
# मुंबईचा वृत्तांत




बाळकृष्ण बापू आचार्य
मोरो विनायक शिंगणे

संपादक बापूराव नाईक

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई

52
B

# मुंबईचा वृत्तांत

(या १८८९ साली प्रसिध्द झालेल्या पुस्तकाचे
विस्तृत प्रस्तावनेसह यथामूल पुनर्मुद्रण)

बाळकृष्ण बापू आचार्य
मोरो विनायक शिंगणे

संपादक : बापूराव नाईक

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,
मुंबई, १९८०

मूलावृत्ती १८८९
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे प्रथम मुद्रण १९८०
पुनर्मुद्रण, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, २०११

मूल्य : रु. ३५२.००

प्रकाशक:
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

मुद्रक
अरूण नाईक,
अक्षर प्रतिरूप प्रा. लि.,
४२, आंबेकर मार्ग, मुंबई ४०० ०३१



बाळकृष्ण बापू आचार्य



मोरो विनायक शिंगणे

# मुंबईचा वृत्तांत

वाय-४२५-अ

# निवेदन

' मुंबईचे वर्णन ' हे कै. माडगावकराचे पुस्तक मुंबई शहरातील मराठीतील पहिले पुस्तक होय. त्याशिवाय १८८९ मध्ये प्रसिध्द झालेले 'मुंबईचा वृत्तांत' हे बाळकृष्ण बापू आचार्य व मोरो विनायक शिंगणे यांनी लिहिलेले तत्कालीन मुंबईशहराबद्दल साद्यत माहिती देणारे असे पुस्तक तेवढेच महत्वाचे आहे. हे पुस्तक अनेक वर्षे दुर्मीळ होते. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या त्यावेळच्या अध्यक्षांनी त्याचे आवर्जुन पुनर्मुद्रण केले. आजच्या मुंबई शहराचे स्वरूप दीडशे वर्षापूर्वी कसे होते त्याचा इतिहास, भूगोल, रचना, चतुःसिमा इंग्रजी आमदानीतील तेथील कारभार, नागरी व्यवस्था आणि स्थानिक स्वराज्य आदी अनेक विषयांची माहिती 'मुंबईचा वृत्तांत ' मध्ये वाचावयास मिळते. आजच्या पिढीला ही सर्व माहिती व वर्णन वैशिष्ट्यपूर्ण वाटेल.

मुंबईसारख्या सतत बदलत्या व विकसित होणा-या शहराबद्दल असे माहितीपूर्ण पुस्तक उपलब्ध असणे ही एक ऐतिहासिक गरज आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या महत्त्वपूर्ण पुस्तकाचे यथामूल पुनर्मुद्रण करावयाचे ठरवून आज ते पुस्तक वाचकांच्या हाती दिले आहे. वाचकांची जुन्या मुंबईबद्दलची जिज्ञासा हे पुस्तक पूर्ण करील असा विश्वास वाटतो.

**(मधु मंगेश कर्णिक)**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

स्थळ : मुंबई

दिनांक ३ ऑक्टोबर, २०११.

# निवेदन

एकोणिसाव्या शतकात व विसाव्या शतकातील पहिल्या जागतिक युद्धाच्या काळापर्यंत मराठी साहित्यातील सिद्ध झालेली महत्त्वाची व पुस्तकांच्या बाजारात उपलब्ध न होणारी पुस्तके पुनःप्रकाशित करण्याचे धोरण महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने ठरवले. अशा प्रकारची पुस्तके जर महाराष्ट्रातील खाजगी प्रकाशक व साहित्यिक संस्था यांनी प्रकाशित करण्याचे ठरवले तर मंडळ त्यांना अनुदान देण्याचा विचारही करते.

अशा साहित्याचे महत्त्व अनेक प्रकारचे आहे. मराठी साहित्याची शैली बदलत व विकसित होत गेली आहे ; कविता, कथा , लघुकथा यांचा आशय आणि आकृतिबंध वेळोवेळी बदलला आहे. ऐतिहासिक व भौगोलिक वर्णनांची पद्धती यांच्यात फरक पडत गेलेला आहे. वैचारिक निबंध व प्रबंध यांच्यातील ध्येयवाद व तत्त्वप्रतिपादन यांमध्ये नवीन नवीन भर पडत गेली आहे ; जीवनमूल्यांमध्ये व सामाजिक परिस्थितीमध्ये जे परिवर्तन होत आहे त्याचाही वेळोवळी वेगवेगळा ठसा साहित्यात उमटलेला आहे. या सर्व परिवर्तनांचे भिन्न भिन्न आविष्कार आज अनुपलब्ध असलेल्या ज्या ज्या जुन्या मराठी साहित्यात आढळून येतात, ते ते साहित्य मराठी वाचकाला उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाने अंगावर घेतली आहे.

अशा साहित्यामध्ये कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची ***निबंधमाला***, कै. आगरकरांचे निबंध इत्यादी वैचारिक साहित्य येते. कै. न्यायमूर्ती रानडे यांच्या ***राईज् ऑफ मराठा पॉवर*** किंवा कै. नारायण गद्रे यांच्या ***महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग*** हे ग्रंथ येतात. यापैकी ***निबंधमाला*** मंडळाने प्रकाशनार्थ स्वीकारली आहे. आणि दुसरे दोन ग्रंथ प्रकाशित केले आहेत. कै. माडगावकर यांचे ***मुंबईचे वर्णन*** आणि कै. बाळकृष्ण बापू आचार्य व मोरो विनायक शिंगणे यांच्या ***मुंबईचा वृत्तांत*** या पुस्तकांचाही मौलिक ग्रंथात समावेश होतो.

कै. माडगावकरांचे ***मुंबईचे वर्णन*** हे पुस्तक मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाने या पूर्वीच पुनर्मुद्रित केले आहे. परंतु ***मुंबईचा वृत्तांत*** हे १८८९ मध्ये प्रसिद्ध झालेले पुस्तक आज अनेक वर्षे अनुपलब्ध होते. मुंबई या महाराष्ट्राच्या राजधानीचा वृत्तांत इ. स. १४०० पासून १८८८ पर्यंत या पुस्तकात दिलेला आहे. त्याचे पुनर्मुद्रण करावे असे मंडळाने ठरवले. मुंबई शहराच्या आणि उत्तर कोकणच्या इतिहासात अलिकडे बरेच नवे संशोधन झाले आहे. त्याची माहिती या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणात घ्यावी असे मंडळाने ठरविले आणि या पुनर्मुद्रित पुस्तकाचे संपादन मंडळाचे सुरुवातीपासूनचे सदस्य श्री. बापूराव नाईक यांच्याकडे सोपवले.

मुंबई शहराचा आणि परिसराचा इतिहास अलिकडे उपलब्ध झाला आहे. मंडळाचे माजी सदस्य म. म. डॉ. वा. मि. मिराशी यांनी या अज्ञात इतिहासावर नवा प्रकाश टाकला आहे. त्या माहितीचा उपयोग संपादकांनी प्रस्तावनेत करून घेतला आहे. मुंबई नगरीतल्या प्रगतीची माहिती साक्षेपाने गोळा करून प्रसिद्ध करण्यात श्री. शां. शं. रेगे यांनी मोलाची कामगिरी केलेली आहे. त्या माहितीचा उपयोगही प्रस्तावनेत केला आहे, असे दिसून येईल.

मूळ पुस्तक १८६९ साली निर्णयसागर मुद्रणालयात मुद्रित झाले. त्याचे यथामूल मुद्रण प्रतिरूप पद्धतीने केले आहे. मराठीतील यथामूल पुनर्मुद्रण केलेले हे पहिलेच पुस्तक ठरावे. या पुस्तकाच्या संपादनाची जबाबदारी पार पाडल्याबद्दल श्री. बापूराव नाईक आणि सुव्यवस्थित मुद्रण केल्याबद्दल अक्षर प्रतिरूप मुद्रणालयाचे श्री. अरुण नाईक यांचे आभार मानले पाहिजेत.

**लक्ष्मणशास्त्री जोशी,**

नारळी पौर्णिमा : अध्यक्ष,

दिनांक २५ ऑगस्ट, १९८०. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

# संपादकीय प्राक्कथन

**मुंबईचा वृत्तांत** हे पुस्तक १८८९ मध्ये प्रसिद्ध झाले. त्याचे पुनर्मुद्रण करायचे ठरले तेव्हा ते संपादण्याची जबाबदारी मंडळाने माझ्याकडे सोपवली. सुरुवातीला असा विचार होता, की मूळ पुस्तकात जागजागी खुणा करून टीपा द्याव्या. हे काम हाती घेतल्यावर माझ्या असे लक्षात आले, की टीपा फारच होतील शिवाय मूळ पुस्तक नव्याने जुळवावे लागेल. हे पुस्तक निर्णयसागरच्या प्रारंभीच्या मुद्रणाचा एक नमुना आहे. ते मूळाबरहुकुम मुद्रित करणे इष्ट. तेव्हा टीपांऐवजी विस्तृत प्रस्तावना लिहून त्यात जादा माहिती द्यावी असे ठरवले.

मुंबईच्या इतिहासाविषयी, खरे म्हणजे एकंदर कोकणच्या इतिहासाविषयी, बरीच माहिती अलिकडे उपलब्ध झाली आहे. त्यात मोठा वाटा महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी यांनी उचलला आहे. मुंबईच्या घडणीत महत्त्वाचा भाग गव्हर्नर आंगियर यांनी घेतला. त्याची माहिती प्रस्तावनेत दिली आहे. मुंबईतील प्रसिद्ध स्थळांबाबतची माहिती मूळ पुस्तकात आली आहे. परंतु अलिकडे मुंबईच्या इतिहासाचे अभ्यासक श्री. शा. शं. रेगे यांनी प्रसिद्ध केलेल्या माहितीच्या आधारे प्रस्तावनेत संक्षेपाने लिहिले. शिवाय मुंबईची वाहतुकव्यवस्था, नगरव्यवस्था, स्थानिक स्वराज्याची वाटचाल यावर विस्ताराने लिहिले आहे. मुंबईचा १८८८ चा म्युनिसिपल कायदा या नगरीच्या प्रगतीतील महत्त्वाचा टप्पा आहे. म्हणून प्रारंभापासून १८८८ पर्यंतचा नगरव्यवस्थेचा इतिहास संक्षेपाने दिला आहे. या विषयावरील मि. वाच्छा यांचे इंग्रजी पुस्तक वाचनीय

आणि माहितीपूर्ण आहे. त्याच्या आधारेच मुख्यतः प्रस्तावनेतील या विषयावरचा मजकूर लिहिला आहे.

प्रस्तावनेत १८८८ नंतरच्या मुंबईच्या प्रगतीचा आढावा घेतलेला नाही, कारण तो एका स्वतंत्र पुस्तकाचा विषय आहे. मूळ पुस्तकात मुंबईचे नकाशे होते असा उल्लेख आहे. परंतु मला उपलब्ध झालेल्या सहा प्रतींपैकी एकीतही नकाशा आढळला नाही.

क्रॉफर्डच्या कारकीर्दीत मुंबई शहरातल्या व्यवस्थेसंबंधी एक अहवाल प्रसिद्ध झाला होता. त्यात चांगली रेखाचित्रे प्रसिद्ध झाली होती. त्यापैकी काही पुनर्मुद्रित केली आहेत. शिवाय जुन्या मुंबईची कल्पना आणून देणारी काही छायाचित्रेही दिली आहेत. त्यापैकी काही मुंबईच्या गॅझेटियर मधून घेतली आहेत. हा त्रिखंडात्मक ग्रंथ अलिकडेच पुनर्मुद्रित झाला आहे. त्याचे मराठी भाषांतर प्रसिद्ध होणे आवश्यक वाटते.

मूळ पुस्तकात सूची नाही. परंतु अनुक्रमणिकेत सर्व विषयांची नोंद केली आहे.

मुंबईच्या रस्त्यांच्या जुन्या नावांचा मूळ पुस्तकात ठिकठिकाणी निर्देश आला आहे. आजची त्यांची नावे कळणे आवश्यक वाटते. म्हणून त्यांची यादीही तयार करून (जुन्या नावांच्या) वर्णानुक्रमाने दिली आहे. या यादीचा आजच्या वाचकास उपयोग होईल असे वाटते.

या पुस्तकाचे संपादन माझ्याकडे देऊन मुंबईच्या इतिहासाच्या अभ्यासास उजाळा देण्याची संधी दिल्याबद्दल मी साहित्य संस्कृती मंडळाचा आभारी आहे.

मुंबई :
बापूराव नाईक
दिनांक २५ ऑगस्ट, १९८०.

## अनुक्रमणिका

निवेदन (३) - (६)

संपादकीय प्राक्कथन (७) - (८)

प्रस्तावना एक ते छ्यान्नव

माडगांवकरांचे **मुंबईचे वर्णन**. . . . **दोन** ; मुंबईचे भाविक लोक : कॉर्नवॉलीसच्या पुतळास नवस . . . . **तिन** ; प्रस्तुत ग्रंथ : **मुंबईचा वृत्तांत** . . . . **चार** ; मुंबईचा प्राचीन इतिहास . . . . **पाच** ; मुंबईचे पहिले रहिवासी : कोळी . . . .**पाच** ; अपरांत : कोकणपट्टीचा उत्तर भाग . . . . **सहा** ; महाभारतकालीन अपरान्त. . . . **सात** ; मुंबई-साष्टी-सोपारा : भारताचे प्रवेशद्वार . . . . **नऊ** ; उत्तर कोकणावरील मौर्य राजसत्ता . . . . **दहा** ; मुंबईच्या प्राचीन इतिहासाची साधने. . . . **अकरा** ; सातवाहन कुलाचा उदय . ... . **अकरा** ; सातवाहनांची मातृभाषा महाराष्ट्री . . . . **बारा** ; सातवाहनांची मूळ राजधानी पैठण . . . .**चौदा** ; सातवाहनांचे परधर्म सहिष्णुत्व. . . . **पंधरा** ; प्राचीन वाङ्मयातील अपरान्ताचा उल्लेख . . . . **सोळा** ; सातवाहन काल. . . .**सोळा** ; राष्ट्रकूटांकडून शिलाहारांकडे . . **सतरा** ; नागांची राज्ये आणि कलचूरी काल . . . . **अठरा** ; उत्तर कोकणातील बंदरातून आयात-निर्यात. . . . **एकोणीस** ; वाकाटकांचा कोकणाशी संबंध. . . . . **एकोणीस** ; चालुक्य राजांची कारकीर्द. . . . **वीस**, चालुक्यराजाचे कारभारी राष्ट्रकूट. . . .**एकवीस**, राष्ट्रकूटांची राजधानी पूरी कोणती ? **बावीस**, शिलाहारांचे राज्य आणि राज्यशाखा . . **तेवीस** ; शिलाहार राज्याचा शेवट. . . . **पंचवीस** ; शिलाहारांची कामगिरी आणि मुंबई बेटे . . . .**सव्वीस**, प्राचीन इतिहासात मुंबईचा अनुल्लेख. . . . **सव्वीस** ; मध्ययुगीन मुंबईचा इतिहास : देवगिरीचे यादव. . . .**सत्तावीस**; मुंबईची भाषा. . . .**अठ्ठावीस** ; उत्तर कोकणावरील यादवांचा अंमल . . . .**एकोणतीस** ; बिंबदेवाने केलेली माहीमची वसाहत. . . .**तीस** ; मरोल येथील दुय्यम राजधानी आणि यादवांचा पराभव. . . **एकतीस** ; आधुनिक मुंबईच्या विकासाचा प्रारंभ. . . . **बत्तीस** ; जेरॉल्ड

ऑंगियर मुंबईचे गव्हर्नर. . . . **बत्तीस ;** समुद्रकिनाऱ्यावरील दफनभूमी. . . .**चौतीस ;** राय कामती : वाळकेश्वरचा निर्माता. . . . **छत्तीस ;** मुंबईतील फोर्ट विभाग. . . .**सदतीस ;** पहिले गव्हर्न्मेंट हाउस . . . .**सदतीस ;** ओल्ड गव्हर्न्मेंट हाउस . . . . **अडतीस ;** ओल्ड कस्टम हाउस. . . . .**एकोणचाळीस ;** टाऊन हॉल. . . . . **चाळीस ;** कुलाब्याची दांडी : प्राग्ज दीपगृह. . . . **बेचाळीस ;** मुंबईची न्यायव्यवस्था . . . . **बेचाळीस**, हायकोर्टाची इमारत. . . . **चौरेचाळीस ;** मुंबई महानगरपालिका. . . . **पंचेचाळीस ;** मुंबईतील मार्केट. . . .**सत्तेचाळीस ;** क्रॉफर्ड मार्केट. . . . **अठ्ठेचाळीस ;** राजाबाई टॉवर. . . . **एकोणपन्नास**, एल्फिन्स्टन् कॉलेज. . **पन्नास ;** विल्सन कॉलेज. . . .**बावन्न ;** व्हिक्टोरिया टर्मिनस् . . .**त्रेपन्न;** ॲग्री-हॉर्टिकल्चरल सोसायटी . . . .**चौपन्न;** व्हिक्टोरिया गार्डन आणि आल्बर्ट म्यूझियम. . . . **पंचावन्न ;** आल्बर्ट म्यूझियम मधील वस्तूसंग्रह. . . . **सत्तावन्न ;** वाळकेश्वर मंदिराचा इतिहास. . . . **सत्तावन्न ;** वाळकेश्वरचा परिसर. . . . . **अठ्ठावन्न ;** गावदेवी, लीलावती देवीचे देऊळ. . . .**एकोणसाठ**, जुम्मा मशिद . . . . **एकोणसाठ ;** माहीम : मकदुम फकि अल्लीचा दर्गा . . . . **एकसष्ट ;** सेंट टॉमस कथीड्रल आणि सेंट ॲन्ड्र्यूज चर्च . . . . **बासष्ट ;** नोसा सेन्होरा डा ग्लोरिआ . . . .**त्रेसष्ट ;** पारशी स्मशानभूमी आणि अग्याऱ्या . . . . . **चौसष्ट**.

**मुंबईतील वाहतुकीची व्यवस्था आणि विजेचा वापर :**

मुंबईची वाढ आणि वाढत्या गरजा. . . . **पासष्ट ;** रेकले शिग्राम आणि पालखी . . . . **सहासष्ट ;** आगगाडीची कल्पना आणि प्रयत्न . . . . **सदुसष्ट ;** आगगाडीचा पहिला प्रवास . . . . **सदुसष्ट ;** ट्रामगाड्यांची सुरवात . . . .**अडुसष्ट ;** बी. इ. एस्. टी. ची स्थापना . . . .**एकोणसत्तर ;** शेवटची ट्रॅम आणि बस गाड्यांची सुरुवात. . . . **एकाहत्तर ;** ट्रॉली बसची सुरुवात . . . . **बाहत्तर ;** मुंबईत विजेचे आगमन . . . . **बाहत्तर ;** रस्त्यावरील विजेचे दिवे. . . . **त्र्याहत्तर ;** बेस्टची स्थापना आणि म्युनिसिपालटीशी करार. . . . **चौऱ्याहत्तर ;** बेस्टची मुख्य कचेरी आणि व्यवस्थापन. . . . **पंचाहत्तर.**

**मुंबईची नगरव्यवस्था स्थानिक स्वराज्य :**

जे. पी. च्या संस्थेचा उगम. . . .**शहात्तर** ; नगरव्यवस्था जे. पीं. कडे . . .**शहात्तर** ; पहिल्या म्युनिसिपल कमिशनरची नेमणूक. . . . **सत्त्याहत्तर** ; म्युनिसिपालटीचा १८६५ चा कायदा आणि क्रॉफर्डची नेमणूक. . . . **अठ्ठ्याहत्तर** ; दक्षिण मुंबईची पुनर्रचना. . . .**एकोणऐंशी** ; पहिली नगरपालिका. . . . **एकोणऐंशी** ; पूर्वीची तीन कमिशनरची योजना आणि नगरव्यवस्था. . . **ऐंशी** ; १८६५ पूर्वीची नगरव्यवस्था . . . .**ऐक्याऐंशी** ; नव्या कमिशनरची नेमणूक आणि अधिकार. . . . . **ब्याऐंशी** ; क्रॉफर्डचा एकहाती कारभार . . . . . **त्र्याऐंशी** ; जे. पी. संस्था जागृत झाली. . . . **चौऱ्याऐंशी** ; क्रॉफर्डच्या कारकिर्दीवरील टीका आणि उपाय. . . . **शहांऐंशी** ; फोबर्सची कामगिरी. . . . **सत्त्याऐंशी** ; फेरोजशहा मेहतांच्या कारकिर्दीचा उगम आणि कामगिरी. . . .**अठ्ठ्याऐंशी** ; क्रॉफर्ड प्रकरण आणि क्रॉफर्डचे समर्थन. . . . **अठ्ठ्याऐंशी** ; क्रॉफडवरील कार्यवाही. . . . **नव्वद**; क्रॉफर्डबद्दल फेरोजशहांचे उद्गार . . . . **ऐक्क्यान्नव** ; लोकमान्य टिळक आणि क्रॉफर्ड प्रकरण दुसरे. . . . **ब्यान्नव** ; १९७२ च्या सुधा म्युनिसिपल कायद्याचा मसुदा. . . .**त्र्यान्नव** ; नव्या कायद्यावरील जे. पी. मंडळाची चर्चा . . . .**चौऱ्यान्नव** ; घरपट्टी आणि इतर कर अशी टीका . . . **पंच्यान्नव** ; स्थानिक स्वराज्याचा दुसरा हप्ता : १८८८ चा कायदा. . . . **छ्यान्नव.**

**मुंबईचा वृत्तांत :**

प्राचीन आणि अर्वाचीन वर्णनात्मक नकाशांसह.

**लेखक** : बाळकृष्ण बापू आचार्य व मोरो विनायक शिंगणे, १८८९.


| | |
|---|---|
| प्रस्तावना | एक ते एकशेदहा |
| अनुक्रमणिका | एकशे अकरा ते एकशे चोवीस |
| मुंबईचा वृत्तांत | १ ते ३८० |
| परिशिष्ट | ३८१ ते ४१३ |


**परिशिष्टे :**


| | |
|---|---|
| मुंबईतील रस्त्यांची बदललेली नावे<br>उपनगरातील रस्ते | ४१४ ते ४२८ |


**विशेष चित्रपत्रे आणि छायाचित्रे.**

# प्रस्तावना

मुंबई हे आज भारतातील पहिल्या क्रमाकांचे शहर बनले आहे. लोकसंख्या, आर्थिक उलाढाल, पहिल्या प्रतीचे बंदर, बहुभाषी नागरिकांची एकत्र वस्ती, अग्रेसर विद्यापीठे, समर्थ महानगरपालिका, चांगली नागरी वहातुकयोजना, उज्वल परंपरेची न्यायदान व्यवस्था, या आणि इतर अनेक दृष्टींनी हे शहर भारतात आपले पहिले स्थान आजही टिकवून आहे. या शहराची वाढ आणि प्रगती मात्र गेल्या तीनशे वर्षांच्या आतली आहे. प्राथमिक अवस्थेतील मुंबईचे वर्णन एका कवीने केले आहे :

निमे मुंबई सागरामाजी होती ।
बहू लोकवस्ती असी तै न होती ।।
महाघोर राने तशा शेतवाड्या ।
लघू झोपड्या झांवळ्यांच्या कवाड्या ।।

मुंबईचे वर्णन गोविंद नारायण माडगांवकर करतात ते असे :

जे मुंबई शहर सांप्रत (१८६३) इतक्या वैभवास चढले आहे ते सन १५३०त ज्यावेळी मुसलमानांकडून पोर्टूगीझ् लोकांच्या हाती आले त्यावेळी केवळ रानवट व ओसाडगांवासारखे असून त्यांत सुमारें लहान मोठी मिळून ४०० घरे होती आणि पाच हजार लोकांची वस्ती होती. ती केवळ कोळी, भंडारी आणि पांचकळसी या जातींची असे आणि जमिनींचा वसूल सरकारास दरसाल ७०० असुरफ्या म्हणजे अदमासे ३५० रुपये होत असे.

पुढील तीनशे वर्षांत मुंबईची इतकी प्रगती झाली, की १८६१ मध्ये सरकारी जामदारखान्यात तीन कोटी साडेबारा लाख रुपये होते. ही रक्कम एकूण हिंदुस्थानच्या शिलकीच्या पंचवीस टक्के भरते. मुंबईची ही प्रगती डोळ्यात भरण्यासारखी होती.

> पहा ! आज (१८६३) मुंबईमध्ये गरीब दुबळा, लंगडालुला, आंधळा-पांगळा, बहिरामुका, भलाबुरा, चोरचोरटा, थोंटलबाड, खुळाभोळा, सोंगी-ढोंगी, कोणी कसाही आला असता अन्नवस्त्रास मरत नाही . . . उद्योग मात्र केला पाहिजे म्हणजे शहरात मनुष्य पाजीचा गाजी होतो.

ही स्थिती आजही आहे !

१८६१ मध्ये मुंबईची लोकवस्ती पाच लाख होती. आज ती सत्तर लाखाच्या घरात गेली आहे. म्हणजे तुलनेने शंभर वर्षांपूर्वी मुंबईत अतिविरळ वस्ती होती असे म्हटले पाहिजे. मुंबईची हवा बरी वाटे. " कित्येक इंग्रजी बाहेरगावाहून हवा पालटण्याकरिता मुंबईस येतात." तरी रोगराईबद्दल तक्रार होतीच. माडगांवकरांच्या मते :

> हल्ली मुंबईतील हवा केवळ निरोगी नसण्याचें कारण फक्त लोकांची गर्दी. जमिनीचा व हवेचा गुण नव्हे.

**मुंबई शहरावरील मराठी ग्रंथ : मुंबईचे वर्णन :**

अशा या शहराचा अद्ययावत् सुसंगत इतिहास मात्र मराठीमध्ये एकत्र उपलब्ध नाही, ही मोठीच उणीव आहे. मुंबई शहराविषयी माहिती देणारे पहिले मराठी पुस्तक म्हणजे श्री. गोविंद नारायण माडगावकर यांचे *मुंबईचे वर्णन*. हे १८६३ मध्ये प्रसिद्ध झाले.

> इंग्रजी राज्याच्या पहिल्या पंचवीशीत (१८२० नंतर) मुंबई शहरामध्ये जे लोकहिताच्या कळकळीचे साहित्यसेवक उदयास आले त्यांत *मुंबईचे वर्णन* या ग्रंथाचे लेखक प. वा. गोविंद नारायण माडगांवकर (१८१५-१८६५) यांना पुष्कळच वरचे स्थान द्यावे लागते.

असा अभिप्राय प्रा. न. र. फाटक यांनी प्रस्तुत पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीत (१९६१) व्यक्त केला आहे. माडगांवकरांनी विल्सन हायस्कूलात तीस वर्षे अध्यापन केले. ते क्रमिक पुस्तक लेखनसमितीचे सदस्य आणि परीक्षकही होते. अनेक निबंध, दोन नाटके आणि इतर अनेक पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. *मुंबईचे वर्णन* हा त्यांचा प्रमुख ग्रंथ.

मुंबईविषयी ग्रंथ लिहायचे ठरवल्यावर एतद्विषयक सर्व सामग्री जमा करण्याचा उद्योग त्यांनी सुरू केला. त्यात कालापव्यय होतो हे त्यांच्या लक्षात आल्यावर, आणखी किती वेळ थांबायचे असा त्यांना प्रश्न पडला. ते लिहितात :

> हीं सर्व साधनें जमवीन म्हटलें तर जन्म गुदरेलें तरी साध्य होणे कठीण, आणि आयुष्य तर नदीवेगासारिखें झपाट्यानें जातें, व पुढेंही जर असेच आज-उद्यां असें करून आळसांत दिवस घालविले, तर ज्या थोड्या बहुत गोष्टी प्रयासानें जमविल्या आहेत, त्याही शेवटीं जेथल्या तेथेंच राहतील. असें लक्षांत आल्यावरून सामग्रीची जी तरतूद होती ती सामर्थ्यानुसार गोळा करून ही रचना केली आहे. श्रीमान् लोक हजारो रुपयें खर्चून रमणीय वाडे व बंगले बांधितात म्हणून गरिबानें आपलें कोलव्याचें झोपडें बांधावयास आळस करू नये.
>
> म्हणून त्यांनी *मुंबईचें वर्णन* लिहायचे नक्की केले.
>
> आपल्या देशाचा इतिहास लिहिण्याचा उद्योग करावा असा मनोरथ होता (परंतु) हे सिद्धीस जाण्यास बुद्धि, द्रव्य व शरीरसंपत्ति हीं अनुकूल असलीं पाहिजेत . . . म्हणून अशा कृत्यास हात घातला नाही.

असे त्यानी सखेद नमूद केले आहे. "ज्ञान प्राप्त करून जन्माचे सार्थक करावे हाच या ग्रंथाचा उद्देश" असे माडगांवकरांनी म्हटले आहे. त्यांचे *मुंबईचें वर्णन* त्यांच्या लेखन शैलीमुळे अपूर्व झाले आहे. त्यातील माहिती तर मौलिक आहे, परंतु ती ज्या प्रकारे मांडली आहे ती शैली आल्हाददायक आहे. मुंबईचे वैशिष्ठ्य त्यांनी अचूक टिपले आहे.

## मुंबईचे भाविक लोक : कॉर्नवॉलीसच्या पुतळ्यास नवस

सामान्य मुंबईकरांची वैशिष्ठ्ये जागजागी माडगांवकरांनी नोंदली आहेत. त्यातील एक पहा. आजच्या टाऊन हॉल समोरील हॉर्निमन सर्कल मध्ये लॉर्ड कॉर्नवालीसचा पुतळा आहे. त्याबद्दल लिहिताना ते म्हणतात :

> ह्या पुतळ्यास कित्येक हमाल व दुसरे गरीब गुरीब लोक भजत व नवस घेत, व त्या समोर नारळ, विडा दक्षिणा ठेवून मानणुक करीत. परंतु

अलिकडे सरकारनें हे खूळ बंद करून टाकिलें आहे. आमचे लोक काय विचारतां! सर्व गोष्टींत भोळे! दगडास कांहीं आकृति दृष्टीस पडली कीं, नारळ घेऊन त्या पुढें हात जोडायास धांवले; विचार करायचे भरीस पडायचे नाहींत.

अशाच एका इंग्रजाच्या पुतळ्यासमोर भक्त मंडळीची पूजाअर्चा चाले. तो गोंधळ बंद करण्यासाठी सरकारला पुतळ्याभोवती कठडा घालून संत्री बसवावे लागले, तेव्हा कुठे हा प्रकार बंद पडला अशीही नोंद करण्यात आलेली आहे.

मुंबईस येणाऱ्या मारवाड्यांचे जे मोठे मार्मिक वर्णन केले आहे, ते मुळातूनच वाचले पाहिजे. शेवटी माडगांवकर म्हणतात :

मुंबईत लोक गेले म्हणजे मिजास करायास लागतात व उधळे होतात, असा पुष्कळ लोकांचा समज आहे, परंतु मुंबई सोडून विलायतेस गेले तरी मारवाडी लोकांचा कृपणपणा सुटायचा नाही. लोकांचे गाडीघोडे, शाली दुपेटे व वस्त्र अलंकार हीं पाहून त्यांचा उपभोग आपण घ्यावा असी त्यांच्या मनांत कल्पांतींही इच्छा उत्पन्न व्हावयाची नाही. आतां जे मोठेमोठे सावकार आहेत ते गाडीघोडे ठेवितात खरें, परंतु त्यांचा झाला तरी वस्त्रप्रावरणाकडे खर्च थोडाच.

अर्थात अशा प्रकारे काटकसरीने राहून मारवाड्यांनी भांडवल उभे केले आणि गेल्या शंभर वर्षांत अनेक उद्योगधंदे भरभराटीला आणले हे लक्षात घेतले पाहिजे.

माडगांवकरांच्या वर्णनात मुंबईतील दिनचर्या, विविध जमाती, शहरातील निरनिराळे भाग, देवळे, आगगाडी, इमारती, रस्ते, वस्तुसंग्रहालये, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे इत्यादींचे मोठे रसभरित आणि रोचक वर्णन केले आहे ते मनोरंजक आणि वाचनीय झाले आहे.

**प्रस्तुत ग्रंथ : मुंबईचा वृत्तांत**

मुंबईविषयीचे दुसरे पुस्तक म्हणजे *मुंबईचा वृत्तांत*. हे ' प्राचीन आणि अर्वाचीन वर्णनात्मक नकाशासह ', बाळकृष्ण बापू आचार्य व मोरो विनायक शिंगणे यांनी लिहिले आणि निर्णयसागर छापखान्यात छापून १८८९ मध्ये प्रसिद्ध केले. आपल्यापुढील कार्याचा त्यांना योग्य अंदाज होता.

ज्या देशाचा किंवा प्रान्ताचा इतिहास लिहावयाचा, त्याची पूर्ण माहिती ग्रंथकारास असली पाहिजे ; तेथींल अनेक वयोवृद्ध व अनुभवशीर अशा गृहस्थांचा त्याच्याशीं परिचय असला पाहिजे, व त्यानें त्या कामीं साधनीभूत अशा अनेक ग्रंथाचें अवलोकन केलें पाहिजे. इत्यादी साधनांपैकीं आम्हापाशीं एकही पुरें साधन नसतां आम्हीं हें धाडसाचें- आणि त्यांत मुंबईसारख्या वैभवशाली शहराचा वृत्तांत लिहिण्याचें काम हातीं कां घेतलें असा प्रश्न साहजिक उत्पन्न होईल. होय. प्रश्न अगदीं बरोबर आहे. आह्मींही पूर्ण जाणत आहों की, हें काम आमच्या शक्तीपलिकडे आहे हें खचीत. तरी पण, यथाशक्ती प्रयत्न करून जी अल्पस्वल्प माहिती मिळविली ती तशीच दाबून न ठेवितां लोकांपुढे आणावी, बरीवाईट कशी काय असेल तशी त्यांचे ते पाहून घेतील; आणि आमचे दोष आम्हांस दाखवितील . . .

असे लेखकद्वयीने प्रस्तावनेतच लिहून ठेवले आहे. ज्या पुस्तकांची त्यांनी मदत घेतली त्यात *म्याक्लिन्स गाईड टु बॉम्बे, बुक ऑफ बॉम्बे, मुंबईचें वर्णन, राऊंड अबाऊट बॉम्बे; मुंबईनो बहार (भाग १ ला), बिंबाख्यान* इत्यादींचा समावेश आहे.

## मुंबईचा प्राचीन इतिहास

मुंबई बेट साष्ठी तालुक्याखाली कुलाबा तालुक्याच्या पश्चिमेस समुद्रात पसरले आहे. कुलाब्यापासून माहीमखाडीपर्यंतच्या भागात पूर्वी सात बेटे होती. त्यांच्यामधील भाग पाण्याखाली होता. त्यात भर घालून आता हे मुंबई बेट बनले आहे. साष्टी तालुक्यातील वांद्र्यापासून मुलुंड पर्यंतचा भाग आजच्या बृह्नमुंबईत समाविष्ट आहे. *मुंबईच्या वृत्तांतात* मात्र त्याकाळी मुंबईत समाविष्ट असलेल्या माहिमखाडीपुढील वांद्र्यापर्यंतच्या भागांचाच वृत्तांत दिलेला आहे.

## मुंबईचे पहिले रहिवासी : कोळी

फार प्राचीन काळापासून मुंबई बेटे आणि त्याच्या पूर्वेचा प्रदेश 'अपरान्त' प्रान्तात अंतभूत होता. अपरान्त म्हणजेच उत्तर कोकण. अलग अलग अशा सात बेटांना मध्ये भर घालून आणि जोडून मुंबई बेट तयार झाले,

अशी वस्तूस्थिती असली तरी मुंबईची सात बेटे पूर्वी एकसंध असावीत आणि तो मुख्य भूप्रदेशाचाच सलग भाग असावा असे स्पष्ट दिसते. या प्रदेशात घनदाट जंगल होते. त्याचे अवशेष गोदी भागात उत्खनन करताना खैरांच्या झाडांचा गाडलेल्या स्थितीत आढळ झाला, त्यात दिसून येतात. इथले पहिले रहिवासी कोल जमातीचे होते. ही जमात डोंगराळ भागात वस्ती करून असणारी आदिवासी जमात होती. महादेव आणि अंबा ही त्यांची दैवते. कळसूबाई (सह्याद्रीतील अत्युच्च शिखर), महाबळेश्वर, ठाणे तालुक्यातील एकवीरा देवीचे स्थान, यांना कोळी भजतात. ते लोक किंवा मुंडा या प्रोटोऑस्ट्रॉलाईड जमातींचे आजचे प्रतिनिधी. ते मूळचे गौंड. ऐतिहासिक काळात कोळी लोकांची डोंगरी किल्ल्याच्या पायथ्याशी वस्ती होती. त्यांच्यातील कित्येक ' नायक ' किल्लेदार नेमले जात. समुद्र सपाटीच्या प्रदेशात शेती, मच्छिमारी आणि नौकानयन हा व्यवसाय सुरू झाला. डोंगराळ प्रदेशातून खाली उतरल्यावर त्यांचा द्रविड (सिंधू) संस्कृतीशी संबंध आला आणि तांदुळ पिकवण्यास आणि ताड-खजुरी यांची लागवड करण्यास सुरूवात झाली.

कोळी सर्व कोकण किनाऱ्यावर पसरले आहेत. मुंबादेवी ही मुंग कोळ्यांची देवी. द्रविड संस्कृतीत शिवाची (पशुपती) आणि मातृदेवतांची पूजा होती. तिचा यानी स्वीकार केला. तत्पूर्वी सर्पपूजा, वृक्षपूजा, लिंगपूजा आणि भुताखेतांची पूर्वजपूजा, त्यांच्यामध्ये होती. तीही कायम राहिली. आर्य टोळ्या भारतात इ. स. पूर्व तिसऱ्या सहस्त्राकात येऊ लागल्या आणि त्यानी कोलादी अनार्य जमाती आणि द्रविडांना दक्षिणेकडे लोटण्यास सुरूवात केली.

**अपरांत : कोकणपट्टीचा उत्तरभाग**

'अपरान्त ' शब्दाचा अर्थ पश्चिमेकडील शेवटचा प्रदेश. हा भाग उत्तर कोंकणात मोडतो. कोंकण हा पश्चिम किनारपट्टीचा दमणगंगेपासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंतचा भाग. प्राचीन ग्रंथात 'कुंकण ' हा शब्द येतो. अकराव्या शतकांतील खारेपाटण लेखात कोंकण, कुंकण यांचे निर्देश आहेत. सातव्या शतकांतील *प्रपंचहृदय* या ग्रंथात सात कोकणाचा

उल्लेख आहे. ती अशी : कूपक, केरळ, मूषक, आळुक, पशू, कोंकण आणि परकोंकण. सह्याद्रिखंडात दिलेली त्यांची नावे : केरळ, तुलंग, सौराष्ट्र, कोकण, करहाट, करनार आणि बर्वर. यातील पाठभेद असे : केरळ, तुलिग, गोराष्ट्र, कोकण, कुडाळ, वरालाट आणि बर्बर. यातील कुडाळ (रत्नागिरी जिल्ह्यामधील जुन्या सावंतवाडी संस्थानातील उत्तर भाग) आणि कर्नाटकच्या उल्लेखावरून वेळोवेळी या भूभागांच्या नावात फरक होत राहिला असे दिसते. याच भागात मुंबई आणि साष्टी ही ठाणे जिल्ह्यातील बेटे येतात. अपरान्ताचा जुना उल्लेख भीष्म पर्वात येतो.

अपरान्तप्रांताची राजधानी शूर्पारक किवा सोपारा इथे होती. बायबलच्या जुन्या करारात सॉलोमनच्या राज्यात देशोदेशाहून नानाविध वस्तू आयात होत, त्यांची माहिती देताना ऑफीर (ophir) चा उल्लेख केला आहे. हे बंदर म्हणजेच जलमार्गाने आयात निर्यात जेथून होत असे ते शूर्परक-सोपारा बंदर होय असे संशोधकांनी सूचित केले आहे. त्यास विद्वानांची मान्यताही मिळाली आहे.

## महाभारतकालीन अपरान्त*

आपल्याकडील साहित्यात शूर्परकाचा उल्लेख प्रथम महाभारतात मिळतो. पांडवांच्या तीर्थयात्रेसंबंधी पुलस्त्य आणि धौम्य ऋषींनी मार्गदर्शन केले आहे. त्याचा वृत्तांत आरण्यक पर्वातील ८० ते ८८ अध्यायांत आला आहे. या तीर्थांच्या महाभारतात आलेल्या याद्या वेगवेगळ्या काळातील आहेत. तरी त्या बौद्धकाळापूर्वीच्या आहेत असे निश्चितपणे म्हणता येते. पांडवांचा काळ इ. स. पूर्व चौदावे शतक हा आहे असे आता मान्य झाले आहे. ' अपरान्त ' हा शब्द प्राचीन वाङ्मयांत वेगवेगळे प्रदेश निर्दिष्ट करण्यासाठी वापरात आलेला आहे. तिथे पश्चिमेकडील प्रदेश असा त्याचा अर्थ आहे. अपरान्त शब्द उत्तर कोकण या अर्थी महाभारतात काही ठिकाणी वापरलेला आहे.

धौम्यांच्या तीर्थक्षेत्र वर्णनात खालील उल्लेख येतात : (आरण्यक पर्व, अध्याय ८८)

वेदी **शूर्पारके** तात जमदग्नेर्महात्मन : ।।१२।।
**गोकर्ण** इति विख्यात स्त्रिषु लोकेषु भारत ।।१५।।
**प्रभास** चोदद्यौ तीर्थं त्रिदभानां युधिष्ठिर ।।२०।।

---

* महाभारतातील उतारे चित्रशाळा आवृत्तीतून घेतले आहेत.

यात पश्चिम किनाऱ्यावरील शूर्पारक, गोकर्ण आणि प्रभास या ह्या तीन तीर्थांचा निर्देश आहे. याशिवाय वनपर्वात ११८ अध्यायात खालील वर्णन आले आहे :

स तानि तीर्थानि च सागरस्य
पुण्यानि चान्यानि बहूनि राजन्।
क्रमेण गच्छन्परिपूर्णकामा :
शूर्पारकं पुण्यतमं ददर्श ।।८।।
तत्रोदधेः कंचिदतीत्य देशं
ख्यातं पृथिव्यां वनमाससाद।
तप्तं सुरैस्त्र तपः पुरस्ता–
दिष्टं तथा पुण्यपरैर्नरेन्दैः ।।९।।
स तत्र तामग्र्यधनुर्धरस्य
वेदीं ददर्शायतपीनबाहू :।
ऋचीकपुत्रस्य तपस्विसङ्घैः
समावृत्तां पुण्यकृदर्चनीयाम् ।।१०।।
ततो वसूनां वसुधाधिपः स
मरुग्दणानां च तथाश्चिनोश्च।
वैवस्वतादित्यधनेश्वराणा–
मिन्द्रस्य विष्णोः सवितुर्विभोश्च ।।११।।
भवस्य चन्द्रस्य दिवाकरस्य
पतेरपां साध्यगणस्य चैव।
धातुः पितृणां च तथा महात्मा
रुदस्य राजन्सगणस्य चैव।।१२।।
सरस्वत्याः सिद्धगणस्य चैव
पुण्याश्च ये चाप्यमरास्तथान्ये।
पुण्यानि चाप्यायतनानि तेषां
ददर्श राजा सुमनोहराणि।।१३।।
तेषूपवासान्विबुधानुपोष्य
दत्वा च रत्नानि महान्ति राजा।
तीर्थेषु सर्वेषु परिप्लुतीङ्ग :
पुनः **शूर्पारक**माजगाम।।१४।।

स तेन तीर्थेन तु सागरस्य
पुनः प्रयातः सह सोदरीयैः।
द्विजैःपृथिव्यां प्रथितं महाद्भि
स्तीर्थं **प्रभासं** समुपाजगाम।।१५।।

युधिष्ठिर आपल्या तीर्थयात्रेत समुद्रतीर्थांची भेट घेत शूर्पारक तीर्थास येऊन पोहचला. तिथून प्रख्यात अशा वनात गेला. तिथे राजांनी पूर्वी यज्ञ केले होते. ऋचीक कुलोत्पन्न (परशु) रामाची वेदी त्याने पाहिली आणि सूर्य, कुबेर, विष्णु, सविता, श्रीशंकर, रुद्र, सरस्वती इत्यादी देवदेवतांच्या मंदिरांना भेट दिली.

महाभारतकालीन हा परिसर म्हणजे सोपारा, वज्रेश्वरी, अंबरनाथ, कल्याण, हा ठाणे जिल्ह्यांतील भाग आहे, हे ध्यानात येते. निर्मळ आणि अंबरनाथ येथील शंकराची मंदिरे, विशेष म्हणजे लोनाडचे आदित्यमंदिर, ही आजही पाहता येतात. आदित्यमंदिर हे तर दक्षिण भागातले एकमेव सूर्यमंदिर आहे. अर्थात आज उभी असलेली मंदिरे पांडवकालातील नसून शिलाहारांच्या काळात जीर्णोद्धार करून नव्याने उभारलेली मंदिरे आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे.

## मुंबई-साष्टी-सोपारा : भारताचे पश्चिम प्रवेशद्वार

महाभारतातील सभापर्वात दुर्योधनाने ‘पांडववैभव’ वर्णन केले आहे. पांडवांकडे देशीदेशीहून नजराणे घेऊन अनेक राजे आले, त्यांनी विविध वस्तू आणल्या होत्या. त्यांत अपरान्ताचा उल्लेख आला आहे.

निशितांश्चैव दीर्घासीनृष्टिशक्तिपरश्वधान्।

अपरान्तसमुभ्दूतांस्तथैव परशूञ्छितान् ।। २८।। (सभापर्व अ. ५१.)

रामायणातील किष्किन्धाकांडात ज्या परशुरामक्षेत्राचा उल्लेख आहे ते स्थान शूर्पारकच असावे, चिपळूण नव्हे, ह्या भागात घनदाट जंगल होते. त्यात हत्तींचा वास होता. येथील मध्यम प्रतीच्या हत्तींचा निर्देश कौटिल्याने केलेला आहे. “भूमिच्छिन्द्र विधानम्” अधिकरणात खालील श्लोक आहे. तिथे हत्तींची माहिती दिली आहे.

कलिङ्ग गजाः श्रेष्ठाः प्राच्याश्चंति करूराजाः
दशार्णाश्चापरान्ताश्चा न्दिपानां मध्यमा मताः ।। २०.२३।।

इसवी सनाच्या पाचव्या शतकापूर्वीही सोपारा बंदरातून मेसेपोटेमियाशी व्यापार चालत असे. पुढे चौल बंदर प्रसिद्धीस आले.

## उत्तर कोकणावरील मौर्य राजसत्ता

उत्तर कोकणात शक, अभीर, लाट, यांचे आगमन झाले होते. या जमातींचा महाभारतात उल्लेख आहे. मौर्य साम्राज्यात कोकणचा अंतर्भाव होता. जंजिऱ्याजवळील राजपुरी ही मौर्यांची राजधानी होती. इथे जवळच कुड्याची बौद्धलेणी आहेत, त्यांत महाभोजी विजयेचा पुत्र महाभोज स्कन्दपालित याचा उल्लेख आहे. जावळीचे मोरे हे मूळचे मौर्य असावेत. परचक्रापासून बचाव करण्यासाठी त्यानी सह्याद्री पर्वतात आश्रय घेतला आणि पुढे सहस्त्र वर्षांनंतर आपली ठाणी प्रस्थापीत केली असावीत असे सुचवण्यात आले आहे.

मौर्य राजसत्ता उत्तर भारतांत (मगध) इ. स. पूर्व चवथ्या शतकाच्या उत्तरार्धात प्रस्थापीत झाली (इ. स. पूर्व ३२२). अशोकाच्या (इ. स. पूर्व २७३-२३२) लेखात 'अपरान्त' देशाचा उल्लेख आहे. खुद्द सोपाऱ्यात अशोकस्तंभाचा अवशेष सापडला आहे. **दीपवंस आणि महावंत** या लंकेत लिहिल्या गेलेल्या ग्रंथात अशोकाच्या कारकीर्दीत सतराव्या वर्षी (इ. स. पूर्व २६६) 'संगीति' तिसरी बौद्धधर्म सभा भरली होती. त्या सभेचा अध्यक्ष मोग्गलीपुत्र तिस्स याने महाधर्म रक्षिताला महाराष्ट्रांत आणि धर्म रक्षिताला अपरान्तात धर्म प्रचारार्थ पाठवण्याचे ठरवले. त्यांची कामगिरी कशी सफल झाली ते सांगताना लेखक म्हणतो :

महारट्ठं इसी गत्वा स्ते महाधम्म रक्खितो ।
महानारद कस्सपा व्हं जातक कथयी तहिं ।।
मग्गफलं पापुणिंसु चतुरासीति सहस्सका ।
तेरसं तु सहस्सानि पब्बजिंसु तदन्तिके ।।

पश्चिम पट्टीतून, कन्याकुमारी रामेश्वरमार्गे, सिंहलद्वीपात आर्यांचा प्रवेश झाला. सिंहली भाषा आर्यभाषेपासून बनवली आहे. यावरून पश्चिम पट्टीतील धर्मप्रसाराची प्राचीन सिंहली लेखकांस प्रत्यक्ष माहिती होती हे सहाजिक आहे.

## मुंबईच्या प्राचीन इतिहासाची साधने

भारताच्या प्राचीन इतिहासाची रचना करताना प्रथम वेदवाङ्‌मय, रामायण महाभारत ही महाकाव्ये, अर्थशास्त्र, स्मृतिग्रंथ आणि पुराणे यांचा आश्रय घेणे आवश्यक ठरते. त्यानंतर जातककथा, पुराणे आणि काव्यनाटकादी साहित्यग्रंथांचा क्रम लागतो. परंतु यातून उपलब्ध होणारा इतिहास संपूर्ण विश्वसनीय नसतो. घटणांची कालनिश्चिती करणे कठीण असते आणि मतभेद फार असतात. उत्खननाचे अहवाल, शिलालेख आणि ताम्रपट हेच विश्वसनीय ऐतिहासिक साहित्य होय. मध्ययुगीन इतिहास त्यावरच आधारित असतो. सुदैवाने महाराष्ट्रांत आढळून येणाऱ्या लेण्यांत आणि इतरत्र असे लेख सापडले आहेत. त्यामुळे इ. स. पूर्व तिसऱ्या शतकापासून इ. स. बाराव्या शतकापर्यंतचा इतिहास उजेडात येऊ लागला आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या इतिहासास उपयोगी अशी लेणी ढोबळ कालानुक्रमाने इथे देतो :

| | | |
|---|---|---|
| १. | कार्ले | इ. स. पूर्व पहिले शतक |
| २. | नाणेघाट | इ. स. पूर्व दुसरे शतक |
| ३. | भाजे | इ. स. पूर्व दुसरे शतक |
| ४. | जुन्नर | इ. स. पूर्व पहिले ते इ. स. तिसरे शतक |
| ५. | कान्हेरी | इ. स. पूर्व पहिले ते इ. स. नववे शतक |
| ६. | घारापुरी (एलिफंटा) | इ. स. तिसरे ते दहावे शतक |
| ७. | लोणगढ (ठाणे) | इ. स. सहावे सातवे शतक |
| ८. | जोगेश्वरी | इ. स. सातवे आठवे शतक |

## सातवाहन कुलाचा उदय

अशोककालीन लेखांमध्ये रथिक, भोज, पेटेनिक या उत्तर कोकणातील साम्राज्य प्रतिनिधींचा उल्लेख येतो. परंतु त्याची जास्त माहिती मिळत नाही.

उत्तर कोकणाचा सलग इतिहास आपल्याला सातवाहन काळापासून माहीत होत आहे. त्या काळाच्या इतिहासाच्या उभारणीत विश्वसनीय

भाग हा शिलालेखांचा आणि नंतर ताम्रपटांचा आहे. सातवाहनकालाचा शेवट इ. स. २१० मध्ये झाला. मौर्यांचा नाश इ. स. पूर्व २०० मध्ये होऊन त्यांचे महाराष्ट्रावरील अधिपत्य संपुष्टात आले, असे आपण मानतो. ते खरेच आहे. परंतु मौर्यांचे या भागावरील आधिपत्य निर्विवाद नव्हते. रथिक, भोज, आणि पेटेनिक हे मांडलिक म्हणून उत्तर महाराष्ट्रात कारभार करत होते. ते स्वायत्त होते.

दुसरा सातवाहन राजा इ. स. पूर्व २०० मध्ये प्रभावी होता. खारवेलाचा पराभव करणारा सातवाहन (शातकर्णी) हा त्या वंशातील सहावा राजा. त्यानेच इ. स. पूर्व पहिल्या शतकाच्या मध्यास रथिकांचा आणि भोजांचा पराभव केला तेव्हा दुसरा सातवाहन राजा प्रभावी होता.

अमरावती स्तूपात इ. स. पूर्व पहिल्या आणि दुसऱ्या शतकातील बौद्ध वर्चस्व दिग्दर्शित करणारे लेख सापडले आहेत. तिथे वशिष्ठपुत्र पुळयामी आणि श्री. शिवमक सातवाहनाचा उल्लेख आहे. सातवाहन हे आंध्र होते, या समजूतीचा विचार करताना इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात सातवाहनांचे आंध्रावर अधिपत्य नव्हते, याची दखल घेतली पाहिजे. सातवाहन काळापूर्वी दक्षिण भारतात लहान लहान राज्ये होती. सातवाहनांनीच प्रथम दक्षिणेत साम्राज्य स्थापन केले. त्या काळात उत्तर भारतावर बॅक्टोरियन, शक, पार्थियन, कुशाण यांच्या स्वाऱ्या होत होत्या. परंतु दक्षिण भारत या स्वाऱ्यांपासून बराच मुक्त होता. यापैकी शकांनी उज्जैनीस आपले बस्तान बसवले होते. आणि त्यांच्या दक्षिणभारतावर स्वाऱ्या होत. त्या संघर्षात सातवाहनांना उत्तर कोकण आणि उत्तर महाराष्ट्रातील काही प्रदेश गमवावा लागला होता. परंतु या परकीयांना पिटाळून लावून सातवाहनांनी या प्रदेशावरील आपली पकड पुन्हा पक्की केली. नाणेघाटात हे सातवाहनांचे मूळ दैवत असावे. त्यामुळेच त्यांनी तेथील लेण्यातून आपल्या इतिहासाचे निर्देश ठेवले आहेत.

## सातवाहनांची मातृभाषा महाराष्ट्री

सातवाहन राजानी महाराष्ट्रीचा राज्यभाषा म्हणून स्वीकार केला. त्यावरून ते आंध्र नसून महाराष्ट्रीय असावेत असे अनुमान निघते. हालाची सप्तशती ही महाराष्ट्री प्राकृतात आहे. महाराष्ट्री सातवाहनांची मातृभाषा होती. प्रतिष्ठान ही सातवाहनांची मूळ राजधानी

असावी, या कल्पनेला त्यामुळे बळकटी येते. सातवाहनांचे जुन्यात जुने लेख नाशिक आणि जवळील नाणेघाटात सापडले आहेत. त्यावरून त्यांचे मूलस्थान नाशिक-पुणे प्रांत हे असावे असे वाटते.

ऋषी सातकर्णाचा उल्लेख रघुवंशात (XIII 38.40) आला आहे. सिन्धप्रान्तांमधून आलेल्या बुद्धरुचीने उभारला. कान्हेरी स्तूप कार्ल्याचे लेणे वनवासी किंवा वैजयंती येथील सावकार भूतपाल याने कोरवले.

वैजयंति तो सोठिणा भूतपालेन

सेल घरं परिनिठपितं जंबूदीपहि उत्तमं

वैजयंती ही सातवाहनांची दक्षिणेकडील राजधानी होती. उत्तर कानड्यातील शीर्शी शहरापासून आग्नेईस पंधरा मैलावर हे स्थळ आहे. त्याला वानवासी म्हणतात. कार्ला लेण्यातील लेखात 'करहाकड, घेनकाटक (डहाणू), शूर्पारक (सोपारा), कलिअण (कल्याण), चेमुल (चौल), वस्य (वसई), स्थानक (ठाणे) ' या गावांचा उल्लेख आहे.

षेरिप्लस (इ. स. ८०) आणि टॉलेमी (इ. स. १२७-१९१) यांच्या ग्रंथात, सोपारा, कल्याण आणि भडोच बंदरांहून होणाऱ्या आयात-निर्यात मालाची माहिती दिली आहे. कल्याणवरून नाणेघाटमार्गे मालाची वाहतुक होई. नानेघाटांत 'टोल नाके' होते. त्याचे रांजण सापडले आहेत. महाराष्ट्रातील लेण्यात माळी, सुवर्णकार, लोहवणिज, वराकार (बुरूड), कास्यकार, सार्थवाह, हतलिक (शेतकरी), श्रेष्ठी, गंधीक, इत्यादी व्यावसाईकांचे उल्लेख आहेत. भाजे (मुंबई-पुणे रस्त्यावर मळवली स्टेशन जवळ), येथील लेण्यात खालील इ. स. पूर्व दुसऱ्या शतकातील लेख आहे.

१. नडसवस नायस

२. भोगवतस गाभो दानं

भोगवतीचा नडसव याने गर्भलेणे दान दिले. हा नडसव नागकुलोत्पन्न आहे. त्यावेळी या भागात नागकुलांची वस्ती होती.

सातवाहन राजघराण्याची स्थापना शिमुकने केली त्याने तेवीस वर्षे राज्य केले. इ. स. पूर्व पहिल्या शतकात हा प्रांत सातवाहनच्या अखत्यारीत

होता. त्यांच्या काळापासून उत्तर कोकणचा सलग इतिहास उपलब्ध आहे. सातवाहनांचे राजघराणे इ. स. पूर्व २३० ते इ. स. २५० पर्यंत राज्यावर होते. सातवाहन कुलाचा संस्थापक सिमुक यांचा पिता सातवाहन हा मौर्यांचा मांडलिक होता. मौर्यांचे मांडलिक रथीक आणि भोजक हे सातवाहनांचे नंतर मांडलिक झाले. महाड येथील लेण्यात कुमार काणभोजाचा आणि भाजे लेण्यात महारथी कौशिकीपुत्राचा उल्लेख आहे. अनेक लेण्यातून अन्य रथीक आणि भोजकांचे उल्लेख येतात. सातवाहन राजा राजकर्णा यांचा लेख कान्हेरीला सांपडला आहे. त्यावरून वशिष्ठपुत्र शातकर्णीचे राज्य अपरान्तावरही होते हे समजून येते. सातवाहन कालातच मध्यंतरी काही वर्षे क्षत्रप नहपान याचे राज्य या प्रदेशावर होते. त्याचा जामात ऋषभदत्त याच्या दानधर्माचे वर्णन नाशिक आणि कार्ले येथील लेखात आलेले आहे. त्याने ब्राह्मणास दाने दिलेली आहेत. त्याचप्रमाणे बौद्धभिक्षूनाही नाशिक आणि कार्ले इथे गावे दान दिली होती.

## सातवाहनांची मूळ राजधानी पैठण

सातवाहनांची राजधानी पैठण होती. ते आंध्र होते आणि आंध्र देशातून महाराष्ट्रात आले, असे काही विद्वानांचे म्हणणे आहे. काहींचे म्हणणे असे, की पश्चिम महाराष्ट्रातील, मावळांपैकी आंध्रीमावळ या प्रान्तावरून सातवाहनाना आंध्रदेशीय म्हणण्यात आले असावे. या मावळाच्या पश्चिमेकडील 'नाणेघाटता' सातवाहनांचे लेख आणि कोरीव पुतळे सापडले आहेत. या भागातील रहिवासी नागलोक, यांच्याशी त्यांचे विवाहसंबंध आले आहेत, त्यावरून वरील अनुमान ग्राह्य वाटते. काहीही असले तरी सातवाहनांचा प्रतिष्ठान किंवा पैठणशी घनिष्ठ संबंध होता, हे मान्य केलेच पाहिजे. त्यांनी दक्षिणपथात सर्वत्र संचार केला. गौतमीपुत्र सातकर्णी यांचे घोडे तीन समुद्राचे पाणी प्याले होते, असे प्रस्तरलेखात वर्णन आहे. जुन्नरच्या पश्चिमेकडील नाणेघाटात सातवाहन कालीन (इ. स. पूर्व दुसरे शतक) लेणी आहेत. त्यात सातकर्णी पहिला सातवाहन राजा सिमुक याचा पुतळा आहे. सातकर्णी आणि त्याची राणी नागनिका यांचेही पुतळे आहेत. नागनिका महारठी कळकाय याची कन्या. तो 'अंगीय' कुलातील नागवंशीय होता. नागांच्या अधिपत्याखालील

प्रदेशास राष्ट्र असे म्हणत. अशी अनेक नागराज्ये महाराष्ट्रात होती. कळकायनागाने नंतर सातवाहनाचे मांडलिकत्व पत्करले. त्याची नाणी आजच्या आंध्र आणि कर्णाटक प्रदेशात सांपडली आहेत. नागनिकेने अनेक यज्ञ केले. त्यांचा उल्लेख नाणेघाट लेखात आहे. हजारो गाई, हजारो काषार्पण, हत्ती, वस्त्रप्रावरणे इतकेच नव्हे तर कित्येक गावे दान दिली होती. एवढे सातवाहन राजे वैभवशाली होते.

## सातवाहनांचे परधर्म सहिष्णुत्व

सातवाहन राजे ब्राह्मण होते. त्यांच्या राज्यात हिंदु आणि बौद्ध धर्मास सारखाच राजाश्रय होता. त्यांच्या दानाचे उल्लेख नाणेघाटातील, त्याचप्रमाणे जुन्नर आणि नाशिक येथील लेखात येतात. याच वंशातील राजा हाल हा चांगला व्युत्पन्न होता. त्याने गाथांचा संग्रह केला तो गाथासप्तशती म्हणून प्रसिद्ध आहे. पुराणातून तीस सातवाहन राजे उल्लेखले आहेत. त्यातील तेविसावा गौतमीपुत्र सातकर्णि. याच्या काळापासून शिलालेख, नाणी सापडतात. याच्या पूर्वी सातवाहनाच्या अधिपत्याखालील प्रदेशात कुशान सम्राट कनिष्काच्या शकवंशी क्षत्रपांनी वर्चस्व प्रस्थापित केले होते. क्षत्रप (प्रान्ताधिकारी) नहपान (फारशी नाव) याचा जामात ऋषभदत्त (दक्षमित्राचा पिता) आणि अमात्य अर्यमा यांचे लेख उपलब्ध झाले आहेत. त्यावरून शक राजे ब्राह्मण आणि बौद्ध धर्मियांना सारखीच वागणूक देत हे सिद्ध होते. त्यांनी धर्मशाळा, घाट, रस्ते बांधले, तलाव खणले, राजरस्त्यांवर पाणपोयादी सोई उपलब्ध करून दिल्या असे आढळते. शकांच्या कारकीर्दीत सातवाहन राजे बालाघाट, वैनगंगातीरी वास्तव्य करून काळाची वाट पहात होते. पुढे गोतमीपुत्र सातकर्णीने शकांचा पराभव केला. अपरान्त आणि महाराष्ट्रात पुन्हा सातवाहन अंमल जारी केला. त्याचे राज्य ऋषीक (खानदेश), अश्मक (गोदातीर), मूळक (पैठणप्रान्त), सुराष्ट्र (सौराष्ट), कुकुर (राजस्थान), अपरान्त, अनूप, विदर्भ, आकारावंती (माळवा), कृष्णगिरी किंवा कान्हेरी या प्रांती पसरले होते. ही माहिती त्याची आई गौतमी बलश्री हिने पुत्र शातकर्णी याच्या निधनानंतर नाशिकच्या लेण्यात कोरवलेल्या लेखात दिली आहे.

## प्राचीन वाङ्‌मयातील अपरांताचा उल्लेख

सातवाहनकाळात कल्याण, चौल, सोपारा, राजपुरी ही बंदरे भरभराटीत होती. तिथून इराण, ग्रीस, अरबस्तान, इजीप्त ह्या पश्चिमेकडील आणि जावा, सुमात्रा, चीन ह्या पूर्वेकडील देशांशी समुद्रमार्गे दळणवळण होते. या परदेशांमधून आलेल्या मालाचा नजराणा घेऊन इथले राजे युधिष्ठिराकडे गेले होते असा महाभारतात उल्लेख आहे. त्या संदर्भात 'अपरान्त' चा उल्लेख सभापर्वात आला आहे. परदेशाशी व्यापारी संबंधात या भागाचे प्रथमस्थान आजही मुंबईने कायम राखले आहे. किंबहुना मुंबईची वाढ या वैशिष्ठ्यांमुळेच झालेली आहे.

## सातवाहनकाल

इ. सनाच्या तिसऱ्या शतकाच्या मध्यापासून इ. स. ४१५ पर्यंत उत्तर कोकणावर अभीरांचे राज्य होते. इ. स. पाचव्या शतकात रचलेल्या कालिदासाच्या रघुवंशीकाव्यात रघूच्या स्वारीचे वर्णन आहे.

तस्यानीकैर्विसर्पद्बिरपरान्तजयोद्यतेः ।।

रामास्त्रोत्सारितो ऽ प्यासीत्सह्यलग्न इवार्णव. ।।५३।। सर्ग ४ 'अपरान्ताः कौङ्कणाः' असे वल्लभाचे म्हणणे. रघूने अपरान्तावर स्वारी केली होती. पुढच्याच श्लोकात केरल योषितांचा उल्लेख आहे. पंचान्नवाव्या श्लोकात मुरूला नदीचा उल्लेख आहे.

मुरूलामारूतेद्धूतमगमत्कैतकं रजः ।। ५५ ।।

ही मुरूला, 'मुरवी' नदी केरळातील असावी असे मल्लिनाथाच्या संजीविनी टीकेत सांगितले आहे. निर्णयसागरी आवृत्तीतील नारायण राम आचार्य यांच्या टीपेत " मुरला चेयं कर्णाटकस्था सदाशिवगढसंनिधवाहिनी 'काली ' नदीति संप्रतिख्याते " –असे सांगितले आहे. परंतु ५५ ते ५७ हे श्लोक कोकणवर्णनात घेतले पाहिजेत असे प्रा. शेजवलकर म्हणतात. यासाठी शिलाहारांच्या भादाणे ताम्रपटाचा ते आधार घेतात. त्यांत लोणादित्य देवाला दान दिलेल्या गांवाच्या दक्षिणेची सीमा मुरूल महानदी ही सांगितली. म्हणजे आजची कल्याणची खाडी

ही नाणेघाटात उगम पावते. तिच्याच तीरावर मुरबाड गाव आहे. ५८ व्या श्लोकात पुन्हा ' अपरान्त 'चा उल्लेख आहे. आणि पुढे :

त्रिकूटमेव तत्रोच्चैर्जयस्तंभ चकार सः ।। ५९ ।।

असे कालिदास म्हणतो. भादाणे ताम्रपटात माहिरी किंवा आजच्या माहुलीचा उल्लेख आहे. तिथल्या माहुलीच्या डोंगरावर किल्ला आहे. हेच ते रघूच्या जयस्तंभाचे स्थान असे शेजवलकर सुचवतात. भोगशक्तीच्या या ताम्रपटातील राजा हरिश्चंद्रान्वय. या राजवंशाचे मूळपीठ म्हणजे आजचा हरिश्चंद्रगड. तिथे कोरीव लेणी आहेत. हा भाग तेव्हा उत्तर कोकणात (अपरान्तात) मोडत असे.

## राष्ट्रकूटांकडून शिलाहारांकडे

राष्ट्रकूट राजांची राजधानी सातारा जिल्ह्यातील माणदेशात होती. त्यांचे उत्तर कोकणवर अधिराज्य होते. राष्ट्रकूटांकडून उत्तर कोकणचे अधिपत्य शिलाहारांकडे आले. त्यांचे ठाणे-मुंबईवर साडेचारशे वर्षे राज्य होते (इ. स. ८०० ते १२४०). याच काळातील इ. स. ११८७ चा लेख मुंबईतील परळ येथे सापडला आहे. शिलाहारांची राजधानी पुरी. म्हणजे जंजिऱ्याजवळील राजपुरी होती. ठाण्यालाही त्यांची राजधानी होती. कल्याण जवळील अंबरनाथ येथे चित्तराजाने उभारलेले शिवमंदिर आणि मुंबईचे वाळुकेश्वर मंदिर यांच्याच अमदानीतले. शिलाहार राष्ट्रकूटाचे आणि चालुक्यांचे मांडलिक म्हणवीत. इ. स. १२६० मध्ये देवगिरीचा राजा महादेव याने बेटे मुंबई आपल्या राज्यात समाविष्ट केली.

शिलाहार राजे शिवभक्त असले तरी त्यांचे धोरण सर्वधर्मसमावेशक होते. ज्यू, मुस्लिम, ख्रिस्ती, अरब, पारशी यांना त्यांनी सारखीच वागणूक दिली. मुंबई-ठाणे रस्ता त्यांच्याच काळात तयार झाला. त्यांच्याच काळात पाठारे (पाताणे), कायस्थ, आणि यजुर्वेदी ब्राह्मण मुंबईत स्थायीक झाले. यादवांच्या वतीने मुंबई साष्टीचा कारभार अच्युत नायक पाही. त्यावेळी कृष्ण हा भारद्वाज गोत्री ब्राह्मण मुंबईसाष्टीचा सुभेदार होता. रामदेवांचा मुलगा भिल्लम किंवा बिंबदेव हा १२९४ पासून उत्तर कोकणाचा कारभार पाहू लागला. त्याची राजधानी माहीम येथे होती.

या सुभ्यात १५ महाल आणि १६२४ खेडी होती. बिंबदेवाच्या काळी माहीम, वाळुकेश्वर आणि मुंबई ही तीनच ठाणी होती. माहीम गाव बाभळीच्या वृक्षांनी भरलेला होता. त्याच काळात नारळीच्या झाडांची लागवड मुंबई बेटात करण्यात आली. बिंबदेवाच्या कोकणातील चौदा परगण्यांपैकी माहीम हा एक परगणा होता. त्यात सात गावे होती. बिंबदेव हा मुंबईचा उत्पादक म्हटला पाहिजे. त्याची दुसरी राजधानी मरोळ येथे होती.

दिल्लीचे बादशहा मुबारक याच्या सैन्याने १३१८ मध्ये माहीम आणि साष्टी बेटे काबीज केली. तरीही प्रतापशहाचे माहीमवर अधिपत्य होते. त्याचा त्याच्याच मेहुण्याने (चौलचा अधिपती) १३३१ मध्ये पराभव केला.

मौर्यांचे अधिपत्य भारतात दक्षिणेस नेलोरेपासून कल्याण पूरी नदीपर्यंत पसरले होते. पश्चिम दक्षिणर्धात अपरांत सामवून घेतले होते. याच काळात हूण, शक, कुषाण, यानी अपरान्तात गुजरातमार्गे प्रवेश केला होता. इ. स. पूर्व पहिल्या शतकात चेदी वंशातील तिसरा राजा खारवेल याचा अमल काही काळ या भागात होता, हे पुरातत्त्व संशोधनात सिद्ध झाले आहे. मौर्य सम्राट अशोकानंतर कनिष्काच्या कारकिर्दीत अष्वघोष हा नाटककार आणि चरक हा धन्वंतरी होऊन गेला. इ. स. ११९-१२५ च्या सुमारास नपहान हा सत्रप अपरान्तांत प्रभावी होता. त्याची नाणी नाशिक-पुणे भागात सापडली आहेत.

**नागांची राज्ये आणि कलचूरी काल :**

आभिरांनी सातवाहनांचा इ. स. तिसऱ्या शतकाच्या मध्यास पराभव केला. याला 'कचलचूरी काळ' असे म्हणतात. त्या पूर्वी दोनशे वर्षे नागाची राज्ये स्थापन झाली होती. महाभारतातील सर्पसत्रकाळात नाग लोकांचा छळ झाला, तेव्हा ते दक्षिणेस पसरले. त्यांच्यापैकी काहींनी कोकणाचा आश्रय घेतला नागाचे देवक (totam) सर्प होते. उत्तर आणि दक्षिण कोकणात त्याच्या शिलामूर्ती सापडतात. कोकणातील आडनावात आजही नागांची स्मृती रक्षिलेली दिसून येते. या नाग राज्यांशी

सातवाहनांनी समझोता केला. शरीरसंबंध जोडले. याचा उल्लेख पूर्वी केलाच आहे. यज्ञ-शातकर्णीने सत्रपांचा बिमोड केला. याचाही उल्लेख येऊन गेला आहे यांच्या नाण्यांवर जहाजाची प्रतिकृती आढळून येते. ती दर्यावर्दीपणाची सूचक आहे. त्याच्यानंतर सातवाहन राज्याची शकले झाली. आणि नंतर वाकाटकांनी तिसऱ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत अपरान्तासह कोकणावर आधिपत्य प्रस्थापित केले.

## उत्तर कोकणातील बंदरातून आयात-निर्यात :

महाभारतात युधिष्ठिराला परदेशातून नजराणे आले त्याची माहिती दिली आहे. त्यावरून तत्कालीन आयातीच्या व्यापाराची कल्पना येते. महाभारत हे एक संकलन आहे. आणि संकलनाचा काळ इ. स. पूर्व ४०० ते इ. स. ४०० असा होता. हे संकलन क्षत्रियांच्या गाथांवरून केले. त्या पूर्वी काही शतके गाथा प्रचारात आल्या होत्या. या काळात परदेशांशी विशेषतः पश्चिमी देशांशी होणारा आयात निर्यात व्यापार कल्याण चौल बंदरातून होत असे. Periplus of the Erythraean Sea या ग्रीको इजिप्शीयन दर्यावर्दीने लिहिलेल्या ग्रंथात या आयात निर्यातीचा उल्लेख आहे. त्यावेळी मसाल्याचे पदार्थ, अत्तरे, औषधी, वनस्पती रंग, मोती, रत्ने, चामडी, कापड, रेशमी धागा. तलमकापड, नीळ, हस्तिदंत, कासवाची कवचे आणि चिनीमातीची भांडी पश्चिमी देशांना निर्यात होत. आयातीत चांदी, सोने, तांबे, कथिल, शिसे, माणिक, कापड, लीनन, अत्तरे यांचा समावेश असे. प्लीनी सांगतो की, रोम मध्येच पाचकोटीचा माल खरेदी केला जाई. पश्चिमी राष्ट्रांशी होणाऱ्या व्यापाराची अलेक्झांड्रिया (इजिप्त) ही बाजार पेठ होती. भारतात रोमन सुवर्ण नाणी सापडली आहेत तीही या व्यापाराची साक्ष देतात.

## वाकाटकांचा कोकणाशी संबंध :

भारतात गुप्तांचे साम्राज्य इ. स. ३२० मध्ये मूळ धरत होते. त्यावर्षी चंद्रगुप्त राज्यावर आला. गुप्त सम्राट चंद्रगुप्ताने शक-सत्रपांचा पराभव करून कोकण प्रांत जिंकून घेतला. त्यापूर्वीपासून दक्षिणेत स्वतंत्र

राज्ये स्थापन होऊ लागली होती. वाकाटकांनी इ. स. तिसऱ्या शतकाच्या मध्यास विदर्भास उठाव केला. या राजवंशाचा मूळ पुरुष विंध्यशक्ति (इ. स. २५० -२७५) हा शैव ब्राह्मण होता. त्याचा पुत्र प्रवरसेन (मृत्यू इ. स. ३३०) नातू रुद्रसेन याची राजधानी नागपूरजवळ रामटेक येथे होती. रुद्रसेनाचा नातू दुसरा रुद्रसेन याने सम्राट चंद्रगुप्त (इ. स. ३८०-४१३) याची मुलगी प्रभावती गुप्ता इच्याशी विवाह केला. मूळचा तो शैव. पण त्याने वैष्णव पंथाचा स्वीकार केला. त्याच्या मृत्यूनंतर मुलगा दिवाकरसेन याच्या वतीने प्रभावती गुप्ताने राज्यकारभार पाहिला. वाकाटकांच्या वत्सगुल्म (वाशिम) शाखेतील हरिक्षेण (मृत्यू इ. स. ५५०) याने कोकणावर स्वारी करून आपले अधिपत्य स्थापन केले.

उत्तर कोकणावर इ. स. २४८ पासून त्रैकूटक राज्य करीत होते. ते अभीरांचे मांडलिक होते. उत्तर कोकणातील त्रिकुट पर्वता जवळील त्रेकूटक येथे त्यांचा उगम. त्रैकूटक इन्द्रदत्त याचा मुलगा व्याघ्रसेन, अपरान्तांचा स्वामी होता. (इ. स. ४९०) पारडी येथे त्याचे लेख सापडले आहेत. त्रैकूटक कृष्णराजाची रौप्यनाणी मुंबई आणि साष्टी बेटात सापडली आहेत. त्याशिवाय कऱ्हाड आणि नाशिक येथे सापडलेल्या नाण्यावरून इ. स. ३७५ पासून इ. स. ४०० पर्यंत मुंबईसह उत्तर कोकणावर त्रैकूटकांचा अंमल होता, ही गोष्ट सिद्ध होते. त्या काळात मुंबईचा ठाण्याचा घनिष्ट संबंध होता.

**चालुक्य राजांची कारकीर्द :**

वाकाटकानंतरचे कोकणाधिपती चालुक्य. चालुक्य पूलकेशी याची राजधानी वातापिपूरा (बदामी-विजापूर). चालुक्य कीर्तिवर्माने (५६६-५९७) कदंबाचा बिमोड केला आणि मौर्याची पिछेहाट करून मुंबईसह कोकणावर आधिपत्य स्थापन केले. (इ. स. ५९०) पूलकेशीच्या अमदानीत आयात निर्यात व्यापार भरभराटीत होता. त्याने इराणी देशांशी पुन्हा व्यापारी संबंध प्रस्थापित केले. आणि वैदिक धर्म स्वीकारून यज्ञसंस्कृतीचा पुरस्कार केला.

वर ज्या मौर्याचा उल्लेख केला आहे तेच मोरे. मौर्य सुकेतवर्मा याचा, ठाणे वाडा येथे सापडलेल्या लेखात उल्लेख आला आहे. चालुक्य कीर्तीवर्मा याने रेवती द्वीप (रत्नागिरी) आणि गोवा जिंकून मुंबईवर हल्ला केला आणि मौर्याचा बिमोड केला. चंद्रदंड या पूलकेशीच्या सेनापतीने पुरी येथे मोऱ्यांची शंभर ज़हाजे नष्ट केली. चालुक्यांनी माही नदीच्या दक्षिणेकडील सर्व कोकणपट्टी काबीज केली होती. दुसरा पूलकेशी (इ. स. ६१०) मध्ये गादीवर बसला त्याचा इतिहास अहिलोल प्रशस्ती (इ. स. ६३४-५) वरून समजतो. याच लेखात कालिदासाचा पहिला ज्ञात उल्लेख आहे. दुसऱ्या पूलकेशीने कोकणात दक्षिणेस वनवासी (उत्तर कानडा) पर्यंत चाल करून तिथपर्यंतच्या कोकणपट्टीवर अधिपत्य स्थापन केले. मौर्याचा बिमोड करून पुरी ताब्यात घेतली. हर्षवर्धनाच्या पराभवाचे (इ. स. ६३०) चिनी प्रवासी हुएनस्तंग याने वर्णन केले आहे.

**चालुक्यांचे कारभारी राष्ट्रकूट :**

राष्ट्रकूट हे पाचव्या शतकात चालुक्यांचे कारभारी होते. त्यावेळी मुंबई बेटे नाशिकच्या चालुक्य राजाचा अधिपत्याखाली होती. चालुक्यांवर इ. स. ७५३ मध्ये राष्ट्रकूटांनी वर्चस्व स्थापन केले आणि इ. स. ७६० मध्ये कोकणावर अधिसत्ता स्थापन केली. त्यांची राजधानी नाशिकजवळील मयूरखंड या डोंगरी किल्यावर होती. राष्ट्रकूटांचा मुंबईशी असलेला संबंध " कोलके " या नावात दिसून येतो. वेरूळचे कैलास लेणे राष्ट्रकूटांच्या प्रेरणेने इ. स. आठव्या शतकाच्या चतुर्थपादात खोदण्यात आले. मानपुरा (माण-माणक), येथे इ. स. पाचव्या शतकात राष्ट्रकूटानी राज्य स्थापन केले होते. आठव्या शतकाच्या चतुर्थपादापासून दहाव्या शतकाच्या प्रथम पादापर्यंत राष्ट्रकूट राजे, ध्रुव (७७९-७९३), गोविंद तिसरा (७९४-८३), अमोघ वर्ष (८१४-८७७), कृष्ण (८७८-९१४) यांनी कोकणावर राज्य केले.

**राष्ट्रकूटांची राजधानी पूरी कोणती :**

राष्ट्रकूटांचे मांडलिक म्हणून ठाणा-कुलाबा प्रान्ताचा कारभार शिलाहार पाहात होते (इ. स. ८१०-१२६०). त्याच्या अधिपत्याखाली ठाणे-कुलाबा जिल्ह्याचा भाग असून त्यात १४०० गावे होती, असे भादान दानपत्र आणि खारेपाटण ताम्रपटावरून समजते. या प्रान्ताची राजधानी पूरी येथे होती असा उल्लेख आहे. पूरी ही मौऱ्यांची राजधानी जंजिऱ्याजवळ होती. तीच ही पूरी होती काय हा प्रश्न अनिर्णित आहे. कझेन्स् यांच्या मते मुंबईजवळील मरोळ ही पूरी असावी. ऐहोळे लेखात पूरी समुद्रवेष्टित होती असे म्हटले आहे, ते वर्णन मरोळला जूळते. बहुतेक लेखातून आणि ताम्रपटातून स्थानक म्हणजे ठाणे याचा शिलाहारांची राजधानी म्हणून स्पष्ट उल्लेख आहे. पूरी ही दुय्यम राजधानी असावी. शिलाहार मूळचे ' तेर ' ह्या मराठवाड्यातील गावचे तिथे आठशे वर्षांपूर्वीपर्यंत कन्नड भाषेचा प्रभाव होता. ती शिलाहारांची भाषा. त्यामुळे मुंबई-ठाणे-कुलाबा भागात कन्नडभाषिक शब्द उपयोगात आले असे जुन्या लेखांवरून दिसते. त्याचा उल्लेख इतरत्र आला आहे.

राष्ट्रकूट सम्राट गोविंद तिसरा, याने कपर्दी पहिला, या शिलाहार वंशस्थापकाला उत्तर कोकणचा सामंत (कारभारी) नेमले. त्यावरून उत्तर कोकणला कपर्दी द्वीप किंवा कवडी द्वीप असे नाव पडले. शिलाहारांचे महाराष्ट्री वंशज शेलार हे क्षत्रिय आहेत. ते मूळचे तगरचे, जीमूतवाहनाचे वंशज. शिलाहार नावाची व्युत्पत्ती छद्वैदेवाच्या प्रिन्स अव्ह वेल्स म्यूझियममध्ये असलेल्या ताम्रपटात दिली आहे.

जामदग्न्यशरात्रस्तः शीलारच्छद्मना तदा सागरो रक्षिस्तश्च प्रापुस्तन्नाम पूर्वजाः ।। १९।।

याच ताम्रपटात ' वखोला ' गावास जाण्याचा मार्ग आणि लवण चरिका (क्षारक्षेत्र) याचा उल्लेख दान दिलेल्या शेतांची सीमा म्हणून आला आहे. हे वखोला गाव कुलाब्याच्या उत्तरेच्या पोयनाड जवळील कोलेति असावे असे म. म. मिराशी म्हणतात. या संदर्भात मुंबईस आज विद्यापीठाचा नवीन परिसर असलेल्या वाकोला गावाची आठवण होते.

## शिलाहारांचे राज्य आणि राज्यशाखा :

शिलाहार वंशातील एक शाखा दक्षिण कोकणावर इ. स. ७८२ ते १००८ पर्यंत राज्य करीत होती. तर दुसरी शाखा कऱ्हाड-सातारा प्रान्तावर राज्य करीत होती. द्वितीय शिलाहार पुल्लशक्ति (८५०-८८०) याचे लेख कृष्णागिरीस (कान्हेरीस) आहेत. त्याचा मुलगा द्वितीय कपर्दी, कपर्दीचा मुलगा वष्णुवन्न (८८०-९१०) पाचवा शिलाहार झंझ (९१०-९३०) हा सैमूर वर राज्य करीत होता असे अरब इतिहासकार मसूदी याने लिहून ठेवले आहे. त्याने बारा शिवमंदिरे स्थापन केली होती. परंतु ती आज अस्तित्वात नाहीत. झंझानंतर त्याचा भाऊ गोग्या (९३०-९४५) आणि मुलगे वज्जड (९४५-९६५) आणि छद्वैदेव (९६५-९७५) यांनी राज्य केले. नववा शिलाहार अपराजित मृगांक (९७५-१०१०) त्याचा भादाणे ताम्रपट (इ. स. ९९७) उपलब्ध झाला आहे. त्यावरून अपराजित अखिल कोकणचा अधिपती होता असे दिसते. चालुक्यानी राष्ट्रकूटांना पराजित केले होते. अपराजित त्यांचे वर्चस्व मानायला तयार नव्हता. परंतु त्याचाच खुद्द चालुक्यानी पराभव केल्यामुळे त्याला पूरीचा आश्रय घ्यावा लागला. आणि चालुक्यांचे अधिपत्य मान्य करावे लागले. अपराजितचा मुलगा वज्जद दुसरा (१०१०-१०१५) अल्पकाळच राज्यावर होता. त्याच्यानंतर त्याचा चुलता अरिकेसरी याने १०१५ पासून १०२० पर्यंत पाचच वर्षे राज्य केले. याच्याच काळात भोज परमारने उत्तर कोकणावर स्वारी केली आणि शिलाहारांना मांडलिकत्व स्वीकारायला लावले.

पूलकेशीची राजधानी विजापूर, वातापिपुरी बदामी, येथे होती. दुय्यम राजधानी होती नासिक. ह्यू एन्. सिंग याने त्याची नासिक येथे भेट घेतली असे दिसते. तो पूलकेशीला महाराष्ट्राचा राजा असे म्हणतो. पूलकेशीचा मोठा मुलगा विक्रमादित्य धाकटा जयसिंह नाशिकचा अधिपति होता. त्याचा ताम्रपट नाशिकला सापडला आहे. जयसिंगाचा धाकटा मुलगा मंगलरस. तो ठाणे जिल्ह्यात राज्य करीत होता. त्याचा ताम्रपट ठाणे भागातील मानोर येथे सापडला आहे.

उत्तर कोकणातील एक ताम्रपट (इ. स. ७३१) कच्छमध्ये सापडला आहे. त्यात मंगलरसाने श्रीपूर (शिरगाव) येथून दान दिल्याचा उल्लेख आहे. ठाणे जिल्ह्यातील वाडे तालुक्यातील मागोठाण (मंगलस्थान) येथे त्याने राजधानी स्थापली होती. इ. स. ७४९ च्या मनोर ताम्रपटात शिरगाव येथील देवालयास राष्ट्रकूट दंतिदूर्ग याने तमसाही गाव दान दिल्याचा उल्लेख आहे. सित्तराजवर कदबांनी स्वारी करून शरण आणले. परंतु त्यांचे मांडलिकत्व स्वीकारून सित्तराजाने (१०२०-१०३५) आपले राज्य टिकवले. त्यानेच कल्याणजवळील अंबरनाथचे शिवमंदिर बांधण्यास सुरुवात केली होती. त्याच्या कारकीर्दीत विद्या-कलाना उत्तेजन मिळाले. सित्तराजानंतर त्याचा मुलगा नागार्जुन १०४५ पर्यंत राज्य करीत होता. तो चालुक्य सोमेश्वर यांच्या हल्यात मारला गेला. सित्तराजचा धाकटा भाऊ मुन्मुणी (१०४५-१०७०) याला सोमेश्वराने गादीवर बसविले. त्याने कदंब राजघराण्यातील मुलीशी विवाह करून त्याच्याशी सख्य जोडले. मुन्मुणीच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांच्या वतीने गोव्यातील कदंबानी चौलच्या अरबांच्या सहाय्याने उत्तर कोकणवर स्वारी केली. मुन्मुणीच्या कारकीर्दीतील एका लेखात कर्जत तालुक्यातील गावांचा उल्लेख आहे. सित्तराजाचा पुतण्या, नागार्जुनाचा मुलगा अनंतदेव (१०७०-१११०) याने कदंबाना हाकलून आणि दक्षिण कोकण जिंकून " पश्चिम समुद्राधिपति " पदवी धारण केली. त्या काळातील खारेपाटण ताम्रपटात (१०९४) त्याने आपल्या मंत्र्यांना ठाणे, सोपारा बंदरात जहाजांना जकातमाफी दिल्याचा उल्लेख आहे. कदंब राजा द्वितीय जयकेशी याने केलेल्या हल्ल्यात अनंतपाल मारला गेला. त्याचा मुलगा अपरार्क (११२०-११४०) गादीवर आल्यानंतर कदंबानी पुन्हा उचल खाल्ली. जयकेशी दुसरा याने उत्तर कोकणातून अपरार्कला काही काळ थोपवून ठेवले होते. परंतु अपरार्कने कदंबाचे वर्चस्व पार झुगारून दिले. त्याने भारतातील इतर राजसत्तांशी स्नेह प्रस्थापित केला. त्यांचे राजनैतिक संबंध काश्मिरपर्यंत प्रस्थापित झाले होते. त्यांचा काश्मिर मधील वकील तेजकंठ यांचा उल्लेख मंखाच्या *श्रीकंठ सरितात* आला आहे.

तेजकंठ हा विद्वान आणि वादपटू होता. त्याने सोपाऱ्यात आपल्या प्रतिस्पर्ध्याचा वादांत पराभव केला होता. याज्ञवल्क्य स्मृतीवर टीका लिहिण्याइतका तो विद्वान होता. त्याचा मुलगा हरपाल (११४०-११५५) आणि नातू मल्लिकार्जुन (११५५-११७०). मल्लिकार्जुन बलाढ्य राजा होता. त्याचा एक लेख वसई येथे सापडला आहे. त्यात भिवंडीतील लोनाड (लोन-वाटक) लखण उपाध्याय यास दान दिल्याचा उल्लेख आहे. मल्लिकार्जुनाने "राजपितामह" हे बिरुद धारण केले. त्याची "राजधानी जलाधिवेष्टित शतानंदपुर" होती.

## शिलाहार राज्याचा शेवट :

मल्लिकार्जुनानंतरचा अपरादित्य दुसरा (११७०-११९५) गादीवर येण्यापूर्वी उत्तर कोकणवर गुजरातच्या कुमारपालने वर्चस्व स्थापन केले होते. ते अपरादित्याने संपुष्टात आणले आणि ठाण्याची मुक्तता केली, असे परळच्या शिलालेखावरून (११८७) दिसते. "त्यांत महाराजाधिराज कोंकणचक्रवर्ती" असा त्याचा उल्लेख आहे. अपरादित्याचा मोठा मुलगा द्वितीय अनंतदेव अल्पकाळच (११९५-१२००) गादीवर होता. धाकटा मुलगा केशिराज पंचेचाळीस वर्षे (१२००-१२४५) राज्यावर होता. या काळात अनेक स्वाऱ्या करून देवगिरीच्या यादवांनी त्याचे राज्य खिळखिळे करून टाकले. केशिराजाचा मुलगा तृतीय अनंतदेव (१२४५-१२५५) त्याचा धाकटा भाऊ सोमेश्वर (१२५५-१२६५) हा शेवटचा शिलाहार राजा. त्यांचा इ. स. १२६० मध्ये देवगिरीचा राजा महादेव याने पराभव केला. या स्वारीत त्याने गजदळाचा वापर मोठ्या प्रमाणात केला होता. त्या हल्ल्यामुळे टिकाव न लागून सोमेश्वराला जहाजातून पळून जावे लागले. त्यातच त्याचा अंत झाला असावा. मुंबईजवळील बोरीवली येथे या युद्धाची शिल्पे कोरलेले वीरगळ सापडले आहेत. ते तेराव्या शतकातील आहेत.

**शिलाहारांची कामगिरी आणि मुंबई बेटे :**

उत्तर कोकणावर शिलाहारांचे राज्य साडेचारशे वर्षे होते. ते परधर्मसहिष्णु होते. त्यांच्या काळात मुस्लीम प्रार्थनामंदिरे बांधण्यास त्यांनी परवानगी दिली होती. मुस्लिम धर्मीयातील कज्जेदारास त्यांच्या कायद्याप्रमाणे न्याय मिळावा म्हणून मुस्लीम न्यायाधिशांची नेमणूक केली होती. यांच्याच काळात संजान, चौल, सोपारा, ठाणा, कुलाबा या भागात अरब, ज्यू, खिस्ती, पार्शी, मुसलमान यांची मोठ्या संख्येने वसती झाली. त्यामुळे परप्रान्ताशी आणि परदेशाशी व्यापारी संबंध प्रस्थापित झाले. शिलाहारांनी अनेक मंदिरे उभारली. त्यात वाळकेश्वर आणि अंबरनाथचा समावेश होतो. त्यानीच मुंबई बेटात नागपूजा आणली. " पाडा " हा गाववाचक शब्द मुंबई बेटात सिलाहारानी आणला. नागपाडा, आग्रीपाडा, नौपाडा (ठाणे), इत्यादी त्यांनी दिलेली नावे आजही प्रचलीत आहेत. शिलाहारांनी जमाबंदी व्यवहारात व्यवस्था आणली. त्यासाठी भूभाग निश्चित केले. राष्ट्र (जिल्हा), त्याचे भाग ' विषय ' आणि ग्राम, ग्रामांचा किंवा खेड्यांचा प्रमुख जमाबंदी अधिकारी ' पट्टकिल ' (प्रमुख) हाच आजचा पाटील. मुंबई बेटे ठाण्यास राज रस्त्याने जोडली. त्यांच्या काळात देशावरील पाठारे (पाताणे) प्रभू, कायस्थ यजुर्वेदी ब्राह्मण यांचे मुंबईत प्रथम आगमन झाले.

**प्राचीन इतिहासात मुंबईचा अनुल्लेख :**

आतापर्यंत जो अपरान्त उत्तर किंवा कोकणाच्या राजवटींचा इतिहास सांगितला, त्यात मुंबई बेटांचा जरी समावेश असला तरी याबेटांच्या तत्कालीन भौगोलिक अवस्थेमुळे याचा स्वतंत्र उल्लेख विरळाच आढळतो. इथे काही घडतच नव्हते, असा त्याचा अर्थ करणे बरोबर ठरणार नाही. पोर्तुगीजांनी ही सात बेटे, साष्टीसह, इंग्रज राजाला आंदण म्हणून दिली. तत्पुर्वी ती अगदीच उपेक्षित होती, असे मानण्यात येते. तेही चूक. कोकणाच्या आणि अर्थात मुंबईच्या इतिहासाची साधने

गेल्या शतकात फारशी उपलब्ध नव्हती. पोर्तुगीजांच्या मागे जायचे तर महिकावती बखरीच्या आधारे माहिमचा राजा बिंब, इथपर्यंतच मजल असे. *मुंबईचा वृत्तांत* मध्ये लेखकद्वय म्हणतातः

> बहुत शतकांपूर्वी मुंबई आणि तिच्या आसपासचा प्रदेश दक्षिणेंतील राष्ट्रकूट नावांच्या राजांच्या अमलाखालीं होता असें दिसतें. तसेंच पुढें कांहीं वेळापर्यंत मुंबई दक्षिणेतील कित्येक बलाढ्य सरदार व नायक ह्यांच्या हाती होती असेंहि समजतें. (पान ४३).

पुढे टीपेत म्हटले आहे :

> फार प्राचीन काळीं कोकणांत यादवकुलोत्पन्न क्षत्रीय राजे येथे येऊन त्यांनीं येथें राज्य केलें. पुढें प्रभास क्षेत्री यादवांची घडामोड होऊन वाताहत झाली तेव्हां बौद्ध लोकांनी ही संधी साधून येथे आपलें राज्य स्थापिलें हें त्या वेळचीं जीं नाणी अजून सांपडतात त्या वरून सिद्ध होते.

यावरून लेखकद्वयाना निश्चित पूर्वेतिहास उपलब्ध झाला नाही असे दिसते. आता परिस्थिती बरीच पालटली आहे. गेल्या पन्नास वर्षांत बरीच नवीन माहितीपुढे आली आहे. तिच्याच आधारे वरील प्रपंच केला आहे. त्याची आवश्यकता होती असें वाटते.

**मध्ययुगीन मुंबईचा इतिहास : देवगिरीचे यादव**

मुंबईच्या उत्कर्षाचे पहिले पर्व बिंबराजाने माहिंम बेटास भेट दिल्यानंतर मुंबईची वाढ करायचे ठरवले, तिथे सुरू होते. बिंबराज हा देवगिरीच्या यादव राजघराण्यातील. यादव कुळातील वीर पुरुष. भिल्लम याने दक्षिणेवर स्वारी करून देवगिरीला आपली राजधानी स्थापन केली (इ. स. ११८५-९३). त्याचा पुत्र जैत्रपाल (इ. स. ११९३-१२००). जैत्रपालाचा पुत्र सिंघण (१२००-१२४७) याची दीर्घ कारकीर्द विशेष महत्त्वाची ठरली. त्याने कोल्हापूरचे शिलाहार आणि गोव्याचे कदंब यांचा पराभव केला. पुत्र कृष्ण (१२४७-१२६०) आणि महादेव (१२६०-१२७१) याने प्रथम उत्तर कोकणावर कब्जा केला. प्रसिद्ध पंडित हेमाद्रि हा महादेवाचा प्रधान होता.

**मुंबईची भाषा :**

सांप्रत पुणेप्रांती सुशिक्षीत लोकांमध्ये जी मराठी भाषा चालू आहे तीच, सर्वमान्य मराठी भाषेचा आदर्श, ही गोष्ट जरी खरी, तरी ही तिची सर्वमान्यता पुरातनकाळापासून सर्वदा पुण्यालाच चिकटून राहिली आहे असें कोणीही समजूं नये. राज्यांच्या वैभवाप्रमाणे भाषेचे वैभव फिरत असते........ मराठी भाषेचे अत्यंत प्राचीन स्वरूप जें संस्कृत काव्य नाटकादिकांमध्ये स्त्रीजनांच्या आणि बालकांच्या भाषेत सांपडतें, त्यावरून पाहिलें असतां त्याकाळीं उज्जयनी नगरी हें मराठीचे मुख्य स्थान होतें, असे स्पष्ट दिसतें. तथापि, शालिवाहन शकाच्या आरंभापासून पुढें बराच काळ पर्यंत प्रतिष्ठान किंवा पैठणनगरी हें मराठीचें मुख्य स्थान होतें........... याच्याही पलिकडे गेलो तर अशोकादिकांच्या शिलालेखांमध्यें आढळणारी जी मागधीभाषा तिजकडे वडीलपण जाईल. अर्थात मगध देशीं म्हणजे सांप्रतच्या बिहार प्रान्तीं, गंगातीरीं, चंद्रगुप्त राजांची ' पाटली पुत्र ' नावांची नगरी 'पाटना' नामें करून सांप्रत प्रसिद्ध आहे. तें मराठी भाषेचें मूळस्थान म्हणावें लागतें. या प्रमाणें पाहतां ' पाटलीपुत्र ' ' उज्जयिनी ' 'प्रतिष्ठान' यांच्या पाठी मागून भोजराजाची ' धारानगरी ' नंतर ' विदर्भ ' म्हणजे वऱ्हाड, पुढे यादवांची ' देवगिरी,' तेथून शाहू छत्रपतीचा ' सातारा ' आणि शेवट पेशव्याचे ' पुणें,' अशी परंपराच लागत जाते,......... पुण्याहुन ही राज्य क्रांती झाली आहे. तेव्हां आतां पुण्याचे नांव राहणें किंवा मागे पडणे, हें जसा योगायोग असेल, तसें घडेल, त्याविषयी विशेष बोलण्यांत अर्थ नाहीं. *

वरील उताऱ्यांत यादवांच्या देवगिरीनंतर एकदम शाहू छत्रपतीच्या साताऱ्याच्या आणि मग पेशव्यांच्या पुण्याचा उल्लेख आहे. पण यादवांच्या मुंबईवरील अधिपत्याचीचा उल्लेख नाही. त्याचा विचार करण्यापूर्वी आपण प्रथम यादवांच्या मुंबईवरील अधिपत्याचा इतिहास पाहू.

* *(रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांचे संकलित लेख, प्रथम भाग, १९४२, पान १९९-२००).*

## उत्तर कोकणावरील यादवांचा अंमल

उत्तर कोंकणाचा समावेश यादव साम्राज्यात झाल्यानंतर १२७२ मध्ये रामदेवाचा प्रतिनिधी म्हणून महाप्रधान अच्युत नायक साष्टीचा कारभार पाहात होता असे फ्लीटने साधार दाखवले आहे. ज्ञानेश्वरीचे लेखन " शके बाराशे बारोत्तरे " पूर्ण झाले. त्याचवेळी म्हणजे इ. स. १२९० मध्ये भारद्वाजगोत्री ब्राह्मण कृष्ण हा अखिल कोकणावर रामदेव राजाचे प्रतिनिधित्व करत होता. रामदेवाचा अल्लाउद्दीन खिलजीने १२९४ मध्ये पराभव केला. रामदेवाला दिल्लीपतीला जबर खंडणी कबूल करावी लागली. त्याला दोन मुलगे एक रामदेव मोठा शंकरदेव. याने देवगिरीची राजधानी सांभाळली. दुसरा भीमदेव त्याने उत्तर कोकणचा कारभार कृष्णाकडून आपल्या हाती घेतला होता, असे बेदरचा सुलतान महंमद दलील याच्या इ. स. १४३६ मधल्या सनदेवरून दिसून येते. भीमदेवाने माही-माहीम ही आपली राजधानी केली. राज्यकारभारासाठी त्याने प्रान्ताची पंधरा महालात विभागणी केली. त्यात १६२४ खेडी होती. याबद्दलची माहिती आपल्याला *माहिकावतीची बखर* मधून मिळते. ती अशी :

पाठारा ज्ञातीसमाधि मूळ रामराजा.......... त्याचा वंशिक राजा रामदेवराजा ।। त्या रामदेवाचे राज्य घटिका चहुमध्ये ४ सुलतान अलावदिनाने घेतले ।। सेवटी रामदेवरायासीं पराभविलें ।। तो रामदेवराजा व आणिक राज देशोदेशीचे ।। सूर्यवंशी तथा सोमवंशी।। राया समागमि पैठणीं आले।। तेथें राजधामी राहिलें।। त्या रामदेवरायाचा जेष्ठ पुत्र केशव देवगिरी किल्यावर सिंहासनारूढ केंला।। द्वितीये पुत्र राजा बिंब उदय पुरासी स्थापिला।। तृतीय पुत्र प्रतापशा अलंदापुर पाटणी राज्याधिकार दिधला।। तद्नंतर शके १२१० मध्ये पैठणास सुलतान अलावदीन याने चाल करोन उद्द केलें।। तेथेही रामदेवाराजा तथा आणिक सोमवंशि राजे थोर प्रभु पराभवाते पावले।।तदनंतरें उदयपुरास राया बिंबास वर्तमान श्रुत जाला।। तेथोन त्याणे चाल करोन गुजरात काबिज केली आणि प्रांता होवोन अहिनळवाडा पूर

पाटणा दक्षणप्रांति देशविलायत नाईकी यापैकी ठाणे कोंकण माहीम पावेतंव काबिज रोन परतापूर राजधाम द्वादश राजे सूर्यवंशि आणि २४ सोमवंशि आणि सोना समुदाये व सेवकजन आणि नवखुमे शैषवंशि आणि सेनाप समुदाये राहिला....... माहीम बेटाची वसाईत करविली।। शके १२२७ मध्ये राजा बिंब बाग पाहावया माहिमा गेला।। तर ते माहिम जागा उत्तम रम्य स्थळ देखोन आज्ञा प्रधानाप्रत दिधली कीं, येथे महाल बांधावा।।

बिम्ब राजानंतर त्याचा मुलगा प्रतापदेव हा माहिकावतीचा अधिपती झाला. त्याचा खून करून त्याचाच मेहुणा चौलचा अधिपती नागरदेव याने माहीमचा कबजा केला. इ. स. १३४८ मध्ये गुजरातच्या बादशहाचा सेनापती मलिक याने कोकण प्रान्तावर स्वारी केली. आणि कोकणावर मुसलमानांच्या अंमल स्थापित झाला. इ. स. १५३४ मध्ये मुंबई बेटे पोर्तुगीजांनी काबिज केली.

**बिंबदेवाने केलेली माहीमची वसाहत**

बिम्बदेव उदेपूरवरून अनहिलवाडमार्गे अपरान्तात उतरला आणि माहीमला आला. अपरान्ताची राजधानी सोपारा किंवा ठाणा याठिकाणी न स्थिरावता तो माहीमला आला आणि त्याने माहीम हे आपले ठाणे म्हणून निश्चित केले. याला सबळ कारण होते. यापूर्वी अपरान्ताचे अधिपती शिलाहार यांचा पराभव गजदळाने केला होता. आणि त्यांना समुद्रवेष्ठित पुरीचा आश्रय घ्यावा लागला होता. पुरी पेक्षाही मुंबई बेटे जास्त संरक्षित होती हे त्याचे कारण असावे. देशावर सुरक्षित स्थाने म्हणजे डोंगरी किल्ले तसे कोकणपट्टीत संरक्षित स्थाने म्हणजे दुर्ग, जंजिरे आणि समुद्रवलयांकित बेटे हे त्या अनुभवी सेनापतीस ज्ञात होते. यापूर्वी समुद्रमार्गे कोकण किनाऱ्यावर येणारे अरबांसारखे व्यापारी तरी होते किंवा पारशी ज्यूसारखे निर्वासित तरी होते. परकीय आक्रमक त्या काळापर्यंत समुद्रमार्गे भारतात आले नव्हते. आक्रमण पोर्तुगीजांनी नंतर केले. म्हणून

बिंबदेवाला मुंबई बेटे सुरक्षित वाटणे संयुक्तिक होते.

बिंबदेवाच्या आगमनापूर्वी मुंबई बेटात वसती अगदीच नव्हती असे नव्हे. वालुकेश्वर मंदिर बांधण्यात आलेले होते. तेथे वसती होती. मुंबादेवीची स्थापना माहीम भागात झालेली होती. माहीम बेटातही कोळ्यांची वसती होती, पण तुरळक. तिथे नवीन नगर वसवण्यात वाव होता. सर्वत्र बाभळीची झाडे होती. माहीमला त्याने नारळीच्या बागा करवल्या. बिम्बदेवाने आज्ञा केली की इथे राजवाडा आणि घरे बांधावी. त्याच्याबरोबर उदेपूरवरून आणि नंतर देवगिरीहून आलेल्या सर्वांची सोय करावी. त्याने पैठणहून यजुर्वेदी ब्राह्मण माध्यंदिन शाखेची नऊ पाताणे सूर्यवंशी प्रभू कायस्थची सत्तावीस, शेशबंशियांची सात, पांचालांची पाच, कुणबी आगरी यांची सात कुटुंबे आणली होती. त्यांची माहीमला स्थापना केली. अनेक देवळे बांधली आणि आपली कुलदेवता प्रभादेवी हिची स्थापना केली. माहिम बेटात सात खेडी स्थापन केली.

माहिकावतीच्या बखरीतील बिम्बाख्यान एकीव माहितीवर आधारलेले असल्यामुळे त्यातील माहिती बिनचूक नाही. परंतु दस्तऐवजी पुराव्या अभावी आज तरी तेच एक साधन आपल्या हाती आहे. यातील काही माहिती फारशी अस्सल साधने आणि इतर दानपत्रांशी ताडून पाहून दुरुस्त करून घेता येते. राज पुरोहित कवळे यांना मालाड भागातील गाव बिंम्बदेवाने दान दिल्याचे नबाब चंउखान या दमणच्या मुसलमान सुभेदाराच्या १४९५ मधील फर्मानावरून कळून येते.

## मरोल येथील दुय्यम राजधानी आणि यादवांचा पराभव

बिंम्बदेवाचा पुत्र प्रतापबिम्ब याने साष्ठी मधील मरोल येथे दुसरी राजधानी स्थापन केली, तिला प्रतापपूर असे नाव दिले. हेच आजचे पर्जपूर किंवा पर्दपूर. इ. स. १३१८ मध्ये मुंबई मुसलमानांच्या कबज्यात गेली, तरी प्रताप १३३१ पर्यंत राज्यावर होता. आणि त्याचाच मेहुणा चौलचा अधिपती नगरदेव याने पराभव केला आणि वध केला.

नगर देवाने १७ वर्षे मुंबई आपल्या कबजात ठेवली होती. इ. स. १३४७ मध्ये त्याचा मुसलमानांनी पाडाव केला. नगरदेवाचा पराभवही त्याच्या अनुयायांपैकी विश्वासू भगदचूरी याच्या बेईमानी वर्तनामुळे झाला. माहीमवर मुसलमानांचा हल्ला झाला तेव्हा नगरदेव वाळकेश्वरला दर्शनासाठी गेला होता. त्याच्या अनुपस्थितीत त्याच्या राणीने प्रतिकार केला. परंतु तिचा वध करून माहीमचा राजवाडा मुसलमानांनी लुटला. नगरदेवाने सैन्य जमा करून भायखळ्याला मुसलमानांना तोंड दिले परंतु त्याचा पराभव झाला आणि तो मृत्युमुखी पडला.

## आधुनिक मुंबईच्या विकासाचा प्रारंभ

*मुंबईचा वृत्तांत* मध्ये यादवांनंतरचे मुंबईचे अधिपती मोगल आणि नंतर पोर्तुगीज यांच्याविषयी माहिती आली आहे. त्यामुळे त्या कालाचा इतिहास इथे देत नाही. आधुनिक मुंबईचा पाया गव्हर्नर आंगियर यांनी घातला. त्याचा थोडा पूर्वेइतिहास आता पाहू.

## जेराल्ड ऑगियर मुंबईचे गव्हर्नर

जेराल्ड ऑगियर याची जुलै १६६९ मध्ये सुरतेच्या फॅक्टरीचे अध्यक्ष आणि मुंबईचे गव्हर्नर म्हणून नियुक्ती झाली. १६७० च्या जानेवारीत ते मुंबईला आले. कंपनी सरकारच्या सैनिकी आणि मुलकी कारभाराची त्यांनी घोषणा केली. फेब्रुवारीत ते सुरतेस परत गेले. त्यावेळी सुरतेवर मराठे हल्ले करत असत. ऑगियरने सुरतेचे ठाणे मुंबईस हालवले. दिनांक ७ जून १८७२ ला सुरतेहून समुद्रमार्गे ते मुंबईस येऊन पोहचले त्या काळापर्यंत मुंबई इंग्रजांच्या ताब्यात असली तरी राज्य पद्धतीवरील पोर्तुगीज छाप कायमच होती. ऑगियरने इंग्लिश कायदा लागू केला. जॉर्ज विल्किन्सची न्यायाधीश म्हणून नेमणूक केली. किल्ल्यांच्या परिसरात शहराची नव्याने मांडणी केली. ३०० ते ४०० टनांची जहाजे लागतील असा धक्का बांधला. याला मोल स्टेशन म्हणत. याच जागी पुढे बॅलार्ड पिअर बांधण्यात आला. त्यांनी मिंटचा पाया घातला. किल्ल्याची बळकटी केली. शिवाय रुग्णालयाची स्थापना

केली. जातीपंचायती कारभाराची सुरूवात करून दिली. मुदतीच्या भाडेपट्ट्याने ६१ वर्षासाठी खाजगीघरे बांधू देण्यास मंजुरी दिली.

आधुनिक मुंबईच्या विकासास ऑगियरने प्रथम प्रेरणा दिली. आणि उत्कर्षाचा मार्ग मोकळा करून दिला. पोर्तुगीज अमलात बेटावरील जागा कायम भाडेपट्ट्याने देण्यात येत असे. भुईभाडे वार्षिक उत्पन्नाच्या चतुर्थांश होते. शिवाय सैनिकी नोकरी करण्याचे बंधन असे. त्यावेळी सर्वत्र नारळाची आणि ताडाची झाडे होती. माहिम बेटावर फणसांच्या आणि आंब्यांच्या झाडांच्या जागा होत्या. सखल भागात भातशेती करत. बेटातील मलबार (वाळकेश्वर) टेकडी, वरळी आणि चिंचपोकळी (आजचा परळचा भाग) इथे एकूण १०,००० लोकवस्ती होती. त्यात कोळी, भंडारी, कुणबी आणि मजूर यांचा समावेश होता. सर्वत्र फळबागा (hortus-carts) होत्या. मराठ्यांच्या आणि शिद्दींच्या हल्ल्यांच्या भीतीमुळे वस्ती कोटाजवळ केंद्रित झाली होती. शिवाय माहीम आणि माझगाव या किल्ल्यांच्या आश्रयाने थोडी वस्ती होती.

बेटांवरील बरीच जागा पोर्तुगीजांनी आपल्या निवृत्त सैनिकास इनाम दिली होती. त्यावेळी मुंबई बेटे वसईचा भाग गणली जात. त्यांचा केवळ माहीम म्हणून उल्लेख होई. इंग्लंडच्या चार्लस् राजाला मुंबई बेटे १६६१ मध्ये विवाहाच्या वेळी आंदण देण्यात आली. त्यावेळी नकाशात साष्टी वसईचा समावेश होता. ही बेटे इंग्रज सरकारने कारभारासाठी १६६८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या हवाली केली. त्यापूर्वी पोर्तुगीज अधिकाऱ्यांकडून या आंदण बेटांचा ताबा घेण्यात बराच काळ गेला होता. ईस्ट इंडिया कंपनीने साली दहा पाउंड भाडे इंग्रज सरकारला घ्यायचे असे.

इस. स. १६६२ मध्ये गव्हर्नर कुकच्याच सहाय्याने अनेकांनी बनावट कागद तयार करून बेटावरील जागेवर अधिकार प्रस्थापित करण्याचे कारस्थान केले होते. माझगावचा भाग, मनोर १५७१ मध्ये पोर्तुगालचा राजा सबॅस्टीन याने लिओनेल डिसूजा या दर्यासारंगाला भाडेपट्ट्याने

दिला होता. फिलीप राजाने १६३७ मध्ये बर्नादिन डीटावरा या डिसूजाच्या नातवाला हा भाग नाममात्र भाड्याने वंशपरंपरा इनाम करून दिला. त्यावेळी वंशपरंपरा खाजगी मालकीची अशी ही एकच जमीन होती. इतर कुळे वार्षिक भाडे आणि सैनिकी नोकरीच्या करारानुसार जमिनीचा उपभोग घेत. या पोर्तुगीज जमीनधारकांची कंपनीच्या अधिकाऱ्यांशी नित्य भांडणे होत. सिन्योर अल्वारीज पेरेज डीटौरा या माझगावच्या इनामदारासह १२० जमीन हक्कधारकांची १२ नोव्हेंबर, १६७२ रोजी सभा भरवण्यात आली. आणि जागेचे स्वामित्व म्हणून सालीना १२०० पाउंड आकार निश्चित करण्यात आला. Foras (पोर्तुगीज Fora = दार) म्हणजेच (Pensio = पेन्शन) वरील मागणीला १६-७-१६७४ रोजी भरलेल्या सभेत मान्यता देण्यात आली. याबाबत काही इंग्लिश जमीनधारकांनी खळबळ केली. परंतु ऑगियरने त्याला दाद दिली नाही. बेटावरच्या जमिनीचे या प्रकारे वाटप झाले तरी किनारपट्टीवरील जागा सरकारच्या ताब्यात राहिली. त्याचा उपयोग मृतांचे दहन आणि दफन करण्यासाठी होत असे.

## समुद्रकिनाऱ्यावरील दफनभूमी

दफनभूमीच्या किनाऱ्यावरील खुणा आजही दिसतात. मुंबई मराठी साहित्य संघाची इमारत आहे त्या केळेवाडीच्या उत्तर भागी ख्रिस्ती दफनभूमी असावी. पहिल्या खुल्या नाट्यगृहातील रंगमंचाचा पाया खणताना तिथे मृतांच्या अस्थी सापडल्या होत्या. केळेवाडीच्या दक्षिणेस आजही मुसलमानांची दफनभूमी आहे. ठाकूरद्वार रस्त्याच्या दक्षिणेस आज 'एस्. के. पाटील' उद्यान आहे, तिथे प्राटेस्टंट ख्रित्यांची दफनभूमी परवापर्यंत होती. विल्सन हायस्कूल आणि कॉलेज यांचे संस्थापक डॉ. जॉन विल्सन् यांचे थडगे तेथे होते. त्यापुढे मुस्लिमांची दफनभूमी आहे. आणि त्यापुढे मरीन लाइन्स् स्टेशनच्या कोपऱ्यापर्यंत सोनापूर ही हिन्दूंची दफनभूमी आहे. आजचा क्वीन्स् रोड तेव्हा पाण्याखाली होता. बेटांच्या पश्चिमेस समुद्रकिनारा, वाळकेश्वर, महालक्ष्मी, वरळी,

दादर आणि माहीमपर्यंत स्मशानभूमी होत्या. त्यापैकी आजही काही उपयोगात आहेत. माझगाव ते शिवडीपर्यंतच्या पूर्व किनाऱ्यावरही स्मशानभूमी होत्या. त्यापैकी शिवडीची ख्रिश्चन दफनभूमी आजही वापरात आहे. इथल्या किनाऱ्यावरील स्मशानभूमीस लागून असलेली खाजगी जागा, ती वरील बांधकामासकट सुमारे दहा लाख पाउंडास नंतर पोर्ट ट्रस्टने विकत घेतली.

वर जो ऑंगियरच्या कन्व्हेशननुसार करार झाला त्यास अधिकृत सरकारी मान्यता मिळाल्याची नोंद नाही. परंतु त्यानुसार ' पेन्शन ' ची वसुली मात्र चालू राहिली. एतद्देशीयास सात वर्षे नोकरी केल्यावर अर्धा पगार आणि जमीन देण्यात येई. इ. स. १६७६ मध्ये शंभर जमीनधारकांनी ६०० सैनिकांची फलटण तयार केली होती. कोणी सैनिकी नौकरी नाकारली तर त्याची जमीन जप्त होई. परळच्या जेसुइटांनी जंजिऱ्याच्या शिद्दीशी हातमिळवणी केली, म्हणून १६९० परळ जप्त झाले. तीच गोष्ट शिवडीची. इ. स. १७१८ मध्ये इनामदारी नष्ट करून मिलिटरी टॅक्स् बसवण्यात आला. त्यावेळी मुंबईची वसाहत वाढवण्याचा प्रयत्न असे. कच्छ, काठेवाडमधूनच नव्हे तर इराणी आखात आणि तांबड्या समुद्राचा परिसर येथून जी माणसे मुंबईस आली किंवा आणवण्यात आली, त्यांना प्रवास खर्च देण्यात येई. सर्वांना प्रवेश खुला होता.

वर सांगितल्याप्रमाणे ऑंगियर कन्व्हेशनखाली किनारपट्टीवरील चाळीस यार्ड पट्टीवर कंपनी सरकारचे स्वामित्व प्रस्थापित झाले. किल्ला कंपनीच्या ताब्यात आलाच होता. बाहेरील २८००० चौ. यार्ड जागा थोडी थोडी अशी सरकारला विकत घ्यावी लागली. त्यासाठी १७६० पासून १८२० पर्यंत एकूण ७,३७,९२७ खर्च करावे लागले.

याप्रमाणे मुंबई बेटे पूर्ण ताब्यात आली. मलबारहील ताब्यात होतीच. ती रु. १३० वार्षिक भाड्याने गुरचराईसाठी देण्यात आली होती. कुलाबा बेट मात्र ताब्यात नव्हते. ते १६७४ मध्ये विकत घ्यावे लागले. (१८८६ साली कुलाब्यातील लोकवस्ती १७१८२ होती. तिथे नारळीची झाडे होती. वस्ती कोळ्यांची होती.)

किल्ल्याच्या बाहेर उत्तरेस झोपडपट्टी होती. ती उठवून एक मैल लांबीचा रस्ता करण्यात आला. त्याचे नाव बझार स्ट्रीट असे होते. कारण त्याच्या टोकास बाजार होता. हे एक गावच होते. १८०३ च्या अग्निप्रलयात ते भस्मसात झाले.

## राम कामती : वाळकेश्वरचा निर्माता

अठराव्या शतकात राम कामती नावाचा शेणवी पुरुष प्रसिद्धीस आला. तो सुरुवातीस इंग्रजांच्या सैन्यात होता. त्याने मद्रास प्रान्ती लढाईत भाग घेतला होता. त्याचे सील वापरून कोणीतरी खोटे कागद तयार केले. त्याला गव्हर्नरला कैद करण्याच्या आंगऱ्यांच्या कटात गोवण्यात आले. कामतीला कैद केले (१७२०). राजद्रोहाचा त्याच्यावर आरोप ठेवला. याच राम कामतीने वाळकेश्वर येथील शिवालयाचे १७१५ मध्ये पुनररूज्जिवन केले होते. इ.स. १७१८ मध्ये इंग्लिश चर्चचे उद्‌घाटन झाले, तेव्हा उपस्थित असणारात तो एक प्रमुख एतद्देशीय होता. अशा प्रतिष्ठित गृहस्थांची इंग्रजांनी उचलबांगडी केली. माझगांवचा पोर्तुगीज इनामदार १७६० मध्ये चांगला सुखवस्तू होता. पण छानछोकी, आळशी जीवन यामुळे पुढे त्या घराण्यात कर्जबाजारी शिरली आणि ऱ्हास ओढवला. इ.स. १७८० मध्ये मुंबईची वस्ती फक्त दीड लाखांच्या घरात होती. पुढील शंभर वर्षांत ती साडेसहा लाख झाली. पुढील दहा वर्षांत (१८८१) पावणे आठ लाखापर्यंत वाढली.

१७१८ पूर्वी बॉम्बे कॅसलला आणि तटबंदीच्या आतील भागास कोट म्हणत. त्या साली कोटाची भिंत बांधून पुरी झाली आणि त्या भिंतीच्या आतला सर्व भाग कोट म्हणून ओळखला जाऊ लागला. औगियरच्या कन्व्हेन्शनप्रमाणे 'पेन्शन' व 'टॅक्स' असे करवसुलीचे दोन भाग असत. पेन्शन म्हणजे मुळात ठरवलेला सारा आणि सैननकी नोकरी केली नाही तर घ्यावयाची नुकसान भरपाई टॅक्स म्हणून करावी लागे. या टॅक्सची एकूण वसुली १८८२ साली रू. ५६,९९४-४-१० इतकी झाली होती. त्यावेळी बेटात नारळीची १४,४७१ आणि ताडाची ४,३९२ झाडे

होती. एकंदर ७,७३,१९६ लोकवस्तीपैकी ७,१७,१५१ कोटात राहत. बेटाच्या एकंदर २२ चौरस मैलांपैकी शहराचा भाग फक्त एक चौरस मैल होता.

## मुंबईतील फोर्ट विभाग

साष्टी तालुका, वसई आणि ठाणे हा भाग, मराठ्यांकडून १७३९ साली कंपनी सरकाने जिंकून तहात आपल्या कबज्यांत घेतला. मुंबईतील बोरीबंदर पलिकडील समुद्रापासून ते चर्चगेटपुढील नरिमन पॉइंट या पूर्व पश्चिम रेषेच्या दक्षिणेकडील रीगल सिनेमापर्यंतचा भाग फोर्ट किंवा कोट असे नाव आहे. या भागातील हायकोर्टाजवळच्या एल्फिन्स्टन् कॉलेजच्या मागच्या बाजूस जी मोठी इमारत आहे, अलिकडेपर्यंत मुंबई सरकारची कचेरी होती. त्यास सेक्रेटरीएट म्हणत. तिथून निघणाऱ्या सरकारी आदेशांवर आणि ठरावांवर 'बॉम्बे कॅसल्' असा पत्ता दिलेला असे. उत्तरेस सेंट जॉर्ज हॉस्पिटल पासून जनरल पोस्ट ऑफिसवरून चर्चगेटपर्यंत आणि दक्षिणेस अपोलो बंदर, ताजमहाल हॉटेल, कॉउन्सिट् हॉल, कावसजी जहांगीर हॉलपासून आंबेडकर पुतळ्यापर्यंत तटबंदी होती. यांच्या आतील भाग तो कोट. यातील बॅस्टीयन रोड रॅम्पार्ट रो (जहांगीर आर्ट गॅलरीपासून यलो गेटापर्यंतचा रस्ता), ही आणि अशी 'कोटा' शी निगडीत नावे आहेत.

## पहिले गव्हनर्मेंट हाऊस

इ.स. १५३८ मध्ये पोर्तुगालच्या राजाने गार्सिया दा ओर्ता या वनस्पती शास्त्रज्ञास मुंबई बेट भाड्याने दिले. त्याचा बंगला टाऊन हॉलच्या मागे होता. त्यानंतर पोर्तुगीजांनी किल्ला बांधला. १६१७ मध्ये डच आणि इंग्लिश यांच्या हल्ल्यात किल्ल्याची बरीच नासधूस झाली. १६६५ मध्ये इंग्रजांनी किल्ल्याचा ताबा घेतला त्यावेळी "मनोर हाऊस" या ओर्ताच्या बंगल्याच्या भिन्तीच तेवढ्या उभ्या होत्या. त्याची दुरुस्ती करून गव्हर्नमेंट हाऊस मध्ये रूपांतर करण्यात आले. जेरॉल्ड ऑगियर हे इथे राहणारे पहिले गव्हर्नर (१६६९ ते १६७७). इ.स. १७५७ मध्ये ह्या

बंगल्याचे वरचे मजले पाडण्यात आले आणि गव्हर्नरचे निवासस्थान दुसरीकडे हलवले. ही मनोर हाऊसची इमारत दारूखान्याच्या पॅटर्नरूमसमोर आहे.

किल्ल्याची तटबंदी १७६६ पर्यंत पुरी झाली. १७३९ ते १७४३ या काळात तटाभोवती खंदक खोदण्यात आला. बोरीबंदरजवळील आजच्या सेंट जॉर्ज हॉस्पिटलच्या पूर्वेस जुन्या किल्ल्यांच्या जागी एक पक्का किल्ला ऑगियरने बांधला. त्यास फोर्ट जॉर्ज म्हणत. मोठ्या किल्ल्याचे अवशेष टाऊनहॉलच्या नाविकदलाच्या अखत्यारीतील भागात आजही पाहता येतात. इथे किल्ल्याचे प्रवेशद्वार आहे आणि पोर्तुगीजकालीन दगडी कालदर्शक छायायंत्र आहे. किल्ल्यातील १० टन वजनाची घंटा पोर्तुगीजांची होती. ती नंतर बरोज लेन मधल्या दाबूल चर्चला दिली.

किल्ल्यामध्ये मनोर हाऊस शिवाय टांकसाळ, टाऊन हॉल, (ओल्ड) कस्टम हाऊस, अर्सनल, सैनिकांच्या बॅरॅक्स् आणि जुने सेक्रेटरीएट होते.

**ओल्ड गव्हर्नमेंट हाऊस**

जुने गव्हर्नमेंट हाऊस कोटात अपोलो स्ट्रीट आणि हमाम स्ट्रीटमधील एका इमारतीत होते. या इमारतीला न्यू हाऊस म्हणत. याचा विस्तार एस्प्लनेडपर्यंत होता. त्याच्याजवळची इमारत इ.स. १७८० साली विकत घेऊन तिथे सेक्रेटरीएटची व्यवस्था लावण्यात आली. इ.स. १७५७ पूर्वी किल्ल्यातील फोर्ट हाऊसमध्ये गव्हर्नर राहत असे. आज परळच्या हाफकीन इन्स्टिट्युटच्या वापरात असलेली इमारत १७५० पासून गव्हर्नमेंट हाऊस म्हणून वापरात होती. तिथे फक्त उन्हाळ्यात गव्हर्नरचे वास्तव्य असे. इ.स. १८२९ पर्यंत गव्हर्नरचे निवासस्थान कोटातील वरील इमारतीतच असे. १८७३ मध्ये तिथे सेक्रेटरीएटच्या कचेऱ्या आल्या. माऊंट स्ट्युअर्ट एल्फिन्स्टन् इथे राहत असे. याच इमारतीत १८११ मध्ये गव्हर्नर डंकन निधन पावला. परळला आज जिथे हाफकीन इन्स्टिट्युट आहे ती इमारत प्रथम गव्हर्नमेंट हाऊस म्हणून बांधण्यात आली. या इमारतीस तेव्हा मोठे आवार होते. त्याचे प्रवेशद्वार आजही गांधी हॉस्पिटलजवळील रस्त्याच्या बाजूस उभे आहे. इथे परळी बैजिनाथचे

प्राचीन मंदिर होते. या मंदिराचा पोर्तुगीजांनी विध्वंस केला. आणि खिस्ती प्रार्थना मंदिर बांधले. इ.स. १७२० मध्ये इमारतीची डागडुजी करून त्याचे निवासस्थान बनवले. महालक्ष्मीनजीकच्या हॉर्नबी व्हेलॉर्ड या बांधामुळे प्रसिद्ध असलेला हॉर्न्बी १७७६ मध्ये इथे रहात होता. इ.स. १८०३ मध्ये न्यायमूर्ती जेम्स् मॅकिण्टॉश इथे राहत होता. १८१९ साली इमारतीत वाढ करण्यात आली आणि माऊंट स्टयुअर्ट एल्फिन्स्टन् इथे राहायला आला. या इमारतीत जुन्या चर्चचे अवशेष सापडले आहेत. प्रिन्स् ऑफ वेल्स्, सातवे एडवर्ड इथे १८७५ मध्ये एक आठवडाभर राहिले होते. लेडी फर्ग्यूसन १८८३ साली याच इमारतीत मृत्यू पावल्या. इ.स. १८८५ मध्ये गव्हर्नर म्हणून नियुक्त झालेले लॉर्ड रे मलबार हिलवरील गव्हर्नमेंट हाऊस मध्ये रहायला गेले.

परळच्या या गव्हर्नमेंट हाऊसमध्ये १८९९ मध्ये प्लेग संशोधन संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेत १९०६ साली " बॉम्बे बॅक्ट्रिऑलॉजिकल लॅबोरेटरी " स्थापन करण्यात आली. रशियन वैद्यकीय संशोधक हाफकीन याचे संशोधन कार्य याच इमारतीत फळास आले. त्यांचे नाव या संस्थेस १९२५ साली देण्यात आले.

**ओल्ड कस्टम हाऊस**

आज मुंबईच्या कलेक्टरांची कचेरी, विवाह नोंदणी कचेरी, जमीन मालकी व्यवहार याचे नोंदणी अधिकारी, दारूबंदी अधिकारी यांच्या कचेऱ्या असलेल्या टाऊन हॉलच्या दक्षिणेकडील इमारतीस "ओल्ड कस्टम हाऊस" म्हणून संबोधले जाते. यातील काही इमारती पोर्तुगीजांच्या काळात बांधलेल्या आहेत. त्यापैकी काही आजही शाबूत आहेत. या इमारतींच्या पूर्वेस मुंबईचे मुख्य बंदर होते. या इमारतींपैकी काहींचा गुदामे म्हणून वापर होत असे, कंपनी सरकारच्या खात्यातील कारकुनांच्या (रायटर्स) निवासासाठी या बॅरक्सचा उपयोग करत असत. त्यामुळे रायटर्स बिल्डिंग्ज् असे त्यांना संबोधण्यात येई. या भागांतील दर्शनी इमारत १७०९ साली उभारण्यात आली. या इमारतीचा १८०२ पासून कस्टम हाऊस म्हणून उपयोग होऊ लागला. आता इथे कस्टम कचेऱ्या

नाहीत, त्या " न्यू कस्टम हाऊस " या बेलार्ड पियरवरील इमारतीत नेण्यात आल्या आहेत. इ. स. १८९५ मध्ये ओल्ड कस्टम हाऊसमधील इमारतीची संपूर्ण दुरुस्ती करण्यात आली. आता नशाबंदी खात्याच्या कचेऱ्या इथे असल्यामुळे गांजा, चरस, इत्यादी पदार्थ इथे गोदामातून ठेवण्यात येतात.

मुंबई राज्यात औद्योगिक खाते सुरू झाले तेव्हा त्या खात्याच्या संचालकांच्या कचेऱ्या इथे होत्या. आता त्या सचिवालयात (मंत्रालयात)हलवण्यात आल्या आहेत. परंतु या खात्यातील ' वेट्स् ॲण्ड मेझर्स ' खात्याच्या कचेऱ्या पुष्कळ काळ आतल्या इमारतीच्या तळमजल्यावर होत्या.

**टाउन हॉल**

नागरिकांच्या सभा भरवण्याची मुंबईतील पहिली जागा. १६७५ च्या दरम्यान, त्यावेळच्या न्यायालयाची इमारत त्यानंतर गनबो स्ट्रीटवरील मापलापोल इमारतीत गव्हर्नर ऑगियरचे न्यायालय होते, तिथे भरे. इ. स. १७२० ते १७८८ या काळात रामा कामतीच्या घरातील एका दिवाणखान्यात नागरिकांच्या सभा भरत असत. नंतर हॉर्न्बी हाऊसच्या प्रमुख दालनात या सभा भरू लागल्या.

इ. स. १८०४ साली गव्हर्नर डंकन यांच्या अध्यक्षतेखाली परळच्या गव्हर्नमेंट हाऊसमध्ये एक सभा भरली. त्यावेळचे प्रमुख न्यायाधीश सर जेम्स् मॅकिन्टॉश यांची " लिटररी सोसायटी अव्ह बॉम्बे " या संस्थेच्या स्थापनेची योजना मान्य झाली. या संस्थेच्या सभा हॉर्निमन सर्कल जवळील नाट्यगृहात भरत असत. संस्थेसाठी, त्याचप्रमाणे ग्रंथालय, वस्तुसंग्रहालय आणि नागरिकांच्या सभांसाठी व्यवस्था असलेली अशी एक इमारत असावी अशी कल्पना पुढे आली. या कल्पनेचा मेसर्स ब्रूस फॉसेट आणि मेसर्स फॉर्ब्स या कंपन्यांनी पुरस्कार केला. इमारतीच्या खर्चासाठी लॉटरी काढली, त्यात एक लक्ष साडेअकरा हजार रुपये जमले. यशानंतर काढण्यात आलेल्या लॉटऱ्यात आणखी काही पैसे जमले.

इ. स. १८२१ मध्ये कर्नल कॉपर, रॉयल इंजिनियर यांनी इमारतीचा आराखडा तयार केला आणि बांधकामास सुरूवात झाली. लिटररी

सोसायटीने रुपये दहा हजार आणि सरकारने दहा हजार अशा देणग्या दिल्या. इ. स. १८२३ साली काढलेल्या लॉटरीत फक्त तीस हजार रुपये मिळाले. अशाप्रकारे एक लक्ष साडेएकसष्ट हजार रुपये निधी इमारतीसाठी उपलब्ध झाला. बांधकाम अपुरे राहिले होते. उर्वरित रकमेसकट ही योजना १८२६ साली कंपनी सरकारकडे सुपूर्द करण्यात आली.

१८२९ साली तयार झालेल्या इमारतींची उत्तर बाजू सोसायटीच्या हवाली करण्याचा निर्णय घेण्यात आला. या भागात भिंतीला लागून वर तक्तपोशीपर्यंत शिसवी कपाटे उभारण्यात आली. तीन लक्ष रुपये खर्च करून इमारतीचे उर्वरित बांधकाम पुरे करण्यास मंजुरी मिळाली. इ. स. १८३३ मध्ये इमारत पूर्ण झाली तेव्हा एकूण खर्च रु. ६,५६,६६९ झाला होता.

सोसायटीच्या जागेप्रमाणेच इमारतीचा दक्षिण भाग बांधला होता. या दोन्ही भागांमध्ये भव्य हॉल बांधला होता. २६० X १०० फूट अशी ही लांबरुंद इमारत आहे. हॉर्निमन सर्कलच्या समोरील पायऱ्या चढून गेल्यावर पहिल्या मजल्यावरील भव्य मुख्य हॉल लागतो. या हॉलच्या दक्षिण भागात लाकडी मंच आहे. आग्नेय कोपऱ्याला दरबार हॉल असून त्यात गव्हर्नरचा दरबार भरे आणि कायदे काऊन्सिलच्या सभा होत. मुंबई विद्यापीठाची पहिली बी. ए. ची परीक्षा १८६२ साली या हॉल मध्येच झाली. त्यात महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, बाळ मंगेश वागळे आणि वामन आबाजी मोडक हे चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

या इमारतीत माऊंट स्टयुअर्ट एल्फिन्स्टन, सर चार्लस् फोर्ब्स स्टीफन नॅबिग्टन, सर जॉन माल्कम्, लॉर्ड जॉन एल्फिन्स्टन, चार्लस मॉरिस्, सर जमशेटजी जिजिभॉय आणि नाना शंकर शेट यांचे पुतळे आहेत. इमारतीच्या दर्शनी भागी ग्रीक स्थापत्य पद्धतीचे उंच स्तंभ आहेत. आतही असेच खांब आहेत. या इमारतीच्या समोर मैदान होते त्याला बॉम्बे ग्रीन म्हणत. आता इथे छोटीशी बाग आहे. त्याला हॉर्निमन सर्कल असे नाव आहे. हॉर्निमन हे *बॉम्बे क्रॉनिकल* दैनिकाचे संपादक होते.

## कुलाब्याची दांडी : प्राग्ज् दीपगृह

पोर्तुगीज काळात मुंबई बेटाच्या दक्षिण टोकास, कुलाब्यास, १४३ फूट उंचीचा टेहळणी मनोरा बांधण्यात आला होता. जहाजाना मार्गदर्शन करण्यासाठी त्यावर आग पेटवून दिली जाई. इ. स. १७६८ साली इंग्रज सरकारने पाच हजार रुपये खर्चून कुलाब्याला भारतातील पहिले दीपगृह बांधले. तेव्हा १५० फूट उंच होते. सुरुवातीस ते काही काळच दिवा दाखवी. इ. स. १७७२ पासून त्यावर तेलाचा दिवा दररोज प्रज्वलीत ठेवण्यात येऊ लागला. पहिल्या वर्षी तेलाचा खर्च रु. ६३० आला होता. जहाजास या मार्गदर्शनासाठी काही आकार द्यावा लागे. तो शंभर टनास रु. २ असा होता. इ. स. १७९७ मध्ये साडेसहा हजार रुपये खर्च करून या दीपगृहावर परावर्तक आरशांचा कंदिल बसवण्यात आला. त्याचा प्रकाश निरभ्र आकाशात २१ मैलपर्यंत दिसत असे.

सध्याचे दीपगृह मुंबई बेटाच्या नैऋत्येकडे समुद्रसपाटीपासून अठरा फूट उंच खडकावर बांधलेल्या १६८ फूट उंचीच्या मनोऱ्यावर आहे. हे दीपगृह १८७४ मध्ये बांधून झाले. एक नोव्हेंबर, १८७४ पासून इथे दिवा लावला. हा दिवा ६८ मैलांवरून दिसतो. त्यास सहा लक्ष वीस हजार रुपये खर्च आला होता. या मनोऱ्यात आठ कोठड्या आहेत. त्यात गोल जिन्याने प्रवेश करता येतो. या मनोऱ्यातच दीपगृहाचे अधिकारी, तज्ज्ञ, सेवक यांच्या निवासाची सोय आहे. शिवाय गोडे पाणी, शिधा आणि इतर सामानाचा साठा ठेवलेला आहे.

वरच्या फिरत्या कंदिलास आठ बाजू आहेत. तो नित्य फिरता आहे. त्याच्या एका प्रदक्षिणेसह ८० सेकंद लागतात. या दिपगृहावरील स्मारकशिला आर्ट स्कूलचे प्राचार्य लॉकवुड किपलिंग यांनी आरेखली आहे. ते त्यावेळी सर जे. जे. स्कूल अव्ह् आर्टस्‌चे डीन होते. आवारातील डीनच्या बंगल्यात ते राहत. इथेच रुडियार्ड किपलिंगचा जन्म झाला.

## मुंबईची न्यायव्यवस्था

इ. स. १६७२ मध्ये कोर्ट ऑफ ज्युडिकेचरची मुंबईत स्थापना झाली. त्याच्या उद्‌घाटनाच्या वेळी कंपनी सरकारचे गव्हर्नर जनरल ऑंगियर म्हणाले,

The Inhabitants of this Island consist of severale nations and Religions to wit, English, Portuguese and other Christians, Moores and jentues, but you, when you sit in this seat of justice and judgement, must look upon them with one single eye as I doe, without distinction of nation or Religion for they are all His Majestie's and the Honble Company's subjects as the English are, and have all an equal title and right to justice and you must doe them all justice, even the meanest person of the Island, and in particular the poore, the orphan, the widow and stranger, in all matters of controversy, of Common right, and menin and Tuman ; And this not only against the other, but even against myself and those who are in office under me may against the Honble Company themselves when low, Reason and Equity shall require you soe to doe, for this is your duty and therein will you be justified, and in soe doing God will be with you to strengthen you, his majestie and the Company will comend you and reward you, and I, in my place, shall be ready to assist countenance, honour and protect you to the utmost of the power and Authority entrusted to me, and so I pray God give his blessing to you.

प्रत्यक्षात मात्र या प्रमाणे न्यायदान झाले असे दिसत नाही. न्यायमूर्ती आपापल्या पद्धतीप्रमाणे निकाल देत.

१० फेब्रुवारी, १७२८ रोजी टॉउन हॉलमध्ये मेयर कोर्ट स्थापन झाले. त्यात मेयर आणि दहा आल्डरमन् होते. सर्व मुलकी खटले या कोर्टापुढे चालत. त्यांच्या निकालावरील अपील गव्हर्नरपुढे चाले.

इ. स. १७९८ मध्ये रेकॉर्डर्स कोर्ट स्थापन झाले. त्यात शहराचा मेयर, तीन आल्डरमन् आणि एक रेकॉर्डर, की जो न्यायाधिकारी होता, ह्यांचा समावेश होता. रेकॉर्डर हा पाच वर्षे बॅरिस्टरी केलेला असे. या न्यायालयात मुलकी आणि फौजदारी खटले चालत. यावरील अपील फक्त ' किंग इन् काउन्सिल ' पुढे चाले. यापूर्वीचे न्यायमूर्ती कंपनी सरकारने नेमलेले असत. तर प्रस्तुत कोर्टाचे न्यायाधीश राजाने नेमलेले असत. याच न्यायालयांच्या कारकिर्दीत न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य प्रस्थापित झाले. सर जेम्स् मॅकिंटॉश आणि सर एडवर्ड बेस्ट यांनी न्यायदानात

शासनाने केलेल्या हस्तक्षेपाचा यशस्वी प्रतिकार केला होता.

रेकॉर्डरच्या बरोबर हिंदू पंडित आणि मौलवी न्यायदानात मदत करण्यासाठी बसत असत. रेकॉर्डरचे न्यायपीठ १८२४ पर्यंत अस्तित्वात होते. त्यानंतर सुप्रीम कोर्टाची स्थापना झाली आणि सर एडवर्ड वेस्ट यांची मुख्य न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. त्यांनी न्यायदानातील स्वतंत्रता सांभाळली.

सर जॉन मालकम् हे मुंबई इलाख्याचे गव्हर्नर असताना त्यांनी सुप्रीम कोर्टाच्या निकालावर कार्यवाही करण्याचे अमान्य केले. त्यामुळे सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश रुष्ट झाले आणि ही नाखुशी कोर्टाच्या खुल्या अधिवेशनात त्यांनी जाहीर केली :

The Court would not allow any individual, be his rank ever so distinguished or his powers ever so predominant, to address it in any other way respecting its judicial and public functions, than as the humblest suitor, who applies for its protection, within these walls, we know no equal and no superior but God and the King.

सुप्रीम कोर्टाचे दोन न्यायाधीश निधन पावले. उर्वरित न्यायाधीश सर जॉन पीटर ग्रँट यांनी पुढे निर्णय दिला. त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे त्यांनी सुप्रीम कोर्टाचे कामच बंद केले. ते निवृत्त होईपर्यंत पाच महिने सुप्रीम कोर्टाचे काम थांबून राहिले होते.

**हायकोर्टची इमारत**

गव्हर्नर ऑगियर यांनी १६७२ मध्ये कस्टम् हाऊसच्या इमारतीतील गिल्ड हॉलमध्ये सनदी न्यायालयाचे उद्‌घाटन केले. नेव्हल डॉकयार्डच्या टॉवरसमोर कामा हॉलच्या शेजारी ही इमारत आहे. हे न्यायालय नंतर गनबाऊ स्ट्रीट वरील मापला पोळच्या इमारतीत हालवले. त्यानंतर ते बझार गेट स्ट्रीटवरील राम कामती यांच्या घरात नेले. इ. स. १७८६ मध्ये न्यायालय हॉर्नबी हाऊस मध्ये गेले. याच इमारतीचा उपयोग पूर्वी टाउनहॉल म्हणून करण्यात येत असे. इ. स. १८२४ मध्ये या न्यायालयाला सुप्रीम कोर्टाचा दर्जा देण्यात आला. त्याचे १८६२ मध्ये हायकोर्टात रूपांतर झाले. सध्याची हायकोर्टाची इमारत एप्रिल १८७८ साली पूर्ण

झाली. त्याला रु. १६,४४,५२८ खर्च आला. मान्य अंदाजाहून ही रक्कम रु. ३,००० नी कमी होती.

पूर्वी हायकोर्टाचे न्यायाधीश इंग्रज असत. इ. स. १८६४ मध्ये पहिले हिन्दी हंगामी न्यायाधीश म्हणून जनार्दन वासुदेव (१८६४-५) यांची नेमणूक झाली. पहिले कायम हिन्दी न्यायमूर्ती नानाभाई हरिदास (१८८३), पहिले हंगामी सरन्यायाधीश बद्रुद्दीन तय्यबजी (१९०३), मुंबई हायकोर्टाचे पहिले हिन्दी सर न्यायाधीश छगला हे होत.

हायकोर्टची जुनी इमारत नेव्हल डॉकयार्डच्या टॉवरसमोर कामा हॉलच्या शेजारी उभी आहे. इमारतीच्या दर्शनी भिंतीवर संगमरवरी शिलालेख आहे. इमारतीपुढील पोर्चवर सज्जा होता. त्यावरून ड्यूक ऑफ वेलिंग्टनने मुंबईच्या नागरिकांना दर्शन दिले होते. तो आता रस्तारुंदीत नष्ट झाला आहे. याच इमारतीत नंतर कित्येक वर्षे ग्रेट वेस्टर्न हॉटेल होते. आता इथे अनेक कंपन्यांच्या कचेऱ्या आहेत.

**मुंबई महानगरपालिका**

नगर शासनाचे काम सुरुवातीस ईस्ट इंडिया कंपनीचे अध्यक्ष काही अधिकाऱ्यांमार्फत करवून घेत असत. १७९२ साली पार्लमेंटच्या कायद्याने हे अधिकार गर्व्हनरकडे सुपूर्द करण्यात आले. १८४५ च्या कायद्याप्रमाणे म्युनिसिपल फंड स्थापन करण्यात आला आणि सात सदस्यांची एक कार्यकारी समिती नेमण्यात आली. १८५८ साली तीन कमिशनर्स नेमले. १८६५ मध्ये एक स्वतंत्र नगर शासन संस्था निर्माण करून मुख्य अधिकारी कमिशनर यांची नेमणूक झाली. ही नगर शासन संस्था म्हणजे जे. पी. चे मंडळ होते. सुमारे २०० जे. पी. चे मंडळ नगर व्यवस्था आणि पोलीस व्यवस्था ही दोन्ही कामे पाही. १८७२ मध्ये करदात्यांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे कॉर्पोरेशन निर्माण केले.

कमिशनरची नेमणूक झाली तेव्हा म्युनिसिपालिटीची कचेरी गिरगाव रस्त्याच्या टोकाला एका भाड्याच्या इमारतीत होती. नंतर ही कचेरी रॅम्पार्ट रोच्या पश्चिम टोकावर आज व्हिदम् हाऊस आहे त्या इमारतीत हलवली आणि पुढे समोरील आर्मी नेव्ही बिल्डिंगमध्ये नेली. याच जागेतून १८९३ पर्यंत नगर शासनाची सूत्रे हलवली जात असत. त्यापूर्वीच काही वर्षे कॉर्पोरेशनसाठी स्वतंत्र इमारत बांधण्यास सुरुवात झाली होती.

लॉर्ड रिपन यांच्या हस्ते १९-१२-१८८४ रोजी सध्याच्या बोरीबंदर समोरील इमारतीची कोनशिला बसविली होती. परंतु प्रत्यक्ष बांधणीस सुरुवात झाली ती २५-७-१८८९ रोजी. ही इमारत जुलै, १८९३ मध्ये पुरी झाली.

बोरीबंदर समोर हॉन्बी रोड आणि क्रुकशँक रोड यांच्या बेचक्यात ही दक्षिणाभिमुख भव्य इमारत आज उभी आहे. वास्तुशिल्पकार होते एफ्. डब्ल्यू. स्टीव्हन्स् आणि इंजिनियर होते रावसाहेब सीताराम खेडेराव. इमारतीची स्थापत्यशैली बाराव्या शतकातील गॉथिक पद्धतीची आहे, तर दर्शनी भागावरील घुमट पौर्वात्य शैलीचा आहे.

इमारतीचे मुख्य प्रवेशद्वार दोन रस्त्यांच्या कोपऱ्यावर दक्षिणाभिमुख आहे. बाहेर पोर्च असून त्यावर गच्ची आहे. गच्चीच्या दोन्ही टोकावर व्हेनेशियन शैलीच्या पंखयुक्त सिंहाचे शिल्प असून त्यांनी कॉर्पोरेशनचे बोधचिन्ह असलेली ढाल धरली आहे. तिसऱ्या मजल्यावर दर्शनी भागांत तेरा फूट उंचीचा स्त्रीचा पुतळा आहे. त्याच्या पायापाशी रंगीत बोधचिन्ह आहे. या शिल्पाकृती इंग्लिश शिल्पकार हेमन याने बनवल्या आहेत. इमारतीवर घुमट आहे. त्याच्या सभोवती गच्ची आहे. ती १६५ फूट उंचीवर आहे. घुमटाच्या कळसाची उंची २३५ फूट आहे. घुमटाखाली आत पाण्याची टाकी आहे. त्यातील पाण्याने लिफ्ट चालवले जाई. ते ९० फूट उंच जात असे. इमारतीच्या पश्चिम आणि पूर्व बाजूनाही चवथ्या मजल्यावर असेच छोटे घुमट आहेत. पश्चिमेस क्रुकशाँक रोडवर दुसरे प्रवेशद्वार आहे. त्यासमोर पोर्च. तिथून पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी दगडी जिना आहे. पहिल्या मजल्यावर उजव्या बाजूस कमिशनर बसतात. डाव्या बाजूस मुख्य सभागृह आहे. या सभागृहात अनेक पुतळे आहेत. त्यातले एक रा. ब. विश्वनाथ नारायण मंडलीक यांचा. मुंबई कॉर्पोरेशनची कार्यकक्षा १९५० मध्ये वाढवली. त्यात बृहन्मुंबईचा समावेश करण्यात आला. व्याप वाढला. कचेरीस जागा अपुरी पडू लागली म्हणून उत्तर बाजूस क्रुकशाँक रोडवर नवीन इमारत (विस्तार भवन) बांधण्यात आली आणि रस्त्यावरून पहिल्या मजल्यावर जोडण्यात आली.

इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर सर फेरोजशहा मेहतांचा भव्य पुतळा आहे. ते सुरुवातीचे महापौर, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु आणि राजकीय पुढारी होत. दादाभाई नौरोजी, दिनशा वाच्छा, इब्राहीम रहिमतुल्ला, चिमणलाल सेटलवाड, रुस्तुम मसानी, विठ्ठलभाई पटेल, जमनादास मेहता, वि. ना. मंडलीक, का. त्रि. तेलंग, जीवनलाल याज्ञीक, बद्रुद्दीन तैयबीजी, के. एफ. नरीमन, स. का. पाटील, आचार्य दोंदे असे महापौर आजवर होऊन गेले आहेत.

## मुंबईतील मार्केट

१८०९ साली गव्हर्नर जोनाथन डंकन याने कोटातील घोड्यांच्या तबेल्याचे मार्केटात रूपांतर केले. ती जागा सोईची नव्हती परंतु कोटातील लोकांना जवळ होती. १८३७ साली आरर्कीन मार्केटसाठी नळबाजारवर शेड बांधण्यात आली. शिवाय अबदुल रहमान स्ट्रीटवर आजच्या भाजीपाला गल्लीच्या जागी खाजगी मार्केट होते. चिराबाजार मार्केट, धोबी तलाव आणि ठाकूरद्वार यांच्यामध्ये गिरगाव रोडवर होते. आजुबाजुच्या खिश्चन मांसाहारी वस्तीस ते सोईचे होते. १८४७ साली मिंटरोडवर किल्ल्याच्या तटाबाहेर मार्केट बांधले. बझारगट स्ट्रीटवर ब्रेड मार्केट होते. तिथे पाव, लोणी, अंडी हे न्याहारीचे पदार्थ विकण्याची सोय होती.

१८६५ साली म्युनिसिपल ॲक्ट पास झाला आणि म्युनिसिपालटीची रीतसर स्थापना झाली. सर्वाधिकारी म्हणून कमिशनरचे पद निर्माण केले. पहिला म्युनिसिपल कमिशनर म्हणून आर्थर क्रॉफर्ड यांची नेमणूक झाली. ते सहा वर्षे अधिकारावर होते. अधिकाराची सूत्रे हाती येताच त्यांनी ज्या अनेक योजना हाती घेतल्या त्यात मध्यवर्ती मार्केटची योजना होती. त्यांनी सरकारकडून आजची पोलीस कमिशनरच्या कचेरीसमोरील जागा मिळविली. बोरीबंदरपासून धोबीतलावपर्यंत खुले मैदान होते. त्याच्या उत्तर कोपऱ्यात ही जागा कोट आणि गिरगाव-भेंडीबाजार पर्यंत पसरलेल्या गाववस्तीस मध्यवर्ती होती. आज शंभर वर्षांनंतरही या मार्केटचे मुंबईत जे महत्त्व कायम राहिले आहे, ते ध्यानी घेता क्रॉफर्डची दूरदृष्टी पाहून अचंबा वाटतो.

१८६५ साली स्थापन झालेल्या म्युनिसिपालटीकडे प्रमुख काम गावाची स्वच्छता आणि रोगकारक अव्यवस्थित घाणेरड्या जागा नष्ट करून मृत्यू संख्या घटवणे हे होते. त्यानुसार गावात इतःस्ततः पसरलेले खाटिकखाने १८६६ साली बंद करून ते बेटाबाहेर माहीम खाडीपलिकडे वांद्र्यास नेण्यात आले. मिंटरोड आणि नळबाजार येथील मार्केटांची सुधारणा करण्यात आली.

## क्राफर्ड मार्केट

पोलिस कमिशनरच्या ऑफिससमोरील ७२००० चौ. यार्ड जागा मिळाल्यावर वास्तुशास्त्रज्ञ इमर्सन आणि सर जे. जे. स्कूलचे लॉकवूड कीप्लिंग यांच्या सहाय्याने आराखडा तयार करण्यात आला. मार्केटच्या इमारतीस रु. ११,१८,५०० खर्च आला. त्याचे जानेवारी, १८६८ मध्ये उद्घाटन झाले. पुढील वर्षापासून ते सुरु झाले. याचे तीन विभाग आहेत. पश्चिमेच्या दर्शनी बाजूस मुख्य प्रवेशद्वार, फळ बाजार विभाग असून त्यावरच्या मजल्यावर मार्केट सुप्रिटेंडंटची कचेरी आहे. प्रवेशद्वारावर घड्याळाचा मनोरा आहे. हे घड्याळ पूर्वी 'मुंबई टाईम' दाखवत असे. ही वेळ इंडियन स्टँडर्ड टाइमच्या मागे ३९ मिनिटे असे. परदेशी प्रवाशांना या घड्याळाकडे पाहून ते मागे पडले आहे असे वाटे. त्यांचे पूर्व पश्चिम २००० मैल अंतर असलेल्या हिन्दुस्थानात सुर्योदयाच्या वेळेतील फरकाकडे लक्ष वेधावे लागे. याचा उल्लेख Ben Dique याने आपल्या *A Visit to Bombay* या १९२६ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात केला आहे.

मार्केटच्या दक्षिण विभागात कोंबड्या, इतर पक्षी आणि धान्याची दुकाने आहेत. पूर्वेकडील भागात मासे. मांसमार्केट आता स्वतंत्र इमारतीत आहे. उत्तरेकडच्या पक्षात मसाले, तेले, भाजीपाला इत्यादीची छोटी छोटी दुकाने आहेत. पश्चिम आणि उत्तर पक्षातील मोकळ्या जागेत शेड बांधल्या आहेत. तिथे फळे, भाजीपाला याची घाऊक विक्री करणारे दलाल हजारो रुपयांची उलाढाल करतात. क्रॉफर्ड मार्केट बांधले तेव्हा त्यात ८८८ गाळे होते. वार्षिक उत्पन्न रु. १,०४,००० होते. बोरीबंदर, म्युनिसिपालटी, युनिव्हर्सिटीचा राजाबाई टॉवर या इमारतीप्रमाणे मार्केटच्या

प्रवेशद्वारावरील कमानीत भारतीय नागरीक जीवनव्यवहारदर्शक शिल्पाकृती बसवण्याची मूळ योजना होती. परंतु, कल्पक कलावंत लॉकवूड किप्लिंग मायदेशी परतल्यामुळे फक्त दोनच शिल्पाकृती बसवण्यात आल्या. पश्चिम प्रवेशद्वारावर पाण्याचे घडे घेतलेल्या गुर्जर स्त्रिया आणि शेट सावकार, तर उत्तर प्रवेशद्वारावर भाजीविक्यांच्या शिल्पाकृती आहेत. आत एक उत्तम कारंजे आहे. परंतु दुकानांनी वेढल्यामुळे ते आता निरुपयोगी झाले आहे.

उजव्या बाजूस १५० फूट X १०० फूट पश्चिम पक्षात फळे-फुले विकण्याचे गाळे आहेत. समोरचा किंवा उत्तर पक्ष ३५० फूट X १०० फूट असून त्यात भाजीपाला, मसाले, खाद्य पदार्थ यांची दुतर्फा दुकाने आहेत. या दोन्ही पक्षांची उंची ३० फूट असून त्यात पन्नास फूट रुंदीची दोन छपरे आहेत. मधला भाग १६० X १०० लांबरुंद आहे. त्याच्या छप्पराची उंची ५१ फूट आहे. घड्याळाचा मनोरा १२० फूट उंच आहे. बाहेरच्या खुल्या भागात पूर्वी बाग होती तिथे लॉक्वूडने तयार केलेले उत्तम कारंजे होते. त्यात निरनिराळ्या प्राण्यांच्या तोंडातून पाणी पडत असे. आज ह्या कारंज्याभोवती फळांच्या पाट्या रचल्यामुळे ते सुंदर कारंजे आत छपून गेले आहे.

**राजाबाई टॉवर**

उत्तरेस हायकोर्ट आणि दक्षिणेस सेक्रेटरीएटच्या इमारती यांच्यामध्ये मुंबई विद्यापीठाच्या इमारती आहेत. त्यातील ग्रंथ संग्रहालयाची इमारत आणि तिच्यावरील राजाबाई टॉवर हा घड्याळाचा मनोरा मुंबई शहराचे प्रतीक म्हणून प्रसिद्ध आहे. ही इमारत १८७८ मध्ये पुरी झाली. तिच्या समोरील सिनेट हॉल ही इमारत १८७४ साली बांधून पुरी झाली.

इमारतीचे बांधकाम १८६९ साली सुरू झाले. सर एगल्बर्ट स्कॉट यांनी या इमारतींचे आराखडे तयार केले. सिनेट हॉलच्या इमारतीस तीन लक्ष ऐंशी हजार रुपये खर्च आला, त्यापैकी एक लक्ष रुपये सर कावसजी जहांगीर यांनी देणगीदाखल दिले होते. ग्रंथसंग्रहालयाच्या इमारतीस दोन लक्ष ऐंशी हजार खर्च आला.

ग्रंथसंग्रहालयाच्या इमारतीवरील मनोरा राजाबाई टॉवर म्हणून प्रसिद्ध आहे. तो २८० फूट उंच आहे. या टॉवर मध्ये ६८ फुटांवर एक हॉल आहे. तिथपर्यंतची इमारत चतुःष्कोनी आहे. वरचा भाग अष्टकोनी आहे. ११८ फुटांवर दुसरा आणि १८६ फुटांवर तिसरा हॉल आहे. याच हॉलच्या बाजूला घड्याळे चालवणारी यंत्रसामुग्री आहे. या मजल्यावर जायला १८० पायऱ्या चढून जाव्या लागतात. आणखी ५२ पायऱ्या चढल्यावर शेवटचा मजला लागतो. घड्याळाच्या बाजूला गच्ची आहे. तिथून सर्व मुंबईच नव्हे तर पूर्वेस समुद्रापलिकडील उरण, एलिफंटा यांचेही दर्शन घडते. या गॅलरीत मुंबईतील विविध जमातीतील पुरुषांचे विविध वेशभूषेतील आठ फूट उंचीचे आठ पुतळे आहेत. शिवाय ५२ फूट उंचीच्या घुमटाच्या बैठकीखालील खांबाच्या शीर्षावरही पुतळे आहेत. सरकारी इंजीनियर मुकुंद रामचंद्र यांनी केलेल्या नमुन्यावरून ते घडवले आहेत.

टॉवरवर बसवलेल्या घड्याळात दहा टन वजनाच्या १६ घंटा आहेत. हे घड्याळ लुण्ड ॲण्ड ब्लॉक्‌ले या लंडनच्या कंपनीने बनवले आहे. घंटांच्या नादांचा पाश्चात्य संगीत वाजवण्यास उपयोग होईल अशी व्यवस्था आहे. त्यांवर १६ गीते वाजवण्याची सोय आहे.

सुप्रसिद्ध ब्रोकर प्रेमचंद रायचंद यानी या इमारतीसाठी चार लाख रुपयांची देणगी दिली. त्यात शासनाने दीड लाखांची भर घातली. इमारतीस प्रेमचंदची आई राजाबाई हिचे नाव देण्यात आले. या इमारतीचे उद्‌घाटन १८८० मध्ये झाले. पूर्वी घड्याळाच्या मनोऱ्यावर कोणीही जाऊ शकत होते. १८९१ मध्ये दोन पारशी तरुणींनी मनोऱ्यावरून खाली उडी घेतली किंवा त्यांना लोटून देण्यात आले आणि त्यांचा मृत्यू झाला. तेव्हापासून वर जाण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत.

**एल्फिन्स्टन् कॉलेज**

सेंट कॅथीड्रलचे धर्माधिकारी रे. कॉब् यांनी १७१८ साली मुंबईतील पहिली शाळा सुरू केली. ती शंभर वर्षांनी बॉम्बे एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यात दिली. या संस्थेचा व्याप वाढल्यावर एल्फिन्स्टन् नेटिव्ह एज्युकेशन इन्स्टीट्यूटची स्थापना करण्यात आली. मूळ संस्थेचे १८२७ मध्ये बॉम्बे एज्युकेशन सोसायटी असे नामांतर केले होते.

१८२७ मध्ये एलफिन्स्टन् गव्हर्नरपदावरून निवृत्त झाले. त्यांच्या नावाने एल्फिन्स्टन् प्रोफेसरच्या जागा मंजूर करण्यासाठी म्हणून ४।। लाख रुपयांचा निधी जमवला होता. १८३५ मध्ये जॉन हार्कनेस आणि ओलेंबार यांची एलफिन्स्टन् प्रोफेसर म्हणून नेमणूक झाली. प्रारंभीचे वर्ग टाऊन हॉल मध्येच भरवण्यात येत. नंतर जे.जे. हॉस्पिट्ल समोरच्या भव्य इमारतीत कॉलजचे काम १८६२ पर्यंत चालू होते. पुढे गोवालिया टँक (ऑगस्ट क्रान्ती मैदान) वरील टँकर व्हीला मध्ये १८७१ पर्यंत कॉलेज चालू होते. १८६२ मध्ये अलेक्झांडर ग्रँट हे कॉलेजचे प्रिन्सीपल झाले. त्यांनी कावसजी जहांगीर यांच्याकडून दोन लाखांची देणगी मिळवली. ही इमारत परळ रस्त्यावर बांधली आणि १८७१ मध्ये कॉलेज तेथे नेले.

१८८८ साली शासकीय मध्यवर्ती छापखान्यासाठी सरकारने नवीन इमारत बांधण्याचे ठरवले. छापखाना तेव्हा अपोलो स्ट्रीट वरील सचिवालयाच्या इमारतीतच होता. नवीन सेक्रेटरीएटच्या पूर्वेस नवीन इमारत बांधली. परंतु त्यात छापखाना न आणता तिचा पुढचा भाग कॉलेजला देण्यात आला. मागच्या भागात दप्तरखाना मांडला.

कॉलेजच्या दक्षिण बाजूस क्रीडांगण होते. तिथे आता कावसजी जहांगीर हॉल आणि सायन्स् इन्स्टिट्यूटच्या इमारती आहेत. त्याच्या पश्चिम बाजूस पे ॲण्ड अकाऊण्टस् ऑफिसची इमारत बांधली आहे. इथे पूर्वी लाल बंगला होता. त्यात विद्यार्थ्यांचे वसतीगृह असे.

सध्याची कॉलेजची इमारत इ.आय्. मंचरजी मर्झबान् यांच्या आराखड्याप्रमाणे बांधली आहे. या इमारतीचे उद्घाटन ४-२-८५ रोजी करण्यात आले. इमारतीला रु. ४,१८,५०० खर्च आला. मागच्या दप्तरखान्यावर नंतर मजला बांधला त्यास आणखी दोन लाख रुपये खर्च आला. मुख्य इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर प्राचार्यांचे निवासस्थान आहे. त्यामध्ये शंभर माणसे बसतील असा भव्य दिवाणखाना आहे. इमारतीच्या या वर आलेल्या भागाच्या उत्तरेस कै. पु. शि. रेगे प्राचार्य असताना एक प्रसाधनगृह जोडण्यात आले. त्यामुळे इमारतीच्या शोभेस गालबोट लागले आहे.

एल्‌फिन्‌स्टन्‌ कॉलेजला १८६० मध्ये मुंबई विद्यापीठाची मान्यता मिळाली. कॉलेजचे पहिले पदवीधर न्या. महादेव गोविंद रानडे, (सर) रामकृष्ण गोपाळ भांडारकर, बाळ मंगेश वागळे आणि वामन आबाजी मोडक. शिवाय दादाभाई नौरोजी, दिनशा वाच्छा, न्या. का. वि. तेलंग, वि.ना. मंडलिक, होरमसजी दादाभाई, कावसजी एदलजी, बंमनजी मास्टर, खंबाटा हे सुरुवातीच्या काळातील काही प्रसिद्ध विद्यार्थी.

एल्‌फिन्स्टन्‌ कॉलेजचा दर्जा फार मोठा समजला जातो. सुरुवातीच्या काळात युरपीयन प्राचार्य असत. नंतर भारतीय प्राध्यापक प्राचार्य होऊ लागले. त्यांचा दर्जा मुंबई प्रान्ताच्या शिक्षणाधिकाऱ्यांच्या बरोबरीचा असे. इंडियन एज्युकेशन सर्व्हिसमधुन त्यांची निवड होई. कित्येकदा अध्ययन-अध्यापनप्रेमी ज्येष्ठ प्राध्यापक शिक्षणाधिकारी म्हणून नेमणूक नाकारीत आणि प्राचार्यपदावर राहणे पसंत करीत. अशा पैकी अलिकडचे उदाहरण म्हणजे प्राचार्य रंग्लर का. रा. गुंजीकर.

**विल्सन कॉलेज**

इ.स. १८१३ मध्ये स्कॉटीश मिशनरी सोसायटीला परवानगी मिळाली. त्यानी शैक्षणीक कार्य सुरू केले. जॉन विल्सन १८२९ मध्ये हिन्दुस्थानात आले. प्रथम ते मराठी,संस्कृत,पर्शियन, गुजराती, हिन्दुस्थानी भाषा शिकले. त्याना हिब्रु आणि लॅटीन भाषा अवगत होत्या. या भाषांचे परीक्षक म्हणून १८५७ पासून ते विद्यापीठात काम करू लागले होते. ' ध क्लिफ् ' या आपल्या राहत्या घरात त्यांनी ' ध आंब्रोली इंग्लिश स्कूल ' २९ मार्च, १८३२ रोजी स्थापन केले. मार्गारिट विल्सन यांनी १८२८ सालीच मुलींची शाळा सुरू केली होती. १८३६ साली आंब्रोली शाळेत सात वर्ग सुरू झाले. ही शाळा नंतर मुंबई विद्यापीठासमोरील मिलिटरी स्क्वेअर लेनमध्ये नेली. तिथेच प्रथम कॉलजचा वर्ग सुरू झाला. त्यासाठी रे मरे मिचेल आणि रे नेस्बिट यांचे सहाय्य घेण्यात आले. त्यानंतर इमारतीसाठी निधी गोळा करण्यात आला. आणि भुलेश्वरजवळ आज जेथे गोकुळदास तेजपाळ हायस्कूल आहे ती इमारत बांधली या इमारतीच्या दर्शनी ओट्यावर चार सुंदर खांब होते, म्हणून तिला चार खांबाची शाळा म्हणत. या इमारतीची मालकी चर्च ऑफ

स्कॉटलंडकडे गेली. त्यावेळी विल्सन 'फ्री चर्च ऑफ स्कॉटलंड' मध्ये सामील झाले होते. त्यामुळे त्यांची शाळा मिलिटरी स्क्वेअर लेनमध्येच राहिली.

विल्सननी गिरगावात पोलीस स्टेशनसमोर आंब्रोली हाउसनजीक जागा विकत घेतली आणि १८५५ मध्ये इथे शाळा आणि कॉलेज हलवले. शाळेचे नाव 'फ्री जनरल असेम्ब्लीज् इन्स्टीट्युट' असे ठेवले होते. कॉलेज विभाग १८६१ मध्ये मुंबई विद्यापीठास जोडण्यात आला. विद्यापीठाशी संलग्न झालेले हे पहिले खाजगी कॉलेज. कॉलेजचे पहिले पदवीधर महादेव मोरेश्वर कुंटे आणि विठ्ठल नारायण पाठक. विल्सन पुढे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू झाले. इ. स. १८६९ मध्ये त्यांच्या स्मरणार्थ २१००० रुपये निधी जमवण्यात आला. या कामात डॉ. भाऊ दाजी आणि डेव्हीड ससून यांचा पुढाकार होता. त्यातूनच 'विल्सन फॉयलॉलॉजिकल् व्याख्यान माले' चा उगम झाला. इ.स. १८७२ मध्ये विल्सन भारतात परत आले आणि १८७५ मध्ये खिस्तवासी झाले.

मुंबई सरकारने दिलेल्या जागेवर (चौपाटी जवळील) १० मार्च, १८८५ रोजी इमारतीचा पायाभरणी समारंभ झाला. त्यावेळी कॉलेज आणि शाळा यांना विल्सनचे नाव दिले. इमारतीचा आराखडा जॉन ॲडम्स् यानी तयार केला होता. इमारतीचे उद्घाटन १४ मार्च १८८९ रोजी झाले. १९०८ साली इमारत वाढवण्यात आली. दक्षिण भागात कॉलेजचा हॉल आहे. त्या सभोवती गॅलरी आहे. उत्तर बाजूस प्रिन्सिपलचा बंगला होता. तो १९३५ साली कॉलेजच्या वाढीस जागा उपलब्ध करून देण्यासाठी पाडण्यात आला. पुढे हार्वे रोडवर हॉस्टेलची इमारत उभारली. त्यापूर्वी हॉस्टेल कॉलेजच्या मागल्या बाजूस होते. कॉलेजची इमारत बांधली तेव्हा समुद्राचे पाणी भरतीच्या वेळी आवारापर्यंत येत असे.

विल्सन कॉलेजचा जिमखाना तारापोरवाला ॲक्वेरियमिच्या दक्षिणेस रेक्लमेशनवर रेल्वे लाईनच्या पश्चिमेस आहे. त्याचे १९१६ साली उद्घाटन झाले.

## व्हिक्टोरिया टर्मिनस्

बोरीबंदर हे जहाजांचे बंदर होते. तिथेच मूळचे मुंबादेवीचे मंदिर होते. ते कुतुबुद्दीनने पाडून टाकले होते. १३१७ मध्ये ते पुन्हा उभारले

परंतु पोर्तुगीजांनी पुन्हा पाडून टाकले. देवळाजवळ तलाव होता त्या ठिकाणी पोर्तुगीज अमलात फाशी देण्याची व्यवस्था केली होती. म्हणून तलावाला फाशीचा तलाव असे म्हणण्यात येई.

बोरीबंदरचे पहिले स्थानक लाकडी इमारतीत होते. सध्याची इमारत एफ्. डब्ल्यू. स्टीव्हन्स याने बांधली आहे. त्याचे स्थानिक सहाय्यक रावसाहेब सीताराम खंडेराव आणि एम्. जनार्दन हे होते. या तीन मजली इमारतीला २७ लाख रुपये खर्च आला. इमारतीवरील नक्षी आणि खोदकामावर जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे डीन ग्रिफिथ्स् यांनी देखरेख केली. बांधकाम १८७८ साली सुरू झाले ते १८८८ मध्ये पूर्ण झाले. १८८७ साली व्हिक्टोरिया राणीची ज्युबिली झाली त्या निमित्ताने बोरीबंदर स्टेशनला व्हिक्टोरिया टर्मिनस् असे नाव देण्यात आले.

इमारतीचे मुख्य प्रवेशद्वार पश्चिमाभिमूख आहे. त्या बाजूच्या कुंपणावर वाघ आणि सिंह यांची भव्य शिल्पे आहेत. मधल्या चौकातील दर्शनी भागावर वर्तुळाकृती दगडी कोंदण आहे. त्यात सर जमशेदजी जिजिभाई, लॉर्ड एल्फिन्स्टन् लॉर्ड रे, माउंट स्ट्युअर्ट एल्फिन्स्टन्, सर बार्टल फ्रियर, नाना शंकरशेट यांचे मुखवटे कोरले आहेत. बाजूच्या कोपऱ्यात भारतातील निरनिराळ्या जमातीच्या प्रातिनिधिक पुरुषांचे मुखवटे कोरले आहेत. वरच्या घुमटाखाली साडेआठ फूट व्यासाचे घड्याळ बसवले आहे. घड्याळाखाली साडेसात फूट उंच व्हिक्टोरिया राणीचा पुतळा आहे. घुमटाच्या शिरोभागी प्रगतीचा निर्देशक असा साडेसोळा फूट उंचीचा पुतळा आहे.

**ॲग्री-हार्टिकल्चरल सोसायटी**

मुंबईमध्ये ११ फेब्रुवारी १८३० रोजी हंगामी गव्हर्नर सर सिडने बेकविथ ह्यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून ॲग्रो-हार्टिकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टन इंडिया या सोसायटीची स्थापना करण्यात आली. वनस्पतीच्या संशोधनासाठी बागेची आवश्यकता होती. बागेसाठी सरकारने प्रथम १८३५ मध्ये शिवडी येथे जागा दिली. तिच्यात १८३७ आणि १८४० साली वाढ करण्यात आली. त्यानंतरच्या पुढील २५ वर्षांत बाग चांगली

वाढली. ही जागा युरपीयनांच्या दफनासाठी देण्याचे ठरवल्यामुळे बागेला माझगावला जागा देण्यास सरकार कबूल झाले. अशा प्रकारे मिळालेल्या ३३ एकर जागेत व्हिक्टोरिया गार्डन आहे. १८७३ मध्ये बाग आणि म्यूझियम म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या हवाली करण्यात आली.

वस्तुसंग्रहालयाची कल्पना मुळात लॉर्ड एलफिन्स्टन् यांची. ते मुंबईचे गव्हर्नर होते (१८५३-६०). १८४८ पासून वस्तू तयार करण्यास सुरुवात झाली होती. पश्चिम महाराष्ट्रातील विविध उद्योगांची माहिती देणारी अशी कारागिरांची आणि रहिवाश्यांच्या चित्राकृती यात होत्या. प्रत्यक्ष म्युझियमची स्थापना १८५५ साली 'गव्हर्नमेंट सेंट्रल म्युझियम' म्हणून झाली. या संस्थेचे पहिले सेक्रेटरी आणि क्युरेटर ' धी बॉम्बे टाइम्स् ' चे संपादक डॉ. बुइस्ट होते. तयार झालेल्या वस्तू सुरुवातीस किल्ल्यातील सैनिकांच्या बराकीत (भोजनगृह) ठेवण्यात आल्या होत्या. १८५७ साली शिपायांनी उत्तरेत बंड केले. तेव्हा बंगालमधील इंग्रज सैनिकांच्या मदतीसाठी इंग्लंडहून सैनिकांच्या तुकड्या आल्या. त्या मुंबईत उतरल्या. त्यांना राहायला जागा हवी म्हणून बराकी खाली करण्याचा हुकुम ब्रिगेडियर जनरल याने म्युझियमला दिला. हे काम इतक्या घाईने करण्यात आले, की अननुभवी मजुरांच्या हातून पुष्कळच मोडतोड झाली. ज्या वस्तू शाबूत राहिल्या त्या टाऊन हॉलमध्ये हलविण्यात आल्या. या व्यवस्थेत डॉ. भाऊ दाजी यांचा भाग होता. तत्पूर्वी या वस्तूंचे प्रदर्शन झाले होते.

## व्हिक्टोरिया गार्डन आणि अल्बर्ट म्युझियम

१८८५ च्या १५ डिसेंबरला जगन्नाथ शंकरशेट यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची सभा भरवून राणीच्या नावे बाग आणि वस्तुसंग्रहालय स्थापन करण्याचे ठरले. त्या वेळी डॉ. भाऊ दाजी यांनी केलेल्या विस्तृत भाषणाचा अहवाल उपलब्ध आहे. तात्कालीक प्रेरणा १९५८ सालातील राणीचा जाहीरनामा (१-११-१८५८) ही होती. नाना शंकर शेट यानी रु. ५००० देणगी दिली. डॉ. भाऊ दाजी लाड आणि डॉ. बर्डउड हे संयुक्त कार्यवाह होते. या समितीने एक लाख रुपये जमवले. तितकेच

सरकारने अनुदान दिले. बाग आणि म्युझियमसाठी एस्प्लनेड आणि परिसर ही धोबीतलावाची जागा लॉर्ड एल्फिन्स्टन् यांनी देण्याचे कबूल केले. परंतु त्यांच्या निधनानंतर (२९-७-१८६०) तो बेत सिद्धीस गेला नाही. या संबंधात मुंबई सरकारने सेक्रेटरी ऑफ स्टेट यांना पत्राद्वारे विस्तृत अहवाल पाठवला. त्यात एस्प्लनेडच्या जागेचे फायदे नोंदवले आहेत. या भागात कॉलेजे आणि विद्यापीठांच्या इमारतीना जागा देता येईल आणि बाग-म्युझियम आणि शैक्षणिक संस्था याना परस्पर फायदा मिळेल हा एक विचार होता. एस्प्लेनेडच्या जागेस दादाभाई नौरोजींनी भाषण करून जोरदार पाठिंबा दिला. एस्प्लनेड ऐवजी सरकारने भायखळ्यावरील मौट एस्टेटमधील जागा दिली. ही जागा शैक्षणिक संस्थापासून आणि मुख्य वस्तीपासून लांब म्हणून गैरसोईची असली तरी जमीन आणि हवा या दृष्टिने बागेला जास्त उपयुक्त होती. हा सरकारी अहवालातील विचार प्रभावी ठरला.

वस्तुसंग्रहालयाचा कोनशिला समारंभ गव्हर्नर फ्रियर यांच्या हस्ते १९ नोव्हेंबर, १८५८ रोजी करण्यात आला. त्याच वेळी लेडी फ्रियर यांच्या हस्ते बागेचा मुहूर्त केला. कोनशिलेखाली एक तांब्याची पेटी पुरण्यात आली त्या पेटीत योजनेचे कागद, स्थापनादिन १५-११-५८ चा अहवाल, त्या दिवसाची वृत्तपत्रे, देणगीदारांची यादी, तत्कालिन नाणी, राणीच्या जाहीरनाम्याची (१-११-५८) प्रत या वस्तु ठेवल्या, पेटीच्या झाकणावर आतील बाजूस कोरलेल्या मजकुरात अध्यक्ष जगन्नाथ शंकर शेट, संयुक्त कार्यवाह डॉ. भाऊ दाजी आणि जी.सी.एम् बर्डउड, शेरीफ विल्यम लॉडन, स्थापत्यविशारद विल्यम् ट्रेसी यांची नावे आहेत. इमारतीच्या खर्चाचा अंदाज रु. ३,३७,००० होता. त्यातील निम्मा भाग नागरिकांनी पुरा करायचा अशी कल्पना होती. परंतु शेअर बाजारातील उलाढालीमुळे एकलक्ष दहा हजारांवर निधी गेला नाही.

शिवडीवरून बागेतील झाडे हलवण्यास १८६२ मध्येच सुरुवात झाली होती. इमारत १८७२ मध्ये पुरी झाली उद्घाटन गव्हर्नर सीमूर फिट्झिरॉल्ड यानी २२ मे, १९७२ रोजी केले. तो १८० फूट लांब आणि ८० फूट रुंद दुमजली आहे. वास्तुशिल्प इटालियन आहे. इंग्रज शिल्पकार नोबेल यानी तयार केलेला प्रिन्स अलबर्ट यांचा पुतळा आहे. इथे प्रथम राणी व्हिक्टोरियाचा पुतळा होता तो नंतर मेयोरोड वर हलवण्यात आला होता. शिवाय एल्फिन्स्टन्चा पुतळा उभा केला आहे.

**अल्बर्ट म्यूझियम मधील वस्तूसंग्रह**

राणीच्या बागेतील इमारत तयार झाल्यावर टाउन हॉलमध्ये सुरक्षित ठेवलेल्या गव्हर्नमेंट सेंट्रल म्युझियमच्या वस्तू अल्बर्ट म्युझियममध्ये आणवल्या. या संग्रहात देशातील वेगवेगळ्या जमातीतील स्त्री पुरुषांची वेशभूषा, आभरणे दाखवणारे तसेच, साधुबैरागी, देवदेवता यांचे छोटे पुतळे आहेत. हत्यारे, रत्ने आणि विणकामाचे सुंदर नमुने मांडण्यात आले आहेत. कोपऱ्यावरच्या खोलीत मुंबई शहराचे उठावाचे नकाशे आहेत. त्यात मूळची सात बेटे आणि उंच सखल भाग दाखवण्यात आलेले आहेत. मुंबईच्या इतिहासाच्या अभ्यासास आवश्यक अशी दुर्मिळ पुस्तके संग्रहित केलेली आहेत. म्युझियममध्ये दुर्मिळ चित्रांचा चांगला संग्रह आहे.

बागेचा एकंदर विस्तार ५० एकरांचा आहे. प्रवेशद्वारावरील नक्षिदार कठडा आणि दरवाजा नाना शंकर शेट आणि प्रेमाभाई हेमाभाई यांनी स्वखर्चाने बांधून दिला आहे. प्रवेशद्वारावर ६७ फूट अुंचीचा घड्याळाचा मनोरा आहे. बागेत चांगले प्राणीसंग्रहालय आहे. त्यात हत्ती, सिंह, वाघ इत्यादी वन्यपशू आणि पक्षांचा अंतर्भाव आहे. मुलांसाठी हत्ती आणि उंटावरच्या सफरीची सोय आहे. घारापुरी (एलिफंटा) येथील हत्तीचे भव्य शिल्प आणून इथे उभे केले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कोटातील परकीयांचे जे पुतळे हालवण्यात आले ते इथे आणून ठेवले आहेत. त्याची स्वच्छता नाही मग देखभाल कुठची ? याच संग्रहात मेयोरोडवरून हालवलेला राणी व्हिक्टोरियाचा पुतळा आणून टाकला आहे.

**वाळकेश्वर मंदिराचा इतिहास**

वाळकेश्वर (वाळुका - वाळूचे लिंग) हे नाव मलबार हिलवरील वाळकेश्वराचे मूळ लिंग वाळूचे केले होते त्यावरून पडले आहे. स्कंद पुराणातील सह्याद्रि खंडात एक कथा आहे ; त्यांत परशुरामाने टेकडीवरून बाण मारून गंगा निर्माण केली आणि वाळुकेश्वराची स्थापना केली अशी कथा आहे. परशुरामाने समुद्र हटवून अपरांतसह सप्तकोकणची निर्मिती केली असा कोकणपट्टीच्या निर्मितीचा इतिहास कोकणभर प्राचीन कालापासून सर्वतोमुखी आहे. सीतेच्या शोधार्थ श्रीराम लक्ष्मणासह मुंबईतील पश्चिम किनाऱ्यावरील टेकडीवर येऊन पोहचले. दररोज शिवलिंगाची ते पूजा करीत. शिवलिंग आणण्यासाठी लक्ष्मणास वाराणशीस पाठवले. त्याला वेळ लागला म्हणून श्रीरामाने वाळूचेच लिंग तयार करून पूजा

केली. इतक्यात लक्ष्मण शिवलिंग घेऊन आला ते स्थापन करून त्यावर देवालय बांधले ते वाळकेश्वर. आज देवळात असलेले शिवलिंग लक्ष्मणाने आणलेले आहे अशी कथा वाळकेश्वर महात्म्यात आली आहे. मूळचे वाळूचे लिंग समुद्रात नष्ट झाले ती जागा कोळ्यांना माहीत होती. प्रतिवर्षी शिवरात्रीस या जागेवर जाऊन कोळी पूजा करतात.

वाळुकेश्वराचे मंदिर शिलाहार राजांनी अकराव्या शतकात बांधून पुरे केले, त्याचा उल्लेख फ्रायरने १६७२ मध्ये केलेला आहे. ते मंदिर मुसलमानांच्या आणि पोर्तुगीजांच्या हल्ल्यात छिन्नविछिन्न झाले, त्या वेळी जवळच समुद्र किनाऱ्यावर एक नैसर्गिक कमान होती (तिला श्रीगुंडी असे म्हणत) कोळी तिची पूजा करीत. ती जागा सध्याच्या गव्हर्नमेंट हाऊसच्या आवारांत आहे. मूळचे वाळूचे शिवलिंग असलेली ती हीच जागा असावी. वाळकेश्वरला अफझलखानाच्या वधानंतर शिवाजीने भेट दिली होती असे सांगतात.

आज विद्यमान असलेले वाळुकेश्वराचे मंदिर राम कामतीने बांधले आहे. सारस्वत लोकांनी आजूबाजूस वस्ती केली, घरे बांधली. या सर्व परिसरात वाळुकेश्वराशिवाय इतर देवदेवतांची अनेक मंदिरे आहेत. मंदिराजवळ बाणगंगा तलाव आहे. त्याला पाताळ गंगा म्हणतात. तशात श्रीरामाने बाणमारून पाताळातील भोगवती नदीचे पाणी वर आणले तो ह्या बाणगंगेतील झरा असे सांगतात.

मंदिरातील शिवलिंग स्वयंभू मानले जाते. ते वितभर उंच आहे. त्यावर दगडी नागफणा आहे. पिंडीवर एरवी पितळेचा नाग बसविलेला असतो. शिवलिंगाजवळ पार्वती आणि गजाननाच्या संगमरवरी मूर्ती आहेत. पूजेसाठी एक गुजराती ब्राह्मण आणि एका शेणवी ब्राह्मणाची नेमणूक आहे. शिवरात्रीला इथे उत्सव असतो आणि मोठी जत्रा भरते. मंदिराच्या गाभाऱ्याबाहेर शिवलिंगसन्मुख नंदी आहे. दारावर अनेक घंटा आहेत.

## वाळकेश्वरचा परिसर

१७२८ साली वाळुकेश्वर टेकडी किंवा मलबार हिल उजाड होती. ती गुरचराई साठी केवळ रु. १३० सालिना भाड्याने दिली होती. मलबारातील चाचे लोक इथे येऊन जहाजे लुटीत आणि टेकडीवर लपून बसत म्हणून टेकडीला मलबार हिल हे नाव मिळाले असे म्हणतात. वाळकेश्वर मंदिराच्या आसपासची जागा सारस्वतांच्या देवस्थान-विश्वस्तांकडे

आहे. नंतरच्या काळात टेकडीवर धनिकांनी आणि राजे-रजवाड्यांनी प्रशस्त बंगले बांधले. मुंबईतील सामान्य नागरिकांचा इथे पूर्वी फारसा राबता नसे. श्रीमंतांच्या वस्तीचे ते ठिकाण होते. जत्रेस, सणामाशी आणि सहलीस मुंबईकर आणि बाहेरगावचे लोक इथे प्रेक्षणीय स्थळे पाहाण्यास काय ते येत.

## गावदेवी : लीलावती देवीचे देऊळ

सोमवंशी क्षत्रिय जमातीची गिरगावात १६६१ साली सुमारे दोनशे लोकवस्ती होती. त्यांच्यापैकी बाबाजी म्हात्रे यांच्या स्वप्नात देवी लीलावती आली. ही सप्रमात्रांपैकी एक. आपली मूर्ती वाळकेश्वराच्या डोंगरात आहे ती आणून प्रतिष्ठापना करावी अशी बाबाजींना स्वप्नात येऊन तिने आज्ञा केली अशी दंतकथा आहे. बाबाजींनी केलेल्या शोधात ही मूर्ती सापडली, त्यांनी ती आणून तिची समारंभपूर्वक स्थापना केली. जवळ वडाचे वृक्षारोपण केले. १८०६ साली मूर्तीवर बाळाजी भिकाजी यानी घुमटी बांधली १८२१ साली कौलारू सभामंडप बांधला. मंदिर १८८६ मध्ये नव्याने उभारले तीन वर्षांनी सभामंडपावर छत घातले. अलिकडे १९६१ मध्ये नवीन मंदिर काँक्रीटमध्ये बांधले आहे. देवळात लीलावती देवी बरोबरच शितळादेवीची मूर्ती स्थापन केली आहे. शितळादेवी गोस्तनदेवी आणि गोवर-कांजण्यानी आजारी असलेल्यांना रोगमुक्त करते अशी समजूत आहे. देवळात मार्गशीर्ष पौर्णिमेला जत्रा भरते. शिवाय नवरात्र दसरा-दिवाळी हे उत्सवाचे दिवस आहेत. नवरात्रात 'गोंधळ' होतो. मंदिराच्या प्रांगणात तीन दीपमाळा आहेत, शेजारी नर्मदेश्वराचे देवालय यादव कृष्ण चौधरी यांनी बांधले आहे. त्यात शिवलिंग आहे. जवळ पुष्करणी आहे. ती धर्माबाई शिवाजी राऊत हिने बांधविली. गिरगावाच्या वायव्य भागी गावदेवी आहे. गिरगाव हे नाव गिरीग्राम वरून आले म्हणतात. वाळकेश्वर टेकडीच्या पायथ्याशी हा गिरगावातील गावदेवीचा भाग येतो. देवीच्या स्थापनेनंतर या भागास गावदेवी नाव पडले आणि नाना चौक ते अपेराहाऊसच्या पश्चिमेकडील भाग वेगळा झाला.

## जुम्मा मशीद

जुम्मा मशीद ही कोकणी मुसलमानांची. त्यांचा मुख्य व्यवसाय खलाशांचा. ते प्रथम कोटात, की जेथून समुद्रमार्ग दळणवळण प्रस्थापित झाले होते, तिथे वसती करून होते. टिप्पुसुलतानास मदत केल्याच्या

संशयावरून त्यांच्यावर राज्यकर्त्यांची इतराजी झाली आणि त्यांची कोटातून हकालपट्टी झाली. ते कोटाबाहेरील क्राफर्ड (आजच्या फुले) मार्केटच्या उत्तरेस वसती करून राहिले. जुम्मा मशीद प्रथम डोंगरी किल्ल्याजवळ होती. नंतर ती फुले मार्केट जवळ जे. जे. स्कूलच्या समोर नेण्यात आली. गव्हर्नर हॉर्नबी यांच्या १७७० च्या फतव्यास अनुसरून बोरीबंदरचे मुंबादेवीचे देऊळ क्रॉस मैदानातील कथीड्रल आणि जुम्मा मशीद हलवण्यात आली. मशीदीची सध्याची जागा गोवा कालिकत येथील मुसलमान व्यापाऱ्यांच्या मालकीची होती. तिथे बांधकाम करून १८०२ मध्ये मशीदीची इमारत तयार करण्यात आली. बांधकाम १७७५ मध्येच सुरू झाले होते. परंतु जागेच्या मालकी बाबत कज्जेदलाली होऊन ते पुन्हा सुरू व्हायला १७८८ साल उजाडले. या कज्जेदलालीत ती जागा कोकणी मुसलमानांच्या मालकीची आहे असा निर्णय झाला.

या मशीदीतील प्रार्थनागृहात ६०० लोक बसतात. इमारतींच्या बाजूस दहाफूट खोल तळे आहे. बाजूच्या इमारतीत पाठशाळा आहे. बाजूच्या शेख मेमण स्ट्रीट भागात मुसलमान वस्ती असल्यामुळे प्रार्थनेच्या वेळी शांतता राखणे सोईचे झाले आहे. जागेच्या मूळ मालकाने तळे बुजवण्याची अट घातली होती. त्यामुळे तळ्यावरच बांधकाम करुन वर एक मजली इमारत बांधण्यात आली. तीही इमारत पूर्ण करण्यासाठी खाटिक मंडळीचे प्रमूख नथु पटेल आणि इब्राहीम पटेल यांनी पुढाकार घेतला. इ. स. १८०२ मध्ये इमारत पुरी झाली. इ. स. १८३७ साली इमारत दुरुस्ती साठी रु. एक लाख महमद अल्ली रोगे यानी खर्च केले. सन १८६४ पासून कोर्ट हुकुमाने मशीदिची व्यवस्था कोकणी मुसलमानांकडे सूपूर्द केली आहे.

मशीदीची इमारत भव्य चतुष्कोणी आहे. बांधकाम दगडाविटांचे. मुख्य भागाच्या सभोवती दुमजली बांधकाम केले आहे. त्यावर गच्ची आहे. तळमजल्यावर बाहेरच्या बाजूस दुकाने आहेत. आवाराच्या आत शिरल्यावर जुना तलाव दिसतो. त्याला घाट बांधून पायऱ्या काढल्या आहेत. त्या १८९३ साली बांधण्यात आल्या तलावावरील सोळा काळ्या कमानीवर प्रार्थनामंदिर उभारले आहे. या कमानी १८७४ मध्ये बांधल्या. प्रार्थनामंदिरातील लाकडी खांबांच्या रांगेत कपाटे केली असून त्यात धर्मग्रंथ संग्रहित केले आहेत.

जुम्मा मशीद संस्थानचे वार्षिक उत्पन्न एक लाखावर असून मुंबईतील सर्व कोकणी मुसलमान तीन वर्षांनी कारभारी मंडळाची निवड करतात. व्यवस्था नाझर पाहतो. मुख्य इमाम ईद आणि दर शुक्रवारी प्रार्थना सांगतो. प्रार्थनेची वेळ दुपारी १२ ते १ ही वेळ सोडून प्रार्थना मंदिरात इतर कोणालाही प्रवेश मिळतो. आवारात पाठशाळेच्या विद्यार्थ्यांचे वसतीगृह आहे. मुख्य इमारतीवर दोन मोठे घुमट आणि खांबांवर छोटे घुमट आहे. शिवाय दोन नक्षीदार मिनार आहेत. दोन्ही मजल्यांवर अष्टकोनी गच्च्या आहेत.

## माहीम : मकदुम फकि अल्लीचा दर्गा

माहीमला समुद्रकिनाऱ्यावर हा दर्गा आणि मशीद आहे. मकदुम बाबांचे पूर्वज इ. स. ८६० मध्ये बसाऱ्याहून हिन्दुस्थानात आले. इ. स. १३६० च्या सुमारास मकदुम बाबांचा जन्म झाला. अध्ययन करीत, प्रवास करीत करीत ते माहीमला येऊन पोचले. त्यावेळी इथे मुसलमान राजसत्ता होती. त्यांना काजी नेमण्यात आले. त्यांनी कुराणावर टीका लिहिली आहे. बाबा दररोज रात्री मक्केला जाऊन येई अशी आख्यायिका आहे. १४३१ मध्ये ते पैगंबरवासी झाले. जंजिऱ्याचे शिद्दी त्याना मान देत. अजूनही दर उरूसाच्या वेळी जंजिऱ्याच्या संस्थानाकडून नजराणा येतो. त्यात कबरीवर पांघरण्यासाठी वस्त्रे आणि द्रव्य पाठवले जाते.

१४३१ साली मकदुम बाबा निवर्तल्यावर तिथे दर्गा आणि मशीद बांधली. कबरीवर पांघरण्यास शिद्दी किनखाबाचा तागा पाठवी. दर्ग्याची १६७४ साली वाढ केली. १७४८ साली तो नव्याने बांधण्यात आला. बांधकाम दगड चुन्याचे आहे. साठ चौरस फुटांच्या चबुतऱ्यावर दर्गा बांधला आहे. त्याला संगमरवरी पायऱ्या आहेत. आवारात अनेक कबरी आहेत. पूर्वी समुद्राच्या किनाऱ्यावर झाडीत असलेल्या कबरी या दर्ग्याच्या आवारात आणल्या आहेत. मधील कक्षात पश्चिमबाजूस मगदुम बाबांची आणि पुर्वेस त्यांच्या आईची कबर आहे. दोन्ही कबरी शुभ्र पांढऱ्या दगडांच्या आहेत. दर उरुसात कबरीवर जरीकाम केलेली हिरवी चादर आच्छादण्यात येत असते. तीवर कुराणातील वचने विणलेली असतात. कबरीवर कोरीव लाकडी छत आहे. ते शुभ्र संगमरवरी खांबावर आधारले आहे. सर्वत्र संगमरवरी लाद्या बसवल्या आहेत.

भिन्तीनाही आठफूट उंचीपर्यंत अशा लादया आहेत. छताच्या आतल्या बाजूस मकदुम बाबांचे संपूर्ण नाव आणि जन्ममृत्यु तिथिची अरबी लिपीत नोंद केली आहे.

आवारात विहिर आहे. ती बिंबराजाने बांधली अशी समजूत आहे. ओहटीच्या वेळी समुद्रातील लहानलहान खडक पाण्यावर येतात. त्यातील एकावर मकदुम बाबांचा वास असे. तिथे आता निशाण लावलेले आढळेल. हा भाग पूर्वी समुद्रसपाटीच्या वर असून तिथे वसती असावी.

बाबाच्या मृत्युतिथीस धरून दहा दिवस उरुस असतो. दोन दिवस तीन रात्री धार्मिक कार्य चालते. त्यावेळी सर्व देशातून भाविक दर्शनासाठी येतात. पहिल्या दिवशी माहिम पोलीस स्टेशनपासून पोलीसांची मिरवणूक निघते. नंतर जंजिऱ्याच्या सिद्दीची मिरवणूक येते. रात्री बारावाजता नागरिकांची मिरवणूक निघते. उरुसात दहाही दिवस फकीर जमतात. अन्नछत्र चालू असते. आसमंतात जत्रा भरते. खाद्यपदार्थांची, खेळण्याची आणि अन्य वस्तूंची दुकाने लागतात. गर्दी इतकी जमते, की कॅडेल रोड वाहानास बंद होतो.

## सेंट टॉमस कथीड्रल आणि सेंट ॲन्ड्र्यूज चर्च

किल्ल्याच्या चर्चगेटसमोर सेन्ट टॉमस हे कथीड्रल होते. त्याचे १७१८ च्या नाताळात उद्‌घाटन झाले. हे मुंबईतील पहिले चर्च. १६६२ साली मुंबई बेट इंग्रजांकडे आल्यावर १६६८ साली गव्हर्नर सर जॉर्ज ऑक्झन्‌डेन यानी या इमारतीचा आराखडा तयार करवला. नंतर जेरॉल्ड ऑंगियर आणि सर जॉन चाइल्ड यांच्याकडे निधी गोळा होऊ लागला, त्यासाठी मुंबईच्या नागरीकांनी ५००० रुपये गोळा केले होते. गव्हर्नर चाइल्ड यानी त्यातील पैसे वापरले होते. चार्लस बून यानी बांधकाम पुरे करवले. नंतर गव्हर्नर ऐल्सबी यांच्या कारकीर्दीत इमारतीची पुनर्बांधणी करण्यात आली. पुन्हा १८६५ साली तिची वाढ करण्यात आली. चर्चच्या पश्चिम दरवाजाजवळ सर कावसजी जहांगीर यांच्या देणगीतून कारंजे बांधण्यात आले. चर्चच्या मनोऱ्यावर चार घड्याळे आहेत. आवारात पहिले रेकॉर्ड अधिकारी सर विल्यम सायर्स, पहिले कमांडर इन चिफ सर रॉबर्ट ऑलिव्हर, नेपोलियनचा पराभव करणारे ॲडमिरल मेटलँड, गव्हर्नर जोनाथन डंकन, बिशन टॉमस कार इत्यादींची थडगी आहेत.

सेंट अँड्र्यूज चर्च १८१८ मध्ये बांधून पुरे झाले अपोलोस्ट्रीट रॅम्पार्ट रोला मिळतो तिथे यलो गेटासमोर ही इमारत आहे. १८२३ साली चर्च वर मिनार बांधण्यात आला होता तो १८२६ च्या वादळात पडला. नंतरचा मिनार जॉन कॉल्डेकॉट या त्रिवेंद्रम येथील ऑब्झरवेटरीत काम करणाऱ्या खगोलशास्त्रज्ञाच्या आराखड्याबरहुकुम बांधला आहे. १८२५ साली चर्चमध्ये ऑर्गन बसवण्यात आला. रेव्हरंड जेम्स् क्लो हे १८१५ पासून १८३४ पर्यंत मुंबईचे धर्मगुरु होते.

फ्रीचर्चची इमारत वॉडबी रोडवर टाटा पॅलेस पलिकडे मेसॉनिक लॉज-जवळ आहे. ती १८४८ मध्ये खुली झाली.

**नोसा सेन्होरा डा ग्लोरिआ**

१५२९ मध्ये पोर्तुगीजांनी मुस्लिमांपासून माहीम आणि मुंबई जिंकून घेतली. त्यावेळी कॅप्टन ॲण्टोनिओ पेसो याला माझगाव आणि वांद्रे बेट आणि खार गाव इनाम मिळाले. त्याने माझगांवला १५४८ साली भव्य वाडा बांधला आणि तिथेच ख्रिस्ती प्रार्थनामंदिर उभारले. त्याचे नाव नोसा सेन्होरा डा ग्लोरिआ (अवर लेडी अव्ह ग्लोरी विजय देवता) असे ठेवले. इ. स. १५७१ मध्ये पेसो ख्रिस्तवासी झाला. इस्टेटीची माऴकी त्याचा जामात लायनेल डिसोजा याजकडे आली. माझगावचे प्रार्थनामंदिर खाजगी मालकीचे होते. ते पाडून त्यावर १५९६ साली चर्च बांधण्यात आले. इ. स. १७५१ मध्ये माझगावची मालमत्ता विश्वनाथ शेणवी तेलंग यानी विकत घेतली. त्यानंतर १८१० मध्ये चर्च पुन्हा नव्याने बांधले. हे चर्च आणि मूळचा वाडा ‘ माझगाव मनोर ’ आज अस्तित्वात नाही. १९०८ मध्ये ही सर्व जागा दोन लक्ष रुपये नुकसान भरपाई देऊन ताब्यात घेतली. आज मूळच्या चर्चच्या जागेवर फक्त एक क्रॉस आहे. लगतच्या रस्त्याला चर्चस्ट्रीट असे नाव आहे.

चर्चसाठी भायखळ्याच्या पुलाच्या उत्तरेस रस्त्याच्या पूर्व बाजूस जागा घेण्यात आली. आणि १९११ साली गोव्याचे आर्चबिशप ‘ डॉम ’ मॅथ्यूज डा लिव्हेरा यांच्या हस्ते पायाभरणी करण्यात आली. १९१३ साली चर्च जनतेस खुले झाले. इमारतीचे स्थापत्य इंग्लिश गॉथिक शैलीचे आहे. मनोऱ्याची उंची १६० फूट आहे. मूळ माझगाव मनोरजवळील चर्चमधील ‘ अवर लेडी ऑफ द ग्लोरी ’ ची मूर्ती या नवीन इमारतीत बसवण्यात आली. माझगाव चर्चला जोडून चालवलेली ‘ ॲन्टोनिओ डिसोजा ’ शाळा आता भायखळा चर्च जवळील स्वतंत्र इमारतीत चालू आहे.

## पारशी स्मशानभूमी आणि अग्याऱ्या

केम्स कॉर्नर फ्लाय ओवर खालून जो रस्ता पश्चिमेस समुद्राकडे जातो त्याच्या डाव्या बाजूस पारशी स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे भव्य प्रवेशद्वार आहे. ह्या स्मशानभूमीला डुंगरवाडी म्हणतात. याचा जुन्यात जुना उल्लेख डॉ. जॉन फ्रायर यांच्या १६७३ मधील प्रवासवर्णनात आढळतो. या स्मशान भूमीतील टॉवर १६७० साली मोदी नावाच्या पारशाने बांधला. आज तिथे सात टॉवर आहेत. यांनाच टॉवर ऑफ सायलेंस् म्हणतात.

दोराबजी नानाभाई हा मुंबईचा पहिला पारशी रहिवाशी. मुंबईत पारश्यांच्या अनेक अग्याऱ्या आहेत. अग्यारीत कायम प्रज्वलीत अग्नी असतो. ऋग्वेदात अग्नीचा देवता-त्रयीत समावेश होतो. पारशांचा धर्मग्रंथ झेन्द अवेस्तामध्ये अग्नीला अहुर मझदाचा पुत्र मानले आहे. त्याला, ईश्वरी प्रतीक म्हणजे 'किब्ला' म्हणतात. बाराशे वर्षांमागे पारशी भारतात आश्रयास आले, तेव्हा पवित्र अग्नी बरोबर घेऊन आले तो गुजराथमधील उदवाडा येथे प्रज्वलीत ठेवला आहे. दर नमाजच्या सुरुवातीस अग्नीत पूर्व-पश्चिम आणि दक्षिण-उत्तर चंदनाच्या काड्या ठेवतात. या जळणाऱ्या काड्यांना (आतिश पडशाह) अग्नीचे सिंहासन म्हणतात. अग्नी प्रज्वलित करण्याचे एक विशिष्ट तंत्र असते. तसे ते वैदिक यज्ञकर्मात विस्ताराने वर्णिले आहे. आतश बेहराम अग्यारीत सोळा साधनांद्वारे प्रज्वलित केलेला अग्नी असतो.

मुंबईतील पहिली अग्यारी मोदी हिराजी वाच्छा यांनी १६७० साली कोटात बांधली होती. ती १८०३ सालच्या आगीत भस्मसात झाली. त्यानंतर हुतात्मा चौकाजवळील नानाभाई लैन मध्ये १७२० साली बनाजी अग्यारी उभारलेली गेली.

सर्वात जुना 'डोसाभाई सेठ आतश बेहराम' जगन्नाथ शंकर शेठ रस्त्यावरील दादीशेट अग्यारी लेनवर फणसवाडी नजिक आहे. हा १७८२ साली बांधला.प्रिन्सेस स्ट्रीटला नाना शंकर शेट रस्ता काटतो त्याच्या दक्षिण-पश्चिम कोपऱ्यावर वाडिया आतश बेहराम १८३० साली बांधला गेला.

चर्नीरोडवरून ठाकुरद्वारला जाताना डाव्या बाजूस कोपऱ्यावर कावसजी बनाजी आतश बेहराम आहे. तो १८४५ साली बांधला गेला. तो अखिल भारतातील पारशी आतश बेहरामांमध्ये अतिसुंदर समजला जातो.

## मुंबईतील वाहतुकीची व्यवस्था आणि विजेचा वापर
## मुंबईची वाढ आणि वाढत्या गरजा

मुंबई सोळाव्या शतकापर्यंत सात लहान-लहान बेटांची बनलेली होती. बेटात फिरायचे तर पायीच. एका बेटातून दुसऱ्या बेटात जायचे ते होडीतून. बेटातल्या बेटात धनिक, घोडे किंवा पालखी वापरीत असावेत. अठराव्या शतकात बेटे एकमेकास जोडण्यात येऊ लागली. रस्त्यांची स्थिती काही चांगली नव्हती. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात बैलगाड्या उपयोगात होत्या. गव्हर्नर, मोठे अधिकारी आणि धनिक इनामदार त्यांचाच उपयोग करीत. त्यावेळी रस्ते थोडे होते. तेही अरुंद होते. परळ रोड, बीच कँडी रोडसुद्धा चाळीस फूटांचे होते. एकोणीसाव्या शतकाच्या सुरूवातीला ते साठ फूट रूंद केले. गल्ल्यांची रूंदी वीस फूट ठरवण्यात आली, वस्ती वाढत चालली तसे एल्‌फिन्स्टन् सर्कल-बझार गेट-फोरस रोड रस्ता करण्यात आला. अपोलो स्ट्रीट रुंद झाला. बेलासीस रोड, एल्‌फिन्‌अस्टन् रोड पूल-बाबुला टँक रस्ता तयार झाला. चर्नी रोड स्टेशन फॉक्‌लंड रोडशी रस्त्याने जोडण्यात आले. गिरगाव रस्ता रुंद केला. परळ वरळीशी जोडणारा रस्ता तयार झाला. त्याचे नाव फर्ग्युसन रोड ठेवण्यात आले. जेकब सर्कल किंवा सात रस्त्याची मांडणी केली. त्यावेळी हे रस्ते खडीचेच होते. डांबरी रस्ते नंतर आले, रस्ते चापून चोपून पक्के करण्यासाठी दगडी रूळ होते. वाफेचे रूळ प्रथम १८६९ मध्ये उपयोगात आले. सुरुवातीस रस्त्यांवर दिवे नसत. गॅसलाईटचा १८३३ मध्ये अर्देसर करसेटजी यांनी प्रथम आपल्या वाड्यात उपयोग केला. १८४३ पासून रस्त्यांवर घासलेटचे दिवे लावण्यात सुरुवात झाली होती. गॅसलाइटचे दिवे रस्त्यावर प्रथम १८८६ मध्ये दिसले. ते प्रथम एस्लपेड रोड (आजचा महात्मा गांधी रस्ता) चर्चगेट आणि भेंडी बाजार येथे उभारण्यात आले. या दिव्यांची अप्रूपता त्यावेळी, इतकी होती, की सायंकाळी ते पेटवत चाललेल्या माणसामागे हा चमत्कार पाहाण्यास बघे जमत. उत्साही धनिकांनी सुबक नक्षीदार दिवे रस्त्यावर लावण्यास देणगी दाखल दिले होते. मुंबईतील पहिली कापड गिरणी १८५० मध्ये स्थापन झाली. तोपर्यंत व्यापार, आयात-निर्यात हे प्रमुख व्यवसाय होते. बंदरापर्यंत आणि बंदरापासून मालाची ने-आण

बैलगाड्यांनीच होई. कोटात कचेऱ्यातून काम करणारी मंडळी प्रथम कोटाच्या जवळपास वस्ती करून होती. व्यापारी, धनिक यांची निवासस्थानेही तिथेच होती. पुढे कोटाबाहेरील धनिकाना कोटात जागा देण्यास सुरुवात झाली. तिथे त्यांनी बंगले बांधले. शक्य ते धनिक नव्याने उपयोगात येऊ लागलेल्या मलबार हिलवर घरे बांधू लागले. युरपियनांची वस्ती भायखळा माझगाव भागात होती. मध्यमवर्गीय गावात म्हणजे गिरगाव, काळबादेवी, मांडवी, भेंडीबाजार, भुलेश्वर, खेतवाडी, गावदेवी, ताडदेव या भागात, छोट्या घरात किंवा चाळीत राहायला जाऊ लागले. धोबीतलावपासून कोटापर्यंत, क्रॉफर्ड मार्केट-बोरीबंदरपासून मरीन लाइन्स पर्यत मैदान होते. पश्चिम बाजूने ते कुलाब्यापर्यंत पसरले होते. कोटात काम करणारी मध्यमवर्गीय आणि गरीब मंडळी तेव्हा गावातून पायी मैदानामागे कामाच्या ठिकाणी जात आणि येत. मलबार हिलवर राहणारे आणि गावात राहणारे तुरळक धनिक सुखवस्तू, गाडीघोड्यांचा, पालखीचा उपयोग करत.

## रेकले, शिग्राम आणि पालखी

एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीस बंद बैलगाडी-रेकला, बंद घोडागाडी-शिग्राम आणि पालखी हीच वाहातुकीची साधने होती. पूर्वीच्या घोडागाडीचे पुढे व्हिक्टोरियात रूपांतर झाले. ती प्रथम १८८२ मध्ये मुंबईत अवतरली. १८७० मध्ये सुएझ कालवा वाहतुकीस खुला झाल्यावर आणि नियमीत टपाल आणि माल यांची आयात निर्यात वाढू लागल्यावर मुंबईची वाढ झपाट्याने होऊ लागली. १८६४ साली मुंबईची लोकसंख्या आठ लाखांवर आली होती. व्हिक्टोरिया आणि रेकला ही मध्यमवर्गीयांची वाहने होती. पालखी आणि एकदोन घोड्यांच्या शिग्राम बग्या ही श्रीमंतांची वाहने. व्हिक्टोरियाचा दर मैलास फक्त चार आणे आणि रेकल्याचे तीन आणे असे. उघड्या बैलगाड्या मालाची वहातुक करत. बंद बैलगाड्या मागे पडत होत्या. बैलगाड्यांवरील हौद्यात चार माणसे बसत. तो हौदा दोन चाकांवर दळमळत असे. व्हिक्टोरियाला चार चाके, प्रसंगी आठ दहा माणसेही बसू शकत. पण वाढत्या लोकसंख्येला सार्वजनिक वाहनव्यवस्थेची गरज भासू लागली होती.

## आगगाडीची कल्पना आणि प्रयत्न

आगगाडी इंग्लंडमध्ये १८३२ मध्येच सुरू झाली होती. आपल्याकडे आगगाडी सुरू करण्याचा विचार दहा वर्षानंतर १८४३ मध्ये सुरू झाला आणि ग्रेट ईस्टर्न रेल्वे कंपनी स्थापन करण्यात आली. त्यात प्रमुख एतद्देशीय होते ते नाना शंकर शेट आणि सर जमशेटजी जिजीभाई. १३ जुलै १८४४ रोजी या योजनेचा एक अर्ज सरकारकडे पाठवला. त्यावर नाना शंकर शेट आणि सर जमशेटजी जिजीभाई यांनी सह्या केल्या होत्या. कंपनीच्या चालकांची सभा १९ एप्रिल १८४५ रोजी कर्नल जर्व्हिस यांच्या अध्यक्षतेखाली टाउन हॉलमध्ये भरली होती. त्या सभेत 'दि इनलँड रेल्वे असोशिएशन' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी एक समिती नेमण्यात आली. तीत जे.पी विलोघवी (अध्यक्ष), याशिवाय नाना शंकर शेट, फ्रामजी कावसजी यांचा समावेश होता.

भारतात असा हा प्रयत्न चालू असतानाच लंडन येथे जून १८४५ मध्ये 'ग्रेट इंडियन पेनिन्स्यूला रेल्वे' ही कंपनी स्थापन करण्यात आली. तिने मि. चापमन यांना पाहाणी करण्यासाठी मुंबईत पाठवले. कंपनी सरकारने जूलै १८४८ मध्ये ३५ मैल लांबीची रेल्वे बांधण्याची परवानगी कंपनीस दिली. त्याच्या खर्चाचा अंदाज पाच लक्ष पाउंड होता. कंपनीचे पाच पाउंडांचे तीस हजार शेअर्स तत्काळ संपले. कंपनीचे एकंदर भांडवल पन्नास लक्ष होते. या काळात अमेरिकेत रेल्वे सुरू होऊन एकंदर ५७४० मैल लोहमार्ग १८४७ पूर्वीच सिद्ध झाला होता. या योजनेचा सूतोवाच मुंबईत झाला, परंतु कंपनी सरकारातील आणि इंग्लंडमधील चाणाक्ष बनियांनी नव्या कंपनीची सूत्रे आपल्याकडेच ठेवली. कंपनीचे भांडवल दहालाख पाऊंड केले. कंपनीची कचेरी नाना शंकरजींच्या वाड्यातच ठेवली. (१८५०)

## आगगाडीचा पहिला प्रवास

लोहमार्ग टाकण्याची सुरुवात ३१ ऑक्टोबर १८५० रोजी शीव येथे नामदार जे.पी. विलोधबी यांच्या हस्ते करण्यात आली. प्रत्यक्षात १६ एप्रिल १८५३ रोजी दुपारी साडेतीन वाजता अठरा डबे असलेली तीन

इंजिनांची आगगाडी ५०० माणसे घेऊन बोरीबंदरहून निघाली ती ५७ मिनिटांनी ठाण्यास पोचली. गाडीत गव्हर्नरांबरोबर नाना शंकर शेट आणि अनेक निवडक मंडळी होती. गाडी सुटताना तोफांची सरबत्ती देण्यात आली. बँडवादन झाले. वाफेवर चालणारी गाडी ही एक देवताच आहे अशा भावनेने लोक नमस्कार करत वाटेवर उभे होते !

या आगगाडीच्या सुरूवातीने मुंबईत प्रथमच सार्वजनिक दळणवळण व्यवस्था सुरू झाली. बॉम्बे बरोडा अँड सेंट्रल इंडिया (बि.बि.सी.आय्), आजची वेस्टर्न रेल्वे, १८५५ साली सुरू झाली. जी आय्. पी. चा मुख्य मार्ग मुंबई शहरात बोरीबंदरपासून दादर-ठाणे-कल्याणपर्यंत आणि त्याची बंदर शाखा (हार्बर ब्रांच) बोरीबंदरपासून शिवडीमार्गे वान्द्र्यापर्यंत वहातुक करते. बि.बि.सी.आय्. रेल्वे चर्चगेट स्टेशनपासून दादर-बान्द्रा मार्गे वसई-विरार पर्यंत वहातुक करते. हा मार्ग पूर्वी चर्चगेट पुढे कुलाब्यापर्यंत जाई.

## ट्रामगाड्यांची सुरूवात

शहराची जशी वाढ होत गेली तसे आतील भागात सार्वजनिक वाहातुक व्यवस्थेची गरज वाढू लागली. शिग्राम,व्हिक्टोरिया, ती गरज भागवू शकत नव्हत्या. सार्वजनिक घोडागाड्या सुरू करण्याचा उपक्रम १८१९ मध्ये विचारात घेतला जात होता असे *बॉम्बे कुरिअर* अंकातील जाहिरातीवरून समजते. त्यात 'हॉर्स कोच' चा उल्लेख आहे. तो कोच 'फोर्ट'पासून शिवडीपर्यंत ये-जा करणारा होता. त्यामुळे विशेषतः भायखळा आणि परळमधील रहिवाश्यांची सोय होणार होती. ट्राम गाड्यांची कल्पना १९७१ मध्ये पुढे आली. लंडन शहरात घोड्यांच्या ट्रामगाड्या १८७० मध्येच सुरू झाल्या होत्या. बॉम्बे ट्रामवे कंपनीची स्थापना १८७३ मध्ये झाली. आणि 'बॉम्बे ट्रामवेज ॲक्ट्' १८७४ मध्ये करण्यात आला. ही ट्राम गाडी प्रथम दोन मार्गांवर सुरू झाली. कुलाबा-क्रॉफर्ड मार्केट-पायधुणी आणि बोरीबंदर-काळबादेवी-पायधुणी. दिनांक ९ मे १८७४ रोजी या ट्रामगाड्या प्रथमच रस्त्यावर धाऊ लागल्या. त्यावेळी कुलाब्यापासून पायधुणीपर्यंतच्या प्रवासात तीन आणे आकार होता. कंडक्टर आकार वसूल करी पण तिकिटे नव्हती. नंतर तीन चार महिन्यांनी तिकिटे सुरू करण्यात आली. उत्पन्न वाढू लागले. त्यामुळे आकार कमी करणे

शक्य झाले. तो हळू-हळू कमी-कमी करत-करत १८९९ मध्ये एक आण्याइतका उतरवण्यात आला. ट्राम सुरू झाल्यामुळे रेकला आणि शिग्राम चालकांना आपल्या व्यवसायास धोका निर्माण झाला असे वाटू लागले. त्यांच्या असंतोषातून ट्रामच्या रूळांच्या खाचात बारीक खडी आणि माती टाकण्याचा उद्योग जन्म पावला. एरवीही आगगाडीसारखे ट्रामचे स्वागत झाले नाही. कंपनीच्या चालकांनी सुरूवातीस मोफत प्रवासही घडवला. चांगल्या सुबुद्ध नागरिकांच्या मनातही ट्रामवाहतुकीविषयी किंतु होता. १८८४ साली प्रसिद्ध झालेल्या आपल्या शिशुबोध या लहानशा पुस्तकात दादोबा पांडुरंग म्हणतात :

> .....अमेरिकेतील बॉस्टन शहरात थोडे पैकेवाले जमून त्यांनी सक्तीने पैका काढून या मुंबई शहरात ट्राम म्हणोन लोखंडी कांबी वरून फिरणाऱ्या भाडुत्री गाड्या फिरवण्याचा धंदा काढिला आहे. आणि त्यामुळे एथील भाडोत्री गाड्या फारच कमी होऊन नित्य शेकडों रुपय ते अमेरिकेत हाल्लीं आपल्या डोळ्यांवर झांपट आणून मिळवितात. मला तर त्या त्रामच्या गाड्या पाहिल्या म्हणजे असे मनात आणल्यावाचून कदापि राहवत नाही की या लोकांकडून रूप्या तांब्याचा खुर्दा गोळा करण्याकरिता आपल्या देशांत धूर्त अमेरिकन लोकांनी जाणों हे मोठे पावडेंच हातांत घेतले आहे काय ? .... मुंबईच्या लोकांनी तरी, जसें कलकत्ता, मद्रास,एथिल लोकांनी या त्राम गाड्यांतून न फिरण्याचा निश्चय केंला तसा यांणीहि करायचा होता. तसे न करितां हे लोक आपल्या हातून आपल्या देशास दरिद्र आणित आहेत. असा अनर्थ मीं आता पाहत आहे.

ट्रामगाड्या सुरूवातीस घोडे ओढीत. त्याना फार कष्ट पडत. त्यामुळे ते लवकर निकामी होत. यावरून गधेकाम करणाऱ्यास ट्रामचा घोडा असे संबोधण्यात येऊ लागले.

**बी.इ.एस.टी.ची स्थापना**

१९०५ साली स्थापन झालेल्या 'धि बॉम्बे इलेक्ट्रिक सप्लाय ॲण्ड ट्रामवेज कंपनी' ने जुनी ट्राम कंपनी विकत घेतली. जुनी कंपनी सुरू झाली त्या दिवशी (९ मे १८७४) फक्त ४५१ प्रवाशांनी प्रवास केला होता. वसुली फक्त रु. ८५ झाली होती. एकतीस वर्षानंतर शेवटच्या दिवशी (६ ऑगस्ट १९०५) ७१,९४७ प्रवासांनी ट्रामचा उपयोग केला आणि रु. ४२६० आकार भरला. म्युझियम ते ससूनडॉक, वाडीबंदर,

लालबाग,जेकब सर्कल, ऑपेरा हाऊस, कार्नॅकबंदर ते धोबीतलाव, जे. जे. हॉस्पिटल ते ग्रँटरोड अशा सात मार्गावर ट्राम वहातुक तेव्हा होत होती.

जुन्या कंपनीने १८९९ मध्येच ट्रामगाड्या विजेवर चालवण्याची परवानगी मागितली होती. प्रत्यक्षात ती १९०७ पर्यंत मिळाली नाही. ७ मे १९०७ रोजी विजेची ट्रामगाडी सुरू झाली. तेव्हा श्री. वल्लभदास ठाकरसी म्युनिसिपालटीचे चेअरमन होते. आणि शेपर्ड कमिशनर होते. उद्‌घाटनाला उपस्थित असलेल्या लोकात सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, सर हरिकिसनदास, नरोत्तम दास, श्री. इब्राहिम रहिमतुल्ला याचा समावेश होता. सुरुवातीस विजेच्या ट्रामगाडीचा प्रवास म्युनिसिपल ऑफिस (बोरीबंदर) ते क्रॉफर्ड मार्केट इतकाच होता. नंतर चार मार्गावर त्याच दिवशी विजेची ट्रामगाडी ये-जा करू लागली. दुसऱ्या दिवशी विजेच्या ट्राम गाड्या व्यवस्थित सुरू झाल्या. परंतु पहिल्याच दिवशी मालवणकर नावाचा एक प्रवासी धावत्या गाडीतून पडला आणि त्याचा पाय रूळांवर तुटला. त्यावेळी ट्राम गाड्यांमध्ये अपरक्लास आणि लोअर क्लास अशी विभागणी होती. १९१० पासून ट्राममध्ये उभ्यांची व्यवस्था होती, पण १९१४ मध्ये म्युनिसिपालिटीने त्यावर बंदी आणली. दुमजली ट्राम १९२० मध्ये सुरू झाली.

ट्रामने प्रवास करणे गरिबांना शक्य होते. आकार एक आणा होता. म्युझियमपासून दादरपर्यंतचा प्रवास फक्त दीड आण्यात होई. दादर ते माटुंगा ट्राम नंतर सुरू झाली. त्यावेळी माटुंग्याच्या भागात वस्ती नसे. पार्शी कॉलनी नुकतीच उभारण्यात आली होती. व्हि.जे.टी.आय् हे तंत्रविज्ञानाचे विद्यालय सुरू झाले होते. त्यावळी दादर माटुंगा प्रवास धोक्याचा समजला जाई. ट्राममध्ये संध्याकाळी तीसचाळीस माणसेच असत. ट्रामगाडी ३१ मार्च १९६४ मध्ये बंद झाली. लंडन शहरातील ट्राम गाड्या त्यापूर्वी १२ वर्षे बंद झाल्या होत्या. तिथे शेवटच्या दिवशी होबर्न ते आल्डविच् (भारत सरकारची दूतावास कचेरी) पर्यंतची ट्राम शेवटच्या प्रवासास निघाली तेव्हा रूळांवर पेन्सची नाणी टाकून ती चेपलेली नाणी हस्तगत करण्यासाठी उत्साही नागरिकांची झुंबड उडाली होती. मुंबईत असे घडल्याचे वाचनात नाही. पण शेवटची ट्राम पाहण्यास अलोट गर्दी लोटली होती असे स्मरते.

## शेवटची ट्राम आणि बसगाड्यांची सुरूवात

ट्रामगाड्या बंद झाल्यातरी १९२६ साली सुरू झालेल्या बसगाड्या अजून चालू आहेत. आणि आज मुंबईतील नागरिकांचे तेच एक त्वरित प्रवासाचे साधन आहे. १९१९ मध्ये दादर ते किंग्ज् सर्कल (महेश्वरी उद्यान) ट्रॉलीबस् म्हणजे विजेच्यातारांवर चालणाऱ्या बसगाड्या सुरू करण्याची कल्पना पुढे आली होती. १९२३ पासूनच मोटर बस, की ट्रॉली बस यावर चर्चा सुरू झाली होती. ती १३ वर्षे चालूच होती. १९२६ मध्ये मोटर बस चालू करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रथम प्रयोग म्हणून कुलाब्याचे अफगाण चर्च ते क्रॉफर्ड मार्केट, दादर ते किंग्ज् सर्कल, ऑपेरा हाउस ते लालबाग अशा तीन मार्गांवर बस सुरू झाली. दिनांक २५ जुलै १९२६ रोजी बस सेवा सुरू झाली तेव्हा २४ बस गाड्या होत्या.

ट्राम गाड्या सुरू झाल्या तेव्हा झाला तसा विरोध बस गाड्यानाही झाला. बस सुरु होण्यापूर्वी टॅक्सी सेवा सुरू झाली होती. त्यांचा बसला विरोध होता. पोलिस कमिशनरने टॅक्सी ड्रायव्हरच्या विरोधास जुमानले नाही. टॅक्सीतून प्रवास करणारा वर्ग बसमधून प्रवास करणारांच्या वर्गाहून भिन्न आहे त्यामुळे यात स्पर्धेचा प्रश्न नाही असा त्यांचा युक्तिवाद होता. सुरुवातीला बस प्रवासांचा आकार दोन आण्यापासून सहा आण्यापर्यंत होता. मुलांना निम्मा आकार लावण्याची प्रथा १९२८ मध्ये सुरू झाली. १९२८ पासून १९३० पर्यंत बसमध्ये पोस्टाची पेटी ठेवलेली असे ! बस प्रवासाच्या पहिल्या वर्षी सहा लाख प्रवाशांनी लाभ घेतला. तर पुढल्यावर्षी ही संख्या ३८ लाखांवर गेली. सुरूवातीस २४ मोटर बस होत्या. पुढल्या वर्षी त्यात पंचवीसांची भर पडली.

सुरूवातीला बसप्रवासाची व्यवस्था दक्षिण भागापुरतीच मर्यादित होती. १९३४ मध्ये ती माटुंग्यापर्यंत वाढवण्यात आली. नाताळाच्या सुटीत सर्व दिवसाचे तिकिट देण्याची व्यवस्था १९३५ मध्ये सुरू झाली. पुढे ती बंद करण्यात आली (१९३९). दुमजली बसगाड्या १९३७ मध्ये सुरू

झाल्या. एकमजली बसमध्ये ३६ प्रवाशांची सोय असे तर दुमजली बसमध्ये ५८ प्रवाशांची सोय होती. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात बिनाछप्पर दुमजली बसगाड्या वापरात आल्या. उन्हाळ्याने त्रासलेल्या प्रवाशांनी त्याचे स्वागत केले. मोजक्या थांब्यावर उभ्या राहणाऱ्या लिमिटेड स्टॉप बसची सुरूवात १९४० साली झाली ती कुलाबा ते माहीम मार्गावर.

## ट्रॉली बसची सुरूवात

१९३७ मध्ये ट्राम आणि बसगाड्यांऐवजी सर्वत्र ट्रॉली बस सुरू करावी असा प्रस्ताव म्युनिसिपालटीमध्ये श्री. एस. आर. प्रसन्न यांनी माडला. परंतु तो बस कंपनीने स्वीकारला नाही. नंतर गवालिया टँक ते माझगाव ट्रॉली बस सुरू झाली परंतु ती फार दिवस चालली नाही. १९४७ मध्ये बसगाड्यांची संख्या २४२ पर्यंत गेली होती. तेव्हा मुबई कॉर्पोरेशनने कंपनी ताब्यात घेतली.

## मुंबईत विजेचे आगमन

मुंबईत प्रथम क्रॉफर्ड मार्केटमध्ये १८८२ साली वीजेचे दिवे लावण्यात आले. १८८३ मध्ये मुंबई म्युनिसिपालटीने इस्टर्न इलेक्ट्रिक लाईट अॅन्ड पॉवर कंपनीशी करार केला त्यानुसार क्रॉफर्ड मार्केट आणि काही रस्त्यांवर विजेचे दिवे लाण्यात आले. पुढच्याच वर्षी कंपनीचे दिवाळे वाजले आणि परत गॅस लाईट सुरू झाले. १८९४ साली म्युनिसिपालटीने स्वतःचा जनरेटर सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि विजेचे दिवे सुरू झाले. परंतु १९०६ साली यंत्रसामग्रीच्या नासधुसीमुळे दिवे बंद पडले. क्रॉफर्ड मार्केट मध्ये गॅस लाइन पुन्हा सुरू झाली परंतु म्युनिसिपालटीमध्ये मात्र त्या वेळी अस्तित्वात आलेल्या बॉम्बे इलेक्ट्रिक सप्लाय आणि ट्रामवेज कंपनीकडून वीज घेऊन विजेचे दिवे चालू ठेवले. ही कंपनी इंग्लंडमधील ब्रिटीश इलेक्ट्रिक ट्रक्शन कंपनीने सुरू केली (१९०५). त्याच वर्षी कंपनीने वाडीबंदर येथे वीज उत्पादन केन्द्र स्थापन केले. त्या केन्द्राची क्षमता ४३०० कि. वॉ. होती. दुसरे माझगावचे केन्द्र १९७२ मध्ये सुरू करण्यात आले. टाटाचे वीज उत्पादन केंद्र

१९११ मध्ये स्थापन झाले. बी.इ.एस.टी. ला संरक्षण देण्यासाठी पाच लाख युनिट्सवरील वीज वापरणाऱ्यांनाच टाटाची वीज मिळावी असे नमूद करण्यात आले. पुढे बी.इ.एस.टी. लाच टाटाकडून वीज घ्यावी लागली. बी.इ.एस.टी. चे वीजकेंद्र कसाऱ्याला होते. ते पावसाळी पाण्यावर अवलंबून असे. ते बंद झाल्यावर बी.इ.एस.टी टाटाकडून १९२५ पासून वीज घ्यायला लागली. १९३० नंतर कारखाने, रस्ते आणि घरातील विजेच्या वापराशिवाय वीजेची घरगुती उपकरणे प्रचारात येऊ लागली आणि विजेचा वापर वाढत चालला. त्यापूर्वीच १९२६ पासून बी.इ.एस.टी. कंपनीने वीजेच्या उपकरणाचा प्रसार करण्यासाठी इलेक्ट्रिक हाउसमध्ये एक शो रूम उघडली होती. त्यात इस्त्र्या, ब्लोअर, रेफ्रिजेटर इत्यादींचा प्रचार करण्यात येई.

**रस्त्यावरील विजेचे दिवे**

१९२१ साली रस्त्यावरील दिव्यांसाठी म्युनिसिपालटीने बी.इ.एस.टी कडून वीज घेण्याचा प्रस्ताव केला. यानुसार १९२३ मध्ये ४७ ठिकाणी वीजेचे दिवे लावण्यात आले. १९०५ साली वीजेचे उत्पादन दीड लक्ष किलो वॅट होते ते चाळीस वर्षांत ६० लक्ष किलो वॅट झाले. सुरूवातीस वीजेचा दर दिव्यांसाठी एका आणा युनिट ते तीन आणे युनिट आणि कारखान्यास आठ आणे ते दीड आणा असा होता. नंतर तो साडेचार आणे ते दोन आणे असा उतरवण्यात आला.

१९१३ मध्ये इस्त्री वगैरे वीज उपकरणासाठी लागणाऱ्या वीजेचा दर एक आण्याने उतरवण्यात आला. त्याच सुमारास अलेक्झांड्रा, कॉरोनेशन, एडवर्ड आणि गेईटी ही सिनेमा थिएटरे सुरू झाली. त्यांना वीज लागे. ती स्वतःचा जनरेटर लावल्याने बी.इ.एस.टी. पेक्षा कमी दराने मिळेल असे दिसून आले. त्यामुळे कंपनीने आपला दर तीन आण्यावर उतरवला. लग्नादी स्वागतसमारंभात लागणाऱ्या वीजेचा दरही उतरवला. मुंबई सरकारने १९३८ मध्ये वीजेच्या दरांचा विचार करण्यासाठी समिती नेमली. तिच्या शिफारशीनुसार पुढील वर्षापासून दिव्यासाठी दोन आणे आणि इतर कामास अर्धा आणा असा दर ठरवण्यात आला. शिवाय दरमहा मिटर भाडे म्हणून चार आणे.

वीजेच्या वापरावर १९३२ पासून कर आकारण्यात येऊ लागला. सुरुवातीस तो तात्पुरताच होता. पण पुढे कायम झाला. सुरूवातीस युनिटमागे अर्धा आणा कर असे, तो वाढत वाढत १९३९ मध्ये सवा आणा झाला. त्याचे तात्कालिक कारण दारूबंदीमुळे होणारा तोटा भरून काढणे हे होते. परंतु इतर अनेक करांप्रमाणे हाही कर कायम राहिला.

**बेस्टची स्थापना आणि म्युनिसिपालटीशी करार**

बी.इ.एस.टी. ने 'बॉम्बे ट्राम मुंबई' कडून वाहतूक व्यवस्था विकत घेतली हे सांगितले. १९०१ पासूनच मुंबई नगरपालिकेने ही कंपनी ताब्यात घेण्याचा इरादा व्यक्त केला होता. १९०५ मध्ये एका कराराअन्वये बी.इ.एस.टी. ला इलेक्ट्रिक ट्राम चालवण्याचा आणि शहरात वीज पुरवठा करण्याचा मक्ता देण्यात आला. त्यावेळी बी.इ.एस.टी. ने ट्राम कंपनीची मालमत्ता ९८,५०,००० ला विकत घेतली. त्यात घोड्याच्या ट्राम, घोडे, बैलगाड्या, बैल, इमारती इत्यादीचा समावेश होता. त्याच वेळी नवीन ट्राम मार्ग सुरू करण्यात आला आणि वीजेचा दर युनिटमागे सहा आणे ठरला. शिवाय म्युनिसिपालटीची वाहतूक कंपनीने कमी दरात करावयाची होती. म्युनिसिपालटीला ४२,५६ किंवा ६३ वर्षांनी ताब्यात घेण्याचा अधिकार राहिला. बी.इ.एस.टी. कंपनी इंग्लंडमध्ये स्थापन झाली होती. तीत भारतीयांनी पैसे गुंतवले होते. कंपनीची कचेरी मुंबईस हालवण्याबाबत त्यांचा आग्रह असे. पहिल्या महायुद्धाच्या काळात आयकराचे दर वाढले. भारतीय भागधारकांना दुबार कर भरावा लागे. त्यामुळे या मागणीस आणखीच जोर चढला, सर डेव्हिड ससून यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय शेअर होल्डर्सची सभा भरून बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे लंडन ऑफिस बंद करावे, असा निर्णय घेण्यास आला. त्याला ब्रिटीश भागधारकांनी संमती दिली आणि १ एप्रिल, १९१६ पासून कंपनीचा कारभार मुंबईहूनच चालावा असा निर्णय घेण्यात आला. कंपनीने बोर्ड ऑफ डायरेक्टर्स नियुक्त करण्याचे अधिकार सर डेव्हिड ससून, सर शापूरजी भरूचा, सर इब्राहिम रहिमतुल्ला आणि मि.जी. एस.वॉर्डला यांना देण्यात आले. याचा प्रत्यक्ष अंमल मात्र १९२० मध्ये झाला. मुंबईत

स्थापन झालेल्या कंपनीचे भांडवल तीन कोटी नव्वद लक्ष होते. ही नवीन व्यवस्था १९४७ पर्यंत अमलात होती. १९४७ सालच्या दुसऱ्या ऑर्डिनस् प्रमाणे बी.इ.एस.टी. च्या व्यवस्थेसाठी समिती नेमण्यात आली. ७ ऑगस्ट रोजी कंपनी म्युनिसिपालटीच्या ताब्यात आली.

**बेस्टची मुख्य कचेरी आणि व्यवस्थापन**

बेस्टच्या मुख्य-कचेरीसाठी इमारतीची जरूरी होती. त्यासाठी इलेक्ट्रिक हाउस जवळील जागा म्युनिसिपालटीकडून १ लक्ष ४४ हजाराला विकत घेतली. मेसर्स एफ् मकिंटकडून आराखडे करून घेतले. जी.जी. लाझारस् आणि के.एम. खारेघाट या कंपनीच्या इंजीनियरच्या देखरेखीखाली इमारत बांधण्यात आली. संपूर्ण वातानुकुलीत अशी ही मुंबईतील पहिलीच इमारत. १९३६ मध्ये इमारतीत बेस्टच्या कचेऱ्या हालवण्यात आल्या तेव्हा कंपनीची व्यवस्था ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हातात होती. पहिले जनरल मॅनेजर होते एफ्.सी.रेमिंग्टन (१८८७-१९२२), दुसरे सी. एन.मोबर्ली (१९२२-३५) आणि शेवटचे ब्रिटिश जनरल मॅनेजर होते ए.एस. ट्रालिफ (१९३५-१९४५). कंपनी म्युनिसीपालटीने घेतल्यानंतर जनरल मॅनेजरच्या पदावर आय.सी.एस. अधिकाऱ्यांची नेमणूक होऊ लागली. आजचे जनरल मॅनेजर श्री. केरकर.त्यांच्या पूर्वीचे जनरल मॅनेजर आय.ए.एस. मघाले होते.

बी.इ.एस.टी. ला किती रक्कम द्यावी याबद्दल बरीच घासाघीस होऊन किंमत ठरवण्यासाठी शेवटी सर जॉन केनडी यांचा लवाद नेमण्यात आला. त्यानुसार कंपनीची किंमत ९ कोटी ८६ लक्ष ५८ हजार ठरवण्यात आली. कंपनी म्युनिसिपालटीने ताब्यात घेतली (१९४७). तेव्हा फक्त १६७ बस गाड्या होत्या. त्यांची १९७२ मध्ये १२१५ पर्यंत वाढ झाली. १९४७ मध्ये दर दिवसाची आवक २२ हजार होती ती १९७२ मध्ये चार लक्ष ५० हजार झाली. त्याचप्रमाणे प्रवाशांच्या संख्येत दोन लाखापासून पंचवीस लाखापर्यंत वाढ झाली.

इ.स. १९६७ पासून ट्रॅक्टरबस सुरू झाली. अशा दीडशे बसगाड्या आहेत. बसचे इंजिन बिघडले तर दुसरा ट्रॅक्टर लावता येतो. त्यामुळे या बसगाड्या नित्य वापरात राहतात. ११ जून १९६२ साली गवालिया टँक ते माझगाव या मार्गावर ट्राली बसीस सुरू झाल्या. परंतु त्यांचे

आयुष्य फक्त दहा वर्षांचे ठरले. ट्राम गाड्या रस्त्यांमधून टाकलेल्या रूळांवरून चालत. त्या रूळांपासून हालू शकत नसत. मधला अर्धा रस्ता त्यामुळे इतर वहातुकीस मोकळा नसे. ट्रॉली बसीस ट्राम गाड्याप्रमाणे वरील विजेच्या तारातून वाहाणाऱ्या वीजप्रवाहातून चालत, तरी खाली त्याना रूळांतून जाणाऱ्या लोखंडी चाकांऐवजी रबरी टायर असत. त्यामुळे त्या रस्त्यांच्या बाजूस उभ्या राहू शकत आणि इतर वहातुकीतून रस्ता काढून पुढे जाऊ शकत.

आज मोटर बसिस दररोज अडीच लक्ष मैल धावतात आणि पंचवीस लक्ष प्रवाशांची ने आण करतात.

## मुंबईची नगरव्यवस्था-स्थानिक स्वराज्य

### जे. पीं. च्या संस्थेचा उगम

मुंबई महानगरपालिकेच्या कामाचा उगम १७९२ मध्ये झाला. त्या वर्षी तिसऱ्या जॉर्जने तेहतिसाव्या स्टॅच्यूट अन्वये 'जस्टिस् ऑफ द पीस' नेमण्याचा अधिकार बंगालच्या गव्हर्नर जनरलला दिला. आणि आजच्या घटकेला वादविषय झालेली जेपींची संस्था अस्तित्वात आली. त्यांच्याकडे सोपवलेल्या कामात झाडुवाले नेमून रस्ते स्वच्छ ठेवणे आणि त्यांची दुरुस्ती करणे या कामाचा समावेश होता. या कामास जो पैसा लागेल तो उभा करण्यासाठी घरांवर कर आकारण्याचा त्याना अधिकार देण्यात आला. कराची कमाल मर्यादा ठरवून देण्यात आली ती वर्षाच्या किंमतीचा (उत्पन्नाचा) विसावा हिस्सा होती. करचुकव्यांची मालमत्ता जप्त करण्याचीही व्यवस्था कायद्यात केली होती. शिवाय दारूविक्रीचे परवाने देऊन फी वसूली करण्याची सोयही केली.

### नगरव्यवस्था जे. पीं. कडे

नंतर वीस वर्षांनी कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे कामही या सन्मान्य न्यायाधिकाऱ्यांकडे सोपवले. रस्त्यांवरील आक्रमण आणि दळणवळणास अडथळा, हे गुन्हे ठरवण्यात आले. त्यांना शिक्षा सांगितली. जन्माची नोंद करण्याचे कामही या न्यायाधिकाऱ्यांच्या कक्षेत आले. या सर्व कामास लागणारा पैसा केवळ घरांवरील कर आणि

दारूचे परवाने यातून उभा करणे शक्य नव्हते. इ. स. १८२७ मध्ये उत्पन्नाच्या बाबीत दुकाने, गाळे, गाड्या, घोडे इत्यादींवर कर लादण्यात आला. त्यात संगीताचा समावेश होता. ही करमणूककराची सुरुवात. वाढत्या खर्चाची आणि उत्पन्नाची तोंडमिळवणी करण्याच्या प्रश्नावर वादंग माजे. अशाच प्रकरणात स्वतंत्र बाण्याचे नागरीक आणि कार्याध्यक्ष मि. ब्रूस यांनी त्यागपत्र दिले. त्याचा इष्ट परिणाम झाला. १८३६ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने जेपींच्या संघटनेचे अधिकारक्षेत्र निश्चित करून दिले. ही गोष्ट स्थानिक शासन अधिकाऱ्यांना आवडली नाही. १८४५ पूर्वी दोन जेपी आणि एक सन्मान्य नागरीक यांचे साधारण गुन्ह्यात न्यायदान करणारे खंडपीठ होते. ते नगराधिकारी म्हणून काम करत. यावर्षी म्युनिसिपल कॉन्झर्व्हन्सी बोर्ड स्थापन करण्यात आले. त्याना नगरपालिकेच्या वसुलावर आणि खर्चावर पूर्ण अधिकार दिला. हे बोर्ड सात जेपींचे होते. ज्येष्ठ न्यायाधिकारी कार्याध्यक्ष असे. कलेक्टर, दोन पोलिसमॅजिस्ट्रेट, दोन युरपियन आणि तीन एतद्देशीय असे काउन्सिलचे सदस्य असत. एतद्देशीय जेपींची निवड जे. पी. आणि शासन करीत. बोर्डाची निवड तीन वर्षांकरता असे. काउन्सिलच्या कामावर सर्व जेपींची देखरेख असे. अशा प्रकारे स्थानिक स्वराज्याचा उगम झाला. या नगरव्यवस्थेचे उत्पन्न १९४५ मध्ये फक्त ४५,००० रुपये होते. ते १९०० मध्ये साडेपाच लाख एवढे वाढले. १८५० पासून तंबाखूवर आणि मालमत्तेवर कर लादण्याचा अधिकार देण्यात आला. पोर्तुगींजाच्या काळात इनाम दिलेल्या जमिनीवरची कर आकारणी करण्यासाठी पाच आयुक्तांची नियुक्ती करण्यात आणि आजच्या महानगरपालिकेतील ॲसेसरच्या खात्याचा प्रारंभ झाला.

## पहिल्या म्युनिसिपल कमिशनरची नेमणूक

वाढत्या मुंबईस ही नगरव्यवस्था पुरी पडली नाही. बोर्डाच्या कारभाराविरूद्ध चळवळ सुरू झाली. त्याचा परिणाम म्हणून १८५८ मध्ये तीन म्युनिसिपल कमिशनरची नेमणूक करण्यात आली. त्यावेळी अस्वच्छता इतकी वाढली होती, की दरवर्षी तीनचार हजार लोक मृत्युमुखी

पडत. १८६४ मध्ये तर ४५८८ लोक मरण पावले. शुद्ध पाण्याचा पुरवठा आणि सांडपाण्याचा निचरा करण्याची आवश्यकता होती. ही कामे नवीन कमिशनरने हातात घेतली. पूर्णवेळ कमिशनरना सालिना दहाहजार पगार होता. अर्धवेळ देऊ शकणाऱ्यांना सालिना चारहजार रुपये मिळत. जेपींच्या देखरेखीचा अधिकार ठरवून दिला. दोनशेपर्यंत पगारदारांची ते नेमणूक करू शकत. त्यावरचे पगारदार नेमण्यास शासनाची मंजुरी लागे. या बोर्डाच्या कारकीर्दीत विहार तलावाची योजना पक्की झाली. लोखंडी नळ टाकून विहारचे पाणी मुंबईत आणण्याची कार्यवाही कोनबेअर या इंजीनियरकडे सोपवण्यात आली. त्याने हे काम १८६५ साली पुरे केले. सर बर्टल फ्रियर यांच्या प्रेरणेने डॉ. लीथने सर्व शहराच्या स्वच्छतेची सर्वांगीण पहाणी करून अहवाल सादर केला.

**म्युनिसिपालटिच्या १८६५ चा कायदा आणि क्रॉफर्डची नेमणूक**

१ जुलै १८६५ ला बोर्डाचे अस्तित्व संपुष्टात आले. १८६५ चा दुसरा कायदेकानून पास झाला. त्या अन्वये ऑर्थर क्रॉफर्ड यांची मुख्य कार्याधिकारी म्हणून नेमणूक झाली. ह्या कर्तबगार कमिशनरने नवीन मुंबईचा पाया घातला. त्याच्या दूरदर्शित्वाच्या खुणा आजही दिसून येतात. अधिकारातिक्रमण, बेसुमार खर्च, मनमाने वर्तन इत्यादी आरोपांचा तो धनी झाला. त्याबद्दलच्या तक्रारी, चळवळ, क्रॉफर्डची चौकशी ह्या गोष्टी क्रॉफर्ड प्रकरण म्हणून मुंबईच्या इतिहासात नोंदल्या गेल्या आहेत. हे खरे असले तरी क्रॉफर्डच्या कामगिरीचे, मुंबईच्या निष्काम सेवेचे सार्वकालीन महत्त्व मुळीच कमी होत नाही.

१८६५ चा नगरपालिका कायदा तयार करण्याच्या कामात वॉल्टर कॅसेल या ' पील कॅरेनेल ॲण्ड कंपनी ' च्या अध्यक्षांनी महत्त्वाचा वाटा उचलला होता. कॅसेल हा स्कॉचमन मुंबईतील परदेशी व्यापाऱ्यात प्रमुख होता. बॉम्बे चेंबरच्या कार्यात तो भाग घेत असे. उत्तम कापसाच्या लागवडीत तो रस घेत असे. या काळात नवीन मुंबईची रचना होत होती. किल्ल्याच्या भिन्ती आणि बुरूज पाडण्यात येऊन वाढत्या वस्तीसाठी जागा मोकळी करण्याचे काम सुरू झाले होते. डॉकयार्डपासून सेंट

जॉर्ज हॉस्पिटल पर्यंत हा किल्ला पसरला होता. बी.बी.सि.आय्. रेल्वेला कुलाब्यापर्यंत रूळ टाकायचे होते. त्यासाठी समुद्र किनाऱ्यालगत जागा पाहिजे होती. त्यातून बॅकबे रेक्लमेशनचा जन्म झाला. मायकेल स्कॉटने या कल्पनेचा पाठपुरावा केला. रिटची स्टेनार्ट आणि कंपनी ही त्यांची कंपनी भरभराटीत होती.

१८६४ मध्ये कापसाच्या मागणीत आणि भावात वाढ झाली होती. परंतु पुढच्याच वर्षी सौदेबाजीत भाव एकदम उतरले आणि सर्वत्र आर्थिक अवकळा आली. त्यात कंपनीचे ऐशियाटिक बँकिंग कंपनीत असलेले नव्वद लक्ष रुपये धोक्यात आले. कोटात आम्बेडकर पुतळ्याच्या दक्षिणेस असलेल्या वुडहाउस रस्त्यापासून तो चौपाटीपर्यंतचा भाग यायोजनेत येतो. वेस्टर्न रेल्वेचे चर्निरोड पासून चर्चगेट-कुलाब्यापर्यंतचे लोहमार्ग, क्वीन्स् रोड, एरॉस सिनेमा, मंत्रालय हा सर्व भाग त्या पूर्वी पाण्याखाली होता. मायकेल स्कॉटच्या चिकाटीमुळे सुमारे एक कोट रुपये खर्चून हा भाग भरुन काढला.

## दक्षिण मुंबईची पुनर्रचना

कोटाच्या भिन्ती पाडून पश्चिमेकडील मैदान घरबांधणीस उपलब्ध करून मिळाले. म्यूझियमपासून क्राफर्ड मार्केट-धोबी तलावपर्यंतचा भाग मोकळा झाला. एल्फिन्स्टन् कॉलेज पासून कॅपिटॉल सिनेमापर्यंतच्या जमिनीचे प्लॉट विक्रीस काढण्यात आले. ही नवी मुंबई फ्रियर टाउन म्हणून संबोधण्यात येणार होती. परंतु आजतागाजत तिचे ' कोट ' हे नावच वापरात आहे. या भागातील जागा त्या वेळेचा बाजारभाव ध्यानी घेता भरमसाट भावाने विकल्या गेल्या. चौरस यार्डास रु. ७५ ते १४५ पर्यंत विकत घेणाऱ्यांनी विसाराची रक्कम भरली होती. परंतु १८६५ च्या आर्थिक संकटात या भावी मालकांचे दिवाळे वाजले आणि विसाऱ्यासाची रक्कम सरकारजप्त झाली.

## पहिली नगरपालिका

अशा काळात म्युनिसिपल ॲक्ट अमलात आला. ' नगर स्वच्छता आणि सुधारणा ' हा प्रमुख उद्देश होता. जे. पी. हेच नगरव्यवस्थेचे राखणदार होते. त्यावेळी त्यांची संख्या शंभर असावी. त्यांच्यात युरोपियन

आणि देशी व्यापारी उद्योगपती, मालदार धनिक आणि विद्वान यांचा समावेश होता. यापैकी बहुतेक करदार असत परंतु ते सर्व करदात्यांचे प्रतिनिधी असतच असे नाही. करदात्यांचा तेंव्हा असा आग्रहही नसे. जेपींची संस्था हीच नगरपालिका. तीन कमिशनरच्या ताब्यात असलेली सर्व मालमत्ता, खजिना आणि अधिकार या संस्थेकडे कायदेशीरपणे सुपूर्द करण्यात आले. त्याचप्रमाणे नगरपालिकेस जे देणे होते त्याचे उत्तरदायित्वसुद्धा या मंडळीवर लादण्यात आले. त्यासाठी जेपींना कायद्यात ट्रस्टीचा दर्जा देण्यात आला होता. दर तीन महिन्यांनी या मंडळीची बैठक व्हावयाची. कोरम फक्त सात जणांचा होता! अध्यक्षांची नेमणूक शासनाने करावयाची होती. पहिले अध्यक्ष एल. एच्. लिट्ल्टन् होते. त्यावेळी ते ॲडव्होकेट जनरल आणि विधिखात्याचे अवर सचिव होते.

या पहिल्या नगरपालिकेमध्ये दूरदर्शी सदस्य होते. त्यात जगन्नाथ शंकरशेट यांची गणना होते. गव्हर्नर बर्टल फ्रियर आणि कमांडर इन् चीफ सर विल्यम सॅण्डहर्स्ट यांचे महानगरपालिकेला मार्गदर्शन होते. सार्वजनिक आरोग्य, इंजीनियरिंग आणि अर्थ या खात्यांच्या प्रमुखांची निवड शासनाने करायची होती. कमिशनरची नेमणूक शासन करी. आजतागायत कमिशनरची नेमणूक शासनच करते. जे.पीं.च्या सभेत उपस्थित सभासदांच्या दोन तृतीयांश मताने ठराव केल्यास कमिशनरला निवृत्त करता येत असे. कंट्रोलर ऑफ म्युनिसिपल अकाउंटंटची नेमणूक शासन करी.

## पूर्वीची तीन कमिशनरची योजना आणि नगरव्यवस्था

या कायद्याच्या पूर्वीची शहरव्यवस्था तीन कमिशनरच्या हातात होती असे वर सांगितले आहे. तत्पूर्वीची व्यवस्था ही अव्यवस्थाच होती. परिस्थिती शोचनीय होती. कॉंट्रॅक्टरच्या हातात शहराचे भवितव्य असे. सोनखत वाहून नेणारे हलालखोर स्वयंमन्य होते. ते घाण कचरा कोठेही टाकून देत. त्याना बोलण्याची सोय नव्हती. शहर पोलीस खातेही तेव्हा नगरपालिकेकडेच होते. मुंबई नगर पालिकेच्या

उत्पन्नात वाढ होत होती. १८४६ आणि १८५२ मधील आयव्ययाचे आकडे इथे पाहू.

| उत्पन्न | १८४६ | १८५२ |
|---|---|---|
| खाजगी इमारतीवरील कर . . | १,३३,००० | १,७२,००० |
| सरकारी इमारतीवरील कर. . | १३,००० | १३,००० |
| मार्केट फी . . | ३०,००० | ६४,००० |
| वाहनांवरील कर . . | ५०,००० | ८०,००० |
| दारूवरील कर . . | ४९,००० | ३५,००० |
| दंड . . | ६,००० | ५,५०० |
| न्यायाधिशांनी लादलेला दंड. . | २४,००० | १८,००० |
| | ३,०५,००० | ३,८७,५०० |

| खर्च | १८४६ | १८५२ |
|---|---|---|
| पोलीस . . | ४५,००० | ५३,००० |
| एस्टॅब्लिशमेंट . . | १३,००० | २३,००० |
| क्झ्यु. इंजीनियर खाते . . | १४,००० | १५,००० |
| सफाई . . | १४,००० | १३,००० |
| बांधकाम . . | २,८१,००० | २,२७,००० |
| | ३,६७,००० | ३,३१,००० |

१८५२ सालाचे आयव्ययाचे आकडे पाहता उत्पन्नापेक्षा खर्च कमी. त्यातही सुमारे ७० टक्के खर्च भांडवली कामावर आणि सफाईच्या खर्चात घट ! त्यामुळे गलिच्छपणा वाढला नाही तरच नवल.

### १८६५ पूर्वीची नगरव्यवस्था

त्या काळी स्वच्छता खाते, सर्वेक्षण किंवा इंजीनियर, आरोग्य अधिकारी खाती, मार्केट, कत्तलखाने, रस्ते झाडणे आणि कॉंट्रक्टर जनरल यांचे बनलेले होते. पैकी शेवटचा घटकच फार प्रभावी होता. १८६५ मध्ये लोकवस्ती ७८,४०० होती. ११,९१९ एकर जागेत २९,६५३ करयोग्य

इस्टेटी होत्या. मृत्यूसंख्या फार होती. वाढत होती. १८६४ च्या पहिल्या सहामाहीत ६४३४ मृत्यूंची नोंद झाली तर पुढील वर्षाच्या पहिल्या सहामाहीत ही संख्या १२२८४ वर गेली ! याचे प्रमुख कारण सांडपाण्याच्या निचऱ्याची निकृष्ट व्यवस्था, हलालखोरांचा निष्काळजीपणा आणि आळस. किती एक नागरिक कचऱ्याच्या ढिगावर झोपत असे नोंदण्यात आले आहे. १८६५ पूर्वीच्या दिवाबत्तीबद्दल लिहिताना दिनशा वाच्छांनी रस्त्यावरील प्रकाशव्यवस्थेचे ' दृश्य अंधार ' (visible darkness) असे वर्णन केले आहे. पार्शी लोक, इतर घरंदाज आपल्या ओसरीवर कंदील (atta) लावीत. तोच प्रकाश ! ऑक्टोबर १८६५ पर्यंत गॅसच्या बत्त्या नव्हत्या. फाणस होते. त्यात घालायचे तेल कॉंट्रॅक्टरच्या घरी जात असावे. ते गोरज मुहुर्तावर थोडे मिणमिणत आणि अनंतत्वांत विलीन होत. रेल्वे मार्गावर पूल नव्हते. फाटके होती.

## नव्या कमिशनरची नेमणूक आणि अधिकार

नवीन कायद्यामध्ये कमिशनरला केन्द्रस्थानी धरून रचना केली होती. त्याला सर्व अधिकार होते. शहरसुधारणा, स्वच्छता, वाहातुकीची व्यवस्था, रस्तेदुरुस्ती, देखभाल, मार्केटव्यवस्था आणि करवसुली. वार्षिक अंदाजपत्रक जे. पी. मंडळाकडून मान्य करून घ्यायचे असे. अर्थात कार्यवाहीत कमिशनरला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. अशा जागी योग्य अधिकाऱ्यांची निवड करणे अवश्य होते. सर बर्टल फ्रियर यांनी त्यासाठी आर्थर क्रॉफर्ड या उत्साही कर्तबगार सनदी नोकराची नियुक्ती केली. क्रॉफर्डने धडाक्याने कामास सुरुवात केली. डॉ. लीथ यांनी शहर स्वच्छतेसंबंधीचा अहवाल सादर केला होता. डॉ. ह्यूवटे यांची आरोग्याधिकारी म्हणून अर्धवेळ नेमणूक झाली होती. त्यांच्या सहकार्याने क्रॉफर्डने कार्यक्षम असे आरोग्य खाते निर्माण केले. शहरातील कचरा वाहून नेण्यासाठी जी. आय. पी. (आजची सेंट्रल) रेल्वेशी करार केला. त्या प्रमाणे शहरातील कचरा कुर्ल्याला वाहून न्यायचा होता. शहरातील कचरा गोळा करून एकत्र जमवण्यासाठी बैलगाड्यांची योजना केली. बैलांसाठी गोठे बांधले. जमवलेला कचरा रेलगाडीत भरेपर्यंत साठवण्याची चिंचबंदर स्टेशन जवळ व्यवस्था केली.

सार्वजनिक मुताऱ्या, संडास बांधून घेतले. मुंबईतील मार्केटची व्यवस्था अगदी असमाधानकारक होती. सर्वत्र घाण, कचरा करण्यात ही मार्केटे मोठाच हातभार लावत. खाटिकखाने कुठे नसावेत याचा नियम नव्हता. ते सर्वत्र पसरले होते. क्रॉफर्डने शहरातून खाटिकखाने हालवून ते माहिमखाडी पलिकडे वांद्र्यास एकत्र केले. अद्ययावत् मार्केट उभारण्याची योजना केली. त्यातून आजचे फुले मार्केट जन्म पावले. त्याचे वर्णन पूर्वी केलेच आहे. या मार्केटवर झालेल्या भांडवल खर्चावर ६।। टक्के उत्पन्न होत असे. त्यामुळे भांडवली खर्च समर्थनीयच नव्हे तर उपकारक ठरावा. रस्ते धुण्याचे काम दरमहा रु. २०,००० देवून कॉंट्रॅक्टरला दिले होते. रस्तेदुरुस्तीचे कामही कॉंट्रॅक्टरला दिले होते. परंतु प्रत्यक्षात काम होत नसे.

क्रॉफर्डच्या कारकीर्दीत गॅसचे दिवे प्रथम ७ ऑक्टोबर १८६५ रोजी मुंबईच्या रस्त्यांवर पेटले. त्या दिवशी १३३ बत्त्या लागल्या. रेल्वे मार्गावर पूल नव्हते हे मागे सांगितले आहे. लेव्हल क्रॉसिंग होती. माझगाव आणि भायखळा येथे मार्ग अत्यंत अवघड होता. क्रॉफर्डच्या कारकीर्दीत कारनॅकबंदर, मस्जिद आणि एल्फिन्स्टन् बंदर येथे पूल बांधण्यात आले.

सांडपाणी समुद्रात सोडून देण्यासाठी विचार झाला. प्रारंभी कुलाब्याला हे सांडपाणी सोडून द्यायचा विचार पुढे आला होता. परंतु शेवटी वरळी येथेच हे पाणी सोडून देण्याचा विचार ठरला.

## क्रॉफर्डचा एकहाती कारभार

वरीलप्रमाणे शहरव्यवस्थेची कामे करताना द्रव्य सहाय्य आवश्यक होते. हा सर्व पैसा करवसुलीतूनच यायचा होता. क्रॉफर्डने करचुकव्यांवर जप्ती वॉरंटे काढली. रस्त्यांची कामे, मार्केटे बांधणे, गलिच्छ वसती निर्मूलन, खाटिकखाने हालवणे, यासाठी पैसा खर्च करणे इतकेच नव्हे, तर भुयारी गटारांना लागणाऱ्या विटा तयार करण्यासाठी पनवेलला कारखाना उभारणे ही आणि अशी कामे क्रॉफर्डने हातात घेतली.

करवसुली करायची तर वाईटपणा घेणे आलेच. सुखासुखी कोण पैसे काढील. प्रसंगी गरीब लोक पैसे देतात परंतु धनिक पैसे देणे असेल ते न देणे हाही एक पैसे कमावण्याचा मार्ग समजतात. क्रॉफर्डने आपल्याकडे सुपूर्द केलेल्या अधिकारानुसार डिस्ट्रेस वॉरंटे काढली. साहजिकच घरमालकांनी ओरडा सूरू केला ; त्यांना पाठीशी घालणारे जे. पी. ही

निघाले. त्यांनी म्युनिसिपालटीच्या त्रैमासिक सभेत आवाज उठवला. सहाजिकच क्रॉफर्ड विरूद्ध वातावरण तयार होऊ लागले. वृत्तपत्रांनी रस घ्यायला सुरुवात केली.

शहरसुधारणा करायची तर भांडवली खर्च करणे आवश्यक ठरते. या भांडवली खर्चाची तोंडमिळवणी प्रतिवर्षी वसूल करण्यात येणाऱ्या करातून करणे अशक्य. तसे करण्यात येत होते, तेव्हा शहर सफाई होत नव्हती. मृत्यूसंख्या फुगत होती हे आपण वर पाहिले. क्रॉफर्डने अंदाजपत्रकाकडे लक्ष न देता आवश्यक भांडवली खर्च केला. अंदाजपत्रकात मान्य झालेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम खर्च केली. त्यामुळे वार्षिक आयव्यय पत्रकात तूट येऊ लागली. सुरूवातीस ८ लाख तूट असे वाटले तिथे तुटीचा आकडा १९ लाखांवर गेला.

क्रॉफर्डने अशा प्रकारे खर्च केला, की खजिना रिकामा झाला. हॅमिल्टन मॅक्सवेल, जे. पी. (विल्यम निकोल आणि कंपनी) यांनी नगरपालिकेचे दिवाळे वाजले असा शेरा मांडला. टाइम्सचे संपादक मार्टिन् वुड यांनी एक लेख लिहून आठ लाख तूट (की जी पुढे १९ लाख झाली) कशी भरून काढायची या प्रश्नावर एक लेख लिहिला. त्यात अर्थसमितीने केलेल्या टीकेचेच पडसाद दिसून येतात.

**जे. पी. संस्था जागृत झाली**

ज्या जेपींच्या संस्थेने गंभीरपणे शहरव्यवस्थेचा कधीच विचार केला नव्हता त्यांनी टीकेला सुरुवात होताच त्यात हिरीरीने भाग घेला. मार्टीन वुड बरोबर अनेक जेपी त्यात सामील झाले. नवरोसजी फर्डुनजी, विश्वनाथ नारायण मंडलिक, सोराबजी शपूरजी बेगांली, हे त्या वेळी करदात्यांच्या बाजूने भांडत होते. घरमालकांचे प्रतिनिधी मंगळदास नथुभाई, बैरामजी जिजीभाई हेही या टीकेत साम्मील झाले. महानगरपालिकांच्या व्यवस्थेचा पूर्ण अभ्यास केलेले फेरोजशहा मेहता यांनी ईस्ट इंडिया असोसिएशनच्या मुंबई ब्रांच समोर एक पेपर वाचला (१८७१). त्यात मूलग्राही विचार होते.

या सर्व टीकेचा प्रभाव १८७२ च्या म्युनिसिपल ॲक्टवर पडला असे दिसते. त्यावेळी नगरपालिकेला २१ ते २५ लाखांवर कर वसूल करायचा होता, अशी समजूत होती. परंतु प्रत्यक्षात फक्त ११ लाख वसूलीच

बाकी होती. १८६८ मध्ये नोटिसी आणि वॉरंटे काढण्यात आली ती अशी होती.

| | | नोटिसी | वॉरंटे |
|---|---|---|---|
| (१) | घरांवरील कर ... | ३३६५ | ६५३ |
| (२) | पोलिस, दिवाबत्ती आणि हलालखोर | ८८४० | ३६२७ |
| (३) | पाणीपट्टी ... | १६०२ | २९७ |
| (४) | वाहन कर ... | ४५१ | १९५ |
| | | १४५५६ | ४७९७ |

१८७९ साली वसूल होणारी रक्कम फक्त रु. ३२,६४२ इतकीच होती. यावरून नगरपालिकेची वसूलीव्यवस्था क्रॉफर्डच्या कारकीर्दीत कार्यक्षम होती, असे म्हटले पाहिजे.

त्यावेळच्या सर्वसाधारण टीकेवरून असे दिसते, की जे. पी. संस्थेकडे १८६५ च्या कायद्याअन्वये जी जबाबदारी सोपवली होती ती तिने पार पाडली नाही. कायद्याप्रमाणे आपल्यावर असलेल्या जबाबदारीची जे. पी. मंडळाला कल्पनाच आली नसावी, किंवा त्यांच्यापैकी काहींना त्याची कल्पना असली तरी त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले असावे.

क्रॉफर्डने जे. पी. मंडळाला न विचारता अनेक गोष्टी केल्या असे मानले तरी जे. पी. मंडळाची जबाबदारी संपत नाही. सुमारे १०० जे. पी. पैकी फक्त सात जणांचा कोरम पुरेसा होता. प्रत्यक्षात २०-२५ जे. पी. उपस्थित राहत असावे. यावरून एक गोष्ट शिकली पाहिजे, की अशा फार मोठ्या मंडळाकडे कोणतीही जबाबदारी सोपवताना पूर्ण विचार करून प्रत्यक्ष कार्याचे नियम केले पाहिजेत. सर्वच स्वयंभू. फक्त टीका करण्याचे अधिकारी. जबाबदारी घ्यायला नको. कार्यवाही करणाऱ्यांच्या अडचणीची कल्पना नाही, अशी स्थिती होते.

त्याकाळी नगरपालिकेला योग्य अशी कचेरीची जागा नव्हती. जे. पी. मंडळाच्या सभा टाउन हॉलच्या दरबार दिवाणखान्यात होत. क्रॉफर्डने नगरपालिकेसाठी आज आर्मी नेव्ही स्टोअरची इमारत म्हणून

ओळखल्या जाणाऱ्या एल्फिन्स्टन् कॉलेजजवळील इमारतीत जागा भाड्याने घेतली. ही इमारत जे. पी. ए. एच्. वाडिया यांच्या मालकीची. भाडे मासिक रु. २८२५ ठरले. त्यावर जोरदार टिका झाली. परंतु या बाबत काही कार्यवाही करण्यास आपण असमर्थ आहोत असे मत जे. पीं. नी व्यक्त केले! १८६५ च्या कायद्यात दुरुस्ती केल्यानंतरच परिस्थिती सुधारण्याची शक्यता आहे, असे मत त्यांनी नोंदवले.

**क्रॉफर्डच्या कारकिर्दीवरील टीका आणि उपाय**

दरम्यान सरकारने म्युनिसिपल ॲक्टमध्ये बदल करण्यासाठी बिल मांडले. शिवाय लोकमत अजमावण्यासाठी आवाहन केले. टीकाकाराना आता घटनात्मक पाठिंबा मिळाला. टीकेचा जोर वाढत चालला तेव्हा सर्व प्रश्नांचा विचार करण्यासाठी जे. पी. मंडळाची खास सभा बोलवावी अशा सूचना यायला लागल्या. ॲड्र्यू स्कोल्स् यांच्या अध्यक्षतेखाली जेपींनीची सभा दि. ३०-६-१८७१ रोजी बोलावण्यात आली. टाउन हॉलच्या दरबार हॉलमध्ये ही सभा झाली. तीनचार वेळा स्थगित झाली. कारण अनेकांना बोलायचे होते. हॉल तुडुंब भरला म्हणून मुख्य सभागृहात तिचे स्थलांतर झाले. आता अनेक जे. पी. जागृत झाले होते.

नागरीकांचा राग, खरे म्हणजे घरमालकांचा राग करांवर होता. त्यावेळी घरकर ६ टक्के, पोलीसकर २ टक्के, दिवाबत्तीकर २ टक्के, पाणीपट्टी ५ टक्के आणि हलालखोर कर ३ टक्के होता. म्हणजे एकूण १८ टक्के. हा कर जाचक आहे असे घर मालकांचे म्हणणे फोर्बस्ने उचलून धरले. क्रॉफर्ड भरमसाट खर्च करतो. त्यासाठी जे. पी. मंडळापुढे पूर्व संमत्ती घेत नाही. कित्येक भारी रकमेची कंत्राटे दिली जातात. ती मंडळापुढे आणीत नाही. याला आळा घातला तर कर कमी करणे शक्य होईल, अशी सर्वसाधारण समजूत झाली होती. तिचा फायदा घेऊन फोर्बस्ने आपल्या ठरावात टाउन काउन्सिलची कल्पना पुढे मांडली. त्याचे १६ सदस्य असावेत. त्यातील ६ सरकारने नेमावे, ६ जे. पी. मंडळाने निवडावे आणि चार घरमालकांनी आणि दरमहा रु. २५ वर भाडे देणाऱ्या भाडेकरूंनी निवडावे अशी व्यवस्था केली होती. या टाउन काउन्सिलकडे १८६५ कायद्याअन्वये कमिशनरला दिलेले अधिकार सुपूर्द करावे, म्हणजे कमिशनरच्या कामावर अंकुश राहील अशी कल्पना! काउन्सिलला कार्यवाह नेमून एक्झिक्यूटीव्ह बनायचे होते. फायनान्स् कंट्रोलर

कमिशनरवर अंकुश ठेऊ शकलेला नव्हता. म्हणून त्याची नेमणूक त्याचप्रमाणे आरोग्याधिकारी आणि एक्झिक्यूटिव्ह इंजीनियर यांच्या नेमणुकी टाउन काउन्सिलने करायच्या, पण जे. पी. मंडळाची मंजुरी घ्यायची, अशी योजना अंतर्भूत केली होती. जरूर पडली तरच या नेमणुका करायच्या होत्या. कारण काटकसर. म्हणजे ही महत्त्वाची कामे अधिकाऱ्यांशिवाय करता येतील असा भाबडा विश्वास. घरमालकांना सहानुभूती दाखवताना कोर्टात नादारी साठी ६०० अर्ज नोंदवण्यात आल्याचा त्यानी उल्लेख केला. परंतु यातील बहुसंख्य अर्जांचा म्युनिसिपल कराशी काही संबंध नव्हता. कमिशनरने सहा वर्षांत दोन कोटी बारा लाख खर्च केले. त्यात ३२ लाख कर्ज काढले ते समाविष्ट आहे असेही त्यानी सांगितले. टाउन ड्यूटी रद्द करावी अशी त्यानी मागणी केली.

**फोर्बस्‌ची कामगिरी**

फोर्बस्‌च्या पाठीराख्यात जमशेटजी जिजिभाई, सोराबजी शापुरजी, विश्वनाथ नारायण मंडलिक, महादेव गोविंद रानडे, डॉ. आत्माराम पांडुरंग, नाना मोरोबा अशी मंडळी होती. तर विरोधकात नारायण वासुदेव दाभोलकर, शंकरशेट, दोसाजी क्रामजी होते. टाउन काउन्सिलची कल्पना त्यानी उचलून धरली तरी त्या समितीला एक्झिक्यूटिव्हचे अधिकार देणास त्यांचा विरोध होता. त्यात मि. ऑर्मिस्टन हा एल्फिन्स्टन्‌ लॅण्ड कंपनीचा इंजीनियर होता. या कंपनीचेच पुढे पोर्टट्रस्ट मध्ये रूपांतर झाले. टाइम्सचे माजी संपादक रॉबर्ट नाइट, कमिशनर क्रॉफर्डच्या बाजूने उभे ठाकले. त्यांनी तयार करून आणलेले भाषण वाचायला विरोध झाला तेव्हा ते बोलले. पण तयार भाषणाच्या प्रती वाटण्यात आल्या. आजही हे छापील भाषण नगरपालिकेच्या दोला अवस्थेतील परिस्थिती समजाऊन घेण्यास अत्यंत उपयुक्त आहे. ते पुन्हा छापून उपलब्ध झाले पाहिजे. रॉबर्ट नाइट म्हणाले, की फोर्बस्‌ला क्रॉफर्डला काढून टाकायचे आहे.

a commissioner to whom the community owes a debt of gratitude for his services that it can never repay. The man has his faults, but he is a man. . . .in the commissioner you have a blood horse in your Municipal carriage and therefore you must have a skillful driver. I would not take him on a paltry worrying ground and tease him about brickfields or steam rollers. Fellows who do not keep one eye open upon the steam roller, while they close both upon the Markets and the other improvements.

**फेरोजशाहा मेहतांच्या कारकीर्दीचा उगम आणि कामगिरी**

फेरोजशहा मेहता मुंबई नगरपालिकेत पुढे फार लक्ष घालू लागले. त्यावेळी (१८७१) ते तरूण, थोड्याच काळापूर्वी युरपमधून परतले होते. परंतु त्यांचे निदान अचूक होते. तहहयात जे.पीं.ना हा कारभार झेपणार नाही, त्यांची निवड करदात्यांनी केली पाहिजे आणि त्यातून निवडलेल्या टाऊन काउन्सिलचा कमिशनरने सल्ला घेतला पाहिजे असे मत त्यानी मांडले. याच तत्त्वावर पुढे १९७२ चा तिसरा कायदा आधारण्यात आला असे दिसून येईल. फेरोजशहा मेहतांनी नगरव्यवस्था एतद्देशियांकडे सोपवण्यास विरोध असणाऱ्यांना असे उत्तर दिले, की हा देश पंचायत राज्यांच्या बाबतीत हजारो वर्षे पुढे आहे. हॅमिल्टन मॅक्सवेल यांनी (निकोल आणि कंपनी) बँक्रप्ट या एकाच शब्दाने नगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचे वर्णन केले. आणि कमिशनरला अंकुश लावण्याची आवश्यकता प्रतिपादली. बॅरिस्टर जॉन कॅनन त्यावेळी चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट होते. त्यानी सरकारी खात्यातून असलेल्या आर्थिक नियमनाची, कमिशनरला दिलेल्या निरंकुश अधिकाराशी तुलना करून मॅक्सवेलला पाठिंबा दिला.

चार दिवस चाललेल्या या मॅरॅथॉन सभेमध्ये अनेक फर्डे वक्ते बोलले, पण क्रॉफर्डच्या बाजूने बोलणारे एकदोनच निघाले. सभेचा नूर विरूद्धच होता. बाहेर नागरिकांनी बॉर्ड लावून मोर्चा आणला. असंख्य लोक दररोज टाउन हॉलच्या पायऱ्यांवर आणि पुढील मैदानात जमा होत. अशा वेळी क्रॉफर्डने आपले समर्थनाचे भाषण करायचे ठरवले.

**क्रॉफर्ड प्रकरण आणि क्रॉफर्डचे समर्थन**

आर्थर ट्रव्हस् क्रॉफर्ड १८३५ मध्ये जन्मला. वयाच्या १९ व्या वर्षी (१८५४) त्याने मुंबई मुलकी खात्यात नोकरी धरली. तिसाव्या वर्षी त्याला कमिशनर नेमण्यात आले. त्यापूर्वी त्याने जिल्ह्यातून रेव्हिन्यू खात्यात कामे केली होती. धडाडीचा अधिकारी आणि गरीबांचा कैवारी म्हणून नाव मिळवले होते. तो मराठीच नव्हे, तर मराठीच्या बोलीही उत्तम बोलू शके. उंचीपुरी रूबाबदार देहयष्टी लाभलेला हा अधिकारी आता आरोपीच्या पिंजऱ्यात सापडला होता. आरोप करणाऱ्यांविषयी राग मनात धुमसत होता. त्याला त्याने वाट करून दिली आणि मग बऱ्याच कृत्यांचे तो समर्थनही करू शकला. हलालखोरांनी नागरिकांची कोंडी केली होती. संडास तेच वाटून घेत, पण काम मात्र करत

नसत. नगरपालिकेने आपले हलालखोर आणले तेव्हा त्यांनी संप केला. दोन चार दिवस संडास सफाई झालीच नाही. त्यासाठी स्वस्थ बसून रोगराईस वाट मोकळी करून द्यायची, का जरूर तर जास्त खर्च करूनही स्वच्छता काम चालू ठेवायचे ? असा त्याचा सवाल होता. हलालखोर वाढवावेत असे १८६४ सालीच जे.पी. मंडळात चर्चिले गेले होते, याचा त्याने उल्लेख केला. १८६५ च्या कायद्यात हलालखोरखर्च देणे वैकल्पिक होते, म्हणून काही घरमालक तो भरत नसत. त्यांचे संडास घाण ठेवायचे, की तो सक्तीने वसूल करायचा ? कायद्यातील पळवाटीचा फायदा घेऊ न देण्यास, शहर स्वच्छतेची जबाबदारी पार पाडण्याचे बंधन हे बिनतोड कारण त्याने दिले. हलालखोर खर्चाची वसूली कमी झाल्यामुळे म्युनिसिपलटीचे सात लाख नुकसान झाले. कारण त्याला कायद्याचा आधार नव्हता. या आरोपाचे वर्णन क्रॉफर्डने कमरेखाली हल्ला असे केले. त्याचे उत्तर नाकावर ठोसा मारूनच दिले पाहिजे असा त्याने आत्मविश्वासाने पवित्रा घेतला.

करवाढीबद्दल बोलताना तर क्रॉफर्डने सोराबजी शापुरजी बंगाली यांची दांडीच घेतली. फोर्बस्च्या ठरावास बळकटी आणण्यासाठी यांनीच प्रामुख्याने भाग घेतला होता, अशी माहिती पुरवली. उत्तरात क्रॉफर्डने सहा टक्क्यांवरून सात टक्के घरपट्टी न्यावी ही सूचना मुळात सोराबजीनीच जे.पी. मंडळात केली होती. त्या अन्वये ती वाढवण्यात आली, हे त्याने ठणकाऊन जाहीर केले. डिस्ट्रेस वॉरंट घेऊन नागरिकांवर बेलीफ सोडले, यास त्याचे उत्तर होते, की चौदाहजार घरमालकांकडून पट्टी वसूल करण्याऐवजी दीड लाख भाडेकरूंकडून तो वसूल करण्याची व्यवस्था १८६५ च्या कायद्यात केली हेच चुकले. मग १८००० वॉरंटे काढण्याशिवाय कमिशनरला कसे गप्प बसता येईल ? या सवालाला उत्तर नव्हते. भरमसाट खर्चाच्या आरोपास उत्तर देताना क्रॉफर्डने दाखवून दिले, की १८६५ मध्ये झालेल्या ४५ लाख खर्चावरून तो १८७० मध्ये २६ लाखांवर आणला आहे ! आणि तरी नागरिकांच्या सोयीत प्रशंसनीय वाढ झाली आहे.

## क्रॉफर्डवरील कार्यवाही

मार्टिन वूड या टाइम्सच्या संपादकाने चवथ्या दिवशी भाषण केले. त्यात त्याने उपसूचना मांडली. १८६५ च्या कायद्याच्या अमलबजावणीची आणि गेल्या सहा वर्षांतील म्युनिसिपालटीच्या कारभाराची संपूर्ण चौकशी शासनाने करावी. त्यासाठी कमिशन नेमावे. ही उपसूचना ८१ विरूद्ध ४३ मतांनी पास झाली. लोकांची चळवळ आणि वृत्तपत्रातील टीका चालूच होती. शासनाने तीन लोकांची एक समिती नेमली. सुरतेचे कलेक्टर थिओडोर होप, असिस्टंट अकाउंटंट जनरल डॉ. क्लिन आणि सोराबजी शापुरजी बंगाली. ऑक्टोबर १८७१ मध्ये समितीने अहवाल दिला, की पंधरा लाख रुपये कर्ज दिल्याने म्युनिसिपालटीच्या आयव्ययाची तोंडमिळवणी होईल. पण दरम्यान १९६९ मध्ये क्रॉफर्डने मार्केटवर ६।। लाख आणखी खर्च केले होते. दोन लाख रुपये वसूल होतील पण मार्केटवर परत आणखी २।। लाख खर्च झाला. त्यामुळे तूट आणखी सात लाखाने वाढली. या अहवालाच्या प्रसिद्धीनंतर टाइम्समध्ये वूडनी आणखी हल्ला चढवला. क्रॉफर्डची बाजू ***स्टार ऑफ इंडियाचे*** संपादक नाईट मांडत होते. पुण्याच्या गव्हर्नमेंट हाऊस वर १५ लाख खर्च केल्यामुळे मुंबई सरकार आर्थिक अडचणीत होतेच आणि हिन्दुस्थान सरकारच्या रोषास पात्र झाले होते. फिट्झिराल्ड तेव्हा गव्हर्नर होते. त्यांनी क्रॉफर्डला दूर करून मुंबईच्या कलेक्टरकडे म्युनिसिपालटीचा कारभार सोपवला. परिणामतः क्रॉफर्डला अपमान सोसून गप्प बसावे लागले. वूडच्या सूचनेप्रमाणे निःपक्षपाती मंडळाने क्रॉफर्डच्या कारभाराची चौकशी केली असती तर कदाचित् क्रॉफर्डच्या कामाचे आणि दोषांचे योग्य मूल्यमापन झाले असते असे वाटते. जे.पी. मंडळासारख्या अवाढव्य आणि अप्रातिनिधिक संस्थेवर १८६५ च्या कायद्याअन्वये नगरव्यवस्था सोपवली ही शासनाची चूक झाली. नंतर १६६८ पासून सुरू झालेल्या टीकेची, जे.पी. मंडळाने पत्र व्यवहारात प्रगट केलेल्या क्रॉफर्डवर अंकुश ठेवण्याबाबत असमर्थतेची योग्य वेळी दखल घेतली नाही ही दुसरी चूक.

## क्रॉफर्डबद्दल फेरोजशहांचे उद्‌गार

क्रॉफर्डच्या कामगिरीचे योग्य मूल्यमापन झाले असते असे म्हणण्याला भक्कम आधार म्हणजे नगरपालिकांच्या कामाचा पूर्ण अभ्यास केलेल्या फेराजशहांचे भाषण. जे. पी. मंडळांच्या सभेत मेहतांचे भाषण झाले, तेव्हाच या तरूण 'कॉर्पोरेटर' च्या अभ्यास वृत्ती आणि निःपक्षपाती विचारसरणी यांची साक्ष पटली होती. मेहतांचे भाषण दिनांक २९ नोव्हेंबर १८७१ रोजी फ्रामजी कावसजी हॉलमध्ये झाले. ईस्ट इंडियन असोसिएशनच्या मुंबई शाखेकरता हा निबंध मेहतांनी लिहिला होता. क्रॉफर्डच्या कामगिरी बद्दल ते म्हणतात :

The wonderful transformation of the Bombay of 1865 into the Bombay of 1871 desereves in the main to be emphatically proclaimed. Mr. Crawford was its saviour and benefactor. He might have been guilty of great faults, committed great errors and defied all restraints, forms and formulae what so ever. But on these conditions only could the work have been acomplished, and their memory must in justice be lost in the general successful results. It is exactly like the case of the general who, in the desperte hour of the battle, defies his strict orders, relies upon his own judgement, and gains the victory, Death ; the just punishment of his insubordination, if he had failed ; a greatful act of indemnity the reward of his successful intrepidity. It is one thing, even in ordinary times, to ascertain the costs of works before they are finished, and another to critisize by the light of past experience. Mr. Crawford has steered the city safely through a supreme municipal crises,.... namely, the strike of the original halalkore monopolists. Are we to forget in our day of safety and prosperity, that he has in so short a time driven disease and death from our doors where they were constant visctors before ?

Are we to forget, that if he has touched ourpockets too closely, he has put us in a position to enjoy what we have left, in comfort and safety. Nay, that in the case if the poorer classes, by improving their chances of health and vigour, he has removed the continual drain which sickness and want of health cast indirectly upon their packets, and actually supplied them with the means of fighting more vigoruously for their livelihood.

यावर वेगळे भाष्य करण्याची जरूरी नाही. मुंबई महानगपालिकेच्या आजच्या समस्यांबाबतही कर्तबगार कमिशनर काय करू शकतो आणि अशा दोनतीन कमिशनरनी काय करून दाखवले किंवा ते करू शकले असते हे उदाहरण घेऊन दाखवता येईल.

**लोकमान्य टिळक आणि क्रॉफर्ड प्रकरण दुसरे**

न. चिं. केळकर यांनी आपल्या टिळकचरित्रात क्रॉफर्ड साहेबाचे वर्णन केले आहे. त्यातील उतारे देऊन हे क्रॉफर्ड प्रकरण पुरे करू, याचा संदर्भ असा, की क्रॉफर्ड , नंतर मध्य विभागाचे रेव्हन्यू कमिशनर झाले. त्यांच्या तेथील कारकीर्दीवर लाचलुचपती बाबत टीका झाली. तेव्हा क्रॉफर्डना त्यात अडकवून संपवायचे असा कट त्यावेळच्या सेक्रेटरीएट मध्ये शिजला. लाचलुचपत झाली हे सिद्ध करायला कबुलीजबाबांची आवश्यकता होती. लाच मामलेदारांनी बदलीसाठी, नोरीतील बढतीसाठी, दिली असली पाहिजे. त्यांच्याकडून हे जबाब घेण्यात आले. त्यांना माफीचे आमीष दाखवले. त्या कबुलीजबाबांचा फायदा घेऊन हणमंतराव यांच्यावर खटला झाला आणि क्रॉफर्ड यास बडतर्फ केले. ते वेश पालटून मुंबईत पळाले. पुढे सिलोनला जायचा बेत होता, पण पकडले गेले. खटल्याऐवजी कमिशन नेमले, त्यात लाचलुचपत सिद्ध झाली नाही. कर्ज घेतल्याचा आरोप होता. त्यामुळे त्याना नोकरीतून कमी केले. कबुलीजबाब दिलेल्या मामलेदारास माफी मिळावी म्हणून लो. टिळकांनी प्रयत्न चालवले होते-त्यात ते अंशतः यशस्वी झाले. चरित्रकार केळकर लिहितातः

क्रॉफर्ड साहेब हे एक अस्सल इंग्रज सिव्हिलियन होते. ते मोठे बुद्धिमान असत. पण बुद्धिमान मनुष्यांच्या अंगी असणारा आळसही त्यांच्या अंगी पूर्णपणे वसत होता. महिना महिनाभर ख्यालीखुशालीत रहावे, व काम तुंबले म्हणजे एखाद्या रात्री अवशीच्या प्रहरी टेबलावर एका बाजूस शेलक्या प्रकरणांचा डोंगर रचावा, दुसरे बाजूस दारूच्या बाटल्या व सिगरेटच्या पेट्या ठेवून द्याव्या, व उजाडेपर्यंत ती प्रकरणे ती दारू व त्या विड्या संपवून सूर्योदयाच्या वेळी साहेबानी पांघरूणात शिरून ऐन माध्यांनीची मध्यरात्र करावी असा त्याचा प्रघात असे— ते लिहिणारे मोठे फर्डे असत..... त्यांचा स्वभाव अत्यंत खर्चिक असून ते ज्या जिल्ह्यात असतील त्या जिल्ह्यातील सुखावलेल्या सर्व युरोपियन स्त्रीपुरुषांचा अड्डा त्यांच्या बंगल्यांत कायमचा पडलेला असे. या स्त्रीवर्गाला जिच्या तिच्या लायकीप्रमाणे मोत्यांच्या हारापर्यंतही क्रॉफर्ड साहेबांकडून देणग्या मिळत..... लाचलुचपतीची खोड साहेब मजकुरांना अगदी पहिल्या पासूनच होती. या लांचापैकी काही ते कर्ज म्हणून घेत व कांही देणगी म्हणून स्वीकारीत...... त्यांचा स्वभाव खरोखरच दिलदार व सरदारी असून, त्यांनी ज्यांचा लाच घेतला त्यांचीच काय पण ज्यांचा न घेतला त्यांचीही कामे करून दिली..... नेटिव्ह लोकांत मिळूनमिसळून वागण्याची त्यांची हातोटी कांही विशेषच होती..... नेटिव्ह लोकांशी इतक्या खेळीमळीने वागणारा दुसरा कोणी सिव्हिलियन झाला नाही ही गोष्ट अगदी निश्चित होय.

## १९७२ च्या सुधारित म्युनिसिपल कायद्याचा मसुदा

१८६५ च्या म्युनिसिपल कायद्याचा पूर्ण अनुभव घेतल्यानंतर आणि लोकमताचा क्षोभ अनुभवल्यावर मुंबई सरकारने नवीन म्युनिसिपल बिल २४ मार्च १८७२ रोजी नव्याने लेजिस्लेटिव्ह असेंब्लित मांडले. त्यांचे 'कमित कमी प्रतिनिधित्व आणि जास्तीत जास्त अंकुश' असे वर्णन करण्यात आले होते. असेंब्लीत बिल सादर करताना जॉर्ज टकर यांनी त्याचे पितृत्व आपल्याकडे नाही, ते तयार करताना अनेक हात लागले आहेत आणि एकाहून जास्त डोक्याना शीण पडला आहे, असे सांगितले. परस्परविरुद्ध मतांचा त्यात समन्वय करायचा प्रयत्न होता : ही पद्धत

अयोग्य आहे असे स्पष्ट मत त्यावेळचे ॲडव्होकेट जनरल मि. व्हाइट यांनी व्यक्त केले होते. ज्या करदात्यांचा प्रत्यक्ष संबंध नगरव्यवस्थेशी येतो, त्याना अत्यल्प प्रतिनिधित्व तर शासनाला अनिर्बंध अधिकार देण्याच्या या उपक्रमाला त्यांचा विरोध होता. या बिलाअन्वये जे.पी.ची नेमणूक सरकार करी त्यातूनच निवडायच्या एकंदर ८० सदस्यापैकी ३२ जे.पी. ची नेमणूक शासन करणार, कर दात्याचे ८ प्रतिनिधी जेपींमधून शासनच नेमणार. ४० सदस्य, जेपींनी निवडायचे त्यांतील ८ करदाते असावेत आणि टाउन काउन्सिलच्या अध्यक्षांसह ६ सदस्यांची नेमणूकही शासनच करणार असा एकतर्फी प्रकार होता.

पहिल्या वाचनानंतर करदात्यांना प्रतिनिधित्व नाही आणि सदस्यांची फार मोठी (८०) संख्या यावर विरूद्ध प्रत प्रदर्शित होत होते. दुसऱ्या वाचनापर्यंत त्यांत महत्त्वाचा बदल करण्यात आला. सदस्यांची संख्या ६४ वर आणली. यापैकी निम्मे सदस्य करदात्यांनी निवडायचे, जे.पी.नी. १६ निवडायचे आणि १६ सरकारने नियुक्त करायचे अशी सुधारणा झाली. आरोग्याधिकारी आणि एक्झिक्युटिव्ह इंजीनियरची नेमणूक सदस्यांनी करायची पण शासनाची संमती घ्यायची. सिलेक्ट कमिटीकडून बिल आले त्यात ३०४ कलमे होती ! बरेच अधिकार शासनाकडे राखून ठेवलेले होते. आणि कमिशनरची नेमणूक शासनाकडे,एक्झिक्युटिव्ह अधिकार कमिशनरकडेच ठेवले. बिलांत टाउनड्युटीचा समावेश होता आणि सरकारी इमारती करमुक्त ठेवण्यात आल्या होत्या.

## नव्या कायद्यावरील जे.पी. मंडळाची चर्चा

पोलीसांवरील खर्च नगरपालिका करी, परंतु पोलीस खाते शासनाने आपल्या ताब्यात घेतले होते. शासन फक्त एक लाख रुपये मदत देत असे. ही गोष्ट करदात्यांना मान्य होण्यासारखी नव्हती. सर मंगळदासांनी बिलाच्या कलम ४० आणि ४१ वर जोरदार टीका केली. त्यात अशी सोय होती की शासनाकडे कॉर्पोरेशनच्या निर्णयाबाबत तक्रार आली तर चौकशी करून शासन कॉर्पोरेशनला दोषी ठरवू शकेल. सर मंगळदासांनी असे जाहीर केले, की हे कलम जर कायद्यात राहिले तर कोणी स्वाभिमानी

माणूस कॉर्पोरेशनवर काम करणार नाही. हे कलम नंतर रद्द झाले. कमिशनर आणि कॉर्पोरेशन मध्ये मतभेद झाला आणि कॉर्पोरेशनने ४० सदस्यांच्या मताने ठराव पास केला तर शासन कमिशनरला परत बोलवू शकेल, अशी दुरुस्ती मान्य झाली. घरपट्टी कमीतकमी चार आणि जास्तीत जास्त सात टक्के ठरली. तोही घर मालकांनी द्यायची पोलिस आणि दिवाबत्ती कर मात्र भाडेकरूंवर आकारावा असे ठरले त्याची आकारणी तीन आणि दोन टक्के मान्य झाली.

## घरपट्टी आणि इतर कर अशी टीका

टाउनड्युटी वसूल करण्याची सोय म्युनिसिपल कायद्यात होती. त्याला जबर विरोध होता. मुंबई बंदरातून बऱ्याच मोठ्या प्रमाणात कापसाची नेआण होई. त्यामुळे हा कर व्यापाऱ्यांना जाचक वाटे. तो आणि धान्य कर रद्द व्हावा यासाठी त्यांच्या प्रतिनिधिनी इंच इंच लढा दला. वस्तुतः यात नागरिकांचा फायदा होता असे सकृतदर्शनी वाटले तरी म्युनिसिपालटीच्या खर्चाच्या तोड मिळवणीस त्याची आवश्यकता होती. त्याविना इतर कर वाढवावे लागले असते. शासनाच्या विरोधामुळे ह्या चळवळीचा परिणाम झाला नाही. पाणीपट्टीचा दर ठरवून देणे कठीण होते कारण वाढत्या लोकवस्तीस पाण्याची गरज होती आणि पाणी पुरवठ्याची मोठी कामे हाती घेणे आवश्यक होते. म्हणून पाणीपट्टी ठरवण्याचा अधिकार म्युनिसिपालिटीला देणे आवश्यक होते. या प्रमाणे नवा म्युनिसिपल कायदा १८७२ मध्ये अमलात आला. तेव्हा उत्पन्न ३० लाख पन्नास हजार तर खर्च ३१ लाख होता. त्यावेळी घरपट्टी बसवण्यात येणाऱ्या मालमत्तांची संख्या २२ हजार असून करपात्र किंमत एक कोटी वीस लक्ष होती. खर्चाच्या प्रमुख बाबी : आरोग्य ७.६१ लाख बांधकाम, घाणपाणी निचरा व्यवस्था धरून, ७.९० लाख, पोलिस ३.८८ लाख व्याज १.७६ लाख, तर प्राथमिक शिक्षण फक्त ९ हजार ! विहार तलाव सोडून इतर भांडवली कामावर खर्च झालेले ४५ लाख देणे होते. म्युनिसिपालटीचा आजचा खर्च पाहता हा खर्च विहिरीतील पाण्याचा एक थेंब वाटावा.

## स्थानिक स्वराज्याचा दुसरा हप्ता : १८८८ चा कायदा

देशातील स्थानिकस्वराज्यव्यवस्था सुधारणे आवश्यक आहे, असे केन्द्र शासनाचे मत बनत चालले होते. त्याबाबत १८ मे १८८२ चा ठराव करून प्रान्तांना सूचना देण्यात आल्या. १८७२ च्या कायद्याने मुंबई नागरिकांचे समाधान झाले नव्हते, इतकेच नव्हे तर त्याबाबत अनेक गाऱ्हाणी होती. ती पुढे मांडून कॉर्पोरेशनने मुंबई सरकारमागे लकडा लावला. व्हाइसरॉय लॉर्ड रिपन याचे मत केंद्र शासनाच्या ठरावात व्यक्त झाले होते. कॉर्पोरेशनने ठराव करून पाठवला त्याला केंद्र सरकारने उचित जबाबही दिला. परंतु केंद्रशासनाच्या ठरावाची अंमलबजावणी करण्यात मुंबई शासनाने खळखळ चालवली.

कॉर्पोरेशनने याबाबत शिफारशीचा खर्डा तयार करण्यासाठी समिती नेमली त्यात वि.ना. मंडलिक, का.वि.तेलंग, फिरोजशा मेहता, बद्रुद्दिन तेय्यबजी, सयानी, खोटे इत्यादी सदस्य होते. ऑगस्ट १८८३ मध्ये समितीचा अहवाल आला. समितीने ६४ ऐवजी ७२ सदस्य संख्या सुचवली. त्याची विगत अशी :

| | |
|---|---|
| करदात्यांनी निवडून दिलेले | ३६ |
| जे.पीं. नी. निवडून दिलेले | २४ |
| विश्वविद्यालयाचे फेलो | २ |
| चेंबर ऑफ कॉमर्सचे प्रतिनिधी | २ |
| शासनाने नियुक्त केलेले | ८ |
| | ७२ |

करदात्यांचे प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार युनिव्हर्सिट्यांचे ग्रॅज्युएट, बॅरिस्टर, ॲडव्होकेट, हायकोर्टाचे वकील यांना असावा. सदस्यांची वॉर्डवार विभागणी असावी. चेअरमनची निवड टाउन काउन्सिलने करावी. कमिशनरची नेमणूक शासनाने करावी. रू.३००० वरची कंत्राटे स्वीकारण्यास टाउन काउन्सिलची संमती आवश्यक. अशी व्यवस्था होती. हा कॉर्पोरेशन कायदा कमिशनर चार्लस ऑलिव्हर यांनी तयार केला होता. सप्टेंबर १८८४ पर्यंत त्यावर चर्चा चालू होती.

कॉर्पोरेशनने तयार केलेली योजना शासनाकडे पाठवण्यात आली. शासनाने दुरुस्ती विधेयक तयार केले त्याच्या प्रती कॉर्पोरेशनकडे ऑक्टोबर १८८५ मध्ये आल्या. त्यात मुंबई शासनाने कॉर्पोरेशनचा अधिकार सीमित केला आहे असे आढळून आले. १० ऑक्टाबर १८८४ मध्ये केलेल्या सूचनानाच कॉर्पोरेशन थोड्याफार फरकाने चिकटून राहिले.

तयार झालेले म्युनिसिपल बिल अखेरीस एप्रिल १८८७ मध्ये गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाले. कॉर्पोरेशनने सर्वच सदस्यांची समिती बिलाचा विचार करण्यासाठी नेमली. समितीचा अहवाल २५ ऑक्टोबर १८८७ रोजी शासनास पाठवण्यात आला. लेजिस्लेटिव्ह काउन्सिल पुण्यास १६ जुलै १८८७ रोजी भरून त्यात बिलाचे पहिले वाचन लॉर्ड रे गव्हर्नर यांच्या हस्ते झाले होते. त्यावेळी का.त्रि. तेलंग आणि फेरोजशा मेहता हे काउन्सिलचे सदस्य होते. बिलाची एकंदर ५२८ कलमे होती. या बिलात कमिशनरला कॉर्पोरेशनचा सदस्य बनवला होता. कोणत्याही प्रस्तावावर किंवा सदस्याच्या भाषणावर त्याला लगेच उत्तर देण्याचा अधिकार होता. इमर्जन्सी म्हणून कॉर्पोरेशनला आधी विश्वासात न घेता खर्च करायची मुभा होती. कोणत्याही विषयास चर्चेत प्राधान्य देण्याबाबत कमिशनची मागणी अध्यक्षांवर बंधनकारक होती.

पहिल्या वाचनाच्या वेळीच तेलंगानी त्यावर जोरदार टीका केली. जॉइंट स्कूल बोर्डाच्या तरतुदीबाबत आणि निर्बंधाबाबत तेलंग म्हणाले :

I do not think the government grant-in-aid rules to be the *ne plus ultra* of educational wisdom........why we should-never-the less entirely bound by the rules made by Government.

कमिशनर-कॉर्पोरेशन संबंधाबद्दल त्यांचे उद्‌गार वेदवाक्य समजायला हवेत.

*a strong executive* responsible to the Corporation and an *enlightened Corporation* watchful over its executive.

तेलंगानंतर चंदावरकर बोलले. नवीन कायदा १८७२ च्या कायद्यावर सुधारणा आहे असे सरकारी प्रवक्त्यांचे म्हणणे होते. त्याबाबत त्यानी विचारले.

where lay the germs of the progress referred to ? .....what was euphemiously characterised as progress was simply retrogression.

सिलेक्ट कमिटीकडून आल्यावर बिलाचे दुसरे वाचन ७ मार्च १८८८ रोजी सुरू झाले. टीका झालेल्या गोष्टी बिलांतून काढून टाकल्या नव्हत्या त्यामुळे पूर्वीचीच भाषणे पुन्हा झाली. त्यात फेरोजशाहा मेहतांनी प्रमुख भाग घेतला. सिलेक्ट कमिटीत मेहता अल्पमतात होते. तेलंग महाबळेश्वरास झालेल्या बैठकींना उपस्थित राहू शकले नव्हते. मेहता १८८५-८६ मध्ये कॉर्पोरेशनचे चेअरमन होते. म्युनिसिपालटीच्या कामाचा त्यांचा अनुभव दांडगा होता. म्हणूनच ते अधिकारवाणीने म्हणू शकले की :

real local self-government did not consist in the *direct* exercise of executive powers by the Corporation, by themselves or by committees.

कंट्रोलर ऑफ अकाउंटस्ची जागा चर्चेला आली असता त्याची नेमणूक कॉर्पोरेशनच्या अखत्यारीत असावी असा तेलंग आणि मेहता यांनी युक्तिवाद केला. परंतु शासनाचे प्रतिनिधी ती कमिशनरच्या अखत्यारात रहावी असे घट्ट धरून बसले. त्यांचे बहुमत होते. त्या पदाचे नाव चीफ अकाउंटंट असे ठेवण्यात आले.

नव्या म्युनिसिपल कायद्याच्या चर्चेत नागरिकांच्या बाजूने तेलंग, मेहता आणि मि. अॅडम हे भाग घेत होते तरी काही मुद्यांवर त्यांचा मतभेद होत होता, तिथे ते आपली परस्पर विरूद्ध मते स्पष्टपणे मांडत होते असे दिसून येते. कारण प्रत्येकाचे अनुभवक्षेत्र वेगळे होते आणि आपल्या मतांशी ते प्रामाणिक होते. त्याचप्रमाणे त्या त्या वेळचे अॅडव्हॉकेट जनरल, प्रसंगी शासनाच्या विरूद्ध मते व्यक्त करत होते. कित्येकदा सरकारपक्षाला अडचणीत टाकत होते. या सर्वांनी मुंबईच्या नागरिकांसाठी स्थानिक स्वराज्या करिता लढाई दिली आहे.

संपादकीय निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे टीपांऐवजी एकच दीर्घ प्रस्तावना लिहायचे ठरवले. त्यामुळे तिच्यात थोडा तुटकपणा अपरिहार्य झाला. ज्या प्रमुख मुद्यांचा परामर्ष खुद्द पुस्तकात सविस्तरपणे आलेला

नाही त्यांची माहिती प्रस्तावनेत दिली आहे. नगरव्यवस्थेची माहिती आवश्यक म्हणून दिली. वीज आणि वाहतूकव्यवस्था याची माहिती अद्ययावत देण्याचा प्रयत्न केला आहे. मुंबईत १८६५ च्या सुमारास शेअर मार्केट गडगडून जो आर्थिक पेच निर्माण झाला त्याचेही विवेचन करायचे होते परंतु विस्तारभयास्तव तो विचार रद्द करावा लागला. तसेच आरोग्य-व्यवस्थेवर थोडे लिहायला पाहिजे होते. तेही ह्याच कारणासाठी राहिले. अद्ययावत् मुंबई शहराचे वर्णन हा तर एक स्वतंत्र ग्रंथाचा विषय अहे. तोही कधीतरी पुरा करायचा आहे.

बापूराव नाईक

A DESCRIPTIVE

# ACCOUNT OF BOMBAY

## BEING AN OUTLINE

OF

## EVENTS BOTH PAST AND PRESENT

**WITH MAPS**

BY

BALKRISHNA BAPU ACHARYA

AND

MORO VINAYAK SHINGNE

PUBLISHED BY

JANARDAN MAHADEO GURJAR

BOOK-SELLER AND PUBLISHER, RAMWADI

---

BOMBAY

---

PRINTED AT THE NIRNAYA SAGAR PRESS

---

Shake 1810, A. D. 1889

---

*Price Rupees Two.*

# मुंबईचा वृत्तांत

प्राचीन आणि अर्वाचीन वर्णनात्मक

नकाशांसह

हें पुस्तक

## बाळकृष्ण बापू आचार्य

व

## मोरो विनायक शिंगणे

ह्यांनीं केलें

तें

**जनार्दन महादेव गुर्जर,**

बुकसेलर आणि पब्लिशर, रामवाडी, मुंबई

ह्यांनीं

**मुंबईत,**

**"निर्णयसागर" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.**

---

शके १८१०, सन १८८९.

---

हें पुस्तक इ. स. १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून प्रकाशकानें सर्व हक्क आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

---

किंमत दोन रुपये.

# रा. रा. नीलकंठ महादेव मोगरे,

## जस्टिस ऑफ् धि पीस,

## सुपरिंटेंडन्ट,

रेव्हिन्यु, फिन्यान्शिअल आणि जनरल डिपार्टमेंट्स

निसबत सरकार मुंबई,

**ह्यांस**

**त्यांचे सौजन्य, त्यांच्या अंतःकरणाची प्रेमळता, त्यांच्या स्वभावाची सरळता व त्यांची विद्यावृद्धीच्या कामीं आस्था**

**इत्यादि**

**सद्गुण पाहून**

**पूज्यभावपूर्वक**

हें पुस्तक

समर्पण केलें आहे.

पुस्तककर्ते.

आमच्या ह्या भरतभूमीवर फार प्राचीनकाळापासून अनेक विषयांवर मोठमोठ्या विद्वानांनीं अनेक ग्रंथ लिहिले आहेत, ही गोष्ट निर्विवाद होय. व ही आह्मां आर्यजनांस सर्वथैव अभिमान मानण्यासारखी आहे ह्यांतही कांहीं संशय नाही. पण त्यांत धर्मसंबंधीं बाबतींवरच बहुत ग्रंथ झाले. परंतु, ज्यांमध्यें कोणत्याही देशाचा किंवा प्रांताचा इतिहास नमूद केला आहे अशीं पुस्तकें असल्यास फारच थोडीं असतील. नाहीं म्हणण्यास भारतादि महा प्रचंड ग्रंथ आहेत खरे; परंतु, त्यांस इतिहास ही संज्ञा देतां येईल कीं नाहीं, ह्याविषयीं अजून बराच मतभेद आहे. फार प्राचीनकाळची गोष्ट घटकाभर बाजूला ठेविलीं तरी मधल्या काळांतही असले ग्रंथ झालेले उपलब्ध नाहींत; हें म्हणणें धाडसाचें होईल असें आह्मांस तरी निदान वाटत नाहीं. हा काळ टाकूनही अंमळ पुढें आलें तरी देखील ऐतिहासिक ग्रंथासंबंधी अशीच शोचनीय स्थिति पाहण्यांत येते. आमचे आधुनिक विद्वान आजमितीला जीं देशभाषांतून अनेक विषयांवर पुस्तकें काढीत आहेत, त्यांकडे पाहिलें तरी देखील त्यांनींही ऐतिहासिक ग्रंथलेखनाच्या कामीं बरेंच दुर्लक्ष केलें आहे असेंच दिसून येईल. अलीकडे मात्र कांहीं कांहीं विद्वानांनीं आपलें मन ह्या बाबतींत घातलेलें पाहण्यांत येतें. तेव्हां आतां अशी उमेद बाळगण्यास हरकत नाहीं कीं, अल्पकाळांतच ह्या अगदीं टाकून दिलेल्या-पण अति उपयोगाच्या व अति महत्त्वाच्या-विषयाकडे बहुतांचे लक्ष लागेल; कारण आज तशीं सुचिन्हें दिसत आहेत. असो.

हिंदुस्थानांत अनेक सुप्रसिद्ध अशीं शहरें आहेत, परंतु, त्यांत मुंबईसारखे अल्पकाळांत प्रसिद्धीस आलेलें व वैभवास चढलेलें दुसरें शहर कोठें नसेल असें म्हटले असतां कांहीं वावगें होईल असें आह्मांस वाटत नाहीं. तेव्हां अशा ह्या अजब, अफाट व दाट वस्तीच्या शहराचा वृत्तांत लिहिणें ह्मणजे अंमळ धाडसाचेंच काम करणें आहे, असें कोणीही कबूल करील. हेंच काम जर एकाद्या जाड्या विद्वानानें हातीं घेतलें असतें तर, तें झालें आहे त्यापेक्षांही शतपटीनें अधिक चांगलें झालें असतें ह्यांत संशय नाहीं.

आतां, कोणताही इतिहास लिहिणें आहे तर तो लिहिणारापाशीं अनेक साधनें असावीं लागतात. एक तर, ज्या देशाचा किंवा प्रांताचा इतिहास लिहावयाचा, त्याची पूर्ण माहिती ग्रंथकारास असली पाहिजे; तेथील अनेक वयोवृद्ध व अनुभवशीर अशा गृहस्थांचा त्याच्याशीं परिचय असला पाहिजे, व त्याने त्या कामीं साधनीभूत अशा अनेक ग्रंथांचें अवलोकन केलें पाहिजे. इत्यादि साधनांपैकीं आम्हापाशीं एकही पुरें साधन नसतां आम्हीं हें धाडसाचें-आणि त्यांत मुंबईसारख्या वैभवशाली शहराचा वृत्तांत लिहिण्याचें-काम हातीं कां घेतलें असा प्रश्न साहजिक उत्पन्न होईल. होय, प्रश्न अगदीं बरोबर आहे. आह्मींही पूर्ण जाणत आहों कीं, हें काम आमच्या शक्तीपलीकडे आहे हें खचीत. तरी पण, यथाशक्ति प्रयत्न करून जी अल्पस्वल्प माहिती मिळविली ती तशीच दाबून न ठेवितां लोकांपुढें आणावी, बरीवाईट कशी काय असेल ती त्यांचे ते पाहून घेतील; आणि आमचे दोष आह्मांस दाखवितील व तेणेंकरून दुसऱ्या कोणत्याही कामास हात घालण्यास आह्मांस उमेद देण्यास ते कारणीभूत होतील; एवढाच काय तो इतकें धाडस करण्याचा आमचा मुख्य उद्देश. येथें असाही प्रश्न उद्‌भवण्याचा संभव आहे कीं, असल्या ग्रंथाचा उपयोग कोणता? तर, त्याचें उत्तर इतकेंच की, जर पुराणादि ग्रंथ आपल्या पूर्वजांनी लिहून ठेविले नसते तर, मागल्या काळांत कोणकोणत्या गोष्टी घडून गेल्या ह्यांचे अनुमान करण्यास आज आपणांपाशी कांहींच साधन राहिलें नसतें. आपल्या देशावर पूर्वी ज्या परकीयांनी अनेक स्वाऱ्या केल्या व त्यास धुळीस मिळविलें, अनेक वीरपुरुष होऊन गेले, अनेक साधुसंतांनीं ह्या देशास आपल्या अस्तित्वानें पूत केलें, इत्यादि गोष्टी जर इतिहास नसते तर आपणांस समजल्या असत्या काय? हाच उद्देश मनांत आणून ह्या मुंबईसारख्या आपल्या देशाच्या एका लहानशा भागाची प्राचीन व अर्वाचीन माहिती, आह्मांस मिळाली तेवढी देऊन अंशतः तरी देशसेवा करावी असें बहुत दिवस आमच्या मनांत होतें, त्याप्रमाणें ह्या ग्रंथांत जें जें मुंबईंत पाहण्यालायक व ह्या पुस्तकांत नमूद करण्याजोगें आमच्या समजाप्रमाणें दिसलें, तें तें थोडक्यात वाचकांपुढे ठेवण्याचा यत्न केला आहे. बाकी, ह्या पुस्तकांत नमूद केल्या नाहींत अशा असंख्य गोष्टी मुंबईंत पाहण्यांत येतील त्या

सर्वांचा उल्लेख करणें अशक्य होय. तरी पण, ज्यांच्या ज्यांच्या हातीं हें पुस्तक जाईल त्यांस तें अंशतः तरी मार्गोपदेशक होईल असा यत्न केला आहे.

पण इतकें करूनही आमच्या गरीबीमुळें ग्रंथ छापून बाहेर पडतो कसा? ह्याची मोठी काळजी पडली. ह्या विवंचनेंत कांहीं दिवस गेल्यावर, आमचे मित्र रा. रा. नारायण विठ्ठल वैद्य पुरंदरे पुणताम्बेकर ह्यांच्या मार्फत रा. रा. जनार्दन महादेव गुर्जर ह्यांचा व आमचा परिचय होऊन, रा. गुर्जरांनीं हें काम हातीं घेऊन आम्हांस प्रोत्साहन दिलें, त्याबद्दल आह्मी त्यांचे फार फार आभारी आहोंत. तसेंच, रा. रा. नारायणरावजींनी आह्मांस कित्येक स्थळी उपयुक्त अशी माहिती दिली, त्याबद्दलही त्यांचे आह्मांवर बहुत उपकार झाले आहेत.

हा ग्रंथ लिहितेवेळी ज्या ज्या आमच्या मित्रांनी पुस्तकद्वारा आम्हांस मदत केली त्यांचेही आभार मानल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. त्यांची नांवे येणेंप्रमाणे :—

रा. रा. गणपतराव कृष्ण तिवरेकर, विनायक महादेव जावळे, रामचंद्र राघोबा धराधर, हरिश्चंद्र नारायणजी, नीळकंठ दामोदर पाठारे, पुरुषोत्तम कृष्ण आचार्य, केशव नीळकंठ मोगरे, परशुराम नारायण वैद्य, केशव वासुदेव सांवखेडकर, जनार्दन महादेव जावळे, काशीनाथ रघुनाथजी, नारायण चिमणाजी दिवाडकर, दत्तात्रय दामोदर पाणंधीकर व बाबूराव जनार्दन.

तसेंच हा ग्रंथ लिहितांना ज्या पुस्तकांची आह्मी मदत घेतली त्यांतील ठळक ठळक पुस्तकांची नांवे येणेप्रमाणे :—

म्याक्लिन्स गाईड टु बॉंबे, बुक ऑफ् बॉंबे, राऊंड अबौट बॉंबे, इंडिया इन १८८० (सर रिचर्ड टेंपलकृत), मुंबईचे वर्णन, सेन्सस रिपोर्ट १८८१, कॉक्स हिस्टरी ऑफ् धि बॉंबे प्रेसिडेन्सी, अकौंट ऑफ् बॉंबे, धि टाईम्स ऑफ् इंडिया क्यालंडर व डायरेक्टरी, मुंबईनो बहार (भाग १ ला), मूर्स ओरिएन्टल फ्र्याग्मेंट्स, धि मंथली मिसलेनी ऑफ् वेस्टर्न इंडिया, नेरन्स कोंकण, धि सिलेक्शन फ्रॉम स्टेट पेपर्स, धि बॉंबे गझेटिअर्स-ठाणें व

कुलाबा, उत्तर कोंकणांतील प्राचीन गंगातीरस्थ शुक्ल यजुर्वेदीय ब्राह्मण ह्यांची खरी माहिती, जर्नल ऑफ् आ रेसिडन्स इन् इंडिया, बिंबाख्यान, धि इंडियन रेलवे ट्राव्हेलर्स गाईड, इंग्लंदचा प्रवास, विचारसाधन, बांबे आडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट १८८६-८७, इंग्रजी व मराठी वर्तमान पत्रें व मासिक पुस्तकें वगैरे वगैरे.

येणेंप्रमाणें ग्रंथांच्या साह्याने हा अल्प प्रयत्न आह्मीं आमच्या इतिहासप्रिय व रसिक देशबांधवांपुढें सादर केला आहे. ह्यांत जे प्रमाद घडले असतील किंवा जी अशुद्धे राहिलीं असतील, त्यांजबद्दल आह्मांस ते क्षमा करून हंसक्षीरन्यायानें दोष असतील ते टाकून गुणांचे ग्रहण करतील अशी आशा आहे.

मुंबई,<br>फेब्रुवारी १८८९.

पुस्तककर्ते.

# अनुक्रमणिका

## भाग पहिला

### प्राचीन माहिती


अक्षांश, रेखांश वगैरे .. .. .. .. १
क्षेत्रफळ, लांबी, रुंदी वगैरे. १
मुंबईच्या नांवासंबंधी लोकांचे तर्क. २
कोकणची प्राचीन माहिती. ३
मुंबईची पूर्वीची स्थिति. ५
पूर्वीच्या मुंबईचे निरनिराळे भाग. ६
हवा पाण्याच्या संबंधानें मुंबईची निकृष्टावस्था. .. ८
वरळीचा बांध. ९
इ.स. १६६२ तील मुंबईची स्थिति. .. .. १२
मुंबईसंबंधी कूकसाहेबाचें ह्मणणे. १२
इ.स. १७६० तील माजगांव येथील वस्ती. १३
कंबालाहिलविषयीं डाक्तर फ्रायरसाहेबाचें ह्मणणें. १४
मुंबईहून ठाणें उठविण्याविषयीं इंग्रजांचे विचार व त्यावेळचें तिचे उत्पन्न. .. १५
मुंबईतील वस्ती वाढविण्याचा प्रयत्न. .. १६
मुंबईविषयीं नेबूरसाहेबांचें ह्मणणें. १६
इ.स. १७०० मधली मुंबईतील स्थलवाहनें. १६
मुंबईसंबंधानें डाक्तर फ्रायर, आयव्ही, नेबूर, फार्ब्स वगैरे साहेबांचे लेख. .. .. .. .. १७
वसई व साष्टी वगैरे बेटें इंग्रजांस मिळालीं. .. १८
इ.स. १७७५ तील मुंबई. .. .. १८
मुंबईसंबंधी पार्सन्ससाहेबाचें ह्मणणें. .. .. १९
मुंबईसंबंधी प्रर्वाकलीन साहेबांचें ह्मणणें. .. १९
शिंवचा पूल .. .. .. १९

| | |
|---|---|
| मुंबईविषयी म्याकिंटाशसाहेबाचें ह्मणणें. .. | १९ |
| पोर्टुगिजांनी बांधलेला किल्ला... ... .. | १९ |
| जमिनीची किंमत. .. .. ... .. | २० |
| मुंबईतील मूळ जाती. .. .. .. | २१ |
| निरनिराळ्या लोकांचें मुंबईस येणें. .. .. | २२ |
| इ.स. १५२९ तील मुंबई. .. .. | २३ |
| वसईचे भाग. .. .. .. .. | २४ |
| इ.स. १५१४ तील व्यापाराची स्थिति. .. .. | २५ |
| सर मायकेल वेस्ट्राप साहेबाचें मुंबईसंबंधी ह्मणणें. | २५ |
| ठाण्याच्या राज्याचे भाग. .. .. | २५ |
| मुंबई भाड्यानें दिली. .. .. .. | २५ |
| मुंबईचा किल्ला. .. .. .. .. | २६ |
| इ.स. १७४१-४२ सालांतील मुंबईची व्यवस्था. .. | २८ |
| मुंबईतील निरनिराळ्या ठिकाणची व निरनिराळ्या वेळची वस्ती. | ३० |
| वस्तीचें मान. .. .. .. .. | ३१ |
| सरकारानें वेळोवेळी लोकांपासून घेतलेली जमीन. | ३१ |
| गुलामांचा व्यापार. .. .. .. .. | ३२ |
| कांपाच्या मैदानांतील वस्ती मोडली. .. | ३२ |
| कर वगैरे. .. .. .. .. | ३३ |
| मुंबईचे निरनिराळे भाग व तेथील उत्पन्न. .. | ३४ |
| उत्पन्नाच्या बाबी. .. .. .. .. | ३५ |
| कंपनी सरकारचे कायदे. .. .. .. | ३६ |
| मुंबईच्या व्यापाराची शोचनीय स्थिति. .. .. | ३६ |
| मुंबईचें संरक्षण, वाख्याचा उद्‌भव व व्यापार. .. | ३७ |
| वाखा. .. .. ... .. | ३८ |
| तुफान. .. .. .. .. | ३८ |
| अग्निप्रलय. .. .. .. .. | ३८ |
| दुष्काळ. .. .. .. .. | ३८ |
| वादळ. .. .. .. .. | ३८ |
| मुंबईची हल्लींची रचना. .. ... .. | ३९ |

# भाग दुसरा

## इतिहास


| | |
|---|---|
| मुंबईवर निरनिराळ्या राजांचे अंमल. .. .. | ४३ |
| भोंगळी राजे. .. .. .. .. | ४६ |
| मुंबईस मुसलमानांचें ठाणें. .. .. .. | ४६ |
| बाहामनी राजे. .. .. .. .. | ४७ |
| पोर्टुगिजांनी चेवलास वखार. .. .. .. | ४७ |
| पोर्टुगिजांचा मोड. .. .. .. .. | ४७ |
| ननोडाकुन्हाची मुंबईवर चाल.. .. .. | ४८ |
| मुंबईवर वसईची सत्ता. .. .. .. | ४९ |
| पोर्टुगिजांची इंग्रजांस मुंबई आंदण दिल्याचा सनदपट्टा | ५० |
| मुंबईबरोबर इंग्रजांस मिळालेले इतर हक्क. .. | ५२ |
| मुंबई स्वाधीन करून घेण्यास अर्ल ऑफ् माल्बरोंचे येणें. | ५३ |
| मुंबई इंग्रजांच्या स्वाधीन झाली. .. .. | ५४ |
| डच लोकांचें प्राबल्य. .. .. .. | ५५ |
| पोर्टुगिजांनी बसविलेली जकात. .. .. | ५५ |
| मुंबई बेट इस्ट इंडिया कंपनीचे स्वाधीन केलें. .. | ५६ |
| कंपनीसरकारचें ठाणें सुरतेहून मुंबईस आलें. .. | ५७ |
| मराठ्यांचा मुंबईवर डोळा. .. .. .. | ५८ |
| शिंद्यांचा मुंबईवर डोळा. .. .. .. | ५८ |
| इ. स. १६७३-७४ तील इंग्रजसरकारची भयप्रद स्थिति. | ५९ |
| मान्युअल डि साल्डाना ह्याची मुंबईवर चाल. .. | ५९ |
| हंफ्रिकुकबरोबर पोर्टुगिजांचा तहनामा. .. .. | ६० |
| डच लोकांचे मुंबईवर येणें. .. .. .. | ६१ |
| मराठ्यांचा मोड. .. .. .. .. | ६१ |
| इंग्रजांनी आपलें ठाणें मुंबईस केलें .. .. | ६३ |
| शिंद्यांची मुंबईवर चाल. .. .. | ६४ |
| मोंगलाबरोबर झालेला तहनामा. .. .. | ६५ |
| इंग्रजांस मोंगलापासून व्यापार करण्याची मोकळीक. | ६६ |
| शिद्यांची मुंबईवर पुनः चाल. .. .. .. | ६७ |

कान्होजी आंग्रे. .. .. .. .. ६८
शहर वाढविण्याचे विचार. .. .. .. ६९
मुसलमान लोकांचा दंगा. .. .. .. ७०
इ. स. १८५७ सालचें बंड. .. .. .. ७०
मुसलमान लोकांचा दुसरा दंगा. .. .. ७१


---

## भाग तिसरा
### लोकसंख्या


वस्तीचें मान. .. .. .. .. ७२
निरनिराळ्या ठिकाणची वस्ती. .. .. ७३
इ. स. १७३९ तील इंग्रजांची वस्ती. .. .. ७४
इ. स. १८००-१० तील पेढ्या. .. .. ७४
मुंबईतील वेळोवेळची लोकसंख्या. .. .. ७४
मुंबईतील घरांची मोजदाद. .. .. ७५
कलकत्ता व मुंबई येथील लोकसंख्येची तुलना. .. ७६
धंदेवाल्यांचीं दुकाने. .. .. .. ७६
बहिरे, मुके वगैरे अपांगलोकांची संख्या. .. ७७
निरनिराळ्या धर्मांचे लोक. .. .. ७७
हिंदूतील जातिदर्शक कोष्टक. .. .. ७८
मुसलमानांतील जातिदर्शक कोष्टक. .. .. ८१
पारशांतील जातिदर्शक कोष्टक. .. .. ८१
खिस्तीलोकांतील जातिदर्शक कोष्टक. .. .. ८१


---

## भाग चौथा
### व्यापार


फार प्राचीन काळापासून बाह्य देशाबरोबर मुंबईचा व्यापार. ८२
मुंबई इंग्रजांच्या स्वाधीन झाल्यापासून व्यापाराची भरभराट. ८४
कंपनीसरकारच्या हातून व्यापार गेला. .. ८५
व्यापार करण्याची सर्वांस मोकळीक. .. .. ८५
व्यापारसंबंधीं रायलेसाहेबाचें ह्मणणें. .. .. ८५

इ. स. १८६१-६६ पर्यंतचा व्यापार. .. .. ८६
इ. स. १८८१-८२ चे अमदानी व रवानगीचे आंकडे. ८६
शेरबाजार व ब्यांकांची स्थापना. .. .. ८७
दरमाणशीं कपड्याचा खप. .. .. ८९
व्यापारसंबंधीं क्यासलरीग साहेबाचें ह्मणणें. .. ९०
अफू. .. .. .. .. ९१
गहू. .. .. .. .. ९१
मोत्ये. .. .. .. .. ९२
मुंबईस एकंदर माल येतो तो. .. .. ९२
मुंबईहून एकंदर माल जातो तो. .. .. ९२

---

## भाग पाचवा
## सरकार आणि उत्पन्न

हिंदुस्थानचे विभाग. .. .. .. ९४
मुंबईसरकारच्या हाताखालचा प्रांत. .. .. ९४
मुंबईइलाख्याची मर्यादा. .. .. .. ९४
मुंबईइलाख्यांतील जमीन. .. .. .. ९४
एतद्देशीय संस्थानें. .. .. .. .. ९५
स्वतंत्र संस्थानें. .. .. .. .. ९५
गव्हर्नर. .. .. .. .. ९५
सनदी नोकर. .. .. .. .. ९६
सनदी नोकरांचे वर्ग. .. .. .. ९८
सनदी नोकरांचा व्यापारात हात. .. .. ९९
दात्कर वगैरे. .. .. .. .. १००
पूर्वीच्या गव्हर्नर व डेप्युटी गव्हर्नरांचा पगार. .. १००
मुंबईसरकार. .. .. .. .. १०१
मुंबईचे गव्हर्नर. .. .. .. १०२
कौन्सिलचें काम. .. .. .. .. १०९
कायदे करणारी मंडळी. .. .. .. १०९
सरकारचीं निरनिराळीं खातीं. .. .. ११०

सैन्य. . . . . . . . . ११३
आरमार. . . . . . . . . ११४
उत्पन्न. . . . . . . . . ११४
उत्पन्नाच्या बाबी. . . . . . . . . ११६
कोर्ट. . . . . . . . . ११७
मुंबईतील प्राचीन शिक्षापद्धति. . . . . १२१
काळेंपाणी. . . . . . . . . १२२
शेरिफ. . . . . . . . . १२२
स्मालकाज कोर्ट. . . . . . . . . १२२
म्याजिस्ट्रेटचें कोर्ट. . . . . . . १२३
जस्टिस ऑफ् धि पीस. . . . . . . १२४
पोलीस. . . . . . . . . १२४
तुरुंग. . . . . . . . . १२७
कारोनर. . . . . . . . . १२९
म्युनिसिपालिटी. . . . . . . १३०
कारर्पोरेशन. . . . . . . . . १३०
टौन कौन्सिल. . . . . . . . . १३१
म्युनिसिपालिटीचें काम. . . . . . . १३१
म्युनिसिपालिटीचें उत्पन्न आणि खर्च. . . . . १३२
पोर्ट ट्रस्ट. . . . . . . . . १३४
चेम्बर ऑफ कॉमर्स. . . . . . . १३४
धि सोसायटी फॉर धि प्रिव्हेंशन ऑफ् क्र्युएल्टी टु आनिमल्स. १३५
धि बाँबे प्रेसिडेन्सी असोशिएशन. . . . . १३५

---

## भाग सहावा
## शहराचें वर्णन

शहराचा साधारण देखावा. . . . . . . १३६
मुंबईतील जमीन आणि तेथील उत्पन्न. . . . . १४३
मुंबईतील रस्ते. . . . . . . . . १४४
शहरांतील दिवे. . . . . . . . . १४५

शौचकूप. . . . . . . . . १४६
भाडोत्री व घरगुती गाड्या. . . . . . . १४६
पालख्या. . . . . . . . . १४९
धंदेवाले लोके . . . . . . . . १५०
आगबोट. . . . . . . . . १५४
सकाळ संध्याकाळची रस्त्यावरील शोभा. . . १५७
ठकबाजी. . . . . . . . . १५८
रिंग ड्रापर्स. . . . . . . . . १५९
पावसाचा सट्टा. . . . . . . . . १६०
धुतारू, ठकबाज, जुगारी वगैरे. . . . . १६१
मुंबई पाहण्याकरतां देशोदेशच्या लोकांचे येणें. . . १६४
ज्युबिली. . . . . . . . . १६५
फयान्सी बाजार. . . . . . . . . १६८
घरेंदारें. . . . . . . . . १६९
पोषाख, दागिने वगैरे. . . . . . . १७१
लोकांची रीतभात, धर्म, लोकाचार वगैरे. . . १७६
लोकमत. . . . . . . . . १७९
लग्नकार्ये. . . . . . . . . १८१
स्त्रीस्वातंत्र्य. . . . . . . . . १८३
भोजनप्रकार. . . . . . . . . १८४
धर्माची अनास्था. . . . . . . . . १८५
विद्याव्यासंग. . . . . . . . . १८७
देशसुधारणेच्छा. . . . . . . . . १८८
व्यापाराची हालचाल. . . . . . . १८९
महर्गता. . . . . . . . . १९३
सरकारचे कर. . . . . . . . . १९४
घरदारवाले. . . . . . . . . १९५
मुंबई शहरांतील निरनिराळी जमीन. . . . १९५
शर्यती, पैजा वगैरे. . . . . . . . १९७
हवापाणी. . . . . . . . . १९८

| | |
|---|---|
| पाणी, तळीं, विहिरी वगैरे. . . . . . . . | १९९ |
| भाषा. . . . . . . . . | २०४ |
| विद्याखातें. . . . . . . . . | २०६ |
| व्हिक्टौरिआ आणि आल्बर्ट म्यूझिअम व बाग (राणीचा बाग). | २०८ |
| स्विमिंग बाथ. . . . . . . . . | २१२ |
| बमनजी हॉरमसजी कारंजें. . . . . . . . | २१३ |
| फ्रियर फौंटन. . . . . . . . . | २१४ |
| गिरण्या, कारखाने वगैरे. . . . . . . . | २१५ |
| ग्यासचा कारखाना. . . . . . . . . | २१९ |
| आगगाडी. . . . . . . . . | २२० |
| ग्रेट इंडिअन पेनिन्शुला रेलवे. . . . . | २२२ |
| बॉंबे बरोडा आणि सेंट्रल इंडिआ रेलवे. . . . . | २२२ |
| विमान. . . . . . . . . | २२३ |
| टपाल. . . . . . . . . | २२४ |
| पत्रे. . . . . . . . . | २२६ |
| पोस्टकार्ड. . . . . . . . . | २२६ |
| वर्तमानपत्रें व पुस्तकें. . . . . . . | २२७ |
| बंगी पार्सलें. . . . . . . . . | २२७ |
| नोंदलेलीं (रजिस्टर्ड) पत्रें. . . . . . . | २२७ |
| विमा उतरविलेलीं पत्रें. . . . . . . | २२७ |
| मनीआर्डर. . . . . . . . . | २२७ |
| व्ह्याल्यूपेएबल पाकीट. . . . . . . | २२७ |
| टेलीग्राफ. . . . . . . . . | २२८ |
| समुद्रांतील तारायंत्र. . . . . . . | २२९ |
| टेलीफोन. . . . . . . . . | २२९ |
| केनेडी लैट हौस. . . . . . . . | २३० |
| कुलाबची दांडी. . . . . . . . | २३१ |
| प्रांग्स लैट हौस. . . . . . . . | २३१ |
| पांजरापोळ. . . . . . . . . | २३२ |
| नवें पांजरापोळ. . . . . . . . | २३४ |

मुंबईंतील मार्किटें. .. .. .. .. २३५
क्राफर्ड मार्किट. .. .. .. .. २३८
नळबाजार. .. .. .. .. २४१
भुलेश्वर बाजार. .. .. .. .. २४२
आदमजी पीरभाई मार्किट. .. .. .. २४२
पेडर मार्किट. .. .. .. २४२
कॉटन ग्रीन. .. .. .. २४३
क्लब्स. .. .. .. .. २४४
हॉटेलें, खाणावळी, भटारखाने भोजनगृहें वगैरे. .. २४५
सणवार वगैरे. .. .. २५०
जत्रा. .. .. .. .. २५७
देवी काढणें. .. .. .. .. २५९
नाणें. .. .. .. .. २६१
राणीचा पुतळा. .. .. .. २६४
युवराज प्रिन्स ऑफ् वेल्स यांचा पुतळा. .. २६५
सर रिचर्ड टेंपलचा पुतळा. .. .. २६६
ट्रामवे कंपनीचे तबेले. .. .. २६६
दि बाँबे ब्रांच ऑफ् दि रॉयल एशिआटिक सोसाएटीची
लायब्ररी. .. .. .. २६८
नेटीव जनरल लायब्ररी. .. .. २६९
गव्हर्मेंट सेंट्रल बुक डिपो. .. .. २६९
वर्तमानपत्रें. .. .. .. २६९
वेधशाळा. .. .. .. .. २७१
ल्युनायटिक असाएलम. .. .. .. २७५
घारापुरी. .. .. .. २७५
बंदरें. .. .. .. .. २७९
आयस्टर रॉक आणि बंदराचें संरक्षण. .. .. २८३
डॉकयार्ड व डॉक्स. .. .. .. २८५
प्रिन्सेस डॉक. .. .. .. .. २८७
व्हिक्टोरिआ डॉक. .. .. .. २८८

ससून डॉक. .. .. .. .. २८८
हॉग आयलंड येथील हैडलिक लिफ्ट डॉक. .. २८९
मोदीबंदर रिक्लेमेशन. .. .. .. २८९
एल्फिन्स्टन इस्टेट्स. .. .. .. २९०
सोनापूर. .. .. .. .. २९०
टॉवर ऑफ् सायलेन्स. .. .. .. २९४
पाहण्यालायक स्थळें व इमारती. .. .. २९५

---

## भाग सातवा

## प्रसिद्ध इमारती वगैरे

टौन हॉल. .. .. .. .. २९७
डकसाळ. .. .. .. .. ३००
कस्टम हौस. .. .. .. .. ३०४
ससून बिल्डिंग्स आणि एलफिन्स्टन सर्कल. .. ३०५
नवें सेक्रेटरी ऑफिस. .. .. .. ३०६
जुनें सेक्रेटरी ऑफिस. .. .. .. ३०८
युनिव्हर्सिटी सिनट हॉल. .. .. .. ३०८
युनिव्हर्सिटी लायब्ररी व राजाबाई टॉवर. .. ३०९
हायकोर्ट. .. .. .. .. ३११
पब्लिक वर्क्स ऑफिस. .. .. .. ३१३
जनरल पोस्ट ऑफिस. .. .. .. ३१४
टेलीग्राफ, ऑफिस. .. .. .. .. ३१६
एस्प्लेनेड हॉटेल. .. .. .. .. ३१७
याच क्लब. .. .. .. .. ३१७
फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूट. .. .. ३१८
जिमखाना. .. .. .. .. ३१९
सेलर्स होम. .. .. .. .. ३२०
व्हिक्टोरिया टर्मिनस. .. .. .. ३२०
गेईटी थिएटर. .. .. .. .. ३२२
धि स्टीम फ्याक्टरी. .. .. .. .. ३२३

धि पेस्तनजी हॉर्मसजी कामा हॉस्पिटल. . . ३२४
गोकुळदास तेजपाळ हॉस्पिटल. .. .. ३२५
सर कावसजी जहांगीर अप्थालमिक हॉस्पिटल. ३२५
युरोपिअन जनरल हॉस्पिटल. .. .. ३२६
सर जमशेटजी जीजीभाई हॉस्पिटल. .. .. ३२६
गव्हर्मेंट हौस-मलबार पाईंट. .. .. ३२८
गव्हर्मेंट हौस-परळ. .. .. .. ३२९
एल्फिन्स्टन कॉलेज. .. .. .. ३३०
ग्रांट मेडिकल कॉलेज. .. .. .. ३३१
धि गव्हर्मेंट व्हेटेरिनरी कॉलेज व हॉस्पिटल. .. ३३२
सेंट झेव्हीअर कॉलेज व स्कूल. .. .. ३३२
एल्फिन्स्टन हायस्कूल. .. .. .. ३३३
जॉन कानन हायस्कूल. .. .. .. ३३५
राबर्ट मनी इन्स्टिट्यूशन. .. .. .. ३३६
सर जमशेटजी जीजीभाई स्कूल ऑफ आर्त. .. ३३६
धि क्याथीड्रल हायस्कूल. .. .. .. ३३७
फ्री जनरल असेंब्लीज इन्स्टिट्यूशन. .. .. ३३७
जनरल असेंब्लीज इन्स्टिट्यूशन. .. .. ३३८
एज्युकेशन सोसाएटीची शाळा. .. .. ३३८
सेंट मेरी इन्स्टिट्यूशन. .. .. .. ३३९
सर जमशेटजी जीजीभाई पारशी बेनिव्होलेंट इन्स्टिट्यूशन. ३३९
धि फ्रिअर फ्लेचर स्कूल. .. .. .. ३४०
आलेक्झांड्रा नेटीव गर्लस् इंग्लिश इन्स्टिट्यूशन. ३४०
गव्हर्मेंट लॉ स्कूल. .. .. .. .. ३४१
उद्योग शाळा. .. .. .. .. ३४१
डेव्हिड ससून मेक्यानिक इन्स्टिट्यूशन. .. ३४२
देवालयें. .. .. .. .. ३४३
वालुकेश्वर. .. .. .. .. ३४४
महालक्ष्मी. .. .. .. .. ३५०
बाबुलनाथ. .. .. .. .. ३५४

गांवदेवीचें देवालय. ... ३५४
माधवबाग. ... ३५५
कृष्णबाग. ... ३५६
ठाकुरद्वार. ... ३५७
भुलेश्वर. ... ३५८
हाटकेश्वर. ... ३५९
मुंबादेवी. ... ३६०
रामवाडीत श्रीरामचंद्राचें देऊळ. ... ३६२
सुंदरबाग. ... ३६२
काळबादेवी. ... ३६४
साधारण देवालयें. ... ३६४
घोडपदेव. ... ३६६
कान्होबा. ... ३६६
डेरे. ... ३६७
रावळें. ... ३६९
आर्यसमाज. ... ३६९
प्रार्थनासमाज. ... ३६९
क्याथिड्रल. ... ३७०
सेंट अंड्र्यूज कर्क. ... ३७२
सेंट जॉन चर्च. ... ३७२
होली ट्रिनिटी चर्च. ... ३७३
खाइस्ट चर्च. ... ३७३
सेंट पिटर्स चर्च. ... ३७३
मशिदी. ... ३७४
जुमा मशिद. ... ३७६
साततांड मशिद. ... ३७६
जकरिया मशिद. ... ३७६
हाजी इस्माइल हबीबची मशिद. ... ३७७
मोगल मशीद. ... ३७७
समाजजाती. ... ३७७

फायर टेम्पल्स . . . . . . . . ३७८
सिनेगॉग. . . . . . . . . ३८०

## परिशिष्ट

युनिव्हर्सिटी एन्डौमेंटस्. . . . . . . . ३८९-३८८
विमान (बलून). . . . . . . . . ३८९
कालेजिस. . . . . . . . . ३९०
हायस्कूल. . . . . . . . . ३९०
स्कूल्स. . . . . . . . . ३९०
कन्या शाळा. . . . . . . . . ३९१-३९२
मुख्य व प्रसिद्ध रस्त्यांची नांवें. . . . . ३९१-३९२
भाड्याच्या गाड्या उभ्या राहण्याचीं ठिकाणें. . . ३९३
परराज्यांतील प्रतिनिधि (कौंसिल्र्स). . . . . ३९३
पूल. . . . . . . . . ३९४
प्रसिद्ध नेटिव कंपन्या. . . . . . . ३९४
प्रसिद्ध युरोपिअन कंपन्या. . . . . . ३९५
ब्यांका. . . . . . . . . ३९६
असोशिएशन. . . . . . . . . ३९६
मर्कंटाइल असोशिएशन्स. . . . . . . ३९६
मंडळ्या व सभा. . . . . . . . ३९७
बेनिव्होलेंट इंस्टिटयूशन्स. . . . . . . ३९७
स्पिनिंग आणि विव्हिंग कंपन्या. . . . . ३९८
फ्लोअर आणि ऑइलमिल्स कंपन्या. . . . . ४००
किरकोळ कंपन्या वगैरे. . . . . . . ४००
पोस्ट ऑफिसें. . . . . . . . ४०१
टेलिग्राफ ऑफिसें. . . . . . . . ४०१
केमिस्ट आणि ड्रगिस्ट. . . . . . . ४०१
डेंटिस्ट (दंतवैद्य). . . . . . . ४०२
हौस एजंट्स. . . . . . . . ४०२
फोटोग्राफर्स. . . . . . . . ४०२

बुक सेलर्स. .. .. .. .. ४०२
पुस्तकालयें. .. .. .. .. ४०३
वर्तमानपत्रें आणि मासिकपुस्तकें. .. .. ४०४-४०६
हॉटेल्स (खाणावळी). .. .. .. ४०७
क्लब्स. .. .. .. .. ४०७
हॉस्पिटल्स. .. .. .. .. ४०८
डिस्पेन्सऱ्या. .. .. .. .. ४०८
वेळादर्शक कोष्टक. .. .. .. .. ४०८
मुंबईतील जत्रा. .. .. .. .. ४१०
छापखाने. .. .. .. .. ४१२-४१३
मुंबईतील रस्त्यांची बदलेली नावे . . . . . . . . . . ४१४-४२८
विशेष चित्रपत्रे आणि छायाचित्रे

# मुंबईचा वृत्तांत

## भाग पहिला

### मुंबईची प्राचीन माहिती

**मुंबई** हे शहर पूर्वी फार लहान बेट असून अगदी अप्रसिध्द असे एक स्थळ होते; परंतु तेंच सुदैवेंकरून आपल्या दयाळु इंग्रज सरकारच्या अमलाखालीं आल्या दिवसापासून त्याची उत्तरोत्तर भरभराटी होत चालली आहे, एवढेंच केवळ नाहीं; तर तें आज मोठें नामांकित शहर होऊन व्यापाराचे मुख्य स्थान, विद्येचें माहेरघर, आणि पश्चिम हिंदुस्थानची राजधानी बनून गेलें आहे. अशा या लहानच पण टुमदार, भरगच्च, चमत्कारिक, अजब आणि **हिंदुस्थानां**तील **इंग्रजां**च्या राज्यांतील मुख्य शहराची अलौकिक रचना, त्यांतील घरेंदारें, तेथील लोकांच्या रीतिभाति, व्यापारउदीम, तेथील रमणीय स्थळें, लोकस्थिति, इत्यादि विषयांचे संक्षिप्त वर्णन आम्हीं आमच्या इतिहासप्रिय आणि रसिक वाचकांपुढे यथामति सादर करीत आहों.

२. **अक्षांश रेखांश वगैरे.**—हें शहर १८°–५३' आणि ४५ उत्तर अक्षांश आणि ७२°–५२' पूर्वरखांश ह्यांच्यामध्ये आहे. ह्या शहराच्या चोहों बाजूंनी पाणी आहे म्हणून ह्यास बेट म्हणतात. शहरांत समुद्राचे पाणी येऊं नये याकरितां, त्याच्या सभोंवताली धरणे, धक्के वगैरे बांधून काढिल्यामुळे ह्या बेटास भूशिराचा आकार आला आहे. ह्याच्या उत्तरेस सुमारें तीन कोसांवर **साष्टी** हे बेट असून दक्षिणेस **कुलाब्याचा** भाग चिंचोळा होत गेला आहे.

३. **क्षेत्रफळ, लांबी, रुंदी वगैरे.**—**मुंबई**चे क्षेत्रफळ २२ चौरस मैल, १६५ एकर आणि ४,५६८ चौरस यार्ड इतकें असून लांबी सुमारे १२ मैल व रुंदी ३½ मैल इतकी आहे; शिवाय आजमितीला सरकारी व खासगी रस्त्यांची एकंदर लांबी २४२ मैलांहून अधिक होईल असे अनुमान आहे. हें बेट साधारण समांतर रेषेनें जाणाऱ्या अशा दोन टेंकड्यांमध्ये आहे. ह्या टेकड्यांचे अति उंच शिखर म्हटलें म्हणजे, **ब्याकबे**च्या पश्चिमेकडील

**मलबारहिल** नामक टेकडी हे होय. समुद्राच्या सपाटीपासून ह्या शिखराची उंची सुमारें १८० फूट असून सदर्हु दोन टेंकड्यांमध्ये ३ मैलांचे अंतर आहे. ह्या टेंकड्यांच्या उच्च शिखरांवरून पाहिलें असतां असा भास होतो कीं, जणूं काय हे शहर सदर्हु टेंकड्यांनी अगदीं आच्छादून टाकिलें आहे. पश्चिमेस **मुंबई माहिमापासून तो कुलाब्यापर्यंत** जो आठ मैल लांबीचा किनारा आहे, तो अनेक सुंदर उपसागरांनी युक्त असल्यामुळें फारच रमणीय दिसतो. या किनाऱ्यावर फक्त मच्छीमार वगैरे लहानसहान जहाजें चालतात. मोठा उपसागर ह्मटला ह्मणजे **ब्याकबे** हा होय. ह्याची रुंदी ३ मैल आहे. हा उपसागर कुलाब्याच्या टोंकापासून निघून धनुष्याकृति **मलबारहिल** येथें येऊन मिळाला आहे. ह्या बेटाचें केवळ कोंदणच किंवा, रत्नाकारानें आपला एक हात बाहेर काढला आहे, असा भास उत्पन्न करणारें **मुंबई**च्या पूर्वेकडचें अति खोल आणि विशाळ बंदर मुख्य भूमीपासून **मुंबई** आणि **साष्टी** ह्यांस दुभागून **ठाण्या**च्या भागांतून येऊन **वसई** जवळ **पुन: हिंदी**महासागरास मिळतें.

४. **मुंबईच्या नांवासंबंधी लोकांचे तर्क.**—ह्या बेटास फार प्राचीनकाळीं कोणतें नांव होतें ह्याचा बरोबर शोध लागत नाहीं; तरी पण इ.स. १३१८ सालीं पहिला **मुबारक** बादशहा ह्याची सत्ता ह्या बेटावर होती असें ह्मणतात; त्या वेळीं त्यानें आपलें नांव ह्या बेटास दिले; ह्मणून **मुबारख**, ह्यावरून **मुबारखपूर** किंवा **मुंबापूर** असें नाव प्रचारांत आले असावें, असा आमचा समज आहे, पुढें इ.स. १५३१ त (Ailha da boa vida) **'ऐला दा बोआ व्हिदा'** असे **पोर्टुगिजां**नी ह्या बेटास नांव दिलेले वाचण्यांत येते. ह्या नावांचा अर्थ 'राहण्यास उत्तम स्थळ' असा होतो. **बंबाईम** हेंही पण **पोर्टुगिजांनींच मुंबईस** नांव दिले होतें. ह्या नांवाचा अर्थ बाम् म्हणजे चांगले आणि **बेहीआ** ह्मणजे बंदर असा होतो. **बोमेलो** अथवा **बांबेडक** (बोंबील नांवाची मासळी) ह्या शब्दाशीं आणि **मुंबई** ह्या शब्दाशीं कांही संबंध असावा असेंही कित्येक ह्मणतात. आम्हांस हे ह्मणणे अंमळ सुयुक्तिक दिसतें. कारण ह्या प्रकारचे मासे, **मुंबई** व तिच्या लगतच्या

१ हिला **वाळकेश्वर**चा डोंगर ह्मणतात.

बंदरांखेरीज दुसरे कोठेही उत्पंन्न होत नाहींत असे ह्मणतात. **टालमीनें** मुंबईस **'हेप्टेजिअन्'** आयलंडस् (सप्तद्वीप स्थळ) असें नांव दिलें होते, असाही लेख पाहण्यांत येतो. इसवी सनाच्या सोळाच्या शतकाच्या आरंभीं ह्या बेटास **ठाणें-मुंबई** हें नांव होतें, असें **यूल** साहेब ह्मणतो. **बार्बोसा** साहेबाचें असें ह्मणणे आहे कीं, ह्या नांवावरून पूर्वी सर्व **कोंकणपट्टींती**ल राज्यांचा बोध होत असे. **मुंबई** किंवा **मयांबू** ह्या नांवाशी **माहिम** ह्या नांवाचा कांही संबंध असावा असेंही कित्येक ह्मणतात. **ब्रिग** साहेब असें ह्मणतो कीं, पूर्वी ह्या बेटाच्या कांही भागास **माहिम** व कांही भागास **मुंबई** असें ह्मणत. हें नांव येथील **मुंबादेवी**पासून मिळाले असावें असाही ह्या साहेबाचा तर्क आहे. **अंडरसन** साहेब ह्मणतो–पूर्वी ह्या सर्व बेटास **माहिम** हेंच नांव होते. तसैच, कर्नल **साईक्स** साहेब असे ह्मणतो कीं, **मुंबई** हें एक **पार्वतीचें** नांव आहे. कारण तिने **मुम्** नांवाचा राक्षक ह्या बेटावर मारला होता म्हणून ह्या बेटास **मुंबई** हे नांव मिळालें.

५. याप्रमाणे ह्या शहराच्या नांवासंबंधाने अनेकांचे अनेक तर्क आहेत खरें; तरी पण, ह्या बेटांत **पोर्टुगीज** आले त्यापूर्वीचा विश्वसनीय इतिहास उपलब्ध नसल्या कारणानें **मुंबई** हें नांव कसे निघालें, हे कळणें जरी दुरापस्त आहे तरी, त्याचा अर्थ आह्मी वर दर्शविल्याप्रमाणे **बंबाईम** ह्या पोर्टुगीज शब्दाप्रमाणे 'उत्तम बंदर' असा घेऊन चाललें, तरी त्यांत ह्मणजे कांही वावगें होईल असें निदान आह्मांस वाटत नाही. पुढें इंग्रजांच्या स्वाधीन **मुंबई** झाल्या दिवसापासून त्यांनीं **बांबेयम**चे **बांबे** हे नांव प्रचारांत आणलें व तेंच हल्लीं चालत आहे. **बांबे** ह्याचें मराठींत मुंबई झालें व तेंच नांव सर्वत्र चालू आहे.

६. **कोंकणाची प्राचीन माहिती.**—**मुंबई** ही **उत्तरकोंकणांत** मोडते आणि **मुंबई** आणि उत्तर**कोंकण** ह्यामध्ये परस्परांशी निकट संबंध

---

१ Colonel Sykes has it of pure Maharathtra origin "Moombaee—a name of Parwuttee the wife of Mahadev; Moom from Mumba a demon slain by her on the island, and Baee the term employed for dignified or noble Maharatnees." The Monthly Liscelllany of Western India.

भावार्थ.—सदर्हु मजकुराचा भावार्थ वर येऊन गेलाच आहे.

आहे म्हणूंन कोंकणसंबंधीही थोडीशी माहिती देणें इष्ट वाटल्यावरून त्यासंबंधी कांही जुनी माहिती खाली दिली आहे :—

"[१] **श्रीपरशुरामानें कोंकण उत्पन्न करुन तेथे वसाहत केली हे पुराण प्रसिद्ध आहे ; ह्यावरून ह्यास परशुरामक्षेत्र असें ह्मणतात. आगाशी जवळील अरनाळें येथें श्रीरेणुकेची स्थापना परशुरामाच्या हातची आहे असें कित्येक ह्मणतात, व तेव्हांपासून ह्यास कीकटदेश असें नांव पडलें आहे. कोंकण हा शब्द संस्कृत भाषेंतील आहे. राज्यक्रांतीमुळें ह्याच्या सरहद्दी वेळोवेळीं बदलत गेल्या, तेणेंकरून कोंकण** हा शब्द कोणत्या प्रदेशात लागू होता, हें त्या वेळच्या इतिहासावरून कळून येतें. ज्यास हल्लीं कोंकण ह्मणतात त्याची लांबी सुमारें १६० कोस व रुंदी १५ पासून ३० कोस आहे. आरब लोक ह्या प्रदेशास " **केमकेम** " असें ह्मणत. टालमीनें '**लारिका**' असें नांव दिलें होतें. ह्या प्रदेशांत **सोपारा** अथवा **उपारा** हें एक मोठे बंदर होतें, असें **पेरिप्लंस** म्हणतो. लासन ह्यानें असें प्रतिपादन केलें आहे की, '**समूला**' हें नांव वसईचें असावें. **फेरिस्तानें** देखील कोंकणची कांही माहिती लिहिली आहे. इ. सनाच्या ६ व्या शतकांत **कासमस** नांवाचा एक ग्रीक व्यापारी कोंकणांत आला होता, त्याने कल्याण ही एक मोठी राजधानी त्या वेळीं होती असे दर्शविले आहे. इ. स. ४ थ्या शतकाच्या सुमारास **फाहियान** आणि ७ व्या शतकाच्या सुमारास हैओयुयन थस्यांग हे दोन्ही चिनी गृहस्थ कान्हेरी येथील बुद्धांचीं लेणीं पाहवयास आले होते. इ. स. ८५१ च्या सुमारास कोंकण (" **कोकम** ") हा एक, बल्हार (भडोच) येथील राज्याचा भाग होता असें आरब लोकांचे ह्मणणें आहे. पर्शिअन (इराणी) आणि इजिप्शिअन (मिसरी) लोक प्राचीन काळापासून व्यापारासाठी येथें येत असत, परंतु रोमन (रुमी) लोकांनीं कधीं ह्या प्रांताबरोबर व्यापार केला असेल, हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. इ. स. ९५६ नांत **बाणा** (ठाणें) ह्याचा उल्लेख **अलमाषुद्दीन** ह्यानें केला आहे. सन १२३० त ओडोरिकस नामक इटालिअन पाद्री ठाण्यात आला होता, त्यांने तेथील माहिती दिली आहे."

**७. आपण हल्ली जी ह्या शहराची स्थिती पाहत आहो त्याप्रमाणे तिची**

---

१. उ. कों. प्रा. गं. शु. य.ब्रा. ह्या. ख. मा.

**स्थिती** पूर्वी नव्हती एवढेंच नाहीं; तर, पूर्वीच्या व हल्लींच्या स्थितींत जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे. हल्ली ज्या ठिकाणी मोठमोठ्या हवेल्या आहेत, मोठमोठे बागबगीचे आहेत व नवीन नवीन अफाट कारखाने आहेत, त्या ठिकाणीं पूर्वी पाण्यावांचून कांहींच दृष्टीस पडत नसे ! त्या वेळचा एकादा मनुष्य आज जिवंत झाला तर तो आश्चर्यभरित होऊन जाऊन त्यास असें वाटले कीं, मीं आज कोठे इंद्रभुवनांत आहें कीं, राजाच्या रंगमहाली आहें ! अशी त्याची स्थिती होऊन जाईल. त्या वेळच्या जुन्या मनुष्याची गोष्ट आपण घटकाभर बाजूला ठेवूं ; आपण जरी शहरांत नेहमीं राहणारे आहोंत व एकाद्या रस्त्यावरून बरेच दिवसपर्यंत जाणें झालें नाही, आणि एकाएकींच त्या रस्त्यावर कांहीं नूतन झालेली सुधारणा दृष्टीस पडली, तर आपण सहज घटकाभर आश्चर्यानें चकीत होऊन जातों व ह्मणतो, मीं नुकता चार महिन्यांपूर्वी ह्या रस्त्यावरून गेलों त्या वेळी येथें कांहीच नव्हते आणि इतक्यांत ही इमारत कोणी व केव्हां बांधली ! याप्रमाणें उत्तरोत्तर नवीन नवीन इमारती व लोकोपयोंगी कामें होऊन **मुंबईची** सुधारणा होत चालली आहे.

८. **मुंबईची पूर्वीची स्थिती.**—पूर्वी मुंबईमध्यें भरती आली म्हणजे जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन जाई आणि ओहटीच्या वेळी सर्व एक सपाट मैदान व मधून मधून उंच सखल जागा दिसे, उत्तर व पश्चिम बाजूला सगळें जंगल असून तेथें लोकवस्ती मुळींच नव्हती, **माजगांव** आणि **डोंगरी** (नवरोजीहिल) ह्या बाजूला गरीब लोकांची वस्ती दाट होती. किल्यांत सर्व युरोपिअन आणि श्रीमान लोक राहत असत. ह्या काळी मैदानांतून रात्रीचें जाणें ह्मटलें म्हणजे, फारच धोक्याचें काम असे, कारण, हल्लीं जेथे **क्रॉफर्ड मार्केट** आहे तेथें टोळीवाले, दरोडेखोर, वाटपाडे वगैरे लोक छपून राहत आणि ते रस्त्यांने जाणाऱ्या येणाऱ्या लोकांवर धाड घालीत; यामुळें बाहेर पडणारांचा जीव नेहमी धोक्यांत असे. **खानेरीहुनेरी, दिवदिवें, शिनालटेंकडी**[1] इत्यादि ठिकाणीं चाचे व इतर लुटारू लोक

---

१. हें नांव **पोर्टुगीज** लोकांनी ह्या टेंकडीस दिलें होतें. असे सांगतात की, हे लोक जेव्हां **मुंबईस** प्रथमच आले तेव्हां त्यांनी आपला बावटा ह्या टेंकडीवर लाविला होता. ‘ **शिनाल** ’ हा पोर्टुगीज शब्द आहे. त्याचा अर्थ ‘ बावटा ’

येऊन राहत आणि तेथून आसपासच्या गांवांवर हल्ला करून ते लोकांस लुटीत असत. **अलू-पालू** हीं नांवे बहुधा **मुंबई**च्या जुन्या लोकांच्या आठवणींतून अजून गेलीं नसतील. असें सांगतात की, अशा लोकांच्या भीतीपासून लोकांनी सावध राहावें आणि रात्रीस कोठें बाहेर पडूं नये असें रयतेस कळण्याकरितां रात्रीं नऊ वाजतां तोफ सोडण्याची वहिवाट सुरू झाली ती ह्याच वेळेपासून. प्रातःकाळ झाला हें दर्शविण्याकरितां पहांटी पांच वाजतां अशीच एक तोफ सोडीत, ह्या वेळी **उत्तरकोंकण देवगीरी** येथील राजांचे ताब्यांत होते, ही तोफ सोडण्याची वहिवाट **मुंबई**मध्ये अद्यापि चालू आहे. कित्येक लोकांचे ह्मणण्यांत असेंही येतें की, मुसलमानी अमदानींत सुद्धां अशीच तोफ सोडीत असत.

**९. पूर्वीच्या मुंबईचे निरनिराळे भाग.—ह्मातारपाखाडी**, उमरखाडी, **माजगांव** व **माहीम** ही निरनिराळी बेटें असून मधून मधून खाड्या होत्या.

---

'**निशाण**' असा होतो. '**शिनाल**' ह्याचा अपभ्रंश होऊन आमचे लोक हिला '**छिनळ**' '**छिनाळ**' टेंकडी असें म्हणू लागले! ह्या शब्दर्थाविषयी जो लोकांत वाईट समज आहे तो खरा असून ह्या ठिकाणी पूर्वी कांही तसला प्रकार होत असेल असें ह्मणण्यास कांही आधार सांपडत नाही.

१. इ. स. १२९० त **मार्कोपोलो** ह्याला **मुंबईमध्ये चांचे** लोक येतात असें आढळलें.— **बाम्बे गझेटीअर-ठाणें.**

२. ह्या बंदरात मासळी फार उत्पन्न होत असल्याकारणानें ह्या स्थळास '**मच्छलीगांव**' असें ह्मणत; पण पुढें कांही काळानें **मच्छलीगांव** शब्दाचा अपभ्रंश होऊन हल्लींचे नांव व्यवहारांत आलें असावें असें कित्येकांचे ह्मणणें आहे. कोणी असेंही सांगतात की, **पोर्तुगीजां**च्या स्वाधीन **मुंबई** बेट झाले त्या वेळी **माजगांव बिंबदेवा**च्या हाताखालच्या एका सरदाराच्या हस्तगत होते. हा गांव त्यास वंशपरंपरेनें इनाम करून दिला होता. पोर्तुगीजांनी हा गांव त्याजपासून घेण्याकरितां बरीच खटपट केली पण त्यानें त्यांस असा जवाब दिला कीं, हें **माझें गांव** आहे ? अखेरीस पोर्तुगीजांनी **माजगांव** घेतलेंच ; पण तेव्हापासून ह्यास '**माझें गांव**' किंवा '**माझगांव**' असे ह्मणण्यांत येऊ लागले. पुढें '**झ**' चा '**ज**' होऊन सहजच '**माजगांव**' असें नांव लोकव्यवहारांत आलें असावें. इंग्रजीत अजून Mazagon (माझागांव) अशी ह्या शब्दाची वटीका करितात.

**पाय**[1] **धुणी**पासून जी खाडी होती ती भरतीच्यावेळीं **भेंडीबाजारा**पासून **चिंचबंदरा**पर्यंत भरत जाई. **डोंगरी** आणि **चिंचबंदर** ह्यांच्या खालीं सर्वत्र समुद्राचे पाणी भरत असल्यामुळें ही जागा निरुपयोगी असें समजून सरकार ती लोकांस वसाहत करण्यासाठी फुकट देई. **चौपाटी** आणि **गिरगांव** येथें फार पातळ वस्ती होती. किल्ल्यांतील **हार्नबी रो, मोदीखाना स्ट्रीट, सरकल** आणि **व्हिक्टोरिया स्टेशन**पासून पुढें व **बझारस्ट्रीटचा** उत्तर भाग (येथेंच पूर्वी जुना बाजार होता) इतके भागांत वस्ती हल्लीप्रमाणें दाट असून जिकडे तिकडे माड फार पसरले होते. **शेतवळी** ही सगळी शेती जमीन असल्याकारणानें तेथें नेहमी चिखल सांचत असे. **भायखळा** व **नागपाडा** ही तर गुरें चरण्याची जागा होती. **शेतवळींत** मधून मधून गरीबगुरीब लोक राहून तेथें भाजीपाला उत्पन्न करीत; क्वचित् नारळींचीही लागवड करीत; परंतु त्यांस ह्यांपासून जमिनीच्या खारटपणामुळे हवे तसें उत्पन्न होत नसे. जरी ह्या जागेस **शेतवळी** हे नांव होतें तरी वरील कारणामुळें तेथें धान्य फारसे पिकत नसे. बाकी **शेतवळी** हे नांव सार्थ आहे.

१०. कांहीं वर्षांपूर्वी **पालव**बंदरापासून **शिवरी**पर्यंत आणि **कुलाब्या**पासून **ब्याकबे**पर्यंत पाहणारास समुद्रकांठची जागा जिकडे तिकडे खारटणानें भरलेली असल्यामुळें फारच घाणेरडी दिसे. सर्व शहरांतील नळे, मोऱ्या वगैरे शौचकूपांचेंच काम करीत. **कुलाब्या**पासून **ब्याकबे**च्या वाळूंतून **मलबारहिल्**वर जाणे ह्मटले ह्मणजे यमयातनाच सोसाव्या लागत असे ह्मणण्यास काही हरकत नाही. तेथें जाणें ह्मटले ह्मणजे पहिल्यानें कित्येक गटार ओलांडावे लागत आणि त्यांची जी घाण येई ती कांहीं पुसूंच नका. **चौपाटी** जवळ जवळ आले ह्मणजे इकडे होड्या पडल्या आहेत; तिकडे मासे मारण्याचीं जाळीं पडलीं आहेत; इकडे लांकडांचे ढीग पडले आहेत; तिकडे कोळ्यांनी मारलेले मासे पडले आहेत आणि त्यांची

---

१. पाय धुण्याची ज़ागा. हीस '**पायधुणी**' ह्मणण्याचें कारण असें दिसतें कीं, पूर्वी येथपर्यंत समुद्राचें पाणी येत असून तेथें सांचलेल्या पाण्यांत **माहिम** वगैरे ठिकाणाहून येणारे लोक पाय धुवून गांवांत जात. अशीच दुसरी पाय धुण्याची जागा हल्ली जेथें **सामुद्रिकमातेचें** देवालय आहे तेथें होती ह्मणून समजतें. ह्या ठिकाणीं **वाळकेश्वर** वगैरे ठिकाणाहून येणारे लोक पाय धुऊन शहरांत जात.

दुर्गंधी सुटली आहे; आणि दुसरीकडें पाहिलें तर मासे वाळविण्याचें काम चाललेंच आहे; असा विलक्षण देखावा पाहणाराच्या दृष्टीस पडावयाचा ! इत्याद्यनेक कारणांमुळें जाणारा येणारास किती त्रास सोसणें भाग पडत असे, ह्याचे वर्णन करणें फार कठीण आहे, येवढेंच नाही; तर, तें वाचकांस विनाकारण चिळस आणण्यासारखें होणार आहे.

**११.** वर सांगितल्याप्रमाणें **मुंबई**ची स्थिती असल्याकारणानें शहरांत वारंवार रोग उत्पन्न होत. असे वारंवार रोग उद्भवण्याचीं कारणें अनेक होतीं; त्यांपैकी शेतांस व झाडांस खत घालणें हें एक होय. हें खत मासळीच्या हाडांचा वगैरे जो बारीक चुरा राहतो (ज्यास कुटा ह्मणतात) त्याचें असे. हा कुटा घातला ह्मणजे सहजच शेतांतून व गांवांतून दुर्गंधी सुटे, त्यामुळें लोकांस फार त्रास होऊं लागला, असें पाहून सरकारानें कुट्याचें खत घालण्याची चाल इ.स. १७२० पासून बंद केली, आणि त्याच्या मोबदला शेणाचें खत घालावें ह्मणून हुकूम केला; ह्यामुळें बहुतेक शेतकरी, त्यांचे उत्पन्न कमी झाल्यावरून **साष्टी, ठाणें** वगैरे ठिकाणीं जाऊन राहूं लागले. हें वर्तमान कंपनी सरकारानें **कोर्ट ऑफ डायरेक्टर** ह्यांस लिहून कळविलें. पण त्यांचा मुख्य हेतु शहर सुधारण्याचा असल्याकारणानें शेतकरी लोकांनी जरी वरील परवानगी मिळावी ह्मणून सरकारास दहा हजार रुपये देऊं केले तरी, त्यांचे ह्मणणें नाकबूल करण्यांत आलें, आणि त्यांनी आपला हुकूम तसाच सक्तीनें बजावण्याचा क्रम सुरू ठेविला.

**१२.** याप्रमाणें सुमारें २०० वर्षांपासून हवापाण्याच्या संबधानें **मुंबई**ची फारच निकृष्टावस्था असल्यामुळें येथें रोगराई विशेष उत्पन्न होऊं लागली व त्यामुळें युरोपिअन लोकांची वस्ती येथें फारशी होत नसे. एकादा युरोपिअन येऊन राहिलाच तर दोन चार वर्षांत त्याचा बहुधा निकालच लागावयाचा[१].

---

१. इ. स. १६७६ त तर युरोपिअन लोकांमध्ये सैन्यांत जे लोक मेले ते खेरीजकरून **मुंबई**त इतर बडे बडे लोक बरेच नाहीसे झाले; त्यांत **मुंबई**चे डेप्यूटी गव्हर्नर मि. **गायफोर्ड** व **मुंबई**चा सरव्हेअर जनरल मि. **बेक** वगैरे बरीच निवडक निवडक मंडळी मृत्यूच्या मुखीं पडली!

१३. वर दर्शित केलेल्या कारणांपैकीं दुसरें कारण असें होतें कीं, येथील पाणी खारट असून भरती बरोबर जेथें तेथें समुद्राचें पाणी भरून जाई व ओहटीच्या वेळीं खारटणांतून दुर्गंधी सुटे, ह्यामुळें शहरांत तापाची सांत वारंवार येई. आसपास खाजणें असल्यामुळें येथील हवा नेहमीं सर्द असे, आणि पावसाळा गेला ह्मणजे येथें राहणारा वांचला असें समजत. सदरहु कारणांमुळें ह्या बेटास **'यमपुरी'** असें ह्मणत. इ.स. १६७२ त ह्या बेटाचा बहुतेक भाग ह्मणजे चाळीस हजार बिघे जमीन खारें पाण्यानें भरून जाई; आणि कोरडी जमीन ह्मटली ह्मणजे काय ती सगळी दहा हजार बिघे असे. यावरुन त्या वेळच्या **मुंबई**ची हवा कशी होती याचें अनुमान सहज होण्यासारखें आहे.

१४. वरीलप्रमाणें जरी **मुंबई**ची स्थिती होती तरी ती फार दिवस टिकली नाही; कारण पुढें लवकरच इ.स. १७७६–८० ह्यांच्या दरम्यान **वरळीचा** बांध बांधण्यांत आला. हा बांध बांधल्यापासून आणि **माहिम**ची खाडी बुजून टाकल्यापासून **महालक्ष्मी, परळ, वरळी, माहिम, माटुंगें** वगैरे ठिकाणीं धान्य पिकूं लागलें व अनेक तऱ्हेचा भाजीपालाही उत्पन्न होऊं लागला. हा बांध **मुंबई**चे माजी गव्हर्नर **हार्नबी** साहेब ह्यांचे कारकीर्दीत कोणी इंग्रजानें बांधला आहे असें सांगतात. आणखीं असेंही ऐकिवांत आहे कीं, हा बांध बांधण्याच्या कामीं सदर्हु गव्हर्नरानें द्रव्याचा अतोनात व्यय केला ह्मणून त्याजवर **कोर्ट ऑफ् डायरेक्टर**ची फार इतराजी झाली होती. ह्या बांधाची लांबी सुमारें पाव कोस होईल. ह्यास **हॉर्नबी व्हेलर्ड** असें ह्मणतात. कित्येकांच्या तोंडून असें ऐकण्यांत येतें कीं, कोणी **नेसबिट** नामक एका सधन मडमेनें हा बांध बांधला आहे. **कोट** आणि **माजगांव** ह्या ठिकाणीं सदर्हु मडमेच्या नांवानें बांधलेले **नेसबिट लेन** नांवाचे रस्ते अजून प्रसिद्ध आहेत. ह्यावरून सदर्हू मडमेंने **हॉर्नबी** गव्हर्नरास हा बांध बांधण्याच्या **कामी** द्रव्यद्वारा मदत केली असावी असा तर्क करण्यास जागा मिळते. हा बांध बांधल्यापासून समुद्राचें पाणी शहरांत येण्याचें बंद झालें, इतकेंच नाही; तर, मूळच्या खाड्या होत्या त्यांत नळ बांधून त्यांतून पावसाचें आणि शहरातील नाण्या मोऱ्यांचें सगळें पाणी त्यांत सोडून तो थेट **मार्किटा**च्या मागून डोंगरीच्या खालून काढून **मोंदीबे**[१] बाजाराच्या मागच्या बाजूनें

रस्त्यामधून **वरळी**च्या खाडीस नेऊन मिळविला आहे. हा नळ सुमारें दीड पुरुष ओंड असून चार हात रुंद आहे. **भेंडीबाजार** आणि **मार्किट** ह्यांच्या मागें जे नळ आहेत ते कांही वर्षांपूर्वी अगदीं खुल्ले होते; पण ते हल्लीं साफ बंद करून टाकिले आहेत. **नळ** बाजारास **' नळ '** हे नांव पडण्याचें कारण हे नळ तेथून नेले आहेत हेंच असावें. वरळीच्या बांधाच्या शेवटीं जेथें समुद्राच्या आणि शहराच्या पाण्याचा संयोग होतो तेथें एक मोठा चुनेगच्ची बांध बांधला असून त्यांतून पाणी आंत यावें ह्मणून, त्याला एक कळसूत्र करून त्यास एक भला मोठा दरवाजा केला आहे; त्यांतून भरतीच्या वेळीं समुद्राचें पाणी आंत येतें, आणि ओहटीच्या वेळीं शहरांतील पाणी समुद्रास जाऊन मिळते. कांही वर्षांनी पुढें रस्त्यामधून नळ खणून लोकांच्या वापरांचें पाणी ह्या नळास लावून दिलें. ह्या वरळीच्या बांधाविषयींच्या माहितीसंबंधाने ' **मुंबईचें वर्णन** ' ह्या पुस्तकांतून उतारा पुढें दिला आहे : —

" श्री राजबिंब महाराज यांणी आपले पाटील यांस वरळी गांव वंशपरंपरा इनाम दिलें होतें. त्या गांवांतील शेत, जमीन, डोंगर, ताडमाड, खजुरी यांचे उत्पन्न वसूल करून घेऊन पुत्रपौत्रादिकांनी याचा उपभोग करून घ्यावा अशी त्या पाटिलास सनद करुन दिली होती. तदनुसार फिरंगी यांनीही तीच वहिवाट कायम करून पाटील मजकूर यांचे इनाम चालविलें. तदनंतर इंग्रजी झाली त्यांनीही कांही हल्ला हरकत न करितां पाटिलाच्या घराण्यास पूर्ववत् इनाम चालूं दिलें. त्या पाटिलाचें कुटुंब मोठें होतें. काहीं काळानें त्यांचा पडता काळ आला. व कुटूंबांतील मनुष्यें विभक्त झाली, आणि वरळी गावांच्या वतनाच्या निरनिराळ्या तक्षिमा करून त्यांनी आपआपणांत वांटून घेतल्या. त्यांचा मोडता काळ होत चालल्यामुळें कोणी कोणी आपआपल्या तक्षिमा विकूं लागले. अशा त्यांनी पुष्कळ जागा फरोक्त केल्या. त्यांपैकी, मनोहरदास रूपजी, नसरवानजी

१. ह्यास **मोदी बे** ह्मणण्याचें कारण असें दिसतें कीं, ह्या ठिकाणीं **'मोदी '** ह्या आडनांवाच्या एका पारशाचा बंगला होता हें एक, व दुसरें **बाणकोट** येथून येणाऱ्या तांदळाच्या **'मुड्या '** येथें उतरत, हे दुसरें-असें बहुतेक ह्मणतात. ह्मणून अर्थात **'मुडी '** बंदराचें **'मोदी बे '** हें नांव प्रचारांत आलें असावें.

मोदी व सोकाजी रघुनाथजी यांनीं विकत घेतल्या, व बदामीचें भाट नांवाचीं वाडी भिकाजी माणकोजी याणें खरेदी केली, आणि थोडीशी जागा रुस्तमजी बरजोरजी याणें विकत घेतली. पुढे सन १७५३ मध्यें ज्या वेळीं कंपनीसरकारास मुंबईवर फ्रांसीस येणार आहे, असें समजलें त्या वेळीं मुंबईच्या किल्ल्यासभोंवतें चर खणण्याचा आपला मतलब मुंबईतील शेटसावकार लोकांस दर्शवून सरकारास द्रव्याची या प्रसंगीं कुमक करावी असें सांगितले. त्या वेळी मुंबईतील रयतेनें असें सांगितले की, सरकारास द्रव्याची कुमक करायास आह्मापाशीं कांही द्रव्य नाही, परंतु सरकारनें आमची स्थावर जिनगी वतनवाडी यांवर कांही कर बसवून आमच्या उत्पन्नांतून सालिना कांही द्रव्य घ्यावें आणि मग अडचण दूर झाल्यावर तें द्रव्य आमचें आह्मांस परत द्यावें. असा ठराव कंपनीसरकारापाशीं करून कर चालू केला. त्यापूर्वी वरली गांवावर सरकार देणें घेणें कांही पडत नव्हतें. इतर गांव माहीम, परळ, मुंबई या ठिकाणी पेनशनटाक्स म्हणून कर द्यावा पडत होता. कारण तो गांव इनाम दिला होता आणि तें पाटिलांचे वतन होतें. सबब त्याजवर कांही कर चालू केला नव्हता. सन १७५३ पासून वरळी गांवावर कंपनी सरकाराने कर घेणें ठरविलें."

१५. याप्रमाणे **वरळी**चा बांध आणि **माहिम**ची खाडी बांधल्यामुळे शहरात पाणी येण्याचे बंद केलें होते तरी देखील **भायखळ्या**पासून **बोरीबंदरा**पर्यंत जाणें ह्मटलें म्हणजे केवळ लोकांच्या शौचकूपांचेंच दर्शन घेण्यासारखें होते; पण आतां पाहिलें तर अपालो बंदराच्या दोन्ही बाजूंची जागा भरून काढून ती थेट **कुलाब्या**पर्यंत भरीत नेली असून **कष्टमहौस** पासून **शिवरी**पर्यंत व तेथून पुढें **मोदीबे**, **एलफिन्स्टन बंदर**, **मांजगांव**, **टांकबंदर**, **फ्रिअरबंदर** वगैरे सुमारें पांच सहा मैल जागा येथून तेथून सर्व भरून काढली आहे. सारांश, ह्या गेल्या पंचवीस वर्षांत ह्या कामीं जो पैशाचा अतोनात खर्च करून मुंबईच्या बंदरांची जी ही सुधारणा आज आपणांस पहावयास मिळते ती अलौकिक आहे, असे ह्मणणे केवळ साहसाचें होणार नाही व ह्या कामीं जो सहा सात कोट रुपयांचा खर्च झाला म्हणून ह्मणतात, तो व्यर्थ गेला असेंही ह्मणतां येणार नाही.

१६. इ.स. १६६२ च्या सुमारास **मुंबई** बेट अगदीं हलक्या प्रतीचें होते, त्या वेळीं सगळ्या बेटाचें उत्पन्न सालिना २४,००० रुपये होतें. असे सांगतात कीं, **मलबारहिल्** एका गवळ्यास १३० रुपयांस रेंदी (भाड्यानें) दिली होती. **कुलाबा** हें एक मुंबईच्या दक्षिणेच्या शेवटास लहानसें बेट असून तेथे गुरें चरत व वस्ती **आगरी** आणि **कोळी** ह्यांची असे. हे लोक तेथें भाजीपाला उत्पन्न करून व बंदरातील मासळी विकून आपला चरितार्थ चालवीत. ह्या वेळीं **कुलाब्यास** जाण्यास होडी लागत असे; पण पुढें ती खाडी कंपनीसरकारानें तिच्यावर पूल बांधून **मुंबई**स मिळविली. **वाळकेश्वरा**च्या डोंगरापासून तों **कुलाब्या**च्या दांडीच्या खडकापर्यंत समुद्रांत ओहटीच्या वेळीं ह्या पुलाचा कांही भाग थोडे वर्षापूर्वी दृष्टीस पडत असें असे सांगतात. ह्या पुलास '[1]**सिरगुंदीपूल**' ह्मणत. ह्या पुलावरून **वाळकेश्वर** येथील गुरें **कुलाब्यास** चरावयास जात. हा पूल कोणी व कधीं बांधिला ह्याचा कांहीच शोध लागत नाही. इ.स. १६३४ पर्यंत **कुलाबा मुंबई**त धरीत नसत. **कुलाब्याचें** पूर्वीचें नांव '**कोल्स**' असें असून हें स्थळ इंग्रज लोकांचे शिकारीस्थान होतें. इ.स. १७२८ त सगळा **कुलाबा** सालिना १३० रुपयांस व इ.स. १७५० त देखील सालिना २०० रुपयांस गुरें चारण्याकरितां रेंदीनें दिला होता. हल्ली त्याच कुलाब्याचे उत्पन्न हजार पटीनें जास्त वाढले आहे !

१७. **कूकसाहेब** इ.स. १६६४ त **मुंबई**स आले होते त्या वेळच्या **मुंबई**च्या स्थितीचें ते असें वर्णन करितातः—"मीं ज्या वेळीं **मुंबई**च्या बंदरी येऊन उतरलों त्यावेळी मला उत्तम ठिकाणी बांधलेली पण जिची तटबंदी चांगलीशी नाहीं अशी एक इमारत आढळली (ज्या जाग्यावर मुंबईचा किल्ला होता) व त्या इमारतीच्या सभोंवतीं एक रमणीय असा बाग आहे.

---

१. **वाळुकेश्वर**च्या डोंगरास निरनिराळी नांवे आहेत. एका भागास '**खंबाळा**' किंवा '**खंबाला**'; दुसऱ्या भागास '**गवाळी**' तळ्याचा डोंगर; आणि तिसऱ्या भागास '**टाकरविल**' अशी नांवे असून दांडीच्या शेवटच्या टोंकास '**शिरगुंडी**' किंवा '**सिरगुंदी**' असे म्हणतात.

ह्या बागेमधून बहुतकरून इष्कबाज लोकांची जोडपीं फिरतांना दृष्टीस पडतात. बागेची जागा फार विस्तीर्ण आहे व बेटाच्या संरक्षणाकरितां काय त्या सगळ्या चार पितळी तोफा आहेत. तरी पण, तेथें तोफखान्याची व्यवस्था मुळींच नाहीं. सदहु इमारतीपासून गांव बराच दूर असून तेथें वस्ती ह्मटली म्हणजे ब्राह्मण, परभू, पांचकळशी, कोळी, माळी, हपशी, पोर्तुगीज, युरेजिअन व मधून मधून इंग्रज इतके लोकांचीच आहे. त्यांची राहण्याची घरें ठेंगणी असून ती माडाच्या झापांनी शिवलेलीं आहेत. कस्टम ऑफिस (मांडवी) व सरकारी वखारी मात्र कौलारू आहेत. गांवाच्या बाहेर एक बाजार[१] असून सर्व गांवांत माड लावलेले आहेत. दारू काढणारे **भंडारी** वाड्यांतून राहतात. गांवापासून सुमारे एक मैलावर **माजगांव** आहे. हें बंदर मासे मारण्यासाठीं सोईचें असून तेथें बोंबील नांवाचे मासे उत्तम मिळतात[२]. माजगांवच्या पलीकडे **परळ** आहे. **परळ, माहिम, शींव** व **मुंबई** ह्यांच्या मध्ये एक मोठें खांजण असून त्यानें चाळीस हजार एकर जमीन व्यापिली आहे व त्यांत हदवेळाशिवाय दुसरें कांही उत्पन्न होत नाहीं. **परळा**पासून **माहिमा**पर्यंत मधूनमधून मोडकळीस आलेले धक्के दृष्टीस पडतात. आंबे, फणस व माड ह्यांचे उत्पन्न **माहिमा**स फार होतें.

१८. ह्या वेळी **कोळी** लोक **माजगांवां**त राहत असत. हें गांव इ.स. १६६१ त सरकारने **टाहोरा** घराण्यापासून विकत घेतले. इ.स. १७६० त आणि त्याच्याही पूर्वी पुष्कळ दिवसांपासून सधन ख्रिस्ती व इतर लोकांची वस्ती तेथे होती. सुमारे दहा-पंधरा वर्षांमागे पी. ॲंड ओ. कंपनीचा सुपरिंटेंडंट कपतान **हेनरी** हा गाडींतून पडून मेला. तोपर्यंत **मुंबईहून माजगांवा**स जाण्यास तेथे असलेल्या पुलाचा भाग दृष्टीस पडस असे; परंतु हल्ली सरकारानें रस्ता वाढविल्याकारणाने तो नाहींसा झाला.

---

१. हा बाजार **जुमा** मशीदीच्या दक्षिणांगालां किंवा जेथे हल्ली सर **मंगळदास नथूभाई**चा कापडाचा बाजार आहे तिथेच असावा असा आमचा समज आहे. येथेंच पूर्वीच्या गव्हर्नराची **'कीचन गार्डन'** ही बाग होती. हल्ली तेथें **कीचन गार्डन** म्हणून लावलेली पाटीही पाहण्यांत येते.

२. **माजगांव** येथें आंबेही उत्तम होत असत व ते दिल्लीचा बादशाह मागवून नेत असे अशी आख्यायिका आहे!

ह्याच पुलाच्या पूर्व बाजूस **पोर्टुगीज** लोकांचा **मुंबई** येथील गव्हर्नर **फराया**[1] हा राहत असे. ह्याच्या बंगल्यासभोंवतालचा विस्तीर्ण बाग हल्ली पाहण्यात येतो. ह्यास **'मिंगेलचा बाग'** असे ह्मणतात.

**१९.** इ.स. १६७३ त डाक्तर **फ्रायर** साहेबांचे **कंबालाहिल्** विषयी असें ह्मणणें आहें की, तेथे पूर्वीपासून दक्षिण किनाऱ्यावरील **'मलबारी'** लोक तीर्थसंबंधानें तेथें असलेल्या तळ्यावर स्नान करण्याच्या उद्देशानें येत असत; ह्मणून ह्या टेंकडीस **मलबारहिल्** म्हणतात. इ.स. १८५३ सालीं **मलबार** किनाऱ्याचे जे नकाशे काढण्यांत आले आहेत त्यांत ह्या टेकडीला " **केम बांबेयम** " असें ह्मटलें आहे. ह्या नावावरून पाहिले असतां असे दिसून येईल कीं, हे नांव **पोर्टुगिजां**नी ह्या टेंकडीस दिलें असावें. गेल्या शतकात ही टेंकडी **कंबालाहिल्** ह्या नांवाने प्रसिध्द होती, असें ह्मणतात; व अजूनही क्वचित् ह्या टेंकडीस हेंच नांव लावण्यात येतें. परंतु, हिचें वास्तविक फार प्राचीन नांव ह्मटलें म्हणजे **वाळकेश्वर**चा **डोंगर** हेंच होय. ह्या टेंकडीवर इ.स. १८१६ पूर्वी एकही बंगला नव्हता, असें ह्मणतात; पण पुढें इ.स. १८३० सालीं एक बंगला बांधण्यात आला आहे. ह्यांत माजी म्युनिसिपाल कमिशनर राहत असत. **मलबारहिल्**वर सर्वात जुना असा हाच बंगला होय.

**२०.** सदर्हु **फ्रायर** साहेबांच्या लेखावरून असें दिसण्यांत येते कीं, इ.स. १६७४ च्या सुमारास **कामाठीपुऱ्यां**त इतकें पाणी भरे कीं, त्यातून लहानसहान बोटीसुध्दां चालत; इतकेंच नाहीं तर, तें भरतीच्या वेळी **भेंडीबाजारा**[2] पर्यंत येऊन तेथून पुढे **मुंबादेवी**च्या तलावापर्यंत जाऊन पोंहचे. आणखी ते असें लिहितात की, " ह्या बेटाचा बहुतेक भाग म्हणजे

---

१. **फराया** या नांवावरून हल्लीं जे आपण **'पायरीचे'** आंबे खातों ते निघाले असावेत असें कित्येक ह्मणतात; कारण ह्याच गव्हर्नरानें ह्या झाडाचीं कलमें प्रथमतः **माजगांवास** आणून लाविली. तसेंच, **'आफोस'** (आपोस) म्हणून जे आंबे येथें होतात, त्यांचाही संबंध **आल्फान्सो** ह्या एका पोर्टुगीज नांवाशी असावा असाही तर्क कित्येक बांधितात.

२. हें नांव पडण्याचें कारण कोणी असें सांगतात कीं, पूर्वी येथें **'भोंदू'** अर्थात ठकबाज लोक फार रहात असून ते लोकांस वारंवार फसवीत असत. ह्या वरून **भोंदु** बाजार शब्दाचा **' भेंडी '** बाजार असा अपभ्रंश झाला असावा. कित्येक असेंही ह्मणतात कीं, येथें **'भेंडी'** चीं झाडें फार होती त्यावरूनच हें नांव प्रचारांत आलें असावे. आम्हास दुसरी कल्पना कांहीशी बरी दिसते.

सुमारें ४०,००० बिघे जमीन समुद्राचे पाण्यानें भरून वहात असतो आणि सरासरी १०,००० बिघे जमिनीचा भाग मात्र वास्तवीक जमिनींत गणला जातो. **मुंबई**चीं लहानलहान पांच बेटें आहेत आणि त्यांतून खाऱ्या पाण्याच्या खाड्या असून त्या चिखलानें भरलेल्या आहेत; ओहटीच्या वेळीं हीं बेटें पांच दिसतात; परंतु; भरती आली म्हणजे जिकडे तिकडे पाणी भरून सात होतात."

२१. **ग्रांट डफ** साहेबाचे इतिहासावरून असें दिसून येतें कीं, इ.स. १६६८ सालीं कंपनी सरकारास **मुंबई** बेट नापसंत झाल्यामुळें त्यांनी आपलें ठाणे जंजिऱ्यास नेण्याचा विचार केला होता परंतु, तसें कांही झालें नाही; कारण त्यांस लागलेंच कळून आलें की, **मुंबई**हून ठाणे उठविणें ही गोष्ट फार चुकीची आहे. इ.स. १६६९-१६७७ ह्या दरम्यान म्हणजे गव्हर्नर **जेरल्ड आंजिअर** ह्यांचे कारकीर्दीत त्यांनी शहर सुधारण्यांकरितां व लोकवस्ती वाढविण्याकरितां पुष्कळ प्रयत्न करून रयतेस त्यांचे हक्क कायम ठेवून कोणत्याही प्रकारचा जोर—जुलूम तुमच्यावर करण्यांत येणार नाही, अशा अर्थाचा एक '**कौल**' (कान्व्हेन्शन) इ.स. १६७४ सालीं करून दिला. ह्या कौलांत त्यांनी रयतेच्या सुखोपायांची योजना करण्याकरितां, त्यांजपासून सालिना २० हजार **सराफींचे** (झराफिन्स-असुरफ्या) उत्पन्न जास्ती काढलें. शिवाय, चालू असलेला '**क्विट् रेंट**' नामक कर त्यांस द्यावा लागे तो आलाहिदाच ! ह्या कौलापासून रयतेच्या मालमत्तेची सुरक्षितता ज्यास्त वाढली, हें खरें आहे. ह्या कौलाचा आशय रयतेस कळवावा म्हणून **जेरल्ड आंजिअर** यांनी **मुंबई**च्या किल्ल्यांत एक जंगी सभा भरविली होती. त्या प्रसंगी दिलेला कौल आह्मांस मान्य आहे अशा अर्थाच्या १२० **मुंबई**तील प्रमुख लोकांनीं त्याजवर सह्या केल्या. अशा युक्तीनें त्यांनी **मुंबई**चे उत्पन्न ६,५०० पासून ९,०६० पौंड व लोकसंख्या १०,००० पासून ६०,००० पर्यंत वाढवून सैन्य ४०० **युरोपिअन** व १,५०० **पोर्टुगीज** एवढे वाढविलें. ह्या वेळीं मुंबईचे डेप्युटी गव्हर्नर मि. **हेनरी आक्झेंडम** ह्यांनी जें **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** ह्यास पत्र लिहिलें होतें, त्यांत त्यांनी १६७७-७८ सालीं कस्टमचें उत्पन्न ३०,००० सराफी व तंबाकूचें २०,००० सराफी आहे, ह्मणून लिहिले होते.

२२. याप्रमाणें शहरांत वस्ती आणि उत्पन्न वाढविण्याविषयीं प्रयत्न चालू असतां, ह्या शहरांचें विशेष महत्त्व वाढून भरभराटी व्हावी ह्या हेतूनें मि. **आंजिअर** ह्यानें धनिक व व्यापारी लोकांची वस्ती वाढविण्याविषयीं बहुत खटपट केली हें वर ह्मटलेंच आहे. मि. **आक्झेंडम** ह्यांनी जो ह्या संबंधी सरकारास रिपोर्ट केला होता त्यांत सुध्दां त्यांनी असें लिहिले होते कीं, नेटीव लोकांच्या हलक्या जातींचाच येथे भरणा विशेष असून, चांगल्या जातीचे लोक ह्या बेटांत फार नाहीत. इ.स. १६९० त मि. **वेल्डन** ह्यांनी **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** ह्यास असें लिहून कळविले कीं, ह्या शहराच्या संरक्षणार्थ किल्ल्यासभोंवतीं तटबंदी केली असतां, श्रीमंत व चांगले लोक येथें येऊन राहतील. **मि. वेल्डन** ह्यांच्या मागून येणाऱ्या गव्हर्नरानेंही ह्या बाबतींत बऱ्याच खटपटी केल्या; परंतु, त्यापासून तादृश फायदा झाला नाही. पण पुढें **मि. बून** (इ.स. १७१६-२०) ह्यांनीं आपल्या कारकीर्दीत ही गोष्ट सिध्दीस नेली व तेणेंकरून लोकांच्या झुंडीच्या झुंडी ह्या शहरांत येऊन वसाहत करू लागल्या.

२३. इ.स. १७५० त **नेबूर** साहेब **मुंबईस** आले होते त्या वेळीं त्यांनीं मुंबईविषयीं असें लिहिलें आहे कीं, हल्लीं ह्या बेटांत **ग्रीक** लोकांची वस्ती असून येथील इंग्रज लोक आंगाबसता कपडा घालतात; इतर युरोपिअन लोक इंग्रज लोकांपेक्षां व्यापारामध्ये फारसें मन घालीत नाहींत; सैन्याचा मुख्य अधिकारी कौन्सिलचा मेंबर (सभासद) आहे; आणि त्यास **'मेजर'** ही पदवी आहे; आणि सर्व पश्चिम **हिंदुस्थानां**करितां एकच क्लर्जिमन (पाद्री) आहे.

२४. इ.स. १६९९-१७०० मध्यें **मुंबईत** घोड्यांच्या गाड्या वगैरे कांहीं नसून फक्त बैलगाड्याच होत्या. त्या गाड्यांत त्या वेळचे गव्हर्नर व कौन्सिलर बसत. गव्हर्नर फिरावयास निघाला म्हणजे त्याच्या गाडीपुढे **भंडारी** आणि **सिद्दी** हे चालत. गव्हर्नर कधीं कधीं घोड्यावरून किंवा पालखींतून फिरत. पालखींवाहक **मुसलमान** व **कोहर** लोक असत. ह्या वेळी गव्हर्नराच्या डोईवर **'समब्रेरो'** (छत्र) धरीत. ह्यावरून त्या वेळीं हें शहर अति दारिद्री व ओसाड असे स्थान होतें. त्यावेळीं सनदी इंग्रज

कामदारांत गव्हर्नर, डेप्युटी गव्हर्नर व कौन्सिलर मिळून सगळे ८ असामी होते. ह्या वेळीं इंग्रज लोक **मोंगल** व **मराठे** राजांस फार भीत असून त्यांचा ह्यांजवर मोठा दरारा असे ह्मणून सांगतात, व ही गोष्ट वस्तुतः खरीही असण्याचा पुष्कळ संभव आहे.

२५. इ.स. १६७५ त **मुंबईची** स्थिती कशी होती, ह्याविषयीं डाक्तर **जॉन फ्रायर** ह्यांनी असें लिहिलें आहे :—

"ह्या बेटाची वस्ती येथें **पोर्टुगीज** लोकांची सत्ता होती त्या वेळेपेक्षां बरीच ज्यास्त वाढली आहे; तरी ती बहुतकरून मटके व पळंपुटे लोकांचीच आहे.

२६. इ.स. १७५७ सालच्या **मुंबईच्या** स्थितीविषयीं **आयव्ही** साहेबाच्या लेखावरून असें समजण्यांत येतें कीं, **मुंबईसारखें** थोडक्याच काळांत भरभराटीस आलेलें असें शहर ह्या जगांत नाहीं; एवढेंच केवळ नाहीं; तर तें आज **आरबस्थान** आणि **इराण** येथील व्यापारांचे माहेरघर बनून गेलें आहे.

२७. **नेबूर** साहेब ह्मणतो कीं, इ.स. १७६४ सालीं **मुंबईची** हवा निरोगी असून सुखकारक अशी होती आणि तेथील उत्पन्न तांदूळ, नारळ आणि मीठ ह्यांपासून होत असे. पूर्वीपेक्षा वस्ती ज्यास्त वाढली होती, आणि **जुना किल्ला** म्हणण्यासारखा उपयोगी नव्हता; तरी पण, **तीन दरवाज्यांपुढें** शहराची व्यवस्था उत्तम तऱ्हेनें ठेवलेली होती. **माहिम, रिवें, शीव, सुरी**[1] (?) **माजगांव** आणि **वरळी** येथें लहान लहान किल्ले होते. शहरांत ३०० नेटीव पायदळ असून तोफखान्याची स्थिती उत्तम होती. एक उत्तम अशी गोदी होती. मराठे लोक हा वेळपर्यंत इंग्रजांस मोठ्या क्रूरतेनें वागवीत असत.

२८. **फॉर्ब्स** साहेबांचे ह्मणणें **नेबूर** साहेबाप्रमाणेंच असून आणखी तो असें लिहतो कीं, **मुंबईचा** घेर २ मैल आहे. येथें ३ **गोदी** असून एक **मरिन यार्ड** आहे. ह्या **गोदींत पारशी** लोक गलबतें बांधितात. मुख्य इमारती

१ मुंबई गझेटीयर–ठाणें.

सरकारी बंगला, कस्टमहौस (मांडवी), मरीन हौस, ७ बराकी, एक टांकसाळ, तिजोरीचा बंगला, थिएटर, तुरुंग, ३ इस्पितळे, प्रॉटेस्टँट चर्च आणि एक धर्मादाय शाळा इतक्याच आहेत. **इंग्रज** लोकांची घरें स्वच्छ व सोईचीं आहेत. **पारश्यां**चींही घरें साधारण चांगलींच आहेत. सर्व **हिंदुस्थानांत** मुंबई हें व्यापारांचे मुख्य स्थान आहे. सरकारची व्यवस्था उत्तम आहे खरी; पण त्यांचा खर्च आदायापेक्षां अधिक आहे.

२९. इ.स. १७६८ त किल्ला बांधल्यामुळें खर्च अतोनात झाला. त्यामुळें **कंपनी** सरकार आणि **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** ह्यांचे मनांत असे आलें कीं, आसपासचा कांही प्रदेश मिळाल्याशिवाय **मुंबई** सुरक्षितपणें आपल्या ताब्यांत राहणें फार कठीण. आतां **मुंबई**च्या अगदीं जवळचा प्रदेश म्हटला म्हणजे **वसई** आणि **साष्टी** हा होय. हा प्रदेश ताब्यांत घेण्याविषयींच्या बाबतींत बोलणें करण्याकरितां त्यांनी पुण्यास एक वकील पाठविला होता; परंतु त्यापासून कांही एक निष्पन्न न होतां त्यास परत यावें लागलें. पुढे इ.स. १७७५ त **रघुनाथराव** पेशवे ह्यांजबरोबर जो एक तह झाला, त्यांत **वसई** व **साष्टी** हीं बेटें इंग्रजांस मिळालीं. व हा प्रदेश हस्तगत होण्यापूर्वींच त्यांनी **ठाणें** घेतलें होतें. आणि पुढे एकामागून एक **वरसोवा, घारापुरी** आणि **हागबेटें** ही त्यांच्या स्वाधीन झाली. **साष्टी** इंग्रजांस मिळण्यापूर्वी **मुंबई**चे उत्पन्न १,०१,९०,००० रुपये असून खर्च २,९७,४०,००० रुपये होता. त्यामुळें **कंपनी** सरकारास ज्यास्त खर्च बसला.

३०. इ.स. १७७५ तील **मुंबईं**त दोन मरीनगेट असून त्या ठिकाणीं सोईवार असे धक्के बांधले होते आणि ह्या दोन गेटांमध्यें किल्ला होता; त्याच्यावरून सर्व शहराचा देखावा दिसत असे. किल्ल्याच्या सभोंवार मोठमोठें धक्के होते. ग्रीनचौकांत रेजिमेंट राहाण्याची जागा होती. गल्या व रस्ते उत्तम बांधलेले होते. मोठमोठाल्या सुंदर हवेल्या होत्या. जमिनीची माती वाळूमिश्र होती. **ओल्डवुमन**च्या (धाकट्या कुलाब्याच्या) टोंकांस समुद्रावर एक दिवा दांडी होती; तिचा उजेड ५ लीग (१५ मैल) पर्यंत पडे. येथेंच दोन मिलिटरी बराकी असून कधीं कधीं तेथे कंपूही राहत असे, ह्या बेटांत फार घरें नव्हतीं.

३१. ह्याच वेळच्या स्थितीचें वर्णन **पार्सन्स** साहेब असें करतो :—"हे शहर मोठें सुंदर असून आंत सभ्य लोकांची वस्ती आहे. रस्ते चांगले असून मैदान विस्तीर्ण आहे. तटबंदीच्या आंत मोठा चौका असून तेथें पलटणीची कवाईत चालते. किल्ला मोठा असून मजबूद आहे. गोदींत चांगली जाहजें बांधली जात आहेत. किल्याच्या सभोंवार मोठमोठे खंदक असल्यामुळें ह्या शहरात शत्रूपासून मुळींच भीति नाहीं."

३२. फ्र्यांकलीन साहेब असें म्हणतो कीं, 'इ. स. १७८६ मध्ये **मुंबई** बंदर फार सुंदर व भव्य असून वस्तीच्या मानानें पाहिलें तर, ह्या शहराच्या आकाराएवढ्या पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याही शहरांत जेवढी वस्ती असावी तेवढी ह्या शहरांत आहे. बंदर विशाळ असून येथील गोदीचें कामही फार सुंदर आहे व गोदींत तारवें करणारे कारागीर फार कुशल आहेत. इतर ठिकाणांहून मुंबईंत येणाऱ्या व्यापाऱ्यांची संख्या बरीच वाढत चालली आहे.'

३३. इ. स. १८०२ सालीं गव्हर्नर डंकन साहेबानें शींवचा पूल बांधून मुंबईस मिळविला आणि आयात मालावरील कर बंद केला.

३४. इ. स. १८०४ सालीं म्याकिंटाश साहेब **मुंबई**विषयीं असें लिहितो कीं, 'सर्व राष्ट्रांतील लोक व त्यांचे पोशाग, रीत रिवाज, चाली वगैरे ह्या शहरांत पाहण्यांत येतात.' हें त्याचें ह्मणणें अक्षरशः खरें आहे.

३५. पोर्टुगीज लोक येण्यापूर्वी माजगांव, शिवरी, परळ, माहिम आणि शींव येथें किल्ले होते, परंतु त्यांचा अंमल सुरू झाल्या दिवसापासून त्यांनीं ह्या शहराच्या संरक्षणाकरितां कोटांत एक किल्ला बांधला होता. त्यास तीन दरवाजे असून त्यांत लष्कर राहत असे.

३६. पुढें **एलफिन्स्टन** साहेबाचे कारकीर्दीत त्यांनी हा किल्ला फोडून खाडे खळगे भरून ती जागा सारखी केली. **पोर्टुगीजांचे** पूर्वीही येथे **हपशांनीं** एक किल्ला बांधला होता ह्मणून सांगतात; पण, हा किल्ला कोणता व कधी बांधला हें बरोबर समजण्यास कांही खात्रीलायक आधार मिळत नाहीं. असेंही सांगतात कीं, येथेंच **साष्टी**, **तुर्भे**, **कल्याण**, **भिवंडी** वगैरे ठिकाणच्या सर्व जहाजांवरची जकात घेण्यांत येत असे.

३७. याप्रमाणें चालू शतकाच्या आरंभापर्यंत **मुंबई**ची स्थिती होती; पण, पुढें हळुहळू समुद्रांत भरती घालून जमीन वाढविल्यामुळे पश्चिम

बाजूला ब्याकबे आणि उत्तर बाजूला **भायखळा** ह्या ठिकाणच्या जागा मिळाल्या. पुढें इ. स. १८३५ त **चौपाटी** व **भायखळा** ह्यांमधील मोठी सडक बांधली गेली व ह्या सडकेस त्यावेळचे गव्हर्नर सर राबर्ट ग्रांट ह्यांचें नांव देण्यांत आलें. पुढें कांही दिवसांनी **बेलासिसरोड** नांवाचा रस्ता **ग्रांटरोड**च्या उत्तर बाजूला बांधून तयार झाला. ह्या रस्त्याच्या संबंधानें विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, ह्या वेळीं **सुरत** येथें दुष्काळ पडल्यामुळें तेथील गरीब व अनाथ लोक **मुंबई**स पळून आले होते; त्यांजकडून ह्या रस्त्यांचे काम करविण्यांत आलें आहे. ह्याचप्रमाणे पुढें उत्तरोत्तर **मलबारहिल्**, **ब्रीचक्यांडी** व **महालक्ष्मी** इत्यादी ठिकाणी जाणारे रस्ते तयार झाल्या कारणानें साहेब व इतर धनिक लोक त्या त्या ठिकाणी जाऊन राहूं लागले. इ. स. १८६१ सालीं लार्ड एलफिन्स्टन हे मुंबईचे गव्हर्नर असतांना, नळ बांधून मुंबईत **व्याहाडा**चें पाणी आणिलें; त्यामुळें येथें चांगल्या पाण्याचा सुकाळ झाला. व तेणेंकरून लोकांची वस्ती वाढत चालली एवढेंच नाहीं; तर, तिच्या बरोबर व्यापारही वाढत गेला ह्यामुळें शहरांत जागेचेंही मोल चढून ती मिळेनाशी झाली. पूर्वी जमिनीची किंमत ८-१० रुपये चौरस यार्ड पर्यंत पडत असे; पुढें २५-३० रुपयांपर्यंत झाली; परंतु १८६५ त शेर बाजाराचे वेळेस **रामपार्ट**रोच्या समोरची जागा ११५-१२० रुपये पर्यंत चौरस यार्ड प्रमाणें विकली गेली; पण, हल्लीं ३०-४० रुपयांस एक चौरस यार्ड ह्याप्रमाणे सरासरी जमिनीची किंमत आहे. ही कोटांतील जमिनीची गोष्ट झाली. शहरांतही मोठ्यारस्त्यावर असाच साधारण भाव आहे व आडरस्त्याला कांही कमी किंमत पडते; तरी, सरासरी ९-१० रुपये पडतात असें म्हणण्यात हरकत नाहीं. हल्लीं जमीन केवळ सोन्याचा तुकडा होऊन इतकी दुर्मिळ झाली आहे कीं, शहरांत राहणाऱ्या लोकांस जागा पुरेनाशी होऊन, त्यांस राहण्याची पंचाईत पडते; म्हणून सरकारानें मुंबई वाढविण्याचे प्रयत्न चालविले आहेत. व त्या संबंधानें रिपोर्ट करण्याकरितां एक कमेटीही नेमण्यांत आली आहे. व तिचा **इंग्लंड**च्या धर्तीवर राजरस्ते लांकडाचे करावे व येथील मोठमोठ्या इमारतीही **इंग्लंड**च्या नमुन्यावर बांधाव्या असा विचार घाटत आहे असें समजतें.

३८. **मुंबईतील मूळ जाती-पोर्टुगिजांचा** अंमल सुरू होण्यापूर्वी खाली दिलेल्या पांच जातींची ह्या बेटांत वस्ती होती. त्या जाती येणेंप्रमाणें :-

(१) [१]ब्राह्मण (देशस्थ); (२) सोमवंशी व सूर्यवंशी क्षत्रिय; (३) पाताणे परभू; (४) [२]भंडारी (५) मासे मारणारे कोळी.

३९. मुंबईची मूळ वस्ती फक्त कोळी लोकांची. ह्या संबंधी डाक्तर **विलसन** साहेबांचे असें ह्मणणें आहे की,-**मुंबईचे** मूळ रहिवाशी ह्मटले म्हणजे कोळी लोक हेच होत. ह्या लोकांविषयी डाक्तर मजकूर अशी एक चमत्कारिक गोष्ट लिहितात कीं, पूर्वी फक्त ह्याच लोकांपासून-मग ते कोणताही धंदा करीत असेले तरी-एका प्रकारचा कर (पोल ट्याक्स) घेतला जात असे. ह्या करास मराठींत 'आगदेव' म्हणत. ह्या करा संबंधानें मशारनिल्हे साहेबांनीं एका इंग्रजी सरकारी दस्तैवजावरून लेख लिहिला आहे त्याचा मतलब असा आहे :- ह्या जातींतील प्रत्येक मुलगा १३ वर्षांचा झाला म्हणजे त्याजकडून सदर्हु कराबद्दल सालिना एक रुपया; १४ वर्षांचा झाला कीं दोन रुपये; ह्या प्रमाणे मुलगा १८ वर्षांचा होईतोंपर्यंत प्रत्येक वर्षास एक रुपया अधिक असा कर घेतला जात असे. ह्या वयापुढें

---

१. हे ब्राह्मण इ. स. १२९९ व तद्नंतर ह्या प्रांतीं राजा **बिंबा**बरोबर आले व त्यानें त्याचे कुलगुरू-रा. रा. **पुरूषोत्तम पंत कावळे** ह्यांस १४ महालची वृत्ति दान दिली. ह्यांचे वंशज अद्याप आहेत. त्या दिवसांपासून हे ब्राह्मण येथील सर्व जातींच्या लोकांचे कुलगुरू व कुलोपाध्यायपणाचें काम करूं लागले. ह्मणून येथील सर्व वतन त्यांचेंच असून ह्या बेटांत जे लोक त्यांचे पाठीमागून येऊन वसाहत करूं लागले त्यांचेही कुलगुरू व कुलोपाध्याय हेच ब्राह्मण होत गेले. ज्योतिषपणाचीही वृत्ति ह्या ब्राह्मणांचीच. हल्लीं रा. रा. **पाण्डुरंग भास्कर जोशी** हे **मुंबईचे 'ग्रामजोशी** 'आहेत. सदर्हु राजा **बिंबानें** ह्या ब्राह्मणांखेरीज एकंदर ६६ कुळें पैठण वगैरे ठिकाणाहून ह्या प्रांतीं आपल्या बरोबर आणून स्थायिक केलीं. त्यांचा तपशील :-

२७ सोमवंशी, १२ सूर्यवंशी, ९शेषवंशी, ५ पंचाळ, ७ घोडेल ऊर्फ कुणबी, १ लाड, १ दसालाड, १ विसालाड, १ मोड, १ दसमोड, १ विसमोड.-

उ. कों. प्रा. गं. ती. शु. य. ब्रा.

२. इ. स. १२९५ त **भीम** राजानें **मुंबई** घेऊन माड लाविले त्यामुळें **भंडारी** लोक येथें आले.— **मुंबईचें वर्णन.**

६-१-१३ इतका ठरींव कर घेतला जाई. अति वृद्धांस व १३ वर्षांच्या आंतील मुलांस कर नसे. इ. स. १८४२ त **मुंबईत** ९२२ आणि **माहिमास** १४१५ इतके कोळी होते. ह्यांत **मुंबईचे** कोळ्यांत १८ हून अधिक व **माहिमचे** कोळ्यांत १० हून अधिक जाती होत्या.

**४०.** वर दिलेल्या जाती मुंबईत वसाहत करून राहिल्या होत्या व येथें वेळोवेळीं निरनिराळीं राज्यें होत गेलीं: तरी त्या वेळीं ह्मणजें **मुंबईच्या** वसाहतीस जोर आला होता असें मुळींच झालें नाहीं; परंतु, **पोर्टुगीजांचा** अंमल ह्या बेटावर बसल्या दिवसापासून थोडीशी ह्या बेटाची व्यापाराच्या संबंधाने उच्च स्थिति होत गेली; त्यामुळें हळुहळू वस्ती वाढत जाऊन इंग्रजी अंमल झाल्या दिवसापासून तर, ती बरीच वाढत चालली. **सुरतेचा** व्यापार बंद होऊन **मुंबईची** भरभराटी झाल्यामुळें इ. स. १६४०[१] चे सुमारास **पारशी** लोक **सुरतेहून** येऊन **मुंबईत** वसाहत करूं लागले. इंग्रज लोकांनी **पुणें** घेतलें तेव्हांपासून ब्राह्मण व इतर दक्षणी लोक येथें येऊ लागले. घोड्यांचा व्यापार चालू झाल्यामुळें **आरब, कंदाहारी** वगैरे लोक आणि फिरंग्याच्या कारकीर्दीपासून, किंबहुना इंग्रजी झाल्या दिवसापासून **शिंपी** लोक येथें येऊन राहूं लागले असें अनुमान होतें. **सोनार** लोक **पोर्टुगिजांचे** कारकीर्दीपासून येथें आले असावे. इ. स. १५५० चे सुमारस

---

१. "पारशी लोक सहपरिवार मुंबईत कोणत्या वर्षापासून आले व प्रथम त्यांची किती कुटुंबें येथें येऊन वस्ती करून राहूं लागलीं हें बरोबर समजत नाही. परंतु हे खरें आहे कीं, पोर्टुगीज लोकांच्या हस्तगत हें बेट झाल्यानंतर पांच दहा वर्षांनी म्हणजे सुमारें इ. स. १५४० पासून एक दोन पारशी गृहस्थ सहकुटुंब येथें राहत होते. ते पोर्टुगीज दरबारांत कारभार करीत असत असें पक्या शोधावरून समजतें. नंतर इंग्रज लोकांचे कारकिर्दीपासून त्यांची वस्ती वाढत चालली. सुरतेस इंग्रज कंपनीचा व्यापार चालला होता त्या वेळीं हे लोक त्यांचे दलाल व मुख्य कारभारी होते. देण्याघेण्याची सर्व वहिवाट इंग्रज व्यापारी त्यांच्याच मार्फतीनें करीत. आणि पूर्वीपासून इंग्रज लोकांचा ह्यांवर विश्वास बसला होता; सबब जेव्हां त्यांच्या हस्तगत हें बेट झालें तेव्हां त्यांनी पारशी लोकांस येथें येण्यास उत्तेजन दिलें आणि राज्यांतील कांही नाजुक कामें त्यांस दिलीं." **मुंबईचें वर्णन.**

**शेणवी** (सारस्वत ब्राह्मण) हे **पोर्टुगिजां**बरोबर ह्या बेटांत आले. **खत्री** हे मूळचे चौल येथील राहणारे होते, तेही **पोर्टुगी**जांचे वेळी १६०० मध्यें आले. **बेनीइस्त्रायल** हे मूळचे **आरबस्थान** येथील राहणारे होते. तेथील राजाचे जुलमामुळें इ. सनाच्या ६ वे शतकांत ते हिदुस्थानांत आले व तेव्हापासून **मुंबईत** स्थायिक होऊन राहिले आहेत. **यहुदी** व **बेनीइस्त्रायल** हे एकच आहेत. **मुसलमान** लोक इ. स. १३०० च्या सुमारास आणि इ. स. १६९५ च्या सुमारास **कामाठी** लोक येथें आले असावे असें वाटतें. इ. स. १६७७ पासून **वाणी** लोक येथें येऊन राहूं लागले. असे **मुंबई**त अनेक जातींचे लोक आहेत व तेही अनेक देशांहून आले आहेत; तरी, त्यांच्यातील भेद पाहणारांच्या तेव्हांच लक्षांत येतो. असे अठरापगड जातीचे लोक अनेक वेळीं येऊन **मुंबई**त वसाहत करून राहिले आहेत. हल्लीं **मुंबई**त ज्या जाती आहेत त्या सर्वांची माहिती मिळणें फार दुरापास्त गोष्ट आहे. प्रयत्नानें मिळूंही शकेल. पण तसें करून उगीच ग्रंथ वाढविण्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं.

४१. इ. स. १५२९ त हें बेट अगदीं रानवट व ओसाड असून त्यांत सुमारें ४०० लहान मोठीं घरें होतीं व तेथील वस्ती **कोळी, भंडारी** वगैरे लोकांची असे. जमिनीचा वसूल दरसाल ७०० **सराफी** होता. जमीन काळसर व बरड असून आसपास सर्वत्र खांजणें होतीं. येथें धान्य मुळींच पिकत नसे असें कित्येक ह्मणतात; परंतु, हें त्यांचे ह्मणणें अंमळ चुकींचे दिसतें; कारण, आम्ही मागें दर्शित केल्याप्रमाणें **पोर्टुगीजांनी मुंबई** बेट घेतल्या नंतर ह्या बेटास **हेटरडा सिलव्हेरा** ह्याच्या सैन्याने 'राहण्यास उत्तम स्थळ ' असें नांव दिलें होतें व तें सोळाव्या शतकापर्यंत चाललें. ह्यास विशेष पुरावा 'शेतवळी ' ह्या नांवांतच सापडून येईल. तेव्हा येथें धान्य मुळींच पिकत नव्हतें, हें ह्मणणें जरा चुकींचे दिसतें, हें पुनः सांगणें नलगे. ह्याच वर्षी **पोर्टुगीजां**चा ह्या बेटांत प्रवेश झाला व इ. स. १५३० त हें बेट **मुसलमान** राजाकडून त्यांचे कांहीं नाजुक काम केल्यामुळें त्यांस बक्षिस मिळालें.

४२. इ. स. १५३३[१] त **पोर्टुगीजांचा व्हाईसराय ननोडा कुन्हा** ह्यानें **वसई** जिंकून घेतल्यावर त्यांने **वसईचे** आठ भाग केले होते. त्यांत **मुंबई** मोडत असे. **मुंबई** बेटाचा राज्यकारभार उत्तम रीतींने चालावा म्हणून ह्याचे निरनिराळे भाग केले होते. ह्या वेळीं **मुंबई** काय ती **अपालो**[२] (पालव) बंदरापासून **महालक्ष्मी**पर्यंत व **गिरगांवा**पासून **उमरखाडी**पर्यंत

---

१. After its formal cession in 1533 Bombay was rented in perpertuity to Gartia d' Orta, a Lisban Physican, known for his Dialogues on Indian Simples. *Bombay Gazetteer, Thana.*

**भावार्थ.**– ह्या वेळी **मुंबई गार्शिआ डी ओर्टा** ह्यास निरंतरच्या भाड्यानें दिली होती. हा गृहस्थ लिस्बन येथील वैद्य असून त्यानें **हिंदुस्थानां**तील वनस्पतीवर ग्रंथ लिहिला होता ह्मणून तो फार प्रसिद्ध झाला होता.

२. ह्या बंदराचें सरकारी नांव **वेलिंगटन पायर** असें आहे. परंतु तें कधींच प्रचारांत येत नाहीं. 'अपालो' हे नांव संस्कृत 'पल' व मराठी 'पालो' (मासे) ह्या शब्दांपासून निघालें आहे असें ह्मणतात. ह्या विषयीं सर **मायकेल वेस्ट्राप** साहेबांचे असें ह्मणणें आहे कीं :-

" Polo, a corruption of Palwa, derived from Pal, which, interalia means a fighting vessel, by which kind of craft the locality was probably frequented. From P'alwa or Palwar, the bunder now called " Pallo" is supposed to take its name. In the memorial of a grant of land, dated 5th December 1743, by Government to Essa Motra, in exchange for land taken from him as site for part of the fort walls, the P'akhade in question is called Pallo." *Meclean's Guide to Bombay.*

**भावार्थ.**– **'पालवा'** हा **'पोलो'** ह्या शब्दाचा अपभ्रंश असून 'पाल' शब्दापासून निघाला आहे. 'पाल' ह्या शब्दाचा दुसरा कांहीही अर्थ असला तरी, त्याचा 'लढाऊ जहाज ' असा अर्थ होतो व हाच अर्थ खरा आहे; कारण ह्या प्रकारचीं गलबतें ह्या किनाऱ्यावर फार येत असत. व ह्याचवरून हल्लींचे 'अपालो' ('पालो' 'पालव') हें नांव प्रचारांत आलें असावें. **इसामोत्रा** ह्यास इ. स. १७४३ चे ५ वें डिसेंबरास किल्ल्याच्या भिंतीकरितां त्याच्यापासून जी जमीन मोबदला घेतली आहे, तिजबद्दल त्यास सनदपट्टा करून दिला आहे त्यांत त्या पखाडीला 'पालो' असें म्हटलें आहे.

हल्लीं प्रचारांत असलेला 'पालवाचा रस्ता' (ह्या बंदरावर जाण्याचा रस्ता) ह्यासही सदहू बंदरावरुन हें नांव पडलें असावें. कारण ज्या वेळीं पालव बंदरावर जाण्याचा हाच एक रस्ता होता. कित्येकांचा असा तर्क आहे कीं, हें नांव **'अपालो'** ह्या **ग्रीक** लोकांच्या देवतेपासून ह्या बंदरास मिळालें असावे.

होती. **माजगांव, माहीम, परळ, वरळी,** वगैरे आसपासचीं गांवे ही **वसई**च्या अमलाखालीं असलेल्या **मुंबई**च्या भागापैकीं लहान लहान खेडीं होतीं.

४३. इ. स. १५१४ चे सुमारास ठाण्याचे बंदरांत फारच थोडा व्यापार चालत असे. **घांट** आणि **कोंकण** ह्याच्यामध्यें जो व्यापार चाले तो फक्त **चेऊल** आणि **दाभोळ** किंवा, खुष्कीच्या मार्गानें **सुरत** आणि **रांदेर** ह्या ठिकाणीं चालून सदहू ठिकाणीं इतर सर्व जातीचेही मालाचा व्यापार मोठा चाले. त्याचप्रमाणेंच **वसई** ही सुद्धां व्यापाराची मोठी जागा होती; परंतु, येथें माल **मलबार** किनाऱ्यावरून मात्र येई. ह्याच सुमारास **ठाणें, माहिम व मुंबई** (येवढ्या भागास **ठाणामयांबू** हे नांव होतें) हीं मोठीं बंदरें असून तेथें व्यापारही बराच चालत असे. असेंही समजण्यात येतें की, इ. स. १५००-१६७० ह्या दरम्यान **मुंबई**त धान्याचा पुष्कळ व्यापार चाले.

४४. इ. स. १५३२ त जेव्हां **पोर्तुगीज** लोक येथें आले त्यावेळी हें शहर अगदी गलिच्छ स्थितींत होतें. **मुंबई हायकोर्टाचे** मुख्य न्यायाधीश सर **मायकेल वेस्ट्राप** ह्यांनी एका ठिकाणी असें ह्मटलें आहे की, ह्या वर्षी जो **वसई**चा तह झाला आहे त्यांत **मुंबई**चें नांव सुद्धां नाही. डाक्तर **डा कुन्हा** ह्यांचे ह्मणणें असें आहे की, त्या वेळी ह्या बेटांत कायतें एकच **कालपादेवी** (काळबादेवी, कालिकादेवी ?) चें खेडें होतें.

४५. **दवणे**पासून **करंजा**पर्यंत सर्व किनारचा मुलुख **पोर्तुगिजां**च्या हस्तगत झाल्यादिवसापासून ह्मणजे सुमारें इ. स. १५६० पासून, त्यांनी त्यांच्या **ठाण्या**च्या राज्याचे **दमण** आणि **वसई** असे दोन भाग केले होते. **दवणेंत-संजाण, डहाणु, तारापुर आणि माहिम; आणि वसईत-आसेरी, मनोर,** खुद्द **वसई** किंवा **सायवाण, साष्टी, मुंबई, बेलापूर** किवा **शहाबाज** आणि **करंजा** ही गावें मोडत असत.

४६. इ. स. १५४८ त **मुंबई** ही एका **मेस्टी डि आगो** नामक पोर्टुगिजास भाड्यानें मिळाली होती व ती त्याजकडे दोन वर्षांपर्यंत होती, व त्याबद्दल

त्यास सालिना १,४३२ १/२ परडो[१] भाडें द्यावें लागत असे. पुढें पुनः इ. स. १५५०[२] त **डा. गार्शिआ डी ओर्टा** ह्यास वर ह्मटलेल्या भाड्यानें **मुंबई** मिळाली व ती त्याजकडे इ. स. १५७२ पर्यंत होती.

४७. **मुंबईचा किल्ला.**– हल्लीं ज्या ठिकाणी काळा किल्ला (आरसेनल) आहे त्याठिकाणी इ. स. १६३४ त एक लहान खेडें होतें. ह्या वेळीं **मुंबई**च्या मालकास **वझादोर** असें म्हणत. ह्या खेड्यांत वस्ती म्हटली ह्मणजे बायका मुलांसुद्धां ११ युरोपिअन, व ५९ हत्यारबंद शिपाई एवढीच असून तेथेंच कपतान राहत असे. सदर्हु किल्ल्याच्या पलीकडे काही अंतरावर एक देऊळ व एक घर अशा दोन इमारती होत्या. इंग्रजांस **मुंबई** मिळाली तेव्हां सुद्धां त्यांचे गव्हर्नर ह्याच किल्ल्यांत राहत असत. हल्लीं ज्यास ओल्ड (जुनें) सेक्रेटारिएट ह्मणतात तें हेंच असावें असें वाटतें. कित्येक असें सांगतात कीं, ह्या इमारतीच्या जागेवर पूर्वी एक मोठें तळें असून तें **मि. व्हाईटहॉल्** ह्यानें बुजवून ती जागा इ. स. १७६४ मध्ये सरकारास १,४५,००० रुपयांत विकली.

४८. पुढें हळुहळू किल्ल्याच्या पलीकडे वस्ती वाढत चालली. ह्या किल्यास इ. स. १६६९ त बांधण्यात सुरवात होऊन तो **चार्ल्स बून** नामक गव्हर्नराचे कारकीर्दीत ह्मणजे इ. स. १७१६ त बांधून पुरा झाला. ह्या किल्ल्याने सभोंवतालचे खंदक खणण्याकरितां **मुंबई**तील त्या वेळच्या श्रीमान लोकांनीं मिळून ३,३५,००० रुपये **कंपनी सरकारास** दिले होते.

---

१. हे **'परडो'** हल्लीं कोणत्या नाण्याबरोबर आहेत हें निश्चयात्मक कळत नाहीं; परंतु, सोन्याचें **'प्यागोडा'** नामक जें नाणें आहे त्याजबरोबर म्हणजे सुमारें ३½ रुपयांबरोबर ह्या **परडो**ची किंमत असावी असें अनुमान आहे. कित्येक असेंही ह्मणतात कीं, ह्या **'परडोची'** किंमत ८ आण्यांबरोबर आहे.

Two Pardaos to a rupee. *Bombay Gazetteer-- Thana.*

**भावार्थ**— २ परडो म्हणजे एक रुपया.

२ **मुंबई** गझेटीअर **ठाणें** ह्या पुस्तकांत इ. स. १५३३ हा शक आहे तो वर पृष्ठ २४ येथें दिलाच आहे.

हा किल्ला फार विस्तीर्ण[१] असून, ज्यास हल्ली **'फोर्ट'** म्हणतात, तितकी सर्व जागा त्यानें व्यापिली होती; परंतु आज मितीला त्याची जी कांहीं थोडी बहुत तटबंदी दृष्टीस पडते तिजवरून मात्र पूर्वी तेथें किल्ला होता असें अनुमान करतां येतें; एरव्हीं पाहूं गेलें असतां, तेथें पूर्वी किल्ला होता कीं नव्हता, ह्याचें अनुमान करण्यास सुद्धां कांहींच आधार मिळत नाहीं. ह्या किल्ल्यास ५ दरवाजे[२] होते ते दक्षिणेस–२ **मरीन गेट**; पश्चिमेस– **अपालो**, आणि **चर्च गेट**[३]; उत्तरेस–**बजार गेट**; मिळून पांच. हल्लीं राहिलेल्या किल्ल्याचा भाग **कस्टम हौस** व **टौन हॉल** ह्यांच्या दरम्यान असून त्याच्या भिंती समुद्राचे बाजूला पाहण्यांत येतात. येथें मुख्य पाहण्यासारखी गोष्ट अशी आहे की, सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत राजचिन्हांकित निशाण फडकत असतें. ह्यासच इंग्रजांचा झेंडा ह्मणतात. येथेंच उंच असा एक मनोरा असून त्याजवर एक घड्याळ बसविलेलें आहे. ह्या घड्याळावर एक वेळादर्शक मोठा गोळा असून तो दररोज बरोबर एक वाजतां खालीं पडतो, आणि हा गोळा पडला ह्मणजे नवें **सेक्रेटारिएटच्या** समोर समुद्रकिनारीं ठेवलेल्या तोफेला सरबत्ती देतात. ह्याच तोफेच्या वेळाबरोबर शहरांतील लोक आपापलीं घड्याळें लावतात. रात्रीस नऊ वाजतां अशीच एक तोफ होते. सदहु घड्याळाचा व **कुलाबा** येथील **वेधशाळे**चा विद्युल्लतेच्या तारेच्या योगानें संबंध जोडला आहे. किल्ल्याच्या तटबंदीच्या आंतील प्रत्येक भिंतीच्या बाजूची जागा ३०० फुट आहे. **कस्टम हौस** व **टांकसाळ** ह्यांच्या दरम्यान म्हणजे **टौन हॉल**च्या पाठीमागें **आरसेन**ल आहे. त्यांत तोफगोळे व इतर लष्करी सामान असतें. **इंग्लंड** वगैरे देशांतून येणाऱ्या आगबोटी व तिर्कटी तारवें वगैरे आल्याची लोकांस माहिती होण्यासाठी ह्या किल्ल्यावर बावटे उभारतात;

---

१. The area of the castle proper is about 20,903 square yards while that which is outside near the Town Hall is about 28,319-- *Book of Bombay.*

**भावार्थ**--खुद्द किल्यानें २०,९०३ चौरस वार जागा व्यापिली आहे; पण टौनहालाजवळ जी किल्ल्याची जागा आहे ती २८,३१९ चौरस वार आहे.

२. **मुंबई** गझेटीअर– **ठाणें**.

३. ह्यासच **'पवनचक्कीचा दरवाजा '** **असें म्हणत.**

ते त्या त्या देशच्या चिन्हांनी युक्त असे असतात. सदर्हु किल्ल्याच्या संबंधानें ही एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, हल्लीं किल्ला मुळींच नाहीं तरी, आज मितीपर्यंत **सेक्रेटरी** ऑफिसांत सर्व सरकारी कागदांवर **'बांबे क्यासल'** (मुंबईचा किल्ला) असा पत्ता लिहितात.

४९. इ. स. १७४१-४२ सालीं ऑनरेबल **स्टिफन ला, मुंबईचे** गव्हर्नर, यांनी शहरांत व्यवस्था राहून शहराचा उत्तम रितीनें बंदोबस्त रहावा ह्मणून शहरभर टिमकी पिटवून व जागोजाग जाहिरनामे[१] लावून प्रसिद्ध केले होते, त्यांतील आशय येणेंप्रमाणें :—

मिस्तर **रॉबर्ट राडन** आणि **थामस स्टोनह्याम** ह्यांस सर्व शहरांत घरवाले किती आहेत; कोणकोणत्या जातीचे आहेत; त्यांची वर्तणूक कशी आहे; ते ह्या शहरांत किती दिवस राहत आहेत; व प्रत्येकाच्या कुटुंबांत किती माणसें आहेत ह्या सर्व गोष्टींची नोंद घेण्यास नेमण्यांत आलें आहे. तसेंच त्या प्रत्येकाजवळ हत्यारें व दारुगोळा किती आहे ह्याचाही ते तपास करतील, ह्मणून ह्या जाहिरनाम्याच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून कोणीही आपणाजवळ हत्यार-मग तें कोणत्याही प्रकारचें असलें तरी-किंवा दारुगोळा गव्हर्नराच्या परवान्यावांचून बाळगूं नये.

**अपालो, चर्च** आणि **बजारगेट** हे तिन्ही शहराचे दरवाजे (गेट) सूर्यास्तानंतर अर्ध्या तासानें बंद केले जातील व कांहीं दिवस पर्यंत प्रत्येक दरवाज्यापुढे सूर्यास्त होण्यापूर्वी पाव तास व सूर्यास्तानंतर पाव तास लोकांस कळण्याकरतां प्रत्येक दरवाज्यावर नगारा वाजविला जाईल; पण पुढें **बाजारगेट**च्या रस्त्यावर मोठी घंटा; तशाच इंग्लिश चर्च व किल्ला येथील मोठ्या घंटा वाजविल्या जातील. हा घंटारव झाला कीं शहरांत राहणाऱ्या लोकांनी लागलेंच आपापल्या घरचा रस्ता धरला पाहिजे, व शहराबाहेर राहणाऱ्या लोकांनी घंटा वाजून पुरी झाली नाही तोंच शहराबाहेर गेलें पाहिजे. ह्या वेळानंतर कोणत्याही घरवाल्यानें कोणत्याही कारणावरून परकी लोकांस गव्हर्नर, किंवा त्याच्या ऐवजीं जो काम पहात असेल, त्याच्या परवानगीशिवाय आपल्या घरांत राहूं देऊ नयें. **मांडवी** बंदर आणि **मोदीबे** येथें व्यापारानिमित्त असलेल्या जाहजावरील लोकांनी दरवाजे बंद होण्यापूर्वीच आपापल्या

१. Selections from State Papers, Bombay, Vol. I.

जाहजावर गेलें पाहिजे. तसेंच कोणत्याही परराष्ट्रीय जाहजावरील **'नाखोदा'** किंवा दुसरे लोक ह्यांनी गव्हर्नराच्या हुकुमावांचून बंदरांत राहूं नये, ह्या मितीपासून पुढें कोणासही शहरांत घर बांधणें झाल्यास तें त्यानें गव्हर्नर आणि 'ल्यांड पेमास्तर' (फजिनदार) ह्यांच्या परवानगीवाचून बांधूं नये. सदर्हु परवाना मिळल्यावर 'इंजिनिअर' ज्याप्रमाणें 'प्लान' (नकाशा) काढून देईल व जेवढी जागा आंखून देईल तेवढ्या जाग्यांत त्या नमुन्याबर्हुकुम घर बांधावें. ह्या त्याच्या मेहनतीबद्दल इंजिनिअरानें कौलारू घर असलें तर, पांच रुपये आणि झापांचे असलें तर, एक रुपया ह्याप्रमाणें घरवाल्याकडून फी घ्यावी; पण, तेंच जर कंपनीच्या नोकरांचे घर असेल तर, त्याच्या मेहनतीबद्दल त्यास कांहींही फी मिळणार नाहीं. हा इतका सर्व बंदोबस्त करण्याचें कारण शहरांतील रस्ते चांगल्या रीतीनें रहावे हेंच होय.

बंदर आणि **मरीनयार्ड** ह्यांमधील पश्चिम बाजूकडील रस्ते व तेथील इतर रस्ते व तेथील लोकांच्या घराच्या परसाचे दरवाजे सूर्यास्ताबरोबर बंद झाले पाहिजेत. व ज्या कोणांस संध्याकाळी येणेंजाणें असेल त्यानें सदर्हु जुन्या बंदराच्या रस्त्यानें मात्र आलें गेलें पाहिजे; परंतु **मरीनहौस** आणि जुनें बंदर ह्यांचे दरवाजे रात्रीस बरोबर दहा वाजतां बंद करूं नये असा ज्या दिवशीं हुकूम असेल, तो दिवस खेरीज़ करून हे दरवाजे नित्य दहा वाजतांच बंद केले जातील.

५०. ज्या वणजारी लोकांच्या जोरावर शहरांतील व्यापार मुख्यत्वें चालत असे त्या वणजारी लोकांनी सरकारास अशी भीति घातली कीं, आमचें व आमच्या मालमत्तेचें संरक्षण सरकारच्यानें जर होत नसेल, तर आह्मी शहर सोडून जाऊं. ह्या त्यांच्या भीतीमुळें सदर्हु जाहिरनाम्याची कलमें त्यांस लागू केलीं नव्हतीं. पण पुढें कांही दिवसांनीं त्यांतलीं कलमें अमलांत न आल्यामुळें हा जाहिरनामा नामशेष मात्र होऊन राहिला.

५१. ह्या जाहिरनाम्याप्रमाणें सदर्हु गव्हर्नराचा आणखीं दुसरा एक जाहिरनामा तारीख ११ माहे फेब्रुआरी सन १७४१-४२ रोजीं लागला होता. त्यांतील मतलब असा होता :—

शहराच्या भिंतीपासून ३०० यार्ड अंतरावर जे सधन आणि अब्रूदार लोक राहत आहेत, त्यांची शहरांत येऊन राहण्याची इच्छा असल्यास, ह्या

जाहिरनाम्याच्या मितीपासून तीन दिवसांच्या आंत त्यांनी मिस्तर **जॉन मोरले,** ल्यांड पेमास्तर, ह्यास आपली इच्छा प्रदर्शित करावी; त्यांस आपलीं नांवें द्यावीं; आणि आपल्या कुटुंबात किती माणसें आहेत वगैरेची सविस्तर माहितीही द्यावी. सदर्हु मिस्तर **मोरले** आपल्या पसंतीस येईल अशा गृहस्थांस त्यांस पुरे इतकी व सोईची अशी जागा देतील.

५२. पूर्वी मैदानाच्या उत्तरेस पूर्वेकडील भाग म्हणजे सुमारें हल्लीं जेथें **जुमा मशीद** आहे तेथपर्यंत आणि **मांडवी, उमरखाडी, भुलेश्वर,** इत्यादि भाग पुरातन काळापासून वसलेले दिसतात. पण पश्चिमेकडील म्हणजे साधारणतः **धोबीतळें, गिरगांव, चौपाटी, शेतवळी** इत्यादि भाग इ.स. १८०६ पर्यंत देखील फार वसलेले नव्हते. मैदानात इ.स. १७२५ पूर्वी एक पीठ दळण्याची पवनचक्की होती, परंतु ती कोणी बांधली व तेथून केव्हां काढिली ह्याचा पत्ता लागत नाही. ज्या ठिकाणी पूर्वी मैदानांत गुरें चरत असत तो मैदानाचा पूर्व भाग होय. येथील वस्ती इ.स. १७०७ मध्यें मोडून मैदान साफ खुलें केलें; पण पुनः तेथे हळु हळू इमारती होत चालल्या आणि हल्लीं तर, तेथें इतक्या इमारती झाल्या आहेत कीं, मैदानाकरितां मुळींच जागा राहिली नाहीं असें ह्मटले तरी चालेल. **डोंगरी**वर मासे मारणारे कोळ्यांची खोपटीं असत. व त्याच्या पश्चिम बाजूला **माजगांवा**पर्यंत **भंडारी** लोक राहत. **महालक्ष्मी व वरळी** ह्यामधून तों थेट **फल्याट**पर्यंत येऊन **पायधुणी**पर्यंत समुद्राचे पाणी येत असे. ह्या वेळीं म्हणजे १७७२-८४ चे सुमारास **मुंबईचे** गव्हर्नर **हॉर्नबी** हे होते. हे गव्हर्नर जुन्या **कोर्ट हौस** मध्यें राहत. ह्यांनी हें पाणी बंद करण्याविषयीं पुष्कळ प्रयत्न केले. **ब्रीच क्यांडी** येथून समुद्राचे पाणी शहरांत येतें तें बंद केल्यानें शहराची फार सुधारणा होईल, असे मनांत आणून त्यांनी **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** यांजपासून या कामीं ४ लक्ष रुपये खर्च करण्याची मंजुरी मागितली होती; परंतु त्यांनीं ह्याविषयीं आपली संमती दिली नाहीं; तरी देखील त्यांनीं हें काम आपल्या जोखमावर सुरू केलें. कामाची सुरूवात झाल्यापासून त्यांच्या चाकरीची मुदत अवघी दीड वर्ष राहिली होती; तरी

त्यांस आपण हें काम तेवढ्या वेळांत आटपूं अशी खात्री होती. आतां कामाची पूर्तता थोडक्याच दिवसांत होणार इतक्यांत विलायतेहून त्यांस 'सस्पिंड' (संशयावरून तूर्त दूर) केल्याचा हुकूम आला; तरी, त्या हुकूमास न जुमानतां त्यांनीं हें काम पुरें करून मग आपल्या जागेचा **'चार्ज'** (अधिकार) त्याच्या जागीं येणारे गव्हर्नर मि. **बोढ्याम** ह्यास दिला. ह्या त्यांच्या अनन्वित कृत्याबद्दल **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** ह्यांस मोठा राग येऊन त्यांनीं असा हुकूम फर्मावला की, पुढे येणाऱ्या कोणत्याही गव्हर्नरानें विलायतेहून येणारा **'डिसप्याच'** (सरकारी ठरावाचा कागद) स्वतः न फोडतां तो सेक्रेटरींने फोडावा व ही वहिवाट अजून चालू आहे.

५३. हल्लीं ज्यास **एसप्लेनेड** (मैदान) ह्मणतात त्या ठिकाणीं पूर्वी माडांची वगैरे बरीच झाडें होतीं. मध्यभागीं म्हणजे हल्ली जेथें मोठा खुरुस आहे तेथें इंग्रज लोकांचे च्यापेल (देऊळ) होतें. इ.स. १६६१ त ज्या वेळीं **मुंबई बेट** इंग्रजांस मिळालें त्या वेळीं ह्या बेटाची मालकी **डोना इग्नेस डि मिरांडा** हिच्याकडे होती; पण तेव्हांपासून हिचा मालकीचा हक्क ह्या बेटावरून नाहींसा झाला इतकेंच नाहीं तर, तिच्या मालमत्तेचा सुध्दा हक्क **कंपनी** सरकाराने विकत घेतला.

५४. **वस्तीचें मान**.—इ.स. १६६७ च्या सुमारास व त्याच्याही पूर्वी **मुंबईत** लोकवस्ती कमी असल्या कारणानें बरीच जमीन ओसाड होती. ह्मणून येथे राहण्यास जे लोक येत त्यांस पुष्कळ जमीन देऊन वसवीत. पण त्यांजपासून कस्टमचा कर खेरीज करून कोणत्याच प्रकारचा कर घेतला जात नसे. व म्हणूनच आज जी कित्येक लोकांची खासगी जमीन आहे ती अशाच प्रकारें त्यांस मिळालेली असावी. आणि ह्मणूनच ह्या शहरांत इतकी वस्ती नेहमी वाढत गेली.

५५. याप्रमाणें अनेक जातींचे अनेक धंदे करणारे लोक आणून त्यांस उत्तेजन देऊन शहर वसविलें. पुढे जेव्हां लोकवस्ती फारच वाढली व सर्व जागा वसाहत करण्यास येणारे लोकांनी व्यापून टाकिली आणि सरकारास जागा मिळेनाशी झाली असें झालें, त्या वेळीं त्यांनी इ.स. १८०६ सालीं **हरजीवन लालाची बाग** ह्या नावाने प्रसिध्द असलेली कांही कोटांतील

जागा माजी पारशी गृहस्थ मि. **आरदेसर खरशेटजी दादी** ह्यांज पासून घेऊन तिच्या मोबदला त्यांस **साष्टी**तील **मालाड, मागाठणें तुळशी, आरा, एकसर व कान्हेरी** हीं गांवे दिलीं. तसेंच इ.स. १८०९ सालीं माजी **मि. होरमसजी बमनजी वाडिया** ह्यांस मुंबईत **अपालोगेट** जवळ असलेली त्यांची जागा घेऊन तिच्या मोबदला त्यांस **कुरलें, मोहिली, कोले कल्याण, मरोळ, शहार, असालया** आणि **पारजापूर** हीं साष्टींतील गांवे दिलीं. इ.स. १७४३ त **इसा मोत्रा** ह्याजपासून सरकारानें कांही जमीन मोबदला घेतली आहे; तसेंच हल्लींच्या **ग्रीन चौकाच्या** जागेवर वरील वाडियांचे घर होतें, ती जागा व घर सरकारानें विकत घेऊन त्या ठिकाणीं बाग केला. कांही जमीन एक दोन परभु गृहस्थांकडून घेऊन त्यांस तिच्या मोबदला **साष्टीं**त कांही गांव दिले आहेत असेंही समजतें. याप्रमाणे ज्या ज्या वेळीं सरकारास जागेची जरुरी लागली त्या त्या वेळीं तिच्या मालकाकडून कांही जमीन मोबदला अगर विकत घेऊन शहराची सुधारणा करून वस्ती वाढविली.

**५६.** इ.स. १६६७ च्या सुमारास **कोटांत** एक आणि **माहिमास** एक अशीं दोन **कस्टम** (मांडवी) ऑफिसें होतीं व तेथें आयात आणि निर्गत मालावर जकात घेत असत. असाच कर **पोर्टुगीजांचे** अमदानींतही घेण्यात येत असे. गुलामाचाही व्यापार ह्या वेळीं **मुंबईत** चाले. **सिल्हार** वंशातील राजांच्या वेळीं सुध्दां **आफ्रिकें**तील **सोफाला** गांवाहून **ठाणें** व **हिंदुस्थाना**तील इतर ठिकाणी गुलाम येत असत. हे गुलाम फार स्वल्प किमतींत ह्मणजे सगळ्या १५—२० क्रौनांस मिळत. व त्यांस पोटास एकदांच देण्याचें पडे. एक क्रौन ह्मणजे सरासरीनें २।। रुपये होतात.

**५७.** इ.स. १७६८ पूर्वी **मुंबई**तील सर्व श्रीमान लोक **कापाच्या** मैदानांत राहत असल्यामुळे त्या ठिकाणीं मोठमोठ्या हवेल्या व देवळें होतीं. संभावीत लोकांची वस्ती कोटाच्या दरवाज्यापासून मशीद बंदराच्या अलीकडे होती; परंतु **किल्ला** बांधण्याचें काम सुरू झाल्यामुळें **कंपनी** सरकारानें तेथें असलेलीं घरें, देवळें वगैरे इमारती पैसा देऊन मोडून टाकून **कापाचें** मैदान खुल्ले केलें. पूर्वी ह्या मैदानांत धोबीलोक कपडे धुण्यास येत; परंतु हल्लीं **महालक्ष्मी** येथील रेलवेच्या स्टेशनाजीक **धोबी घांट** म्हणून त्यांस

सरकाराने जागा करून दिली आहे, तेथें बहुतेक सर्व परीट शहरांतील लोकांचे कपडे धुण्यास नेतात. हल्लीं असेंही ऐकण्यांत आलें आहे की, **आंधेरी** आणि **वांद्रे** ह्या दोन रेल्वेच्या स्टेशनांमध्ये जें एक **इरलें पाडलें** ह्मणून नवें स्टेशन बांधीत आहेत, तेथें हा घांट बांधून परटांस सोई करून देण्यात येणार आहे.

५८. **कर वगैरे**—इ.स. १६७५ त **मुंबईचें** उत्पन्न १,०७,००० **सराफी** होतें. इ.स. १६८८ पासून **मुंबईत** घरपट्टी सुरू झाली, त्या वेळीं घराच्या मानानें १ पासून २।। शिलिंग पर्यंत कर बसविण्यात आला. इ.स. १६७० पर्यंत **मुंबईमध्ये** जी **पोर्तुगिजां**ची रयत होती तिजपासून जमिनीच्या उत्पन्नातून १/४ कर घेण्यात येऊं लागला. ही वहिवाट मि. **आंजिअर** यांनी मोडून तिच्या बद्दल भाड्यापोटीं सालिना २० हजार रुपये **पोर्तुगिजांनी** द्यावे असें ठरविलें. ह्यामुळे इ.स. १६८९ सालीं **पोर्तुगिजांनी इंग्रजांच्या** सैन्यांत नोंकरी करण्याचें नाकारिलें. पुढल्या वर्षी **जेसुईट** लोकांच्या ताब्यांत असलेली जमीन, त्यांनी **सिद्यास** मदत केली ह्या आरोपावरून त्याजपासून काढून घेऊन आपल्या राज्यास मिळविली. ह्या वरून **मुंबईतील** सर्व **पोर्तुगिजांनी** आपल्या राजास ह्या जुलमाबद्दलचें गाऱ्हाणें केलें. ह्या त्यांच्या अर्जामुळे **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** ह्यांनी इ.स. १६९२ त **लंडन** येथील **पोर्तुगिजांचे** वकिलास असें कळविलें की, जमिनीवर त्यांचा मुळींच हक्क पोंचत नाहीं. एवढेंच नाही; तर त्यांजपासून लष्करी कामांतही मदत घेतली जाईल. असा जबाब **पोर्तुगिजांस** देऊन इकडे आपल्या **मुंबईच्या** गव्हर्नरास असें सुचविले की, जे कोणी खरोखर निरपराधी असतील त्यांस त्यांची जमीन परत द्यावी, आणि त्यांस विनाकारण त्रास देऊं नये. **आयव्ही** साहेब असे ह्मणतो कीं, इ.स. १७५४ त प्रत्येक नारळीचे झाडामागें २० शिलिंग कर घेण्यात येत असे आणि ह्याप्रमाणे जमलेला पैसा सैन्याचे व आरमाराचे संरक्षणाकरितां खर्च होत असे. इ.स. १८४४ त[1] **'टौन ड्यूटी'** बंद करून इ.स. १८४८ त सर्व निर्गत मालावरील जकात काढून टाकण्यांत आली.

---

१. मुंबई गझेटीअर, ठाणे.

५९. **मुंबईचे निरनिराळे भाग व तेथील उत्पन्न**—इ.स. १७२०—३९ सालांत **मुंबईचे मुंबई** आणि **माहीम** असे दोन भाग (कसबे) होते असें समजते. शिवाय **मांजगांव, वरळी, परळ, वडाळें** (परळ आणि माटुंगे ह्यांच्यामध्यें) **नायगांव,** (वडाळ्याच्या दक्षिणेस आणि परळच्या उत्तरेस), **माटुंगे, धारावी** आणि **कुलाबा** (कोळ्यांचे बेट) असे आठ पोटभाग होते. ह्यांत सात लहान लहान खेडीं होतीं; पैकी **अयवारी** आणि **गवारी** अशीं दोन **वडाळ्यांत; बामणवाळी**[1] आणि **कोल्टेम**[2] **धारावींत;** आणि **भोईवाडा; पोमाला** आणि **शालगाडो** अशीं तीन **परळांत;** ह्यांत **कोळ्यांचीं** राहण्याचीं ठिकाणें पांच :—**मुंबई, माजगाव, वरळी, परळ** आणि **शींव, माटुंग्याचे** उत्तरेस **केम**[3] येथें एक व **शिवरी, वडाळें** मिळून २ एकूण तीन मिठागर होते. ह्या वेळीं **मुंबईच्या** निरनिराळ्या भागांचे उत्पन्न खालीं दिल्याप्रमाणे होतें :—

खुद **मुंबईचे**[4] उत्पन्न ४०,००० नारळीपासून व कांहीं शेत जमिनीपासून.

**माहिम**— " ७०,००० " व ५९२ मुडे भातापासून.

**माजगांव**— " १८४ मुडे भातापासून व २५० खजुरीचे झाडांपासून, मिळून सालिना ४,००० सराफी.

**वरळी**— ३४ मुडे धान्यापासून ७,००० सराफी.

**परळ** (तीन खेडीं मिळून) १५४ मुडे भात आणि खजुरीचे उत्पन्न ४,००० सराफी.

---

१. **'ब्राह्मण आळी'** ह्या शब्दाचा अपभ्रंश **बामण वाळी, बामण आळी** असा झाला असावा. ह्या शब्दावरून असें दिसतें की, येथें पूर्वी ब्राह्मण लोकांचीच वस्ती असावी.

२. **कोल्टेम–कोळी** लोकांच्या राहण्याच्या ठिकाणास 'टेंभ' असें ह्मणतात व ह्याच वरून **कोल्टेम** हा शब्द प्रचारांत आला असावा.

३. **ठाणें गझेटीअर** वरून असें दिसतें कीं, ह्याचें नांव **'काऊली'** असावें.

४. हल्लीं खुद्द **मुंबईत** मुळींच शेत जमीन राहिली नाही. हे उत्पन्न कशापासून होतें ह्याचा खुलासा नाहीं.

| | | |
|---|---|---|
| वडाळें (दोन खेडीं मिळून) | ७५ मुडे भात आणि खजुरीचे | १,९०० |
| नायगांव— | ४२ " " | १,००० |
| मादुंगें— | ६५ " " | |
| | १०० खजुरीनें उत्पन्न मिळून | १,७०० |
| शींव— | ५४ " आणि कांही नारळीचे | |
| झाडाचें उत्पन्न | .. .. .. | १,४०० |
| धारावी (दोन खेडीं मिळून) | २३ " आणि खजुरीचे झाडापासून | ६२५ |
| कुलाब्याचें उत्पन्न | ४,०००—५,००० | सराफी. |

६०. मिठागरापासून २,३०० आणि **कोळी** लोकांचे खेड्यांतून ७,००० **सराफी** इतकें उत्पन्न होई. **मुंबईस** १ व **माहिमास** १ अशा दोन दारू गाळण्याच्या भट्ट्या होत्या. उत्पन्नाची दुसरी बाब ह्मटली म्हणजे **मुंबई आणि माहिम** येथील कस्टमऑफिसें (मांडवी) यांपासून ५२,००० सराफी; तंबाकूवरील जकात १९,००० सराफी; दारुवरील जकात १२,००० सराफी; भाडें ३,००० सराफी; **माहिम** येथें फिरणाऱ्या होड्यांपासून १,२०० सराफी; ह्मणजे साधारण १,६०,००० सराफी **मुंबईचें** उत्पन्न होई.

६१. **उत्पन्नाच्या बाबी**—इ.स. १६६७ त ह्मणजे सर **जरव्हीस लुकस** ह्यांचे कारकीर्दीत **मुंबईचें** उत्पन्न २,८८३ पौंड; आणि स. १६६८ त गव्हर्नर **ग्यारे** ह्यांच्या कारकीर्दीत ६,४९० पौंड, १७ शिलिंग ९ पेन्स ह्मणजे ७५००० सराफी[१] इतकें होतें. **ब्रूस** साहेब यांनी आपल्या "**अनाल्स ऑफ् ईस्ट इंडिया कंपनी**" नामक पुस्तकात **सदर्हु** उत्पन्नाच्या बाबतींचा तपशील दिला आहे तो येणेप्रमाणें :—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **माजगांवचें** उत्पन्न— | सराफी | ९,३०० | ० | ४० |
| **माहिम**— " | " | ४,७९७ | २ | ४५ |
| **परळ**— " | " | २,३७७ | १ | ५६ |
| **वडाळें**— " | " | १,७३८ | ० | ४० |

१. **मंथ्ली मिसलेनी ऑफ् वेस्तर्न इंडिया** ह्या पुस्तकावरून असें समजतें कीं, २२ शिलिंग ६ पेन्स अगर हलींच्या ११ रुपयां बरोबर १३ सराफी आहेत. ह्या सुमारास सराफी हें चलनी नाणें असून 'बझरुक' हे तांब्याचें नाणें होतें.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शींव– | ” | ” | ७९० | ० | ६० |
| वरेळी (वरळी?) | ” | ” | ५७१ | १ | ३४ |
| मुंबई– | ” | ” | ६,३४४ | २ | ६१ |
| | | | २५,९२० | १ | १८ |
| तंबाकूचें उत्पन्न– | ” | ” | ९,५५० | ० | ० |
| दारूचें उत्पन्न– | ” | ” | २,४०० | ० | ० |
| कस्टम (मांडवीचें) | ” | ” | १८,००० | ० | ० |
| नारळांचें उत्पन्न | ” | ” | १८,००० | ० | ० |
| | | | सराफी–७३,८७० | १ | १८ |
| किरकोळ– | ” | ” | १,१२९ | १ | ६२ |
| | | | एकूण सराफी–७५,००० | ० | ० |

६२. हें बेट **कंपनी** सरकारच्या ताब्यात आल्यावर त्यांनी ते सुधारण्याकरितां जे कायदे केले त्यांतील मुख्य गोष्टी ह्या होत्या :–

(१) **मुंबई**चा किल्ला चांगला मजबूत बांधून काढावा; (२) शहर मोठें टुमदार करावें; (३) मुख्यत्वेंकरून इंग्रज लोकांस येथें वसाहत करण्यास उत्तेजन द्यावें व त्यांजपासून पांच वर्षे पर्यंत कोणतीही जकात घेऊं नये; (४) रयतेस कोणत्याही कारणावरून नाखुश न करितां जमाबंदीची सुधारणा करावी; (५) **प्रॉटेस्टंट** धर्माच्या लोकांस चांगल्या रितीनें वागवावें; परंतु, इतरधर्मी लोकांवर विनाकारण कोणत्याही प्रकारचा धर्मासंबंधी दाब ठेऊं नये; (६) कापसाचा व रेशमाचा धंदा करणारे लोकांस उत्तेजन द्यावें व त्यांस माग पुरवावे आणि (७) एक बंदर बांधून त्यांत गोदी करावी.

६३. **मुंबईच्या व्यापाराची शोचनीय स्थिति** :– इ.स. १६९४ त **मुंबई**ची अगदीं निकृष्टावस्था झाली होती; कारण त्या वेळीं व्यापार अगदीं बसून जाऊन उत्पन्नही ५२,०८० रुपयांवरून १४,१६० रुपयांवर येऊन बसलें; नारळीचेंही उत्पन्न बंद झालें; आणि सर्व सैन्यांत कायते १०० युरोपिअन

राहिले. ह्याप्रमाणे **मुंबई**ची स्थिति उत्तरोत्तर बिघडत जाऊन पुढे दोन वर्षांनीं ह्मणजे इ.स. १६९६ त पैशाच्या कमताईमुळें सरकारास सैन्यातून ६० खिस्ती व ३४० काळे अम्मलदार कमी करावे लागले.

६४. इ.स. १६९७ त **मुंबई**च्या सैन्यात सगळे २७ युरोपिअन उरले होते. पुढें इ.स. १७०१ मध्ये जरी **माहिम** आणि इतर ठिकाणीं थोडथोडें सैन्य वाढविण्यांत आलें, तरी एकंदरीच्या मानानें पाहिलें तर, सैन्याच्या संबंधाने ह्या वेळीं **मुंबई**ची स्थिति फारच वाईट होती. **मराठे, सिद्दी, आरब,** आणि **पोर्टुगीज** हे तर **मुंबई** बळकावण्यास पाहतच होते. आणि योग्य वेळीं ह्या बेटांतील सैन्यास कुमक मिळाली नसती तर, हे बेट **कंपनी** सरकारच्या हातून खास गेलेंच असते. इ.स. १७०२ मध्ये पोर्टुगिजांनीं कट करून **मुंबई**त अन्न सामुग्री येण्याचे मार्ग बंद केले. शिवाय त्यांनीं **मराठ्यां**स आंतून मदत केल्यामुळे हें बेट फारच धोक्यांत होतें. अशा स्थितींत **मुंबई** असतां एकाएकीं पटकीचा रोग उद्‌भवून शेकडो लोक मेले आणि युरोपिअन लोकांकडेच ह्या बाईची इतकी वक्र दृष्टी होती कीं, वर ह्मटलेल्या कुमकेस आलेल्या सैन्यातून फक्त ७६ युरोपिअन जिवंत राहिले. हा रोग थोडासा शमतो आहे नाहीं इतक्यांत, **मुंबई**च्या बंदरांत एक मोठें तुफान झालें ह्या तुफानांत शेकडोशें गलबतांचा नाश होऊन पिकाचेंही थोडें नुकसान झालें असें नाहीं. ह्याप्रमाणे **मुंबई**ची स्थिति दिवसें दिवस बिघडत गेली, ती पुढे इ.स. १७०५ पासून अमळ सुधरूं लागली. तरी पण, **मुंबई**च्या संरक्षणाकरितां असावें तेवढें सैन्य मुळींच नव्हतें. **सुरते**चा व्यापार बंद झाला आणि **मलबार** किनाऱ्यावरील व्यापाराचा **कान्होजी आंग्रांनें** फार मोड केला. इंग्रजांनी **मुंबई** घेतल्या दिवसापासून पन्नास वर्षांची सरासरी काढली तर, असे अनुमान करतां येईल कीं, **मुंबई** बंदर खेरीज करून **ठाणे** व इतर बंदरे ह्यांचा व्यापार अगदी मंदावत चालला होता. इ.स. १६६४-८४ पर्यंत व्यापार भरभराटीस येऊन मोठ्या विलक्षण तऱ्हेनें वाढत गेला होता, व इ.स. १६८४-८८ पर्यंत पश्चिम **हिंदुस्थान**च्या व्यापारांचे **मुंबई** शहर मुख्य स्थान होतें.

---

१. ह्या संबंधी विशेष खुलासा पुढील भागांत पहा.

६५. येणेंप्रमाणे **मुंबई**च्या जुन्या माहितीची वाचकांस थोडीशी ओळख करून देऊन, आतां पुरातन काळीं मुख्य मुख्य ध्यानांत ठेवण्यासारख्या ज्या गोष्टी झाल्या, त्यांचीही कांहीं माहिती वाचकांस करून देणे अवश्य वाटल्यावरून ती खालीं दिली आहे.

६६. इ.स. १६९१-१७०२ ह्यांच्या दरम्यान **मुंबई**त मोठा वाखा उठला होता, त्या वेळीं इंग्रज लोकांचे पलटणीमध्ये सगळीं ७६ मनुष्यें राहिलीं होतीं व ८०० इंग्रज लोकांपैकी सगळे ८० इंग्रज राहिले होते. ह्यावरून **मुंबई**तील इतर लोक ह्या वेळीं मृत्युमुखीं किती पडले असतील नकळे ! असा ह्या रोगानें **मुंबई**त मोठा कहर उडविला होता !

६७. इ.स. १७९९ त **मुंबई** बंदरांत मोठे तुफान झालें होतें, त्यांत १,००० गलबतें व ४०० मनुष्यें बुडाली असें ह्मणतात. शहरांतही लोकांचे लाखों रुपयांचे नुकसान झालें.

६८. इ.स. १८०३[1] सालीं कोटांत जबरदस्त अग्निप्रलय झाला होता. त्या अग्नीनें घरे, बराकी, **कस्टमहौस**, बाजार वगैरे इमारती जळून खाक झाल्या; लोकांचें लक्षावधी रुपयांचें नुकसान झालें व १/३ गांव जळून खाक झाला. ह्या आगीच्या योगानें जुनि मोडकळ घरें जळून गेल्यामुळें नवीं टुमदार घरें बांधण्यास जागा मिळून ती घरें **फल्याट**पर्यंत येऊन पोंहचली, व त्या मानानें वस्ती फारच वाढली. ह्याच वेळेपासून **भुलेश्वर** व **भेंडीबाजार** येथेंही बरीच वस्ती वाढत गेली.

६९. ह्याच वर्षी **मुंबई**त मोठा दुष्काळ पडला होता. त्या वेळीं **मुंबई**त लोकांस जरी पुरे इतकी धान्यसामुग्री होती तरी, नुसता ५० लक्षांचा तांदूळच बाहेर गांवांहून **मुंबई**त आला. असाच जबरदस्त दुष्काळ इ.स. १८११-१२ ह्या वर्षी पुनः **मुंबई**त पडला होता. ह्या दोन्हीं प्रसंगीं हजारों गोरगरीब लोक प्राणास मुकले ! ह्याच वेळीं हिंदुस्थानांत जेथें जेथें दुष्काळ पडला होता तेथें तेथें **मुंबई**तील व्यापाऱ्यांनी धान्याचा पुरवठा केला. व ह्या दोन्ही वेळीं **मुंबई**त बरेच लोक आले होते.

७०. इ.स. १८३७ त जून महिन्याच्या १५ तारखेस **मुंबई**मध्ये मोठें वादळ झालें होतें, त्या वेळी **मुंबई**त लोकांच्या जिवांचें व मालमत्तेचें बहुत

१. धि मंथ्ली मिसलेनी या पुस्तकांत हा सन १८०२ असा आहे.

नुकसान झालें. असेंच दुसरें वादळ इ.स. १८५४ च्या नोव्हेंबर महिन्यांत झालें होतें.

७१. आतां **मुंबईच्या** हल्लींच्या रचनेविषयीं वाचकांस थोडीशी माहिती करून देऊन हा भाग पुरा करूं.

७२. **कुलाब्या**चे धाकटा, मधला व मोठा असे तीन भाग आहेत. **आर्थर** बंदरापासून **गनक्यारिएज** बंदरापर्यंत धाकटा, पुढें **सेंट जान चर्च**पर्यंत मधला आणि त्याच्यापुढें **दांडी**पर्यंत मोठा. धाकट्या **कुलाब्यास आर्थर** बंदर असून तेथेंच **ग्रांट बिल्डिंग्स्** नांवाच्या प्रसिध्द इमारती आहेत. त्यांच्या मागें मोठमोठ्या गिरण्या व कापसाच्या वखारी आहेत. मधल्या **कुलाब्यास** गोऱ्या पलटणीच्या लैनी, इस्पिताळ, पोर्तुगीज व इंग्रज लोकांची देवळें आहेत. मोठे **कुलाब्यास वेड्यांचे इस्पिताळ व वेधशाळा** हीं आहेत. मोठ्या **कुलाब्या**ची जमीन खडकाळ आहे.

७३. **कुलाब्या**पासून **सेलरहोम** टाकून **अपालोगेट**वरून आलें म्हणजे मनुष्य **कोटांत** येतें. उजव्या बाजूला **डॉक्यार्ड** व डाव्याबाजूला **स्कॉच चर्च** लागतें. ह्या चर्चपासून **रामपोर्टरो**वर **चर्चगेटा**पर्यंत, तसेच **हार्नबीरो**पासून **बाजारगेटा**पर्यंत मोठमोठ्या इमारती लागून गेल्या आहेत. **कोटा**चे दोन भाग आहेत. एक-**स्काच चर्च** पासून **चर्चगेटस्त्रीट**च्या पश्चिम टोंकापर्यंत व तेथून पुढें **क्याथिड्रल चर्च, एलफिन्स्टन सर्कल** आणि **टौनहॉल**पर्यंत व त्याच्या मागून **कस्टमहौस** पासून **डॉक्यार्ड** पर्यंत; व दुसरा–क्याथिड्रल पासून तों थेट **जी.आय.पी.** रेल्वेच्या **विक्टोरिया टर्मिनस** स्टेशनापर्यंत. **कस्टम हौस** पासून **डॉक्यार्ड**पर्यंत बहुतेक युरोपिअन लोकांची वस्ती असून तेथें बहुतकरून सरकारी व सावकारी ऑफिसें आहेत. पुढें **क्याथिड्रल**पासून **बोरीबंदरा**पर्यंत नेटिव लोकांचीं दुकानें वगैरे आहेत. कोटांतील बहुतेक घरें इ.स. १७५८ सालापासून वाढत गेलीं आहेत. कारण त्या वेळीं कोटाची तटबंदी झाली होती त्यामुळें तेथें जाऊन राहणें निर्भय व सुखावह आहे असें लोक मानीत. ह्या सुमारास **क्याथिड्रल**च्या दक्षिणेस **गव्हर्नमेंट हौस** (जुनें सेक्रेटारिएट ऑफिस) जुनें **हायकोर्ट** आणि **कस्टम हौस** एवढ्याच इमारती तेथें होत्या.

७४. **फार्ब्स स्ट्रीट व बाम्बे कासल** (मुंबईचा किल्ला) ह्यांच्या दरम्यान बहुतेक सरकारी ऑफिसें, मोठमोठ्या व्यापाऱ्यांच्या पेढ्या व इतर ऑफिसें होतीं. व युरोपिअन लोकांची ऑफिसें व दुकानें **मेडो**स्ट्रीटमध्यें होतीं; परंतु इ.स. १८६३ साली **बाम्बे ग्रीन** मोडून तेथें **एल्फिन्स्टन सर्कल** केलें. तेथून तों **चर्चगेट**स्ट्रीटपर्यंत व **रामपार्टरो**पासून **एस्प्लेनेड** हॉटेलपर्यंत ऑफिसें व दुकानें वसूं लागलीं आहेत. व आतां तर त्यांचा ह्या ठिकाणीं सुकाळ झाला आहे.

७५. **टौनहाला**नजीक एका बाजूला **बंबखाना** आहे. त्यांत आग विझविण्याची सामुग्री असते. **मुंबईत** अशीं बंब ठेवण्याचीं ठिकाणें बरींच आहेत. **पोलिस** कमिशनरच्या ताब्यांत ११ बंबखाने आहेत. ते शहरच्या मुख्य भागीं असतात. **परळास** गव्हर्नरच्या बंगल्यांत एक बंब असून दर पलटणींत एक एक असे बंब आहेत. हे नेहमीं तयार ठेवितात. आगीची वर्दी लागल्याबरोबर तेथें बंब नेतात. **पोलिस** कमिशनरच्या ताब्यांत असलेल्या बंबांपैकीं **४ स्टीम एजिन्स** (यंत्रानें चालणारे) व **७ म्यान्युअल** (हातानें चालविण्याचे) बंब आहेत. पोलिसच्या ताब्यांतील असणाऱ्या बंबांचा खर्च **म्युनिसिपालिटी**च्या मार्फत होतो.

७६. **कापाच्या** उजव्या बाजूला म्हणजे **फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूट**च्या पुढें व **कारनाक** बंदराशेजारी जें नेटींव पलटणीचें ठाणें आहे त्यास '**बराकी**' म्हणतात. येथे नेहमीं संत्र्यांचा पाहरा असतो. गोरे पलटणींचें ठाणें **कुलाब्यास** असतें. तेथील बराकींत कांही सुधारणा करून त्या वाढविण्याचा हल्ली विचार सुरू आहे. **मैदानां**त शिपायांस कवाईत वगैरे शिकवितात. **मैदानां**तल्या बराकीशेजारीं पलटणींतल्या लोकांकरितां एक हास्पितळ आहे. व गोरे पलटणीच्या लोकांकरितां **युरोपिअन जनरल हास्पिटल** मध्ये सोई केलेली आहे. ह्या बराकी माजी गव्हर्नर **डंकन** साहेब यांच्या कारकीर्दींत बांधल्या आहेत. **काळ्या किल्ल्या**वर असणारा बावटा सकाळीं चढविला ह्मणजे हे लोक लष्करी रितीची सलाम झाडून सुमारें अर्धा तास पर्यंत '**ब्यांड**' वाजवितात. व **न्याशनल आंथेम** गातात. **न्याशनल आंथेम** म्हणजे सार्वजनिक गाणें. ह्या गाण्यांत "ईश्वरा राणीचें

रक्षण कर" असा भावार्थ असतो. असाच प्रकार संध्याकाळीं बावटा उतरवितांना होतो.

७७. **कापा**च्या उत्तर अंगाला **कारनाक** बंदराशेजारीं **क्रॉफर्ड मार्केट, क्लॉथ मार्केट**, **चकला**, त्याच्या पुढें **मुंबादेवी, भुलेश्वर**, त्याच्या पुढें **नळ बाजार, भायखळा** अशीं पाहण्यासारखीं अनेक ठिकाणें आहेत. **क्रॉफर्ड मार्केटां**त भाजीपाला व फळफळावळीचीं दुकानें; **क्लॉथ मार्केटां**त कापडाचीं दुकानें; **मुंबादेवी, काळबादेवी, रामवाडी, भुलेश्वर** येथे मोठमोठ्या सावकारांच्या पेढ्या, इतर दुकानें व देवळें इत्यादिकांची गर्दी दृष्टीस पडते. **नळबाजारां**त किरकोळ किराणा वगैरे माल विकण्याचीं दुकानें आणि भाजी व मच्छीबाजार आणि **भायखळ्या**वर इंग्रज लोकांची वस्ती, दुकानें व हाटेलें हीं आहेत. **भेंडी**बाजाराशेजारीं बाबुल्याचें तळें, व त्याच्या एका बाजूस **नागपाडा**[1]; पुढे **सर जमशेटजी जिजीभाई** ह्यांचे इस्पिताळ. त्याच्या पुढें **डेविडसासून** ह्यानें बांधलेलें **यहुदी** लोकांचे सिनेगाग (देऊळ) हीं आहेत. कापाच्या पश्चिम आंगाला उत्तर दिशेस **धोबीतळें**, **चिराबाजार**, त्याच्या पुढे **ठाकूरद्वार** येथूनच **गिरगांवा**स सुरुवात होऊन ती थेट पश्चिम आंगाला **बाबूलनाथा**च्या देवळापर्यंत, उत्तर आंगाला **ग्रांटरोड** रस्ता आंत येऊन **नळ** बाजारापर्यंत व पूर्वबाजूला **भुलेश्वरा**पर्यंत आहे. **गिरगांवा**पुढें **ताडदेव**-येथें गिरण्या वगैरे अनेक कारखाने आहेत. **ताडदेवा**पुढें **महालक्ष्मी** असून तिच्या दक्षिण आंगाला **वाळुकेश्वर** आहे. येथें हिंदूंची देवळें असून श्रीमान लोकांची वस्ती आहे.

७८. **किल्ल्या**च्या उत्तरेस सुमारें अडीच कोसांवर **परळ** आहे. त्याच्या ईशान्येस अर्धकोसावर **शिवरी**, तिच्या अलीकडे **माजगांव** व **चिंचपुगळी**, **माहिम** हें एक लहानसें गांव असून **किल्ल्या**पासून सुमारें ३ कोसांवर आहे. **माहिमा**स नारळाचें उत्पन्न फार होतें. तेथील नारळ फार प्रख्यात आहेत. तेथील किल्ला लहानच आहे. **माहिम**च्या पूर्व बाजूस **माटुंगे** आहे. येथें

---

१. पूर्वी येथें **नागपंचमी**च्या दिवशीं प्रत्यक्ष **'नाग'** (सर्प) निघून तो लोकांकडून दूध व लाह्या यांचे सेवन करी अशी आख्यायिका आहे. ह्यावरून ह्यास **'नागपाडा'** हें नांव पडलें असावें. हल्ली मुंबईत नवा व जुना असें दोन नागपाडे आहेत.

पूर्वी लष्कराची छावणीं असे. पुढें **शींव**[१], येथे डोंगरावर एक किल्ला आहे. त्याच्याखाली दुसरा एक लहानसा किल्ला आहे, त्यास '**रिवाचा किल्ला**' म्हणतात. **महालक्ष्मी**च्या उत्तरेस **वरळी** म्हणून एक लहानसा डोंगरी गांव आहे. ह्या गावांत टेंकडीवर एक किल्ला आहे. **शिवरी**स लहानसा किल्ला असून त्याच्या शेवटास एक मोठा मिठागर[२] आहे. असेच मिठागर **माटुंग्या**सही आहेत.

७९. **मुंबई**च्या आसपास दहावीस कोसांच्या अंतरावर लहानमोठी दहा पंधरा बेटें आहेत. उत्तरेस सुमारें २४ मैलांवर **वसई** आहे. **वसई**च्या खालीं **साष्टी**-जीस **ठाणें** ह्मणतात ती आहे. **ठाण्या**च्या अलीकडेच **चेम्बुर, वेसावें** व **तुर्भे** हीं बेटें आहेत. व **शींव**चा पूल बांधून **साष्टी** व **मुंबई** ह्यास **तुर्भे** मिळविलें आहे. **तुर्भ्या**च्या आग्नेयेस **घारापुरी, दिवदिवें, शिनाल टेंकडी, खानेरी, हुनेरी** हीं बेटें आहेत. त्याच्या खाली **करंजे** किंवा **उरण** आहे. ईशान्येस **वांदरें,** हें **माहिम**चा पूल बांधून **मुंबई**स मिळविलें आहे. तेथे **मुंबई**ची हद्द पुरी होते.

---

१. ह्यास **शींव** ह्मणण्याचें कारण असें दिसतें की, पूर्वी येथें **मुंबई**ची शींव (सीमा-हद्द) पुरी होत असावी असा तर्क होतो. पोर्तुगिजांच्या अमदानींतही त्यांनी **शींव** हेंच नांव कायम ठेविलें होतें; परंतु, इंग्रजांनी **शींव**चें **सीऑन** (sion) असें नांव प्रचारांत आणलें.

२. मीठ पिकविण्याची कृति अशी आहे कीं, खाडी नजीक जें खांजण असतें त्यांत '**वाफे**' करून आंत पाणी घेतात, ह्यास, हिंदीभाषेंत '**कियारी**' म्हणतात. त्यावर मातीचा '**शिवारा**' देतात. ह्याप्रमाणें वाफ्यांत जमविलेल्या पाण्यावर ऊन्ह पडलें म्हणजे दुधासारखी साई येते व ती आठ पंधरा दिवसांनीं जाड व कठीण होते. हेंच मीठ.

## इतिहास

**मुंबई**च्या संबंधाची उपलब्ध असलेली प्राचीन माहिती व तिची हल्लीची साधारण रचना ह्यांची ओळख मागील भागांत आह्मीं आमच्या वाचकांस थोडक्यांत करून दिली. आतां ह्या भागांत जी **मुंबई**संबंधीं ऐतिहासिक माहिती मिळाली तीही संक्षेपानें त्यांच्या पुढे ठेवितो—

२. बहुत शतकांपूर्वी **मुंबई** आणि तिच्या आसपासचा प्रदेश दक्षिणेतील **राष्ट्रकूट** नांवाच्या राजांच्या अमलाखाली होता असें दिसतें. तसेच, ह्या राजांनंतर पुढें कांहीं वेळपर्यंत **मुंबई** दक्षिणेतील कित्येक बलाढ्य सरदार व नायक ह्यांच्या हातीं होतीं असेंही समजतें. इ. स. १०१८ त हें बेट **टगर** वंशाचे राजाच्या स्वाधीन होतें. पुढे इ. स. १०४७ त त्याच वंशांतील **केशवदेव** राजानें **साष्टी**पैकीं **उत्तन** गांव इनाम दिल्याबद्दलचा लेख उपलब्ध आहे. इ. स. १०९९-११०० मध्ये **हरपाळदेव** राजाने **वेऊर** गांव वगैरे इनाम दिल्याबद्दलचा लेख आढळतो. ह्या लेखावरून **भीमदेवाने माहिमा**स राज्य स्थापन केलें होतें असें उघड दिसतें. **भीमदेव**, ज्यास [1]**बिंबदेव** किंवा **बिंब राजा**ः ह्मणतात तो हाच असावा असा आमचा समज आहे.

---

१. फार प्राचीन काळीं **कोंकणांत यादव**कुलोत्पन्न क्षत्रिय राजे येथे येऊन त्यांनीं येथें राज्य केलें. पुढे **प्रभासक्षेत्रीं यादवां**ची घडामोड होऊन वाताहत झाली, तेव्हां **बौद्ध** लोकांनी ही संधी साधून येथें आपलें राज्य स्थापिलें ; हें त्या वेळचीं जीं नाणीं अजून सांपडतात त्यावरून सिद्ध होतें. त्यांच्या नंतर इ. स. १७८७ सालीं **ठाण्या**चे किल्ल्यांत खणतांना एक ताम्रपट सांपडला, त्याजवर ९३९ (इ. स. १०१८) असा शक असून **सिल्हार** वंशाचा राजा **अरिकेसरीदेवराज** ह्यानें जमीन दान दिल्याचा लेख आहे. ह्यावरून तो सर्व **कोंकण** प्रांताचा राजा असावा असें वाटतें. शके ९४८ (इ. स. १०२७) ह्या वर्षांचाही एक ताम्रपट **भांडपा**जवळ सांपडला त्यावरून असें दर्शित होतें कीं, कोंकणांतील १,४०० गावांचा अधिपति **चिमणदेवराज** हा असून **पुरी** हें शहर त्याची राजधानी होती.

ह्याच राजानें ६६ गावांचा वरील ताम्रपट करून दिला असावा असें वाटतें. **उत्तन** आणि **येवर** (वेऊर ?) येथील कांही जमीन **केशीदेवराज** ह्यानें दिल्याची शिळा आहे, तिजवर इ. स. १०४७ हा शकें आहे. इ. स. १०९९ ह्या वर्षी **हरपाळदेवानें** वरील गावांतील जमीन दिल्याचा दुसरा लेख आहे. **ठाण्यांत** दुसरे जे दोन ताम्रपट पाहण्यांत आलें त्यांजवर शके ११९४ (इ. स. १२७३) आणि शके १२१२ (इ. स. १२९१) ही वर्षे असून **यादव** कुळातील **श्रीरामचंद्र** अथवा **रामदेव** ह्याचा वंशवृक्ष दिला आहे. इ. स. १२९५ त दक्षिणेंत प्रथमतः मुसलमानांनी स्वारी करून **देवगिरी** घेतली, तेथील जो **रामदेव** राजा तो हाच असावा असें **बाथेन**साहेब ह्मणतो. इ. स. ११ पासून १३ शतकापर्यंत **कोंकणांत** लहान लहान बहुत राज्यें असावीं आणि त्यांच्यातील मुख्य राजा **देवगिरी** येथील राजाच्या काही अंशी तरी ताब्यांतला असावा, असें वरील लेखांवरून दिसतें. उत्तर **कोंकणांतील** मुख्य राजा **सिल्हार** वंशांतील असून **साष्टी**तील **पुरी** गांव ही त्याची राजधानी असावी. इ. स. ६०० पासून ११५१ पर्यंत **चालुक्य** वंशाचे राजे **कल्याणा**स अधिकारी असावे. पुढे **देवगिरी** येथील **यादव** कुळाचे राजे **उत्तरकोंकणां**त बलिष्ठ होऊन त्यांनीं **चालुक्य** राजांस माजी पाडले असावें असें अनुमान होतें.

पुढे **सिंहीचा** राजा **रामदेव** ह्याजवर मुसलमानांनी गदा फिरविली तेव्हां तो **पैठणास** आला आणि तेथे **विक्रमभोज** राजाच्या आश्रयाने राहिला. ह्या **रामदेवास** तीन पुत्र होते ; वडील **केशव** ह्यानें **देवगिरी** येथें राज्य स्थापिलें ; दुसरा **बिंबदेव**, हा **उदेपुरासच** राहिला. तिसरा **प्रतापशहा** ह्यानें **अहिनलवाडा** (कडीपाटण) येथें राज्य स्थापिलें. पुढे **अल्लाउदीनानें** **देवगिरी**वर हल्ला करून तेथील सर्व प्रांत आपल्या स्वाधीन करून घेऊन **रामदेवराणा** व **प्रतापशहा** ह्यांस मारून इ. स. १२८८ त आपली सत्ता स्थापन करून **बिंबदेवाचा** पराभव केला, त्यामुळें त्यास आपली राजधानी सोडून **उत्तर कोंकणांत** येणें भाग पडलें. येथें येऊन त्यानें नाईक राजांचा मुलुख काबीज करून **बालापार्डी, चिंचणी, तारापुर असेरी** (अशीरी) **केळवें माहिम, साष्टी** व **मुंबईमाहिम** इत्यादि गांव घेऊन **मुंबईमाहीम** ही मुख्य राजधानी करून आपल्या ताब्यातील सर्व मुलखाचे ४४४ गांवाचे १५ महल करून, त्यांत आपल्याबरोबर आणलेल्या लोकांपैकीं कोणास **केळवें**, कोणास **माहिम**, कोणास **वसई** वगैरे गांवांचा अधिकार देऊन राज्याची व्यवस्था लाविली–असें पुष्कळ आधारांवरून सिद्ध होतें. पुढें **बिंबाने** इ. स. १२९५ त **वसई** (वत्सापूर–गुलछनाबाद) घेतली. पुढें **ठाण्यांचा**

१३ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत **मुंबई** व **माहीम** हीं गावें **भीम** देवाच्या ताब्यांत होतीं ; परंतु, तीं पुढें मुसलमानांनी घेतलीं. इ. स. १२९४ त **अल्लाउदीनानें पैठणास रामदेव** राजा ह्याचा पराभव केला असता, तो पुनः राज्य करूं लागला, इतकेंच नाहीं ; तर, त्यानें आपल्या **भीम**देव नामक पुत्रास **उदेपुर**च्या गादीवरही बसविलें. परंतु, दक्षिणेतील व पश्चिमेकडील मुसलमानांचे प्राबल्य झाल्यामुळें त्यास इ. स. १२९५ मध्ये **सूर्यवंशी** १२ राजे व **सोमवंशी** क्षत्रियांची ६४ कुळे ह्यांस घेऊन आपल्या लष्करासह **गुजराथ** सोडणें भाग पडलें. पुढें तो तेथून जो निघाला तो दक्षिणेतील **नायक** राजांचा पराभव करून **चिंचणी, तारापुर, आसेरी, केळवें-माहिम, थळ** व **मुंबई-माहिम** हीं गावें घेऊन, तेथें आपल्या राज्याची स्थापना करून, त्यातील ४४४ गांवांचे १५ महाल केले आणि त्यांजवर बरोबर आणलेल्या लोकांस नेमलें. **भीम** राजानें **माहिम** वसवून तेथें आपली राजधानी केल्यामुळें त्यास **' माहिम ' ' महिकावती '; ' प्रभावती'** आणि **' भीमस्थान '** अशीं नावें पडलीं होतीं ; पैकीं, **माहिम** हें नांव अजून प्रचारांत आहे. त्याने ह्या बेटाचे **कुलाबा, वाळकेश्वर, वरळी, माहिम, शिवरी, माजगांव** आणि **मुंबई** (पायाधुणीपासून तों कोटापर्यंत) राजा **यशवंतराव** ह्यास ठार मारून **ठाणें** (श्रीस्थानक) आणि **साष्टी** हीं गांवें घेतलीं, आणि **ठाण्यास ' अहिनलवाडा पाटण '** हें नाव दिलें. इ. स. १२९७ त **चेऊल** (चंपावती) चा राजा **भोज** ह्यानें **ठाण्यावर** स्वारी केलीं तींत **बिंबानें** त्यास ठार मारून **चेऊल** आपल्या स्वाधीन करून घेतले. ह्याच संधीस राजा **बिंबानें महिमुंबई (मुंबई-माहिम,)** घेतली असावी–

वर ह्मटलेली **' पुरी '** ही असावी :–

*Puri* the unkonwn capital of *Silharas* (A. D. 810-1260) has been supposed to be **Rajpuri** near **Janjira**. But perhaps the most likely identification **of Puri** is the mora landing or Bandar on the north-east corner of **Gharapuri** or **Elephanta,** where many ancient remains have been found. *Kolaba Gazetteer.*

**भावार्थ–जंजिऱ्या**जवळील **राजपुरी** ही **सिल्हार** वंशांतील राजाची (इ. स. ८१०-१२६०) अप्रसिद्ध अशी (**' पुरीच '** ही) राजधानी असावी ; परंतु, **घारापुरी**च्या ईशान्यदिशेस जें बेट आहे, तेंच बहुतकरून ही **पुरी** असावी. कारण तेथें अजून बरींच प्राचीन कामें आढळण्यांत येतात.

असें ७ भाग[१] केलें होतें. **भीम**देवाच्या पूर्वी **माहिम, मरोळ** व **मुंबई** हीं बेटें **भोंगळी**[२] राजाच्या हाताखालील कित्येक सरदारांच्या ताब्यात होती. ह्याच्या पूर्वी ह्मणजे इ. स. ११५० च्या सुमारास **सोळंकी** वंशांतील एका राजानें **मुंबई**वर चाल केली होती, असेंही कित्येक लेखांवरून समजतें.

३. इ. स. १२९५ त **भीम**राजानें **मुंबई** बेट आपल्या ताब्यांत करून घेतलें, तेव्हांपासून **भंडारी** लोक येथें येऊन राहूं लागले. कांही काळानें **चेउल**च्या राजाच्या पदरी असलेल्या सरदारांनी **भीम**राजास पदच्युत करून तें राज्य आपल्या स्वाधीन करून घेतलें आणि तेथें ते स्वतः राज्य करूं लागले ; परंतु, तें त्यांच्या हातीं फार दिवस राहिलें नाहीं ; कारण मुसलमान लोकांनीं त्यांचा पराभव करून तें राज्य आपल्या स्वाधीन करून घेतलें. पुढे **माहिम**चे राज्य **भोंगळ** राजांच्या हातीं गेलें होतें, तेंही पण फार दिवस टिकलें नाहीं. इ. स. १२९२ त त्यांनी दक्षिणेवर स्वारी केली त्या वेळी **देवगड** (दौलताबाद) येथील **रामदेव** राणा जाधव ह्यास **अल्लाउदीना**नें जिंकिलें. पुढे इ. स. १३१८ त त्यांनी **माहिम, साष्टी, कोंकण** आणि दुसरी कित्येक ठिकाणें ह्यांजवर आपली सत्ता बसविलीं. ह्याच वर्षी पहिला **मुबारक** बादशहा ह्यानें **हरपालदेव** ह्याचा **दौलताबादे**जवळ पराभव करून त्यास ठार मारिलें आणि वसईचा कारभार **बाहदूरखाना**च्या स्वाधीन केला व ही त्याची सत्ता इ. स. १३२१ पर्यंत होती.

४. इ. स. १४२९ तं मुसलमान लोकांचीं लष्करांचीं ठाणीं **मुंबई माहिम** आणि **ठाणें** ह्या ठिकाणी होती. ह्यावरून ह्या वेळी मुसलमानांचीही सत्ता ह्या प्रदेशावर बरीच असावी असें अनुमान होतें. त्यांच्या येथील सैन्याच्या अधिपतीचें नांव **कुतुबखान** होतें. **बहामनी** राजांचा प्रधान

---

१. कित्येकांचा असा समज आहे कीं, धरणीकंप किंवा दुसऱ्या अशाच कांहीं कारणांमुळें हीं एकाचीं सात बेटें झालीं असावींत.

२. हे **भोंगळ** राजे जातीचे भंडारी असावेंत असें अनुमान होतें ; कारण ह्यास **भोंगळ** वाजविण्याचा फार नाद असें व तीं ते **फिरंगी** राजाच्या अमदानीत वाजवीत व **मुंबई**त देखील काहीं दिवसांपूर्वी **सेशन** बसावयाचे दिवशीं न्यायाधिशाची गाडी कोर्टाचे दरवाज्याजवळ आली ह्मणजे निशाण घेऊन शिंग-अर्थात भोंगळ-वाजवीत.

**मलिकुलतुजार** ह्यानें **कुतुबखाना**च्या मरणानंतर ह्मणजे, सदहु वर्षीच **माहिम** व **साष्टी** ह्या गांवांवर आपला पगडा बसविला. ही बातमी **गुजराथचा** राजा **अहमदशहा** ह्यास कळल्यावरून त्यानें **झफरखान** नामक आपला मुलगा आणि सैन्याधिपति **मलिकइफतिकारखान** ह्यांजबरोबर मोठें आरमार देऊन त्यांस **माहिमा**वर पाठविले, ह्या आरमारानें येऊन **ठाण्या**वर हल्ला करून **मलिकुलतुजार** ह्यास तेथून हांकून दिलें. पुढें त्यांच्या ह्यांच्या एकदोन लटापटी होऊन **बहामनी** राजाचा मोड करून **मलिकइफतिकारखान** ह्यानें **माहिम** आपल्या स्वाधीन करून घेतलें. ह्या वेळीं **माहिमा**स एक हिंदु राजा होता.

५. इ. स. १४८० मध्यें **बहामनी** राजानें आपल्या ताब्यांतल्या मुलखाचे ८ विभाग केले होते ; त्यांपैकीं, **जुन्नर** हा मुख्य भाग केल्यामुळें **उत्तरकोंकण** व **घाट** ह्यामध्यें निकट संबंध होऊन दळणवळण विशेष वाढलें. पुढे इ. स. १४८५ त गोव्याच्या गव्हर्नराचा मुलगा **बहादरखान झिलानी** ह्यानें **दाभोळ** आणि दक्षिण **कोकणां**तील कांहीं प्रदेश घेऊन **दर्याबार** काबीज केला. इ. स. १४८४ त **गुजराथ** किनारा जिंकून त्यानें १४९० त **याकूतखाना**स **माहिमा**वर चाल करण्यास पाठविलें. **याकूतखानानें** **गुजराथ**च्या राजाचे आरमाराचा मोड करून **गुजराथ** आपल्या स्वाधीन करून घेतली.

६. इ. स. १५१६ त **डामजावडीमनो** हा **वांदऱ्या**स येऊन त्यानें **माहिम**च्या अधिकाऱ्याचा मोड केला. ह्याच वर्षी **चेवला**स **पोर्टुगीज** लोकांची वखार स्थापन झाली. ह्या प्रमाणें **चेवला**स वखार स्थापन झाल्यावर इ. स. १५२१ त **पोर्टुगला**हून असा हुकूम आला कीं, **चेऊल** आणि **दीव** येथें किल्ले बांधावे. पुढे इ. स. १५२६ त **पोर्टुगिजांनी** **वसई** येथें आपली वखार स्थापित केली.

७. इ. स. १५२७ त हें बेट **पोर्टुगिजां**चे स्वाधीन होतें त्या वेळीं **मुंबईस** त्यांचा **लिओव्हास डि संपायो** नांवाचा गव्हर्नर होता. ह्याच सुमारास **खंबायत**च्या राजानें **पोर्टुगिजां**च्या आरमाराचा मोड केला. पुढें ते **चेऊल** सोडून **दीव** येथें जात असता एकाएकी **संपायो** ह्यानें **मुंबई**च्या बंदरात **खंबायत**चे आरमार होते त्यावर हल्ला करून शत्रूस जहाजावर घेतलें. परंतु **खंबायत**चे आरमाराचा मुख्य **अलीशहा** ह्यानें **माहिम**च्या रस्त्यानें पळून

जावें ह्या हेतूनें तेथून पळ काढिला ; पण **पोर्टुगिजांनीं वांद्ऱ्यास** गलबतें ठेवलींच होतीं, त्यामुळें त्याला सात जहाजांनिशीं जातांना पकडलें. तेव्हां अर्थात त्यास बरेच लष्करी लोक, लढाईचें सामान व लूट मिळाली. ह्या जयानंतर **संपायो गोंव्यास** जातेसमयी त्याने **हेटर डा सिलव्हेरा** ह्यास **गुजराथेवर** हल्ला करण्यास हुकूम केला होता ; त्याप्रमाणें **सिलव्हेरा** ह्यानें कांहीं दिवस **मुंबईस** राहून पुढें **गुजराथेवर** हल्ला करून तेथील सहा गांवें जाळून टाकिलीं आणि परत येतेसमयीं **वसई** मुक्कामीं आपल्या सैन्याचा तळ दिला. त्या वेळीं **वसई** हा गांव, तेथें किल्ले वगैरे बांधलेले असल्याकारणानें बराच बंदोबस्तात होता.

८. याप्रमाणे **सिलव्हेराचा वसईस** तळ असता तेथें त्यास **अलीशहा** ३,५०० लोकांनिशीं आडवा आला. त्याचा पराभव करून त्यानें **वसई** सोडतांना ती लुटून सर्व गांव जाळून टाकिला. ह्या त्याच्या पराक्रमामुळें **ठाण्याचा** अधिकारी घाबरून जाऊन **सिलव्हेरास** खंडणी देण्यास कबूल झाला व ती त्यानें मान्य करून **चेवलास** परत गेला.

९. इ. स. १५३१ त **ननोडा कुन्हा** हा मोठें आरमार घेऊन **मुंबईस** आला होता. येथून पुढें तो आपले आरमारानिशीं **दमण** (दवण) काबीज करण्याकरितां गेला ; परंतु, शहरांत जाऊन पाहतो तों त्यास ते अगदीं ओस दिसलें ; ह्मणून तसाच पुढें उत्तरेस जाऊन **काठेवाडच्या** दक्षिण बाजूचें ' **लिटलबेट** ' घेऊन पुढें **दीव** येथें गेला ; परंतु, तेथें त्याचें काहीं एक न चालता त्यास परत गोंव्यास जावें लागलें. पण जातांना त्यानें **खंबायतवर** हल्ला करण्यास **आंटोनिओ डा सिलव्हाना** ह्यास सांगितलें होतें, त्यावरून सदर्हु **आंटोनिओ** ह्यानें **बलसाड, तारापुर, केळवें माहिम** व **आगाशी** वगैरे गांवांचा नाश केला. पुढें इ. स. १५३२ त **ननोडा कुन्हा** ह्यानें **डायागो डा सिलव्हेरा** ह्यास **गुजराथ** लुटण्याकरितां पाठवून त्यानें स्वतः **वसईवर** चाल केली. **वसईमध्यें** जरी ह्या वेळीं १२०० लोकांची पलटण होती तरी, पोर्टुगिजांनीं किल्ल्यावर एकसारखा मार करून तो घेतला ; त्याची तटबंदी फोडून टाकिली ; **ठाणें** आणि **वांदरें** येथील

राजास खंडणी देण्यास लाविलें ; आणि पुढल्या वर्षी ह्मणजे इ. स. १५३३ त **वसई** व तिच्या आसपासचा प्रदेश, **साष्टी** आणि **मुंबई** हीं गांवें घेतलीं. त्यावेळीं हा भाग **बेदर**च्या राजाच्या अमलाखालीं होता. **वसई** आणि तिच्या मधील सर्व गांवें जाळून टाकिलें आणि **दवण**चा किल्ला घेण्याविषयीं देखील त्यानें प्रयत्न केला होता ; परंतु, ह्या प्रयत्नातही त्यास यश प्राप्त झालें नाहीं. इ. स. १५३५ त **बहादर** यानें **पोर्टुगिज** लोकांस **दीव** येथें किल्ला बांधण्याची परवानगी दिली ह्याचीं कारणें अशीं दिसतात कीं, ह्या वेळी **बहादरा**चा **हुमायून** ह्यानें अगदीं मोड केला होता हे एक, आणि पोर्टुगिजांनीहीं त्यास मदत करण्याचें कबूल केलें होतें, हें दुसरें. **बहादराने तुर्कस्थान**च्या सुलतानास कुमकेविषयीं लिहिलें होतें ; परंतु, तेथून कांहीं जबाब न आल्याकारणाने त्यानें ही वेळ थांबण्याची नाहीं असें पाहून, पोर्टुगिजांबरोबर तह केला. ह्या तहामुळें **वसई** आणि **दीव** हीं व्यापाराची मुख्य ठाणीं झालीं आणि ह्याचवर्षी **वसई** व **दीव** येथें किल्ले बांधले गेले. ह्या वेळी **मुंबई**चें उत्पन्न मिठागरापासून ३,७०० रुपयांचें होते आणि वस्ती अवघी ५,००० लोकांची होती.

१०. इसवी सनाच्या सोळाव्या शतकाचे उत्तरार्धापर्यंत म्हणजे ज्यावेळीं **पोर्टुगिजां**चे प्राबल्य ह्या किनाऱ्यावर निर्विघ्नपणें चाललें होतें, त्यावेळीं हें बेट **वसई**चा कप्तान जनरल ह्याच्या अमलाखालीं होतें ; पण, ह्या शतकाचे शेवटीं जेंव्हां **इंग्रज** लोक व्यापाराच्या निमित्तानें येथें आलें आणि त्यांचें लक्ष ह्या बेटावर लागून इ. स. १६२५ त **कंपनी सरकारा**चे मनांत **मुंबई** घेण्याचे आल्यावरून त्यांनीं **डच** लोकांचीही मदत मागितली ; परंतु, त्यानीं ती नाकारिल्यावरून इ. स. १६४० त **सुरते**च्या कौन्सिलानें **हिंदुस्थान**च्या पश्चिम किनाऱ्यावरील **मुंबई** हें बेट राहण्यास उत्तम स्थळ आहे असें **विलायत** सरकारच्या मनांत भरवून दिलें. पुढें इ. स. १६५२ त त्यांनीं **पोर्टुगिजां**पासून **मुंबई** आणि **वसई** विकत घेण्याचा विचार चालविला, व इ. स. १६५४ त **ऑलिव्हर क्रॉमवेल** ह्यास मानपत्र मिळालें त्यांत सुद्धां वरील दोन गांवें व्यापाराकरितां उत्तम स्थळें आहेत असें सुचविलें होतें. इ. स. १६५९ त **सुरते**च्या कौन्सिलाने **पोर्टुगल** देशच्या राजापासून पश्चिम किनाऱ्यावरील कांहीं जागा **दांडा, राजापूर, मुंबई** किंवा **वरसोवा** असें भाग

**इंग्रजांस** मिळावे ह्मणून अर्ज करून त्यांत मागणी केली होती. शेवटीं इ. स. १६६१ त डिसेंबर महिन्याचे ७ व्या तारखेस **सुरते**च्या कौन्सिलानें **डायरेक्टर** लोकांस असें पत्र लिहिले कीं, आह्मांस **मुंबई** खेरीज करून इतर ठिकाणीं राहण्यास फार त्रास पडतो. कारण दुसऱ्या ठिकाणीं राहणें म्हणजे तेथें **मोंगल** व **शिवाजी** ह्यांचे नेहमीं हल्ले चालूच असतात त्यांत सापडणें होय, एवढेंच नाहीं ; तर, **मुंबई** खेरीज करून इतर ठिकाणीं राहिल्यानें **डच** लोकांपासूनही वारंवार त्रास पोंहचल्यावाचून राहणें नाही; सबब, **मुंबई** आह्मांस राहण्यास मिळेल असें करावें. **इंग्रजांस मुंबई**चा इतका लोभ सुटण्याचें मुख्य कारण तिचें उत्तम बंदर हेंच होय.

११. याप्रमाणें **कंपनी**चे इकडे **मुंबई** घेण्याविषयींचे प्रयत्न चालू असतां, तिकडे ह्याच वर्षाच्या जून महिन्याचे २३ तारखेस **पोर्टुगल**च्या राजाची बहीण **क्याथारिना** हिचें लग्न **इंग्लंद**चा राजा दुसरा **चार्ल्स** ह्याजबरोबर झालें. त्या वेळीं त्यानें हें बेट तिला आंदण दिलें. ह्या प्रसंगी **पोर्टुगल**च्या राजाने दुसऱ्या **चार्ल्स** राजास **मुंबई**च्या संबंधानें जो दानपट्टा करून दिला आहे तो येणेंप्रमाणे :—

ARTICLE XI*

That for the better improvement of the English Interest and Commerce in the East Indies, and that the king of Great Britain may be better enabled to assist, defend, and protect the subjects of the the king of Portugal in those parts, from the power and invasion of the States of the United Provinces, the King of Portugal, with the assent and advice of his Council, gives, transfers, and by these presents, grants and confirms, to the King of Great Britain, his heirs and successors, for ever the port and island of Bombay, in the East Indies, with all the rights, profits, territories, and appurtenances whatsoever thereunto belonging, and, together with the income and revenue, the direct, full, and absolute dominion and sovereignty of the said port, island, and premises, with all their royalties, freely, fully, entirely, and absolutely. He also covenants and grants that the quiet

* Selections from State Papers, Home Series, Vol. I.

and peaceable possession of the same shall, with all convenient speed, be freely and effectually delivered to the King of Great Britain, or to the persons thereto appointed by the said King of Great Britain, for his use, in pursuance of this cession ; the inhabitants of the said island (as subjects of the King of Great Britain, and under his sovereignty, crown, jurisdiction and Government) being permitted to remain there, and to enjoy the free exercise of the Roman Catholic Religion in the same manner as they do at present; it being always understood, as it is now declared, once for all, that the same Regulations shall be observed for the exercise and preservation of the Roman Catholic Religion in Tangier, and all other places which shall be ceded and delivered by the King of Portugal into the possession of the King of Great Britain, as were stipulated and agreed to on the surrender of Dunkirk into the hands of the English ; and when the King of Great Britain shall send his fleet to take possession of the said port and island of Bombay, the English shall have instructions to treat the subjects of the King of Portugal, throughout the East Indies, in the most friendly manner, to help and assist them, and to protect them in their trade and navigation there.

वरील दानपत्रांतील मतलब येणेंप्रमाणे :-

**कलम ११.—पोर्तुगल** देशच्या राजानें आपल्या कौन्सिलच्या सल्ल्यानें **ग्रेटब्रिटन** येथील राजास त्याचा **ईस्ट इंडीस** येथील व्यापार सुरळीत चालावा आणि त्यास येथील **पोर्टुगीस** रयतेचें संरक्षण नीट रीतीनें करतां यावें, आणि **मुंबई** बेटाचा वंशपरंपरेनें उपभोग घेता यावा ह्मणून हें बेट आणि बंदर, आणि यांतील जल, तरु, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेपादि हक्कांसह आणि त्याच्या लगतचा प्रदेश, तेथील उत्पन्न व सर्व प्रकारचे हक्क यांसह आणि **ग्रेटब्रिटन**चा राजा किंवा त्याजकडून नेमिलेले अधिकारी यांस हें बेट ह्या दानपत्रांने दिलें आहे. याकरितां **ग्रेटब्रिटन**चा राजा किंवा त्याचे अधिकारी यांच्या स्वाधीन हें बेट बिनतक्रार संतोषानें व सुखानें उपभोग घेण्याकरितां स्वाधीन करून द्यावें. व हल्ली तेथें असलेल्या **पोर्टुगीज** रयतेनें **ग्रेटब्रिटन**च्या राजाची रयत समजून, आपल्या **क्याथलिक**

धर्मपन्थान्वयें बिनदिक्कत चालावें. आणि ज्या वेळी **ग्रेटब्रिटन**चा राजा आपलें आरमार **मुंबई**बेट हस्तगत करून घेण्याकरितां **मुंबई**स पाठवील त्या वेळीं त्यांनीं **ईस्ट इंडीस** मधील **पोर्टुगीस** रयतेस मोठ्या मित्रत्वानें वागवून त्यांच्या उदीमव्यापारांत आणि जलमार्गाच्या सफरींत लागेल ती मदत करावी. व हें बेट **ग्रेटब्रिटन**च्या राजाच्या स्वाधीन करून देण्याविषयीं **मुंबई** येथील अधिकाऱ्यास सूचना केली जाईल.

१२. सदहु दानपट्ट्यावरून **मुंबई** संबंधीं **इंग्रजां**स काय काय प्राप्त झालें व त्या वेळची स्थिति कशी होती इत्यादि माहितीचा उतारा खालीं इंग्रजींत डग्लसकृत "बुक आफ् बॉम्बे" नामक पुस्तकांतून दिला आहे :-

1.—A four square house, some part of the walls of which may still exist in the arsenal, and which afterwards became our Govt. house. 2.—The garden which surrounded it, verdant with slippered pantaloons, fardingales of frowsy women from Europe, and the *saries* of "the pampered jades of Asia". 3.—Four brass guns. 4.—A few houses interspersed among palm trees cujaned (*i. e.* roofed with the leaves of the palmyra palm) where the Fort now is. 5.—A population of ten thousand, mostly fugitives and vagabonds. 6.—Renegade Jesuits who fomented rebellion and endangered our lives. 7.—A new chapter in the physical history of man consequent on the rulers "levelling" down and not "levelling" up. 8.—Half a dozen ricketty forts, such as we see to day the remains of on Thana creeck. They crowned the Knolls of Mahim, Reeva, Varli, Sion, Sewree and Mazagon. 9.—A colonial Government from Europe, but without the law the police, or the education of Europe. 10.— Forty thousand acres of the best land. Partially submerged by the sea and growing mothing but Samphire. 11.—A few fishermen's huts on Dongri Hill, and the villages of Parel, Mahim, Varli and Mazagon. 12.—The ruins of an old stone causeway between Parel and Sion, a varitable "Bridge of Sighs," built as the annalist hath it "out of penances". 13.—A climate of the verulence of which was owing to the inability of the settlers themselves to comprehend the first principles of sanitary science ; a climate which literally devoured every man and woman from England and Sacrified some of the noblest lives that ever came to Western India. 14.—A huge quantity of fish and fish bones.

ह्या इंग्रजी मजकुराचा साधारण मतलब ;

(१) एक किल्ला. (२) किल्ल्याच्या सभोंवतीं असलेला बाग. (३) चार पितळी तोफा. (४) बेटांत असलेली माडांच्या झापांचीं घरें. (५) १०,००० पळपुटे व भटके लोकांची वस्ती. (६) इंग्रजांविरुद्ध नेहमी बंड करणारे जेसुईट. (७) इंग्रजांच्या राज्यप्राप्तीपासून सुख. (८) मोडकळीस आलेले माहिम, रिवें, वरळी, शींव, शिवरी, आणि माजगांव वगैरे ठिकाणचे पांच सहा किल्ले. (९) इंग्रजी राज्यपद्धती. (१०) चाळीस हजार एकर बहुतेक समुद्रांत असलेली जमीन. (११) डोंगरीवर असलेलीं कोळ्यांचीं झोंपडी. परळ, वरळी, माहीम आणि माजगांव हीं गांवें. (१२) परळ आणि शींव ह्यां मधील मोडकळीस आलेला बांध. (१३) रोगट हवा (१४) मच्छी वगैरे.

१३. **'मंथ्ली मिसलेनी ऑफ् वेस्टर्न इंदिया'** ह्या पुस्तकावरून ह्याच संबंधानें जी विशेष माहिती मिळते ती :—

मुंबईतील सर्व घरें दारें, जवाहीर, पैसाटक्का आणि रोकड ४,८७९ पौंड, ७ शिलिंग ६ पेन्स इतकें इंग्रजांस आणखी ज्यास्त मिळालें.

**१४.** पुढें इ. स. १६६२ च्या मार्च महिन्यांत **सर आंद्रू शिपमन** (आब्राहाम शिपमन) ह्यास गव्हर्नर नेमून त्याच्या स्वाधीन हें बेट करून देण्याकरितां अर्ल ऑफ् **मार्लबरो** हे पांच जहाजांचे आरमार व ४०० लोक बरोबर घेऊन येथें येण्याकरितां निघाले. सदर्हु आरमारापैकीं कांहीं आरमार सप्टेंबर महिन्यांत व कांही अक्टोबरांत येथें येऊन दाखल झालें. त्यांजबरोबर **पोर्टुगिजां**चा अधिकारी व एक मानकरी हे त्या राज्याच्या वतीनें इकडील त्यांचा गव्हर्नर यास मुखजबानीनें सांगून हें बेट इंग्रजांच्या स्वाधीन करून देण्याकरितां आले होते. परंतु येथील **पोर्टुगिजां**चा गव्हर्नर **डान आंटोनिओ डिमेलो इ क्यास्ट्रो** हें बेट त्यांच्या स्वाधीन करिना. हें बेट इंग्रजांच्या स्वाधीन करून देण्याविषयीं त्यांनी ज्या एक दोन तकरारी सांगितल्या त्या अशा— पहिली **साष्टी** खेरीज करून **मुंबईबेट**

तुमचे स्वाधीन करूं; परंतु, **साष्टी**सुद्धां **मुंबई** आमचे स्वाधीन करा असें अर्ल ऑफ् **मार्लबरो** ह्यांचे ह्मणणें होतें. दुसरी— आमच्या राजानें जी तुम्हांस सनद करून दिली आहे ती शिरस्त्याप्रमाणें नाहीं, म्हणून **मुंबई** तुमच्या स्वाधीन करतां येत नाहीं. अशा जबाबामुळे अर्ल ऑफ् **मार्लबरो** ह्यांस वरवा करण्यासाठीं अर्थात दुसरें स्थळ शोधणें प्राप्त झालें. पहिल्याने अर्ल ऑफ् **मार्लबरो** ह्यांनीं **सुरते**च्या वखारीचे प्रेसिडेंट सर **जार्ज आक्झिंडम** ह्यांजकडे **सुरते**स सैन्यास उतरण्याकरितां जागा मागितली. परंतु ह्यास आश्रय दिला असतां मोंगलांचा आपणावर रोष होईल, म्हणून त्यांनीं अर्ल ऑफ् **मार्लबरो** ह्यांचे म्हणणें नाकारिलें. हें पाहून आपल्या आरमारावरील लोकांचे हाल होऊं नयेत म्हणून त्यास पहिल्यानें **तापी** नदीच्या कांठीं असलेल्या **सुवाळी** गांवांत जावें लागलें. नंतर तेथून त्यानें **गोंव्या**नजिक **सदाशिव**गडाच्या अलीकडे दहा पंधरा कोसांवर **आंजदिवे** म्हणून एक लहानसें बेट आहे, तेथें आपली छावणी मारली, आणि तेथें कांहीं दिवस राहिल्यावर **सर आंद्रू शिपमन** यास ठेवून अर्ल ऑफ् **मार्लबरो** हें विलायतेस निघून गेले. परंतु हें स्थळही राहण्यास चांगलेंसें नसल्याकारणानें **सर आंद्रू शिपमन** व ३०० गोरे थोडक्याच काळांत मरण पावले. ह्या प्रमाणें त्यांचीं दोन वर्षे अशाच घोटाळ्यांत गेलीं.

**१५. सर आंद्रू शिपमनच्या** मरणाची बातमी विलायतेस कळल्यावर दुसऱ्या **चार्ल्स** राजानें **हंफ्रि कूक** यास येथें जें सैन्य राहिलें होतें तें घेऊन बेट स्वाधीन करून घ्यावें असा हुकूम देऊन **हिंदुस्थानां**त पाठविलें. हा हुकूम मिळाल्यावर इ. स. १६६५ चे फेब्रुवारी महिन्यांत ते येथें येऊन दाखल झाले आणि **पोर्तुगीज** लोकांच्या अटी कबूल करून, **मुंबई**चा अधिकार आपल्या स्वाधीन करून घेतला. ज्या वेळीं सदर्हु **कूक** साहेब आपल्या बरोबर आणलेल्या ११९ इंग्लिशलोकांनिशीं **मुंबई**च्या बंदरांत उतरले,[१] त्या वेळीं **मुंबई**ची वस्ती १०,००० असून उत्पन्न २८,००० रुपये होतें.

१. १ गव्हर्नर, १ एनसाईन, ४ सार्जेंट, ६ कारपोरल, १ सर्जन, १ सर्जनचा साथी, २ गनर, १ गनरचा साथी, १ तोफा तयार करणारा, आणि ९७ प्रायव्हेट (खासगी).

१६. आतां, **मुंबई** व तिच्या आसपासचा प्रदेश **पोर्तुगिजांनीं इंग्रजां**स देण्यांत त्यांचा मुख्य उद्देश असा असावा कीं, ह्या वेळीं जे डच लोक फार माजले होते व ज्यांपासून **पोर्तुगिजां**स वारंवार त्रास पोहचत असे, त्यांचे निवारण व्हावें म्हणून इंग्रजांनी आपणांस मदत करावी व आपली सत्ता निर्विघ्नपणें चालावी; ह्या हेतूनें त्याच्याबरोबर सख्यत्व राखण्याकरितांच त्यांनीं हें बेट **इंग्रजां**स आदंणरूपानें दिलें. असें केल्यावांचून त्यांस गत्यंतरच नव्हतें.

१७. इ. स. १६५६ त **डच** लोकांनी **पोर्तुगिजांस सिलोन** (लंके) मधून हांकून लाविलें. **बंटम** येथे **पोर्तुगीज** सैन्यास व **गोवें** येथें **इंग्लिश** सैन्यास त्यांनीं वेढा दिलाच होता. आता, **डच** लोकांच्या स्वाधीन **गोंवें** झालें असतें तर, अर्थात **दीव** येथेंही त्यांची सत्ता सहज बसली असती आणि एकदां कां त्यांची सत्ता **दीव** बेटावर बसली असती, ह्मणजे **इंग्रज**कंपनीला निःसंशय आपलें गवाळें गुंडाळणें भाग पडतें. परंतु वर दर्शित केलेला **डच** लोकांस हांकून देण्याचा उद्देश **युरोपांतील पोर्तुगीज** व इकडील **पोर्तुगीज** ह्यांच्यामध्यें जो परस्परांत गैरसमज झाला होता त्या गैर समजाच्या अभिमानामुळेंच हा त्यांचा धारलेला हेतु सिद्धीस गेला नाहीं.

१८. याप्रमाणें **इंग्रज** आणि **पोर्तुगीज** ह्यांच्यामध्यें परस्पर स्नेहभाव वाढण्याचें तर एकीकडेसच राहिलें; पण, उलट फार दिवसांचें असलेलें वैमनस्य मात्र वृद्धिंगत होत गेले. बरें, **इंग्रजांस** तरी **मुंबई** व तिच्या आसपासचा प्रदेश आणि तेथील उत्पन्न ह्यांवाचून हें नुसतें बेट सांभाळणें ह्मणजे मोठें खर्चाचेंच काम होतें; तरी पण व्यापाराचें स्थान ह्मणूनच हें सांभाळावे तर, **डच** लोकांबरोबर चाललेल्या भांडणांत हें बेट सांभाळण्यापासून ह्मणजे **इंग्रजां**स कांहीं बळकटी आली असती असेंही नाहीं.

१९. याप्रमाणें सदर्हु **कूक** ह्यानें **मुंबई**चा अधिकार आपल्या स्वाधीन करून घेतला खरा तरी पण, **पोर्तुगिजां**नीं त्यास मदत न करितां उलट **ठाणें** आणि **करंजें** येथून इंग्रजांचीं जीं जहाजें जात येत असत त्यांजवर जकात बसविली. बरें एवढें करून तरी ते स्वस्थ बसले असेंही नाही तर, त्यांनी **विलायतेस** जाणाऱ्या येणाऱ्या मालावर दहापासून बारा टक्केपर्यंत

जकात बसविली. ही जकात बंद करावी ह्मणून मि. **कूक** ह्यानें पुष्कळ प्रयत्न केले; परंतु, **मुंबई इंग्रजां**च्या स्वाधीन नुकतीच झाल्याकारणानें **पोर्तुगिजां**चें निवारण करण्यास त्याच्या आंगी हवी तेवढी शक्ति आली नव्हती.

**२०.** कांहीं काळानें पुढें वर ह्मटलेल्या **हंफ्रि कूक** ह्याजवर सरकारी पैशाची अफरातफर केल्याचा आरोप आल्यावरून त्यास कामावरून दूर करण्यांत आलें, आणि त्याच्या जागीं **जरव्हीस लूकस** ह्याची नेमणूक झाली. इ. स. १६६६ त नोव्हेंबर महिन्याचे ५ वे तारखेस **लूकस** ह्यानें ह्या बेटाचा अधिकार आपल्या स्वाधीन करून घेतला. पण हे साहेबही फार दिवस राहिले नाहींत. ते इकडे आल्यावर लागलेच मरण पावले. पुढें इ. स. १६६७ च्या मे महिन्याच्या २१ वे तारखेस कपतान **हेनरी गारी** हे **मुंबई**च्या गव्हर्नरच्या जाग्यावर आले. हा विलायतेतून नेमणूक होऊन आलेला शेवटचा गव्हर्नर. ह्या वेळीं **मुंबई**च्या उत्पन्नांतून सरकारी खर्चही धड भागत नसे, ह्मणून दुसरा **चार्ल्स** ह्यानें **ईस्ट इंडिया** कंपनीच्या विनंतीवरून व्यापाराकरितां ह्मणून सालिना १०० रुपये घेण्याचे करारानें इ.स. १६६८ सालीं हें बेट त्यांच्या स्वाधीन केलें. व ह्याबद्दलचा सनद[1] पट्टा घेऊन **कांस्टंटिनोपल** नांवाची आगबोट सप्टेंबराचे १ ल्या तारखेस **सुरते**स येऊन

1. The treaty of Breda, conclued between England and Holland in 1667 was the occasion of annoyance to the East India Company and to pacify this feeling, rather than actuated by any other motive, **Charles** the second, by letters patent dated 27th March 1668, conferred upon the Company and in perpetuity the Port and Island of Bombay, "With all the rights, profits and "territories thereof, in all full manner as the King himslf pos- " sessed them by virtue of the treaty with the King of Portugal "by which the Island was ceded to his Majesty, to be held by 'The company of the King in force and common soceage, as of "the Manor of East Greenwich, in payment of the annual rent "of £10 in gold, on the 30th September in each year."--- The Montly Miscellany of Western India.

**भावार्थ**—इ. स. १६६७ त **इंग्लंद** व **हालंद** ह्यांमध्यें जो **ब्रेडा** येथें तह झाला तेणेंकरून **ईस्ट इंदिया कंपनीस** बहुत राग आला होता; त्याची शांति करण्याकरितांच फक्त हें बेट सर्व हक्कासुद्धां त्यांच्या स्वाधीन करण्यांत आलें. बाकीचा मजकूर वर आलाच आहे.

दाखल झाली. त्या वेळीं **सुरत** येथील वखारीचे प्रेसिडेंट सर **जार्ज आक्झिंडम** ह्यांनीं हें बेट ताब्यांत करून घेण्याकरिंता **मुंबई**स एक कमिशन पाठविलें. ह्या कमिशनांत त्याच्या कौन्सिलचे मेंबर **गुडलिअर, कोडस्** आणि **मास्तर** हे होते. व कपतान **यंग** ह्यांस **मुंबई**चे डेप्यूटी गव्हर्नरचा हुद्दा देऊन कपतान **गेरी**कडून **मुंबई** स्वाधीन करून घेण्याकरितां पाठविलें. कमिशन त्याच महिन्याचे २१ वे तारखेस येथें येऊन दाखल झालें व त्यांनी **गेरीस** पत्र लिहिलें व कपतान **गेरी**नें २३ वे तारखेस –ज्या मानमरातबानें **इंग्रजां**स **पोर्टुगिजां**कडून हें बेट मिळालें होतें, त्याच थाटानें **कंपनी** सरकारच्या स्वाधीन केलें. बेटाबरोबर तेथील सर्व लष्करी सामान, दारुगोळा, आणि बेटाच्या संरक्षणाकरितां जितका राजकीय अधिकार असणें अवश्य तितका कंपनीस मिळाला. **मुंबई** कंपनी सरकारच्या ताब्यांत गेल्यादिवसापासून तिचें तीन वर्षांत उत्पन्न ३०,००० रुपयांपासून ६५,००० रुपयांपर्यंत वाढलें, वर सांगितलेल्या करारांपैकीं एका कलमांत असें होतें कीं, कोणत्याही कारणामुळें **कंपनी**नें आपल्या हातून हें बेट जाऊ देऊं नये, बेटाच्या संरक्षणाकरितां पक्का बंदोबस्त ठेवावा, आणि ह्या बेटांत जन्मलेल्या लोकांस **इंग्लदां**तल्या रयतेप्रमाणें गणलें जावें.

२१. याप्रमाणें हे बेट **कंपनी**च्या स्वाधीन झाल्यापासून त्यांच्याच हुकुमानें **मुंबई**स गव्हर्नर येऊं लागले. इ.स. १६८५ पर्यंत डेप्यूटी गव्हर्नर व इतर कामगार ह्यांच्या नेमणुका **सुरते**च्या वखारीच्या अधिकाऱ्याकडून होत; परंतु, पुढल्या वर्षी ह्मणजे इ. स. १६८६ त सर्व अधिकार **मुंबई**च्या गव्हर्नरास देऊन त्याची नेमणूक **विलायतेहून** होऊं लागली. हा वेळपर्यंत **सुरते**सच सरकारी ठाणें होतें; परंतु, इ. स. १६८६ त **सुरते**स भयंकर आग लागल्यामुळें **कंपनी**स आपलें ठाणें तेथून **मुंबई**स आणावें लागलें. ह्या वेळीं येथें लोकांची बरीच वस्ती वाढत चालली आहे असें पाहून, त्यांनीं **मुंबई** हेंच आपलें मुख्य सरकारी ठाणें केलें व शहरांत अनेक सुधारणा सुरू केल्या. ही सर्व व्यवस्था नीट चालून खर्चही भागावा ह्मणून शहरांतील दुकानदारांवर प्रतिवर्षी एक रुपयाचा कर बसविला. शिवाय मच्छीमार लोकांवर कर होता तो निराळाच. पुढें इ. स. १६८८ मध्यें शहरांतील

घरांवर छापा घेण्याची सुरवात केली. असे हळुहळू नवीन कर बसवून कंपनीनें शहराचें उत्पन्न वाढविलें.

२२. आता, पूर्वीपासून **मुंबईवर मराठ्यां**चाही बराच डोळा होता. इ.स. १६६६ त **शिवाजीनें ठाण्या**चे किनाऱ्यावरून सर्व मोंगल लोकांस हांकून लाविले आणि इ.स. १६७० त **करनाळे** आणि **माहूली** इकडचे किल्ले त्यांजकडून घेतले. ह्याच वर्षी **पोर्टुगिजां**नीं **शिवाजी**चा जलमार्गानें पराभव केला; पण, त्यास न जुमानतां तो तसाच पुढे खुष्कीच्या मार्गानें **घोडबंदर** व **साष्टी** हीं घेत घेत पुढें चालला, त्यामुळें **इंग्रजां**नीं **शिवाजी**कडे तहाचें बोलणें करण्याकरितां एक वकील पाठविला. ह्या वेळीं जो तह झाला त्यांत **शिवाजी**नें आपण **इंग्रजां**च्या मुलखावर हल्ला करणार नाहीं असें कबूल केलें. इ. स. १६७३ त **मुंबईंत डच** लोक आले व त्यांनीं रयतेस इतका त्रास दिला कीं, त्यास **पोर्टुगिजां**चा आश्रय धरून त्याच्या मुलखांत जाऊन राहणें भाग पडलें. परंतु गव्हर्नर **आंजिअर** ह्यांचा कडेकोट बंदोबस्त असल्यामुळें **डच** लोकांचें कांहींएक न चालतां त्यांस हा मुलुख सोडून परत जाणें भाग पडलें.

२३. **मुंबईला शिद्धी** लोकांपासूनही वारंवार असाच त्रास पोहचत असे. इ. स. १६७२-८० च्या दरम्यान प्रत्येक वर्षी ते लोक **मुंबईस** येत असत. त्याप्रमाणें इ. स. १६७४ त ते **मुंबई**वर येऊन **शींव**या किल्ल्यांतून लोकांस हांकून लाविलें; परंतु, इतक्यांत **इंग्रज** सैन्यानें त्यांजवर चाल करून त्यांजबरोबर असा करार केला कीं, **मुंबई**मध्यें कोणत्याही प्रसंगी ३५० पेक्षां अधिक **शिद्धी** लोकांनीं राहूं नये; आणि त्यांजजवळ तरवारी खेरीज दुसरें कोणतेंही हत्यार असूं नये. ह्या **शिद्ध्यां**च्या येण्यापासून **इंग्रजां**स मोठें संकट प्राप्त झालें होतें; कारण काय कीं, त्यांनीं जर **शिद्ध्यां**स **मुंबईस** येऊं दिलें असतें तर, **शिवाजी**स मोठा राग येऊन **इंग्रजा**संबंधी त्याच्या मनांत संशय उत्पन्न होता; बरें, **शिवाजी**च्या म्हणण्याप्रमाणें **शिद्ध्यांस मुंबईं**त येण्याचें बंद करावें तर तिकडूनही **मोंगलां**ची इतराजी होईल ही भीति. ह्याप्रमाणे **इंग्रजां**स अडकित्यांत सांपडल्याप्रमाणें झालें होतें.

२४. इ. स. १६७३ साली इंग्रज लोकांची **मुंबई**चे संबंधानें स्थिति कशी होती ह्याविषयीं डा. **फ्रायर** साहेब असें म्हणतो कीं, 'हल्लीं आमचा संबंध **पोर्तुगीज, शिवाजी** आणि **मोंगल** ह्यांजबरोबर असल्या कारणानें ह्या प्रत्येकाशीं आम्हांस मोठ्या सौम्य रितीनें वागलें पाहिजे. हे तिघेही एकमेकांविरूद्ध असल्याकारणानें आपआपसांत एकमेकांविषयी द्वेषभाव व मत्सर दाखवितात. उदाहरणार्थ—**मोंगलां**नी जर कांही कारणावरून आपलें आरमार **मुंबई**स आणलें तर **शिवाजी**स राग येतो. **मोंगलां**स बंदरात येऊं दिलें नाहीं तर, ते सर्व व्यापार उदीम बंद करून टाकितात आणि **पोर्तुगीज** हे ह्या दोघांच्याही विरुद्ध असल्या कारणानें ह्या दोहोंतून एकाच्याही म्हणण्याप्रमाणें आम्हीं वागलों तरी **पोर्तुगीजां**स असें वाटतें कीं, त्यांत आमचे अंग आहे.'

२५. इ. स. १६७४ चे एप्रील महिन्यांत **'रायगड'** येथे **शिवाजी**स राज्याभिषेक झाला त्यावेळी **मुंबई** सरकारानें त्याजकडेस जो वकील पाठविला होता, त्याचें त्यानें मोठ्या मित्रत्वानें आदरातिथ्य केलें इतकेंच नाहीं ; तर, **इंग्रजां**स आपल्या ताब्यांत असलेल्या सर्व मुलखांत व्यापार करण्याची मोकळीक दिली. परंतु त्यांत इतकी अट ठेविली होती कीं, आयात मालावर $२\frac{१}{२}$ टक्केप्रमाणें फी घेतल्यावाचून माल आत येऊं द्यावयाचा नाहीं. आणि त्यास **राजापूर, दाभोळ, चौल** आणि **कल्याण** येथें वखारी घालण्यास परवानगी दिली. ह्या मोकळीकीपासून **इंग्रजां**च्या व्यापारास बरीच तेजी आली.

२६. इ. स. १६७३—७७ पर्यंत **पोर्तुगीज** आणि **इंग्रज** हे एकमेकांविरुद्धच असत. **पोर्तुगीजां**चा जनरल **म्यान्युअल् डि सालडाना** ह्याने १२०० लोकांनिशीं **मुंबई**वर चाल केली. ह्याचें कारण असें होतें कीं, **मुंबई**च्या डेप्यूटी गव्हर्नराने **मलबार** येथील बंदरात असलेलें त्यांचे एक जहाज **पोर्तुगीजां**स देण्याचें नाकारिलें, परंतु **साल्डाना**चें कांहीं एक न चालतां तो तसाच माघारा गेला. पुढें थोडक्या दिवसांनी **पोर्तुगीज** लोकांचे कांहीं पाद्र्यांनी **इंग्रजां**विरुद्ध उठण्याकरितां त्यांस भर दिल्यावरून **इंग्रजां**नी असा हुकूम फर्माविला कीं, **मुंबई**तील सर्व **पोर्तुगीज** पाद्र्यांस हांकून द्यावें. हें

**इंग्रजां**चें कृत्य **पोर्टुगीजां**स न आवडून त्यांनी **मुंबई**तील लोकांस भुकें मारण्याचा विचार करून **वांद्रे** येथील तांदूळ येण्याचें बंद केलें इतकेंच नाहीं ; तर, फळफळावळ, भाजीपाला, कोंबडीं, बदकें वगैरेवर जबरदस्त कर बसविला, **ठाणें** आणि **करंजे** येथून **मुंबईं**त येणाऱ्या मालावर शेकडा १० टक्के कर बसवावा असाही त्यांचा विचार होता. एवढा जरी **पोर्टुगीजां**नीं त्यांस त्रास दिला तरी देखील **इंग्रजां**नीं त्यांस जुमानिलें नाहीं.

२७. पुढें **पोर्टुगिजां**नीं **हंफ्रि कूक**बरोबर तहनामा केला, त्यांतील कलमें अशीं होतीं कीं, **मुंबई**च्या बंदरांतून **पोर्टुगीज** व इतर लोकांच्या व्यापारास **इंग्रजां**नीं कोणत्याही प्रकारें अडथळा करूं नये; **पोर्टुगिजां**नीं **इंग्रजां**ची परवानगी घेतल्याशिवाय खुशाल आपलीं गलबतें **मुंबई**च्या बंदरांतून आणावीं व न्यावीं व असें करण्याचा त्यांचा इतर बंदरांप्रमाणें **मुंबई**बंदरावरही हक्क आहे. शिवाय **मुंबई**च्या रहिवाशांनीं आपला जमिनीवरील खासगी हक्क कोणत्याही कारणावरून घालवूं नये.

२८. याप्रमाणें तह झालेला ऐकून दुसऱ्या **चार्ल्स** राजानें **पोर्टुगिजां**चा व्हाईसराय ह्यास **गोंव्यास** इ. स. १६७६-७७ च्या १० मार्च रोजीं असें पत्र लिहिलें कीं, आम्हांस जो ग्रांट (दानपट्टा) तुह्मांकडून देण्यांत आला आहे, त्याअन्वयें आह्मांस न कळवितां तुम्ही **हंफ्रि कूक** ह्याजकडून जुलमानें अन्यायाचा लेख लिहून घेतला ही तुझीं फार वाईट गोष्ट केली. कारण सदर्हु दानपट्ट्यांत कोणत्याही तऱ्हेचा फेरफार करण्यास कोणासही अधिकार नाहीं. ह्या तुमच्या कृत्यापासून आमच्या राजकीय पदवीला धक्का पोंहचेल एवढेंच नाहीं; तर, तुमच्या राजासही वाईट वाटल्याशिवाय राहणार नाहीं. आह्मीं आमच्या लोकांस असा कोणत्याही प्रकारचा लेख लिहून न देण्याविषयीं पूर्वीपासून ताकीद केली आहे. व आतां ते तुह्मांस **ठाणें** व **करंजें ह्या** बंदरांतून येणाऱ्या जाणाऱ्या गलबतांवरील जकात देणार नाहींत; कारण सदर्हू तहापूर्वी असा कर आह्मांपासून कधींच घेण्यांत येत नसे. आतां, तुमच्या ताब्यांतल्या मुलखांत व्यापार करणें झाल्यास आमचे लोक तुमचे वाजवी कर देण्यास कबूल आहेत. याप्रमाणें **पोर्टुगीज** लोक वारंवार नवीन नवीन खटले उपस्थित करून **इंग्रजां**स त्रास देत.

**२९.** अशी जरी **इंग्रजांची** स्थिती होति तरी त्यांनी जिकडे तिकडे किल्ले बांधून थोडथोडें लष्कर ठेऊन **मुंबई** मोठ्या बंदोबस्तांत ठेविली होती. तरी पण, इ. स. १६७३ च्या २० व्या फेब्रुवारीस **वलंदाजी** (डच) लोकांचा सेनाधिपति **रिक्लाफ व्हानगान** हा ६,००० लोकांनिशीं आरमार घेऊन **मुंबई**वर आला; परंतु, त्यावेळचे **मुंबई**चे गव्हर्नर, जनरल **आंजिअर** हे मोठे धूर्त, चतूर व चौकस असल्याकारणानें त्यांनी आपल्यापाशीं असलेली फौज जिकडेतिकडे नाकेबंदीनें ठेऊन मोठा कडेकोट बंदोबस्त केला होता. सैन्यांत काय ते सगळे ३०० **गोरे**, ४०० **किरिस्तांव**, ३०० **भंडारी** आणि ५०० **पोर्टुगीज** व त्यांजवर एक **इंग्रज** सरदार इतके लोक असून फक्त ८ तोफा होत्या. त्या तटावर चढवून **मुंबई**च्या किल्ल्यावर ५०० लोकांची नेमणूक केली. हा इतका बंदोबस्त पाहून **रिक्लाफ व्हानगान** ह्यानें आपल्या आरमाराचें सुकाणूं फिरवून **माहिम**च्या **बाऱ्यां**त वरवा करण्याचा विचार केला; परंतु, येथेंही **आंजिअर** साहेबांनें **माहिम**च्या किल्ल्यावर ३०० **भंडारी** लोक ठेवलेच होते. ह्या शिवाय **मुंबई**च्या बंदरांच्या संरक्षणाकरितां तीस तीस तोफांची तीन लढाऊ जहाजें व पांच **फ्रेंच** (फरासीस) लोकांचीं मदतीस आलेलीं जहाजें ठेवलीं होतीं. असा **मुंबई**चा बंदोबस्त पाहून **रिक्लाफ व्हानगान** ह्यास पळून जावें लागलें. नंतर इ.स. १६८६ मध्यें पुनः **डच** लोकांनीं **मुंबई**वर असाच एक हल्ला केला होता; परंतु, तेव्हांही पूर्वीप्रमाणें कडेकोट बंदोबस्त असल्याकारणानें त्यांचें कांही एक न चालतां ह्या वेळींही त्यांस आपला गाशा गुंडाळणें भाग पडलें.

**३०.** इ. स. १६७८त **मुंबई** बंदरांत असलेल्या **मुसलमानां**च्या बोटी जाळण्याचा विचार **शिवाजीनें** केला होता; परंतु, त्यांत त्यास जय मिळाला नाहीं, ह्मणून **कल्याणा**स परत जाऊन तसाच तो पुढें **ठाण्या**स जाण्याचा प्रयत्न करीत आहे इतक्यांत **पोर्टुगिजां**नीं त्यास हरकत केली. इ.स. १६७९त **मुंबई** बंदराच्या दक्षिण किनाऱ्याचें **शिद्या**पासून रक्षण करण्याकरितां **शिवाजीनें कान्हेरी** बेट आपल्या स्वाधीन करून घेतलें. ह्या बेटावर **इंग्रज** व **पोर्टुगीज** हे दोघेही आपापला हक्क सांगत होते. हें बेट हस्तगत करून घेतल्यावर **इंग्रज** आणि **शिदी** ह्या दोघांनींही **शिवाजीस** हांकून देण्याचा पुष्कळ प्रयत्न केला **इंग्रजांनीं** तर **मराठ्यां**चा पाडाव करून त्यांचे पुष्कळ लोक मारून चार गलबतेंही बुडविलीं, तरी त्यानें ह्या बेटावरील आपला हक्क सोडिला नाहीं.

३१. इ. स. १६८०च्या ५ एप्रिल रोजीं **शिवाजी**चें देहावसान झालें. त्याच्यामागून त्याचा मुलगा **संभाजी** हा **औरंगझेबा**चा बंडखोर मुलगा **सुलतान अकबर** ह्यास सामील झाल्याकारणानें त्याजवर **औरंगझेबा**चा मोठा कोप झाला होता. **शिद्दी** आणि **मराठे** ह्यांजमध्यें वारंवार लढाया होत असल्यामुळें **मुंबई**च्या किनाऱ्यावर नेहमीं हल्ले चालूच असत. तेव्हां अर्थात **मुंबई**तील इंग्रजांस ह्यांची मोठी भीति असे. शिवाय **इंग्रजां**जवळ फौजफांटाही ह्मणण्यासारखा नव्हता म्हणून **कंपनी** सरकारास ह्या बेटांत वसाहत करविण्याच्या कामीं पुष्कळ श्रम पडले; कारण **संभाजी**चा **मुंबई**वर डोळा होता व म्हणूनच तो पुष्कळ सैन्यानिशीं **घारापुरी** व **कान्हेरी, हुनेरी** येथें येऊन वारंवार छावणी देत असे.

३२. इ. स. १६८२त **मोंगलां**चें सैन्य **जुन्नराहून कल्याणा**स आलें त्यावेळीं **पोर्टुगिजां**ची सत्ता **बेलापुरा**वरची नाहींशी झाली होती आणि **शिद्दी कासीम** हाही **बेलापुर** येथें **मराठ्यांपासून** आपलें संरक्षण व्हावें म्हणून एक किल्ला बांधीत होता. ह्याच वर्षाच्या एप्रिल महिन्यांत सदर्हु **शिद्दी कासीम** हा **मुंबई**वर आला तेव्हां **औरंगझेब** बादशहाची मर्जी खप्पा न व्हावी ह्मणून **इंग्रजां**नीं त्यास **मुंबई**च्या बंदरांत वरवा करण्याची मोकळीक दिली. पुढें पावसाळा गेल्यानंतर **मराठे** आणि **शिद्दी** ह्यांची पुनः **मुंबई**च्या बंदरांत चकामक झडली तींत **संभाजी**चा पराभव होऊन **शिद्द्यानें** त्याचीं तारवें लुटिलीं, गांवें जाळिलीं व कित्येक बायका पळवून नेऊन **महाड**पर्यंत चाल करून **संभाजी**चा जनरल [1]**दादाजी रघुनाथ देशपांडे** ह्याची बायको कैद करून घेऊन गेला. असें जेव्हां झालें तेव्हां **संभाजीनें घारापुरी** येथें किल्ले बांधण्याची तयारी करून आपल्या **दौलतखान** नामक सरदारास **मुंबई**स वेढा घालण्याकरितां पाठविलें व त्यास कुमक करण्याकरितां **मोंगलां**चे ३,००० लोक **माजगांव** येथें तळ देऊन राहिले होते. ह्या शिवाय **अलिबाग**चा **आंग्रया, हपसाणां**तील **शिद्दी, वाडीचा सांवंत, जंजिऱ्याचे चांचे** इत्यादि सरदारांकडून **मुंबई**तील लोकांस बराच त्रास पोंहचे. **चांचे** वगैरे लोक मोठमोठीं जहाजें लुटीत, त्यांतील मालाची नासधूस करीत,

---

१. कुलाबा गझेटीअर.

लोकांस कैद करीत आणि कधीं कधीं ठारही मारीत. **याकूबखान** तर इ. स. १६७२ पासून **माजगांवा**स येऊन हजारो लोकांनिशीं तळ देऊन रहात असे एवढेंच नाहीं ; तर, कधीं कधीं आसपासच्या गांवांत जाऊन तीं लुटीही. **याकूबखाना**चे व **शिवाजी**चे वाकडे होते त्यामुळें त्याजवर जाण्याच्या निमित्तानें तो **मुंबई**वर येऊन तळ देई. **पोर्तुगीज** लोकांप्रमाणेंच **संभाजी**नेंही एक दोनदां दाणा गल्ला **मुंबई**स पाठविण्याचें बंद केलें होतें, ह्यामुळे येथील लोकांचे बरेच हाल झाले.

३३. इ. स. १६८३ साली **सर जान चाईल्ड** याचे कारकीर्दीत डच लोकांनीं **बंटम** घेतल्यामुळे **इंग्रजांनीं मुंबई** आपले मुख्य ठाणें करून सैन्य वाढविलें. वर्षअखेरीच्या सुमारास **मुंबई** येथील सैन्याचे कम्यांडर कप्तान **रिचर्ड केगविन**–कौन्सिलचा तिसरा मेंबर–ह्यानें आपल्या पगाराच्या व खाण्याच्या खर्चाबद्दलची **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** ह्यांनी मंजुरी न दिल्याकारणानें **कंपनी** सरकाराविरूद्ध सैन्य फितवून बंड करून डेप्यूटी गव्हर्नर मि. **वार्ड** यास कैद केलें व त्यानें ह्या बेटांतील कारभार २७ डिसेंबर १६८३ पासून तों १९ नोव्हेंबर १६८४ पर्यंत **इंग्लंद**च्या राजाच्या नांवानें चालविला. **सुरत** येथील वखारीचे प्रेसिडेंट व **मुंबई**चे गव्हर्नर सदर्हु **चाईल्ड** हे **मुंबई**स येऊन त्यांनी बंड मिटविण्याविषयीं पुष्कळ खटपट केली ; परंतु, त्यांचे कांहीं एक न चालतां त्यांस **सुरत** येथें पुनः परत जावें लागलें. ह्या प्रसंगी **केगविन** व त्याचा साथी **थॉर्नबर्न** ह्या प्रत्येकास धरून देणारास ४,००० रुपयांचें बक्षीस ; **अंडरसन** व **फ्लेचर** ह्या बंडखोरांस पकडण्याबद्दल प्रत्येकीं २,००० व दंग्यांत जे कोणी जखमी वगैरे होतील त्यांस बक्षीसादाखल वांटण्याकरितां ८,००० रुपये **कंपनीसरकार**नें काढले होते असें सांगतात. हें बंड इ. स. १६८४ च्या आक्टोबर महिन्यापर्यंत चाललें. ह्या वेळी **विलायते**हून इंडियन आरमाराचे व्हाईस आडमिरल सर **थामस ग्रांथ्याम** हे **मुंबई**त नोव्हेंबर महिन्यांत येऊन दाखल झाले ; तेव्हां कप्तान **केगविन** ह्यानें 'आपणांस अपराध माफ असल्यास हें बेट तुमच्या स्वाधीन करतों' असें सांगून माफी मिळाल्यावर त्यांच्या स्वाधीन हें बेट केलें. नंतर त्यास **विलायते**स जाण्याचा हुकूम झाला. आतां, जरी **केगविन** ह्यानें बंड करून **मुंबई**

आपल्या स्वाधीन करून घेतली होतीं तरी, त्यानें तितक्या काळांत **मुंबई**ची राज्यव्यवस्था फार उत्तमरीतीनें ठेविली होती इतकेंच केवळ नव्हे ; तर, त्यानें **संभाजी**बरोबर मैत्री जोडून **इंग्लिशां**स हितकारक असा तह करून **शिद्यांस**ही **मुंबई**त येण्याचें बंद केलें होतें. सारांश, त्यानें ह्या बेटाची राज्यव्यवस्था मोठ्या दक्षतेंने चालविली होती व हीच त्याची दक्षता **मराठे**, **मोंगल** व **शिद्दी** ह्यांच्या तावडींतून हें बेट सोडविण्यास कारणीभूत झाली असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

**३४.** इ. स. १६८७ ह्या वर्षी **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** ह्यांनीं व्यापाराची वृद्धि होण्याकरितां **मुंबई, मद्रास** आणि **चितागांग** इत्यादि ठिकाणीं स्वतंत्र वसाहती करण्याचें मनांत आणिलें. त्यांत **मुंबई** ही त्यांनी आपलें मुख्य ठाणें केलें व सर **जॉन चाईल्ड** यास **मुंबई**स **मराठे** व **मोगल** यांजबरोबर मित्रत्व करण्यास पुष्कळ सैन्य व आरमार देऊन **सुरते**हून **मुंबई**स पाठविलें; पण, त्यास ह्या कामीं ह्मणण्यासारखे यश न येतां तो इ. स. १६९० त फेब्रुवारीच्या ४ थ्या तारखेस मरण पावला.

**३५.** इ. स. १६८९ तारीख २२ फेब्रुवारी ह्या दिवशीं **जंजिऱ्या**चा **शिद्दी** २५,००० फौज घेऊन **मुंबई**वर आला. पहिल्यानें **शिवरी** येथील किल्ला हस्तगत करून घेऊन दुसऱ्या दिवशी **माजगांव**च्या किल्लयावर चाल केली व तेथें असलेल्या संत्री लोकांस हांकून देऊन किल्ल्यांतील सर्व दारुगोळा व तोफखाना आणि नाण्याच्या कांहीं पेट्या आपल्या हस्तगत करून घेतल्या. पुढें **माहिम**चा किल्ला स्वाधीन करून घेण्याकरितां तेथें कांहीं सैन्यास जाण्याचा हुकूम दिला आणि **डोंगरी** किल्ल्यांवर तोफा रचून **इंग्रजां**च्या ताब्यांत असलेला **मुंबई**चा मोठा किल्ला घेण्याची मसलत केली होती. **मुंबई**चा बहुतेक भाग त्याच्या स्वाधीन होऊन त्याचे लष्कर सुमारें ४५,००० लोकांचें झालें. सुमारे एक वर्ष येथें राहून शेवटी **माजगांव**चा किल्ला जाळून इ. स. १६९० त तो परत गेला. ह्या स्वारीनंतर **मुंबईं**त महामारीचा रोग उत्पन्न होऊन पुष्कळ लोक मेले व **इंग्रज** सैन्यापैकीं काय ते सगळे ३५ गोरे शिपाई शहरसंरक्षणाकरितां राहिले.

३६. ह्या वेळी **जॉन चाईल्ड** नांवाचा एक इंग्रज व्यापारी ह्या बेटात होता. तो **कंपनीसरकार**ची राज्यसत्ता वाढविण्याच्या कामीं फार झटत असल्याकारणानें त्याला त्यांनी **'ब्यारोनेट'** चा किताब देऊन **'आडमिरल'** व **मुंबई**च्या फौजेचा 'जनरल'[१] हा हुद्दा देऊन शिवाय **मुंबई**चे गव्हर्नराच्या जागेवर नेमिलें होतें. हाच वरील सर **जॉन चाईल्ड** होय. त्यास हल्लींच्या गव्हर्नर जनरलाइतका अधिकार होता. पण ह्याचा स्वभाव उद्धट असल्याकरणानें **औरंगझेब** बादशहाचा ह्याजवर वक्र डोळा असे.

३७. याप्रमाणे स्थिति असल्याकारणानें **याकुबखाना**चें निवारण करण्यास त्यास बरेच प्रयास पडले. त्यानें मुंबईहून तळ उठवून जावें म्हणून **चाईल्ड** ह्यानें **औरंगझेबा**बरोबर तहाचें बोलणे लावण्याकरितां **दिल्ली**स दोन वकील पाठविले होते, त्यांनीं **औरंगझेबा**च्या सर्व अटी कबूल करून त्याजबरोबर इ. स. १६९० त तह केला त्यांतील कलमें येणेप्रमाणें:–

१. सर **जॉन चाईल्ड** ह्यानें नऊ महिन्याचे आंत **हिंदुस्थान** सोडून जावें.

२. **मोंगल**सरकारास **याकूबखाना**चे स्वारीसंबधीं जो खर्च झाला असेल तो भरून काढण्याकरितां इंग्रजांनी आपला एक मनुष्य ओलीस द्यावा,

३. **कंपनीचे** शिपायांस रयतेंत न गणतां त्यांस गुलामांप्रमाणे गणावें.

३८. सदर्हु तहाचा लेख आह्मीं **मुंबई**च्या वर्णनांतून खालीं दिला आहे:– तारीख २७ माहे फेब्रुवारी सन १६८९-९० मोठ्या कीर्तिमान राज्याच्या तेहतिसाव्या वर्षी, "सर्व इंग्रज लोकांनीं मोठ्या नम्रतेने अर्ज केला कीं, जे आपण अपराध केले त्यांची आपणास क्षमा असावी, आणि क्षमा झाली हें प्रसिद्ध होण्यासाठी नवीन फरमान द्यावा अशी विनंती केली; आणि जगामध्यें जें मोठें प्रतापी स्थळ अत्युत्तम राजमंदीर येथे बादशहाची कृपादृष्टी असावी ह्मणून आपले वकील पाठविले. आणखी गुन्हेगारीबद्दल ते ज्याचा

१. सर **जॉन चाईल्ड** ह्याच्या मरणापर्यंत **सुरते**च्या वखारीवरील अधिकाऱ्यास **'जनरल'** ही पदवी होती; परंतु, पुढें ही पदवी काढून टाकून तिच्या ऐवजीं **"प्रेसिडेंट"** ही पदवी चालू केली व ह्याच वेळेपासून पायदळाचे कपतान लोक हे **मुंबई**च्या एक्झिक्युटिव कौन्सिलचे मेंबर होऊं लागले.

जामदारखाना मोठा आणि सूर्यासारिखा प्रज्वलित आहे अशा महान बादशहास दीड लक्ष रुपये नजराणा करतील; आणि सावकार लोकांचा माल जो त्यांनीं हरण केला आहे, तो त्यांच्या धन्यांस परत देतील आणि मामूल चालीप्रमाणें वहिवाट ठेवून इतःपर याप्रमाणें गैररीतीची वर्तणूक ठेवणार नाहीत. असा सुरतेचे सुभेदार यांजकडून अस्मानाएवढा अर्ज या नामांकित दरबारांत पोंहचला; सबब जी आपली मेहरबानी सर्वलोकावर करण्यास योग्य आहे, तेणेंकरून दयाळू होऊन त्यांच्या अपराधाची क्षमा केली आहे. आणि बादशहा लायक मेहरबानगीनें फरमावितात कीं, नजराणा सुरतेच्या जामदारखान्यात दाखल करण्यात यावा, सावकारांचा माल परत केला जावा, शहराची अबादानी असावी, आणि त्यांनीं पूर्ववत व्यापार चालवावा; व मि. चैल्ड ज्यानें ही बेअदबीची गोष्ट केली, त्यास येथून लावून देण्यांत यावें. हा हुकूम अनिवर्त आहे. "

३९. यावरून पाहतां एकदरीनें ह्या तहापासून इंग्रजांचें बहुत नुकसान होऊन त्यांस नीचत्व आलें हें सागणें नकोच. शिवाय **याकुबखाना**च्या स्वारीसंबंधीं झालेला ४१,६०,००० रुपये खर्च भरून द्यावा लागला. ह्याप्रमाणें इंग्रजांची लीनता दिसल्यावरून याकुबखानास **औरंगझेबानें** हुकूम पाठविल्याप्रमाणें जातेवेळीं बरीच लुटालूट करून हें बेट इंग्रजांच्या स्वाधीन करून तो जंजिऱ्यास परत गेला.

४०. वरील प्रकार बहुतकरून सर **जॉन चाईल्ड** ह्याच्या हयगयीमुळें झाला असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं; कारण ह्यास सरदार नेमलें होतें तरी, हा फक्त नावाचाच सरदार होता. ज्या वेळी शत्रु चाल करून आला त्या वेळी ह्याला लढण्याचें ज्ञान नसल्याकारणानें **इंग्रज**सरकारच्या स्वाधीन थोडाबहुत असलेला मुलुखही ह्यानें घालविला. ह्याच्या हाताखालीं २,५०० फौज होती एवढेंच केवळ नव्हे; तर, त्याच्या स्वाधीन १२ लढाऊ गलबतेंही होती; परंतु, ह्याची हयगय ह्या पराभवास कारणीभूत होऊन वरील तहांप्रमाणें त्यास हा प्रांत सोडूनही जाणें भाग पडलें असतें; परंतु, ही तहाची मुदत संपण्यापूर्वीच सदर्हु **चाईल्ड** साहेब मरण पावले.

४१. इ. स. १६९० च्या फेब्रुवारी महिन्याचे २७ वे तारखेस **मोंगलांनी इंग्रजां**स व्यापार करण्याची मोकळीक दिली; परंतु, ज्या अटीवर ही

मोकळीक देण्यांत आली होती, त्या अटी **इंग्रजांस** फार मानहानीकारक होत्या. कारण त्यांस आपला अपराध कबूल करून क्षमा मागावी लागली, पुष्कळ दंड द्यावा लागला, 'आह्मी पुनः आमचा व्यापाराचा धंदा पत्करूं' असें कबूल करावें लागलें. ह्या सर्व संकटाचें आदिकारण जो सर **जॉन चाईल्ड** ह्यास काढून टाकूं असें कबूल करावें लागलें; हें वर सांगितलेंच आहे. ह्यापूर्वीच (ह्मणजे इ. स. १६८९ त) **शिद्द्यांच्या** सैन्यानें **मुंबईवर** चाल करून **माहिम, मांजगांव, शीव**, वगैरे गांवें आपल्या हस्तगत करून घेतली आणि गव्हर्नर व त्यांचे सैन्य ह्यांस कैद केलें. ही गावें **इंग्रजांच्या** हस्तगत २२ जून १६९० पर्यंत झालीं नव्हती; कारण बेटाचे संरक्षणाकरितां बंदोबस्त इतका कमी व सैन्य इतकें निर्बल होतें की, **मोंगलांचा** जनरल **मुक्त्यारखान** ह्याचें आणि **शिद्द्यांचे** वांकडें नसतें तर त्यांनीं **मुंबईबेट** कधीच काबीज केलें असतें.

४२. इ. स. १६९२ त **मुंबईत** महामारीच्या सपाट्यानें **इंग्रजांचे** सैन्य बरेंच नाहीसें झालें, ही संधी पाहून **जंजिऱ्याच्या हपशानें** पुनः **मुंबईवर** चाल केली. ह्या प्रसंगीं **रस्तम दोराब** ह्या पारशी गृहस्थानें **कोळी** लोकांस शिपाई बनवून आणि दुसऱ्या अनेक उपायांनीं **इंग्रजांस** मदत करून ह्या परचक्राचें निवारण केलें. ह्या त्याच्या कामगिरीबद्दल सरकारानें त्यास **मुंबईतील** पाटिलकीचा अधिकार दिला आणि सदर्हु किताब त्याच्या वंशपरंपरेनें चालावा असा सनदपट्टा करून देऊन **कोळी** लोकांचा मनसुबा करण्याचा अधिकारही त्यास दिला व तो अजूनही त्याच्या वशंजाकडे चालत आहे असें वाटतें. पुढें गव्हर्नर **हार्नबी** ह्यानें सदर्हु **रस्तम दोराब** ह्याचा चिरंजीव **कावसजी** ह्यास वरील किताब दिला व कावसजी पाटलाचें तळे जें **मुंबईत** प्रसिद्ध आहे तें ह्याच गृहस्थानें बांधले आहे.

४३. **ईस्टइंदिया कंपनीला** ता. ७ अक्टोबर व ११ नोव्हेंबर १६९३ ह्या वर्षी जे दोन **चार्टर** (सनदा) मिळाले त्या योगानें **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** यांचे अधिकार विशेष वाढून दुसरी **ईस्टइंदिया** नांवाची नवीन कंपनी निघणार होती, तिचाही मोड झाला. ह्याच सुमारास **फोर्ट सेंट जार्ज** येथील गव्हर्नर सर **जान गोल्डबरो** ह्यांस सर्व **हिंदुस्थानाचे 'जनरल'** नेमण्यांत आलें आणि सर **जान गेयर** यांस **'लेफटेनंट जनरल'**ची पदवी मिळाली.

४४. इ. स. १७१७[1] त **कान्होजी आंग्रे** ह्यानें **इंग्रज** सैन्याचा मोड करून **विजयदुर्ग** येथील किल्ल्यावर हल्ला करण्यास त्यांस अडथळा केला. पुढें इ. स. १७१८ त इंग्रजांनीं **कान्हेरीव**र हल्ला केला; परंतु, त्यांच्या जवळ भरपूर सैन्य नसल्याकारणानें त्या वेळचे गव्हर्नर **चार्ल्सबून** ह्यांनीं हें कार्य अन्य उपायानें साधून घेण्याचें योजिलें. त्यानें सर्वास लालुच दाखवून असें प्रसिद्ध केलें कीं, जे कोणी आह्मांस ह्या कृत्यांत मदत करतील त्यांस **मुंबईस** परत आल्यावर दरमहा ४० रुपये व ह्या सरकारच्या कामांत हस्तपादादि अवयवांनीं पंगू होतील त्यांस सालिना ३०० रुपये देऊन **कंपनी**चे नोकर असे समजू. याप्रमाणें सैन्य वाढवून त्यानें आपलें कार्य साधून घेतलें.

४५. ह्या **आंग्र्या**च्या स्वारीनंतर **इंग्रजां**चे सूत्र कांहीं वर्षे नीट चाललें होतें असें दिसतें; इतक्यांत पुनः इ. स. १७२० मध्यें **पोर्टुगीज** व **इंग्रज** ह्यांचें वाकडे पडल्यामुळें त्यांनीं **वांदऱ्याचा** आणि **मुंबई**चा संबंध तोडला; त्यावेळीं **इंग्रज** सरकारानें अशी दवंडी पिटविली कीं, २१ दिवसांचे आंत सर्व **पोर्टुगीज** लोकांनीं **मुंबई** सोडून **माहिमा**स निघून जावें; पण, पुढे आपापसांत समजूत झाल्याकारणानें **पोर्टुगिजांस मुंबईं**तून निघून जाण्याचा प्रसंग आला नाहीं. पुढे इ.स. १७२७ त **पोर्टुगिजांनीं इंग्रजां**कडून **मुंबई** विकत घेण्याचा घाट घातला होता पण तसें कांहीं घडून आलें नाहीं.

४६. इ. स. १७३९ त पेशव्यांनीं **पोर्टुगिजां**पासून वसई घेतल्यानंतर त्यांची सत्ता **मुंबई** खेरीज करून **ठाण्याच्या** भागावर पसरत चालली होती. **आंग्र्या**चा मुलूख तर त्यांनीं पाहिजे तेव्हा घेतला असता. ह्याच सुमारास **पोर्टुगिजांस चौल** येथें लावून दिल्यामुळें **मुंबईं**तील लोक अगदीं हवालदील होऊन गेले होते आणि **मुंबई**ची सैन्याचे संबंधानें स्थिति चांगलीशी नसल्यामुळें **मुंबई**सरकारानें **वसईस** एक **चिमणाजीआपाकडे;** आणि एक **सातारच्या महाराजांकडे;** असे दोन वकील पाठविले. **चिमणाजीआपाकडे** गेलेल्या वकिलानें **इंग्रजांस** हितकारक असा तहनामा करून घेतला व **सातारचे**

1. Lows Indian Navy.

**महाराजांकडे** गेलेल्या वकिलानें **महाराजां**कडून असें आश्वासन मिळविलें कीं, **हिंदुस्थानां**तील लोक **इंग्रजां**च्या व्यापाराचें महत्त्व जाणतात म्हणून **मुंबई**वर कोणी हल्ला हरकत करणार नाहीं; परंतु, ह्या आश्वासनापासून हवातसा उपयोग झाला नाहीं; कारण, थोडक्याच दिवसांनीं **इंग्रज** व्यापाऱ्यांचे जहाज **आंग्र्यांनी** लुटिलें व त्यांचे त्यांनीं पुष्कळ नुकसान केलें.

४७. याप्रमाणे जरी **मुंबई**ची स्थिति होती तरी तिचें महत्त्व यत्किंचितही कमी न होतां उलट दिवसेंदिवस वाढतच चाललें होतें. इ. स. १७५३ सालीं **कंपनी**सरकाराने **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** ह्यास लिहिलें कीं, ह्या शहराची वस्ती उत्तरोत्तर वाढत चालल्याकारणानें शहर वाढवावें ह्मणून येथील राहणाऱ्या लोकांची नेहमीं ओरड चालली आहे, आणि **औरंगाबाद, पुणे** व इतर ठिकाणचे पेढीवाले ह्यांनीं आपलीं दुकानें येथें उघडलीं असल्यामुळें व्यापारास फार तेजी येत चालली आहे. एवढी वस्ती वाढण्याचें कारण इ. स. १७४८ त **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स**कडून लोकांस येथें वसाहत करण्यास उत्तेजन द्यावे व त्यांजपासून पांच वर्षेपर्यंत कर घेऊं नये ह्मणून **कंपनी**सरकारास लिहून आलें होतें, हेंच होय, हें मार्गे सांगितलेंच आहे. शहर स्वच्छ ठेवण्याविषयीं नेहमी प्रयत्न चालूच होते. प्रत्येक धर्मातील मनुष्यांस आपापल्या धर्माप्रमाणे वागण्याची पूर्ण मोकळीस असल्याकारणानें लोकांस ती पसंत पडून **मुंबईं**त वस्तीशिवाय किंचित्‌ही जागा उरली नव्हती; एवढेंच केवळ नव्हे तर, हें शहर व्यापाराचे मुख्य स्थान असून ह्या बंदराचा व्यापार पश्चिम आणि उत्तर **हिदुस्थान, मलबार**किनारा, **इराणचे** अखात आणि **तांबडा समुद्र** ह्यांजबरोबर चालत होता. ह्याच कारणास्तव **इंग्रज्यांच्या हिंदुस्थानां**तील इतर सर्व मुलखापेक्षां **मुंबई** शहर हे त्यांचा अगदीं जीव कीं प्राण होऊन गेलें होतें.

४८. **पोर्टुगिजांचें कोंकणांत** मुख्य ठाणें **वसई** हें होतें. **इंग्रज** लोक **मुंबई**स आले त्यापूर्वी **मुंबई**वर **पोर्टुगिजां**ची सत्ता १३० वर्षांहून अधिक होती. इतकेंही असून आज पाहिलें तर त्याचें राज्य येथें कधीं होतें किं नाहीं, ह्याचा कांहींच पत्ता लागत नाहीं. कारण त्यांच्या अमदानींत ह्मणण्यासारखी कोणतीच सुधारणा येथें झालेली दिसण्यांत येत नाहीं;

त्यांनीं केलेलें कोणतेंही लोकोपयोगी काम आढळत नाहीं; परंतु हें शहर **इंग्रजां**चे स्वाधीन झाल्यादिवसापासून ह्याची उत्तरोत्तर भरभराटी होत चालली आहे व जिकडेतिकडे सुधारणाच सुधारणा पाहण्यांत येत आहे. ही फार अभिनंदनीय गोष्ट होय.

४९. याप्रमाणें ज्या ज्या ऐतिहासिक गोष्टींचा **मुंबई**शी अगदीं निकट संबंध होता असें दिसलें, त्याची त्यांची संक्षिप्त माहिती आह्मीं आमच्या वाचकांपुढे सादर केली. आता मधून मधून **इंग्रजां**स इतर राजकीयप्रकरणीं अनेक वेळीं अनेक लढाया करण्याचे प्रसंग आले आणि तेणेंकरून वारंवार सैन्यही वाढवावें लागलें; परंतु, त्याचा **मुंबई**शीं वास्तविक संबंध नाहीं असें वाटल्यावरून तत्संबंधी आह्मी येथे कांहीं उल्लेख केला नाहीं. कारण उगीच खोगीरभरती माहिती देऊन विनाकारण ग्रंथ वाढविणें आह्मांस प्रशस्त दिसत नाहीं.

५०. आतां, खुद **मुंबई** शहरांत अलीकडे फार अर्वाचीनकाळीं ज्या मुख्यमुख्य ऐतिहासिक गोष्टी घडून आल्या त्याचा गोषवारा येथें देऊन हा भाग पुरा करितों.

५१. इ. स. १८५१ सालीं ह्या शहरांत **मुसलमान** लोकांनीं मोठा दंगा केला होता. ह्या दंग्याचें कारण असें समजतें कीं, कोणी एका पारशानें **मुसलमानां**च्या पैगंबराचें वेडेंवांकडें चित्र काढून त्याचा खोटाच वृत्तांत दिला होता व तें त्यानें त्यांच्या मशिदींवर चिकटविले होतें; त्यामुळें कांहीं दिवस येथें मोठा गोंधळ उडून गेला होता; तेणेंकरून येथील लोकांचेंही नुकसान बहुत झालें ह्मणून सांगतात.

५२. इ.स. १८५७ सालीं **बंगाल**च्या पलटणीनें मोठे बंड केलें होतें त्यामुळे **हिंदुस्थान**च्या रयतेची व **कंपनी**सरकारची फार नुकसानी झाली. हें बंड मोडण्यास सरकारास एक कोटी रुपये खर्च झाला ह्मणून सांगतात. पुढच्या वर्षीं सर्व बंडाळी मोडून जिकडे तिकडे शांतता झाल्यावर नोव्हेंबराचे पहिल्या तारखेस आपल्या प्रिय महाराणीने जाहिरनामा प्रसिद्ध करून व आह्मां **हिंदुस्थान**वासी जनांस अभय देऊन **कंपनी**सरकारचे

हातून **हिंदुस्थान**चें राज्यसूत्र आपल्या हातीं घेतलें व त्या दिवसापासून त्या हा राज्यशकट मोठ्या हुशारीनें व दक्षतेनें प्रजेस त्रास न देता हांकीत आहेत ही मोठी अभिनंदनीय व आमच्या हिताची गोष्ट होय.

५३. इ.स. १८७४ सालीं पुनः **मुसलमान** लोकांनीं **पारशांच्या** विरुद्ध बंड केलें; त्या वेळीं **मुंबई**तील **पारशां**ची पांचांवर धारण बसली होती. जेथें जेथें पारशी सांपडेल तेथें तेथें त्यास धरून ते मारीत, त्यांचीं घरें फोडीत, सांपडेल तें लुटीत व त्यांच्या बायकामुलांस त्रास देत. ह्या बंडांत **पारशांचे** फार नुकसान झालें. कांहीं लोक मारलेही गेले. **मुसलमानां**चेंही थोडें बहुत नुकसान झालें. हें बंड उद्भवण्याचें कारण असे दिसतें कीं, **रुस्तमजी हारमसजी** नांवाच्या एका **पारशी** गृहस्थानें गुजराथीभाषेंत सर्व देशांतील भविष्यवाद्यांचें चरित्र ह्मणून एक पुस्तक लिहिलें होतें, त्यांत **महंमदा**विषयीं फारच वाईट लेख लिहिला होता आणि तोच बंड उपस्थित होण्यास कारण झाला. हें बंड बरेच दिवस धुमसत होते. पण येथील पोलीसानें सैन्याच्या साह्यानें तें लवकरच मिटविलें.

---

## लोकसंख्या

लोकवस्तीच्या मानानें पाहूं गेलें तर, आपल्या ह्या **हिंदुस्थान** देशांत **मुंबई** शहरायेवढी वस्ती दुसऱ्या कोणत्याही शहरीं नसेल. ह्या शहरांत अनेक जातींचे, अनेक धर्मांचे, आणि अनेक पंथांचे लोक आहेत; ह्या वरून कित्येक लोक ह्या शहरास 'बकाली शहर', असें म्हणतात. वस्तीचें मान ह्मटलें म्हणजे, शंभरी ७६ हिंदु, १७ मुसलमान आणि ७ बाकीचे इतर लोक असें आहे, असे इ. स. १८८१ चे खानेसुमारीवरून समजतें. शेंकडो पंथांचे व धर्मांचे लोक ज्या मानानें येथें राहतात, त्याच मानानें पापपुण्याचरणाची व्यवस्था असणे हेंही साहजिक आहे; ह्मणजे जसा धर्म तसाच अधर्मही त्याचबरोबर, — किबहुना विशेष— होतो असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्या संबंधानें येवढेंच ह्मणणें पुरे आहे; कारण हा विषय स्वतंत्र आहे ह्मणून आह्मींही त्याविषयीं येथें कांहीं लिहित नाहीं.

२. धर्माच्या संबंधानें पाहिलें तर, एका धर्माच्या लोकांतही अनेक जाती, व त्यांतही त्यांचे अनेक अंतरंग भेद दृष्टीस पडतात येवढेंच नाहीं; तर, एका जातीच्या लोकांचें दुसऱ्या जातीच्या लोकांशीं रुपसादृश्य बहुधा नसतें; उदाहरणार्थ— महंमदधर्मानुयायांत **अफगाणी , इराणी, आरब, तुर्की, मलाई, चिनी, अबिसीनिअन** वगैरे जाती मोडतात. रुपसादृश्य नाहीं तें नाहींच; पण, प्रत्येक जातीच्या लोकांच्या रीतीभाती आचारविचार देखील सर्व भिन्न असतात. ही विधर्मी लोकांची गोष्ट झाली. आमच्या लोकांचीही स्थिति अशीच. उदाहरणार्थ ब्राह्मणच घ्या— **चित्पावन** निराळे; **कऱ्हाडे** निराळे; **यजुर्वेदी** निराळे; **गुर्जर** निराळे; एका जातीच्या मनुष्याचें रूपसादृश्य दुसऱ्या जातीच्या मनुष्यास नाहीं. एकंदरीत एकमेकांपासून सर्वच भिन्नता. ह्याप्रमाणें इतर सर्व धर्मांचे व जातींचे लोकांची व्यवस्था समजावयाची. ह्या संबंधानें शहराच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळी वस्ती आढळते; तरी पण, **हिंदुस्थानां**तील इतर शहराप्रमाणें अगदीं तंतोतंत व्यवस्था येथें दृष्टीस पडावयाची नाहीं. तेथें ' ब्राह्मणआळी '

निराळी ; ' तांबटआळी ' निराळी ; ह्मणजे अर्थात जेथें एका जातीचा भरणा फार तेथें दुसऱ्या जातीची वस्ती होणें नाहीं. **मुंबई**मध्यें ही व्यवस्था कशी आहे ते खालीं उदाहरणार्थ दाखवितों ; तरी पण, ज्या ठिकाणीं ज्या लोकांची वस्ती आहे ह्मणून खालीं दाखविलें आहे, त्या ठिकाणीं ह्मणजे तेच लोक राहतात ; दुसरे मुळींच राहत नाहींत ; असें मात्र वाचकांनीं समजूं नये. तेथेंही दुसरे लोक राहतात ; पण, विशेष भरणा त्यात्यां विवक्षित लोकांचा असतो असें समजावें. खेड्यापाड्यांत साधारणतः ह्या संबंधानें बरी व्यवस्था दृष्टीस पडते ; पण तसला प्रकार अगदीं कांटेतोल एवढ्या लहानच पण, भरगच्च वस्तीच्या शहरीं राहणें फारच असंभवनीय गोष्ट होय. तरी पण, नेहमीं साधारणपणें असेंच पाहण्यांत येतें कीं, साधेल तेथें प्रत्येक धर्माचे, धर्मपंथाचे किंवा जातीचे लोक आपापल्या धर्माचा, धर्मपंथाचा किंवा जातीचा शेजार पाहून राहतात. हें साहजिक आहे ; व तसें राहणेंही इष्ट आहे. हें ह्मणणें आपण उदाहरणानें व्यक्त करूं. पहा–जेथें **पारशां**ची वस्ती फार, तेथें एकाच **हिंदू**चें बिऱ्हाड जाऊन रहावयाचें नाहीं ; किंवा, जेथें **हिंदु** लोकांचा भरणा फार, तेथें एकाच किरिस्तांवाचें बिऱ्हाड येऊन रहावयाचें नाहीं.

३. **धोबीतळें, काळबादेवी, गिरगांव, माजगांव, परळ, माटुंगें, वरळी, माहिम** आणि **शीव** येथें बहुतकरून **दक्षणी** लोकांची वस्ती फार. **गुजराथी** लोकांची वस्ती ह्मटली ह्मणजे **भुलेश्वर, भोयवाडा, मुंबादेवी, कोट, मांडवी** इत्यादि ठिकाणीं फार. व्यापारी लोक बहुशः ज्या ठिकाणीं व्यापाराची सोई त्यांस जवळ दिसेल, व व्यापारासंबंधी घडामोड सुलभरीतीनें करतां येईल अशा ठिकाणीं जाऊन रहातात. चाकरी करणारे लोक मुख्यत्वें **गिरगांव, वाळकेश्वर, महालक्ष्मी** ह्या बाजूला राहतात. **गिरगांव** व **माहिम** ह्या ठिकाणीं **किरिस्तांव** लोकांची वस्ती विशेष. **कोट, गिरगांव, परळ, महालक्ष्मी, वाळकेश्वर** वगैरे ठिकाणीं **पारशी** लोक फार रहातात. **मुसलमान** लोकांची वस्ती बहुधा पायधुणीपासून तों थेट सगळा **भेंडीबाजार, चकला,**

**नळबाजारा**पासून तों थेट **मांडवी**पर्यंत. **साहेब** लोकांची वस्ती फारकरून **वाळकेश्वर, महालक्ष्मी, गवाळीट्यांकरोड** येथें फार व पुढें **भायखळा, कोट** वगैरे ठिकाणीं तुरळक अशी आहे. **भाटे, वाणी, पारशी, खोजे, मुसलमान, मेमण, कच्छी** इत्यादि लोकांची वस्ती **कोट, मशीदबंदर**, **चिंचबंदर, डोंगरी, मुंबादेवी** इत्यादि ठिकाणीं आहे. **शेतवळी, कुंभारवाडा**, **डंकनरोड, नागपाडा** आणि **माटुंगें** येथे बहुत करून पंचभेळ वस्ती आहे. **महार, मांग, धेड, चांभार** वगैरे लोक बहुधा येथेंच रहातात. **भंगी** लोकांची वस्ती **शेतवळीं**त **भंगीवाडा** ह्मणून एक गल्ली आहे तेथें फार आहे. सर्व जातीच्या विश्वयोषितांचा सुळसुळाट सर्वत्र पाहण्यांत येतो ; तरी पण, **कुंभारतुकडा, फणसवाडी, खरसेटजी सुक्लाजी स्ट्रीट, भेंडीबाजार** वगैरे ह्यांची राहण्याचीं ठिकाणें प्रसिद्ध आहेत.

**४.** इसवी सन १७३९ सांत **मुंबई** इलाख्यांत आठ अविवाहित आणि वीस विवाहित **इंग्रज**स्त्रिया, चार पांच विधवा, सहा सात मुलें एवढीच काय ती **इंग्रज**बायकांची संख्या होती. पण आतां जिकडे पहावें तिकडें ह्या लोकांची कुटुंबांची कुटुंबें दृष्टीस पडतात. त्याचप्रमाणें इ. स. १७७५ त घरदारवाले व स्थावर मिळकतीचे मालक सुमारें ९०० इसम होते. त्यांत **ब्राह्मण** १०० होते.

**५.** इ. स. १८००-१० चे सुमारास **मुंबई**मध्यें ७ **युरोपियन** लोकांच्या पेढ्या असून ४ कलालांचीं दुकानें होतीं. **पारशी** हे **युरोपिअन** लोकांचे दलाल होते. १६ **पारशां**ची दुकानें असून पैकीं २ **चीन**देशाबरोबर व्यापार करीत. **डॉकयार्ड**चा सर्व मक्ता **पारशां**नीच घेतला होता. ह्यावेळी सर्व **मुंबई** त्याच लोकांची होती असें ह्मटलें तरी चालेल. ह्या शिवाय **पोर्टुगिजां**चीं ३, **अमेरिकन** लोकांचीं ४, **हिंदूं**चीं १५ आणि **बोहऱ्यां**चीं ४ अशी व्यापाराचीं दुकानें होती. ह्यावरून सुमारे दीडशें पावणदोनशें वर्षांपूर्वी **मुंबई**ची वस्ती वगैरेच्या मानानें काय स्थिति होती ह्यांचें अनुमान आमचे वाचक सहज करू शकतील.

६. **निरनिराळ्या वेळची लोकसंख्या.**–ह्या शहरांत निरनिराळ्या काळी जी लोकसंख्या होती ती येणेप्रमाणे :—

| वर्ष | | लोकसंख्या |
|---|---|---|
| इ. स. १६६२ } १६६७ } | .. .. .. | १०,००० |
| इ. स. १७१६ साली | .. .. .. | १६,००० |
| इ. स. १७५० साली | .. .. .. | १,००,००० |
| इ. स. १७७५ साली | .. .. .. | १,५०,००० |
| इ. स. १८१६ साली | .. .. .. | १,६१,५५० |
| इ. स. १८३३-३४ साली | .. .. | २,३४,०३२ |
| इ. स. १८४४ साली | .. .. .. | ५,२४,१२१ |
| इ. स. १८५१ साली | .. .. .. | ५,१४,७१३ |
| इ. स. १८६४ साली | .. .. .. | ८,१६,५६२ |
| इ. स. १८७२ साली | .. .. .. | ६,४४,४०५ |

७. इ. स. १८६४ सालापेक्षां १८७२ त एवढी एकदम लोकसंख्या कमी होण्याचें कारण **अमेरिके**तील लढाई असावी असें दिसतें ; कारण त्या वेळीं बरेच लोक लढाई सुरू झाल्याकारणानें व्यापार धंद्याकरितां **मुंबईं**त येऊन राहिले होतें. पुढें १८८१ च्या फेब्रुवारी महिन्यांत सरकारानें पुनः मनुष्यगणती केली, त्या वेळी ह्या शहरांत एकंदर ७,७३,१९६ मनुष्यें होतीं. ह्याच गणतीवरून असें समजतें कीं, ह्यावेळीं सर्व **हिंदुस्थानां**त २५,३८,९१,८२१ एवढी लोकसंख्या होती. ह्या खानेसुमारीवरून **मुंबईं**त दर १०० बायकांस १५०.६८ पुरुष येतात.

८. **मुंबईं**त इ. स. १८८१ मध्ये एकंदर रहातीं घरें २८,३१५ व ओस पडलेलीं १,५०२ होतीं; शिवाय १,७२२ सोपे वगैरे होतें. ह्या मानानें प्रत्येक घरांत २४ मनुष्यें रहात असावीं असें त्या वेळचें अनुमान होतें. ह्याच खानेसुमारीच्या मानानें पाहता **मुंबईं**त न रहाती घरें शेंकडा ५; चाळी, रहातीं व न राहतीं घरें शेंकडा ७४; चाळी शेंकडा ४; दुकानें शेंकडा २ ऑफिसांच्या उपयोगासारखीं घरें शेंकडा ५; व वखारी शेंकडा २ ह्या प्रमाणें घरांची व्यवस्था होतीं. साधारण वस्तीच्या ठिकाणीं प्रत्येक एकरामागें

२४ व फार गर्दीच्या ठिकाणीं ३५ अशीं घरें होतीं. ११,६३५ घरें तळमजल्यांची, ८,०७७ दुमजली, ५,४०६ तीन मजली, २,८७८ चारमजली; १,२९९ पांचमजली, आणि ४७८ पांचांपेक्षां जास्त मजल्यांची घरें ह्या मनुष्यगणतीच्या वेळीं मुंबईत होतीं; परंतु हल्लीं **मुंबई** मध्यें सुमारें ३४,००० हून अधिक घरें झालीं असावीं. तसेंच, प्रत्येक घरांमध्यें २९ मनुष्यांची वस्ती असून लोकसंख्या ८,९०,००० जवळजवळ झाली असावी; असें मागील मनुष्यगणतीच्या प्रमाणावरून अनुमान करतां येतें.

९. **मुंबईमध्यें कलकत्त्या**पेक्षां लोकवस्ती फार दाट आहे. **कलकत्त्यां**तील मनुष्यगणतीच्या रिपोर्टावरून असें अनुमान होतें कीं, जेथें एक एकर जमिनीमागें सरासरी २०८ मनुष्यांची वस्ती आहे, तेथें **मुंबईं**त तेवढ्याच जागेंत ७५९ मनुष्यांची वस्ती आहे. **कलकत्त्यां**त आसपासची खेडीं धरून सुद्धां प्रत्येक एकरामागें ३३ मनुष्यें पडतात; तींच **मुंबईं**त ५२.५२ मनुष्यें पडतात. तेव्हां अर्थात, ज्या मानानें **मुंबईं**त वस्ती ज्यास्त, त्याच मानानें तितक्या लोकांस रहाण्याकरितां घरें बांधण्याची आवश्यकताही ज्यास्त. **कलकत्त्यां**त २३,७५१ इमारतींपैकीं शेंकडा ६ दुमजली आहेत; परंतु, तेंच मान **मुंबईं**त शेंकडा ३३.५ एवढें आहे. **कलकत्त्यांत** प्रत्येक घरामागें १.७ मनुष्यें पडतात; परंतु, **मुंबईं**त प्रत्येक घरांत ५.१ एवढी कुटुंबे राहतात. ह्या आंकड्यावरून **मुंबईं**त लोकवस्ती किती दाट आहे, हे सहज़ लक्षांत येईल. शिवाय, हे आंकडे इ. स. १८८१ सालच्या मनुष्यगणतीच्या रिपोर्टावरून घेतले आहेत. तेव्हांपासून आजमितीपर्यंत सात वर्षांत **मुंबईं**त किती लोकवस्ती वाढली असावी, ह्याचें अनुमान आह्मीं वर दिलेंच आहे.

१०. **मुंबई**मध्यें २० होटेलें, २३ रिफ्रेशमेंटरूम्स, ४९ टॅव्हर्न, १७४ रिटेललिकरशॉप्स (पिठीं), २१६ ताडी विकण्याचीं दुकानें, १० बोर्डिंग व ८ लॉजिंगहौसेस, ४ आईसक्रीम सलून, ३६ कॉफीहौसेस (कावेखाने), ९ चंडोलखानें, ६ विषारी पदार्थ विकण्याचीं दुकानें, ५१ हत्यारें व दारूगोळा वगैरे विकण्याचीं दुकानें, ७ अफू विकण्याचीं दुकानें व १० मदत विकण्याची दुकानें इ. स. १८८१ सालीं होतीं. पण हल्ली विलायती दारूची १५९, गांवठी दारूचीं ३४७ व ताडी विकण्याचीं १०० दुकानें आहेत. ह्याच मानानें बाकीच्या दुकानांची व्यवस्था समजावी. ह्या आंकड्यांवरून **मुंबईं**त मद्यपानाचा प्रसार दिवसेंदिवस किती वाढत चालला आहे हें व्यक्त होत आहे!

**११.** **मुंबईत** १,४०३ मनुष्यांत १ बहिरा व मुका, १,१६४ त १ वेडा, ४३८ त १ आंधळा, आणि १,६९८ त १ महारोगी आहे असें इ. स. १८८१ च्या खानेसुमारीवरून आंकडे मिळतात.

**१२.** ह्या शहरांत प्रत्येक धर्माचे लोक किती आहेत, ह्याचें वर्गीकरण सदर्हु खानेसुमारीच्या गणतीवरून दिलें आहे :–

| जाती | | | संख्या |
|---|---|---|---|
| जैन .. | .. | .. | १७,२१८ |
| ब्राह्मण .. | .. | .. | ३५,४२८ |
| लिंगायत | .. | .. | १,१६७ |
| भाट्ये .. | .. | .. | ९,४१७ |
| इतर जातींचे हिंदु | .. | .. | ४,०७,७१७ |
| हीनजातीचे हिंदु | .. | .. | ४०,१२२ |
| मुसलमान | .. | .. | १,५८,०२४ |
| शिद्दी .. | .. | .. | ६८९ |
| पारशी .. | .. | .. | ४८,५९७ |
| यहुदी .. | .. | .. | ३,३२१ |
| किरिस्तांव | .. | .. | ३०,७०८ |
| युरेशिअन | .. | .. | १,१६८ |
| युरोपिअन | .. | .. | १०,४५१ |
| चीनी .. | .. | .. | १६९ |
| | | | एकूण ७,७३,१९६ |

**१३.** इ. स. १८८१ च्या मनुष्यगणतीच्या रिपोर्टावरून **मुंबईं**तील मुख्य मुख्य धर्माच्या लोकांत किती जाती व त्या प्रत्येक जातीचे **मुंबई**मध्यें लोक किती आहेत ह्याचीं कोष्टकें खालीं दिलीं आहेत. ह्या सर्व यादींवरून जरी **मुंबईंत** असलेल्या जातींपैकीं प्रत्येक जातींतील अंतरंग भेद कळणार नाहींत, हें खरें आहे; तरी, **मुंबईं**तील ठळक ठळक जातींची संख्या व नांवे

तरी समजण्यास ह्या यादी वाचकांस अंशतः मदत करतील अशी आशा आहे :–

हिंदु

| जाती | संख्या |
|---|---|
| आग्री | ६,६२३ |
| भाटभुंजे (वणजारी) | २९६ |
| भंडारी | २७,७२८ |
| भंगसाळी | १,६८६ |
| भाटे | ९,४१७ |
| भुसारी | १,०४९ |
| भाई | २,११५ |
| ब्राह्मण, गुजराथी | १२,६९२ |
| ब्राह्मण, महाराष्ट्र | १२,७९७ |
| ब्राह्मण, कानडी आणि तेलंगी | ८४९ |
| ब्राह्मण, गौड आणि बंगाली | ४,८६१ |
| ब्रह्मक्षत्रिय | ५७५ |
| बैरागी, गोंसांवी, जोगी, इत्यादी | १,९४७ |
| भंगी | १,९४४ |
| बुरूड | ७१७ |
| चॉकसाळी | ८ |
| चांभार | ६,१८२ |
| चत्री | ५२३ |
| धेड | ५,३८५ |
| चवकळशी | ६८९ |
| धोबी | ५,७५५ |
| धनगर | १,६९९ |
| धुळधोय (झारेकरी) | ६२ |
| गौळी (अहीर) | ४,४१८ |
| चितारी | २९८ |
| गवंडी (कडये) | ४३२ |
| गोल्हई | ५१४ |
| गुरव | १,७१८ |

| | | | |
|---|---|---|---|
| घांची | .. | .. | ५१ |
| हजाम | .. | .. | ९४६ |
| जिनगर | .. | .. | २३ |
| कच्छी | .. | .. | ३८९ |
| कामाठी | .. | .. | ६,७८४ |
| कंतारी | .. | .. | ६६ |
| खरडी | .. | .. | २२० |
| कांसार | .. | .. | ४,१२० |
| खत्री | .. | .. | ४,८८४ |
| खारवी | .. | .. | ४,७३३ |
| कोळी (घाटी) | .. | .. | ११,००९ |
| कोळी (कोंकणी) | .. | .. | १२,७८२ |
| कायथ | .. | .. | ९४ |
| कुंभार | .. | .. | ३,७६९ |
| कोष्टी | .. | .. | ६९५ |
| कुणबी (मराठी) | .. | .. | ५६,५९३ |
| कुणबी (गुजराथी) | .. | .. | १,०३० |
| लाड | .. | .. | ७६८ |
| लिंगाईतवाणी | .. | .. | १,१६७ |
| लोणारी (चुनारा) | .. | .. | ६ |
| लोहाणे | .. | .. | १३,२८७ |
| लोहार | .. | .. | ३,९७९ |
| माची | .. | .. | १,०१९ |
| माळी (फुल, हळदी, जिरे इत्यादी) | .. | .. | ९,४०९ |
| मांगेले | .. | .. | २९४ |
| महार (परवारी वगैरे) | .. | .. | २७,३२० |
| मांग | .. | .. | २,२७० |
| मिठाग्री | .. | .. | १,७३२ |
| मराठे | .. | .. | १,२०,१८४ |
| मोची | .. | .. | ५,७३१ |

| | |
|---|---|
| मुलतानी (वाणी) .. .. | ४८८ |
| नायकीण (भावीण, कलावन्तीण) .. | ५२६ |
| न्हावी .. .. .. | ५,४७२ |
| निराली .. .. .. | ५ |
| पांचकळशी .. .. | २,६९७ |
| परीट .. .. .. | १,०६७ |
| पटवेकरी. . .. | ४६ |
| पाथरवट. . .. | १५४ |
| परभू (कायस्थ) .. .. | १,४६४ |
| परभू (पाताणे) .. .. | ४,७५६ |
| रजपूत .. .. .. | ३,५३७ |
| रंगारी .. .. .. | १३७ |
| रावळ .. .. .. | २७८ |
| सालत .. .. .. | ५८ |
| साळवी .. .. .. | ८१६ |
| शिक्लेगर .. .. | १८६ |
| शिंपी (दरजी) .. .. | ८,१९७ |
| सोनार .. .. .. | ९,७६८ |
| सोमवंशी (क्षत्रिय) .. .. | ६,००४ |
| सुतार .. .. .. | ३,६३४ |
| तेली .. .. .. | ४,४२९ |
| ठाकूर .. .. .. | ८६८ |
| वाग्री .. .. .. | २९० |
| वणजारी .. .. | २,६६० |
| वाणी (गुजराथी) .. .. | १७,४३९ |
| वैश्यवाणी आणि दक्षिणी .. | ८,८३० |
| ह्याशिवाय इतर जाती .. .. | १०,७१२ |
| एकूण | ५,०२,८५१ |

मुसलमान

| जाती | संख्या |
|---|---|
| आरब .. .. .. | २,२४५ |
| आफ्रिकन (सिद्दी वगैरे).. .. | ६७२ |
| बोहरी .. .. .. | ११,६२५ |
| खोजे .. .. .. | १०,३३६ |
| मेमण .. .. .. | १३,४२१ |
| इराणी (मोंगल) .. .. | १,५९० |
| पठाण .. .. .. | ३,५९० |
| कोंकणी मुसलमान .. .. | ६,७९२ |
| इतर जाती .. .. | ८६,१५४ |
| सैयद .. .. .. | ३,७७६ |
| शेख .. .. .. | १८,४९५ |
| | एकूण १५,८६,९६९ |

पारशी

| जाती | संख्या |
|---|---|
| शाहानशाही .. .. | ४३,२९२ |
| कदमी .. .. | ५,३०५ |
| | एकूण ४८,५९७ |

खिस्ती

| जाती | संख्या |
|---|---|
| अमेरिकन .. .. | २४ |
| ब्यापटिस्ट .. .. | १०४ |
| कांग्रिगेशन्यालिस्ट .. .. | ६२ |
| एपिस्कोप्यालिअन (चर्च ऑफ् इंग्लंद) | ४,९४७ |
| ग्रीक .. .. .. | २० |
| लुथेरिअन .. .. | ६९ |
| मेथॉडिस्ट (वेस्टलिअन).. .. | ४७३ |
| प्रेसबिटीरिअन .. .. | १,५९४ |
| रोमनक्याथॅलिक .. .. | ३२,१३७ |
| सीरिअन.. .. .. | ९२ |

| | |
|---|---|
| इतर जाती . . . . | १९ |
| प्राटेस्टंटस्, खिस्ती वगैरे. . . . | २,८३८ |
| | एकूण ४२,३३९ |

# भाग चौथा

## व्यापार

जगामध्ये जेवढे देश ह्मणून आहेत त्या सर्वांत **हिंदुस्थान**देशासारखा सुपीक दुसरा देश मिळणें फार विरळा; नाही ह्मटलें तरी चालेल. ह्या देशांत सर्वप्रकारचे जिन्नस उत्पन्न होतात. मनुष्याच्या जीविताला आवश्यक अशी सर्वजातींचीं धान्यें, फळफळावळ, सर्वजातींचे मसाले व इतर जिन्नस ह्यांविषयी फार प्राचीनकाळापासून **हिंदुस्थाना**ची प्रसिद्धी आहे. शिवाय, ज्या वस्तूंवांचून मनुष्यमात्रास चालत नाहीं, असें अत्युपयोगी पदार्थ ह्मणजे कापूस आणि रेशीम ह्यांचा सुद्धां सर्व इतर देशांत पुरवठा आमच्या देशानें केला आहे, व म्हणूनच ह्या देशात कोणत्याही पदार्थांकरितां दुसरा देशावर अवलंबून राहण्याची विशेष गरज पडत नाहीं. ह्या देशाचे '**सुवर्णभूमी** 'हें नांव ऐकून **एशिआ** खंडांतील **आरब, चीनी व पर्शियन** लोक तर काय; **युरोपां**तील **इजिपशिअन, ग्रीक व रोमन** लोक ह्या देशाबरोबर व्यापार करीत. पुढें हळुहळू त्या लोकांच्या ह्या देशावर स्वाऱ्याही होऊं लागल्या. ह्या लोकांपैकीं बहुतेकांचे वंशजही हल्ली उपलब्ध आहेत. असे :– **इजिप्शिअन** म्हणजे **इस्त्रायल** ज्यांस आपले लोक शनवारी **तेली** म्हणतात ते व जे आपणास **बेनीइस्त्रायल** ह्मणवितात ते. **पारशी, मुसलमान** वगैरे. अर्वाचीनकाळीं **डच, पोर्टुगीज, फ्रेंच** आणि **इंग्लिश** व्यापाऱ्याच्या सोंगानें ह्या देशीं येऊन त्यांनीं सर्व देश आपलासा करून तें सत्ताधीश बनले हे इतिहास प्रसिद्धच आहे. याप्रमाणें इतर देशांतील लोकांच्या स्वाऱ्या ह्या देशावर वारंवार होऊं लागल्या. ह्या देशाचे शेजारी **आरब** हें पहिल्यानें स्वारीं करून ह्या देशांशीं व्यापार करूं लागलें. त्यांच्या मागून इतर देशातील लोकही हळुहळू स्वाऱ्या करून येथें आपापलीं ठाणीं बसवूं लागलें. ह्या वेळीं ह्मणजे सुमारें २,००० वर्षांपूर्वी **गुजराथेंत भडोच** हें व्यापाराचे मोठें बंदर होतें, व बहुतेक माल ह्याच बंदरांतून जात येत असें. शिवाय **उज्जनी, पालीबोथ्रा** (अलाहाबाद) **नासिक व कोंकणांत कल्याण, ठाणें पनवेल, चेऊल व मलबार**

किनारा इत्यादि अनेक ठिकाणें व्यापाराकरितां मोठीं प्रसिद्धीस आलीं होतीं. **आर्मी** साहेबांचें असें ह्मणणें आहे कीं, **कल्याण** हें सोळावे शतकापर्यंत **साष्टी, मुंबई** व **वसई** ह्या प्रांतांशी व्यापार करण्याचें मोठें स्थान होतें. ह्या वेळीं **मुंबई**ची स्थिति फारच गरीब होती, हें मागें सांगितलेंच आहे. पुढें हें बेट **इंग्रज**सरकारचे ताब्यांत आल्यादिवसापासून त्यांनी ह्या बेटाची हळुहळू सुधारणा करून व्यापाराच्या सोईही विशेष वाढविल्या. **मुंबईत** जसजशा व्यापाराच्या सोई वाढत गेल्या तसतशीं इतर सर्व प्राचीन बंदरें मोडकळीस येऊन आज **हिंदुस्थाना**मध्यें किंबहुना सर्व, जगांमध्यें[1] **मुंबईशहर** पहिल्या प्रतीचें बंदर होऊन गेलें आहे, एवढेंच नाहीं; तर, दिवसेंदिवस त्याची भरभराटी विशेष होत चालली आहे.

२. फार प्राचीन काळापासून **आरब, इजिप्शिअन** (मिसरी) **पर्शिअन** (इराणी), **वाणी, वणजारी, मलबारी** वगैरे जातींचे लोक ह्या देशांत व्यापार करीत. त्यांत **आरब** व **इजिप्शिअन** लोकांची दर्यावर्दीपणा व व्यापार ह्या दोन्ही कामांत फार प्रसिद्धि आहे. ह्या लोकांचा **हिंदुस्थान** देशांशी आजकालचा व्यापार आहे असें नाही; तर, ख्रिस्तीशकास आरंभ झाल्यादिवसापासून **अनहिलवाडा** व **चंद्रावती** येथील राजांची जहाजें **खंबायत**च्या अखातांतून **आरबस्थान** व दुसरे इतर देश येथेंही जात व परदेशाहून येथे येत, असाही लेख आढळतो. ह्याच सुमारास, किंबहुना त्याच्याही पूर्वीपासून **मिसर** देशांतील लोक **हिंदुस्थाना**चे पश्चिम किनाऱ्याबरोबर व्यापार करीत असत ; पण त्या वेळी बहुधा व्यापार ह्मटला ह्मणजे देशांतल्या, देशांत, फार लांब देशाशीं थोडा, इतका संकुचित होता.

---

1. The harbour, one of the finest in the world both on account of accommodation and beauty and variety of scenery stertches along the eastern face of Bombay, and this part of the Island is therefore the most thickly inhabited over its whole extent.—The Indian Railway Travellers' Guide.

**भावार्थ.**—हें बंदर **मुंबई**च्या पूर्वबाजूला असून, आपल्या जागेच्या सोईमुळें, आपल्या सुंदरपणामुळें आणि आपल्या चमत्कारिक व चित्रविचित्र देखाव्यामुळें, सर्व जगांत उत्तम गणलें गेलें आहे आणि ह्याच कारणामुळें ह्या बेटाचा येथील सर्व भाग मनुष्यवस्तीनें अतिशयित व्यापून टाकिला आहे.

फार लांब लांब देशाशीं थोडा, इतका संकुचित होता. **वणजारी** लोक बैलांवर, घोड्यांवर अगर गलबतांत माल भरून व्यापार करीत व ही चाल ह्मणजे घोडे किंवा बैल ह्यांवर माल भरून नेण्याची चाल **मुंबई**च्या बाहेर अजूनही दृष्टीस पडते. ह्या व्यापाऱ्यांस वारंवार त्रासही भोगावा लागे, कारण त्यांच्यावर वारंवार लुटारू लोकांचे हल्ले होत; परंतु, आगगाडी, आगबोटी वगैरे सुलभ साधनें सुरू झाल्यादिवसापासून वरील सर्व लोकांचा अशा प्रकारचा व्यापार बंद पडून व्यापारी लोकांस फारच सुख झालें. पूर्वी हवा तो माल हवा त्या वेळीं मिळत नसे; ह्यामुळें माल खरेदी करणारांची फारच गैर सोई होई; पण, ती आतां सर्व दूर झाली आहे व व्यापार करण्याला जीं अवश्य साधने तीं सुलभ अशीं नेहमीं होत चाललीं आहेत, हें एकापरी देशाचें भाग्यच समजलें पाहिजे.

३. **इंग्रज** लोकांचा अम्मल **मुंबई**त सुरू झाल्यादिवसापासून व्यापारास विशेष उत्तेजन येत चाललें आहे. तत्पूर्वी व्यापार इतका झपाट्यानें चालत नसे. इ.स. १८०२-६ ह्या पांच वर्षांत **मुंबई** आणि **सुरत** ह्या दोन बंदरांमध्यें २,४०,००,००० रुपये किंमतीचा माल आला व १,९२,८०,००० रुपये किंमतीचा माल बाहेर रवाना झाला, ह्मणजे एका वर्षाची सरासरी ९०,००,००० रुपये होते, इतका व्यापार चार वर्षांचा. इ.स. १७९२-९३ पासून १८०८-९ इतक्या काळांत ५,३०,४१,२०० रुपये किंमतीचा माल बाहेर रवाना झाला; ह्मणजे एका वर्षास सरासरीच्या मानानें ४८,००,००० रुपये होतात. ह्या सुमारास **चीन**देशाशी **मुंबई**चा व्यापार मोठ्या झपाट्यानें चालत असे. इ.स. १८०५ सालीं **मुंबई**हून ६४,७३,६३९ रुपये किंमतीचा कापूस **चीन**देशीं रवाना झाला व ५,८८,७२५ रुपयांचा **इंग्लंदा**स गेला. इ.स. १७७० पासून **हिंदुस्थान** व **चीन** ह्यांच्यामध्ये व्यापार विशेष वाढला. इ.स. १८०५ पर्यंत **इंग्लंदा**हून कोणत्याच तऱ्हेचा माल **मुंबईस** येत नसे, असें कित्येक ग्रंथकारांचे ह्मणणें आहे. **मिल्फर्ड** साहेबांचें असें ह्मणणें आहे कीं, ह्या वेळीं नानातऱ्हेचें चीट, मखमाल व इंग्रजबायकांकरितां झगे, लोखंड वगैरे माल **इंग्लंदाहून मुंबई**स येत असे. इ.स. १७५० पर्यंत **मुंबई**त व्यापाराच्या घडामोडीची वेळ सूर्योदयापासून माध्यान्हपर्यंत असे,

ही गोष्ट **मुंबई**च्या ह्या वेळच्या व्यापारासंबंधी विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

४. इ.स. १८१३ पर्यंत येथील सर्व व्यापाराचीं सूत्रें **ईस्टइंदिया कंपनी**च्या हातीं होतीं; परंतु, ह्याचवर्षी **लार्ड मेल्व्हिल्**साहेबांनीं पार्लमेंटासमोर एक **'बील'** (कायद्याचा मसुदा) पास करून **ईस्टइंदिया या कंपनी**च्या हातून सर्व व्यापाराचीं सूत्रें काढून घेतलीं. ह्याचें कारण असें दिसतें कीं, **हिंदुस्थानां**तून जो कच्चा कापूस **इंग्लंदां**त जात असे, तो पाठविण्याचें **कंपनी**च्या हातांत असल्यामुळें हवा तेवढा कापूस जात नसे; तेव्हां अर्थात वरील बील काढून इतर सर्व व्यापाऱ्यांस कापसाचा व्यापार करण्याची मोकळीक दिली; त्यामुळें कापसाची रवानगी **इंग्लंदा**स बरीच होऊं लागली. व तेथील व्यापारीलोकांस हवा तेवढा कापूस मिळून त्यांस कपडे तयार करण्यास व **हिंदुस्थानां**त पाठविण्यास चांगली संधि मिळाली. याप्रमाणें विलायतेहून यंत्रनिर्मित कापड इकडे येऊं लागलें व तें दिसण्यांत सुरेख असल्यामुळें त्याच कापडाचा विशेष खप होऊं लागला, ह्मणून अर्थात आमच्या मागावर काढलेल्या पण टिकावू मालास कोणी विचारीनासें झालें ! ही एका बाबतीची गोष्ट झाली. ह्याचप्रमाणें हरएक बाबतींत समजावें. येणेंकरून झालें काय कीं, आमचा व्यापार बसला, कारागीर लोकांस धड मूठभर अन्न मिळेनासें झालें आणि प्रतिवर्षी कोट्यावधी रुपये परद्वीपास जाऊं लागले तेणेंकरून आमचा देश निष्कांचन होत चालला आहे.

५. इ.स. १८१३ सालापासून १८२० पर्यंत **चीन**देशाबरोबर व्यापार करण्याचा मक्ता **कंपनी**नें घेतला होता; पण, इ.स. १८३३ त जो कायदा झाला ह्मणून मागें म्हटलें आहे, त्यानें **कंपनी**चा **इंग्लंद** देशाशींच केवळ नव्हे; तर, **चीन** देशाशीं सुद्धां संबंध तोडला. आणि सर्वांस व्यापार करण्याची मोकळीक मिळाली.

६. **रायले** साहेब असें ह्मणतो कीं, इ.स. १७८३ पर्यंत **हिंदुस्थानां**तील कापूस **मुंबई**तून बाह्यदेशीं रवाना झाला नाही; पण, ह्याच वर्षी १,१४,१३३ पौंड कापूस ह्या शहरांतून बाह्यदेशीं पाठविण्यांत आला. इ.स. १७९० सालीं **ईस्टइंदिया** कंपनीचे डायरेक्टर ह्यांनी ४,२२,२०७ पौंड कापूस येथून विलायतेस पाठविला होता; परंतु, ह्या उलाढालीपासून

कंपनीस तादृश फायदा झाला नाहीं. पुढें १८१७-१९ ह्या वर्षांत व्यापारास पुनः उत्तेजन येऊन, इ.स. १८१८ त **हिंदुस्थानां**तील इतर ठिकाणांहून ८,६०,००,००० पौंड कापूस **मुंबईं**त आला. ह्याप्रमाणें **मुंबई**च्या व्यापारांत इ.स. १८६० पर्यंत बरीच घडामोड झाली; पण, पुढें इ.स. १८६१ पासून १८६५ पर्यंत कापसाचे व्यापारास विशेष तेजी आली होती, हें खालील आंकड्यावरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इ. स. १८६१-६२ | ह्या सालीं | रुपये | ९,२६,२८,१७० | किंमतीचा माल |
| ” १८६२-६३ | .. | ” | १४,८३,४६,४०० | ” |
| ” १८६३-६४ | .. | ” | २७,९१,२१,१७० | ” |
| ” १८६४-६५ | .. | ” | ३०,३७,०४,८२० | ” |
| ” १८६५-६६ | .. | ” | २५,५३,४१,७९० | ” |

एकवर्षाची सरासरी रु. २,१५,८२,८४७.

याप्रमाणें व्यापार उत्तरोत्तर वाढत गेला. आणखी खालील आंकडे पहा :–

| | अमदानी | रवानगी |
|---|---|---|
| इ.स. १८८१ सालीं .. | ६२,१०,४९,८४० | ७६,०२,१०,४३० |
| इ.स. १८८२ .. | ६०,४३,६१,५५० | ८३,०६,८१,९८० |

७. इ.स. १८८३-८४ ह्या वर्षी फक्त कापूसच विलायतेस १४,३६,००,००० रुपयांचा गेला आणि २१,०५,००,००० रुपये किंमतीचा कापसाचा माल **हिंदुस्थानां**त आला. साधारण मानानें दरसाल सरासरी २ अब्ज ४० कोटी रुपयांचा माल विलायतेंतून बाह्यदेशी जातो; त्यांतला सुमारें ३२ कोटी रुपयांचा माल **हिंदुस्थानां**त येतो. **रान्सन** साहेबाचें ह्मणणें असें आहे कीं, १८८२ - ८३ ह्या वर्षी **ल्यांकशायर** येथून एकंदर कापसाचा माल ७६ कोट रुपयांचा बाह्यदेशीं गेला; त्यांतला फक्त **हिंदुस्थानां**त २५ कोटी रुपयांचा आला. धातूंचें सामान ६ कोटी रुपयांचें आलें; यंत्रें १ कोटी ७५ लक्ष रुपयांचीं आलीं; आगगाडीचें लोखंडी सामान १ कोटी ५० लक्ष रुपयांचें आलें आणि इतर लोंकरी सामान १ कोटी २५ लक्ष रुपयांचें आलें!

८. वरील १८६१-६६ सालच्या आंकड्यावरून वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलेंच असेल कीं, हा जो एवढा अवाढव्य व्यापार वाढला तो

फक्त कापसाचाच होय. ह्या वेळीं **मुंबईत** अगदीं श्रीमंतापासून तों अतिगरीबापर्यंत सर्वांचें लक्ष ह्या व्यापाराकडे लागलें होतें. ह्या संधीस **मुंबईतील** व्यापाऱ्यांनीं पुष्कळ पैसा गोळा केला असें बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांनीं बघून, जसा एकादा भुकेला गिधाड आपल्या भक्षावर झडप घालतो, तसे तेही **मुंबईत** व्यापाराचे निमित्ताने येऊं लागले, व व्यापारांत मिळविलेल्या पैशाचा अन्य तऱ्हेनें उपयोग करावा म्हणून युक्ति योजूं लागले. व्यापाराची उलाढाली ही बहुतकरून स्पर्शजन्य रोगासारखीच आहे; कारण, एकदां अशा व्यापारांत कोणाएकास थोडेंसें यश मिळालें असें समजलें म्हणजे, अर्थातच सचोटीच्या व्यापाराकडे लोकांचें दुर्लक्ष होऊन ह्या अशा उलाढालीच्या व्यापारांत लोक आपलीं मनें घालूं लागतात, ही गोष्ट खरी आहे; पण, अशा व्यापारांत नुकसान मात्र पुष्कळांचें होतें, यश थोडक्यांसच मिळतें. ह्या व्यापारांत मनुष्य एकदम चढतो खरा; परंतु, एकदांका तो सपाट्यांत सांपडला म्हणजे त्यास बुडण्यास काडीचाही वेळ लागत नाहीं. सचोटीचा व्यापार थोडा मंदाईने चालतो खरा; पण, त्यांत व्यापाऱ्यांस हमी लागण्याचीं कारणे फारच थोडीं असतात. असें असतांही अशा सचोटीच्या व्यापारांत मन घालण्याकडे लोकांचें फारसें लक्ष नसतें.

९. इ.स. १८६३ सालापर्यंत व्यापाऱ्यांचें लक्ष "जाईन्ट स्टॉक् कंपनी" कडे लागलें होतें. 'मुक्त्यार' अगर 'अडते' ह्यांच्या पेढ्यांमार्फत व्यापार चालविण्याच्या ऐवजीं ब्यांका निघून त्यांच्या मार्फत व्यापार होऊं लागला. **मुंबईब्यांक** इ.स. १८४० त स्थापन झाली. **ओरिएन्टल ब्यांकिंग कारपोरेशनची** शाखा **मुंबईत** इ.स. १८४४ त सुरू झाली. **कमर्शिअल ब्यांक, चार्टर्ड मरकंटाईल ब्यांक, आग्रा** आणि **युनायटेड सर्व्हिस,** आणि **चार्टर्ड ब्यांक ऑफ् इंडिया ऑस्ट्रेलिआ** आणि **चायना** ह्या सर्व ब्यांका इ.स. १८६० पूर्वीच स्थापन झाल्या होत्या, आणि ह्याच वर्षी **सेंट्रल ब्यांक ऑफ् वेस्टर्न इंडिया** ही स्थापना झाली. **जाईन्ट स्टॉक्** (एशिआटिक), **रायल ब्यांक,** आणि **ब्यांक ऑफ् इंडिया** ह्या सर्व इ.स. १८६३ सालीं सुरू झाल्या व ह्याचवर्षी **बांबे शिपिंग** आणि **आयर्न शिपिंग** ह्या कंपन्यांची स्थापना झाली.

**१०.** याप्रमाणें व्यापाराकडे सर्वांचें लक्ष लागल्यामुळे इ.स. १८६४ सालीं **मुंबई**च्या व्यापाराची विशेष भरभराटी होऊन तिच्या बरोबर **मुंबई**चें वैभवही वाढलें; परंतु, ह्या वैभवाचा अगदीं कळस झाला. **अमेरिकें**तली लढाई लवकर बंद होत नाही असें पाहून, जो तो आपापलें घोडें पुढें ढकलूं लागला. श्रीमंतापासून तों गरीबापर्यंत सर्वांचे डोळ्यांसमोर व्यापार दिसूं लागला. ब्यांकांचाही सुकाळ झाला एवढेंच नाही; तर, **फिन्यान्शिअल असोशिएशन**सारख्या मंडळ्याही अस्तित्वांत येऊं लागल्या. परंतु, ही भरभराटी फार वेळ टिकली नाही. कारण, हल्लीं **ब्याकबे**वर ज्या ठिकाणीं बी.बी. आणि सी.आय्. रेल्वेच्या गाड्या चालतात तेथपर्यंत समुद्र असल्याकारणानें ती जागा भरून काढण्याची एक नवीनच शक्कल निघाली. ह्या वेळीं जमिनीची किंमत दुप्पट तिप्पट वाढून शहरांत लोकांची वस्तीही फार वाढत चालली होती. जमीन ह्मणजे केवळ सोन्याचाच तुकडा होऊन गेला होता. खासगी कंपनीच्या स्वाधीन एवढी जागा करूं नये म्हणून बरेच अडथळे आले. **मुंबईसरकार**च्याही मनांत ह्या कंपनीचे **'शेर'** ठेवावे असें आलें होतें; परंतु त्यांस **हिंदुस्थान** सरकारानें तसें न करण्याविषयी लिहून पाठविलें. नंतर ह्या कंपनीच्या निःसीम भक्तांनीं आपापले शेर लेलांव करून काढून टाकिले. दलालांनीं तर ४ हजार रुपयांच्या शेरांची २५ हजार रुपयांपर्यंत किंमत वाढविली ! ह्याप्रमाणें ह्या शेरांनीं **मुंबई**शहर अगदीं वेडें करून सोडलें होतें; तें इतकें कीं, शहरांतील बहुतेकांस रात्रीची झोंप व दिवसा जेवण हीं सुद्धा सुचत नसत. रस्त्यांतून 'काय भाव' हा शब्द सर्वतोमुखी असे. ह्या वेळीं **मुंबई** शहर केवळ प्रती 'कुबेरनगरी' च बनून गेलें होतें, असें म्हणण्यास हरकत दिसत नाही. कारण लोकांस पैशाची परवा म्हणून मुळींच नसे; त्यामुळे दिडकीच्या मालाची किंमत रुपयापर्यंत चढली होती. भाडोत्री गाड्याघोडेवाल्यांची तर चंगळ उडून गेली होती. आपणांजवळ पैसा नसला तरी कर्ज काढून, अगर घरदार गहाण ठेऊन कंपनीचे शेर घ्यावे, ह्यांतच मोठें भूषण आहे, असें बहुतेकांस वाटूं लागलें; म्हणून ह्या काळास 'शेर मनीया' (Share Mania म्हणजे शेराचें खुळच) ह्मणण्याचा प्रघात पडला गेला; परंतु, ह्या सौभाग्याचा लवकरच शेवट झाला. तो असा की, **अमेरीकें**त चाललेली

लढाई बंद झाली अशी तार ह्या शेरांत गढून गेलेल्या लोकांस समजली. ही बातमी समजल्याबरोबर लोक अगदीं हवालदील होऊन गेले;कापसाचा भाव एकदम बसला; आणि खरें नाणें जाऊन शेर घेतलेल्या कागदांच्या तुकड्यांचेंच लोकांस दर्शन होऊ लागलें ! ह्या सपाट्यांत पूर्वी मोठ्या भरभराटीस आलेल्या ब्यांका, ल्यांड कंपन्या वगैरे व्यापारी मंडळ्या रसातळास जाऊन पोहचल्या आणि शेरांनी लोकांस 'शेर' अन्न सुध्दां मिळण्याची पंचाईत केली; जो तो ऊर बडवूं लागला; कित्येकांनी अब्रूस्तव जीव सुद्धां दिले ! ह्या सपाट्यांत **ओरिएन्टल ब्यांक**[1], **चार्टर्ड मरकंटाईल ब्यांक, चार्टर्ड ब्यांक व फ्रेंच ब्यांक** एवढ्याच काय त्या ब्यांका शेष राहिल्या. याप्रमाणे **मुंबई** शहरांतील लोकांचे नजरेवर जें शेरुरूपी अंधकाराचे भुरळ आलें होतें, तें लढाईरूपी दिव्यांजनाने एकदम फाटून गेलें !!

**११. हिंदुस्थानां**त आज २५ कोट प्रजा असून त्यांत माणशी २ रुपयांचे कापड सालीना लागतें, असें सरासरी घेऊन चाललें तरी, सांप्रतकाळीं आमच्या देशांत एकंदर ५० कोट रुपयांचें कापड दरसाल खपतें, असें सिद्ध होतें. पैकीं निम्मे सिम्मे देशांत होतें. बाकीचा पुरवठा परदेशाहून होतो. परंतु विलायती, कापडाचा भरणा फार असून सर्व कापडांना सूत **विलायतच** पुरविते. **हिंदुस्थानां**त अवघें २ कोट रुपयांचें सूत होतें व तेंही ३० नंबरावर निघत नाहीं. इतर देशांकडे परदेशीय माल किती खपतो हें बघितलें तर— खुद्द **विलायतें**त दरमाणशीं ६५ रुपयांचा परदेशीय माल खपतो; **आस्ट्रेलिआ** येथें माणशीं ११०; **कानडा** ३०; **अमेरिका** १६; परंतु, **हिंदुस्थानांत** केवळ २$\frac{१}{२}$ रुपयांचा परदेशीय माल सालीना खपतो असे आंकडे मिळतात! ह्या आंकड्यांवरून आमच्या देशाच्या निकृष्टावस्थेचें अनुमान आमचे वाचक सहज करूं शकतील! आतां, आमच्या येथें **इंग्लंदाहून** जें कापड येतें, तें रेशमासही मागें टाकणारें असून इतकें स्वस्त दराने विकलें जात आहे कीं, त्यामुळें आज **हिंदुस्थान**चा व्यापार अगदी बसून गेला आहे; कोष्ट्यांचे माग फारसे कोठें दिसतनासे होत चालले आहेत; देशी मालास उत्तेजन नसल्याकारणानें धंदेवाले लोक स्वस्थ बसूं लागले आहेत; आणि त्यामुळें लोकांत आळस विशेष वाढत आहे; व आळस वाढल्याच्यायोगानें देश

१. " ब्यांक ऑफ् वेस्टर्न इंदिया " हें हिचें पूर्वीचें नांव होते.

दिवसें दिवस भिकारी होऊं लागला आहे! त्यांतूनही जर कोणी देशांत कपडे-कपडेचसे काय पण कोणताही माल-तयार करूं लागला तर, त्यास आमच्या लोकांकडून उत्तेजन मिळत नाहीं. अशी आज आमची स्थिति होऊन गेली आहे !!

**१२.** इ. स. १८१३ सालीं लॉर्ड **क्यास्टल्‌रीग** साहेब एकदां पार्लमेंटमध्यें असें ह्मणाला की, 'गेल्या वीस वर्षांत **विलायते**हून कापसाचें कापड **हिंदुस्थानां**त वीस हजार रुपयांचें जात होतें, तेंच आज १०,८०,००० रुपयांचें जात आहे; आणि हा व्यापार दिवसें दिवस अधिकाधिक वाढतच आहे.' **सुलीवान** साहेब एकदां असें ह्मणाला कीं, 'इ. स. १७९२–९६ पर्यंत विणलेलें कापड जें **हिंदुस्थानात** गेलें तें सरासरी ७,३०० रुपयाचें होतें; तेंच इ. स. १८०७-११ ह्या वर्षांत ९६,९,८०० रुपयांचे झाले.' पण आज पाहिलें तर दरसाल **हिंदुस्थाना**त २५ कोटी रुपयांचें कापड येतें व **हिंदुस्थानां**तून १४ कोट रुपयांचा कापूस बाह्य देशीं जातो. शिवाय धान्य जातें तें निराळेंच. एवढें आहे तरी, त्यांच्याकडून येणाऱ्या मालाच्या किंमतीचा माल बाह्यदेशीं पाठविण्यास आमच्या देशास निदान कांहीं तपें तर घालवावी लागतील. इतका आमचा देश अजून मागें आहे !

**१३.** वर दिलेल्या आंकड्यांवरून एवढें खचीत कळून येते की, इ. स. १८६१-६२ वर्षाची स. १८७४-७५ ह्या वर्षाबरोबर तुलना केली असतां, इ. स. १८६१-६२ ह्या वर्षी ३५,००,०००, पौंड व १८७४-७५ सालीं ५०,००,००० पौंड माल रवाना झाला. ह्या मालाची किंमत सरासरीच्या मानानें पाहतां, अनुक्रमें ९ कोट २५ लक्ष व १२ कोट ५० लक्ष अशी होती. ह्यावरून एकंदरीनें पाहूं जातां, असें दिसून येईल कीं, शेरबाजाराचे वेळीं जरी एवढी जबरदस्त उलाढाली झाली होती तरी देखील **मुंबई**च्या व्यापारास कोणत्याही रितीनें यत्‌किंचितही धक्का पोंहोचला नाहीं, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आतां तर **मुंबई** व्यापाराच्या संबंधाने **म्यांचेस्टर**ची बऱ्याच अंशी बरोबरी करूं पाहत आहे, एवढेंच नाहीं; तर, ३० वर्षांपूर्वी जी **मुंबई**ची व्यापारासंबंधी दैन्यावस्था होती, ती जाऊन **मुंबई** आपल्या येथें माल तयार करून तो आज बाह्यदेशीं पाठवूं लागली आहे. त्यांत इ. स. १८७५ साली आमच्या दयाळु सरकारानें रवानगी कर

(एक्सपोर्ट ड्यूटी) बंद केल्यापासून आमच्या देशांतील कारागीर लोकांस उमेद येऊन व्यापारास विशेष जोर आला; आणि त्या योगानें **मुंबईं**त देशी माल उत्पन्न करावा ह्मणून शेट सावकार लोक नवीन नवीन गिरण्या व कारखाने स्थापन करूं लागले; व हल्लीं ते आपल्या गिरण्यांतून उत्तम माल काढीत आहेत. ही त्यांची कृति विशेष आदरणीय व प्रशंसनीय होय. तरी पण, हवा तसा माल-ह्मणजे अर्थात विलायती मालाची बरोबरी करणारा माल-अजूनही येथें तयार होत नाहीं ; पण आशा आहे कीं, असाच सतत प्रयत्न जारीनें चालू लागला तर कांहीं काळानें तरी तसा माल येथेंही निघूं शकेल.

**१४. अफू.**—कापसाच्या खालोखाल व्यापार ह्मटला ह्मणजे अफूचा होय. कमींतकमीं वर्षास पन्नास-साठ लाखांची अफू बाह्यदेशीं जाते. फक्त अफूपासून सरकारास दरसाल दोन अडीच लक्ष रुपयांचें उत्पन्न आहे. प्रत्येक अफूच्या पेटीची किंमत सुमारें ६०० रुपयापर्यंत असते पण, कधीं कधीं तिची किंमत बाजारभावाप्रमाणें कमी किंवा अधिकही होते. अफूची लागवड बहुतेक **पाटणा** व **माळवा** येथे होते आणि तिचा खप बहुतकरून **चीन, काठेवाड, गुजराथ** वगैरे प्रांतीं फार होतो. अलीकडे **इंग्रज**सरकारनें असा ठराव केला आहे कीं, **माळवा** खेरीज करून दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं अफूची लागवड करूं नये. अफूचा व्यापार बहुतकरून मारवाडी लोकच करितात. हे लोक **माळव्यांतून** अफू खरेदी करून इतर ठिकाणीं रवाना करितात. **मुंबईंत** ह्या व्यापारावर बहुत मारवाडी सधन झाले आहेत.

**१५. गहूं**—**हिंदुस्थानचे** माजी गव्हर्नर जनरल **लॉर्ड नार्थब्रूक** ह्यांनीं इ. स. १८७३ सालीं गव्हांच्या रवानगीच्या व्यापारा (एक्सपोर्ट-ट्रेड) वरून कर माफ केल्या दिवसापासून ह्या व्यापारास विशेष भरभराटी येत चालली आहे. गव्हांची लागवड **मुंबई** इलाख्यांतील कांहीं कांहीं भागांत होते; पण, **नर्मदा**नदीच्या कांठचा प्रदेश व मध्य**हिंदुस्थान** ह्यांत गहूं फार होतो. अलीकडे **अमेरिकें**तही गहूं फार होऊं लागला आहे. तरी पण, अमेरिकन गहू **हिंदुस्थानां**तल्या गव्हापेक्षां निःसत्त्व असतो. हल्लीं इतर देशांत **हिंदुस्थानांतून**

बराच गहूं रवाना होतो. ह्या देशांतून इ. स. १८७४ सालीं १ कोट हंड्रवेट व इ. स. १८८७ सालीं ४९९ लक्ष रुपयांचा गहूं विलायतेस रवाना झाला.

**१६. मोत्यें**-मोत्यांचा व्यापार **मुंबई**शहरांत फार होतो. मोत्यें बहुतकरून **इराण** देशांतून फार येतात. अलीकडे मोत्यें व सोनें ह्यांचा खप विलायतेंत फार होऊं लागल्याकारणानें, त्यांची किंमत दुप्पट तिप्पट वाढली आहे व ह्यांचा लक्षावधी रुपयांचा व्यापार चालतो आणि आमचे लोक दागिने फार घालतात म्हणून हंसणारे साहेब लोकही सोनें, मोत्यें वगैरेचे दागिने आतां मोठ्या हौसेनें घालूं लागले आहेत !

**१७. मुंबईस एकंदर माल येतो तो—मद्रासे**हून काफी; **कच्छ व काठेवाड** येथून कच्चा कापूस; **मद्रास** व **पोर्टुगीज** लोकांच्या वसाहती आहेत तेथून नारळ; (कालीकोटी नारळ प्रसिद्धच आहेत) **बंगाल** व **ब्रह्मदेशा**हून तांदूळ; **बंगाल्यां**तून गोणपाट वगैरे; **मद्रासे-हून** तेल वगैरे; **बंगाल, मद्रास** व **गोवें** येथून सुपारी; (**मुंबई** इलाख्यांतील 'श्रीवर्धनी पांढरी' व **वसई** व चेऊल येथील फुलभरडी सुपारी प्रसिद्धच आहे) **मद्रासे**हून सुंठ व मिरीं; **बनारस** (काशी) व **बंगाल** येथून साखर; **ब्रह्मदेशा**हून इमारतीचें लांकूड ; **काबूल, कंदहार** व **सिंध**देशांतून कच्ची लोंकर; **कालिकोट, मलबार, गोमांतक, मालवण, कर्नाटक** वगैरे ठिकाणांहून काथ्याचे दोर व सुंभ; **चीनाहून** रेशमी कापड, रेशीम, मातीचीं भांडीं, चहा आणि फटाके वगैरे दारुकाम व इतर तरतऱ्हेचे जिन्नस; **विलायतेहून** कापसाचें व लोंकरीचें कापड, कांचेचें सामान, नानातऱ्हेची यंत्रे, चाकू, कात्र्या, सुया, टांचण्या, मद्यें-औषधें वगैरे अनेक तऱ्हेचे जिन्नस; **फ्रान्स, पोर्टुगल** येथून नानाप्रकारचीं मद्यें; **आरबस्थान, पेगू, काठेवाड** येथून घोडे ; **मस्कत** येथून डाळींब वगैरे फळफळावळ आणि जरदाळू, बेदाणा वगैरे मेवा; याप्रमाणे अनेक ठिकाणांहून अनेक जातींचा मनोवेधक असा माल **मुंबईस** येतो. ह्यांची नामावळी देऊं गेलें तर, एक निराळा ग्रंथच होईल ; कारण असा कोणताच पदार्थ नाही कीं, तो **मुंबईं**त मिळत नाहीं.

**१८. मुंबईहून माल जातो तो**—कच्चा कापूस **बंगाल्यास**; **मुंबईं**तील गिरण्यांत झालेलें कच्चे सूत चीन देशास; **मद्रास, बंगाल** व **हिंदुस्थाना**ंतील इतर ठिकाणीं विणलेलें सूत; **मद्रास, कच्छ** व **काठेवाड** येथे तांदूळ व

इतर धान्यें, मद्रास व बंगाल येथे मीठ; काठेवाड येथें नानातऱ्हेचें बीं; **कच्छ** व **काठेवाड** येथें गरम मसाला व साखर; तसेंच अफू, गहूं, मोत्यें, घोडे, किनखाप, रेशमी व सुती कापड, सोन्यारुप्याची तार, कशिदे काढलेलें कापड, लोंकर, चामडें, मातीचीं भांडीं, सोनें, रुपें वगैरे मौल्यवान धातु, हिरे, माणीक वगैरे मौल्यवान जवाहीर; तांब्यापितळेचीं भांडीं, हांतऱ्या, गाड्या, विटा, कौलें, घरकामाला लागणारे धोंडे, चुना वगैरे; नानातऱ्हेच्या नक्षीदार काम केलेल्या पेट्या वगैरे जिन्नस बाह्यप्रदेशीं जातात. एवढा जरी माल **मुंबई**हून बाह्यदेशीं जातो तरी, साधारणपणे किंबहुना विशेषतः विलायतेहून येथें माल फार येऊन त्याचा खपही बराच होतो; तेणेंकरून आमच्या देशाचा चोहोंकडून तोटाच आहे ! ह्या सर्व गोष्टी एकिकडेस ठेविल्या तरी, आज आपण फक्त 'आग' आणि 'पाणी' ह्या करतांच किती बरें पैसा परमुलखीं घालवीत आहों ? दिडकीला दोन-छे, आतांशा तीनही मिळूं लागल्या आहेत याप्रमाणें प्रत्येक मनुष्यास दरसाल किती पैशांच्या आगपेट्या लागत असतील बरें ? तसेंच 'सोडावाटर' 'लेमोनेड' वगैरे करतां किती द्रव्य विलायतेस जातें ? अर्थात आम्ही सर्वस्वीं परावलंबी होऊन गेलों आहोंत ! कारण आळसाने आम्हास अगदी जखडून टाकलें आहे.

**१९.** एकंदरीनें पाहता ह्या देशात **युरोपिअन** लोकांचा प्रवेश झाल्या-दिवसापासून येथील व्यापार मोठ्या झपाट्यानें वाढत चालला आहे, हें वरील सर्व विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल; तरी पण, सरासरीनें पाहूं गेलें असतां, असे अनुमान निघतें कीं, एकंदर देशांत जो माल येतो त्याची किंमत बाहेर जाणाऱ्या मालाच्या किंमतीपेक्षां सुमारें २३ कोट रुपये अधिक आहे. इ.स. १८८४ त बाहेर गेलेल्या मालाची किंमत ६३ कोट व आलेल्या मालाची ८९ कोट म्हणजे निवळ २६ कोट रुपये तोटा ह्या देशास व्यापारांत आला हें देशाच्या अभ्युद्याला किती हानिकारक आहे हें येथें सांगण्याची गरज दिसत नाहीं. याप्रमाणें स्थूलमानानें आम्ही आमच्या वाचकांपुढें मुंबईच्या व्यापाराच्या स्थितीचें संक्षेपेंकरून निरूपण केलें.

## भाग पांचवा.

### सरकार आणि उत्पन्न.

**हिंदुस्थानाचे विभाग-हिंदुस्थान**देशाचे **बंगाल**, **मद्रास** आणि **मुंबई** असे तीन इलाखे आहेत. त्यांतही **बंगाल**, **मद्रास**, **मुंबई**, **नॉर्थवेस्टर्न प्राव्हिन्सेस** (औध मिळून), **पंजाब**, **मध्यहिंदुस्थान** (सेंट्रल प्राव्हिन्सेस), **ब्रिटिशबर्मा** आणि **आसाम** असे आठ पोटभेद आहेत. इ.स. १७७३ सालापासून **मुंबई**, **मद्रास** व **बंगाल** हे इलाखे गव्हर्नर जनरलच्या अधिकाराखालीं आले आहेत.

२. **मुंबई सरकारच्या हाताखालचा प्रांत-मुंबई** सरकारच्या हाताखालीं उत्तर रेखांश २८°-३२' **सिंध**चे उत्तर टोंकापासून तों १३°-५५' **कानड्या**च्या दक्षिण टोंकापर्यंत, आणि पूर्वरेखांश ६६°-४३' **सिंध**चे पश्चिम टोंकापासून तों ७६°-२०' **खानदेश**च्या पूर्व टोंकापर्यंत इतका मुलूख आहे.

३. **मुंबईइलाख्याची मर्यादा**—ह्या इलाख्याच्या सीमा वायव्येस, उत्तरेस आणि ईशान्येस— **बलुचिस्थान**, **पंजाब** आणि **राजपुताना**; पूर्व आणि आग्नेय दिशांस – **इंदूर**, **मध्यप्रांत**, **पश्चिमवऱ्हाड** आणि **निजामा**चें राज्य ; दक्षिणेस –**मद्रास** आणि **म्हैसूर** आणि पश्चिमेस – **आरबी**समुद्र अशा आहेत.

४. **मुंबई इलाख्यांतील जमीन** –**मुंबई** इलाख्यांत एकंदर १,८८,१९५ चौरस मैल जमीन आहे. पैकीं **रेग्युलेशन** डिस्ट्रिक्टमध्यें ७७,७६७; **सिंध**मध्यें ४७,१७५ आणि ६३,२५३ चौरस मैल जमीन एतद्देशीय संस्थानिकांच्या ताब्यांत आहे सगळ्या **हिंदुस्थानां**त **इंग्रज**सरकारचा अम्मल ८,८१,८२३ चौरस मैलांवर असून त्यांच्या ताब्यांत एतद्देशीय संस्थानाचा अम्मल ५,२१,११६ चौरस मैलांवर आहे. **हिंदुस्थानां**त एकंदर ४,७९० लक्ष एकर जमीन आहे; पैकीं राजे, रजवाडे, संस्थानिक वगैरे यांजकडे १,१८० लक्ष एकर आहे. बाकी राहिलेल्या ३,६१० लक्ष एकरांपैकीं १,५०० एकर जमीन लागवडीकडे आणि ४०० लक्ष एकर जंगलाकडे आहे. ती वजाकरितां ६,६७० लक्ष पडीत आहे. ह्यांतून अजून ८०० एकर जमीन लागवड होण्यासारखी आहे. ह्यापैकीं **पोर्टुगिजां**चा अम्मल १,०८६ चौरस मैलांवर, आणि **फ्रेंचां**चा १७८ चौरस मैलांवर आहे.

५. **एतद्देशीय संस्थानें**—सर्व देशभर लहानमोठीं एतद्देशीय संस्थानें १,००० आहेत; त्यांत **निजाम, म्हैसुर, होळकर, शिंदे** व **गायकवाड** ह्यांचीं संस्थानें मोठीं आहेत. या सर्व संस्थानांचे उत्पन्न सुमारें १६,००,००,००० रुपयांचें असून ७,२५,००० रुपये खंडणी जाते. **भोपाळ**चें राज्य तीन पिढ्या स्त्रियांच्या ताब्यांत आहे ! **मुंबई** इलाख्याची मनुष्य गणती २,५६,२४,६९६ असून १,४१,६०,२०८ **रेग्युलेशन** डिस्ट्रीक्टमध्ये; **सिंध**मध्यें २१,९२,४१५ आणि एतद्देशीय राजांच्या संस्थानांत ९२,७२,०७३ एवढी आहे.

६. **स्वतंत्र संस्थानें**—**मुंबई**इलाख्यांत स्वतंत्र संस्थानें काय तीं **पोर्टुगीज** लोकांचीं आहेत. तीं येणेंप्रमाणें:—**गोवें, दवण** आणि **दींव**ह्यांत मोठें म्हटलें म्हणजे **गोवें** होय. ह्याचें क्षेत्रफळ २२४ चौरस मैल आहे व हें उत्तर रेखांश १५°-४४' व पूर्व अक्षांश ७३°-४५' **रत्नागिरी व कारवार** ह्यांमध्यें आहे. उत्तर रेखांश २०°-१८' आणि पूर्व अक्षांश ६०°-३५' ह्यांमध्यें **दवण** आहे. **दवण**चें क्षेत्रफळ सरासरी **मुंबई**एवढेंच म्हणजे सुमारें २२ चौरस मैल होईल. **दींव** हें एक लहानसें बेट आहे. ह्याचें क्षेत्रफळ १³/४ चौरस मैल असून तें **काठेवाठ**च्या दक्षिण किनाऱ्यावर आहे.

७. **गव्हर्नर**—**मुंबई** इलाख्यावर गव्हर्नर-इन्-कौन्सिल याचा अधिकार चालतो. गव्हर्नराची नेमणूक विलायतेहून होते. हे गर्व्हनर दर पांच वर्षांनीं बदलतात. ह्यांस चाकर माणसें, गाडी घोडा, खाणें पिणें वगैरे सर्व इतमाम सरकारी खजिन्यांतून मिळतो. ह्याबद्दल सरकारास सालीना दहा लक्ष तीस हजार रुपये खर्च बसतो. गव्हर्नराचा 'पर्सनल स्टाफ' (खासगीकडील माणसें) म्हटला म्हणजे एक प्रायव्हेट व एक मिलिटरी असे दोन सेक्रेटरी, एक सर्जन व तीन एंडीक्यांप असा असतो. गव्हर्नराचे दोन्ही सेक्रेटरी हे त्याच्या कामासंबंधीं त्यास मदत करितात. ह्यांस दरमहा प्रत्येकीं १,२५० रुपये पगार मिळतो. शिवाय एक बॉडीगार्डही असतो. गव्हर्नराच्या गाडीबरोबर नेहमीं दोन स्वार असतात. 'लेव्ही' वगैरे मोठमोठ्या प्रसंगी गव्हर्नर चार घोड्यांच्या गाडींत बसतो, व त्या प्रसंगी त्याच्या बरोबर ५० मिलीटरी स्वार असतात. प्रत्येक सेक्रेटरींकडे एक एक मिलीटरी गार्ड असतो. गव्हर्नरास १९ तोफांची सलामी

होते. चीफ जस्टीस (मुख्य न्यायाधीश) आणि कम्यांडर-इन-चीफ (मुख्य सेनाधिपति) ह्यांस प्रत्येकी १७ तोफा, आणि हायकोर्टाचे इतर न्यायाधीश आणि कौन्सिलचे सिव्हिल मेंबर ह्यांस प्रत्येकी चौदा चौदा तोफांची सलामी झडते, शिवाय प्रत्येकाचे बंगल्यावर नेहमी संत्र्यांचा पहारा असतोच. **मुंबई**च्या गव्हर्नरास कम्यांडर-इन-चीफचा हुद्दा असतो. गव्हर्नरास प्रत्येक राजकीय बाबतींत गव्हर्नर जनरलची सल्ला घ्यावी लागते. गव्हर्नर जनरल हे **हिंदुस्थान**चें मुख्य सरकार होय. त्यांसही अति मोठ्या महत्त्वाच्या राजकीय बाबतींत **वेस्ट मिन्स्टर** येथें असलेल्या सेक्रेटरी आफ्-स्टेट-इन-कौन्सिलच्या सल्ल्याने वागावें लागतें. सेक्रेटरी आफ्-स्टेट हे ब्रिटिश क्याबिनेटचे सभासद असून **हिंदुस्थान**चे प्रतिनिधि असतात. त्यांस **हिंदुस्थान**च्या राज्यकारभारसंबंधाने पार्लमेंट जबाबदार धरितें.

८. इ. स. १७०८ सालीं ह्मणजे ज्या वेळीं जुनी व नवी कंपनी मोडून **युनायटेड् ईस्ट इंडिया कंपनी**ची स्थापना झाली त्या वेळीं **मुंबई**-इलाखा स्वतंत्र मानला जात असे; परंतु, इ. स. १७७३ सालीं तो **हिंदुस्थान** सरकारचे ताब्यांत गेला, त्यावेळी **वारन हेस्तिंग्स** हे **हिदुस्थान**चे गव्हर्नर जनरल होते. इ. स. १८५८ सालीं **ईस्ट इंडिया कंपनी** खालसा झाल्यावर **मुंबई**च्या संबंधाचे सर्व अधिकार सरकारचे ताब्यांत गेले.

९. **सनदी नोंकर**—**मुंबई** इलाख्याचा राज्यकारभार सुरळीतपणें चालावा ह्मणून विलायतेहून जे कामगार लोक येतात त्यांस **'सिव्हिल सर्व्हन्ट्स** किंवा **सिव्हीलिअन'** (सनदी नोकर) म्हणतात. ते येथें आल्यावर त्यांस देशी भाषांत परीक्षा द्याव्या लागतात. इ. स. १७२० मध्यें **मुंबई** इलाख्यांत ४० सनदी कामगार होते. व त्यांस इ. स. १८०४ पर्यंत व्यापार करण्यास सरकारांतून मोकळीक असे. इ. स. १७३९ त कंपनी सरकारचे नोकरांनीं त्या वेळेस असलेले गव्हर्नर ऑनरेबल **स्टीफन लॉ** ह्यांजकडे आपणांस पगार कमी मिळतो तो पुरत नाहीं, व तो थोडा बहुत तरी वाढवावा ह्या अर्थाचा अर्ज केला होता, त्यांत त्यांच्या खर्चाची विल्हेवारी दिली आहे. कारण त्या वेळीं त्यांस पगार व खर्चहीं बरोबर होत. तेव्हांच्या सिव्हिलिअनांमध्यें आणि आतांच्या सिव्हिलिअनांमध्ये जो पगाराच्या संबंधानें जमीन अस्मानाचा भेद दिसून येतो, तो त्या वेळीं **मुंबई**चें उत्पन्नही फारच

थोडें होतें ह्मणून दिसून येतो, हें वास्तविकच आहे. वर ह्मटलेल्या खर्चाची विल्हेवारी येणेंप्रमाणें—

| Name of Article | Rs. | Qrs. | जिनसांची नांवे | रु. | पा. |
|---|---|---|---|---|---|
| 1 One fowl per diem at I qr 6. P. each | 9 | 3 | दिवसात एक कोंबडी | ९ | ३ |
| 1 Chicken or Fish & rice 14 P. each | 5 | 1 | कोंबडी किंवा मच्छी आणि तांदूळ . . | ५ | १ |
| Flour, pepper mustard & etc. . . | 0 | 2 | आटा, मिरें, मोहऱ्या वगैरे | ० | २ |
| Greens. . . | 0 | 3 | भाजीपाला . . | ० | ३ |
| 3 Rolls per diem 2P. each . . | 2 | 1 | ३ पांव वगैरे . . | २ | १ |
| Wine & Punch Rupees 2 each . . | 15 | 0 | इंग्रजी दारु आणि पंच नांवाची दारु . . | १५ | ० |
| Ghee. . . | 0 | 3 | तूप . . | ० | ३ |
| Oil & Candles | 4 | 0 | तेल आणि मेणबत्त्या | ४ | ० |
| Wood 1,200 billets Rupees 2-2 per mille. . . | 3 | 0 | लांकूड फांटे वगैरे . . | ३ | ० |
| Tea half cally. | 1 | 2 | चहा . . | १ | २ |
| Sugar & sugarcandy. | 2 | 2 | साखर आणि खडी साखर | २ | २ |
| Milk . . | 0 | 3 | दूध . . | ० | ३ |
| Butter 2 lbs. Rupee 1 per lb. . . | 2 | 0 | लोणी . . | २ | ० |
| Water-bearer | 0 | 2 | पाणक्या . . | ० | २ |
| Rupees | 48 | 2 | रुपये | ४८ | २ |

१०. मुंबई खेरीज करून सुरत, खंबायत, अहमदाबाद, पनवेल, टेलिचरी, कालिकोट, ओनोर, अंजनगड, बसोरा, ठट्ठा, लारी, शाहाबंदर वगैरे ठिकाणी हिंदुस्थानांत कंपनी सरकारच्या वखारी होत्या. त्यांत

कंपनीचे **'एजंट'** असून ते कौन्सिलचे मेंबर असत. त्या वेळचें कौन्सिल ह्मटले ह्मणजे गव्हर्नर, कमांडर-इन्-चीफ आणि प्रत्येक वखारीचे मुख्य मिळून होत असे. ह्या वखारींची व्यवस्था सुरळीतपणें चालावी म्हणून येथें **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** दरसाल तरुण मंडळी पाठवीत असे. **मुंबई** हस्तगत झाल्यानंतर तिच्या संरक्षणाकरितां लष्करी दिवाणी खात्यांतल्या लोकांमध्यें नेहमीं झटापटी चालत; म्हणून इ. स. १६७६ सालीं स्थानिक सरकारास **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** ह्यांनी असें कळविले कीं, हीं दोन्ही खातीं एकत्र करून दिवाणी खात्याचें वर्चस्व राखावें. ह्या सिव्हिल खात्यांतील नोकरांचे तीन वर्ग असत. त्यांस त्यांची पांच वर्षांची नोकरी होई तोंपर्यंत अप्रेंटिस (उमेदवार) म्हणत; परंतु त्यांची तीन वर्षांची नोकरी पुरी झाली ह्मणजे, त्यांचा भोजनखर्च व इतर सर्व लवाजमा खेरीज करून त्यांस सालिना १० पौंड (१०० रुपये) मिळत. नंतर त्यांस **'रायटर'**[१] ह्मणत. पुढें त्यांस **'फ्याक्टर'** ची जागा मिळे. ह्याप्रमाणें ते हळुहळू **'मर्चंट'** आणि **'सिनिअर मर्चंट'** असे पायरी पायरीनें वरच्या दर्जापर्यंत जात. ही व्यवस्था इ. स. १८४१ पर्यंत चालली.

११. **'सिलेक्शन फ्रॉम स्टेट पेपर्स'** होम सीरिज, व्हाल्युम १, ह्या पुस्तकावरून असें दिसतें कीं, कंपनीच्या नोकरांचे तीन वर्ग होते. **मर्चंटस् फ्याक्टर्स** आणि **रायटर्स**. सात वर्षें चाकरी होईपर्यंत त्यांस **'अप्रेंटिस'** ह्मणत. ही मुदत भरल्यावर त्यांनीं जामीन दिला तर, त्यांस कायमची नोकरी मिळे, नोकरी मिळाल्यावर ते **रायटर** बनत. व त्यांस हें काम पांच वर्षेपर्यंत चालवावें लागे. त्याबद्दल त्यांस दरसाल १० पौंड मिळत आणि आपल्या चांगल्या वर्तणुकीच्या जामीनगिरीबद्दल त्यांस ५०० पौंडांचा **बॉंड** (हमी) लिहून द्यावा लागे. ही चाकरी पुरी झाल्यावर त्यांस **फ्याक्टर** ह्मणत. जागा मिळणें ती ज्याचा हक्क जास्त पोंहचेल त्यास मिळे, व त्यासही सालिना २० पौंड पगार मिळून शिवाय एक हजार पौंडाचा **बॉंड** जामीनगिरीबद्दल लिहून द्यावा लागे; व हा बॉंड लिहून दिला ह्मणजे लिहून देणारा सिनिअर (जुना) **फ्याक्टर** झाला तीन वर्षेपर्यंत फ्याक्टरची नोकरी झाल्यावर त्यास जागा रिकामी होईल त्याप्रमाणे **मर्चंट** करीत व त्यास

[१] आतां ह्यास **'सिव्हिल सर्व्हंट'** म्हणतात.

सालिना ४० पौंड पगार मिळे. शिवाय घरभाडें, खाणें वगैरेचा खर्च कंपनी देई. रेसिडेंटाचा पगार सालिना ५०० पौंड असे. ह्या पगारांतून अर्धा पगार त्यास येथें मिळून अर्धा तो विलायतेस गेल्यावर तेथें मिळे व त्याची गैर वर्तणूक वगैरे न व्हावी म्हणून त्याजजवळूनही ५,००० पौंडाचा बाँड जामीनगिरीबद्दल घेत. **रायटर** वगैरे लोकांचा पगार त्यांस तेथेंच मिळे. याप्रमाणे पूर्वी 'सिव्हिलिअन' ची स्थिति होती. तेव्हांच्या 'रायटरांत' व आतांच्या **'सिव्हिल सर्व्हंटांत'** किती अंतर आहे पहा.

१२. **सनदी नोकरांचा व्यापारांत हात**— व्यापाराच्या संबंधानें पाहिलें तर बहुतकरून **युरोपिअन** लोकांच्या कंपन्यांतून येथें जेवढे **सिव्हिल सर्व्हंट्स्** येत त्यांचा थोडाबहुत तरी संबंध प्रत्येक व्यापारी कंपनीशीं असे.

ह्या संबंधी इ. स. १८०३ सालचें 'एशिआटिक अन्युअल रजिस्टर' व्हाल्युम ५, या पुस्तकांत जो लेख आहे तो येणेंप्रमाणे :—

In many of the European houses the civil servants were directly interested as partners; but to adopt the views of the contribution named—"the greater number of the members of the mercantile houses here have been pursers of Indiamen and captains of ships in the country trade; the knowledge they acquired of Indian commerce by frequenting the different trading ports, induced them to establish themselves in Bombay as merchants and Agents. They first employed Banians (Vanias) and afterwards Parsees (Parsis) as their brokers."

**भावार्थ**— येथें युरोपिअन लोकांच्या ज्या वखारी होत्या त्यांत जे **'सिव्हिल सर्व्हंट्'** असत त्यांचा प्रत्यक्ष संबंध ह्या वखारीशीं असून स्थानिक व्यापारांतही बहुतेक **सिव्हिल सर्व्हंट** आपला हात घालीत असत. कोणी जहाजांवर सर्व सामुग्री पुरवीत, किंवा कोणी जहाजांवरील कपतान होऊन जात. असा ते येथील व्यापाराशी आपला संबंध ठेवीत. याप्रमाणे निरनिराळीं बंदरे फिरून येथील थोडीशी व्यापारसंबंधी माहिती मिळाली असे झालें म्हणजे **मुंबई**त व्यापारी किंवा 'आडते' बनून मोठमोठी दुकानें घालून राहण्याचे त्यांस उत्तेजन येई. त्यांनीं पहिल्यानें वाणी लोकांस दलालीच्या कामांत घेतलें. पुढें पारशी घुसले.

१३. **डाक्तर वगैरे**—इ. स. १७२० पासून १७२८ पर्यंत व त्याच्या पूर्वी देखील **मुंबईत** सरकारी डाक्तर नव्हते; त्यामुळें लोकांस आणि मुख्यत्वें युरोपिअन लोकांस बरोबर औषधोपचार होत नसे, एवढेंच नाहीं; तर, शहराची स्थितीही फारच घाणेरडी असे. पुढें हळुहळू डाक्तर येऊं लागले; तेव्हा लोकांची औषधपाण्याच्या संबंधानें ओरड कमी होत जाऊन शहराचीही उत्तरोत्तर सुधारणा होत गेली. ह्या वेळीं सर्जनचा पगार दरमहा ४२ रुपये असून दुसरे दोन डाक्तर त्याच्या हाताखालीं असत. त्या प्रत्येकाचा पगार सालीना ३५० रुपये होता. धर्मोपदेशक पाद्रीला सालिना ५०० रुपये मिळून शिवाय तितकेच रूपये बक्षीसादाखल मिळत. ह्या सुमारास ह्या बेटांत एकच पाद्री होता. लष्करी खात्यांतील अम्मलदारांचा पगारही ह्याच मानानें कमी असे. एकंदरींत ह्यावेळीं सर्व सरकारी अम्मलदारांचें वेतन हल्लींच्या मानानें कांहींच नव्हतें असें म्हटलें तरी चालेल.

१४. पूर्वीच्या गव्हर्नर व डेप्युटी गव्हर्नरांचा पगार—इ.स. १७०४ पर्यंत **मुंबईत 'डेप्यूटी गव्हर्नर'** असे. इ. स. १६८२ म्हणजे सर जॉन चाईल्ड ह्यांच्या कारकीर्दीपर्यंत डेप्यूटी गव्हर्नराचा पगार ह्मटला ह्मणजे काय तो सगळा सालीना ८०० रुपये होता. इ. स. १७०० मध्यें कंपनी सरकारकडून मुंबई टापूबद्दल सरकारास उत्पन्न थोडें असून खर्च फार होतो, सबब तो कमी करण्याकरितां डेप्यूटी गव्हर्नराचा पगार दरमहा १०० रुपयांवर आणून सर्व शहराचा वार्षिक खर्च सत्तर हजार रुपयांच्या आंत आटपावा ह्मणून हुकूम आला होता. वर म्हटलेल्या सत्तर हजार रुपयांच्या रकमेंत गांवखातें, धर्मखातें व लष्करी खातें ह्या सर्व खात्यांच्या खर्चाचा समावेश होत असे. जकात व जमिनीचा वसूल मिळून ह्या वेळीं सरकारास ९४,२०० रुपये वर्षाचें उत्पन्न होतें. सदरहु हुकमाप्रमाणे डेप्यूटी गव्हर्नरास सालिना १,००० व गव्हर्नरास ३,००० रुपये पगार करून, कौन्सिलच्या तिसऱ्या हुद्देदाराचा पगार सालिना ७०० रुपये केला; पण यांचा अन्नखर्च व दुसरा इतमाम दरबारी खर्चांतून होई. त्यास प्रतिवर्षी बक्षिसें मिळत तीं आलाहिदाच !

१५. **मुंबई सरकार—मुंबई** सरकार ह्मटलें म्हणजे गव्हर्नर, कमांडर-इन-चीफ आणि गव्हर्नराच्या कौन्सिलाचे मेंबर इतकेंच होय. ह्या बड्या हुद्देदारांचे दरमहाचे पगार येणेप्रमाणें:—

| | | रु. आ. पै. |
|---|---|---|
| **गव्हर्नर** | .. .. .. | १०,६६६-१०-८ |
| **कमांडर-इन्-चीफ** | .. | ५,८३३-५-४ |
| **कौन्सिलचे मेंबर** प्रत्येकीं | .. | ५,३३३-५-४ |

गव्हर्नरास त्याच्या इतर खर्चाबद्दल सालीना २५,००० रुपये मिळतात. गव्हर्नरांस इतका मोठा पगार माजी गव्हर्नर **लार्ड एल्फिन्स्टन** ह्यांचे कारकीर्दीपासून मिळूं लागला. कमांडर-इन-चीफ् यांस पगाराशिवाय सालिना गव्हर्नरास कौन्सिलमध्यें मदत करण्याबद्दल ६०,००० व इतर खर्चाबद्दल २,६०० रुपये मिळतात. हे चाऱ्ही कामदार राजकीय कारणाकरितां एकत्र जमले म्हणजे त्यास कौन्सिल ह्मणतात. परंतु कमांडर-इन्-चीफ हे बहुधः तशाच मोठ्या राजकीय प्रकरणाशिवाय कौन्सिलांत हजर नसतात. वस्तुतः कमांडर-इन्-चीफ् ह्यांचे काम सैन्याची तरतूद ठेवण्याचेंच होय. कौन्सिलचे मेंबर ह्यांची नेमणूक स्थानिक सरकारच्या संमतीनें व बहुतांशी विलायत सरकारच्या शिफारशीनें होते. हे लोक एकदम गव्हर्नरासारखे विलायतेहून न येतां, पूर्वीपासून सिव्हिलिअन असल्यामुळें वाढतवाढत आपल्या हुशारीप्रमाणें त्यांस ही जागा मिळते. पहिल्या कौन्सिलची जागा रिकामी झाली तर ती नव्यास न मिळतां त्याच्या खालच्या मेंबरास मिळते. गव्हर्नराची जागा इकडे असलेल्या हुशार सिव्हिलियनास क्वचित् मिळते. ह्याचें प्रत्यक्ष अलीकडील उदाहरण सर **रिचर्ड टेंपल** ह्याचे होय. हा वाढतवाढत जाऊन **मुंबई**चे गव्हर्नर झाला. आजपर्यंत जे गव्हर्नर मुंबईत झाले त्यांची यादी खालीं दिली आहे :—

## मुंबईचे गव्हर्नर.

### मुंबई बेट इंग्रजांच्या हस्तगत झाल्यापासून आजपर्यंत जे जे गव्हर्नर मुंबईचा कारभार चालविण्याकरितां नेमण्यांत आले त्यांची शकवार यादीः—

| क्रमांक | नांव | अधिकारारुढ झाल्याची तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| | **खुद्द राजाकडून नेमलेले गव्हर्नर.** | | |
| १ | धि ऑनरेबल सर अब्राहम शिप्मन. | ह्यास इ. स. १६६२ च्या मार्च महिन्याचे १९ वे तारखेस जनरल आणि गव्हर्नर नेमिलें; परंतु, त्यास पोर्टुगिजांनी मुंबईत येण्याचा प्रतिबंध केल्यामुळें तो येथें आला नाहीं. हा इ. स. १६६४ च्या ऑक्टोबर महिन्यांत आंजदिव बेटांत मरण पावला. | |

१. इ स. १६६८ पासून १६८७ पर्यंत जे गव्हर्नर झाले, ते बहुतकरून सुरतेच्या वखारीच्या प्रेसिडेंटच्या नात्यानें सुरतेसच राहत असत. त्या वेळी मुंबईचा अधिकार डेप्युटी गव्हर्नर चालवीत. पुढें इ. स. १६८७ पासून म्हणजे ज्या वेळी मुंबईस कंपनी सरकारचें मुख्य ठाणें आलें त्या वेळेपासून डेप्युटी गव्हर्नराची जागा कमी झाली. जरी ही जागा कमी केली तरी बरींच वर्षेपर्यंत कौन्सिलच्या दुसऱ्या मेंबरास डेप्यूटी गव्हर्नराचा हुद्दा असे; परंतु, हा हुद्दा बहुतकरून इ. स. १७२० पासून १७३८ ह्या वर्षाच्या दरम्यान नाहींसा झाला असावा. कंपनी सरकारचे इ.स. १६६८ पासून १७०४ पर्यंत मुंबईत डेप्यूटी गव्हर्नर आले त्यांची नावें येणेंप्रमाणे:—इ. स. १६६८ त कपतान हेनरी यंग; १६७० त माथ्यू ग्रे आणि फिलीप् गायफोर्ड; १६७६ त हेनरी आक्झिंडन; १६८२ त चार्ल्स वॉर्ड; १६८३ त केगविन; १६८४ त चार्ल्स झिनझन; १६८६ त सर जॉन वायबोर्न; १६८८ त जॉन व्हो; १६८९ त जॉर्ज कुक; १६९० त जॉर्ज वेल्डन; १६९० त साम्यूअल बरनिस्टन आणि १७०४ विल्यम एलाबी हे होते. पैकी केगविन ह्याच्या बंडाची हकीकत दुसऱ्या भागांत येऊन गेलीच आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| २ | मिस्तर हंफ्री कुक. | हा अब्राहम शिपमनचा सेक्रेटरी (चिटणीस). ह्याने इ.स. १६६५ चे फेब्रुवारी महिन्यांत गव्हर्नराचे जागेचा अधिकार घेऊन तो त्याने इ. स. १६६६ चे नोव्हेंबर महिन्याचे ५ वे तारखेपर्यंत चालविला. | |
| ३ | धि ऑनरेबल सर जरव्हिस लुकस. | १६६५ नोव्हेंबर ५. | हा मुंबईत इ. स. १६६६ त मे महिन्याचे २१ वे तारखेस मरण पावला. |
| ४ | कपतान हेनरी गारी. | १६६७ मे २२. | हा डेप्यूटी गव्हर्नर असून गव्हर्नराचे काम पाहात असे. |
| | **कंपनी सरकाराकडून नेमलेले गव्हर्नर.** | | |
| ५ | सर जॉर्ज ऑक्झिंडन. | १६६८ सप्टेंबर २३. | हा बहुतकरून सुरतेस राहत असे. व तेथेंच ता. १४ जुलई १६६९ त मरण पावला. |
| ६ | मिस्तर जेरल्ड आंजिअर. | १६६९ जुलई १४. | इ. स. १६७३-७४-७५ ह्या वर्षांत ह्याने मुंबईत पुष्कळ दिवस घालविले. सुरत येथें इ. स. १६७६ त ३० जून रोजी मरण पावला. |
| ७ | ,, थामस रोल्ट. | १६७७ जून २०. | |
| ८ | सर जॉन चाईल्ड, ब्योरोनेट, | १६८१ अक्टोबर २७. | मुंबईत मरण पावला. |

| क्रमांक | नांव | अधिकारारुढ झाल्याची तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| ९ | मिस्तर बार्थलोम्यू ह्यरीस. | १६९० फेब्रुवारी ४. | सुरत येथें इ. स. १६९४ त १० मे रोजी मरण पावला. |
| १० | " डानिअल आनेस्लि. | १६९४ मे १०. | हा डेप्यूटी गव्हर्नर असून गव्हर्नराचें काम पाहत असे. |
| ११ | सर जॉन गेअर. | १६९४ मे १७. | इ.स. १७०१—४ पर्यंत हा सुरत येथे कैदेंत होता. |
| १२ | " निकोलस वेट. | १७०४ नोव्हेंबर— | इ. स. १६९४ पासून १७१५ पर्यंत मुंबईचे गव्हर्नरास जनरलची पदवी असे. |
| १३ | मिस्तर विल्यम एलाबी | १७०८ सप्तेंबर— | |
| १४ | " स्टिफन स्ट्रट्. | १७१५. | हा डेप्यूटी गव्हर्नर असून गव्हर्नराचें काम पाहत असे. |
| १५ | " चार्ल्स बून | १७१६. | |
| १६ | " विल्यम फिप्स् | १७२०. | |
| १७ | " रॉबर्ट कोव्हन. | १७२८. | ह्याला चाकरींतून दूर केलें होते. |
| १८ | " जॉन हॉर्न. | १७३४ सप्तेंबर | |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | " स्टिफन लॉ. | १७३९ एप्रिल ७. | |
| २० | " जॉन गीकी. | १७४२ नोव्हेंबर १५. | कौन्सिलचा सीनिअर मेंबर असून गव्हर्नराचें काम पाहत असे. |
| २१ | " विल्यम बेक. | १७४२ " २६. | |
| २२ | " रिचर्ड बोरचर | १७५० " १७. | |
| २३ | " चार्ल्स क्रोमेलिन. | १७६० फेब्रुवारी २८. | |
| २४ | " टामस हाजीस. | १७६७ जानुआरी २७. | इ.स. १७७१ त फेब्रुवारीचे २३वे तारखेस मरण पावला. |
| २५ | " विल्यम हॉर्नबी. | १७७१ फेब्रुवारी २६. | |
| २६ | " रॉसन हार्ट बोढ्याम. | १७८४ जानुआरी १. | |
| २७ | " आँड्रयु रामसे | १७८८ " ९. | कौन्सिलचा सीनिअर मेंबर असून गव्हर्नराचे काम पाहत असे. |
| २८ | मेजर जनरल सर विल्यम मेडोस के. बी. | १७८८ सप्टेंबर ६. | |
| २९ | मेजर जनरल सर रॉबर्ट आबर क्रांम्बी. के. बी. | १७९० जानुआरी २१. | इ. स. १७९३ त मद्रासेंत गेला होता तेथून गव्हर्नर जनरलचे कौन्सिलांत कमांडर-इन्-चीफ इन इंडिया ह्या हुद्द्यानें कौन्सिलांत रूजू झाला. |
| ३० | मिस्तर जॉर्ज डिक् | १७९३ नोव्हेंबर १. | |
| ३१ | " जॉन ग्रिफिथ्. | १७९५ सप्टेंबर ३. | |

| क्रमांक | नांव. | अधिकारारुढ झाल्याची तारीख. | शेरा. |
|---|---|---|---|
| ३२ | मिस्तर जोनाथन डंकन. | १७९५ डिसेंबर २७. | इ. स. १८११ त आगष्ट महिन्याचे ११ वे तारखेस मुंबईत मरण पावला. |
| ३३ | ” जॉर्ज ब्रौन. | १८११ आगष्ट ११. | कौन्सिलचा सीनिअर मेंबर असून गव्हर्नराचें काम पाहत असे. |
| ३४ | सर इव्हान नेपिअन, ब्योरोनेट. | १८१२ ” १२. | |
| ३५ | धि ऑनरेबल मानस्टूअर्ट एलफिन्स्टन. | १८१९ नोव्हेंबर १. | हा गव्हर्नर विद्यावृध्दीकडे फार लक्ष देई व ह्याच्याच कारकीर्दीत बहुतेक शाळा स्थापन झाल्या. |
| ३६ | मेजर जनरल धि ऑनरेबल सर जॉन मालकम् के. सी. बी. | १८२७ ” | |
| ३७ | लेप्टनेंट जनरल धि ऑनरेबल सर टॉमस सिडनी बेकविथ्. के. सी. बी. | १८३० डिसेंबर १. | इ. स. १८३१ त १५ जानुवारी रोजी मरण पावला. |
| ३८ | मिस्तर जॉन रोमर. | १८३१ जानुआरी १७. | कौन्सिलचा सीनिअर मेंबर असून गव्हर्नराचें काम पाहत असे. |
| ३९ | धि अर्ल ऑफ् क्लेअर राईट ऑनरेबल जॉन बल जॉन फिट्स गिबन. | १८३१ मार्च २१. | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४० | सर रॉबर्ट ग्रांट. जी. सी. एच्. | १८३५ मार्च १७. | दापुरी येथें इ. स. १८३८ त ९ जुलईस मरण पावला. |
| ४१ | मिस्तर जेम्स फ्यारिश | १८३८ जुलई ११. | कौन्सिलचा सीनिअर मेंबर असून गव्हर्नराचे काम पाहत असे. |
| ४२ | सर जे. रिव्हेट कारनाक, बारोनेट, | १८३९ मे ३१. | |
| ४३ | सर विल्यम हे माक्नाटन, बारोनेट. | | इ. स. १८४१ त कोर्ट ऑफ् डायरेक्टर्सनी ह्यास गव्हर्नर नेमिलें होतें; परंतु हा अधिकार स्वाधीन होण्यापूर्वीच ह्मणजे त्याच वर्षाच्या २८ वे डिसेंबरास काबूल येथें मारला गेला. |
| ४४ | सर जॉर्ज विल्यम अंडरसन. | १८४१ एप्रिल २८. | कौन्सिलचा सीनिअर मेंबर अस्न गव्हर्नराचे काम पाहत असे. |
| ४५ | सर जॉर्ज आर्थर, बारोनेट, के.सी.एच्. | १८४२ जून ९. | |
| ४६ | घि ऑनरेबल मि. लेस्टॉक आर्. रीड. | १८४६ आगष्ट ६. | कौन्सिलचा सीनिअर मेंबर असून गव्हर्नराचें काम पाहत असे. |
| ४७ | सर जॉर्ज रसेल क्लार्क. के. सी. बी. | १८४७ जानुआरी २३. | |
| ४८ | व्हायकौंट फॉक्लंड. | १८४८ मे १. | |

| क्रमांक | नांव. | अधिकारारुढ झाल्याची तारीख. | शेरा. |
|---|---|---|---|
| ४९ | लॉर्ड एलफिन्स्टन जी. सी. एच्. | १८५३ डिसेंबर २६. | |
| ५० | सर जॉर्ज रसेल क्लार्क. के. सी. बी. | १८६० मे ११. | |
| ५१ | सर एच्. बी. ई. फ्रियर. के. सी. बी. जी. सी. एस्. आय्. | १८६२ एप्रिल २४. | |
| ५२ | सर वुल्यम रॉबर्ट सिमोर व्हिसी फिट्-जेराल्ड, जी. सी. एस्. आय्. | १८६७ मार्च ६. | |
| ५३ | सर फिलिप् एडमंड वुडहौस, के. सी. बी. जी. सी. एस्. आय. | १८७२ मे ६. | |
| ५४ | सर रिचर्ड टेंपल, बारोनेट, जी. सी. एस्. आय. सी. आय. ई. | १८७७ एप्रिल ३०. | |
| ५५ | सर जेम्स फरग्यूसन, बारोनेट, के. सी. एम्. जी. सी. आय. ई. | १८८० एप्रिल २८. | |
| ५६ | घि राईट ऑनरेबल लॉर्ड रे, एल्. एल्. डी. जी. सी. आय्. ई. | १८८५ मार्च ३०. | हल्लीं गव्हर्नर आहेत. |

**१६. कौन्सिलचें काम–** मुलकी काम सदई दोन्ही कौन्सिलर पाहतात. गव्हर्नर परराष्ट्रसंबंधीं (फॉरीन अफेअर्स) व पब्लिकवर्क्स खात्याचें काम पाहतो. पैकीं पहिला कौन्सिलर जमाबंदीचें व दुसरा राजकीय आणि न्यायखात्याचें काम पाहतो. कौन्सिलर लोक त्यांच्या त्यांच्या हाताखालच्या नियमित खात्यांतील लहानसहान कामांचा निकाल लावितात. महत्त्वाचें काम गव्हर्नर पाहतो. गव्हर्नराचा आणि कौन्सिलरांचा कोणत्याही बाबतींत मतभेद पडल्यास भर कौन्सिलमध्यें त्या गोष्टीचा पुनः विचार होतो. कमांडर-इन्-चीफ मुलकी कामांस फारसें लक्ष देत नाहीं; पण, कधीं कधीं कौन्सिलमध्यें हजर असतो. कौन्सिलमध्ये दोन्ही बाजूंच्या मेंबरांचे सारखें मत न पडलें तर, गव्हर्नरास **'क्यास्टिंगहोट'** (ज्यास्ती मत) देण्याचा अधिकार असल्यामुळें त्यांच्या बाजूचें मत खरें ठरतें. कौन्सिलचें सर्व काम लेखी चालतें.

**१७. कायदे करणारी मंडळी–** सरकारास नवीन कायदे करणें झालें तर, त्या कामासाठीं निराळीच मंडळी असते, तिला **'लेजिस्लेटिव्ह कौन्सिल'** ह्मणतात. ह्या कौन्सिलांत गव्हर्नर-इन-कौन्सिल, कमांडर-इन-चीफ व दुसरे १० मेंबर असतात. ह्यांची निवडणूक गव्हर्नरादी कौन्सिलर करतात. हे मेंबर सरकारी नोकर नसले तरी चालतात. अलीकडे या कौन्सिलांत २-३ नेटिवांचा प्रवेश झाला आहे ही अभिनंदनीय गोष्ट होय. कोणताही कायदा करणें झालें तर, पहिल्यानें त्यांचीं कारणें दाखवावी लागतात, व तीं सरकारी **'गझेटात'** प्रसिद्ध होतात. तीं प्रसिद्ध झाल्यावर कायदे करणारी मंडळी त्यांजवर वादविवाद करून तो कायदा पसंतीकरितां वरिष्ठ सरकार गव्हर्नर जनरल ह्यांजकडे जातो. तेथून पूर्ण संमती मिळाल्यावर सरकारी गझेटांत देशी व इंग्रजी भाषांत तीन वेळ प्रसिद्ध केला जातो. याप्रमाणे गझेटांत प्रसिद्ध झाल्यादिवसापासून तीन महिन्यांनीं कोणताही कायदा अंमलात येतो. ह्याची एक प्रत **'सेक्रेटरी ऑफ स्टेट'**कडे जाते. आमचें सरकार प्रत्यहीं नवीन नवीन कायदे करीत आहे. पण त्यांत रयतेच्या हिताहिताकडे किती लक्ष्य पुरविलें जातें हें सर्व जाणतच आहेत.

१८. **सरकारची निरनिराळीं खातीं**—सरकारी काम नीट व्यवस्थेनें चालावे ह्मणून सरकारनें कामाची निरनिराळीं खातीं पाडलीं आहेत व त्या खात्यांवर निरनिराळे कामगार नेमले आहेत. रेव्हिन्यु, फिन्यान्शिअल, जनरल आणि सेपरेट खात्यांकडे एक सेक्रेटरी, एक अंडर सेक्रेटरी आणि एक असिस्टंट सेक्रेटरी एवढे असतात. ह्या सर्व खात्यांच्या सेक्रेटरीस चीफ सेक्रेटरी ह्मणतात. रेव्हिन्यु खात्यांत जमाबंदी, फॉरेस्ट (जंगल), मीठ, अपकारी, स्टांप, रेजिस्ट्रेशन, पोस्ट, अफू, सर्व्हे (पाहणी) वगैरे कामांचा विचार होतो, फिन्यान्शिअल खात्यांत सर्व पैशासंबंधी कामाचा विचार होतो, आणि जनरल खात्यांत हवा, पाणी डिस्पेन्सरी, डाक्तर लोकांच्या नेमणुका, म्युनिसिपालिटी वगैरे कामांचा विचार होतो. पोलिटिकल, ज्युडिशिअल, एज्युकेशनल आणि सिक्रेट ह्या खात्यांकडे वरप्रमाणेंच अधिकारी असतात. व ह्या खात्यांचा अंडर सेक्रेटरी लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचा सेक्रेटरी असतो. पोलिटिकलखात्यांत राजकीय प्रकरणी गोष्टींचा विचार होतो. ज्युडिशिअल खात्यांत न्यायसंबंधीं आणि एज्युकेशनल खात्यांत सर्व इलाख्यांतील विद्याखात्यासंबंधी विचार होतो. सेपरेट व सिक्रेट हीं खातीं इतर बारीकसारीक काम पाहतात. एक सेक्रेटरी आणि एक असिस्टंट सेक्रेटरी–मिलिटरी, मरिन व इक्लेझिआस्टिकल खातीं आणि इंडो युरोपिअन टेलिग्राफिक् डिपार्टमेंट ह्या खात्यांकडे असतात. मिलीटरी खात्यांत सर्व लष्करी कामासंबंधी; मरीनमध्यें सरकारी बंदरासंबंधी आणि इक्लेझिआस्टिकल खात्यांत धर्मसंबंधी विचार होतो पब्लिक वर्क्स आणि रेलवे डिपार्टमेंटमध्ये एक सेक्रेटरी, ३ अंडर सेक्रेटरी आणि एक असिस्टंट सेक्रेटरी एवढे कामगार असतात. पब्लिक वर्क्स खात्यांकडे सर्व सरकारी इमारती, रस्ते, बागबगीचे वगैरे संबंधी व्यवस्था ठेवण्याचें काम आहे. नवीन रस्ते बांधणें, त्यांच्या खर्चाचा अंदाज काढणें, इमारतींची दागदुजी करणें, सरकारास सार्वजनिक कृत्यांकरितां जागा घेणें असल्यास तिच्या किंमतीची इयत्ता ठरविणें, रस्त्यांची दुरुस्ती करणें वगैरे लहान मोठीं कामें ह्या खात्याकडेस आहेत. इतकी सर्व व्यवस्था सुयंत्र चालविण्याकरितां ह्या कामावर जो मुख्य असतो त्यास **'एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर प्रेसिडेन्सि'** असें ह्मणतात. ह्याच्या हाताखाली दुसरे बहुत इंजिनिअर असतात; ते ही सर्व व्यवस्था ह्याच्या हुकमाप्रमाणे करितात. रेलवेखात्यांत **मुंबई**इलाख्यांत

असलेल्या रेलवेची ह्मणजे ज्यांस **'ग्यारंटीड रेलवे'** असें ह्मणतात त्यांची व्यवस्था पाहण्याचें काम असतें. रेलवेचा वेळ वगैरे बदलणें झाल्यास ह्या खात्याची परवानगी घ्यावी लागते. इरिगेशन डिपार्टमेंटमध्यें कालवे वगैरे सार्वजनिक हिताच्या कामासंबंधीं विचार होतो. ह्याप्रमाणें निरिनिराळ्या खात्यांतून निरनिराळ्या प्रकारानें सरकारची राज्यव्यवस्था सुयंत्र चालावी ह्मणून प्रत्येक खात्याच्या मुख्यास त्याच्या कामासंबंधीं सरकार जबाबदार धरितें.

१९. ह्या खात्यांशिवाय दुसरींही बहुत सरकारी ऑफिसें आहेत. त्यापैकी कांहींची माहिती थोडक्यांत खालीं दिली आहे; कारण, तीं खातींही सरकारच्या अंगभूत असून सरकारचें काम सुरळीत चालविण्यास कारणीभूत आहेत.

**अकौटंट जनरल.**—ह्या ऑफिसांत **मुंबई** इलाख्याचे उत्पन्नाचा व खर्चाचा हिशेब होतो. हें खातें **हिंदुस्थान** सरकारचे हाताखालीं आहे. ह्याजवर **मुंबई**तील गव्हर्नराचा खुद्द हुकूम चालत नाहीं. जमाखर्चाचा खर्डा पसार करणें **अकौटंट जनरल**चे स्वाधीन असतें.

**ओरिएन्टल ट्रान्सलेटर टु गव्हर्मेंट.**—सरकारास जीं देशी भाषांत कागदपत्रे येतात त्यांचें इंग्रजींत भाषांतर ह्या ऑफिसांत होतें. सरकारी कायद्यांचेंही भाषांतर देशीभाषांतून ह्याच ऑफिसांत होतें. हा ऑफिसर राजे रजवाडे ह्यांस भेटण्याकरितां गव्हर्नर साहेब गेले किंवा ते गव्हर्नरास भेटण्यास आले तर, त्यांजबरोबर असतों. गव्हर्नर साहेबांचे बरोबर महाबळेश्वरीं व पुण्यास देखील हा जातो. **मुंबईत** गव्हर्नर दरबार किंवा **'लेव्ही'** भरवितो त्या वेळीं बडे बडे लोकांची मुलाकत करून देण्याचें कामही ह्या ऑफिसराकडे असतें.

**कलेक्टर.**—**मुंबई** शहराकरितां एक निराळाच कलेक्टर असतो. त्याचें काम **मुंबई**तील जमिनीचे कर गोळा करण्याचें असतें. शिवाय ह्यास अपकारी खात्याचेंही काम पहावें लागतें. ह्याच्याच हाताखालीं कस्टम, स्टांप व स्टेशनरी ऑफिस हीं खातीं आहेत. स्टांप ऑफिसांत इलाख्यांतील प्रत्येक डिस्ट्रिक्ट मध्यें स्टांप पाठविण्याचें काम असतें. हे स्टांप विलायतेहून येतात. स्टांपाचे उत्पन्नाचा व खर्चाचा हिशेबही येथेंच होतो. स्टेशनरी ऑफिसांतून प्रत्येक सरकारी खात्यास कागद, पेन, लेखण्या, दौती वगैरे लागणारें सर्व लेखनसाहित्य पुरविलें जातें.

**कस्टम**.—कस्टम ऑफिसांत सरकारी व सावकारी माल जातो व येतो त्याच्यावरती जकात गोळा करण्याचें काम असतें. येथून माल पसार झाल्याशिवाय तो व्यापारीलोकांस बंदरांतून नेतां येत नाहीं. येथील मुख्यास 'कलेक्टर ऑफ् कस्टम्स्' ह्मणतात. हल्लीं **मुंबई**कलेक्टर आणि **कस्टम**कलेक्टर हीं दोन्हीं खातीं सरकारनें एकत्र केलीं आहेत.

**सानिटरी कमिशनर**.—ह्यांच्याकडे शहर सुधारण्याचें काम असतें. शहरांत हवा बिघडली अगर दुसऱ्या कोणत्याही तऱ्हेनें शहरांत हवा पाण्याच्या संबंधानें रोगराई उत्पन्न झाली; तर, त्यांचीं कारणें शोधून काढून ह्यांस बंदोबस्त करावा लागतो.

**रेजिस्ट्रेशन डिपार्टमेंट**.—ह्या ऑफिसांत सर्व दस्तऐवज नोंदले जातात. व त्याबद्दल दस्तऐवज नोंदविणारांस नियत फी द्यावी लागते. येथें नोंदलेले दस्तऐवज कायद्याच्या कोर्टात खरे ठरतात. कोणत्या दस्तऐवजास किती किंमतीचा स्टांप असावा वगैरे माहिती रजिस्ट्रेशन आणि स्टांप आक्ट ह्यांत दिली आहे.

**रिपोर्टर ऑन धि नेटिव प्रेस**.— ह्या कामगार **मुंबई** इलाख्यांतील एतद्देशीय लोकांनी काढलेलीं वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें वाचन त्यांतून सरकारसंबंधी जेवढे लेख येतात, त्यांतील वेंचे काढून ते दर आठवड्यास सरकारास सादर करितो. **मुंबई** इलाख्यांत छापलेलीं पुस्तकेंही ह्याच ऑफिसांत नोंदलीं जातात, व त्याबद्दल नियमित फी रुपये २ द्यावी लागते. ह्या कामावरून ह्यास "रेजिस्ट्रार ऑफ् पब्लिकेशन" असें ह्मणतात. हें ऑफिस पूर्वी डायरेक्टर ऑफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन ह्याच्या ताब्यांत होतें; परंतु हल्लीं जनरल डिपार्टमेंटच्या ताब्यांत गेलें असून तें नव्या सेक्रेटरी ऑफिसांत आहे.

२०. वर दिलेल्या ऑफिसांशिवाय प्रेसिडेन्सी पे मास्टरचें ऑफिस, क्वार्टरमास्तरचें ऑफिस, सर्जनजनरलचें ऑफिस, कमिसारीएट ऑफिस, आडज्युटंट जनरल ऑफ धि आर्मीचें ऑफिस, आडमिनीस्ट्रेटर जनरलचें ऑफिस, एजंटस् फॉर ट्रान्स्पोर्टस्, मिंट पेपरकरन्सी, कंट्रोलर ऑफ् मिलिटरी अकौन्टन्सचें ऑफिस, मेडिकल स्टोअरकिपरचें ऑफिस पेनशन पे ऑफिस वगैरे दुसरीं लहानमोठीं ऑफिसें **मुंबईं**त बरींच आहेत.

२१. **सैन्य.**—इ. स. १६८६ सालीं **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** ह्यांनी लष्कराची एक तुकडी येथें पाठविली होती, तींत किती लोक होते हें बरोबर समजत नाहीं. पुढे तें सैन्य वाढत वाढत इ. सं. १७७७ मध्यें ६,००० पर्यंत वाढलें. ह्याच वर्षी **कंपनी** सरकारानें असा कायदा केला कीं, सर्व शहरांतील शेट-सावकार लोकांनी कवाईत शिकून प्रसंग पडल्यास लढाईंत मदत करण्यास तयार असावें. इ. स. १७९४ त **मुंबई** खात्यांतील लष्कर १५,८०१ इतकें वाढलें. पुढें इ. स. १८०७ त २८,४५० इतकें आणि इ. स. १८४७ त ७७,०५५ इतकें झालें. याप्रमाणें इ. स. १६८६ पासून तों इ. स. १८४७ पर्यंत इंग्रजांचें सैन्य कसें वाढत गेलें हें वरील आंकड्यांवरून वाचकांचे लक्षांत सहज येईल; व त्या वेळेस त्यांस लढाईचे प्रसंगही वारंवार येत; त्यामुळें देशाच्या संरक्षणाकरितां वेळोवेळीं सैन्य वाढविणें सरकारास भाग पडलें, हेंही उघड आहे. पण इ. स. १८६१ त ७५,००० इतकें सैन्य कमी झालें. हल्लीं सर्वत्र शांतता असल्याकारणानें सैन्याची फारशी जरूर लागत नाहीं, तरी आज मितीला **मुंबई** इलाख्यांत ३०,५०० लोकांचें सैन्य असून त्यांत २१,००० एतद्देशीय लोकांचें आहे. **मुंबई** येथील सैन्य बहुतेक सर्व पुण्यात असतें. तेथें २,१०० इंग्रज लोकांचें पायदळ आहे. सर्व **मुंबई** इलाख्यामध्यें **रायल हॉर्स आर्टिलरी**च्या दोन **'ब्याटरी,'** दहा **'फिल्ड ब्याटरी'** व सहा **'ग्यारिझन ब्याटरी'** मिळून १४ ब्याटरी आहेत. शिवाय **मुंबई 'व्हालंटिअर कोर'**चे ६०० आणि जी. आय्. पी. रेलवे व्हालंटिअर कोरचे ८०० लोक आहेत. इंग्रजांस इ. स. १७९८ त **फ्रेंचांची** भीती असल्याकारणानें **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** ह्यांनी गव्हर्नर **डंकन** साहेबास व्हालंटिअर कोरची एक तुकडी तयार करावी ह्मणून हुकूम पाठविला होता. त्या हुकमान्वये त्यानें **मुंबईं**त एक सभा भरवून तींत तीन लक्ष रुपये जमवून व्हालंटिअर कोरचें काम चालविलें; परंतु, तें ह्मणण्यासारखें सिद्धीस गेलें नाहीं. पण पुढें इ. स. १८६१ सालीं हें 'कोर' पुनः उपस्थित झालें तें हा काळ पर्यंत अस्तित्वांत आहे. इ. स. १८८७ साल अखेर **मुंबईचें** सैन्य ३७,४०८ इतकें होतें त्यास २४५$^1/_2$ लक्ष रुपये खर्च लागला.

२२. सर्व **हिंदुस्थान** देशातील संस्थानिकांचे सैन्य ३,८१,००० लोकांचें आहे. सरकारास **हिंदुस्थानां**तील सर्व सैन्याकरितां १८ कोट रुपये खर्च करावे लागतात. इ.स. १८५७ सालचे बंडापूर्वी काळे लोकांचे सैन्य पुष्कळ आणि गोरे लोकांचें कमी होतें; पण, तदनंतर तें मान उलट फिरून आज जरी सैन्य कमी झालें आहे, तरी, खर्च फार वाढला आहे. ह्याचें कारण गोरे लोकांचे मोठमोठाले पगार.

२३. **आरमार**.—इ. स. १६३६ च्या जून महिन्यांत **सुरते**च्या वखारीचा प्रेसिडेंट मि. **मेथोल्ड** ह्यानें **पोर्टगिजां**च्या व्हाईसरायाबरोबर व्यापारसंबंधी एक करारनामा केला होता, त्यांत त्यानें इंग्रजांस **वसई**च्या बंदरांत दोन आणि **दवण**च्या बंदरांत दोन, अशी चार जहाजें स्थानिक व्यापाराचे संरक्षणाकरितां असूं द्यावीं अशीं कलमें घातलीं होतीं. **'इंडियन नेव्ही'** सुरू झाली ती ह्या वेळेपासून. **ईस्टइंदिया कंपनी**च्या स्वाधीन हें बेट झाल्यावर त्याच्या संरक्षणाकरितां बंदरांत जहाजें असावीं असें कंपनीस वाटल्यावरून, तिने १६७० त येथें एक गोदी बांधिली. ह्या वेळीं **मुंबई**चे गव्हर्नर **जेरल्ड आंजिअर** हे होते. हल्लीं आरमाराचें मुख्य ठिकाण मुंबई बंदर आहे. एक **'फ्ल्यागशिप'** खेरीज करून बाकीचे आरमार निरनिराळ्या बंदरीं असतें. जुनी इंडियन नेव्ही इ.स. १८६३ सालीं **सर चार्ल्स वुडहौस** ह्यांनी काढून टाकिली; परंतु **हिंदुस्थान**सरकारनें तीच **'इंडियन मरीन'** ह्या नावांनें पुनः चालू केली. ह्या **इंडिअन मरीन**चे सुपरिटेंडेंट एक **कलकत्त्या**स व एक **मुंबई**स असे दोन असतात. ह्या कामांत लावलेले आरमार बहुतेक **इराण**चे आखातांत व **हिंदुस्थान**च्या इतर बंदरांत असतें.

२४. **उत्पन्न**.—सरकारच्या आयव्ययाची नीट व्यवस्था रहावी ह्मणून सेक्रेटरी ऑफ् स्टेटकडून **'फायन्यान्स मिनिस्टर'** म्हणून एक कारभारी नेमलेला असतो. हा मिनिस्टर गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलचा मेंबर असतो. ह्यांचें काम उत्पन्नाच्या संबंधानें हिशेब ठेवण्याचें असतें. ज्या वर्षी कर वगैरे वाढविलेला नसतो, किंवा खर्ड्यांत कांही विशेष फेरफार करावयाचा नसतो, त्या वर्षी जमाखर्चाचा खर्डा लेजिस्लेटिव्ह कौन्सिलपुढें न जातां, गव्हर्नर जनरल स्वतःच पास करितो, व ह्यामुळे त्यासंबंधी वादविवाद करण्याची जरुरी राहत नाहीं. याप्रमाणें लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या पसंतीने कोणताही हिशेबी खर्डा पास होतो. असें आहे

तरी, वस्तुतः इतर सर्व गोष्टींप्रमाणे गव्हर्नर जनरल स्वतःच त्यांत कमज्यास्त फेरफार करतो. बाकी सर्व सरकारी कामगारांकडे गव्हर्नरानें पास केलेल्या खर्ड्यांस आपापली मंजुरी देण्याचेंच काय तें काम राहतें.

२५. इ. स. १८७१ पासून **हिंदुस्थान** सरकारानें स्थानिक सरकारांवर कित्येक खात्यांच्या खर्चांची जबाबदारी सोंपवून त्यांच्याकडे मुख्यत्वें पब्लिक वर्क्स, पोलीस, विद्याखातें, तुरुंग आणि छापखाने हीं खातीं देऊन, सरकारी उत्पन्नांतून त्यांचा खर्च चालविण्याकरितां कायम रकम तोडून दिली आहे; परंतु, ह्या व्यवस्थेपासून चांगलासा फायदा झालेला दिसून येत नाहीं; कारण, त्या त्या खात्यांकडे तोडून दिलेल्या रकमांत त्यांचा खर्च भागत नाहीं. **मुंबई** सरकारानें तर आपला खर्च इतक्या रकमेंत भागत नाही; किंवा तोडून दिलेल्या रकमेंत काहीं कमीही करतां येत नाहीं, असेंही ह्मणून दाखविलें होतें. हा खर्च भागावा ह्मणून सरकार लोकलफंड, लैसन्स ट्याक्स, इन्कम ट्याक्स, सारखे नवीन नवीन कर बसवीत आहे; पण ह्यापासून सरकारास विशेष फायदा न होतां उलट लोकांवर कराचा बोजा मात्र अधिकाधिक पडत चालला आहे, हें पुढील माहितीवरून वाचकांच्या लक्षांत येईल.

२६. इ. स. १८६० मध्यें सरकारानें इन्कम् ट्याक्स बसविला होता, तो असा कीं, ज्याचें उत्पन्न २०० पासून ५०० चे आंत असेल त्यानें दरशेंकडा २ रुपये कर द्यावा आणि ५०० चे वर असेल त्यानें दरशेंकडा ४ रुपये द्यावे; परंतु, हा ट्याक्स लवकरच बंद झाला. पुढल्या ह्मणजे इ. स. १८६१ सालीं लैसन्स ट्याक्स सुरू झाला. हा कर ज्यांच्यावर इन्कम् ट्याक्स लागू नसे त्यांजलाच लागू होता; परंतु; हाही कर पुढल्या वर्षी बंद करण्यांत आला. परंतु, सरकारास खर्च फार होतो व वारंवार देशांत दुष्काळ पडतात, त्यांपासून रयतेचें रक्षण व्हावें म्हणून इ. स. १८७६ सालीं पुनः लैसन्स ट्याक्स सुरू केला. त्यापासूनही सरकारची तुंबडी भरत नाहीं, हें पाहून इ. स. १८८७ सालच्या एप्रिल महिन्यापासून इन्कम् ट्याक्स पुनः अमलांत आला. ह्या ट्याक्सबद्दल ५०० रुपयांचे आंत ज्याचें सालिना उत्पन्न असेल त्यास दर रुपयास ४ पै व ५०० रुपयांच्यावर उत्पन्नास दर रुपयास ५ पै प्रमाणें कर घेण्यांत येतो. हा कर आतां किती दिवस चालून सरकारचा खिसा भरणार नकळे !

२७. इ. स. १८६० मध्यें अक्टोबर महिन्याचे पहिले तारखेपासून स्टांप आक्ट सुरू झाला व इ. स. १८७९ साली सुधारला. कस्टम्स् टारिफ आक्ट-१८७५ त; इंडिअन पोर्ट्स आक्ट-१८७५ त; साल्ट आक्ट-१८७७ त; सी कस्टम्स् आक्ट-१८७८ त; रेजिस्ट्रेशन आक्ट-१८६५ त; इंडिअन आर्म्स आक्ट-१८७८ त; ओपिअम आक्ट-१८७८ त; बांबे साल्ट आक्ट-१८७८ त; फॉरेस्ट आक्ट-१८७८ त; अपकारी आक्ट-१८७८ त; बांबे पोर्टस् आक्ट-१८७९ त; इत्यादि, इत्यादि अनेक कायदे वेळोवेळी सरकारानें उत्पन्नाच्या बाबी वाढविण्याकरतां केले आहेत; व करीतही आहे; परंतु ज्या मानानें उत्पन्न वाढतें, त्याचमानानें खर्चही वाढत जातो, हें तत्व ध्यानांत आलें म्हणजे सहज समजेल कीं, ह्यापासून सरकारास तादृश फायदा न होतां उलट रयतेवर करांचा अधिकाधिक बोजा मात्र पडत चालला आहे; हें आम्हीं वर सांगितलेंच आहे.

२८. **हिंदुस्थाना**पासून सरकारास ७२ कोटी रुपयांचे उत्पन्न असून खर्चही प्रायः तेवढाच होतो. इ. स. १८८४ च्या मार्च महिन्याच्या अखेरीस **हिंदुस्थाना**वर एकंदर १,६१,३०,०१,२१० रुपयांचें कर्ज होतें; त्याबद्दल व्याज ४,५६,८१,३२० रुपये द्यावें लागतें ! आतांही **हिंदुस्थान**- सरकारानें तीन कोट रुपयांचे लोन काढलें आहे ! ह्यावरुन वरच्या ह्मणण्याची सत्यता वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

२९. **उत्पन्नाच्या बाबी**.—सरकारच्या उत्पन्नाच्या मुख्य मुख्य बाबी खालीं दिल्याप्रमाणें आहेत :—

| | | | |
|---|---|---|---|
| **जमीन** | बाब-शेंकडा | | १७ ४४३ |
| **औषधें** | " | " | २. ८८ |
| **अफू** | " | " | . २७ |
| **कस्टम** | " | " | ३१.६६६ |
| **मीठ** | " | " | १०.७१४ |
| **स्टांप** | " | " | ४.५७१ |

ह्मणजे सरासरी हिंदुस्थान सरकाराचें उत्पन्न आजमितीला खालीं दिल्याप्रमाणे :—

जमीन बाब २२१/२ कोटी; अफू १० कोटी; मीठ ६ कोटी; छापी कागद ३३/४ कोटी; आणि अपकारी २१/२ कोटी; इत्यादि उत्पन्नाच्या मुख्य मुख्य बाबी आहेत. दुसऱ्याही पन्नास साठ उत्पन्नाच्या बाबी आहेत; त्यांपासून बाकीचें उत्पन्न होतें. इ. स. १८८६-८७ सालीं मीठ शिवाय करून कस्टमचें उत्पन्न सरकारास १,२०,५०,००० रुपये झालें!

३०. इ. स. १८८६-८७ सालीं **मुंबई** इलाख्यांत इंपीरिअल (राष्ट्रीय) प्राव्हिन्शिअल (प्रांतिक) आणि लोकल (स्थानिक) ह्या तिन्ही प्रकारचें मिळून एकंदर उत्पन्न १,२४४ लक्ष रुपये झालें व त्याबद्दल सरकारास खर्च ८२४ लक्ष रुपये झाला. देशी दारूच्या मक्त्यापासून ३ लक्ष रुपये; विलायती दारू पासून ७१ लक्ष; प्राप्तीवरील करापासून २५,४८,२८२ रुपये झाले; पैकीं, सरकारी नोकरांच्या पगारापासून २,८१,१६८; कंपन्यांच्या नफ्यावर २,६६,४४९ रु.; सरकारी नोटा १५,८५४ व इतर उत्पन्नापासून २०,०३,५९८ रुपये. अशी आमच्या सरकारची आयव्ययसंबंधानें व्यवस्था आहे!

३१. **कोर्ट**.—इ. स. १६७०-७१ सालीं **सुरते**च्या वखारीचे प्रेसिडेंट (मुख्य) **सर जेरल्ड आंजिअर** हे **मुंबई**स आले होते, त्यावेळीं त्यांनीं **मुंबईं**त दोन कोर्टांची स्थापना केली. पहिल्या कोर्टात डेप्यूटी गव्हर्नर व एक्झिक्युटिव कौन्सिलचे मेंबर ह्यांस खालच्या कोर्टातील मुलकी व फौजदारी खटले तपासण्याचा अधिकार असे. व ह्यांच्या विरुद्ध **'अपील'** करणें झाल्यास त्यांच्याच मंजुरीनें ते विलायत सरकाराकडे करावें लागे. दुसऱ्या कोर्टांत कंपनी सरकारचा एक 'सिव्हिल' कामगार व त्याच्या मदतीकरितां कांहीं एतद्देशीय कामगार मंडळी असे. ह्या कोर्टाकडे १०० सराफीपर्यंत मुकद्दमे तपासण्याचा अधिकार होता. ही कोर्टें आठवड्यांतून एकदां बसत.

३२. इ. स. १६७६ सालीं **मुंबई**च्या लोकांनी **मुंबई**करितां एक 'जज्ज' (न्यायाधीश) असावा अशी सरकारास विनंती केल्यावरून पुढील वर्षी त्यांनीं मि. **हेनरी गेरी** ह्यांस 'चीफ जस्टीस'च्या हुद्द्यावर नेमिलें, व त्यास 'एक्झिक्युटिव कौन्सिलांत' बसण्याचा अधिकार

दिला. पुढें इ. स. १६८४ त **मुंबईत 'कोर्ट ऑफ् आड्मिराल्टी'** ची स्थापना झाली. ह्या कोर्टात **सेंट जॉन** यास सालिना २०० पौंड[१] (२,००० रुपये) पगार देऊन जज्ज नेमिलें. पगाराशिवाय ह्यास खाणेंपिणें कंपनी सरकाराकडून मिळे व त्याच्या मदतीस कंपनीचे दोन कामगार असत; परंतु पुढें कांही कारणामुळें **सर जॉन चाईल्ड** ह्यानें **सर जॉन व्हो** ह्याची ह्या कामावर नेमणूक करून **सेंट जॉन** ह्यानें फक्त दर्यावर्दी (मरीन) खटल्यांचा निकाल करावा ह्मणून हुकूम केला; परंतु; त्यास हें न आवडून त्यानें त्या वेळचे सेक्रेटरी ऑफ् स्टेट **सर लिओलाईन जेनकिन्स्** ह्यांस असे कळविलें की, हल्ली जो मनुष्य ह्या कामावर नेमला आहे, तो त्या कामास नालायक असल्यामुळें व येथील रहिवाशांस इंग्रजी कामाची माहिती नसल्याकारणानें तो त्यांस आवडत नाहीं. परंतु, **सेंट जॉन** ह्याच्या ह्मणण्याकडे लक्ष न देतां कंपनीसरकारानें त्यास कामावरून दूर केलें व तेव्हांपासून **कोर्ट ऑफ् आडमिऱ्याल्टी**चाही शेवट झाला.

**३३.** पुढें इ. स. १७२६ त मुंबईमध्यें **'मेयर्स कोर्ट'** आणि **'कोर्टस ऑफ् आयर आणि टर्मिनर'** ह्यांची ३ इलाख्यांत स्थापना झाली. **मेयर्स कोर्टात** सर्व वयोवृद्ध (एल्डरमेन) व जाणते असे गृहस्थ असून एक **'रेकार्डर'** आणि एक **'टौन क्लार्क'** असे कारभारी असून ते सर्व खटल्यांची नोंद ठेऊन वर्षातून एकदां **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्सकडे** आपल्या कामाचा 'रिपोर्ट' करीत. न्यायासनावर बसतांना एल्डरमेन तांबडे काळे रंगाचे झगे घालीत आणि त्यांच्या पुढें एक तलवार व एक राजदंड (मेस) धरीत. **'जज्ज आड्व्होकेट'** ह्यांच्या पुढें चांदीचा राजदंड धरून एक शिपाई चालावा अशी वहिवाट होती.

---

[१] सिलेकशन्स फ्रॉम स्टेट पेपर्स, होम सीरीज, व्हाल्युम १. ह्या पुस्तकावरून असें समजतें की, इ. स. १७२० च्या पूर्वी गव्हर्नराचा पगार सालिना ३०० पौंड; डेप्यूटी गव्हर्नर ज्यास अकौटंटचाही हुद्दा असून जो कौन्सिलचा पहिला मेंबर असे—त्यास १०० पौंड; चीफ जस्टिस हा कौसिलचा दुसरा मेंबर असून त्यास १०० पौंड; तिसऱ्यास ७० पौंड. चौथा व पांचवा मेंबर ह्यांस प्रत्येकी ५० पौंड; सहावा आणि सातवा ह्यास प्रत्येकी ४० पौंड; आणि फिझिशिअन व दोन सर्जन ह्यांस प्रत्येकी ३६ पौंड असा पगार मिळत असे !

३४. इ. स. १८०६ पासून १८३०[१] पर्यंत जें न्यायखातें **मुंबईंत** होतें, त्यास **' रेकॉर्डर्स कोर्ट '** हें नांव होतें. ह्यांत एक न्यायाधीश व दुसरे नऊ असामी **' पंच '** मिळून न्याय करीत. सर **विल्यम सायर नाईट हे मुंबईचे** प्रथम **' रेकॉर्डर '** होत. ह्यांचा पगार ६५० रुपये असून अधिकार ह्मटला तर हल्लीच्या मुनसफा एवढाच असे. हा रेकॉर्डर दिवाणी आणि फौजदारी खटल्यांचा निकाल करी. ह्याच्य निकालाविरुद्ध अपील गव्हर्नर व त्याचे कौन्सिलर ह्यांजकडे होत असे. **' इन्सालव्हंट '** (नादारी) कोर्टाची स्थापना १६ मार्च १८२९ त झाली व सन १८४५ त **रिमेब्रन्सर ऑफ् लीगल अफेअर्सच्या** जागेची स्थापना होऊन ह्या जागेवरच पहिल्यानेच एका ब्यारिस्टरची नेमणूक झाली. पुढें इ. स. १८३०[२] पासून **' सुप्रीम '** कोर्टाची स्थापना झाली. ह्या कोर्टात ५०० रुपयांपासून वर रकमांच्या दिवाणी व फौजदारी खटल्यांचे मुकद्दमे तपासले जात. दर तिमाही सेशनांत फौजदारी मुकद्दम्यांचे फैसले होत. ह्यांत दोन न्यायाधीश असत. **' सदर अदालतींत '** कौन्सिलर सुद्धां ३ न्यायाधीश असत. ह्या अदालतींत **मुंबई** इलाख्यांतील व बाहेर जिल्ह्यांतील न्याय मनसुबे होत. पुढें इ. स. १८६२ त सरकारने **सदर अदालत** व **सुप्रीम** कोर्ट ह्या दोन्ही कचेऱ्या एकत्र करून त्यांस **' हायकोर्ट '** हें नांव दिलें. ह्या कोर्टाच्या एक ' ओरिजनल ' व एक ' अपेलेट ' साईड अशा दोन शाखा आहेत.

३५. **हायकोर्टातील** न्यायाधीशांनी सात वर्षेपर्यंत काम करावे असे आहे. ह्या कोर्टांत हल्ली १ चीफ जस्टीस व दुसरे ७ जज्ज आहेत. ह्या जज्जांस ५०० रुपयांवर फसला चालविण्याचा अधिकार असतो. कोर्टाचे कामास सुरूवात होण्यापूर्वी [३]**' रजिस्ट्रार ऑफ धि कोर्ट '** ह्मणून एक कारभारी असतो, तो न्यायाधीशापुढें खटले मांडतो. ह्याप्रमाणे जज्जापुढे खटला आल्यावर ' क्रायर ' (पुकारणारा) म्हणून जो असतो तो वादी प्रतिवादींस तीनदां पुकारतो. प्रत्येक बाजूचे लोक आपापले वकील,

---

[१] १७९८-१८२४ असा सन 'मंथ्ली मिसलेनी ऑफ् वेस्टर्न इंडिया' ह्यांत सांपडतो !

[२] १८२४ चा शक ह्याच पुस्तकांत सांपडतो. [३] सर्व सिव्हिल बाबतींत ह्या ऑफिसरास 'प्राथोनाटरी' व सर्व इक्लेझिआस्टिकल बाबतींत 'रजिस्ट्रार' ह्मणतात. असे दोन्ही हुद्दे एका इसमालाच असतात.

ब्यारिस्टर घेऊन हजर होतात. नंतर पुढे खटला तपासण्यास सुरवात होते. जें कुळ गरीब असून खटला चालविण्यास असमर्थ (नादार) असतें त्यानें कोर्टास अर्ज केला असतां, व त्याचा अर्ज वास्तविक आहे असें कोर्टाच्या नजरेस आलें असतां, त्यास सरकाराकडून वकील देण्यांत येतो. अशा खटल्यास **' पापर सूट '** ह्मणतात. हे खटले पहिल्याने बोर्ड (लांकडी घोडा किंवा फळा) वर लावितात. कोर्टांत जो दुभाषी असतो त्याचें काम जज्ज अगर ब्यारिस्टर जें काय ह्मणतील तें साक्षीदार किंवा पक्षकार इंग्रजी समजत नसतील तर त्यांस त्यांच्या भाषांतून समजविण्याचें असतें. आपल्या बाजूचा वकील जे साक्षीदारास प्रश्न विचारतो त्यास, **' एक्झामिनेशन-इन्-चीफ '** (मुख्य जबानी) ह्मणतात व प्रतिपक्षाच्या वकिलाकडून जे सवाल विचारण्यांत येतात त्यांस **' क्रॉस एक्झामिनेशन '** (उलट तपासणी) ह्मणतात. याप्रमाणें खटला चालल्यावर त्या खटल्यासंबंधी जे जे शेरे जज्जास योग्य वाटतात त्यांची त्यांची तो आपल्या नोंदवहीत नोंद करून त्यांच्या आधारें फैसल्ला (जज्मेंट) देतो. हायकोर्टांतील जज्ज, वकील, ब्यारिस्टर, हे कोर्टांत असतात त्यावेळी झगा घालतात. कोर्टांत न्यायाधीश आल्यावर त्यास सर्वांनी उठून मान देण्याची वहिवाट आहे. कोर्टांत एकदा खटला चालविणें म्हणजे धुळीस मिळण्यासारखें होय. कोर्टाची फी, स्टांप व वकील ब्यारिस्टरांची फी देतां देतां जीव बेजार होऊन जातो. हें ज्यांना ज्यांना म्हणून कोर्ट लढण्याची पाळी आली असेल, त्यांना आपल्या अनुभवावरून समजलेंच असेल ; तेव्हां ह्या संबंधानें येथें अधिक विस्तार करण्याची आवश्यकता नाहीं. वकिलास कोर्टांत काम चालविण्याबद्दल सनद मिळते. सॉलिसिटर जे असतात ते सर्व ' केस ' (खटला) तयार करून ब्यारिस्टर लोकांस देतात व त्यावरून ते कोर्टांत खटला चालवितात. महत्त्वाच्या खटल्यांचा तपास करण्याकरितां वर्षांतून पांचवेळ सेशन भरतें. सेशन भरतें त्या दिवशी कोर्टावर निशाण लावितात. फौजदारी किंवा खुनाचे खटले चालतात त्यावेळी पंच नेमण्यांत येतात. त्यास ' जूरी ' ह्मणतात. ह्या जूरीत सर्व जातीचें १२ असामी असतात. मुख्य जूररास ' फोरमन '

ह्मणतात व हाच सर्व जूरीचें मत जज्जास कळवितो. न्याय देण्यापूर्वी खटल्यासंबंधी स्वतःचे सर्व विचार जज्जाने जूरीस कळविल्यावर जूरी सर्व साधकबाधक गोष्टींचा विचार करून कैदी अपराधी (गिल्टी) आहे किंवा, निरपराधी (नॉन गिल्टी) आहे ह्याविषयीं न्यायाधिशास आपलें मत कळविते. न्यायाधीश जूरीच्या म्हणण्याचा विचार करून न्याय देतो. जूरींत एक कॉमन (साधारण) व दुसरा स्पेशल (निवडक) असे दोन प्रकार असतात. जुरींत असणारे लोक सरकारी किंवा सावकारी ऑफिसांतील गवटमोठ्या पगाराचे कामगार असतात. हायकोर्टांतील जज्जांस फांशी व जन्मठेपेची शिक्षा देण्याचा अधिकार असतो. फांशीची शिक्षा अमलांत आणण्यापूर्वी गव्हर्नराची मंजूरी घ्यावी लागते.

३६. **मुंबईतील प्राचीन शिक्षा पद्धति.**— इ. स. १७२६-२७ मध्यें अपराध्यांस शिक्षा देण्याचा **मुंबईंत** जो प्रकार होता त्याविषयीं ' सिलेक्शन्स फ्रॉमस्टेट पेपर्स' ह्या पुस्तकांत जी माहिती मिळते ती खालीं दिली आहे.—

इ. स. १७२६-२७ च्या १ ल्या फेब्रुवारी रोजीं **इगनाशिओ डी लेव्हरे** ह्यानें चोरी व कोर्टांतील जज्जास मारण्याचा प्रयत्न केल्यावरून त्याचा खटला पुनः ध्यानीं आणून गव्हर्नरानें त्यास तीन दिवसपर्यंत रोज ३९ फटके मारून, त्याच्या गळ्यासभोंवती दोरी गुंडाळून व त्यास वधस्तंभाशीं बांधून, त्याच्या डोकीवर त्याच्या गुन्ह्याबद्दलचा कागद लावून व वाटेल त्या वेळेस त्यास सक्त मजूरीला लावून त्याच्या गुन्ह्याची सर्वांस माहिती व्हावी एतदर्थ तापलेल्या लोखंडाचा त्याच्या गालावर डाग द्यावा म्हणून हुकूम केला होता. **जोना** नामक एका ख्रिस्ती बाईला १५ फटके मारण्यांत आले होते. हे फटके मारण्याचें कारण असें होतें कीं, ह्या बाईला तिच्या नवऱ्याबरोबर हद्दपार केलें होतें. वस्तुतः ह्या बाईचा मुळीच अपराध नव्हता ; फक्त तिनें आपल्या नवऱ्याच्या गुन्ह्याकडे कानाडोळा केला हाच काय तो तिच्यावर आरोप. १५ फटके मारूनही तिला अशी सक्त ताकीद दिली होती कीं, तिनें पुनः मुंबईस येऊ नये आणि जर ती परत आली तर तिचा एक कान कापावा ! एवढेंही करून जर ती आणखी पुनः आली तर, तिचा दुसराही कान कापावा ! ह्या वेळी सर्व बदफैली स्त्रियांस

एकदा हद्दपार करून पुनः त्या मुंबईस आल्या तर, हीच शिक्षा होत असे. अशीच एक दुसरी **गंगा** नावाची स्त्री जिला आपल्या नवऱ्याचा खून झाला त्यात मदत केली ह्या आरोपाबद्दल जुरीनें अपराधी ठरविली होती, तिला जाळून टाकण्याचा हुकूम करण्यांत आला होता.

**३७. काळेंपाणी रेकार्डर्स कोर्ट—** स्थापन होण्यापूर्वी कोणास शासन करावयाचें असल्यास शहरांत दवंडी पिटवून त्यास तरीपार करीत ; म्हणजे त्यास **उरण, आलिबाग** वगैरे ठिकाणीं नेऊन सोडीत व त्यास पुनः शहरांत येण्याचा प्रतिबंध करीत. हेच त्यावेळचें काळे पाणी. परंतु हल्लीं **सिंगापूर आंदमान** वगैरे बेटांत नेऊन टाकिले म्हणजे त्यास काळें पाणी ह्मणतात.

**३८. शेरिफ—** हायकोर्टांत शेरिफाचें खातें आहे. सर्व दिवाणी व फौजदारी कैदी ह्याच्या स्वाधीन असतात. कैद्यांस कोर्टांतून शिक्षा मिळाल्यावर त्यांची व्यवस्था शेरिफ लावतो. ह्याच्या हाताखाली जो एक दुय्यम शेरिफ असतो, त्याची नेमणूक कायम असून त्यास दरमहा ३०० रुपये पगार मिळतो. मुख्य शेरिफाची नेमणूक प्रतिवर्षी जानेवारी महिन्याचे पहिल्या तारखेस सरकारमार्फत होते. शेरिफ होणारा गृहस्थ चांगला विद्वान, लौकिकवान व धनिक असावा लागतो. अलीकडे ही जागा नेटिवांसही मिळूं लागली आहे ही आनंदाची गोष्ट होय. शेरिफास पूर्वी शेंकडा ५ रुपये फी मिळत असे ; परंतु सर **अर्स्किन पेरी** ह्यांनीं इ. स. १८५० त स्मालकाज कोर्टांत जी पूर्वी शंभर रुपये पर्यंत फिर्याद चालत असे, ती ५०० रुपयांपर्यंत वाढविली; तेव्हांपासून शेरिफास दिवाणी खटल्यांत शेंकडा २ १/२ रुपये प्रमाणें फी मिळूं लागली. शेरिफास सेशनाचे वेळीं व कांहीं महत्त्वाचें काम असेल त्या प्रसंगी कोर्टांत हजर व्हावें लागते.

**३९. स्मॉलकाज कोर्ट—** ह्या कोर्टाची उत्पत्ति प्रथम **कोर्ट ऑफ रिक्वेस्ट** ह्या कोर्टापासून निघाली असावी व त्यासही ८० रुपयांपर्यंतच्या फिर्यादीचा न्याय करण्याचा अधिकार होता असें कित्येकांचें ह्मणणे आहे. हल्लीं ह्या कोर्टांत ५०० रुपयांपर्यंत खटल्याचा निकाल होतो. येथें फक्त दिवाणी काम चालतें. ह्या कोर्टांत चार जज्ज असतात, त्यातील मुख्यास फर्स्ट जज्ज ह्मणतात. प्रत्येक जज्जास एक दुभाषी असतो.

ह्या कोर्टांतही मुकद्दमे चालविण्याचा प्रकार हायकोर्टाप्रमाणेंच असतो. पूर्वी स्मालकाज कोर्टांत दर शेंकडा १२ रुपये फी घेत; परंतु ती इ. स. १८६१ सालापासून बंद झाली. ह्या कोर्टांस लहान सहान मुकद्दम्यांचा निकाली होत असल्या कारणानें, मारवाडी, भाटे, वाणी वगैरे सावकार लोकांची बरीच गर्दी नेहमीं दृष्टीस पडते. कर्जदार लोकांस 'समन्स' लावण्याकरिता ' बेलिफ ' असतात ते जज्जाची सही समन्सवर घेऊन कर्जदार लोकांस कोर्टांत हजर होण्यासाठीं तीं लावतात. त्याप्रमाणें ते कोर्टांत हजर राहून पैसा देण्यास समर्थ असल्यास, पैशाची फेड करून टाकतात आणि असमर्थ असल्यास कोर्ट हप्ते मांडून देतें. हप्त्यांचा पैसा वेळेवर न पोहचल्यास सावकार ' टांच ' काढून कर्जदारांची मालमत्ता जप्त करतो व ती कोर्टांत नेऊन तेथे प्रत्येक शनिवार व बुधवार या दिवशी कोर्टांत याप्रमाणें आलेल्या मालाचें कोर्ट जाहिर लेलांव करतें, त्यांत सावकार आपला पैसा ताजा करितो. टाचांतही त्याच्या हातास कांहीं लागलें नाहीं तर, त्याजवर 'केसा ' काढून त्यास सावकारी तुरुंगांत घालतो. मात्र सावकारानें त्यास त्याच्या पोटगीबद्दल जे दररोज ४ आणे द्यावे लागतात ते कोर्टांत नेऊन भरले पाहिजेत. हे पैसे एका आठवड्याचे केसा काढते वेळींच घेतात. याप्रमाणें सावकाराच्या मनांत कर्जदारास जास्त त्रास द्यावयाचा असल्यास, सात दिवसांचा ' भत्ता ' पुरा झाल्यावर तो आणखी पैसे नेऊन भरतो. बरें, कर्जदार नोकरीवाला असला तर, सावकार त्याच्या पगाराचा दिवस पाहून त्याच्या पगारावर टांच लावून अर्धा पगार पटकावितो. सावकार पुष्कळ असले तर ते त्याचा अर्धा पगार आपापसांत हिस्सेरशीनें वांटून घेतात.

४०. **म्याजिस्ट्रेटचें कोर्ट**— इ. स. १७९० त **मुंबईंत** तीन माजिस्ट्रेट असत एक **माजगांवास** एक **माहिमास** आणि एक **किल्ल्यांत**. पुढें इ. स. १८३४ त **माहिमचे** माजिस्ट्रेटाची जागा कमी करण्यांत आली आणि ६ नोव्हेंबर १८४३ पासून तों २० नोव्हेंबर १८४५ पर्यंत **माजगांवचें** माजिस्ट्रेट कोर्ट बंद करून **कोट** व **माजगांव** येथील दोन्ही माजिस्ट्रेट किल्ल्यांत बसू लागले. पुढें इ. स. १८४५ त पुनः **माजगांव** येथील ऑफिस उघडून इ. स. १८४८ त पुनः तिसऱ्या माजिस्ट्रेटाची नेमणूक झाली. हल्ली सगळ्या

शहरांकरितां २ **कोटांत** व १ **गिरगांवांत** असे तीन माजिस्ट्रेट आहेत. त्यांतील मुख्यास ' चीफ प्रेसिडेन्सी म्याजिस्ट्रेट ' ह्मणतात. हे माजिस्ट्रेट शहरांतील सर्व लहानसहान फौजदारी खटल्यांचा निकाल करितात. माजिस्ट्रेटांचे अधिकाराबाहेर असलेले खटले हायकोर्टांत (सेशनांत) पाठविण्यांत येतात. हायकोर्ट व स्मालकाज ह्या कोर्टांप्रमाणें प्रत्येक माजिस्ट्रेटाजवळ एक एक दुभाषी असतो.

**४१. जस्टिस ऑफ् धि पीस**— इ. स. १७०४ साली **सर निकोलस वेट**, त्या वेळचे गव्हर्नर, ह्यांनीं **मि. एलाबी** ह्यास जस्टिस ऑफ् धि पीस नेमिलें होतें व हेच गृहस्थ पहिले जस्टिस ऑफ धि पीस होत. हल्लीं **मुंबईत** नेटिव आणि युरोपियन मिळून एकंदर ४५३ जस्टिस ऑफ् धि पीस आहेत. हा हुद्दा श्रीमान व अब्रूदार अशा गृहस्थास सरकारांतून देण्यांत येतो. शहराची नीट व्यवस्था ठेवणें ; शहराच्या व्यवस्थेसाठीं सरकारांतून जें द्रव्य जातें त्याचा व्यय नीट होतो किंवा नाहीं, हें पाहणें व रयतेच्या सुखदुःखाकडे लक्ष देणें हें ह्यांचें काम. ह्या पदवीप्रमाणें जरी त्यांजकडे थोडाबहुत माजिस्ट्रेटचें काम चालविण्याचा अधिकारी असतो तरी, ह्यांतून कोणी वर सांगितलेल्या कामांपैकीं एकादें तरी काम बजावीत असेल कीं नाही, ह्याची शंकाच आहे.

**४२. पोलीस**.— हें खातें प्रथम **जेरल्ड आंजिअर** ह्यांच्या कारकीर्दीत सुरू झाले. हल्लीं **मुंबई** शहराचा बंदोबस्त करण्यासाठीं जें पोलीस खातें आहे, त्या खात्याच्या मुख्यास ' पोलिस कमिश्नर ' असें म्हणतात. ह्याचा हुकूम फक्त **मुंबई** पोलिसवर चालतो. ह्याच्या हाताखालीं एक डेप्यूटी कमिशनर, ६ सुपरिंटेंडेंट, २५ इन्स्पेक्टर आणि २२ कॉनस्टेबल मिळून एकंदर ५४ युरोपिअन ऑफिसर्स आहेत. शिवाय 'डिटेक्टिव्ह' ब्रांच चा सुपरिंटेंडेंट असतो तो निराळाच. हा सुपरिंटेंडेंट बहुधः नेटिवच असतो. हल्लीचें डिटेक्टिव्ह सुपरिंटेंडेंट **खान बहादुर मीर अबदुल अल्ली** हे आहेत. शहर संरक्षणाकरितां ३३ घोडेस्वार (मौन्टेड पोलीस), जमादार, हवालदार व शिपाई मिळून जवळ जवळ १,६०० पोलीस आहे. शिवाय श्रीमान लोकांकडे पाहरेकरी असतात, त्यांची नेमणूक पोलीस खात्याकडून होते. ह्यास **' रामोशी '** म्हणतात. ह्यांचा पगार ज्या धन्याकडेस ते

चाकरीस असतात त्यांजकडून घेण्यात येतो. शहरांत एकंदर पोलिसचे व्यवस्थेकरितां, ए, बी, सी, डी, ई, एफ् व जी आणि डब्ल्यू (हॉरबर किंवा वॉटर पोलीस) असे आठ भाग केले आहेत. **प्रिन्सेस डाक** हा भाग निराळा, ह्या प्रत्येक **' डिव्हिजनांत '** नोकरी करणाऱ्या शिपायास त्या त्या डिव्हिजनचें दर्शक असें पितळेचें अक्षर व नंबर मिळतात, ते तो आपल्या छातीवर लावतो. वाटर पोलिस खेरीज करून प्रत्येक डिव्हिजनचे **' सेक्शन '** असे पोटविभाग केले आहेत व त्यातही **' बीट '** म्हणून प्रति पोटविभाग आहेत. म्युनिसिपालिटीनें शहराच्या व्यवस्थेकरितां जे **मुंबईचे** भाग केले आहेत त्यास **वार्ड** म्हणतात व ते पोलिसच्या डिव्हिजनांप्रमाणें अनुक्रमे ए. बी. सी. असेच असतात व त्यांच्या सीमाही बहुधा पोलीस सारख्याच आहेत. ह्या पोलिसापैकीं **' रिझर्व '** (राखलेलें) पोलीस असतें त्यांचा जरुरीच्या वेळीं मात्र उपयोग करितात. ह्या सर्व पोलिस खात्याकडेस सरकारास सालिना सुमारें चार पांच लाख रुपये खर्च होतो. पोलिस कमिशनरच्या खात्यांत शहरांतील अनेक तऱ्हेचीं कामें असतात. आर्मस् आणि आम्युनिशन लायसेन्सिंग डिपार्टमेंट (हत्यारें वगैरे बाळगणारे व विकणारे ह्यांस परवाना देणें) म्युझिक लायन्सेस[1] डिपार्टमेंट (रस्त्यावरून वाद्य वाजविण्याबद्दल परवाना देणें) ; अपकारी डिपार्टमेंट पब्लिक ल्यांड कनव्हेयन्स डिपार्टमेंट (भाडोत्री गाड्यांस छापे वगैरे देणें) वेटस्[2] आन्ड मेझर्स स्टांपिंग डिपार्टमेंट (वजनें वगैरेवर छाप देणें) वगैरे

---

१. **मुंबईत** प्रसिद्ध रस्त्यांवरून वाद्यें वाजवीत नेणें झाल्यास पोलीस कमिश्नरची परवानगी घ्यावी लागते. ही परवानगी घेणारास एका दिवसांचे पांच रुपये फी द्यावी लागते. एकादा मोठा मेळा (प्रोसेशन) वगैरे काढावयाचा आहे तर, त्यास कमिशनरकडे तो कोणकोणत्या रस्त्याने जाणार वगैरेची माहिती लेखात दिली म्हणजे **'प्रोसेशन पास'** मिळतो. ह्या पासाबद्दल कांहीं फी पडत नाहीं. देवादिकांची पालखी वगैरे धर्म संबंधाच्या कामीं हा **'पास'** फुकट मिळतो. वाद्यें वाजविण्याचा पास पांच रुपये देऊन घेतला तरी म्हणजे रात्री अकरा वाजल्यानंतर रत्यांवरून वाद्यें वाजवीत जाण्यास मिळतें असें मुळींच होत नाहीं. आणि त्यातूनही सर्वच प्रसिद्ध रस्त्यांवरून वाजवूं देतात असेंही नाहीं. कांहीं कांहीं रस्त्यांवरून वाजविण्याची मुळींच बंदी आहे.

२. दुकानवाले वगैरे लोकांचीं मापें, वजनें वगैरे पोलिस कमिशनरच्या ऑफिसातून वर्षांतून एकदां छापवून घ्यावीं लागतात. ह्या आफिसांत 'स्टांडर्ड वेटस् अँड मेझर्स' असतात, त्यांजबरोबर व्यापाऱ्यांचीं वजनें वगैरे ताडून कम-ज्यास्त असलीं तर तीं स्टँडर्ड बरोबर करून देतात ह्याबद्दल दर नगामागें एक आणा फी घेण्यांत येते. सरकाराकडून एवढा बंदोबस्त आहे तरी, खोटी वजनें, मापें वापरणारे लबाड लोक ह्या **मुंबईत** थोडे आहेत असें नाहीं !

सटरफटर खातीं कमिशनरच्या ताब्यांत आहेत. शिवाय रिफ्रेशमेंट रूम, कावेखाने, हॉटेल, वगैरेस परवाने देण्याची वगैरे अशीं बहुत कामें पोलिसांस पहावीं लागतात. पोलिसांचें मुख्य काम ह्मटलें म्हणजे शहरांत शांतता राखणें, दंगेधोपे न होऊं देणें आणि रयतेचें व तिच्या मालमत्तेचें संरक्षण करणें हें होय. त्यात ह्या **मुंबई**सारख्या शहराची व्यवस्था ठेवणें हें काम फार जोखमाचें आहे. **हिंदुस्थानां**तील इतर सर्व शहरच्या पोलिसांपेक्षां **मुंबई**शहरांतल्या पोलिसांचा खून, चोरी वगैरे मोठ मोठे गुन्हे पकडण्याच्या कामांत हातखंडा आहे. ह्या कामांत **मुंबई डिटेक्टिव** पोलिसची तारिफच करावी लागते.

४३. शहरांत नेहमीं जागोजाग तंटे, माऱ्यामाऱ्या चालूच असतात. गुन्हेगारांस पकडून कॉन्स्टेबल पुढें उभें करून चौकींत टाकण्याचें काम पोलिसचेच लोक करितात. शहरांत बंदोबस्ताकरितां पोलीस कान्स्टेबल फिरत असतात. रात्रीचे प्रहरी प्रत्येक नाक्यावर पोलिसचा पाहरा असतो. सुमारें तिसरा हिसा पोलिस रात्रीं कामावर असतें. पोलिसची खरी चाकरी काय ती मोहरममध्यें दृष्टीस पडते. ताबुतास (डोल्यांस) सुरवात झाल्या दिवसापासून तों तीं दहावे दिवशीं थंड होत तोंपर्यंत पोलिसांस रात्रंदिवस खडा पाहरा करावा लागतो. त्यांत कत्तलच्या रात्रीं तर जिकडे तिकडे पोलिसचे शिपाई, कॉन्स्टेबल, घोडेस्वार हे अगदीं तयार असतात; कारण कोठें दंगा होईल व केव्हां हुकूम येईल ह्याचा नियम नसतो.

४४. पोलिस कमिशनरास **'सुपरिंटेंडेंट ऑफ् कानव्हिक्टस्'** हा हुद्दा असून शिवाय **मुंबई**तील तुरुंग आणि ल्युनायटिक असायलम् (भ्रांतचेतसालय) हें पाहण्याचें काम ह्या ऑफिसराकडेस असतें. कमिशनरच्या हाताखालीं जे सुपरिंटेंडेंट असतात त्यांचा पगार २५० पासून ४५० रुपये पर्यंत असतो व कॉनस्टेबलास १०० रुपये मिळतात. खुद्द कमिशनरापासून तों १० रुपयांच्या शिपायापर्यंत सर्वांस घरभाडें सरकाराकडून मिळतें.

४५. **मुंबई** पोलिसचा सर्व पोशाग काळा असतो, आणि पगडी पिवळी असून कोटास पिंवळी फीत असते. दरमहा दहा रुपये पगार असणाऱ्या शिपायाचे हातावर फीत नसते, पण पुढें ११-१२-१३ रुपयांपर्यंत एक एक फीत वाढत जाते. तेरा रुपये पगार होई तोंपर्यंत शिपाई ही संज्ञा असते. ह्या दरज्यापुढें हवालदार-ह्याचा पगार सोळा, वीस, पंचविस रुपये पर्यंत असतो. शिपायाप्रमाणे ह्याचा पगाराच्यामानानें एक दोन तीन अशा ह्यास फिती मिळतात; पण, भेद इतकाच कीं, ह्याच्या फिती दंडावर असतात व शिपायांच्या मणगटाच्या वर असतात. पुढचा दरजा जमादाराचा-त्यांतही तीन वर्ग आहेत. ३०-५०-७०. ह्यांचें **'बकल'** चांदीचें असतें. पगाराखेरीज दहा रुपयांपासून तों तेरा रुपयांपर्यंतच्या शिपायांस १ रुपया घर भाडें मिळतें व हवालदारापासून जमादारापर्यंत प्रत्येकीं दोन रुपये घर भाडें मिळतें. शिपायांच्या छातीवर त्यांच्या डिव्हीजनचें दर्शक पितळी अक्षर व नंबर हीं असतात. शिपायापासून जमादारापर्यंत प्रत्येकाजवळ एक सोटा व एक शीळ असते. पोशागाच्या सारखेपणाविषयीं, नीटनेटकेपणाविषयीं आणि व्यवस्थेविषयीं **मुंबई** पोलिसची जेवढी वाहवा करावी तेवढी थोडीच आहे.

४६. पोलिससंबंधाचे जे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून असें दिसतें की, **कलकत्त्या**ची लोकसंख्या ६,८४,६५८ असून तेथें ३,०१० पोलीस आहे; **मुंबई**ची लोकसंख्या ७,७३,१९६ एवढी असून पोलीस १,४८६ आहे; **मद्रास**ची लोकसंख्या ४,०५,८४८ असून पोलीस ९८० आहे. ह्मणजे **कलकत्त्या**स २२१ मनुष्यांस १ पोलीस -; **मद्रासें**त ४१४ स १ व **मुंबई**स ५२० मनुष्यांस १ पोलीस लागतें. ह्यावरून पाहतां **मुंबई**चे लोक बरेच शांत असून, शहराकरितां पोलिस फारच कमी आहे, हे उघड दिसतें. इतक्या थोड्या पोलिसानें इतक्या अवाढव्य वस्तीच्या व अशा बकाली शहराचा बंदोबस्त ठेवण्याचें काम-आणि तेंही बिनहत्त्यारी-ह्मणजे फार जोखमांचे व चातुर्याचें आहे हें सांगणें नको !

४७. **तुरुंग**—**मुंबई**त एकंदर ३ तुरुंग आहेत. ह्या तुरुंगात **कोर्टा**कडून ज्या कैद्यांस शिक्षा मिळते त्यांस ठेवण्यांत येतें. **उमरखाडी**च्या तुरुंगास **"हर म्याजेस्टीज हौस ऑफ् करेक्शन"** म्हणतात. हा तुरुंग **जोनाथन डंकन** ह्यांच्या कारकीर्दीत इ. स. १८०२ सालीं बांधला असें त्या तुरुंगाच्या

पश्चिमबाजूच्या भिंतीवर जो लेख आहे त्यावरून समजतें. **डोंगरी**वर एक तुरुंग आहे त्याचे दोन भाग केले आहेत. एका भागांत सरकारी कैदी व दुसऱ्या भागांत सावकारी कैदी ठेवतात. सावकारी तुरुंगास **'डेटर्स जेल'** (कर्जदार लोकांचे) व सरकारी तुरुंगास **'कामन जेल'** ह्मणतात. **उमरखाडी**वरच्या तुरुंगांत मोठ्या गुन्ह्याचे व ज्यास्त शिक्षेचे कैदी ठेवतात व **डोंगरी**वरच्या तुरुंगात लहान गुन्ह्याचे व थोडक्या शिक्षेचे लोक असतात. सावकारी तुरुंगात असलेल्या लोकांस त्यांस तुरुंगात घालणारा जोपर्यंत त्यांच्या पोटापाण्याचे पैसे देईल तोंपर्यंत ठेवतात. पैसा येण्याचें बंद झालें कीं, त्यांस सोडून देतात. पूर्वी **उमरखाडी** येथें असलेल्या चौकींत कैद्यांस फार वाईट रीतीनें वागवीत ह्मणून सांगतात. अजूनही 'फार गडबड करूं नको, नाहीं तर, उमरखाडीची चौकी दाखवीन' म्हणून साधारणतः कोणास धमकी देणें असल्यास लोकांत असें ह्मणण्याची वहिवाट सुरू आहे. तुरुंगावरील मुख्यास **'जेलर'** ही संज्ञा असते. जेलर तुरुंगांतील कैद्यांविषयीं सर्व बाबतींत जबाबदार राहतो. तुरुंगातील कैद्यांची, औषधपाण्याची व पोटाची व्यवस्था सरकार ठेवतें. कैद्यांस तपासण्याकरितां 'प्रेसिडेन्सी सर्जन' प्रतिदिवशीं तुरुंगांत जातो. आजारी कैद्यांस काम करण्यास लावीत नसतात. कैद्यांचा पोशाग निराळा असतो. तो कैदी तुरुंगांत गेला म्हणजे त्यास देतात. त्यांस खावयास अन्न नियमित मिळतें. कैदी तुरुंगात जाण्यापूर्वी त्याचे शेंडीचे केंस कापतात व गळ्यांत यज्ञोपवीत असलें तर तेंही काढून घेतात ह्मणून सांगतात ! सावकारी तुरुंगांत कैद्यांस काम नसतें. ते फक्त दोनवेळ खाऊन पडून असतात. त्यांस सावकाराकडून पोटगीबद्दल रोज चार आणे मिळतात हें मागें सांगितलेंच आहे. सावकारी तुरुंगातील लोक बहुधः सशक्त होऊन बाहेर पडतात व त्यांची तेंथे मोठी मजा असते. दहा पांच एकत्र जमून गप्पागोष्टी करून किंवा, नानातऱ्हेचे खेळ खेळून ते आपला वेळ गमतींत घालवितात. सावकारी तुरुंगांत सकाळचे पांचपासून संध्याकाळचे पांच वाजत तोपर्यंत कैद्यांस भेटण्यास जाण्याची बाहेरच्या लोकांस परवानगी असते. येथील सरकारी तुरुंगांत कैद्यांस जागा नसली तर, त्यांस **ठाणें** अगर **येरवडें** येथील तुरुंगांत नेऊन ठेवितात. कैदी

तुरुंगांत गेला म्हणजे त्यास प्रथमतः 'तरळांत' (Trail yard) नेतात तेथून पुढें त्यास 'जेलक्लार्क' च्या ऑफिसांत नेलें ह्मणजे तेथें त्याचें वजन करितात; शरीराची उंची, डोक्याचा परीघ, पायांची लांबी व आंगावरील ठळक ठळक खुणा टिपून घेतात. नंतर पुढें नेटिव मेडिकल ऑफिसर ह्मणून असतो तो कैद्यास कांही रोग आहे काय ह्मणून तपास करतो. तेथून पुढे कैद्यास 'हाटली'वर (Hard labour yard) नेतात व तेथें त्यास काम करावयास लावतात. जेवणासाठीं एक लोखंडी कढईच्या आकाराचें टकोरें कैद्यास देतात. निजण्याच्या खोलींत लघवीस व शौचास जाण्यासाठीं एकएक लोखंडी पात्र ठेविलें असतें. बायकांस तुरुंगांत नेतात तेव्हां त्यांस लहान मुलें असलीं तर त्यांचीही तेथें सोई करितात. तुरुंगांत आलेल्या बायकोचे केंस कापून तिचीं कांकणेंही पिचवितात ! आणि त्यांस नेसण्यास काळ्या खादीचें पातळ व त्याच कपड्याची चोळी देतात.

४८. फांशी देण्याची जागा पूर्वी कापावर जें तळें होतें त्याच्या शेजारीं होती म्हणून ह्या तळ्यास 'फांशीतळे' हें नांव पडलें होतें; पण हल्लीं फांशी देण्याची जागा **डोंगरी**वर असलेल्या तुरुंगांत आहे. फांशीची शिक्षा झालेला कैदी आजारी असला तर, तो सरकारी डाक्तराच्या औषधोपचारानें बरा होईतोंपर्यंत त्यास फांसावर देत नाहींत. फांसावर चढविण्यापूर्वी कैद्यास 'तुझी कांही इच्छा आहे काय' ह्मणून विचारतात, व ती योग्य असल्यास पुरवितात. परंतु हल्लीं हा प्रकार मुळींच नाहीं ह्मणून सांगतात. पूर्वी फांसावर देतेवेळीं दैववशात् कैद्याचा फांस तुटला किंवा, तेथून गव्हर्नराची किंवा एकाद्या बारोनेट सारख्या कीर्तिमान पुरुषाची गाडी गेली तर, कैद्यास सोडून देत ह्मणून सांगतात; परंतु, तसला प्रकार आमच्या पाहण्यांत आला नाहीं. असेंही ह्मणतात कीं, वारंवार असे कैदी सुटूं लागल्यामुळें, न्यायाधीश शिक्षा देते वेळीं "तुझा जीव जाईपर्यंत तुला फांसावर दिलें जाईल" ह्मणून कैद्यांस सांगतात.

४९. **कारोनर**—सर्व शहराकरितां **कारोनर** व डेप्यूटी **कारोनर** असे दोन कामगार आहेत. **कारोनर**चें काम शहरांत जेथें-जेथें आकस्मिक मृत्यू होतात तेथें तेथें जाऊन जुरी भरून मृत्यूच्या कारणांची पंचांमार्फत चौकशी करण्याचें होय.

५०. **म्युनिसिपालिटी—मुंबईंत** म्युनिसिपालिटी असावी असा बूट निघून तिच्या संबंधानें **मुंबईच्या लेजिस्लेटिव्ह** कौन्सिलपुढें "म्युनिसिपल बील" नांवाचें बील वाचण्यांत आले व त्यास **हिंदुस्थान** सरकारानें आपलें अनुमोदन इ. स. १८७२ सालीं दिलें. ह्यापूर्वी म्युनिसिपालिटीचें काम कमिशनर आणि जज्ज लोक मिळून पाहत; परंतु, कमिशनरचा अधिकार इतका व्यापक होता कीं, कामकाजाच्या संबंधानें सर्व गोष्टींत तो आपलें आंग काढून घेऊं लागला; कारण त्याच्यानें तें सर्व काम झेपेना. ह्या वेळीं म्युनिसिपल कमिशनर प्रख्यात **क्राफर्ड** साहेब व त्यांस मदतगार माजी **यशवंत बळवंत** हे होते. ह्यांनी **मुंबईची** पुष्कळ अंशीं सुधारणा केली खरी; तरी पण, रयतेचा पैसा मनमानेल तसा खर्च केला. म्युनिसिपालिटीमध्यें अशी अंदाधुंदी चालली आहे, असें पाहून इ. स. १८७१ सालीं **मुंबईंत** मोठी गडबड होऊन सरकारास नवीन म्युनिसिपालिटीची स्थापना करणें भाग पडलें. ह्याप्रमाणें नवीन स्थापित म्युनिसिपालिटीमध्यें रयतेनें पसंत केलेल्या मुख्त्यारांस बोलण्याची परवानगी मिळाली. रयतेच्या तर्फे मुख्त्यार प्रथमच **मुंबईमध्यें** इ. स. १८७३ सालीं नेमण्यांत आले.

५१. **कारपोरेशन—मुंबईच्या** म्युनिसिपल कारपोरेशनच्या सभेंत ६४ मेंबर असतात. हे सर्व सभासद कर देणारांपैकीं असून **मुंबईचे** रहिवाशी असतात. मेंबराचें वय २५ वर्षांहून अधिक असावें लागतें; पण तो घरपट्टी पोलीसपट्टी वगैरे कर मिळून वर्षांतून ५० रुपयांपेक्षां कमी कर देणारा नसला पाहिजे. ह्यांत **मुंबईच्या युनिव्हर्सिटीचे** 'फेलोज' ही नेमण्यांत येतात; पण, म्युनिसिपल कायद्याचे नियम जसे इतर मेंबरांस लागू असतात, तसें ह्यांस नसतात. ह्या ६४ सभासदांपैकीं १६ ची नेमणूक सरकार तर्फे; १६ ची **मुंबईंत** राहणाऱ्या 'जस्टीस आफ् धि पीस' ह्यांजकडून, आणि बाकी राहिलेल्या ३२ मेंबरांची नेमणूक कर देणाऱ्या रयतेकडून होते. ह्या सर्व सभासदांची नेमणूक फक्त दोन वर्षेपर्यंत चालते. 'कारपोरेशन'चा चेरमन (अध्यक्ष) सभासदांकडून निवडला जातो व त्याची नेमणूक एक वर्षपर्यंत चालते. सभासदांस वाटल्यास त्याची नेमणूक दुसऱ्या वर्षाकरितांही कायम करितात. ह्या कारपोरेशनच्या साप्ताहिक सभा खेरीजकरून वर्षांतून चार तिमाही सभा होतात.

५२. **टौन कौन्सिल**—ह्या कौन्सिलांत १२ सभासद असतात. व त्यांची नेमणूक दोन वर्षेपर्यंत चालते. कौन्सिलाकरितां चेरमन नेमणें तो सरकारमार्फत नेमला जातो. बारांपैकीं आठ सभासदांची नेमणूक कारपोरेशन आणि बाकी राहिलेल्या चौघांची नेमणूक सरकार करतें. टौन कौल्सिलच्या स्वाधीन कारपोरेशनचें कॉमन सील (शिक्कामोर्तब) असतें. कौन्सिल आठवड्यांतून एकदां जमून महत्त्वाच्या कामाकरितां सब कमेट्या नेमतें, चेकांवर सह्या करतें आणि वर्षाचा बजेट (जमाखर्चाचा खर्डा) पसार करितें. शिवाय साधारणपणें म्युनिसिपालिटीच्या साधारण कामाची व्यवस्था राखून इ. स. १८७२ चे कायद्यान्वयें म्युनिसिपालिटीचें काम बरोबर चालतें किंवा नाहीं हें पाहतें. इत्यादि कामें टौन कौन्सिलच्या अधिकारांत असतात. कौन्सिलचे प्रत्येक सभेच्या वेळीं दर सभासदास ३० रुपये फी मिळते; पण, आठवड्यांतून एकापेक्षां अधिक सभा झाल्यास त्यांस कांही ज्यास्त फी मिळत नाहीं टौन कौन्सिलचा सेक्रेटरी कायम पगारावर असतो व त्यास 'क्लार्क आफ् धि कारपोरेशन' ह्मणतात.

५३. **म्युनिसिपालिटीचें काम**—म्युनिसिपालिटीचा मुख्य कामदार ह्मटला म्हणजे 'म्युनिसिपल कमिशनर' हा होय. ह्याची नेमणूक सरकारांतून होते व तीन वर्षेपर्यंत चालते. कमिशनराची गैर वर्तणूक सरकारचे नजरेस आल्यास तें त्यास दूर करूं शकतें; अगर कारपोरेशनच्या नियमित कामाकरितां जमलेल्या सभेंत ४० पेक्षां अधिक सभासदांच्या लेखी शेऱ्यावरूनही तो कमी केला जातो. ह्याचा पगार २,००० पासून २,५०० रुपयांपर्यंत असतो. म्युनिसिपालिटीच्या एक्झिक्युटिव्ह इंजिनिअरची नेमणूक कारपोरेशन करितें; पण, त्यास आधीं सरकारची मंजूरी लागते. ह्याच्यावर म्युनिसिपल कमिशनरचा अधिकार चालतो. ह्याची नेमणूक ५ वर्षेपर्यंत असते. स्पेशल जनरल मिटींगमध्यें हजर असलेल्या सभासदांपैकी $^2/_3$ सभासदांचें मत ह्याच्या विरुद्ध पडलें तर हा काढून टाकला जातो. ह्याचा पगार १,२०० पासून १,५०० रुपये पर्यंत असतो. एक्झिक्युटिव्ह 'हेल्थ ऑफिसर' ह्याची नेमणूक करणें, पगार देणें, किंवा काढून टाकणें इत्यादि अधिकार कारपोरेशनच्या स्वाधीन असतात. विशेष एवढेंच कीं, हा कामदार डाक्तर असला पाहिजे. ह्या सर्व मोठ्या कामदारांची

चाकरीची मुदत पुरी झाल्यावर सर्वांस पसंत पडल्यास त्यांस पुनः ठेवतात. वर सांगितलेले कामगार खेरीजकरून बाकीचे सर्व कामगार म्युनिसिपल कमिशनर नेमतों. टौन कौन्सिलचा सेक्रेटरी आणि कारपोरेशनचा क्लार्क ह्यांची नेमणूक टौन कौन्सिल करतें. ज्या कामगाराचा पगार ३०० रुपयांवर असतो त्यास टौन कौन्सिलच्या मंजूरीवांचून म्युनिसिपल कमिशनर ह्यास त्या कामदारास काढतां येत नाहीं. तसेंच कारपोरेशनच्या मंजूरीवाचून ३०० रुपयांपेक्षा अधिक पगाराची जागा म्युनिसिपल कमिशनर ह्यास नवीन काढतां येत नाहीं. ह्या म्युनिसिपालिटीच्या कामासंबंधीं नवीन कायदा निघून त्यांत पुष्कळ बाबतींत फेरफार करण्याचें घाटत आहे.

५४. प्रत्येक वर्षाच्या अक्टोबर महिन्याचे पहिले तारखेस म्युनिसिपल कमिशनरनें पुढच्या वर्षात खर्च कोणत्या तऱ्हेनें करावयाचा व त्याची वजावाट कोणकोणत्या बाबींत करावयाची ह्याचा खर्डा टौन कौन्सिलपुढें ठेवलाच पाहिजे. व त्या खर्ड्याचा विचार म्युनिसिपल कमिशनरच्या सल्ल्याने बजेट तयार करून टौन कौन्सिलचा चेरमन कारपोरेशनच्या स्पेशल जनरल मिटींगपुढे नोव्हेंबर महिन्याचे दहावे तारखेस मांडतो. नंतर कारपोरेशन त्या बजेटचा विचार करून ज्या बाबी नापसंत होतील त्यांबद्दलचे आंकडे काढून टाकण्यास सांगतें. ह्याप्रमाणें म्युनिसिपालिटीच्या कामाची साधारण माहिती दिली. आतां तिच्या उत्पन्नाविषयीं दोन शब्द लिहून हा भाग पुरा करूं.

५५. **म्युनिसिपालिटीचें उत्पन्न आणि खर्च**—म्युनिसिपालिटीच्या मुख्य, मुख्य उत्पन्नाच्या बाबी ह्मटल्या म्हणजे लोकल ट्याक्सीस, हौसरेट, लायटिंग रेट, पोलीस रेट, व्हील ट्याक्स, वाटर रेट, हलालखोर सेस, टौनड्यूटी वगैरे आहेत. ह्यांची विगतवार माहिती खालीं थोडक्यांत दिली आहेः—

| | | |
|---|---|---|
| लोकल ट्याक्सिस—शेंकडा | ८ | टक्केप्रमाणें. |
| हौस रेट [१] (घरपट्टी) . . | ४ | ” |
| लायटिंग रेट (दिवाबत्ती) | २ | ” |
| पोलीस रेट . . | २ | ” |

१. घराचे एकंदर वर्षाचे उत्पन्न ठरवून त्यावर वरील कर घेतात.

हॉर्स आणि व्हिल ट्याक्स (घोडा गाडी)- } ची विगत येणेंप्रमाणें.

| | |
|---|---|
| चार चाकांच्या गाडीला प्रत्येक तिमाहिला— | ६ रुपये. |
| दोन चाकांच्या गाडीला | ४ " |
| रेकला (बैलांच्या गाड्या) | ७½ " |
| खटारे वगैरे ( " ) | ४½ " |
| १२ 'हात' वर उंचीच्या प्रत्येक घोड्यास, तट्टास अगर खेंचरास | ७½ " |
| वरील उंचीच्या आंतील प्रत्येक जनावरास | ३¾ " |

५६. **वाटर रेट (पाणी पट्टी)**—जेथें मिटर (पाणी मापक यंत्र) असतें तेथें दर १,००० ग्यालनाला १२ आणेप्रमाणें कर घेतात; परंतु, जी धर्मादाय कामें असतात तेथें ३ आणे प्रमाणें १,००० ग्यालनास कर घेतात. घराचें जें उत्पन्न ठरविलें असेल, त्याच्या पहिल्या शेंकड्यास ३½, दुसऱ्या शेंकड्यास २ व तिसऱ्या व त्याच्या पुढील प्रत्येक शेंकड्यास १½ प्रमाणें कर घेतात; परंतु, प्रत्येक महिन्यास १२ आणे कराखालीं पाणी देत नाहीत. तसेच—

हलालखोर सेस (भंगी पट्टी) } घराच्या उत्पन्नावर शेंकडा ३ टक्के.

**टौन ड्युटी—**

| | | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|---|
| सर्व प्रकारचे धान्य प्रत्येक खंडीस | | ० | ४ | ० |
| लांकूड फांटे | " | ० | २ | ० |
| दारू वगैरे | दर ग्यालनास | ० | ४ | ० |
| बियर नांवाची दारू | " | ० | ० | ६ |
| साखर, काकवी आणि गूळ-शेंकडा | | १ | ८ | ० |
| तूप-दरमणी | " | ० | ६ | ० |
| इमारती लांकूड | " | २ | ८ | ० |

५७. याप्रमाणें **मुंबई** म्युनिसिपालिटीचें सदहु बाबींपूसन स. १८८५-८६ सालांत साधारण उत्पन्न ४० लक्ष ३१ हजार चारशें पस्तीस रुपये झालें

होतें. १८८६-८७ सालांत ४५,९१,७५९ इतकें उत्पन्न झालें व खर्च ४१,७५,००० रुपये झाला; तरी पण, **मुंबई** म्युनिसिपालिटीस वर्ष अखेर १६७ लाख रुपये देणें आहे ह्मणून समजतें !

५८. **पोर्ट ट्रस्ट**--म्हणजे मुंबईच्या सर्व बंदराची व्यवस्था पाहण्याकरितां नेमलेली कामगार मंडळी होय. ह्यांची नेमणूक सरकार व 'चेम्बर ऑफ् कामर्स' मंडळीकडून होते. **मुंबई**च्या सर्व किनाऱ्यावरील मिळकत सरकारानें विकत घेऊन येथील **पोर्टट्रस्ट**च्या स्वाधीन केली आहे. समुद्रांतून येणाऱ्या जाणाऱ्या सर्व मालांची जकात घेणें न घेणें वगैरे व्यवस्था ही मंडळी पाहते, ह्मणजे एका प्रकारें सरकारानें व्यापाराचा मक्ता कांही अंशी आपल्या स्वाधीन करून घेतला आहे असें म्हटलें पाहिजे. **पोर्टट्रस्टचें** सालिना सरासरी उत्पन्न ३९ २/३ लक्ष रुपये आहे.

५९. याप्रमाणें, सरकारानें राज्याचें काम सुरळीत व सुयंत्र चालावें म्हणून निरनिराळीं ऑफिसें व निरनिराळे कामदार नेमून व त्यांच्या शिरावर त्या त्या खात्यांचे जोखीम ठेवून राज्यव्यवस्था चालविली आहे.

६०. **मुंबई**त हल्ली ज्या बऱ्याच मंडळ्या स्थापना झाल्या आहेत व ज्यांचा संबंध अधिकउण्या मानानें सरकाराशीं असतो असें वाटल्यावरून त्यापैंकी कांहीची महिती थोडक्यांत खालीं नमूद केली आहे.

६१. **चेम्बर ऑफ् कॉमर्स**--व्यापारी लोकांस त्यांच्या व्यापारांत उत्तेजन देत जावें, व्यापाराच्या संबंधानें सर्वांची एकी करून उत्तम रीतीनें व सचोटीनें व्यापार चालवावा, व्यापारासंबंधीं ठिकठिकाणची माहिती मिळवून तिचा उपयोग सर्वांस सारखा करून द्यावा, कदाचित् एकादा व्यापारी संकटांत आला तर त्यास हरतऱ्हेनें मदत करावी, एवढाच ह्या मंडळीचा मुख्य उद्देश आहे. ही मंडळी इ.स. १८३६ च्या सप्तेंबरच्या २२ वे तारखेस एतद्देशीय व युरोपिअन व्यापारी दलाल वगैरे लोकांनीं मिळून स्थापन केली व ह्या कामांत त्यांस त्या वेळचे गव्हर्नर सर **राबर्ट ग्रांट** ह्यांनी फार उत्तेजन दिले. ह्या चेंम्बरचे सभासद बहुतकरून व्यापारी कंपन्यांचे मुख्य साहेब व एतद्देशीय लोक असतात. मेंबरास दरमहा १५ रुपये वर्गणी द्यावी लागत असून शिवाय चेम्बरकडून निघणाऱ्या वर्तमानपत्राबद्दलही १५ रुपये वर्गणी भरावी लागते. ह्या चेम्बरचे एक चेरमन (अध्यक्ष), एक डेप्युटी चेरमन (उपाध्यक्ष),

असे दोन मुख्य अधिकारी व एक सेक्रेटरी असतो. सभेच्या फंडाची तरतूद चेरमन, डेप्यूटी चेरमन व दुसरे पांच मेंबर एकूण ७ असामी ठेवतात. व्यापारांत अधिक कळकळ दाखविणारे व लोकहिताच्या कामाकरितां झटणारे अशा गृहस्थांस ऑनररी मेंबर (सन्माननीय सभासद) करितात. ह्यांस कोणत्याही प्रकारची वर्गणी द्यावी लागत नाहीं. ह्यांची जनरल मीटिंग (सभा) ३ महिन्यांनी भरून वार्षिक सभा जानेवारीचे पहिल्या तारखेस बहुधः भरते त्या वेळीं व्यापारसंबंधीं बरीच वाटाघाट होते.

६२. **धि सोसाएटी फॉर धि प्रिव्हेंशन ऑफ् क्रुएल्टी टु आ निमलस्**–(मूक प्राणी दया विशिष्ट मंडळी). ह्या मंडळीचा उद्देश जनावरांस जो त्यांच्या धन्यांपासून अगर इतरांपासून त्रास पोंहचतो तो न पोंहचावा व मुक्या जनावरांचें संरक्षण व्हावें हाच होय. ह्या मंडळीचे इन्स्पेक्टर हे शहरांत रस्तोरस्तीं फिरून जनावरांस त्रास देणाऱ्या इसमास म्याजिस्ट्रेट समोर उभे करून शिक्षा देववितात.

६३. **धि बांबे प्रेसिडेंन्सि असोशिएशन**–ह्या असोशिएशनचा मुख्य उद्देश रयतेचें गाऱ्हाणें सरकारापाशीं नेऊन त्यांस सरकाराकडून त्यांचे जे कांही वाजवी हक्क असतील ते देववावे व प्रजेस जेणेंकरून सुख होईल असे उपाय योजावे हाच होय.

## भाग सहावा

## शहराचें वर्णन

**युरोपिअन** लोकांस **हिंदुस्थानांतून** स्वदेशीं परत जातांना किंवा, स्वदेशाहून **हिंदुस्था**नांत येतांना **मुंबई** बंदर हें फार नजीक व सोयस्कर असल्यामुळें **मुंबईस** आल्यावांचून त्यांची सुटकाच नाहीं. कोणताही नवखा मनुष्य **मुंबईच्या** बंदरांत उतरला आणि तो ह्मणजे गांवांत फिरून तेथील थोडी बहुत तरी अवर्णनीय शोभा पाहिल्यावांचून राहिला आहे, असें कधींही होणें नाहीं. खुद्द शहराची सर्व शोभा पाहून झाल्यावर **घारापुरी**सारखा **मुंबईच्या** आसपासचा प्रदेश पाहण्याची जिज्ञासा त्यास साहजिक उत्पन्न होते. तसेंच, **काशी**ची शोभा, **आग्र्या**चा ताजमहाल **दिल्ली, लखनौ** वगैरे शहरांचा ऐतिहासिक मोठेपणा, इत्यादि गोष्टी पाहण्याविषयीं त्याचें मन अगदीं उतावीळ होऊन जातें खरें; तरी पण, ह्या सर्व गोष्टी **मुंबई** पाहून झाल्यानंतरच्या. हें शहर केवळ त्याच्या उत्तम व सोईच्या बंदराकरितांच प्रसिद्ध आहे असें नाहीं ; तर, दुसऱ्या अनेक कारणांनीं आज हें शहरं इतक्या प्रसिद्धीस येऊन पोंहचलें आहे एवढेंच केवळ नव्हे; तर, त्याची उत्तरोत्तर चढतीच कमान आहे. पाश्चिमात्य देखील असें ह्मणतात कीं, सर्व **हिंदुस्थानांत मुंबई**सारखें दुसरें शहर नाहीं आणि हें त्यांचें ह्मणणेंही कांहीं खोटें नाहीं. पहा कीं, ह्या शहरांत जरी मनोवेधक असे बाजार नाहींत; किंवा येथील घरांची बांधणी सरकारी इमारतींपेक्षा विशेष चांगलीशी नाहीं; किंवा, हे शहर ऐतिहासिक अगर पौराणिक गोष्टींविषयीं प्रसिद्ध आहे, असेंही नाहीं; तरी देखील ह्या शहरांतील अठरापगड जातींच्या लोकांचा चित्रविचित्र देखावा; त्यांची एकमेकांपासून भिन्न-भिन्न वर्तणूक; त्यांचे निरनिराळे आचारविचार ; त्यांचे निरनिराळे धर्म व धर्मपंथ; त्यांच्या निरनिराळ्या चाली रीति; त्यांचे निरनिराळे पोषाग इत्यादि गोष्टी पाहणारांचे मन आधींच वेधून टाकितात. **कलकत्ता, आग्रा, दिल्ली, लखनौ, पंजाब** वगैरे **हिंदुस्थानां**तील शतशः शहरें आपापलें प्राचीन ऐतिहासिक वैभव तेथील भव्य, टोलेजंग व

मनोवेधक मनोरे, इमारती यांहींकरून दाखवीत आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे; तरी पण, विद्या, व्यापार आणि तदंगभूत संपत्ति इत्यादि गोष्टींत आपली बरोबरी करणारें शहर सगळ्या **हिदुस्थानां**त, किंबहुना, दुसऱ्या कोठेंही नाहीं हें दाखवून त्याच्याच बरोबर आपलें नूतन वैभव, आपली भरभराटी व इतर सर्व शहारांपेक्षां आपला मोठेपणा इत्यादि गोष्टी **मुंबई** शहर आज आपणांस प्रत्यक्ष दाखवीत आहे हें कोणीही कबूल करील.

२. **मुंबईतील** लोकांचा चित्रविचित्र पेहराव, त्यांचे रीतरिवाज, व्यापारधंद्यांत त्यांचें साहस व पुढारीपणा आणि सार्वजनिक कृत्यांत मोठ्या आस्थेनें व कळकळीनें वाटाघाट करून पुढें पाऊल टाकण्याच्या कामीं त्यांचें अग्रेसरत्व इत्यादि गोष्टींवरून हे लोक चंचल, दक्ष व उद्योगी आहेत असा ग्रह मनुष्याच्या मनावर साहजिक उत्पन्न होतो. ह्यांची कारणें पाहूं गेलें असतां, उत्तर **हिदुस्थानांतील** लोक **मुसलमानांच्या** व इतर परकीयांच्या वारंवार स्वाऱ्यांनीं अगदीं जर्जर होऊन गेले होते आणि वेळोवेळीं त्यांस अनेक संकटें भोगावीं लागत; किंबहुना, त्यांस आपल्या जीविताचीही शाश्वति नसे, तसा प्रसंग ह्या पश्चिम हिदुस्थानांतील लोकांस मुळींच आला नाहीं हे एक– आणि हें शहर आपल्या दयाळु **इंग्रज** सरकारच्या अमलांत आल्यादिवसापासून जिकडे तिकडे शांतता होत जाऊन उत्तरोत्तर भरभराटीस येत चाललें आहे,–हें दुसरें. आमच्या मतें हे दुसरें कारण सबळ होय. आज पाहूं गेलें तर, **मुंबई** ही अगदी **इंग्रज**मय बनून गेली आहे असें दिसून येतें; कारण, **हिंदुस्थानां**तील इतर शहरांपेक्षां ह्या शहरांत **इंग्रज** लोक फार राहतात हेंच नव्हे; तर, बहुतेक सर्व लोक आंग्लभौमीय विद्येनें विभूषित झाले आहेत हें होय. इंग्लंद वगैरे ठिकाणी जशा सार्वजनिक सभा त्या लोकांच्या आंगवळणी पडून गेल्या आहेत, तशा ह्याही शहरांतील लोकांच्या त्या नेहमींच्या झाल्या आहेत. आमच्या लोकांचा लेखणीबहादरपणा आणि त्यांची उत्तम वक्ते बनण्याची इच्छा देखील प्रशंसनीय होत चालली आहे. ह्यापासून कधींकधीं हास्यास्पद असे परिणाम होतात हें खरें आहे; तरी साधारण मानानें पाहूं गेलें तर, त्यापासून तोट्यापेक्षां फायदेच फार दिसून येतील. कसे ते पहा–एकाद्या इंग्रजी अगर एतद्देशीय वर्तमानपत्रांत कांहीं मजकूर आला कीं, लागलीच त्या

लेखाच्या खरेखोटेपणावर चर्चा सुरू झालीच ! दोन्ही पक्षकार आपापली साधकबाधक प्रमाणें जगापुढें आणितात आणि अशा रीतीनें त्या विषयाचा बराच परिस्फोट होऊन तत्संबंधीं लोकांची मतें काय आहेत हें व्यक्त होतें, आणि त्याबरोबर भाषेचीही सुधारणा सहज होत जाते एवढेंच नव्हे; तर, त्यापासून खरें मत कोणते व खोटें कोणतें ह्याचा विचार करण्यास लोकांस बरीच जागा मिळते. हा कांहीं लहानसहान फायदा नव्हे. अशा ह्या विद्याविभूषित शहरांतील लोकांविषयी इतर देशांतील लोकांचें मन सुप्रसन्न होऊन त्यांना ह्याच्याविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न होणें ही गोष्ट कांहीं साधारण नव्हे. ह्या शहराविषयी **ग्रांटडफ** साहेबांचे असें ह्मणणें आहे कीं, 'खिस्ती शकाच्या आरंभी जसें **आलेक्झांड्रिआ** हें उत्तम शहर मानलें जात होतें, तसें हल्ली **एशिआ** खंडांत **मुंबई** हें शहर मानलें जात आहे; आणि वर दर्शविलेली चिन्हें जसजशी बळावत जात आहेत तसतसें हें शहर एक मोठें रमणीय व मनोवेधक स्थळ बनत आहे.' ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. **ग्रांटडफ** साहेबासच काय परंतु, त्याच्यापेक्षा कमी विचाराचाही कां कोणी मनुष्य असेना ! तो देखील ह्या शहराचा भपका पाहिल्याबरोबर आश्चर्य चकित होऊन जावयाचाच! रस्त्यानें जातांनाच लोकांची गर्दी पाहून पाहणारांचे मन अगदी दंग होऊन जातें. मनुष्य घराबाहेर निघाला नाहीं तोंच, त्याच्या दृष्टीस एकसारखी हिरव्या, पिवळ्या, निळ्या, तांबड्या अशा अनेक रंगांचीं भव्य देवळें व इमारती दृष्टीस पडतात. देवळांत शिरण्याबरोबर भक्तजनांचा घंटा वाजविण्याचा सपाटा–कीं ते जणूं काय घंटारवानें देवाला आपल्या प्रार्थनेकडे कान देण्यास विनवीत आहेत–कोणी 'शंभो हर हर महादेव' ह्मणून ओरडत आहेत; कोणी देवापुढें साष्टांग नमस्कार घालण्यांत निमग्न झाले आहेत; आणि कोणी एकसारखी मन लावून ईश्वरप्रार्थना करीत आहेत. असे नानाविध चमत्कार पाहून तो तेथून पुढें जातो तोंच **मुसलमानां**ची मशीद त्याच्या दृष्टीस पडते. मशीदींत शिरण्याबरोबर शेंकडो मुसलमान लोक –कोणी 'किबला' पसरून 'निमाज' पडत आहेत; कोणी तळ्यात पाय धुत आहेत; कोणी 'तसबी' (माळ) फिरवीत आहेत; कोणी 'या अल्ला' म्हणून 'बांग' पुकारीत आहेत; कोणी ध्यान धरून बसले आहेत; आणि कोणी

कुराण वाचीत आहेत. इत्यादि चमत्कार पाहून तेथून पुढें जातो तोच त्याच्या दृष्टीस **पारश्यां**ची अग्यारी (अग्निगृह) पडते. तेथें कित्येक **पारशी** आपआपलीं धर्मपुस्तके घेऊन वाचीत बसले आहेत; कोणी सूर्यस्तुति करीत आहेत; कोणी समुद्राचें पाणी आंगावर सिंचन करून घेत आहेत, आणि कोणी 'कस्ती' करीत आहेत. वगैरे अब्दुत चमत्कार पाहून पाहणारास आश्चर्य वाटून आनंदही पण तसाच होत असेल हें सांगणें नको.

३. संध्याकाळचे प्रहरी मैदानांत फिरावयास निघाले म्हणजे, एका बाजूस पाहिले तर, **मुसलमान** लोक आपला 'किबला'पसरून कुराणातील 'कलमे' पढत आहेत; दुसऱ्या बाजूस, सूर्य अस्ताचलास जाण्यापूर्वी **पारशी** लोक कोणास न शिवतां एकाबाजूस उभे राहून आपली धर्मपुस्तकें वाचीत आहेत; आणि तिसरीकडे पाहिलें तर, लहान लहान मुले चेंडूफळी (क्रिकेट) खेळत आहेत; साहेब लोक घोड्यावर बसून चेंडू फेंकीत भोंवऱ्यासारखे गरगरां फिरत आहेत आणि त्यांची मजा शेंकडो मडमा आणि इतर पौरजन समुदाय गाड्या बाजूला उभ्या करून पाहत आहेत. त्याचप्रमाणें सभोवार रस्त्यानें येणाऱ्या जाणाऱ्या लोकांची अतिशयित गर्दी जमली आहे व त्यांस पोलिसचे शिपाई बाजूस करीतच आहेत. साहेब व मडमा ह्यांचाही खेळ चालला आहे. कोणी नेम धरून बाण मारीत आहेत; व्हालंटीअर **कोरची** 'परेड' (कवाईत) चालली आहे आणि त्यांच्या बंदुकांचा आवाज ऐकूं येत आहे, त्यामुळें गाड्यात बसून जाणारे लोकांचे घोडे बुजून वाकडे तिकडे धांवा घेत आहेत व त्यांस सांवरण्याकरितां घोडेवाल्यांची व इतर लोकांची एकच धांदल उडून गेली आहे. कित्येक लोक ऑफिसांतून सुटून आपापल्या सुखदुःखाच्या गोष्टी बोलत चालले आहेत; कित्येक बाया गिरण्यांतून सुटून मोठ्या तांतडीनें घरीं जातांना 'आज पैसे किती मिळाले व त्यांचा व्यय कसा करावयाचा' इत्यादि गोष्टी बोलत चालल्या आहेत; आणि कित्येक रस्त्यानें गाणीं गात चालले आहेत. लष्करी लोकांची आपापल्या पाहऱ्यावर जाण्यास उशीर झाल्याकारणानें खांद्यावर बंदूक टाकून जाण्याची

एकच धांदल उडून गेली आहे; कित्येक चैनी लोक सायंकाळचा 'ब्यांड'[१] ऐकण्याकरितां ह्मणून गाड्यांत बसून घोडे भरधांव फेकीत नेत आहेत आणि कित्येक पायांनीही जात आहेत. तसेच **पारशी** व **साहेब** लोकांच्या तरुण मुली हातात हात घालून ब्यांडाच्या सभोवार फिरत आहेत आणि कोणी गप्पा झोंकीत आहेत. ब्यांडाच्या सभोंवार शेंकडो गाड्या उभ्या आहेत त्यांतूनच कित्येक लोक ब्यांडाचा सुस्वर ध्वनि ऐकत आहेत; मैदानांत दुतर्फा झाडाच्या रांगा लागून गेल्यामुळे रमणीय शोभा दिसत आहे; अशी मजा पाहत पाहत समुद्रकिनाऱ्यावरून **ब्याकबेवर** जाऊं लागलें ह्मणजे, संध्याकाळचे प्रहरीं शहरांतील हजारो पुरुष, बायका व मुलें हवा खाण्यास आलेलीं दृष्टीस पडतात. त्या वेळीं **पारशी** लोकांच्या बायका अनेक रंगाच्या रेशमी साड्या नेसून फिरत आहेत आणि मडमा आपल्या प्रिय भर्त्यांसहवर्तमान हातांत हात घालून जात आहेत. याप्रमाणें निरनिराळ्या तऱ्हेचीं पागोटीं, निरनिराळ्या तऱ्हेचे पेहराव व निरनिराळ्या जातीचे लोक तेथे पाहण्यात येत आहेत. अशा वेळीं तेथें हजारो लोक जमत असल्याकारणानें एकादी जत्रा भरली आहे कीं काय? असा भास उत्पन्न होतो. एकीकडे **पारशी** लोक आपली धर्मपुस्तकें वाचून झाल्यावर समुद्राचें तीर्थ घेण्यास ह्मणून धक्याच्या खाली जात आहेत; एकीकडे **हिंदु**लोक सूर्यस्तुति करण्यांत व समुद्र दर्शन घेण्यांत गढून गेले आहेत, व त्यांस तेथें असलेल्या गुजराथी भटांची पूजा सांगण्याची व दक्षिणा घेण्याची एकच धांदल उडून गेली आहे; कित्येक भट परडींत फुलें व गंध घेऊन 'चांदला करो महाराज' ह्मणून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांच्या कपाळी गंधतिलक करण्यास जात आहेत तोंच त्यास ते झिटकारीत आहेत. भरतीच्या वेळीं

१. हें स्थळ नव्या सेक्रेटरी ऑफिसाच्या जवळ आहे ही जागा चोहो बाजूंनीं उघडी असून ब्यांडमास्तर व त्याचीं मनुष्यें ह्यांचा समावेश होईल एवढीच काय ती आहे. तेथें त्यांची वाद्यें ठेवण्यासाठीं उत्तम सोईची जागा केली आहे. लोकांस बसावयासाठीं ब्यांडासभोंवार बांक मांडलेले असतात. ही वाद्य वाजविणारी मंडळी गव्हर्नराचे चाकरींत असणाऱ्या व त्यांच्या घरीं ब्यांड वाजविणाऱ्या मंडळापैकीं असते ह्मणून, ह्यास गव्हर्नराचा ब्यांड असें ह्मणतात. हीं वाद्यें आठवड्यांतून तीनदा पौरजनमनोरंजनाकरितां वाजवितात, त्यांत शुक्रवारचा दिवस मुख्य असतो. त्या दिवशी स्वचित्तरंजनार्थ बहुत लोकांची गर्दी जमते. शोकी लोकांच्या दंपत्यांचीं दंपत्यें बाहेर फिरावयास निघालीं ह्मणजे सहज तिकडे जातात. ब्यांडाचा शेवट 'गॉड सेव्ह धि क्वीन' ह्या गीतानें होतो. एकंदरीत संसाराच्या नानाविध व्यासंगानें त्रस्त झालेल्या मनुष्यास संध्याकाळीं करमणूक होऊन त्याच्या मनास क्षणभर समाधान व्हावें, असें हें स्थळ आहे.

समुद्राच्या लाटा धक्यावर आपटत आहेत व त्यायोगें आंगावर पाण्याचे तुषार उडत आहेत ही मजा पाहण्यांत कित्येक गढून गेले आहेत; ओ-होटीच्या वेळीं समुद्राचें पाणी कमी झाल्याकारणानें मंदमंद लाटांची कित्येक गंमत पाहत आहेत; आणि कोणी धक्यावरच्या दगडी बाकांवर किंवा नुसत्या धोंड्यांवर बसून स्वच्छ हवा खात आहेत. कित्येक साहेब घोड्यांवर बसून इकडून तिकडे आपले घोडे धांववीत आहेत आणि कित्येक आपल्या नवयुवतींसह तेथें फिरत आहेत. समुद्रकिनारीं जणूं काय गालिच्याच पसरला आहे असा भास उत्पन्न करणाऱ्या हिरव्या गार गवतावर बसून नाना प्रकारचे खेळ खेळून गप्पा गोष्टी करण्यांत कित्येक आपला वेळ घालवून समाधान मानून घेत आहेत; कित्येक बागेंत बांकावर बसले आहेत; कित्येक फिरत आहेत आणि कित्येक झाडांखालीं बसले आहेत. माळी लोकांनींही बाग साफसुफ करून ठेविली असल्याकारणानें ह्या वेळीं ती फार रमणीय दिसत आहे, ह्मणून तेथें बसून कोणी उपाहार करीत आहेत; कोणी खेळत बसले आहेत; कित्येक उगीच इकडच्या तिकडच्या गप्पा झोंकीत आहेत आणि कित्येक विद्यार्थी आपापले धडे वाचीत आहेत. मधून-मधून 'चणा ले रे गरमागरम,' 'ताज्या भज्या,' 'गंडेरी ले रे गंडेरी,' 'सोडा वॉटर,' 'आईसक्रीम,' असे फेरीवाले लोक तोंडानें चमत्कारिक स्वर काढून फिरत आहेत; उन्हाळ्या रात्रीं हजारो लोक अर्धरात्रपर्यंत तेथें फिरत आहेत आणि चांदण्यारात्रीं **युरोपिअन** व **पारशी** लोकांची जोडपीं वारंवार पाहण्यांत येत आहेत. जरा रात्र पडली म्हणजे **कुलाबचे** दांडीचा दिवा फिरत असतो त्याची चमक पाण्यावर पडून पाहणारास समुद्रांत हजारो दिवे लावले आहेत कीं काय ? असा भास उत्पन्न करणाऱ्या दिव्याची कित्येक मजा पाहत आहेत : त्याचप्रमाणें **वाळकेश्वराचे** डोंगरापासून **कुलाबचे** दांडीपर्यंत धनुष्याकार दिव्यांच्या रांगा, मधून-मधून रेलवे स्टेशनावरील दिवे व त्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या आगगाड्यांचे कंदील व गाड्यांचा घडघडाट, **चौपाटी** बंदरांतील तारवें वगैरे मजा पाहून पाहणाराचें मन अगदी **थक्क** होऊन जातें, व त्यास असें वाटते की, मी हें पाहतों काय, आणि हा सर्व चमत्कार आहे काय ? पाहणाऱ्यांची अशी स्थिति होणें हे साहजिक आहे : परंतु, **मुंबईत** ही जागा खरोखर घटकाभर जिवास आराम आणि मनास समाधान देणारी आहे ह्यांत कांही संशय नाहीं.

४. **मलबारहिल**वरून **मुंबईचा** देखावा बघितला असतां एका बाजूला हिरवीगार माडांची व दुसरीं इतर झाडें; मध्येंमध्यें उंच नीच व डौलदार घरें; दुसऱ्या बाजूला लांबलांब रस्ते; एका बाजूला समुद्र; समोर **कोटा**कडील भव्य इमारतींचा देखावा व **राजाबाई** टॉवरवरील घड्याळ, **सेंट थामसचर्च**, गिरण्यांचे बंब, कुलाब्याचे देवळाचें टोंक, आगगाडीचा नागमोडीसारखा रस्ता, बंदरें, आगबोटी, वगैरे मोठा मनोवेधक, चित्तास आराम देणारा व घटकाभर तहान भूक हरविणारा असा दिसतो. असाच देखावा **माजगांव** येथील **भंडारवाडा** रिझरव्हायरवरून पाहिला असतां दिसतो. हें स्थळही फार मनोवेधक आहे.

५. **मुंबईत** सहज रस्त्यावर फिरावयास निघालें ह्मणजे कोठें दुकानदार आपापलीं दुकानें मांडीत आहेत; कोणी गिऱ्हाईकांस माल देण्यांत गुंतले आहेत; कोणी पैसे घेत आहेत; कोणी पैसे बरोबर न पोंहचल्याकारणानें गिऱ्हाइकांबरोबर हर्षामर्ष करीत आहेत; कित्येक गुलहौशी लोक रस्त्यांतून गाणीं गात चालले आहेत; कोणी मारामारी, तंटाभांडणें करीत आहेत आणि त्यांस शिपाई पकडून नेत आहेत व ती मजा पाहण्यास लोकांची एकच गर्दी झाली आहे; कित्येक मुलें त्यांची हुर्यो करीत आहेत; कोणी नाटकाच्या वगैरे जाहिराती वांटीत आहेत आणि कोणी आपापसांत विनोदपर भाषणें करीत चालले आहेत. कोठें गारोडी चव्हाट्यावर तमाशा करीत बसला आहे, आणि त्याच्या सभोंवतीं शेंकडो मंडळी जमली आहे; कोणी तांबोळ्याचे दुकानीं पानसुपारी खात आहेत आणि कोणी रस्त्यानें विड्या ओढीत चालले आहेत. याप्रमाणें कोणी काय, कोणी काय असे हजारो लोक नानाप्रकारचे रंग करीत चालले आहेत. असे नानाविध मनोवेधक देखावे रस्त्यांत फिरावयास निघालें म्हणजे पाहण्यांत येतात. हें पाहून एकादा नवखा मनुष्य अगदीं दंग होऊन जाईल ह्यांत नवल तें कोणतें !

६. ह्या शहरांत सावधगिरीशिवाय रस्त्यावरून जाणें ह्मणजे मोठें धोक्याचें काम आहे; कारण चोहोंकडून गाड्या फिरतात, त्यांच्या सपाट्यांत सापडून बरींच माणसें वारंवार दगावतात. फार गर्दीच्या ठिकाणीं तर

घोडेवाल्यांची "पैस, पैस" "बाजू, बांजू" ह्मणतांना पुरे पुरे होऊन जाते. रात्रीस गाडीच्या दोन्ही बाजूंला कंदील लावलेले असतात ह्मणून कांही बरें; नाहीं तर, मुंबईत रात्रीस रस्त्यावरून पायीं जाणारांची मोठीच पंचाईत व्हावयाची. रात्रीस गल्ल्या कुच्यांतून उजेड बरोबर नसल्या कारणानें तेथें लबाड लोकांचे बरेंच फावतें, एवढेंच नाहीं, तर, त्यांपासून लोकांसही वेळोवेळीं बराच त्रास सोसावा लागतो.

७. रस्त्यानें जातांना सहज एकाद्या घराकडे नजर फेंकली तरी मनुष्य अगदीं आश्चर्यचकित होऊन जातो आणि त्याच्या मनांत असा विचार उत्पन्न होतो कीं, असलीं भव्य, सुंदर व टोलेजंग घरें कधीं व कोणी बांधली असावींत व हीं बांधण्यास पैशाचा खर्च तरी किती अतोनात केला असावा! एकेक घर ह्मटलें ह्मणजे कोणाचें सात मजली, कोणाचें सहा मजली, कोणाचें पांच मजली, अशीं एकाहून एक सुंदर अशा शेकडोंशे घरांची गर्दी पाहणारांच्या नजरेस पडते. सहज एकाद्याच्या मनांत आलें कीं, एकादी इमारत खालपासून वरपर्यंत नीट न्यहाळून पहावी; तर, त्याला आपल्या डोकींतील पागोटें सांवरल्यावांचून ती पाहतां येणारच नाही. इतक्या येथील एकेक इमारती उंच असतात, मधून मधून दुमजली, कोठें बैठीं, कोठें तीन मजली, कोठें चार मजली अशीं घरें व चाळी एकाहून एक सुंदर सर्वत्र पाहण्यांत येतात. **मांडवी, चकला** वगैरे ठिकाणीं तर चारमजल्याखालीं फारच थोडीं घरें असतील. अशीं 'डोल्यां' सारखी उंच घरें बहुधः वाणी, भाटे, पारशी वगैरे लोकांचीं असतात. गिरगांवांत लहानच पण टुमदार घरें दृष्टीस पडतात. कोणाच्या घरापुढें लहान लहान बाग असतात, त्यांतून कोणी झाडांना पाणी घालीत आहेत कोणी बाग झाडून स्वच्छ करवीत आहेत; कोणी आपल्या घराच्या समोरच 'थुई थुई' उडणाऱ्या कारंज्याचें पाणी सभोंवार गरगर फिरत आहे, तें पाहण्यांतच गुंग होऊन गेले आहेत कोणी आपल्या घरापुढें सुंदर सुंदर पक्ष्यांचे पिंजरे टांगून ठेविले आहेत; आणि गडी माणसें ते साफ करून पक्ष्यांस चारा पाणी घालण्यांत गढून गेले आहेत, असा चमत्कार पाहणारास दिसतो.

८. **मुंबईतील जमीन आणि तेथील उत्पन्न – मुंबईची** जमीन बहुतकरून काळी पांढरी अशी आहे. शहर अगदीं दाट वस्तीनें भरून गेलें असल्यामुळें

धान्य वगैरे उत्पन्न करण्यास जागा मुळींच शिल्लक नाहीं; तरी, **वरळी, माहिम, परळ, महालक्ष्मी** वगैरे आसपासच्या गांवांतून थोडी शेतजमीन आहे, तेथें भात पिकवितात. **माहिम** येथें वाड्यांतून लोक भाजीपाला करून विकतात. तेथें नारळीचेंही उत्पन्न फार होतें. **वाळकेश्वर, बाबूलनाथ** येथें बरसातींत कांकड्या, भेंडे वगैरे फळभाजी लावितात. येथील कांकड्या व मक्यांची बोंडें फार स्वादिष्ट असतात. त्यांस बाहेरगांवचे मालापेक्षां किंमतही फार पडते. येथें आंबेही उत्तम होतात. सर्व शहराला भाजीपाला व फळफळावळ ह्यांचा पुरवठा बाहेरगांवाहूनच होतो. शहरांत आज ८ लक्षांजवळ-जवळ वस्ती आहे व ह्या सर्वांस भाजीपाला व फळफळावळ ह्यांचा किती खप होत असेल ह्याचा अंदाज करण्याचें काम आम्हीं आमच्या वाचकांवरच सोपवितों. गिरगांव लत्त्याखेरीज बहुतकरून दुसरीकडे कोठेंच फारशी झाडें दिसत नाहींत. त्यांत बहुतेक सर्व माडच असतात. ह्या शिवाय दुसरीं झाडें म्हणजे कांहीं वाखाणण्यासारखीं असतात असें मुळींच नाहीं. कोणी कोणी आपल्या घरापुढें किंवा क्वचित कोठें कोठें लहानशा एखाद्या वाडींत नानातऱ्हेंची झाडें लावितात, त्यांत कित्येक विलायती झाडें फार सुंदर असून पहाण्यासारखीं असतात. मुंबईंत मुळीं वस्ती इतकी दाट आहे कीं, घरें कशीं गच्च एकमेकांस भिडून गेलीं आहेत. आजूबाजूला 'ऐसपैस' जागा, किंवा पुढें पाठीमागें सुटी जागा आहे अशी घरें फारच थोडी, म्हणजे शेंकडा एक-दोन निघतील कीं नाहींत याची मुळीं शंकाच. तेव्हां अशा ठिकाणी झाडें पानें लावण्यास मोकळी जागा मिळालीच तर फार थोडी मिळतें; हें उघड आहे. इतकें आहे तरी शोकी लोक कोंड्यांत वगैरे झाडें लावून आपली हौस कशी तरी पुरवून घेतात.

९. **मुंबईंतील रस्ते**.—ह्या शहरांतील रस्ते बहुतकरून स्वच्छ व सुरेख असे आहेत. शहराची हवापाण्याच्या संबंधानें व्यवस्था लावण्याकरितां व रस्त्यांच्या दुरुस्ती करण्याचे कामावर शहर म्युनिसिपालिटीकडून निरनिराळे युरोपिअन व एतद्देशीय कामगार नेमलेले असतात. हे लोक आपापली कामें वेळच्यावेळी बजावतात; पण, नेटिव लोकांची वस्ती जेथें विशेष असते, तेथें बहुधः स्वच्छता ठेवण्याच्या कामीं हे लोक अंमळ निष्काळजीपणानें

वागतात; पण, युरोपिअन लोकांच्या वस्तीच्या ठिकाणीं मात्र त्यांस विशेष काळजी ठेवावी लागते. शहराचे मोठ्या रहदारीचे रस्ते फार विस्तीर्ण व रुंद असे असतात; तरी पण, बहुतेक ठिकाणीं लहान सहान गल्ल्याही बऱ्याच आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूनें शहरांतील सर्व घाण वाहून नेण्याकरितां गटार असतात. हे गटार साफ करण्याकरितां झाडूवाले असतात ते गटार साफ करून रस्तेही झाडण्याचें काम करितात. रस्त्यावर खडी वगैरे पडलेली असल्यास म्युनिसिपालिटीचे लोक ती गोळा करून रस्ते साफ ठेवितात. रस्त्याची दागदुजी करतांना खडी दाबणें झाल्यास रुळाची योजना करितात. हा रूळ लहान असल्यास माणसें आणि मोठा असल्यास ८-१० बैल जोडून त्यांजकडून तो ओढवून खडी दाबविण्याचें काम करितात. शिवाय वाफेनें चालणारे रूळ असतात ते मोठे व रुंद रस्त्यांवरून चालवितात. रस्त्यांतून चालतांना अंगावर धूळ उडूं नये किंवा, तिचे कण डोळ्यांत शिरूं नयेत म्हणून, सकाळ संध्याकाळ म्युनिसिपालिटीच्या रस्ते शिंपण्याच्या गाड्या फिरतात. असे रस्ते शिंपण्याच्या गाड्या आज **मुंबईंत** १,२०० वर आहेत. ह्या गाड्यांत पाणी भरून तें पाणी गाडीस जोडलेल्या एका नळीच्या द्वारें सुमारें चार फुटीची दुसरी एक लांब नळी असते त्या नळींत सोडून तिच्या छिद्रांतून तें रस्त्यावर शिंपडतात. रस्ते शिंपण्याच्या कामीं **व्यहाड** व **तुळशी** ह्या दोन्हीं तलावांतून मिळून ३ लक्ष ग्यालन पाणी ह्या कामीं सरतें; शिवाय शहरांतील सार्वजनिक तळीं व विहीरी ह्यांचे पाणी रहाटानें ओढून ह्या कामीं लावतात तें निराळेंच. अतिशय गर्दीच्या ठिकाणीं भिस्ती लोकांकडून हें काम करविण्यांत येतें. फार मोठ्या व सोईच्या रस्त्यावर दुतर्फा बहुधः 'फूटपाथ' (पायरस्ते) केलेले असतात. हे रस्ते बहुतकरून खडी, तार किंवा डामर यांचे करतात. असे रस्ते वारंवार दुरुस्त करावे लागतात ह्मणून अलीकडे जेवढे पायरस्ते होतात तेवढे फरसबंदी करतात.

१०. **शहरांतील दिवे.**— मोठ्या सार्वजनिक रस्त्यावर कांहीं नियमित अंतरानें दुतर्फा ग्यासच्या दिव्यांचे खांब पुरलेले असतात. ग्यासचे दिवे मुंबईंत एकंदर आजमितिला ३,२८२ पेक्षां अधिक असून साधारण रस्ते व गल्ल्या ह्यांजवर केरोसिन तेलाचे दिवे लावतात ते निराळेच. ह्यांची

संख्या १,२५७ पेक्षां ज्यास्त आहे. दिवे लावण्याकरितां म्युनिसिपालिटीकडून नोकर लोक नेमलेले असतात, ते दिवसा कंदील साफसूफ करून संध्याकाळीं काळोख पडतांच एका काठींत बसविलेल्या दिव्याच्या योगानें रस्त्यानें एकसारखे दिवे लावीत जातात. मध्यें ह्या ग्यासच्या दिव्यांस रजा देऊन त्यांच्या ऐवजी विजेचे दिवे लावण्याचा विचार घाटत होता, व कांहीं कांहीं रस्त्यांवर त्यांचा उपयोग सुद्धां केला होता; परंतु, हे दिवे राहून राहून मध्येंच नाहींसे होत; ह्यामुळे एकदम अंधार पडे, असें जेव्हां होऊ लागलें तेव्हां ते मुळींच काढून टाकून ग्यासचेच दिवे हल्लीं उपयोगांत आणतात.

**११. शौचकूप**– शौचकूप साफ करण्यात भंगी असतात. हे लोक पहांटे चार वाजल्यापासून तों सकाळीं दहावाजत तोपर्यंत आपलें काम करितात. ज्या ठिकाणीं शौचकुपाचे पाणी रस्त्यावरील मोठ्या गटारास मिळविण्याची सोई नसते, त्या ठिकाणीं जमिनीत टांकीं केलेलीं असतात. तेथें तें पाणी सांठवितात. टांकी रात्री १२ नंतर किंवा सकाळीं ८ वाजता तों भंगी लोक साफ करून टाकितात. हें टांक्यांचें पाणी नेण्याच्या गाड्या असतात. अलीकडे समुद्राचें पाणी शहरांत आणून तेणेंकरून शहरांतील सर्व शौचकूप व गटार साफ करवून ती घाण समुद्रास मिळवावी ह्या इराद्याने लक्षावधि रुपये खर्चून मोठमोठे गटार खणण्याचें काम नेहमी चाललें आहे. हा बेत सिद्धीस जाईल तेव्हां खरा !

**१२. भाडोत्री व घरगुती गाड्या**– ह्या शहरांत गाडींत बसणें झाल्यास शहरांतील प्रसिद्ध ठिकाणीं व्हिक्टोरियावाले, शिग्रामवाले, रेकलेवाले वगैरे आपापली स्थलवाहनें घेऊन तयार असतात. पाहिजे त्या वेळीं हीं स्थलवाहने पाहिजे त्यास भाड्यानें मिळूं शकतात. ह्यांच्या भाड्याचें मान साधारणपणें व्हिक्टोरिया गाडीस दर मैलामागें ४ आणे व रेकल्यास ३ आणेप्रमाणें असतें. पालखीत बसणें झाल्यास त्याही मिळूं शकतात. ह्या गाडीवाल्यांस शहरांत मोठा समारंभ अगर जत्रावगैरे कांही मोठें कृत्य असल्यास नित्यापेक्षां बरीच ज्यास्त पैदास होते. कारण ते अशा प्रसंगीं भाडें अगदीं चापून घेतात. हे लोक बरसातींतही अडवून ज्यास्त भाडें घेतात. कित्येंक प्रसंगीं भाडोत्री गाडीवाल्यांचें वर्तन फार गैर असतें. एकादा नवखा किंवा भोळसर मनुष्य असल्यास गालीप्रदानाचीही

वेळ कधीं कधीं येते. शहरांत एकीकडून दुसरीकडे ओझ्याचें सामान नेणें झाल्यास 'खटारें' असतात. ज्या कोणास मुदतीनें १ घोड्याची किंवा २ दोन घोड्यांची गाडी पाहिजे असल्यास शहरांत भाड्यानें गाड्या देणारांचे मोठमोठे कारखाने आहेत त्यांत मिळूं शकते. अशा गाड्यांस फार पैसा पडतो. **मुंबई**त ट्राम गाड्यांची मोठी सोई आहे. एक घोड्याच्या ट्राम गाडींत साधारणपणें २४ माणसें बसण्याची सोई केलेली असते. दोन घोड्यांच्या गाडींत ४८-५० पर्यंत मनुष्यें बसूं शकतात. ह्या गाड्या चालत असतांना एकाएकीं थांबविता येतात. गाडी हांकणारा उभाच असतो. गाडींत बसणारांपासून पैसा घेण्याकरितां जो मनुष्य मागें उभा असतो त्यास 'कंडक्टर' ह्मणतात. तो पैसा घेऊन त्याच्याबद्दल ज्या जागीं उतरायाचें असेल त्या जागेचें टिकिट देतो. हीं टिकिटें तपासण्याकरितां इन्सपेक्टर असतात ते दिवसभर एका गाडींतून दुसऱ्या गाडींत, दुसरींतून तिसरींत याप्रमाणें टिकिटें तपासीत फिरत असतात. ह्या टिकिटांस 'बक्षीसचिठी' ह्मणतात. बक्षीसचिठी ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं, प्रत्येक महिन्याचे शेवटीं टिकिटांच्या नंबरांची सोडत काढतात व तींत ज्याचा नंबर येईल त्यास दहा व शंभर रुपयांचीं बक्षीसें लावलेलीं असतात त्यांतून ज्याच्या नंबरास जें येईल तें त्यास मिळतें. प्रत्येक गाडी अमुक ठिकाणाहून अमुक ठिकाणीं जाणार असें लोकांस समजावें म्हणून गाड्यांवर पाट्या लावतात. रात्रीं अंधारांत पाट्यांचा उपयोग होत नाहीं म्हणून त्यांच्या ऐवजीं तांबडे, हिरवे, पिंवळे अशा रंगांचीं भिंगें फाणसास बसविलेलीं असतात. ह्या सर्व गाड्या लोखंडी रुळांवर चालतात. असे रस्ते ट्रामवे कंपनीनें सर्व शहरभर केले आहेत. हे रस्ते अडचणीच्या ठिकाणीं एकच गाडी जाण्यापुरते असून मोठ्या रस्त्यावर दोन गाड्यांच्या सोईचे आहेत. **वांदरें, माहिम, दादर** वगैरे ठिकाणीं जाणें झाल्यास आगगाडींतून जावें यावें लागतें. पूर्व बाजूस जी. आय. पी. रेलवे आणि पश्चिम बाजूस बी.बी आणि सी.आय.रेलवे अशा दोन रेल्वे आहेत. ह्या रेल्वेच्या गाड्या प्रत्येक अर्ध्या तासास अनुक्रमें **कल्याण व वांदरें** येथें जाणाऱ्या येणाऱ्या असतात. ह्या गाड्यांतून पुष्कळ लोक 'पास' काढून ऑफिसांत जातात. पासीचा दर फार थोडा आहे. ह्या पासी तिमाही काढाव्या लागतात. सहामाही अगर जशी ज्यास सोई असेल तशीही काढणारे लोक पुष्कळ आहेत. याप्रमाणें शहरांत सहज फिरणें अगर धंद्यारोजगारास जाणें झाल्यास गाड्यांची सोई असते ; पण, ह्या सर्व सोई ज्याच्या खिशांत दोन पैसे असतील त्याच्याकरितां.

**१३.** गव्हर्नर साहेब नेहमीं दोन घोड्यांच्या गाडींत बसतात ; परंतु, त्यांस 'लेव्ही' किंवा दुसरा एकादा राजकारणी दिवस असल्यास चार घोड्यांची गाडी असते. राजेरजवाडे शहरांत आले तर बहुतकरून दोन घोड्यांच्या गाडींत बसतात. ह्यांच्या गाडीमागें त्यांचे स्वार असतात. गव्हर्नर साहेबांच्या गाडीमागें नेहमीं दोन स्वार असून मोठ्या समारंभाचे दिवशीं सुमारें चाळीस घोडेस्वार असतात. चार घोड्यांची गाडी असली तर, घोड्यांच्या पाठीवर एक हांकणारा बसतो. शिवाय मुख्य गाडी हांकणारा असतो तो निराळाच. शहरांतील श्रीमान लोक आपापल्या योग्यतेप्रमाणें १ किंवा २ घोड्यांच्या गाड्या ठेवतात. अशा गाड्यांची संख्या सुमारें १०-१२ हजारांवर होईल. कित्येक लोक गाड्यांशिवाय बसण्याकरितां घोडे ठेवतात. हे घोडे **अरबस्थान, इराण, पेगू, काठेवाड** वगैरे ठिकाणांहून येतात. ह्या घोड्यांखेरीज गांवठी वगैरे बहुत जातींची दुसरी घोडीं **मुंबईंत** पहाण्यांत येतात. सकाळ संध्याकाळ साहेब व मडमा घोड्यावर बसून फिरतांना दृष्टीस पडतात. मडमांची घोड्यावर बसण्याची रीति पुरुषांप्रमाणें नसून, त्या घोड्याच्या एकाच बाजूला आपले दोन्ही पाय टाकून बसतात. ह्मणजे घोड्याचें तोंड पूर्वेस तर ह्यांच्वें दक्षिणेस अगर उत्तरेस. ह्यांस बसण्याकरितां जीं जिनें केलेलीं असतात, त्यांची अशी कांहीं योजना केलेली असते कीं, घोडा कितीही भरधांव फेंकला तरी त्यांस पडण्याची मुळींच भीति नसते. कित्येक शोकी लोक लोखंडी गाड्यांवर बसून फिरतात. ह्या गाड्या पांच सहा प्रकारच्या **मुंबईत** आज मितीला पहाण्यांत येतात. एक चाकापासून ते ४ चाकांपर्यंत. ह्या गाड्यांचा वेग घोड्यांच्या धांवेबरोबर आहे, किंबहुना, ज्यास्त ह्मटला तरी चालेल. ह्या गाड्या बसणारानें पायानें चालविण्याच्या असतात म्हणून गाडीवर बसणारानें आपल्या आंगाचा सर्व तोल सारखा धरून पाय न चुकवितां गाडी चालविली पाहिजे. भरधांव जात असतां ह्या गाड्या पाहिजे तिकडे वळतां येतात. एकदां का पाय चुकला कीं एक चाकी गाडीवर बसणारा मनुष्य पडलाच समजावयाचा. दोन चाकांपासून अधिक चाकांच्या गाड्या कांही बऱ्या. चार चाकी गाड्या पायांच्या योगानें मागें बसण्याकरितां केलेल्या जागेंत बसून चालवितात ह्या गाड्यांस घोड्यांच्या गाड्यांप्रमाणें कंदील असतात. कांही वर्षांपूर्वी **मुंबईंत**

'आमनिबस' नांवाची एक कंपनी निघाली होती तिच्या गाड्या भाड्यानें मिळत. ह्या गाड्यांस घोडे जोडीत. ह्या गाडींत बसणें मोठें जोखमाचें असे. कारण गाडींत कांहीं माणसें बसून गाडीवरही कांहीं बसत; तेणेंकरून वर असलेल्यांस पडण्याची भीति विशेष. ह्या गाड्यांस 'जनरथ' म्हणत. ह्या गाड्या व **मुंबई**तील बगीवाले, शिग्रामवाले, रेकलेवाले वगैरे लोकांचें तपेलें ट्रामवे सुरू झाल्यापासून बुडालें. हल्लीं शहरांतील भाडोत्री गाड्यांत ट्रामगाडींसारखें उत्पन्न दुसऱ्या कोणत्याच गाड्यांस होत नाहीं.

१४. भाडोत्री गाड्यांस छाप असतो. त्यावर गाडीचा नंबर असून गाडी हांकणाराचे गळ्यांतही एक बिल्ला असतो, त्यावर त्याच गाडीचा नंबर असून तो नंबर त्या गाडीचा हांकणारा असें व्यक्त करितो. व्हिक्टोरियावाले जे असतात त्यांस मालकाचा लायसन्स घ्यावा लागतो आणि व्हिक्टोरिया हांकणारांसही निराळा लायसन्स मिळतो. त्याजवर हांकणाराचा चेहरा (फोटोग्राफ) लावतात. शिवाय त्याजजवळ एक 'निरखा' चें बुक (फेर बुक) देतात. ह्या बुकांत अमुक ठिकाणांहून अमुक ठिकाणीं गाडी नेली असतां किती पैसा द्यावा वगैरे माहिती असते. अलीकडे व्हिक्टोरियावाल्यांस कमरपट्टे देतात. परवाने द्यावयाचे ते दरसाल जानुआरी महिन्यांत किंवा कोणतेही वेळीं देण्यांत येतात. हे पट्टे बदलण्याबद्दल सरकारांत फी भरावी लागते ती येणेंप्रमाणें :—

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| व्हिक्टोरिया दर वर्षास- | ३— | २— | ० |
| रेकले . . . . | १— | १०— | ० |
| खटारे . . . . | १— | ६— | ० |

१५. पालखीस सरकारानें ठरविलेंले भाडें असें आहे :—

**चार हमालांची पालखी**— कोणताही टप्पा ४ मैलांचे वर नसल्यास व्हिक्टोरियाप्रमाणें भाडे पडतें. व खोटी केल्यास दर कलाकास चार आणे. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत सगळे दिवसास रु. २॥.

**सहा हमालांची पालखी**— कोणताही टप्पा ४ मैलांचे वर असल्यास क्याब नांवाचे गाडीप्रमाणें. खोटी केल्यास दर कलाकास ६ आणे. सगळे दिवसास रु. ३।।.

**१६.** कोणताही भाडेत्री घेऊन जाण्याकरितां अड्ड्यांवरून किंवा कांहीं अंतरावरून जर भाड्याचें स्थलवाहन बोलावून आणलें असेल तर, त्या वाहनाचे हांकणारास ठरविलेले जागेचें वाजवी भाडें देऊन जेथून तें वाहन आणलें असेल, त्या अंतराचें जें भाडें होईल त्याचे निम्मे आणखी ज्यास्ती भाडें द्यावें लागतें.

**१७. धंदेवाले लोके**— ह्या शहरांत घड्याळें नीट करणारे व घड्याळें विकणारे ह्यांचीं दुकानें जागोजाग दृष्टीस पडतात. **मुंबई**मध्यें जवळ घड्याळ नाहीं असे लोके फारच थोडे असतील. अलीकडे घड्याळें इतकीं स्वस्त होऊन गेलीं आहेत कीं, ८ रुपयांस देखील तीं मिळूं शकतात ! पानवाल्यांचीं दुकानें, पगडबंदांचीं दुकानें, डाक्तर व वैद्य लोकांचे दवाखाने, सोनारांचीं दुकानें, मारवाड्यांचीं दुकानें, दारूची पिठीं, किराणामाल विकणारांचीं दुकानें, वगैरे नानातऱ्हेचा धंदा करणाऱ्या लोकांचीं दुकानें जागोजाग आहेत. रस्त्यावर एकादें दुकानत नाहीं असा रस्ता **मुंबई**त मिळावयाचाच नाही ! तांबोळी लोक पान विकण्याचा धंदा करितात. पगडबंद आपली दुकानें एकाद्याच्या ओटीवर, कोणाच्या तरी दुकानांत अगर एकादी लहानशी कोठडी भाड्यानें घेऊन तेथें घालतात. ह्यांजकडे नेहमीं पागोट्यांचा ढीग पडलेला दृष्टीस पडतो. ही पागोटीं कोणी पायांवर व कोणी बांधण्यासाठीं मुद्दाम ठोकळे केले असतात त्यांजवर बांधतात. गुजराथी लोकांच्या आणि पारशी लोकाच्या पगड्या ह्या नेहमीं ठोकळ्यावरच बांधतात. सोनार लोकांचींही दुकानें पगडबंदांसारखींच कोणाच्या तरी ओटीवर असतात. दक्षणी लोकांस अलीकडे पुण्याच्या पगड्या फार पसंत पडूं लागल्या आहेत. डाक्तरांचे दवाखाने लहानशी कोठडी भाड्यानें घेऊन त्यांत घालतात. साधारण दवाखान्याचा थाट—एक कंपौंडर (औषधें देणारा) एक टेबल, खुर्ची व एक दोन बाटल्यांनी भरलेलीं कपाटें एवढा असतो. वैद्य लोकांच्या दुकानीं एकाद दुसरें कपाट व एकादी चटई हाच काय तो सरंजाम. मारवाडी तर ह्या शहरांतल्या प्रत्येक

गल्ली कुच्चीत असायचाच. हे लोक **मारवाडांतून** येतात त्या वेळी त्यांजवळ एकादी तपेली, फाटकें पागोटें, व आंगांत खादीची बंडी एवढी काय ती संपत्ति असते. पण तेच मुंबईत आले म्हणजे, आपल्या एकाद्या स्वजातीयाच्या दुकानांत चाकरीनें राहून पुढें हळुहळू दुकानांत दिडकी पासून भाग ठेवून वाढत वाढत बरीचशी रक्कम हातांत खेळूं लागली म्हणजे स्वतः दुकान काढतात. ह्या लोकांचा इतर लोकांस फसंविण्याच्या कामीं हातखंडा असतो. १०० रुपये देऊन १२५ लिहून घ्यावयाचे व त्या रुपयांचें व्याज पैसे देण्यापूर्वीच कापून घ्यावयाचें, असा ह्यांचा धंदा असतो. पुढें रिणकोजवळून व्याज, चक्रवाढव्याजानें पैसा घेऊन शेवटीं न दिल्यास कोर्टात फिर्यादी करून पैसा उगवून घेतात. ह्या लोकांची कोर्टाचे बेलिफाचे दारीं सकाळचे प्रहरीं बरीच गर्दी दृष्टीस पडते. हे लोक जरी अशा जुलमानें पैसा घेतात, तरी हे लोक आहेत ह्मणूनच मुंबईतील गरीब लोकांची अब्रू आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाही. कारण कोणी कसाही मनुष्य येवो त्यास हे लोक पैसा देण्यास तयार. त्यानें साधारण आपली ओळख दिली ह्मणजे पुरे. असें केल्यानें त्यांचा कांहीं पैसा बुडतो खरा, तथापि बुडविणारांची संख्या फार थोडी असते. कित्येक मारवाडी मोठमोठे व्यापारी असून त्यांचा नेहमीं लाखो रुपयांचा व्यापार चालतो. ह्या लोकांचा एकच धंदा असतो असें नाहीं. कोणी दागिने करून विकतो; कोणी दुकानदारी करतो; कोणी भांड्यांचा व्यापार करतो; कोणी तेल विकतो ; असे अनेक धंदे हे लोक करितात. ह्या लोकांचे न्हावीही त्यांच्याच जातीचे असतात व ह्या लोकांची अशी कांहीं खुबी आहे कीं, ते आपल्या जातींच्या हजामाशिवाय इतरांजवळ कधींच हजामत करवीत नाहींत. मारवाड्यांत **फत्तेपुरी, अजमिरी**

---

[१] इ.स. १६१७ पर्यंत इंग्रजी दारू **हिंदुस्थानांत** येत नसे. ह्या वेळीं येथे पंच नांवाची दारू वापरीत असत. ह्या 'पंच' दारूविषयी "बुक आफ् बाँबे" ह्या पुस्तकांत असें लिहिलें आहे:-

Punch and Toddy are both inventions of Western India. Punch means five, the ingredients being lime-juice, rose-water, sugar,arrack and water. *Tom coriyat* writing in India before A. D. 1617 says that he is drinking his friends' health in toddy.

भावार्थ- पंच आणि ताडी हे पश्चिम **हिंदुस्थानांतील** नवीन शोध होत. पंच म्हणजे पांच-लिंबांचा रस, गुलाब पाणी, साखर, मद्यार्क आणि पाणी इतके पदार्थ एकत्र केले म्हणजे पंच होतो. इ.स. १६१७ पूर्वी **टाम कारिएट** नामक गृहस्थानें आपल्या मित्रास असें लिहून कळविले आहे की, 'मीं आपल्या मित्राच्या क्षेमकुशलतेबद्दल ताडी पीत आहे.'

वगैरे ज्या दुसऱ्या जाती आहेत त्यांतील कित्येक मोठमोठे व्यापारी असून त्यांचा सट्यांचा वगैरे मोठा व्यापार चालतो. अफिणीचाही व्यापार बहुधा: हेच लोक करितात. **मुंबादेवीच्या** देवळामागें ह्या लोकांची शालींचीं वगैरे मोठमोठीं दुकानें आहेत. ह्याच ठिकाणीं मोतीवाले, सोनें, रूपें विकणारांची दुकानें आहेत. भांडींवाले, मेवामिठाई विकणारे, कापडवाले, कलालांची दुकानें, नानातऱ्हेचा किरकोळ माल विकणारांचीं दुकाने हीं तर प्रत्येक रस्त्यावर व गल्लोगल्लींत आहेत. इंग्रजी दारूचीं दुकानें अलीकडे फारच वाढत चाललीं आहेत. **कावसजी** पाटलाचे तळ्यापासून तों थेट **क्राफर्ड मार्किटा**पर्यंत हजारो तऱ्हेच्या मालाच्या दुकानांच्या रांगांच्या रांगा दुतर्फा दृष्टीस पडतात. तसेंच पुढें **मांडवी**च्या बाजूला जाऊं लागलें ह्मणजे हजारो मजूर खपत आहेत आणि ते आपल्या श्रमाचा परिहार व्हावा ह्मणून उच्च स्वरांवर गाणीं गात आहेत असें दृष्टीस पडतें. **कोटांतील मांडवी**वरही अशाच तऱ्हेची मजा पाहण्यात येते. दक्षिण बाजूस पाहिलें तर अफाट समुद्र दृष्टीस पडतो व त्यांत आगबोटी, तिर्कटी तारवें, बतेले, ज्यालीबोटी, तराफे, बगले, फत्तेमाऱ्या, मचवे व लहान लहान होड्या ह्यांची एकच मजा दृष्टीस पडते. लहान लहान होड्यांतून मचवेवाले इकडून तिकडे माल नेता आणतांना त्यांची धांदल उडालेली पाहून हें बंदर केवळ नाचतच आहे कीं काय, असा पाहणारास भास उत्पन्न होतो. धक्क्यावर पाहिलें तर कोठें घोडे उतरत आहेत; कोठें नानातऱ्हेचें लोखंडी व पोलादी सामान उतरत आहे ; कोठें कापडाचे गट्ठे पडले आहेत; कोठें यारीच्या योगानें जहाजांतून अगर बोटींतून मोठ्या झपाट्यानें मालाचे गट्ठेच्या गट्ठे धक्क्यावर येऊन पडत आहेत; तसेंच धक्क्यावरील मालाचे गट्ठेच्या गट्ठे बोटीत जाऊन पडत आहेत; कोठें कामगार लोक माल तपासीत आहेत.; कित्येक खटारेवाल्यांची माल गाडीत भरण्याची एकच धांदल उडाली आहे आणि कित्येंक आणलेला माल बोटीत भरीत आहेत. असे नानातऱ्हेचे चमत्कार पाहणाराचें मन थक्क करून टाकितात.

१८. मुंबईंत धंदा नाही असे लोक फार थोडे सांपडतील. प्रत्येकास कांहींना कांहीं तरी धंदा आहेच. रस्त्यावरून मोलकरी ज्यांस 'हेलपाटीवाले' ह्मणतात ते नेहमीं आपणांस कोणी हेल देईल किंवा कोणी हाक मारील म्हणून वाट पहात बसतात. हे लोक बहुधाः बाणकोटी किंवा घाटी असतात. आंधळे लोक रस्त्यावर मोठ्यानें ओरडत फिरतांना किंवा मुख्य **रहदारीच्या रस्त्यावर** दुगाणी मागण्याकरितां बसलेले पहाण्यात येतात. **क्राफर्ड** मार्केटापासून तों थेट **कोटाच्या** दरवाज्यापर्यंत गुजराथी भट आपापली पंचागें काढून लोकांचे हात व ग्रह पाहत बसलेले दिसतात. भिकारी लोक भिक्षावृत्तीचा धंदा करून पोट भरतात व पोटाला खाऊन दाणा उरेल तो भिकार बाजारांत नेऊन विकतात. नवीन नवीन कारखाने रोज निघत असल्याकारणानें सुतार,गवंडी मजूर वगैरे नानातऱ्हेचे धंदे करणारे लोक आपापलीं पोटें भरतात. असे लोक **दोन टांकीवर** रोज सकाळचे दहा वाजत तोंपर्यंत बसलेले दृष्टीस पडतात. लोकांच्या घरीं चाकरी करण्याचें काम बाणकोटी लोक करतात. पारशी, साहेब यवनादिक अविंद जातींकडे चाकरी करणारे किरिस्तांव, व सुर्ती धेडी असतात. शहरांत रस्तोरस्तीं, मुख्य मुख्य बाजारांच्या ठिकाणीं व रेलवे स्टेशनावर हेलकरी लोक असतात; त्यामुळें कोणाचें सामान सुमान नेणें आणणें झाल्यास फारसे प्रयास पडत नाहींत. पांढरपेशे लोक चाकरी धंदा करितात. इतर यवनादि जातींचेही लोकही शिकलेले असल्यास चाकरी धंदा करितात. साहेब लोक हे कित्येक मोठमोठे कामदार असतात, कित्येक व्यापार करितात, व कित्येक दलालीचा धंदा करितात. वाणी, भाटे, पारशी, खोजे मुसलमान हे लोक व्यापार उदीम करतात. ह्याप्रमाणें कोणी कांहीं कोणी कांहीं असे नानाप्रकारचे धंदे करून आपापला उदरनिर्वाह करितात. घाटी, मुसलमान वगैरे लोकांतील कित्येक बायकापोरें सुद्धां गिरण्या वखारी वगैरे कारखान्यांत नोकरी करून पैसा मिळवितात. सारांश ह्या शहरांमध्यें निरूद्योगी लोक फारच थोडे सांपडतील. साधारण लोकांत अशी एक ह्मण आहे कीं '**मुंबई** सर्वांचे माय पोट आहे.' कोणी कसाही मनुष्य येथें आला तरी त्यास त्याच्या योग्यतेनुरूप कांहींना कांहीं तरी धंदा मिळतोच. कारण येथें शेंण, माती ह्यांना देखील पैसा पडतो ! अशी स्थिति असतां निरुद्योगी मनुष्यास मुंबईंत एक दिवसही काढणें किती कठीण आहे हें येथें निराळें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

१९. **आगबोट**– बंदरांत गेलें ह्मणजे तेथें असलेल्या आगबोटी वगैरे पहाव्या अशी मनुष्यास साहजिक जिज्ञासा उत्पन्न होते. तर आतां आपण अंमळ पाण्यांत जाऊन एखाद्या आगबोटीची मजा पाहू या.

२०. प्रथमतः आगबोट पाहणें झाल्यास त्या आगबोटीवरील लहानशी शिडी चढून जावयाचें. ती शिडी चढून गेलें ह्मणजे मनुष्य अगदीं आगबोटीच्या वरच्या भागावर जातें. त्या ठिकाणीं असलेल्या लहान सहान होड्या, वाफेचीं यंत्रें, वरून खालीं व खालून वर सामान घेण्याची ठिकाणें, होकायंत्राची खोली, आगबोट बुडावयाची अगर आग लागली आहे हें उतारू लोकांस सुचविण्याची जागा, तोफा, व इतर नेहमीचें सामान वगैरे पाहून झाल्यावर, मनुष्य तेथें असलेल्या दरवाजांतून खालच्या मजल्यावर जातें. आगबोटींत गम्मत ही असते कीं, मजा पाहणें ती वरून खालीं पाहत उतरावयाचें. तीच आपणास एखादी इमारत पहावयाची असली तर खालून वर जावें लागतें. तशी गोष्ट आगबोटीची नाहीं. तर, आपणांस वरून खालीं जावें लागतें. खालच्या मजल्यावर गेलें ह्मणजे पहिला, दुसरा, असे वर्ग लागतात. पहिल्या वर्गाच्या लोकांस सुख व्हावें ह्मणून फारच नामी सोई केलेली असते. त्यांच्या जेवणाची सोई उत्तम मेजांनी व रेशमी खुर्च्यांनीं केलेली असते. ह्या खुर्च्या हव्या तशा त्यांस खालचे पावके न हालवितां फिरवितां येतात. शेजारीं स्वयंपाकाची जागा असते. निजावयाला, पोषाग करावयाला व जरूरीचें सामान ठेवावयाला लहान लहान व सुंदर अशा खोल्या असतात. ह्यांस 'केबिन' ह्मणतात. दरएक केबिनीमध्यें बहुतकरून तीन उतारूंचा समावेश होतो. एकेका केबिनींत उंच फळ्या बसवून त्यांवर बिछाने घातलेले असतात. ह्या निजण्याच्या जागेस 'बर्थ' असें ह्मणतात. एकेका बर्थावर सुंदर पडदे टांगलेले असून ते वर किंवा खालीं सोडतां येतात. ह्या योगानें प्रत्येका केबिनींतल्या उतारूंस एकमेकांची मर्यादा राखतां येते. दर केबिनींत तोंड धुण्याकरितां 'वॉशिंग टेबल' असतें व आरसे फण्या वगैरे उतारूंच्या सोईकरितां ठेवतात. ह्या केबिनी चाकर माणसें नित्य झाडून धुऊन साफ करतात. बिछाने करण्याचें व त्याजवरील चादर आठाठा

दिवसांनी बदलण्याचें, खोलींत रोज सायंकाळीं दिवाबत्ती करण्याचें, व बूट पुसून साफ करण्याचें काम चाकराचें असतें.

२१. जेवणाचे सोईकरितां निराळी जागा असते त्या जागेवर मोठें टेबल असून त्यावर वारा घालण्याकरितां पंखे टांगलेले असतात. जेवण झाल्यावर ईश्वरप्रार्थनादि विधि आटोपून उतारू लोक कर्मणुकीकरितां स्त्रिया व पुरुष एकत्र जमून वाद्यें वाजवितात. पहिल्या वर्गाच्या उतारूंस हिंडण्याफिरण्याची मोठी सोई केलेली असते. स्नान करण्याच्या निराळ्याच खोल्या असतात. स्नानास उन्ह किंवा थंड जसें पाणी हवें असेल तसें मिळतें. प्रत्येक न्हाण्याच्या खोलींत एक मोठें टांकीसारखे भांडे असतें त्यांत सपशेल पडून आंग चोळतां येतें. व त्यास असलेली कळ फिरविली म्हणजे समुद्राचें ताजे पाणी आंत येऊन पडतें. तशीच त्यास असलेली गुडदी काढली म्हणजे तेंच पाणी पुनः समुद्रांत जातें. शौचास जाण्याची जी खोली असते तीस 'क्लॉसेट' ह्मणतात. सकाळी उठतांच प्रत्येक उतारूंस चहा येतो. साडेआठ नऊ वाजतां न्यहारीची वेळ, आणि दोनप्रहरीं टिफीणीची वेळ होते. संध्याकाळी चार वाजतां जेवण तयार होतें. भोजनोत्तर फळफळावळ खावयास मिळते आणि पुनः संध्याकाळी साडेसहा वाजतां काफी किंवा चहा येतो.

२२. ही सर्व गोष्ट पहिल्या प्रतींतील किंवा केबिनींत असणाऱ्या उतारूंची. दुसऱ्या प्रतीचे उतारू आगबोटीच्या पश्चात्‌भागीं मागाहून जेवतात. आगबोटींत अन्नपाण्याचा मोठा संग्रह करून ठेवलेला असतो. आगबोटीचा कप्तान आगबोटीवरील सर्व अधिकाऱ्यांत मुख्य असतो. त्याच्या हाताखालीं मालीम, इंजिनिअर, कोठारी, डाक्तर, क्रू (खलाशी) वगैरे सर्व मंडळी असते. कप्तानास आगबोट चालविण्याच्या कामीं मदत करणें, आगबोट कोणत्या ठिकाणीं आली आहे किंवा कोणत्या ठिकाणीं खडक वगैरे आहे याची चौकशी करणें, सुकाण्याला हुकूम करणें, नियमित वेळांत आगबोट किती मैल चालली ह्याचें टांचण ठेवणें, वाऱ्याच्या दिशेप्रमाणें आगबोटीचीं शिडें चढविणें किंवा उतरविणें वगैरे कामें मालिमाचीं होत. इंजिनिअराचें काम यंत्रांची खबरदारी ठेवावी एवढेंच. कोठारी सर्वांस धान्य पुरवितो; ह्यास 'पर्सर' ह्मणतात. डाक्तराचें काम उतारूंस औषधोपचार करण्याचें असतें. सारादिवस आणि सारी

रात्र आगबोट चालत असते व त्यामुळें 'धब धब धब' असा तिचा मोठा आवाज होत असतो.

२३. मुख्य जेवणाची जागा एकाद्या मोठ्या दिवाणखान्याप्रमाणें असून बाकीची जागा मध्यें लहानसा रस्ता ठेवून दोन्ही बाजूंनी खोल्यांनीं भरून काढलेली असते. तेथें जाऊन बसलें असतां पहाणारास मी आगबोटींत आहें असें वाटावयाचें नाहीं. पण जर तो वर येऊन पाहील तर मात्र त्यास तसें वाटेल. ते लहान लहान दरवाजे, ते चिमुकले जिने, ते अरुंद रस्ते, त्या सर्व प्रकारच्या सोई आणि त्या अशी आगबोट बांधणाऱ्या शिल्पकारांची कुशलता पाहून मनास एक प्रकाराचा आनंद झाल्यावांचून कधींच रहात नाहीं. ज्या वेळेस आगबोटींतून सामान काढतात त्या वेळेस एका प्रकारची विलक्षण मौज दृष्टीस पडते. २५-२५, ३०-३० गड्डे बांधतात केव्हां, आगबोटींत सोडतात केव्हां, आणि हें सगळें काम अवधीं दोन मनुष्यें करतात कशीं ? इत्यादि चमत्कार पाहून एकादा नवीन पाहणारा तर अगदीं भांबावून जावयाचाच !

२४. पि. आणि ओ. कंपनीच्या आगबोटी प्रसिद्ध आहेत. ही कंपनी नवीन आगबोटी वारंवार तयार करविते. हीच कंपनी दर शुक्रवारीं सरकारी टपाल (मेल) विलायतेस नेते. ह्या कंपनीची 'व्हिक्टोरिया' नांवाची आगबोट नुकतीच **मुंबईस** आणली होती, ती पाहण्यास लोकांचे थव्यांचे थवे लोटत असत, त्या वेळीं बंदरांतील इतर लहान ज्याली बोटवाल्यांची पोळी पिकली होती. ही आगबोट **एडनहून** ४ दिवस, ११ तास व २५ मिनिटांत **मुंबईस** आली. ह्या पूर्वी एवढ्या थोड्या अवकाशांत कोणतीच आगबोट आलेली नव्हती. **मुंबई** बंदरांत नेहमीं असल्या आगबोटी, चिखल काढणाऱ्या आगबोटी, तिर्कटी तारवें, बतेले व इतर लहान सहान होड्या इकडून तिकडे जातां येतांना बंदर अगदीं फुलून गेलेलें दिसतें. ही विलक्षण शोभा पाहून पाहणाराचे मनास घटकाभर आनंद होणार नाहीं असा मनुष्यच सांपडणे कठीण !

२५. ह्या शहरांत अगदीं पहाटे ह्मणजे ४ पासून ६ चे आंत "मिठो निरो" किंवा "निरो मिठो" ह्मणून एका प्रकारचें मद्य घेऊन कांही लोक पारशी वगैरे लोकांच्या वस्तींतून फिरत असतात. पुढें सकाळीं सहापासून

तों सुमारें अकरा वाजत तोंपर्यंत भाजी, मीठ, नारळ, तांदूळ, तेल, तूप वगैरे नाना तऱ्हेचे जिन्नस विकणारे लोक आपापल्या मालांची नांवे घेऊन मुखानें चमत्कारिक स्वर काढीत दारोदार फिरत असतात. सुमारें नऊ वाजल्यापासून तों अकरा वाजेपर्यंत ऑफिसांत जाणाऱ्या मंडळीची, आणि त्याचप्रमाणें व्यापारी लोकांची उद्योगधंद्याला जाण्याची एकच घाई उडून गेलेली दृष्टीस पडते. जे ते आपापल्या ऐपतीप्रमाणें कोणी रेकल्यांत, कोणी व्हिक्टोरियांत, कोणी स्वतःच्या गाडींत, कोणी पायीं, कोणी आगगाडींत, कोणी ट्रामवेंत बसून दोन घास खा खा करून धांवपळ करीत आपल्या उद्योगधंद्यावर 'टाइम' मध्ये जातां यावें म्हणून धापा टाकीत चालले आहेत. याप्रमाणें दोन अडीच तास रस्ता कसा अगदीं गजबजून जातो. दोन प्रहराच्या समयास गांवांतील अर्धी अधिक मंडळी गांवांत नसते असें ह्मटलें तरी चालेल. कारण जो तो आपापल्या कामधंद्यावर जात असतो. अशा समयीं कांसार, कापडवाले, भांडी पातेलींवाले, खारापिस्तावाले, चुरमुरेवाले, चांदले पोतवाले, हिराहिंगवाले, मेवामिठाईवाले, वगैरे फेरीवाले लोक आपापला जिन्नस घेऊन रस्त्यांतून फिरत असतात. पुढें चार वाजल्यापासून दीपदर्शनापर्यंत ग्यास तेल विकणारे, आगीच्या पेट्या विकणारे वगैरे लोक आपापला माल घेऊन ओरडत फिरत असतात. पांच वाजल्यापासून ऑफिसांतील लोक सुटून त्यांची कोणी गाडींत, कोणी पायीं अशी तांतडीनें घरीं येण्याची सुरुवात होते. पायीं चालणारांचा रात्रीचे सात वाजत तोंपर्यंत **राणी**चे पुतळ्यापासून तों **मनिरकुला**पर्यंत एकसारखा थव्याचा थवा चाललेला असतो. त्या वेळीं त्या दुतर्फा झाडांच्या रांगांतून अनेक जातींचे पोषागांचा पागोट्यांचा व जो कांही चमत्कारिक देखावा दिसतो तो अवर्णनीय होय. येथून पुढें कोणी मार्केटाकडे जातो, कोणी थेट आपल्या घरचा रस्ता धरतो किंवा कोणी कांही दुसऱ्या उद्योगाला जातो. उन्हाळ्या रात्रीं बर्फ विकणारे, कलिंगड विकणारे, गंडेरी विकणारे, सोडावाटर विकणारे वगैरे लोक फिरत असतात. मुसलमान फकीर 'दोहरे' 'सवाल' वगैरे ह्मणत, व इतर भिक्षेकरी लोक हातांत टाळविणा घेऊन देवादिकांचीं पदे वगैरे गात दारोदार फिरतात. रस्त्यावर पहावें तें कोणी नाटक पाहण्यास चालले आहेत; कोणी काहीं उद्योगाला जात आहेत; कोणी आपापल्या माडीवर गाणें बजावणें करीत बसले आहेत; कोणी रस्त्यानें

चालतांना हळूच वांकडी नजर करून वेश्याजनसमूहाकडे पाहत आहेत; कोणी देवळांत देवदर्शन घेत आहेत; कोणी कथापुराणें ऐकत बसले आहेत; कोणी पोथी वाचीत आहेत आणि विद्यार्थी आपापले अभ्यास करण्यांत गुंग होऊन गेले आहेत. अशी नानाप्रकारची गम्मत सुमारें रात्रीचे नऊ दहा वाजत तोपर्यंत एकसारखी ज्यारीने चाललेली पाहण्यात येते. दहा पुढें हळुहळू जेथें तेथें सामसूम होत जाऊन बारांचे सुमारास फारच शांतता होते. अशावेळी पोलिसचे शिपाई पाहरा करीत फिरत असतात व त्यावेळी जर एकादा भलताच मनुष्य भेटला तर त्याची चौकशी करितात.

२६. **ठकबाजी**–ह्या शहरांत जसे चांगले लोक आहेत तसेच लबाड, ठकबाज, भोंदू, भामटे, जुगारी वगैरे बदमाष लोकांचाही भरणा आहे. हे लोक रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या लोकांवर केव्हा कोणता प्रसंग आणितील, ह्याचा मुळींच नेम नसतो. कोणी वैद्याचें सोंग घेतात; कोणी लोकांचे खिसे कातरितात; कोणी लहान मुलांच्या आंगांवरील दागिने लांबवितात; कोणी नानातऱ्हेचीं सोंगें घेऊन लोकांपासून पैसा उपटितात; कोणी किमया करण्याची आशा दाखवून लोकांस फसवितात. असे अनेक लोक अनेक सोंगें ढोंगें करून गरीब व भोळे लोकांस कसे नाडितात ह्याचें वर्णन करणें फारच दुरापस्त गोष्ट होय. तरी पण, ह्या लोकांचा दुष्ट हेतु सिद्धीस नेण्याच्या कशा सफाईदार युक्ति असतात व तेणेंकरून ते बोल बोलतां लोकांच्या डोळ्यांत कशी धूळ टाकितात इत्यादी गोष्टींची वाचकांस थोडक्यांत ओळख करून देणें इष्ट आहे; कारण, ह्या शहरांत अपरिचित असे शतशः लोक निरंतर येतात, त्यांस ही माहिती असल्यानें ते मोठ्या सावधगिरीनें राहतील हे जाणून ह्या ठकबाजीचीं काही उदाहरणें खालीं दिलीं आहेत.

२७. पहिल्यानें भोंदू वैद्यच घ्या. हे लोक मुसलमान असून नेहमीं रस्त्यांतून फिरत असतात आणि कोणी एकादा भोळसर मनुष्य पाहिला की, त्याच्याशीं कोणत्या तरी मिषानें प्रथम बोलण्यास सुरुवात करितात. व त्याजबरोबर तो परका गृहस्थ बोलूं लागला कीं, मध्येच आश्चर्यानें त्यास "क्यौंजी, आपका आवाज तो बहोत बैठ गया है; आपको निहायत जबर बिमारी पैदा हुवीहै;" इत्यादी प्रश्न करितो. व त्याजविषयी बहुत कळवळाही दाखवितो. मग साहजिकच तो बिचारा त्यास आपली सगळी हकीकत

सांगण्यास सुरुवात करितो. ह्याप्रमाणें तो आपल्या खिशांत पक्का उतरला असें पाहून,मधून मधून त्याच्या वयाच्या मानानें एक दोन अंतस्थ गोष्टी विचारितो. त्या ऐकतांच त्यास वाटतें कीं, हा कोणी तरी चांगलाच 'हकीम' असावा; कारण, ह्यानें आपणांस पूर्वी कधी न पाहतां फक्त आपल्या शब्दावरून आपल्या रोगाची परीक्षा केली. मग अर्थात तो गृहस्थ ह्या हकीमाची लबाडी न समजतां, औषधाकरितां त्याच्या मागे लागतो. पहिल्यानें तर हकीम साहेब उडवाउडवीच्याच गोष्टी सांगून अगदी निरपेक्ष बुद्धी दाखवितो. असें झालें ह्मणजे, त्याच्या मनात हकिमाविषयी पूर्ण विश्वास बसतो. हकीमही आपण यास जें सांगूं तें आतां हा करील हें पाहून, त्यास एकाद्या गांधीच्या दुकानीं घेऊन जातो. येथें एवढें पक्के ध्यानांत ठेविले पाहिजे कीं, ह्या दुकानदारांबरोबर असल्या लोकांचा पूर्वीच हात बांधलेला असतो. ह्या मनुष्यास दुकानीं नेल्यावर तेथें कांहीं तरी दहा पांच युनानी औषधांचीं नांवें सांगून आठ चार आण्याचा माल ह्या मनुष्याच्या पदरांत टाकवितो आणि त्याच्या जवळून दहा पांच रुपये उपटून त्यास वाटेस लावितो.

२८. **'रिंग ड्रापर्स'** ह्मणून जे लोक असतात ते रस्त्यानें जातां जातां एकाद्या पितळी आंगठीस साधारण सोन्याचा मुलामा देऊन ती एकाद्या भोळ्या मनुष्याच्या पुढें त्यास मुळींच न समजता मोठ्या शिताफीनें टाकितात; व तो मनुष्य एक दोन पावलें पुढें जातो न जातो तोंच, त्यास ती दिसते. ती तो उचलून घेतो. इतक्यांत तो लबाड मनुष्य पुढें येऊन त्यास प्रश्न करितो कीं, काय हो महाराज, आपणांस सांपडले हें काय? आपणांस दुसऱ्या मनुष्यानें पाहिलें असें समजून तो भीतभीत त्यास ती दाखवितो. ह्याच्या हातांत ती आंगठी आल्यावर तो त्या गृहस्थास ह्मणतो कीं, ही आपणांस उभयतांस सापडली असल्यामुळे मलाही अर्धा भाग मिळाला पाहिजे. अर्धा भाग देण्यास हा गृहस्थ कांकूं करूं लागला तर, त्यास अंमळ पोलिसाची भीति घातली म्हणजे तो सहज कबूल होतो. मग आपसांत त्या मालाची किंमत ठरवून, कबूल केले असतील तेवढे रुपये त्याच्या पदरांत टाकितो. रुपये पदरात पडल्याबरोबर हा ठक तेथे उभा राहतो कशाला! आंगठी घेणारा गृहस्थ मोठ्या आशेनें घरी जातो व पाहतो तों हातांत पितळ! ही धांदल बहुधा हे लोक बत्ती लागण्याच्या समयीं करितात.

२९. **पायधुणी**च्या अंमळ पुढें ह्मणजे **मुंबादेवी**च्या तलावाच्या पाठीमागें पावसास सुरूवात झाल्यादिवसापासून तों पाऊस अखेरपर्यंत ह्मणजे अर्थात अवघा चार्तुमास्य एक माठा विलक्षण तऱ्हेचा व्यापार चालतो. ह्यास आपले लोक **'पावसाचा सट्टा'** आणि मारवाडी वगैरे लोक **'बरसातका सट्टा'** म्हणतात. हा व्यापार चालण्याकरितां तेथें एक मोठी इमारत बांधिली आहे. ह्या इमारतीचे मालकास फक्त चार महिन्यांचेंच पांच सहा हजार रुपये भाडें येतें ! ह्यांत वीस पंचवीस पेढीवाले पेढ्या घालून बसतात. ते आपापसांत नफ्यावर कांहीं नियमित टक्के प्रमाणें पैसा जमवून भाड्याची फेड करितात. **पायधुणी**वर तीन मोठीं उंच घरें आहेत. त्या घरांच्या आगाशीवर पेढीवाल्यांपैकीं कांहीं लोक उभे राहून पाऊस येण्याचीं चिन्हें नेहमीं पाहत असतात. व तेथूनच कोणत्या दिशेने ढगें येत आहेत किंवा जात आहेत, ह्मणजे पाऊस आतां इतक्यांत पडेल कीं नाहीं ह्मणून, त्यांच्या कांहीं ठरलेल्या खुणा असतात त्यांच्या योगें ते पेढीवाल्यांस सुचवितात. सट्ट्याचा भाव चढणें किंवा उतरणें हें ह्यांच्या सांगण्यावर बहुधः अवलंबून असतें. ह्या सट्ट्याचे दोन प्रकार आहेत. एक **'कलकत्ता मोरी '** व दुसरा **'लकडी सट्टा.'** कलकत्ता मोरी अल्प अशा पावसानें होते; पण, लकडीला बराच पाऊस पडावा लागतो. कलकत्ता मोरी ह्मणजे एका प्रकारची चतुष्कोणाकृति पेटी असून तिला एक नळी असते. तिचें मूख बाहेर आलेलें असतें. आंत रेती भरतात. नळीच्या मुखाजवळच्या जाग्यांत मात्र रेती नसते. पाऊस पडून त्या नळींतून नियमित वेळांत पाणी बाहेर आलें कीं सट्टा लावणारा जिंकतो. आणि नळींतून पाणी बाहेर न आलें तर तो हरतो. लकडी म्हणजे एकाद्या घराच्या पन्हळास साधारण रुंदीची एक लांकडाची पट्टी आडवी लावितात ह्मणजे अर्थात त्यांतून छपऱ्याचे पाणी खालीं जाऊं नये अशी योजना केलेली असते. पाऊस बराच मोठा पडला ह्मणजे तेथें पाणी सांचून खालीं वाहूं लागलें ह्मणजे लकडी सट्टा होतो. लकडी सट्टा हा बहुधः साधण्यास कठीण असतो म्हणून लोकांचा विशेष समुदाय **कलकत्ता** मोरीकडेसच असतो. हा विलक्षण व्यापार सकाळीं सहापासून तों रात्रीं बारावाजेपर्यंत चालतो. त्यांतून सहा ते नऊ, नऊ ते बारा, बारा ते सहा, सहा ते नऊ आणि नऊ ते बारा, ह्याप्रमाणें सट्ट्याची वेळ बांधलेली असते. समजुतीकरतां घटकाभर अशी कल्पना करा कीं, कोणा एकानें

सकाळीं सहा ते नऊ पर्यंतचा सट्टा मारिला तर, तितक्या अवकाशांत पाऊस पडून सट्टा मारला असेल त्याप्रमाणे **कलकत्ता मोरी** किंवा **लकडी** ह्यांतून वर झटल्याप्रमाणें पाणी पडलें तर, सट्टा मारणारा जिंकतो; तसे न झालें तर ह्मणजे हरला तर, जेवढे पैसे लावले असतील तेवढे भरून द्यावे लागतात. आतां ह्या सट्ट्याचा भाव चार आण्यापासून तो हजार रुपयांपर्यंत असतो आणि सट्ट्याची वेळ जसजशी जवळ येत जाते तसतसा सट्ट्याचा भावही पेढीवाले वाढवीत जातात. सट्ट्याची वेळ जितकी लांब तितका भावही कमी होतो. ह्मणजे वरच्या उदाहणात सहा ते नऊपर्यंत सट्टा मारणारापेक्षां सहा ते बारापर्यंत लावणारास कांहीं पैसे कमीप्रमाणें भाव मिळतो. जिंकणारास पैसे मिळणें ते रात्रीचा सट्टा जिंकला असेल तर दुसरें दिवशीं सकाळी ९ वाजतां व दिवसा जिंकला असेल तर रात्री ९ वाजतां पेढीवाल्यांकडून मिळतो. आतां येथें एवढें लक्षांत ठेवले पाहिजे कीं, यद्यपि हा एका प्रकारचा सभ्य रीतीचा जुगार आहे व ह्याच्यामुळें शेंकडो लोक सधन होतात व शेंकडो अगदी धुळीत मिळून जातात असें आहे तरी, पेढीवाले लोक जिंकणारास त्याचे पैसे देण्यांत लुच्चेगिरी करीत नाहींत असें ऐकतों. एरव्हीं पाहूं गेलें तर, ह्या व्यापारासारखी सभ्यरीतीची ठकबाजी दुसरी कोठें चालत असेल असें आह्मांस वाटत नाहीं. ही ठकबाजी बंद करावी म्हणून मुंबई पोलीसानें ह्या धंद्यातील मुख्यांस ताकीद दिली आहे. फार चांगली गोष्ट!

३०. कित्येक धुतारू लोक मोठ्या दक्षतेनें पहिल्यानें एखाद्या घरच्या मालकाचें नांव गाव शेजाऱ्यांकडून विचारून घेऊन त्याच्या चाकरी धंद्याची चौकशी करितात व त्याच्या घरीं त्याची बायको व अज्ञान मुलें आहेत व दुसरा पोक्त पुरुष कोणींच नाहीं, अशी संधि साधून त्याच्या बायकोस तिच्या नवऱ्याचें नाव गांव सांगून तिच्या नवऱ्यावर कांही संकट आलें आहे ह्मणून कांहीं तरी बतावणी करून त्यांनीं मला पांच किंवा दहा म्हणजे, त्या बाईचे जेवढे पैसे देण्याचे सामर्थ्य असेल त्याप्रमाणें रक्कम सांगून तिजजवळ पैश्याचें मागणें करितात, एवढेंच नाहीं ; तर लौकर देण्याविषयीं तगादा लावितात. बाई बिचारी भोळी असल्यास नवऱ्यानें पैसे मागितले आहेत व त्याच्या सांगण्याप्रमाणें आपला पति संकटांत आहे असें समजून कसें करून तरी त्याच्या स्वाधीन पैसे करते. पैसे हातीं पडतांच हा आपला रस्ता धरितो. संध्याकाळीं पति घरीं आल्यावर त्या बिचारे साध्वीस तोंडघशीं पडल्यासारखें होतें. अशा अनेक तऱ्हेनें अनेक भोळ्या स्त्रिया-स्त्रियाच कशाला-पुरुषही नाडले जातात !

३१. कित्येक ठकबाज आपल्या बरोबर दोन चार पोटभरू शिष्य घेऊन त्यांस बरोबर हिंडवितात. हिंडतां हिंडता गुरूजी एकादें सधन व भोंळें कूळ पाहून त्याच्या येथें ओटीवर जाऊन बसतात. बसल्यावर घरधनी काय पाहिजे इत्यादी प्रश्न करितो. हा प्रश्न ऐकल्याबरोबर गुरूजी त्यास इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगून आपल्या नादास लावतो. आणि मग हळूच त्या गृहस्थाच्या कानांत 'दारिद्र्यदान' करण्याविषयीं सांगतो. दारिद्र्यदान करण्याचें ऐकतांच त्या गृहस्थास असें वाटतें की, हा एवढा शिष्यजनांचा परिवार घेऊन हिंडतो तेव्हा, ह्याच्या जवळ कांहीं तरी दारिद्र्यभंजन करण्याची विद्या असली पाहिजे. ह्याच्या साथीदारांच्या सिद्धसाधकपणाच्या गोष्टीनें तर तो अगदीं भुलून जातो आणि त्याच्या ह्मणण्यास रुकार देतो. इकडे यजमानाची परवानगी मिळतांच गुरुजी शिष्यास पोत्यांतून कांहीं सामान काढण्यास सांगतात व यजमानास कांहीं तांदूळ, डाळ, तूप, कापड, व पैसे आणण्यास सांगतो. ह्या सर्व खटल्यांत केरसुणी आवश्य लागते ! यजमानानें सांगितलेलें सामान आणून दिल्यावर गुरुजी किती पिढ्यांचें दारिद्र्य दान करावयाचें आहे म्हणून प्रश्न करितो. मग जेवढ्या पिढ्यांचें सांगेल तेवढे पट दुसरें सामान द्यावें लागतें; परंतु, हा सर्व खटला गपचूप चालतो. कारण यजमानास असें वाटतें कीं, हा प्रकार जर इतरांस समजला तर तेही दारिद्र्यदान करून आपल्याप्रमाणेंच श्रीमंत होतील व तेणेंकरून आपला मोठेपणा रहाणार नाही. ह्या विचारास अनुसरून यजमान त्या ढोंगी गुरूस तो मागेल तें देतो. इकडे गुरुमहाराज नगदी माल व कपडा लत्ता आपल्या पोत्यांत टाकवून घरांतील केर काढला असेल तो तीनदां त्या घरावरून ओवाळून घेऊन आपल्या शिष्यांच्या स्वाधीन करितो. तो स्वाधीन करितांना मुखाने असें म्हणतों :- 'आजपासून ह्या घरची इडापिडा टळो, दारिद्र्य जावो, व हें घर श्रीमंत होवो.' असे ह्मणून पैसे उपटून गुरु-शिष्य पळून जातात! अशीं उदाहरणे क्वचित होतात.

३२. कित्येक चामड्याच्या वादीनें जुगार खेळतात, कित्येक पैशानें खेळतात, कित्येक पत्त्यानें खेळतात, कित्येक फांशानें खेळतात. चामड्याचे वादींने जुगार खेळण्याची अशी रीत आहे कीं–चारपांच जणांची एक टोळी

असते, त्यांतून एकजण पहिल्यानें आपल्या जवळ तीन चार रुपयांचें नाणें ठेवून मैदानासारख्या प्रसिद्ध व विशेष रहदारीच्या रस्त्यावर बसतो, तेथें बसल्यावर पहिल्यानें पोलीस वगैरे कोणी नाहीं असें पाहून मोठ्या सावधगिरीनें आपल्या जवळची चामड्याची वादी काढून तिची चमत्कारिक रीतीनें गुंडाळी करून सुमारें एक फूट लांबीची जवळ असलेली काठी त्या गुंडाळींत आपल्या साथीदारांपैकीं एकाद्यास घालावयास सांगते. त्यानें ती काठी घातली ह्मणजे, उगीच मोठ्यानें 'हारला हारला,' ' जिंकला जिंकला' अशी बोंब मारतात. असा प्रकार दोन तीनदां होतो. ही बोंब ऐकतांच रस्त्यावरील मंडळी तेथें जमूं लागते. आधींच मुंबईचे लोक ह्मणजे विचित्र. कोणी सहज एकाद्या वस्तूकडे पाहूं लागला ह्मणजे, काय आहे, काय आहे ? ह्मणून विचारीत सहज पांच पन्नास मंडळी तेथें जमते; परंतु, काय आहे आणि काय नाहीं, ह्याचा कोणासच पत्ता नसतो. तेव्हां अर्थातच वरील ओरडाओरड ऐकून जनसमुदाय तेथें बराच जमतो. जनसमुदाय जमला ह्मणजे वरील साथीदारांपैकी एकजण त्या गुंडाळींत काठी घालून मुद्दाम जिंकतो. मग दुसरा, मग तिसरा, याप्रमाणें त्याचे साथीदार जिंकतात. वादी गुंडाळण्यांत खुबी अशी आहे कीं काठी वादींत अडकून राहिली तर ती काठी घालणारा इसम जिंकतो व जर ती काठी गुंडाळीपासून अलग राहिली तर ती घालणारा हरतो-ह्याप्रमाणें जिंकलेल्या मनुष्यास जेवढी कबूलायत केली असेल तितके पैसे मिळतात. हारला तर तितके द्यावे लागतात. ह्याप्रमाणें भोंवती जमलेला जनसमुदाय आशाबद्ध होऊन आपणही जिंकूं अशा आशेनें पैसे लावतात. पण त्यांच्या चलाखीमुळें कोणीही जिंकत नाहीं. मात्र विनाकारण पैशास खार लावून डोकें खाजवीत जावें लागतें ! पत्त्याचा जुगारही अशाच लुच्चेगिरीचा ! ' बिलिअर्ड ' खेळही ह्याच मासल्याचा !

३३. याप्रमाणें **मुंबईंत** अनेक लोक कोणी तेली राजा, कोणी गोंसावी, कोणी तुमडी बाबा, कोणी पाऊड, कोणी पांगूळ, कोणी वासुदेव, कोणी जादूगार, कोणी पंचाक्षरी, कोणी काय, कोणी काय, अशीं नानाप्रकारचीं सोंगें ढोंगें करून लोकांपासून पैसा उपटितात. अशी **मुंबईंतील** ठकबाजी कोठवर लिहावी ! करितां अशा लोकांपासून लोकांनी सावध रहावें हें फार चांगलें.

३४. **मुंबई पाहण्याकरितां देशोदेशच्या लोकांचे येणें**—मुंबई शहराची कीर्ति व वैभव ऐकून पृथ्वीच्या सर्व भागावरील हजारो लोक हें शहर पाहण्याच्या उद्देशानें नित्यशः येत असतात. प्रसंगविशेषीं राजेरजवाडे वगैरे बडेबडे लोकही येथें येतात. अशाप्रसंगीं ज्याची जशी योग्यता असेल त्याप्रमाणें आमचें सरकार त्याचा मानमरातब ठेवतें. व त्यास त्याच्या योग्यतेच्या मानानें जेवढ्या तोफांचा मान असेल तेवढ्यांची सरबत्ती होते. हे लोक **मुंबईस** प्रथमच आले असतां त्यास प्रजाजन मानपत्र देतात व शहरांत रोषनाई करितात. आपल्या प्रिय महाराणीचे चिरंजीव **ड्यूक ऑफ् एडिन्बरो हे मुंबईस** इ. स. १८७० त आले होते त्या वेळीं त्यांस रंजविण्याकरितां सर्व शहरभर रोषनाई करण्यांत आली होती. दारूकामही बरेंच सुटलें होतें. इ. स. १८७२ सालीं **मुंबईत** लार्ड **नार्थब्रूक**, माजी गव्हर्नर जनरल, ह्यांच्या सन्मानार्थ ह्या शहरांत बडा दरबार भरला होता. इ. स. १८७५ सालीं युवराज **प्रिन्स ऑफ् वेल्स** हे आले होते. त्या वेळींही हाच थाट, पुढें **ड्यूक ऑफ् कनाट** हे आले होते. त्यांसही असाच मान देऊन त्यांच्या सन्मानार्थ मुंबईत एक बाजार भरला होता. पुढें इ. स. १८८४ सालीं डिसेंबर महिन्यांत माजी लोकप्रिय गव्हर्नर जनरल लार्ड रिपन हे स्वदेशीं प्रयाण करण्याकरितां ह्या शहरांत आले, त्या वेळीं सर्व शहर आनंदानें गजबजून गेलें होतें. जे ते आपापलीं मानपत्रें घेऊन त्यांस नजर करण्याकरितां पुढें ब्यांड लावून शहरांतून वाजत गाजत **टौनहालाकडे** लोटत. ह्या वेळीं रोषनाईचा इतका कांहीं कळस झाला होता कीं, लोकांनीं आपापल्या घरांतील हांड्याझुंबरें काढून रस्त्यावर लाविलीं होतीं व प्रसिद्ध प्रसिद्ध दुकानदारांनीं आनंद प्रदर्शित करण्याकरितां आपापला माल दुकानासमोर लाविला होता. ज्या दिवशीं **रिपन** साहेब बोटीवर जाणार होते त्या दिवशीं तर परळच्या सरकारी बंगल्यापासून तों थेट **अपालो** बंदरापर्यंत जी त्यांच्यावर एकसारखी पुष्पवृष्टि चालली होती, ती इतकी कीं, फुलें गाडींतून काढून बाहेर टाकून देतां पुरे पुरे होऊन गेलें. मुख्य मुख्य रस्त्यांवर फुलांचे डबे करून ते **रिपन** साहेबांची गाडी जातेवेळीं सोडीत, त्यामुळें फुलांनीं गाडी एकदम भरून जाई. ह्याप्रमाणें असा अद्वितीय मान आजपर्यंत कोणत्याच गव्हर्नरास मिळाला नव्हता व यापुढें मिळेल किंवा नाहीं ह्याची वानवाच आहे. एकंदरींत

हा प्रसंग **मुंबईमध्यें** मोठा विलक्षण व इतिहासांत नमूद करण्यासारखा झाला होता यांत संशय नाहीं. असे अनेक उत्सव **मुंबईमध्यें** वेळोवेळीं होतात.

३५. **ज्युबिली.**— इ. स. १८८७ हें वर्ष **मुंबईच्या**–किंबहुना **हिंदुस्थानच्या** इतिहासांत मोठें महत्त्वाचें आहे. ह्या वर्षी आपल्या महाराणी साहेब ह्यांचा राज्यपंचाशत्वार्षिकोत्सव झाला. ह्यांस **ग्रेट ब्रिटन** आणि **आयर्लंड** ह्या संयुक्त राज्याच्या गादीवर आरूढ होऊन ह्या सालीं पुरीं पन्नास वर्षें झाली. हा उत्सव सर्व **हिंदुस्थान** भर झाला; पण त्यांत ह्या महाराणीच्या **हिंदुस्थानांतील** राज्याचें पश्चिमद्वार ज्याला ह्मणतात त्या ह्या मुंबई शहरांत हा उत्सव फारच उत्तम रीतीनें झाला. आमच्या **मुंबापुरवासी** जनांस ह्या कृत्याबद्दल शाबासकीच दिली पाहिजे ! ह्या उत्सवप्रीत्यर्थ ता. १६ आणि १७ फेब्रुवारी, १८८७ हे दोन दिवस नेमिले होते. ह्या दोन्ही दिवशीं सरकारी व सावकारी ऑफिसें, शाळा, कारखाने वगैरे चटसारे बंद करण्यांत आले होते. १६ व्या तारखेस सकाळीं सहा सात वाजण्याच्या आंत मैदानांत रेजिमेंटचे लोक जमून त्यांची कवायत करण्याची एकच धांदल उडून गेली होती. मधून मधून ब्यांड वाजत होता; निशाणें फडकत होती; आणि ही मजा पाहण्यास शहरवासी जनांचे थव्यांचे थवे पहाटीं ५ वाजल्यापासून उंची पोषाग करून मोठ्या घाईनें पुढें जागा मिळावी म्हणून कोटाकडे लोटतच होते. सुमारें सव्वासातांची वेळ झाली असावी, अशा समयास लष्करी लोकांची जी मानप्रदर्शक सरबत्ती सुरू झाली तेणेंकरून सर्व शहर दणाणून गेलें होतें. मधून 'ईश्वरा राणीचें रक्षण कर' म्हणून सरकारी ब्यांडांतून मधुर ध्वनियुक्त 'न्याशनल आन्थेम' ऐकूं येत होतें. **राजाबाई** टावरवरील घड्याळाच्या घंटाचा घणघणाट, व गाडीघोड्यांचा दणदणाट सुरू होऊन सर्व प्रेक्षक समुदायाचीं अंतःकरणें प्रिय राज्ञीस चिरायुष्यत्व इच्छिण्यांत व आपली निर्मळ राजभक्ति दाखविण्यांत गढून गेलीं होती. रेजिमेंटचे लोक आपापल्या निरनिराळ्या टोळ्या करून **टौनहाला**पर्यंत दुतर्फा एकसारखे रांगेनें उभे राहिल्यावर **मुंबईचे** गव्हर्नर **लॉर्ड रे** ह्यांची स्वारी कौन्सिलर, निरनिराळ्या खात्यांचे सेक्रेटरी व मोठमोठ्या नागरिक जनसमुदायासहवर्तमान मोठ्या राजकीय थाटानें चार घोड्यांच्या गाडींतून **वाळकेश्वराहून** निघून **एल्फिन्स्टन सर्कलच्या** दरवाजावर येऊन दाखल झाली. येथें सर्व मंडळी गाडींतून उतरल्यावर

त्या ठिकाणीं म्युनिसिपल कार्पोरेशनचे सभासद व इतर बडेबडे लोक त्यांस सामोरे आले होते, त्यांसहवर्तमान **टौनहाल**च्या पायऱ्यांवर दरबाराकरितां जी जागा तयार केली होती, त्या जागेवर विराजमान होण्यापूर्वी राजकीय तऱ्हेचें स्वागत झाल्यावर वाद्यांचा गजर होऊन नामदार गव्हर्नर साहेबाची स्वारी गादी (state chair) वर विराजमान झाली.

३६. गव्हर्नर साहेब आसनारूढ झाल्यावर त्यांस शहरांतील बडेबडे लोकांकडून व इतर ठिकाणच्या लोकांकडून आलेलीं मानपत्रें देण्यांत आलीं. ह्या मानपत्रांस उत्तर देतांना त्यांनी राणी सरकारच्या कारकीर्दीतील ह्या देशासंबंधी व मुख्यत्वेंकरून मुंबई इलाख्यासंबंधी आज पन्नास वर्षांत ज्या ठळक ठळक गोष्टी घडल्या त्यांचें थोडक्यांत व चटकदार भाषेनें निरूपण करून शेवटीं ते म्हणाले :– " राणी सरकारच्या राज्यांतील दुसऱ्या कोणच्याही भागांत **जुबिलीचा** उत्सव **मुंबई**शहरापेक्षां मोठ्या कळकळीनें, व आस्थापूर्वक झाला नसेल. "

३७. याप्रमाणें मानपत्राचें उत्तर समाप्त होतांच टौनहालावरील मुद्दाम लाविलेलें निशाण मोकळें सोडतांच ब्यांडास सुरुवात होऊन १०१ तोफांची सरबत्ती झाली. त्या वेळीं जो पौरजनांच्या टाळ्यांचा गजर झाला तेणेंकरून सर्व शहर दुमदुमून गेलें. एवढें झाल्यावर तेथून गव्हर्नरादि बडी मंडळी **क्याथीड्रल** चर्चपर्यंत पादचारी होऊन देवळांत गेली. तेथें प्रार्थनादि विधि आटोपल्यावर मंडळी मजा पाहत पाहत आपापल्या घरीं चालती झाली. प्रत्येक धर्माच्या लोकांनींही आपापल्या प्रार्थनामंदिरांत हरिकीर्तनादि करून हा उत्सव साजरा केला.

३८. ह्या वेळीं **क्विन्स** रस्त्यावरून तों थेट **टौनहाला**पर्यंत निरनिराळ्या चित्रविचित्र पेहरावाचे लोकांची जी मजा दिसे ती कांही अलौकिकच होती. **एल्फिन्स्टन** सर्कल मधील सर्व इमारती इतक्या कांही प्रेक्षक समुदायानें भरून गेल्या होत्या कीं, जणूं काय एकावर एक अशीं मनुष्येंच उभीं राहिलीं आहेत असा भास उत्पन्न करीत. **टौनहा**लास तर एकाप्रकारची विलक्षण शोभा आली होती.

३९. **चर्चगेट** स्ट्रीटमध्यें सर्व रस्ताभर जी कांही शोभा आणिली होती ती अवर्णनीय होय. मध्यें मध्यें समांतर रेषेनें दुतर्फा कमानी लाविल्या

होत्या; त्या सर्वांवर हांड्या, झुंबरे, ग्लासें इत्यादि लटकावून दिलीं होतीं. जागोजाग चित्रविचित्र निशाणें लाविलीं होतीं, व त्यांजवर ' गॉड सेव्ह दि क्विन ' व अशाच अर्थांची नाना तऱ्हेचीं सुवर्णमय अक्षरें लिहिलीं होती. ह्या रोषनाईमुळें त्या अक्षरांवर जो प्रकाश पडे तो परावर्तन पावून प्रेक्षक समुदायाचे नेत्र अगदीं दीपवून टाकी. वाऱ्याच्या झुळकेबरोबर निशाणें फडफड वाजत तेणेंकरून प्रेक्षक जनांस असा भास उत्पन्न होई कीं, जणूं काय तीं आपल्या पक्षांनीं आपणास बोलावीतच आहेत ! **ग्रीन चौकांतील** कारंजें मोठ्या सपाट्यानें वर उडत होतें; त्याजवर बालांकाचीं मंदमंद किरणें पडल्याकारणानें रौप्यवर्णाची लकेर मारीत होती; व बागेंतील झाडें, हळुहळू डोलून आपला आनंद दर्शवीत होतीं आणि प्रेक्षक समुदायांचा श्रमापासून परिहार व्हावा म्हणून गार हवा व सुगंधयुक्त परिमळ देऊन त्यांस आनंदवीत होतीं.

४०. ह्या उत्सवाच्या वेळीं मुख्य मुख्य राजरस्त्यांवरील सरकारी व सावकारी इमारती उजाळल्या होत्या. हा रोषनाईचा प्रकार एकसारखा दोन दिवस चालला. ह्या वेळी **कांपाच्या** मैदानांत एक मोठा बाजार भरला होता. त्यांत ब्यांडाकरितां एक जागा तयार केली होती ती पहाण्यासारखी होती. शिवाय दोन लहान लहान कारंजी केलीं होतीं. ह्या बाजारांत अनेक लोकांचीं दुकानें आलीं होती; आणि विश्वयोषिता, मुरळ्या तमासगीर वगैरे लोकांच्या बैठकी, नाच, तमाशे असे अनेक खेळ चाललेच होते. सारांश ह्या बाजारांत एकदां मनुष्य गेला कीं तो अगदीं गोंधळून जाऊन त्यास असें वाटे कीं, आपण आलों कोणत्या रस्त्यानें आणि आतां बाहेर पडावें कोणत्या रस्त्यानें ! कारण जावें तेथें सर्व सारखी रचना. उजेडही चोहोंकडे सारखा. अशी मोठी विलक्षण आणि मनोवेधक रचना ह्या बाजाराची केली होती. याप्रमाणें एकसारखा आठ दिवसपर्यंत समारंभ चालला. ह्या बाजारांत नानातऱ्हेचीं गाणीं, बॉल वगैरे चालूच होते. ह्या १६ व १७ व्या तारखांस **मुंबईत** जी बाहेर गांवाहून आलेल्यांची व शहरांतील लोकांची गर्दी उडाली होती ती पुसूंच नका. ह्याप्रमाणें ह्या प्रसंगीं आपल्या महाराज्ञीच्या राजनिष्ठ प्रजेनें आपली राजनिष्ठा प्रदर्शक जीं जीं कृत्यें केली ती अवर्णनीय होत, असें म्हटल्यावांचून राहवत नाही. आपली राजनिष्ठा प्रकट करणें हा प्रजेचा धर्मच आहे.

४१. ह्याच दिवशीं महाराज्ञीकडून गव्हर्नर साहेबांस तारायंत्रद्वारें जबाब आला कीं, ' माझे सर्व एतद्देशीय राजे रजवाडे व **हिंदुस्थानांतील** सर्व प्रजा ह्यांनीं जो माझ्या उत्सवसंबंधी आपला आनंद प्रदर्शित केला त्याबद्दल मी त्या सर्वांची फार फार आभारी आहें. ' तो जबाब हा–' I thank you all, the native princes and my loyal Indian subjects, for kind congratulations. '

४२. ह्या जुबिली उत्वसाचे परिसमाप्तीनंतर आमच्या इकडील कित्येक श्रीमंत व विद्वान लोकांस राणीसरकाराकडून ह्या उत्सवाची लोकांस स्मृति रहावी म्हणून पदव्या देण्यांत आल्या. सोळाव्या तारखेस येथील तुरुंगांतील कांही दिवाणी व फौजदारी कैद्यांसही बंदमुक्त करण्यांत आले !

४३. **फ्यान्सीबाजार**–नव्या सेक्रेटरी ऑफिसाच्या पश्चिम अंगाला तारीख ९-१०-११ फेब्रुवारी, १८८८ रोजीं एक मोठा 'फ्यान्सी' (चमत्कारिक वस्तूंनीं भरलेला) बाजार भरला होता. आपल्या प्रिय राज्ञी साहेब मलिकामा आझमा **व्हिक्टोरिया** व त्यांची स्नुषा **डचेस ऑफ् कनाट** व पुत्र ड्यूक ऑफ **कनाट** ह्यांच्या संमतीनें हा बाजार पेस्तनजी कामा हॉस्पिटलास द्रव्यद्वारें मदत करावी ह्या उद्देशानें भरविण्यांत आला होता. ह्या हास्पिटलासंबंधी मि. कामा ह्यांनीं १५,००० रुपये दिले होते; परंतु, तें काम तेवढ्या रकमेंत होणार नाहीं; त्यास २५,००० रुपये ज्यास्त लागतील असें अनुमान निघाल्यावरून ती रक्कम भरून काढावी एतदर्थ एवढी सगळी खटपट ! ह्या बाजाराच्या कामाकरितां मुख्य **लेडी रे** वगैरे नामांकित इंग्रज व पारशी स्त्रियांनीं पुष्कळ मेहनत घेऊन ह्या बाजारांत त्या स्वतः दुकानदार बनल्या होत्या. ह्यांत **पारीस** वगैरे नामांकित ठिकाणांहून नानाप्रकारचा चित्तवेधक खेळ, बाहुल्या वगैरे जिन्नस आणविले होते. बाजाराच्या मध्यभागीं एक मोठी दरबारासारखी जागा केली होती त्याठिकाणीं डचेस ऑफ **कनाट** व **लेडी रे** ह्यांची दुकानें होती. ह्या बाजारांत जाणारानें मालाची किंमत न करितां सांगितलेल्या किंमतीस माल घ्यावा अशी ह्या बाजारांत गम्मत होती. एकंदर बाजारांत दुकानावर येथून तेथून सगळ्या स्त्रियाच बसल्या होत्या. ही ह्या बाजारासंबंधी मोठीच पाहण्यासारखी गम्मत होती ! मध्यें मध्यें गिऱ्हाइकांस सुख व्हावें म्हणून जागजागीं विश्रांतिस्थळें (रिफ्रेश्मेंट रूम्स)

करून ठेविलीं होतीं. प्रत्येक दिवशीं संध्याकाळी नाच तमाशा होत असे. गव्हर्नरचा ब्यांडही हजर असे. बाजारांत विजेचे दिवे घेतले होते. मधून मधून हिरव्या, तांबड्या व पांढऱ्या भिंगांचे कंदीलही टांगले होते. नाटकशाळा तयार करून तेथें रात्रीचें नाटकही होई. मिलीटरी लोक कवाईत करून जनमनसंतोषदायक असा ब्यांडही वाजवीत. येथें बाजार असेपर्यंत नित्य जाणारास एकंदर ५ रुपये व एकदांच जाणारास १ रु. फी ठेविली होती शिवाय, नाटकें, तमाशे वगैरे पाहणारास निराळी फी द्यावी लागे. ह्या तिन्ही दिवसांच्या बाजाराच्या विक्रीपासून ३२,००० रुपयांवर रकम उत्पन्न झाली. व पुढें दोन दिवस अधिक बाजार चालू ठेवला होता त्याचें उत्पन्न धरून खर्चवेंच वजा जातां एकंदर सर्व उत्पन्न ४३,०८५-३-५ रुपये झालें ! तेथें जाणाराची इतकी गर्दी होत असे कीं, एके दिवशीं एक दोन बायांस मूर्च्छा येऊन त्या खालीं पडल्या. अशा प्रकारचा अपूर्व बाजार **मुंबईंत** कधींच भरला नसेल. येथील व्यवस्थेच्या, मेहनतीच्या बंदोबस्ताच्या, ठाकठिकपणाच्या व मोहकतेच्या मानानें पाहिलें असतां ह्या बाजाराच्या उत्पादकांची धन्यता वर्णन करावी तेवढी थोडीच !

४४. घरें दारें— ह्या शहरांतील घरें बहुधः एकमजल्यापर्यंत दगड व पुढें विटा ह्यांनीं बांधलेलीं असतात व त्यांस चुना लावतात. सरकारी ऑफिसें व सार्वजनिक गृहें हीं बहुत करून खालपासून वरपर्यंत दगडांनींच बांधलेलीं असतात. घरांवर गांवठी अगर विलायती कौलें घालतात. कोठें कोठें 'टिन' (जस्ता) चे पत्रेही आढळतात. हीं घरें सर्वच सोईचीं असतात असें नाहीं; तर, तीं जशी जागा सांपडेल त्याप्रमाणें बांधलेली असतात. त्यामुळें पंचवीस पंचवीस घरांमध्ये हवा येण्यास मुळींच जागा नसून ती जणूं काय एकच आहेत अशीं दिसतात. ह्मणजे अर्थात आमच्या प्राचीन शिल्पशास्त्राप्रमाणें फार थोडीं घरें **मुंबईंत** सांपडतील. अशीं गर्दीची घरें **मांडवी** वगैरे ठिकाणी दृष्टीस पडतात. कित्येक घरें केवळ बांधायची म्हणून बांधलेलीं असतात एवढेंच काय तें; परंतु, मुख्य खांब जर बघितला तर त्याची जाडी अर्धफूट ! अशीं घरें लोक फक्त भाड्याच्या आशेनें बांधतात; परंतु, घरधनी जेवढें भाडें खातात तेवढेंच भाडें सव्याज, किंबहुना, ज्यास्तही त्यांस घरांच्या दुरुस्तीकरितां खर्चावें लागते. व

कधीं कधीं हीं घरे पडतातही. ह्याप्रमाणे त्यांस घरापासून सुख मिळतें ! आतांशा जीं घरें बांधलीं जातात ती म्युनिसिपालटीच्या कांहीं अटी असतात त्याप्रमाणे सोई करून बांधावीं लागतात. लांबच्यालांब पांच पंचवीस बिऱ्हाडें राहण्याची सोई असली तर त्या घरास 'चाळ' ह्मणतात. अशा चाळी चार मजल्यापर्यंत असतात व त्या मानाप्रमाणें त्यांत बिऱ्हाडेंही १५०-२०० पर्यंत राहतात. **मुंबईत** राहणाऱ्या लोकांस घरभाडें फार द्यावें लागतें. ह्या शहरासारखी जागेची दुर्मिळता व घरभाडें हिंदुस्थानांत दुसऱ्या कोणत्याही शहरीं नसेल. **हिंदुलोकांची** राहण्याची रीति फार साधी असते. 'पाढंर पेशे' लोक ज्या ठिकाणीं राहतात त्या ठिकाणीं बहुतकरून स्वच्छता असते. **पारशी** लोकांची घरें बाहेरून मात्र चांगली झक्क पक्क पाहून घ्यावीं. 'आंगणावरून घराची परीक्षा' ह्या ह्मणीप्रमाणें आंगणांत कोठें कोंबड्यांची विष्ठा पडली आहे; कोठें कुत्रीं ओकलीं आहेत; कोठें मुलांचे मलमूत्र पडलें आहे आणि कोठें माशांची हाडें पडलीं आहेत. अशी स्थिति जेथें असते तेथें घरांत किती स्वच्छता राहत असेल ह्याची कल्पना वाचकांनींच करावी ! **पारशी** लोकांच्या दारावरून जाणें ह्मणजे फार जपून जावें लागते; कारण, केव्हां आंगावर काय पडेल ह्याचा नेम नसतो. आतां, अशी स्थिति म्हणजे सर्वच ठिकाणी असते असें नाहीं; तरी, बहुतेक ठिकाणीं असते असें ह्मणण्यास हरकत नाहीं. असें आहे तरी हे लोक रोज सकाळीं आपल्या ओटीवर आणि पुढें जागा असल्यास ती स्वच्छ करून तेथें, रांगोळी घालतात व संध्याकाळीं चंदनाचा चुरा विस्तवावर ठेऊन त्याचा सर्व घरभर धूप देतात. ही गोष्ट मात्र सर्वांनी अनुकरण करण्यासारखी हे लोक करितात यांत कांहीं संशय नाहीं. साहेब लोकांची राहण्याची रीति फार चांगली असून त्यांच्या राहण्याच्या ठिकाणी स्वच्छताही विशेष दृष्टीस पडते. पण अंमल भटारखान्याकडे दृष्टि फेंकली तर, अमांसहारी मनुष्य ओकल्यावाचून राहवयाचाच नाहीं. अशी त्यांच्या पाकशाळेंत दुर्गंधि सुटलेली असते । तरी एकंदरींने पाहिलें तर ह्या लोकांस स्वभावतः स्वच्छता विशेष आवडते. त्यांस दारापुढें झाडें लावण्याची सोई नसली तरी देखील दहापांच कुंड्या तरी ठेवतील. ह्यांच्या घरांतील जमीन फारच स्वच्छ असते. एखाद्या

साहेबाच्या बंगल्यांत गेलें तर तेथें साधारण राजाच्या राजमहालाप्रमाणे शोभा दृष्टीस पडते. हे लोक जरी लहानशा झोंपडीत राहत असले तरी ती रमणीय दिसावी म्हणून फारच प्रयत्न करितात. एतद्देशीय श्रीमंत लोकांच्या घरी हंड्या, झुंबरें, कोचा, टेबलें, खुर्चा वगैरे युरोपियन तऱ्हेचें सामान असून शिवाय दिवाणखान्यांत एकेक पुरुष उंचीचे आरसे लावलेले असतात. कित्येकांस तर सर्व दिवाणखानाभर आरसे लावण्याची मजा वाटते. दिवाणखान्यांत बहुश : 'सिलींग' फारच उत्तम केलेलें असतें. **माटुंग्यास जिवनजी** महाराजाचा 'आरसे महाल' आहे त्या ठिकाणीं जाऊन उभें राहिलें तर चोहोंकडून पाहणारास आपलें रूप दिसते. **पारशी** लोकांकडे **हिंदु** लोकांप्रमाणेंच व्यवस्था असून खुर्च्या व टेबलें ह्मांचा विशेष भरणा असतो. कारण ते जेवतांना आपल्या लोकांप्रमाणें जमिनीवर पाट मांडून न बसता खुर्चीवर बसून टेबलावर भोजनपात्र (बशी किंवा रिकाबी) ठेऊन जेवतात. नानाप्रकारचे चेहरे व आरसेही त्यांच्या 'सदरेंत' (दिवाणखान्यांत) ठेवतात. साहेब लोकांकडेस भांड्यांच्या ऐवजी कांचपात्रें विशेष असतात. **मुसलमान** आणि **पारशी** लोक आपल्या भांड्यांस आंतून बाहेरून कल्हई लावतात. साहेब लोकांकडे भांडीं असलींच तर त्यांस ते हिंदु लोकांप्रमाणे बाहेरून कल्हई लावीत नाहीत. प्रत्येक **पारशा**कडे कुत्रें असावयाचेंच. कित्येक साहेब व हिंदुही आपल्या घरीं मोठमोठी किंमत देऊन कुत्रे ठेवतात.

४५. **पोषाख, दागिने वगैरे–मुंबई** शहरांत नानातऱ्हेचे पोषाख दृष्टीस पडतात. पागोटींच पाहूं गेलें तर ब्राह्मणी, परभी, गुजराथी, बडोदेशाही, मारवाडी, मराठेशाही अशीं सुमारें ५०–६० तऱ्हांचीं एका **हिंदु**लोकांचींच पाहण्यांत येतात. शिवाय **पारशी, मुसलमान** वगैरे लोकांची निराळींच. साहेब व किरिस्तांव ह्मांच्या टोप्या तरी अनेक तऱ्हेच्या दृष्टीस पडतात. निरनिराळ्या लोकांची निरनिराळीं पागोटी. असतात ह्मणून सांगितलें त्यांतही एका जातीच्या लोकांच्या पागोट्यांशी दुसऱ्या जातीच्या लोकांच्या पागोट्यांचा कधींच सारखेपणा नसतो. थोडाबहुत फरक असतोच. प्रत्येकाची तऱ्हा निराळीच. **तैलंगण** व **कानडा** वगैरे ठिकाणचे लोक उघड्या डोक्यानेंच फिरतात. **चिनी** लोकांत डोकीस एक टोपी असते व त्यांचे

डोकीवरील केंस पायापर्यंत वेणी घालून बांधलेले असतात. हिंदु लोकांप्रमाणें **चिनी** लोक हजामत करवितात. ब्राह्मण व इतर जाती डोकीस रुमाल बांधतात. पागोटींही आपापल्या तऱ्हेची घालतात.

४६. **हिंदु** लोकांचा पोषाख ह्मटला ह्मणजे साधारणत:[1] डोकीस पागोटें, नेसण्यास धोतर, आंगांत बंडी आणि आंगरखा असा असतो. ब्राह्मण असला तर त्याच्या आंगावर उपवस्त्र आणि पायांत जोडा असतो. सुमारें २५-३० वर्षांपूर्वी **मुंबईंत** फारच मोठीं पागोटीं पहाण्यांत येत; परंतु हल्लीं तीं जाऊन त्यांच्या जागीं अगदींच लहान पागोटीं वापरण्यांत येतात. अलीकडे पुण्याच्या 'पगड्या' निघाल्या आहेत, त्या फार हलक्या असून त्यांपासून डोकीसही फार कमी भार होतो. त्यांस वर्षांतून एकदां बांधविण्याची किंवा रंगविण्याची काय ती खटपट. अशा पगड्या वापरणारांस लोक पूर्वी हंसत; परंतु, त्याच हल्ली बडेबडे लोकही वापरूं लागले आहेत. 'बंदरी ' व 'शिटी' पागोटीं कांही कांही जुन्या परभू गृहस्थांशिवाय कोणाच्याच डोकीस अलीकडेच दृष्टीस पडत नाहींत **पारशी** व **मुसलमान** ह्यांचा पोषाख ह्मटला ह्मणजे डोकीस खोकें, आंगांत बंडी व आंगरखा, नेसण्यास विजार आणि स्टाकिंग व बूट हा होय. कित्येक **मुसलमान** धोतर नेसून जोडे घातलेले दृष्टीस पडतात. तसाच साहेब लोकांचा पोषाख डोकीस टोपी, आगांत खमीस, हाफ् ज्याकेट आणि कमरेपर्यंत कोट, नेसण्यास विजार आणि पायांत स्टाकिंग आणि बूट असा असतो. पोषाखाच्या संबंधानें हा जरी सामान्य तऱ्हेचा पोषाख त्या त्या लोकांचा दिला आहे, तरी एवढें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं अलीकडे सर्व जातींच्या लोकांस इंग्रजी तऱ्हेचा पोषाख घालणें ह्यांत मोठें भूषण आहे असें वाटूं लागल्यामुळें हळुहळू इंग्रजी रिवाजाचा पोषाख सर्वत्र पाहण्यांत येतो. असें आहे तरी हेंही विसरता कामा नये कीं, **मुंबईंत** कोणा एका विवक्षित

[1] लग्नकार्य अगर एकाद्या विशेष प्रसंगीं वाणी, भाटे, परभू व पारशी हे लोक पायापर्यंत घोळत असलेला झगा घालतात त्यास 'जामा' ह्मणतात. त्याजवर कंबरे सभोंवती शेला अगर दुसरें एकादें शुभ्र वस्त्र गुंडळतात. ही पोषाखाची तऱ्हा तरी हळु हळू कमीच होत चालली आहे.

जातीचा अमुक एका प्रकारचा ठरींव पोषाख आहे असें मुळींच नाही; कारण , **मुंबईं**त कोणत्याच प्रकारचा धरबंद नसल्यामुळें ज्याच्या मनास वाटेल तसें तो आपले वर्तन ठेवितो.

४७. **हिंदु** लोकांचे स्त्रियांचा पोषाख ह्मटला ह्मणजे लुगडें आणि चोळी हा होय. गुजराथी, मारवाडी वगैरे लोकांच्या बायकांचा पोषाख दक्षिणी लोकांच्या बायकांच्या पोषाखाहून फार भिन्न असतो. त्यांच्या स्त्रिया साधारणतः एक मोठा परकर नेसून त्याच्या सभोंवार एक लहानसा लुगड्याचा तुकडा गुंडाळून त्याचा डोकीवरून पदर घेतात व चोळी दक्षिणी लोकांचे बायकांप्रमाणें न घालतां उलट घालतात; ह्मणजे चोळीची गांठ ऊरस्तनभागीं न बांधतां ती पाठीवर मारतात. ह्या जातींच्या बायका कच्छहीन असतात. ब्राह्मण लोकांच्या बायकांचा व इतर जातींच्या बायकांचा लुगडें नेसण्याचा प्रकार कांहींसा भिन्न असतो. मासे मारणारे कोळी वगैरे लोकांच्या बायका गुडघ्यापर्यंत लुगडें नेसून कांस मारतात. **हिंदु** लोकांच्या बायका सधवा असल्या तर कपाळांत कुंकू लावतात. कारणपरत्वें रस्त्यांतून जाणें झालें तर डोकीवरून पदर घेतात. व लग्नकार्य प्रयोजनीं आंगावर शालू अगर शाल घेतात. याप्रमाणें पोषाख करणें तो ज्यांचे ते आपल्या ऐपतीप्रमाणें करितात. पण हेंही मान ह्या **मुंबईं**त फार कमी प्रमाणानें सांपडेल. घरांत एकवार खावयास नसलें तरी पुरवेल; पण, बाहेर पडलें ह्मणजे 'खडेघाट' थाटानें निघावयाचे. असे लोक येथें फार.

४८. आमच्या **हिंदु** लोकांच्या बायकांस दागिने घालण्याची मोठी हौस. कित्येक पुरुषांमध्येंही कांहीं वर्षांमागें अशीच हौस दृष्टीस पडे. पण हल्लीं ती क्वचित दृष्टीस पडते; तरी पण, मुलगा सुमारे १५-२० वर्षांचा होई तोंपर्यंत त्यास दागिने घालण्याची अजून चाल आहे. ब्राह्मण, सोनार, परभू वगैरे लोकांच्या स्त्रियांच्या आंगावरील दागिने बहुत करून सारखेच असतात; परंतु त्यांत ही थोडथोडा फरक असतो. ह्या जातींच्या बायकांचे दागिने गुजराथी वगैरे लोकांच्या बायकांच्या दागिन्यापेक्षां फारच चांगले, सुबग व सुशोभित असे असतात. दागिनें घालनें ते ज्याचा तो आपल्या ऐपतीप्रमाणें घालतो. गरीबांस चांदीवरच आपली हौस पुरी

करून घ्यावी लागते. मग सोनें, मोतीं, हिरे, माणकें ह्यांची गोष्ट कशाला पाहिजे? पण **हिंदु** स्त्रियांच्या दागिन्यांत नथ अवश्य लागते. मग ती पांच रुपयांची कां असेना. इतर दुसरे दागिने कांहीं नसले तरी चालतील. इतकी नथीची हौस आमच्या बायकांस असते. भाटे, वाणी, कच्छी, मुसलमान इत्यादि लोकांच्या स्त्रियांचे दागिने कांहींसे आबड धोबड असतात. सोन्याचे पत्रे मारलेलीं व साधीं हस्तिदंती कंकणें कोपरापर्यंत वाणी, भाट्ये वगैरे लोकांच्या बायका घालतात. नाकांत नथ घालितात. **हिंदुस्थानां**तील परदेशी वगैरे जातीचे लोकांतील स्त्रिया नथ घालतात तिचा घेर साधारण पाऊण फूट इतका होईल! असे अवजड दागिने इतर लोकांत फार घालितात.

४९. **पारशी** लोकांच्या बायका सणावारी अगर कार्यप्रयोजनी कपाळीं कुंकुमाचा टिळक लावितात. त्यांचा पोषाख ह्मटला ह्मणजे आंगांत बंडी, डोकीस पांढरा शुभ्र फडका व नेसायला विजार, पायांत स्टाकिंग बूट किंवा सपातें होय. **पारशी** स्त्रिया बाहेर जातेसमयीं इजारी वरून रेशमी साडी नेसून तिचा पदर डोकीवरून घेतात. ह्या लोकांच्या बायका आमच्या लोकांचे बायकांप्रमाणें बांगड्या घालतात. अलीकडे सोन्यारुप्याचे दागिनेही घालूं लागल्या आहेत. साडीवांचून कोणतीही **पारशीण** बाहेर पडावयाची नाहीं, **पारशी** स्त्रिया घरांत असतात तेव्हां नेसण्यास तुमान, आंगांत जाळीदार सदरा व वरून बंडी असा त्यांचा पोषाख असतो. वृद्ध वृद्ध बायका तर नुसता सदराच घालून असतात. अलीकडे ह्यांचा डोकीवरचा फडका मागें सरत जाऊन इंग्रजी तऱ्हेचा थाट ह्या बायकांत विशेष शिरत चालला आहे.

५०. **साहेब**लोकांच्या बायकांचा पोषाख गवन, स्टाकिंग, बूट, विजार व डोकीस टोपी हा असतो. लग्न झालेल्या बायांचा झगा पायांपर्यंत असून कुमारिकांचा पोषाख गुढघ्यापर्यंतच असतो. हे झगे (गवन) इतके लांब, घेरदार व पायघोळ असतात कीं, एकादी मडम रस्त्यानें चालूं लागली तर ती आपल्या गवनानें रस्ता साफ करीत जाते असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्या लोकांच्या बायकांचे पोषाख नेहमी बदलत जाऊन त्यांच्या तऱ्हाही चमत्कारिक असतात. पूर्वीं ह्या लोकांच्या स्त्रिया

सोन्यारुप्याचे दागिने न घालतां कपड्यांतच आपला पैसा खर्च करीत; पण, अलीकडे त्याही दागिने घालूं लागल्या आहेत. आपल्या लोकांत दागिन्यावांचून एकादी स्त्री असली तर तिला उकी अगर उघडी असें समजतात. तसें ह्या लोकांत नाही. ह्यांचे सर्व लक्ष पोषाखाकडे असते. गृहस्थाच्या स्त्रीस निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळे पोषाख लागतात. सकाळीं घरांत घालून बसावयाचा एक; बाहेर पायीं चालत जातांना करावयाचा एक; गाडींतून जातांना करावयाचा एक; घोड्यावर बसून जावयाचा एक; कोठें 'खाणा' असेल तेथें जावयाचें असल्यास एक; नाचास जावयाचा एक; नाटकास जावयाचा एक; दरबारांत जावयाचा एक; असे भिन्न भिन्न स्थळीं आणि भिन्न भिन्न प्रसंगीं करावयास त्यांस अनेक भिन्न भिन्न पोषाख लागतात. ह्यांच्या झग्यामध्यें 'क्रिनोलिन' घालतात तेणेंकरून त्यांच्या शरीराचा कमरेखालील भाग मोठा फुगलेला दिसतो. ह्या बायकांचा शृंगार करण्यांतच बहुतेक वेळ जातो.

५१. गोव्याचे किरिस्तांव वगैरे लोकांच्या बायका लुगडें नेसून आंगांत बंडी आणि पायांत सपातें घालतात. ह्या बायकांची केंस बांधण्याची तऱ्हा मोठी चमत्कारिक असते. त्या आपले केंस डाव्या कानावर बांधून त्यांत फणी खोंवतात. ह्या लोकांच्या स्त्रिया दागिने घालतात. ह्यांच्यांतही आतां लुगडें क्वचित जुन्या स्त्रियांत मात्र पाहण्यांत येतें.

५२. याप्रमाणें मुख्य मुख्य जातींच्या स्त्रीपुरुषांच्या पोषाख, दागिने वगैरेच्या संबंधी ठळक ठळक गोष्टींची माहिती वाचकांस करून दिली. तसेंच **मुसलमान** लोकांच्या संबंधीही कांहीं लिहिणें इष्ट होतें. परंतु, त्यांच्यांत स्त्रीपुरुषांच्या पोषाखाची व अलंकार भूषणादि घालण्याची एकच तऱ्हा नसते. म्हणजे पहा, कित्येक बायका हिंदु स्त्रियाप्रमाणें पोषाख करितात; कित्येक डोकीपासून पायांपर्यंत बुरखा[१] घेतात; कित्येकांचा हिंदुमुसलमान असा विजातीय पोषाख असतो! **यहुदी** लोकांचे बायकांचा पोषाख ह्मटला ह्मणजे कित्येकांचा **हिंदु**लोकांच्या बायकांप्रमाणें, आणि कित्येकांचा साहेबलोकांच्या मडमांप्रमाणें. **मोंगल** लोकांचा पोषाख नेसण्यास

[१] बुरखा म्हणजे डोकीवरून तो पायांपर्यंत जो कपडा मुसलमान लोकांच्या स्त्रिया घालतात तो. ह्यास तोंडासमोर श्वासोच्छ्वासाकरितां व दिसण्याकरितां एक लहानशी जाळी असते.

इजार, आगांत पायघोळ आंगरखा व त्यास पाऊण हात रुंदीच्या अस्तन्या असा असतो. ह्याप्रमाणें अनेक जातीचे स्त्रीपुरुषांच्या पोषाख व अलंकार भूषणें घालण्याच्या तऱ्हा भिन्न भिन्न असल्याकारणानें प्रत्येकाचे पृथक् वर्णन करूं जाणें ह्मणजे ह्यासंबंधी एक निराळा ग्रंथच लिहावा लागेल. तशांत ह्या **मुंबई** शहरांत 'अठरापकड' जाती भरल्या आहेत. तेव्हां त्या प्रत्येक जातींतील निरनिराळे अलंकार भूषणें व पोषाख ह्यासंबंधी बारीक बारीक भेदांचें कंटाळवाणें वर्णन देऊन वाचकांस विनाकारण त्रासविणें आम्हांस प्रशस्त दिसत नाहीं.

५३. **लोकांची रीतभात, धर्म, लोकाचार वगैरे**— आमचा आर्यलोकांचा मूळ वैदिक धर्म. प्राचीन ग्रंथांत ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ह्या तीन वर्णांस [१]आर्य अशी संज्ञा आहे. आर्यांवांचून बाकीचे सर्व लोक अनार्य. ह्यावरून जेवढे म्हणून **हिंदु** आहेत तेवढ्यांस आर्य ह्मणतात व त्यांचा जो देश तो आर्यावर्त. आरंभीं जेव्हां हे आर्य उत्तर खंडांत राहत होते, तेव्हां सदरील तिन्हीं वर्णांचा परस्परांशीं विवाहसंबंध व भोजनव्यवहार होत असे. आर्यलोकांची सर्व भरतखंडांत वस्ती होऊन ब्राह्मण लोकांत मोठमोठे विद्वान ऋषी, आणि क्षत्रियांत पराक्रमी राजे झाले; वैश्यांनीं कृषिकर्माची व पशुपालनाची वृद्धि करून ह्या देशांत निर्वाहाच्या पदार्थांचा पुरवठा केला; आणि शूद्रांनीं त्यांस आंगमेहनतीने सहाय्य केलें. ह्याप्रमाणें आमच्या देशांत चतुर्वर्णात्मक प्रजेचा विस्तार झाला. मूळ आर्य हे मोठे पराक्रमी, विद्याशोधक व एक मतानें वागणारे असे असल्यामुळें, त्यांनीं नानाविध विषयांवर बहुत ग्रंथ केले व अनेक कलाकौशल्यांत प्रावीण्य मिळविलें; हें इतिहास प्रसिद्ध आहेच. ह्या वेळीं इतर देशचे लोक अगदीं रानटी असल्याकारणानें त्यांनीं त्यांस 'अनार्य' , 'म्लेंच्छ', 'निषाद', 'दस्युः' अशीं अनेक निंदास्पद नावें दिलीं. पुढें हळुहळू 'आर्यावर्त स्वर्णभूः' हें नांव ऐकून आमच्या देशावर वारंवार परकीयांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या व त्यामुळें वरील वर्णव्यवस्थेस धक्का पोंहचत जाऊन सदरील चार जातींच्या अनेक जाती झाल्या. त्या इतक्या कीं, फक्त ब्राह्मणांतच शेपन्नास जाती

[१] 'आर्य' शब्दाचा अर्थ पूज्य, उत्तम, श्रेष्ठ, सुशिक्षित, सुधारलेले असा होतो. सुधारलेले ह्या शब्दाचा अर्थ अलीकडे जो लोक-प्रचारांत तो मात्र येथें घेतां कामा नये.

होऊन क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्यांत निदान सवाशें दिडशें जाती झाल्या आहेत. बरें, निरनिराळ्या जाती होऊनच मूळ धर्म राहिला आहे असेंही नाहीं; तर, त्यांतही अनेक मतें व अनेक पंथ निघून आमच्या देशांत जाती धर्म ह्यांचा सगळा गोंधळ होऊन गेला आहे. ह्याप्रमाणें सांप्रत जाती ह्मणून जो प्रकार आमच्या लोकांत दृष्टीस पडतो, त्याचें यथायोग्य स्वरूपवर्णन करीत बसणें म्हणजे विनाकारण जागा अडविणें ह्यासारखें होय व तो विषयही प्रकृत पुस्तकाचा नाहीं. इतका ह्या जातींचा व्याप फार सूक्ष्म रीतीनें भिन्न भिन्न प्रदेशीं भिन्नभिन्न जातींमध्ये भिन्न भिन्न प्रकारानें झाला आहे. तरी पण, ह्या शहरांत ज्या ठळक ठळक गोष्टी जातिभेदांत दृष्टीस पडतात त्यांची थोडक्यांत माहिती देऊन हा विषय पुरा करूं.

५४. आत ह्या **मुंबईं**त शेंकडो जाती असून त्यांच्यामध्यें अनेक प्रकारच्या रूढी चालू आहेत. कोणी एका ताटांत जेवीत नाहींत; कोणी एका पंक्तीस बसत नाहींत; कोणा एका जातीस दुसऱ्या जातीचीं भांडीं उपयोगीं पडत नाहीं; कोणी दुसऱ्याचे हातचें पाणी घेत नाहींत; कोणास दुसऱ्यानें शिजविलेलें अन्न चालत नाहीं, कोणास पाण्यानें शिजविलेलें अन्न चालत नाहीं. पण दुधांत शिजविलेलें अगर तळलेलें असलें तर चालतें; कोणाकोणाचा अन्नव्यवहार होतो; पण, बेटीव्यवहार होत नाहीं; कित्येक दक्षिणी ब्राह्मण गुजराथी ब्राह्मणांच्या हातचें अन्न खात नाहींत; पण, कित्येक गुजराथी ब्राह्मण दक्षिणी ब्राह्मणाकडे अन्न व्यवहार करितात; हिन्दुस्तानी ब्राह्मण इतरांनीं शिजविलेलें अन्न खात नाहींत एवढेंच नाहीं; तर, दरएक मनुष्य वेगळी चूल करून आपलें अन्न शिजवून खातो. कदाचित् आपल्या स्वयंपाक घरांत अगर चुलीच्या चौकांत कोणी चुकून गेलाच तर, अन्न विटाळलें असें ते मानतात; परंतु, चौकाच्या बाहेरून त्यांस कुणब्यानें किंवा दुसऱ्या एकाद्या जातीच्या मनुष्यानें पाणी दिलें किवा, भाकरीचें पीठ मळून त्याच्या भाकरी वळून दिल्या तरी चालतात. असा प्रकार दुसऱ्या ब्राह्मणांत चालत नाहीं. कित्येक गुजराथी ब्राह्मणांत कुणब्यानें पाणी आणून त्यास 'बामणया पाणी' ह्मणून त्यांस दिलें तर ते पितात. लंबोरी जातीचे मलबारी ब्राह्मण कोणास न शिवतां मुसलमान भटाऱ्याकडील भाकरी घेऊन खातात. शिजलेलें अन्न मुसलमानानें स्पर्श न करितां

एका काठीच्या शेवटास बांधून आणलें तर तें नेपाळी लोक निर्दोष मानून खातात. गुजराथी ब्राह्मणांत सोवळ्याओंवळ्याचा विटाळ नाहीं; परंतु, दक्षिणी लोकांत एकदां सोंवळें नेसलें म्हणजे त्यास स्वजातीचे लोक जरी ओंवळ्यानें शिवले तरी विटाळ मानितात. कित्येक गुजराथी, सिंधी वगैरे ब्राह्मण चामड्याच्या पखालींतून आणलेलें पाणी पितात. हिंदुस्थानी ब्राह्मण शूद्राच्या घरचें तळलेलें अन्न खातात. **पंजाब, सिंध व बंगाल** येथील ब्राह्मणांस मच्छमांसादि चालतें. मद्यही पितात! देशावरील कित्येक ब्राह्मण चांभारांचीं लग्नें लावतात; परंतु, **कोंकणां**तील ब्राह्मण चांभाराची सांवली देखील घेत नाहींत. रजपूत मुसलमानाच्या मुली करितात; पण, आपल्या मुली मात्र त्यांस देत नाहींत. असे अनेक प्रकार अनेक जातीच्या लोकांच्या रीतीभातींत दिसून येतात. जो तो आपणास उंच मानितो. चांभार देखील बुरूड, मांग ह्या जातींपेक्षां आपण उंच आहोंत असें मानतात. भंगी म्हणतात आम्ही महार, मांग चांभार ह्या जातींपेक्षा उंच, असे प्रत्येक जातीचे लोक आपण उंच आहोंत असें मानतात व आपल्या जातीचा व वहिवाटीचा प्रत्येकास इतका अभिमान असतो कीं, आपलें सर्वस्व गेलें तरी हरकत नाहीं; पण, चालत असलेल्या वहिवाटींत एवढें देखील न्यून पडतां उपयोगी नाहीं. पण ही सर्व बंधनें **मुंबई**मध्यें हळुहळू शिथिल होत चाललीं आहेत.

**५५.** आतां आमच्या लोकांच्या रीतीभाती श्रुतिस्मृति पुराणाधारें चालतात हें सांगितलें पाहिजे असें नाही. ह्या चालू रीतीभातींत कोणत्याही प्रकारें फेरबदल करणें म्हणजे आमच्या लोकांच्या जिवावर येतें. इतक्या त्या आमच्या आंगीं अगदीं खिळून गेल्या आहेत. आमचे आधुनिक सुधारक ह्या रितीभातीत वर्तमान काळाला अनुसरून फेरबदल करण्यासाठीं आपणाकडून होईल तो प्रयत्न करीत आहेत; परंतु, ह्या त्यांच्या कृत्यास आजच यश येईल असें निदान आम्हांस दिसत नाहीं. आमच्यांतील जुन्या लोकांस पहिल्यानें सोंवळेंओंवळें फार. त्यांत जुन्या चालत आलेल्या रीतीभातींस, आचारविचारांस— मग ते कसेही कां असेनात—त्यांस एकदम फांटा देणें हें त्यांस अगदीं रुचत नाहीं. आणि आमचे आधुनिक सुधारक लोक तर होईल तें करून साधेल तेवढा फेरबदल करण्यास झटत असतात. येथेंच मतभेद होतो. कसा तो पहा—जुन्या लोकांचा सोंवळ्या

ओंवळ्याकडे विशेष कटाक्ष असल्या कारणानें आगगाडींत बसून प्रवास करूं नये किंवा "नवदेद्यावनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि:" ह्याप्रमाणें त्यांचें मत; पण, आमचे आंग्लभौमविद्याविभूषित विद्वानांचें मत ह्या विरुद्ध; तेव्हां अर्थात वर ह्मटल्याप्रमाणें नव्या जुन्या लोकांत मतैक्य असणें फार कठीण. पण हळुहळू यावनी भाषा शिकल्यापासून लाभ आहेत आणि आगगाडींतून जाणेंयेणें सुलभ व अल्पकाळांत होतें, हें जुन्या लोकांस जसजसें समजूं लागलें, तसतसें त्यांच्याही समजांत थोडाथोडा फरक पडत चालला आहे. हें बंड मोडतां मोडतां ते आतां आपल्या मुलांस इंग्रजी शिकण्यास पाठवूं लागले आहेत. ह्याप्रमाणें देशकालानुरोधानें आणि 'यथा राजा तथा प्रजा' ह्या न्यायानें दिवसेंदिवस सुधारणुकेचें पाऊल पुढेंच पडत जावयाचें!

५६. **लोकमत**-सांप्रतकाळीं आमचे सुधारक लोक कोणकोणत्या ठळक ठळक बाबतींत सुधारणा करणें इष्ट आहे ह्मणून ह्मणतात, त्यांचें थोडेसें दिग्दर्शन करून हा विषय पुरा करूं.

५७. स्त्रियांस शिक्षण देणें अवश्य आहे असें प्रतिपादन करणारांचें ह्मणणें असें आहे कीं, स्त्रिया सुशिक्षित असल्या तर पुरुषांस त्यांच्या व्यासंगांत फारसा त्रास पडत नाहीं, गृहकृत्यें सुरळीत चालतात आणि परस्परांमध्यें प्रेमाधिक्य विशेष राहतें; पण, तीच स्त्री अशिक्षित असली तर, प्रजाही मूर्ख होण्याचा बराच संभव असतो. कारण आईचा आणि बालकाचा अतिनिकट संबंध असावयाचा. विरुद्ध पक्षाचे मत असें आहें कीं, आमच्या लोकांच्या स्त्रियांस शिक्षण हें मुळींच नसावें व कित्येकांचे मत असें आहे कीं, स्त्रियांस शिक्षण देणें तें हल्ली जसें हायस्कुलादि शाळा काढून त्यांस देण्यांत येतें त्याप्रकारचें न देतां, त्यांस साधारण लिहिण्यावाचण्यास आलें म्हणजे पुरे आहे. कांहीं तर असेंही प्रदिपादन करतात कीं, स्त्रियांस इंग्रज लोकांच्या बायकांप्रमाणें स्वातंत्र्य असावें; त्यांस घरच्या दासीप्रमाणें न वागवितां त्यांस त्यांचे पूर्ण हक्क द्यावे; त्यांनीं पुरुषांबरोबर फिरण्यास जावें वगैरे- कित्येक ह्मणतात कीं त्यांस इतकें स्वातंत्र्य देतां कांहीं कामा नये; तरी पण, त्यांस कांहीं नियमित गोष्टींत थोडेंबहुत तरी स्वातंत्र्य देणें इष्ट आहे. दुसरा विषय बालविवाहनिषेध व विधवाविवाहप्रतिपादन हा होय. सुधारक लोकांचें

म्हणणें असें आहे कीं, बालविवाह मुळींच नसावा; मुलीचे लग्न बारा वर्षांवर व १६ वर्षांच्या आंत व मुलाचे लग्न वीस वर्षांपासून पुढें करावें. असें केल्यानें प्रजोत्पत्ति दुर्बळ न होतां चांगली निपजते. ह्या ह्मणण्याच्या समर्थनास ते वैद्यशास्त्रांची प्रमाणें देतात. कांहीं ह्मणतात मुलींचें लग्न 'रजोदर्शनात्प्राक्' होणें इष्ट आहे; कित्येक तर असेंही ह्मणतात कीं, हें कांहीं उपयोगांचें नाहीं. स्त्रिया चांगल्या प्रौढ झाल्या ह्मणजे त्यांस पसंत पडेल त्याजबरोबर त्यांनीं आपला विवाह करावा. दुसरे असेंही ह्मणतात कीं, त्यास रजोदर्शन झालें तरी देखील हरकत नाहीं. त्यासही कांहीं प्रायश्चित केलें म्हणजे शास्त्राची मोकळीक आहे. 'अष्टवर्षा भवेद्गौरी ०–' असेंही म्हणणारे आमचे जुने लोक त्यांच्या विरुद्ध आहेतच. विधवाविवाहाच्या संबंधानें कित्येक असें म्हणतात कीं, ज्या अबला तरुणपणी गतधवा होतात त्यांचें लग्न 'नष्टे मृते०–' या शास्त्राधारें पुनः करावें व असा परिपाठ आपल्या आर्य लोकांमध्यें पूर्वी होताही. ह्या मतास विरुद्ध पक्षही बराच सबळ आहे. धर्मसंबंधाच्या बाबतींतही भिन्नभिन्न मतें प्रचलित आहेत. कोणी म्हणतात–कोणी एक जो निराकार परमेश्वर आहे त्याचें स्तवन करून मूर्तिपूजादिकांचा त्याग करावा; जातिभेद मुळींच बाळगूं नये; आपण सर्व एका ईश्वराची लेंकरें; ईश्वरदत्त किवा ईश्वरप्रेरित असें कोणतेच धर्मपुस्तक नाहीं; सर्व धर्मांचीं मूलतत्त्वें सारखींच; नीतीनें वागणें, सत्य बोलणें, परोपकार करणें, कोणाचें वाईट न करणें, हाच धर्म. नैश्वरवादीही बरेच आहेत. आमच्या मतें सर्व आर्यजनांनीं आपला जो सनातन वैदिकधर्म त्यास धरून चाललें असतां फार चांगली गोष्ट आहे. त्यांतच हित आहे आणि त्यांतच आपलें आर्यत्व कायम राहणार आहे. इत्यादि अनेक बाबतींत नेहमीं वाटाघाट चालूच असते. वर्तमानपत्रांतून व मासिकपुस्तकांतून जुने व नवे मताचे लोक एकमेकांविरुद्ध लेख लिहून किंवा प्रसिद्ध सभा भरवून तेथें एकामेकांचा पाडाव करण्याविषयीं प्रत्येक पक्ष झटत असतो, विरुद्धपक्षाचे लोक त्यांचे मंडण करण्याचे सामर्थ्य आपल्या आंगीं नसल्याकारणानें सरकाराकडून कायदेही मागतात. स्त्रियांस स्वातंत्र्य असावें म्हणून एखाद्या स्त्रीस उत्तेजन देऊन सोडचिठीचाही प्रकार कोर्टांत चाललेला दृष्टीस पडतो. असा नेहमीं घोटाळा सुधारक व दुर्धारक (जुने व नवे) ह्यांत चालू असतो. आमच्या मतें दोन्हीं पक्षकारांनीं एक विचारानें वागून चाललें असतां फार चांगलें होईल.

५८. राज्य प्रकरणींही नेहमीं 'भवति न भवति' चाललीच असते. कोणी सरकारच्या विचाराविरुद्ध लिहितो आणि कोणी सरकारच्या तर्फेनें लिहितो; पण, विषय प्रकृत पुस्तकाचा नसल्यामुळें त्यावर लेखणी धरण्यास आम्ही इच्छित नाहीं.

**५९. लग्नकार्यें** — आमच्या लोकांस लग्नसंबंधाच्या बाबतींत विशेष खर्च होतो. गुजराथी, वाणी, भाटे वगैरे लोकांत तर लग्नकार्यांत पाण्यासारखा पैसा उधळण्यांत येतो. ह्या जातींत असेही लोक पाहण्यांत येतात कीं, एकाद्याकडेस त्याच्या मुलांचे किंवा मुलीचें लग्न आहे आणि तो फार सधन आहे तर, आपल्या दारापुढें मंडपाकरितां जागा नसल्यास, एकाद्याचें घर मोडून त्यास त्याची किंमत देऊन त्या जागेवर दहा पांच हजार रुपयांपर्यंत खर्च करून मंडप उभारितो व त्यांत हजारो ग्लासें, हंड्या व झुंबरें लावून तो एकाद्या राजमहालाप्रमाणें तयार करतो. इतका पैसा व्यर्थ गेला नाहीं असें कोण ह्मणेल? तसाच हा लोकांत जेवणावळीचा समारंभ महिना महिना चालतो. अशा ह्या जेवणावळी घरीं न होतां त्या लोकांच्या **'महाजनवाड्या'** ह्मणून जागा आहेत, त्यांत होतात. **मुंबई**तील बहुतेक सर्व लोकांत लग्नसमारंभाच्या वेळीं विश्वयोषिता तर अवश्य असलीच पाहिजे. कित्येक वेळां एकाद्यानें अशा प्रसंगीं नायकीण न आणली तर मोठेमोठे कलहही होतात. फक्त एकादी वरात निघाली तर, रस्त्यांतून दारूकामाचा, हिलालांचा, वाजंत्र्यांचा व गाडीघोड्यांचा जो समारंभ निघतो तो सुमारें मैल अर्धमैलपर्यंत चालतो. अशी एकादी रस्त्यांतून वरात निघाली असतां तिजबरोबर जर नायकीण आणि बेंडबाजा हे नसले तर ती वरातच नाहीं असें इकडील लोक समजतात. जसे नायकिणीच्या बाबतींत कलह होतात ह्मणून वर ह्मटलें आहे, तसेंच ह्या बेंडबाजाच्या बाबतींतही अशा विवाहाच्या संबंधानें अति निकट झालेल्या इष्टमित्रांत आणि सुहृत्संबंध्यांत कलह होतात. याप्रमाणें विवाहसंबंधी जो **मुंबई**त लोक अतोनात द्रव्यव्यय करितात तो फुकट जातो व त्यापासून देशाचें काडीमात्र देखील हित होत नाहीं, हें ह्मणणें सर्व कबूल करतील ! ह्मणून या बाबतींत हळुहळू कां होईना, पण सुधारणा होणें इष्ट आहे असें आह्मांस वाटतें.

६०. पारशी लोकांच्या लग्नें लावण्याच्या निराळ्याच जागा असतात. ह्यांच्यांत लग्न समारंभ एकच दिवस असतो. त्या दिवशीं नियमित जागीं जाऊन त्यांच्या धर्मपंथाप्रमाणें लग्नकार्य उरकून घेतात. विवाहसंबंधीं ह्या लोकांत विशेष उधळेपणा पाहण्यांत येत नाहीं. आमच्या लोकांप्रमाणें ह्यांच्यांतही ब्यांड वगैरे वाद्यें

लागतात. रोषनाईचाही थाट मोठा असतो. ह्यांच्या लग्नांत संस्कृत मंत्र ह्मणतात ह्मणून सांगतात ! हीं लग्नें त्यांचे 'अंधारु' (धर्मोपाध्ये) लावतात.

६१. इंग्रज लोकांची लग्न लावण्याची रीति निराळीच. त्यांचीं लग्नें आमच्या लोकांप्रमाणें घरीं लागत नसून देवळांत लागतात. ह्यांच्या लग्नाचा प्रकार कांहींसा आमच्या लोकांच्या फार प्राचीनकाळच्या स्वयंवरासारखा आहे. देवळांत गेल्यावर पाद्री वधुवरांचें पाणिग्रहण करवितो त्यावेळीं नवरा उजवीकडे आणि नवरी डावीकडे अशीं उभीं राहतात. नंतर ' एकमेकांच्या सल्यानें चालूं, त्यांत अंतर करणार नाहीं.' अशा परस्पर शपथा घेतात; व नवरा आपल्या बरोबर आणलेल्या दोन आंगठ्यांपैकीं एक वधूच्या हातांत व एक आपल्या हातांत घालतो. एवढें झालें म्हणजे लग्नसमारंभ आटपला. नंतर तीं उभयतां घरीं आल्यावर इष्टमित्रांसहवर्तमान भोजनसमारंभ करतात. लग्नांत 'वेडिंग केक' (लग्नाचे पक्वान्न) नांवाचें पक्वान्न करितात. नंतर ती वधुवरें लागलीच 'हनी मून' (नूतन वधुसंगमसुख) भोगण्यासाठीं कोठें तरी बाहेरगांवीं निघून जातात. ह्यावेळीं ह्या वधूवरांच्या गाडीवर मागून जुने 'बूट' उडविणें हा मोठा शुभ शकून समजतात ! बडेबडे लोक लग्नसमारंभ आटपल्यानंतर रात्रीं आपल्या सोयऱ्याधायऱ्यांस व इष्टमित्रांस [१]बॉल देतात. बॉल हा

[१]. बॉल देण्याची तऱ्हा अशी आहे कीं, यजमान आपल्या इष्टमित्रांस सहकुटुंब आमत्रंण चिठ्या पाठवून नियमितवेळीं येण्याची विनंती करितो. अशा प्रसंगी बहुधा अविवाहितांस आमंत्रण नसतें. ह्याप्रमाणें निमंत्रित जोडपीं आल्यावर त्यांस मेजवानीचा थाट उडतो. पुढें ह्या खेळास आरंभ होण्यापूर्वी बॉलम्यानेजर (व्यवस्था पहाणारा) ह्यास जो तो आपापली इच्छा प्रदर्शित करितो. त्याप्रमाणें प्रत्येकास सूचना झाल्यावर जी बाई ज्यानें पसंत केली असेल तिजबरोबर नाचण्यास तो उठतो. व ती बाईही संकेताप्रमाणें त्याजबरोबर नाचण्यास तयार होते. आतां येथें हेंही सांगितले पाहिजे कीं, जिची किंवा ज्याची तिजबरोबर किंवा त्याजबरोबर नाचण्याची इच्छा नसेल त्याप्रमाणें सदर्हु बॉल म्यानेजरास सुचना होते. नाचणारा पुरुष बाईच्या कमरेसभोंवती हात घालून उभा राहतो, त्याप्रमाणेंच बाईही त्या पुरुषाच्या स्कंधावरुन हात टाकून उभी राहते. ह्याप्रमाणें सर्व जोडपीं तयार झाल्यावर ब्यांडास सुरवात होते आणि मग हीं स्त्रीपुरुषयुग्में पूर्वीच मद्यमांसादि आहारानें तृप्त झालेलीं असतात, त्या आनंदाभरांत नृत्यास आरंभ करितात. ह्याप्रमाणें सुमारें दहा मिनिटेंपर्यंत एक नाच चालतो. पुढें कांहीं वेळ पुनः आहारादि होऊन पुनः पूर्ववत् नाचास सुरवात होते. असें एका रात्रींतून दहा पांच वेळ झालें म्हणजे नाच पुरा होतो. हा नाच आमच्यांतील पूर्वीच्या रासक्रीडेचेंच अंशतः अनुकरण आहे असें वाटतें !

एक प्रकारचा वाद्यनृत्ययुक्त स्त्रीपुरुषांनीं नाचण्याचा खेळ आहे. अशा प्रकारचे नाच आनंदोत्सवार्थ इतर वेळींही देण्यांत येतात. वधूवरें वधूच्या घरून देवळास जाण्यास निघतात तेव्हां वधू पांढरा शुभ्र पोषाख करून तोंडावर पांढराच जाळीचा बुरखा टाकिते. वराचा पोषाख अस्मानी रंगाचा असून आंतली बंडी पांढऱ्या साटणीची असते.

६२. पोर्तुगीज लोकांतही लग्नाचा प्रकार फार करून साहेब-लोकांसारखाच असतो. तरी किंचित् थोडा फरक असतो. ज्याप्रमाणें साहेब लोकांत सोळाव्या वर्षाच्या आंत मुलीचें लग्न आणि २५ वर्षांच्या आंत मुलाचें लग्न होत नाहीं असा सर्व साधारण नियम आहे, तसाच प्रकार पोर्तुगीज लोकांतही आहे. फरक एवढाच कीं, पोर्तुगीज लोकांत आमच्या लोकांप्रमाणें वधूवरांचें लग्न कांहीं अंशीं त्यांच्या मातापितरांच्या इच्छेवर अवलंबून असतें. ज्याप्रमाणें आमच्या लोकांच्या बायकांस दागिन्यांची हौस असते त्याप्रमाणें साहेब व पोर्तुगीज लोकांत त्यांच्या बायकांस कपडालत्ता, गाडीघोडा, चाकरनोकर इत्यादिकांकरितां लग्न झाल्यानंतर पैसा खर्च करण्याची हौस असते. पण इकडील पोर्तुगीज लोकांत थोड्या बहुत हिंदु लोकांच्या चाली शिरल्या आहेत.

६३. मुसलमान लोकांत लग्नसमारंभ कांहींसा हिंदु लोकांसारखा थाटमाटाचा असतो; तरी पण, आमच्या लोकांसारखा ते ह्या कामीं विनाकारण पैशाचा व्यय करीत नाहींत. ह्या लोकांची लग्नें काजी लावतो. हे लोक विवाहास 'शादी' व पुनर्लग्नास 'निक्का' असें ह्मणतात.

६४. **स्त्रीस्वातंत्र्य**— आमच्या लोकांतील स्त्रियांस 'स्वातंत्र्यं न क्वचित्स्त्रियाः' अशी स्थिति असल्या कारणानें त्यांस स्वातंत्र्य नसल्यामुळें उंच जातींतील कुलीन स्त्रिया एकट्या कधींही कारणावांचून बाहेर जावयाच्या नाहींत. साधारण स्त्रिया ह्यांस देखील भीड मर्यादा विशेष असते. ही गोष्ट फार चांगली आहे; परंतु, त्यांस विनाकारण अगदीं कोंडवाड्यांत ठेऊन यत्किंचितही कोणत्याच बाबतींत स्वातंत्र्य न देणें हें आमच्या मतें

चांगलें नाहीं. मुसलमान लोकांत बायकांस नेहमीं झनान्यांत ठेवतात व त्यांच्या स्त्रिया बाहेर पडणें झाल्यास तोंडावरून 'बुरखा' घेतात. ही गोष्ट कुलीन व श्रीमान गृहस्थांची आहे. साधारण प्रतीच्या स्त्रिया रस्त्यानें हिंडतांना दृष्टीस पडतात. स्त्रियांस अगदीं **'गोषांत'** ठेवण्याची चाल आमच्या लोकांनीं मुसलमानांपासूनच घेतली असावी असें दिसतें. पारशांच्या स्त्रिया ह्या एकट्या बाहेर फिरावयास जातात. ह्यांच्यांत साहेब लोकांप्रमाणें स्त्रियांस अलीकडे विशेष स्वातंत्र्य देण्यांत आलेलें पाहण्यांत येतें. साहेब लोकांत तर स्त्रियांस फारच मान देण्यांत येतो व त्या मानानें त्यांस सर्व बाबतींत पूर्ण स्वातंत्र असतें. स्त्रियांस ते इतका मान देतात कीं, साधारण गाडींत बसणें अगर गाडींतून उतरणें झालें तरी, पहिल्यानें मडम साहेब बसावयाची आणि तीही नवरा अगर कोणी इष्टमित्र असेल त्यानें तिचा हात धरून बसवावें अगर उतरवावें लागतें. एकाद्या समाजांत स्त्री गेली तर-मग ती आपल्यापेक्षां किंचित् हलक्या दर्ज्याची असली तरी-दुसरी खुर्ची रिकामी नसल्यास पुरुष मंडळीपैकीं कोणीही उठून तिला जागा देतो. इतका ते लोक स्त्रियांचा मान राखतात. आपली सहचारिणी या नात्यानें स्त्रियांस योग्य तो मान देणें इष्ट आहे; पण, साहेब लोकांप्रमाणें बेहद्द तऱ्हेची मोकळिक देणें आम्हांस तरी पसंत नाहीं.

६५. **भोजनप्रकार**— आमच्या लोकांची जेवणाखाण्याची रीत साहेब, पारशी, मुसलमान वगैरे लोकांसारखी नसून तांब्या, सोवळें, ताट, पाट, पळी, पंचपात्री, वगैरे बरीच खटपट असते. एकंदरींत पाहिलें तर इतर बाबतींप्रमाणें जेवणाच्या प्रसंगींही आमच्या लोकांचा शुचिर्भूतपणा विशेष असतो ही गोष्ट फार अभिनंदनीय होय. आमचे कित्येक होतकरू विद्वान ह्या बाबतींतही साहेब लोकांचें अनुकरण करण्यास पहात आहेत हें फार वाईट ! साहेब, पारशी वगैरे लोकांस टेबल, खुर्ची असली ह्मणजे पुरे होतें. ते कधीं जेवणाच्या जागीं शेण लावीत नसतात. मुसलमान

लोकांत चारपांच जण एकत्र मिळून 'बिसमिल्ला' होतो. ह्यांतही सुशिक्षित लोक साहेब लोकांचें अनुकरण करीत आहेत. मुसलमान, पार्शी, इंग्रज वगैरे लोकांत पाणी पिणें झाल्यास एकाच भांड्यानें पांचपंचवीस असामी पाणी घेऊन पितात, असला घाणेरडा प्रकार आमच्या लोकांस मुळींच खपत नाहीं. साहेब लोकांत घरांतील सर्व माणसें एका मेजावर बरोबर जेवावयास बसतात. जेवणाचें मेज मोठें लांब असतें त्यावर एक धुतलेलें शुभ्र वस्त्र घालितात. यजमान किंवा घरांतील मुख्य पुरुष असतो तो मध्यें ह्मणजे मेजाच्या दोन लहान बाजू असतात त्यांतून एका बाजूवर मधल्या खुर्चीत बसतो. नंतर वाढपी एकेकाच्या पुढ्यांत एक एक रिकामी बशी आणून मांडितो प्रत्येक बशीवर धुवट रुमाल, सुरी, कांटा आणि चमचा इतकें साहित्य असतें. नंतर वाढपी एका मोठ्या भांड्यांत पदार्थ घालून झांकून आणून यजमानापुढें ठेवितो, नंतर तो त्या मोठ्या भांड्यांतून एकाएका बशींत थोडथोडें अन्न घालून ती वाढण्याजवळ देतो आणि वाढपी ती प्रत्येकाचे पुढें नेऊन ठेवितो. याप्रमाणें सर्वांस वाढून झाल्यावर यजमान आपण जेऊं लागतो. हा पहिला पदार्थ खाऊन झाल्यावर वाढपी सर्वांच्या पुढच्या जुन्या बशा घेऊन जातो आणि नव्या आणून ठेवितो. याप्रमाणें एकामागून एक पदार्थ जेवण होईतोंपर्यंत वाढले जातात.

६६. **धर्माची अनास्था**— आज आमच्या लोकांत धर्माच्या बाबतींत जुन्या धर्मपंथाविरुद्ध बरीच चळवळ दृष्टीस पडते. कोणी म्हणतो देव एक आहे; कोणी म्हणतो अनेक आहेत; कोणी म्हणतो शीव श्रेष्ठ, कोणी ह्मणतो विष्णु श्रेष्ठ, आणि कोणी ह्मणतो गणपती श्रेष्ठ, असे अनेक दैवतांवर भरंवसा ठेवणारे लोक पुष्कळ आहेत. देव मुळींच नाहीं असेंही ह्मणणारे आढळतात ! कोणी नानकपंथी; कोणी वल्लभपंथी; कोणी कबीरपंथी; कोणी रामानुजपंथी असे अनेक पंथांचे अनेक लोक ह्या शहरीं आहेत. शिवाय आज कोठें ब्रह्मसमाज; कोठें प्रार्थनासमाज; कोठें सोहंसमाज; कोठें

आर्यसमाज असे नवीन नवीन समाजही निघत आहेत. परंतु एकाचा मेळ दुसऱ्यास नाहीं. अशी आमच्या जुन्या वैदिक धर्माची पायमल्ली होऊन निरनिराळे पंथ आणि निरनिराळ्या जाती उत्पन्न झाल्या. ह्या जातिभेदाचें खुळ आज इतकें माजलें आहे कीं, आपल्यापेक्षां हलक्या जातीकडे ब्राह्मण जेवावयास जावयाचा नाहीं इतकेंच नाहीं; तर ब्राह्मणेतराकडून पाणीही घ्यावयाचा नाहीं; तरी पण, अलीकडे हें बंड सुधारक लोकांत बरेंच कमी मानानें दृष्टीस पडतें. साहेब, मुसलमान, पारशी, वगैरे लोकांतही अशा प्रकारचा भेद मानण्यांत येतो; परंतु, तो कांहीं निराळ्या तऱ्हेचा असून त्यांत धर्मसंबंध मुळींच नसतो. ह्या जातिभेदामुळें आज आमच्यांत बहुत अनर्थ होत आहेत. अशी धर्मसंबंधी आमच्या लोकांची स्थिति आहे. आमच्या धर्माचा मातेरा विशेष ह्या पाद्रीमंडळानें केला आहे. ह्या लोकांकडून आमच्या आर्यधर्माविरुद्ध नित्यशः शेकडोशें पुस्तकें निघत आहेत. एवढेंच करून ते स्वस्थ राहतात असें नाहीं; तर, त्यांचे धर्मोपदेशक रस्तोरस्तीं आपल्या धर्मांत लोकांस ओढण्याकरितां प्रयत्न करीत असतात. ह्याप्रमाणें त्यांनीं आपल्या कळपांत आजपर्यंत बरेच लोकांस ओढून नेलें. परंतु हल्लीं त्यांस हवेंतसें यश मिळत नाहीं. **कै. विष्णुबुवा** ब्रह्मचारी आणि **श्रीमद्दयानंद सरस्वती** सारख्या विद्वान गृहस्थांनीं आपल्या उपदेशानें वैदिक धर्माचें खरें तत्व लोकांस समजावून देऊन त्यांस धर्मांतर करण्यापासून सोडविलें. ह्या वरील दोन्ही गृहस्थांनीं पाद्यांच्या विरुद्ध सभा भरवून त्यांच्याच धर्मांतील चुका त्यांस दाखविल्या. ह्या पाद्रीधर्मोपदेशकांचें हिंदुधर्माविरुद्ध बरेंच खुळ कमी होत चाललें आहे, नाहीं इतक्यांत साता समुद्रापलीकडून **हिंदुस्थानांतील** 'पापी' लोकांस तारण्याकरितां ईश्वरानें ज्यांस पतितांचा उद्धारकरण्याचा जणुं काय शिक्काच दिला आहे असें एकदम एक मोठें 'सैन्य' चार पांच वर्षांपूर्वी **मुंबई**त येऊन दाखल झालें. व त्या सैन्यानेंही आपली धर्मोपदेशरूप तरवार गाजविण्याचा प्रकार चालविला आहे. ह्या सैन्यास 'मुक्तिफौज' ह्मणतात. ह्या मुक्तिफौजेंतील लोक आंगांत कफनी, नेसण्यास लंगोटा, कपडे भगवे, हातांत कमंडलू, अनवाणी चालणें वगैरे पोषाखकरून आमच्यांतील

संन्याशांचें हुबेहुब सोंग आणितात. संन्याशांत व ह्यांच्यांत फरक इतकाच कीं, संन्याशी विद्वान असून कित्येकांस थोडें बहुत वेदाध्ययन तरी असतें व ह्यांचें त्यासंबंधानें आंवळ्या एवढें पूज्य. तरी ह्यांचीं डोकीं केवळ संन्याशांचे असोल्या गोट्याप्रमाणें नसतात ! ह्या लोकांचा उद्योग शहरांत फिरून कोणी तावडींत सांपडल्यास आपल्या फौजेंत ओढावा. हे लोक रोज सांजसकाळ स्वतः करितां घेतलेल्या जागेंत उपदेश करीत असतात. आमच्या लोकांत जशा संतिणी असतात तशा ह्यांच्यांतही कित्येक स्त्रिया धर्मपंथ वाढविण्याच्या कामीं लागल्या आहेत. ह्याही हिंदुलोकांच्या स्त्रियांप्रमाणें पोषाख करितात. पाद्रीलोक, हिंदु-पारशी वगैरे इतर धर्माची निंदा करितात; पण, मुसलमानी धर्माची निंदा करणें झाल्यास मात्र फार जपून करितात. ह्याप्रमाणें धर्माची अनास्था ह्या शहरीं आहे; पण प्रत्येकाने हें पक्कें लक्षांत वागविलें पाहिजे कीं, धर्मश्रद्धा व सदाचार हीं आपल्या धर्माची व देशाची सुधारणा करण्यास कांही अंशीं कारणीभूत अशी साधनें आहेत. व ह्या दोन्हीं गोष्टी आपणास प्राप्त झाल्या ह्मणजे स्वदेशाचा अभिमान साहजिकच मनांत येऊन आपल्या देशांतील लोक सुखी होतील. हें बीज नेहमीं मनुष्यानें लक्षात धरून 'स्वधर्मे निधन श्रेयः' या भगवदुक्तीप्रमाणे सर्वांनीं वागण्याचा प्रयत्न केला असतां सर्वांचें हित होईल अशी आशा आहे.

६७. **विद्याव्यासंग**—आमच्या लोकांस अलीकडे विद्येचें मोल काय आहे हें थोडें बहुत समजूं लागलें आहे; तरी पण, विद्येचें मोल जाणणारे शेंकडा दहा मिळतील कीं नाहीं ह्याचा संशय आहे. **इंग्लंद** देशांत तर शेतकरी, हेलकरी वगैरे अगदीं कनिष्ठ प्रतीचे लोकही थोडी बहुत तरी विद्या संपादन करितात. साधारण तेथें एकाद्या काफी पैसांतही पुष्कळ लोक वर्तमानपत्रें वाचण्यांत व नानाविध विषयांवर संभाषणें करण्यांत गढून गेलेले असतात. तशी स्थिति अजून आमच्या लोकांची झाली नाहीं, ही मोठी शोचनीय गोष्ट होय. विद्येची अभिरुची अलीकडे लोकांस उत्पन्न होत चालली आहे खरी; तरी पण, विद्या संपादन करण्यास अवश्य असें जें द्रव्य त्याची आमच्या लोकांत फार कमतरता असल्याकारणानें ज्यांस

आपल्या मुलांस विद्या शिकवावी अशी उत्कट इच्छा असते, त्यांच्याजवळ विद्या शिक्षणास लागणारा पैसा नसल्या कारणानें त्यांजकडून हवें तेवढें शिक्षण आपल्या मुलांस देतां येत नाहीं. तेव्हां अर्थातच गरीब लोकांचा वर्ग ह्या कामीं मागसला जातो; आणि शिकण्याची अभिरुचि ह्मटली ह्मणजे गरीबांसच विशेष असते. सधन लोक तिजविषयीं बहुधः निष्काळजीपणा दाखवितात. दिवसेंदिवस आमचें सरकारही शिक्षण महाग करीत चाललें आहे, त्यामुळें अर्थातच आमच्या येथें विद्येचा प्रसार कमी होतो हें निराळें सांगणें नलगे.

६८. आतां **युरोप** खंडांतील देशांची आणि आमच्या देशाची विद्येच्या संबंधानें तुलना केली तर, त्यांच्यांत व आमच्यांत जमीन अस्मानाचा फरक दिसून येतो. **इंग्लंद, फ्रान्स, स्वित्झरलंद, जर्मनी, इताली, ऑस्ट्रिया** इत्यादि देशांत मुलांस सक्तीनें विद्या शिकवून गरीबांच्या मुलांस फुकट शिकवितात. **बेलजम** व **हिंदुस्थान** ह्या दोन देशांत मुलांवर शिकण्याची सक्ती नाहीं. बेलजम देशांत गरीब मुलांस शिक्षण फुकट देतात आणि आमच्या येथें तर, पैसा नसला ह्मणजे शिकण्याची सोय मुळींच होत नाही ! अशी आमच्या देशाची विद्येच्या संबंधानें शोचनीय स्थिती आहे. हें आमचें ह्मणणे खालील आंकड्यांवरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

६९. **ग्रेटब्रिटनां**त एकंदर २,९७,१०,०१५ एवढी लोकसंख्या असून तेथे २१,८६२ इतक्या शाळा आहेत. आणि ह्या शाळांतून जाणाऱ्या मुलांची संख्या ३७,२१,३६६ इतकी आहे. आमच्या देशांत २५,३९,८२,५९५ इतकी लोकसंख्या असून १,३२,८०५ इतक्या शाळा आहेत व त्या शाळांतून जाणाऱ्या मुलांची संख्या ३२,२५,७१८ एवढी आहे. ह्या आंकड्यांवरून वाचकांच्या लक्षांत सहज येईल कीं, **ग्रेटब्रिटना**पेक्षां **हिंदुस्थानां**त लोकसंख्या ज्यास्त असूनही त्यांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या फार थोडी आहे. ह्याचें कारण वर दिलेंच आहे. एकट्या **मुंबई** इलाख्यांत आज पन्नास साठ हजार मुलें शिकणारीं निघतील; पण, त्यांजकडे शिकण्याचें साधन नाहीं. इतका आमचा देश उत्तरोत्तर कंगाल होत चालला आहे !

७०. **देशसुधारणेच्छा**—देश सुधारणेच्या संबंधाने आमच्या अलीकडील विद्वानांचे अनेक तर्क आहेत. कोणी ह्मणतो आपणांस पहिल्यानें कलाशास्त्र शिकलें पाहिजे; कोणी ह्मणतो शेतकीची सुधारणा केली पाहिजे; कोणी

ह्मणतो देशाटण करून व्यापार उदीम वाढविला पाहिजे; कोणी ह्मणतो शिल्पकला शिकली पाहिजे; कोणी ह्मणतो आज जी आमच्या **हिंदुस्थान** देशांत प्रतिवर्षी लक्षावधि गाईंची हिंसा होत आहे व जिच्या योगानें देश भिकार होऊन प्रजेचा उत्तरोत्तर तोटा होत चालला आहे, तर असली हिंसा प्रथमतः बंद केली पाहिजे; कोणी ह्मणतो **पार्लिमेंटां**त **हिंदुस्थान** तर्फे सभासंद असले पाहिजेत; कारण, **विलायतें**तील इंग्रज लोकांस आपलीं सुखदुःखे कोणकोणतीं आहेत, आपले हक्क काय आहेत, हें समजले ह्मणजे त्यांस आपला द्रव येऊन ते आपल्या हिताविषयीं विचार करून आमचे हक्क आह्मांस देतील. ह्याप्रमाणें कोणी ह्या विषयांत, कोणी त्या विषयांत असे ज्यास जो विषय बरा वाटेल त्याचा स्वीकार करून आपापला पक्ष सबल करण्यास प्रयत्न करून थोडेसें तरी देशाचें हित व्हावें ह्मणून झटतात ही फार चांगली गोष्ट आहे. मात्र कांहीं कांहीं प्रसंगी आमचे देशसुधारणेच्छु फाजीलपणाचे अवलंबन करतात, तें जर न करतील तर, ह्या त्यांच्या प्रयत्नास कालेंकरून थोडें बहुत यश मिळण्याचा संभव आहे.

७१. **व्यापाराची हालचाल**–आमच्या दक्षणी लोकांत व्यापार करणारी मंडळी फार थोडी. जरी कोणी केला तरी त्यास मिळावा तितका आश्रय मिळत नाहीं. ही फार दुःखाची गोष्ट होय. सर्व लोक विलायतेकडील मालावर फार भुलून जातात. **मुंबई** शहरांत स्वदेशी कपडा वापरणारे शेंकडा [१] मिळाला तर मिळेल. बहुधः नाहीं ह्मटला तरी चालेल. आमच्याकडील व्यापारी व कारागीर लोकांस उत्तेजन मिळत नसल्यामुळें, आजमितीस ते असून नाहीतसे झाले आहेत व जरी एकादा माल त्यांनी तयार केला तरी विलायती मालाचा दोन दिवसांचा भपका पाहून त्याजकडून स्वदेशी माल कोणी घेत नाहीत. हल्लीं आमच्या येथें मुख्य व्यापारी ह्मटले

[१]. ह्या संबंधी **हिंदुस्तानाचे** 'रिप्रेझेंटेटीव्ह' (मुखत्यार) म्हणून दोन चार गृहस्थ विलायतेत गेले होते; परंतु आमच्या देशाच्या दुर्दैवामुळे त्यांचा पार्लिमेंटात शिरकाव झाला नाही. ऑनरेबल मि. **दादाभाई नवरोजीं** हे ह्याच खटपटीकरितां हल्ली विलायतेस गेले आहेत. ह्यासंबंधी वाटाघाट करण्याकरितां कित्येक सभा स्थापन झाल्या आहेत आणि वर्तमानपत्रांतूनही लेख येत आहेत. 'बांबे प्रेसिडेन्सि असोशिएशन' आणि पुण्यांतील 'सार्वजनिक सभा' ह्या कामीं कमी खटपट करीत आहेत असें नाहीं. शिवाय 'न्याशनल कांग्रेस' (राष्ट्रीय सभा) म्हणून **हिंदुस्थानां**तील सर्व जातीतील संभावित व थोर गृहस्थांची सभा देशहिताच्या उद्देशानें प्रतिवर्षी ठिकठिकाणीं भरते.

वाणी, भाटे, मुसलमान, पारशी, खोजे, मेमण वैगरे लोक होते. इंग्रज लोक तर व्यापारावरच सत्ताधीश बनले आहेत !

७२. आतां, हे व्यापारी जरी आहेत तरी सर्वांपेक्षां इंग्रज लोकांची व्यापार करण्याची खुबी कांहीं निराळीच आहे. दुकानांत कसाही माल असला तरी त्यांस चालतो; पण त्यांच्या दुकानाचा भपका पाहिल्याबरोबरच गिऱ्हाईकांस असें वाटतें कीं, ह्या दुकानांत काय काय माल असेल कोण जाणे ! साधारणपणें त्यांचा नीटनेटकेपणा पाहूनच त्यांच्या दुकानांतील माल घेण्यास गिऱ्हाईकाचें मन धांवतें. सर्व दुकानाचा भपका व खर्च चालावा म्हणून साधारण मालाची सद्धां ते दुप्पट तिप्पट किंमत सांगतात. व गिऱ्हाईकांस असें वाटतें की, आज हा एवढा मोठा साहेब आपणास भलतीच किंमत सांगणार नाहीं. हें पाहून बिनतक्रार किंमत देतात. अशी गोष्ट आमच्या दुकानदारांची नसते; कारण, आधीच त्यांची दुकानें घाणेरडी, व त्यात खरोखर चांगला माल असला तरी त्याजवर गिऱ्हाईकांचा विश्वास बसत नाही. साहेब लोकांच्या दुकानाचा भपका आणि शोभा नीट पहावयाची असली तर गाडींत बसून जाण्यापेक्षां पायीं चालत जावें हें चांगले. दुकानांत जिन्नस अशा रितीनें मांडले असतात कीं, त्यांजकडे पाहणाऱ्याचें मन गेल्यावांचून राहातच नाहीं व चालण्याचे श्रमही होत नाहीत. दुकानदार आपली नांवें पाट्यांवर लिहून त्या दुकानांबाहेर लावितात. ह्या पाट्यांवर बहुधा आपल्या दुकानांत कोणत्या जातीचा माल विकला जातो ह्याचेंही चिन्ह दाखविलें असते. **मुंबई**तील कित्येक दुकानदार बहुधा फार मगरूर असतात. त्यास गिऱ्हाईकांची मुळींच परवा नसते. कदाचित् त्यांजबरोबर अधिकउणें बोलणें झालें तर, मारामारीपर्यंत सद्धां मजल आणण्यास ते चुकत नाहींत. पण हळुहळू कित्येक दक्षिणी लोकांची दुकानें निघाल्या पासून वरील प्रकार फार कमी नजरेस पडूं लागला आहे.

७३. **हिंदुस्थाना**खेरीज अन्य मुलखाबरोबर म्हणजे **इंग्लंदादि** परकीय देशांबरोबर व्यापार करणें झाल्यास कायकाय व्यवस्था ठेवावी लागते वगैरे संबंधाची माहिती वाचकांकरितां खालीं थोडक्यांत दिली आहे.

७४. 'निर्गत' (एक्स्पोर्ट) किंवा 'आयात' (इम्पोर्ट) मालाचा व्यापार करणें झालें तर, त्या संबंधानें निरनिराळी व्यवस्था ठेवावी लागते. आयात

ह्मणजे बंदरांत माल येतो तो आणि निर्गत म्हणजे बंदरांतून दुसऱ्या देशीं माल जातो तो. आतां, ज्यास आयात मालाचा व्यापार करणें असेल, त्यानें प्रथमतः जितका कालपर्यंत त्याची व्यापारांत पक्की साख बसे तितका काळपर्यंत कोणा एकाद्या इंग्रज व्यापाऱ्याकडेस, ह्मणजे ज्याच्या मार्फत तो व्यापार करूं इच्छितो त्याजकडे त्यास कांहीं रक्कम अनामत ठेविली पाहिजे. कमींत कमी तो जेवढा माल आणविणार असेल त्याच्या चतुर्थांशाएवढी रक्कम तरी निदान अनामत ठेवावा लागते. त्यावांचून व्यापार चालणेंच नाहीं. ही गोष्ट अगदीं नवीन व्यापाऱ्याची झाली. पण एकदां व्यापारांत साख बसून त्यांत त्यास दोन पैसे मिळतात. किंवा, तो पैशाची फेड वेळच्यावेळीं करतो, अशी व्यापाऱ्यास त्याची पक्की खात्री पटली ह्मणजे, वरील रक्कम अनामत न ठेविली तरी चालते. ह्याप्रमाणें अनामत रक्कम हातात आल्यावर तो इंग्रज व्यापारी त्याजकडून सहिनिशीं 'इन्डेंट' लिहून घेतो. इन्डेंट ह्मणजे आपणास जो माल आणविणे असेल त्याबद्दलच्या सर्व हकिकतीचा दस्तैवज. ह्या इन्डेन्टांत मालाची सर्व विगत व शर्ती परिस्फोट लिहाव्या लागतात. तसेंच अमुक दिवसांत तो माल आणून दिलाच पाहिजे असेंही त्यांत लिहावें लागतें. हल्लीं विशेष असा प्रघात पडला आहे कीं, इन्डेन्टें तारमार्फतही **विलायतेस** पाठविण्यांत येतात. कित्येक शर्ती अशा असतात कीं, बंदरांत प्रथम आगबोट आल्याबरोबर मालाच्या किंमतीच्या पैशाची भरपाई करावी लागते. अशाही कांहीं शर्ती आहेत कीं, माल वखारींत येऊन दाखल झाल्याबरोबर पैशाची फेड करून मग इन्डन्टंरानें तो माल नेला पाहिजे. क्वचित् अशाही शर्ती असतात कीं, विलायतेंतील ज्या बंदरांतून माल यावयाचा असेल, त्या बंदरांत माल आगबोटीवर चढला ह्मणजे, येथें त्या मालाच्या किंमतीची भरपाई करावी. अशी जेथें कबुलायत असेल, तेथें माल चढविलेल्या दिवसापासून त्याची हुंडी इकडून विलायतेस जाऊन पोंहचेल तितक्या दिवसांचें व्याज त्यास दिलें पाहिजे. वखारींतून माल नेण्याचें इन्डेन्ट चलनी रुपयांत असतें. बाकी स्टर्लिंग पौंड ह्मणजे विलायती नाण्याचें असतें. हुंडी भरणें ती व्यापाऱ्याच्या ऑफिसांत अगर ज्या ब्यांकेच्या मार्फत 'शिपिंग डाक्युमेंटस' (विलायतेहून ज्या आगबोटींतून माल रवाना होतो त्याबद्दलच्या

सर्व विगतीचे दस्तैवज) आले असतील, त्या ब्यांकेंत वटावासुद्धां रोख पैशाची भरपाई केली पाहिजे. ह्या हुंड्यास इंग्रजीत 'बिल्स ऑफ एक्सचेंज' ह्मणतात. ह्या हुंड्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय अशा शर्तीच्या असतात. प्रथम हुंडी न भरण्यात आली तर दुसरीचा उपयोग करावा, दुसरीही न भरली तर, तिसरीचा उपयोग करावा. ह्याप्रमाणें आयात मालाची व्यवस्था झाली.

७५. आतां, निर्गत माल पाठविणें झाल्यास प्रथम एकाद्या इंग्रज व्यापाऱ्याकडेस जाऊन त्याजबरोबर ज्या रितीने जो माल पाठविणें असेल, त्याच्या किंमती वगैरे संबंधीं ठराव केला पाहिजे. हा ठराव झाल्यावर माल व्यापाऱ्यास दाखविला जातो. माल पाहून झाल्यावर व्यापारी मालाच्या धन्यास जी किंमत ठरविली असेल, तिच्या निम्मे अगर पाऊणपट नाणें देतो. नंतर त्या मालाचे 'इन्व्हॉईस' (निर्गतपत्र) करून माल चढविणारा त्याजवर आपली सही करून त्या इंग्रज व्यापाऱ्यापाशीं देतो. इतकें झालें ह्मणजे, ज्या आगबोटीतून तो माल ज्या बंदरांत पाठविणें असेल, त्या आगबोटीच्या मालकाबरोबर तो इंग्रज आणि माल चढविणारा (मग जसा ठराव केला असेल त्याप्रमाणें) त्या मालाबद्दल 'नोर' ठरवून मालाचा विमा वगैरे उतरुन त्या मालासंबंधी सर्व कागदपत्रें तो व्यापारी नेमलेल्या ब्यांकेत पाठवितो आणि तो माल आगबोटींतून रवाना झाला म्हणजे, माल चढविणारास त्या ब्यांकेतून तो इंग्रज व्यापारी ठरावाप्रमाणें मालाच्या धन्यास पैसे भरतो. तो माल विलायतेस गेल्यावर त्याची विक्री कमी दरानें झाली तर, जी नुकसानी होईल त्या नुकसानीचे पैसें माल चढविणारास त्या इंग्रज व्यापाऱ्यास द्यावे लागतात. व ह्या विषयीं दर्शनी किंवा पंधरवडा अथवा महिन्याचे मुदतीचे 'रीड्राफ्टस' (नुकसानीची परत हुंडी) विलायतेहून येतात. ती त्या मालाच्या धन्यास भरलीच पाहिजे. जर करितां, ही हुंडी भरण्यास तो व्यापारी असमर्थ असला तर, खांका वर करून दिवाळें काढतो ! अशा व्यापारात शेंकडो लोक सधन होतात. धुळीसही शेंकडो मिळतात. एतावता आमच्या लोकांचीं व्यापाराचीं सर्व सूत्रें इंग्रजांच्या हातीं. ते तीं हालवितील तसें आह्मांस नाचलें पाहिजे. आमच्या हातांत कांहीं नाहीं.

**७६. महगर्ता-मुंबई**त दिवसेंदिवस लोकवस्ती वाढत चालल्याकारणानें महागाई बरीच होत चालली आहे. कोणताही माल घ्या त्याची आपली किंमत दुप्पट झालीच आहे व विशेषतः महागाईचें दुसरें कारण सरकारी एक्स्चेंज रेट (हुंडीचा भाव) वारंवार बदलतो हें होय. अशीच स्थिति कांहीं काळ चालली तर, कांहीं वर्षांनीं **लंदन** शहरासारखी **मुंबई**ची स्थिति होणार असा रंग दिसतो. **मुंबई**त मातीलाही पैसा पडतो. पैशावांचून ह्या शहरांत एक दिवसही राहण्याची सोई नाहीं. सर्व जिनसा विकत घ्यावयाच्या. अशा ह्या शहरांत थोडक्या पैक्यानें राहणें म्हणजे मोठें फजितीचें काम आहे. एक पुरता पैसेवाला बरा किंवा एक पुरा भिकारी बरा. मध्य स्थितींतल्या मनुष्याची फारच तारांबळ उडते. हें ह्मणणें आपण एका उदाहरणानें व्यक्त करूं. एका मनुष्यास साधारण दरमहा पंधरा रुपये पगार मिळतो अशी कल्पना केली तर, त्यास आपल्या पगारांतून दरमहा घरभाडें निदान तीन रुपये द्यावें लागतें. तीन रुपयांची जागा म्हणजे एकादी लहानशी खोली मिळणार. ती चांगली असली तर बरें. नाहीं तर, तेथूनही हालच. पोटास तांदूळ रुपये चार, दाळ ४ आणे, फाटें साधारण १।। रुपया, १ रुपया तूप, ८ आणे न्हावी, धोबी, भाजीपाला, तेल, मीठ मसाला वगैरे, १ रुपया किरकोळ वगैरे खर्च लागतो. शिवाय, कपडालत्ता, पैपाहुणा, औषधपाणी वगैरे पाठीमागें आहेच. शेवटीं त्याच्या पगारांतून त्यास कांहीएक न उरतां उलट महिन्याकांठीं एक दोन रुपये कर्जी काढावे लागतात. हेच जर पंधरा रुपये दुसऱ्या एकाद्या ठिकाणीं मिळाले तर, महिन्याचा खर्च वेंच जाऊन निदान पांच रुपये तरी शिलकेंत पडण्यास कांहीच हरकत नाहीं. **मुंबई** शहर हें श्रीमंताचें आहे. गरीबांस मुळींच उपयोगी नाहीं. तशांत सरकार नेहमीं नवीन नवीन कर बसवितें, त्या करांचें ओझें आमच्यावर अप्रत्यक्ष रीतीनें पडून आह्मा गरीब लोकांस आपला उदरनिर्वाह करणें फारच जड जातें. व्यापारी लोकांवर कर बसविला तर ते मालाची किंमत वाढवून कराचा पैसा गरीबगुरीब लोकांपासून उत्पन्न करून घेतात व आह्मांस वाटतें आमच्यावर कोठे सरकारानें कर बसविला आहे? व्यापारी वगैरे

लोकांवर बसविला तर ते भरतील; पण, वस्तुतः कर आह्मी देतों, व्यापारी लोक मुळींच देत नाहींत. तरी पण, अप्रत्यक्षरीतीनें **मुंबई**त प्रत्येक माणशीं सालिना चार पांच रुपये कर अवश्य पडत असेल. याप्रमाणें कर वाढणें हेंहीपण एक महर्गतेंचें कारण आहे असें दिसून येईल.

७७. **सरकारचे कर**— याप्रमाणें **मुंबईत** राहणाऱ्या लोकांच्या साधारण स्थितीचें दिग्दर्शन केलें. आतां, करासंबंधाने आपल्या देशाची काय स्थिति आहे ती पाहूं—**हिंदुस्थानां**त दरमाणशीं सरकार देणें सुमारें अडीच रुपये पडतें व प्राप्ति सरासरीं दर उद्योगी माणसास अठरा रुपये असते; ह्मणजे सरकारी जमिनीचें एकंदर उत्पन्न वीस कोटि व देवस्थानें, इनाम वगैरे ह्यांजवरील दहा कोटि; एकूण सर्व उत्पन्न ३० कोटि रुपये सरकारास होतें. ऐन उत्पन्नाचा षष्ठांश सरकार घेतें. ह्यावरून एकंदर **हिंदुस्थानां**तील उत्पन्न १८० कोटींचे आहे असें होते. आतां, **हिंदुस्थानां**तील २५ कोटि प्रजेपैकीं दहा कोहि काय ते मेहनती लोक आहेत असे आंकडे निघतील. ह्यावरून पाहतां, प्रत्येक उद्योगी माणसास निव्वळ १८ रुपयेच उत्पन्न पडतें. त्यांत बायका, मुलें, अशक्त, दुखणाईत, एक वर्षांचे अन्न, लत्ताकपडा, सरकार देणें, कार्य प्रयोजन वगैरे सर्व कामें उरकावयाचीं ! ह्यावरून हा देश किती धनसंपन्न असावा ह्याची वाचकांनीच कल्पना करावी !

७८. कराच्या योगानें आमच्या देशाची किती दुःखद स्थिति आहे, ह्याचें अनुमान मर्मज्ञ वाचकांस यथार्थ करितां यावें म्हणून हा खालील चटकार संवाद त्यांच्याकरितां आम्ही जशाचा तसाच दिला आहे :—

Norman Macleod's conversation on the Tree Tax. on the morning after his arrival in India, was, as nearly as I can remember, "What sort of a tree is that ?" A Palm tree. "Yes, I know it's a palm tree, but what kind of palm tree." A Toddy palm tree. "Yes, I think I've heard the name before; and what are these letters printed white upon it ?" For taxation. "You don't mean to say the trees in India are taxed ?" Yes, "Oh India the very hairs of your head are numbered." - *Round about Bombay.*

**भावार्थ–नार्मन म्याक्लिअड** हे **हिंदुस्थानांत** आल्यावर दुसऱ्या दिवशीं ह्यांचा 'झाडावरील कर' ह्या संबंधी जो संवाद झाला आहे तो येणें प्रमाणे :– "हें झाड कशाचें आहे ? " ताडाचें. "होय, ताडाचें आहे हें मीं जाणतों; परंतु,

कोणत्या जातीचा ताड ? " ज्यापासून ताडी काढतात तो. "होय, मला वाटतें हें नांव मी पूर्वी ऐकलें आहे; पण, ह्याजवर जीं पांढरीं अक्षरें लिहिलीं आहेत तीं कशाकरितां ? " कर घेण्याकरितां. "तुमच्या ह्मणण्याचा अर्थ असा नाहीं काय कीं, **हिंदुस्थानां**तील झाडांवरही कर आहे ? " होय, तसाच. "हे हतभाग्या **हिंदुस्थाना** ! तुझ्या डोईवरील एक एक केंस किंरे मोजला जात आहे ! "

७९. **घरदारवाले-मुंबईं**त घरवाले लोकही इतरांस वाटतात तेवढे सुखी असतात असें नाहीं; त्यांच्याही मागें अन्यरूपानें भाडें देण्याचा तगादा असतोच. त्यांस, भंगीपट्टी, दिवापट्टी, रस्तापट्टी, जमीनपट्टी, पाणीपट्टी वगैरे निरनिराळ्या पट्टयांनीं अगदीं जखडून टाकलें असतेंच. जमीन फजिनदारी असली तर त्याचेंही फजनाचें बिल चुकवावें लागतें. शिवाय घराची दागदुजी आहेच. गाडीघोडा असल्यास त्याबद्दल कर द्यावा लागतो तो निराळाच. ह्या करांशिवाय इनकम् ट्याक्स द्यावा लागतो तो लागतोच. ह्याप्रमाणें जसजसे नवीन कर बसतात तसतसे बाजारभावांतही फेरबदल होत असतात. व ते आम्हांस किती नडतात हें मागें सांगितलेंच आहे.

८०. **मुंबई शहरांतील निरनिराळी जमीन- मुंबई** शहरांत कांहीं जमीन फजिनदारी असते व कांहीं सरकारी असते. फजिनदार लोकांस जमीनभाड्याबद्दल कांहीं नियमित रक्कम त्यांच्या जागेंत ज्यांचें घर असेल त्याजकडून मिळते. व ते लोक सरकारास भाडें देतात. सरकारी जमिनीवर जीं घरें असतात त्यांचें भाडें सरकार घेतें. **मुंबईंत** किती प्रकारची जमीन आहे, तिचे निरनिराळे कसकसे विभाग केले आहेत व ती एकंदर किती आहे हें खालीं दिलेल्या इ. स. १८८१ सालच्या मनुष्यगणतीच्या रिपोर्टावरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

| क्रमांक (१) | जागा (२) | क्षेत्रफळ (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| | | वार | |
| १ | पेनशन आणि ट्याक्स | १,४०,७०,३३८ | ह्यांत मुंबई, माहिम आणि वरळी हीं गांवे मोडतात. |
| २ | क्विट आणि जमीन भाडें. | १३,१७,८६० | ह्यांत किल्ला, जुनें शहर, कुलाबा मांजगाव, मलबारहिल् आणि माहिम ही गांवे मोडतात. |

| क्रमांक (१) | जागा (२) | क्षेत्रफळ (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| ३ | गव्हर्मेंट रिझूम्डल्यान्ड (सरकारी राखलेली जमीन) | ६,९३,०५८ | ह्यांत नवें शहर. |
| ४ | (लीसहोल्डल्यान्ड) फजिनदारी. | ३२,५२,३६९ | ह्यांत मुंबई आणि माहिम ही गांवे येतात. |
| ५ | सफरन्सलीस. | ६,१८,२३० | कित्ता. |
| ६ | सरकारी व फरास ठोक्याची जमीन. | ६८,१८,०७१ | ह्यांत माहिम मोडतें. |
| ७ | नवे आणि जुने मिठागर किंवा फोरास जमीन. | १,२६,६८,६७५ | ह्यांत मुंबई आणि माहिम ही गांवे मोडतात. |
| ८ | निरनिराळ्या खात्यांकडे असलेली सरकारी जमीन. | ४८,९८,५१९ | ह्यांत बाम्बे पोर्टट्रस्ट आणि म्युनिसिपालिटीला दिलेली जमीन. इमारतींनी व्यापलेली जमीन, मार्केट, पोलीस चौक्या, सार्वजनिक बाग वगैरे मोडतात. |
| ९ | इनाम जमीन. | २०,७२,०२२ | माहिम. |
| १० | सरकारी पडित जमीन. | ९३,०१,४८८ | ह्यांत मोकळी, चिखलट, टेंकड्या, मैदानें वगैरे मोडतात. |
| ११ | धर्मादाय. | ८,८०,३१३ | ह्यांत मशीदी, कब्रस्थानें, दर्गे, देवळें, चर्चीस, अग्याऱ्या, धर्मशाळा, शाळा वगैरे मोडतात. |
| १२ | रेलवे. | २१,४६,५५९ | ह्यांत जी. आय्. पी. रेलवे व बी. बी. सी. आय्. रेलवेच्या लैनी, सामानाच्या वखारी, कारखाने,वखारी वगैरेंनीं व्यापलेली जमीन मोडते. |
| १३ | खासगी मिठागर. | ३२,३८,४२० | ह्यांत माटुंगें व शींव येथील मिठागर येतात. |
| १४ | सरकारी मिठागर. | २,७२,९८२ | कित्ता. |
| १५ | किरकोळ. | ४४,८२,४९७ | ह्यांत रस्ते, तळीं, विहीरी, सरकारी रस्ते, घरबंध, खाणी, खळगे वगैरे. |
| १६ | समुद्रांतून घेतलेली जमीन. | २,१८,९६७ | ह्यांत प्रिन्सेस डाक वगैरे. |
| | एकूण . . | ६,८९,५०,३६८ | चौरस यार्ड जमीन. |

८१. **शर्यती, पैजा वगैरे–मुंबईत** ज्या आंगबळाच्या मोठ्या पैजा होतात, त्या बहुतकरून **युरोपियन** लोकांच्या असतात. ह्या पैजांत धावण्याच्या पोहण्याच्या, बार मारण्याच्या, चेंडूफळीच्या, घोड्यावरच्या, होड्यांच्या वगैरे मुख्य होत. ह्यांत मोठमोठे कामगार लोक असतात. प्रतिवर्षी फेब्रुआरी महिन्यांत **महालक्ष्मी** येथील रेल्वे स्टेशनानजिक घोड्यांच्या पैजा होतात ; त्या वेळीं तेथें त्या पाहण्यास लोकांचे थवेच्या थवे जातात. ह्या पैजांस ' हॉर्स् रेसिंग ' असें ह्मणतात. ज्यांस धक्याबुक्या खाणें आवडत नसेल, ह्मणजे अर्थात ज्यांच्या जवळ दोन पैसे असतील, त्यांच्या साठीं एक उंच ठिकाण केलें आहे तेथें फी घेऊन त्यांस जाऊं देतात. नियमित वेळीं घोडे बाहेर निघाले ह्मणजे बहुतेक लोक आपापल्या सामर्थ्याप्रमाणें पैजा मारुं लागतात. ह्या पैजा मध्यें कांहीं दिवस जाऊन पुनः अशा तीनचारदां होतात. त्याबद्दल पूर्वी पैजांचा ' प्रोग्राम ' (हकीकतपत्रक) काढतात व वर्तमानपत्रद्वारेंही लोकांस जाहीर करतात. ह्या पत्रकांत प्रत्येक शर्यतीचे किती घोडे असतात, ती कोणत्या वेळी सुटणार, ती किती वेळांत पुरी झाली पाहिजे, तींत धावणारे घोड्यांचीं नांवें काय आहेत वगैरे सर्व माहिती असते. घोडे सुटतांना सर्व एकदम न सुटतां कांहीं मागें पुढें झाले ह्मणजे, त्यास ' फॉल्स स्टार्ट ' ह्मणतात. याप्रमाणें फॉल्स स्टार्ट झाला ह्मणजे, सर्व घोडे थांबतात आणि पुनः नव्यानें सर्व घोड्यांचा एकदम स्टार्ट होतो. हे पैजेचे घोडे २, ३, ४, ५ किंवा ६ एकदम सुटलेले पाहिलें असतां मोठा चमत्कार वाटतो. प्रत्येक पैजेच्या वेळीं घोडे सुटतांना टाईम (वेळ) धरतात व सर्व ' रेस कोर्स ' ची (शर्यतीची मुद्दाम वर्तुळाकार केलेली जागा) सर्व राऊंड (चक्कर) एक किंवा दोन मिनिटांच्या नियमित वेळांत व्हावी लागते. ह्याप्रमाणें जो जिंकतो त्यास बराच लाभ होतो. आतां, वर बसलेला ' ज्याकी '(घोड्यावर स्वार होणारा) जो असतो त्याचा अगदीं दमदम निघून जातो व तितका वेळपर्यंत त्याचे जीवितही धोक्यात असते हें खरें आहे. हे शर्यतीचे घोडे मोठ्या किंमतीचे असून ज्या वेळीं पैज सुटते त्या वेळीं नियमित वेळांत तीन मैलांचा फेरा फिरून यावयाचे ह्मणून त्यांस पूर्वी मद्य पाजतात. अशा सपाट्यात ज्याकी कदाचित वाऱ्याच्या जोराबरोबर उडून जाईल या भीतीनें त्याच्या आंगास वजन बांधतात. घोड्यांवरही बरेंच वजन लादतात.

८२. **हवापाणी–मुंबई** शहराची हवा बहुधः कांही दिवस खेरीज करून साधारणपणें उष्णच असते ; म्हणजे सरासरीने ६०° पासून ९०° अंशपर्यंत नेहमी उष्णतामापक (फ्यारनहीट) यंत्रांत पारा असतो. त्याच मानानें पावसाची सरासरी काढली तर एका वर्षात साधारणपणे ९० इंचपर्यंत पडतो अशी निघेल. ह्यावरून पाहतां **मुंबईची** हवा बरीच आरोग्यकारक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांत विशेषतः **हिंदुस्थानांतील** इतर शहरांपेक्षा **मुंबईची** हवा युरोपियन लोकांस फारच पसंत पडते. जे नेहमी **मुंबईत** मृत्यू होतात त्यांची सरासरी काढली तर दरमैलास २५.८ एवढी पडते.

८३. इ. स. १७५६ साली डाक्तर **थॉमस** ह्यानें पाणीमापक यंत्र **मुंबईत** सुरू केलें. त्या सालीं ११० इंच ३ दोकडे पाऊस पडला होता असें समजतें. पुढें सुमारें ७५ वर्षेपर्यंत ह्यासंबंधी कांहीं माहिती मिळत नाहीं. पण इ. स. १८१७ मध्यें मि. **बेंजामिन नॉटन,** त्या वेळचे **मुंबईचे** कॉरोनर, ह्यांनीं हें यंत्र **मुंबईत** पुनः सुरू केलें तें अद्यापि चालू आहे. सदर्हु वर्षी १०३ इंच पाऊस पडला होता.

८४. वर दिलेल्या पावसाच्या सरासरीच्या मानापेक्षां इ. स. १८२५ पासून ज्यासालीं १०० इंचांवर पाऊस पडला त्याची नोंद खालीं दिली आहे :—

| | इंच | दोकडे. | | इंच | दोकडे. |
|---|---|---|---|---|---|
| इ. स. १८२८ | १२१ | ९८ | इ. स. १८६१ | १०६ | ८ |
| ,, १८३१ | १०१ | ८३ | ,, १८६९ | ११५ | ३९ |
| ,, १८४९ | ११८ | ८८ | ,, १८७८ | १२३ | २० |
| ,, १८५१ | १०६ | १४ | ,, १८८३ | १०० | ५३ |

इ. स. १८८६ च्या जून महिन्याचे १८ वे तारखेस एका दिवसांत १६ इंच पाऊस पडला होता !

८५. पावसाळ्यास बहुतकरून जून महिन्याचे १० वे तारखेपासून सुरुवात होते व तो सप्तेंबर अखेर नाहींसा होतो. पावसाळा सुरू होण्यापूर्वी मे व जून ह्या दोन महिन्यांत अति उष्मा होतो. ह्या दिवसांत जरा कोठें बाहेर जाऊन आलें किंवा जरा ज्यास्त काम केलें ह्मणजे कपडे कसे

घामाने भिजून चिम्म् होऊन जातात. आक्टोबर महिन्यांतही येथें कमी उष्मा होतो असें नाही. कांही दिवसपर्यंत एकसारखा पाऊस पडून हवेंत थंडपणा आला ह्मणजे जरा जिवास चैन पडतें. अशा दिवसांत **मुंबईचे** गव्हर्नर व त्यांचे सेक्रेटरी हे **महाबळेश्वरीं** जातात पण पावसाळ्यांत पुण्यास राहतात. हिंवाळा नोव्हेंबरपासून मार्च अखेरपर्यंत असतो. ह्या दिवसांत येथील हवा फार चांगली असते. पावसाळ्यांत हवा सर्द होत असल्या कारणानें ती पहिल्यानें लोकांस बरीच जाचते. घाटांवरील लोक **मुंबईची** हवा खराब मानतात ; परंतु, वास्तविक ही त्यांची गैर समजूत आहे ; कारण, पावसाळ्यात येथें पुष्कळ पाऊस पडतो तरी, तो जरा थांबला कीं रस्ते वाळून जाऊन पुनः हवेंत समशीतोष्णपणा येतो. हिवाळ्यात ह्मणण्यासारखी थंडी नसते. उन्हाळ्यांतही विशेष उष्णता वाटते तरी, समुद्र जवळ असल्याकारणानें तिजपासून फारसा त्रास होत नाही.

८६. इ. स. १७६३ साली **न्यूबहर** साहेब मुंबईस आला होता, त्यावेळीं त्यानें इकडील हवेच्या संबंधाने असें लिहिलें आहे कीं, " समुद्राची हवा आणि पर्जन्य ह्यांच्या योगानें हवेमध्यें थंडपणा येत असल्या कारणानें वातावरण थंड होऊन ह्या बेटाची हवा नेहमीं समशीतोष्ण असते." हें त्यांचें १२५ वर्षांपूर्वीचें ह्मणणें आज ह्या शहरांत वस्ती फार वाढली आहे तरी अंशतः खरें ठरतें.

८७. **पाणी, तळीं, विहिरी वगैरे.**–पाणी हें मनुष्याच्या जीवितास किती आवश्यक आहे हें येथें सांगण्याची आवश्यकता दिसत नाही. पूर्वी मुंबईमध्यें पाण्याची फारच गैरसोई असे. ज्या थोड्या बहुत येथें विहिरी होत्या त्याही म्हणजे उत्तम पाण्याचे झरेच होते असें मुळींच नव्हतें. लोकांस पाण्यामुळें **मुंबईत** फार हाल काढावे लागत. फार लांबची गोष्ट कशाला. कालपरवां नळ येण्याचे पूर्वी ज्या कित्येक बाया व पुरुष हाताडोईवर भांडी घेऊन पाण्याकरितां फिरत व त्यांस किती त्रास सोसावा लागे हें त्या वेळची ज्यानें ती स्थिति बघितली असेल, त्यास हल्लींच्या व पूर्वीच्या राहण्याच्या स्थितींत किती महदंतर पडलें आहे हें लागलेंच कळून येईल. अशी ज्या शहराची स्थिति तेथें आवर्षण पडलें असतां

लोकांचे काय हाल होत असतील–ईश्वर करो आणि तसा प्रसंग कोणत्याही देशावर न येवो–ह्यांचें वर्णन करणें तर तें तसा प्रसंग ज्यानें स्वतः अनुभविला आहे अशाच मनुष्याकडून झालें तर होईल.

८८. **मुंबईनेंही** बऱ्याच वेळी असे प्रसंग अनुभविले आहेत. इ. स. १८२२ त आवर्षण पडलें होतें. त्या वेळीं श्रावण महिन्यांत विहिरींत सगळें हात दोन हात देखील पाणी नव्हतें ह्मणून सांगतात! ह्यावरून चैत्र वैशाखीं ह्मणजे, ऐन पाण्याचे जरुरीच्या वेळीं, पाण्याकरितां लोकांचे किती हाल झाले असतील हें सांगणें नकोच! लोकांत मोठा हाहाकार उडाला; तळीं, विहिरी कोरड्या ठणठणीत झाल्या; आणि स्त्रिया डोईवर पाण्याचे हांडे घेऊन गल्लोगल्लीं व रस्तोरस्तीं पाणी पाणी करीत हिंडूं लागल्या. शहरांत पाणी नाहीं म्हणून **मुंबईतील** सर्व गाई ह्मशी वगैरे जनावरें बाहेर गांवी नेऊन ठेवावी म्हणून सरकारचा हुकूम झाला. कित्येक बाया **कांपाच्या** मैदानांत मध्यरात्रपर्यंत बसून मोठ्या आयासानें थोडें पाणी आणीत; कित्येक तर विहिरींत आंत उतरून वाट्यावाट्यांनीं पाणी भरीत. असा ह्या वेळीं मुंबईत एकच अनर्थ उडून गेला होता. इ. स. १८५६ त ही असेंच एक आवर्षण पडलें होतें. ह्या वेळींही पाण्याच्या संबंधानें बरीच टंचाई पडली होती, तरी, सरकार आगगाडींतून पिंपांतून बाहेरगांवांहून पाणी आणवून विहिरींत ओतवी; तरी देखील, ह्मणण्यासारखें पाणी लोकांस पुरलें नाहीं.

८९. याप्रमाणें **मुंबईत** पाण्याची तंगी असल्यामुळें येथील हवा फार रोगट, वस्ती विरळ, राहण्याच्या जागा कमी, अशी येथें राहण्याची फारच गैर सोय असे; तेणेंकरून मनुष्यांच्या प्रकृतीस वारंवार विकार उत्पन्न होऊन लोक फार व्याधिग्रस्त होत. अशा वेळीं **मुंबईस** येणें ह्मटलें ह्मणजे केवळ 'काळेंपाणी'च भोगण्यास जाणें असें लोक समजत. शहरांत जिकडे तिकडे घाण फार असे ह्मणून महामारीचाही उपद्रव वारंवार उत्पन्न होई. आज आमची म्युनिसिपालिटी इतकी स्वच्छता ठेवीत आहे, तरी देखील, ह्या बाईनें आपलें ठाणें येथून समूळ उठविलें आहे असें नाहीं. पिण्याचें पाणी तर **कांपाच्या** मैदानांतून आणावें लागे. अशीं अनेक संकटें येथें राहणारांस सोसावीं लागत.

९०. **मुंबईतील** सधन लोकांनींही वेळोवेळीं हस्तें परहस्तें ही उणीव

दूर करावी ह्मणून बरेच उपाय योजिलेले पाहण्यांत येतात. इ. स. १८२२ त **धोबीतळें** अगदी खडखडीत आटून गेलें होतें ह्मणून त्यांत दोन विहिरी खणण्यांत आल्या. त्या विहिरींस गांवांतील इतर विहिरींपेक्षां अंमळ गोडें पाणी लागल्यावरून त्या तळ्यास 'साखरतळें' असें लोक ह्मणूं लागले. इ. स. १८५६ साली **कांपा**वर मारुतीच्या देवळासमोर **नाखोदा महंमद रोगे** ह्या उदार गृहस्थानें ५०,००० रुपये खर्च करून एक मोठा तलाव बांधिला. ह्या तळ्यास 'नाखोदाचा तलाव' ह्मणतात. हा तलाव अष्टकोनी असून दगडांनीं बांधिला आहे. ह्याच्या प्रत्येक कोनास एकएक असे ८ सोपे बांधिले आहेत. **कावसजी पाटलांचे** [1]तळें हें **मुंबईत** प्रसिद्ध आहे. हें तळें इ. स. १७७५ त **कावसजी रस्तमजी** पाटेल नामक पारशी गृहस्थानें बांधिलें. हल्लीं हें तळें म्युनिसिपालिटीनें अर्धें बुजून टाकलें आहे. **गवाळी** तळें, **सांखळी** तळें, **नबाबाचे** तळे, **बाबुल्यांचें** तळें वगैरे तळीं व विहिरी जागोजागी लोकांनीं बांधिल्या. त्यांत **वाळकेश्वर, महालक्ष्मी, बाबुलनाथ, गिरगांव,** वगैरे ठिकाणीं मात्र साधारण गोडें पाणी असे. हल्लीं **बाबुलनाथ** येथील विहिरींचें पाणी आजारी मनुष्यास हलकें म्हणून प्यावयास देतात.

९१. सरकारानेंही ह्या कामीं आपलेकडून कांहीं आळस केला आहे असें दिसत नाहीं. कारण ही ओरड त्याच्याही कानीं वेळोवेळीं जात असे. **कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स** ह्यांनीं ही ह्या कामीं कांहीं खटपट चालविली होती ; पण, त्यांत त्यांस कांहीं यश आलें नाहीं. **कंपनी** सरकार तर पुष्कळ वर्षेपर्यंत अनेक उपाय योजीत होतें. त्यांनीं इ. स. १८४५ त ह्मणजे **सर जॉर्ज आर्थर** ह्या गव्हर्नराचे कारकीर्दींत डाक्तर **लीथ** व डाक्तर **ग्रेहाम** ह्या दोन गृहस्थांस **मुंबईत** पाणी कोठें, किती व कोणत्या

---

१. ह्यावरील लेख येणेप्रमाणें:—

THIS TANK
WAS BUILT FOR PUBLIC USE
BY
COWASJI RUSTOMJI PATEL
1775.

प्रकारचें आहे, ह्याचा तपास करून रिपोर्ट करावा ह्मणून नेमलें होतें. त्यावरून त्यांनीं आपलें मत सरकारास कळविलें; पण, तें त्यांस पसंत पडलें नाहीं. पुढें ही अडचण कोणत्या तऱ्हेनें दूर होईल, ह्यास काय युक्ति योजावी, पाणी कोठून आणावें, ह्या विचारांतच कांहीं वर्षे गेलीं. त्यांत अनेकांचें अनेक तर्क निघाले. कोणी ह्मणत **वाळकेश्वराचे** डोंगरांत एक तलाव खणून त्यांतून पाणी आणावें, आणि कोणी ह्मणत **मांजगावचे** डोंगरांत सांठवून तेथून शहरांत आणावें. अशा अनेकांनीं अनेक सूचना केल्या ; पण, ह्यांपैकीं कोणतीच सूचना अमलांत आली नाहीं.

९२. याप्रमाणें पाण्याची टंचाई चालली असतां लेफ्टनेंट कर्नल **क्रॉफर्ड**, आर, ई. ह्यांनीं **साष्टी**तील, **मुंबई**पासून ७।। कोस असलेल्या **व्यहाड** नामक तलवाचें पाणी आणावें अशी युक्ति इ. स. १८५३ त योजिली. ही युक्ति पसंत पडून त्या कामास इ. स. १८५७ त सुरुवात झाली. **व्यहाडचे** डोंगरांत एक मोठा तलाव बांधून त्यांत पाणी सांठवून तेथपासून नळ बांधून त्यांतून **मुंबईस** पाणी आणलें. ह्या तळ्याची रचना व बांधणी मोठी विलक्षण आहे. प्रथमच इ. स. १८६० सालीं **मुंबईंत** नळाचें पाणी आलें. ह्या तळ्यांत **साष्टी**तील **गोपूर** नदीचें पाणी घेतलें आहे. तळ्यांचें क्षेत्रफळ एकंदर १,४०० एकर असून सभोंवार ३ मोठमोठे बांध (धक्के) बांधिले आहेत. ह्या तळ्यांतून दररोज ८० लक्ष ग्यालन पाणी शहरांत येतें. असाही अंदाज काढला आहे कीं, मुंबईंतील प्रत्येक मनुष्यास दररोज १२-१३ ग्यालन पाणी हें तळें पुरवितें. तळ्याच्या आसपास कोणास शेती वगैरे कांहीं करूं देत नाहींत. तळ्यावर मोठा बंदोबस्त असतो व ह्या बंदोबस्ताकरितां तेथें म्युनिसिपालिटीचे कामगार असतात. कांहीं वर्षेपर्यंत ह्या तळ्याचें पाणी स्वच्छ होतें; पण, अलिकडे त्यांत झाडेंझुडपें वाढल्यामुळें पाणी फार खराब झालें आहे; परंतु, हें तळें रिकामें करण्यास अगर पाणी गाळून स्वच्छ करण्यास चांगलेंसें साधन नाहीं. हें तळें एक लहानसा उपसागरच आहे असें दिसतें. कित्येक गुलहौसी लोक जलकेली करण्याच्या निमित्तानें तेथें जाऊन आंत होड्या टाकून खुशाल फिरत असतात. इतकें हें पात्र विस्तीर्ण आहे. हें तळें बांधण्यास एकंदर ३७,३६,५०० रुपये खर्च झाला आहे.

९३. ह्या तलावाचें काम करण्याचें कंत्राट मेसर्स **ब्रेसन** आणि कंपनी ह्यांस दिलें होतें. इ. स. १८६७ साली हें तळें अगदीं पाण्यानें भरून वाहून गेलें. तळें बांधून सुमारें दोन तीन वर्षें गेलीं नाहीत तोंच, त्यांतून पाणी पाझरून जातें म्हणून समजलें. इ. स. १८६९ सालीं मि. **रसेल एट्किन**, त्या वेळचा एक्झिक्युटिव्ह एंजिनिअर, ह्यानें त्या वेळीं हें पाणी बंद करण्याचा प्रयत्न केला; परंतु, त्यापासूनही झणण्यासारखा पाणी जाण्यास प्रतिबंध झाला आहे असें नाहीं. इ. स. १८८१ सालीं **तुळशी** तळ्याचा बांध फुटून सर्व तळें वाहून जाण्याची भीति उत्पन्न झाली होती; कारण जर कां **तुळशी** तळ्याचा बांध फुटला असता तर, त्याचें पाणी **व्यहाडचे** तळ्यांत जाऊन त्याही तळ्याचा बांध फुटून गेला असता; तरी पण, आजमितीपर्यंत ह्या तळ्यांतून पाझरानें पाणी जातें तें जातेंच. पण त्याचा आजदिवसपर्यंत बंदोबस्त झाला नाहीं.

९४. इ. स. १८७२ सालीं ह्या तळ्यांचें पाणी शहरास पुरत नाहीं अशी ओरड झाल्यामुळें ३३ लक्ष रुपये खर्च करून त्याच्याच शेजारीं **तुळशीचें** तळें बांधून **व्यहाडच्या** तळ्यांत त्या पाण्याचा पुरवठा केला. इ. स. १८७५ त ह्याच तळ्यांतून नळानें पाणी आणून ते **मलबारहिल्‌वर** सोडावें असा म्युनिसिपालिटीनें विचार करून इ. स. १८८० मध्यें **मलबारहिल्‌वर** ४० लक्ष रुपये खर्चून एक मोठा रिझरव्हॉयर बांधून त्यांत पाणी सोडलें. येणेंकरून दर मनुष्यास सहा ग्यालन पाणी ज्यास मिळू लागलें. असें झालें तरी, पाण्याची ओरड आहे ती आहेच. म्हणून **तान्सा** येथून पाणी आणण्याची तजवीज चालली आहे व कामही सुरू झालें आहे. **माजगांवास भंडारा** रिझरव्हॉयर ह्मणून एक डोंगरावर तलाव बांधला आहे. ह्याजवर यंत्रें वगैरे असून तळ्यावर बागबगीचा केला आहे. व बागाखाली जागा बांधून काढून पाण्याकरितां खोल्या केल्या आहेत. वरून पाहिलें तर तलाव आहे असें कोणास भासणार देखील नाहीं. वरील दोन्हीं रिझरव्हॉयरमधून अलीकडे बरेंच पाणी पाझरून जात आहे तें एवढें कीं, **मलबारहिल्** रिझरव्हॉयरमधून दर २४ तासांत १,३२,००० ग्यालन व **भंडारवाडा** रिझरव्हॉयरमधून तितक्याच वेळांत १,२४,००० ग्यालन पाणी जातें असा अजमास काढला आहे. ह्या प्रत्येक

रिझरव्हॉयरास नीट करण्यास अनुक्रमें ६०,००० व ८०,००० रुपये खर्च बसेल असें अनुमान आहे !

९५. **मुंबईंत** वीस पंचवीस हात जमीन खणली ह्मणजे पाणी लागतें; परंतु गोडें पाणी मात्र सर्वत्र लागत नाही. बहुतेक ठिकाणी खारें पाणी असतें. **मशीदबंदर, डोंगरी, भेंडीबजार, चिंचबंदर** येथें मात्र फार पाणी नसतें. परंतु, पाऊस चांगला पडला असतां पाण्याचा तोटा येत नाही. लोकांच्या घरोघर विहिरी होत्या. अजूनही बऱ्याच आहेत तरी, कित्येक अज्ञानी लोकांनीं नळ आल्यापासून आपल्या दारच्या विहिरी बुजवून टाकल्या. **माहिम, शींव, वरळी, माजगांव, परळ** आणि **मुंबई** मिळून लहान मोठे ८०-९० तलाव आहेत व अलीकडे पूर्वी जो पाण्याच्या संबंधानें त्रास होता ते जाऊन लोकांस बरेंच सुख झालें आहे.

९६. **भाषा**—आज पृथ्वीवर ज्या भाषा चालत आहेत, त्यांपैकी बहुतेकांची बरीच माहिती झाली आहे. पण **आफ्रिकेच्या** मध्यभागांतील भाषांविषयी अजून चांगली माहिती मिळत नाहीं. **अमेरिकेंत** युरोपिअन लोकांच्या वसाहती झाल्यामुळें त्यांच्या भाषा चालू होऊन मूळ भाषांचा ऱ्हास होत चालला. पृथ्वीवरील सुमारें ८-९०० शें भाषांविषयीं आज थोडीबहुत माहिती मिळते. ह्या सर्व भाषांस मूलभूत अशा तीन भाषा आहेत, त्या ह्या :—**(१) आर्यन्, (२) सेमिटिक** व **(३) तुरेनिअन.**

**१. आर्यन्** भाषेंत मुख्यत्वें—(१) संस्कृत (मराठी, गुजराथी, हिंदी, बंगाली, वगैरे हिंदुस्थानांतील सर्व भाषा), (२) इराणी (झेंद आणि हल्लींची फारशी मिळून), (३) ग्रीक (तिचे भिन्न भिन्न भेद) (४) इतालिक आणि लातिन (इतालिअन, स्पानिश, पोर्तुगीज, फ्रेंच वगैरे), (५) त्यूतानिक, (गॉथिक, ॲंग्लोसाक्सन, इंग्लिश, जर्मन, दच, डानिश वगैरे), (६) लेतो लिथुआनिअन; (७) स्लेव्होनिअन (रशिअन, पॉलिश, सरबिअन वगैरे); (८) सेल्तिक (गॉलिक, ऐरिश, वेल्श) इत्यादि भाषा येतात.

**२. सेमितिक** भाषेत—(१) कालदी, (२) सीरियाक (सुरियानी), (३) अरेबिक (आरबी), (४) हिब्रू (इब्रानी), (५) सामारितन, (६) इथिओपिक, (७) जुनी फिनिशिअन वगैरे भाषा मोडतात.

३. **तुरेनिअन** भाषेंत—(१) तुर्की, (२) सायबेरिअन, (३) फिनलंदाची, (४) चिनी, (५) तामूल किंवा तामील (द्रविडी), (६) मलयालम, (७) कानडी, तैलंगी वगैरे भाषा मोडतात.

९७. संस्कृत भाषा अडाणी लोक जेव्हां प्रथम बोलूं लागले, तेव्हां त्यांनीं तिचे शब्द बहुत बदलले. अशा ह्या विकृत भाषेस प्राकृत किंवा बालभाषा ह्मणतात. पुढें संस्कृत भाषेचा पुनः उत्कर्ष होऊन प्राकृत भाषेंत खरे संस्कृत शब्द येऊं लागले. ह्या रीतीनें फेरफार होतांहोतां प्राकृत भाषेची मराठी भाषा झाली. राज्याच्या अदलाबदलीमुळें मराठी भाषेंत आरबी, फार्शी, इंग्रजी वगैरे शब्द आले आहेत. मुसलमान लोक ह्या देशांत आले तेव्हां त्यांची मूळची हिंदवी किंवा ब्रीज भाषा बदलून तिची उडदु किंवा उर्दु (बाजारी भाषा) झाली. पुढें तिला रूपांतर होऊन तिची हिंदुस्थानी झाली. ह्या भाषेंत आरबी व फार्शी शब्द फार आहेत. मराठी भाषेंत संस्कृत शब्दांचा इतका भरणा असण्याचें कारण असें दिसतें कीं, ह्या देशांत जे जे हिंदु राजे होऊन गेले, ते ते संस्कृत भाषेस उत्तेजन देत गेले. इ. स. १२९३ त **देवगड** येथील शेवटचा राजा **रामदेवराव** जाधव ह्याचा मुसलमानांनीं पराभव केला, तेव्हांपासून **हिंदुस्थानांत मुसलमानांचा** पाय शिरून त्यांनीं निरनिराळीं राज्यें स्थापन केलीं, ह्यामुळें मराठींत फार्शी व आरबी शब्द आले. तीं राज्यें फार दिवस चालतीं तर मराठी भाषा समूळ नाहींशी झाली असती ! पण पुढे **शिवाजी** महाराजांच्या वेळेस पुनः हिचा उत्कर्ष होऊ लागला. तेथपासून तों इ. स. १८१८ पर्यंत मराठी राज्य असल्यामुळें मराठी भाषेंत इतर भाषांतील शब्द फारकरून आले नाहींत परंतु, ह्या सालापासून इंग्रजी झाल्याकारणानें मराठींत इंग्रजी शब्दांचा भरणा बराच होत चालला आहे. असो, आतां ह्या एकट्या मुंबई शहरांत ज्या पृथ्वीवरील अनेक भाषा चालतात त्यांची माहिती खाली थोडक्यांत दिली आहे.

९८. मराठी, गुजराथी, हिंदुस्थानी (मुसलमानी किंवा उर्दु), कानडी, कोंकणी (इडो पोर्टुगीज), कच्छी, सिंधी, बंगाली, तेलंगी, तामील, मारवाडी, पुस्तु (अफगानी), आरबी, फार्शी, तुर्की, चिनी, हिब्रु, सोमाली, इंग्लिश,

जर्मन, फ्रेंच, इतालिअन, रशिअन, स्प्यानिश, ग्रीक, पोर्तुगीज, व प्रत्येक भाषेचे पोटभेद वगैरे. अलीकडे संस्कृत भाषेचे परिशीलन करून त्या भाषेत बोलण्याचा प्रयत्न आमच्यांतील कित्येक विद्वान गृहस्थ करीत आहेत ही फारच अभिनंदनीय गोष्ट होय. असाच क्रम कांहीं काळ पुढें चालला तर, आमच्या संस्कृत भाषेचें अमोलिक विद्याभांडार खुल्ले होऊन तेणेकरून, आर्यावर्तीचे बहुत हित होण्याचा संभव आहे.

९९. **विद्याखातें**—सर्व धनापेक्षां विद्याधनाची योग्यता मोठी आहे. विद्या आपणांस नको असे ह्मणणारे लोक कांही असलेच तरी ते फारच थोडे असतील. माजी गव्हर्नर लार्ड मानस्टुअर्ट एलफिन्स्टन ह्यांनीं इ. स. १८१९ पासून ह्या इलाख्यांत गांवोंगांवी विद्यालयें स्थापन करून येथील लोकांस विद्यामृत पाजण्याचें मनावर घेतलें. इतक्या थोड्या काळांत आज जो हा विद्येचा प्रसार झाला आहे, त्याबद्दल सदर्हु गव्हर्नराचे आभार मानणें हे प्रत्येक मनुष्यांचें कर्तव्य कर्म आहे; कारण आज त्यांच्या कृतीचीं फळें आपण चाखीत आहों. इतक्या अल्प काळांत मुंबई इलाख्यात १ युनिव्हर्सिटी, १० कालेजें, ६६ हायकुलें आणि ३,५९८ इतर शाळा इतकी विद्यालयें झालीं असून त्यांत सुमारें २ लक्षां जवळजवळ मुलें शिकत आहेत.

१००. सर्व इलाख्यांतील शाळांची व्यवस्था पाहण्याकरितां विद्यागुरू असतो, त्यास ' डायरेक्टर ऑफ् पब्लिक् इन्स्ट्रकशन् ' ह्मणतात. ह्याच्या हाताखालीं इन्स्पेक्टर असतात, ते प्रतिवर्षी सर्व शाळा फिरून विद्यार्थ्यांची परीक्षा घेतात. जितकीं मुलें परिक्षेंत पसार होतील, त्यामानानें खासगी शाळांस सरकारांतून मदत मिळते तिला ' ग्रांटस्-इन्-एड् ' ह्मणतात. मुंबईतील शाळांचा वेळ सकाळी १०-१० ।। किंवा ११ पासून तो संध्याकाळी ४½ किवा ५ वाजेपर्यंत असतो. मधल्या वेळीं तास अर्धा तास मुलांस सुटी मिळते. गरमीच्या दिवसांत कित्येक शाळांस महिना व कित्येकांस दीड महिना सुटी मिळते. शाळांतून म्याट्रिक्यूलेशनच्या परीक्षेपर्यंत अभ्यास होतो. शाळेचा अभ्यास पुरा झाला ह्मणजे युनिव्हर्सिटी विद्यार्थ्यांची परीक्षा घेते. युनिव्हर्सिटीकडे उमेदवारांची परीक्षा घेऊन त्यांस पदव्या देण्यांचे काम असतें, येवढेंच नाही ; तर, शाळांतून व कॉलेजांतून कोणती पुस्तकें चालवावयाचीं व अभ्यासांचें वर्गीकरण कसें करावयाचें वगैरे सर्व व्यवस्था डायरेक्टर ऑफ् पब्लिक इन्स्ट्रकशन करितो. अलीकडे 'फायनल स्कूलएक्झामिनेशन ' ह्मणून नवीनच एक परीक्षा निघाली आहे. ह्या परिक्षेंत पसार झाला म्हणजें साधारणपणें विद्यार्थी सरकारी नोकरीला योग्य होतो. पण ही परीक्षा अजून अमलांत आली नाहीं. केव्हां येईल

ती येवो ! कॉलेजांत पीई, बीए, एम्‌ए, पर्यंत अभ्यास होतो, कित्येक इंजिनिअरिंगचा अभ्यास करितात; कित्येक मेडिकल कॉलेजांत जाऊन वैद्यकाचा अभ्यास करितात; कोणी लॉक्लासांत जाऊन एल्‌-एल्‌.बीचा अभ्यास करितात.

१०१. या प्रमाणें सदरील कोणत्याही परीक्षेंत उमेदवार पसार झाले ह्मणजे त्यांस डिग्री (पदवी) मिळते. हा पदवी देण्याचा समारंभ प्रतिवर्षी फेब्रुवारी महिन्यांत युनिव्हर्सिटी हॉलमध्यें होतो. ह्या समारंभास 'कान्व्होकेशन' ह्मणतात. हा पदवी देण्याचा समारंभ खुद्द गव्हर्नर साहेब युनिव्हर्सिटीचा 'चान्सलर' ह्या नात्यानें करितो. गव्हर्नर विद्यमान नसल्यास 'व्हाईस चान्सलर' हा समारंभ साजरा करितो. उमेदवारांस पदवी देणें, पास किंवा नापास इत्यादि बाबतींचा विचार 'सिनेट' करितें. जो उमेदवार ज्या विषयांत पसार होऊन पहिला येईल, त्यास उदार व सधन गृहस्थानीं युनिव्हर्सिटीस कांही [1]देणग्या दिल्या आहेत, त्यांतून बक्षिसें मिळतात. ज्या परीक्षेकरितां उमेदवारांस बसावयाचें असेल, त्या परीक्षेसंबंधी त्याजपासून १०-२०-३० किंवा ४० ह्या प्रमाणें जी फी त्या परीक्षेकरितां नियत केली असेल ती फी युनिव्हर्सिटी त्याजपासून घेते.

१०२. अलीकडे शिल्पशास्त्र शिकविण्याकडे सरकारचें लक्ष लागलें आहे व ह्या संबंधी हालचाल बरीच चालली आहे. ह्या संबंधानें चालू वर्षाच्या सप्तेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेपासून **एल्फिन्स्टन** कॉलेजांत एक नवीन क्लास काढला आहे. ही इमारत देखील टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या कामाकरितां दिली आहे.

१०३. मुलांच्या शाळांप्रमाणें मुलींच्याही शाळा **मुंबईंत** बऱ्याच आहेत. ह्या शाळांत इंग्रजी शिकवून गायन, वाद्यकला, शिवणकाम वगैरे विषयही त्यांस शिकविले जातात.

१०४. शाळांतून मुलांस नीतिशिक्षण द्यावें ह्मणून अलीकडे सरकारचे ठराव प्रसिद्ध झाले आहेत. वर्तमानपत्रांनींही ह्या विषयांच्या संबंधानें बरीच 'भवति न भवति' केली आहे. अजून शाळांतून कोणती पुस्तकें चालावीं वगैरे कांहींच ठरलें नाहीं ; किंवा, सरकारच्या ठरावाप्रमाणें नीतिशिक्षणाचा क्रमही शाळांतून सुरू झाला नाहीं. पुढें काय होईल तें पाहणें आहे.

१०५. सिनेट वर्षांतून एकदां मिळते; परंतु, व्हाईस चान्सलर ह्याच्या मनांत आल्यास तो ह्या सिनेट सभेस मध्यंतरींही जमण्यास सांगतो. ही

१. या संबंधीं विशेष माहिती परिशिष्टांत पहा.

सभा भरण्यास निदान सहा सभासदांची मंजूरी मिळाली पाहिजे. सभेस सहा असामी जमले असतां कोरम होतो. व तेथें हजर असलेल्या सभासदांपैकीं जी गोष्ट बहुमतानें पसंत ठरेल ती पसार होते. जेव्हां दोन्ही पक्षांकडे सभासदांची समान मतें पडतात, तेव्हां अध्यक्ष ज्या बाजूला आपलें मत देईल तो पक्ष सबळ होतो. (१) आर्त, (२) लॉ, (३) मेडिसिन आणि (४) सिव्हिल इंजिनिअरींग अशा चार पदव्या (फ्याकल्टीज़) आहेत. ह्या फ्याकल्टीची नेमणूक सिनेट आपल्या वार्षिक सभेंत करितें. ह्या सिनेटचा सभासद होण्यास मनुष्य या चार पदव्यांपैकीं निदान एक तरी पदवी धारण करणारा असला पाहिजे. युनिव्हर्सिटीची सर्व व्यवस्था सिंडिकेट पाहते. सिंडिकेटमध्यें व्हाईस चान्सलर व दुसरे युनिव्हर्सिटीचे आठ फेलो असतात. ह्यांची नेमणूक एक वर्षपर्यंत चालते व ती वर ह्मटलेल्या सिनेटकडून होते.

१०६. **व्हिक्टोरिआ आणि आल्बर्ट म्यूझिअम व बाग**— परळच्या रस्त्यानें **यहुदी** लोकांचें देऊळ टाकून गेलें ह्मणजे पुढें **व्हिक्टोरिया गार्डन व म्युझियम** ही बाग दृष्टीस पडते. ह्या बागेच्या पुढेंच एक मनोरा असून त्यावर मोठें घड्याळ लाविलें आहे. हा मनोरा **डेव्हिड ससून** नामक प्रख्यात यहुदी गृहस्थानें बांधला आहे. आंत मोठी सुंदर, चित्रविचित्र व सुशोभित इमारत आहे, 'तिला पदार्थ संग्रहालय' (म्यूझिअम्) असें ह्मणतात. पश्चिम हिंदुस्थानांतील सर्व पशुपक्ष्यादिकांचा व धान्यादिकांचा संग्रह एका ठिकाणीं असावा म्हणून माजी गव्हर्नर लॉर्ड **एल्फिन्स्टन** ह्यांनीं ह्या संग्रहालयाची स्थापना केली ; त्या वेळीं त्याला 'गव्हर्मेंट सेंट्रल म्यूझिअम्' हें नांव दिलें होतें. ह्या वेळी ह्या संग्रहालयांत डाक्तर **ब्रूइस्ट** एल्.एल्.डी.एफ्.आर.एस्. ह्यांस पहिल्यानेंच नेमण्यांत आले होते. त्यांच्यामागून रेवरेंड डाक्तर **फ्रेसर** एल्.एल्.डी हे क्यूरेटर नेमले गेले. ह्या दोन्हीं साहेबांनीं जो संग्रह केला होता, तो ह्या शहरच्या बराकींत ठेविला होता ; परंतु, इ.स. १८५७ सालच्या बलव्यामध्यें त्या सर्व संग्रहाचा नाश झाला. कारण, **मुंबईच्या** पलटणींतील अधिकाऱ्यानें तें फेंकून देण्याचा हुकूम करून त्याचा नाश केला. त्याच वर्षी एल्फिन्स्टन साहेबानें डाक्तर बर्डवूड ह्यांस क्यूरेटर नेमिलें. सदर्हु गृहस्थानें कै. डाक्तर **भाऊदाजी** ह्यांच्या साह्यानें त्या ठिकाणीं एक इमारत उभारावी म्हणून वर्गणी गोळा करून आग्रिहार्टिकल्चरच्या बागेमध्यें ही इमारत उभारली. ह्याप्रमाणें व्हिक्टोरिया व आल्बर्ट "सर्वसंग्रहोपवनालय" दहा लक्ष रुपये खर्च करून तयार केलें. इ.स. १८६२ सालीं ह्याच्या पायाचा

दगड सर **बार्टल फ्रियर** ह्यांनीं बसविला[1].

१. "जो दगड ह्या इमारतीच्या मुख्य दरवाज्यांत गव्हर्नर साहेबांचे हातानें बसविला आहे, त्या खालीं एक मजबूत तांब्याची पेटी घातली आहे. तींत त्या दिवसाच्या प्रत्येक वर्तमानपत्राची प्रत; मुंबईतील चालू नाणें; हे संग्रहालय उपस्थित करण्याचा बेत झाला होता त्या संबंधी सर्व कागदपत्रें; व ज्यांनीं ह्यास मदत दिली त्यांचीं नांवें लिहून घातलीं आहेत. आणखी त्या पेटीच्या ढांकणावर असा लेख कोरला आहे :—

सन १८६२ नवेंबर १९ बुधवार

महाप्रतापी राणी व्हिक्टोरिया हिच्या राज्याच्या २५ व्या वर्षी

हिज एक्सेलन्सी धि रैट ऑनरबल्

धिअर्ल आव्ह एलजिन् आणि किंकरडैन के. टी. जी. जी. सी. बी. के एस्. ऐ.

हे भरतखंडाचे व्हैसराय आणि गव्हर्नर जनरल असून हिज्

एक्सलेन्सी सर हेनरी बार्टल्

एडवर्ड फ्रियर के. सी. बी.

मुंबईचे गव्हर्नर

यांनी

व्हिक्टोरिया आणि आलबर्ट पदार्थसंग्रहाल

याच्या पायाचा दगड बसविला.

सन १८५८ नवेंबर १ या दिवशीं महाराणीनें भरतखंडाचें

राज्य आपल्या स्वाधीन करून घेतलें असा जाहीरनामा लावला

होता त्या दिवसाच्या स्मरणार्थ आणि आपल्या राजनिष्ठाप्रदर्शनार्थ

मुंबापुरस्थ लोक हे बांधीत आहेत.

धि आनरेबल् जगन्नाथ शंकरशेट,

सर्वपदार्थसंग्रहालय व उपवनालय यांच्या व्यवस्थापक मंडळीचे अध्यक्ष

भाऊदाजी इस्क्वायर, जी. जी. एम्. सी.

आणि जी. सी. एम्. बर्डवूड इस्क्वायर एम्. डी ;

काम चालतां चालतां इ. स. १८६५ त पैशाच्या कमतरतेमुळें तें बंद ठेवावें लागलें ; परंतु, सरकारानें पुनः इ. स. १८६८ सालीं तें पुरें करण्याचें मनावर घेतलें. हें नवें उपवनालय इ. स. १८७१-७२ सालीं उघडलें. त्यावेंळी ऑनरेबल् **जगन्नाथ शंकर शेट** हे ह्या कामांत पुढारी होते; येवढेंच नाहीं तर, त्यांनीं ह्या कामीं ५,००० रुपये वर्गणी देखील दिली होती.

**१०७.** ह्या इमारतीची लांबी १८० व रुंदी ८० फूट आहे. ह्या म्यूझिअमांत **नोबलकृत** प्रिन्स **कॉन्सर्ट** यांचा पुतळा आहे. ही इमारत एक मजली आहे. आंत सर्व प्रकारचे पदार्थ ठेविले आहेत. मधून मधून इमारतीच्या खांबांस सोनेरी मुलामा दिला आहे तेणें करून ते फार सुशोभित दिसतात. जमिनीचें एकंदर क्षेत्रफळ ३४ एकर आहे ; ह्यापैकीं २ एकर जमीन म्यूझिअमच्या आसपासची कायती सरकारची आहे. बाकीची सर्व जमीन म्युनिसिपालिटीची आहे. बाग व म्युझिअम मिळून सर्व व्यवस्था म्युनिसिपालिटीच्याच ताब्यांत आहे. सर्व बागेसभोवती तिन्ही बाजूनीं चुन्याच्या भिंती आहेत. पश्चिम बाजूला ह्मणजे मुख्य रस्त्याला लोखंडी कठडा असून भव्य असे लोखंडी दरवाजे आहेत. बागेंत फिरण्याकरितां रुंद रुंद रस्ते असून मधून बाजूचे रस्ते आहेत. मध्यें मध्यें गल्ल्या असून झाडांखालीं बांका टाकल्या आहेत. मध्यभागीं एक सुंदर तलाव असून त्यात कारंजे आहे. बागेंत सर्व प्रकारचीं झाडें व वनस्पती लावलीं आहेत. एक लहानच पण सुंदर नदीचा देखावा दाखविला आहे व त्या नदीवरून जाण्यायेण्यासाठी लहान लहान लाकडी पूल बांधून अरण्याचा देखावा दाखविला आहे. बागेंतून जातांना अनेक तऱ्हेच्या पुष्पांचा सुवास येऊन मनास अत्यानंद होतो. बागेंत शिरतांना उजव्या बाजूस इंग्रजी तऱ्हेची बागाची रचना केली आहे, ती अतिशयित चित्तवेधक आहे. मधून मधून उंचवटे असल्यामुळें डोंगराचा देखावा दिसतो. वांकडे

---

हे आनररी जाइंट सेक्रेटरी होते.
विलियम लौडन इस्क्वा
यर, मुंबईचे शेरिफ.
विलियम ट्रेसी;

शिल्पशास्त्री.
ह्या दगडावर पुढील लेख लिहिला आहे.

हा
व्हिक्टोरिया आणि आलबर्ट संग्रहालयाच्या पायाचा मुख्य दगड
तारीख १९ नवेंबर सन १८६२ रोजी
मेहरबान सर एच्, बी. ई. फ्रियर के. सी. बी.,
मुंबईचे गव्हरर्नर, ह्यांनीं घातला आहे.—मुंबईचें वर्णन.

तिकडे रस्ते बांधिल्यामुळें रस्ता नागमोडी सारखा दिसून विलक्षण देखावा दृष्टीस पडतो. पूर्व बाजूस सिंहाचा पिंजरा, वाघाचा पिंजरा, अस्वलींना राहण्यासारखी विहीर, माकडांचे पिंजरे, चित्ते, कोल्हे, हरणें, सांबरें, वनगाई, वगैरे अनेक जातीचीं श्वापदें दृष्टीस पडतात. जरा पुढें गेलें ह्मणजे, नानातऱ्हेच्या पक्ष्यांचे पिंजरे दृष्टीस पडतात. त्यांत नानातऱ्हेचे देशोदेशचे पक्षी ठेविलेले पाहण्यांत येतात. पूर्व बाजूला ब्यांडस्टयांड आहे तेथें आठवड्यांतून २-३ दिवस संध्याकाळीं सरकारी ब्यांडवाले ब्यांड वाजवितात. ब्यांडस्टयांड आणि म्यूझिअम ह्याच्यांमध्यें एक मनोरा बांधिला आहे. मध्येंच गाड्या वगैरे सोडण्यास मोकळी जागा ठेविली आहे. म्यूझिअममध्यें नाना तऱ्हेची धान्यें, तसेंच नाना तऱ्हेचें पदार्थ, पशु, पक्षी, सर्प, चित्रें, वगैरे जिनसा ठेविल्या असून प्रसिद्ध प्रसिद्ध ठिकाणेंही चित्ररूपानें दाखविलीं आहेत. असे अनेक पदार्थ येथें पाहण्यास मिळतात. एकंदरींत हें स्थळ मोठें रमणीय व चित्तास घटकाभर आराम देणारें असें आहे ह्यांत संशय नाहीं. अशा स्थळांचें नुसते वर्णन वाचून तेथील सर्व शोभा चटकन् हुबेहुब डोळ्यांसमोर उभी राहील असें नाहीं ; तर अशी स्थळें स्वतः एकवार जाऊन पाहिलीच पाहिजेत.

१०८. ह्या बागेप्रीत्यर्थ सालीना दहाहजार रुपयांचा खर्च आहे. ही रक्कम मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशन पब्लिक फंडापैकीं मिळते. बाग व म्यूझिअम झाडूनझुडून साफसुफ ठेवण्याकरितां निरंतर ५-२५ माणसें खपतात.

१०९. ह्याशिवाय मुंबईमध्यें आणखी लहान सहान जे बाग आहेत ते येणेंप्रमाणें :—रॉटनरोराइड, युनिव्हर्सिटी गार्डन, एलफिन्स्टनसर्कल गार्डन (ह्यांत दोन उत्तम [1]पुतळें पहाण्यासारखे असून मध्यें सुंदर कारंजें आहे. ही बाग आपल्या प्रियमहाराणी साहेबांचे द्वितीय चिरंजीव **ड्यूक ऑफ एडिन्बरो** हे **मुंबईस** येणार ह्मणून ३१ दिवसांत मोठ्या खटपटीनें पुरी केली;) हार्नबीरोगार्डन, क्रॉफर्ड मार्केट बाग, **नार्थब्रूकगार्डन**, फॉक्लंडरोडगार्डन, ब्याकबेगार्डन, मलबारहिल्गार्डन, वगैरे बरेच पाहण्यासारखे लहानमोठे बाग **मुंबईंत** आहेत.

---

१. मार्क्विस **कॉर्नवालीस** आणि मार्क्विस **वेलस्ली**. पैकीं दुसऱ्या पुतळ्यास ५,००० गिनी खर्च झाला आहे. वेलस्लीसाहेबाचा जो पुतळा आहे त्याजवर पुढील लेख लिहिला आहे :—

११०. शिवरीस एकमोठी सरकारी बाग आहे,ती इ.स. १८३० त बांधली आहे. ह्या बागेंत देशोदेशचीं फळें व फुलझाडें आणि वनस्पती ह्या आणून लावल्या आहेत. **माजगांवास सरजमशेटजी जीजीभाई** यांची एक अत्युत्तम बाग व बंगला आहे. ह्यास 'माझगाव क्यासल' ह्मणतात.

१११. **स्विमिंग बाथ** (जलविहार स्थान)-- पुष्कळ वर्षे पर्यंत **मुंबईमध्यें** ह्या प्रकारचीं जलविहारस्थानें नव्हतीं ; परंतु, ही उणीव कांहीं युरोपिअन लोकांनीं दूर केली. त्यांनी आपसांत वर्गणी गोळा करून **ब्रिचक्यांडीच्या वार्डनरोडवर** एक विहारस्थान बांधलें आहे; परंतु, त्यांत एतद्देशीय लोकांस मुळींच घेत नाहींत, ही मोठी दुःखाची गोष्ट होय. पुष्कळ वर्षेपर्यंत विलायतेंतून ज्या आगबोटी निघत त्या **एडन** पर्यंत येत असत व पुढें तेथून दुसऱ्या आगबोटीनें उतारू **मुंबईस** येत.

एडन येथें उतरणाऱ्या साहेबलोकांस सोईवार असा एक बंगला बांधावा व **एडनहून** येणाऱ्या लोकांस **मुंबईंत** सोई व्हावी व त्यांस राहण्यास स्थान असावें ह्मणून एक बंगला **मुंबईंतही** बांधावा एतदर्थ कित्येक मुलकी कामगार व इतर साहेब लोक ह्यांनीं फंड उभारला. पण पुढें कांहीं

१. मार्क्विस **कॉर्नवालीस** आणि मार्क्विस **वेलस्ली.** पैकी दुसऱ्या पुतळ्यास ५,००० गिनी खर्च झाला आहे. वेलस्लीसाहेबाचा जो पुतळा आहे त्याजवर पुढील लेख लिहिला आहे :–

In honour of
Marquis Wellesly
Governor General of India.

हा पुतळा एका चौथऱ्यावर बसविला आहे व त्याच्या डाव्या हातांत मोठें पुस्तक असून उजव्या हातांत एका पेहलवानास देण्याकरितां तोडा आहे. हा पेहलवान उजव्या बाजूला असून डाव्या बाजूला एक मडम आहे. पेहलवानाजवळ ढाल, तरवार असून त्याची नजर गव्हर्नरजनरलाकडे आहे व मडम हातांत लेखणी घेऊन "Wisdom, Energy, Integrity" (चातुर्य, शौर्य, प्रामाणिकपणा) अशीं अक्षरें लिहित आहे असें दाखविलें आहे. ह्याच्या म्हणजे चौथऱ्याच्या मागच्या भागाला वाघ व सिंह ह्यांचे पुतळे आहेत; ह्या पेहेलवानानें वाघ व सिंह जिवंत धरून आणले होते म्हणून सदर्हु साहेबानें खुशी होऊन त्यास एक तोडा बक्षीस दिला होता ह्मणून सांगतात. ही मडम त्याची मुलगी आहे म्हणून बोलवा आहे. हा पुतळा **मुंबईतील** व्यापारी लोकांनीं उभारला आहे. चौथऱ्याच्या पायथ्याशीं **मुंबईतील** व्यापारीलोकांचीं वगैरे चित्रें दाखविली आहेत व **आसईची** लढाई कोरली आहे. हा इ.स.१८१४ त स्थापिला.

काळानें आगबोटी **एडन** येथें न थांबतां थेट मुंबईस येऊं लागल्या. तेव्हां तो फंडाचा पैसा **मुंबईंतील** म्युनिसिपल कमिशनर मिस्तर **पेडर** ह्यांचे स्वाधीन केला. त्या पैशांतून हे वरील जलविहारस्थान बांधण्यांत आलें आहे. हे लांबीनें ६० फूट असून रुंदीनें ३० फूट आहे. ह्या जलविहाराची जमीन मींटनच्या कौलांनीं बांधली असून त्यांच्या बाजू सिमीट लावून पांढऱ्या रंगविल्या आहेत. ह्यांत २० खोल्या आहेत त्यांत साहेब लोक आपले कपडे करितात. येथें दोन [१]शावरबाथ आहेत.

११२. येथें थोडा पैसा दिला ह्मणजे चहा काफी व सिगारेट (विड्या) मिळतात. येथें जाऊन जलविहारात क्रीडा करण्याबद्दल पुरुषांस दरमहा चार रुपये ; स्त्रियांस २ रुपये; व जे मेंबर नसतात त्यांस प्रत्येकवेळीं चार आणे अशी फी पडते, वर्गणीदार पुरुषांची वेळ बहुधः सकाळीं व बायकांची दोनप्रहरीं असते. बाकीच्या वेळी जे नेहमींचे मेंबर नसतील त्यांनीं तेथें जाऊन जलक्रेली करावी. ह्या बाथमध्यें थोडी ज्यास्त फी दिली ह्मणजे स्नानाचीं वस्त्रें व रुमाल वगैरे सर्व जिनसा मिळतात. प्रत्येक वर्षी जानेवारी महिन्यांत जी वर्गणीदारांची सभा होते, त्या वेळीं जे कोणी कामगार नेमिले जातात ते ह्या बाथची व्यवस्था पाहतात. अशीच एक बाथ किल्ल्यांत **केनेडीसीफेसवर** काढण्यांत आली आहे. तशीच फक्त स्त्रियांकरितां **जनरलम्यूजजवळ** दुसरी एक बाथ बांधण्यांत आली आहे. ह्याचप्रमाणें पालवरोडवर नामदार **जगन्नाथ शंकरशेट** ह्यांच्या घराच्या मागें **पारशी** व **हिंदूलोकांची** स्विमींग बाथची जागा आहे व अशाच दुसऱ्या एक दोन ठिकाणीं आहेत. प्रत्येक जलविहारात पोहण्यांस वगैरे शिकवितात.

११३. **बमनजी हॉरमसजी कारंजें**.– हे कारंजें **टौन** हॉलानजीक बाजारगेटस्ट्रीमध्यें आहे. हे कारंजें वरील गृहस्थांच्या स्मारकाप्रीत्यर्थ

---

१. झारीसारख्या भांड्यांतून पावसाच्या सरीप्रमाणें त्या झारीला असलेल्या छिद्रांतून पाणी पडतें व त्याखाली अंघोळ करणे त्याला शावरबाथ ह्मणतात.

वर्गणी गोळा करून बांधण्यात आले आहे. मध्यें एक मोठा दगडी खांब असून चार बाजूला चार सज्जे आहेत. प्रत्येक सज्जाला पऱ्या आहेत. त्यांना वरच्या भागाला मनुष्यांची तोंडे असून खालच्या भागाला जनावरांचा आकार आहे व वर सोनेरी 'आतस' आहे. खालीं मोठें घडयाळ आहे. हें कारंजें अगदी भरवस्तीत असल्याकारणानें आणि आंत पाण्याचे नळ घेतल्याकारणानें तेथें पाणी भरणाऱ्या लोकांची नेहमीं गर्दी असते. ह्याजवर एक गुजराथी व एक इंग्रजी असे दोन लेख आहे; पैकीं आमच्या वाचकांकरितां इंग्रजी लेख खालीं देतोः—

ERECTED
TO THE MEMORY OF
BOMANJI HORMUSJI WADIA ESQ., J.P.
By Public subscription
Bombay 1880

**११४. फ्रिअर फाउंटन** —हे कारंजें **रामपार्टरो** रस्त्यावर पोस्टऑफिसाच्या नजीक आहे. हें कारंजें ऑग्रिहार्टिकल्चरल सोसैटीनें २७,००० पर्यंत रुपये खर्चून **व्हिक्टोरिया** गार्डनमध्यें ठेवण्याकरितां केलें होते; इ.स. १८६५ सालच्या शेअरबाजारामुळें ह्या सोसैंटीचें दिवाळें निघालें आणि ह्यास ९०,००० रुपये खर्च लागेल असा अंदाज झाला म्हणून त्यांच्याकडून हें काम पुरें झालें नाहीं. ह्याच समयास मि. क्राफर्ड साहेब ह्या सोसैंटीचे प्रेसिडेंट आणि 'एसप्लेनेड फीफंड'कमिटीचे मेंबर असल्यामुळें त्यांनीं ह्या कमिटीकडून बाकीचे पैसे घेऊन हल्लींच्या ठिकाणीं हे कारंजें बांधविलें आहे. ह्या कारंज्यावर एक युरोपिअन बाई उभी केली असून चारबाजूला मुक्तस्तन पुतळ्या आहेत. मध्यें पोकळ जागा असून तेथें चार पुतळ्यांच्या डोईवर नळ्या आहेत; त्यांतून पाणी उडत असतें. हे कारंजें पहाण्यासारखें आहे. अशीच दोन कारंजीं **ग्रांटरोड** रस्त्यावर एका गुजराती गृहस्थानें बांधलीं आहेत. **मुंबईत** ठिकठिकाणीं लहान मोठीं बरींच कारंजी आहेत. पण त्या सर्वांचें वर्णन देऊन उगीच जागा अडविण्यांत काही अर्थ आहे, असें आह्मांस वाटत नाहीं.

११५. **गिरण्या,कारखाने वगैरे** — गिरणी ह्मणजे सूत काढण्याचें व कापड विणण्याचें यंत्र, गिरणींत अनेक प्रकारचीं यंत्रें असतात. सर्व यंत्राचें काम एका वाफेच्या यंत्राच्या योगानें चालतें ! मुंबईंत गिरण्या निघण्यापूर्वी रेशमाचे कपडे वगैरे करण्याचें काम खत्रीलोक करीत. ह्या लोकांस सरकार बाहेरगावांहून मुद्दाम आणून व उत्तेजन देऊन त्यांजकडून कारखाने चालवीत असे ; हे लोक शिवणकामही करीत असत, इत्यादि हकीकत मागें येऊन गेलीच आहे. ह्या शहरांत कापसाचा व्यापार बराच चालतो. ह्या व्यापारास इ.स. १७५० सालीं सुरवात झाली. मुंबईंत सर्वप्रकारचे मिळून आज सुमारें दोन चारशें कारखाने असतील. **मुंबईंत** आज नुसत्या कापसाच्या गिरण्याच ५२ आहेत. पांचसहा गिरण्या तर एकट्या सर **दिनशा माणकजी पेटीट** ह्यांच्याच आहेत. एकंदर गिरण्यांचें भांडवल ४,७३,००,८४५ रुपये आहे. फक्त सर दिनशा ह्यांच्या सहा गिरण्यांचे भांडवल ८१ लक्ष ७४ हजार इतकें आहे. एकंदर गिरण्यांतील वाफेच्या चक्त्यांची किंमत १३ लक्ष रुपये आहे. सर **दिनशा** ह्यांच्या गिरण्यांत २,४६,१९२ रुपयांच्या चक्त्या आहेत. तसेंच गतवर्षी एकंदर गिरण्या मिळून सुमारें १,९५,५७७ खंडी कापूस लागला. फक्त **दिनशांच्या** गिरण्यांत ३६,७८९ खंडी लागला. सर्व गिरण्या मिळून ४४,१११ माणसें खपत आहेत. एकट्या सर **दिनशाच्या** गिरण्यांत ९,३५३ माणसें नोकरीस आहेत. सर्व गिरण्यांत लाख सव्वालाख चक्त्या व अकरा बारा हजार माग नेहमीं चालू असतात. ह्यावरून ह्या **मुंबई** शहरांत सर्व प्रकारच्या कारखान्यांवर किती माणसें आपलें पोट भरीत असतील ह्यांचें अनुमान आमचे वाचक सहज करूं शकतील.

११६. हे सर्व कारखाने **विलायतेवर** अवलंबून असतात हें निराळें सांगितलें पाहिजें असें नाहीं. तेथून जेव्हां यंत्रें येतींल तेव्हां कोठें येथें आमच्या गिरण्यांचें काम चालणार ! पूर्वी जो आमच्या एका कारागिरास एक साधारण कपडा तयार करण्यास वेळ लागत असे, तितक्याच वेळांत गिरणीच्या योगानें आम्हीं सहज त्याच्या पन्नास किंबहुना ज्यास्त पट्टीनें कपडा काढूं शकतों. आता, ज्या गिरणीच्या योगानें आह्मास **एवढा**

फायदा होत आहे तर, अशा एकाद्या गिरणींत जाऊन तेथें सूत काढण्याची व कपडा तयार करण्याची साधारणतः काय कृति असते, ती पाहून तिचा यत्किंचित् परिचय वाचकांस, कीं ज्यांनीं गिरणी मुळींच पाहिली नाहीं त्यांस करून देऊं.

११७. प्रथम एकाद्या गिरणींत गेलें ह्मणजे, अनेंक तऱ्हेचे चमत्कार दृष्टीस पडतात. त्यांत प्रथमच तेथें चालणाऱ्या यंत्रांचा जो घडघडाट व फडफडाट होतो तेणेंकरून तर आधीं कानटाळीं बसून जातात. रस्त्यावर मनुष्य आहे तोंच काहीं अंतरावरून एक मोठी चिमणी काळा धूर बाहेर टाकीत आहे असें त्याच्या दृष्टीस पडतें. ही चिमणी सुमारें दीड ताड उंच असतें. चिमणी टाकून पहात पहात अंमळ पुढें जावें तोंच, वाफेच्या एंजिनास जोडलेलें एक मोठें भलें भक्कम चक्र दृष्टीस पडतें. ह्याचा व्यास सुमारें २५-३० फूट असतो. ह्या मोठ्या यंत्राच्या शेजारीं दुसरें सुमारें १०-१५ फूट व्यासाचें एक लहान यंत्र असतें. ह्या यंत्रापासून बाकीचीं दुसरीं लहान यंत्रें दांत्यांच्या योगानें अथवा चामड्यांचे लांबलांब पट्टे असतात त्यांच्या योगानें चालतात. एकदां एंजिनाजवळच्या यंत्रास चालण्याची गति प्राप्त झाली ह्मणजे इतर सर्व लहान थोर यंत्रांस चालण्याची गति दिली पाहिजे. मोठ्या चक्राजवळ उष्णतामापक यंत्र असतें. ह्या यंत्रावरून उष्णता ज्यास्त किंवा कमी झाली आहे हें समजतें. ज्यास्त झाल्यास वाफ सोडून देतात व कमी असल्यास लागणारी तयार करून घेतात. सर्व यंत्रें चालण्यास बहुतांशीं उष्णतामापक यंत्रच कारणीभूत आहे. हें पाहून झाल्यावर जरा पुढें जावें तोंच शेंकडो मनुष्यें आपापल्या कामांत दंग होऊन गेलेलीं दिसतात. ह्या लोकांची आपापलें काम मोठ्या कुशलतेनें व दक्षतेनें करण्याची चलाखी पाहून मनुष्य कसें अगदीं दंग होऊन जातों. येथें कोणापासून आपल्या कामांत अंमळ दिरंगाई किंवा दुर्लक्ष झालें तर एकाद्या यंत्रात हस्तपादादि सांपडून त्याचा चुराडा होऊन जाण्याची भीति असते. गिरण्यांतून काम करणारीं लहान लहान मुलें व बायकाही बहुत असतात. कोठें कापूस साफ होत आहे; कोठें तो पिंजला जात आहे; कोठें त्याचें जाड सूत तयार झालें आहे; कोठें नुकतेच

सूताचे तंतु तयार होत आहेत; कोठें बारीक सूत निघत आहे; कोठें त्याच्या गुंड्या होत आहेत; कोठें सुतास पीळ देण्याचें काम चाललें आहे; कोठें पीळ दिलेलें सूत मागावर घालून त्याचा कपडा तयार करण्याचें काम चाललें आहे आणि त्यातून जर एकादा लहानसा सुताचा तंतू तुटला तर, त्या मागांचें यंत्र कसें एकाएकी बंद पडतें व तोच जडून दिला ह्मणजे तें पुनः कसें चालू लागतें हे सर्व चमत्कार पाहिलें असतां घटकाभर तहान भूक नाहींशी होऊन जाते. गिरणींतील सर्व प्रकारचें साद्यंत आणि यथातथ्य वर्णन करणें अंमळ अशक्य. अशी कामें तेथें एकबार जाऊन नेत्रानेंच पाहिली पाहिजेत, तेव्हां कोठें वाचलेले वर्णन कांहींसें ध्यानांत भरलें तर भरेल.

११८. एका खोलींत फ्लाय मशीन म्हणून एक कापूस साफ करण्याची मोठी पेटी असते, तिच्या एका बाजूस गठ्ठ्यांतील कापूस घातला ह्मणजे त्यांतील केरकचरा सर्व निघून जाऊन त्याची गादी होऊन ती एका लोखंडी दांड्यासभोंवती गुंडाळली जाते. याप्रमाणें एक दांडा भरला की, त्या ठिकाणीं दुसरा घालतात. अशी दिवसांतून शेंकडो कापसाची गुंडाळी तयार होतात. हीं गुंडाळी तयार झालीं ह्मणजे, त्यांतला कापूस हळुहळू एका पेटींत जाऊन त्यांत बारीक पिंजून दुसरे बाजूनें बाहेर निघून त्याची सुमारें अंगठ्या एवढी जाड वात होते आणि एका लोखंडी नळकंड्यांत जाऊन पडते. एका नळकंड्यांत सुमारें साठसत्तर हात लांबीची वात राहूं शकते, एवढीं तीं मोठीं असतात. एक भरून झालें ह्मणजे दुसरें असें एकामागून एक असें चालते. ज्यांत सूत पिंजले जातें त्यास कार्डिंग मशीन म्हणतात. अशा प्रकारें तयार झालेल्या वाती 'ड्राईंग मशीन' मध्यें घालून लांब वाढविल्या जातात. कार्डिंग मशीन मधून निघालेली वात सारख्या जाडीची नसते, ती ह्या यंत्रांत घातली असतां सारखी होते. पुढें ह्या वातीस 'रोविंग मशीन' (पीळ देण्यांचें यंत्र) च्या योगानें पीळ देण्यांत येतो. अशा रितीनें पीळ दिलेली वात सुमारें सुतळी येवढी जाड असते. पुढें ही वात ह्याच यंत्रानें एका चातीवर गुंडाळली जाते. अशी तयार झालेली गुंडाळीं बारीक सूत काढण्याचे यंत्राकडेस नेतात.

ह्या यंत्रांत ही वात एका बाजूनें आंत येऊन तिचें लांब बारीक सूत होतें आणि तें एका दुसऱ्या चातीसभोंवती गुंडाळलें जातें. तेथून काढून पीळ पडण्यासाठीं रहाट असतो, तेथें मांडतात. रहाट फिरविला ह्मणजे सूत चात्यांवरून उलगडून रहाटासभोंवती गुंडाळलें जातें. असें झालें ह्मणजे तें विकण्याच्या उपयोगाचे होतें. ह्याप्रमाणें सुतास पूर्ण पिळ येऊन तें कपड्याच्या उपयोगाचें झाले ह्मणजें मग मागावर नेतात. तेथें चात्यास तें लावून दिलें ह्मणजे, फणीच्या आकाराचें यंत्र असतें ते प्रत्येक धागा निराळा ठेवून आडवे व उभे धागे एकमेकांस सारखे बसऊन टाकितें. असे अनेक धागे एकत्र झाले ह्मणजे कपडा तयार होतो. एका बाजूस कपडा तयार झाला ह्मणजे, दुसऱ्या बाजूस त्याजवर खळ देण्याचें काम चालतें. तेथून तो तिसऱ्या यंत्रावर नेला ह्मणजे तेथें वाळून तयार होतो. पुढें आणखी एका यंत्रावर कपडा नेला ह्मणजे त्याच्या घड्या पडतात. त्या दाबण्याच्या यंत्रानें दाबून पेट्यांत घालून ठेवितात. इ.स. १६८४ सालीं कंपनी सरकारनें कॉटन स्क्रू (कापूस दाबण्याचें यंत्र) **मुंबईंत** आणला होता; पण, त्यापासून काहींच फायदा झाला नाहीं.

**११९.** साधारण मानानें पाहूं गेलें तर, एका चातीपासून एका तासांत सुमारें १,५०० फूट लांबीचें सूत निघतें. आतां, चांगला सूत काढणारा असला तर, पराकाष्ठेनें दररोज ५०० हात सूत काढूं शकेल. ह्याजवरून पाहिलें असतां, यंत्राच्या योगानें फार श्रमावांचून कामही जास्त होतें, तरी, अशा तऱ्हेनें तयार झालेल्या सुताचा कपडा फार दिवस टिकत नाहीं हें आपण अनुभवावरून जाणतच आहों. कारण, **नागपुरी** धोतरजोडा जेवढा काळ टिकेल तेवढा काळ विलायती कपडा टिकणार नाहीं. कारण हातानें काढलेलें सूत गिरणीच्या सुताप्रमाणें कच्चें व निकस नसतें. हे सर्व सुताचे कारखाने **मुंबईंत** इ. स. १७९२ पासून सुरू झाले.

**१२०.** गिरगांवांत कागद करण्याची एक गिरणी आहे, तींत हलक्या जातीचे कागद होतात; हे कागद साधारण जमाखर्चाच्या कामीं लागतात. हिंदुस्थानांत कागद करण्याचे कारखाने दिवसेंदिवस वाढत चालले आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. हल्लीं या देशांत ९ कागद

करण्याचे कारखाने आहेत; त्यांपैकीं ५ **मुंबई** इलाख्यांत, २ **बंगाल्यांत,** १ **लखनौ** व १ **ग्वाल्हेर** येथें आहेत. व या सर्व गिरण्यांतून गेले सालपर्यंत ८ लक्ष रुपयांचे कागद तयार झाले असें समजतें. **पुण्यास** हल्लीं एक कागदांची गिरणी तयार झाली आहे. पूर्वी इ. स. १७२५ त **चर्चगेट** जवळ एक मोठा रहाट बांधून त्यास तारवासारखीं बाहेरून शिडें वगैरे लावून वाऱ्याच्या योगानें गहू दळण्याचा कारखाना होता. तो कांहीं वर्षांमागें काढून टाकण्यांत आला. त्यास पवनचक्की ह्मणत. परंतु, हल्लीं तिच्या ऐवजी पीठ दळण्याच्या बऱ्याच गिरण्या **मुंबईंत** निघाल्या आहेत. त्यांत हजारो खंडी गहूं दळले जातात.

१२१. बर्फ तयार करण्याकरितां पूर्वी एक मोठी गिरणी गिरगावांत ह्मणजे हल्लीं जेथें प्रार्थना समाज मंदीर आहे त्याच्याजवळ होती. पण अलीकडे जिकडे तिकडे मुंबईंत बर्फाच्या गिरण्या बऱ्याच झाल्या आहे. ह्यापूर्वी बर्फ **अमेरिकेंतून** येत असे.

१२२. **ग्यासचाकारखाना—चिंचपुगळी** जवळ ग्यासचा जबरदस्त कारखाना आहे. तेथून तो नळीनें रस्त्यांवर व इतर ठिकाणीं खेळविला आहे. हा ग्यास रोज किती सरला हें मोजण्याचें एक यंत्र असतें. हा ग्यास दगडी कोळशापासून करितात. ह्या कारखान्यांत मोठमोठ्या भांड्यांत कोळसे घालून ते तापवितात. याप्रमाणें कोळसे तापले ह्मणजे त्यांतून धूर निघूं लागतो. त्यास ग्यास ह्मणतात. नंतर तो चुन्याच्या पाण्यांतून अगर दुसऱ्या काहीं पदार्थांतून जाऊं देऊन स्वच्छ करितात. या प्रमाणें ग्यास स्वच्छ केला नाहीं तर त्याचा प्रकाश कमी व लाल असा पडतो; पण, तोच चुन्याच्या पाण्यांतून काढला तर प्रकाश विशेष स्वच्छ पडतो. ग्यास स्वच्छ झाला ह्मणजे मग पाण्यानें भरलेल्या एका मोठ्या हौदांत एक भलें मोठें उघडें घातलेलें पात्र असतें त्यांत तो सोडतात. जसजसा ग्यास त्यांत जास्त भरत जातो तसतसें तें भांडें वर चढत जातें; व आंत असलेल्या ग्यासावर भांड्यांचें वजन पडून तो दाबला जातो. इतकी कृति झाली ह्मणजे ग्यास कामांत आणण्यासारखा होतो. असा ग्यास एका ठिकाणीं भांड्यांत दाबून राहिला ह्मणजे, त्या

भांड्यांत मोठमोठे नळ सोडून आणि त्या नळांस लहान लहान नळ्या लावून मग त्या नळ्यांच्याद्वारें सर्व शहरभर नेतात. हा ग्यास दगडी कोळशांचाच होतो असें केवळ नव्हे; तर लांकूड, तेल वगैरे पदार्थांपासूनही करितां येतो. हा कारखाना विस्तीर्ण असून मोठा पाहण्यासारखा आहे. या कृतिजन्य ग्यासाप्रमाणें स्वाभाविक ग्यास **रशियांत** भूगर्भी सांपडतो. जमिनींत कांहीं खोल खणलें कीं ग्यास आपोआप वर येतो ! अमेरिकेंतही ह्या ग्यासाच्या विहीरी सांपडल्या आहेत ह्मणून कळतें !

१२३. **आगगाडी**—आपल्या देशांत आगगाडी सुरू झाल्यादिवसापासून व्यापाराची विशेष भरभराटी होत चालली आहें, हें आतां कोणास सांगावयास पाहिजे असें आह्मांस वाटत नाहीं. आगगाडीपासून काय फायदे आहेत हें एकाद्या लहान मुलास विचारलें तरी तें देखील सांगूं शकेल. पूर्वी प्रवास करण्यास किती संकटें भोगावी लागत पहा—एकाद्या मनुष्यास साधारण **मुंबईहून पुण्यास** जाणें झालें तर, त्यास अनेक संकटें भोगावी लागत ; अनेकांचे आर्जव करावे लागत; मोठमोठे घांट चढावे लागत; येवढेहीं करून लवकर पोंचलाच तरी साधारण ३ दिवस लागत. तोच मनुष्य आतां आगगाडीच्या योगानें ६ तासांत पुण्यास जाऊन पोंहचतो! तेव्हां किती वेळाचा फायदा झाला ? चोराचिलटांचाही त्रास चुकला हें विशेष सांगितलें पाहिजे असें नाही. आगगाडीची प्रथम युक्ति विलायतेस निघाली व तिचा लाभ तिकडील लोक घेऊं लागले; तेव्हां तसाच लाभ इकडील लोकांस करून द्यावा म्हणून इ. स. १८४३ सालीं कित्येक सरकारी कामदार व सावकार एकत्र जमून ह्याविषयीं विचार करीत आहेत व ती चालू करण्याच्या अनेक युक्ति योजीत आहेत, इतक्यांत लोकांत असा गवगवा झाला कीं, इंग्रज लोक आमच्या देशांत येऊन आह्मांस फसवून अनेक तऱ्हेनें पैसा नेण्याच्या तजविजींत आहेत. आजपर्यंत वाफेनें चालणारी गाडी कोणी काढलीही नाहीं व कोणाच्यानें काढवणारही नाहीं. आमचे महापराक्रमी, बुद्धिमान व विद्वच्छिरोमणी ऋषीलोक काय सर्व मूर्ख होते ? अशी वाफेनें गाडी चालत असती तर त्यांनीं ती केव्हांच चालविली असती. कोणी ह्मणत छेः हो, असें कधींच होणें नाहीं. हे

इंग्रजलोक काय एवढे मोठे आमच्या लोकांपेक्षां शहाणे आले आहेत. कांहीं तरी सबब सांगून पैसा गोळा करून पळून जाण्याचा रंग दिसत आहे. त्यांना लागलें आहे वेड ! त्यांच्या नादीं लागून आह्मीं एक फुटकी कवडी सुद्धां देणार नाहीं. आमचा व्यापार बुडून जाईल. गाडी-घोडेवाले उपाशी मरतील. एकदां कां हा अग्निरथ चालू झाला कीं, मग ह्या बिचाऱ्या लोकांस कोण विचारतो ! हें सरकारचें करणें आह्मांस मुळींच पसंत नाहीं. अशा प्रकारें अनेकांचे अनेक कुतर्क पुढें आल्यामुळें ह्या बाबतींत कांही एक न होतां वर्ष सहा महिने तसेच लोटले. पण लागलेंच इ. स. १८४४ सालीं सरकारानें या कामावर मि. चापमन यास नेमिलें व त्यानें हजारो रुपये खर्चून ठिकठिकाणीं जाहिराती लावून सरकारचे विचार लोकांस कळविले व असेंही कळविले कीं, येणेंकरून रयतेचें कोणत्याच प्रकारें नुकसान होणार नाहीं; उलट त्यांस फायदाच होईल; व्यापारांच्या सोई होऊन तो जास्त भरभराटीस येईल व प्रवास करण्याचे मार्ग खुले होतील. तरी लोकांचे मनांत जें वेड भरलें होतें तें यत्किंचितही कमी न होतां दिवसेंदिवस ज्यास्त वृद्धिंगत होऊन ह्या कृत्यास जेवढी मदत व वर्गणी जमेल असें वाटलें होतें तिचा चतुर्थांश सुद्धां जमा झाली नाहीं. असें जेव्हां सरकारचे नजरेस आलें तेव्हां, त्यांनीं स्वतः ही गोष्ट मनावर घेऊन आपली 'मोसबेदारी' कबूल केली ; तेव्हां थोडथोडा लोकांस विश्वास पटून मंडळीचें भांडवल १,५०,००,००० रुपयां जवळ-जवळ जमलें. ह्याप्रमाणें भांडवल जमून सडका बांधण्यास सुरवात झाली.; तेव्हां तर, अज्ञानी लोकांनीं पूर्वीपेक्षांही चमत्कारिक आफवा उठविण्यांत आळस केला नाहीं. कित्येकांनीं तर, सडकेखालीं मनुष्याचे बळी द्यावे लागतात.; लहान मुलांस सडकेखालीं गाडावें लागतें; साहेब लोक जो कोणी सांपडेल त्यास धरून नेतात; वगैरे अनेक प्रकारच्या विक्षिप्त कल्पना काढून लोकांचीं मनें विरस केलीं. एवढें झालें तरी, सरकारानें न डगमगतां आपला उद्योग अव्याहत चालू ठेविलाच होता.

१२४. पुढें इ.स. १८५३ सालीं एप्रिल महिन्याचे १६ वे तारखेस सायंकाळीं पांच वाजतां आगगाडी चालूं लागेल अशी वंदता लोकांत पसरल्या बरोबर ती मजा पाहण्याकरितां हजारो कोसांवरून शेंकडों

ठिकाणचे लोक **मुंबईंत** येऊन दाखल झाले. ह्यादिवशीं ही मजा पाहण्याकरितां सर्व सरकारी व सावकारी ऑफिसांत सुटी देण्यांत आली होती. **बोरीबंदरा**पासून तों थेट परळापर्यंत दुतर्फा लोकसमुदाय जमला होता. ह्या गाडीस तीन इंजिनें (वाफेची यंत्रें) लावून वीस मोठमोठे डबे जोडिले होते. पांच वाजण्याचा सुमार होण्याबरोबर **मुंबईचे** गव्हर्नर व दुसरे मोठमोठे शेट सावकार गाडीत बसल्यावर गाडी चालू झाली, ती बरोबर सहा वाजता ठाण्यास जाऊन पोंहचली व तेथून पुनः आठ वाजतां मुंबईस येऊन दाखल झाली.

१२५. **ग्रेटइंडियन पेनिनसुला रेलवे**-- ही कंपनी **हिंदुस्थानां**त इ.स.१८५० त येऊन गाडीचें काम इ.स. १८५३ त सुरू झालें. ह्या वेळीं **मुंबईचे** गव्हर्नर **लॉर्ड एलफिन्स्टन्** हे होते. ह्या लैनची तेव्हां पासून तों इ.स. १८८५ अखेरपर्यंत १,४५० मैल पर्यंत रेल पसरली आहे. **हिंदुस्थानांत** रेलवे स्थापन करावी ह्मणून **इंग्लंद**मध्ये इ.स. १८४४ त ह्या कंपनीचा विचार ठरून पहिल्यानेंच मिस्तर **विलबी** साहेब आले होते. ह्या रेलवेस **बोर**घाट व **थल**घाट असे दोन घांट लागतात. त्या घाटांवरून हळुहळू चढणीनें गाडी नेली आहे. घांटावर गाडी चढतांना निराळी इंजनें लावतात. **बोर**घाट इ.स. १८६३ सालीं बांधला. ह्या रेलवेची **मुबंईंत** एकंदर **शींवा**पर्यंत ७ स्टेशनें आहेत. पैकीं व्हिक्टोरिआटर्मिनस स्टेशनाचें वर्णन पुढील भागात निराळें दिलेंच आहे.

१२६. **बांबे बरोडा** आणि **सेंट्रल इंडिया रेल्वे**-- ही लैन पहिल्याने इ.स. १८६० मध्यें **अमरोळी**पासून **अंकलेश्वरा**पर्यंत सुरू झाली. पुढल्या वर्षी **भडोच** पासून **बडोद्या** पर्यंत गेली व इ.स. १८६३ सालीं **बडोद्या** पासून **अमदाबाद**पर्यंत पोंचली. तेथून इ.स. १८६४ सालीं दक्षिणेकडे **मुंबई**पर्यंत येऊन थडकली. हल्लीं **काशी**पर्यंत जाऊन पोंहचली आहे. ह्या रेलवेची **कुलाबा, चर्चगेट, मरिनलाईन्स, चरनीरोड, ग्रांटरोड, महालक्ष्मी, परळ, एलफिन्स्टन्**रोड, **दादर** व **माहिम** अशीं **मुंबई**च्या टांपूंतलीं स्टेशनें आहेत. ह्या सर्व स्टेशनांत **ग्रांटरोड** स्टेशन जुनें व मोठें आहे. ह्या रेल्वेचे **मुंबई**मध्यें दोन रस्ते आहेत. एक गाडी जाण्याकरितां व दुसरा गाडी

येण्याकरितां. दोन्ही बाजूला निरनिराळीं स्टेशनें आहेत. ह्या सर्व स्टेशनांत **ग्रांट**रोड खेरीजकरून सर्व स्टेशनें नवीं बांधलीं आहेत. ही रेलवे व जी.आय.पी. रेलवे ह्या दोन्ही लैनी **दादर** येथें जोडल्या आहेत. ह्यास **दादर जंक्शन्** ह्मणतात. ह्या रेलवेच्या गाड्या बसण्यास सोईच्या असून जी. आय.पी. रेलवेच्या गाड्यापेक्षां उत्तम आहेत. ह्या रेलवेच्या गाड्या अर्ध्या अर्ध्या तासाने **बांद्रे** व **कुलावा** ह्याच्या दरम्यान फिरत असतात; व जी. आय. पी. रेलवेच्या गाड्या **व्हिक्टोरियाटर्मिनस** पासून तो **कल्याणा**पर्यंत वारंवार जातात. ह्या दोन्ही रेलवेच्या गाड्यांचे ३ वर्ग आहेत. पहिला, दुसरा व तिसरा. 'सलुन' ह्मणून जो वर्ग आहे तो प्रसंगविशेषीं जोडण्यांत येतो व 'स्टेट क्यारिएज' ह्मणून जी गाडी असते ती राजे व गव्हर्नरा सारखे थोर लोक जाणारे असले तरच जोडतात.

१२७. **विमान**— हल्लीं जसें प्रवास वगैरे करणें झाल्यास आगगाडीची योजना झाली आहे, तशी पूर्वी ह्मणजे फार प्राचीन काळीं विमानद्वारें प्रवास करण्याची कला लोकांस माहित होती असें पुराणादि ग्रंथांवरून समजतें; परंतु, तिचा उत्तरोत्तर ऱ्हास होत जाऊन ती कला जगांतून नाहींशीच झाली होती; पण, ह्या कलेचा उदय **फ्रान्स** देशीं झाला. **फ्रान्स** देशात **मांट गोल फीर** नावांचे दोन कागदाचे कारखानदार होते. त्यांनीं एकदा इ.स. १७८२ मध्यें आपल्या कारखान्यांत कांहीं कारणासाठीं एका थैलींत उष्ण हवा भरली होती; पण, झालें काय कीं, ती थैली त्या हवेच्या योगानें तेथील आढ्यास जाऊन लटकली. हे पाहून त्यांस मोठें आश्चर्य वाटलें. प्रयत्न तसाच पुढें चालवितां चालवितां त्यांच्या मनांत विमानाविषयी विचार येऊन त्यांनीं इ.स. १७७३ सालीं एक मोठें विमान तयार केलें. त्यांत हवा भरून तें हजारो लोकांसमक्ष आत देंन बदकें बसवून आकाशमार्गें उडविलें. तें सुमारें १,७०० फूट उंच जाऊन २७ मिनिटें वर अंतरिक्षांत भ्रमण करीत होतें. पुढें ह्या कामात चांगले यश येतें असें पाहून, त्यांनीं वारंवार विमानें उडवून पाहिलीं. इ.स.१८५३ सालीं **मुंबईत** कोणी **कैट** नांवाचा एक गृहस्थ आला होता, त्यानें एक विमान उडविलें होतें. पुढें इ.स. १८७३ -७४ तही असेंच एक विमान परळास लालबागेंत उडविण्यांत

आलें होतें. तें बरेंच उंच जाऊन त्याची बिंदुमय आकृति जनांच्या नेत्रांस फारच आनंदवीत होती. विमान रेशमाचें करितात. ह्याचा आकार बहुधा लंबमौक्तिकासारखा असतो. आंतील ग्यास सुरक्षित रहावा ह्मणून त्यास वारनीस लावतात. विमान जाळ्यांनी आच्छादून त्याचे सर्व बंद खालीं लावलेल्या कड्यांस अडकवितात. ह्या कड्यांसच झोळीच्या आकाराची दोन तीन मनुष्यांस बसण्यासारखी जागा होईल अशी एक टोपली बांधतात. ही टोपली वरील जाळ्याच्या कड्यांस अडकविलेली असल्यामुळें तिचे वजन विमानावर सारखे पडतें. वजन सारखें पडल्याच्या योगानें विमान फाटण्याची अगर एकारण्याची विशेष भीति नसते. विमान उडविण्याच्या कामी 'हैद्रोजन' ह्या वायूची योजना करितात. हा वायू फार हलका असल्यामुळें विमान सहज वर उडतें. ग्यास भरतेवेळीं तें उडून जाऊं नये ह्मणून, त्यास दोऱ्यांनीं घट्ट बांधतात. ग्यास आंत जसजसा भरूं लागतो, तसतसें हें वर उडण्यास जोर करूं लागतें व संपूर्ण विमान ग्यासानें भरून गेलें ह्मणजे दोऱ्या ताणल्या जातात. विमानांत बसून जाणारे मोठ्या खबरदारीने बसतात. ताणलेल्या दोऱ्या तोडल्या ह्मणजे तें लागलेंच वर जाऊं लागतें. विमान खालीं उतरविणें असल्यास त्यास असलेल्या खिडक्यांपैकीं एक खिडकी खुली केली ह्मणजे, तींतून हैद्रोजन ग्यास बाहेर जाऊन आत जड हवेचा प्रवेश होऊ लागतो आणि मग ते हळुहळू खाली येऊं लागतें. खालीं न उतरता वरच जाणें आहे तर, टोपलींत असलेलें वजन खालीं टाकलें ह्मणजे तें पुनः वर चढू लागतें. ही युक्ति शोधून काढली त्यांची धन्य होय. पण ही युक्ति अजून आगगाडीसारखी अगदीं हातांत आली नाहीं. कालेंकरून अशा साहसी लोकांच्या प्रयत्नास यश येईल असें वाटतें. पण आगगाडीपेक्षां त्यांत मनुष्याच्या जिवास विशेष धोका पोंहचण्याचा संभव आहे.

१२८. **टपाल**— पूर्वी पत्रें पाठविण्याची कांहींच सोई नव्हती. कोणास पत्र पाठविणें झालेंच तर मुद्दाम एकादा मनुष्य पाठवावा लागे. मराठी राजाच्या कारकीर्दीत देखील टपालसंबंधीं ह्मणण्यासारखी कांहींच व्यवस्था नव्हती. पुढे **मुंबई**बेट जेव्हां इंग्रज लोकांच्या स्वाधीन झाले तेव्हां, **कंपनी**

सरकारानें टपाल सर्वत्र सुरू केलें. याप्रमाणें **मुंबईं**त सुमारें इ.स. १६९४ त टपालाची स्थापना झाली. पुढें इ.स. १८१८ पासून त्याच्या शाखा गांवोगांवी व शहरोशहरीं पसरल्या. बहुतवर्षेपर्यंत **विलायते**तून आगबोटी येत; पण त्या एडन पर्यंत मात्र येत असून थेट **मुंबई**पर्यंत येत नसत; पण, इ.स. १८२८ पासून **मुंबईंत** आगबोटी येऊं लागल्या. ह्याप्रमाणें इ.स. १८३१ त **लिंडसे** नांवाच्या आगबोटींतून आलेले **मुंबईचे** गव्हर्नर **अर्ल ऑफ क्लेर** हे पहिलेच होत. इ.स. १८२५ पासून **पार्लमेंट**मध्यें **हिंदुस्थानाशीं** पत्रव्यवहार ठेवावा ह्या संबंधानें वाटाघाट चालली होती. तींत ह्यासंबंधी १२ लक्ष रुपये खर्च होईल ह्मणून अजमासही काढला होता. पण हें काम तसेच तहकूब राहिलें. पुढें इस.स. १८३७ त **लिंडसे** आगबोट २८ एप्रिल रोजी ३,४६३ लखोटे व वर्तमानपत्रें घेऊन **मुंबईस** आली. ही आगबोट एक महिन्यांत **इंग्लंदाहून मुंबईस** येऊन पोंहचली. तिर्कटी तारवांस सहा सहा महिने लागत आतां तर **इंग्लंदच्या** आगबोटी महिन्यांतून चार वेळ येतात व जातात. हल्लीं विलायतेहून **मुंबईस** आगबोट अवघी २० दिवसांत येतें ! आगबोट **मुंबईच्या** बंदरात आली ह्मणजे व्यापारी वगैरे लोकांस सूचना देण्याकरितां दोन तोफा होतात. इ.स. १८६२ सालच्या आगष्ट महिन्यांत एक आगबोट **विलायतेहून मुंबईस** १९ दिवसांत आली होती ! पि.आणि ओ. कंपनीची व्हिक्टोरिया नांवाची आगबोट मुंबईस **एडनाहून** अवधीं ४ दिवस ११ तास व २५ मिनिटांत आली होती हे मागें सांगितलेंच आहे.

**१२९.** इ.स. १८३८ सालपर्यंत **मुंबईहू**न थेट **इंग्लंदा**स दरमहा जाणारी येणारी डांक नव्हती. त्याच्यापूर्वी ती **सुएज** येथून जात असे. पुढें सन १८३८ पासून इ.स. १८४० पर्यंत **इराण**चे अखातावरून डांकेची आगबोट जाऊं येऊं लागली. इ.स. १८५५ सालीं पि.आणि ओ.कंपनीनें हें काम आपल्या हातीं घेतलें. पुढें इ.स. १८६८ मध्यें दर आठवड्यास मेल आगबोट येथून जाऊं लागली. इ.स. १८६९ सालीं **सुएज**चे कालव्यांतून आगबोटी जाऊं येऊं लागल्या. ह्या सर्व मेल आगबोटी **मुंबईहून** निघाव्या असें इ.स. १८६८ सालीं ठरलें. आठ महिने मेल आगबोट शुक्रवारीं जाते व पावसाळ्यांत मंगळवारीं निघते.

१३०. हें खातें इतकें वाढलें आहे कीं, गेल्या १५ वर्षांमागें २,२०० [१]पोस्टऑफिसे होती तीच आज ५,५०० वर होऊन गेलीं आहेत. इतक्या काळांत ह्या खात्याचा १०,००० मैल ज्यास्त विस्तार झाला आहे. जे पूर्वी एका वर्षाचें ४,०१,००० पौंड उत्पन्न होतें, तेंच आज ६,६०,००० पौडांहून अधिक होऊन गेलें आहे. सरकारी पत्रव्यवहार होतो तो निराळाच. त्याचा हिशेब यांत नाही. दरसाल १३,१०,००० इतकीं तर नुस्तीं पत्रेंच टपालांत पडतात !

१३१. **मुंबईमध्यें** दिवसांतून पांचवेळ टपाल फुटतें–१ लें १० वाजतां; २रें ११ $\frac{१}{२}$ वाजता; ३रें १२ $\frac{१}{२}$ वाजतां; ४ थें २ $\frac{१}{२}$ वाजतां आणि ५ वें संध्याकाळीं ५ वाजतां. **विलायते**स जाणाऱ्या मेल करितां ब्रांच पोस्ट ऑफिसांत पत्रें वगैरे असतात तीं मेलच्या दिवशीं संध्याकाळीं ४ वाजतां जनरल पोस्टऑफिसांत रवाना होतात; परंतु तेथें ४ $\frac{१}{४}$ वाजल्यानंतर घेत नाहींत. वर्तमानपत्रें, पुस्तकें वगैरे १ $\frac{१}{२}$ वाजेपर्यंतच घेतात. ह्या वेळानंतर जीं पत्रें वगैरे जातील ती जनरल पोस्टऑफिसमध्यें ४ $\frac{१}{४}$ वाजेपर्यंत ज्यास्त फी घेऊन घेतात. पण आगबोटीवर संध्याकाळचे ५ वाजेपर्यंतही घेतात; त्यास ४ आणे ज्यास्त फी द्यावी लागते.

१३२. **पत्रें**– अर्धा तोळा वजनापर्यंत पत्रास अर्धा आणा. एक तोळ्यापर्यंत वजनास १ आणा; १ तोळ्याच्यावर व २ तोळे वजनापर्यंत २ आणे; पुढें प्रत्येक ज्यास्त तोळ्यास १ आणा फी द्यावी लागते. ही फी टिकीट रूपानें असते.

१३३. **पोस्टकार्ड**– प्रत्येक पोस्ट कार्डाची किंमत पाव आणा. पोस्ट कार्डाचे ज्या बाजूवर आंगचेच टिकीट असते त्याबाजूवर फक्त पत्ता लिहिला जातो. आणखी कांहीं लिहिल्यास कार्ड घेणारास अर्धा आणा अधिक द्यावा लागतो. पोस्ट कार्डास जोडलेला 'रिप्लायकार्ड' असतो तो व पोस्टकार्ड मिळून अर्धा आणा पडतो. रिप्लाय कार्डावर आपलें नांव लिहून कार्डासोबत कोणास पाठविल्यास त्याचें हंशील पडत नाहीं. तिकीट न लावलें तर पत्रास दुप्पट हंशील पडतें व पत्र घेणाराचा मुळींच थांग न लागल्यास 'डेड लेटर' ऑफिसमध्यें जातें तेथें तें फोडतात.

१. India in 1880 by Sir Richard Temple, Bart.

१३४. **वर्तमानपत्रे व पुस्तकें**– प्रत्येक १० तोळ्यास **अर्धा** आणा; दहा तोळ्यांपेक्षा वजन किंचित् ज्यास्त असल्यास दुसरें अर्धा आण्याचें तिकीट लावावें लागतें. वर्तमानपत्रें पाठविण्याची विशेष व्यवस्था पोस्ट ऑफिसाबरोबर पूर्वीच करून पैसा भरतात; त्यामुळें त्यांच्या पत्राचें ज्यास्त वजन झाल्यास त्यास ज्यास्त पैसे द्यावे लागत नाहीं. प्रत्येक वेळीं तिकीटही लावावें लागत नाहीं.

१३५. **बंगी पार्सले** — २० तोळ्यांचे वजनास चार आणे; ४० तोळ्यांचे वजनास ८ आणे; पुढे प्रत्येक ज्यास्त ४० तोळ्यास ४ आणे द्यावे लागतात. पुरें हंशील भरलें नसल्यास, बाकीचें हंशील पार्सल घेणारास द्यावें लागतें. पुरी तिकीटें न लावल्यास पत्रास किंवा पुस्तकास कमती आलेल्या हंशींलाच्या दुप्पट हंशील पडतें; पण पार्सलास मात्र कमती तिकीटें लावलीं असल्यास तेवढी भरपाई करावी लागते.

१३६. **नोंदलेली (रजिस्टर्ड) पत्रें**– आपणास कोणतेंही महत्त्वाचे कागदपत्र पाठविणें असल्यास त्यास दोन आण्याचें तिकीट व दुसरें अर्ध्या आण्याचे टिकीट लावून पोस्ट ऑफिसांत नोंदवावे. तें पोंहोचलें किंवा नाही ह्याचा जबाब पाहिजे असल्यास आणखी एक आणा ज्यास्त द्यावा लागतो.

१३७. **विमा उतरविलेलीं पत्रें**—सोनें, रूपें, हिरे वगैरे मौल्यवान पदार्थ विमा उतरवून पाठवावीं लागतात व ती तशीं पाठवावीं हें बरें. विमा उतरविला नसला तर तो माल गहाळ झाल्यास पोस्टऑफिस मालाची किंमत भरून देत नाहीं.

१३८. **मनी आर्डर** –ह्मणजे पोस्ट ऑफिसांत पैसे भरून दुसऱ्याकडे पाठविणें. १० रुपयांपर्यंत २ आणे ; २५ रुपयांपेक्षां वर नसेल तर ४ आणे व पुढे प्रत्येक २५ रुपयांवर ४ आणे याप्रमाणें पैसे पडतात. मनी आर्डर १५० रुपयांवर घेत नाहींत. ज्यास्त पैसा पाठविणें असेल तर तितक्या निराळ्या मनी आर्डरी कराव्या लागतात.

१३९. **व्ह्याल्यूपेएबल पाकीट**– ह्मणजे पोस्टऑफिसद्वारें आपल्या मालाची किंमत आणविणें. मालाची किंमत १० रुपयांहून अधिक नसेल तर २ आणे; २५ रुपयांहून अधिक नसेल तर ४ आणे; व पुढें प्रत्येक २५ रुपयांस चार आणे याप्रमाणें पैसे द्यावे लागतात.

१४०. **टेलीग्राफ** (तारायंत्र.)—हा शब्द दोन ग्रीक शब्दांपासून निघाला आहे. " टेली " ह्मणजे दूर आणि " ग्राफो " ह्मणजे मी लिहितों. इ. स. १८५२ सालीं तारायंत्राची युक्ति निघाली. तारायंत्रसंबंधीं कांही माहिती वेदामध्येंही आहे ह्मणून सांगतात ! हें खरें असेल तर आमच्या देशात ही युक्ति नामशेषही राहिली नाहीं हें कसें तें कळत नाहीं. तार करण्याची रिती अशी आहे कीं, एक लाकडाचा लहान घड्याळासारखा तुकडा असतो, त्या तुकड्यावर दोन लहान लहान कांटे असतात व खालीं एक खुंटा असतो तो ज्या स्टेशनास तार पाठवावयाची असेल त्या स्टेशनला सूचना करण्याविषयीं हालविला जातो. तो हालविला ह्मणजे बातमी घेणारा सावध असण्याची पुनःसूचना करितो, मग बातमी पाठविणारा पुनः खुंटा हालवितो तो हालविला ह्मणजे विजेच्या योगाने बातमी चट्दिशी विवक्षित ठिकाणीं जाते. इ. स. १८५५ पासून तारायंत्राचें काम अमलांत आलें. इ. स. १८७० सालीं **मुंबई**पासून **सुएझ**पर्यंत तारायंत्र सुरू झालें.

१४१. तार पाठविण्याचे तीन प्रकार आहेत. जरुरीची (अर्जंट्), साधारण (आर्डिनरी) व सावकाश (डिफर्ड). जरुरीची बातमी लागलीच एकदम पाठवून ज्याची त्यास पोंहचविण्यांत येते. साधारण बातमी जरुरीच्या बातम्या संपल्यावर क्रमाक्रमानें पाठवावयाची व क्रमाक्रमानें पोहचवावयाची, सावकाश ह्मणजे वरील दोन्ही प्रकारच्या बातम्या गेल्यावर सवडीप्रमाणें बहुतेककरून पोस्टमार्फत पोहचवावयाची. ह्या बातम्या पाठविण्याचे दर असे आहेत :—

| | बातमी | जरुरीची | | साधारण | | सावकाश | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु. | आ. | रु. | आ. | रु. | आ. |
| दर, | आठ शब्दांस, | २ | ० | १ | ० | ० | ८ |
| | आठ शब्दांपुढें दर शब्दास | ० | ४ | ० | २ | ० | १ |

ज्याला बातमी पाठवावयाची त्याचें नांव व पत्ता आणि पाठविणाराचें नांव याबद्दल पैसे पडत नाहींत. बातमीची भाषा कोणतीही असली तरी

चालते ; परंतु, अक्षरें व आंकडे मात्र इंग्रजी असले पाहिजेत. पाठवावयाचे बातमीचें इंग्रजीत भाषांतर करण्यास व आलेल्या बातमीचें भाषांतर देशभाषेत करण्यास तारायंत्रांतील व पोस्टातील मनुष्यांस मदत करावी लागते. हा नियम प्रेसिडेन्सि टौन्स ह्मणजे मुंबई, मद्रास व कलकत्ता ह्या शहरांस लागू नाहीं. ही गोष्ट फक्त देशांतल्या देशात तार पाठविण्याची झाली. परंतु, परराष्ट्रांत तार पाठविणें आहे तर त्याचे दर जास्त असून नांवाबद्दलही पैसा घेतात. तारायंत्रापासून किती फायदे आहेत व त्यापासून देशांचे किती हित होत आहे, हें येथें निराळें सांगण्याची कांहीं आवश्यकता दिसत नाहीं. ही गोष्ट आबालवृद्धांस माहित होऊन गेली आहे.

१४२. **लार्ड डालहौसी** साहेबानें आपल्या कारकीर्दीत हिंदुस्थानांत तारायंत्र असावें ह्मणून सेक्रेटरी-ऑफ्-स्टेटकडे लिहून पाठविलें होतें तिकडून मंजूरी मिळाल्यावर हें काम वरील वर्षी सुरू केलें. ह्यास एकंदर खर्च ३,१५,००,००० रुपये झाला आहे. अनुभवाअंतीं असें कळून आलें आहे कीं, एका सेकंदात १८,७०० मैल पर्यंत दूर बातमी जाते.

१४३. **समुद्रांतील तारायंत्र**—सर्व पृथ्वीवर समुद्रांत १,०७,००० मैल तारायंत्र पसरलें आहे. ह्या कामास एकंदर १८,५०,००,००० रुपये खर्च लागला आहे असें समजतें. ह्यापैकीं काय तें सात हजार मैल खेरीजकरून बाकी १ लक्ष मैल तारायंत्र ब्रिटिश राज्याच्या ताब्यातील आहे.

१४४. **टेलीफोन (दूरध्वनियंत्र)**—टेलीफोन हा शब्दही टेलीग्राफ शब्दाप्रमाणे दोन ग्रीक शब्द मिळून झाला आहे. "टेली" ह्मणजे दूर व "फोनो" ह्मणजे मी ध्वनि करतों, अर्थात बोलतो असा अर्थ. ही युक्ति फारच अलीकडची आहे. प्रथमतः ही युक्ति **अमेरिकेंत** निघाली. तेथून ती थोडक्याच काळांत **हिंदुस्थानांत** आलीं. कलकत्ता, मद्रास व मुंबई ह्या शहरीं हिची सुरुवात इ. स. १८८२ सालीं झाली. मुंबईंत टेलीफोन भांवाची कंपन आहे, ती ह्याची व्यवस्था पाहते. ह्या कंपनीचें मुख्य ऑफिस कोटांत आहे. ह्या टेलीफोनच्या योगानें एका लांबच्या मनुष्याबरोबर सहज बोलतां येतें. टेलीफोनच्या तारा टेलीग्राफच्या तारांप्रमाणें शहरांत रस्तोरस्ती खांबाला लावलेल्या असतात. आपणांस दुसऱ्याबरोबर बोलणें

आहे तर, टेलीफोनची लहानशी पेटी असते त्या पेटीला किल्ली असते ती किल्ली फिरविली ह्मणजे मोठ्यानें घंटानाद होतो. आवाज झाला ह्मणजे दुसऱ्या ठिकाणचा बोलणारा त्या पेटीजवळ येतो व यंत्राच्या तारेच्या शेवटास असलेली नळी कानाजवळ नेऊन दुसऱ्याचें बोलणें ऐकतो व उत्तर द्यावयाचें असल्यास पेटीला एक लहानसें भोंक असतें, त्याजवळ तोंड नेऊन सदहू नळी कानास लावून तो बोलतो. या भोकांत पारदर्शक भिंग बसविलें असतें. टेलीफोनचा उपयोग व्यापारी लोकांस फार होतो. शहरांतल्या शहरांत दूरदूरच्या ठिकाणीं दुसऱ्याबरोबर, त्यांच्याशीं प्रत्यक्ष भेट न होतां बोलणें हीं कांहीं लहानसहान युक्ति नाहीं. ह्या युक्तिच्या योगानें काळ व श्रम किती वाचतात हें सांगणें नको !

**१४५.** ह्या टेलीफोन यंत्रापेक्षांही **अमेरिकेंत** एक नवीनच यंत्र निघालें आहे ह्मणून वाचण्यांत आलें आहे. ह्या यंत्राच्या योगानें आपण जें येथें लिहावें तें ज्या मनुष्याकरितां लिहिलें असेल त्याच्या येथें, तो कितीही अंतरावर असला तरी, तीं अक्षरें जशींच्यातशीं कागदावर उमटतात. कृति फार साधी आहे. ह्या यंत्रास एकघंटा असते ती प्रथमतः वाजविली ह्मणजे, ज्या मनुष्याकरितां आपण लिहितों त्याच्या येथें असलेल्या यंत्रांत प्रतिध्वनि होतो. मग हा गृहस्थ बातमी घेण्यास यंत्राजवळ येऊन उभा राहतो. मग लिहिणारा तेथें असलेल्या पेनशिलीनें त्यास जें लिहिणें असेल तें लिहितो व तींच अक्षरें त्या दुसऱ्या गृहस्थाकडेस कागदावर उमटतात ! ह्या यंत्रानें फक्त लिहिलें जातें एवढेंच केवळ नव्हे ; तर, चित्रें देखील काढलीं जातात! टेलीफोन यंत्राच्यायोगानें बरोबर ऐकूं न आलें तर गैरसमज होण्याचा संभव असतो, तो ह्या यंत्राच्या योगानें बऱ्याच अंशी दूर होईल असें वाटतें. मनुष्याची कल्पनाशक्ति अचाट आहे !

**१४६. केनेडी लैट हौस** – हें **मुंबईच्या** दक्षिणेस सुमारें १२ कोसांच्या अंतरावर एका लहानशा बेटांत ह्मणजे जेथें पूर्वी **मराठे** लोकांनीं तटबंदी केली होती तेथें आहे. क्यापटन **बार्कर** नांवाच्या **इंडिअन नेव्ही**च्या एका अम्मलदारानें येथें लैटहौस बांधण्याविषयीं सरकारास सूचना केली होती ती पसंत होऊन हें लैट हौस बांधण्याच्या कामास इ.स. १८६६ च्या

अक्टोबर महिन्याचे २७ वे तारखेस सुरवात होऊन पुढल्या वर्षाच्या जानेवारी महिन्याच्या १९ वे तारखेस ह्या इमारतीचा कोपऱ्यांतील मुख्य दगड सर बार्टल फ्रिंयर ह्यांनीं बसविला. ह्याच वर्षाच्या जून महिन्याचे १ ल्या तारखेस तेथें दिवा लाविला. हा दिवा पाण्याच्या सपाटीपासून १६१ फूट उंचीवर बसविला आहे. ह्याचा मनोरा जमिनीच्या सपाटीपासून ५० फूट उंच असल्यामुळें पश्चिमेकडून येणाऱ्या गलबतांचा खडकापासून बचाव होतो. हें लैटहौस बांधण्यास एकंदर १,९८,८४१-३-९ रुपये खर्च लागला आहे. ह्या ठिकाणीं २ मोठ्या ३२ पौंडर तोफा लोखंडी गाड्यावर घालून ठेविला आहेत; निशाणें ठेविलीं आहेत; तेणेंकरून धोक्यांपासून गलबतांचा बचाव करतां येतो. ह्या दांडीच्या खुणेवरून गलबतें बंदरांत येतात. ह्या लैटहौसचें काम पाहण्यासारखें आहे.

१४७. **कुलाबची दांडी** (कुलाबा लैट हौस)— इ.स. १७७५ मध्यें हीं दांडी बांधली. ही दांडी समुद्राच्या सपाटीपेक्षां ७० फूट उंच असून दिवा ८९ फूट उंचीवर लागतो. हिच्या पायथ्याचा घेर सुमारें १०५ फूट आहे. पूर्वी ह्यांत एकच कंदील होता; परंतु इ.स. १८४७ पासून त्यांत कळसूत्र सुरू केलें आहे. ह्या युक्तिपासून असें होतें कीं, दिवे लावले ह्मणजे सर्व कंदील एकसारखे फिरत राहून त्यांचा प्रकाश चौफेर सारखा फांकतो. ह्यांस दररोज सुमारें दीड मण तेल लागत असे असें सांगतात. १२ कोसांच्या अंतरावरून ही दांडी दिसते इतकी ती उंच बांधिली आहे. प्रांग्सलैट हौस बांधून पुरें झाल्यावर ह्मणजे इ.स. १८७४ सालीं ही दांडी बंद झाली.

१४८. **प्रांग्स लैट हौस—** हें लैट हौस पाण्याच्या सपाटीपासून अठरा फूट उंच आहे असें गलबतात बसलेल्या लोकांस अठरा मैलांवरून दृष्टीस पडते. ह्या लैट हौसचा मनोरा काळा, पांढरा, तांबडा आणि पांढरा असा रंगविलेला आहे. काळा पट्टा अगदीं तळाला आहे; तेणेंकरून बरसातींत अगर सकाळींच जेव्हां पाण्यावर फार धुकें पडलेलें असतें तेव्हां हा मनोरा स्पष्टपणें दिसतो. हे लैट हौस 'प्रांग्स' नामक खडकाच्या पायथ्याशी बांधलें आहे, ह्मणून ह्यास प्रांग्स लैट हौस ह्मणतात. ह्याच्या आसपास मैल

सव्वा मैल जमीन अगदीं खडकाळ आहे. ह्या लैटहौसमध्यें आठ कोठड्या आहेत. कित्येकांत सामान ठेवितात व कित्येकांत मनुष्यें राहतात. ह्या कामावर एक साहेब व ५ नेटीव कामदार आहेत. आंत जो कंदील आहे, त्याच्यापासून प्रत्येक दहा सेकंदांनीं सफेत उजेड दिसतो. हा कंदील कांचेचा केलेला असून त्याला आठ बाजू आहेत. सर्व कंदिलाची ८० सेकंदांत एक प्रदक्षिणा होते ह्मणजे अर्थात प्रत्येक दहा सेकंदांनीं उजेडाची चमक दिसते. ह्याची चौकट तांबें आणि तोफेची धातू मिळून केलेली आहे. तिच्यावर त्रिकोणाकृति कांचेचें तावदान असल्यामुळें त्यास विशेष चकाकी मारते. सर्वजगांत हें लैट्हौस मोठें आहे. ह्याचें एकंदर वजन १०,१६५ टन आहे असें अनुमान आहे ! व ह्या लैटहौसला एकंदर खर्च ६,२०,२५५ रूपये झाला आहे. ह्याचें काम इ.स. १८७४ त मार्चचे १३ तारखेस पुरें होऊन १ ल्या नवेबरास आंत दिवा लाविला.

**१४९.** दर्यावर्दी लोकांकरितां अशा सोई असणें फार उपयोगाचें आहे. अशीं लैटहौसें बांधण्याचीं कारणें उघड आहेत. कारण, नावाडी लोकांस त्यांचा किती उपयोग होतो हें सांगणें नको. पहाना शत्रूचीं जहाजें आलीं तर, ती फार लांबून दिसतात व तीं दिसलीं ह्मणजे सावधगिरी व तयारी ठेवण्यास कांहीं अवकाश मिळतो; रात्रीं येणाऱ्या जहाजांस बंदरांत शिरण्याचा मार्ग दिसतो; व अशा रितीनें खडकांपासून त्यांचा बचाव होतो. हे काय लहानसहान फायदे आहेत ?

**१५०. पांजरपोळ** — मनुष्यांमात्रांमध्यें दया असणें ही गोष्ट फार अगत्याची आहे. ज्या मनुष्याच्या आंगीं यत्किंचित्‌ही भूतदया नाहीं, त्याला 'मनुष्य' ह्मणणे साजेल कीं नाहीं, ह्याचा आह्मांस संशय वाटतो. मनुष्याच्या आंगीं दया असणें हे एक धार्मिकपणाचें लक्षण आहे. ह्या संबधानें **तुळशीदासानेंही** एका ठिकाणीं असें ह्मटलें आहे :—

**दया धरमका मूल है । पापमूल अभिमान।।**
**तुलसी दया न छांडिये। जबलगघटमे प्रान ।।**

मनुष्यानें मनुष्यावर दया करणें हें साहजिक आहे व ती प्रसंगविशेषीं एकमेकानें एकमेकावर करणे हा मनुष्यमात्राचा धर्मच होय. धर्माची जीं

दहा लक्षणें सांगितलीं आहेत त्यांतही 'दया' या लक्षणाचा समावेश केला आहे. सर्व भूतमात्रांवर दया करणें हाही पण एक मनुष्याचा धर्म आहे हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. त्यांतून गाई, ह्मशी आदिकरून परोपकारी व मूक जनावरांवर दया करणें ह्यात विशेष पुण्य मानिलें आहे. त्यांजवर दया करणें ह्मटलें ह्मणजे, आह्मी केवळ त्यांचें कांही विशेष साह्य करतों असें नाहीं; तर, आम्हीं आमचा धर्मच बजावितो असें आहे. व त्याजवर दया करणें ह्मणजे त्यांचा हिंसेपासून बचाव करणेंच होय. "अहिंसा परमोधर्मः" ह्मणून वेदवाणीही आहे. तेव्हा अर्थात गाईसारख्या परोपकारी,निरुपद्रवी व अत्यंत उपयोगी प्राण्यावर दया करणें हें प्रत्येक मनुष्यास उचित आहे. आतां, ह्या प्राण्यापासून मनुष्यमात्रांस सुख मिळतें ह्मणून, त्यांजवर दया करावी व इतर प्राण्यावर करूं नये, असें कोणी मुळींच समजता कामा नये. आपल्या अज्ञानामुळें मात्र आपणांस त्याजपासून काय काय फायदे आहेत हें कळत नाही. एवढेंच कायतें. बाकी ज्या जगन्नियंत्या परमेश्वरानें त्यांस उत्पन्न केलें आहे, त्यानें त्यांचा कांहीं तरी उपयोग असेल म्हणूनच उत्पन्न केलें आहे. असो.

**१५१.** मनुष्यांस दुखणेंबाणे झालें असता त्यांची व्याधीपासून मुक्तता व्हावी ह्मणून ज्याप्रमाणें जागोजाग औषधालयें (हॉस्पिटलें) स्थापिलीं आहेत, त्याप्रमाणेंच अशा ह्या मूक प्राण्यांस कांही रोग वगैरे झाल्यास किंवा तीं जराग्रस्त झालीं असतां त्यांचे रक्षण व्हावें म्हणून अशाच तऱ्हेचें एकादें स्थान असावें, हा विचार मनांत आणून इ.स. १८३४ सालीं मुंबई मध्यें पशुपक्ष्यादि मूकजनावरांकरितां एक स्थान बांधण्यांत आलें. एवढें हें धर्माचें कृत्य श्रावक धर्मांतील शेट **मोतीचंद अमीचंद** नांवाचा एक प्रख्यात व सधन व्यापारी होऊन गेला त्याचें आहे, त्यानें **कावसजी** पाटलाचे तळ्याजवळ एक मोठी जागा विकत घेऊन तींत एक मोठा वाडा बांधिला आणि त्यास 'पांजरपोळ' हें नाव दिलें. ह्या पांजरपोळांत रोगी व अशक्त चतुष्पाद प्राणी तसेच नानातऱ्हेचे पक्षी वगैरे आणून सोडिले जातात. तेथें त्यांची उत्तम प्रकारें सुश्रूषा ठेविली जाते. पक्ष्यांस ठेवण्याकरितां पिंजरे निराळे, जागा निराळी; गाई, ह्मशी घोडे इत्यादि जनावरांकरितां गोठे

निराळे; तबेले निराळे; कुत्रे,माकडें वगैरे अंमळ क्रूर जनावरांकरितां निराळी ठिकाणें व निराळे पिंजरें; कांसवादि जलचरांकरितां विहिरी; वगैरे नानाविध प्राण्याकरितां निरनिराळ्या सोई ह्या ठिकाणीं केल्या आहेत. त्यांस दाणापाणी देण्याकरितां व जागा वगैरे स्वच्छ ठेवण्याकरितां बहुत नोकर ठेविले आहेत. एकंदरींत हल्लीं ह्या पांजरापोळाची व्यवस्था फार चांगल्या तऱ्हेची आहे असें दिसतें. सदर्हु पांजरापोळांचा खर्च चालावा म्हणून **शेट मोतीचंद** ह्यांनीं ३०,००० रुपये अमानत काढून ठेविले आहेत, त्यांच्या व्याजांतून ही सर्व व्यवस्था होते. शिवाय व्यापारी लोकांस व्यापारांत जो नफा होतो, त्यातून रुपयामागें एक आणा धर्मादाय काढिला पाहिजे, असा येथील वाणी, भाटे वगैरे व्यापाऱ्यांचा एक नियम आहे. ह्या एक आण्यांपैकी कांहीं भाग पांजरापोळाकडे जातो व कांहीं इतर धर्मकृत्यांकडे लागतो. कित्येक धार्मिक लोक ह्या कामीं वेळोवेळीं पैशाच्या देणग्याही देतात. ह्याच ठिकाणीं पांजरपोळसंबंधीं नीट व्यवस्था लावण्याकरितां व जमाखर्चादि हिशेब ठेवण्याकरितां एक ऑफिस आहे.

१५२. कोणा एकाद्या सद्‌गृहस्थास गाई, ह्मैस किंवा घोडा पाहिजे असेल तर तें जनावर 'मी विकणार नाहीं आणि त्याचा यथायोग्य प्रतिपाळ करीन' अशी तेथील व्यवस्थापकाची खात्री करून दिली तर, त्यास तें जनावर मिळतें. तसेंच ज्या कोणास आपल्या येथें असलेल्या जनावरांस पाळण्याचें सामर्थ्य नसेल त्यानें तें ह्या पांजरापोळांत नेऊन सोडिल्यास घेतात.

१५३. **नवे पांजरापोळ**— हें ठिकाण **गिरगावां**त नामदार **जगन्नाथ शंकरशेट**च्या पूर्वीच्या शाळेजवळ आहे. **सरजेमशेटजी जीजीभाई** ह्यांनीं ही जागा गुरांस चरण्याकरितां धर्मार्थ ठेविली आहे. ह्यास कोणी **'गायवाडी'** देखील ह्मणतात. येथें गुरांस पाणी पिण्याची मात्र सोई आहे. पूर्वी इ.स.१८३८ सालपर्यंत शहरवासी लोकांच्या गाई, ह्मशी वगैरे जनावरें **कांपाच्या** मैदानांत चारावयास नेत. तेथें जागोजाग धोबीलोक वस्त्रें धूत, मैदानही खुल्लें होतें. त्यामुळें गुरांस थोडाबहुत चारा मिळून पाण्याचीही चांगली सोई होत असे. गुरांस पाणी मिळावें म्हणून कांहीं

गृहस्थांनीं मैदानांत मुद्दाम टांकी बांधलीं होतीं. असें चाललें असतां सरकारानें ह्याठिकाणीं गुरें चारण्याबद्दल दरह्मशीस ३ पै; गाईस २ पै व शेळीस १ पै असा कर बसविला. पुढें कांहीं दिवसांनीं तर तीं चारण्याचीही बंदी केली; त्यामुळें गुराखी लोक जनावरांस समुद्र किनाऱ्यावर वाळवंटांत नेऊन सोडीत. हल्ली मैदानांत गुरांस चारण्याकरितां **मुंबईचे** एक्झिक्युटिव इंजिनिअर ह्यांचे ऑफिसांतून गवळी वगैरे लोकांस पास दिले जातात. हे पास पितळेचे असून जनावरांच्या गळ्यांत बांधतात.

१५४. **मुंबईतील मार्किटें — मुंबई** सारख्या शहरांत बाजार असणें हें अति महत्त्वाचें आहे; कारण, ह्या शहरांत लोक वस्तीच्या मानानें जी नित्यशः उलाढाल होते व जो लाखो रुपयांचा व्यापार चालतो, त्या मानानें बाजारांची संख्या व व्यापाराचे अड्डेही ज्यास्त असले पाहिजेत हें निराळें सांगणें नलगे. ह्या शहरांत एकंदर २३ प्रसिद्ध अशीं बाजारांची ठिकाणें आहेत. त्यांत १८ बाजार खासगी असून बाकी ५ म्युनिसिपालटीचे आहेत. हे बाजार बांधण्यास म्युनिसिपालिटीस एकंदर खर्च १४,५७,०५९ रुपयांवर झाला आहे ह्मणून समजतें. बाजारांची व्यवस्था पाहण्यास म्युनिसिपालिटीच्या तर्फे एक कमिटी आहे. ह्या बाजारांपासून म्युनिसिपालिटीस सर्व खर्च वेंच जाऊन सुमारें ७५,००० रुपये उत्पन्न होतात. ह्या बाजारातून एकंदर प्रतिदिवशीं सुमारें दीडलक्षांवर मनुष्यांची रहदारी आहे. खासगी बाजारांपासून कमिटीस २१,४६२ रुपयांचे उत्पन्न होते. अलीकडे म्युनिसिपालिटीच्या मनांत हे खाजगी बाजार मोडून सुमारें ३।। लाख रुपये खर्च करून मोठा एक नवीन बाजार बांधावा असें आहे. ह्यांचे कारण खाजगी बाजारांत व्यवस्था बरोबर नसते हें होय. ह्या शिवाय लहान लहान बाजार व दुकानें तर गल्लोगल्लीला दृष्टीस पडतात. मनुष्य पाहिजे त्या रस्त्यावरून जाऊं लागल्यास तेथें त्याच्या दृष्टीस कांहीं तरी दुकानें पडावयाचींच.

१५५. पूर्वी **मुंबईंत** वस्ती थोडी व व्यापारही तादृश कमी असल्यामुळें ह्मणण्यासारखी बाजाराची नीट अशी व्यवस्था नव्हती; सबब, माल विकणारे लोक त्यांस जागा सांपडेल तेथें बसून आपला माल विकीत. पण पुढें

कांही काळानें एका वाणी गृहस्थानें शहराच्या मध्यभागीं ह्मणजे हल्लीं असलेल्या जुमामशीदी समोरील दक्षिणआंगची जागा बाजाराकरितां बक्षीस दिली. ह्याप्रमाणें कांहीं वर्षेपर्यंत लोक त्या जाग्यांत बसून आपापला माल विकीत; पण, पुढें इ.स. १८०९ ह्या वर्षी **डंकन** साहेबाच्या कारकीर्दीत येथें सरकारानें सोईवार इमला बांधून लोकांस बसवण्यासाठीं जागा केली. त्या वेळीं अशी वहिवाट होती कीं, जो प्रथम येऊन ज्या जाग्यांत बसेल ती त्याची जागा. असें प्रत्यहीं सकाळीं होत असे. तेथें पावसाळ्यांत चिखल होत असे त्यामुळें माल विकणारांची व बाजारांत जाणारे येणारांची बरीच गैरसोई होई. पुढें इ.स. १८३८ त सरकारानें हे मार्किट पुनः नवें बांधिलें. त्यांत माल विकणाराकरितां बसण्याची सोई केली होती, तरी तेथें बसून माल विकण्याबद्दल सरकारास कांही द्यावें लागत नसे. ह्या बाजारांत मासळी वगैरे विकण्याचा अगदीं प्रतिबंध होता.

१५६. **भुलेश्वर** मार्किटांतून **क्राफर्ड** मार्किटाकडे जो रस्ता जातो त्या रस्त्यानें जाऊ लागले ह्मणजे, डाव्या हातावर **पायधुणी**कडे जातांना तांबटांचे दुकानांची एकसारखी रांग दृष्टीस पडते. तेथें हजारो तऱ्हेचीं तांब्यापितळेचीं भांडीं विकण्याकरितां मांडलेलीं असतात. हीं दुकानें एक लांबच्या लांब चाळ आहे तींत आहेत. **नळ**बाजाराजवळ मातीचीं भांडी विकतात. तसेंच **भुलेश्वरा**वरून **क्राफर्ड** मार्किटाकडे जातांना **मारवाडी** बाजार लागतो ह्या ठिकाणी एकेक श्रीमंत मारवाडी कापडाचे गट्ठेचे गट्ठे ठेऊन तक्याला टेंकून बसलेले दृष्टीस पडतात. ह्यांच्या दुकांनी उंची शेले, शालू, शाली, साड्या, पीतांबर, पागोटीं, सतरंज्या वगैरे कापड मिळतें. ह्या बाजारांतून नेहमीं मारवाडी लोकांचे सट्टे चाललेले दृष्टीस पडतात. त्याच्यापुढें गेलें ह्मणजे, मोतीवाले लोक पुढें पेट्या ठेवून बसलेले दृष्टीस पडतात. येथें मोंती, हिरे वगैरे जवाहिर विकलें जातें. चार पावलें पुढे गेलें नाहीं तोंच सोन्या रूप्याचे व्यापारी सोन्याच्या लगड्या ठेवून बसलेले आहेत असें नजरेस पडतें. ह्यांच्या पुढें बोहरी लोकांची चोपड्या वगैरे विकण्याचीं दुकानें; जरीच्या टोप्या विकणारांची दुकानें; किराणा माल विकणारांची दुकानें, अशी शेकडों दुकानें असून तेथें लाखों

रुपयांची घडामोड चाललेली पाहून व लोकांची चळवळ व माल विकत घेणारांची धांवाधांव पाहून मनुष्य आश्चर्य भरित होऊन जातो. ह्याच्याच पुढें कापड बाजार लागतो. **क्राफर्ड** मार्किटापासून **मारवाडी** बाजारांपर्यंत कापडाचे तीन बाजार आहेत. त्यांत जुना व प्रसिद्ध असा **सर मंगळदास नथुभाई** ह्यांचा बाजार आहे. हा बाजार मनस्वी विस्तीर्ण आहे. नाक्यावरील दुकानांस भाडें फार पडतें ; परंतु, आंतील दुकानांस तितकें पडत नाहीं. ह्या दुकानांत बहुतेक सर्व माल विलायती असतो. कांहीं कांहीं दुकानांवर स्वदेशी माल असतो खरा ; परंतु, तो फारच थोडा असतो. स्वदेशी मालाचा व्यापार करणाऱ्या मंडळीचीं **मुंबईत** अवघीं २-३ दुकानें आहेत ; पैकीं मोठें दुकान **रामवाडीत** राममंदिराच्या दरवाज्या जवळ आहे. ह्या दुकानाला आमच्या लोकांस विलायती माल वापरण्याची गोडी लागल्यामुळें फारसा नफा होत नसेल. तरी कित्येक स्वदेशाभिमानी आहेत ते देशी कपड्यावांचून इतर ठिकाणचा कपडा वापरीत नाहींत. नळबाजारांतही कापड विकण्याची दुकानें बहुत आहे. **क्राफर्ड**मार्किटाच्या शेजारींच **लोहार**चाळीचे गल्लींत खिळे, स्क्रू, वगैरे लोखंडी सामान विकणारांचीं दुकानें आहेत. येथेंच एक चोर बाजार आहे तेथें जुने कपडे मिळतात. ह्याच गल्लीचे समोर बिल्लोरीसामान विकणारांची दुकानें आहेत. चकल्यांत कपाटें, खुर्च्या, टेबलें, पेट्या वगैरे लाकडीसामान (नवें व जुनें) तयार करून विकण्याची बहुत दुकानें आहेत. कांचेचे सामान विकणारांची दुकानेंही येथें थोडीं आहेत असें नाहीं.

१५७. **क्राफर्ड** मार्किटच्या उत्तर बाजूला बुटांची दुकानें आहेत तेथें इंग्रजी बूट विकतात. मैदानांत पोलीस चौकीच्या शेजारी मोकळी जागा आहे तेथें गांवठी बूट व ब्राह्मणीजोडे विकत मिळतात. येथे मोची संध्याकाळचे ४ वाजल्यापासून तों ७ वाजेपर्यंत बसतात. कांही जोडे विकणारे मोचीलोक **भुलेश्वरा**जवळ रामवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर बसलेले आढळतात. ह्या मार्केटच्या शेजारीं एक लहानशी गल्ली आहे तेथें बिछानें , उशा, पासोड्या वगैरे मिळतात. **जुमा**मशिदीच्या बाजूनें जो रस्ता जातो त्या रस्त्यावर

बोहरी लोकांची दुकानें असून किराणा माल विकणारांचीही दुकानें आहेत. त्याच्यापुढें गेलें ह्मणजे छत्र्या विकणारे लोकांची दुकानें दिसतात; ह्या दुकानांत बहुतकरून सर्व विलायतीच माल असतो. जरा पुढें गेले ह्मणजे, लोखंडीसामानाचीं दुकानें लागतात व तेथून बरण्या, पेले वगैरे चिनाई मातीच्या भांड्यांचीं दुकानें लागतात. कापड मार्किटाचे शेजारी ह्मणजे हल्लीं जेथें मिरच्या, बटाटे, कांदे, सुपारी वगैरे जिन्नस विकण्याचीं दुकानें आहेत तें जुनें मार्किट होय. कुंभारतुकड्याच्या नाक्यापासून तें थेट **भुलेश्वर, मुंबादेवी** पर्यंत मेवा मिठाईची दुकानें लागून गेलीं आहेत. त्यांत प्रसिद्ध अशीं आज मितीला दोनच आहेत. एक **गोपाळदासचें** व दुसरें **अमीचंद** ह्याचे हलव्याचें दुकान. **गोपाळदासचें** दुकान **कुंभार**तुकडीच्या नाक्यावर आणि कापडबाजाराजवळ **अमीचंदचें** आहे. वर जीं प्रसिद्ध व नामांकित दुकानें सांगितली त्यांत त्या त्या दुकानांचे उत्पादक जिवंत होते तो पर्यंतच अति उत्तम माल मिळत असे ; तरी पण, अजूनही त्या दुकानांवर इतर दुकानांवर जो माल मिळतो त्यापेक्षा चांगलाच मिळतो. किराणा माल व औषधीही प्रत्येक गल्लीला मिळतात. नारळ वगैरे विकण्याच्या वखारी आहेत. लाकूडफाटे विकण्याच्या वखारी गल्लोगल्लीला झाल्या आहेत. दारूची पिठीं व विलायती दारूचीं दुकानेंही नाहींत अशी **मुंबईत** जागाच नाहीं. पानवाले गल्लोगल्लीला आहेत. अशा शहराच्या बाजारांची संख्या देणें किंवा वर्णन करु जाणें ह्मणजे जरा धाडसाचेंच काम आहे.

१५८. **क्राफर्डमार्किट.— मुंबईत** राहणाऱ्या लोकांस **क्राफर्ड**साहेबाचें नांव माहित नाहीं, असा एकही मनुष्य मिळणें कठीण ; कारण, सदरहू साहेबानें ह्या शहरांत ज्या सुधारणा केल्या आहेत त्या सर्व ह्या शहरच्या रहिवाशांच्या सुखार्थच केल्या आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पूर्वी कोटांतून गांवांत येणें झालें ह्मणजे उन्हाचा अतिशयित त्रास होत असे ; परंतु, ह्या साहेबानें कापावर दुतर्फा झाडें लाविल्याकारणानें जाणारा येणारास आज बरेंच सुख होत आहे. अशा ह्या साहेबांच्या कृति अनेक आहेत. त्यांपैकींच वरील मार्किट होय. हें मार्किट कापाच्या मैदानांत

ईशान्य दिशेस कारन्याक बंदराशेजारीं आहे. इ. स. १८६५ पासून इ. स. १८७१ पर्यंत **मशारनिल्हे** साहेब **मुंबईचे** म्युनिसिपल कमिशनर होते. त्या वेळी त्यांनी हें मार्किट बांधिले. हे साहेब जेव्हां म्युनिसिपल कमिशनर झाले तेव्हां मार्किटांच्या शेजारींच " कसाईवाडें " असत. त्यामुळें मांसाहारी नव्हत अशा लोकांस ह्या बाजारात जाणें ह्मणजे मोठें जिवावर येई. हें पाहून ह्या साहेबानें सर्व कसाईलोक तेथून हांकून दिले व **मुंबई**पासून दहा मैलांवर ह्मणजे **बांदरे** येथे कसाईवाडे बांधिले. कसाईवाड्यांत जाण्यापूर्वी प्रत्येक जनावर तपासलें जातें. ह्याप्रमाणें त्यांचा तेथें वध झाल्यावर त्यांचें मांस आणण्याच्या निराळ्याच रेल्वेच्या गाड्या (मीट व्हान्स) आहेत त्यांतून **मुंबई**तल्या बाजारांत नेतात. ह्या गाड्या बहुतकरून पहाटीं येत असतात. ह्या **क्राफर्ड**मार्किटाची जागा एकदंर ७२,००० चौरसयार्ड आहे. ह्या मार्किटांत शिरतानांच पश्चिमबाजूला एक मोठा दरवाजा आहे. त्या दरवाजाच्या वरच्या भिंतीवर वाणीलोकांच्या बायका डोकीवर पाण्याचे घडे घेऊन चालल्या आहेत; कोणी शेटसावकार इकडून तिकडे फिरत आहेत; असा मजेचा देखावा दाखविला आहे. आंत शिरतांच समोर एक कारंजें आहे. हे कारंजें सर **कावसजी जहांगीर** ह्यांनी बांधिलें आहे. त्याजवर नानाप्रकारचीं चिनाई मातीची भांडी ठेवून दुकानदार बसलाच असतो. उजव्या हाताकडे बघितलें ह्मणजे फळफळावळ विकणाऱ्या लोकांच्या दुकानांच्या रांगा नानाप्रकारच्या फळ फळावळीनें सुशोभित अशा दृष्टीस पडतात. त्याच्याच बाजूला फूलमाळ्यांची हार, तुरे, गजरे करण्याची एकच घाई उडून गेली आहेसें दिसतें. पुढें तांबोळी विड्याच्या पानांची दुकानें मांडून बसतात. तेथून निघून पुढें गेलें ह्मणजे एकसारखा नाना तऱ्हेचा भाजीपाला दृष्टीस पडतो. दुकानांवर पाहिजे तेव्हां जा तेथें एकसारखी गर्दी आहेच आहे. पुढें तंबाकु विकणारांच्या गाद्या आहेत, तेथून जरा उत्तर बाजूला गेलें ह्मणजे, बोहऱ्यांची दुकानें एका रांगेनें लागून गेलेलीं दृष्टीस पडतात. तेथें सर्व प्रकारची मिठाई मिळते. तेथून परत पश्चिम बाजूला आलें ह्मणजे, दवाखान्याचा थाट

दृष्टीस पडतो. त्यांत हजारो बाटल्या दृष्टीस पडतात. खालीं जमिनीकडे पाहिलें तर पांढऱ्या शुभ्र दगडांनीं पिटल्यामुळें जणूं काय एक शुभ्र गालीचाच पसरिला आहे ह्मणून भास होतो. त्याजवर पडलेला केर कचरा हमाल लोक केरसुणीनें एक सारखा झाडीत असतात. वर पहावें तों सर्व लोखंडी काम दृष्टीस पडतें. मधून मधून ते लोखंडी गज पाहून मनुष्य अगदी दंग होऊन जातो. ह्या बाजारांत उत्तम तऱ्हेची फळफळावळ मिळते. ह्यांत बहुतकरून साहेब लोक फार जात असतात. येथें केव्हांही गेलें तरी, त्यांचीं जोडपीं फिरतांना पाहण्यात येतात. ह्या मार्किटांत जिन्नस बहुधा महाग मिळतो अशी सर्व साधारण समजूत आहे. व ती कांही अंशी खरी आहे. रात्री ग्यासचे दिवे पेटत असतात. उत्तर बाजूच्या बाहेरच्या भागाला एकीकडे कांसार, एकीकडे कांचेचें सामान विकणारे आणि दुसरीकडे बूट विकणारे, असा अनेक तरतऱ्हेचा माल विकणारांचीं दुकानें आहेत. तेथून दक्षिण आंगाला गेलें ह्मणजे एक रमणीय बाग दृष्टीस पडतो ; त्यांत बसण्याकरितां जागजागीं बांका ठेविल्या असून, त्यांजवर बसणारांस छाया व्हावी म्हणून आर्चीस (लतामंडप) केले आहेत. त्यांच्यापुढें पांखरें विकणारांचीं दुकानें लागतात. त्यांच्या दुकानांत हजारो ठिकाणचे हजारो जातीचे पक्षी असतात. ते पक्षी घेणारांची गर्दी दृष्टीस पडते. कित्येक पक्षी फार मोलवान असतात. त्याच्यापुढें ह्मणजे पक्षीबाजाराच्या शेजारीं जी घाऊक माल विकण्याकरितां पडवी केली आहे तीत, भाजीपाला, फळफळावळ विकत घेणारांची एकच घाई उडलेली दृष्टीस पडते. हीं फळें व भाजीपाला बाहेर गांवाहून येतात. एवढे पाहून झालें ह्मणजे, मांसभक्षक लोक मासळी बाजाराकडे जातात. येथील वर्णन आह्मीं देण्यास इच्छित नाहीं. संध्याकाळीं चाकरमाणसें सर्व बाजार पाण्यानें धुवून साफसुफ करून टाकितात.

१५९. ह्या मार्किटाला मुख्य तीन दरवाजे असून मध्यें एक हॉल आहे. ह्या बाजाराचें काम सर्व सफेत पोरबंदरी व वसईचा लाल दगड ह्यांचें मिश्रण करून केलें आहे. ह्याच मार्किटांत "सुपरिटेन्डेंट ऑफ् मार्किटस् " राहतो व तो ह्या मार्किटाची सर्व व्यवस्था पाहतो. ह्या

मार्किटावर १८० फूट उंचीवर घड्याळ बसविलें आहे, तें मोठें असून फार लांबून दिसतें. रात्रीच्या प्रहरीं पाहणारांस वेळ दिसावा म्हणून ह्यांत ग्यासच्या दिव्याची योजना केली आहे.

१६०. ह्या बाजाराच्या वर सांगितलेल्या फळफळावळीच्या बाजूच्या भागाचें क्षेत्रफळ १५,००० चौरस **फूट** आहे ; व मसाले, भाजी वगैरे विकण्याकरितां जी जागा आहे तिचें क्षेत्रफळ ३५,००० चौरस फूट आहे. भिंती सगळ्या ३० फूट उंचीच्या आहेत व तेथून वर पत्रें लाविलेलें आहेत. छपऱ्यापर्यंत एकंदर उंची ५१।। फूट आहे. एकंदरीनें ह्या मार्किटाची रचना फार विलक्षण आहे. ह्या बाजाराविषयीं **म्याक्लीन** साहेबांचें असें म्हणणें आहे :—

A very handsome building which in general appearance in the convenience and cleanliness of all its internal arrangements, is not surpassed by any market in the world.

**भावार्थ**— ह्या बाजाराची इमारत इतकी सुंदर व मनोवेधक आहे की तिचा सर्व साधारण बाह्य देखावा, तिच्यांत केलेल्या सोई, तिचा आंतील नीटनेटकेपणा आणि स्वच्छता इत्यादि गोष्टींत तिची बरोबरी करणारी दुसरी बाजाराची इमारत ह्या जगांत नाही !

१६१. मासळी बाजाराच्या शेजारी बटलर्स 'कॉफी शाप्' आहेत. तेथें हजारो साहेब लोकांचे बुटलेर ब्रेक्फास्ट (न्याहारी) आणण्याकरितां जातात. त्याच्याच शेजारीं पोल्ट्री मार्किट (बदकें वगैरे विकण्याचा बाजार) आहे. तेथें कोंबडी बदकें वगैरे शेंकडों प्राणी नित्यशः विकले जातात.

१६२. हें मार्किट बांधण्याला एकंदर खर्च ११,१८,५०० रुपये झाला आहे. **मुंबई** शहरांतील सरासरीनें १/३ लोक ह्या मार्किटांत जातात. एकंदर सर्व मार्किटांचा खर्च म्युनिसिपालिटीस ८०,००० रुपये होतो व उत्पन्न २,१२,००० रुपये होतें.

१६३. **नळ बाजार** हा बाजार डंकन रोडच्या बाजूला आहे. तेथेंही थोडी बहुत **क्राफर्ड** मार्किटाप्रमाणें व्यवस्था असून ह्याच्या शेजारींच मासळी बाजार बांधला आहे. ह्या मार्किटास एकंदर खर्च १,३७,००० झाला असून ३८,००० रुपये वर्षाचें उत्पन्न होतें. ह्या बाजाराचें काम सर्व लोखंडी आहे. सकाळ संध्याकाळ ह्या बाजारांत इतकी गर्दी होते कीं, हा

बाजार **मुंबई** शहरातील अर्ध्या लोकवस्तीला भाजीपाला व इतर फळफळावळ पुरवितो असें ह्मणण्यास हरकत नाही. पण बहुधा ह्या बाजारांत जाणारे लोक साधारण वर्गातील असतात. ह्याच बाजाराच्या शेजारी परंतु जरा लांब चोरबाजार आहे, तेथें जुनेपाने नाना तऱ्हेचे पदार्थ विकण्यास असतात व त्यांत कपड्यांची संख्या फार असते. असाच दुसरा चोरबाजार लोहारचाळीत आहे. तेथें जुनेपाने कपडे शिवाय फाटके तुटके जोडे सुद्धां विकतात. नळ बाजाराशेजारीच भिकार बाजार आहे, तेथें भिकारी लोक संध्याकाळी सगळा दिवस भिक्षा मागून दाणादुणा मिळेल तो विकतात.

१६४. **भुलेश्वर बाजार.**— हा बाजार **भुलेश्वरा**च्या देवळानजीक व जुन्या **मुंबादेवी** पोलीस चौकीच्या समोर आहे. ह्यांत फक्त भाजीपालाच मिळतों. इतर मार्केटांप्रमाणे ह्यांत मासळी विकीत नाहीत. ह्या बाजारांत बहुतकरून वाणी, भाटे, ब्राह्मण, श्रावक वैगरे निवृत्तमांस लोकांची गर्दी दृष्टीस पडते. येथे मालही चांगला मिळतो. येथें मच्छी बाजार नाहीं ही व्यवस्था फार उत्तम आहे.

१६५. **आदमजी पीरभाई मार्किट.**–हें मार्किट सदरील नांवाच्या एका सधन बोहरी गृहस्थानें बांधिलें आहे. ह्या मार्किटाच्या जागेवर पूर्वी ट्रिनिटी च्यापेल होतें. हें मार्किट इ. स. १८८७ च्या नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस उघडलें. **धोबीतळ्यावर** व आजूबाजूस राहणाऱ्या लोकांस जी पूर्वी गैरसोई होती ती दूर व्हावी ह्या उद्देशानें हें मार्किट बांधण्यांत आलें आहे. येथें बहुधः **क्राफर्ड** मार्किटाप्रमाणें व्यवस्था केली आहे. येथें मालही उत्तम प्रकारचा विकण्यास ठेविला जातो. हें मार्किट **मरीनलाईन्स** स्टेशनानजीक असल्यामुळें **कुलाब्या**पासून तों **वांदऱ्या**पर्यंत व **वाळकेश्वर, चौपाटी** इत्यादि रेल्वेच्या आजूबाजूच्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांस हें फार सोईवार होईल. हा बाजार सकाळी ५ पासून रात्रौ ९ वाजेपर्यंत उघडा असतो. प्रत्येक दिवशी लागणाऱ्या सर्व जिनसांची दुकानें ह्या मार्किटांत बसविली आहेत.

१६६. **पेडर मार्किट.**–हें मार्किट **माझगांव** येथें आहे. तेथील लोकांनी म्युनिसिपालिटीस अर्ज केल्यावरून हें मार्किट बांधण्यांत आले. ह्याचें काम साधेंच आहे. त्याच्या मोठ्या दरवाज्याजवळ जो बाजार आहे तेथें फळफळावळ व भाजीपाला विकतात व त्याच्या दुसऱ्या बाजूला मच्छीबाजार आहे. हें मार्किट एकदंर बांधण्याचा खर्च ३७,००० रुपये झाला आहे. हें मार्किट

बांधलें त्या वेळीं **मुंबईचे** म्युनिसिपलकमिशनर मि. **पेडर** साहेब हे होते. व त्यांच्या कारकीर्दींत हें बांधलें गेलें म्हणून त्यांचेंच नांव ह्या बाजारास देण्यांत आलें. कारण त्यांच्या खटपटीमुळें हें मार्किट तयार झालें.

१६७. **भायखळ्या**वर जो दररोज पहांटेस बाजार भरतो, त्या वेळीं तेथें **शीव, कुरलें, माटुंगें, माजगांव, वांदरें, परळ, वरळी, माहिम** वगैरे ठिकाणांहून माळी लोक अनेक जातीचा भाजीपाला, फळफळावळ वगैरे जिन्नस घेऊन येतात. हा बाजार पहाटें सुमारें चार वाजल्यापासून सहा वाजत तोंपर्यंत असतों. तेथें ह्या शहरांतील भाजी विकणारे लोक जाऊन माल खरेदी करून तो गावांत आणून विकतात.

१६८. वर दिलेल्या मुख्य व प्रसिद्ध बाजारांशिवाय **मुंबईंत** आणखी दुसरे बाजार आहेत ते येणेंप्रमाणे :–

**चिऱ्याचा** बाजार (धोबीतलाव बाजार), **मांडवी** बाजार, **मारवाडी** बाजार, **बांगडी** बाजार, **चोर** बाजार, **क्याटल** मार्किट (दावण), **डोंगरी** बाजार, **इंग्रज** बाजार, **गोणपाट** बाजार, **जुना** बाजार, **खांड** बाजार, **मच्छी** बाजार, **मेमण** बाजार, **मोती** बाजार, **सट्टा** बाजार, **पारशी** बाजार, **रंग** बाजार, **शिवणी** बाजार, **शेर** बाजार, **बोरा** बाजार, **तेली** बाजार वगैरे, वगैरे बहुत बाजार आहेत. ह्या बाजारांपैकीं 'बाजार' किंवा 'मार्किट' ही संज्ञा देतां येईल असे फारच थोडे बाजार आहेत. तेथें त्या त्या नावांप्रमाणे 'नित्यशः' शेंकडो रुपयांच्या उलाढाली मात्र होतात.

१६९. **धि कॉटन ग्रीन.**—कापसाच्या व्यापाराच्या संबंधानें **मुंबईची** तुलना **न्यूआर्लियन्स** बरोबर केली असतां किंबहुना **मुंबई** तिच्या खालोखाल आहे असें ह्मटलें तरी चालेल. **न्यूआर्लियन्स** शहराप्रमाणें दुसरें शहर कापसाच्या व्यापाराच्या संबंधानें जगांत नाहीं. कोटापासून सुमारें अर्धमैलावर **कुलाब्यास** जें कापसाचें मार्किट आहे; त्यासच " कॉटन ग्रीन " असें ह्मणतात. येथें **न्यूआर्लियन्स**प्रमाणें कापसाच्या व्यापाराची घडामोड चालते. **कुलाबा** कॉजवेच्या दोन्ही बाजू मिळून सुमारें १ ! चौरसमैल जमीन ह्या **ग्रीन**नें व्यापिली आहे. प्रत्येक व्यापारी आपापल्या धंद्याच्या मानाप्रमाणें येथें जागा भाड्यानें घेतो व ह्या त्यांच्या जागेस **'जथ्था'** असें ह्मणतात. व्यापारी लोक माल देणें किंवा घेणें ह्या संबंधानें **कुलाब्यास** ज्या ठिकाणीं हल्लीं ट्रामवेचा रस्ता संपतो त्या ठिकाणीं जमतात. इकडे इंग्रज व्यापारी कापसाचा भाव ठरवून मग जथ्थ्याकडे जातो व तेथें

गेल्यावर पडलेल्या गठ्ठ्यांतून कापसाचे काही गठ्ठे पसंत करून त्यांजवर आपली निशाणी करितो. नंतर कापूस तोलून प्रेस हौस (कापूस दाबण्याच्या यंत्रालया) मध्यें पाठवितो. तेथें हे गठ्ठे सोडून त्याचे प्रत्येक गठ्ठ्यांत ३½ हंड्रवेट ह्याप्रमाणें १० घन फुटांचा एक एक गठ्ठा बांधून तयार करितात. ह्या एका गठ्ठ्यांतला कापूस सुटा करून पसरला तर १५० घनफूट; त्याचे दोकडे तर ८३ घनफूट आणि अर्ध दाबलेला गठ्ठा (हाफ् प्रेस्ड) ५० घनफूट जागा व्यापील. असे दाबलेले गठ्ठे १३ लाखांवर दरसाल येथून बाह्यप्रदेशीं जातात. पूर्वी ह्याप्रमाणें दाबलेला कापूस **मुंबई**स येत नसे. कापसाचा हंगाम दिपवाळीपासून सुरू होतो तो ज्येष्ठ अखेरपर्यंत मोठ्या सपाट्यानें चालतो. त्यांत मार्च, एप्रिल व जून ह्या तीन महिन्यांत तर हा व्यापार ज़ारीनें चालतो. कामाचा वेळ सकाळीं ८ पासून १० पर्यंत व संध्याकाळीं ३ पासून ५ पर्यंत असतो.

**१७०. क्लब्स्.—मुंबई**मध्यें साहेबलोकांस उत्तम तऱ्हेनें राहण्याचीं स्थळें ह्मटलीं ह्मणजे **बांबे** व **भायखळा** क्लब हीं होत. कारण अशा क्लबामध्यें राहणारांस बोलण्याचालण्यास, ख्यालीखुशाली करण्यास व भोजनोत्तर गप्पा मारण्यास बरीच मंडळी असते. पूर्वी **भायखळाक्लब**मध्यें फक्त खेळण्याकरितां मंडळी जमत असे; परंतु हल्लीं त्यांत बहुतेक मुलकी व लष्करी खात्यांतील अम्मलदार, व्यापारी, वकील, वगैरे बरेच लोक जाऊन राहतात. क्लबचा मेंबर होऊ इच्छिणारास ' ब्यालट ' नें घेतात. त्या वेळीं प्रवेश फी २०० आणि दरमहा सहा रुपये वर्गणी द्यावी लागते. येथें सुमारें ५० मेंबरास निजण्याकरितां खोल्या आहेत. उन्हाळ्यांत कंपौंडांत जागोजाग तंबू मारतात. कांहीं खोल्या एक महिन्याच्या मुदतीनेंच भाड्यानें देतात व कांहीं दोन वर्षांच्या मुदतीनें देतात. ह्या खोल्यांस 'चेंबर' म्हणतात. चेंबरची मागणी फार असते, कधीं कधीं तर असें होतें कीं मेंबर लोकांस एक एक दोनदोन वर्षांपर्यंत सुद्धां चेंबर मिळत नसतें. येथें राहणाऱ्या मेंबरास दरमाहा ३५० रु. पर्यंत खर्च येतो. गाडीघोड्याचा खर्च ज्याच्या त्याच्या शिरावर. बंगाल व मद्रास येथील क्लबच्या मेंबरांस ह्या क्लबमध्यें ब्यालटवांचून मेंबर करितात. तसेंच येथील क्लबच्या मेंबरास तेथें ब्यालटवांचून घेतात.

**१७१. बांबे** क्लबमध्येंही मुलकी व लष्करीखात्यांतील मेंबर असतात. ह्या क्लबमध्यें इतर गृहस्थांसही घेतलें जातें. प्रत्येक मेंबरास १०० रुपये

प्रवेश फी खेरीज करून दरमहा सहा रुपये वर्गणी द्यावी लागते. 'ऑनररी मेंबर' लोकांना प्रवेश फी पडत नाहीं. ह्यांस ब्यालटवांचून कमिटी घेऊं शकते. हा क्लब **रामपार्टरोवर ट्रिचर** कंपनीच्या शेजारच्या इमारतींत आहे. ह्यांत राहण्याची सोई उत्तम आहे. हल्लीं **चर्चगेट** स्टेशनानजीक ह्या क्लबकरितां एक सुंदर इमारत बांधण्याचा विचार घांटत आहे.

१७२. **पारशी** लोकांनीं इ. स. १८८४ च्या जुलै महिन्यांत इंग्रजी नमुन्यावर अशाच तऱ्हेचा एक नवीन क्लब काढला आहे. त्यास 'रिपन क्लब' ह्मणतात, ह्यांत २०० वर मेंबर असून ते सर्व पारशी आहेत. ह्या क्लबची प्रवेश फी १०० रुपये व दरमहाची वर्गणी ५ रुपये आहे. हा क्लब **हॉर्नबीरोडवर** समुद्राच्या तोंडाशीं आहे. ही इमारत फार सुंदर आहे. ह्यांत सर्व **हिंदुस्थानांतील** व **लंडन** येथील वर्तमानपत्रें मेंबर लोकांच्या उपयांगाकरितां घेतात. एका खोलींमध्यें दोन 'बिलियर्ड ' टेबलें असतात. हल्लींची इमारत भाड्यानें घेतली आहे; परंतु, उत्पादकांच्या मनांत क्लबकरितां स्वतःची इमारत बांधावी असें आहे. मेंबरलोकांस ब्यालटनें घेतात. ह्या क्लबचे अध्यक्ष **सर जमशेटजी जीजीभाई**, ब्यारोनेट, हे आहेत.

१७३. **हॉटेलें, खाणावळी, भटारखाने, भोजनगृहें वगैरे**.- आज मितीला मुंबईंत हॉटेलांची संख्या फार आहे. त्यांत **एस्प्लेनेड** हॉटेल, **पालनजीचें** हॉटेल (ऑडेलफी हॉटेल **भायखळ्यावर** व व्हिक्टोरिया हॉटेल मैदानांत) व **ग्रेट वेस्टर्न** हॉटेल हीं हॉटेलें उत्तमांपैकीं गणलीं आहेत. ग्रेट वेस्टर्न हॉटेल हें अलीकडेसच उघडलें असून त्यांत उत्तम हवाशीर अशा खोल्या आहेत. ह्या हॉटेलांशिवाय मिसेस **टेलरचें** व **वेव्हर्ली हॉटेल** हीं **रामपार्टरो** रस्त्यावर आहेत. **ह्यामिल्टन** हॉटेल **भायखळ्यावर** आहे. **फ्यामिली** हॉटेल **कंबाला** हिल्वर आहे. ह्यांत पहिल्या नंबराला सहा रुपये फी पडते. ह्या हॉटेलांत एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्याजोगी ही आहे कीं त्यांत जाणारास दारू मिळत नाहीं ! माषुक व तरुण जोडप्यांकरितां **अपॉलो** बंदरावर रिफ्रेशमेंट रूम्स आहेत; तेथें चहा, कॉफी व फराळाचे पदार्थ मिळतात. तशीच **रामपार्टरोवर टेंपलबार** नांवाची एक प्रख्यात रिफ्रेशमेंट रूम आहे.

१७४. अशा हॉटेलमध्यें एका मनुष्यास दरमहा काय खर्च बसतो, त्यांचे अनुमान खालीं दिलें आहे :—

| जागा. | दररोज एक मनुष्यास एक खोली. | दररोज दोन मनुष्यांस एक खोली. | दरमहा एक मनुष्यांस एक खोली. | दरमहा दोन मनुष्याँस एक खोली |
|---|---|---|---|---|
| | रुपये. | रुपये. | रुपये. | रुपये. |
| अगदीं वरचा मजला. | ४ | ८ | ११० | २२० |
| तिसरा. | ५ | ९ | १४० | २६० |
| दुसरा. | ६ | १० | १७० | २९० |
| पहिला. | ७ | १२ | २०० | ३५० |

**१७५.** हे दर **एस्प्लेनेड** हॉटेलचे आहेत. इतक्या पैशांत निजण्यास खोली, जेवणखाण, तैनातीस एक मनुष्य, स्नानास उदक, बर्फ, आईसक्रीम, दिवाबत्ती वगैरेची उत्तम सोई असते. राहणारास कांहींएक पहावें लागत नाहीं. एकदां पैसा फेकून दिला कीं सर्व तयारी. तीन वर्षांच्या आंतील मुलास दररोज एक रुपया; तीनापासून बारा वर्षांच्या आंतील मुलास ज्या मजल्यावर तें राहत असेल त्याच्या निम्मे दर आणि बारावर्षांवर पुरुषाप्रमाणें दराची आकारणी होते. प्रत्येक हॉटेलामध्यें दरांत थोडा बहुत फरक असतो.

**१७६.** या शहरांत परमुलूखातून नित्यशः आगबोटी येतात, त्यांवरील खलाशी वगैरे बहुतेक इंग्रजच असतात. हे लोक जात्या अशिक्षित व उद्धट असल्याकारणानें शहरांत आले म्हणजे फार दंगाधोपा करीत असत; कधीं कधीं बायकांवरही चाल करीत; पण, ते गौरकाय असल्यामुळें पोलिसचे नेटिव शिपाई त्यांस धरण्यास धजत नसत. ह्यामुळें लोकांस त्यांची फारच भीति वाटे. हे लोक एकदांका शहरांत आले ह्मणजे काय अनर्थ करितील आणि काय नाहीं ह्याचा मुळींच नेम नसे. अशा ह्या लोकांपासून शहरांतील रचनेस कमी त्रास व्हावा म्हणून येथील पुष्कळ इंग्रज व्यापारी मिळून व सरकारची मदत घेऊन त्यांनी **कांपा**वरील मारुतीच्या देवळानजीक सुमारें एक लक्ष रुपये खर्चून 'सेलर्स होम' ह्मणून एक मोठी इमारत बांधिली आहे. तेथें ह्या लोकांस उत्तम बंदोबस्तांत ठेवून धिंगामस्ती

वगैरे कांही करूं देत नाहीत. पूर्वी ह्या लोकांकरितां **डंकन**रोडवर एक जागा दिली होती. **धोबीतळें, काळबादेवी, कोलभाट, भेंडीबाजार, हनुमान**गल्ली वगैरे ठिकाणीं ह्या लोकांच्या काहीं खाणावळी होत्या. हल्लीं **सेलर्स होम** व **सीमेन्सरेस्ट**सारखीं गृहें तयार झालीं आहेत ह्मणून, ह्या लोकांपासून पोंहचावा तितका त्रास शहरवासी जनांस पोंहचत नाहीं.

१७७. मुसलमान लोकांचे भटारखाने **भेंडीबाजार, डोंगरी, मार्किट** वगैरे ठिकाणीं आहेत. ह्या लोकांच्या भटारखान्यांत सर्व प्रकारचें अन्न मिळतें. मुसलमान लोकांत फकीर, कंगाल स्थितींतील लोक, आरब, मोंगल, मुशाफर वगैरे कनिष्ठ स्थितींतील लोक बहुधः अशा भटारखान्यांतल्या जेवणावरच दिवस लोटतात. साधारण उत्तम, व मध्यम प्रतीच्या लोकांखेरीज घरी स्वयंपाक करण्याची बहुधः कोणी खटपट करीत नाहींत. फकीर वगैरे लोक भिक्षावृत्ति करून मशिदींत जाऊन पडतात.

१७८. येथपर्यंत मुंबईतील विधर्मी लोकांच्या खाण्यापिण्याच्या सोईच्या संबंधानें थोडीशी माहिती दिली. आतां आपल्या लोकांकरितां ह्यासंबंधीं काय काय सोई आहेत त्यांचा विचार करूं. आज जर परकीय गांवाहून ह्मणजे ज्या गृहस्थास **मुंबई**ची कांहीच माहिती नाहीं असा गृहस्थ येथें आला तर, त्यास अचानक इंग्रज लोकांच्या हॉटेलांप्रमाणें अमुकच ठिकाणीं खाणावळ आहे आणि तेथें जाऊन तों आपली तहान भूक भागवील असें एकही स्थळ मिळणें नाहीं—नाहीं ह्मणायला **उमरखाडी**वर भोजन व वसतिगृह नामक एक खाणावळ कांहीं दिवसांपूर्वी रा. **नारायण हरी** या नांवाच्या गृहस्थानें स्थापिली आहे. तेथेंही ब्राह्मणाकरितां काय सोई केल्या आहेत हें आह्मांस निश्चयानें सांगवत नाही—मग त्या परकीय गृहस्थास रस्त्यानें जातां जातां जो कोणी भेटेल त्यास येथें कोठें खाणावळ आहे कायहो? ह्मणून विचारण्याचा प्रसंग येतो. एकाद्यास बरोबर माहिती असली तर तो अमुक अमुक ठिकाणीं एक खाणावळ आहे ह्मणून सांगतो. सदहू खाणावळीचें ठिकाण हुडकून काढतां काढतां तो गृहस्थ—आधींच प्रवासानें अगदीं थकला भागलेला—बेजार होऊन जातो. शेवटीं त्या ठिकाणाचा शोध लावल्यावर तेथें खानावळ नाहीं म्हणून त्यास समजतांच त्याच्या मनाची स्थिति काय होत असेल तिचें वर्णन करणें आमच्या लेखणीच्या

शक्तीपलीकडे आहे. ज्यांच्याज्यांच्यावर म्हणून असा प्रसंग आला असेल त्यांसच अशा प्रसंगीं त्यांच्या मनाची स्थिति कशी होते हें बरें सांगता येईल; व असे प्रसंग **मुंबईं**त वारंवार घडून येतात. शेवटीं असे धक्के खाऊन त्यास एकाद्या चाळींत एकादी खाणावळ सांपडते. तेथें तो जाऊन आपलें बिऱ्हाड लावितो. नंतर जेवणाची तयारी असल्यास हातपाय धुवून जेवावयास जातो तोंच तेथील सोंवळ्या ओंवळ्याचा प्रकार त्याच्या दृष्टीस पडतो. जेवावयास जाणारा खाणावळीण बाईच्या जातीचा असल्यास ठीकच, पण जर कां तो परक्या जातीचा असला तर, त्याच्या तांब्याची, ताटाची, व सोवळ्याची जी कांही गम्मत उडते व बाई व तिच्या हाताखालील बाईची त्याच्या पानाबद्दल आपआपसात कुजबूज सुरू होतें तिचे यथार्थ वर्णन करणें अशक्य होय. प्रत्यक्ष तेथें जाऊन तसला प्रसंग अनुभविल्यावांचून वाचकांची नीट खातरी होणार नाहीं. एवढेंही होऊन एकदां जेवणास पान मांडलें ह्मणजे त्यावर चटणी, एकादी पातळ भाजी, भात, अर्धी पळी वरण व इवलेंसें तूप वाढून झालें कीं आटपलें, कढी तर अपूर्व तऱ्हेची, पांढरी दिसते व किंचित् आंबट लागते ह्मणूनच ताक आहे असें खाणारास वाटतें. त्या जलरूप ताकाची चव आम्हीं येथें काय सांगावी? किंबहुना साधारण चांगलें सुग्रास अन्न खाणारास तर घांस तोंडांत गेल्याबरोबर ओकारीच यावयाची ! फार काय सांगावे? जेवणारा जर नेहमी असेंच कनिष्ठ प्रतींचे जेवण जेवित असला तर ठीकच; पण तद्विरुद्ध असेल तर, त्यास असें होऊन जातें की, आपण एक वेळ उपाशीं राहून नुसते दाळचुरमुरे फांकले असते तरी पुरवतें, पण हें जेवण नको !

**१७९.** या मासल्याच्या आमच्या लोकांच्या खाणावळी व तेथील भोजन प्रकार असल्याकरणानें कोणीही संभावित गृहस्थ तेथे जाणें प्रशस्त मानीत नाहीं. घरी नुसता भात खाणें पुरवतें, पण खाणावळींतील पंचपक्वानीं जेवण नको असें ह्मणणारे व बहुतांशी या त्रासामुळेंच अडाप्रसंगाला स्वतः हातानें देखील घरीं स्वयंपाक करून जेवणारे बहुत लोक आहेत. तरी कित्येक बिचारे न चालत्याला अशा खाणावळींत जाऊन कसे तरी आपले दिवस काढितात. पण स्वसंतोषानें तेथे जाऊन जेवणारे असे फारच थोडे, आतां, सर्वच खाणावळींत अशा प्रकारची व्यवस्था असेल असें

ह्मणण्याचें साहस आमच्यानें एकाएकीं करवत नाहीं. तरी असा प्रकार **मुंबई**तील बहुत खाणावळींत असतो ह्यातं कांहीं संशय नाहीं. खाणावळ ह्मटली ह्मणजे तींत एकादि विधवा बाई तर अवश्य असावयाचीच ! तेव्हां जेवणारास बहुतांशीं सर्व गोष्टी बाईच्या कलावर घेतल्या पाहिजेत.

१८०. प्रत्येक जेवणास दररोज दोन आण्यांपासून तों आठ आणेपर्यंत द्यावे लागतात. जेवणाचे तीन प्रकार असतात. उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ, ज्यास्त पैसे देणारास आंघोळीस ऊन्ह पाणी, धोत्र धुण्यास गडी, जेवावयास तूपभात, गव्हांची चपाती, आणि एकाद दुसरी भाजी एवढी सामुग्री असते. मध्यम प्रतीच्या जेवणास वरण भात, एक कसली तरी भाजी , तूप व गव्हांची चपाती. कनिष्ठ प्रतीचें जेवण कसें असतें त्याचें वर्णन वर एकदां येऊन गेलेंच आहे.

१८१. **मुंबईत** वाणी, भाटे वगैरे गुजराथी लोकांत जो जेवणाचा थाट उडतो तो मोठा विलक्षण असतो. हे लोक लग्न अथवा दुसरें कांहीं हव्य कव्यादि कार्य झालें तर मोठमोठाल्या जेवणावळी घालतात. ह्या जेवणावळी घालण्यासाठीं ह्या लोकांच्या नेमलेल्या महाजनवाड्या असतात, ह्या महाजनवाड्या कित्येक श्रीमंत वाणी, भाटे वगैरे लोकांनीं आपल्या जातीच्या उपयोगाकरितां बांधलेल्या असतात व प्रत्येक महाजनवाडीस स्वयंपाकाचें सर्व साहित्य व बसावयाचे पाट, भांडी वगैरे त्या लोकांचे महाजनांकडून दिलेलीं असतात. स्वयंपाकाचीं भांडी इतकीं मोठीं असतात कीं त्यांत फक्त भाजीच केली तर निदान पांचशें मनुष्यांची बेगमी होईल. ह्या लोकांत कोणास व्यापारांत नफा झाला अगर पितृतिथि आली तर, **'चौऱ्याशी'** ह्मणून चौऱ्याशी जातींचे ब्राह्मणांस भोजनें घालण्याची चाल आहे. ह्या वेळीं ते लोक ब्राह्मणांस यथाशक्ति दक्षणा व तांब्या पितळेचीं भांडीं वाटतात. ह्या चौऱ्याशींत गुर्जर ब्राह्मण व दाक्षिणात्यांपैकीं फक्त इकडील स्थायिक यजुर्वेदी ब्राह्मण असतात.

१८२. ह्या लोकांत सोंवळ्या ओंवळ्याच्या संबंधानें फारसा प्रतिबंध नसतो. हे लोक सोंवळे नेसून गळ्याभोंवतीं रेशमी रुमाल लटकावून व हातांत एक पेला घेऊन पाहिजे त्यास रस्त्यानें बिनदिकत धक्या देत जातांना दृष्टीस पडतात! ज्या दिवशीं ही जेवणावळ असेल त्या दिवशीं भुलेश्वराचे रस्त्यानें ह्या लोकांच्या बायकापुरुषांची एवढी गर्दी होते कीं,

त्या वेळीं तेथून जाणारास बराच वेळपर्यंत मार्ग मिळत नसतो; पण त्यास कामाची फारच घाई असली तर, तो तसाच त्या गर्दीतून धक्या बुक्या देत कसातरी एकदां निसटून बाहेर पडतो. ह्या लोकांत बायकांनीं प्रथम जेवून मग पुरुषांनीं जेवावें अशी विलक्षण चाल आहे. ह्या जेवणाच्या वेळीं वाढण्याची व जेवणारांची एकच ओरड ऐकू येते. हे लोक अनेक प्रकारचीं पक्वान्नें करतात. त्यांत तुपाचा मारा फार असतो, गुर्जर लोक भाजी फार थोडी खातात, व त्यांस उच्छिष्टाचा फारसा प्रतिबंध नसतो. गुर्जर लोकांचीं पक्वान्नें करण्याच्या कामी मोठी ख्याति आहे. ह्यांची जेवणाची तऱ्हा मोठी विलक्षण आहे. पात्रें वाढण्यास सुरुवात होण्याची खोटी कीं, जो पदार्थ येईल तो झालाच गट्ट! सर्व वाढप होईपर्यंत धीर धरतो कोण? आमच्या दक्षणी लोकांत असें कदापि होत नाहीं.

१८३. **सण, वार, वगैरे.**—ह्या शहरांत कांहींना कांहींतरी नित्यशः आनंदोत्सव होतच असतात. शून्य असा दिवस बहुधः जात नाहीं. कोणाकडे कांहीं कारणानिमित्त, व कोणाकडे कांहीं कारणानिमित्त चौघडा झडत असावयाचाच! तसेंच **मुंबईं**त शेंकडो जाती असल्यामुळें आठ पंधरा दिवसांनीं एक तरी सण आहेच. आज कोठें **पारशां**चे सण; आज कोठें **इंग्रज** लोकांचे सण; आज कोठें **मुसलमानांचे** सण; आज कोठें **हिंदूंचे** सण; आज कोठें परव; आज कोठें गवार; आज कोठें पजुसण; आज कोठें वलांडन; आज कोठें शिराळशेट; आज कोठें तेवार; आज कोठें आजे पाडवा; आज कोठें गवाळी अग्यारस, आज कोठें ढोसले; आज कोठें मुका पाडवा; आज कोठें इंत्रूज; आज कोठें पोळा, आज कोठें कोजागरी; आज कोठें गोकुळाष्टमी; आज कोठें रथसप्तमी; आज कोठें शिमगा; आज कोठे नाताळ; आज कोठें ईस्टर हॉलिडे; आज कोठें असेन्शन डे; आज कोठें रामनवमी; आज कोठें शितळासप्तमी; आज कोठे रांधणसट; आज कोठें नवरोज; आज कोठें अनन्तचतुर्दशी, आज कोठें गौरी; आज कोठें गणपती असे अनेक लोकांचे अनेक सण **मुंबईं**त हरहम्मेश पाहण्यांत येतात.

१८४. प्रत्येक धर्माचे लोक आपापल्या सणाच्या दिवशीं आपापल्या जिवाच्या कर्मणुकीकरितां शक्यनुसार नानाप्रकारचे खेळ खेळून आपापला वेळ आनंदात घालवितात. साहेब लोकांचे सण मुख्य कायते दोनच

आहेत. एक **नाताळ** आणि दुसरा **गुडफ्रायडे.** **मुसलमान** लोकांत **मोहरम**सारखा दुसरा मोठा सण नाहीं. त्यांच्यात दुसरेही सण आहेत, तरी **मोहरम** हा त्या सर्वांत मोठा. **पारशी** लोकांचा मुख्य सण **पपेटी** हा होय. नाताळ सरला की साहेब लोकांचे नवें वर्ष लागतें. तसेंच मोहरम हा मुसलमानांचा सण त्यांच्या वर्षप्रतिपदेपासून सुरू होतो. आमच्या लोकांच्या मुख्य मुख्य सणांच्या प्रसंगीं **मुंबई**स कसा थाट उडतो त्यांचे दिग्दर्शन खालीं थोडक्यांत केलें आहे.

**१८५.** आमच्या लोकांत सणवार असला ह्मणजे उंची पोषाख करून व अंगावर मोलवान दागिने घालून आपला आनंद प्रदर्शित करण्याची चाल आहे. प्रथम **वर्षप्रतिपदा** येते. ह्या दिवशीं घरोघर बली काढून गुढ्या तोरणें हारोहारींने उभारतात. पुढे चैत्र शद्ध ९ मीस **रामनवमी** येते. ह्या सणाचा आरंभ चैत्रशुद्ध प्रतिपदेपासून होतो तो नवमीपर्यंत एकसारखा चालतो. ह्या नऊ दिवसांत रामाचे देवळांत कीर्तने, कथा, पुराणें, भजनें, गाणीं वगैरेचा थाट एकसारखा चालतो. दहाव्या दिवशीं पालखी निघते. नववे दिवशीं सर्व राम मंदिरांत दहा वाजल्यापासून एकसारखी भक्तजनांची गर्दी होऊं लागते. ठाकुरद्वार, रामवाडी वगैरे प्रसिद्ध देवळांतून तर रामदर्शनार्थ इतकी गर्दी होते कीं, मनुष्यास इकडचे तिकडे फिरण्यास सुद्धां जागा मिळणें मुश्कील पडतें. दहा वाजल्यापासून दुपारीं एक दीड वाजेंपर्यंत रस्त्यांत पाहिलें तर तो उंच उंच पोषाक केलेल्या स्त्रीपुरुषांनी अगदीं कसा गजबजून गेलेला दिसतो. असा थाटाचा उत्सव इतर ठिकाणी क्वचित् होत असेल! पालखीच्या बरोबर हजारो लोकांची गर्दी असून भजनी लोक असतात. या प्रसंगीं लोक नाना तऱ्हेची देवादिकांची सोंगें घेतात. पुढें **वटसावित्री** व गैरे स्त्रियांचे सण येतात; त्या वेळीं त्या आपल्या आंगावर उत्तम प्रकारचे दागिने घालून व उंची वस्त्रें लेऊन पूजेकरितां जेथें जेथें वटवृक्षांचे पार असतात तेथें तेथें जातात; किंवा कोणी घरीं पूजा करितात. अशा प्रसंगीं भटांची तारांबळ जी उडते ती पुसूंच नका! **नागपंचमी**च्या दिवशीं नाग घेऊन फिरणारे लोक दारोद्वार हिंडतात. **नारळी** पौर्णिमेच्या दिवशी श्रावणी घेणारे लोक मोठ्या सपाट्यानें हातांत पूजेचें साहित्य घेऊन एकाद्या प्रसिद्ध ठिकाणीं जातांना

दृष्टीस पडतात. त्यांत **तैलंगी** ब्राह्मणांची जानवीं विकण्याची बरीच धांदल उडते. संध्याकाळीं **ब्याकबे** वगैरे समुद्रकिनारीं अनेक जातींचे हजारो लोक जातात. समुद्रदर्शन घेऊन त्यास नारळ[1] सुपारी अर्पण करितात. त्या वेळीं समुद्रावर जी गर्दी होते व जी मजा दृष्टीस पडते ती अवर्णनीय होय. गणपतीच्या सणांत श्रीमंतलोक आपापल्या घरीं उत्तम उत्तम गणपती मांडून मोठी रोषनाई करितात. **मुंबईंत गणपतीचें** काम फार नामी करतात, भजनें, आरत्या हरिकिर्तनें, वेश्यांची गाणीं ह्यांची तर घरोघरी गर्दी उडून जाते! आरत्या चालतात त्या वेळीं आणि मंत्रपुष्पांजळीचे वेळीं जो दीर्घस्वर होतो व जी ओरड होते ती जर सर्व मुंबईंतील एकसमयावच्छेदेंकरून होईल तर, ती ओरड व तो नाद ब्रह्मांडी सुद्धां ऐकूं जाईल असें ह्मटल्यास वावगें होणार नाहीं ! असा आरत्यांचा थाट एकसारखा १०-१२ दिवस चालतो. ह्याच सणांत **गौरी**चा सण येतो. त्या वेळीं **बाणकोटी** लोकांची नाचण्याची, गाणी ह्मणण्याची आणि पोरांस बायकांचीं

---

१. **मिस मेरिया ग्रेहाम** हिनें आपल्या जर्नल ऑफ् ए रेसिडन्स इन् इंडिया नामक पुस्तकांत असें लिहिलें आहे:—

"At sunset, one of the chief Brahmins advanced towards the sea, and going out a little way upon a ledge of rock, he launched a guilt cocoa-nut in token that the sea now become nevigable; immediately thousands of cocoa-nuts were seen swimming in the bay; for every priest and every master of a family was eager to make his offering."

**भावार्थ** :—सूर्यास्तावरोबर (**मुंबईतील**) एका मुख्य ब्राह्मणानें समुद्रांत बरेंच पुढे जाऊन एका खडकावर उभें राहून समुद्र आजपासून सफर करण्यास योग्य झाला तन्निमित्त त्यांत एक सुवर्णाच्छादित नारळ फेंकला. नंतर हजारो नारळ समुद्रांत पडतांना दिसले; कारण प्रत्येक उपाध्याय व प्रत्येक गृहपति आपापले नारळ टाकण्यास अगदीं उत्सुक होते.

ह्या गोष्टीवरून एवढें अनुमान करता येईल कीं पूर्वी (इ.स. १८११-१२; कारण ह्या मडमेचा ह्याच सुमाराचा लेख आहे.) येथें **मुंबईत** ह्या दिवशीं समुद्रांत नारळ टाकणें तो प्रथम येथील मूळ ग्रामोपाध्याय किंवा ग्राम जोशी यानेंच टाकला पाहिजे होता. ह्यावरून त्या काळीं येथील ग्रामोपाध्ये व ग्राम जोशी **मुंबईतील** स्थायिक वृत्यंशी ब्राह्मणच होते हें येथे सांगितलें पाहिजें असें नाहीं.

सोंगें देऊन त्यांच्या सभोंवतीं मिळून आपापल्या धन्याकडे 'पोस्ता' करतां जाऊन नाचण्याची बरीच गंमत पाहण्यांत येते. एकदा श्रावण महिन्यास आरंभ झाला कीं ह्या लोकांचा रात्रीं दहा वाजल्यानंतर एकाद्या ठिकाणीं ५-२५ एकत्र जमून ढोल कुटीत मध्यरात्रपर्यंत 'ऐलेनमन पैलेनमन गनेसादेवा' वगैरे गाणीं ह्मणण्याचा सपाटा चालतो, तो एकदां गौरी थंड झाल्या कीं पुरा होतो ! **गणपती** जातेवेळीं श्रीमंत लोकांची तासे, चौघडे, बेंडबाजे वगैरे वाद्यें लावून समुद्राकडे जाण्याची एकच गर्दी उडते. गणपती बसल्यापासून कोणाचे दुसरे दिवशीं, कोणाचे ५ वे दिवशीं, कोणाचे ७ वे दिवशीं व कोणाचे दहावेदिवशीं जातात. कित्येकांचे तर महिना महिना सुद्धां राहतात ! **मुंबईंत गणेशचतुर्थी**च्या आदल्या दिवसापासून गणपती करणारांचे दुकानीं बरीच गर्दी दृष्टीस पडते. त्यांत **गुलालवाडी**सारख्या **गणपती** विकण्याच्या प्रसिद्ध ठिकाणीं तर इकडून तिकडे फरकण्यास सुद्धां वाव नसतो ! गणपती आणतांना कोणी डोईवर, कोणी हातांत कोणी पालखींत बसवून आणितात. तासे, बेंडबाजे वगैरे वाद्यांचा कडकडाट तर सर्व शहर दुमदुमून टाकितो. **मुंबईं**त बहुधः **गणपती** जातात त्या दिवशीं एका आळींतील किंवा वाडींतील दहापांच जणांचे गणपती एका वेळीं मिळून काढितात. त्या वेळीं तो बेंडबाजांचा, ताशांचा व चौघड्यांचा कडकडाट, ते सुशोभित **गणपती**, ते गाडी घोडे, ते मल्ल, ते लेजीमवाले, त्या पालख्या व त्या प्रेक्षकजनाच्या झुंडीच्या झुंडी वगैरे थाट पाहून **मुंबईं**तील लोकांच्या डामडौलाची धन्यता वाटल्यावांचून राहणें नाहीं. एकंदरीत असा थाट इतरत्र क्वचित होत असेल ! **गणेशचतुर्थी**च्या दिवशी चंद्रदर्शन वर्ज्य आहे हें सुप्रसिद्ध आहे, ह्या गोष्टीचा फायदा घेऊन चंद्रदर्शनाचा आळ आपणांवरून दूर व्हावा ह्मणून कित्येक बदमाष लोक कांहीं वर्षांपूर्वी लोकांच्या घरावर दगड मारीत व रस्त्यानें जाणारां येणारांस लुटीत. म्हणून **पारशी** वगैरे लोक ह्या सणास थट्टेनें 'ढगळाचोथ' ह्मणत. हे बंड सरकारनें बंदोबस्त करून मुळींच बंद करून टाकलें. नंतर पुढें **पितृपक्ष** येतो. पितृपक्षांत श्राद्धांची दक्षिणा घेतां घेतां व जेवणे खातां खातां भटांची बरीच पोळी पिकते! ह्या १५ दिवसांत दूध, बर्फी, बासुंदी, क्वचित् श्रीखंड वगैरे जिन्नस बरेच महाग होतात. पितृपक्ष जात नाहीं

तोंच नवरात्र येऊन ठेपतात, ह्या नऊ दिवसांत देवीचे घटांचा थाट बराच उडतो. आश्विन शुद्ध ८ चे दिवशीं प्रत्येक देवीच्या देवळासमोर मोठा होम होतो. ह्या दिवसांत **मुंबादेवी, महालक्ष्मी** वगैरे ठिकाणीं नऊ दिवसपर्यंत जत्रा भरते. ह्या दोन्ही देवळांत मुख्यत्वें शुक्रवार व मंगळवार ह्या दिवशीं देव्युपासकांची मनस्वी गर्दी होते.

**१८६.** ह्या दिवसांत वाणी व इतर **गुजराथी** लोकांच्या स्त्रिया 'गर्भे' कुटीत असतात. एकाद्या श्रीमंत गृहस्थास आपल्या घरी गर्भा कुटविण्याची इच्छा झाल्यास, तो आपल्या स्नेह्यांकडे आमंत्रण करितो. मग निमंत्रित स्त्रिया सुमारें रात्रीस आठ नऊ वाजतां त्याच्या येथें जमतात. त्या जमल्यावर उभ्या राहून टाळ्या पिटीत व तोंडानें गर्भा ह्मणत वर्तुळाकार फिरतात. ह्यांत बहुधः नवयुवतीच असतात. मग अशा नवयुवती वस्त्रालंकारादिकेंकरून युक्त होत्सात्या आनंदाच्या भरांत नृत्यगीतादिकेंकरून कोणास मोह उत्पन्न करणार नाहीत? हा त्यांचा थाट सुमारें अकरा वाजेपर्यंत चालतो. मग यजमान आपल्या सामर्थ्यानुरूप प्रत्येक बाईस पातळ, लुगडें, तांबे, पाट, पराती, साड्या ह्यांपैकीं जें त्यास अनुकूल असेल तें देतो.

**१८७.** वरील लोकांच्या बायकांप्रमाणेंच खारवी, कोळी, गुजराथी घोडेवाले वगैरे नीच जातीच्या बायकाही गर्भे कुटीत असतात. ह्यांचा गर्भे कुटण्याचा प्रकार वाणी लोकांच्या बायकांपेक्षा कांहींसा भिन्न असतो. तो असाः—एका टोपलींत मातीचा 'करा' ठेवितात; वर नारळ ठेवून फुलें घालतात, व आंत दिवा लावितात. मग पांच पंचवीस बायका एकत्र जमून **वाणी** किंवा **पारशी** लोकांचे घरोघर तो करा घेऊन फिरतात. टोपली सभोंवती टाळ्या पिटून वर्तुळाकार नाचतात व मुखानें गाणीं ह्मणतात. हा उत्साह सुमारें पंधरा दिवसपर्यंत चालतो. ह्या लोकांच्या बायकांस गर्भा कुटून झाल्यावर ज्यांजकडे गर्भा कुटण्याकरतां त्या गेल्या असतील त्या घरचा मालक अधेली, पावली, चवली असा कांहीं तरी 'पोस्त' देतो. **दसऱ्याच्या** दिवशी सर्व नागरिकजन सोनें, रुपें घेण्यास जातात. ह्यास सीमोल्लंघन ह्मणतात. शमीची पूजा करून देवदर्शन घेऊन आपापल्या मित्रांकडेस सोनें, रुपें देऊन लोक आपापल्या घरी जातात. **आर्यमित्रमेळा** ह्मणून एक मंडळी अलीकडे ५/७ वर्षांपासून

निघाली आहे. ते सर्व **माधवबागें**त एकत्र मिळून सीमोल्लंघनाकरितां वाजत गाजत निघतात. हेतू फार स्तुत्य आहे. हा दिवस कोणत्याही कार्यारंभाला उत्तम धरला जातो. **दिपवाळी**[१] हा सर्वांत मोठा सण. आश्विन वद्य १४ शीच्या दिवशीं मंगलस्नान करून आंगावर वस्त्रालंकार चढवून अंगास उत्तम सुगंधी तेलें लावून फराळ वगैरे आटपून प्रत्येक जण कर्मणूकीकरितां कांहींना कांहीं तरी खेळ खेळत असतो. कोणी सोंगट्या, कोणी गंजिफा, कोणी पत्ते, कोणी बुद्धिबळें, कोणी कांहीं, कोणी कांहीं असे खेळत असतात. असा एकसारखा तीन दिवस सपाटा चालतो. ह्या सणांत साधारणतः कोणी भिकार कपड्यांनी कधींही फिरावयाचा नाहीं. ह्या दिवसांत सुगंधी तेलें फारच महाग मिळतात. रात्रीच्या प्रहरीं दीपोत्सव होतो. त्या वेळीं सर्व शहरभर जे दिवे जळतात त्यांची तर गणतीच नाहीं. कोणी ग्यास, कोणी ग्लासें, कोणी झुंबरें ह्याप्रमाणें ज्याची जशी शक्ति असेल तसा खर्च करून दिवे लावतो. पारशी, मुसलमान व इतर लोक सुद्धां आपापल्या दुकानांतून रोषनाई करितात. **बलिप्रतिपदे**चे दिवशींही असाच प्रकार होतो. ह्या दिवशीं हिंदु मात्र दारापुढें बली काढतात. भाऊबीजेच्या दिवशीं बहिणी आपापल्या भावांस आरती ओंवाळतात. बायकांनीं आपल्या पतींसही आरती करावी असें आहे. नवयुवति आपल्या पतीस आरती करीत असतां सानंदाश्चर्ययुक्त

---

१. ह्या सणांत गुजराथी घोडेवाले तऱ्हेवाईक पोषाख करून कमरेंत घागऱ्या किंवा मोठे घुंगुर व चाळ बांधून दोन्ही हातांत दोन मोठ्या काठ्या घेऊन आपापल्या शेटकडे किंवा आपापल्या ओळखीच्या एखाद्या बड्या गृहस्थाकडे जाऊन नाचत असतात. व गुजराथी तऱ्हेची चमत्कारिक गाणीं ह्मणतात. कित्येक कोळी लोक 'तारपी ' घेऊन व चार पांचजण हातांत हात घालून त्या ताराच्या सुरावर नाचत असतात. नाचतां नाचतां तोंडानें ' भुर्रर ' असा शब्द करितात. वणजारीलोक टिपऱ्यांनी खेळतात व नाचतात देखील. **बलीप्रतिपदे**चे दिवशीं गवळीलोक गवत पेटवून त्यांजवरून आपल्या गाई, ह्मशी व बैल ह्यांस उडवितात. नंतर त्यांच्या शिगांस तांबडी गेरू लावून त्यांच्या गळ्यांत पुष्पमाला घालून व कपाळावर मोठमोठीं बाशिंगें लावून वाजतगाजत शहरांत फिरवितात. ज्या जनावराजवळून आपण सतत एक वर्षभर चाकरी घेतो, त्यास अशाप्रकारें एक दिवस विश्रांती देऊन त्यांचे गौरव करणें ह्या कृत्यास वावगें कोण म्हणेल ?

स्मितहास्य करून सलज्ज होत्सात्या आपणास आपले पति आरतींत काय घालतील ह्या विचारांत निमग्न असतांना त्यांची जी विलक्षण मुखश्री दृष्टीस पडते ती खरोखरच मनास आनंददायिनी आहे. असा कोण पाषाणह्रदयी आहे कीं, त्याचें मन असा मोहक देखावा पाहून वितळणार नाहीं ? असा हा आनंदाचा सण गोडगोड पक्वान्नें खाऊन व नानातऱ्हेचे खेळ खेळून निघून जातो तेव्हां शौकी जनांस खरोखरीं वाईट वाटल्यावांचून रहात नसेल ! ह्या सणांत दारूकाम म्हणजे फटाके, फुलबाज्या, नळे वगैरेचा खप बराच होतो. कायद्याविरुद्ध दारूकाम सोडल्याबद्दल कित्येकांस सरकारदंडही भरावा लागतो ! कांहीं दिवसांनीं पुढें वृंदाविवाह सुरू होतात. ते घरोघर होतात. ह्या सणास **देवदिवाळी** ह्मणतात. बाणकोटी वगैरे लोकांची थोरली दिवाळी ती हीच. तुळशींचें लग्न झाल्यादिवसापासून आमच्या लोकांत मंगलकार्यांना सुरुवात होते. तुळशीचें लग्न हें त्याबद्दलचें सूचक चिन्ह होय. पुढे **मकरसंक्रांत** येते. ह्या सणांत तीळगुळाचें मोठें माहात्म्य. नंतर **महाशिवरात्र**, ह्या दिवशीं सर्व दिवसभर उपोषण करून आपला वेळ ईश्वर भजनांत घालवावा अशी कथा आहे. पण निष्ठापूर्वक तसे करणारे विरळा! सर्व बाह्यात्कारीं लोकांस दाखविण्यापुरतें करणारे फार. शहरांतील निरनिराळ्या शिवालयांत भक्तजनांची बरीच गर्दी जमते. देवळांत कोणी एकादशण्या करीत बसला आहे; कोणी लघुरुद्र करीत बसला आहे; कोणी 'अष्टोप्रहर संततधारा' धरून बसला आहे; कोणी ब्राह्मणद्वारा पूजा करीत आहे; अशी नानाप्रकारें महादेवाची पूजा अर्चा करून कैलासभुवन मिळविण्याची इच्छा धरून भजनपूजन करण्यांत जे ते गढून गेले आहेत असें पाहून कोणाचें मन तेथें रमणार नाहीं ? पण त्यांत खरे भाविक असे फारच थोडे सांपडतील. ही पूजा रात्रीची मुख्य धरिली आहे. प्रत्येक प्रहराला एक ह्याप्रमाणें एका रात्रींत चार पूजा होतात. आषाढी व कार्तिकी एकादशीस विठोबाच्या देवळांत पुष्कळ गर्दी उडते. **माटुंग्या**स तर लक्षावधि लोक जातात. बहुतेक आबालवृद्ध ह्या एकादशी करितात. पुढें फाल्गुन महिन्याच्या प्रतिपदेपासून तों पौर्णिमेपर्यंत पंधरा दिवस **होळी**चा सण असतो, त्यांत पौर्णिमेचा दिवस मुख्य. ह्या सणांत लहान मुलें तेरा दिवस होळी पेटवितात व तासे व इतर वाद्यें वाजवून तोंडानें नानाप्रकारचे बीभत्स शब्द

उच्चारून बोंबा मारितात ! चौदावे व पौर्णिमेच्या दिवशीं वृद्ध वृद्ध पुरुष सुद्धां होळीवर जातात. होळीच्या दिवशी नाटकें, तमाशें, झगडे, छGडी ह्यांची बरीच गर्दी उडून जाते. **ब्याकबे**वर आट्यापाट्या व खो-खो वगैरे खेळ खेळण्यास हजारो लोक जमतात. त्यांत कोणी गाणें, कोणी बजावणें करून वेळ घालवितात. ह्या दिवशीं सकाळीं परभु लोकांचे 'वरघोडे' निघत असतें; त्या वेळीं त्यांत नानातऱ्हेचीं सोंगें घेऊन ते लोक निघतात. पूर्वी ह्या वरघोड्याची बरीच गम्मत असे. अलीकडे ह्या वरघोड्याचें मान फार कमी होत चाललें आहे. ह्या सणांत **मुंबईं**त 'रंग' व 'अबीर' घेण्याचा रिवाज आहे. लहान लहान झबलीं, टोप्या, इजारी वगैरे रंगवून मुलांस घालावयास देतात. साखरेचे गांठेही त्यांच्या गळ्यांत घालतात. पूर्वी हा सण येथें फार गाजत असे, पण पोलिसाच्या धाकानें हें बंड आतां फार कमी झालें आहे.

**१८८.** ह्याप्रमाणें आमच्या लोकांच्या मुख्य मुख्य सणांविषयीं माहिती अति संक्षेपानें आमच्या वाचकांपुढें ठेविली. ह्यापेक्षां अधिक लिहून विनाकारण काळाचा आणि स्थळाचा व्यय करणें आह्मांस प्रशस्त दिसत नाहीं.

**१८९. जत्रा.**—कोणत्याही एकाद्या तीर्थास जाऊन क्षौर करणें, त्या त्या तीर्थांत स्नान करणें, देवदर्शन घेणें, ब्राह्मणसंतर्पण करणें, पित्रुद्देशानें श्राद्ध करणें वगैरे जीं धर्मकृत्यें त्याला 'यात्रा करणें' ह्मणतात. प्रत्येक देवाच्या नियमित दिवशीं त्या देवाचे भक्त मिळून त्याचें ते दर्शन घेतात, त्याच्या प्रीत्यर्थ जी कथाकीर्तनें करतात, जो गोंधळ वगैरे घालतात व जो मोठा थाटमाट करून समारंभ करितात, त्याला जत्रा ह्मणतात. जत्रेलाही यात्रा ह्मणतात; पण तीर्थयात्रेला जत्रा ह्मणण्याचा सांप्रदाय नाहीं. जत्रा साधारणपणें कशा भरतात वगैरेची लोकांस माहिती असल्यामुळें त्याजविषयीं येथें विशेष विस्तार करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. कित्येक जत्रा वर्षातून एकदां, कित्येक दोनदां आणि कित्येक तीनदांही भरतात. **मुंबईं**त दरसाल किती जत्रा भरतात, कोठें भरतात, कोणत्या देवाच्या प्रीत्यर्थ भरतात वगैरेची माहिती परिशिष्टांत दिली आहे. जत्रेच्या दिवशीं दुकानदार आपापला अनेक तऱ्हेचा मेवामिठाई, फळफळावळ, मुलांचा खेळ असे नानाविध चित्तवेधक पदार्थ विकावयास आणून देवळाच्या आसपास दुतर्फा दुकानें मांडून बसतात. देवळांत मोठी आरास केलेली असते. देवाचें जितकें

जवाहिर असतें तितके सर्व जत्रेच्या दिवशीं देवाच्या आंगावर चढतें. देवळासमोर दारूकामही सोडण्यांत येतें. **मुंबईं**त जत्रेच्या दिवशीं जो थाट उडतो तो प्रत्यक्ष जाऊनच पाहिला पाहिजे.

**१९०. वाळकेश्वरीं** श्रावणी अमावास्येस व कार्तिकी पौर्णिमेस अशा वर्षांतून दोन जत्रा भरतात. पूर्वी ह्या जत्रांत जुगाराचा अड्डा फार असे ; परंतु, सरकारनें जुगाराची मनाई केल्या दिवसापासून तो बंद पडला आहे. सुमारें ३०-४० वर्षांपूर्वी ह्या जत्रांत **पारशी**लोक मनस्वी जात असत व डोंगरावर जागोजागीं तंबू मारून राहत. ह्या पारशांच्या बरोबर नकले, थट्टेबाज, ढोंगी व जुगारी पारशी जाऊन धिंगामस्ती करीत व जत्रेंत स्त्रियांमध्यें शिरून थट्टामस्करी चालवीत, हें पाहून महाजनांनीं ही गोष्ट सरकारास कळवून **वाळकेश्वराच्या** संस्थानासभोंवतीं भिंत बांधून सरकारच्या हुकुमानें **पारशी**लोकांस भिंतीच्या आंत जाण्याची मनाई केली. **महालक्ष्मी**सही वर्षांतून दोन जत्रा भरतात. महालक्ष्मीची चैत्र शुद्ध १५ मेस व धाकजीच्या देवळाची वैशाख शुद्ध १५ मेस मिळून दोन. **नवेवाडीची** जत्रा कार्तिक वद्य अमावास्येस भरते. ही जत्रा आठ दिवस असते. जत्रेच्या दिवशीं परभू लोक दारूकाम वगैरे सोडतात. **कालिका**देवीची जत्रा मार्गशीर्ष वद्य अमावास्येस भरते. ह्या दिवशीं **रामवाडी**च्या नाक्यापासून तों जुने **हनुमान** गल्लीच्या नाक्यापर्यंत एकसारखीं दुतर्फा दुकानें लागून जातात. ही जत्रा सुमारे पहांटे १-२ वाजततोंपर्यंत राहते.

**१९१.** ह्या शिवाय **परभादेवी**, **गांवदेवी**, शिंपीआळींतली, **जगन्नाथ शंकरशेट**चें देऊळ, **माणकेश्वर**, **भुलेश्वर**, **मुंबादेवी**, **सदानंद चिंतामण जोशी भानुशे** ह्याचें देऊळ वगैरे देवळांच्या जत्रा निरनिराळ्या समयीं भरत असतात. शिवरात्रीस **घारापुरीस** जत्रा भरते. तेथें पुष्कळ लोक जातात. कार्तिक वद्य ६ स कोटांतील रथ निघतो. हें संस्थान शेणवी गृहस्थांचें आहे. तेथें जत्रा भरते व ब्राह्मणभोजन होतें. श्रावण वद्य ११ दशीस गुजराथीलोक गोवाळी अग्यारस ह्मणतात. ह्या दिवशीं पांच सहा वर्षांच्या मुलांस गोपाळांचा वेश देऊन त्यांच्या आंगावर बहुत जवाहीर घालतात. असे बटु गोपाळ ह्या दिवशीं कोटांतील ठाकुरद्वारांत शें दीडशें जमतात. ह्यांचा डोकींत बायकांसारखी फुलें माळतात. देवदर्शन

झाल्यानंतर मुलें स्नेह्यांच्या घरीं दाखवायास फिरवितात. मुलें ज्याच्या घरीं जातील त्या गृहस्थास त्यांस रुपया दोन रुपये द्यावे लागतात. कोणी कोणी तर त्यांस खाऊही देतात. कित्येक दक्षिणी लोकही कधीं कधीं आपल्या मुलांस असेंच श्रृंगारितात.

१९२. **देवी काढणें**—मनुष्यास देवी येणें ह्मणजे त्याच्या आयुष्यापैकीं एका रोगाची त्याजवर धाड येण्यासारखें होय. देवी आंगच्या येतात तेव्हां मुलांस फार त्रास होतो. त्या नीट रीतीनें गेल्या तर बरें ; नाहीं तर, प्राण्याचे जे हाल होतात ते कांहीं पुसूंच नका ! कित्येकांचे तोंडावर वण राहतात, कित्येकांचे डोळे जातात, कित्येक तर प्राणासही मुकतात, अशा या भयंकर रोगापासून जीवांचें रक्षण सुलभ रीतीनें करतां येईल कीं नाहीं ह्मणून विचक्षण लोक नानाप्रकारच्या युक्ति योजूं लागले. आमच्या लोकांत पूर्वी देवी काढविणें ह्मणजे देवींच्या मर्जीविरुद्ध काम करण्यासारखें होय अशी समजूत होती; तरी मधून मधून कोणी मराठी लोकांकडून देवी काढवीत. त्या लोकांची देवी काढण्याची कृति मोठी भयंकर होती. ती अशी कीं, मनगटापासून एका वितीच्या अंतरावर एकाद्या शस्त्रानें किंवा वस्तऱ्यानें फांसण्या घालीत आणि त्यांवर देवी आलेल्या मनुष्याच्या आंगावरील झडलेल्या खपल्यांची बुकणी टाकून वर घट्ट पट्टा बांधीत. पोह्यांत गूळ घालून खावयासही देत, व त्यावर वातूळ पदार्थ खावयास सांगत. इतकें झाल्यावर मग त्या मनुष्यास एक दोन दिवस ज्वर येऊन सर्व आंगभर देवी येत. ह्यापासून रोग्यांस अत्यंत दुःख भोगावें लागे. देवी काढणाऱ्यास देवीचे भक्त समजून त्यांस बक्षीस वगैरे देऊन देवभोळे लोक त्यांजकडून देवीचें वारेंही करवीत. याप्रमाणें चाललें असतां इ. स. १८१६-१७ च्या सुमारास कंपनीसरकारानें येथें देवी काढण्याचें एक ऑफिस घातलें. पण बरींच वर्षेपर्यंत लोक त्या ऑफिसांत जाऊन देवी काढविण्याचें मनावर घेत ना. पुढें हळूहळू सरकारानें अशा लोकांस कांहीं बक्षीस वगैरे देण्याची लालुच दाखवून आपलें काम साधण्याचें सुरू केलें. ही देवी काढण्याची युक्ति पहिल्यानें **इंग्लंदांत** इ. स. १७९६ सालीं **एडवर्ड जेनर** ह्यानें काढिली. हा गृहस्थ डाक्तरगिरीचें काम शिकत असतां एके समयीं त्याच्या शिक्षकाकडे एक बाई आली. त्या वेळीं ह्या दोघां गुरुशिष्यांचें

देवीविषयीं बोलणें चाललें होतें तें एकून ती बाई ह्मणाली—मला कधीं देवी येणार नाहींत कारण मला गाईच्या देवी आल्या आहेत. ह्या भाषणावरून **एडवर्ड जेनर** ह्या गोष्टीचा शोध करूं लागला. त्याला वाटलें कीं, गाईचें दूध काढतांना वगैरे देवींची लस लागून त्या देवी मुनष्यास येतात. ही कल्पना त्यांनें लोकांस कळविली. तेव्हां बरेच लोक त्याचा उपहास करूं लागले. एवढें झालें तरी, त्याच्या मनाची खातरी असल्यामुळें तशा प्रकारचा प्रयोग करून पाहण्याचा त्याचा निश्चय झाला; व त्याप्रमाणें त्यानें गाईच्या देवीपासून लस घेऊन एका मनुष्यास देवी काढिल्या. तेव्हां त्या मनुष्याच्या आंगावर देवी उ,,वल्या. हा प्रकार पाहून त्यांचे मन आनंदानें स{दीत झालें. पुढें त्यानें असे प्रयोग वारंवार करून पाहून ही देवी काढण्याची युक्ति ठरविली. व ही युक्ति अलीकडे बरीच प्रसिद्ध झाली असून बहुतेक ठिकाणीं अशाच प्रकारें देवी काढितात व त्यामुळें हजारों लेंकरांच्या प्राणांचें रक्षण झालें आहे.

**१९३.** साधारणपणें मूल निरोगी असलें तर त्याच्या जन्मदिवसापासून सहा महिन्यांचे आंतच देवी काढवाव्या असा सरकारचा ठराव आहे. देवी काढणाऱ्या डाक्तरांचीं ठिकाणें **मुंबई**त ठिकठिकाणीं आहेत. देवी काढण्याचे दिवस मंगळवार व शुक्रवार हे आहेत. त्या दिवशीं मुलांस तेथें घेऊन जावें, ह्मणजे देवी काढतात. तिसरे दिवशीं पुनः जाऊन देवी आल्या आहेत असें दाखविलें ह्मणजे सर्टिफिकेट मिळतें. **मुंबई**त ह्या कामावर जो डाक्तर असतो त्याला 'सुपरिंटेंडंट ऑफ् व्ह्याक्सिनेशन ' असें ह्मणतात. ह्याच्या हाताखालीं बरेच व्ह्याक्सिनेटर असतात.

**१९४.** एकदां मुलें छापवून त्यांचे आंगावर 'उगवण' दिसूं लागलें ह्मणजे, **मुंबई**त पुष्कळ लोकांत 'घट ' मांडून त्यास ऊद दाखवून त्याची पूजा करण्याची चाल आहे. घरांत चोपाळा नसला तर मुद्दाम विकत आणून अगर, कोणाचा मागून आणून त्याला लिंबाचे टहाळ बांधून त्याजवर देवी आलेल्या बालकास घेऊन घरांतील बायका गाणीं ह्मणण्याचा सपाटा लावितात. हीं गाणीं संसारांतील कांहीं गोष्टी घेऊन बायकांनींच कशीं तरी रचलेलीं असतात. ह्याप्रमाणे नऊ दिवसपर्यंत गाण्याचा सपाटा चालून त्या दिवशीं घटाजवळ 'रक्षा ' होते. त्या वेळीं नानाप्रकारचीं फळें, मेवामिठाई आणून देवीस नैवेद्य दाखवावा लागतो. निमंत्रित सोयरेधायरेही

त्या दिवशीं तेथें रिक्तपाणी न जातां देवीस काहीं तरी मेवामिठाई घेऊन जातात. घरांत देवी असतां बाहेरून येणारानें आपल्या पायांवर गोमूत्र टाकल्यावांचून आंत येऊं नये अशी वहिवाट **मुंबईत** पुष्कळांकडे आहे. रक्षा झाल्यावर ज्यांस जशी फुरसुद मिळेल त्याप्रमाणें देवीचा 'नवस' होतो. त्या दिवशीं मोठ्या थाटानें **भुलेश्वरीं शीतला**देवीच्या देवळांत जाऊन वाजतगाजत देवीची पूजा करून व सुवाशिणी पूजून आलें ह्मणजे हा सर्व विधि आटपतो. घरीं आल्यावर उत्तम भोजन करून सोयरे धायरे आपापल्या घरीं जातात. कित्येक बाया आपलीं लेंकरें सुखरूपपणें देवींतून पार पडावीं ह्मणून देवीस नानातऱ्हेचे नवस घेतात व ते त्यांस मागाहून फेडावे लागतात.

**१९५. नाणें**.—स्याक्सन लोकांनीं **ब्रिटन**मध्यें पाऊल टाकण्यापूर्वी देखील **हिंदुस्थानांत** हुंड्या चालत होत्या. सोन्यारुप्याचीं नाणींही चालू होतीं. नोटी ह्या **महंमद तघलख** (इ. स. १३२१-५२) ह्यानें चालू केल्या असाही लेख मिळतो. **वेनीस आम्स्टेर्डाम** येथें ब्यांका सुरू होण्याच्या अगोदरपासून देखील चीनांत ब्यांकनोटी निःसंशय होत्या. तशाच **हिंदुस्थानांत** त्या असण्याचा बराच संभव आहे. कारण, **हिंदुस्थानांत** इंग्रजांचा पाय पडण्यापूर्वीच **मद्रास** आणि **मुंबई** येथें तांब्यांची नाणीं चालू होतीं. रुपयाचें नाणें मात्र अलीकडचें. असें आहे तरी फार प्राचीनकाळी देखील पुराणादि ग्रंथांतून रुपयासारखें कांहीं नाणें असल्याचे लेख वाचण्यांत येतात. हें नाणें कोणतें असेल हें मात्र निश्चयात्मक सांगतां येत नाहीं; तरी पण, रुपया आणि मोहर हीं मुसलमानी नाणीं दिसतात. कारण इ. स. १५४२ त **दिल्लीचा** बादशाह **शीरशहा** ह्यानें हीं नाणीं पहिल्यानेंच पाडिलीं. आतां हें खरें आहे कीं, इ. स. १६९७ व त्याच्याही पूर्वी **मुंबईत** रुप्याचें नाणें मुळींच नव्हतें. त्या वेळचीं नाणीं ह्मटली ह्मणजे, प्यागोडा, शाही आणि सराफी हींच होत. ह्यांची इंग्रजी नाण्याबरोबर किंमत अनुक्रमें ९ शिलिंग, ४ शिलिंग आणि १ शिलिंग ८ पेन्स होती. प्यागोडा हें मुळचें **हिंदुस्थानचें** नाणें 'प्यागोडा' हें नांव ह्या नाण्यास **पोर्टुगिजांनीं** दिलें असावें, कारण ह्या नाण्याच्या एका बाजूवर प्यागोडा (देवळा) सारखी आकृति काढलेली असे. ही आकृति ह्या नाण्यावरून पुढें काढूनही टाकिली, तरी त्याचें नांव कायम राहिलें. प्यागोडाचा आकार साधारण

बटनाएवढा असे. होन नाणें हेंच असावें. कारण जुन्या कर्नाटकी भाषेंत सोन्यास 'होन' ह्मणतात. 'हुंडी' हा शब्द ह्या शब्दापासूनच निघाला असावा असाही कित्येक तर्क करितात. प्यागोडा हें नाणें रुपया किंवा मोहर ह्या नाण्याहून फार प्राचीन आहे. दिडकी किंवा पैसा हें नाणें आद्यस्मृतिकार **मनू** ह्याच्या वेळेस देखील होतें इतकें तें प्राचीन आहे ! 'कीर्ष' हा शब्द मुळीं संस्कृत. ह्याचा उल्लेख मनुस्मृतींत सांपडतो. ह्याच कीर्ष शब्दाचा चिनी लोकांच्या 'क्याश' ह्या शब्दाशीं कांहीं संबंध असावा असें कित्येक तत्त्ववेत्त्यांचे ह्मणणें आहे ! इंग्रजी 'क्याश' (रोकड) हा शब्दही **चिनां**तूनच **इंग्लंदांत** गेला असावा असाही कित्येकांचा समज आहे.

**१९६. हिंदुस्थानांत** जेव्हां इंग्रज आले तेव्हां येथें निरनिराळीं नाणीं चालत होतीं ; पण, त्यांत सर्वांची आकृति, आणि वजन हीं एकमेकांपासून बरींच भिन्न असत. सर्वत्र एका तऱ्हेचें नाणें चालावें ह्या उद्देशानें प्रथमतः लॉर्ड **कार्नवॉलिस** आणि सर **जॉन शोअर** ह्यांनी अगदीं झिजून गेलेलीं व खराब झालेली अशीं नाणीं, त्यांस सांपडली तेवढ्यांची, किंमत देऊन घेतलीं आणि इ. स. १७९५ त असा ठराव केला कीं, शिक्का रुपया घेतल्यावांचून जे दस्तऐवज करण्यांत येतील ते खरें आहेत असें समजलें जाणार नाहीं ; पण, पुढें इ. स. १८३५ त हाही रुपया जाऊन त्याच्याबद्दल **ईस्ट इंदिया** कंपनीचा रुपया सुरू झाला व तेंच नाणें हल्ली चालू आहे. मोंगल बादशहा **शहाआलम** ह्यानें (इ. स. १७५९-८६) **मुर्शिदाबाद** येथें आपल्या राज्याच्या १९ व्या वर्षी रुपये पाडले होते. इंग्रज लोकांनींही त्याचेंच अनुकरण करून **कलकत्ता** येथें शिक्का रुपयांचे नाणें पाडले. तरी **महंमद तुघलख** ह्यानेंही आपल्या नाण्यावर स्वतःचें नांव न घालता **मिसर** दे **खलिका**चें नांव घातलें होतें. इंग्रजांच्या नाण्यावरही कांहीं वर्षे पर्यंत मुर्शिदाबादी नाण्याप्रमाणेंच लेख[१] होता.

**१९७.** हल्लीचा चलन या इंग्रेजी फ्लोरीन (दोन शिलिंग) बरोबर आहे; परंतु, त्याची किंमत नेहमीं बाजारभावावर अवलंबून असते. एका

---

१. "Coined at Morsidabad in the nineteenth year of Shah Alum his fortune reign."—*Round about Bombay*. भावार्थ वर आलाच आहे.

रुपयाचे आणे १६, एका शिलिंगाबरोबर अर्धा रुपया, ६ पेन्सबरोबर १ पावला आणि ३ पेन्सांबरोबर एक चवली. तांब्याचें नाणें ह्मटलें ह्मणजे दिडक्या होत. १२ पै किंवा १।। पेन्स ह्मणजे एक आणा. अर्धा आणा किंवा ढबू हा ३/४ पेन्स किंवा सहा पै बरोबर आहे, आणि पाव आणा ३/८ पेनी किंवा ३ पै बरोबर आहे. ३ दमड्या ह्मणजे अर्धा पैसा. येथील नाण्याची किंमत नेहमीं बाजारभावाप्रमाणें ह्मणजे अर्थात् इंग्रजी नाण्याच्या भावाप्रमाणें कमज्यास्त होत असते.

१९८. **मुंबई शहरां**त इ.स. १८६२ पासून नोटींचें नाणें चालू झालें. नोटा ५, १०, २०, ५०, १००, ५००, १०००, आणि १०,००० रुपयांच्या असतात. ह्यांची किंमत ज्या भागाच्या त्या असतील त्या भागामध्यें मात्र सारखी असते, तीच नोट दुसऱ्या भागात नेली तर, वटाव पडतो. **मुंबई**मध्यें इंग्रजी साव्हरिन नाणें, तशींच इतर राष्ट्रांतील नाणीं बाजारभावाप्रमाणें अधिकउण्या किंमतीनें मिळूं शकतात. शिवाय प्रामिसरी नोटा सरकारांतून विकत घेऊन श्रीमानलोक ब्यांकेंत ठेवितात त्यांपासून त्यांस व्याज मिळतें. सावकारी हुंड्या अगर सरकारी चेक्स ह्यांच्या योगानेंही व्यापारांत बरीच देवघेव होत असते. मराठी पैसे अगर **शिवाजी**महाराज ह्यांचा शिवराई **मुंबईं**त चालत नाहीं. तरी पण, तो बहुतेक महाराष्ट्र देशांत म्हणजे **पुणें, सातारा**, व **केळवें माहिम** वगैरे ठाणें जिल्ह्यांतील कांही ठिकाणीं चालतो. व्याजाचा भाव नेहमीं बदलत असतो. प्रामिसरी नोट चांगला भाव आल्यास विकून टाकतात. सरकारास खर्च फार आणि उत्पन्न कमी झाल्यामुळें रयतेकडून ४ किंवा ५ टक्क्याचे व्याजानें द्रव्य घेऊन सरकारी खजिन्यांत दाखल करून गव्हर्नर जनरल ह्यांच्या सहीची चिठी सरकारांत पैसे भरणारास देऊन त्यास त्याबद्दल ६-६ महिन्याचे व्याज देत जावें, असा मुख्य इंग्रजसरकाराकडून इ.स. १७२० त.... मिळाला. तेव्हांपासून सरकारी चार व पांच टक्क्यांच्या ति ....... नोटी सुरू झाल्या. इ.स. १६१६ मध्यें **टॉम कारियट्** न. .... युरोपियन् गृहस्थानें एका रुपयाची किंमत २ शिलिंग ६ पेन्स केली होती, व इ.स. १६६४ त बनियर्ड यानें २९ पेन्स (२ शिलिंग, ..... पेन्स) केली होती. तसेंच इ.स. १७६४ त २ शिलिंग ६ पेन्स एक रुपयाची किंमत झाली होती. **कंपनी**च्या रुपयापेक्षां

शिक्कारुपयामध्यें[१] १५ टक्के चांदी जास्त होती. इ.स. १८३५ पर्यंत हा शिक्का रुपया चालला. इ.स. १६८० व त्याच्या पूर्वी जे हिरे **विलायतेस** जात ते शेंकडा ७ टक्के नफ्यानें तेथें विकले जात. व त्या नफ्यापैकीं अर्धा कंपनीचा व अर्धा प्रेसिडेंट, एजंट व क्रौन्सिल ह्यांचा असे. हल्लीं इ.स. १८८२ पासून सरकारानें पोष्टल ब्यांका काढल्या आहेत. त्यांतही लोक आपला पैसा ठेवितात. आज ह्या पोस्टल ब्यांका सर्व डिस्ट्रिक्ट मधील सुद्धां मिळून एकंदर ४९,६०६ आहेत.

**१९९. राणीचा पुतळा.**—कोटाच्या आणि टेलीग्राफ ऑफिसाच्या नजीकच हा पुतळा आहे. हा पुतळा प्रख्यात आंग्लभौम शिल्पशास्त्री **नोबल** ह्यानें घडला आहे. हा शुभ्र स्फटिकाचा केलेला आहे. ह्यास एकंदर खर्च एक लक्ष ऐंशी हजार रुपये झाला आहे. माजी श्रीमंत **खंडेराव गायकवाड** ह्यांनीं ह्या पुतळ्याचा सर्व खर्च दिला आहे. हा सर्व **मुंबई**मध्यें उत्तम पुतळा आहे. इ.स. १८७२ सालीं गव्हर्नर लार्ड **नार्थब्रुक** हे लार्ड **मेयो** ह्यांच्या मरणोत्तर ह्या देशांत आले, त्या वेळीं त्यांनीं हा पुतळा उघडण्याचा समारंभ आपल्या हातानें केला. पहिल्यानें हा पुतळा **व्हिक्टोरिआ** म्यूझिअममध्यें आपले राज्ञीचे पति **कान्सर्ट आलबर्ट** ह्यांच्या पुतळ्यानजीक बसवावा असें ठरले होतें; परंतु श्रीमंत **गायकवाड** ह्यांच्या आग्रहावरून हल्लींच्या ठिकाणीं बसविण्यांत आला. पहिल्यानें आपल्या राज्ञीचा नुसता पुतळाच असावा असा बेत होता; पण पाठीमागून हल्लीं जें मखर आहे तें बसविण्यांत आलें. ह्या पुतळ्याचा दगड संगमवरी असून काम मोठें सुंदर केलेलें आहे. मखराची उंची एकंदर ४२ फूट आहे. ज्या सिंहासनावर राणीचा पुतळा बसविला आहे त्याची उंची ७ फूट १० इंच असून त्याला पायऱ्या आहेत. खुद्द पुतळ्याची उंची ८ फूट आहे. ह्यांचें जें कारागिरपणाचें काम केलें आहे त्याचें वर्णन करणें फारच दुरापस्त आहे. राणीच्या पोषाखाचें काम असें आहे कीं, हा केवळ कपडाच आहे असा भास होतो. ज्या खुर्चीत हा पुतळा बसविला आहे तिच्या पाठीमागें तक्के दिलेले आहेत व वर राजचिन्हांकित मखर आहे. पुतळ्याच्या उजव्या हातांत राजदंड असून डाव्या हातांत

---

१. 'रौंड अबौट बाम्बे' ह्या पुस्तकावरून असें दिसतें कीं, शिक्का रुपया कंपनी रुपयांपेक्षां शेंकडा ८ रुपयेभर वजनानें जास्त होता.

कमलपुष्प आहे. प्यानेलवर चार भाषांत लेख लिहिले आहेत, त्यांत हा पुतळा माजी **गायकवाड**सरकार ह्यांनीं बांधला आहे असा मजकूर आहे. ह्या पुतळ्याच्या सभोंवार एक लोखंडी कठडा बांधला आहे. ह्या कठड्यात ७ हजार रुपये खर्च झाला हा पुतळा पाहणारास सर्व राजकीय चिन्हें पाहण्यास सांपडतात. एकंदरींत पुतळ्याचें काम फारच पाहण्यासारखें आहे.

२००. **युवराज प्रिन्स ऑफ् वेल्सचा पुतळा.**—हा पुतळा मेक्यानिक इन्स्टिटयूट व फार्बस स्ट्रीट यांच्यामध्यें अगदीं रस्त्यावर असून इ.स. १८७५-७६ सालीं युवराज **मुंबई**स आले होते त्यांच्या स्मरणार्थ सर **आल्बर्ट ससून** ह्यांनीं बसविला आहे. इ.स. १८७९ त जून महिन्याच्या २६ व्या तारखेस माजी गव्हर्नर सर **रिचर्ड टेंपल** ह्यांनीं हा पुतळा उघडण्याचा समारंभ केला. पायापासून मस्तकापर्यंत पुतळ्याची उंची १२ फूट ९ इंच आहे. त्यांच्या आसनाची उंची जमिनीपासून १४।। फूट आहे. आंगात फील्ड मार्शलचा पोषाख घातला आहे. गळ्यांत 'ऑर्डर ऑफ धि बाथ' आहे. उजव्या हातांत टोपी आहे. हा पुतळा अगदीं प्रिन्स ऑफ् वेल्सची प्रतिमाच आहे. आसनाच्या दोन बाजूंला ओतीव कामांत दोन देखावे फार उत्तम दाखविले आहेत. गोदींतून युवराज बाहेर आले तो व मैदानांत लहान मुलांस मेजवानी झाली त्या वेळीं पारशी स्त्रियांनीं त्यांजवर जी पुष्पवृष्टि केली तो ह्या दोन्ही प्रसंगाचा देखावा दाखविला आहे. गोदींतून बाहेर येण्याचा देखावा पश्चिमेचे बाजूला ह्मणजे म्युनिसिपल ऑफिसाच्या समोर आहे. ह्यांत माजी गव्हर्नर जनरल **लॉर्ड नार्थब्रुक** ह्यांनी एतद्देशीय संस्थानिकांबरोबर मुलाकत करून दिली हा देखावा आहे. कामाच्या सफाईमुळें बहुतेक सर्व काढलेले चेहरे ओळखण्यांत येतात. युवराजांच्या बाजूला लार्ड **नार्थ ब्रुक** ह्यांचा चेहरा आहे, व त्यांच्याच पाठीमागें सर **फिलिप वुडहौस** आणि सर **वार्टल फ्रिअर** यांचे आहेत. किंचित् अंतरानें ऑनरेबल **डोसाभाय फ्रामजी**, सर **मंगळदास नथुभाई**, मिस्तर **म्याक्लिन**, मिस्तर **एडवर्ड ससून** आणि मिस्तर **गबे** हे उभे आहेत. युवराजाचे समोर राजेरजवाड्यांपैकी **बडोद्या**चे तरुण गायकवाड, **ह्मैसूर**चे महाराज, **कोल्हापूर**चे

राजे, **कच्छ**चे राव, व निझाम सरकारचे प्रसिद्ध दिवाण सर **सालरजंग** हे आहेत. पूर्वबाजूला पारशी स्त्रिया आपल्या हातांत फुलांच्या माळा घेऊन युवराजाच्या गळ्यांत घालण्याकरितां येत आहेत असें दाखविलें आहे; व त्यांच्याबरोबर इतर हिंदु, मुसलमान, पारशी लोकांचे चेहरे आहेत. आसनाच्या एका बाजूला **प्रिन्स ऑफ् वेल्स** यांचा फोटो आहे व दुसऱ्या बाजूला खालीं दिलेला लेख आहे. ह्या पुतळ्यास एकंदर खर्च १,२५,००० रुपये झाला. हा पुतळा एका उमद्या घोड्यावर बसविला आहे. युवराजाजवळ तरवार वगैरे दिली आहे, तेणेंकरून पुतळा फारच मनोहर दिसतो.

" ALBERT EDWARD
PRINCE OF WALES
K. C. G. C. S. I.
In commemoration of the visit of
HIS ROYAL HIGHNESS
To India in 1875-76
SIR ALBERT SASSON C. S. I. KT.
Presented this statue to his fellow Townsmen
OF THE
Loyal city of
BOMBAY."

**२०१. सर रिचर्ड टेंपलसाहेबाचा पुतळा.**—हा पुतळा चर्चगेट स्टेशननजीक एस्प्लेनेडवर एका कोंपऱ्यांत आहे. हे साहेब **मुंबई**चे गव्हर्नर होते. हा पुतळा इ.स. १८८७ त मार्च महिन्याच्या ३१ व्या तारखेस **लार्ड रे, मुंबई**चे गव्हर्नर, ह्यांच्या हातून उघडण्याचा समारंभ झाला. ह्या पुतळ्यांचे काम विलायतेंतील कारागीर मिस्तर बी. **ब्रॉक** ह्यांनीं केलें आहे. हा पुतळा बसवावा ह्मणून इ.स. १८८० च्या मार्च महिन्याच्या १२ वे तारखेस टौनहालांत एक जंगी सभा भरली होती, त्या वेळीं कित्येक पारशी व युरोपिअन लोकांनीं सुमारें २०,००० रुपये वर्गणी भरली. हा पुतळा शुभ्र संगमरवरी दगडाचा चौथरा करून त्यावर उभा केला आहे.

**२०२. ट्रामवेकंपनीचे तबेले.**—ट्रामवेकंपनीचे तबेले कॉटनग्रीनच्या शेजारी असून फारच सुंदर व पाहण्यासारखें आहेत. ह्या तबेल्यांत ४७५

पेक्षां जास्त घोडे राहण्याची सोय केली आहे. ह्याखेरीज तेथें कारखाना काढून खिळे वगैरे लोखंडी सामान व गाड्या वगैरे कंपनीच तयार करविते. ह्या कारखान्यांत एक एंजिन आहे. तें दहा घोड्याच्या शक्तीचें काम करितें. त्याचा उपयोग दुसरी एंजिनें चालविण्याकडे होऊन त्याच्या योगानें गवत आणि घोड्याचें वैरण साफ होतें. घोड्यांची उत्तम तऱ्हेनें व्यवस्था ह्या तबेल्यांत राहते. असाच जबरदस्त कारखाना **व्हिक्टोरिया**गार्डन जवळ बांधला आहे. **मुंबई**त ह्या कंपनीचें बरेंच पिकलें आहे. ह्या तबेल्यांत घोड्याच्या दाण्यापाण्याची उत्तम व्यवस्था ठेवून त्यांस खाणेंही नियमित वेळीं देतात. घोडे बांधण्याच्या एकसारख्या लांबच्या लांब जागा असून त्यांत त्यांनीं एकमेकांस इजा देऊं नये म्हणून मधून मधून लांकडाचे तुकडे बांधिले आहेत. एक मोठें लांकडाचें पात्र करून ठेविलें असतें त्यांत दाणा शिजवून भरून ठेवितात. घोड्यास दाणा देण्याची वेळ झाल्याबरोबर घंटा वाजते. ती वाजली कीं प्रत्येक घोडेवाला आपापलीं दाण्याची भांडी घेऊन त्या दाण्याच्या पात्राजवळ हजर राहतो. मग तेथें मुकादम असतो तो प्रत्येकाचे भांड्यांत दाणा मापून टाकितो. ह्याप्रमाणें प्रत्येक कामासंबंधीं वेळ बांधिले आहेत. घोड्यांला बिछाना (शेज) घालणे, त्यांची चाकरी करणें, व त्यांस चिलटांपासून त्रास न होऊं देणे ह्या सर्व गोष्टीविषयीं विशेष खबरदारी ठेविली जाते. विशेष चमत्कार असा आहे कीं, येथें एवढे जरी घोडे आहेत तरी कोठें घाण म्हणून मुळींच नाहीं. घोड्यास धुण्याच्या वगैरे नळ घेऊन उत्तम सोई केल्या आहेत.

**२०३.** इ.स. १८६४ सालीं **मुंबई**मध्ये ट्रामवे असावी असा विचार मेसर्स **स्टर्नस** आणि **केट्रिज** साहेब ह्यांनीं काढिला व इ.स. १८६५ साली फेब्रुवारी महिन्यांत **मुंबई** म्युनिसिपालिटीबरोबर करारनामा केला; परंतु पैशाच्या टंचाईमुळे तो बेत तसाच पडून राहिला होता. पुढें इ.स. १८७० सालीं मेसर्स **स्टर्नस होबार्ट** आणि कंपनी ह्यांनीं टामवेला घोडे जोडून आपण हें काम स्वतः चालवितों ह्मणून म्युनिसिपालिटीस कळविलें; पण, त्या वेळच्या म्युनिसिपल कमिशनरानें हे प्रकरण बेंच ऑफ जस्टिस पुढें मांडलें. बेंच ऑफ् जस्टिसचा असा विचार झाला कीं हें काम म्युनिसिपालिटीनें स्वतः चालवावें. मेसर्स **लारेन्स** आणि कंपनी आणि दुसरे कांहीं गृहस्थ ह्यांनीं

ट्रामवेचे रस्ते बांधून देतो म्हणून सांगितलें. परंतु इ.स. १८७२ सालच्या म्युनिसिपल कॉरपोरेशनच्या सभेंत असें ठरलें कीं, एतद्देशीय व **लंडन** येथील वर्तमानपत्रांतून जाहिराती देऊन ह्या कामाकरितां टेंडरें मागवावीं. असें होतां होतां शेवटीं मेसर्स **स्टर्नस व केट्रिज** ह्यांचे टेन्डर कबूल झालें; व इ.स. १८७३ सालीं ह्या कंपनीबरोबर करारनामा होऊन त्यांस काम चालविण्याचा हुकूम झाला. ह्या करारांतील कलमें येणेंप्रमाणें:– तारीख १२ मार्च १८७३ पासून वीस वर्षेपर्यंत हा करार अमलांत राहील, त्यानंतर म्युनिसिपालिटीस ही कंपनी विकत घेण्याचा अधिकार आहे. हल्लीं कंपनीला म्युनिसिपालिटीस दोन गाड्यांचे रस्त्यांबद्दल दरमहा एक मैलास ३,००० रुपये व एक गाडीच्या रस्त्याबद्दल दरमहा २,००० रुपये द्यावे लागतात. हल्लीं ट्रामवेची डबल लाईन साडेसात मैल व सिंगल लाईन ३ मैल एवढी आहे व त्याबद्दल त्यांस म्युनिसिपालिटीस दरमहा २८,००० रुपये द्यावे लागतात. ह्या कंपनीच्या घोड्यांवर गाड्यांवर कर नाहीं. ह्या गाड्यांचा **कुलाब्या**पासून तों एकसारखा सरळ रस्ता **परळ**पर्यंत गेला आहे व त्यांस शहरांत पुष्कळ फांटे फुटले आहेत.

**२०४. धि बांबे ब्रांच ऑफ धि रायल एशिआटिक सोसाएटीची लायब्ररी.-** हें नांव बांबे लिटररी सोसाएटीच्या लायब्ररीला दिलें आहे. ही लायब्ररी टौनहालाच्या दुसऱ्या मजल्यावर आहे. ही शाखा इ.स. १८०४ त तर **जेम्स माकिन्टाश, मुंबई**चे रेकार्डर, ह्यांनीं स्थापन केली. ह्याच लायब्ररीला बांबे जिऑग्राफिकल सोसाएटी जोडली आहे. हिची स्थापना इ.स. १८३१ त झाली होतीं. ह्या सभेचे सभासद ब्यालट (लेखी संमती) नें पसंत करितात. प्रत्येक सभासदास वर्षाची ५० रुपये वर्गणी द्यावी लागते. ह्या पुस्तकालयांत अनेक भाषेंत नानातऱ्हेचे विषयांवर लिहिलेले ग्रंथांचा संग्रह बराच आहे. येथें ग्रंथ आहेत एवढेंच केवळ नाहीं तर, **एशिया**खंडाच्या प्रत्येक भागांतील पुरातन शिलालेख, ताम्रपट व जें जें पुरातनकाळांतील कलाकौशल्यासंबंधीं सांपडलें त्यांचा संग्रह केला आहे. त्याचप्रमाणें पुरातनकाळीं ह्या आपल्या **भरतखंडां**त जे जे शककर्ते व दुसरे राजे होऊन गेले त्यांचा शोध लावण्याप्रीत्यर्थ शेकडों वर्षामागील नाणें, शिक्के, मुद्रा जमा करून ठेवल्या आहेत. पुरातन लिपींचा शोध लावून त्या अर्थासुद्धां

सभेच्या वार्षिकइतिहासांत छापून प्रसिद्ध करितात. **मुंबई**च्या बाहेर राहणाऱ्या वर्गणीदारांस दर वर्षास पंधरा रुपये वर्गणी द्यावी लागते. जे जे गव्हर्नर **मुंबईइ**लाख्यावर येतात ते ते ह्या सभेचे आश्रयदाते असतात. ह्या लायब्ररींत **शिवाजीमहाराजां**चे चिलखत व त्यांची **भवानी** नांवाची तलवार ह्यांचा संग्रह करून ठेविला आहे.

२०५. **नेटीव जनरल लायब्ररी.**—ही लायब्ररी इ.स. १८४५ त स्थापन झाली. ह्या लायब्ररीचे मूळ उत्पादक रा. ब. **राघोबा जनार्दन** हे असून शिवाय त्या वेळचे बरेच एतद्देशीय व इंग्रज त्यांस साह्यकर्ते होते, हें पुस्तकालय हल्लीं **धोबी**तळ्यावर फ्रामजी कावसजी इन्स्टिट्यूटमध्यें आहे. ह्या पुस्तकालयांत अनेक तऱ्हेचे अनेक भाषेंत ग्रंथ आहेत. ही लायब्ररी स्थापण्याचा मूळ उद्देश गरीबलोकांस विद्येची अभिरुचि लागावी हा होय. वर्गणीदारांचे तीन वर्ग आहेत. पहिल्या वर्गाच्या वर्गणीदारांत कांहीं नियमित काळपर्यंत पुस्तकें घरी नेण्यास मिळतात. कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स ह्यांनीं ह्या पुस्तकालयास १,००० रुपये पुस्तकें घेण्यास दिले होते. आमच्या कित्येक राजेलोकांनीं ह्या पुस्तकालयांस बरीच मदत केली होती. ह्या लायब्ररींत डाक्तर **हार्कनेस** ह्यांचा पुतळा आहे. अशी पुस्तकालयें या शहरांत लहानमोठीं बरींच आहेत.

२०६. गव्हर्न्मेंट सेंट्रल बुकडिपो हें हल्लीं **काळबादेवी**च्या रस्त्यावर आहे. ह्यांत सरकारी शालोपयोगी व दुसरी अनेक भाषेंतील पुस्तकें व उत्तम तऱ्हेचे नकाशे येथें विकत मिळतात. त्याचप्रमाणें खासगी पुस्तकें विकण्याची दुकानें बरींच आहेत.

२०७. **वर्तमानपत्रें.**—गव्हर्न्मेंट सेंट्रलप्रेसांत प्रत्येक गुरुवारी सरकारचें गव्हर्न्मेंट गॅझेट नामक साप्ताहिक वर्तमानपत्र निघतें. ह्या पत्राची सुरुवात इ.स. १८३४ पासून झाली. त्याच्या पूर्वी सरकार आपलें काम बांबे कूरिअर नामक वर्तमानपत्रांत छापवित असे. ह्या कामाकरितां सरकार त्या पत्राच्या मालकास सालिना सुमारें दहा हजार रुपये देत असे. ह्याच गझेटपत्रांत सर्व सरकारी संबंधाची माहिती येते. कामदारांच्या नेमणुका, सरकारी जाहिरनामे, कायदे वगैरे छापून प्रसिद्ध होतात. ह्यांचे निरनिराळे भाग आहेत. एका भागांत सरकारी कामदारांच्या नेमणुका वगैरे, एकांत बाजारभाव वगैरे, एकांत कायदेकानू वगैरे असे निरनिराळ्या भागांत निरनिराळे विषय येतात.

२०८. **मुंबई**ंत अगदीं जुनीं वर्तमानपत्रें ह्मटलीं ह्मणजे, बांबेग्याझेट आणि कुरिअर हीं होत. बांबेग्याझेटची सुरुवात मि. **डग्लस निकलसन** ह्यांनीं इ.स. १७९० त केली आणि कुरिअर पत्राची सुरुवात मि. **विलियम आशबर्नर** ह्यांनीं सुमारें इ.स. १७९२ त केली. पुढें इ.स. १८४३ त हीं दोन्हीं पत्रें एकत्र होऊन रोज निघण्याचीं बंद होऊन आठवड्यांतून दोनदां निघूं लागलीं. असें कांही दिवसपर्यंत चाललें. पण पुढें ग्याझेटपत्राच्या मालकानें कुरिअरपत्राचा संबंध सोडून दिला व हल्लींच्या ह्मणजे ग्याझेट ह्या नांवानेंच हे पत्र इ.स. १८४९ च्या नवेंबर महिन्यापासून पुनः दररोज निघूं लागलें. ह्या पत्राचें पूर्वीचें नांव "ब्रिटिश इंडियन जन्टलमनस् ग्याझेट" हें होतें. कुरिअर हें पत्र टेलीग्राफ नामक वर्तमानपत्रकर्त्यानें विकत घेतल्यामुळें ते त्यांत सामिल झालें व इ.स. १८४७-४८ पासून टेलिग्राफ पत्र "टेलीग्राफ आणि कुरिअर" या संयुक्त नांवानें चालूं झालें.

२०९. धि बांबे टाईम्स हें पत्र पहिल्यानें मुंबईतील कित्येक व्यापारी लोकांनी शेर काढून सुरू केलें होते. ८०० रुपयांचा एक असे १६ शेर होते. ह्या पत्रास पूर्वी बांबे टाईम्स आणि जर्नल ऑफ् कॉमर्स असें नांव होतें. इ.स. १८३७ त हें पत्र सुरू झालें तेव्हा तें आठवड्यांतून दोनदां निघे. इ.स. १८५० त सप्टेंबर महिन्याच्या २ ऱ्या तारखेपासून हें पत्र दररोज निघूं लागलें. इ.स. १८६० त स्टांडर्ड ह्या वर्तमानपत्र ह्यांत सामील केल्यापासून हें पत्र "बांबे टाईम्स आणि स्टांडर्ड" नवानें प्रसिद्ध होऊं लागलें व त्याचीं चार पृष्ठें निघूं लागलीं. पण इ.स. १८६१ पासून हल्लींच्या नांवानें प्रसिद्ध होऊं लागलें. इ.स. १८८१ सालापासून ह्याचीं आठ पृष्ठें पुढें निघूं लागलीं. इ.स. १८३८ पासून "ओव्हरलंड समरी" सुरू झाली. बाहेरगांवच्या लोकांकरिता "बायविकली" इ.स. १८३९ त काढली व "विकली" इ.स. १८८१ सालापासून निघूं लागलीं. बांबे एक्सचेंज प्राईस करन्ट, आणि मनी मार्केट रिपोर्ट इ.स. १८५९ पासून सुरू झाले. "बांबे आलमान्याक आणि डायरेक्टरी" इ.स. १८४० पासून सुरू झाली. पुढें तींत बदल होतां होतां इ.स. १८६३ त "टाईम्स ऑफ् इंडिया क्यालेंडर आणि डायरेक्टरी" ह्या नांवानें मोठें उपयुक्त असें आलमान्याक निघूं लागलें.

२१०. इ.स. १७७७ त **रस्तमजी केरसासजी** नांवाच्या पारशी गृहस्थानें **मुंबईं**त प्रथमच छापखाना आणिला व ह्या छापखान्यांत पहिलें छापून निघालेलें काम इ.स. १७८० चें इंग्रजी पंचांग हें होय. इ.स. १७९० मध्ये ग्याझेट छापखाना व त्याच नांवाचें पत्र चालू झालें. अमेरिकन मिशननें इ.स. १८१३ त छापखाना घातला. इ.स. १८४० च्या सुमारास **गणपत कृष्णाजी** ह्यांनीं प्रथम शिळा छाप घातला. व इ.स. १८४३-४४ त टाईपाचा छापखाना काढला. हा गृहस्थ मोठा कुशळ व बुद्धिमान होता, ह्यानें लांकडी छापखाना स्वतः तयार केला होता ह्मणून सांगतात ! पुढें हळू हळू दुसरे बरेच छापखाने झाले.

२११. गेल्या चाळीस वर्षांत युरोपिअन लोकांची वस्ती वाढल्यामुळे इंग्रजी वर्तमानपत्राचेंही मान वाढत चाललें आहे; मराठी व गुजराथी भाषांतही अलीकडे बरींच वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें झळकूं लागली आहेत. आजमितीला **बंगाल्यांत** ३८, **मद्रासेंत** २२, **मुंबईंत** ७८ आणि उत्तर व मध्य **हिंदुस्थानां**त ६५ वर्तमानपत्रें निघत आहेत. ह्यांचा खप **बंगाल्यात** १९,३६०, **मद्रासें**त ५,७५०; **मुंबईं**त १५,५८७ व उत्तर व मध्य **हिंदुस्थानां**त १५,६०८ एवढा होत आहे. फक्त **मुंबई** इलाख्यांत १०० पेक्षां जास्त वर्तमानपत्रें नेटिवांकडून काढलीं जात आहेत. ही गोष्ट कांही अंशीं देशाच्या उत्कर्षास कारणीभूत आहे हें आतां कोणास सांगितलें पाहिजे असें नाहीं. जेवढी ज्यास वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें आमच्या येथें निघतील तेवढीं तीं ह्या कामास विशेष बळकटी आणतील. एकंदर जगांत ३४,००० वर्तमानपत्रें हल्ली चालू आहेत; त्यापैकीं १६,५०० इंग्रजीत, ७,८०० जर्मन भाषेंत; ५,८५० फ्रेंच भाषेंत व १,००० स्प्यानिश भाषेंत आहेत.

२१२. **वेधशाळा** (कुलाबा ऑब्झरव्हेटरी)—**मुंबईं**मध्यें ह्या वेधशाळेची स्थापना इ.स. १८२६ त झाली. ह्या वेळीं ह्या वेधशाळेंत जीं सर्व यंत्रें होती; तीं खगोलविद्येसंबंधी ह्मणजे अर्थात ज्योतिष शास्त्रसंबंधीं होतीं; ह्मणून, पहिल्यांनें ह्या वेधशाळेत 'अस्ट्रॉनॉमिकल ऑब्झरव्हेटरी' हें नांव देण्यांत आलें होतें; पण, पुढें इ.स. १८४० त हीं सर्व खगोलसंबंधीं यंत्रें विलायतेस रवाना झालीं व त्यांच्या ऐवजीं चुंबकाकर्षक यंत्रांचा ह्या वेधशाळेंत भरणा झाला. तींच अजून चालत आहेत; ह्मणून, हल्लींच्या

वेधशाळेचे नांव 'म्याग्नाटिकल आणि मिटिऑरॉलाजिकल ऑब्झरव्हेटरी' हें आहे. हल्लीं ह्या ऑब्झरव्हेटरींत खालीं दिलेलीं मुख्य यंत्रें आहेत :—

| | | |
|---|---|---|
| (१) ॲनिमॉमिटर | (ॲनिमोग्राफ्) | वायुदिग्दर्शकयंत्र. |
| (२) ब्यारोमिटर | (ब्यारोग्राफ्) | प्रभंजनतुलनादर्शकयंत्र. |
| (३) थरमॉमिटर | (थर्मोग्राफ्) | शीतोष्णमापकयंत्र. |
| (४) प्ल्यूव्हिओमिटर | (प्ल्यूव्हिओग्राफ्) | पर्जन्यमापकयंत्र. |
| (५) हायग्रॉमिटर | (हायग्रोग्राफ्) | वाय्वार्द्रतादर्शकयंत्र. |

शिवाय येथें एक लहानशी दुर्बिण आहे तिच्या योगानें 'सायडेरिअल क्लॉक' (सूर्याच्या अस्तोदय गतीवरून वेळा दर्शविणारे घड्याळ) बरोबर ठेविलें जातें. ह्याच घड्याळावरून **मुंबई**त जीस 'बांबे मीन टाईम' ह्मणतात ती वेळ बरोबर ठेविली जाते. इतकाच ह्या दुर्बिणीचा उपयोग. तशीच जमिनींत भुयाराप्रमाणें एक १४ हात लांबरुंद खाडा ह्मणून एक मोठी खोली तयार करून व तींत हवेचा मुळींच प्रवेश होऊं नयें ह्मणून मोठीच विलक्षण योजना केली आहे. मनुष्य आंत शिरतांच आपोआप दरवाजा बंद होतो. हा दरवाजा उघडतांना जी हवा आंत येते तिचा संबंध ह्या खोलींतील यंत्रांशीं अगदीं असूं नयें ह्मणून आंत मोठा गोमुखी सारखा रस्ता केला आहे. ह्या खोलींत हॉरिझांटल फोर्स, ब्यारोग्राफ, व्हर्टिकल फोर्स आणि डिक्लिनियेशन नामक यंत्र हीं यंत्रें ठेविली असून त्या प्रत्येक यंत्रामध्यें एकेक म्याग्नेट (लोहचुंबक) ठेविला आहे. पृथ्वी ही एक म्याग्नेट असल्याकारणानें तिच्यामध्यें निरंतर काय काय फेरफार होतात व तिची गति किती आहे, ती ह्या यंत्रांत असलेल्या म्याग्नेटाबरोबर ताडून पहावी, एवढाच ह्या यंत्रांत म्याग्नेट ठेवण्याचा उद्देश. ह्या यंत्रांत म्याग्नेट असल्याकारणानें तेथें लोखंडाचा मुळींच सांसर्ग ठेवीत नाहींत. ह्या म्याग्नेटाच्या योगानें पृथ्वीच्या चलनाच्या गतीचा नकाशा तेथें ठेविलेल्या फोटोग्राफिक कागदावर उमटला जातो.

**२१३.** वर दिलेल्या पांच यंत्रांची माहिती थोडक्यांत खाली दिली आहे :—

(१) **ॲनिमॉमिटर**.—हें यंत्र हेकले नांवाच्या एका साहेबानें तयार केले आहे. ह्या यंत्राची रचना अशी आहे—एका छिद्रयुक्त चक्रांत (Pivot)

बसविलेल्या लोखंडी दांड्यावर एक चौकट बसविलेली आहे. ह्या चौकटीच्या प्रत्येक पट्टीच्या टोंकास समतोल व समवर्तुळ अशा चार वाट्यांच्या आकाराचीं पात्रें बसविलीं आहेत. ह्या रचनेच्या योगानें त्यांस वायूचा अंमळ स्पर्श झाला कीं सहज त्या वर्तुळाकार फिरतात. ह्या फिरल्या ह्मणजे सहजच ज्या दांड्याच्या आधारावर त्या अवलंबून असतात तो दांडाही फिरूं लागतो. तो फिरतांच त्याच्याशीं संबंध असणारी इतर सर्व यंत्रें देखील फिरूं लागतात ही यंत्रें फिरूं लागलीं कीं मुद्दाम यंत्रांवर ठेवलेला कागद असतो तो फिरूं लागून त्याजवर पेनसिलीच्या रेघा उमटतात. ह्या रेघांच्या कमीज्यास्त प्रमाणावरून वायू कोणत्या दिशेनें व किती त्वरेनें वाहत आहे हें समजतें.

(२) **ब्यारोमिटर**.—हें यंत्र हवेमध्यें दाब किती आहे हें दाखवितें; ह्मणजे हवा पातळ आहे किंवा घन आहे हें दाखवितें. ही दाखविण्याची कृति वर लिहिल्याप्रमाणें कागदावर स्पष्ट लिहिली जाते. ह्या यंत्राच्या योगानें वादळें केव्हां होतील, पाऊस केव्हां पडेल वगैरे अनुमानें करतां येतात.

(३) **थरमॉमिटर**.—ह्या यंत्राच्या योगानें हवेंत सरदी किती आहे किंवा उष्णता किती आहे हें समजतें. कृति सदर्हुप्रमाणें.

(४) **प्ल्यूव्हिओमिटर**.—ह्या यंत्राच्या योगानें नियमित वेळांत किती पाऊस पडला हें समजतें. हीं यंत्रें तीन निरनिराळ्या प्रकारचीं आहेत. (१) एका चतुष्कोणाकृति पाषाणावर एक लोखंडी नळकंडें ठेवून त्यामध्यें कांहीं पाणी भरतात. त्यात एक कृतिजन्य पोकळ गोळा असतो, त्या गोळ्यांतून एक सरळ लोखंडाचा गज सदर्हु लोखंडी नळकंड्याच्या वरच्या तोंडावर आणून ठेविलेला असतो. ह्या गजावर इंच व दोकडे ह्यांचे दर्शक आंकडे व रेघा मांडलेल्या असतात. आतां, हें मात्र येथें सांगितलें पाहिजे कीं, सदर्हु गजावर शून्य अंश (झिरोपॉइंट) दर्शक जें चिन्ह असतें तें ह्या नळकंड्याच्या तोंडाबरोबर लावतात. येणेंकरून कितीही थोडा पाऊस पडला तरी देखील तो गोळा वर चढूं लागतो-ह्या योगानें गजावरील रेघा वर चढून किती पाऊस पडला हें समजतें. (२) वर सांगितलेल्या नळकंड्यांत एक बाटली ठेवलेली असते व त्या बाटलीच्या तोंडात एक

गळणी (फनेल) बसविलेली असते. ही गळणी ह्मणजे साधारण अभिषेकपात्रच ह्मटलें तरी चालेल. ह्या पात्रांत पाऊस पडला ह्मणजे अर्थात तो गळणींतून बाटलींत जातो. नंतर ती बाटली काढून त्या गळणीच्या परिघाचें व ज्या ग्लासांत त्या बाटलींतलें पाणी मोजावयाचे त्या ग्लासाच्या परिघाचें गणित करून किती पाऊस पडला ह्याचें अनुमान काढितात. (३) सुमारें १५ फूटीच्या उंचीवर वर सांगितल्याप्रमाणें एक गळणी ठेवलेली असते, तींतून जो पाऊस पडतो तो एका कांचेच्या नळींतून एका पाण्यानें भरलेल्या विस्तीर्ण पात्रांत (रिझरव्हॉयर) जातो. येथें अशी कांहीं योजना केलेली असते कीं, सदर्हु कांचेच्या नळींतून पाणी रिझरव्हॉयरमध्यें पडतांना तें पडण्याच्या गतीवरून त्याचा नकाशा कागदावर उमटतो ! ह्या नकाशावरून किती पाऊस पडला हें समजतें.

(५) **हायग्रॉमिटर.**—हें यंत्र एका प्रकारचा थरमॉमिटरच आहे. विशेष इतकेंच कीं, ह्या यंत्राच्या बोंडास नेहमीं ओलावा राहण्याकरितां ओली चिंधी गुंडाळतात; तेणेंकरून हवेंत ओलावा किती आहे हें समजतें.

**२१४.** ह्यावरील पांच यंत्रांशिवाय 'ग्राउंड थरमॉमिटर' ह्मणून आणखीं पांच यंत्रें आहेत. त्यांच्या योगानें भूगर्भी उष्णता किती आहे हें समजतें. ग्राउंड थरमॉमिटरची बोंडें जमिनींत पुरलेलीं असतात. आणखीं दुसरीं 'सनरेडिएशन थरमॉमिटर' (सूर्यरश्मि उष्णतादर्शक यंत्र) ग्रासरेडियेशन थरमॉमिटर (रात्रीस थंडी किती पडते हें ह्या यंत्राच्या योगानें समजतें) अशीं यंत्रें आहेत. तशींच म्याक्सिमम व मिनिमम थरमॉमिटर अशीं दुसरीं दोन यंत्रें आहेत. म्याक्सिमम थरमॉमिटरच्या योगानें हवेंत किती मानानें उष्णता ज्यास्त आहे व मिनिमम थरमॉमिटरच्या योगानें किती मानानें कमी आहे हें समजतें. तसेंच येथें अरिथमॉमिटर ह्मणून एक यंत्र आहे; तेणेंकरून एकपासून दशकोटीपर्यंत ह्मणजे अर्थात नऊ आंकड्यांच्या कोणत्याही दोन रकमांचा गुणाकार किंवा भागाकार होतो !

**२१५.** कांहीं दिवसांपूर्वी येथें 'टाईडगॉज' ह्मणून एक यंत्र होतें. ह्या यंत्रांच्या योगानें समुद्राच्या भरतीओहटीचें मान समजतें; पण, हीं यंत्रें अलीकडे उपयोगांत आणीत नाहींत.

२१६. **ल्युनाटिक असायलम् (भ्रांतचेतसालय)**—हें वेडे लोकांस ठेवण्याचें हॉस्पिटल ऑब्झरव्हेटरीच्या नजीक आहे. हे मोठ्या कुशळतनें बांधण्यांत आलें आहे; तरी पण, येथें पाठविलेल्या लोकांस फार सुखानें रहाण्यासारखी जागेची सोय केलेली नाहीं असें ह्मणतात. ह्या हॉस्पिटलची व तेथें असलेल्या वेड्या लोकांची व्यवस्था पहाण्याकरितां एक सर्जन असतो, तो नेहमीं तेथेंच राहतो. इ. स. १८८७ च्या खानेसुमारीच्या वेळीं ४९९ पुरुष व १६५ बायका मिळून ६६४ वेडेलोक **मुंबई**त होते; पैकीं ह्या हॉस्पिटलामध्यें २६६ पुरुष व ५६ बायका होत्या.

२१७. रस्त्यांत जे वेडे भटकत फिरतात व ज्यांच्याकडून लोकांस इजा पोहचण्याचा संभव असतो, अशा लोकांस पोलिसचे शिपाई पोलिसच्या डाक्तरच्या सर्टिफिकीटावरून ह्या हॉस्पिटलमध्यें नेऊन घालतात. येथें असलेल्या वेड्यांस ते चांगले बरे झाले ह्मणजे सोडून देतात. आपला कोणी मनुष्य वेडा झाला असून तो बाळगण्यास अगदीं अनावर होऊन गेला आहे तर, त्यास ह्या हॉस्पिटलमध्यें नेऊन टाकतां येतें. त्याच्या अन्नखर्चाबद्दल वगैरे पैसे दिले ह्मणजे झालें. ज्या कोणास आपला मनुष्य हॉस्पिटलामधून काढून आणणें आहे तर त्यास सरकारची परवानगी मिळवावी लागते व अशी हमी भरावी लागते कीं, ह्याजपासून मी कोणासही इजा होऊं देणार नाहीं. पोलिसचे मार्फत टाकलेल्या लोकांस काढून आणणें झाल्यास वरीलप्रमाणेंच लेख लिहून द्यावा लागतो.

२१८. **घारापुरी**.—**मुंबई**प्रमाणेंच **घारापुरी** हेंही पण तिच्या पूर्वेस एक लहानसें पांच सहा मैलांवर सुंदर बेट आहे. ह्या बेटाचा एकंदर परिघ चार सहा मैलांच्या आंतच होईल. इंग्रजींत ह्या बेटास 'एलिफन्टा' व तेथील लेण्यास 'एलिफन्टा केव्हज्' असें ह्मणतात. एलिफन्टा हें नांव ह्या बेटास प्रथम पोर्टुगिजांनीं दिलें असावें असें कित्येक ग्रंथकारांचे म्हणणें आहे. कित्येक असें ह्मणतात कीं इंग्रज लोकांनीं हें नांव दिलें असावें. कांहींही असो, पण, एवढें खचीत आहे कीं, तेथें कांही काळापूर्वी जो हत्ती होता त्यावरून हें नांव पडलें असावें. हा हत्ती सुमारें २०० वर्षांपूर्वी ह्या बेटाच्या दक्षिणबाजूला जेथें आगबोटींतून उतारू लोक उतरण्यास जागा होती तेथें होता. हा हत्ती मोठा अगडबंब असून काळ्या पाषाणाचा केलेला होता. **ह्यामिलटन** साहेब ह्मणतो कीं, हा हत्ती ७ फूट उंच असून

सुमारें २०० यार्डांच्या अंतरावरून पाहिलें असतां जणु काय हा जिवंतच आहे असा भास होई. इ. स. १७१२ त **पाईक** नामक एक मुशाफर असें ह्मणतो कीं, ह्या हत्तीवर दुसरा एक लहानसा हत्ती होता. इ. स. १७६० त **एनकवेटील** नामक मुशाफरही सदर्हु प्रमाणेंच लिहितो; पण इ. स. १७६४ त **नेबूर** साहेब असें ह्मणतो कीं, ह्या हत्तीच्या पाठीवर दुसरा हत्ती नसून त्याच्या पाठीवर फक्त एक दगडाचा गोळाच होता ! **ब्यासिलहॉल** साहेब ह्मणतो कीं, ह्या हत्तीवर वरील दोन्ही नसून फक्त एक वाघ होता. इ. स. १८१४ त ह्या हत्तीची मान तुटून पडली असें सांगतात; पुढें हळू हळू त्याचा एकेक भाग पडत जाऊन शेवटीं त्याचीं सर्व शकलें हल्ली व्हिक्टोरिया गार्डनमध्यें येऊन पडलीं आहेत.

२१९. आमचे लोकांनीं जें ह्या बेटास घारापुरी हें नांव दिलें आहे तें कसें निघालें असेल ह्याचा बरोबर शोध लागत नाहीं; तरी पण, हीं सर्व लेणीं गुहेंत कोरलीं असल्या कारणानें 'गुहापुरी ' 'किंवा गृहापुरी' ह्या शब्दावरून **घारापुरी** हें नांव निघालें असावें असें आह्मास वाटतें; पण, पुढें हळू हळु त्या नांवाचा अपभ्रंश होऊन सांप्रतचें नांव प्रचारांत आलें असावें.

२२०. वर सांगितलेल्या हत्तीच्या शेजारीं कांहीं अंतरावर एक पाषाणाचा घोडा होता तो अर्धा जमिनींत गेलेला इ. स. १७६३ त **फाईअर** साहेबानें पाहिला होता. ह्या स्थितींत तो इ. स. १७८२ पर्यंत होता ह्मणून सांगतात; परंतु, तो इ.स. १७८४ त कोठे जमिनींत गडप झाला किंवा कोणी फोडून नेला किंवा त्याचें काय झाले हें कांहीच निश्चयात्मक कळत नाहीं. ह्या घोड्याच्या संबंधानें **म्याकिल्न** साहेबाचें ह्मणणें असें आहे कीं, तो तेथें २०० वर्षांपूर्वी होता; परंतु, आह्मांस तर असें वाटतें कीं, ज्या वेळेस पोर्टुगिजांनीं घारापुरी स्वाधीन करून घेतली त्या वेळीं ह्या हिंदुलोकांच्या मूर्ति असाव्यात अशा समजानें सदर्हु हत्ती व घोडा हीं त्यांनीं फोडून टाकिली असावींत. हीं दोन्ही पाषाणमय विशाळ चित्रें खोदण्याच्या कामीं त्यांच्या कारागिरानें आपलें पूर्ण कौशल्य खर्चिलें होतें इतकीं हीं चित्रें सुबग होतीं असे लेख मिळतात.

**२२१. अपालोबंदरावर** किंवा **माजगांवच्या** बंदरावरून बोटींत बसून **घारापुरी** पाहण्यास निघालें तर, सुमारें अडीच तासांत मनुष्य तेथें जाऊन सहज पोंहचतें. जातांना मध्यें **दिवदिवें** (बुचर्सआयलंड) लागतें. हेंही

पण एक लहानसें बेट आहे. ओहटीच्या वेळीं **घारापुरी** हें बेट फारच विस्तीर्ण दिसतें. ह्या बेटावर नानाप्रकारचीं झाडें असून तें एका लहानशा खिंडीनें दुभागलें गेलें आहे. बोटींतून उतरलें ह्मणजे गुहेकडे जाण्याचा मार्ग किनाऱ्याच्या पश्चिमबाजूनें आहे. घारापुरी येथील लेणीं डोंगरांत कोरलीं आहेत हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं. गुहेकडे जाण्यास पाषाणाच्या पायऱ्या बांधिल्या आहेत. खालच्या पायऱ्या जरा रुंद असल्याकारणानें चढण्यास कांही बऱ्या आहेत; परंतु, जसजसें वर जावें तसतशा पुढच्या पायऱ्या आंखूड व लांब होत गेल्या आहेत तेणेंकरून वर चढतांना मनुष्यास पुरेपुरे होऊन जातें. पायऱ्या चढून झाल्या ह्मणजे मनुष्य अगदीं गुहेच्या तोंडाशीं जातें. गुहेचें तोंड ५५ फूट रुंद व १८ फूट उंच आहे. लांबी साधारण रुंदी बरोबरच आहे. येथून सुमारें ३० यार्डांवर गुहेच्या बाहेरील देखावा दृष्टीस पडतो. अंमळ पुढें गेलें ह्मणजे गुहेंतील कांहीं भाग दिसूं लागतो. गुहेंत निरंतर काळोख असल्याकारणानें आंत गेल्यावांचून तेथील देखावा स्पष्टपणें दिसत नाहीं. गुहेच्या तोंडाशीं दोन मोठ्या व दोन लहान अशा खांबाच्या रांगा आहेत व ह्यांच्या आधारावर डोंगर आहे. हे खांब फार नकशीदार असून त्यांजवर नानातऱ्हेचे मोठमोठाले पुतळे कोरले आहेत. कांहीं कांहीं तर सात सात आठ आठ फूट उंचीला भरतील असे आहेत. येथून पुढें गेलें ह्मणजे मुख्य देवालय लागतें. देवळाचा आकार साधारण स्वस्तिकाप्रमाणें आहे. येथें अवाढव्य खांबांच्या चार रांगा लागतात. हे सर्व खांब सारखे समांतर रेषेंत आहेत. ह्मणजे मुख्य दरवाजापासून तों देवळापर्यंत एकसारखे तीन मंडपच पसरून दिले आहेत कीं काय असा भास होतो. हें देवालय १२० फूट लांब व तितकेंच रुंद आहे. ह्यांत देवालयाच्या बाहेरील दोन्ही बाजूच्या देवड्या वगैरे व बाहेरील खोल्या धरल्या नाहींत. आतां बहुतेक खांबांचे तळवट व बराच वरचा भाग पाण्यानें धुपून गेला आहे. फक्त मधून मधून खांबाचे तीर व मथाळे वगैरे कांहीं भाग डोंगराच्या आधारानें आहेत ते आहेत. मुख्य मूर्ति व ह्या देवळाच्या भिंतींत कोरलेलीं बहुतेक चित्रें हीं अगदीं मोडकळीस आलीं आहेत. गुहेंत जे खांब कोरले आहेत ते समप्रमाणांत नसून त्यांच्या जाडींत व उंचींतही फरक आहे. कित्येकांचे तळवट ३ फूट व कित्येकांचे ३ १/२ फूट जाड आहेत. कित्येक साधारण

१३ फूट व कित्येक साधारण १६ १/२ फूट असे एकमेकांपासून दूर आहेत. सदर्हूप्रमाणेंच गुहा देखील कित्येक ठिकाणीं १५-१६ व कित्येक ठिकाणी १७-१७ १/२ फूट उंच आहे. देवळाच्या समोरासमोर दोन लहान लहान अंधारमय कोठड्या आहेत. तेथें दिवसास देखील इतका अंधार असतो कीं दिव्याच्या उजेडावांचून कांहीच दिसत नाहीं. देवळाच्या पुढें जी त्रिमूर्ति आहे ती १९ फूट उंच आहे. येथें एक मोठा स्त्रीचा पुतळा आहे तो बहुतकरून **पार्वती**चाच असावा असा आमच्या लोकांचा समज आहे. हा पुतळा एकस्तनी आहे. **नेबूर**साहेब ह्या पुतळ्याला 'आमेझान' असें ह्मणतो. देवळाच्या उजव्या आंगाला एका आंत खोदलेल्या लहानशा देवळींत शिवलिंग आहे. ह्याच्याच जवळ योनी आहे. ह्या देवळीस चार बाजूला चार दरवाजे आहेत. ह्या गुहेच्या भिंतींत अनेक चित्रें कोरलीं आहेत; परंतु, त्यांतील बहुतेक आतां छिन्नभिन्न होऊन गेलीं आहेत.

२२२. **घारापुरी.**—येथील लेणीं कधीं व कोणी कोरली असावींत ह्याविषयी खात्रीलायक कांहींच शोध लागत नाहीं. कित्येक ह्मणतात हीं १२ व्या व १३ व्या शतकांत कोरलीं असावींत **म्याIन** साहेब त्यांस १० व्या शतकांत नेऊन टाकतात. कित्येक ह्मणतात कीं, हीं लेणीं ८ पासून १२ व्या शतकाच्या दरम्यान कोरलीं असावींत; **गार्शिआ डी ओर्टा** (इ. स. १५५०) **लिंकाटन** (इ. स. १५८३) हे दोन्ही गृहस्थ असें ह्मणतात कीं, हीं कृत्यें **चिनी** लोकांची असावींत. कित्येक ह्मणतात, तीं **पांडवांची** असावींत; व कित्येक ह्मणतात **जैनां**चीं असावींत. शकाच्या संबंधानें पाहूं गेलें तर ही कृत्यें निदान चार हजार वर्षांपलिकडचीं असावींत असा तर्क बांधण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं ; कारण, हीं लेणीं **पांडवां**च्या हातचींच असावींत असा आमच्या लोकांचा समज आहे, तेव्हां अर्थात जेवढीं वर्षे आज पांडवांस होऊन गेलीं असतील तेवढीं वर्षे तरी निदान ह्या लेण्यांस असलीं पाहिजेत. हा समज खरा असल्यास हीं लेणी **जैनां**ची नव्हेत किंवा **चिनी** लोकांची नव्हेत तर, आह्मा **हिंदु**लोकांचींच आहेत हें सिद्ध होतें. शिवाय मूर्तीची ढब, देवळांची वगैरे बांधण्याची तऱ्हा, मूर्तीवरील दागिने, पोषाख वगैरे पाहिले ह्मणजे हीं कृत्यें हिंदूंचींच आहेत असें ह्मटल्यावांचून राहवतच नाहीं. आतां, येथें असलेली लेखशिला कीं जिच्यावर हीं लेणीं कोणी खोदली व कधीं बांधिलीं वगैरे मजकूर होता

ह्मणून सांगतात व जी पोर्टुगिजांनी **लिसबन** येथें नेऊन टाकिली आहे ह्मणून ऐकण्यांत येतें ती शिला आज असती तर, वर जे अनेकांचे अनेक तर्क ह्मणून दिले आहेत त्यांतून खरा कोणता व खोटा कोणता हे जाणण्यास मोठेंच साधन होतें.

२२३. **बंदरें**—कोणत्याही शहराच्या उत्कर्षाचे व व्यापाराच्या भरभराटींचे मूळ कारण म्हटलें म्हणजे बंदरें हींच होत. तेव्हां अर्थात बंदरांचा जेवढा ज्यास्त बंदोबस्त व त्यांची जेवढी ज्यास्त सुधारणा करावी, तेवढी व्यापारीलोकांत ज्यास्त सोयकर होऊन व्यापाराची समृद्धि सुगम होत जाते, हें निराळें सांगणें नको. इ.स. १७२४ सालीं पावसाळ्यांत बंदराची जागा **ठाण्या**जवळ होती असें समजतें. तसेंच हल्लींची बंदराची जागा किल्ल्यापासून बऱ्याच अंतरावर होती. हल्लीं **मुंबई** शहराप्रमाणें दुसऱ्या कोठेंही अशी बंदरांची सोई नसेल असें आह्मांस वाटतें. **मुंबई** शहर जें आज व्यापाराच्या सोई करतां इतकें प्रसिद्धिस आले आहे तें केवळ त्याच्या उत्तम बंदरांच्या योगानेंच आलें आहे हें म्हणणें केवळ धाडसाचें होईल असें आह्मांस वाटत नाहीं.

२२४. इ.स. १८८१ त १७ मे व ७ डिसेंबरच्या सरकारी जाहिरनाम्यांन्वये कोणत्या बंदरीं कोणता माल चढवावा किंवा उतरवावा याविषयीं जो सरकारचा ठराव झाला आहे, त्याचा तपशील येणेंप्रमाणें :—

**पायलट बंदर.**—फक्त कोळसे.

**टॉड बंदर.**—गवत, फांटें, सर्पण, चुना वगैरे.

**ससून डॉक.**—कापूस, अळशी वगैरे.

**व्हिक्टोरिया बंदर.**—कापूस, लोंकर, सर्व हिंदुस्थानांतील बीं, गवत, सर्पण, मच्छी, कोळसा, विटा, कौलें, चुना, रेती, दगड, शिंगे, एरंडेल तेल, लोखंड, ताग, चिंध्या वगैरे.

**गनक्यारिएज बंदर.**—किरकोळ माल, बी. बी. आणि सी. आय्. व जी. आय्. पी. रेलवेचें सर्व सामान व कोळसा, गनक्यारिएजचें लाकूड व कोळसा, मच्छी व रेलवेचें सर्व सामान.

**जमशेटजी बंदर.**—कापूस, लोंकर, कोळसा, ताग वगैरे.

**आर्थर बंदर.**—कापूस, लोंकर, इतर जकात रहित माल वगैरे.

**गव्हर्मेंटकोल डिपो.**—फक्त सरकारी कोळसा.

**अपालो बे रिक्लेमेशन**.—कापूस, लोंकर, कोळसा, गवत, पेंढा, सर्पण वगैरे.

**अपालो बंदर**.—फळफळावळ, बर्फ, तिजोरी, मिलिटरी, सामान आणि सरकारी घोडे.

**गव्हर्मेंट डॉकयार्ड**.—फक्त सरकारी माल.

**टौन बंदर**.—सर्व जकांतरहित माल, सर्व परकीय देशांतून आलेला बोटींवरील व गलबतांवरील माल, गवत, पेंढा, सर्पण, लांकूड (सर्व प्रकारचें), बांबू, विलायती कोळसा, झांप, धान्य (सर्व प्रकारचें) इमारती दगड, रिकामीं पिंपें, नांगर, ताग, कच्चा कापूस, लोखंडी व लांकडी टांक्या, विटा, कौलें, मच्छी मारण्याचीं जाळीं, भाजीपाला व इतर फळफळावळ, बंदुकीची दारु, तार, डामर, केरोसिन तेल, व सर्वप्रकारची ज्वालाग्राही तेलें, व आसिदें, तरपेंटाईन, कातडीं, खडू, डांबर, गोणपाट, रेड्यांची शिंगें, लोखंडी कांबी, पत्रे, बायलर्स, चुनखडी, आगकाड्यांच्या पेट्या, सर्वप्रकारची यंत्रें वगैरे वगैरे.

**आर्सेनलव्हार्फ**.—लष्करी सामान.

**मोदी बे**.—चुना, रेती, विटा, दगड, गवत, फळफळावळ, कोळसा वगैरे.

**बोरी बंदर**.—जकातरहित माल, भाजीपाला, फळफळावळ, चुना, गवत, पेंढा वगैरे.

**पावडरवर्क्स बंदर**.—अफू, दारु, तंबाकू, मीठ, वाळलेले मासे खेरीज करून सर्वप्रकारचा एतद्देशीय माल.

**टांक बंदर**.—इमारती लांकूड.

**फ्रिअरल्यांड** आणि **पायर कंपनीचें बंदर**.—गवत, सर्पण, कोळसा, चुना, कौलें, दगड, हाडें, विटा, इमारती, रेती, कातडीं, शिंगें, मातीचीं भांडीं वगैरे.

**कांडली ब्याटरी**.—सर्पण, गवत, तट्ट्या वगैरे.

**पोर्ट ट्रस्ट पावडर म्यागझिन, शिवरी**.—बंदुकीची दारु व बंदुकीचें इतर सामान.

**हाजी इसा फडलाचें बंदर**.—मासळी, कातडीं, हाडें, रेती, दगड, कोळसे वगैरे.

**शिवरी बंदर.**—सर्पण, गवत, तट्ट्या, मडकीं वगैरे

**गव्हर्मेंट पावडर म्यागझिन, शिवरी.**—बंदुकीची दारु.

**शींव बंदर.**—सर्पण, गवत, मडकीं, सुके मासे, कौलें वगैरे.

**माहिम बंदर.**—बिनजकाती माल.

**वरळी बंदर.**—ताजे मासे, जाळीं, सर्पण, चाबुक, चुना, गवत कौलें वगैरे.

**चौपाटी बंदर.**—सर्पण, कौलें, चुना, ताजे मासे, दगड वगैरे.

**मुडी बंदर.**—सर्वप्रकारचा जकातरहित माल, लोखंडी यंत्रें, कापूस, लोंकर, कोळसा वगैरे,

**कारन्याक बंदर.**—(निकल बसीनसुद्धां) एतद्देशीय व्यापाऱ्यांनीं तयार केलेला माल, कस्टमचा माल वगैरे.

**मशीद बंदर.**—एतद्देशीय व्यापाऱ्यांनीं तयार केलेला माल. ह्या बंदरांतून अफू, मीठ, दारु, मासळी, रेती, विटा, कौलें, चिंध्या व बांबू पाठविण्याची व आणण्याची मनाई आहे.

**प्रिन्सेस डॉक**—बंदुकीच्या दारुशिवाय इतर सर्व बिनजकाती माल.

**म्यालेट बंदर**—मीठ, दारु, तंबाकू व एतद्देशीय माल खेरीज करून कोळसे व इतर सर्व बिनजकाती माल.

**फ्रिअर बसीन बंदर**—जी.आय.पी. रेलवेचें सर्व सामान.

**क्लार्क बंदर**—परवानगीनें आणलेला कोळसा.

**बी.आय्.एस्.एन्. कंपनीची डॉकयार्ड**—ह्या कंपनीचाच माल.

**कासारा बंदर**—इमारतीचीं लांकडें.

**माजगांव बंदर**—तिजोऱ्या, मासळी व सर्पण वगैरे. येथील गोदीमाजी आगा महमद रहीम शिराजी ह्यांनीं बांधिली. पूर्वी येथें किल्ला होता. ह्या गोदींत हल्लीं पी. आणि ओ. कंपनीच्या आगबोटी असतात.

पी. आणि **ओ. कंपनीची डॉकयार्ड**—फक्त ह्या कंपनीचाच माल.

२२५. **गनक्यारिएज बंदर**—हें बंदर सरकारानें बी. बी. आणि सी. आय्. रेलवे कंपनीचें स्वाधीन केलें. व त्यांनी तेथें **मुंबईचें** शेवचें स्टेशन **कुलाबा** हें बांधिले आहे. येथेंच इ.स. १८२३ सालीं गनक्यारिएज ऑफिसाचा कारखाना सुरू झाला. ह्या कारखान्यांत तोफा, गोळे, तोफांचे गाडे व अनेक तऱ्हेंचें लोखंडी व पितळी ओतींव काम करितात. बिडाचे नळ व लोखंडी कामही येथें तयार होतें.

२२६. **अपालो बंदर**—ह्या बंदरांतून उतारू वगैरे इ.स. १८१९ पर्यंत जात नसत; परंतु सरकारानें ४,५०,००० रुपये खर्च करून ही जागा वाढवून धक्के वगैरे बांधून उतारू लोकांची उत्तमप्रकारे सोई केल्यामुळें बाह्य देशीं जाणारे लोक ह्याच बंदरांतून जातात. ह्या ठिकाणी इंग्रजां-करितां एक उपहारगृह बांधिलें आहे. ह्याच बंदरांत सरकारी " मेल " उभी रहाते. अपालो रिक्लेमेशन ह्मणून ह्याच्याच शेजारी दुसरें एक बंदर आहे.

२२७. **बोरी बंदर**—हें बंदर किल्ल्याच्या तटाच्या बाजूस आहे. पूर्वी येथे होडींतून उतारू उतरत असत; परंतु तेथें खडक फार असल्याकारणानें त्यांस फार त्रास पडे; तशीच गाडी येण्याची अगर माल उतरण्याची मोठी पंचाईत पडे; कारण एका बाजूला एक लहानशी टेंकडी व आसपास मोठ-मोठाले खडक होते. पण इ.स. १८५२ च्या सुमारास येथील टेंकडी खडक फोडून टाकून धक्का बांधला, तेणेंकरून हल्ली मोठमोठालीं जहाजें येथे येऊं लागलीं आणि बहुत व्यापार सुरू झाला.

२२८. बोरी बंदरावरून **माजगांवास** जातांना हीं बंदरें थोड्याथोड्या अंतरावर लागतात.

- [1]कारन्याक बंदर
- क्लेर बंदर
- मशीद बंदर
- एल्फिस्टन बंदर.
- वाडी बंदर.
- म्यालेट बंदर

कारन्याक व क्लेर हीं दोन्ही बंदरे मयत **हरिचंद्र लक्ष्मणजी** ऊर्फ **भाऊ रसूल** ह्या नांवाच्या एका प्रसिद्ध परभू गृहस्थानें बांधली आहेत. हीं बंदरें 'भाऊचा धक्का' ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत. असें सांगतात कीं, हे दोन धक्के

---

१. ह्याच बंदराचे शेजारीं कांहीं वर्षांपूर्वी एक गुरांचा कोंडवाडा होता. असाच कोंडवाडा गिरगावांत आहे. ह्या कोंडवाड्यास इंगजींत (Pound) पौंड ह्मणतात. मराठींत ह्या शब्दाचा अपभ्रंश करून ह्यास 'पवन' ह्मणतात. ह्या पौंडात शहरात भटकत फिरणारीं अगर कोणाचीं चुकून गेलेली गाई, ह्मशी, शेळ्या वगैरे जनावरें नेऊन कोंडतात. ह्या पौंडातून मालकास आपलें जनावर सोडवून आणणें झाल्यास जितके दिवस तें जनावर तेथें असेल, तितके दिवसांचा त्याच्या दाण्यापाण्याबद्दल दिवसास अमुक पैसे याप्रमाणें जितके पैसे होतील तितके मालकाकडून घेतात. एक दोन दिवसांवर कोंडवाड्यांत जनावर राहिलें तर पोलीस कमिशनरच्या ऑफिसांत नेऊन तेथें त्यांचे जाहिर लेलांव पुकारलें जातें. ह्या पौंडावर जो मुख्य ऑफिसर असतो त्यास 'पौंड कीपर' ही संज्ञा आहे. हा ऑफिसर युरोपियन असतो. ह्याच्यावर मुंबई पोलिस कमिशनरचा हुकूम चालतो.

बांधण्यास ८-९ लाख रुपये खर्च झाला आहे. क्लेर बंदर हे माजी गव्हर्नर **अर्ल ऑफ् क्लेर** ह्यांच्या कारकीर्दीत बांधले गेले; ह्मणून ह्यास त्याचें नांव देण्यांत आलें आहे. तसेंच **सर जेम्स रिव्हेट कारन्याक** ह्या गव्हर्नराच्या कारकीर्दीत कारनाक बंदर बांधलें गेलें ह्मणून, त्यास त्याचेंच नांव दिलें आहे. मशीदीच्या खालीं बंदर आहे ह्मणून त्या बंदरास मशीद बंदर ह्मणतात. क्लेर बंदरापुढें नवरोजी हिल् ऊर्फ डोंगरी आहे. तिच्याच खालीं एल्फिस्टन बंदर आहे. येथें पूर्वी नुसती खाडी होती ती भरून काढण्यासच १,६७,००० रुपये खर्च झाला आहे. हें बंदर **लॉर्ड एल्फिस्टन** यांचे कारकीर्दीत ह्मणजे १८५८ त बांधलें गेलें ह्मणून ह्या बंदरास त्यांचे नांव दिले आहे. हें बंदर तसेंच वर दिलेले भाऊचे धक्के हे शहरांतील केरकचरा टाकून भरले गेले आहेत.

२२९. **आयस्टररॉक आणि बंदराचें संरक्षण—सेंट जॉनचर्च**च्या नजीक आयस्टर रॉक आहे. हें ठिकाण **मुंबई** बंदराच्या बचावाकरतां तयार करण्यांत पुष्कळ रुपयांचा खर्च झाला आहे. दहाबारावर्षांपूर्वी ह्या 'हार्बरडिफेन्स' करितां सहा निरनिराळीं कामें करण्याचें सरकारानें योजिले होतें; पैकीं मुख्य ह्मटले ह्मणजे, किनाऱ्यापासून १,८०० यार्डांवर मध्य ठिकाणीं एक मोठा किल्ला बांधण्याचें काम हें होय. ह्या किल्ल्यावर बारा तीनशें पौंडर व दोन सहाशें पौंडर अशा दोन तोफा ठेवण्याचें योजिलें होतें ह्याकरितां पायाही भरतीच्या पाण्यापेक्षां कांहीं इंच अधिक उंच असा बांधून तयार झाला आहे. दुसरा किल्ला किनाऱ्यापासून १,००० यार्ड अंतरावर बांधावयाचा विचार होता. ह्याचाही पाया बांधून तयार झाला आहे व ह्यावर १० आणि १९ इंच तोफांची ब्याटरी आहे. तिसरें काम **क्रॉसआयलंड**वर किनाऱ्यापासून १,००० यार्ड आणि मध्यापासून ४,००० यार्ड अंतरावर एक ब्याटरी बांधावयाची होती. ह्या ब्याटरीवर ७ तीनशें पौंडर तोफा ठेवण्याचा विचार होता. ह्या लहानशा बेटाचें टोंक तोडल्यामुळें जी सपाटी झाली

त्या सपाटीवर सहा तोफांची ब्याटरी ठेविली आहे. 'व्टेल्व्ह फूट प्याच टावर' वर मध्यजमिनीपासून ४,००० यार्डांवर दोन ६०० पौंडर तोफा ठेवाव्या असा विचार आहे. मलबारपॉईंटवर पांच ७ इंच गन्स "एन् बारबाटे" नांवाची ब्याटरी आहे. त्या ठिकाणीं एक टॉवर उभारण्याचा बेत असून त्यावर दोन ३०० पौंडर तोफा राहतील असा मनोरा करून **ब्याकबेचा** बचाव करण्याचा विचार आहे. **कुलाबा**पॉईंटवर चार ६८ पौंडरच्या "एनब्यारबाटे" आणि ४ तेरा इंच 'ल्यान्डसर्हिसमॉर्टर्स' नांवाच्या तोफा आहेत. दोन लोखंडी मुख्य तोफा "आबिसीनिआ" व 'मागडाला' **मुंबई**बंदराच्या बचावाकरितां ह्मणून इ.स. १८७१ सालीं आणल्या आहेत. ह्या हार्बरडिफेन्सबद्दल **कर्नल जरव्हाईस** ह्यानें सरकारास इ.स. १८७२ सालीं रिपोर्ट केला होता. त्यांत त्यानें असें दाखविलें आहे कीं, दर्यामध्यें फिरणाऱ्या आरमारांच्या नानाविध कामांमुळें बंदराच्या संरक्षणाकरितां फक्त त्यांवर अवलंबून राहणें फार धोक्याचें काम होय. ह्मणून आरमारावर अवलंबून न राहतां बंदरें व कोळसे ठेवण्याचीं ठाणीं हीं फार सुरक्षित ठेविलीं पाहिजेत. समुद्रांत फिरणाऱ्या ब्याटरी जरी पुष्कळ अंशी बंदरांच्या संरक्षणासाठीं उपयोगी पडतात, तरी त्यांजवरच अवलंबून रहाणें हे चांगलें नाहीं. ह्याप्रमाणें बंदराच्या संरक्षणाकडे अनेक वेळीं अनेक युक्तिप्रयुक्ती करून लक्षावधि रुपयांचा खर्च करून शहरांचें संरक्षण आमचें सरकार करीत आहे. शहराच्या संरक्षणाच्या संबंधानें **कर्नल जरव्हाईस** ह्याचें आणखी असें ह्मणणें होतें की, आयस्टररॉकपासून ६,००० यार्डवरून तसाच मध्यभूमीपासून ४,००० यार्डवरून आणि तसेंच ५,२०० यार्ड आयटररॉकवरून व्टेल्व्हफूटप्याचवरून शहरांत शत्रू येऊं शकेल; ह्मणून बंदरकिनाऱ्याच्या तोंडावरच दोन वर्तुळाकार किल्ले बांधावे; एक **कुलाबा**पाईंटपासून ३,९०० यार्डांवर ३३ फूट पाण्याच्या खोलींत व दुसरा १० फूट प्याचवर **करंजा**पासून ४,००० यार्डांवर आणि प्रत्येकावर १८-२५ टनाच्या तोफा ठेवाव्या, ह्मणजे हे दोन्ही किल्ले एकमेकांपासून ५,४०० यार्डाच्या अंतरावर असावे. तिसरा-**कुलाबा**पॉईंटवर, असे तीन किल्ले बांधिले ह्मणजे शहराचें संरक्षण चांगल्या तऱ्हेने होईल. येवढा बंदोबस्त असतांही कदाचित शत्रु आले तरी ह्या दोन्ही किल्ल्यांवरून त्यांचा नाश होण्याचा संभव आहे. शिवाय दोन ब्याटरी आणि तीन

गनबोटी बंदरात फिरत्या ठेवाव्या ह्मणजे शहर व बंदर ह्यांच्या बंदोबस्ताकडे पहावयास नको. इतक्या सर्व कृत्याला—९३,२५,००० रुपयें खर्च होईल असा अदमास होता. ह्या गोष्टींचा विचार करण्यासाठीं अजून एक कमिशन बसलें आहे असें ह्मणतात. ह्या शहराच्या संरक्षणाकरतां मुख्य दोन गोष्टी केल्या पाहिजेत. त्या ह्या—पहिली, दारूगोळ्याचा उत्तम पुरवठा व दुसरी, बंदराचें मजबूत संरक्षण.

२३०. **डॉकयार्ड** व **डॉक्स** (गोदी)—पहिल्यानें गोदी बांधण्याचें काम **जेरल्ड आंजिअर** ह्यांच्या कारकीर्दीत सुरू झालें. हल्लीं अपालों बंदर आणि कस्टम हौस ह्यांमध्ये एकंदर ५ गोदी आहेत, पैकीं दोन मोठ्या आहेत, त्या जवळ जवळ असून बाजूला स्टिम फ्याक्टरी आहे. स्टीम फ्याक्टरीपासून ज्या तीन गोदी आहेत त्या फार पुरातन आहेत. त्यांस ओल्ड बांबे डॉक (मुंबईची जुनी गोदी) मिडल ओल्ड बांबे डॉक (मधली जुनी मुंबईची गोदी) आणि लोअर ओल्ड बांबे डॉक (खालची जुनी मुंबईची गोदी) असें ह्मणतात. ह्या इ.स. १७३६ त बांधल्या आहेत. वरची गोदी (अपर डॉक) ही २०९ फूट लांब व ४७ फूट ७ इंच रुंद; मिडल डॉक १८३ फूट लांब व ५१ फूट १० इंच रुंद; लोअर डॉक २५६ फूट लांब व ५१ फूट १० इंच रुंद असा त्यांचा विस्तार आहे. वर सांगितलेल्या दुसऱ्या दोन गोदी आहेत त्यांस डंकन गोदी ह्मणतात. ह्या इ.स. १८१० त बांधल्या आहेत. वरची डंकन डॉक २८६ फूट लांब आणि ६३ फूट १० इंच रुंद आहे. पहिल्यानें हिची लांबी २१६ फूट होती; परंतु इ.स. १८४५ त ३० फूट आणि इ.स. १८४९ त ४० फूट वाढविली. लोअर डंकन डॉक २४६ फूट लांब आणि ६३ फूट १० इंच रुंद आहे. येथें १७ फूट खोल पाणी आहे. गोदीच्या तोंडाशींच चिखल बसतो तो काढावा म्हणून चिखल उपसण्याच्या बोटी नेहमीं बंदरांत फिरत्या असतात. ह्या मोठ्या पाहण्यासारख्या असतात. एकदां जहाज गोदींत शिरलें म्हणजें तें १८ फूट पाण्यावर तरंगत असतें. एकाद्या बोटीस ज्यास्त खोलींचें पाणी लागत असलें तर भरतीच्या वेळीं पाणी उंच झाल्याकारणानें तिला गोदींत सहज नेतां येतें. इ.स. १७३६ चे पूर्वी हल्ली जेथें अपर ओल्ड बांबेडॉक आहे, तेथें मातीचें डबकें होतें; परंतु त्यांत भरतीच्या वेळीं लाटांचे पाणी येत

असे. चांचे लोकांच्या त्रासानें ईस्ट इंडिया कंपनीनें इ.स. १६७३ सालीं लढाऊ गलबतें बांधलीं. इ.स. १७३५ चे पूर्वी कंपनीचें मुख्य ठाणें **सुरत** येथें असल्यामुळें त्यांनी तेथें वखारी वगैरे बांधल्या होत्या; परंतु **मुंबई** बंदरांत पाणी विपुल असून गोदी बांधण्याची उत्तम सोई आहे असें पाहून त्यांनी आपलें ठाणें तेथून **मुंबईस** आणिलें. हल्ली जेथें डॉकस् आहेत ती जागा कंपनीसरकारनें इ.स. १७३५ सालीं पसंत केली. इ.स. १७६७ सालीं ही गोदी वाढविली पण, पुढें इ.स. १८०५ सालीं तर फारच विस्तीर्ण केली. ही डॉकयार्ड सुरू झाल्यापासून येथें मोठमोठालीं लढाऊ गलबतें बांधलीं जातात. आजपर्यंत रॉयल नेव्हीकरितां १९ लढाऊ गलबतें बांधली गेलीं. शिवाय लहानसहान बरीच बांधलीं आहेत. २९ तर ईस्ट इंडिया कंपनीकरितां, १७ इंडियन नेव्हींकरितां व ६६ व्यापारी लोकांकरितां. इ.स. १८४० पासून आगबोटी, पायलटबोटस् वगैरे बरींच बांधण्यात आलीं. इ.स. १८५४, 'आसई' व 'पंजाब' नांवाच्या दोन मोठ्या आगबोटी बांधल्या गेल्या; परंतु पुढें असलीं मोठमोठालीं जहाजें विलयतेंत तयार होऊं लागलीं तेव्हा जहाजास लोखंडाचा उपयोग करू लागले. हल्लीं साधारण बोटी येथें बांधल्या जातात.

**२३१.** इ.स. १७३६ त जेव्हां पहिल्यानें ईस्ट इंडिया कंपनीनें **मुंबईत** गोदी बांधल्या त्यावेळीं जहाज बांधण्याकरतां येथें कारागीर नसल्याकारणानें **लवजी नसरवानजी** नांवाचा एक पारशी गृहस्थ **सुरत** येथें कंपनीचीं जहाजें बांधण्याच्या कामावर होता त्यास तेथून **मुंबईस** आणिलें. **लवजी** हा ह्या कामांत हुशार, दक्ष व निपुण असा होता. त्यानें मास्टरबिल्डर (मुख्य गलबतें बांधणारा) चें काम ३८ वर्षेपर्यंत केलें व तेव्हांपासून आजपर्यंत त्याचे वंशज तेंच काम करीत आहेत. ह्या प्रसिद्ध गृहस्थाच्या कुळाचें नांव वाडीया आहे वाडीया म्हणजे जहाजें बांधणारा. ह्यांच्या घराण्यांतील पुरुषांस मोठमोठ्या साहेबलोकांकडून मानपत्रें व सनदा मिळाल्या आहेत. डॉकयार्ड किंवा मरीनयार्ड ही गोदी हल्लीं आहे तेथेंच पूर्वीपासून होती. अलीकडे तिच्या आसपास ज्या इमारती बांधण्यांत आल्या आहेत व जी दाट वस्ती होत चालली आहे, तशी पूर्वी तेथें मुळींच नव्हती. पूर्वीची ड्रायडॉकही अजून तशीच आहे. सेलर होमच्या जवळची गोदी हिची बरोबरी करूं शकत नाहीं.

२३२. **कलकत्त्या**च्या किडरपोर डॉकयार्डपेक्षां **मुंबई**ची डॉकयार्ड सहा पटीनें मोठी आहे. ह्या डॉकयार्डनें पूर्वी ६,००,००० चौरसयार्ड जमीन व्यापिली होती; परंतु सेलर्सहोम बांधलें तेव्हां १,५०,००० चौरसयार्ड जमीन त्या इमारतीकरितां घेतली.

२३३. **प्रिन्सेसडॉक**—ता. ११ नोव्हेंबर १८७५ इसवी रोजीं ह्या गोदीच्या पायाचा दगड युवराज **प्रिन्स ऑफ् वेल्स** ह्यांनीं बसविला. ही इ.स. १८७९ सालीं बांधून पुरी झाली व त्याच वर्षाच्या एप्रिल महिन्याचे १० वे तारखेस **सर रिचर्ड टेंपल** ह्यांनीं ही गोदी उघडून मोठ्या समारंभानें पाणी आंत घेतलें. सर्व **एशिया**खंडामध्यें हीच डॉक मोठी असून फार सोईवार आहे. हिची लांबी १,४६० फूट असून रुंदी १,००० फूट आहे. आंत पाणी घेतलेली जागा ३० एकर असून तेथें मोठमोठे धक्के बांधले आहेत. आंत मोठमोठीं ३० जहाजें येऊं शकतात. ह्या गोदीस एकंदर खर्च ६७,४३,३९७ रुपये झाला आहे. हिला ६० फूट रुंदीचे दोन दरवाजे आहेत. ह्या गोदीच्या जमिनीपैकीं एलफिन्स्टन कंपनीनें ३८६ एकर जमीन आधींच भरून काढली होती. तिचा तपशील येणें प्रमाणें :—

| | |
|---|---|
| जमीन बांधून काढली ती— | २७६ एकर |
| धक्के बांधले— | ६५ एकर |
| जुनीं बंदरें ह्यांत मिळविली ती— | ४५ एकर |
| | ३८६ |

पैकीं सरकारास ८६ एकर जमीन फुकट मिळाली. तसाच सुमारें एक मैलपर्यंत धक्का बांधलेला मिळाला. ह्याप्रमाणें फक्त कायती ६ एकर जमीन सरकारास बांधण्याचा खर्च बसला; पैकीं जी. आय्. पी. रेलवेला कांहीं भाग कंपनीचे गुड्सस्टेशन बांधण्याकरितां दिला त्याच्याकरितां एलफिन्स्टन कंपनीला ६५ लक्ष रुपये खर्च झाला. येथें लांकडाच्या, चुन्याच्या व गवताच्या पुष्कळ वखारी आहेत. व अलीकडे तांदळाचा व्यापारही बराच होतो. व्यापारी लोकांस त्यांच्या वखारी बांधण्याकरितां २ एकर जमीन दिली आहे.

२३४. या गोदींत गेलें ह्मणजे अपूर्व देखावा दृष्टीस पडतो. कोठें आगबोट गोदींत येत आहे; कोठें आंत आलेल्या बोटीतून सामान सुमान

काढण्यांत लोक गुंतले आहेत; कोठें बोटी धुऊन स्वच्छ करण्यांत बोटीवरील लोक गुंतले आहेत; कोठें बोटींची दागदुजी चालली आहे; कोठें आंत सामान सुमानाच्या गाड्या (खटारे) आंत येत आहेत, कोठें गोदींतून माल बाहेर नेत आहेत अशी एकच गडबड चाललेली पाहून नवखा मनुष्य तर अगदीं चकीत होऊन जावयाचा ! बोटी आंत येण्याकरितां जों 'फ्लाइंग ब्रिज' (पाहिजे त्या वेळीं काढतां किंवा घालतां येणारा) ह्मणून जो पूल केला आहे तो सहज एक दोन मनुष्यें कळसूत्र फिरवून कसा ओढून घेतात व पुनः पूर्ववत जशाचातसा कसा सोडून देतात वगैरे चमत्कार तर फारच अपूर्व असून घटकाभर मनुष्यास अचंब्यांत पाडण्यासारखे आहेत ! ही कृति पाहिली म्हणजे तिच्या कर्त्यास त्याच्या कर्तबगारीबद्दल धन्यवादच द्यावा लागतो. असो. साधेल त्यानें असलीं कामें अवश्य पहावीं.

२३५. **व्हिक्टोरिया डॉक**—ही गोदी **प्रिन्सेस** डॉकच्या शेजारीं बांधली आहे. हिची रचना बहुतेक **प्रिन्सेसडॉक** प्रमाणेंच आहे. ह्या गोदींत पाणी येण्याचा समारंभ **लेडी रे** ह्यांनीं गव्हर्नर साहेब व इतर बडेबडे नागरिक लोक यांच्या समक्ष ता. २२ फेब्रुवारी १८८८ रोजीं केला. पुढें एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या तारखेपासून जहाजें आंत येऊ लागलीं. ह्या गोदींत १६-२० पर्यंत जहाजें राहण्याची सोई केली आहे. ह्या गोदीकरितां २५ एकर जमीन पाण्यानें भरून काढली आहे ती व **प्रिन्सेसडॉक**ची ३० एकर जागा धरली असतां एकंदर ५५ एकर जमिनीवर कृत्रिम बंदर केलें आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्या व्हिक्टोरिया डॉकमध्यें यारी आदीकरून सर्व यंत्रें पाहण्यास मिळतात. ही गोदी ३ वर्षांत बांधून तयार झाली व हीस एकंदर ३० लाखांवर खर्च झाला आहे. प्रिन्सेसडॉक प्रमाणें ही गोदीही पहाण्यालायक आहे.

२३६. **ससून डॉक**—मधल्या **कुलाब्या**जवळ ससूनडॉक आहे. ह्या गोदींत नेहमीं आगबोटी व जहाजें येतात व जातात. त्यांतून लाखो खंडींचा माल शहरांत येतो व बाहेर गांवीं जातो. येथें नित्य हजारो मनुष्यांची गडबड दृष्टीस पडते तेनेकरून नवख्या मनुष्याच्या अंतःकरणांत सानंदाश्चर्य उत्पन्न होतें. येथील बंदरकिनारा खडकाळ असल्यामुळें जहाजें व आगबोटी आंत येण्याची मोठी पंचाईत पडे ती दूर व्हावी म्हणून

**डेव्हिड ससून** कंपनीनें **ब्याकबे** कंपनीस बराच पैसा देऊन जागा विकत घेतली व तेथें धक्का व गोदी बांधली. ही गोदी कांहीं वर्षांमागें **पोर्ट ट्रस्ट** करितां सरकारानें त्यांच्याकडून विकत घेतली. ह्या बंदराची जागा समुद्रांतून घेतली आहे व खडक फोडून गोदी बांधली आहे. येथें १८ फूट खोल पाणी आहे. बंदरावर मेसर्स **ग्रेहाम** आणि कंपनीकरितां वखारी बांधल्या आहेत. येथेंच कॉटनप्रेस कंपनी आहे. ह्या गोदीचीही व्यवस्था फार चांगली आहे.

२३७. **हॉग आयलंड येथील हैडॉलिक् लिफ्ट् डॉक**—समुद्रांतून मोठमोठीं जहाजें वर उचलतां यावीं येवढाच कायतो ह्या इतक्या मोठ्या यंत्राचा उपयोग. हें यंत्र २५,००० टनचें जहाज सहज वर उचलूं शकतें. **इमरसन** कंपनीनें हें **विलायतें**तून आणविलें. इ. स. १८७२ च्या सप्टेंबर महिन्याचे १६ वे तारखेस **मागडाला** नांवाची आगबोट उचलून पहावी असा विचार होता परंतु, ह्या आगबोटीस कांहीं धक्का पोहचूं नये अशा विषयीं कंपनीनें हमी भरली पाहिजे असें सरकारानें कळविल्यावरून तो बेत तसाच राहिला. पुढें एक लहानसें जहाज आंत पुष्कळ वजन भरून ३२ फूट पाण्यांत बुडवून ह्या यंत्राच्या योगानें वर उचललें. आंतील मालासुद्धां मागडाला आगबोटीपेक्षां ह्या जहाजाचें वजन चौपट होतें, तरी ते कांही सायास न पडतां सहज ह्या यंत्रानें उचललें गेलें. हें यंत्र (लिफ्ट) डॉकयार्डपासून बरेंच अंतरावर असल्याकारणानें, ह्याचा तादृश उपयोग होत नाहीं. ह्या लिफ्टचा खर्च ३५ लक्ष रुपयांवर झाला आहे. पुढें तें त्याच वर्षी **मुंबई** सरकारच्या स्वाधीन केलें. एवढा खर्च करून शेवटीं व्यर्थच गेला ह्मणावयाचा !

२३८. **मोदीबंदर रिक्लेमेशन**—सुमारें ३० वर्षांपूर्वी सरकारानें कमिसरी डिपार्टमेंटकरितां हें बंदर बांधण्याचें काम सुरू केलें. हें कारन्याक बंदरापासून टंकसाळीपर्यंत आहे. परंतु हें कमिसरी डिपार्टमेंटकरितां कधींच उपयोगांत आलें नाहीं. बहुतेक लोकांचे ह्मणणें असें आहे कीं, ह्या ठिकाणीं गोदी उत्तम निघतील. ह्याच्या मधून ८० फूट रुंदीचा फ्रिअर रस्ता गेला आहे त्यामुळें त्याचे दोन भाग झाले आहेत. बंदराजवळचा रस्ता पोर्टट्रस्टच्या स्वाधीन आहे. व पश्चिमबाजूचा रस्ता सरकारच्या स्वाधीन आहे. एकंदर पाण्यांतून घेतलेली जमीन ८४ एकर आहे व खर्च

३० लाख रुपये झाला आहे. व्यापाराच्या सोईकरितां ह्या बंदरासारखें सोईवार बंदर दुसरें नाहीं; पण उतारू व माल वगैरे उतरविण्याकरितां धक्के वगैरे बांधले नसल्याकारणानें ह्या बंदराचा हवा तसा उपयोग होत नाही. मोदीबेवर बाँबे आईस म्यान्युफ्याक्चरिंग कंपनी लिमिटेड व **मि. एफ् ई. कट्लर** ह्यांनी दोन मोठ्या बर्फाच्या गिरण्या बांधल्या आहेत. **कट्लरची** गिरणी आईस म्यान्युफ्याक्चरिंग कंपनीनें थोडे दिवसांवर विकत घेतली आहे.

२३९. **एल्फिन्स्टन इस्टेटस्—एल्फिन्स्टन इस्टेटनें** शहर व **माजगांव** मिळून एक मैल लांब व अर्धा मैल रुंद जागा व्यापिली आहे. ह्या कंपनीनें जमीन भरतीचें काम इ. स. १८५८ सालीं सुरू करून इ. स. १८७१ त पुरें केलें, इतक्या काळांत त्यांनीं ७० लक्षांहून अधिक घनफूट भरती घातली; १०० एकर जमिनीवर इमारती व वखारी वगैरे बांधल्या; ४० पासून ८० फूट रुंदीचे नऊ मैल रस्ते बांधले; दहा मैल गटार बांधले; डॉककरितां ७१ एकर जमिनीवर धक्के व गोडौन (वखारी) बांधल्या; दहा एकर धक्क्याच्या जमिनीवर खडी घातली; सहा एकर जमिनीवर वखारी बांधल्या ; दोन धक्के मिळून दोन मैलपर्यंत बंदरावर भिंती बांधल्या; व एक बंदर बांधलें. **एलफिन्स्टन इस्टेटवर** जातांना जी. आय्. पी. रेलवेनें ३ पूल बांधले आहेत, त्यांपैकीं ५० फूट रुंदीचे दोन व एक ६० फूट रुंदीचा आहे; **मोदीबे** वरून जातांना जो फ्रिअर रस्ता लागतो त्याची रुंदी ८० फूट आहे.

२४०. **सोनापूर**—शहराच्या पश्चिमेस समुद्र किनारीं मरीन लाईन्स स्टेशनानजीक **हिंदू** व **मुसलमान** लोकांच्या स्मशानभूमिका आहेत. येथील **हिंदूं**च्या स्मशानभूमिकेस सोनापूर असें ह्मणतात. हें सोनापूर इ. स. १७६० पासून सुरू झालें. सोनापुरांत **हिंदु**लोकांसाठी सर्व तयारी करून ठेवलेली असते. एकदां जाऊन वर्दी दिली कीं सरण सुद्धां रचून तयार मिळतें. तेथें एक पाण्याचें टांकें नेहमीं भरलेले असतें. त्यांत नळ सोडला आहे. प्रेतदहनास लागणारें सर्व आवश्यक सामानचिमटे, पावडीं, घागरी वगैरे येथें तयार मिळतें. उंच वर्णाच्या लोकांकरितां निराळी जागा असते. शूद्रांकरितांही निराळी जागा आहे. जो तो आपापल्या जागीं प्रेतसंस्कार करितो. लांकडाची वखार तर नेहमीं

भरलेलीच असते. सोनापूर गल्लींतून प्रेत सोनापुरांत नेतांना **मुसलमान** लोकांच्या थडग्यांतून आबड धोबड व अति संकुचित अशा रस्त्यांने जावें लागतें एवढीच कायती ह्या स्मशानाच्या संबंधानें गैरसोई आहे. स्मशानाच्या तोंडाशींच एक लहानसा बंगला बांधला असून त्यांत म्युनिसिपालिटीचा एक कारकून व एक पोलिसचा शिपाई असे असतात. ह्या कारकुनाचें काम स्मशानांत जें प्रेत येईल त्या प्रेताची चौकशी करून तो मनुष्य कोणत्या रोगानें मेला, किती दिवस आजारी होता, औषधोपचार कोण करीत असे वगैरे सर्व माहिती एका मुद्दाम तयार केलेल्या तक्त्यावर लिहून घेऊन ही माहिती खरी दिली ह्मणून त्याजवर माहिती देणाराची सही घेतो. हें त्यांस जन्ममृत्यूच्या रजिस्टरासाठी घ्यावें लागतें. **मुंबईत** कोणता रोग किती मानानें वाढला किंवा कमी झाला हें ह्यापासून समजतें. ह्या धर्मशाळेच्या पुढें एक लहानसा बाग असून रस्त्यावरच्या भिंतीच्या बाजूला पडव्या काढल्या आहेत त्यांत बसण्यास उत्तम सोई केली आहे. कित्येक धार्मिक लोकांनीं बांका व लोडें हीं सोनपुराकरतां बक्षीस दिलीं आहेत. याप्रमाणें बांका व तक्के हीं विश्रांतिसाधनें असतात, त्यामुळें तेथें जाणारांसमोर प्रेत जळतें ह्मणूनच कायते आपण स्मशानांत आलों आहोंत असा भास होतो; एरव्हीं तेथें सर्व घरासारखी सोई असते. तेथें जाणाऱ्यांचा पानतंबाकु खाण्याचा व विड्या ओढण्याचा सपाटा चालतो. बागांत एका लहानशा देवळीमध्यें देव आहे. सभोंवतीं तुळशीचीं झाडें आहेत. ह्या स्मशानाच्या उत्तर अंगाला **हिंदूंचीं** लहान मुलें पुरण्याची जागा आहे. आठ आणे दिले कीं खाडा तयार होतो. हा खाडा स्मशानांतील चाकरलोक खणतात. शिवाय धर्मार्थ ह्मणून एक चवली द्यावी लागते. **मुसलमान** लोकांच्या कबरी ह्याच्याच शेजारीं आहेत. अलीकडे सरकारानें क्विन्सरोडवरून संध्याकाळचे ४ पासून तों रात्रीचे ८ वाजेपर्यंत वेळ खेरीज करून पाहिजे तेव्हां प्रेतें न्यावीं असा ठराव केला आहे. येथें पूर्वी लांकडे विकणारे लोक लबाडी करीत; परंतु **रा. घुमरे** ह्यांनीं त्यांचीं लबाडी बाहेर काढली, येथें लांकडांस गांवातल्या पेक्षां दरखंडीस एक रुपया फाजील पडतो.

**२४१.** हें सोनापूर इकडून काढून टाकण्याविषयीं सरकारनें हुकूम केला होता; परंतु माजी नामदार **जगन्नाथ शंकरशेट** ह्यांनीं ह्या कामीं

सरकारपर्यंत बरीच खटपट करून ही जागा ठेववून घेतली. इ.स. १८७० त म्युनिसिपालिटीनें ह्या स्मशानासभोंवती भिंत बांधली आहे.

२४२. ह्या जागेशिवाय वाळकेश्वरीं राहणारे लोक तेथेंच समुद्र किनारीं प्रेतें दहन करतात. अनाथ प्रेतें **शिवरी**स पुरण्यास नेतात. पण ह्या सोनापुराची व्यवस्था पाहणारी मंडळी आहे त्यापैकीं कोणाएकाची चिठी नेली तर शवदहनापुरतीं लांकडें फुकट मिळतात. कांहीं दिवसामागें हीं प्रेतें सरण रचून जाळण्यापेक्षां एकदम भट्टींत घालून जाळून टाकावीं ह्मणून **मुंबई** म्युनिसिपालिटीनें विचार काढला होता; परंतु, ही रिती हिंदु धर्माच्या विरुद्ध आहे व असें केल्यानें लोकांची मनें बिथरून जातील, ह्मणून तो विचार तसाच एकीकडे ठेवण्यांत आला. तरी कित्येक आमचे सुधारक मंडळीचे मनांत वरील रिती सुरू करावी असें फार आलें होतें; परंतु जुन्या मताच्या लोकसमुदायापुढें त्यांचें काय चालणार ? सोनापुरांत जाणाऱ्या लोकांस कर्मणूक व्हावी ह्मणून कित्येक उदार गृहस्थांनीं पुस्तकें बक्षीस देऊन तेथें एक लायब्ररी काढली आहे. ही लायब्ररी वर सांगितलेल्या बंगल्यात आहे. ह्या लायब्ररीची व सोनापुराची व्यवस्था "धि बांबे बर्निंग आणि बेरिएल ग्राऊंडस् कमिटी" नांवाची मंडळी पाहते. व ही मंडळी आपल्या कामाचा दरवर्षी रिपोर्ट प्रसिद्ध करिते. ह्या मंडळीच्या हातांत इ. स. १८८७ वर्ष अखेर एकंदर २३,५९३ रुपये १ आणा व ५ पै शिल्लक होती.

२४३. सोनापुरालगतच इंग्रज लोकांची समशानभूमि होती ती बरेच वर्षांपासून बंद करण्यांत आली आहे. आतां इंग्रजांचीं प्रेतें **शिवरीस** नेतात. ही स्मशानभूमि पहिल्यानें इ. स. १७६३ सालीं उघडली. ह्यापूर्वी साहेब लोकांचीं प्रेतें मेंढ्यामस्[1] पॉईंटवर ह्मणजे हल्लींच्या सेलर होमच्या आसपास पुरीत. असें ह्मणतात कीं तेथें **मुंबई**चे गव्हर्नर, डेप्युटी गव्हर्नर, कौन्सिलर वगैरे थोर थोर इंग्रज पुरले गेले आहेत. आतां तेथील सर्व कबरी वगैरे फोडून टाकल्या. इ. स. १८६३ सालीं **मुंबई** गव्हर्नरचे कौन्सिलामध्यें प्रेतें पुरण्याच्या शहरांतील सर्व जागा काढून टाकण्याची

१. ह्यास **मेंढ्याम्स** पॉईंट ह्मणण्याचें कारण असें आहें कीं, **थामस मेंढ्याम** ह्मणून कोणी एक इग्रज पहिल्यानेंच **मुंबई**त मेला व त्यास ह्या जाग्यांत पुरलें होतें ह्मणून ह्या जागेस वरील नांव प्राप्त झालें आहे असें ह्मणतात.

वाटाघाट चालली होती. पुढें इ. स. १८६७ साली सोनापूर येथील साहेबलोकांचीं प्रेतें पुरण्याची जागा बंद करून **शिवरी** येथें नेली. ह्या जागेचा विस्तार सुमारें अर्ध मैल होईल. ही जागा **परळास** गव्हर्नर साहेबाच्या बंगल्यापलीकडे समुद्र किनाऱ्यावर आहे. ह्याठिकाणीं प्रेतें पुरण्याच्या तीन प्रती आहेत. पहिल्या प्रतीस रु. ७, दुसरीस ३ व तिसरीस १ रुपया अशी फी पडते. सेलर, सोलजर, व गरीब गुरीब लोकांकरितां खाडा खणण्याची फी पडत नाहीं. वर थडगें किंवा कबर बांधण्याबद्दल ठरीव भाव आहेत. अशींच दुसरीं प्रेतें पुरण्याची जागा **माटुंग्यास** आहे, तेथें सर्व गोंवेकरी लोक पुरले जातात. ज्या धर्मपंथांतील मयत मनुष्य असेल त्या धर्मपंथाच्या पाद्र्यास " अन्डरटेकर " (कबरीचे कोरींव दगड तयार करणारे ) कडून मयत झाल्याची सूचना जाते. अलीकडे **कुलाबा** व **सोनापूर** येथील **प्रेसबेटेरिअन** लोकांची प्रेतें पुरण्याची जागा व **माटुंगें** येथील जुनी साहेब लोकांची जागा ह्या हल्लीं बंद केल्या आहेत. कित्येक श्रीमंत लोकांचीं प्रेतें ह्या लोकांच्या देवळांत गाडली असून त्यांवर मोठमोठ्या त्यांच्या वर्णनाच्या शिळा कोरल्या आहेत.

२४४. ह्या लोकांच्या प्रेत नेण्याच्या गाड्या काळ्या रंगाच्या असून त्यांवर चार बाजूनें चार काळे गोंडे लावतात. घोडाही काळा असून घोडेवाल्याचा पोशागही काळाच असतो. मयताबरोबर जाणाऱ्या लोकांचाही पोशाग काळाच. ज्या पेटींत मुडदा निजवितात तिला 'कॉफिन' ह्मणतात. व ज्या गाडींत मुडदा नेतात तिला 'हिअर्स' ह्मणतात. मुडद्यास उत्तम पोशाग चढवितात. **मुसलमान** लोकांच्या सोनापुर खेरीज करून **कामाठीपुरा** वगैरे ठिकाणीं कांहीं स्मशानभूमिका आहेत.

२४५. इ. स. १८५५ सालच्या अक्टोबर महिन्यांत ब्याकबेवर वाळूंत प्रेतें पुरण्याची मनाई झाली. पुढें इ. स. १८६३ सालीं सरकारानें " बेरीयल " कमिशन नेमिले. कमिशननें आपला रिपोर्ट इ. स. १८६५ सालीं केला, त्यांत त्यांनीं आपला अभिप्राय असा दर्शविला होता कीं, **माटुंग्यास** २५२ एकर जमीन प्रेतें पुरण्याच्या कामीं लावली तर ह्या कृत्यास ११,८९,३५० रुपये खर्च होईल. हें काम फार खर्चाचें असल्यामुळें सरकारास तो विचार पसंत पडला नाहीं ह्मणून त्यांनीं इ. स. १८६८ सालीं शिवरीस ह्मणजे जेथें पूर्वी हार्टिकल्चरल बाग होता तेथें प्रेतें

पुरण्यास जागा दिली. पुढें सोनापूर, मरीन लाईन्स व गिरगांव येथील प्रेतें पुरण्याच्या जागा बंद करण्यांत आल्या. चिनी लोक व आर्मेनिअन पंथानुयायी लोकांची प्रेतें **शिवरीस**च पुरतात. सोनापूर येथील हिंदूचेंही स्मशान काढून त्यांनी आपलीं प्रेतें आगगाडींत घालून **शिवरी**स वगैरे नेऊन जाळावीं ह्मणून डाक्टर लीथ ह्यांनीं विचार काढला होता, परंतु तो विचार सर्वांस आवडला नाहीं ह्मणून तसाच पडून राहिला.

२४६. **मुंबईत** एकंदर १९ प्रेतें जाळण्याच्या व ४० प्रेतें पुरण्याच्या जागा आहेत. मैदानांत हल्लीं जेथें ब्यांडस्ट्यांड आहे तेथें पूर्वी इंग्रज लोकांची प्रेतें गाडण्याची जागा होती तेथपर्यंत समुद्राचें पाणी येत असे; परंतु, जेव्हां **कुलाब्या**पर्यंत रस्ता झाला व ब्याकबे भरून काढण्यांत आली तेव्हां अर्थात ती जागा बंद जाहली हें बरेच लोकांस माहित असेल.

२४७. **टावर ऑफ सायलेन्स (दोखमा)**—पारशी लोकांच्या प्रेतें टाकण्याच्या विहिरी (दोखमे) बाबूलनाथाच्या शेजारीं डोंगरावर ह्मणजे मलबारहिल रिझरव्हायरच्या अलीकडे आहेत. पूर्वी येथें जाण्याला **गिरगांवा**तून डोंगरावरून अरुंद रस्त्यानें जाण्याचा मार्ग होता; परंतु, सुमारें २०-२२ वर्षांपूर्वी ब्रिचक्यांडी रस्त्यावरून डोंगराच्या दुसऱ्या बाजूनें जातां यावें ह्मणून माजी **रस्तमजी जमशेटजी जीजीभाई** ह्यांनीं पुष्कळ पैसा खर्च करून दुसरा रस्ता केला. ह्या डोंगरावर ८० हजार चौरस यार्ड जागेत पारशी लोकांचे ५ दोखमे बांधले आहेत. ह्या जागेसभोंवार तटबंदी केली आहे. । प्रेताबरोबर जाणाऱ्या लोकांस प्रार्थना करण्याकरितां तेथें एक घर, एक अग्यारी, आणि सुंदरच पण लहान व छुबकेदार बाग आहे. प्रेतास ते इतरांस शिवूं देत नाहींत. त्यांच्यांत " मुडदे फरास " ह्मणून असतात तेच प्रेतास शिवतात व तेच तीं नेतात. प्रेत एका लोखंडी तकटीवर पांढऱ्या वस्त्रांनीं गुंडाळतात. प्रेतवाहक हेही नखशिखांत पांढरा पोशाक करितात. प्रेताबरोबर जाणारी मंडळीही शुभ्र पोशाक करून रुमालाचें एक शेवट एकाच्या व दुसरें दुसऱ्याच्या हातांत घेऊन अशा थाटानें प्रेतामागून चालतात. विश्रांतिगृहांत थोडा वेळ प्रार्थना वगैरे झाल्यावर प्रेतास विहिरीकडे नेतात. ह्या विहिरी वाटोळ्या, दिसण्यांत बोजड पण चुन्याचा गिलावा केलेल्या असतात. त्यांतील मोठ्या विहिरीचा परिघ २७६ फूट आहे आणि भिंतीची उंची ३५ फूट आहे. जमिनीपासून

३ फूट उंचीवर भिंतींत एक दरवाजा असतो त्यांतून प्रेतवाहक प्रेतास आंत जाऊन ठेवितात. जमिनीपासून ३५ फूट उंचीवर विहिरीचें तोंड बंद केलें असतें, ह्यांत पुरुषांस, बायकांस व मुलांस ठेवण्याच्या अशा ३ जागा आहेत. प्रेत जेथल्या तेथें ठेवल्यानंतर वाहक बाहेर येतात न येतात तोंच ५-२५ गिधाड आत शिरतात. आणि लागलाच हां हां म्हणतां प्रेताचा फड्या उडवतात ! कांही दिवसांनीं वाहक तेथें पुनः जाऊन अस्थी संचय करून मध्यभागच्या विहिरींत टाकतात. ही विहीर ४५ फूट रुंद आहे. हे लोक दुसऱ्या जातीच्या लोकांस तिकडे जाऊं देत नाहींत. असा पारशी लोकांचा प्रेताविषयीं प्रतिबंध आहे. रस्त्यांतून प्रेत नेत असतांही एक अंधारु रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांस आपल्या रुमालानें पैस पैस करीतच पुढें चालत असतो !

२४८. **मुंबई**मध्यें पूर्वी ह्मणजे इ.स. १७६४ त कायतें एकच टावर ऑफ् सायलेन्स होतें असें **न्यूबहर** साहेबाचें ह्मणणें आहे. इ.स. १७६५ त **फ्रायर** साहेब **मुंबई**स आला होता, त्यावेळींही त्यानें असेंच म्हटले आहे. इ.स. १७५० तही एकच होतें ह्मणून **ग्रोस** साहेब ह्मणतो. मोडी गांधी टॉवर ऑफ सायलेन्स बांधण्याविषयीं जेव्हां इ.स. १६६९ त त्या वेळच्या गव्हर्नरास **पारशी** लोकांकडून अर्ज करण्यांत आला होता त्यावेळी **मुंबई**त कायते सगळे १२ पार्शी होते असें 'राऊंड अबौट बांबे' ह्या पुस्तकावरून समजतें.

२४९. **मुंबई**मध्यें पाहण्यालायक स्थळें व इमारती आहेत त्यांची नांवे येणेंप्रमाणे :—

टौनहॉल; टंकसाळ; सेंट थॉमस क्याथेड्रल; निरनिराळ्या गोदी; पब्लिक वर्क्स ऑफिस; टेलिग्राफ ऑफिस; नवें सेक्रेटरी ऑफिस; हायकोर्ट; पोस्ट ऑफिस; एलफिन्स्टन सर्कल गार्डन; आर्थर क्राफर्ड मार्किट; ससून मेक्यानिक इन्स्टिटयूट; ग्रांट मेडिकल कॉलेज; सर जमशेटजी जीजी भाई हॉस्पिटल; व्हिक्टोरिया गार्डन व आलबर्ट म्युझिअम (राणीचा बाग); कुलाबा मेमोरिअल चर्च; डेविडससूनचें स्कूल आफ् इन्डस्ट्री; ताडदेव; परळ; गिरगांव येथील सुताच्या गिरण्या व इतर कारखाने; फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूट; पांजरापोळ; राणीचा पुतळा; प्रिन्स आफ् वेल्सचा पुतळा; नार्थब्रूक गार्डन; युनिव्हर्सिटी

हॉल व लायब्ररी; राजाबाई टॉवर; व्हिक्टोरिया टरमिनस स्टेशन; ग्रांटरोड स्टेशन; ल्युनाटिक असायलम; सर रिचर्ड टेंपलचा पुतळा; माधवबाग; कृष्णबाग; वेलिंगटन फाऊन्टन; भुलेश्वरमार्केट; नळाचा बाजार; बाबुलनाथ; वाळकेश्वर; महालक्ष्मी; मलबार हिल् गार्डन; मलबार हिल् रिझरव्हायर; भंडारवाडा रिझरव्हायर; रामवाडीचे देऊळ; ठाकुरद्वारचें देऊळ; मुंबादेवी; काळबादेवी; कुलाबा आबझरव्हेटरी; गांवदेवीचें देऊळ; मुंबईतील निरनिराळे पूल; ट्रामवेचे तबेले; जैन लोकांची मंदिरें; पोर्टुगीज व युरोपिअन लोकांची चर्चिस; मशिदी; सोनापुर इत्यादि; इत्यादि अनेक स्थळें व इमारती मुंबईत पाहण्यालायक आहेत. त्यांची नुसती यादीच करूं ह्मटलें तरी एक निराळाच ग्रंथ लिहावा लागेल. तरी पण, वरील मुख्य इमारती वगैरेची संक्षिप्त माहिती पुढील भागांत दिली आहे.

• • • • • • • • • • • • • •

# भाग सातवा

## प्रसिद्ध इमारती वगैरे

मागल्या भागांत शहराचें वर्णन थोडक्यांत वाचकांपुढें ठेविलें. आतां, या भागांत **मुंबई**तील प्रसिद्ध प्रसिद्ध इमारती, देवालयें, चर्चिस्, मशिदी वगैरे वगैरेच्या संबंधानेंही त्यांच्या पुढें थोडथोडी माहिती ठेऊं.

२. **टौनहॉल—एल्फिन्स्टन** सर्कलच्या पूर्व बाजूला ही प्रसिद्ध इमारत आहे. ह्या शहरांत एकादी सार्वजनिक जागा असावी असा विचार इ.स. १८११[1] साली झाला. ह्यावेळी सर **जेम्स म्याकिनटॉश** हे लिटररी सोसायटी नामक सभेचे अध्यक्ष होते. एकादी सार्वजनिक हिताकरितां सभा भरविणें झाल्यास, अगर कोणाला प्रसिद्धपणें सन्मान देणें असल्यास, अगर प्रसिद्ध पुरुषांचे पुतळे वगैरे बसविणें झाल्यास, त्यास जागा असावी वगैरे लोकहिताच्या कामांकरितां एकादी प्रसिद्ध इमारत असावी हा हें टौनहॉल बांधण्याचा मुख्य उद्देश. अशा इमारतीस पैसा बराच पाहिजे तो मिळवावा म्हणून, सोडत काढण्याचा विचार **मुंबई**च्या गव्हर्नरच्या संमतीनें ठरला. इ.स. १८१२ त याप्रमाणें सोडत

---

[1] Its erection was first mooted by high-spirited Public servant of Government by name Hanshaw, so early as 1793 and he proposed to effect this object by means of the surplus proceeds of a lottery for the especial purpose of raising suitable public buildings at the Presidency. x x x The questions was again mooted in 1818 and 2 years afterwards by means of Government and private subscription a sum was raised sufficiently large for the purpose of erecting an edifice so large and suitable as to meet municipal purpose and to prove the arena of certain Government purposes.—*The Monthly Miscellany of Western India.*

भावार्थ :—इ.स. १७९३ साली **मुंबई**मध्ये एकादें स्वतंत्र स्थान असावें ह्मणून **हेनशा** नामक गृहस्थानें बूट काढिला. व ही इमारत सोडतीच्या पैशांतून उभारावी असा बेत झाला x x x पुढें इ.स. १८१८ त हा विचार पुनः सुरु होऊन ह्या इमारतींत म्युनिसिपालिटीचें काम चालविण्यास व काही सरकारी कामास सोई असावी असें ठरले.

काढून तन्द्वारा एक लक्ष रुपये जमविण्यात आले; परंतु, हें उत्पन्न पुरे होणार नाहीं म्हणून, दुसऱ्या खेपेस सोडत काढिली; पण, ह्या वेळीं आपसांत वैमनस्य उत्पन्न झाल्यामुळें सगळे तीस हजारांचेच उत्पन्न झालें. हें प्रकरणही पुढें बंद पडले. पण पुढें झाले तितक्याच उत्पन्नांत ही इमारत बांधून काढावी या उद्देशानें मेजर **हॉकिन्स**, इंजिनिअर, ह्यांस त्या कामाची देखरेख करण्यास सरकाराने नेमिलें. सदर्हु **हॉकिन्स** यानें हल्लीं ज्या ठिकाणीं ही इमारत आहे, ती जागा पसंत करून ती ह्या इमारतीकरितां मिळावी म्हणून इ. स. १८१७ त **ईस्ट इंडिआ** कंपनीचे **बोर्ड आफ् डायरेक्टर्स** ह्यांच्याकडे अर्ज केला. परंतु सरकाराकडून इ. स. १८२१ पर्यंत मंजुरी मिळाली नाहीं; परंतु दक्षिण बाजूच्या भिंतींतल्या ढेलजांत बसविलेल्या दगडावर जो लेख आहे त्यावरून असें दिसते कीं, ह्या इमारतीचें काम कसें असावें याविषयीं कर्नल कौपर साहेबांनीं नकाशा काढिला व इ. स. १८२१ च्या सप्टेंबर महिन्यात कामास सुरवात होऊन तें इ. स. १८३३ सालीं पुरें झालें. याप्रमाणें सोडतीपासून उत्पन्न झालेले रुपये व सरकारानें दिलेले दहा हजार रुपये शिवाय, वर्गणी गोळा करून मिळविलेला पैसा इतकी रकम हातांत घेऊन कामास सुरवात झाली. पण इ. स. १८२३ सालीं ह्या मंडळीची खर्ची खुटली ह्मणून पुनः सोडतीचें बंड निघाले. हा वेळपर्यंत ह्या कामास जरी २ लक्ष रुपये खर्च होऊन गेला होता, तरी आणखी ३ लक्ष रुपये लागतील असा अंदाज होता. पुढें वरील सोडतीपासून २९,००० रुपये उत्पन्न झालें; परंतु, अशानें हें काम तडीस जाणार नाहीं ह्मणून, सरकारानें आपण होऊन तें हातीं घेतलें. त्याप्रमाणें इ. स. १८२६ त ईस्ट इंडिआ कंपनीचे बोर्ड ऑफ् डायरेक्टर्स ह्यांनी हें काम आम्ही पुरें करतों ह्मणून कबूल केलें. त्यांनीं ज्या अटीवर हें काम हातीं घेतलें, त्या अटी अशा होत्या कीं—आंतील काम साधें असावें, उपगृहामध्यें **लिटररी सोसायटीचें** म्युझिअम आणि पुस्तकालय असावें व कांहीं सरकारी ऑफिसांकरितांही तेथें जागा असावी. येणेप्रमाणें अटी पसंत झाल्यावर इ. स. १८२९ त तीन लक्ष रुपयांची त्यांच्याकडून मंजुरी मिळाली. परंतु, इ. स. १८३३ पर्यंत हें काम पुरें झालें नाही; पांच लक्ष रुपये खर्च होऊन गेला; इमारत बांधण्यास बारा वर्षे लागली व मूळच्या नकाशांतून पुष्कळ गोष्टीकडे दुर्लक्ष झाले.

एवढी ह्या इमारतीच्या संबंधानें हयगई झाली तरी देखील **मुंबईम**ध्यें **टौनहाला**प्रमाणें भव्य व सुंदर दुसरी इमारत नाहीं.

३. याप्रमाणें ही इमारत एकदाची उभारली. ही इमारत २६० फूट लांब व १०० फूट रुंद असून दुमजली आहे. खाली तळमल्यावर उत्तर बाजूला **क्वार्टर मास्तर जनरलचें ऑफिस** असून दक्षिण बाजूला सुपरिंटेंडेंट ऑफ् **स्टेशनरीचें** ऑफिस व **मुंबईचें बेंच ऑफ् धि जस्टिसीस** ह्यांचें ऑफिस आहे आणि वरच्या मजल्यावर उत्तर बाजूला **बाम्बे ब्यांच आफ् धि रॉयल एशिआटिक सोसायटी** ऑफ ग्रेट ब्रिटन आणि आयर्लंड ह्या मंडळीची लायब्ररी आणि रिडिंग रूम असून दक्षिण बाजूला **सर्जन जनरलचें** ऑफिस आहे. ह्या इमारतींतच पूर्वी **एलफिन्स्टन कॉलेज** होतें. तसेच पदार्थसंग्रहालयही या इमारतींत होते; पण तें आतां **व्हिक्टोरिआ** गार्डनमध्ये नेलें आहे. मध्यभागीं एक मोठा हॉल (दिवाणखाना) आहे. ह्या हॉलांत सार्वजनिक कामाचा ऊहापोह करण्याकरितां मोठमोठ्या सभा होतात. म्याट्रिक्युलेशन वगैरे परीक्षांकरितांही ह्या हॉलाचा उपयोग केला जातो. ह्याच हॉलांत मोठा बाजा आहे. हा बाजा इ. स. १८७२ सालीं मुंबईतील प्रसिद्ध गृहस्थ ए. डी. ससून ह्यांनीं बक्षीस दिला आहे. ह्याची किंमत सुमारें ३०,००० रुपये होईल. ह्यावर लेख आहे तो खाली टिपेंत दिला आहे दक्षिण बाजूच्या एका मोठ्या हॉलमध्ये हल्लीचे नवें सेक्रेटरी ऑफिस होण्यापूर्वी कायदे कौन्सिलच्या सभा भरत व गव्हर्नर साहेबांची लेव्हीही तेथेंच भरत असे. तेव्हां ह्या हॉलास 'दरबाररूम' असें ह्मणत. दक्षिण बाजूला माजी गव्हर्नर **मॉन्स्टुअर्ट एल्फिन्स्टन**

---

THIS ORGAN
Built by Messrs Bishops & Storr, London,
Was the gift of
THE HON'BLE SIR ALBERT DAVID SASSOONS, KT., C.S.I.
Member of the Legislative Council of Bombay
To the Town Hall, Bombay
As a memorial of the visit of His Royal Highness the
DUKE OF EDENBURGH.
March 1870, Erected 1872,

(१८१९-२७) ह्यांचा पुतळा आहे. ह्याच गव्हर्नरानें विद्येची अभिरुची मुंबईच्या लोकांस लावून देऊन आपलें नांव चिरकाळ ठेविलें, व ह्याच्याच नांवानें "एल्फिन्स्टन हायस्कूल" नांवाची शाळा प्रसिद्ध आहे तिची स्थापना झाली. दक्षिणेच्या उपभागाला **सरचार्लस फॉर्बस** ह्यांचा पुतळा आहे. हा पुतळा इ.स. १८४१ त बसविण्यांत आला.

**उत्तरेच्या भागांत ६ पुतळे आहेत ते येणेंप्रमाणें :—**

मिस्तर **स्टीफन ब्याबिंगटन,** सदर दिवाणी अदालतीचे माजी जज्ज—इ.स. १८२२.

सर **जॉन मालकम, मुंबईचे** माजी गव्हर्नर इ.स. १८२७-३०

मिस्तर, **सी. नॉरिस**, माजी चीफ् सेक्रेटरी, निसबत सरकार, **मुंबई**. इ.स. १८४२

**जॉन** लॉर्ड **एल्फिन्स्टन, मुंबईचे** माजी गव्हर्नर, इ. स. १८५३-६०

सर **जमशेटजी जीजीभाई**, बारोनेट. इ.स. १८५७.

**तळमजल्यावर उतर बाजूच्या उपगृहामध्यें :—**

नामदार **जगन्नाथ शंकरशेट.** इ.स. १८६४

सर **बार्टल फ्रिअर, मुंबईचे** माजी गव्हर्नर, इ.स. १८६२-६७

ह्या भव्य इमारतीस ८ खांब असून ३० पायऱ्या आहेत. ह्यांत जुने शिलालेख, ताम्रलेख व बौद्धादिकांच्या मूर्ति, चमत्कारिक लेणीं वगैरेचा बराच संग्रह आहे तो मोठा प्रेक्षणीय आहे.

४. **टंकसाळ.**—इ.स. १६८१[1] साली कंपनी सरकारास आपल्या नांवानें नाणें पाडण्याची मुख्य सरकाराकडून सनद मिळाल्यावर त्यांनीं किल्ल्यांत नाणें पाडण्याची टंकसाळ बांधिली; आणि तेथें मोहोरा, पुतळ्या, रुपये, अधेल्या, पावल्या, चवल्या, तांब्याचे पैसे वगैरे नाणीं पाडूं लागले, पण पूर्वीपासून ह्मणजे इ.स. १६७०[2]त **जेरल्ड आंजिअर** ह्या गव्हर्नराच्या कारकीर्दीत कंपनी सरकारानें हें काम चालविलेंच होतें. पण ती नाणीं

१. इ.स. १६८१ त मिस्तर **स्मिथ** हे मिंट मास्तर होते व त्यास सालीना ६० पौंड मिळत.

2. In 1670 was established a mint in Bombay, which was confirmed by letters patent in 1676. *Book of Bombay.*

**कंपनी** सरकारच्या नांवानें न छापतां दिल्लीच्या बादशहाच्या नांवानें[1] छापलीं जात. ह्या नाण्यांवर फार्शी अक्षरांचा छाप असे. पुढें मोगल दरबारांत कांही तक्रार उपस्थित झाल्यामुळें त्यांस सनद मिळविणें भाग पडलें. ही सनद मिळाल्यानंतर कंपनी सरकार हें काम स्वतः चालवूं लागलें. ह्यामुळें त्यांचीच ख्याती होऊन शहराचें उत्पन्न व वैभव वाढण्यास सुरुवात झाली. ह्यावेळीं नाणें पाडण्याचें काम शेंकडों सोनार, कांसार व इतर कारागीर लोक करीत असत. आतां तेंच काम वाफेचें यंत्र करीत आहे.

५. टंकसाळेची पूर्वीची इमारत किल्याजवळ होती. ही इमारत बाहेरून चतुःकोणाकृति आणि आंतून गोल अशी तिची कांहीं विलक्षण रचना होती. ह्या नव्या इमारतींत इ.स. १८६४ सालीं बराच फेरफार करण्यांत आला. ह्या इमारतीची लांबी ३०० फूट आहे. हिच्या पायाचा दगड इ.स. १८२५ त जानेवारीचे पहिल्या तारखेस बसविण्यांत आला. पुढें इ.स. १८२७ च्या डिसेंबरमध्यें सर्व यंत्रें चालू केली; पण, नाणें पाडण्याची सुरुवात इ.स. १८३० पासून झाली. ह्या टंकसाळींत मुख्य तीन यंत्रें आहेत. त्या प्रत्येकाची शक्ति अनुक्रमें ४०,२४ आणि १० घोड्यांची (हॉर्स पावर) आहे. हल्लीं हींत रोज १,५०,००० रुपयांचें नाणें पाडलें जातें. इ.स. १८६४ सालीं हींत यंत्राचा दुप्पट भरणा केला, तेव्हांपासून धातूचा रस तयार करणें, तिच्या लगड्या पाडणें, पत्रे घडून त्यांच्या चकत्या पाडून त्याजवर छाप मारणें इत्यादि कामांकरिता एक स्वतंत्र खोली तयार केली, तेणें करून हल्लींची **मुंबई**ची टंकसाळ ह्मटली ह्मणजे, तिच्यांत लंडन येथील राजकीय टंकसाळेपेक्षा जवळ जवळ दुप्पट नाणें पाडण्याची शक्ति आली आहे. एकदां तर २४ तासांत ७ लक्ष रुपयांचे नाणें पाडिलें होतें ह्मणून सांगतात. दर सालची सरासरी काढली तर, ३ कोटी फक्त रुपयांचीच नाणीं पडतात. अधेल्या, पावल्या, चवल्या, दिडक्या व अर्ध्या वगैरे दुसरीं नाणीं पडतात तीं निराळींच. हीं सर्व नाणीं पाडण्याची कृति कशी असते ती आपण पाहूं या.

६. प्रथमतः टंकसाळ पाहणें झाल्यास मिंटमास्तरची परवानगी

१. सिलेक्शन फ्राम स्टेट पेपर्स ह्या पुस्तकावरून असें दिसतें की इ.स. १७७६ सालीं जें नाणें पाडलें जात असे त्यावर ' पाक्स देव ' असा लेख असे.

घेण्याकरितां अर्ज करावा लागतो व त्या अर्जासोबत उत्तराकरितां अर्ध्या आण्याची टिकीट पाठवावी लागते. अर्ज केल्यादिवसापासून एक दोन दिवसांनी 'परवानगी पास' येतो. त्या पासावर अर्ज करणारा व दुसरे ३ इसम येवढ्यांनीच टंकसाळ पाहण्यास यावें म्हणून लिहिलेलें असतें. हा अर्ज सोमवारीं अगर मंगळवारीं केला असतां शुक्रवारच्या बेतानें पास येतो; कारण टंकसाळ पाहण्याकरितां बहुधा शुक्रवारीं परवानगी मिळते. पास घेऊन गेलें ह्मणजे दरवाजावर शिपाई असतो तो पूर्वीच दुसरी मंडळी आंत गेली असल्यास ती बाहेर येईपर्यंत पाठीमागून जाणारांस तेथें उभें राहण्यास सांगतो. अशा मंडळीस बसतां यावें ह्मणून दरवाजावर एक लहानशी चौकी बांधली आहे. आंत गेलेली मंडळी बाहेर आली ह्मणजे, बाहेरच्या मंडळीस टंकसाळ दाखविण्याकरितां एक शिपाई येतो. त्याचबरोबर आंत गेलें कीं आंगावरील उपवस्त्र, छत्री, स्त्रियांच्या आंगावरील शाल वगैरे काढून ठेवावीं लागतात. ही इमारत दर्शनी बघितली असतां मोठी विशाळ दिसते; परंतु आंत गेल्यावर तिची रचना कांही चमत्कारिक तऱ्हेची दृष्टीस पडते. चौफेर इमारतीचा भाग असून मध्यें मध्यें मोकळी मोठमोठी दालनें आहेत. येणेंकरून स्वच्छ हवा व उजेड यांची मुळींच उणीव पडत नाहीं. चौकांत एक मोठें कारंजे आहे. उत्तर बाजूच्या खोलीत प्रथमतः शिपाई आपणांस घेऊन जातो. तेथें गेलें ह्मणजे सुमारें चार बोटें रुंदीचे, अर्धा इंच उंचीचे व आठ नऊ हात लांबीचे चांदीचे पत्रे दाखवितो. हे तुकडे येथें परीक्षेकरितां आणलेले असतात. तेथें त्यांची परीक्षा करून ते भट्टीकडे पाठविले जातात. तेथें त्यांचा रस होऊन ते जितक्या जाडीचे, जितक्या रुंदीचे व जितक्या लांबीचे पाहिजेत असतील तसे तयार होतात. याप्रमाणें भट्टींतून ओतून तयार केलेले पत्रे वजन करण्याकरितां कांट्यावर येतात. हे पत्रे रुपयाच्या जाडीचे असून त्यांपासून रुपये पाडले असतां साधारणपणें वजनांत बरोबर उतरतील किंवा नाहींत ह्मणून तोडतात. कमी किंवा ज्यास्त असल्यास पुनः ओतण्याकरितां परत पाठवितात. हें तोलण्याचें यंत्र हजारो पत्र्यांचे वजन एका तासात करीत असेल इतकें ह्यांचे काम झपाट्यानें चालतें. बरोबर उतरलेल्या पत्र्याचे रुपयाच्या आकाराचे वर्तुळ तुकडे पडतात. हे तुकडे साफ व्हावे ह्मणून कानशीवर नेतात, तेथें हे तुकडे शृंगाकृति एक पितळेची नळी असते त्या नळीवर

रचून ठेविले कीं सुमारें पांच मिनिटांत पांचसहाशे रुपये घांसून साफ होतात. घरटांत भात घालून दळतांना जसा तूस बाजूला उडून तांदूळ तेवढा जोरानें लांब पडतो, तसे ते तुकडे कीस बाजूला पडून एका भांड्यांत पडत असतात, त्यावेळीं पाहणारास मोठी मजा वाटते. ह्याप्रमाणें घांसून निघालेले तुकडे साफ व चकचकीत करण्याकरितां भट्टींत घालतात. तेथून ते तापवून काढले ह्मणजे त्यांस ओप देऊन वाळवितात. वाळून तयार झाले ह्मणजे त्यांस कांटयावर नेतात. तेथें नेल्यावर त्यांस एका शृंगाकृति नळींत एकावर एक असे रचून ठेवितात. असे हे रचून ठेवलेले तुकडे एक एक त्या कांट्यावर पडून कांट्याखालीं असलेल्या निरनिराळ्या पेटींत पडतात. बरोबर वजनाच्या व उत्तम आवाजाच्या तुकड्यास कांटा एका पेटींत टाकतो; कमी असल्यास दुसऱ्या पेटींत टाकतो, बदड असल्यास तिसऱ्या पेटींत टाकतो. ह्याप्रमाणें प्रत्येक बरोबर, कमी व बदड रुपयांची वजावाट कांटा आपण संथपणें काम करून लावतों. ही कृति घटकाभर पाहण्यासारखी आहे. कांट्यांतून जे तुकडे खरे ठरून पेटींत पडतात त्यांस छापण्याकरितां घेऊन जातात. हेंही यंत्र मोठें पाहण्यासारखें आहे. एका मिनिटांत थोडक्यांत थोडके दीड दोनशें किंबहुना ज्यास्तही रुपये छापून निघत असतील. प्रथम हे तुकडे एका शृंगाकृति आकाराच्या नळींत रचून ठेविले ह्मणजे एकामागून एक असे त्या नळींतील तुकडे छापावर जाऊन पडले ह्मणजे त्यांजवर खालून वरून छाप उमटतो. एवढी कृति झाली ह्मणजे तुकड्यास रुपयाची संज्ञा प्राप्त होते. इतर सर्व रुप्याचीं व तांब्याची नाणीं अशाच कृतीनें पाडलीं जातात. याप्रमाणें रुपये, अधेल्या, पावल्या, चवल्या, दिडक्या, अर्ध्या वगैरे रुप्यातांब्याचे नाण्याचे रोज ढिगच्या ढिग तयार होतात. येथें इतके पैसे पडलेले असतात कीं, टंकसाळ पहावयास जाणारांपैकी कोणी देवभोळा मनुष्य तेथें पडलेल्या नाण्यांवर लक्ष्मी म्हणून पाय देणार नाहीं असें मनांत आणील तर, त्यास टंकसाळ पहावयास मिळणेंच नाही; कारण, रुप्यातांब्याचे पत्रे व नाणीं वगैरे जिकडें तिकडे पडलेलीच असतात.

७. याप्रमाणें आम्ही आमच्या वाचकांस टंकसाळेच्या संबंधानें थोडीशी

माहिती करून दिली व शेवटीं त्यांस आमची अशी शिफारस आहे कीं, साधेल त्यानें टंकसाळ पाहिल्यावांचून राहूं नये; कारण, ती प्रत्यक्ष जाऊन पाहिल्यावांचून नुसत्या वर्णनांने जिज्ञासूंची जिज्ञासा तृप्त होईल असें निदान आह्मांस तरी वाटत नाहीं.

८. **कस्टमहौस.**—डॉकयार्ड जवळच कस्टमहौस आहे. हें ऑफिस फार पुरातन आहे. इ. स. १६६५ सालीं जेव्हां **पोर्टुगीज** लोकांनीं **मुंबई** बंदर आणि किल्ला इंग्रजलोकांच्या स्वाधीन केला त्यावेळीं **पोर्टुगिजांचे** शिपाई राहण्याकरितां हें हौस बराकी ह्मणून वापरीत असत. परंतु ह्या बराकी जेव्हां इंग्रजांच्या ताब्यांत आल्या, तेव्हां "रायटर्स" ज्यांना हल्लीं सिव्हील सर्व्हंटस् ह्मणतात, त्यांना राहण्यासाठीं ही जागा दिली, व त्यांनीं त्या बराकींत दिवसांतून नियमित काळपर्यंतच रहावें असा हुकूम केला. ह्यावेळीं किल्ला पाहण्यास जाणें मोठें धोक्याचें काम असे. गावांत जाणें तर **शिद्दी** लोकांच्या तावडींत सांपडावें असें होतें. कारण **शिद्दी** लोक जिवावर उदार होऊन गांवांत भटकत व जो कोणी परद्वीपस्थ सांपडेल त्याचा नाश करीत. हल्लींच्या कस्टमहौसाचा उपयोग इ. स. १८०२ पर्यंत हल्लींप्रमाणें करीत नसत. मुख्य माल ह्या हौसच्या बंदरकिनारीं उतरतो. इ. स. १७७८ च्या **मुंबई** बंदराच्या जुन्या चार्ट (गलबतांतून जी समुद्राची कड दिसते तिचा नकाशा) मध्यें बंदरावरचा धक्का व मोठा दरवाजा हीं हल्लींच्या कस्टमहौसाला लागून आहेत असें दाखविलें आहे. मिस्तर **फॉर्ब्स** आपल्या बखरींत एका ठिकणीं असें लिहितो कीं, 'इ. स. १७७० सालीं ह्मणजे, ज्यावेळी मी "रायटर" होतों त्यावेळी मला मेणबत्ती घेण्याचें सामर्थ्य नसल्याकारणानें मी रायटर्स बिल्डिंगच्या शेजारीं चांदण्यांत शेक्स्पिअर वाचीत असे'! मुख्य दरवाजाच्या ढेलजावर एक दगड बसविला आहे व त्यावर कोट ऑफ आर्म्स (राजचिन्हांकित पदक) कोरला असून त्याच्या खालीं "The Hon. W. Ainslabie." (धि ऑनरेबल डब्ल्यु आन्सलेबी) लिहिलें आहे. ह्याच्या पुढें एक शब्द आहे परंतु तो लागत नाहीं. परंतु त्याचा सन १७१४ आहे. ह्याजवरून असें अनुमान करितां येईल कीं, तो भाग १७१४ सालीं बांधला असावा. **आन्सलेबी** हे

इ. स. १७०९ पासून १७१४ पर्यंत **मुंबईचे** गव्हर्नर होते आणि हा कोट ऑफ् आर्म्स **ईस्ट इंडिया** कंपनीचा आहे. ह्याजवरून असें सिद्ध होतें कीं, हा भाग इ. स. १७१४ सालीं बांधून **पोर्तुगीज** लोकांचे बराकीला मिळविला असावा. ही इमारत पहातांच तिचा जुनेपणा दिसून येतो. आंतील जिनें वगैरे सर्व रचना जुन्या तऱ्हेची आहे. हल्लीं ह्या इमारतींत **कस्टम** ऑफिस व **बाम्बे कलेक्टरचें** ऑफिस अशा दोन्ही कचेऱ्या असतात.

९. **ससून बिल्डिंग्स् आणि एल्फिन्स्टन सर्कल.**—ज्यांनी पूर्वी ग्रीनचौक कसा व कोठें होता हें पाहिलें आहे, त्यांस हें सर्कल पाहिल्यावर आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं, इतका तेथें आतां फेरबदल होऊन गेला आहे. ही जागा पूर्वी अगदी खुल्ली असून जिकडे तिकडे घाण असे. तेथेंच एक लहानसें देऊळ असे. ही जागा स्वच्छ करून तेथें उत्तम तऱ्हेच्या इमारती उभाराव्या म्हणून **मुंबईचे** माजी पोलीस कमिशनर मिस्तर **फॉर्जेट** ह्यांनी सरकारास अशी सूचना केली होती कीं, ह्या जागेंत एक बाह्यगोल इमारत असावी व ह्या त्यांच्या सूचनेस त्या वेळचे गव्हर्नर **लॉर्ड एल्फिन्स्टन** व **सर बार्टल फ्रिअर** ह्यांनी अनुमोदनही दिलें. नंतर **मुंबईच्या** म्युनिसिपालिटीनें ही सर्व जागा विकत घेऊन दुसऱ्या लोकांस नफ्यानें पुनः लहान लहान तुकडे करून विकली. पुढें **मुंबईचे** प्रसिद्ध श्रीमान यहुदी गृहस्थ **डेविड ससून** ह्यांनीं त्या जमिनीवर इमारती उभारल्या. सर्व इमारती तयार झाल्यावर ज्यांची चांगली किंमत आली त्या विकूनही टाकिल्या. ह्या इमारतीचा नकाशा मि. **रेंझी वॉल्टन** ह्यांनीं काढला होता व ह्या इमारती इ. स. १८७३ सालीं बांधून पुऱ्या झाल्या. **डेविड ससून** ह्यांनीं ह्या बांधिल्या म्हणून ह्यांस 'ससून बिल्डिंग्स्' व **लार्ड एल्फिन्स्टन** ह्यानीं बांधण्यास अनुमोदन दिलें म्हणून त्यांचेच नांव ह्या सर्कलास दिलें आहे.

१०. ह्याच सर्कलांत एक चौथरा वटवृक्षाखालीं बांधलेला आहे, तेथें घोडे, बैल वगैरे जनावरांस पाणी पिण्याकरितां मोठी टांकी बांधिली आहे. ह्या वृक्षाखालीं एक मोठी भुयारासारखी विहीर आहे, तिचें पाणी

पिण्यास फार उत्तम असून तिला आंत उतरण्यास पायऱ्या आहेत. पण तिच्या तोंडावर नेहमीं लोखंडी झांकण बसविलेलें असतें. ह्या विहिरींचें पाणी पंपानें काढून तें तेथें असलेल्या टांक्यांत गुरांस पाजण्याकरतां घालतात. एका गुर्जर महाजनानें एक पगारदार गुजराथी ब्राह्मण येथें ठेविला आहे, तो जाईल त्यास पाणी पाजतो. ह्या ठिकाणीं पाणी पिणारे लोक आपली तहान भागवून अंमळ वटवृक्षाखाली बसून आराम पावतात. अशा कृत्यास धर्मकृत्य नव्हे असें कोण म्हणूं शकेल ? ह्याच झाडाखालीं एक कारंजे आहे त्याजवर तीन भाषांत लेख आहेत त्यांपैकीं मराठींतला लेख वाचकांकरितां खालीं दिला आहे :—

" हें कारंजे बाई माणकुवर बाई गंगादास विजभुकणदास यांची विधवा स्त्री हिणें लोकोपयोगार्थ बांधिलें. शके १७९५ संवत १९३०."

**११. नवें सेक्रेटरी ऑफिस.**— हें ऑफिस इ. स. १८६७ सालीं बांधण्यास सुरवात होऊन इ. स. १८७४ सालीं पुरें झालें. हें ऑफिस बांधण्याचें मुख्य कारण असें आहे कीं, मागें जुनें सेक्रेटरीएट ह्मणजे ज्यांत गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस होता तेथें सर्व सेक्रेटरींचीं ऑफिसें राहण्यास फार गैर सोई होऊं लागली. ही अडचण दूर करावी ह्या उद्देशानें वरील इमारत बांधण्यांत आली. हें ऑफिस **क्रॉटन रो** व **ब्याकबे** ह्या दोन रस्त्यांवर आहे. ह्या ऑफिसापुंढे ४४३ फूट जागा मोकळी आहे व पाठीमागें ह्मणजे पूर्वेच्या बाजूला दोन उपगृहें (Wings) आहेत. ही इमारत बांधण्यास एकंदर खर्च १२,६०,८४४ रुपये झाला आहे. वर जातांना दगडावर जो इंग्रजी लेख आहे तो खालीं जशाचा तसा दिला आहे. ह्या इमारतींस मुख्य जिना दगडाचा असून तो फक्त एका बाजूस भिंतीच्या आधारावर आहे. ह्या इमारतींत गव्हर्नर साहेबाचें बसण्याचें ठिकाण आहे, त्यास **कौन्सिलहॉल** ह्मणतात. वर्षांतून एक दोन वेळां ह्या ठिकाणीं गव्हर्नर साहेबांची ' लेव्ही ' भरत असते. गव्हर्नर साहेब ह्या इमारतींत असतात तितका काळपर्यंत टावरच्या शेंड्यास निशाण फडकत असतें. ह्या इमारतींत एकंदर ऑफिसें आहेत ती येणेंप्रमाणें :—

१ स्टाम्प ऑफिस; २ अकौंटंट जनरलचें ऑफिस; ३ कौन्सिल हॉल; ४ रेव्हिन्यू, फिन्यान्शिअल आणि जनरल डिपार्टमेंटस् ; ५ स्यानिटरी

कमिशनरचें ऑफिस ; ६ मिलीटरी मरिन आणि इक्लेझिआस्टिकल डिपार्टमेंटस् ; ७ गव्हर्न्मेंटसेंट्रलप्रेसची शाखा ; ८ रिपोर्टर ऑन् धि नेटिव प्रेसचें ऑफिस ; ९ पोलिटिकल, ज्युडिशिअल, एज्युकेशनल, सिक्रेट् आणि लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंटस् ; १० ओरिएन्टल ट्रान्सलेटर टु गव्हर्न्मेंटचें ऑफिस; ११ इन्कम ट्याक्स कलेक्टरचें ऑफिस; १२ रेकॉर्डरूम वगैरे वगैरे.

१२. ही इमारत बहुतेक सर्व लोखंडी आहे. ह्या इमारतींत कामगार लोकांकरितां वर नळ व मोऱ्या केल्या आहेत. जमीन चित्र विचित्र दगडांच्या तुकड्यांची केली आहे, तेणेंकरून तेथें गालिचाच पसरला आहे कीं काय असा भास होतो. एकंदरींत ही इमारत फारच सुंदर आहे.

This building for the offices of the Government of Bombay was erected from the designs submitted on the 29th September 1865 by Colonel (then captain) H. St. Clair Wilkins, R. E., A.D.C. to the Queen to H. E. the Hon'ble Sir Bartle Frere, G.C.S.I., K.C.B., Governor and President in the Council, and sanctioned by the Right Hon'ble Sir Charles Wood, Bart, G.C.B., Her Majesty's Secretary of State in Council, on the 16th June 1866. The work was commenced on the 16th April 1867, H. E. the Right Hon'ble Sir William Robert Seymour Vesey Fitz-Gerald, G.C.S.I., Governor and President in Council, and was completed on the 20th March 1874, H. E. the Hon'ble Sir Philips Edmond Wodehouse, K.C.B. Governor and President in Council. The work was carried out under the immediate orders of Captain C.W. Finch, R. E. from April 1867 to November 1867; Lt. Col. J. A. Fuller, R. E. from November 1867 to May 1871. J. H. E. Hart, M. Inst. C. E., from May 1871 to November 1872; Col : J. A. Fuller, R. E. from November 1872 to March, 1874. Mr. Wasudeo Bapuji Kanitkar, Assistant Engineer, being in charge.

Estimate as sanctioned Rs. 12,80,721; actual cost Rs. 12,60,844

Col. M. K. KENNEDY, R. E.
Secretary to Government in the P. W. D.

ही इमारत बांधण्यास सुरुवात कधीं झालीं; ती बांधून पुरी कधीं झाली ; तिचा मूळ नकाशा कोणी काढला ; काम पाहण्यास इंजिनिअर कोण कोण होते व एकंदर खर्च किती झाला वगैरे माहिती ह्या इंग्रजी लेखांत आहे.

१३. **जुनें सेक्रेटरी ऑफिस**.—ही इमारत फार प्राचीन आहे. मुंबईचे गव्हर्नर **एल्फिन्स्टन** साहेब ह्यांचे कारकीर्दीपर्यंतचे सर्व गव्हर्नर येथेंच राहत असत. मूळ पाहिलें तर ही इमारत आगस्टिनिअन पंथानुयायांच्या कालेजाकरितां बांधिली होती. कित्येक असें ह्मणतात कीं हें कॉलेज नसून च्यापेल (देऊळ) होतें. ह्या इमारतींत सेक्रेटरीच्या ऑफिसाकरितां जी जागा होती तेथें इ. स. १७६४ पूर्वी एक मोठा तलाव होता; परंतु, ही सर्व जागा कोणी **व्हाईटहाल** नामक गृहस्थानें विकत घेऊन सर्व तलाव भरून काढला व हल्लींची इमारत नीट बांधिली. इ. स. १८७४ सालीं जेव्हां नवें सेक्रेटरी ऑफिस बांधिलें तेव्हां ही इमारत गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेसाकरितां दिली. पुढें ही इमारत इ. स. १८८६-८७ सालीं सरकारानें विकल्यामुळें हल्लीं तेथें छापखाना नाहीं. इ. स. १८२५ त ह्या इमारतीविषयीं बिशप **हिबर** साहेबाचें असें ह्मणणें आहे कीं, जरी ही इमारत विस्तीर्ण व सोयस्कर अशी आहे तरी हिचा कौन्सिल भरणें व सरकारी काम चालविणें या शिवाय दुसरा उपयोग नाहीं.

१४. **युनिव्हर्सिटी सिनेटहॉल**.—ह्या इमारतीचें काम फ्रेंच लोकांच्या फार प्राचीन काळच्या बांधणीच्या धर्तीवर बांधलें आहे. हिची रुंदी ४४ फूट, लांबी १०४ फूट व उंची शिलिंगपर्यंत ६३ फूट आहे. हॉल खेरीज करून शेवटच्या दोन उंच टोंकांचा व्यास ३८ फूट असून पुढें सुंदर अशी कमान आहे तिनें ७ फूट जागा व्यापिली आहे. पुढील गच्ची ११ फूट आणि बाजूच्या गच्च्या ८ फूट रुंदीच्या आहेत. हॉलच्या बाजूला सभोंवार ८ फूटींची गच्ची (ग्यालरी) आहे*; व तिला नकशीदार अशी लोखंडी त्रिकोणाकृति टोंकें आहेत. आंत शिरतांना दोन्हीं बाजूंनीं जिने असून त्यांजवर अष्टकोणाकृति मनोरे आहेत. ह्या इमारतीचे दगड बहुतकरून सर्व पोरबंदरी आहेत. जमीन नानाप्रकारच्या रंगी बेरंगी दगडांची केलेली

असून मुख्य दरवाज्यापुढची जमीन संगमरवरी दगडाची आहे. ही इमारत बांधण्यास **मुंबई** सरकारची मंजुरी इ. स. १८६९ सालीं मिळाली. त्यावरून त्याच वर्षाचे मार्च महिन्याच्या १ ल्या तारखेस कामास सुरवात झाली व इ. स. १८७४ च्या ३१ डिसेंबर रोजीं सर्व इमारत बांधून पुरी झाली. ह्या इमारतीसाठीं **सर कावसजी जहांगीर** नैट. सी. एस्. आय्. ह्यांनीं एक लक्ष रुपये दिले ह्मणून हिला 'सर कावसजी जहांगीर युनिव्हर्सिटीहॉल' असेंही ह्मणतात. ह्या इमारतींत इ. स. १८७६ सालीं सदर्हु गृहस्थाचा पुतळा बसविला आहे. ही इमारत लहानशीच, पण मोठी टुमदार अशी असून हिचा देखावा दोन प्रहरांपूर्वी फारच उत्तम दिसतो. येथेंच प्रतिवर्षी निरनिराळ्या परीक्षांत उतरलेल्या उमेदवारांस चान्सलर पदवीदान करितात, त्यावेळीं सर्व ग्राजुएट लोक हजर असतात. ह्या इमारतीच्या खिडक्या फारच उत्तम केल्या आहेत. एकंदरींत इमारतीचा देखावा थंडवेळीं बराच मनोवेधक दिसतो.

१५. **युनिव्हर्सिटी लायब्ररी व राजाबाई टॉवर.**—युनिव्हर्सिटी लायब्ररी व क्लॉक टॉवर ह्यांचा प्लान मिस्तर गिल्बर्ट स्कॉट साहेबाच्या हातचा आहे. ह्या इमारतीस खालीं दोन मोठे हॉल आहेत. मुख्य जिना २८ चौरस फूट असून पाठीमागच्या भागाला अष्टकोणाकृति चिंचोळा भाग आहे. पश्चिम बाजूला मनोरा आहे व द्वारमंडप २६ चौरस फूट आहे. भिंतीही ५ फूट जाडीच्या आहेत. एकंदर इमारतीची लांबी १५२ फूट आहे. पश्चिम बाजूला दोन्हीं अंगांनीं वर्तुळाकार जिने आहेत. भिंतीपासून पुढें थोडिशी मोकळी जागा आहे. वरच्या मजल्यावर लायब्ररी व रिडिंग रूम आहे. व तीं दोन्हीं एकाच हॉलमध्यें आहेत. ह्याच इमारतींत 'लॉ लेकचर्स' होत असतात व येथेंच युनिव्हर्सिटी ऑफिस आहे. खिडक्यांस लावलेलीं तावदानें फारच उत्तम असून त्यांचा देखावाही अति मनोहर दिसतो.

१६. राजाबाई टॉवर युनिव्हर्सिटी लायब्ररीला लागूनच पश्चिम बाजूला असून २८० फूट उंच आहे. वर चढतांना पहिल्यानेंच एक हॉल लागतो त्याची उंची ६८ फूट आहे. ह्या हालपर्यंत चतुष्कोणाकृति सरून पुढें

अष्टकोणाकृति रचना लागते. दुसरा हॉल ११८ फूट उंचीवर आहे. तिसरा ह्मणजे शेवटचा दुसऱ्यापासून ९४ फूट उंच आहे ह्मणजे एकंदर २८० फूट होतात. ज्या जागीं घड्याळ बसविलें आहे. त्या जागेचा व्यास आंतून १२'-६" व बाहेरून १६'-६" मिळून १६७" इतका आहे. रात्रीच्या वेळीं लोकांस वेळ समजावा ह्मणून कांही दिवसांपूर्वी आंत विजेचा दिवा लावीत. तो सगळी रात्रभर जळत असे व पाहिजेल त्यावेळीं यंत्राच्या योगानें फिरवितां येई. तिसऱ्या हॉलपासून घड्याळाला सुरवात होते ती थेट शेवटपर्यंत जाऊन पोंचली आहे. ह्या घड्याळास मोठ्या जबरदस्त घंटा आहेत. त्या प्रत्येक १५ मिनटानीं वाजतात व तास झाला ह्मणजे टोले पडतात. कधीं कधीं बाजाही वाजत असतो. हें घड्याळ मेसर्स **ब्लॉकली** आणि **लंड** ह्या कंपनीनें तयार केलें आहे. वर असतां घंटा वाजली ह्मणजे अशी भीति वाटते कीं जणूं काय आतां हा टॉवर कोसळून खालीं पडेल कीं काय न कळे ! घड्याळाचीं यंत्रें अशीं कांही बसविलीं आहेत की, तीं पाहण्याबरोबर मनुष्य अगदीं थक्क होऊन जातो ! वर जाण्यास एकंदर २८२ पायऱ्या आहेत व आंत उजेड पडावा ह्मणून मधून मधून भिंतींतून खिडक्या ठेविल्या आहेत. तरी एक दोन ठिकाणीं बराच अंधार पडतो. पायऱ्या फारच अरुंद असून वर जाण्याची जागाही आंखूड आहे, त्यामुळें चढतांना जीव कसा अगदीं थकून जातो. जमिनीपासून १०९ पायऱ्यावर चढून गेलें ह्मणजे एक टप्पा पुरा होतो. त्याच्यावर ४७ पायऱ्या गेलें ह्मणजे दुसरा. तेथून २४ पायऱ्या आणखीं वर गेलें ह्मणजे तिसरा टप्पा पुरा होतो. येथून घड्याळ लागतें. आणखीं ५० पायऱ्या वर गेलें म्हणजे घड्याळ्याचीं यंत्रें दिसतात. त्याच्यावर ५२ पायऱ्या गेलें ह्मणजे वर जाण्यास एक लहानसा कांचेचा दरवाजा लागतो त्यावर चढून जायचें असतें व येथूनच घंटा वगैरे सर्व घड्याळाचें काम साफ दिसतें. वरून पाहिलें ह्मणजे, सर्व शहराचा देखावा साफ दिसतो. रस्त्याचा, आगगाडीचा, घोड्यांच्या गाड्यांचा, बाग वगैरेचा देखावा फारच मनोवेधक दिसतो. समुद्र तर कित्येक कोसपर्यंत दिसतो. वर घुमट असून त्याच्या सभोंवती सुमारें तीन फूट रुंदीची जागा चालण्यास आहे. वर हिंदु, मुसलमान, पारशी वगैरे लोकांचे पुतळे आहेत. ह्या घड्याळास

एकंदर ३०,००० रुपये खर्च झाला आहे. यंत्राच्या योगानें घंटा वाजतात. घुमटाची उंची ५२ फूट आहे. त्याच्या टोंकावर एक वाटोळा दगड बसविला आहे. पूर्वी ही इमारत लोखंडी बांधावी असा विचार होता; पण तो रहित झाला. मनोऱ्याच्या टोंकापासून तों खालपर्यंत विद्युत्वाहक तांब्याची एक नळी आहे, तिचा व्यास २ $\frac{1}{2}$ फूट आहे. ही नळी बाजूला ६० फूट वळली असून जमिनींत पाणी लागे तोंपर्यंत पुरली आहे. आज एवढें मोठें अवाढव्य काम केलें तरी एकही मनुष्याचे जिवास धक्का पोंहचला नाहीं ही मोठी आश्चर्याची गोष्ट होय. लायब्रीकरितां २,८०,७४८ व टॉवरकरितां २,१७,३४५ रुपये सरकारानें मंजूर केले होते; परंतु ह्यांस खर्च ५,४७,७०३ रुपये जास्त लागला. शेट **प्रेमचंद रायचंद** ह्यांनीं चार लक्ष रुपये आपल्या **राजाबाई** नामक आईच्या स्मरणार्थ टॉवर बांधण्याकरितां इ.स. १८६४-६५ सालीं दिले व त्याचें व्याजही ह्याच कामास लावावें अशी योजना त्यानें करून ठेविली आहे. ह्या टॉवरखालीं उभें राहून पाहणें आहे तर वर मान करून पागोटें अगर जें कांही डोकींत असेल त्याला हात धरल्यावांचून पहावत नाहीं. वर जाऊन खालीं पाहिलें तर मोठमोठीं घरेंही कशीं चिमुकलीं दिसतात. इतका हा टॉवर उंच आहे.

१७. **हायकोर्ट.**—ह्या इमारतीचा मूळ नकाशा कर्नल **फुलर** साहेबानें काढला होता. हिची लांबी ५६२ फूट असून रुंदी १८७ फूट आहे. आढ्यापर्यंत हिची उंची ९० फूट असून ही इमारत मध्यभागापासून १७ फूट उंच आहे. जज्ज लोकांस जाण्याकरितां प्रत्येक बाजूला एक एक असे दोहों बाजूला खासगी जिने आहेत. खालीं तळाला मुख्य जिन्याजवळ दोन मोठाले हॉल आहेत. ह्यांची लांबी रुंदी ४९ x २२ अशी आहे. एका हॉलमध्यें गुन्हेगार कैदी ठेवतात व दुसऱ्यामध्यें कोर्टाचा छापखाना आहे. ह्या इमारतीच्या पूर्वबाजूला प्रत्येक टोंकाला एक एक जिना आहे. हे जिने फार अरुंद आहेत. ह्यावरून गेलें ह्मणजे मनुष्य कोर्टांत जातें. खालतीं ह्मणजे तळ जमिनीवर स्मालकॉजकोर्ट आणावें असा इरादा होता; पण, हल्लीं येथें **मुंबई**च्या शेरिफचें ऑफिस, इनसालव्हेंट डेटर्स कोर्टाचे क्लार्कांचे ऑफिस, ऑफिशिअरल असायनीचें ऑफिस, क्लार्कऑफ् धि क्रौनचें ऑफिस, कोर्टाचा छापखाना, रजिस्ट्रार जनरलचें ऑफिस, जॉईंटस्टॉक कंपनीचें रजिस्टरचें ऑफिस, इत्यादि ऑफिसें असून कित्येक दालनें ब्यारिस्टर

लोकांस भाड्यानें दिलीं आहेत. हायकोर्टाचीं ऑफिसें पहिल्या व तिसऱ्या मजल्यावर आहेत. दुसऱ्या मजल्यावर न्यायकोर्टें भरतात. एकंदर सहा कोर्टें आहेत. ३ अपिलेट साईडचीं व ३ ओरिजनल साईडचीं, चवथ्या मजल्यावर रेकॉर्ड रूम आहे, तेथें सर्व महत्त्वाचीं कागदपत्रें असतात. रेकॉर्ड रूम ५० x ६० फूट आहे. कोर्टाच्या व ग्यालरीच्या जमिनीवर एक प्रकारच्या कौलांची फरसबंदी केली आहे. व बाकीच्या खोल्यांत **इटाली** दगडांची फरसबंदी केली आहे. **मुंबईम**ध्यें ही फार मोठी इमारत आहे. ह्या इमारतीचा बाह्य देखावा मोठा भपकेदार आहे; पण आंत उजेडाची मोठीच उणीव आहे येवढेंच नाहीं; तर, तेथें सोई असाव्या तशा नाहींत, ह्यामुळें जज्ज व ब्यारिस्टर लोक ह्याविषयीं बरीच कुरकुर करतात व हें त्यांचे कुरकुरणें बहुतांशी खरेंही असेल. ही इमारत उभारण्यास एकंदर १६,४४,५२८ रुपये खर्च झाला आहे. ह्या इमारतीवर लेख आहे तो येणेंप्रमाणें :—

The Law courts were erected from designs by Lieut Colonel J. A. Fuller, R.E., and sanctioned by the Government of Bombay. The work was commenced on the 1st April 1871, His Excellency the Right Hon'ble Sir Seymour Vesey Fitz-gerald G. C. S.I., Governor and President in Council; and the building was completed in November 1878. His Excellency the Hon'ble Sir Richard Temple, BART, G.C.S.I., Governor and President in Council. The Hon'ble Sir Michael Roberts Westropp, B.A., Knight, Chief Justice of H. M's. High Court of Judicature. The work was carried out under the immediate orders of Lieut-Colonel J.A. Fuller, R.E., from April 1871 to May 1871. J.H.E. Hart, M. Inst., C.E., from May 1871 to November 1872; Colonel J. A. Fuller, R.E., from November 1872 to November 1878. Rao Bahadur Muckoond Ramchandra being Assistant Engineer in charge. Estimate as sanctioned Rs. 16,01,321. Actual cost Rs. 16,44,528. Lieut.-General Sir Michael Kennedy, K.C.S.I., R.E., Secretary to Government, Public Works Department.

ह्या लेखांतील भावार्थ सेक्रेटरीएटच्या मजकुराप्रमाणेंच आहे. नांवें, शक व खर्च ह्यांत कायतो फरक.

१८. **पब्लिकवर्क्स ऑफिस**.—हायकोर्टाच्या नजीकच सदहु ऑफिस आहे. ह्या इमारतीचा नकाशा कर्नल एच. सेंट **क्लेअर विलकिन्स** आर. इ; ए.डी.सी. टु धि क्विन ह्यांनीं काढला होता. इ.स. १८६९ च्या मे महिन्याचें चवथ्या तारखेस **हिंदुस्थान**सरकाराकडून ही इमारत बांधण्याची मंजूरी मिळाली. त्यावेळेस **सर सिमोर फिट्जेराल्ड** हे गव्हर्नर होते. इमारतीच्या कामास इ. स. १८६९ च्या मे महिन्याच्या २१ तारखेला प्रारंभ होऊन ती इ.स. १८७२ त एप्रिल महिन्याचे पहिल्या तारखेस बांधून तयार झाली. सरकारानें ही इमारत ४,३८,९३७ रुपयांत बांधून पुरी करावी म्हणून मंजुरी दिली; परंतु एकंदर खर्च ४,१४,४८४ रुपये झाला. ह्या इमारतींत ऑफिसें आहेत तीं येणेंप्रमाणें :—१ सुपरिंटेन्डिंग इंजिनिअर ॲट धि प्रेसिडेन्सी, २ आर्किटेकचरल् एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर आणि सर्व्हेअरचें ऑफिस व ३ एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर ॲट धि प्रेसिडेंन्सिंचें ऑफिस. हीं तळमजल्यावर आहेत. ४ एक्झामिनर ऑफ् धि पब्लिक वर्क्स अकौन्टस् हें ऑफिस पहिल्यामजल्यावर; ५ सेक्रेटरी टु गव्हर्न्मेंट पब्लिक वर्क्स आणि रेलवे डिपार्टमेंटचें ऑफिस; ६ कन्सल्टिंग इंजिनिअर फार धि रेलवेज; ७ एक्झामिनर ऑफ् रेलवे अकौंन्टस् हीं दुसऱ्या मजल्यावर आहेत. ही इमारत २८८ $\frac{1}{2}$ फूट लांब असून रुंद ५० $\frac{1}{2}$ फूट आहे. जमिनीपासून आढ्यापर्यंत ५४ फूट उंची आहे. व हिचें जें अगदीं उंच टोंक आहे त्याची उंची ११६ फूट आहे. ह्या इमारतीची जमीन चित्रविचित्र दगडांची केलेली आहे. ह्या इमारतीसही ज्यास फक्त एकाच बाजूचा आधार असा मोठा जिना आहे. ह्या इमारतीच्या पुढें द्वारमंडप आहे. ह्या इमारतीच्यापुढें उत्तरबाजूस समुद्रापासून जमिनीची उंची दाखविण्याचा दगड बसविला आहे व त्यावर चार दिशांस चार लेख आहेत, ते येणेंप्रमाणें :—

**पूर्व**

The top surface of this stone
Is 19.773 feet above the mean level of the sea
As determined by—
Major A. W. Baired, R.E.,
In charge Tidal and levelling operation surface of India

From observations with a self Registering tide guage
At Appollo Bunder
Extending from January 1878 to January 1885
During this period
The highest Recorded High water was 13.71 feet
And the lowest recorded low water was 29.39 feet
Below the top surface of this stone

पश्चिम

The top surface of this stone
Is 100 feet above the plane of
Reference hitherto known as
Town Hall datum.

दक्षिण

The top surface of this stone
Is 19.773 feet above the mean level of the sea
As marked on the Granite stone
Let into the south side of the
North entrance to the Prince's Dock

उत्तर

Standard Bench mark for Bombay,
Erected 1885.

१९. **जनरल पोस्ट ऑफिस**.—कस्टम ऑफिसजवळ पूर्वी पोस्ट ऑफिस होतें; परंतु तें जळून गेल्यामुळें हल्लीचें पोस्ट ऑफिस बांधण्यांत आलें. हें ऑफिस सरकारचे शिल्पशास्त्री **ट्रबशा** आणि **डब्ल्यू पारिस** ए.आर.आय.बी.ए. ह्यांच्या नकाशाप्रमाणें बांधलें आहे. ही इमारत बांधण्याची मंजुरी ता. १ फेब्रुवारी १८७० इसवी ह्या दिवशीं **हिंदुस्थान** सरकारानें दिली. पण बांधण्याचें काम अगोदरच ह्मणजे ता. ११ एप्रिल १८६९ ह्या दिवशींच सुरू केलें होतें. सर्व इमारत ता. १ डिसेंबर १८७२ इसवी रोजीं बांधून तयार झाली. **हिंदुस्थान** सरकारनें मंजुरी देतांना ह्या इमारतीस ५,९९,९९२ रुपयांवर खर्च करूं नये ह्मणून सांगितलें होतें; ह्या इमारतीस

एकंदर ५,९४,२०० रुपये खर्च झाला आहे. ही इमारत बांधण्याचें कारण कोणास सांगितलें पाहिजे असें नाहीं. ह्या पोस्टखात्यापासून काय फायदे आहेत ते एकाद्या पांच वर्षांच्या मुलास विचारलें तरी देखील तो सांगू शकेल. एवढा ह्याचा मोठा उपयोग आहे.

२०. ही इमारत फारच सुंदर बांधिली आहे. तळमजल्यावर पत्रें रजिस्टर करण्याचीं, पत्रें देण्याचीं, घेण्याचीं वगैरे ऑफिसें आहेत. द्वीपांतरीं जाणाऱ्या लखोट्यांच्या व बुक पोस्टच्या पेट्या निराळ्या असून फक्त **हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत** जाणाऱ्या पत्रांच्या व बुक पोस्टच्या पेट्या निराळ्या आहेत. प्रत्येक पेटीवर पितळेच्या पत्र्यांवर अक्षरें कोरून ते पत्रे मारलेले आहेत. बाह्यदेशीं रजिस्टर अगर दुसऱ्या कोणत्याही तऱ्हेनें पत्रें अगर दुसरा कोणताही माल पोस्टमार्गें जात असल्यास तें खातें निराळें, व देशांतल्या देशांत जाणाऱ्या येणाऱ्यांबद्दलचीं खातीं निराळीं आहेत. येथे एक स्टांप व्हेंडर म्हणून सरकारी मनुष्य बसतो, तो ज्यास पाहिजे असतील त्यास पैसे घेऊन स्ट्यांप पुरवितो. आपल्या देशांत ज्या दिडकीच्या कार्डाचा आपण उपयोग करितों त्यापेक्षां विलायती कार्ड निराळ्या रंगाचें असून त्याची प्रत्येकीं किंमत २ पेन्स पडते; हे कार्ड येथेंच मिळतात. **विलायत**तेस आगबोट जाते त्या दिवशीं अगर **विलायत**तेहून येते त्या दिवशीं ह्या ऑफिसांत बरीच धांदल उडते. आगबोट विलायतेहून आल्याच्या तोफा झाल्याबरोबर पोस्ट ऑफिसांतील लोकांची बरीच धांवाधांव होऊन जाते, ती इतकी कीं, बंदरांत बोट घेऊन उभी राहण्याच्या पूर्वीच पोस्टाचे शिपाई बंदरावर हजर. पत्रांच्या मोठमोठ्या पिशव्यांचे ढीगच्या ढीग आगबोट आली ह्मणजे पोस्ट ऑफिसांत येऊन पडतात. ज्यांस आपलीं पत्रें लौकर पाहिजे असतील त्यांनी पोस्टांतून दिलेला पास तेथें जाऊन तेथील कारभाऱ्यास दाखविला ह्मणजे, त्यास त्यांचीं पत्रें लागलींच दिलीं जातात. ह्यास 'विंडो डिलिव्हरी' ह्मणतात. ज्या ऑफिसांतून अशीं विंडो डिलिव्हरीची 'आर्डर' घेऊन शिपाई अगर जो कोणी येईल त्यास उशीर होऊं नये ह्मणून पोस्ट ऑफिसांत निरनिराळे खण करून त्यांजवर कंपन्यांचीं नावें लिहिलीं असतात, तेणेंकरून त्या खणांत टाकलेलीं पत्रें

त्यांस ताबडतोब देण्यांत येतात. पहिल्या मजल्यावर डेड लेटर ऑफिस आहे. पोस्टांतील लोकांस पाठविलेल्या पत्रावर लिहिलेला पत्ता मिळेनासा झाला किंवा, कव्हरावर पाठविणाराचें नांव गांव नसलें तर, ह्या डेड लेटर आफिसांत तें पत्र फोडलें जातें. आंत पत्र पाठविणाराची फक्त सहीच आहे व पत्ता मुळींच नाहीं असें असलें तर, तें पत्र कांही मुदतपर्यंत त्या ऑफिसांत ठेऊन मग त्याची वजावाट लावितात. पण त्याची नोंद ठेवितात. जर पत्रांत पत्र पाठविणाराचा पत्ता असेल तर तें पत्र त्यास पुनः पोहचतें केलें जातें. पुढें दुसऱ्या खोलींत मनीआर्डर व पोस्टल ब्यांक हीं ऑफिसें आहेत, व दुसऱ्यामजल्यावर पोस्टमास्तर जनरलचें ऑफिस आहे. ह्याच ऑफिसांतून सर्व ब्रांच पोस्ट खात्यास हुकूम सुटतात. एकदां 'पोस्टल ब्याग्स' ह्या ऑफिसांत येऊन पडल्या कीं, त्या त्या ब्रांच पोस्ट ऑफिसांत हां हां ह्मणतां वाटल्या जातात. पत्रें पोंहचविणाऱ्या 'पोस्टल व्ह्यान्स'[१] (पोस्टाच्या गाड्या) एक किंवा दोन घोड्यांच्या असतात. शहरांत कसाही समारंभ असला व रस्त्यावर कितीही गर्दी असली तरी ह्या गाड्यांस जाण्यायेण्यास मुळींच प्रतिबंध करूं नये असा सरकारचा ठराव आहे. गर्दीच्यावेळीं पोस्टल व्ह्यानवरील गाडीवान लोकांनीं बाजूला व्हावें ह्मणून 'बिगूल' फुंकतो. ह्या ऑफिसाची इमारत दिसण्यांत मोठी सुंदर असून पोस्टाच्या संबंधी जिकडच्या तिकडे सोई केल्यामुळें व येथील जागा हायकोर्ट व नवे सेक्रेटरीएट प्रमाणें हवाशीर असल्याकारणानें भर चैत्र वैशाखासारख्या उन्हाळ्यादिवसांत सुद्धां पंख्याची जरुरी लागत नाहीं.

२१. **टेलीग्रॉफ (तारायंत्राचें) ऑफिस.**—हें ऑफिस मैदानांतून पुढे आलें ह्मणजे जेथें दोन रस्ते फुटतात तेथेंच मुख्य रस्त्यावर पोस्ट ऑफिसाच्या ह्मणजे राणीच्या पुतळ्यामागें आहे. हें ऑफिस **पारिस** नामक शिल्पशास्त्राच्या नकाशावरून बांधले आहे. पोस्ट ऑफिसासंबधी ह्या शास्त्र्याचें नांव एकवार येऊन गेलेंच आहे. हें **टेलीग्राफ** ऑफिस बांधण्यास **हिंदुस्थान** सरकारची मंजुरी ता. २२ सप्टेंबर **१८७१ इ.** रोजीं मिळाली, आणि पुढें नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या तारखेस कामास सुरवात झाली. ता. २० एप्रिल १८७४ इसवी ह्या दिवशीं सर्व इमारत बांधून तयार झाली. ह्या

इमारतीस २,४४,६९७ रुपये खर्च लागला आहे. पोस्ट ऑफिस आणि हें टेलीग्राफ ऑफिस हीं मोठ्या चातुर्यानें बांधलीं आहेत. ह्या दोन्हीं इमारतींची बांधण्याची शैली बहुतेक सर्व एकसारखी आहे. त्यांत ह्या ऑफिसाची बाह्य शोभा तर फारच चांगली साधली आहे. पुढल्या बाजूला सोनेरी वेलबुटी काढली असल्यामुळें इमारतीचा तेवढा भाग बहुत सुंदर दिसतो. ह्या ऑफिसाची हल्लीं जागा पुरत नसल्याकारणानें दक्षिणांगाला बराच नवीन भाग वाढविला आहे. तळ मजल्यावर तारी (टेलीग्राम) घेण्याचें ऑफिस आहे व वरच्या मजल्यावर दुसरीं निरनिराळी ऑफिसें आहेत.

२२. **एस्प्लेनेड हॉटेल.**—हें हॉटेल म्युनिसिपल ऑफिस व सेक्रेटारी ह्या दोन इमारतींच्या नजीक आहे. ही इमारत बांधण्यास खर्च फार लागला आहे. ह्या इमारतींचें काम लोखंड व विटा ह्यांनीं केलें आहे. पण लांकडी सामान मुळींच वापरलें नाहीं. **मुंबईत** हें हॉटेल नामांकित असून सर्वात मोठें आहे. ह्यांत सुमारे १३० खोल्या असून त्यांत युरोपिअन प्रवाशांस उतरण्याची मोठी सोय केली आहे. त्यांत त्यांचा खाण्यापिण्यापासून तों निजण्याउठण्यापर्यंत सर्व बंदोबस्त असतो. उत्तर बाजूला एक मोठी ग्यालरी असून एकीच्या बाजूला एक अशा लहान लहान दुसऱ्या ग्यालऱ्या आहेत. ही इमारत पांच मजली असून ह्या शहरांतल्या इतर इमारतींप्रमाणें छपऱ्यास कौलें किंवा पत्रे नसून **अहमदनगर** वगैरे ठिकाणीं ज्याप्रमाणें आगाशा असतात त्याप्रमाणें मोठी आगाशी आहे. ह्या हॉटेलच्या स्वतःच्या गाड्या असून त्या आगबोटीवर, रेलवेस्टेशनांवर वगैरे ज्या ज्या ठिकाणीं उतारू लोक येण्याचा संभव असतो त्या त्या ठिकाणीं त्यांस हॉटेलांत आणण्याकरितां ठेवितात.

२३. **याच क्लब.**—बॉम्बे याच क्लब ह्या मंडळीनें हा बंगला आपल्या स्वतःकरिता बांधिला आहे. याचा प्लान अक्टिंग आर्किटेक्चरल एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर मि. आडाम्स् ह्यांनीं काढला होता. ही इमारत

बांधण्यास एकंदर खर्च ३६,००० रुपये झाला आहे. खालीं [१]बिलीयर्ड रूम आहे. वर जाण्याकरितां दोन जिने आहेत. एक मेंबर लोकांकरितां व एक नोकर लोकांकरितां. जेवणाची खोली ५५ फूट लांब असून ३० फूट रुंद आहे. ह्या रूमशिवाय क्लोक रूम, ड्रेसिंग रूम, आईस रूम आणि चार बाथ रूमस् आहेत. शिवाय एक रिडींग रूम आहे. ही इमारत सुंदर व रमणीय आहे.

२४. **फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूट.**—इ. स. १८२२ त **मुंबईम**ध्यें जेव्हां अवर्षण पडलें त्या वेळीं धोबीतळ्याचें पाणी आटून खडखडीत झालें ह्मणून त्यांत दोन मोठ्या विहीरी खणल्या. त्यांत गोडें पाणी लागल्यामुळें त्या तळ्यास साकरतळें हें नांव पडलें. हें मागें सहाव्या भागांत सांगितलेंच आहे. पुढें १८३१ त हें तळें शेट **फ्रामजी कावसजी** ह्यांनीं २०-२५ हजार रुपये खर्च करून बांधिलें; ह्मणून सरकारानें ह्या तळ्यास त्या उदार गृहस्थांचें नांव दिलें. परंतु, धोबीतळें हे नांव पूर्वीपासून वहिवाटींत असल्याकारणानें त्यास कोणी साकरतळे अगर **फ्रामजी कावसजी** तळें असें न ह्मणता धोबीतळेंच ह्मणतात. पुढें कांही दिवसानीं हे पारशी गृहस्थ निवर्तले, त्यावेळी ह्यांचें काहीं स्मारक असावें ह्मणून 'फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूट' नांवाची इमारत ह्या तळ्याच्या शेजारीं कांही हिंदु व पारशी गृहस्थांनीं तीस चाळीस हजार रुपये वर्गणी गोळा करून बांधली. ह्या इमारतीचा पाया इ. स. १८६२ च्या जानेवारी महिन्यांत माजी नामदार **जगन्नाथ शंकर शेट** ह्यानीं बसविला. ह्या इमारतींत प्रसिद्ध व्याख्यानें वगैरे होतात. येथेंच तळमजल्यावर नेटीव जनरल लायब्ररी आहे. हॉलांत वक्त्यांस बोलण्यास उभें राहण्याकरितां उंच जागा तयार केली असून सुमारें हजार मनुष्यें सहज बसूं शकतील एवढी खोलीं सारखी जागा आहे. दक्षिणांगाला ह्या इमारतीचें तोंड असून आंत दोन बाजूला दोन बांकडे जिने आहेत, त्यांवरून हॉलांत जातां येतें. हॉलांतून ग्यालरींत जाण्याकरितां दोन बाजूला दोन वाटोळे जिने असून त्यांजवर ग्यासचे दिवे आहेत. हॉलच्या मध्यभागी ग्यासचा मोठा झुंबर

१. बिलीयार्ड हा एका प्रकारचा खेळ आहे. हा खेळ एका चौकोनी मोठ्या टेबलावर हस्तिदंती गोळ्यांनी खेळतात. खेळण्यास मोठमोठ्या लांब काठ्या लागतात. गोळ्या एकमेकांवर येथून तेथें टेबलावर काठीच्या योगानें नेम धरून मारतात.

आहे व चोहोंकडे बत्तीचे दिवे आहेत. कांहीं सार्वजनिक कामाकरितां सभा भरविणें झाल्यास बहुतकरून हीच जागा उपयोगी पडते. हवा येण्याकरितां मोठमोठ्या खिडक्या व दारें ठेविलीं आहेत. दक्षिणांगाला आगाशी आहे. ह्या इमारतीच्या पूर्व व उत्तर आंगाच्या भिंतीस तळ्याचें पाणी लागलें आहे त्यामुळें असें वाटतें कीं, जणूं काय ही इमारत तळ्यांतूनच बांधून काढिली आहे.

२५. **जिमखाना** (कसरतशाळा.)—कापाच्या मैदानांत इ. स. १८६२ सालीं ही कसरतशाळा स्थापन झाली. ह्या शाळेसाठीं सरकारानें ही जागा बक्षीस दिली आहे व सरकारचा आश्रयही हीस आहे. जिमखाना क्लब ह्मणजे शरीर सुदृढ करण्याची व आंगांत अनेक प्रकारचें सामर्थ्य आणण्यास शिकण्याची शाळा. ह्याच प्रमाणें कोटांत राणीच्या पुतळ्याजवळ मंडळी आहे. हा जिमखाना इ. स. १८७६ सालीं स्थापन झाला. चमत्कार हा आहे कीं ही इमारत त्रिकोणाकार बांधली आहे. हिला **बांबे जिमखाना** ह्मणतात. ह्या जिमखान्याला सरकारचा आश्रय असून ही जागा सरकारानें ह्या कामाकरितां दिली आहे. क्यापटन **मेरिएट** ह्यांनीं ही जागा मिळविण्याच्या कामीं बरेच परिश्रम केले. ह्या इमारतीस १९,००० रुपये खर्च झाला आहे. वरील रकमेपैकीं सर **कावसजी जहांगीर** ह्यांनीं ५,००० रुपये दिले. आंत ब्याडमिंटन कोर्ट व रिफ्रेशमेंटबार अशा दोन जागा आहेत. बाकीची जागा कसरत करण्याकरितां व बागाकरितां. ही मंडळी क्रिकेट खेळणें, घोड्यावरून पैजा मारणें, धांवून नेमलेल्या ठिकाणीं पुढें जाणें, उंच ठिकाणावरून उड्या मारणें असे अनेक प्रकारचे शरीराची हुशारी व चपळता दाखविण्याचे खेळ करिते. ह्यांत उत्तम ठरेल त्यास बक्षिस मिळतें. बिलीयर्ड ह्मणून एक इंग्रज लोकांचा खेळ आहे तोही येथें खेळतात. ह्या जिमखान्याचे मोठ मोठे इंग्रजलोक मेंबर आहेत. ह्याच प्रकारचा एक तालीमखाना मलबारहिल्‌वर सिडी रोडवर आहे.

२६. हिंदू, मुसलमान, बेनीइस्राएल व पारशी लोकांचे तालीमखाने जिकडे तिकडे पूर्वीपासून आहेत; परंतु त्यांत व्यवस्था नसते व दांडगाई फार होत असल्यामुळें त्यांत फारकरून चांगले लोक जात नाहींत. परस्पर

तालीमवाले लोकांत वारंवार तंटे होऊं लागल्याकारणानें सरकारानें कित्येक तालीमखाने बंदही केले.

२७. धोबीतळ्यावर कसरत शिकविण्याकरितां पारशी लोकांनीं एक कसरतशाळा घातली आहे. ह्यांत सर्व प्रकारचें कसरतीस लागणारें सामान ठेविलें आहे. तशीच कांपाच्या मैदानांत **गोकुळदास तेजपाळ** ह्यांच्या हॉस्पिटलानजीक दुसरी एक कसरतशाळा आहे. ही इ. स. १८६२ त स्थापन झाली. ह्या कामासाठीं सरकारानें जागाही फुकट दिली आहे. अशीच एक कसरतशाळा कोटांत आहे.

२८. **सेलर्स होम**.— ह्या सेलर्स होमच्या पायाचा दगड पहिल्यानें ड्यूक ऑफ् **एडिन्बरो** ह्यांच्या हातानें हार्नबी रोडवर बसविला गेला होता; परंतु, हल्लीं तो तेथून काढून हल्लींच्या जागीं बसविण्यांत आला आहे. ह्या इमारतीचें काम २८ फेब्रुवारी इ. स. १८७२ रोजीं सुरू करून इ. स. १८७६ च्या फेब्रुवारी महिन्याच्या २९ तारखेस पुरें झालें. ज्या वेळीं माजी श्रीमंत **खंडेराव गायकवाड** ह्यांनीं **मुंबई**स आपल्या राज्ञीचे द्वितीय चिरंजीव **ड्यूक आफ् एडिन्बरो** हे येथें आले होते तेव्हां त्याचें स्मारक कांहीं असावें ह्मणून ह्या कृत्यास २ लक्ष रुपये दिले होते. ह्या इमारतीस एकंदर खर्च ३,६६,६२९ रुपये लागला आहे. वरील २ लक्ष रुपयांशिवाय बाकीचा खर्च सरकारानें दिला. इ. स. १८७६ सालीं नामदार **लार्ड लिटन**, माजी गव्हर्नर जनरल, ह्यांनीं हें सेलर्स होम उघडिलें. पी. आणि ओ. कंपनीचे माजी सुपरिंटेंडेंट क्यापटन **हेनरी** ह्यांच्या स्मारकाकरितां वर्गणीनें जमा केलेली ६,००० रुपयांची रकम ह्या इमारतीकरितां बक्षीस दिली व तिच्या व्याजांतून पुस्तकें, वर्तमानपत्रें ह्या होम करितां घ्यावीं असें ठरलें.

२९. **व्हिक्टोरिआ टर्मिनस** (बोरीबंदर स्टेशन).—**मुंबई**मध्यें जी. आय्. पी. रेल्वेचें हें शेवटचें स्टेशन होय. **मुंबई**तील सर्व स्टेशनांमध्यें हें उत्तम आहे. ह्या स्टेशनांत कंपनीचीं **मुंबई** येथील सर्व ऑफिसें राहण्याची सोय केली आहे. ही इमारत म्युनिसिपालिटीच्या बागापासून तों थेट **क्राफर्ड** मार्केटानजीक ह्मणजे सुमारें १,५०० फूट लांब गेली आहे. इ. स. १८८२ च्या जानेवारी महिन्यापासून ह्या स्टेशनांतून गाड्या जाऊं येऊं

लागल्या. **मुंबई**हून बाहेरगांवी जाणारे उतारू पश्चिमेकडील मुख्य दरवाजांतून आणि बाहेरगांवाहून येणारे उतारू पूर्वबाजूच्या दरवाज्यांतून जातात. ह्या स्टेशनास मोठे सुंदर प्ल्याटफॉर्म आहेत व रेली आठ आहेत. स्टेशनाची लांबी ६०० फूट आहे. मुख्य प्ल्याटफॉर्म २३२ फूट लांब व ८० फूट रुंद असून ह्यास लोंखंडी खांब देऊन त्यांवर पत्रे बसविले असून ते मुख्य इमारतीला जोडले आहेत. एका प्ल्याटफॉर्मवरून दुसऱ्या प्ल्याटफॉर्मवर जाणें झालें तर मोठमोठे जिने असून वर गलेऱ्या आहेत त्यांतून जाण्याची सोई केली आहे. स्टेशनाच्या उत्तरभागाला तिसऱ्या व चवथ्या वर्गाच्या उतारू लोकांस तिकीट देण्याचें निराळेंच ऑफिस आहे, व तेथेंच त्यांच्याकरितां विश्रांतीच्या खोल्या आहेत. उतारू लोकांस वेळ समजावा ह्मणून प्ल्याटफॉर्मवर दोन मोठीं विशाळ घड्याळें बसविलीं आहेत. ट्राफिक म्यानेजरचें ऑफिस उत्तरबाजूच्या कोपऱ्यांत आहे व तेथेंही उतारू लोकांचे सोईकरितां कांही जागा ठेविली आहे. ९० फूट लांब, ८० फूट रुंद व ४४ फूट उंच असा पहिल्या व दुसऱ्या वर्गाचे उतारूंकरितां एक मोठा दिवाणखाना आहे. ह्या दिवाणखान्याचे खांब संगमरवरी दगडाचे असून वर सुंदर अशा ग्यालऱ्या आहेत. पहिल्या व दुसऱ्या वर्गाचे उतारूंकरितां ह्या हॉलच्या शेजारींच तिकीट ऑफिसें, वेटिंग (विश्रांतीच्या खोल्या) रूमस् व रिफ्रेशमेंट रूमस् (उपहार गृहें) आहेत. ह्या रिफ्रेशमेंट रूमच्या शेजारीं मडमाकरितां मोठ्या उंची सामान भरलेल्या व सुंदर अशा वेटिंग रूमस् आहेत. ह्यांची जमीन उत्तम दगडांची असून साफ धुतल्यावर गालीच्या सारखी दिसते. इमारतीचा बहुतेक सर्व मध्यभाग एजंट, चीफ् इंजिनिअर व चीफ् अकौंटंट यांच्या ऑफिसांकरितां आहे. नैर्ऋत्य दिशेकडील भाग सरकारी मेल पोस्ट ऑफिसें ह्याकरितां ठेविली आहे. ऑफिसाकरितां इमारतीचे तीन मजले आहेत, व मध्यभागीं उत्तम व सुशोभित घुमट आहे, त्याचें वजन ९ टन असून परिघ ८५ फूट आहे, व त्याच्या मध्यभागावर मोठें घड्याळ बसविलें आहे. ह्याच्याच खाली राणीचा पुतळा उभा केला आहे. ह्याची उंची ७ १/२ फूट असून वजन ४/५ टन होईल. पुतळ्याचें काम सुरेख आहे. ह्या इमारतीच्या पुढल्या जागेंत ह्मणजे इमारतीच्या दोन्ही सरंजामामध्यें

कारंजासहित एक बाग केला आहे. व दक्षिणबाजूला मोठा टॉवर असून त्यावर एक पुतळी उभी केली आहे. भिंतीवर पश्चिम आंगाला मोर व इतर पक्षी, व तसेंच निरनिराळ्या जातींचे पुरुषांचे पुतळे कोरले आहेत. पाणी जाण्याकरितां मोऱ्या आहेत त्यांच्या तोंडाशीं माकडें, कुतरें व बाजूला वाघ, सिंह वगैरे जनावरें वगैरेचे पुतळे बसविले आहेत. मुख्य दरवाजावर एका बाजूस सिंह व दुसऱ्या बाजूस वाघ असे पुतळे बसविले असून दरवाजामध्येंच कमानीवर मोठा कंदील आहे. ह्या स्टेशनास व्हिक्टोरीआ टरमिनस हें नांव महाराणी **व्हिक्टोरिआ** यांच्या तारिख १६ फेब्रुवारीच्या ज्युबिली उत्सवाच्या दिवशीं दिलें आहे. एकंदरींत ह्या स्टेशनासारखें स्टेशन सर्व **हिंदुस्थानांत** किंबहुना जगांतही नसेल असें ह्मणतात. ह्या स्टेशनास एकंदर २७ लक्ष रुपयांवर खर्च होईल असा अजमास केला आहे.

३०. **गेइटी थिएटर**.—हें नाटकगृह व्हिक्टोरिया टर्मिनस रेलवे स्टेशनाजवळ आहे. हें मिस्तर नाझर नामक पारशी गृहस्थानें बांधलें आहे. ह्या नाटकगृहाची रंगभूमी ७० फूट रुंद असून पडद्याचे जागेची ३१ फूट रुंदी आहे व रंगभूमीपासून पडदे २२ फूट उंच आहेत. बसण्याचे जोगच्या 'आर्चेस्ट्रा स्टॉल्स' 'स्टॉल्स' आणि पीट अशा तीन प्रति आहेत. शिवाय आर्चेस्ट्राबाक्सवर ग्यालरी आहे तेथें ४ मनुष्यांस बसण्याची सोई आहे. ह्याप्रमाणें बसण्याच्या जागा आहेत. खालची जागा सर्वास एकसारखें दिसावें ह्मणून रंगभूमीपर्यंत उतरती केली आहे. वरच्या ग्यालरीची रचना अर्धचंद्रकार असल्यामुळें दोन्ही कोपऱ्यांत बसणारे लोकांस रंगभूमीवर काय चालतें ते बरोबर दिसत नाहीं, ही मोठी उणीव ह्या नाटकगृहांत आहे. हीच उणीव **मुंबईं**तील बहुतेक सर्व नाटकगृहांत अधिक उण्या मानानें पाहण्यांत येतें. ह्या थिएटरांत ग्यासचे दिवे घेतले आहेत. रंगभूमींवर सोंगें घेणारांसाठी निराळ्या खोल्या असून तेथें पाण्याचे नळ घेतले आहेत. ह्याच्याच शेजारीं **नॉव्हेल्टी** थिएटर आणि **आल्फ्रेड** थिएटर हीं नाटकगृहें आहेत. **न्याशनल** थिएटर **गुलालवाडींत** आहे. ग्रांटरोड रस्त्यावर **व्हिक्टोरिया** थिएटर, **आल्फ्रेड हिंदी** थिएटर, **रिपन** थिएटर इत्यादि नाटकगृहें **मुंबईं**त आहेत. येथेंच ग्रांटरोड थिएटर ह्मणून नामांकित व जुनें नाटकगृह होतें. परंतु तें मोडून हल्लीं त्या

ठिकाणी गिरणी बांधण्यांत आली आहे. **मुंबई**तील नाटकगृहांत शनवारीं व बुधवारीं खेळ होतात. मध्यें मध्यें आडवारींही नाटकीलोक खेळ करितात. वर्षाऋतूंत खेळ फार कमी होतात.

३१. नाटक ह्या विषयासंबंधीं येथें दोन शब्द लिहावे असें आमच्या मनांत होतें. पण तसें करून विनाकारण ग्रंथ विस्तार करण्यांत कांहीं हंशील दिसत नाहीं. कारण ह्या संबंधानें वर्तमानपत्रादिकांतून वेळोवेळीं साधक बाधक लेख येत असतात. तरी पण, येवढें मात्र येथें सांगितल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं कीं, नाटकाच्या संबंधानें आमच्या **मुंबई**करांमध्यें अलीकडे इतका कांहीं गुलहौशीपणा वाढत चालला आहे कीं, ते ह्या कामांत आमच्या **पुणे**कर बंधूंसही घटकाभर खालीं पहावयास लावतील ! पण सर्वांत मोठी दुःखाचीं गोष्ट ही आहे कीं, प्रेक्षकसमुदायांपैकीं शेंकडा एक इसम तरी, नाटक ह्मणजे काय, तें असावें कसें, त्यांतील पात्रें कशीं असावींत, त्यांच्या भाषणांत कोणकोणते गुण अवश्य असावे लागतात, नाटकाचा मूळ उद्देश काय वगैरे गोष्टींकडे लक्ष देत असेल काय? प्रेक्षक तर राहूंद्याच; पण, आमच्या नाटककारांपैकीं केवढ्यानीं या विषयासंबंधीं पुरी माहिती करून घेऊन मग आपले ग्रंथ लिहिले असतील हें जी आज नाटकांचीं पुस्तकें बाहेर पडत आहेत त्यांच्या पर्यवलोकनानें वाचकांस सहज अनुमान करतां येईल.

३२. **धि स्टीम फ्याक्टरी.**—डॉकच्या बाजूला ही स्टीम फ्याक्टरी आहे. ही इमारत ४०० फूट लांब, ४८ फूट रुंद व ४२ फूट उंच आहे. ह्या फ्याक्टरीमध्यें बॉयलर (बंब) करण्याचीं सर्व यंत्रें व मरीन स्टीमइंजिन करण्याचें सर्व सामान आहे. वरच्या मजल्यावर हलक्या प्रतींची यंत्रें असल्याकारणानें तेथें साधारण सामान तयार होतें आणि तळमजल्यावर मोठीं यंत्रें आहेत तेथें मोठमोठालीं कामें होतात. तळमजल्याच्या शेवटच्या भागाला एक फौंडरी आहे. ह्या इमारतींत भोंक पाडण्याचीं, रोल तयार करण्याचीं, कळासी करण्याचीं, कूस काढण्याचीं वगैरे अनेक जातींचीं यंत्रें आहेत. हीं सर्व यंत्रें दोन इंजिनांवर चालतात. ह्या फ्याक्टरींत पूर्वी इंडियन नेव्हीचें काम होतें

तेव्हां तेथें पुष्कळ मोठमोठी यंत्रें तयार होत होतीं; परंतु, सरकारानें तें काम बंद केल्यादिवसापासून मोठी यंत्रें होण्यांचें काम बंद पडून हल्लीं तेथें बारीक सारीक यंत्रें तयार होतात. हा कारखाना एकवार जाऊन पहाण्यासारखा आहे.

३३. **धि पेस्तमजी हॉर्मसजी कामा हॉस्पिटल.**—हें हॉस्पिटल नव्या एलफिन्स्टन हायस्कुलाच्या शेजारीं क्रुकशांक रस्त्यावर आहे. ह्यांत फक्त रोगी स्त्रिया व मुलें ह्यांस औषधोपचार करण्यात येतो. ह्या हास्पिटलाच्या पायाचा दगड बसविण्याचा सभारंभ इ. स. १८८३ च्या नोव्हेंबर महिन्याचे २२ वे तारखेस **ड्यूक आफ् कनाट** ह्यानीं केला. ह्या हॉस्पिटलाप्रीत्यर्थ **मि. कामा** ह्यांनीं १,६४,३११ रुपये दिले आहेत. ह्या हॉस्पिटलाची जागा १९००० चौरस यार्ड असून सरकारानें मोफत दिली आहे. ज्या गृहस्थानें उदार होऊन इतकी रकम दिली त्याच्याच नांवानें ह्मणजे पेस्तनजी हार्मसजी कामा ह्या नांवानें हें हॉस्पिटल प्रसिद्ध आहे. हें सतत चालावें ह्मणून सरकारानें मदत करण्याचें अभिवचन दिलें आहे. येथें डॉक्तर मडम असते. हें १८८६ सालीं उघडलें.

३४. सदर्हु **कामा** ह्याने इतकी जी रकम ह्या कामीं खर्चिली त्यांत त्याचा मुख्य उद्देश असा होता कीं, स्वजातीय (पारशी) स्त्रियांस येथें उत्तम सोई व्हावी; पण जेव्हां पारशी लोकांनीं असें पाहिलें कीं, हा त्यांचा उद्देश सिद्धीस जात नाहीं, तेव्हां त्यांनीं ' पारशी ओरतने माटे सुवावडखानुं ' नामक सूतिकागृह मरीनलैन स्टेशनानजीक काढलें आहे.

३५. ह्या हॉस्पिटलास एक ' ट्रेनिग स्कूल फॉर नर्सिंग आणि मिडवाईफरी ' करितां जोडिलें आहे. ह्यांत बालरोग चिकित्सेसंबंधी व सुईण कामसंबंधीं शिक्षण दिलें जातें. हॉस्पिटल आणि लेक्चर रूम मिळून २२ प्युपिल नर्सीस राहण्याची जागा आहे. श्रीमंत **गायकवाड** सरकार प्युपिलनर्सिसचा खर्च चालवितें.

३६. इ. स. १८८३ सालीं **मुंबई**त स्त्रिया व मुलें ह्यांस औषधोपचार करण्याकरितां डाक्तर स्त्रिया असाव्या असा जेव्हां बूट निघाला त्या वेळीं ह्या संबंधी चर्चा चालू आहे इतक्यांत **मि. कामा** ह्यांनी वरील रकम दिली. ह्या पैशानें हें हॉस्पिटल बांधून त्यांत ५२ रोग्यांस व सोप्यांत २

रोग्यांस निजण्याची सोई केली आहे. जी बाई परीक्षेंत पुष्कळ गुण मिळवून उत्तम रितीनें पसार होईल तिला सोन्याचें पदक बक्षीस देण्याकरितां व स्कॉलरशिपकरितां २५ हजार रुपये निराळे ठेविले आहेत. ह्या हॉस्पिटलास एक लेक्चर हॉल व नर्सिंग रूम जोडावी ह्मणून त्याचा खर्च भागण्याकरितां **लेडी रे** ह्यांनी नवें सेक्रेटरी ऑफिसच्या समोर एक बाजार भरविला होता व त्याच्या उत्पन्नानें वरील होणारा खर्च भरून काढला. ह्याविषयीं हकिकत आम्हीं मागें दिलीच आहे.

३७. **गोकुळदास तेजपाळ हॉस्पिटल.**—हें हॉस्पिटल मैदानांत आहे. इ.स. १८६५ सालीं मुंबईमध्यें दुसरें एकादें हॉस्पिटल असावें अशी वाटाघाट सुरू झाली, तेव्हा मिस्तर **रस्तमजी जमशेटजी जीजीभाई** ह्यानीं सरकारानें १,००,००० रुपये दिल्यास व हॉस्पिटल चालविण्याचा सर्व खर्च म्युनिसिपालिटीनें पत्करिल्यास मीं ह्या कृत्यास १,५०,००० रुपये देईन असें कबूल केलें. ह्या प्रमाणें सर्व तयारी होत आहे. इतक्यांत सर जेमशेटजी ह्याच्या चिरंजीवास पैशाची ओढ आल्याकारणानें हा सर्व बेत रहित झाला. एके दिवशी माजी **शेट गोकुळदास तेजपाळ** हे अत्यावस्थ असतां, त्या वेळचे प्रख्यात म्युनिसिपल कमिशनर मिस्तर **क्राफर्ड**, हे त्यांचे येथें जाऊन त्यांस हा हॉस्पिटलाचे प्लान वगैरे दाखवून त्यांजपासून १,५०,००० रुपयांचा 'चेक' लिहून घेतला. ह्याप्रमाणें चेक आपल्या हातांत आल्यावर, वर सांगितलेल्या व्यवस्थेप्रमाणें सर्व योजना करण्याचें सरकार व म्युनिसिपालिटी ह्यांस सदर्हु **क्राफर्ड** साहेबानें भाग पाडलें. ह्या इमारतीच्या कामास इ.स. १८७० च्या में महिन्याच्या १० तारखेस सुरुवात झाली. त्या वेळीं सर **सिमोर फिट्जेराल्ड** हे **मुंबईचे** गव्हर्नर होते. इ.स. १८७४ सालच्या एप्रिल महिन्याच्या ८ व्या तारखेस सर्व इमारत बांधून पुरी झाली, त्या वेळीं **मुंबईचे** गव्हर्नर **वुडहौस** हे होते. ह्या इमारतीस ३,६७,४६५ रुपये खर्च झाला. ह्यांत १२० रोग्यांस निजण्याची सोई केली आहे. ह्या हॉस्पिटलांत असणाऱ्या रोग्यांस भेटण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांस दिवसास मात्र भेटूं देतात.

३८. **सर कावसजी जहांगीर अपथालमिक हॉस्पिटल.**—हें हॉस्पिटल **सर कावसजी जहांगीर रेडीमनी** ह्यांनीं **बाबुला**तळ्याजवळ **भायखळ्याच्या** रस्त्यावर बांधिले आहे. ह्यांत सर्व प्रकारचे डोळ्यांचे रोगांवर औषधें दिलीं

जातात. ह्यांत सरकारी सर्जन येऊन औषधोपचार करितो. ह्यांत रोग्यास निजण्यासाठीं खाटा ठेविल्या असून त्यांची सर्व प्रकारें सोई केलेली असते. बाकीची सोई व व्यवस्था बहुधा वरच्या हॉस्पिटला सारखीच. डोळ्यांतील मोतबिंदु रोग्यास न समजतां फारच चलाखीनें व चातुर्यानें डाक्तर लोक काढतात. ही इमारत फार विस्तीर्ण असून पहाण्यालायक आहे.

३९. **युरोपिअन जनरल हॉस्पिटल**.—हें युरोपिअन पेनशनर व विधवा ह्यांच्याकरितां बांधिलें आहे. हें इ.स. १८४९ त स्थापन झालें. ह्यांत १४० बिछानें आहेत. ह्यांत स्पर्शजन्यरोगाकरितां निराळ्या खोल्या असून बायकांकरितांही निराळ्या खोल्या आहेत. ह्यांत सर्व युरोपिअन नावाडी, सरकारचे कामगार, व्यापारीलोकांचे नावाडी वगैरे लोकांस घेतलें जातें. तसेंच मुलकी खात्यांतील वारंट आणि नॉन कमिशंड ग्यारिझन्ड ऑफिसर, युरोपिअन पेनशनर, गव्हर्नरचे ब्यांड मधलीं मनुष्यें, पोलीसचे कॉन्स्टेबल आणि सरकारी ऑफिसांतील नोकर व त्यांची कुटुंबे ह्यां सर्वांस येथें औषधोपचार करण्यांत येतो. ह्याशिवाय ह्या हॉस्पिटलांत एक सूतिकागृहही आहे. पाहिजे त्या वेळीं गेलें तरीही येथें रोग्यांस औषधोपचार करण्यांत येतो. संध्याकाळीं ५ पासून ६ वाजेपर्यंत रोगीं लोकांचे आप्तवर्ग व इष्टमित्र ह्यांस भेटण्याची मोकळीक देण्यांत येते. इ.स. १६७६ पूर्वी **मुंबईत** गोरे शिपाई व इंग्रज कामगार लोकांकरिता सोईवार हॉस्पिटल बांधावें ह्मणून **सुरतें**तील वखारीचे मुख्यानें **मुंबई**तील गव्हर्नरास हुकूम पाठविला होता. त्यांत ह्या हॉस्पिटलांत ७० रोग्यांचा समावेश होईल इतकी सोई असावी असेंही लिहिलें होतें. याप्रमाणें इ.स. १६७७ त हॉस्पिटल बांधून तयार झालें.

४०. **सर जमशेटची जीजीभाई हॉस्पिटल**.—हें हॉस्पिटल माजी सर **जमशेटजी जीजीभाई** ब्यारोनेट व **ईस्ट इंडिया कंपनी** ह्यांनीं आपल्या खर्चानें बांधलें आहे. हें इ.स. १८४५ त मे महिन्यांत उघडण्यांत आलें. येथें सर्व जातीचे रोग्यांस घेतात. ह्यांत एकंदर आजारी लोकांकरितां ५३५ बिछानें आहेत. ह्या हॉस्पिटलांत गरीब लोकांची उत्तम तऱ्हेनें सोई

ठेविली जाऊन त्यांस औषधोपचारही वेळच्या वेळीं होतो. ह्या इमारतीचें काम मजबूत असून तिचा देखावा देखील फार मनोवेधक आहे. सरकारानें आजारी लोकांस औषधपाणी वेळेवर मिळावें ह्मणून चाकर माणसें ठेविलीं असून त्यांजवर एक सुपरिंटेन्डेंटही ठेविला आहे. रोज सकाळीं सिव्हिल सर्जन येऊन रोग्याची परीक्षा करून औषधपाणी देऊन जातो. येथें सतत राहणारा डाक्तर असतो त्यास 'हौस सर्जन' ह्मणतात. हॉस्पिटलाच्याच शेजारी असाध्य व महाव्याधिग्रस्त (Incurables) रोग्यांकरितां हॉस्पिटल आहे. ह्यांत ४० पर्यंत रोगी असतात. गरीब स्त्रियांकरिता एक सूतिकागृह आहे तें बांधण्याकरितां लोकांनीं ३१,३८५ रुपये दिले. पैकीं **सर जमशेटजी जीजीभाई** ह्यांनीं १५ हजार रुपये व जागा दिली. ह्मणून त्यांचेच नांव ह्यास दिलें आहे. ह्या रकमेंतून बारा हजार रुपये शिल्लक आहेत त्यांचे व्याजांतून दाई वगैरेचा खर्च चालतो. तेथें गरीब लोकांच्या बायकांचीं बाळंतपणें होतात. सुईणीची, कपड्याची, खाण्यापिण्याची वगैरे सर्व सोई सरकारमार्फत होते. येथें गेल्यावर रोग्यास कोणत्याच प्रकारची काळजी नसते. बाळंतिणीकरितां ३० पलंग आहेत. हे पलंग लोखंडी असून त्यांना नवार गुंडाळून त्यांजवर बिछाना व चादर, आंगावर घेण्यास पासोडी, दोन उशा इतकी निजण्याची सोई असते. मलमूत्र विसर्जन करण्याची पात्रेंही तयारच असतात. रात्रीच्याप्रहरीं उजेड असावा म्हणून ग्यासचे दिवे लावतात. ह्याचप्रमाणे बायका, मुलें व पुरुष ह्यांकरितां दवाखाने आहेत. ते रविवार खेरीजकरून प्रत्यहीं सकाळीं ७ पासून ९ वाजत तोंपर्यंत उघडे असतात. ह्या हॉस्पिटलांत आजारी लोकांवर शस्त्रक्रियेचा प्रयोग (ऑपरेशन) केला तर त्यांच्याकरितां त्यांस वर जाण्याचे श्रम पडूं नयेत म्हणून पाळणें केले आहेत. ह्यांस 'हैड्रालिक लिफ्ट' ह्मणतात. त्यांस निजवून कपीच्या योगानें रोग्यांस वर ओढत घेतात व तसेंच त्यांला खाटेवर निजवून त्यांच्या पलंगावर नेतात. अशा तऱ्हेने रोग्यांची जोपासना येथें उत्तम तऱ्हेनें होते. येथें विद्यार्थ्यांस अनुभविक ज्ञान शिकवितात. येथें तयार झाल्यावर ते युनिव्हर्सिटीपरीक्षा देऊन पदव्या धारण करितात. शेवटची पदवी **एम्. डी.** ची आहे. ही परीक्षा पास झाली कीं 'तो धन्वंतरी' बनला! ह्यांत असणाऱ्या रोग्यांस भेटण्याची इच्छा असल्यास दिवसा आंत जाऊं देतात.

४१. ह्या हॉस्पिटलकरितां सर **जमशेटजी जीजीभाई** ह्यांनीं दिलेले १,७०,००० रुपये व ३०,००० सरकारांने दिलेले मिळून ह्या हॉस्पिटलास २ लक्ष रुपये खर्च झाला आहे. ह्या खात्याचा खर्च सरासरीनें ३३,००० रुपये होतो; पैकीं, सर **जमशेटजी** ह्यांनीं याप्रीत्यर्थ सरकारांत ठेवलेल्या पैशापासून ४,००० रुपये व्याज येतें त्यांतून होतो. बाकीचा खर्च सरकारच्या शिरावर पडतो. परंतु ह्यांत जागा पुरत नाहीं ही उणीव दूर व्हावी म्हणून, **बाई मोटलीबाई जहांगीर वाडिया** ह्या सधन पारशिणीनें ह्याच हॉस्पिटलाच्या शेजारी २०,००० वार जमीन दिली व तेथें एक सूतिकागृह बांधावें ह्या उद्देशानें आणखी १,५०,००० रुपये सरकारच्या स्वाधीन केले व हें जें सूतिकागृह बांधले जाईल त्यास 'बाई मोटलीबाई आब्सटेरिक हॉस्पिटल' हे नांव द्यावें असा आपला हेतु तिनें सरकारास कळविला आहे. हें हॉस्पिटल बांधून तयार झाल्यावर हल्लींच्या हॉस्पिटलास रजा देण्यांत येणार आहे. तसेंच **सर दिनशा माणकजी पेटीट** ह्यांनीं स्त्रिया व मुलें ह्यांस औषधोपचार उत्तम रितीनें होऊन त्यांची तेथें नीट व्यवस्था राहून जोपासना व्हावी ह्या उद्देशानें एक हॉस्पिटल बांधण्याकरितां १,२५,००० रुपये सरकारच्या स्वाधीन केले आहेत.

४२. **गव्हर्मेंट हौस, मलबारपांईट**—हें गव्हर्नरचें राहण्याचें ठिकाण **मलबारहिलचें** जें टोंक समुद्रांत गेलें आहे त्यावर आहे. ह्या ठिकाणाकडे जाऊं लागलें असतां प्रथम दोन चौक्या लागतात. येथें नेहमीं संत्र्यांचा पहारा असतो. आंत रस्त्यावर दुतर्फा झाडी आहे. हें गव्हर्मेंट हौस पुष्कळ लहान लहान बंगलें मिळून झालेलें आहे. सुमारें इ.स. १८०० पर्यंत **मुंबईचे** गव्हर्नर ओल्ड सेक्रेटरीएटमध्यें रहात असत. **मुंबईत** अति थंड, हवाशीर व रमणीय अशी हीच जागा आहे. पावसाळ्यांत येथें वारा मनस्वी असल्याकारणानें कोणी रहात नाहीं. परंतु ही जागा थंडी व उन्हाळा ह्या दिवसांत राहण्यास फार सुखकारक आहे. माजी गव्हर्नर **मॉनस्टुअर्ट एल्फिन्स्टन** ह्याच्यावेळीं येथें लहानसा बंगला होता. अलीकडे बॉलरूमकरितां निराळाच बंगला बांधण्यात आला आहे. बहुतेक गव्हर्नर **परळच्या** बंगल्यांत राहण्याकरितां न जातां हीच जागा पसंत करितात.

येथें कोणास परवानगीवांचून जाऊं देत नाहींत. येथें गव्हर्नर साहेब असतात त्यावेळीं ह्या बंगल्यावर निशाण फडफडत असतें. व संध्याकाळच्या प्रहरीं ब्याकबेवर गेलें ह्मणजे ह्या बंगल्यांतील दिव्यांची, मोठी गम्मत दिसते. ही इमारत भव्य असून अति रमणीय आहे. इमारतीची आंतील रचना फारच मनोवेधक व राजकीय थाटाची आहे.

४३. **गव्हर्मेंट हौस, परळ**—पूर्वी हें **परळ** येथील गव्हर्मेंट हौस जेसुईट (ख्रिस्तानुयायी) लोकांचे एक देऊळ होतें. त्या काळीं येथें ह्या जेसुईट लोकांचा इतका दरारा असे कीं, त्यांचे हुकूम येथें बिनदिक्कत चालत असत. **मुंबई** शहर इंग्रजांच्या हातीं आल्यावर ह्या लोकांनीं पुष्कळ जमिनी व हक्क मागितले. परंतु, ते त्यांस न मिळाल्यामुळें त्यांनीं बंड उपस्थित करून शिद्यांस सहाय्य करून इ.स. १६८९-९० त त्यांजकडून हें शहर घेवविलें पण, पुढें इ.स. १७२० मध्यें जेसुईट लोकांस इकडून हांकून दिले. बिशप **हेबर** ह्मणतो कीं, ह्या वेळीं ही इमारत एका पारशानें घेतली होती; परंतु इ.स. १७६५ त ती त्याजकडून सरकारानें विकत घेतली. ह्या इमारतीचा खालचा मजला मात्र अद्यापि तसाच आहे. ही इमारत सरकारच्या ताब्यांत आल्यानंतर वरचा मजला बांधण्यांत आला. ह्या इमारतीचा बाह्य देखावा फार साधा आहे; परंतु आंतली व्यवस्था अत्युत्तम आहे. डायनिंगरूम व ड्रॉईंगरूम हा प्रत्येक ८० फूट लांब असून त्याच मानानें अरुंद आहेत. माजी गव्हर्नर **वुडहौस** ह्यांनीं ह्या बंगल्यांत उत्तम प्रकारची व्यवस्था ठेविली होती; परंतु, **टेंपल**साहेब ह्यांनीं तेथील राहणेंच सोडून दिले! बंगल्याच्या पाठीमागें एक बाग आहे, त्यांत मोठमोठीं झाडें आहेत. ह्या बंगल्यांत माजी गर्व्हनर हॉर्नबी हे इ.स. १७७६ त पहिल्यानेंच राहिले होते. मूळ इमारतींत पुष्कळ सुधारणा **एल्फिन्स्टन** साहेबांनीं केली. बंगल्यांत गव्हर्नर असतो त्या वेळीं त्यावर निशान फडकत असतें. येथें कोणास आंत जाऊ देत नाहींत. इ.स. १८१० त **डंकन** साहेबानें ह्या इमारतीची दागदुजी केली होती. इ.स. १८०२ त **इराणचा** वकील ह्यांत रहात होता तो तेथेंच त्यास कोणी विषप्रयोग केल्यावरून मेला असें सांगतात.

४४. **एल्फिन्स्टन कॉलेज**.—माजी गव्हर्नर नामदार **मॉनस्टुअर्ट एल्फिन्स्टन** हे आपल्या कामाचा राजीनामा देऊन गेले, त्या वेळीं त्यांचें काहीं तरी स्मारक असावें म्हणून ता. २२ आगष्ट इ.स. १८२७ त बांबे नेटिव्ह एज्युकेशन सोसाएटीची एक सभा झाली. त्या वेळीं ह्या विद्यापीठा (कॉलेजा) विषयीं वाटाघाट सुरू झाली व इंग्रजी भाषेचे शिक्षक (प्रोफेसर) तयार करण्याकरितां एक फंड उभारला व त्यांत एकंदर २,२९,६५६ रुपये जमा झालें. ह्यांत युरोपांतील कला व शास्त्र शिकविणारे प्रोफेसर असावें असें ठरले, व त्यास एल्फिन्स्टन प्रोफेसर शिप्स हें नांव दिलें. ही वर्गणी पुढें ४,४३,९०१ रुपयेपर्यंत वाढली. शिवाय सरकारानें सालीना २२,००० रुपये देऊं केले. पहिले एल्फिन्स्टन प्रोफेसर इ.स. १८३५ त येथें आले. पहिल्यानें त्यांनी आपलें काम टौनहालांत सुरू केलें. पण त्यांस ह्मणण्यासारखें ह्या कामांत यश आलें नाही. पुढें एक दोन वर्षांनीं कांपाच्या नाक्यावर नेटिव एज्युकेशनची शाळा होती तिचा आणि ह्या कॉलेजचा मिलाफ करून तीस एल्फिन्स्टन इंस्टिट्यूट असें नांव दिलें. ह्या इंस्टिट्यूटच्या पहिला रिपोर्ट इ. स. १८४० त बाहेर पडला. पुढें इ.स. १८५६ त ह्या इंस्टिट्यूटचें कॉलेज व स्कूल अशा दोन शाखा केल्या. स्कुलास एल्फिन्स्टन हैस्कूल हें नांव दिलें. हें कॉलेज कांही दिवस भायखळ्यावर होतें. पुढें कांहीं दिवस बाजूला ट्यांक रस्त्यावर गेलें. इ.स. १८७१ च्या फेब्रुवारी महिन्याच्या २० व्या तारखेस **परळ** रोडवर म्हणजे राणीच्या बागासमोर **कावसजी जहांगीर बिल्डिंग्स** मध्यें नेलें. ह्या इमारतीस एकंदर २,००,००० रुपये खर्च झाला; पैकीं अर्धा खर्च माजी शेट सर **कावसजी जहांगीर** ह्यांनीं केला. ह्या सर्व इमारतीची व पैशाची व्यवस्था लावण्याचें काम एल्फिन्स्टन फंडट्रस्ट कमिटीच्या स्वाधीन आहे. ह्या कॉलेजच्या संबंधानें ज्या स्कालरशिपा (पारितोषकें) देण्यांत येतात, त्यांची याद युनिव्हर्सिटी क्यालेंडरमध्यें प्रतिवर्षी छापली जाते. बांबे स्कूल ऑफ् आर्तचे मिस्तर **ग्रिफिथ्स** यांनीं सर **कावसजी** यांना चेहरा तयार करून रंगवून हालांत लाविला आहे. ही इमारत मोठी सुंदर असून भव्य आहे. ह्यांत म्याट्रिक्यूलेशन (प्रवेश) परीक्षा झाल्यानंतर उमेदवार

घेतात. नंतर बी.ए., एम.ए., पर्यंत येथें अभ्यास होतो. ह्या कॉलेजास पुढील देणग्या दिल्या आहेत :—

धि वेस्ट स्कॉलरशिप फंड; हा फंड इ.स. १८२८ त उभारला. क्लेअर स्कॉलरशिप फंड; धि गायकवाड स्कॉलरशिप; बेल प्राईझ फंड; धि सुंदरजी जिवाजी प्राईझ फंड; धार (चे राजाचा) प्राईस फंड; गणपतराव विठ्ठल प्राईझ फंड; धि नवाब व सचिन प्राईस फंड; याप्रमाणें देणग्या दिल्या आहेत.

४५. हल्लीं हें कॉलेज ह्या इमारतीतून काढून नव्या सेक्रेटरी ऑफिसाजवळ गव्हर्मेंट सेंट्रल प्रेसकरितां जी इमारत बांधिली होती तेथें नेलें व ही इमारत टेक्निकल इन्स्टिट्यूटचे उपयोगाकरितां सरकारानें दिली आहे.

४६. **ग्रांट मेडिकल कॉलेज**.—हें कॉलेज **परळ** रोडवर **बाबुला** तळ्याच्या कोपऱ्यावर आहे; हें कॉलेज **मुंबई**चे गव्हर्नर सर रॉबर्ट **ग्रांट** जि. सी. एच्. ह्यांच्या स्मरणार्थ इ.स. १८४५ त स्थापन झालें. हें स्थापन करण्याचा मुख्य उद्देश **हिंदुस्था**नांतील लोकांस शास्त्रीय तऱ्हेनें वैद्यकाचा लाभ व्हावा हा होय. ह्या कॉलेजास अर्धा खर्च **ग्रांट** साहेबांचे मित्रमंडळीचा व अर्धा सरकारचा मिळून एकंदर ९०,००० रुपये खर्च झाला आहे. ह्या कॉलेजाची व्यवस्था सरकार पाहून तत्संबंधी लागणारा खर्चही सरकारचाच आहे. बाम्बे युनिव्हर्सिटी क्यालेंडरवरून असें समजतें की, १,१६,८०० रुपये लोकांनीं धर्मदाय दिले. हे कॉलेज युनिव्हर्सिटीला इ.स. १८६० त मिळविलें. ह्यांतून प्रतिवर्षी बरेच उमेदवार पसार होऊन इंग्रजी वैद्य झाले आहेत. ह्या कॉलेजांत शस्त्रक्रियेसंबंधी विद्यार्थ्यांस उत्तम तऱ्हेचें शिक्षण मिळाल्याकारणानें आज आमच्यांत बरींच रत्नें झळकूं लागलीं आहेत. ह्या कॉलेजात विद्यार्थ्यांस प्रेतें चिरून दाखविल्याकारणांनें त्यांस शारीरिक रचनेची बरीच माहिती मिळते, येणेंकरून ते शस्त्रक्रियाविशारद होतात. ही इमारत मोठी भव्य दिसते. ह्या इमारतीचा नकाशा मेजर **गुड्फेलो** ह्यांनीं काढला होता. **मुंबईत** टौनहॉलाच्या खालोखाल ही इमारत आहे. हिच्याच नजीक सर **जमशेटजी जीजीभाई** ह्यांचे हॉस्पिटल आहे. पूर्वी ह्या कॉलेजातून जे उमेदवार पसार होत त्यांस जी.जी.एम.सी. हा किताब

मिळत असे; परंतु युनिव्हर्सिटी इ.स. १८५७ सालीं स्थापन झाल्यापासून वरील चाल मोडली. आतां एल्.एम्. आणि एस्. ही पदवी देतात. ह्या कॉलेजासंबंधीं अतिश्रेष्ठ पदवी ह्मटली म्हणजे एम्. डी. ही होय.

४७. ह्या कॉलेजाचे समोर इ.स. १८६२ त सर **जमशेटजी जीजीभाई** ह्यांचा पुतळा त्यांचा चिरंजीव व पत्नी **रतनबाई** ह्या उभयतांनीं बसविला आहे.

४८. **धि गव्हर्मेंट व्हेटेरिनरी कॉलेज व हॉस्पिटल**.—हें कॉलेज **सर दिनशा माणेकजी पेटीट** ह्यांनीं **परळ** येथें दिलेल्या जागेवर बांधिलें आहे. हें कॉलेज स्थापण्याचा उद्देश सरकारच्या देखरेखीखालीं अश्वविद्येंत विद्यार्थ्यांस पारंगत करण्याचा होय. ह्या कॉलेजाच्या परिक्षेंत पास होणाऱ्या विद्यार्थ्यांस 'ग्राज्युएट ऑफ् धि बांबे व्हेटेरिनरी कॉलेज' हा किताब मिळतो. हें कॉलेज इ.स. १८८६ सालीं स्थापन झालें आहे. हॉस्पिटल स्थापण्याचा मुख्य उद्देश घोडे वगैरे जनावरांस जे नानातऱ्हेचे रोग होतात त्यांची परीक्षा करून त्यांस औषधोपचार करावा हा होय. ह्या हॉस्पिटलावरील सर्जनास "सुपरिंटेन्डेंट ह्मणतात". ह्यांचें काम **मुंबई** इलाख्यांत कोठें रोगाची सात आली तर तेथें जाऊन नीट रीतीनें बंदोबस्त करावा हें होय. ह्याशिवाय ह्यास एक कॉलेज जोडलें आहे त्यांस जाऊन विद्यार्थ्यांस शिकण्याची सुपरिंटेंडंटास परवानगी आहे.

४९. **सेंटझेव्हीअर कॉलेज व स्कूल.—गोकुळदास तेजपाळ** हॉस्पिटलानजीकच हें कॉलेज आहे. **मुंबई**इलाख्यांत अशा प्रकारचें रोमनक्याथोलिक कॉलेज ह्यासारखें दुसरें मुळींच नाहीं. ही इमारत दिसण्यांत मोठी भव्य असून केवळ राजवाड्यासारखी दिसते. हिच्या सर्व भिंती दगडाच्या असून आंत शाळेकरतां आणि कॉलेजाकरितां उत्तम सोई केल्या आहेत. ह्या कॉलेजांतील शिक्षक लोकांस "फादर" ही संज्ञा आहे. ह्यांत मूळाक्षरापासून तों "एम्.ए." पर्यंत शिकवितात. ह्या कॉलेजांत व स्कुलांत बहुतकरून किरिस्तांव लोकांची मुलें फार जातात. ह्या इमारतीचा पाया इ.स. १८६८ सालीं घालून इ.स. १८७३ सालीं ती बांधून पुरी झाली. इमारतीस एकंदर खर्च २,६२,१९४ रुपये झाला आहे; पैकीं इ.स. १८७१ सालीं सरकारानें ६१,३६८ रुपये दिले. बाकीचे पाद्री

व इतर रोमन क्याथोलिक लोकांनीं वर्गणीनें गोळा करून हे काम पुरें केले. ह्या कॉलेजात बोर्डर्स् असतात. बोर्डर म्हणजे शाळेंत राहून विद्याभ्यास करणारा विद्यार्थी. बोर्डरांची येथें जेवणाखाण्याची, निजण्याउठण्याची व अभ्यासाची उत्तम योजना केलेली असते. मुलांच्या बापापासून किंवा पालकांपासून त्यांच्या अभ्यासाबद्दल व जोपासनेबद्दल व नियमित पैसा घेतला जातो.

५०. **एल्फिन्स्टन हायस्कूल.**—एस्प्लेनेड रोडवर ही शाळा आहे. ही शाळा सेंट झेव्हिअर कॉलेजच्या नजीक असल्यामुळें त्या कॉलेजचा पश्चिम भाग झांकून गेला आहे. ही शाळा बांधण्याकरितां सर **आल्बर्ट ससून** ह्या गृहस्थानें १,५०,००० रुपये दिले. ही इमारत बांधण्यास एकंदर खर्च ५,५९,७७३ रुपये झाला आहे. हिची लांबी ४५२ फूट आहे. ३० फूट लांब व २५ फूट रुंद असे साधारण मानाचे ३० वर्ग केले आहेत. तशाच २० फूट लांब व २५ फूट रुंद मास्तरलोकांकरितां चार खोल्या आहेत. दिवाणखान्याची लांबी ६२ फूट व रुंदी ३५ फूट आहे. सभोंवार एक गच्ची आहे. दिवाणखान्यावर ५३ फूट लांब व २३ फूट रुंदीची लायब्ररीकरितां जागा आहे. ही इमारत बांधण्यांत कारागिरानें मोठीच कुशळता खर्चिली आहे. इमारतीच्या खालीं मुलांस खेळण्याकरितां मोकळी जागा रेती टाकून केली असून वर दिवाणखान्यांत जाण्याकरिता बाहेरून एक मोठा दगडी जिना केला आहे. ह्या इमारतीच्या पायाचा दगड गाड्या जाण्याकरितां जी देवडी आहे तेथें उजव्या बाजूला दरवाज्यासमोर बसविला आहे. डाव्या बाजूच्या दगडावर जो लेख आहे तो खालीं दिला आहे. ह्या शाळेचें पहिलें नांव नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचें स्कूल हें होतें. व तिची स्थापना इ.स. १८२२ त झाली होती. पुढें कांहीं वर्षांनीं ती एल्फिन्स्टन कॉलेजास मिळविल्या कारणानें हीस एल्फिन्स्टन इनस्टिट्यूशन असें ह्मणत; परंतु इ.स. १८५६ सालीं जेव्हां ती निराळीं झाली तेव्हांपासून तिला एल्फिन्स्टन हायस्कूल ह्मणूं लागलें. ही शाळा पूर्वी हल्ली जेथें स्मालकाज कोर्ट आहे त्याच्या शेजारीं होती; परंतु विद्यार्थ्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत गेल्यामुळें तेथें जागा पुरेनाशी होऊन अडचण पडूं लागली ह्मणून ही

हल्लीची शाळा बांधण्यात आली आहे. ह्या शाळेचा ऐशी हजार रुपयांचा फंड आहे. शिवाय सालीना सरकारांतून २०,००० रुपये मिळतात. ह्या शाळेंत मुलांस चवथ्या इयत्तेपासून येतात. ह्या शाळेवर एक "प्रिन्सिपाल" असतो तो सर्व शाळेची व्यवस्था पाहतों. ह्या शाळेंत सर्व जातींची मुलें घेतली जातात. शाळामास्तर हिंदु व पारशी आहेत. मराठी साईड व गुजराथी साईड अशा ह्या शाळेच्या दोन शाखा आहेत. ह्या शाळेंत म्याट्रिक्युलेशनपर्यंत मुलांचा अभ्यास होतों. ह्या शाळेचा देखावा सुंदर असून जागाही चांगली हवाशीर आहे. ह्या शाळेंत इंग्रजी, हिंदुस्थानी, मराठी, गुजराथी, संस्कृत, लातीन, फार्शी, हिब्रू वगैरे भाषा शिकवितात. शिवाय चित्रकला, पदार्थविज्ञानशास्त्र वगैरे उपयुक्त विषयांचे ज्ञानही येथें देण्यांत येते. शिवाय अलीकडें ह्या शाळेत कसरत शाळाही जोडण्यांत आली आहे. ह्या शाळेंत एक प्रिन्सिपाल, १ व्हाइस प्रिन्सिपाल, ३० मास्तर, ३ संस्कृत मास्तर, ४ फार्शी मास्तर, व १ ड्राइंग मास्तर इतके शिक्षक आहेत.

THIS THE FIRST STONE
of the
SASSOON BUILDINGS
for the
ELPHINSTONE HIGH SCHOOL
Towards the erection of which the sum of one lakh & a half of Rs. was contributed
BY THE
HONOURABLE SIR ALBERT DAVID SASSOON, KT. C.S.I.
was laid by
HIS EXCELLENCY THE RIGHT HONOURABLE
SIR W. R. SEYMOUR VESEY FITZGERALD,
G. C. S. I., P. C.
GOVERNOR OF BOMBAY,
on the 3rd day of May, A. D., 1872

५१. ही [1]शाळा पूर्वी स्थापन झाली तेव्हां त्या शाळेंत कोणीही आपली मुलें पाठवित नसत. ह्मणून सरकारानें प्रत्येक वर्षाच्या अंती कोणास शेला, कोणास पागोटें, कोणास पुस्तकें व कोणास रुपये वगैरे बक्षीस देऊन शाळेंत येण्यास लावावें. त्याच शाळेंत हल्लीं चार चार पांच पांच रुपये फी द्यावी लागते व सरकारास हजारों रुपयांचें फीचें उत्पन्न होतें. !

५२. **जॉन कॉनन हायस्कूल**.—महाराणीच्या पुतळ्याच्या पूर्व बाजूला ही शाळा आहे. ही शाळा ८७,५५५ रुपये खर्चून बांधली आहे. ही शाळा सरकार स्कूल फंडाचे ट्रस्टी ह्यांनीं बांधली. ह्या शाळेचा नकाशा

1. The occasion brought together a large collection of natives, and thousands of rupees were subscribed towards the promotion of this purpose. The natives appeared warmly interested in behalf of the cause; and their donations were, to avail ourselves of the expression of a native friend. 'as large as their wishes.'----*The Monthly miscellany of Western India.*----

हा लेख वरच्या लेखास अमळ विरोधपर असा आहे.

**भावार्थ**—ह्या प्रसंगी नेटिव्ह लोकांचा बहुत समुदाय जमला असून ह्या विद्यावृद्धीच्या कामाकरितां वर्गणी त्या ठिकाणीं जमा झाली. नेटिव्ह लोकांनीं ह्या कामास मनापासून मदत केली.

मिस्तर जे. **आडम्स** ह्यांनीं काढला होता. तळमजल्यावर मुलांकरितां दोन मोठाल्या खोल्या आहेत. त्यांची लांबी रुंदी प्रत्येकी ४३ x २५ व १९ x २५ फूट आहे. पाठीमागें उत्तर बाजूला २२ फूट चौरस अशी एक जेवणाची खोली आहे. मुलींची शाळा, विश्रांती घेण्याची खोली आणि असिस्टंट मास्तर लोकांकरितां केलेल्या खोल्या पहिल्या मजल्यावर आहेत. ह्या मजल्यावर खुली गच्ची आहे. मागच्या बाजूची गच्ची अर्धी खुली व अर्धी बंद आहे. ह्यांतच बाथरूम (स्नानागार) आहे. ह्या शाळेला एक मुलांकरितां, एक मुलींकरितां व एक चाकर लोकांकरितां असे ३ जिने आहेत. ह्या शाळेला माजी प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेट **जॉन कॉनन** ह्यांचे नांव दिलें आहे. ही शाळा इ. स. १८६७ सालीं स्थापन झाली.

**५३.** ह्याच शाळेप्रमाणें धि स्कॉटिश एज्युकेशन सोसायटीची शाळा भायखळा येथें रेलवे पुलाजवळ आहे; ह्यांत यूरोपिअन व युरेजिअन लोकांचीं मुलें घेतात. ही शाळा इ. स. १८७९ सालीं स्थापन झाली.

५४. **रॉबर्ट मनी इन्स्टिटयूशन.**—ही शाळा **रॉबर्ट कॉटन मनी** ह्यांनीं व त्यांच्या मित्रांनीं उभारली आहे. हे साहेब खिस्ती शास्त्राचे मोठे भक्त असल्याकारणानें येथील लोकांत त्या शास्त्राचा प्रसार करावा हा ही शाळा स्थापन करण्यांत त्यांचा मुख्य उद्देश होता, व ह्मणूनच त्यांनीं ही शाळा चर्च मिशनरी सोसाएटीचे स्वाधीन केली. हिची सर्व व्यवस्था तेच लोक पाहतात. ह्या शाळेची इ. स. १८५८ च्या मार्च महिन्याचे ११ वे तारखेस स्थापना झाली. ह्या शाळेंत मूळाक्षरापासून तों माट्रिक्युलेशनचे परीक्षेपर्यंत मुलांस शिकविलें जातें. ह्या शाळेचा मुख्य उद्देश खिस्ती शास्त्रांचा प्रसार करण्याचा असल्यामुळें निदान दिवसांतून एक तास तरी ' बायबल ' शिकविलें जातें. ह्या शाळेचा देखावा कोटाच्या बाजूनें येतांना बघितला असतां मोठाच भव्य दिसतो. ह्या शाळेच्या समोर एका चौथऱ्यावर एका उंच खांबावर एक ग्यासचा दिवा आहे त्या दिव्यांत एक मनुष्य बसूं शकेल एवढा तो मोठा आहे ; परंतु, तो कधींच लावीत नाहींत.

५५. **सर जमशेटची जीजीभाई स्कूल ऑफ आर्त**—क्राफर्ड मार्केट टाकून अमळ पुढें गेलें ह्मणजे हें स्कूल लागतें. ह्या इमारतीची एकंदर लांबी २७५ फूट आहे. विद्यार्थ्यांस शिकण्याकरितां ४ मोठाले हॉल

आहेत. मास्तर लोकांकरितांही चार निरनिराळ्या खोल्या आहेत. ह्याखेरीज चार मोठ्या व चार लहान खोल्या आहेत; त्यांत समान सुमान ठेवतात. ह्या इमारतीस चार जिने आहेत. दोन खासगी व दोन सर्वांकरितां. वर एक प्रिन्सिपालकरतां २३ x २५ फूट लांबीरुंदीचा हॉल आहे. खालीं एक मोठें हॉल आहे तें ५५ x ३० फूट आहे. ह्याच्यावर पदार्थसंग्रहालय व लायब्ररी आहे. ही इमारत फार साधी असून बहुत सुंदर आहे. फार नकशी काम केलेलें नाहीं. ह्याच्या नांवावरून हें कोणी बांधलें असावें ह्याची कल्पना वाचकांस सहज करतां येईल. हें स्कूल इ. स. १८५७ च्या सप्तेंबर महिन्यांत उघडलें. ह्या स्कुलांत लाकडी खोदीव काम, नकशीदार मातीचें काम, चित्रकला वगैरे उत्तम उत्तम कला शिकवितात. ह्या शाळेंत सकाळीं ७ पासून नऊ वाजेंपर्यंत चित्रें व दुसऱ्या कला शिकवितात. आणि दुपारीं १०-४ आणि १२-४ असा अभ्यास चालतो. ह्या शाळेकरितां सर **जमशेटजी जीजीभाई** ह्यांनीं २५ हजार रुपये दिले. ही शाळा एल्फिन्स्टन विद्यालयाची एक शाखा आहे.

५६. **धी क्याथीड्रल हायस्कूल.**—हें शाळागृह एस्प्लेनेड मेन रोड व हॉर्नबीरो ह्यांच्यामध्यें असून फ्रिअर फौंटनच्या नजीक आहे. हें गृह पंचकोणाकृति बांधलें असून बाजूला समकोणाकृति उपगृहें आहेत. हें गृह शाळेच्या ट्रस्टी लोकांच्या पैशानें व कांहीं सरकारच्या पैशानें बांधलें आहे. तळ मजल्यावर लेक्चर रूम (व्याख्यानशाला) आहे. ही इमारत बांधण्यास एकंदर खर्च १,९८,८०६ रुपये झाला आहे.

५७. **फ्री जनरल असेम्ब्लीज् इन्स्टिट्यूशन.**—ही शाळा व कॉलेज गिरगांव ब्याक रोडवर खेतवाडीच्या नाक्यावर आहे. हल्लींची शाळा इ. स. १८५५ सालीं बांधिली आहे. ही शाळा पूर्वी दुसरीकडे असून नेटिव्ह लोकांकरितां प्रसिद्ध डाक्तर **विलसन** ह्यांनीं इ. स. १८३२ त स्थापिली. त्या वेळीं ही शाळा लोकाश्रयावर चालत असे. पण इ. स. १८४३ त **फ्रीचर्च ऑफ स्कॉटलंड** कडून आश्रय मिळाला. ह्या शाळेंत मूळाक्षरापासून तों माट्रिक्युलेशनचे परिक्षेपर्यंत अभ्यास होतो. ह्यांत कॉलेजही आहे. हें कॉलेज इ. स. १८६१ सालीं ह्या शाळेस जोडलें. ह्या

कॉलेजांत ४ प्रोफेसर आहेत. ह्या कॉलेजाकरितां सरकारानें चौपाटीवर जागा फुकट दिली असून त्याच्या पायाचा दगड माजी गव्हर्नर सर **जेम्स फरग्युसन** ह्यांच्या हातून बसविण्यांतही आला आहे. काम अजून चाललेंच आहे, पण बहुतेक सर्व संपले.

५८. **जनरल असेम्ब्लीज इंस्टिट्यूशन** (जाडे खांबाची शाळा.)—ही शाळा इ. स. १८३५ सालीं स्थापन झाली. हिचा संबंध चर्च ऑफ् **स्कॉटलंड**च्या इंडियामिशनच्या बरोबर आहे. हिला सरकारी ग्रांट् इन एड मिळतें. ह्या शाळेची गणना हायस्कूलांत आहे. हींत माट्रिक्युलेशन पर्यंत अभ्यास चालतो. ह्या शाळेंत ३ फ्यारिश व ५ स्टीव्हन्सन्स स्कॉलरशिपा आहेत त्या विद्यार्थ्यांस मिळतात. ह्या इमारतीचे दर्शनी जे खांब आहेत ते फार जाड व उंच असल्यामुळे ह्या शाळेंस लोक व्यवहारांत जाडे खांबाची शाळा असें ह्मणतात. ही इमारत दुमजली असून बाहेरून पाहिली असतां भव्य दिसते.

५९. **एज्युकेशन सोसाएटीची शाळा**.—ही शाळा **भायखळ्या**वर आहे. ह्या शाळेस सरकाराकडून ५,२८० रुपये मिळून शिवाय लोकांकडून खुशीनें पैसा मिळतो तो मुलांची फी व हीस इ. स. १८४८ पासून जोडलेला छापखाना आहे ह्याचे उत्पन्न ह्या सर्वांच्या आश्रयावर हीं शाळा चालली आहे. युरोपिअन लोकांचे मुलगे व मुली ह्यांस ह्या शाळेंत घेतात व त्यांत मुख्यत्वेंकरून निराश्रित मुलांस पहिल्यानें आश्रय देतात. इ. स. १८७८ च्या अखेरीस ह्या शाळेंत एकंदर २९६ बोर्डर्स होते. ह्या शाळेस एकंदर देणग्या ६५,००० रुपयांच्या आहेत. त्यांच्या व्याजावर शाळा मास्तरांचे पगार आणि मुलांचा खर्च चालतो. प्रॉटेस्टंट धर्मांत असून इंग्लिशांसच झालेल्या मुलांच्या विद्याभ्यासाकरितां मिसेस **एलिनार बॉईड** हिनें आपली दौलत ह्या शाळेच्या स्वाधीन केली. ह्या शाळेंतील मुलांस व मुलींस देवळांत जातां यावें ह्मणून १०,००० रुपये एज्युकेशन सोसाएटीनें देऊन क्राईस्टचर्च ह्याच शाळेच्या शेजारीं बांधिलें आहे. इ. स. १८२५ सालीं ही शाळा किल्यांतून भायखळ्यावर नेली. ही शाळा बांधण्याकरितां सरकारानें फुकट जागा देऊन त्याजवर जी इमारत बांधिली तिला एकंदर १,७१,२३८ रुपये खर्च झाला आहे. हींत एकंदर १५० मुली व

१५० मुलगे राहण्याची जागा आहे. इ. स. १८४८ सालीं ह्या सोसाएटीनें सरकारापासून छापखाना विकत घेऊन सर्व सरकारी काम पांच वर्षेपर्यंत छापण्याचा मक्ता घेतला होता त्याप्रमाणें सोसाएटीनें तें काम चालविलें; परंतु आतां तें काम सरकार आपल्या सेंट्रल प्रेस छापखान्यांत करितें. ह्या छापखान्याचा खर्च वेंच जाऊन जो नफा होईल तो ह्या शाळेकडे लावितात.

६०. बांबे एज्युकेशन सोसाएटीची स्थापना इ. स. १८१५ च्या २९ व्या जानेवारीस मि. **एल्फिन्स्टन मुंबई**चे गव्हर्नर ह्यांच्या कारकीर्दीत **मुंबई**चे च्यापलेन रेवरेंड **निकोलस वेट** ह्यानें केली.

६१. **सेंट मेरी इन्स्टिटयूशन.**—ही शाळा नेसबिट रोडवर आहे. इ. स. १८६३ सालच्या अखेरीस **मुंबई**मध्यें घरांचे भाडें फार वाढत चाललें होतें ह्मणून भायखळ्यावर क्याथालिक आरफनेजचें भाडें देण्याचें फार कठीण पडूं लागलें, ह्मणून त्या वेळचे बिशप **स्टेनस्** ह्यांनें विनंती पत्र काढून नवीन आरफनेज गृह बांधण्याकरितां वर्गणी गोळा करण्याचें काम सुरू केलें. त्या वेळचे गव्हर्नर सर**बार्टल फ्रिअर** ह्यांनीं सन १८६४ चे जानेवारी महिन्याचे पहिल्या तारखेपर्यंत ह्या कामाकरितां जितकी वर्गणी गोळा होईल तितके रुपये आपण देऊं असें अभिवचन दिलें होतें. एकंदर वर्गणी ९२,००० रुपये जमा झाली. ह्या रकमेंतून **पुणें** येथें मुलींकरितां ऑरफनेज बांधण्यास जें कर्ज झालें होतें तें भरून काढून बाकी राहिलेल्या पैशानें सेंट मेरी इन्स्टिटयूशन शाळा बांधण्यांत आली. ही इमारत इ. स. १८६७ सालीं बांधून पुरी झाली. हींत सकाळचे वर्ग खेरीज करून दोन बोर्डरचे वर्ग आहेत. बोर्डरची पहिल्या प्रतीची फी दर तिमाहीस ९६ रुपये असून दुसऱ्या प्रतीची ६० रुपये आहे.

६२. **सर जमशेटजी जीजीभाई पारशी बेनिव्होलेंट इन्स्टिटयूशन.**—ही शाळा सर **जमशेटजी जीजीभाई** बारोनेट ह्यांनीं स्थापिली. ह्या कृत्याकरितां त्यांनीं व त्यांची बायको ह्यांनीं ३ लक्ष रुपये काढले होते. येथें मुलांस व मुलींस शिक्षण मिळतें. ह्या शाळेच्या शहरांत व बाहेर गांवीं शाखा आहेत. मुलांची शाळा इ. स. १८४९ त उघडून इ. स. १८५० सालीं मुलींकरितां शाळा उघडली गेली. ह्या शाळेचे ट्रस्टी गव्हर्मेंट ऑफ इंडिया आहे. ३ लक्ष रुपयांचे ६ टक्के प्रमाणें व्याज ह्या शाळेनिमित्त

सरकार देतें. ह्या इमारतीच्या पायाचा दगड इ. स. १८७१ च्या २१ फेब्रुवारी रोजीं माजी गव्हर्नर सर **सिमोर फिट्झेराल्ड** ह्यांनीं बसविला.

६३. **धि फ्रिअर फ्लेचर स्कूल.**—जॉन कॉनन हायस्कूल टोंकल ह्मणजे ही शाळा लागते. पूर्वी ह्या शाळेस प्रेसकॉट्स फोर्ट ख्रिश्चियन स्कूल असें ह्मणत असत; कारण **प्रेसकॉट्** नामक बाईच्या मेहनतींचें व उद्योगाचें हें फळ आहे. तिच्या कांही मित्रांनीं माजी गव्हर्नर सर **बार्टलफ्रिअर** ह्यांस विनंती केल्यावरुन त्यांनीं ह्या शाळेस जागा फुकट दिली. शेट **प्रेमचंद रायचंद** ह्यांच्या कांही पैशानें व कांहीं मिस **प्रेसकाटनें** वर्गणी गोळा करून पैसे मिळविले त्यांनीं ही शाळा बांधली गेली. ह्या शाळेचा पाया इ. स. १८७१ सालीं घातला. ह्या इमारतीस ३ मजले आहेत. खालची जागा शाळेकरितां आहे व वर लेडी **सुपरिंटेन्डेंट** राहते. येथेंच एक हॉस्पिटल रूम आहे. दुसरे मजल्यावर मेट्रन (मुख्य बाई) ची खोली आहे. ह्या इमारतीस एकंदर खर्च ७६,४९० रुपये झाला. पैंकी सरकारानें दहा हजार रुपये दिले.

६४. **आलेक्झांड्रा नेटिव गर्लस् इंग्लिश इन्स्टिटयूशन.**—पूर्वी ही शाळा हॉर्नबी रोडवर एका घरांत होती. ही शाळा माजी **मुंबई** स्मालकाज कोर्टाचे जज्ज मि. **माणकजी खरशेटजी** ह्यांच्या परिश्रमानें उपस्थित झाली. इ. स. १८६३ त ही शाळा स्थापन झाली. युवराज **प्रिन्स ऑफ वेल्स** ह्यांचे **डेनमार्क** येथील प्रिन्सेस **आलेक्झांड्रा** हिच्या बरोबर जो विवाह झाला त्याच्या स्मरणार्थ ह्या शाळेस तें नांव दिलें. ह्या शाळेंत मुली २३-२४ वर्षांच्या वयाच्या होत तोंपर्यंत अभ्यास करितात हें लक्षात ठेवण्यासारखें आहे. ह्यांत मुलींस इंग्रजी शिक्षण मिळून शिवाय वाद्य, गान, चित्रकला व शिवणकाम वगैरे शिकवितात. इ. स. १८७२ सालीं **मुंबई**तील फिमेल नार्मल स्कूल हेंही ह्या शाळेस जोडलें गेलें, व त्या स्कुलाचा तेथें संबंध होता तोंपर्यंत सरकार मार्फत सालींना ३,१२० रुपये मिळत असत. हल्लीं ही शाळा जिमखान्याजवळच्या रस्त्यावर आहे. व हिचें काम खान बहादुर **मंचरजी कावसजी मर्झबान** ह्यांच्या देखरेखीखालीं झालें. ह्या इमारतीस एकंदर खर्च ५५,५०० रुपये झाला. ह्यापैकीं अर्धे

रुपये सरकारानें दिले. हिची एकंदर लांबी ८१ फूट, रुंदी ५९ फूट व उंची ४५ फूट आहे. ह्या इमारतीच्या पायाच्या दगडावर जो लेख आहे तो येणेंप्रमाणे :—

"The foundation stone of the Albert Hall for the accommodation and use of the Alexandra Native Girl's English Institution was laid by His Excellency Sir Richard Temple, Bart, G. C. S. I., Governor of Bombay, on the 23rd day of April 1878 in the reign of Her Most Gracious and Imperial Majesty Victoria, Queen of Great Britain and Ireland and Empress of India, His Excellency Lord Lytton, G. C. B. G. M. S. I., being Viceroy."

६५. **गव्हर्मेंट लॉं स्कूल**.—हें स्कूल हायकोर्टाचे माजी चीफ् जस्टिस सर **अर्स्किन पेरी** ह्यांच्या स्मारकाकरितां ज्युरिसप्रुडन्समध्यें प्रोफेसरशिप काढण्याच्या उद्देशानें **मुंबई**तील रहिवाशांच्या पैक्याच्या मदतीनें इ. स. १८५२ त स्थापन केलें व तें युनिव्हर्सिटीनें इ. स. १८६० त कबूल केलें जी रकम अनामत ठेवण्यांत आली आहे, तिजपासून दरमहा १६९ रुपये व्याजापोटीं येतात, व त्यांच्या भरीस सरकाराकडून १०० रुपये मिळतात. ही रकम पेरी प्रोफेसर ऑफ् ज्युरिसप्रूडन्स ह्यांस देण्यांत येते. शिवाय सरकार दरमहा ६०० रुपये कायदे शिकविणाऱ्या प्रोफेसरांस पगारादाखल देतें. ह्या स्कुलाचा वेळ संध्याकाळीं ५ पासून ६ १/२ - ७ वाजेपर्यंत असतो. त्या वेळी विद्यार्थ्यास कायद्यांचें शिक्षण दिलें जातें. हा क्लास युनिव्हर्सिटी लायब्ररीच्या इमारतींत भरतो.

६६. **उद्योगशाळा**.—ही शाळा पूर्वी **शिवरी** येथें होती ती तिकडून काढून हल्लीं सर **मंगळदास नथुभाई** ह्यांच्या बंगल्याच्या पश्चिमबाजूचा ग्रांटरोड स्टेशनाकडे जो रस्ता जातो त्या रस्त्यावर नेली आहे. ही शाळा इ. स. १८३५ साली स्थापन झाली, हीस स्कूल ऑफ् इंडस्ट्री (उद्योगशाळा) हें नांव दिलें आहे. ह्या शाळेंत अल्पवयस्क मुलांनीं अपराध केला तर त्यांस म्याजिस्ट्रेटकडून शिक्षा होऊन त्या मुलांस ह्या शाळेंत पाठवितात. अशीं मुलें इकडे पाठविण्याचें कारण इतकेंच की, त्यांच्या अंगी असलेला वाईट गुण जाऊन त्यांनी शहाणें व उद्योगी व्हावें. ज्या मुलास जितकीं वर्षे ठेप असेल तितकीं वर्षे त्यानें तेथें राहून तितक्या काळांत त्यास आवडेल तो धंदा त्यास शिकण्याची मोकळीक आहे. व तो त्यास आस्थापूर्वक शिकविला जातो. ठेप सरली ह्मणजे त्यास

शाळेंतून घालवून देतात. ह्या मुलांची तेथें राहण्याची मोठी सोई केली आहे, व त्यांच्या पोटास तेथूनच मिळतें. त्यांस उद्योगशाळेंतले कपडे वापरण्यास देतात; व त्या कपड्यांवर त्या शाळेचा छाप असतो. दिवसा ह्यांस दोन शिपाई बरोबर देऊन धंदा शिकविण्यास बाहेर काढितात व पुनः संध्याकाळी शाळेंत सोडतात. ह्या शाळेकरितां मेहरबान **डेव्हिड ससून** यांनीं ३०,००० व सर **मंगळदास नथुभाई** ह्यांनीं २०,००० रुपये सरकारांत भरले आहेत. ह्या शाळेची व्यवस्था सरकार मार्फत होते.

६७. **डेव्हिड ससूनचे मेक्यानिक इन्स्टिटयूट.**—ही लहानच पण सुंदर इमारत माजी प्रख्यात व उदार यहुदी गृहस्थ **डेव्हिड ससून** व त्यांचे चिरंजीव सर **ऑलबर्ट ससून** ह्या पितापुत्रांची एकंदर १,२७,७०० रुपये खर्च करून बांधिली आहे. ह्या इमारतीचा नकाशा स्कॉट म्याक् क्लीलंड आणि कंपनी हिनें काढला होता. ह्या इमारतीच्या तळमजल्याची लांबी ६४ फूट व रुंदी ३० फूट आहे. ह्या ठिकाणीं पहिल्यानें पदार्थसंग्रहालय (म्यूझिअम) करण्याचा विचार होता. वर जाण्यास दगडी जिना आहे. ह्याच्या मध्यभागास लायब्रेरिअनचें ऑफिस आहे. मध्य भागावर तिसरा मजला असून त्याच्यावर उंच मनोरा आहे. ह्या मनोऱ्यावर घड्याळ बसविलें आहे. वर लायब्ररी आहे तेथे पुस्तकांचा संग्रह चांगला आहे. ह्या लायब्ररीची फी दर तिमाहीस ६ रुपये आहे. आंत शिरतांच **डेव्हिड ससून** ह्यांचा भव्य आणि सुंदर पुतळा बसविला आहे.

६८. मेक्यानिक्स इन्स्टिट्यूशन नांवाची एक विद्वज्जनमंडळी येथें आहे. तिचा उद्देश शिल्पशास्त्र, कलाकौशल्य, रसायनशास्त्र, पदार्थ विज्ञानशास्त्र व इंग्रजी भाषेचें उत्तम ज्ञान इत्यादि विषयांत लोकांनीं प्रवीण होऊन तेणेंकरून देशांत ज्ञानाची व सुखाची वृद्धि व्हावी असा आहे. हिचे सभासद सरकारी कामगार व दुसरे गृहस्थ आहेत. मंडळीचे सभासद पाळीपाळीनें वारंवार अनेक विषयांवर व्याख्यानें देतात. व्याख्यानास पाहिजे त्यास जाण्याची मोकळीक असते. दर आठवड्यात सभासदांच्या सभेंत जेव्हां निबंध वाचतात, त्या वेळीं फक्त निमंत्रित गृहस्थांस जाण्याची परवानगी असते. ह्या मंडळीच्या सभा टौन हालांत भरत असतात. ह्या सभेचे सभासद एतद्देशीय विद्वान लोक बरेच आहेत. ह्या सभेंत जे

इंग्रजी भाषेंत उत्तम प्रकारचें व्याख्यान देतील किंवा निबंध लिहितील त्यांस ही सभा शें दोनशें रुपये बक्षीस देते. एकादेसमयीं योग्यतेनुरूप सोन्यारुप्याचीं पदकेंही देते.

६९. देवालयें.—मुंबईमध्यें प्रसिद्ध देवालयें ह्मटली ह्मणजे **वालुकेश्वर, महालक्ष्मी, बाबूलनाथ, मुंबादेवी, काळबादेवी, गांवदेवी, माणकेश्वर, परभादेवी, भुलेश्वर, ठाकूरद्वार, माधवबाग, कृष्णबाग, रामवाडींतील देवालय, विठ्ठलवाडी वगैरे होत.** ह्यांपैकीं बहुतेक अलीकडचींच आहेत. प्राचीन देवालयें ह्मटली ह्मणजे **वालुकेश्वर, महालक्ष्मी, मुंबादेवी, बाबूलनाथ, नागदेवी** आणि **श्रीव्यंटकेश** ह्यांची होत. ही देवळें येथें २०० वर्षांपूर्वी ह्मणजे जेव्हां हिंदु लोकांच्या अनेक जातींची विशेष वसाहत झाली त्यापूर्वींचीं आहेत. पुढें जसजशी वस्ती वाढत चालली तसतशी देवालयांची संख्याही वाढत गेली. सुमारें ८०-८५ वर्षांमागें **मुंबईतील** कित्येक भाटे व वाणी महाजन ह्यांनी वल्लभाचार्य पंथाचें एक मंदिर बांधलें ह्या पंथाचें **मुंबईमध्यें** हेंच पहिले मंदीर होय. ह्यास **जीवनलालजी** महाराजाचें मंदीर ह्मणतात. ह्या संबंधानें प्रत्येक मनुष्याचें व्यापारामध्यें वर्षाला जितकें भांडवल होईल त्याच्यावर शेंकडा अमुक टक्के ह्याप्रमाणें **मुंबईतील** वैष्णव पंथाच्या सर्व व्यापाऱ्यांनीं धर्मार्थ पैसा जमा केला होता व अजूनही जमा करितात. अशा रीतीनें जमा केलेल्या पैशास 'लागा' ह्मणतात. आतां ह्या पंथाचीं दुसरीं मंदिरें चार पांच झालीं आहेत. तसेंच मारवाडी वगैरे जैन पंथाच्या लोकांनीं **बाळाजी** आणि **जगन्नाथ** ह्यांचीं मंदिरें बांधिलीं आहेत. स्वामी नारायण पंथाचें एक **भोईवाड्यांत** व एक **कांदेवाडींत** अशीं दोन मंदिरें आहेत. शिवाय **मुंबईमध्ये गुरुगोविंद** पंथी, **नानक** पंथी, **कबीर** पंथी, **राधावल्लभी, रामानुज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, ब्रह्मोसमाज** वगैरे पंथानुयायी लोकांची आपापल्या पंथांचीं मंदिरें व देवळें आहेत. **मुंबईमध्यें** एकंदर इ. स. १८८१ मध्यें २०९ देवालयें होती.

७०. **मुंबईमध्यें** प्रत्येक देवळाशेजारीं बहुतकरून धर्मशाळा बांधलेल्या असतात. **मुंबईंत** हजारो साधू संत नेहमीं नानातऱ्हेचीं ढोंगें करून फिरतच असतात. स्वामी महाराज तर नेहमीं नारायण नामाचा गजर करून कोठें पुडी मिळेल ह्मणून शोधांत असतात. कोठेंच पुडी न

मिळाल्यास भिक्षा मागून उदरनिर्वाह चालवितात. साधुसंतांस राहण्याकरितां भुलेश्वर, वालुकेश्वर, महालक्ष्मी, बाबूलनाथ वगैरे ठिकाणीं देवळापाठीमागें व पुढें धर्मशाळा आहोत. त्यांत ते शिष्यवर्गासह राहतात. **मुंबईत** कित्येक बैरागी त्या धर्मशाळेंत बसलेले असले ह्मणजे त्यांत कोणी ध्यान धरून बसलेला दृष्टीस पडतों, कोणी गांजा चोळतो, कोणी 'बंब भोळा महादेव' ह्मणून चिलमीला लुगडें नेसवून भुरके मारतो, कोणी सर्व आंगाला राख फांसून शेंडी व जटा वाढवून त्याचा बुचडा बांधून व लंगोटा मारून हातांत त्रिशूल घेऊन भवति भिक्षां देहि ह्मणत भिक्षा मागतो. अशीं अनेक प्रकारचीं ढोंगें करून त्यांवर उदरनिर्वाह करून आपला काळ घालवितात. **वाळुकेश्वर** व **बाबूलनाथ** येथें अशा लोकांची संख्या फार आहे. रोज सकाळीं प्रत्येक महाराजांचे मंदीरासमोर हजारों वाणी व भाटे लोकांची आपल्या बायकामुलांसह महाराजाचे दर्शनाकरितां तोंडानें 'जयजय' शब्दांचा उच्चार करून धांवत जातांना बरीच गर्दी दृष्टीस पडते. ह्याप्रमाणे दर्शन घेण्याच्या मुख्य दोन वेळा आहेत. एक सकाळीं व एक संध्याकाळीं ४ वाजतां. उपासक अगर श्रावक ह्मणजे जैनपंथानुयायी लोकांचे तीर्थंकार आचार्य वगैरे तोंडास फडकीं बांधून व हातांत मोरांचे पिसांचा कुंचा घेऊन "अर्हत्" नांवाचा उच्चार करून धर्मोपदेश करीत असतात. "जोग" आणि "वैखानस" व्रताची दीक्षा घेऊन उपदेश घेण्याकरितां श्रावक लोकांच्या मुली आचार्यांची सेवा करतात. अशा अनेक प्रकारचे भक्तीमार्गानें जो तो आपापला काळ आनंदानें व सुखानें घालवून ईश्वरचरणीं जागा मिळावी ह्मणून आपापल्या सांप्रदायानुरूप भजनपूजनादि नानाविध उपाय योजित असतात. संध्याकाळी देवळोदेवळीं हरीकीर्तनें व पुराणें चालतात. तेथें स्त्री-पुरुष भक्तमंडळीची नेहमीं गर्दी असतेच.

७१. **वालुकेश्वर.—मुंबई** बेटाच्या नैऋत्य दिशेस जी डोंगरी आहे तिला आमचे लोक **वालुकेश्वरचा** डोंगर व साहेब लोक **मलबारहिल्** असें

ह्मणतात, परंतु त्या डोंगरीवर असणाऱ्या देवळास वालुकेश्वराचें[1] देवालय ह्मणतात. पूर्वी हें देवालय, **वालुकेश्वर**ची दांडी किंवा मलबार पॉईन्ट ह्याच्याजवळ अगदीं शेवटास होतें. ह्या ठिकाणी हल्लीं गव्हर्नर साहेबाचा बंगला आहे. हा डोंगर पूर्वी मुख्य गांवापासून निराळा होता व ह्याजवर गुरें चरत असत. पूर्वी ही जागा एवढी रानवट होती कीं, दिवसा सुद्धां येथें जाणें मोठें धोक्याचें असे. पण हल्लीं ह्या जागेवर हवाशीर बंगले व बाग उठविले आहे. येथील हवा गांवांतील हवेपेक्षां मोठी आरोग्यकारक आहे. ह्या टेंकडीवर श्रीमंत लोक व साहेब हे राहतात. जो डोंगर पूर्वी कंगाल लोकांस राहण्याकरतां असे तो हल्लीं श्रीमान लेकांसच आंदण दिल्यासारखा झाला आहे. हें देवालय फार जुनें आहे. ह्याविषयीं अशी माहिती मिळते कीं, सुमारें ६०० वर्षांपूर्वी कोणी **केवाजीराणा** नांवाचा एक मराठा सरदार होता, त्याने पूर्वीचें (ह्मणजे हल्लीं जेथें गव्हर्नर साहेबाचा बंगला आहे तेथें) देवालय बांधिलें असें ह्मणतात. परंतु निश्चयात्मक कांही सांगतां येत नाहीं. हा सरदार भीमराजाच्या सरदारांपैकी असावा असेंही कित्येकांचें ह्मणणें आहे. कित्येक वर्षांपूर्वी ह्या देवळाचा पाया दिसत होता, पण हल्लीं त्याजवर बुरूज बांधला आहे. दांडीच्या आसपास जी सुमारें २०० फूट जागा आहे, तेथें सध्यांचे वालुकेश्वर व दुसरीं देवालयें आहेत. बाजूला बऱ्याच धर्मशाळाही आहेत. मध्यें मोठें तळें आहे. ह्यास बाणगंगा ह्मणतात. **मुंबई**तील महाजन लोकांनीं वर्गणी गोळा करून हें तळें बांधिलें आहे. ६-७ वर्षांपूर्वी हें तळें उपसून ह्यांतील चिखल वगैरे काढून त्यांत स्वच्छ व गोड व्यहाडच्या पाण्याचा नळ सोडिला आहे. इ. स. १८२५ च्या सुमारास व त्याच्याही पूर्वी ह्या तळ्याच्या कांठीं मोठमोठी झाडें असून ब्राह्मण लोकांची वस्ती असे, त्या वेळीं हे स्थान एक तपोवनच बनून गेलें होतें ! पण, हळु हळु वस्ती वाढून हल्लीं सर्व नवीन व्यवस्था झाली आहे.

---

1 The remains at Walkeshwar consist of about 60 richly carved stones, pillar-capitals, statues and other temple remains one of them about 6 x 3, apparently of the tenth century, which lie near the present Walkeshwar temple on Malabar Point, ----*Bombay Gazeteer, Thana.*

**भावार्थ**—जुन्या वालुकेश्वरच्या देवळांपैकीं हल्लीं अवशिष्ट राहिलेले उत्तम खोदीव काम केलेले दगड, खांब, पुतळे वगैरे असून वालुकेश्वर येथें पाहण्यांत येतात. त्यांपैकी एक दहाव्या शतकांतील आहे.

७२. वालुकेश्वर ह्या शब्दाचा अर्थ अगदीं स्पष्ट आहे. वालुकेश्वर ह्मणजे वाळूनें केलेला ईश्वर. हे लिंग **श्रीरामचंद्रानें** स्थापित केलें आहे असें ह्मणतात. वालुकेश्वरमाहात्म्यांत अशी कथा आहे कीं, **राम** व **लक्ष्मण अयोध्येहून लंकेस** जाण्याकरितां निघाले असतां ह्या डोंगरीवर समुद्र कांठीं आले. **रामाचा** असा नियम होता कीं दररोज **लक्ष्मणाकडून काशींतून** एक लिंग आणून त्याची पूजा करावी. पण त्या दिवशीं **लक्ष्मणास** येण्यास उशीर लागल्यामुळें **रामानें** तेथील वाळूचें लिंग करून पूजिलें आणि तेथेंच त्याची स्थापना केली. इतक्यांत **लक्ष्मणही** आला. तेव्हां त्यानें आणलेलें लिंगही कांही अंतरावर तेथेंच स्थापिलें. हल्लीं ज्यास वालुकेश्वर ह्मणतात तो वस्तुतः लक्ष्मणेश्वर आहे. **रामानें** स्थापलेलें लिंग कोठें आढळत नाहीं. असें ह्मणतात कीं, यवन लोकांचे राज्यास कंटाळून तें गुप्त झालें व कित्येक असेंही ह्मणतात कीं तें फिरंग्यांनीं फोडून टाकलें.

७३. सध्याचें वालुकेश्वराचें देवालय इ. स. १७२४ त रामाजी कामत नांवाच्या शेणवी (सारस्वत ब्राह्मण) गृहस्थानें बांधिलें. ह्या देवालयाचीं जागा सरकारांतून ह्या गृहस्थास मोफत मिळाली होती. हे गृहस्थ त्यावेळीं मोठे प्रख्यात व वजनदार असून एतद्देशीय लष्करावरील मुख्य होते. असें ऐकण्यांत येतें. हल्लींही ह्या देवळाची व्यवस्था हेच लोक पहातात.

७४. बाणगंगेविषयीं अशी कथा आहे कीं, वरील देवालय स्थापन केल्यावर **श्रीरामचंद्रास** तहान लागली. पण पाणी कोठें मिळेना ह्मणून त्यानें एक बाणमारून त्या ठिकाणीं पाणी काढलें ह्मणून ह्या तळ्यास बाणगंगा ह्मणतात. हिलाच बाणगंगा बाणतीर्थ व पाताळगंगा असेंही ह्मणतात. पाताळगंगा ह्मणण्याचें कारण **रामानें** पाताळांतून बाणानें भोगावती वर आणिली हे होय.

७५. येथील देवळांच्या शेजारी बऱ्याच धर्मशाळा आहेत परंतु त्या मालकांच्या अगर श्रीमंत लोकांच्या उपयोगाकरितां आहेत. त्यांत गरीब गुरीब लोकांस क्वचित् मिळतात. कोणास धर्मशाळा पाहिजे असली तर त्यासं मालकांची परवानगी घ्यावी लागते.

७६. येथें दुसरी शंकराची देवालयें असून निराळेंच असे श्रीगणपतीचें देवालय आहे. हीं देवालयें बहुतकरून सर्व गंगेच्या कांठावर आहेत. मुख्य देवळांतील लिंग वाळूच्या राशीप्रमाणें दिसतें. वालुकेश्वर नांव पडण्याचें हेंही एक कारण असावें असें आह्मांस वाटतें. मोठ मोठे वाणी, भाटे वगैरे

लोक तेथें जाऊन नेहमीं दान धर्म करित असतात. कित्येकांनीं तर अन्नसत्रेंही आहेत. येथें वर्षांतून दोनदां जत्रा भरत असते. जत्रेच्या दिवशीं लिंगावर शंकराचा मुकुट वगैरे बसवून उत्तम कपडे घालून लिंग सुशोभित करितात. नेहमीं पेक्षां सोमवार, शिवरात्र व जत्रा इत्यादि प्रसंगीं वालुकेश्वरीं बहुत लोक जातात.

७७. वाळकेश्वरच्या डोंगरावर पूर्वी समुद्र आणि वाळकेश्वराचें तळें ह्यांच्या दरम्यान जो एक खडक होता त्यामध्यें जी एक मोठी चीर पडली होती त्यास योनी ह्मणत ह्या योनीसंबंधानें 'मूर्स ओरिएंटल प्रयाग मेंटस' ह्या पुस्तकांत अशी माहिती मिळते कीं, **राघोबादादा** पेशवे ह्यांनीं विलायतेस दोन ब्राह्मण वकील पाठविले होते ते परत आल्यावर त्यांस ह्या योनींतून निघून पवित्र व्हावें लागलें. ही माहिती इंग्रजींत खालीं दिली आहे :—

The famous Brahmin Raghoba, the father of the last of the Maratha Peishwas when at Bombay passed through it (Joni-yoni ?) frequently and it is said, that the great Shivaji jeopardized his liberty and life for the advantages of such regeneration. The said Raghoba sent two Brahmin ambassadors to England. On their return they required purification from having passed through, and lived in debasing countries. They were regenerated by a transit through a golden yoni, made expressly for the purpose and of course with other presents to an immense amount given to the Brahmans.

भावार्थ वर येऊन गेलाच आहे.

७८. ह्या संबंधानें इंग्लंडचा प्रवास ह्या पुस्तकांत माहिती मिळते ती :—

इसवी सन १७८१ च्या आरंभीं रघुनाथराव पेशव्यानें आपल्या राज्यास मदत मिळविण्यासाठीं हणमंतराव नामक आपला एक कारभारी इंग्लंडास पाठविला होता, आणि मणियार नांवाचा कोणी पारशी त्याबरोबर गेला होता. रघुनाथ रावाच्या कारकीर्दीत ही एक मोठी अगत्याची गोष्ट घडून आली. नामदार एडमन्ड बर्क याचा वृत्तांत या नांवाच्या इंग्रजी ग्रंथाच्या तिसऱ्या पुस्तकांत ४६ व्या पृष्ठीं एडमन्ड बर्क याणें रघुनाथराव यास पत्र लिहिलें त्याचा उतारा केला आहे तो येणेंप्रमाणें :—

"You set too much value on the few and slight services, that I have been able to perform for your agent Hanumant Rao, and his assistant Maniar Parsi. It was nothing more than a duty one man owed to another. Hanumant Rao has

done me the honour of being my guest for a very short time, and I endeavoured to make my place, as convenient as any of us are able to do, for a person so strictly observant as he was, of all the rules and ceremonies of the religion, to which he was born, and to which he strictly conformed, often at the manifest hazard of his life. To This I have been witness. We have however, Sir derived one benefit form the instruction he has given us, relative to your ways of living; that whenever it shall be thought necessary to send Gentoos of a high *caste* to transact any business in this kingdom, on giving proper notice, and on obtaining proper licence from authority for their coming, we shall be enabled to provide for them in such a manner as greatly to lessen the difficulties in our intercourse and to render as tolerable as possible to them a country, where there are scarcely six good months in the year. The suffering these gentlemen underwent at first was owing to the ignorance, not unkindness of this nation.

" I am sorry, Sir to inform you that I can give you no sort of hope of your ever obtaining the assistance of the troops you require. It is best at once to speak plainly when it is not in our power to act.

"Hanumant Rao is a faithful and an able servant of yours and Maniar Parsi used every exertion to second him. If your affairs have not succeeded to your wishes, it is no fault of theirs."

*To the preceding letter the following is a foot note.----*

" The object of this letter is incomplete, and one that of Ragunath Rao to which it is in reply, has not been found amongst Mr. Burke's papers. The origin of the correspondence appears to be this : early in 1781 Hanumant Rao, a Brahman of high caste, and Maniar Parsi arrived in England as agents of Ragunath Rao, who had some business to transact with East India Directors and British Government. They were found by Mr. Burke under very unpleasant circumstances, occasioned by their peculiar modes of life, and the obligations of their religion. With the attention to strangers for which Mr. Burke was so remarkable, he took them down to Beaconsfield and it being summer, gave them up a large green-house for their separate use where they prepared their food according to the rules of their *Caste*, performed their ablutions, and dis-

charged such other duties as rites of their religion and their customs required, and as circumstances permitted. They found great pleasure in Mr. and Mrs. Burke's society and where they were visited by many distinguished people whilst they sojourned at Beaconsfield. In autumn they set out on their return to India, and on their arrival there, Ragunath Rao wrote to thank Mr. Burke for his kindness to his agents. The fragment of Burke's reply which is here given was written probably at the end of the year 1782."—

Burke's life; 50/ 3rd p. 46.

(याचा अर्थ.)

"आपला कारभारी हणमंतराव आणि त्याच्या हाताखालचा मणियार पारशी यांच्या मी थोडासा उपयोगी पडलों ती मोठीच गोष्ट असें आपण समजतां. परंतु एकानें दुसऱ्याच्या उपयोगी पडावें हा मनुष्याचा धर्मच आहे आणि मी कांहीं याहून अधिक केलें नाहीं. हणमंतराव याणें थोडे दिवस आमच्या एथें राहून आह्मास मोठा मान दिला. तो आपला आचारविचार आणि धर्मकर्म यांविषयीं फार जपत असे, आणि वेळीं जिवाला त्यापासून कांहीं झालें तरी पर्वा करीत नसे. अशा पुरुषास आमच्या घरीं जागेची जितकी सोय आमच्यानें करवली तितकी आह्मी केली. हणमंतरावाच्या ह्या जातिधर्माविषयीं निष्ठेचा प्रकार मी आपल्या डोळ्यांनीं पाहिला. परंतु, महाराज, यापासून आह्मास एक मोठा लाभ झाला तो हा कीं त्यापासून आह्मास आपल्या राहण्याच्या रीतीची माहिती झाली, आणि यापुढें कोणा उंच वर्णाच्या हिंदूंस या देशीं पाठविण्याचें अगत्य पडल्यास, त्याची आह्मास पूर्वी सूचना झाली आणि सरकारांतून त्याला येण्यास परवाना मिळाला असला ह्मणजे अह्मास एथे त्याची योग्य तर्तूद ठेवतां येईल; आणि जेथें वर्षांतून साहा महिने देखील चांगली हवा नसते असा जो हा आमचा देश ह्यांत तुमच्या लोकांस जितकें होईल तितकें सुखानें राहतां यावें आणि तुमच्या आमच्या व्यवहारांत एरव्हीं ज्या आडचणी येतात त्या होतील तितक्या दूर व्हाव्या अशी तजवीज आह्मी करूं. ह्या गृहस्थांस जी आपदा पहिल्यानें भोगावी लागली ती ह्या देशांतील लोकांस तुमच्या रीतिभाती माहीत नाहींत यामुळेंच, त्यांणीं त्यांचा बराबर समाचार घेतला नाहीं ह्मणून, असें नव्हे, महाराज, मला लिहिण्यास फार वाईट वाटतें कीं शिपायांची कुमक तुह्मास पाहिजे ती आपणास कधीं तरी मिळेल अशी कांही आशा दिसत नाहीं. आपल्या

हातीं कोणतें काम करणें नसलें तर तसें स्पष्ट सांगावें हें उत्तम. हणमंतराव हा आपला विश्वासू व हुशार सेवक आहे आणि मणियार पारशी याणें कोणत्या प्रकारें त्यास मदत करण्यांत कसर केली नाहीं. आपल्या इच्छेप्रमाणें आपलें काम झालें नाहीं तर ह्यांत त्यांचा कांहीं वांक नाहीं."

ग्रंथकर्त्यानें ह्या पत्रास खालीं लिहिल्याप्रमाणें टीप लिहिली आहे :—

"ह्या पत्राचा उद्देश बरोबर समजत नाहीं आणि रघुनाथ रावाच्या ज्या पत्राचें हें उत्तर आहे तें पत्र मिस्तर बर्क याच्या कागदपत्रांत सांपडत नाहीं. हा पत्रव्यवहार चालू झाला तो मुळीं अशा कारणावरून कीं सन १७८१ च्या आरंभींच हणमंतराव ह्मणून एक उंच वर्णाचा ब्राह्मण आणि मणियार पारशी असे रघुनाथ रावाकडून ईस्त इन्डिया डरेक्टर आणि इंग्रज सरकार यांकडेस कांहीं काम होतें त्यासाठीं इंग्लंडांत आले. त्यांची राहण्याची विलक्षण रीति आणि आचारविचार यांमुळें ते फारच दुःख भोगीत आहेत असें मिस्तर बर्क यास आढळलें. परदेशीयांचा समाचार घेण्याविषयीं मिस्तर बर्क प्रसिद्धच होता तो त्यांस एकदम बीकन्सफील्ड एथें घेऊन गेला, आणि ते उन्हाळ्याचे दिवस होते ह्मणून त्याणें बागांत एक मोठा बंगला त्यांच्या स्वाधीन केला, तेथें ते आपल्या जातीच्या चालीप्रमाणें स्वयंपाक व नित्याचें स्नानादिक कर्म करीत, आणि आपल्या धर्माप्रमाणें व चालींप्रमाणें दुसरीं सर्व कर्मे त्या ठिकाणीं होत त्याप्रमाणें करीत असत. मिस्तर बर्क आणि त्याची पत्नी यांच्या समागमानें त्यांला फार संतोष होत असे, आणि ते बीकन्सफील्ड एथें होते तोंपर्यंत पुष्कळ नामांकित पुरुष त्यांस भेटावयास येत असत. पावसाळ्यांत ते परत हिंदुस्थानांत जावयास निघाले. आणि ते तेथें जाऊन पोंचल्यावर, रघुनाथ रावानें मिस्तर बर्क यास पत्र लिहिलें, आणि त्याणें आपल्या कारभाऱ्यांची बरदास्त ठेविली ह्मणून त्याचे आभार मानले. मिस्तर बर्क याणें बहुतकरून हें उत्तर सन १७८२ च्या अखेरीस लिहिलें असावें."

७९. **महालक्ष्मी.**—मुंबईच्या पश्चिम बाजूला कोटापासून सुमारें दोन कोसांच्या अंतरावर समुद्राच्या कांठी टेंकडीवर महालक्ष्मीचें देवालय आहे. ह्या देवळाच्या सभोंवतीं पुष्कळ धर्मशाळा आहेत. देवळाची रचना फार साधी आहे. आंत लहानसा गाभारा आहे. गाभाऱ्यांत देवीच्या ३ मूर्ति आहेत. त्यांत मुख्य मूर्ति श्रीमहालक्ष्मीची आहे. देवीसमोर सभामंडपांत वाघ बसविला असून बाहेरच्या भिंतींत एका बाजूला श्रीगणपती

व दुसऱ्या बाजूला देवीची मूर्ति आहे. ह्या देवीची पूजा अर्च्या अष्टौप्रहर चाललीच असते. देवळांत एक मोठी तुपानें भरलेली समई (नंदादीप) अहोरात्र जळत असते. गाभाऱ्यांतील जमीन पांढऱ्या संगमरवरी दगडाची केलेली आहे. वरच्या बाजूला कांचा लावल्या आहेत. मूर्ति संगमरवरी दगडाच्या चौथऱ्यावर बसविल्या आहेत. देवळाबाहेर गरीब लोक भिक्षा मागण्याकरितां बसलेले असतात. देवीचे दर्शनास जाणारे लोक फार असल्यामुळें कोणी अर्धी कोणी दिडकी देत गेल्यानें भिकाऱ्यांस रोज कमींतकमी आठ चार आण्यांचा तरी खुर्दा मिळतो ! देवळाच्या बाजूला मोकळी जागा असून ती काळ्या दगडांनीं पिटली आहे व देवळासमोर तशाच दगडाच्या दोन दिपमाळी आहेत. देवीस प्रदक्षिणा घालतां यावी ह्मणून देवळा सभोंवतीं मोकळी जागा आहे. देवळाच्या पाठीमागें व पुढें ही बसण्यास जागा आहे. महालक्ष्मी येथील हवा महाबलेश्वराच्या हवेसारखी आहे. आजारीलोक नेहमीं तेथें हवा पाणी बदलण्याकरितां जातात. देवळापासून कांहीं अंतरावर एक तळें आहे. तें सन १८२४ त ४०,००० रुपये खर्चून **तुळशीदास गोपाळदास** नामें भंगसाळ्यानें हें बांधिलें आहे. याची आकृति जहाजासारखी आहे. येथें नवरात्रांत मोठी जत्रा भरते. आश्विन शुद्ध ८ च्या दिवशीं मोठा होम होत असतो, त्या वेळीं मुंबईतील शेंकडो महाजन व इतर धार्मिक लोक होमकुंडांत तुपाची बुधलीं ओतीत असतात ! हा होम मोठा जबरदस्त होतो. तळ्याच्या सभोंवती उत्तम काळ्या दगडांची बैठक असून पश्चिम बाजूला एक देऊळ आहे त्यांत शंकर व रणछोडजी यांच्या मूर्ति आहेत. व पुढें ह्मणजे नंदीच्या शेजारीं मारुती व देवी ह्यांच्या मूर्ति आहेत. ह्या देवळाच्या भिंतीवर उत्तम तऱ्हेची चित्रें काढली आहेत. हें देऊळ व तळें मिळून सुमारें १,१५,००० रुपये खर्च झाला आहे.

८०. महालक्ष्मीच्या देवळाची प्रतिष्ठा **शामाचार्य** नामक इकडील स्थायिक यजुर्वेदी ब्राह्मणानें केली आहे. हे [1]**शामाचार्य मुंबई** प्रांतांतील वृत्त्यंशी असून त्यांस सरकारांतून एक पेटेन्ट मिळाले होतें तें हल्लीं त्यांच्या वंशजांजवळ आहे. ह्याच देवळानजीक धाकजी दादाजी नामक एका परभु गृहस्थाचें देवालय आहे, त्यांतील सर्व देवांस त्यांनीं आपल्या मुलांचीं नांवे दिलीं असून मुख्य शंकराचे लिंगास "धाकलेश्वर" ह्मणून आपलेंच नांव दिलें आहे ह्मणून त्या देवांच्या दर्शनास कोणी फारसे जात नाहींत. ह्या देवालयापुढें मोठें पटांगण आहे. पटांगणांत शिरतांच दोन्हीं बाजूला दोन मोठ्या दिपमाळी आहेत. एकंदरींत ह्या देवळाचें काम फारच सुंदर केलें आहे. ह्यास एकंदर ८०,००० रुपये खर्च झाला आहे. हें २५ कोसांवरून समुद्रांतून दिसतें हीं एकमेकाला लागलेलीं ५ देवळें आहेत. त्यांची नांवें मयूरेश्वर, रमेश्वर, श्रीधाकलेश्वर, हरीनारायण व विनायकादित्य. ह्या देवळास इ. स. १८३० च्या फेब्रुवारी महिन्यांत बांधण्यास आरंभ होऊन तें सन १८३२ त पुरें झालें महालक्ष्मीच्या देवळासंबंधानें मुंबईचे वर्णनांत जो एका बखरींतून उतारा घेतला आहे तो येणेंप्रमाणे :—

"कोणे एकेसमयीं इंग्रज सरकार कंपनी बाहादुर ह्यांचे मनांत आलें कीं, वरळीगांव व मुंबईची दरम्यान खाडी ती बांध बांधून गाडीवाट करावी; परंतु समुद्राचे पाण्याचा जोर फार होता तेव्हां फार सायास पडले, तथापि बांध बांधून खाडींतली जागा काढून शेतें केलीं व बहुतेक जागा तेणेंकरून निघाली आणि रयतेस सुख जहालें व गाडीवाट व पायवाट जहाली. हा एक धर्मच आहे. कोणी लोकांस त्या रस्त्यावरून येण्यास कांहीं मनाई जोरजुलूम करीत नाहींत. तर धर्माची रीत अशीच आहे. तरी म्लेंछ यांत असून फार सुज्ञ धर्माची वृद्धी करितात. परंतु हिंदुलोक द्वेष करून धर्माचा लोप करितात, तेणेंकरून क्षयातें पावतात. हा विचार कोणीच पहात नाहीत. हें कलींचें माहात्म्य आहे.

---

१. हा देश पोर्तुगिजांच्या हातीं गेल्यावर त्यांनी हिंदूंच्या देवालयांचा विध्वंस केला व कोणतेंही धर्मकृत्य होऊं दिलें नाहीं. पुढें पोर्तुगिजांस हांकून लाविल्यावर हा देश ब्रिटीशांच्या हातीं आला. नेटीवांवर (एतद्देशीयांवर) जी त्यांची निरंतर दया असते त्या अन्वयें त्यांस (वरील यजुर्वेद्यांस) आपल्या धर्माप्रमाणें चालण्याची परवानगी दिली. ही परवानगी मिळाल्यावरून ह्या यजुर्वेद्यांपैकी मल्हार नाईक नामक ब्राह्मणाने श्रीमुलेश्वराचें लिंग (कोणीस्थान भ्रष्ट करून छपवून ठेवलेलें) काढून त्याची प्रतिष्ठा केली. X X X भुलेश्वराची प्रतिष्ठा झाल्यानंतर महालक्ष्मी (ब्रिचक्यांडी) येथील देवीची प्रतिष्ठा शामाचार्याने (ज्यास ब्रिटीश सरकारचें पेटेन्ट आहे त्यानें) केली आणि आज मितीपर्यंत सर्व हिंदुलोक त्या देवीची पूजा करित आहेत. X X X"

उत्तर कों०. प्रा०. गं०. शु०. य०. ब्राह्मण ह्यांची खरी माहिती.

जे समयीं वरळींचा बांध बांधावा असें इंग्रज सरकाराच्या मनांत आल्यावरून सरकारानें फार मेहनत केली. दगडांच्या राशी जहाजें भरून तेथें समुद्रांत दगड टाकले परंतु रस्ता कांहीं सिद्धीस न जाय. याप्रमाणें कित्येक दिवस मेहनत केली तेव्हां श्रीमहालक्ष्मी, महाकाळी, महासरस्वती, यांचे मनांत आलें कीं, क्षीर सागरांतून बाहेर निघावें आणि मुंबई नगरांत प्रसिद्ध व्हावें, भक्तजन तरायासाठीं; कारण त्या रस्त्याचे जागेंत त्यांचा वास होता. तेणेंकरून बांधाची बांधणी सिद्धीस जात नव्हती; त्यासाठीं श्रीमहालक्ष्मी, महाकाळी, महासरस्वतीनें ते समयीं रामजी शिवजी परभू सरकारचे इंजनेर होते, त्यांस दृष्टांत दिला कीं, आह्मी क्षीरसागरांत आहों तर आह्मांस तेथून काढून बाहेर ज्या ठिकाणीं सद्यः आहेत ते टेंकडीवर देवालय बांधून स्थापना करावी. तर आह्मी संतुष्ट होऊन बांध बांधायास अनुकूल होऊन तुझ्या हातीं बांध बांधवूं. बांध सिद्धीस गेला तर तूं सरकारांत हमी भरावी कीं मजला सरकारानें हुकूम केला असतां बांध बांधून देईन. नंतर त्या समुद्राचे खाडींत जाळें घाल. ह्मणजे आह्मी जाळ्यामधून समुद्रांतून बाहेर निघून येऊं. या प्रमाणें देवीचा दृष्टांत झाला.

रामजी शिवजीनें देवीचे आज्ञेवरून सरकारांत हमी भरली कीं, सरकार जर मला हुकुम करील तर मी बांध बांधून देतों. नंतर सरकारानें रामजी शिवजीस हुकूम दिला कीं, तुह्मी बांध बांधावा; तो बांधला असे. परंतु हुकूम झाल्यावर रामजी शिवजीची खात्री होण्यास देवीचे आज्ञेप्रमाणें जाळें दर्यांत घातलें. तेव्हां त्या तीन मूर्ति पाषाणी महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती त्या जाळ्यांत आल्या. पहा ! देवीचें सत्व कसें आहे ! जाळें तें काय, किती बारीक सुतळीचें त्या मूर्ति पाषाणी भारी तळास बसलेल्या त्या जाळ्यांत कशा आपोआप बसून जाळें भारानें न तुटलें असतां आल्या. नंतर त्या मूर्ति ह्या ज्या टेंकडीवर आहेत त्याच टेंकडीवर ठेविल्या. नंतर ती टेंकडी व जागा सरकाराकडून बक्षीस मागून त्या टेंकडीवर देऊळ बांधून स्थापना केली. त्या दिवसापासून तों आज दिवस पावेतों अचल आहेत. तर ती टेंकडी देवीची असे. त्या टेंकडीवर व जाग्यावर देवीशिवाय कोणाची सत्ता नाहीं त्या टेंकडीची हद्द टेंकडी व डोंगरी सारी दर्याकिनारा

वरळीचे बाजूचा तेथपर्यंत ती काळीकेचे देवळापर्यंत देवीचें देऊळ बांधिले तेथपर्यंत असे. नंतर गोविंदजी मुग्यानें धर्मशाळा बांधिली. सोनारशेट्यानें धर्मशाळा बांधिली. व माणकी कोळणीनें बांधिली."

८१. **बाबूलनाथ.—चौपाटीच्या** पुढें डाव्या बाजूस जी एक टेंकडी आहे तीस **बाबूलनाथ** ह्मणतात. ही डोंगरी वाळकेश्वराच्या डोंगरीचा भाग आहे. येथें एक महादेवाचें देवालय आहे, ते कोणी पांडुशेट या नांवाच्या सोनार गृहस्थानें बांधलें होतें असें ऐकतों. हें देऊळ लहानच असून तेथें आतां नवीन सभामंडप बांधला आहे. हें केव्हा बांधलें ह्याचा बरोबर पत्ता लागत नाहीं. येथील लिंग स्वयंभू आहे ह्मणून सांगतात. येथील पाणी चांगले आहे. **मुंबईत** पूर्वी नळ नव्हते त्यावेळीं गुजराथी ब्राह्मणाकडून बहुतकरून ह्याच ठिकाणचें पाणी नेववून येथील लोक पीत असत. हें स्थान एकांतीं टेंकडीवर असल्यामुळें फार रम्य दिसतें. येथून **मुंबईचा** देखावाही फार मनोवेधक दिसतो. बाबूलनाथ हें नांव ह्या देवास कसें पडलें असावें ह्याची कांही व्युत्पत्ति साधार मिळत नाहीं. तरी हा डोंगर असल्यामुळे येथें बाभळीचीं झाडें असण्याचा संभव आहे. व अशा बाभळीच्या झाडांमध्यें जागा करून येथें हें देवालय बांधलें असल्याकारणानें ह्यास बाभळनाथ हें नांव सहज पडलें असावें. तेव्हां अर्थात बाभूळनाथ अथवा बाभळनाथ असा कठोर उच्चार न करितां बाबूलनाथ ह्मणू लागले असावे असें आह्मांस वाटतें; पण खरें काय असेल तें ईश्वर जाणे !

८२. **गांव (ग्राम) देवीचें देवालय.**—हें देवालय गिरगांवात चौपाटी बंदराच्या नजीक असून त्याच्या शेजारीं श्रीशंकराचें देवालय आहे. व जवळच पुष्करणी आहे. ह्या देवळाचा सभामंडप मोठा असून बाजूला जागाही पुष्कळ आहे. ह्या देवीच्या विषयीं अशी कथा सांगतात कीं ही देवी पुरातन आहे. हिचें पूर्वीचें नांव **लीलावती** असें होतें. आणखी असें सांगतात कीं, ही देवी दोनशें वर्षापूर्वी **वाळकेश्वराचे** डोंगरांत होती. पण एके दिवशी रा. **बाबाजी ह्मात्रे** सोमवंशी क्षत्रीय पाठारे ह्यांच्या स्वप्नांत येऊन तिणें त्यांस असें सांगितलें कीं, मला गांवांत घेऊन जा. तेव्हां सदर्हु ह्मात्रे व गिरगांव येथील सर्व मंडळी मिळून तिला गांवांत आणून तिची उघड्या जागेवर स्थापना केली, व तेथें एक वडांचें झाड लाविलें. तें अद्यापि आहे. कांही वर्षांमागें मोठें तुफान झालें त्यांत तो वटवृक्ष मोडून

पडल्यामुळें देवी अगदीं उघडी पडली. तेव्हां [१]शके १७२८ मध्यें रा. **बाळाजी भिकाजी** क्षत्री सोमवंशी पाठारे यांनीं देवीचें देवालय बांधिलें. ह्या देवीची जत्रा मार्गशीर्षशुद्ध पौर्णिमेस भरते. नवरात्राचे व रामनवमीचे ही उत्साह होतात. देवीच्या संबंधाचा सर्व खर्च सोमवंशी क्षत्रीय हेच लोक करितात. देवीचें नांव लीलावती असतां तिला गांवदेवी असेंच ह्मणतात. ह्याचे कारण तिला गांवांत आणून तिची प्रतिष्ठा केली ह्मणूनच हें नांव प्राप्त झालें असावें असें वाटतें. ही नांव बदलण्याची कल्पना सयुक्तिक दिसते.

८३. **माधवबाग**.—माधवबाग हा कावसजी पाटलाचे तळ्यानजीक नळबाजाराकडे जाणाऱ्या रस्त्यावर आहे. ह्या बागांत लहानसेंच पण टुमदार श्रीलक्ष्मीनारायणाचे देऊळ असून देवळाच्या सभोंवार धर्मशाळा आहेत. त्यांपैकीं उत्तर आंगची धर्मशाळा ही वास्तविक धर्मशाळा नसून लहानसा टुमदार बंगला आहे. हा बंगला बहुतकरून मालकाच्या स्वाधीन असतो. ह्या धर्मशाळा मोठ्या सुंदर असून बहुतकरून सार्वजनिक कामाकरितां उपयोगी पडतात. बागाच्या मुख्य दरवाज्याजवळ एक लहानशी जागा चौघड्याकरितां तयार केली आहे व दरवाज्याजवळच एक तीन भाषेंत शिलालेख आहे. त्याजवरचा मराठीतला उतारा खालीं दिला आहे :—

श्री.

हा

माधवबाग

मुंबई येथील राहाणारे कपोळवाणी स्वर्गवासी शेठ माधवदास

रणछोडदास यांचे चिरंजीव

नरोत्तमदास व वरजीवनदास

याणीं आपले तीर्थरूपाचे स्मरणार्थ बांधविला आहे

शके १७९६ संवत १९३० सन १८७४.

८४. देऊळ पूर्वाभिमुख असून त्याची रचना साधारण फारच नामी आहे. व जागोजाग कोरींव काम केलें असून साधुसंत व देवादिकांचे पुतळे

[१] मुंबईचें वर्णन.

घुमटाच्या खालच्या भागाला कोरले आहेत. घुमटावर सोन्याचा कळस बसविला असून नेहमीं निशाण फडकत असतें. सभामंडप हा लहानसाच असून जमीन फरसबंदी दगडाची केलेली आहे. व देवासमोर एक कारंजा आहे त्याजवर नेहमीं लांकडी झांकण असतें. देवळाच्या गाभाऱ्यांत जाण्यास एक लहानसा दरवाजा आहे त्याचें काम फारच नकशीचें असून त्याजवर रुपेरी पत्रा बसविला आहे. देवळांत मूर्ति श्रीलक्ष्मीनारायणाच्या आहेत. ह्या मूर्ति एका फरसबंदी चौथऱ्यावर उभ्या केल्या असून. शुभ्र स्फटिकाच्या आहेत. ह्या देवळांतील मूर्तीसारख्या मूर्ति फारच थोड्या ठिकाणीं पाहण्यास मिळतील. नारायणाची मूर्ति जणूंकाय भक्तजनांबरोबर हंसतेच आहे व लक्ष्मी आपल्या सव्य हस्तानें भक्तजनांस घाबरूं नका, मी तुमचें रक्षण करीन ह्मणून आश्वासन देत आहे कीं काय असा भास उत्पन्न करणाऱ्या आहेत. नारायणाचे चाऱ्ही हातांत प्रत्येकीं शंख, चक्र, गदा व पद्म अशीं आयुधें आहेत व लक्ष्मीचे डावे हातांत सुवर्णाचा पेला आहे. ह्या मूर्तीचा प्रत्येक दिवशींचा पोषाख निरनिराळा असतो. नारायणास नेहमीं मंदील बांधतात. मूर्तीचे आंगावर नेहमीं सोन्याचे, मोत्यांचे व हिऱ्यांचे दागिने असतात. ह्या मूर्ति एकवेळ अवश्य पाहण्यासारख्या आहेत. येथील पूजा त्रिकाळ होत असते. ह्या देवळांतील दर्शनाचा वगैरे थाट वल्लभी पंथाप्रमाणेंच असतो ह्मणजे सदासर्वकाळ दर्शन खुलें नसतें. दर्शनाच्या नियमित वेळा आहेत.

८५. **कृष्णबाग**.–हा बाग कावसजी पटेलच्या तळ्यानजिक असून **कांदेवाडी**च्या नाक्यावर लोहाणे जातीचे गृहस्थ वैकुंठवासी **धनाजी उकरडा कांदेवाला** ह्यांची स्त्री **कानबाई** हिनें सुमारें लाख सवालाख रुपये खर्च करून एक भव्य देवालय व हा बाग बांधला. ह्या देवळांत शके १८०७ पार्थिवनाम संवत्सरे फाल्गुन शु. २ रवौ ह्या दिवशीं मोठ्या समारंभानें श्रीमुरलीधराची स्थापना केली. ह्या प्रसादप्रतिष्ठेंत इकडील स्थानिक यजुर्वेदी व गुर्जर हे होते. ह्या देवळांतील मूर्ति सुमारें सात आठवर्षींच्या मुलाइतक्या उंच असून त्यांच्या मागें प्रभावळ आहे. मुरलीधराचे हातांत मुरली असून तो ती बाजवीत आहे व बाजूला लक्ष्मीची मूर्ति आहे, तिच्या डाव्या हातांत सुवर्णमय पेला असून उजवा हात मोकळाच आहे. ह्या मूर्ति शुभ्र स्फटिकाच्या असून एका फरसबंदी चौथऱ्यावर उभ्या केल्या

आहेत. ह्या मूर्तिही माधवबागेंतील मूर्तिप्रमाणेंच पाहण्यासारख्या असून पूजादिकांचा थाट माधवबागेंतील व्यवस्थेप्रमाणेंच समजावा. ह्या मूर्तिच्या खालोखाल मूर्ति झावबाच्या देवालयांतील आहेत. ह्या देवळांतील गाभाऱ्याचा दरवाजा साधाच असून भिंतीचें कोरींव काम फारच उत्तम केलें आहे. सभामंडप लहानच असून आंत कारंजा आहे. ह्या देवळाच्या घुमटाचा कळस सोनेरी पत्र्याचा असून त्याजवर नेहमीं निशाण फडकत असतें. व सभामंडपावर जो साधारण घुमटाचा आकार देऊन जे आंत पुतळे कोरले आहेत व तसेंच बागांत शिरण्याच्या मुख्य दरवाज्यापासून तों थेट देवळाच्या मुख्य घुमटापर्यंत कोरींव काम केलें आहे व त्या कामांत जे एक एक अत्युत्तम पुतळे कोरले आहेत त्यांचे वर्णन करणें ह्मणजे लेखणीच्या शक्तिपलीकडे आहे. ह्मणजे तें इतकें बारीक व उत्तम आहे कीं तें काम चार घटका डोळे भरून पाहिल्याखेरीज समजावयाचें नाही. सभामंडपाची जमीन फरसबंदी आहे. ह्या मूर्तीच्या समोरच एका लहानशा देवळांत हात जोडून सर्पावर बसलेला असा गरुड आहे. देवळाच्या बाजूला लहानसा बाग असून तेथेंच एका चाळींत सदावर्त आहे.

८६. **ठाकूरद्वार.–पालवाच्या** रस्त्यावर **आत्माराम** बावा ह्यांचे देवालय आहे त्यास ठाकूरद्वार असें ह्मणतात. हें बांधण्यास सुमारें तीस चाळीस हजार रुपये खर्च झाला आहे. ह्या देवळांत राम, लक्ष्मण व सीता ह्यांच्या मूर्ति आहेत. हें देऊळ दगडी बांधलेलें असून जुन्या धर्तीचें आहे. रामाच्या मूर्तीसमोर सभामंडपांत आत्माराम बावाची समाधी आहे. मूर्तींच्या समोरासमोर एका चौथऱ्यावर मारुती असून त्याच्याच पुढें शिवलिंग आहे. पूर्व बांजूला लहानशा देवळींत विठ्ठलाचें, गणपतीचें, दत्तात्रयाच्या पादुका-, अक्कलकोट येथील स्वामीचें व शिवलिंग वगैरे देवांच्या मूर्ति आहेत. ह्याच देवळाच्या शेजारीं दुसऱ्या देवालयांत विष्णूची, मारुतीची, दत्तात्रयाची व शिवलिंग अशा मूर्ति आहेत. ह्या देवळाच्या पाठीमागें दुस वाडींत हरीभाऊचें ठाकूरद्वार आहे तेथेंही रामाच्याच मूर्ति आहेत. ह्या दोन्ही देवळांच्या नजीक झावबाचें देवालय आहे ह्यांतही राम, लक्ष्मण व सीता ह्यांच्या मूर्ति असून ह्या मूर्ति पांढऱ्या स्फटिकाच्या आहेत. येथें एक अन्नसत्र आहे. ह्या देवळांत ग्यास घेतला असून देवालयाचें काम मोठें सुरेख केलें आहे. पुढें कांहीं अंतरावर

शेणव्यांचे ठाकूरद्वार आहे. येथें शिवलिंग, राममूर्ति वगैरे दुसऱ्या मूर्ति आहेत. वरील सर्व देवळांत रामनवमीच्या दिवशी मोठा उत्सव होतो. १० मीच्या दिवशीं देवाची पालखी निघते.

८७. **भुलेश्वर**.–हें देऊळ कावजी पाटलाच्या तळ्यावरून भारवाडी बाजाराकडे जाणाऱ्या रस्त्यावर आहे. ह्या देवळांतील महादेवाची प्रतिष्ठा **मुंबई**तील स्थानिक यजुर्वेदी ब्राह्मणांपैकीं [1]**मल्हार नाईक** नामक ब्राह्मणानें केली. हें देऊळ मोठें असून बाहेर नंदी आहे. आंत नेहमीं भक्तजनांची गर्दी उडलेली दृष्टीस पडते. संततधारा देवावर नेहमीं चालूच असतात. सभामंडपांत शीतळा देवीची मूर्ति आहे. बाजूला ह्मणजे दक्षिण आंगास श्रीगणपतीचें देवालय आहे. हें देवालय इ. स. १७०८ ह्या वर्षी कोणी **दादाजी लक्षाजीराव** नामक श्रीमंत परभू गृहस्थानें बांधिलें आहे. हे बांधण्याचें कारण त्याच्या पोटीं संतान नव्हतें हे होय असें सांगतात. उत्तर आंगास श्रीबालाजींचे देवालय असून त्याच्याच बाजूला मारुतीचें देवालय आहे. गणपतीच्या देवालयाचे बाजूस दुसरें एक मोठें श्रीरामेश्वराचें देवालय आहे तें आत्माराम शिंप्यानें बांधिलें आहे. व त्याच्या पुढें ह्मणजे तळ्याचे दक्षिण आंगाला दगडांनीं बांधलेलें श्रीशंकराचें व श्रीगणपतीचें अशीं दोन देवालयें आहेत. ह्या देवळासमोर एक लहानशी विहीर आहे. ह्याच देवळाचे शेजारीं एक काळभैरवाचें देऊळ आहे. भुलेश्वराचे देवळासमोर कथा पुराणें होण्याकरितां सभामंडप आहे, तेथें नेहमीं कथा पुराणें चालू असतात. भुलेश्वर देवळासमोर एक विस्तीर्ण तळें असून त्याच्या मध्यभागीं एक खांब पुरलेला आहे. ह्या तळ्याचें पाणी स्वच्छ नसतें. ह्या तळ्याच्या कांठीं पुस्तकें विकणारे लोकांचीं दुकानें असतात. व बैरागी लोक येथें नेहमी गांजा भांग पिऊन व नानातऱ्हेचीं सोंगें करून पडलेले असतात. देवळांत शिरतांनाच पायरीवर असलेले गुजराथी ब्राह्मण बेल फुलें घेऊन तयार असतात. त्यांजपासून बेल फुलें घेऊन देवदर्शन झाल्यावर त्यांस दक्षणा द्यावी लागते. ह्या लोकांस येथे बसण्याबद्दल भाडें द्यावें लागतें असें ऐकिवांत आहे. सभामंडपाच्या शेजारी एक वट व अश्वत्थ यांचा पार आहे. त्याच्या खालीं नेहमीं गाई बसतात. ह्या गाईस चारा पाणी, भाटे लोकांकडून धर्मार्थ

१. ३४८ पृष्ठावरील टीप पहा.

दिला जातो. यज्ञोपवीतें विकणारांची दुकानें येथेंच असतात. व ह्याच वृक्षाखालीं कांहीं मूर्ति व लिंगें आहेत. भुलेश्वराच्या देवळानिमित्त एक चौघडा आहे तो बारमास झडत असतो. चौघड्याकरितां मुख्य दरवाज्यावर एक जागा तयार केली आहे. बाहेरच्या आंगास फुलमाळ्यांची दुकानें आहेत. तेथें सर्व प्रकारचीं फुलें मिळतात, या देवळांत दर सोमवारीं व त्यांत मुख्यत्वेंकरून श्रावण सोमवार, महाशिवरात्र व प्रदोष ह्या दिवशी तर भक्तजनांची इतकी गर्दी होऊन जाते कीं, आंत शिरण्याची सुद्धां मोठी मुष्कील पडते. रात्रौ आर्तीचा जो थाट उडतो तो कांहीं अलौकिकच ह्मटला तरी चालेल. सर्व रस्ता लोकांनीं भरून जातो. आंधळे व इतर भिकारी अर्धी दुगाणी मागण्याकरितां दरवाज्याच्या तोंडाशींच उभे असतात. ह्या देवळांतील थाट व देखावा त्यांत अशा विशेष प्रसंगाचा-प्रत्यक्ष पाहिल्यावाचून लक्षांत येणें कठीण. **हिंदुस्थानांत** अनेक महान महान तीर्थें व क्षेत्रें आहेत तरी तेथें भुलेश्वराएवढी सतत गर्दी व ह्या देवळासारखें उत्पन्न दुसऱ्या कोणत्याही देवळाचें नसेल असें आह्मांस वाटतें.

८८. भुलेश्वर देवळाच्या उत्तर आंगाला पंचमुखी मारुतीचें देवालय आहे. ह्या मारुतीस पंचमुखी ह्मणयाचें कारण ह्यास पांच मुखें आहेत. श्रावणांतील शनवारीं येथे मोठी गर्दी असते. ह्या मूर्तीच्या समोर दुसरी एक शनीची मूर्ति आहे. व पश्चिम बाजूला विठ्ठल रखुमाई व राधाकृष्ण ह्यांच्या मूर्ति असून तेथेंच रणछोडजीची मूर्ति आहे. दक्षिण बाजूस महादेवाचीं निरनिराळीं लिंगें आहेत. मोठें लिंग ज्या ठिकाणीं आहे तेथे नेहमीं काळोख असतो. लहान लिंग आहे तेथें मात्र उजेड असतो. भिंतींत पार्वती, गणपती व मारुती ह्यांच्या मूर्ति आहेत. हीं देवालयें कधीं व कोणी बांधलीं ह्याविषयीं कांहींच माहिती मिळत नाहीं!

८९. **हाटकेश्वर.**–हें देवालय भुलेशवरानजिक आहे. ह्या देवालयांत शिवलिंग आहे. ह्या देवालयाच्या स्थापनेविषयीं अशी दंतकथा सांगतात कीं, हल्लीं ज्या ठिकाणीं हें लिंग आहे त्या ठिकाणीं कोणी एक कपोळ जातीचा वाणी राहत असे. एके दिवशीं त्या वाण्यानें त्या घरांत भाड्यानें राहत असलेल्या एका ब्राह्मणास घर सोडून जाण्यास सांगितलें, जेव्हा तो त्या गोष्टीस नाकबूल झाला. पुढें मालकाचें व त्याचें बरेंच भांडण झालें; तेव्हां त्यानें जातांना एके दिवशीं रात्रीस हल्लींच्या जागेवर लिंग

आहे त्या जागेवर शिवलिंगाची स्थापना केली, दुसरे दिवशीं सकाळीं मालक येऊन पाहता तों घरांत शिवलिंगाची स्थापना झाली आहे. तेव्हां अर्थात हे शिवस्व झाल्याकारणानें त्याचा नाइलाज झाला. अजूनही ह्या देवळाच्या वरचा भाग घराचा दिसतो. हट्टाने स्थापन केला ह्मणून ह्या देवास हाटकेश्वर किंवा 'हट्टेश्वर' हे नांव पडलें.

९०. **मुंबादेवी.**–ह्या देवीचें देवालय पूर्वी मैदानांत फांशीतळ्याजवळ होते. पण सरकारास कांपाच्या मैदानांत जागा हवी होती ह्मणून देवळाची किंमत देऊन त्यांनी तें इ.स. १८०३ त मोडून टाकविलें व हल्लींच्या जागेवर नेण्याची परवानगी दिली. त्यावेळीं या देवळाचा सर्व कारभार [१]**पांडुशेट सोनार** याजकडे होता. हल्लींचें देऊळ कोणी व कधीं बांधिलें ह्याविषयीं विश्वसनीय माहिती मिळत नाही. ह्यादेवीची स्थापना सुमारें ५०० वर्षांपूर्वी झाली आहे असें समजतें. हिची स्थापना कोणी काळ्यानें केली होती असें बहुतेकांचें ह्मणणें पडतें. हें ह्मणणें संभवनीय दिसतें, कारण येथील मुळचे राहणारे कोळीच होत. मुंबादेवी ही त्यांची कुळदेवता. कोळ्यांत स्त्रियांचीं नांवें मुंगा, शिमगी, मौना, मोंगु अशी अझून आढळतात. ह्यावरून असें अनुमान होतें की, ही देवी कोणी कोळणींने स्थापून तिला आपलें नांव ठेविलें असावें. पुढें हळुहळू "गा" चा "बा" होऊन मुंबा शब्द लोकव्यवहारांत आला. तेव्हां अर्थात मुंबादेवीचे मुंबादेवी हेंच नांव प्रसिद्ध झालें. हल्लीं परळास माणकेश्वर, महालक्ष्मी येथे धाकलेश्वर वगैरे स्थापकांची नांवें जशीं देवांच्या कपाळी आली आहेत, तसलाच प्रकार मुंबादेवीच्या संबंधानें होऊन कोणी मुंगा नामक कोळणीनें देवीस आपलें नांव दिलें असल्याचा बराच संभव आहे. पांडुशेट हे गृहस्थ पूर्वी **मुंबईत** मोठे वजनदार होते. त्यांनीं हें देऊळ बांधलें व त्याची व्यवस्था आपण स्वतः पाहू लागले. हल्लीं देखील त्यांच्या घराण्याकडेसच हें काम आहे असें ऐकिवांत आहे. ह्या देवळाची जागा मारवाडी बाजाराच्या एकाटोंकापासून दुसऱ्याटोंकापर्यंत आहे. ह्याला तीन दरवाजे आहेत. चिंचबंदराकडे जो रस्ता जातो तेथें मुख्य दरवाजा आहे. दुसरा दरवाजा मारवाडी बाजाराकडे आहे. व तिसरा मोठे रस्त्यावर तांबटांच्या चाळीसमोर ह्मणजे पायधुणी व भायखळा येथें जो रस्ता जातो

१. म्याल्किन साहेब ह्या गृहस्थास शेवगी म्हणतात.

त्या रस्त्यावर आहे. ह्याच देवळांत गणपती, मारुती , शिव आणि इंद्रायणी ह्यांची देवळें आहेत. ह्या देवळासमोर दुसरें लक्ष्मीनारायणाचें एक देऊळ आहे, तें माजी **जगन्नाथ शंकरशेट** ह्यांनी बांधिलें आहे. मुंबादेवीच्या तळ्याकडे जाऊं लागलें ह्मणजे जगन्नाथजी व बलदेवजी ह्यांची लहान देवळें लागतात. दुसऱ्या दरवाज्याशेजारी व तलावाचे समोर गणपती, लक्ष्मीनारायण, मारुती आणि पंचमुखीमहादेव ह्या देवांच्या मूर्ति आहेत. ह्या देवांच्या मागें शमीचा एक मोठा वृक्ष आहे. दसऱ्याच्या दिवशीं ह्या वृक्षाची पूजा करितात. येथें नवरात्रांत ९ दिवसपर्यंत दररोज हजारों भाविकजनांची दर्शनाकरितां गर्दी जमत असते.

९१. हें देऊळ बैठें असून मूर्ति दगडाच्या आहेत. देवीची पूजाअर्चा नेहमीं मोठ्या थाटानें होत असते. देवीच्या पुढें एक वाघ बसविला आहे. नवरात्रांत येथें मोठा होम होत असतो. त्यावेळी धार्मिक लोक बराच धर्म करून मणोगणती तूप यज्ञनारायणार्पण करितात. असाच यज्ञ बेचरादेवीच्या पुढें नवरात्रांत होत असतो. ही देवी भुलेश्वरानजीक आहे. ह्या देवीची मूर्ति उग्र आहे. मुंबादेवीचें तळें **शेट नागरदास नवलाख्या** यांनी बांधिलें आहे. ह्या तळ्यावर बसण्याकरितां फरसबंदी चौथरे सभोंवार केले आहेत. तळ्यात एक स्तंभ उभा केला आहे. ह्या तळ्याचें पाणी स्वच्छ नसतें. लक्ष्मीनारायणाचे देवळासमोर वाणी वगैरे लोक कबुतरांस दाणा घालतात. असा धर्म बहुधः श्रावक वाण्यांत फार होत असतो. झाडांच्या बुडांशीं, घरांच्या भिंतींच्या कोपऱ्यांत अगर मुंग्यांच्या वारुळावर हे लोक साखर टाकितात. संस्कृत भाषेंत मुंबादेवीचें एक माहात्म्य आहे. त्यांत अशी कथा वाचण्यांत येते कीं, ह्या बेटांत पूर्वी मुबारक नांवाचा कोणी एक बलाढ्य दैत्य होता. त्यानें आपल्या तपोबलानें ब्रह्मदेवापासून असा वर मागून घेतला होता कीं, आपणास कोणापासूनही मृत्यु नसावा व आपण नेहमीं विजयी व्हावें. ह्याप्रमाणें वर मिळाल्यावर तो दैत्य ब्राह्मणांस पीडा देऊं लागला. त्याचा संहार व्हावा ह्मणून सर्व देव मिळून विष्णूस शरण गेले. तेव्हां विष्णु, शिव आदिकरून सर्व देवांनीं आपापलें तेज काढून त्या दैत्यास मारण्याकरितां देवी उत्पन्न केली. देवीनें मुबारकास हतवीर्य केलें. तेव्हा तो देवीस शरण गेला व तिजपासून असा वर मागितला कीं, माझें नांव तुझ्या नांवांत मिळवून तें तुझ्या नांवापूर्वी यावें आणि सर्वकाळ ह्या जगांत प्रसिद्ध असावें. ह्यावरून देवीनें आपलें नांव

मुंबादेवी ठेविलें. ह्या देवळाच्या शेजारीं कासार लोकांचें एक देऊळ आहे. हें देवालय देवीचें आहे.

९२. **रामवाडींतील श्रीरामचंद्राचें देऊळ.**–हें देऊळ फार पुरातन आहे असें दिसतें. हें प्रथम काशीनाथ सोकाजी या नांवाच्या परभू गृहस्थानें बांधलें होतें. सुमारें ९० - ९५ वर्षांपूर्वी विठोबा कानोजी नामक परभू गृहस्थानें ह्या देवळाचा जीर्णोद्धार केला असें सांगतात. तेव्हांपासून ह्या देवळाची वहिवाट त्यांच्याच वंशजाकडे आहे. येथें रामाचें देऊळ असल्याकारणानें आसमंतात भागाला रामवाडी हें नांव पडलें आहे.

९३. मुख्य देऊळ श्रीरामचंद्राचें असून त्यांत राम, लक्ष्मण आणि सीता ह्यांच्या मूर्ति आहेत. मुख्य देवळास चांदीचा देव्हारा आहे. या मूर्तीच्या उत्तर बाजूला श्रीमारुती व गणपति यांची लहान लहान देवळें आहेत, तसेंच दक्षिणांगास, गरुड आणि श्रीलक्ष्मीनारायणाचें अशी देवळें आहेत. ह्या सर्व मूर्ति पृथक् पृथक् लहान मखरांत किंवा देव्हाऱ्यांत उत्तम संगमरवरी दगडाच्या चौथऱ्यावर बसविल्या आहेत. सर्व मूर्ति सफेत स्फटिकाच्या आहेत. बाहेर एक मारुतीचें लहानसें देवालय असून त्याच्या बाजूला दगडी दीपमाळी आहेत. हें देवालय लहानच असून ह्यास देवळाचा आकार मुळींच नाहीं. एकाद्या घरासारखी ह्या देवळाची रचना असून तेंही मोडकळीस आलें आहे.

९४. **सुंदरबाग.**–(श्रीद्वारकानाथजीचें देवालय.)–हें देवालय रामवाडी व विठ्ठलवाडी ह्यांच्या जवळ असून **काळका**देवीच्या रस्त्यावर आहे. हें देऊळ **सुंदरदास** नामक वाणी गृहस्थानें बांधिलें आहे. ह्मणून ह्यास 'सुंदरबाग' असें ह्मणतात. मुख्य दरवाज्यावर लेख आहे तो येणेंप्रमाणें:–

आ श्रीद्वारकानाथजीनु मंदीर ठक्कर मुलजीजेठा सुत सुंदरदासे बंधाव्यु छे. तेनी प्रतिष्ठा संवत् १९३१ ना जेष्ठ शु. ८ ने शुक्रवारे करी छे.

This temple is built by Sunderdass son of Thakar Mulji Jetha and dedicated to God Dwarkanathji in the year of Samvat 1931 Jestha Sudh 8th Friday the 11th June 1875.

९५. ह्या देवळांत जाण्यास मुख्य दोन दरवाजे आहेत. एक पश्चिमबाजूस व दुसरा उत्तर बाजूस. पश्चिम बाजूच्या दरवाज्यावर रिद्धीसिद्धीसहित

गणपती कोरला असून वर मोठें घड्याळ आहे. व बाहेरच्या उत्तर व पश्चिम बाजूस ऋषी, गोंसावी, गवळणी, माकडें वगैरे नानातऱ्हेचीं चित्रें कोरलीं आहेत. कोणी जपमाळ घेऊन बसला आहे, कोणी पोथीवाचीत आहे, कोणाच्या जटा वाढल्या आहेत त्या तो नीट करीत आहे, कोठें माकडें नानातऱ्हेचें खेळ करीत आहेत, असें अनेक जातीचें कोरींव काम मोठें सुंदर केलें आहे. आंत शिरतांच मोठा भव्य व विशाळ असा सभामंडप दृष्टीस पडतो. ह्या सभामंडपाची जमीन संगमरवरी दगडांनीं पिटलेली आहे. सभामंडपाच्याखालीं भक्तजनांस जोडेवगैरे ठेवण्याकरितां जागा केली आहे. सभामंडपांत एका कोपऱ्यास लहानशी विहीर आहे त्या विहिरीवर नेहमीं झांकण असतें. सभामंडपावर तीन बाजूंनीं ग्यालरी आहे व ह्या ग्यालरीचें काम व खांबांचे काम मोठें नकशीदार केलें आहे. द्वारकानाथजीच्या मूर्तीच्या समोर लहानसा कारंजा आहे, तो नेहमी बंद असतो. कारणपरत्वें त्याचा उपयोग करितात. गाभाऱ्यांत जाण्याचा दरवाजा रूपेरी मुलाम्याचा आहे. ह्या दरवाज्यावर श्रीकृष्ण असून त्याजवर दोन मनुष्यांनीं छत्र धरलेलें आहे असा देखावा दाखविला आहे. दरवाज्याच्या बाजूला जयविजय हे बसविले असून त्यांच्याच दोनीं बाजूंला कोनाड्यासारखा आकार दाखून तेथें गोपी हातांत हात घालून फुगड्या घालीत आहेत असें दाखवून त्यांच्याखाली गाईचीं चित्रें कोरलीं आहेत व त्यांच्याच बाजूला एका बाजूस सारंगीवाला सारंगी व दुसऱ्या बाजूला तबलजी तबला वाजवीत आहेत असें दाखविलें असून त्यांच्याहीवर अशींच तबलजी व सारंगीवाल्यांचीं चित्रें आहेत. श्रीद्वारकानाथजीची मूर्ती काळ्या स्फटिकाची असून एका चौरंगासारख्या उंच चौथऱ्यावर बसविली आहे व त्या मूर्तीपुढें निरनिराळ्या जनावरांचीं चित्रें ठेवितात. बैठकीवर नेहमीं रेशमीकपडा असतो. मूर्तीच्या चाऱ्ही हातांत शंख, चक्र, गदा व पद्म हीं आयुधें आहेत. हीं सर्व रुप्याचीं आहेत. ह्या मूर्तीच्या बाजूला लहान लहान तक्के ठेवलेले असतात. मूर्तीचा पोशाग नेहमीं किनखापी असून पागोटें वल्लभपंथानुयायी महाराजां प्रमाणें असतें. ह्या देवाचें दर्शन सकाळीं ६-७-९ वाजतां व संध्याकाळीं ४-५-६- वाजतां असें सगळें सहावेळ 'खुलें' होतें. बाकीच्या वेळीं दरवाजा बंद असतो. दर्शन सगळें ५-१० मिनटें खुलें असतें. ह्या

देवळांत वाणी, भाटे ह्यांची व त्यांच्या बायकांची गर्दी बहुतकरून फार असते. एकंदरींत ह्या देवळाचें काम फारच चांगले केलें असून पाहण्यालायक आहे.

९६. **काळबादेवी.–रामवाडी**च्या नाक्यावरून कांपाच्या मैदानांत जाऊं लागलें ह्मणजे हें देऊळ लागतें. हल्ली ह्या देवळाची वहिवाट इकडील यजुर्वेदी वृत्त्यंशी यांजकडे आहे. ज्या वेळीं **काळबा**देवीचा रस्ता सरकारानें वाढविला त्यावेळीं त्यांनी जुनें देऊळ मोडण्याचा हुकूम करून देवीची पुन्हां स्थापना करण्याचा खर्च देऊन हल्लीचें देऊळ बांधविलें. याची सर्व वहिवाट **कै. रघुनाथ कृष्ण जोशी** ह्यांजकडे सोंपिली होती. हें देऊळ लहानच असून टुमदार आहे व घुमटाच्या बाजूला चार कोपऱ्यांवर चार ब्राह्मण बसविले आहेत. दरवाज्यांत दोन दिपमाळी आहेत. ह्या देवळाची वर्षातून एकदां मार्गशीर्ष वद्य ३० स्येस जत्रा भरते. ह्या देवीची प्रतिष्ठा सुमारें इ.स. १७८४ त इकडील वृत्त्यंशी यजुर्वेद्यांनीं केली आहे व देऊळही त्यांचेच असून अजूनही ह्या देवळाची वहिवाट सदर्हू **रघुनाथ कृष्ण जोशी** ह्यांच्या वंशजांकडेस आहे. ह्या देवीस कालिका देवी असेंही ह्मणतात.

९७. **साधारण देवालयें–शिवरीस** वागेश्वरीचें देवालय आहे. **परळास माणकेश्वराचें** देवालय असून दुसरीं लहान मोठीं बरींच देवालयें आहेत. माणकेश्वराचें देवालय रा.रा. **विठोबा माणकोजी** ह्यांनीं बांधिलें आहे. तसेंच, **माजगांवांसही** माणकेश्वराचें एक देवालय आहे. हें सुमारें १९० वर्षांवर कोणी **वरळीकर** सोमवंशीक्षत्रीय यांनीं बांधिलें आहे. याचा जीर्णोद्धार रा. रा. **पुरुषोत्तम रामचंद्रजी** ह्यांनीं केला आहे असें सांगतात. माणकेश्वराच्या देवळांजवळ धर्मशाळेसमोर एक लहानसें देऊळ आहे. त्यांत शिळेवर एक सर्पाकृति कोरलेली असून, बाजूस ३ फूट उंच व दीड फूट रुंद असा दगड आहे. त्याच्या वरच्या बाजूस चंद्र सूर्य कोरले आहेत. खालीं महादेवाची पिंडी आणि नंदी असे काढले आहेत; आणि त्याच्या खालीं कानडी आणि बालबोध लिपींत कांहीं लेख आहेत. हा दगड **अवरंगजेब** बादशहाच्या पदरच्या एका कानडी गृहस्थानें बसविला आहे असें सांगतात.

९८. शंभुमहादेवाचें देवालय **वरळी**स आहे. **माटुंग्या**स मारुतीचें देवालय फार प्रसिद्ध आहे व तेथेंच दुसरीं कांहीं देवालयें आहेत. त्यांत

विठोबाचें देवालय मोठें असून आषाढीकार्तिकीस मोठी जत्रा भरते. माहिमास खोकलादेवी आहे. तिची खोकला बंद करण्याविषयीं मोठी प्रसिद्धि आहे. **ग्रांटरोड** स्टेशनानजीक **महालक्ष्मी**च्या रस्त्यावर **जगन्नाथ शंकर शेट** ऊर्फ **नाना शंकर शेट** ह्यांचें भवानीशंकराचें देवालय आहे. बाजूस धर्मशाळा असून तिच्याच लगत त्यांचा धर्मार्थ दवाखाना आहे. ह्या देवळाच्या बाजूला त्यांचा वाडा असून त्याच्या पुढें सुंदर बाग आहे.

९९. तसेंच **मुंबईकर** शिंदे शेषवंशी भंडारी जातीचें श्रीहरेश्वराचें देवालय **कै. लाडकुबाई गोपाळ भिकाजी ह्मात्रे** यांची विधवा हिनें आपल्या मृत्युपत्रांत लिहिल्याप्रमाणें तिच्या जातीच्या लोकांनीं वैशाख शुद्ध ५ मंगळ, शके १७७३ ता. ८ मे, सन १८५१ रोजीं बांधून त्यांत श्रीहरेश्वराची स्थापना केली. ह्याच देवालयास मागचे बाजूस **रामचंद्र पांडुरंग राऊत** ह्यांनीं इ.स. १८७४ सालीं श्रीराममंदीर जोडलें आहे.

१००. **माहिमा**स परभा देवीचें देवालय आहे. हें फार प्राचीन आहे. ह्या देवीची स्थापना **बिंब राजाच्या** कारकीर्दीत कोणी एका सरदारानें केली आहे असें तेथील लोकांच्या सांगण्यावरून समजतें. 'परभादेवी' ह्या नांवारून हें देऊळ बांधणारा इसम **बिंब**राजाबरोबर आलेल्या सरदारांपैकी कोणी परभू गृहस्थ असावा असा तर्क करण्यास जागा मिळते. पुढें ह्या देवळाचा जीर्णोद्धार **मुंबई**तील परभू गृहस्थांनीं केला आहे हें खालील लेखावरून वाचकांच्या लक्षांत येईलच. **बिंब** राजानें **माहिम** वसवून तेथें आपली राजधानी केल्यामुळें त्यास **माहिम, महिकावती, प्रभावती व भीमस्थान** (बिंबस्थान) अशीं नांवे पडलीं होतीं वगैरे माहिती आम्ही मागें दुसऱ्या भागांत दिलीच आहे. ह्या देवीस 'प्रभावती' असें ही ह्मणतात. आतां प्रभावती हें नांव पडण्यास एक तर ती परभू गृहस्थानें स्थापीत केली व दुसरें **माहिम**च्या प्रभावती नांवावरूनही त्या देवीस हें नांव मिळालें असावें असा आमचा तर्क आहे. वर ह्मटलेला लेख येणेंप्रमाणें :—

।। श्री ।।

" श्री माता प्रभावतीचें देवालय बांधलें ।
समस्त प्रभुकुल पाठारे ज्ञाती मिळोन ।।
वैशाख शुद्ध ११ येका. संवत् १७७१ ।
विक्रमादी. ।।"

**१०१. घोडपदेव.–माजगांव**च्या शेवटास 'मोटेचें मांजगांव' ह्मणतात. ह्याच्याच शेजारीं एक लहानशी डोंगरी आहे, तीस व तिच्या आसपासच्या जागेस 'घोडपदेव' ह्मणतात. ह्या जागेस घोडपदेव ह्मणण्याचे कारण असें दिसते कीं, पाहण्याबरोबर ह्या डोंगरीची आकृती घोड्याच्या आकारासारखी दिसते, असें कित्येक ह्मणतात; पण, वास्तविक येथें मोठा खडक मात्र आहे, तेव्हा अर्थात ह्यास 'खडकदेव' हें नांव चांगलें शोभेल ! येथें एका घोड्यास शेंदूर चोपडून देव बनविला आहे. हें स्थान फार पुरातन आहे. स्त्रियांस मुलें देण्याविषयीं ह्याची फार प्रख्याती आहे! ह्यास भोळ्या बाया सुपारीचा कौल लावून मुलें मागतात व ज्यास ह्या देवाच्या प्रसादानें मुलें होतात त्या तेथें पाळणें व झोळ्या नेऊन ह्या देवाच्या दारीं बांधतात.

**१०२. कान्होबा.**–आमच्या लोकांकरिता आज तेहतीस कोटी देव आहेत तरी त्यांस ते पुरे न पडून नवीन नवीन धर्मपंथ व मतें निघत आहेत. कान्होबा हाही त्यांतलाच एक देव आहे. कित्येकांचे असें म्हणणें आहे कीं, कान्होबा ह्यास हिंदु व मुसलमान भजतात; पण, कित्येक ह्मणतात मुसलमानांचा कान्होबाशीं काहींच संबंध नाहीं. पहिल्या मताचे लोक असें म्हणतात की, सुमारें १,२०० वर्षांपूर्वी कोणी **सय्यद सादत** नांवाचा एक फकीर **पैठण** मुक्कामीं मोठा विष्णुभक्त होऊन गेला, त्यांने ज्या वेळीं आमच्या देशावर मुसलमान लोकांनीं स्वाऱ्या करून मुसलमानी धर्माचा प्रसार करण्याचा सपाटा चालविला होता, त्यावेळी ह्या लोकांपासून हिंदूंचें रक्षण व्हावे ह्मणून हा पंथ उपस्थित केला. ह्यामुळें ह्या पंथांत हिंदु तर शिरलेच पण मुसलमानही बहुत शिरले. कान्होबाचीं देवळें नसतात. त्यांचे मठ असतात ते साधारण राहतीं घरें, चाळी किंवा एखादी लहानशी कोठडी ह्यांत असतात. मठात एक बाळकृष्णाची मूर्ति असते. क्वचित एकादा पिराचा पंजाही पाहण्यात येतो. कान्होबाच्या पुजाऱ्यास 'भगत' ह्मणतात. हे भगत आपल्या आंगांत वारें आणतात. त्यास कान्होबाचें वारे असे म्हणतात. कान्होबाचे पुजेच्या वेळीं 'याअल्ला बिसमिल्ला' वगैरे यावनी शब्दांचा उपयोग करून त्याच्या पुढे ऊद जाळितात; फुलें न वाहता सबजा वाहतात; जिकडे तिकडे अबीर फेंकतात, व कांहीं मुसलमानी

कलमेही पढतात. विशेष चमत्कार हा आहे की, कान्होबाची पुजा करण्यास फकीर लागतो ! कान्होबाचे भक्त असेंही ह्मणतात कीं, राम आणि रहीम हे दोघे बंधु असून रहीम वडील व राम धाकटा होता !! दुसऱ्या मताचे लोक असें ह्मणतात कीं, कान्होबा हा कृष्णाचा अवतार असून कान्होबा हें नांवही पण कृष्णाचेच आहे; कित्येक तर असें ह्मणतात कीं, कान्होबा आणि कृष्ण हे दोन्ही एकच ; कित्येक ह्मणतात कृष्णाचा सोबती जो पेंद्या तोच हा कान्होबा असावा; कारण त्यास कृष्णानें तू कलियुगात कान्होबा ह्या नांवाने प्रसिद्ध होशील ह्मणून वर दिला होता. कान्होबाचा उत्सव जन्माष्टमी व गोकुळष्टमी ह्या दिवशीं होतो. हें मोठें प्रखर दैवत आहे असें त्याचे भक्त सांगतात व वारें येतें त्या दिवशीं वारेकरी आपल्या आंगावर भल्या जाड सोडग्यांनीं मारून घेतात. कान्होबा बायांस मुलें देतो असेंही ऐकण्यांत येतें ! कान्होबाचे मठ बहुतेक सोनार, शिंपी, भंडारी वगैरे लोकांचे असतात. ब्राह्मण लोकांचे मठ कोठें पाहण्यांत येत नाहीत. जन्माष्टमीसारख्या पवित्र दिवशी मुसलमान फकीर बोलावून त्याजकडून बाळकृष्णाची पूजा करविणें हें मोठें लांछनास्पद होय.

**१०३. डेरे.–मुंबई** शहरांत मारवाडी, व श्रावक वाणी वगैरे लोकांचीं देवालये आहेत त्यांस डेरे ह्मणतात. हे डेरे नेहमीं खुले असतात. वल्लभपंथी मंदिरांप्रमाणें देवांचें दर्शन नियमीत वेळींच होतें असें नाहीं. देवाच्या मुख्य दरवाज्यावर पारसनाथाची मूर्ति असते. हे डेरे बांधण्याची तऱ्हा आमच्या देवळापेक्षां निराळी असते. प्रथमारंभी आंत शिरण्याबरोबर एका बाजूस त्यांचे जती बसण्याच्या जागा असतात, तेथें त्यांच्याजवळ मयूरपिच्छांचा कुंचा असतो. हे जती आपल्या तोंडात क्षुद्र प्राण्यांचा प्रवेश होऊ नये ह्मणून तें नेहमीं वस्त्राच्छादीत करीतात. तसेंच चालतांना देखील सूक्ष्म प्राण्यांची हिंसा घडू नये ह्मणून कुंचानें जमीन झाडून मग पुढें पाऊल टाकतात. 'अहिंसा परमो धर्मः' हे त्यांच्या धर्माचें मुख्य तत्व आहे. ह्या लोकांच्या डेऱ्यांचे तक्तपोशीस आरसे, भिंतीस आरसे, दरवाज्याला आरसे असे अनेक ठिकाणीं आबडधोबड आरसे बसवून त्यात पारसनाथ व इतर मूर्तींची चित्रें बसविलीं असतात. हे डेरे **मुंबईं**त एकंदर आठ नऊ आहेत. ह्यात **पायधुणी**वर असलेला डेरा सर्वांत मोठा. हा मोठा पाहण्यालायक आहे. मुख्य पारसनाथाची मूर्ति

पहिल्या मजल्यावर आहे, तेथें जाण्यास एक दगडी जिना लागतो तो चढून गेलें ह्मणजे प्रथमच एक भल्या लांब व रुंद अशा सहाणी दृष्टीस पडतात. सहाणेच्याच मानानें चंदनाचीं खोडेंही मोठमोठीं असतात. पारसनाथाच्या मूर्तीसमोर नेहमीं अगरबत्त्यांचा धूप चालू असतो. ह्या मूर्तीस घोरजीनाथ हें नांव आहे. मूर्तीचा पोशाग सर्व जडावाचा व मौल्यवान मखमाल, किनखापादि जरतारीचा असतो. ह्या पोषाखावर हिरे व माणकें बसविलीं असतात त्यामुळें दिव्याच्या उजेडानें ते फारच चमकतात. ते इतके कीं जणूं काय आकाशांत चांदण्याच चमकत आहेत असा भास उत्पन्न करितात. ह्या घोरजीनाथाची 'आंगी' दीड दोन लाखांची आहे ह्मणून सांगतात. एकंदर डेऱ्याचें भांडवल पंधरा वीसलक्षांचे आहे. आंगी ह्मणजे मूर्तीवर पोषाख चढविणें होय. ही आंगी चढविण्याची गम्मत पाहाण्याची संधि श्रावण महिन्यांत मारवाड्यांचे पजुसण येतात त्यावेळीं असते. ह्या सणाच्या दिवसांत ते लोक डेऱ्यांत मोठी रोषनाई करितात. प्रथम पुजारी उभा राहून ह्मणतो की, 'पन्नाशेटनी आंगी बे मण', इतक्यांत दुसरा येऊन ह्मणतो 'मारी चार मण' तिसरा ह्मणतो 'मारी आठ मण' ह्याप्रमाणें वाढत वाढत जाऊन पंचवीस तीस मणांपर्यंत धांव जाते. कधीं कधीं ह्याही पेक्षां ज्यास्त मण वाढत जातात. तो जास्त मण बोलेल त्याच्या नांवाची आंगी त्या दिवशीं मूर्तीवर चढवितात. मग ज्याच्या नांवाची आंगी चढली असेल त्याच्या जवळून तो जेवढे मण बोलला असेल तेवढे मण तुपाचे पैसे त्याजजवळून घेतात. प्रत्येक मण २।। रुपयांप्रमांणे धरला जातो. मग तूप १० रुपये अगर २० रुपये मण कां असेना. पण जो एकदां २।। रुपयांचा भाव बसविला आहे त्याच दरानें पैसे घ्यावयाचे. ह्या लोकांच्या भक्तीचा प्रकार हिंदूहून निराळा आहे. हे लोक डेऱ्यास रंग देतात तो तांबडा व पिंवळा असतो. **मुंबईं**तील सर्व मारवाड्यांचे दुकानांस ह्मणा, घरांस ह्मणा किंवा घरांतील पेट्यांस ह्मणा असाच रंग असावयाचा. हा असा रंग देण्याचे तऱ्हेस मारवाडी तऱ्हा ह्मणतात. हे लोक मूर्तीवर दररोज निरनिराळे पोषाख घालतात. एक दिवस मोत्यांचा, एक दिवस पाचूंचा, एक दिवस माणकांचा असा रोज निराळा पोषाग व रोज निराळे दागिने । मारवाडी व श्रावक लोक श्रावण महिन्यांत उपोषण

करितात. कित्येक लोक त्यांस पैसे देऊन त्यांची उपोषणें विकत घेतात. हे लोक धार्मिक असल्याकारणानें धर्माकडेस फार पैसा खर्च करितात.

१०४. **रावळें.**–**कामाठी**पुऱ्यांत कामाठ्यांचीं रावळें आहेत. ह्या देवळांत बहुतेक विठोबा व मारुती हीं दैवतें असतात. ह्या देवांशिवाय त्यांच्यामध्यें जाखाई, जोखाई, पुतळाई, एल्लमा अशा अनेक देवी आहेत ! हे लोक **मद्रास** इलाख्यांतून सुमारें शें दीडशें वर्षांपूर्वी येथें आले असावे व तेव्हांपासून त्यांनीं हीं रावळे बांधिलीं असावींत. ह्या रावळांपैकीं एक दोन रावळें फार चांगलीं आहेत. कामाठी लोक फार उद्योगी आहेत. ह्यांच्या स्त्रियांही कांहीं बसून खात नाहींत. कोणी विड्या करतात आणि कोणी मजूरी करतात असे अनेक धंदे करून त्या आपलें पोट आपल्या नवऱ्यांवर पडूं देत नाहींत. ह्यांच्यांत बरेच लोक आज सधन झाले आहेत.

१०५. **आर्यसमाज.**–हा समाज इ.स. १८७५ सालीं एप्रिल महिन्याचे ५ वे तारखेस श्रीमत् स्वामी **दयानंदसरस्वती** ह्यांनीं स्थापिला. ह्या समाजाचा मुख्य उद्देश वेदांचे तत्व लोकांस कळून त्यांनी प्राचीन आर्यांच्या रितीभाती प्रचारांत आणून त्याप्रमाणें चालावें हा आहे. ह्या समाजाचे अनुयायी पुराणास मान देत नाहींत. आणि मूर्तीसही मानीत नाहींत. ह्या समाजाच्या मंदिराचें काम चाललें आहे. हें गिरगांव पोलिस कोर्टामागें आहे. येथें दर रविवारीं ईश्वरोपासना होऊन एकाद्या विषयावर व्याख्यान होतें. ह्याचा वार्षिकोत्सव चैत्र शु. १ देस होतो. इ.स. १८८५ त ११ नवेंबर रोजीं ह्या समाजास कै. स्वामी **दयानंदसरस्वती** ह्यांच्या स्मरणार्थ "दयानंदपुस्तकालय" जोडलें आहे.

१०६. **प्रार्थनासमाजमंदीर.**–हें मंदीर इ.स. १८६७ सालीं स्थापन झालें. ह्या समाजाचा मुख्य उद्देश हा आहे कीं, ईश्वर एक असून निराकार आहे. मनुष्यानें त्याचीच भक्ति करावी. इतर देवदेवतांस हे समाजिस्त मानीत नाहींत इतकेंच नव्हे; तर, ईश्वरप्रणीत किंवा ईश्वरदत्त असे कोणतेंच धर्मपुस्तक ते कबूल करीत नाहींत. समाजिस्त उपासनेकरितां प्रत्येक रविवारीं सायंकाळीं एकत्र जमतात. ह्या समाजाचा वार्षिक उत्सव एक आठवडा चालतो त्या वेळीं व्याख्यान, हरिकीर्तन व पुराण हीं होत असतात. मंदिराची बांधणी इंग्रजी धर्तीवर असून त्याचा

बाह्य देखावाही कांहींसा इंग्रजी तऱ्हेचा दिसतो. खालीं मोठें हॉल असून आंत व्यासपीठ आहे. व्याख्यानेंही त्या पीठावरूनच देतात. वर ग्यालरी आहे तेथें दुतर्फा लोक बसण्यास जागा आहे. एकंदरींत ह्या मंदिराचा आंतील देखावा मोठा चित्तवेधक आहे । या समाजाविषयीं ही एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, बहुतेक हिंदुधर्मानुयायी लोकांनीं हें मंदीर बांधण्याच्या कामीं वर्गणी भरली आहे. केवळ तत्पंथानुयायांनींच भरली आहे असें नाही. ह्या मंदिराला लागूनच एक मुखशाळा आहे तींत प्रत्येक बुधवारीं व्याख्यान होत असतें.

१०७. **क्याथीड्रल.**–सुमारे १७० वर्षांमागें ह्मणजे इ.स. १७१८ त सेंट थामसचर्च ह्मणजे ज्यास हल्लीं क्याथीड्रल हम्णतात तें त्या वर्षाच्या [1]ख्रिस्तमसच्या दिवशीं उघडलें. ह्यापूर्वी पुष्कळ वर्षेपर्यंत जे इंग्रज लोक **मुंबईस** येत ते किल्ल्यांत एक खोली होती तिला देऊळ समजून प्रार्थना करण्यास जात असत. ह्यापूर्वी ह्मणजे इ.स. १६६५ सालीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्स ह्यांनीं एक सुंदर सोईवार चर्च (पाद्री लोकांचे देऊळ) बांधण्याविषयी सूचना केली होती व त्या चर्चमध्ये केवळ युरोपिअन लोकांसच घेण्याचा विचार नसून एतद्देशीयांपैकीं जे कोणी ख्रिस्ती होतील त्यांसही आंत घेण्याचा विचार होता. ह्या सूचनेवरून सर **जॉर्ज आक्झेंडन**, लोकल कौन्सिलचे प्रेसिडेंट ह्यांनीं आपले वजन खर्चून ५०,००० रुपयांवर रक्कम जमवून ह्या चर्चमध्यें १,००० हजार मनुष्यें बसतील एवढें मोठें देवालय बांधावें असें ठरवून हल्लीं हें ज्या जाग्यावर आहे त्याच जाग्यावर हें बांधण्याचें काम सुरु केलें. परंतु भिंतींचें काम थोडें बहुत चाललें आहे इतक्यांतच तें बंद पडलें. **ह्यामिल्टन** साहेब असें ह्मणतो कीं, सन १६८० मध्यें **जॉन चाईल्ड** यानें त्या कामाचे प्रेसिडेंटच्या कामाचा चार्ज घेऊन शिल्लक राहिलेला पैसा आपल्या घशांत उतरविला. परंतु इ.स. १७१४ सालीं रेवरेंड **रिचर्ड कॉब** नांवाचा गृहस्थ ह्या वेळीं मुंबईचा चापलेन होता, त्याने हें काम आपल्या हातीं घेतलें व त्याच्या प्रयत्नास त्यावेळचे **मुंबईचे** गव्हर्नर ऑनरेबल **डब्ल्यू एलाबी** व इतर युरोपिअन रहिवाशी

---

१. येशू ख्रिस्ताचा जन्म दिवस. ह्यास आपले लोक 'नाताळ' असें ह्मणतात. ह्या शब्दाची व्युत्पत्ती कांहीं कळत नाहीं ! मुख्य दिवस दिसेंबर महिन्याची २५ तारिख हा होय. पण हा सण ८ दिवसपर्यंत पाळिला जातो.

ह्यांनी आस्थापूर्वक मदत केली. त्यांनीं ४०,००० रुपयांवर ह्या कामासाठी रक्कम जमा केली व ईस्ट इंडिया कंपनीने ह्या कामासाठीं १०,००० रुपये बक्षीस दिलें. ह्याप्रमाणें पैसा जमल्यावर इ.स. १७१५ त नवेंबर महिन्याचे १८ वे तारखेस ह्या क्याथीड्रलचे पायाचा दगड डेप्युटी गव्हर्नर **स्टिफन स्ट्रट**[1] ह्यांनीं पूर्वीच्या मोडक्या चर्चच्या जागीं बसविला. हे चर्चचें काम एकसारखें ३ वर्षेपर्यंत चाललें होतें व वर ह्मटल्याप्रमाणें इ.स. १७१८ सालीं नाताळच्या सणांत उघडलें. त्यावेळीं गव्हर्नर साहेबांनीं सर्व खिस्ती लोकांस बडा खाना दिला; व तोफांस सरबत्ती दिली. त्या वेळेपासून ह्या चर्चची दागदुजी व इतर खर्च चालावा ह्मणून बंदरांत येणाऱ्या मालावर शेंकडा अर्धा टक्काप्रमाणें कर बसविला. ह्या देवळास **सेंट थॉमस चर्च** ह्मणण्याचें कारण असें आहे कीं, **युरोप** खंडातून **सेंट थॉमस** ह्याने पहिल्यानेंच **हिंदुस्थानांत** गॉस्पेल (धर्म पुस्तक) आणिलें ह्मणून त्यांचेंच नांव ह्या देवळास दिलें. ह्या चर्चवरील घुमट मोडून हल्लीं जो मनोरा बांधला आहे तो इ.स. १८३८ सालीं १६,००० रुपये खर्चून बांधला. त्याच्यावर असणाऱ्या घड्याळाची किंमत ५०० गिनी आहे. ह्यांत तास, अर्धा तास, पाव तास अशीं वाजतात. चमत्कार हा आहे कीं ह्या कामाकरितां पुष्कळ हिंदु लोकांनीं वर्गणी दिली आहे असें कळतें. इ.स. १८६५ सालीं ह्यांत बराच फेरफार करण्यांत आला. ह्यांत जो बाजा आहे त्यास १५,००० रुपये खर्च झाला आहे. इ.स. १८१९ सालापासून ह्या चर्चास घंटा आहे ती गव्हर्नर मि. **बून** ह्यांनीं दिली व तिजवर त्यांचे नांव व शक लिहिला आहे. ह्या चर्चच्या समोर जें कारंजे आहे तें बांधण्याकरितां सर **कावसजी जहांगीर** ह्यांनीं सात हजार रुपये खर्च केला आहे. ह्या देवळाच्या बाहेरील खुल्या जाग्यांत मोठमोठे प्रसिद्ध पुरुष पुरले आहेत. हें चर्च **मुंबई**त सर्व चर्चांमध्ये मोठें असून ह्यांत नेहमीं प्रार्थना होत असते. आंत बसणारांस उष्णतेपासून त्रास पोहचूं नये ह्मणून पंखे लावले आहेत. देवळाच्या आंत भिंतींत मोठमोठी चित्रें कोरलीं आहेत. ह्या व इतर देवळांत साहेब लोकांची लग्नें होतात व तीं पाद्री लावतो; व बाप्तिस्मा

---

[1] ह्या चर्चच्या पायाचा दगड **रामाजी कामत** नांवाच्या गृहस्थानें बसविला आहे असें 'राऊंट अबाऊट बांबे' ह्या पुस्तकावरून समजतें.

देणें तोही देवळांतच होतो. ख्रिस्ती लोकांत मूल समजुतींत आलें म्हणजे बाप्तिस्मा देत असतात. बाप्तिस्मा देणें म्हणजे ख्रिस्ती शास्त्राचा संस्कार करणे होय.

**१०८. सेंट अंड्रयुज कर्क (सेंट अंड्रयूचें देऊळ)**.–हें प्रेसबिटिरिअन मताचें देऊळ इ.स. १८१६ त बांधण्यास सुरवात केली. हे बांधण्याकरितां सरकारानें ५०,००० रुपये दिले होते. हें चर्च इ.स. १८१८ त बांधून तयार झालें. इ.स. १८२६ त ह्या देवळाचें शिखर विजेच्या तडाक्यांत सांपडून पडलें. हल्लींचें शिखर **जॉन क्यालिकाट**, एफ.आर.एस्. यांनीं बांधिलें आहे. इ.स. १८२५ त मिस्तर **क्लो** ह्या गृहस्थाच्या शिफारशीवरून ह्या देवळांत एक लहानसा बाजा आणून ठेविला होता; परंतु त्याच्या जागीं हल्लीं त्याच्यापेक्षां मोठा आणून ठेविला आहे. इ.स. १८३३ पर्यंत ह्या देवळांत आदितवारीं एकदांच प्रार्थना होत असे. पण तेव्हांपासून सांजसकाळ होऊं लागली.

**१०९. सेंट जॉन चर्च**.–इ.स. १८४७ त सर **जॉर्ज क्लॉर्क, मुंबईचे** माजी गव्हर्नर, ह्यांनीं ह्या इमारतीच्या पायाचा दगड त्याच वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या ४थ्या तारखेस बसविला. इंग्रज सैन्यांतील जे लोक **अफ्गाणिस्थानां**तील लढाईमध्यें पडले गेले त्यांच्या स्मारकाकरितां हें चर्च बांधण्यांत आलें आहे. हें चर्च बांधण्याची कल्पना रेवरेंड जी. **पिगट** ह्यांनीं काढली; परंतु हें चर्च पुरें होण्याच्या अगोदरच ते निवर्तले. इ.स. १८५८ सालीं ह्यांची प्रासादप्रतिष्ठा झाली, त्या वेळीं भट्टाचार्य बिशप **हार्डिंग** हे होते. ह्यावेळी सर्व चर्च पुरे झालें नव्हतें. ह्याचा खर्च एकंदर १,२७,००० रुपये झाला, पैकी सरकारानें ६८,६४४ रुपये दिले होते. घुमटाला ५६,५०० रुपये खर्च लागला आहे. सर्व चर्च इ.स. १८६५ सालीं बांधून पुरें झालें. रेवरेंड डब्ल्यू **मोल** ह्यांनीं मोठी मेहनत करून घुमट बांधण्याकरितां वर्गणी गोळा केली. सर **कावसजी जहांगीर** ह्यांनीं ७,५०० रुपये ह्या टॉवरवर घड्याळ बसविण्याकरितां दिले होते ते त्यांच्या मंजूरीने घुमटाच्या कामीं लावले. ह्या चर्चची बांधणी इंग्रजी तऱ्हेची आहे. पाद्रीची बसण्याची जागा ५० फूट लांब असून २७ फूट रुंद आहे. टॉवर व घुमट १९८ फूट उंच आहे. ह्यांत मोठ्या खिडकीमध्यें ख्रिस्ती लोकांतील पुरातन साधुसंत ह्यांचीं चित्रें काढलीं आहेत.

जुन्या करारांतील गोष्टींचीं जागोजाग दाखविलीं आहेत. ह्या चर्चवर लेख आहे तो येणेंप्रमाणें :—

"This church was built in memory of the officers, whose names are written above, and of the non-commissioned officers and private soldiers, too many to be so recorded, who fell, mindful of their duty, by sickness, or by the sword, in the campaigns of Scinde and Afghanistan, A.D. 1838-43."

एकंदरींत ह्या चर्चचें कारागिरीचें काम वगैरे उत्तम आहे एवढेंच नाहीं तर, **हिंदुस्थानांतील** सर्व चर्चमध्ये हें उत्तमांपैकीं मानलें आहे.

११०. **होली ट्रिनिटी चर्च.**–हें धोबीतळ्याजवळ नव्या **सोनापुर**गल्लींत आहे. ह्या चर्चचा एकंदर खर्च १३,००० रुपये ऑनरेबल **जेम्स फ्यारिश** माजी अक्टिंग गव्हर्नर, ह्यांनीं केला व इ.स. १८४० त उघडून प्रासादप्रतिष्ठा सन १८४२ त झाली. त्यांत अडीचशें मनुष्यें बसतील एवढी जागा आहे. ह्या मध्येंच इ.स. १८३८ सालीं स्थापन झालेली इंडो ब्रिटीश इंस्टिट्यूशनची शाळा आहे.

१११. **खाईस्टचर्च.**–हें भायखळ्यावर भायखळा एज्युकेशन सोसायटीच्या शाळेजवळ आहे. इ.स. १७१८-१९ सालपर्यंत सेंट थॉमस चर्चच्या संबंधानें प्राटेस्टंट मुलांकरितां च्यारिटी स्कूल ह्मणून किल्ल्यांत एक शाळा होती; परंतु इ.स. १८२५ सालीं सरकारच्या हुकमावरून ती शाळा हल्लींच्या इमारतींत भायखळ्यावर आणली. ह्या चर्चास एकंदर १,७१,२८८ रुपये लागले. इ.स.१८३१ सालीं ह्या शाळेच्या आसपास एक चर्च बांधण्याचा उद्योग सुरू झाला. ह्या कृत्यास सरकारानें १०,००० रुपये दिले व दुसरे दहा हजार रुपये एज्युकेशन सोसायटीनें वर्गणी गोळा करून जमविले. ह्या चर्चास जे हल्लीं लोखंडी खांब आहेत ते पूर्वी टौन हॉलाकरितां आणले होते. ह्या चर्चमध्यें ५०० मनुष्यें बसण्याची जागा आहे.

११२. **सेंट पिटर्स्‌चर्च.**–हें चर्च माजगांव येथें असून इ. स. १८५९ सालीं उघडलें. ह्या कृत्यास मि. **शेफर्ड** नामक गृहस्थानें आपल्या मरणसमयीं बरीच रक्कम दिली. तसेंच त्यानें शेफर्डस आम्‌ हौसनामक धर्मशाळा ही आपल्या खर्चानें बांधली. ही **भायखळ्या**वर तुरुंगाच्या

समोर आहे. ह्यांत विधवा, पोरकी मुलें व आंधळे ह्यांस आश्रय मिळतो. ह्या चर्चमध्यें २५० मनुष्यें बसण्याची सोई केली आहे.

**११३.** ह्या देवळांशिवाय रोमन क्याथलिक लोकांची देवळें आहेत त्यांस इगर्जा ह्मणतात. ह्या शिवाय जागोजाग त्या लोकांचे खुरूस आहेत. ते चुने गच्ची चौथऱ्यावर उभे केलेले असतात. प्रत्येक खुरसावर I.N.R.I अशीं अक्षरें असतात. खुरूस हा शब्द इंग्रजी cross (क्रॉस) ह्या शब्दाचा मराठींत अपभ्रंश झाला आहे. हे खुरूस पोर्टुगीज लोकांचा अंमल होता त्यावेळीं स्थापलेले असावे असें वाटतें. कित्येकांचा जीर्णोद्धार केला आहे. किरिस्तांव लोक ह्या खुरुसासमोर खुरमांड्या घालून हात जोडून प्रार्थना करितात. हे खुरूस पोर्टुगीज लोकांचीं दैवतें असून त्यांच्या कारकीर्दीच्या खुणा आहेत. मरीन पलटणीजवळ जो खुरूस आहे तो सर्वांत मोठा आहे. त्यास पुष्कळ किरिस्तांव भजतात. त्यासमोर खुरमांड्या घालून प्रार्थना करितात. संध्याकाळीं तर बरेच किरिस्तांव प्रार्थना करितांना दृष्टीस पडतात. ह्या खुरसास कित्येक नवस घेतात व तो नवसास पावतो असेंही ऐकिवांत आहे. हा खुरूस जें जें कोणी मागेल तें तें त्यांस देतो असें सांगतात ! ह्या खुरसाजवळ नेहमीं पणत्या लावतात. ह्या खुरसास हिंदु व पारशी लोकही भजतात व नवस घेतात असें ऐकण्यांत येतें ! पोर्टुगीज लोकांच्या देवळांत भुलेश्वराच्या पाठीमागच्या रस्त्यावर "नोसासिंयोरा डी एस्पिरांस" ह्मणून जी इगर्ज आहे ती सर्वांत मोठी आहे. हिच्या आसपास पुष्कळ जागा आहे. देवळांत पुष्कळ सामान असून त्यांच्या साधूच्या मूर्ति आहेत. रोमनक्याथलिक लोक मूर्तीची पूजा करितात. हें देऊळ पूर्वी कांपाच्या मैदानांत जेथें मोठा खुरूस आहे त्याच्या जवळ होतें. ह्याचा जीर्णोद्धार इ.स. १८३३ त झाला. प्रार्थनेच्या वेळीं सर्वांस बोलावण्याची घंटा असते ती वाजविली ह्मणजे सर्व जमतात. **माजगांवास** असेंच देऊळ फार पुरातन आहे. हें कोळी लोकांनीं बांधलें आहे असें ऐकिवांत आहे. सकाळच्या प्रहरीं व त्यांत विशेषेंकरून रविवारीं सकाळीं व संध्याकाळीं किरिस्तांव व किरिस्ताविणी डोकीवरून पांढरा कपडा घेऊन व कित्येक तर मडमांसारखा पोषाख करून प्रार्थनेला देवळांत जातांना दृष्टीस पडतात. ह्या लोकांचें धर्मपुस्तक बायबल आहे.

**११४. मशिदी.**—मुसलमान लोकांच्या मशिदी **कुलाब्या**पासून तों

**माहिमा**पर्यंत एकंदर ८९ आहेत. ह्यांपैकी बहुतकरून **सुनी** पंथाचे मुसलमानांच्याच फार आहेत. पैकीं बोहोऱ्यांच्या आठ, खोज्यांच्या दोन आणि मोंगलांची एक अशा आहेत; शिवाय पिरांच्या कबरी व पंजे पुजण्याचीं ठिकाणें शें पन्नास आहेत. मशिदी व पंजे पुजण्यांची ठिकाणें बहुतकरून **पायधुणी**पासून तों थेट **कांपा**च्या मैदानापर्यंत ज्या ज्या ठिकाणीं मुसलमान लोकांची वस्ती आहे त्या त्या ठिकाणीं आहेत. ह्यांच्या मशिदीजवळ तळें असायचेंच. मशिदींत निमाजाकरतां जाणारानें प्रथमतः तळ्यांत पाय धुवून चूळ भरून नंतर आंत गेलें पाहिजे. आंत गेल्यावर पश्चिमबाजूला तोंड करून अल्लाची प्रार्थना मुखानें ह्मणून कानाडोळ्यांला हात लावून पुढें एक किबला पसरून गुडधे टेंकून जमिनीला नाक घांसून पुनः उभें राहून पुनः पहिल्याप्रमाणेंच करून अल्लाची प्रार्थना करितात. ह्यांच्या मशिदींत सर्वांस जाण्याची परवानगी असते. **मक्केंत ममदा**चा जन्म झाला हें पश्चिमेकडे तोंडकरून प्रार्थना करण्याचें कारण सांगतात. ह्यांच्या मशिदीची रचना ह्मटली ह्मणजे चार बाजूला चार लहान घुमटें दाखवून मध्यें मुख्य व उंच घुमट, त्या घुमटावर मत्स्याकृति चिन्ह अशी असते. ह्या लोकांत मोहरमचा सण मोठा असतो. मोहरम हें त्यांच्या महिन्याचें नांव आहे. ह्या महिन्यांत हसन व हुसन ह्यांच्या स्मरणार्थ ताबूत किंवा डोले काढितात व एकसारखे नऊ दिवसपर्यंत ताबुतांपुढें ऊद जाळतात. नववे दिवसाची रात्र ह्मणजे कत्तलची रात्र होय. रात्रीं ताबुतें मिरविण्यासाठीं बाहेर काढितात. व तीं एकदां बाहेर पडलीं ह्मणजे दंग्याला जी सुरवात होते ती पुसतां सोईच नाहीं. हे डोल्याचे दिवस आले ह्मणजे **मुंबईचें** पोलीस जर्जर होऊन जातें । नंतर दहाव्या दिवशीं तीं **भेंडी** बाजारांत एकत्र जमवून समुद्रांत थंड करण्याकरितां नेतात. हे डोले मोठमोठ्या किंमतीचे असून कित्येक पऱ्या, पेहलवान, हंस, हत्ती, उंट वगैरे नानातऱ्हेच्या चित्रांवर बसविले असतात. डोल्यांचें कामही मोठें पाहण्यासारखें असतें. मुसलमान, हिंदु वगैरे हातांत नाडे बांधून फकीरी मागत फिरतात. ह्या सणांत फारच बीभत्स सोंगे दृष्टीस पडतात. **मुंबईं**त दरसाल सुमारें लहान मोठीं मिळून दोनशें-सव्वा दोनशें ताबुतें व पंजे हजार-बाराशें होतात. हीं ताबुतें करायचीं ह्मणजे त्यांस प्रथम सरकारची परवानगी मिळवून दंगाधोपा न होण्याबद्दल जामीन द्यावा लागतो.

**११५.** पूर्वी कत्तलच्या रात्रीस मोंगल लोकांचा घोडा निघत असे. हे लोक ताबूत करीत नाहींत. ह्या घोड्याच्या सर्वांगाला नागव्या तरवारी बांधीत. हा घोडा सर्व शहरभर फिरे. एकदां का हा घोडा व ताबूत हीं समोरासमोर आलीं कीं रक्तस्राव व्हावयाचाच. असें वेळोवेळीं होऊं लागल्या कारणांनें सरकारनें हा घोडा काढण्याची मनाई केली आहे. ह्मणून मोंगल लोक त्यास त्यांच्या मशिदीच्या वाड्यांतच फिरवितात.

**११६.** मुसलमान लोकांच्या मशिदींपैकीं मुख्य जुमामशिद होय, जुमा ह्मणजे शुक्रवार–हा त्यांचा पवित्र दिवस आहे. ही मशिद पूर्वी कांपाच्या मैदानात होती; परंतु, तेथून हल्लीं जुन्या कापडबाजारानजीक मोठ्या तळ्याच्या कांठीं बांधली आहे, ही फार पुरातन असून इ.स. १८३६ सालीं माजी **महंमदअल्ली रोगे** (हल्लींचे **महंमदअल्ली रोगे** ह्यांचे आजे) ह्यांनीं एक लाख रुपये खर्चून बांधली आहे. ह्या जुमामशिदीच्या इस्टेटीपासून सालीना ३०,००० रुपये उत्पन्न होतें. ह्या मशिदीची व्यवस्था पाहण्याचें काम सरकाच्या मंजुरीनें १२ इसमांकडे सोंपविलें आहे. त्यांस मुशाबिर ह्मणतात. ह्या बारा असामींत काजी व नाझर हे असतात. ह्या मशिदींत एक मुख्य धर्मगुरु असतो. ह्यांचें काम जुम्याच्या दिवशीं ह्मणजे शुक्रवारीं व वर्षांतून मुख्य दोन इदी ह्या दिवशी कलमा पढण्याचें आहे. एक मुल्ला नेहमींचा निमाज पढण्याकरितां असतो. एक बांगी असतो त्याचें काम बांग पुकारण्याचें असतें व कांहीं नोकर असतात.

**११७.** ह्या मशिदींत सर्वांस पाहण्याकरितां जाण्याची बहुधा मोकळीक असते परंतु, आंत जाण्यापूर्वी सर्वांनीं आपले जोडे बाहेर काढून ठेवावे असा साधारण नियम आहे. १२ पासून तों एक वाजेपर्यंत निमाज पढण्याची वेळ असते. ह्या मशिदीच्या संबंधानें एक शाळा आहे तींत आरबी, फारशी व उर्दू भाषा शिकविल्या जातात. हिचा खर्च **महंमदअल्ली रोगे** ह्यांनीं ह्याच कामाकरितां निराळे तोडून दिलेल्या पैशांतून करितात.

**११८. सातताड मशिद.**–ही मशिदबंदराजवळ आहे. हिचें सालीना ११,००० रुपयांचे उत्पन्न आहे. हिची व्यवस्था पाहण्याकरितां चार व्यवस्थापक आहेत.

**११९. जकरिया मशिद.**–ही मांडवीजवळ खडकावर आहे, हिचें उत्पन्न सालीना ५,००० रुपये होतें.

**१२०. हाजी इस्मायल हबीबची मशिद**.-ही मशिद सदर्हु नांवाच्या गृहस्थानें बांधिली असल्यामुळें तिला हेंच नांव चालू झालें. ही मशिद मेमणवाड्यांत आहे. हिचें सालीना उत्पन्न साडेचारहजार रुपये आहे.

**१२१. मोंगल मशिद**.—ही मशिद **हाजी महंमदहुसेन शिराजी** ह्यांनीं बांधली असून तुरुंगाच्या रस्त्यावरून बाबूला तळ्यावर आहे. हिचें काम फारच सुरेख असून दरवाज्याचें काम तर चित्तवेधक आहे.

१२२. येणेंप्रमाणें मुंबईतील मुख्य मशिदींचे थोडक्यांत वर्णन झालें; परंतु मुसलमान लोकांची जेथें वस्ती आहे तेथें प्रत्येक गल्लींत एक तरी मशिद असावयाचीच. अशा मशिदीची व्यवस्था चालण्याकरितां प्रत्येक मुसलमानास सालीना एक रुपया द्यावा लागतो असें ऐकतों. ज्या मशिदीचें उत्पन्न फारच कमी असतें तेथील इमामाकरितां व इतर मनुष्यांकरितां दिवसांतून दोनदां लोकांकडून शिजविलेलें अन्न मागतात. रमझान इदीच्या दिवशीं मशिदीच्या इमामास लोक पैसे व कपडे देतात.

**१२३. मामाहजानी.–वरळीच्या** बांधाच्या शेवटीं पश्चिमेस जी एक लहान टेंकडी आहे तिच्या नजीकच्या शें-दोनशें हात जमिनीस **मामाहजानी** असें ह्मणतात. हें दैवत नवसास पावतें असा भोळे लोकांचा समज आहे. ह्या पिराची प्रख्याति होण्याचें व ह्या स्थळास मामाहजानी ह्मणण्याचें कारण असें सांगतात कीं, पूर्वी येथें **हाजी अल्ली** ऊर्फ **मामा** नामक एक सधन मुसलमान राहत होता. त्यास एक बहिण होती. हीं बहिणभावंडे मोठीं देवभक्त असून एकमेकांवर प्रीति करणारी होती. त्यांनीं आपली सर्व संपत्ति गरीब लोंकांस खैरात करून तीं उभयतां मक्केस गेलीं. पुढें 'हज' करून आल्यावर हाजीअल्ली हा फकीर बनून सदर्हु ठिकाणी राहिला. बहिणीसही ह्याप्रमाणें उपदेश केला. जो पुरुष **मक्केची** यात्रा करून येतो त्यास हाजी ह्मणतात व जी स्त्री मक्केत जाऊन येते तिला हाजीआनी ह्मणतात. हाजीआनी ह्या शब्दाचा अपभ्रंश हजानी असा होऊन "मामा हजानी" हा शब्द प्रचारांत आला. नंतर कांहीं काळानें हीं भावंडें निवर्तलीं. पुढें त्यांचे आज्ञेवरून मामाची कबर समुद्रांत व हाजीआनीची खडकावर अशा कबरी बांधल्या गेल्या. येथें साक्षात्कार होतो ह्मणून सांगतात ! ह्या साक्षात्काराविषयीं आणखी असें ऐकण्यांत येतें कीं, समुद्रास कितीही भरती आली तरी त्याचें पाणी

कधींही कबरीस स्पर्श करीत नाहीं; कबरीच्या पायथ्याशीं आलें ह्मणजे कमी पडतें ! हीं दोघें बहीण भावंडे येथें केव्हां येऊन राहिलीं ह्याविषयीं कांहीच खात्रीलायक माहिती मिळत नाहीं. ह्या बावाच्या नांवानें मुंबईंत बरेचभिकारी भिक्षा मागत फिरतात. या कबरीजवळचें पाणी गोड आहे असेंही ह्मणतात ! माहिमास मखदुमबावा व त्याची आई ह्या दोघांच्या एकमेकांशेजारीं कबरी आहेत. ह्याचा उरूस भरतो तो आठ दिवस चालतो. ह्यासच माहिमचा उरूस ह्मणतात. ह्या वेळी तेथे लोकांची मनस्वी गर्दी होते. काही वर्षांमागे **माहिमास** एक मुसलमान राहत असे. त्यास **मखदुम** या नावाचा एक मुलगा होता. त्याचा बाप लहानपणीच मरण पावल्यामुळे त्याची आई जिकडून तिकडून आपला व आपल्या मुलाचा उदरनिर्वाह करी. एके दिवशी मध्यरात्रीच्या सुमारास त्याची आई निद्रावश असता तिने मखदुमा मला पाणी पाज ह्मणून हांक मारिली, ती ऐकतांच तो पाणी घेऊन आईच्या उशागती जाऊन उभा राहिला. पण ती निद्रिस्त होती. ती सकाळी जागी झाली आणि पाहते तो आपला मुलगा पाणी घेऊन उभा आहे ! ही त्याची मातृभक्ति पाहून आई गहिवरली. ही मायलेकरें ईश्वरभक्तिपरायण असल्यामुळें **मखदुमाची** मोठी प्रख्याती झाली. **मखदुम** रोज मक्केस जात असे येवढेंच नव्हे; तर तो अनेक लोकोत्तर चमत्कारही करीत असे ह्मणून ऐकण्यांत येतें ! हा मखदुमबावा केव्हां होऊन गेला ह्याची मुळींच माहिती मिळत नाहीं. ह्याचे नाव **फकिरअल्ली मखदुम** साहेब हे होते. हपसाणांतील हपशी हल्लीं सुद्धां उरसाचे दिवशीं यास वस्त्रे पाठवितो व पूर्वी स्वतः येत असे, असें ऐकण्यांत आहे.

**१२४. फायर टेम्पल्स्** (अग्यारी).— **मुंबईम**ध्यें पारशी लोकाच्या अग्यारी सुमारे ३३ वर आहेत. ह्याशिवाय बडेबडे लोकांच्या घराण्यात ज्या नऊ अग्यारी आहेत त्या खेरीजच. ह्यांत आदरयान, आतस बेहराम, अग्यारी आणि आतस दडगा असे प्रकार आहेत. अग्यारी ह्मणजे अग्निस्थान, आदर्यान हे साधारण अग्निस्थान असून त्यात ५०-६० प्रकारच्या अग्निची संस्कारपूर्वक स्थापना केलेली असते. आतस बेहराममध्यें १,००१ प्रकारच्या अग्नींची स्थापना करितात. मुंबईंत प्रथमतः इ.स. १७८० त दादी शेट नावाच्या पारशी गृहस्थानें आतस बेहरामची

स्थापना केली. ही अग्यारी नवेवाडीजनजीक आहे. येथें अग्यारी आहे ह्मणून त्या रस्त्यास अग्यारीचा रस्ता ह्मणतात.

**१२५**. अग्यारीच्या तीन प्रती आहेत. पहिली चरनीरोडवर **करेल** वाडीत असलेली इ.स. १८४४ त स्थापिलेली **कावसजी बैरामजी बनाजी** ह्याची, दुसरी ब्रिच क्यांडीरोड येथें धोबीतळ्यावर इ.स. १८३० त २५,००० रुपये खर्चून बांधिलेली **हारमसजी बमनजी** वाडिया ह्यांची, आणि तिसरी फणसवाडीजवळ असलेली **दादी नसरवानजी शेट** ह्यांची. ही फार पुरातन आहे. दुसऱ्या प्रतीच्या अग्यारी सर्व शहरभर ३१ आहेत; पैकीं दोन-एक **बनाजी लिमजीची** व दुसरी **माणकजी नवरोजी सेटना** ह्यांची. ह्या दोन्ही किल्यांत असून सुमारे २०० वर्षापूर्वीच्या आहेत असें सांगतात. पारशी लोक स्वजातीयांशिवाय इतरास अग्यारीत जाऊं देत नाहींत. प्रत्येक अग्यारीत अग्निस्थानाची जागा सुमारें १४ फूट औरस चौरस असते. प्रत्येक अग्यारीवर एक अंधारु असतो. ह्याचें काम धर्मपुस्तक पढण्याचें असून अग्नीस नेहमीं चंदनादि द्रव्यानें प्रज्वलित ठेवण्याचें असतें. पारशी लोक सूर्य, चंद्र, तारे व समुद्र ह्यांची पूजा करितात,गाईसही भजतात व गोमूत्र पवित्र समजतात. समुद्रावर जाऊन त्यांतील पाण्याचें वंदन करून हातात धर्मपुस्तक घेऊन वाचीत असलेले पुष्कळ पारशी दृष्टीस पडतात. द्वितीयेचा चंद्र पाहण्याकरितां पारशिणी व पारशी ह्यांची समुद्रावर गर्दी दृष्टीस पडते. पारशीलोक आपले धर्म पुस्तक वाचीत असतां, व कस्ती करित असतां कोणास शिवत नाहींत किवा कोणास शिवूंही देत नाहींत. किंवा कोणाबरोबर बोलत नाहीत. अंधारु लोक नेहमीं पांढऱ्या पोषाखानें व पागोट्यांनीं असतात. त्यांचा धर्म झोराट्रियन आहे. इ.स. १८६२ सालीं पारशी लोकांनीं असा ठराव केला आहे कीं, त्यांच्या शास्त्राप्रमाणें अंधारु व दस्तूर ह्यांचें काम चालविण्यास त्यांचें शास्त्र पढून निपुण झालेल्यासच धर्मकृत्य चालविण्याचा अधिकार द्यावा, शास्त्र पढविण्यासाठीं एक शाळा घालावी आणि तींत मुलें शिकून हुशार झाल्यानंतर त्यास दस्तुरची दीक्षा द्यावी, ह्या कृत्यास सर **जमशेटजी जीजीभाई** ह्यांच्या पत्नीनें ३७,००० रुपये दिले आहेत.

**१२६. सिनेगॉग.** (यहुद्यांचे देऊळ)-- बेनी इस्त्रायल लोकांच्या दोन व यहुदी लोकांची एक अशा तीन सिनेगाग **मुंबईत** आहेत. ह्यांच्या सिनेगागात मूर्ति नसतात. मूर्तिपूजनाचा यांच्या शास्त्रात फार निषेध आहे. मशिदींत पुरातन यहुदी भाषेत लिहिलेले धर्मशास्त्र आहे. तें प्रत्येक शनवारी जमात भरते त्या वेळीं वाचतात. व देवाची प्रार्थना करितात. दर शनवारी हे मंडळीगृहात जमतात. शनवार हा त्यांचा साबाथ (विश्रामवार) आहे. ह्या दिवशी ईश्वर प्रार्थनेशिवाय दुसरें काम करु नये असें त्यांचें शास्त्र आहे. ह्या लोकांच्या देवळास सिनेगाग ह्मणतात.

**१२७.** ह्या लोकांची पुरातन मशिद **मांडवी**वर इस्त्रायल मोहल्यात आहे. ही इ.स. १७९६ त मयत **अजम सामाजी हासाजी दिवेकर** ह्यानें बांधिली. ही बांधण्याचें कारण असें सांगतात कीं, हे टिपु सुलतानाबरोबर इंग्रजांच्या वतीने लढत असतां, त्यांस कैद करून नेलें ह्मणून त्यांनीं नवस केला कीं, जर मी ह्यांच्या हातांतून सुटून **मुंबई**स परत गेलो तर मशिद बांधीन, व त्याप्रमाणें त्यानें ही बांधिली. हीवर लेख आहे तो येणेप्रमाणे-

"ही मशिद पहिल्यानें अज्जम सामाजी हासाजी दिवेकर यांहीं १७१८ या वर्षी बांधिली. परंतु मशीद लहान होती ह्मणून मशिदीचे पैक्यांतून पुनः बांधून तिचा संस्कार चैत्र शुद्ध २ शके १७८२ शनवार रोजी झाला."

**समाप्त.**

## परिशिष्ट.

## युनिव्हर्सिटी एन्डौमेंटस् (देणग्या)

युनिव्हर्सिटीतून जे उमेदवार निरनिराळ्या विषयांत उत्तम तऱ्हेनें पसार होतात, त्यांस निरनिराळ्या थोर व उदार गृहस्थांकडून उत्तेजनार्थ नियमित काळपर्यंत स्कालरशिपा (पारितोषकें) किंवा एकदाच एकादी देणगी मिळावी ह्मणून युनिव्हर्सिटीकडे दिलेल्या रकमेच्या व्याजातून जी पारितोषकें मिळतात त्यांची संक्षिप्त माहिती वाचकांकरितां खालीं दिली आहे :—

१. **मंगळदास नथुभाईज ट्राव्हेलिंग फेलोशिप्.**— युनिव्हर्सिटीतून जो हिंदु ग्राजुएट पसार होऊन विलायतेस अभ्यासाकरितां जाईल त्याच्या खर्चाकरितां दरमहा २५० रुपये मिळावे ह्मणून इ.स. १८६२ सालीं २० हजार रुपये सदर्हु गृहस्थानें युनिव्हर्सिटीच्या स्वाधीन केले.

२. **माणकजी लिमजी गोल्डमेडल.**—युनिव्हर्सिटींत पसार झालेल्यांत ज्यानें नेमलेल्या विषयांत उत्तम निबंध लिहिला असेल त्यास, हें सोन्याचें पदक देण्यांत येतें. ह्या कृत्याकरितां सदर्हु गृहस्थाच्या दोघा चिरंजिवांनीं मिळून इ.स. १८६३ सालीं ५,००० रुपये युनिव्हर्सिटीस दिले.

३. **भगवानदास पुरुषोत्तमदास संस्कृत स्कॉलरशिप्.**—इ.स. १८६३ त ह्या गृहस्थानें युनिव्हर्सिटीनें संस्कृत विद्येस विशेष उत्तेजन द्यावें ह्या उद्देशानें १०,००० रुपये दिले.

४. **होमजी करसेटजी प्राईझ.**—युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांपैकी जो कोणी इंग्रजीत उत्तम कविता करील त्यास बक्षीस देण्याकरितां इ.स. १८६३ साली सदर्हु गृहस्थानें ५,००० रुपये दिले.

५. **जगन्नाथ शंकरशेट संस्कृत स्कॉलरशिप्.**—सदर्हु गृहस्थाचे चिरंजीव **विनायकराव** ह्यांनीं आपल्या पित्याच्या स्मरणार्थ सहा स्कॉलरशिपा ठेविल्या, त्या अशाः— दरमहा रुपये २५ च्या तीन व दरमहा रुपये २० च्या तीन, ह्या स्कॉलरशिपा जे उमेदवार म्याट्रिक्युलेशनमध्यें पसार होऊन कॉलेजांत जातील त्यांस तीन वर्षेपर्यंत मिळाव्या अशी योजना करून ठेविली आहे.

६. **जाम श्री विभाजी स्कॉलरशिप्.**— सदर्हु नवानगरचे जामसाहेब ह्यानीं **काठेवाडां**त इंग्रजी विद्येचा प्रसार व्हावा एतदर्थ जो **काठेवाडां**त राहणारा विद्यार्थी म्याट्रिक्युलेशन पसार होऊन कॉलेजांत जाईल त्यास दोन वर्षेपर्यंत स्कॉलरशिप् मिळावी ह्मणून इ.स. १८६६ सालीं ४,५०० रुपये युनिव्हर्सिटीच्या हवालीं केले.

७. **कावसजी जहागीर ल्याटिन स्कॉलरशिप्.**— ह्या गृहस्थानें इ.स. १८६८ सालीं म्याट्रिक्युलेशन परिक्षेमध्यें जो विद्यार्थी ल्याटीन भाषेंत उत्तम रीतीनें पसार होईल, त्यास स्कॉलरशिप देण्याकरितां ५,००० रुपये दिले.

८. **किनलॉक् फॉर्ब्स गोल्डमेडल.**— किनलॉक् मेमोरियल फंडाच्या ट्रस्टीलोकांनीं इ.स. १८६८ सालीं ज्युरिसप्रुडन्स आणि रोमन सिव्हिल लॉ यामध्यें जो विद्यार्थी उत्तम रीतीनें उतरेल त्यास सोन्याचें पदक बक्षीस देण्याकरितां ५,००० रुपये युनिव्हर्सिटीस दिले. हें पदक देऊन कांहीं पैसा राहिल्यास त्याची त्या विद्यार्थ्यास कायद्याचीं पुस्तकें देतात.

९. **डेव्हिड ससून हिब्रु स्कॉलरशिप्.**— आपल्या बापाचें स्मरण राहावे ह्मणून ऑनरेबल **ए.डी. ससून** सी.एस्.आय्., ह्यांनीं इ.स. १८६९ त सालिना २५० रुपयांची स्कॉलरशिप् हिब्रु भाषेत जो विद्यार्थी उत्तम रीतीने पसार होईल त्यास कॉलेजांत ती दोन वर्षेपर्यंत चालावी ह्मणून ५,००० रुपये दिले.

१०. **जेम्स बर्कली गोल्डमेडल.**— जी.आय्.पी. रेलवेचे चीफ इंजिनिअर मिस्तर **आर.एस.ब्रेरेटन** ह्यांनीं इ.स. १८६९ सालीं सिव्हिल इंजिनिअरिंगमध्यें जो उमेदवार पसार होईल, त्यास एक २५० रुपयांचे गोल्डमेडल व पुस्तकें घेऊन देण्याकरितां ८,००० रुपये दिले.

११. **एलिस प्राईझ.**— म्याट्रिक्युलेशन परिक्षेंत जो विद्यार्थी देशी भाषेंत (ओरिएन्टल ल्यांग्वेजीस) उत्तम रीतीनें पसार होईल त्यास ६० रुपये किमंतीचीं पुस्तकें देण्याकरितां १,५०० रुपये सदर्हु गृहस्थानें दिले.

१२. **हर्बर्ट** आणि **ला टटूची स्कॉलरशिप्.**— हे गृहस्थ इ.स. १८६७ सालीं टोबर हिल्वर वाघीर लोकांबरोबर लढतांना पडले ह्मणून, त्यांच्या स्मरणार्थ जुनागड व नवानगर येथील राजांनीं (चीफस्) दरमहाची

२० रुपयांची एक स्कॉलरशिप् स्थापण्याकरितां युनिव्हर्सिटीस ५,००० रुपये दिले.

**१३. विलसन फायलालॉजिकल् लेक्चरशिप्.**– विलसन टेस्टिमोनिअल फंड कमिटीच्या सेक्रेटरीनें इ.स.१८७० सालीं ह्या गृहस्थाच्या स्मरणार्थ युनिव्हर्सिटीला २३,५०० रुपये दिले. उद्देश हाच कीं युनिव्हर्सिटीनें दरसाल पसंत केलेल्या विषयांत जो युरोपिअन अगर **हिंदु** विद्यार्थी संस्कृत, मराठी, हिब्रु, ल्याटीन, ग्रीक, इंग्लीश, वगैरे भाषांत व तदंतर्गत भाषांत व्याख्यान देईल त्यास वरील रकमेच्या व्याजापैकीं पैसा दिला जावा.

**१४. एलिस स्कॉलरशिप्.**– धि. ऑनरेबल बी. एच्. एलिस ह्या गृहस्थाच्या स्मारकाकरितां एलिस टेस्टिमोनिअल कमिटीच्या अध्यक्षानें ७,२०६ रुपये इ.स. १८७० सालीं युनिव्हर्सिटीस दिले. ह्यातून बी.ए. परिक्षेचे वेळीं जो उमेदवार इंग्रजी भाषेत उत्तम व्याख्यान देईल, त्यास दरमहा २५ रुपये ह्या रकमेच्या व्याजांतून बक्षीस मिळतात.

**१५. चान्सलर्स मेडल.** — इ.स. १८६९ सालीं कॉनव्होकेशनचे वेळीं ऑनरेबल **सर सिमोर फिट् जेराल्ड मुंबई**चे गव्हर्नर व युनिव्हर्सिटीचे चान्सलर ह्यांनीं एक सोन्याचें पदक युनिव्हसिटीचे परिक्षेंत जो पहिला येईल त्यास मिळावे ह्मणून कांहीं रकम दिली.

**१६. अरनॉल्ड स्कॉलरशिप्.**– **मुंबई** हायकोर्टाचे जज्ज सर **जोसेफ अरनॉल्ड,** नाईट, ह्यांच्या स्मरणार्थ अरनॉल्ड टेस्टिमोनिअल फंडाच्या अध्यक्षानें ६,००० रुपये दिले. त्याच्या व्याजांतून एल्.एल्. बी. परिक्षेचे वेळीं हिंदु व मुसलमानी कायद्यांत जो विद्यार्थी उत्तम रीतीनें पसार होईल, त्यास दरमहा २५ रुपये मिळावें ह्मणून ही व्यवस्था केली.

**१७. ड्युक ऑफ् एडिन्बरो फेलोशिप्.**— इ.स. १८७१ सालीं सरदार व राजे लोक ह्यांनीं **मुंबईस ड्यूक ऑफ् एडिन्बरो** आल्याचें स्मरण राहावें ह्मणून युनिव्हर्सिटीला १०,००० रुपये दिले. ह्या रकमेच्या व्याजातून बी.ए. च्या परिक्षेंत जो उमेदवार उत्तम तऱ्हेने पसार होऊन पुढे एम.ए. परीक्षा देईन अशी अट कबूल करील, त्यास दोन वर्षेपर्यंत ह्या रकमेचे व्याज दहमहा मिळते.

१८. **बाई माणकबाई फ्रामजी जीजीभाई प्राईझ.**— इ.स. १८७१ सालीं ऑनरेबल बैरामजी जीजीभाई ह्यांनीं २,००० रुपये युनिव्हर्सिटीस बक्षीस दिले. सिनेट ज्या विद्यार्थ्यास उत्तम ठरवील त्यास वरील रकमेच्या व्याजाचा पैसा मिळतो.

१९. **राव सर प्रागमलजी स्कॉलरशिप्.** — इ.स. १८७० सालीं **ड्युक ऑफ् एडिन्बरो मुंबईस** आले, त्या वेळीं **राव सर प्रागमलजी** हेही त्यांस भेटण्यास आले होते. ह्या गोष्टीचें स्मरण राहावें ह्मणून, **मुंबई**तील कच्छी लोकांनीं २०,००० व खुद्द रावांनीं २५,००० रुपये युनिव्हर्सिटीस दिले. व जो कच्छी विद्यार्थी युनिव्हर्सिटीच्या परीक्षा देईल त्यास त्याच्या खर्चाकरितां सदर्हु रकमेच्या व्याजापैकीं पैसा द्यावा, अशा उद्देशानें ही रकम देण्यांत आली.

२०. **सर जसवंतसिंगजी स्कॉलरशिप्.**— **ड्यूक ऑफ् एडिन्बरो मुंबई**स आले होते ह्या गोष्टीचें स्मरण राहावें ह्मणून, हिज हायनेस **सर जसवंतसिंग** के. सी. एस्. आय्. ह्यांनीं २५,००० रुपये दिले. **भावनगर** हायस्कुलात दोन वर्षे शिकून म्याट्रिक्युलेशन परिक्षेंत पसार होतील त्यांस कॉलेजांत अभ्यास करण्यासाठीं एक रुपये १५ ची व दुसरी रुपये १२ ची अशा दोन स्कालरशिपा ठेविल्या.

२१. **करसनदास मूळजी प्राईझ.**—करसनदास मूळजी मेमोरिअल फंडाचे ऑनररी सेक्रेटरी मि. सोराबजी शापूरजी बंगाली ह्यांनीं इ.स. १८७३ सालीं इंग्रजींत जो उत्तम निबंध लिहील त्यास १०० रुपये बक्षीस देण्याकरिता ३,००० रुपये दिले.

२२. **डोसाभाय हॉरमसजी कामा प्राईझ.**— ग्रांट मेडिकल कॉलेजांतून पसार झालेल्या विद्यार्थ्यांपैकी जो कोणी वैद्यशास्त्रावर उत्तम निबंध लिहील, त्यास २०० रुपयांची पुस्तकें बक्षीस देण्याकरितां मि. **खरशेटजी रुस्तमजी कामा** ह्यांनीं युनिव्हर्सिटीस ५,००० रुपये दिले.

२३. **ह्युजलिंग्स प्राईझ.**— इंग्रजीमध्यें हुशार असून 'आर्ट' च्या परिक्षेंत जो उत्तम रीतीनें पसार होईल त्यास १०० रुपयांची पुस्तकें बक्षीस देण्याकरितां ह्युजलिंग टेस्टिमोनिअल कमिटीच्या सेक्रेटरीनें २,५०० रुपये दिले.

२४. **जेम्स टेलर प्राईझ.**— सदर्हूप्रमाणें.

२५. **भाऊदाजी प्राईझ.**— इ.स. १८७६ त ५,००० रुपये दिले. बी.ए. परिक्षेंत संस्कृतांत पसार होईल त्यास २०० रुपयांचीं पुस्तकें बक्षीस देतात.

२६. **विनायकराव जगन्नाथ शंकरशेट प्राईझ.**—बी. ए. परिक्षेंत संस्कृतांत जो उत्तम तऱ्हेनें पसार होईल, त्यांस १८० रुपयांचीं पुस्तकें बक्षीस देण्याकरितां **विनायकराव ज. श.** मेमोरियल फंडाचे सेक्रेटरी मि. नानाभाई बैरामजी ह्यांनीं इ. स. १८७६ सालीं ४,५०० रुपये दिले.

२७. **मेरवानजी फ्रामजी पंडे स्कॉलरशिप्.**— एल्. सि. ई. परिक्षेंत मेक्यानिकल इंजिनिअरींगमध्यें जो उमेदवार पसार होईल त्यास २० रुपये बक्षीसादाखल देण्याकरितां ओरिएन्टल स्पिनिंग अँड विव्हिंग कंपनीचे वतींने मेरवानजी माणकजी पिटीट ह्यांनीं ६,००० रुपये इ. स. १८७६ त दिले.

२८. **कहानदास मंछाराम स्कॉलरशिप्.**—सदर्हु गृहस्थाच्या विधवेनें जो उमेदवार हिंदु (गुजराथी) असून म्याट्रिक्युलेशन परिक्षेंत उत्तम तऱ्हेंने पसार होऊन पुढेंही स्कॉलरशिप मिळे तो पर्यंत इंजिनिअरिंग कॉलेजमध्यें विद्याभ्यास करीन अशी अट कबूल करील त्यास दरमहा २० रुपये बक्षीसादाखल ह्मणून ६,००० रुपये दिले.

२९. **धिरजलाल मथुरादास स्कालरशिप्.**—सदर्हु गृहस्थाच्या विधवेनें जो उमेदवार हिंदु (गुजराथी) असून बी. ए. च्या परिक्षेंत पसार होऊन पुढें लॉ क्लासांत जाईन अशी अट कबूल करील त्यास बक्षीस देण्याकरितां ६,००० रुपये दिले.

३०. **सिंक्लेअर प्राईस.**—हे गृहस्थ पहिलेच डायरेक्टर ऑफ पब्लिक इंस्ट्रक्शन होते. जो उमेदवार संस्कृत व फारशी भाषेंत म्याट्रिक्युलेशल परिक्षेंमध्यें उत्तम तऱ्हेनें पसार होईल त्यास इ. स. १८७८ सालीं सिंक्लेअर मेमोरिअल फंडाच्या सेक्रेटरीनें दिलेल्या १,५०० रुपयांच्या व्याजाचा पैसा देतात.

३१. **गिब्ज् प्राईझ.**—जहांगीर कावसजी जहांगीर रेडीमनी ह्यानें इ. स. १८७८ सालीं ऑनरेबल गिब्स् ह्यांच्या स्मरणार्थ १,००० रुपये

युनिव्हर्सिटीस दिले. ह्याच्या व्याजांतून आर्ट परिक्षेंत सृष्टिज्ञान ह्या विषयांत जो उत्तम तऱ्हेनें पसार होईल त्यास ८० रुपयांची पुस्तकें मिळतात.

३२. **नारायण वासुदेव स्कॉलरशिप्.**—सदर्हु गृहस्थाच्या स्मारक फंड मंडळीच्या वत्तींनें मि. नानाभाई बैरामजी ह्यांनीं युनिव्हर्सिटीस ५,००० रुपये बी. ए. परिक्षेंत जो उमेदवार सृष्टिज्ञान ह्या विषयांत उत्तम तऱ्हेनें पसार होईल त्यास २०० रुपयांचें बक्षीस देण्याकरितां दिले.

३३. **कॉब्डनक्लब मेडल.**—बी. ए. परीक्षेंत अर्थशास्त्रांत जो पसार होईल त्यास चांदीचें पदक देंण्याचें कॉब्डन क्लबनें इ. स. १८७९ त कबूल केलें. हें पदक कानव्होकेशनच्या वेळीं मिळतें.

३४. **सर जॉर्ज ली ग्रांट जेकब स्कॉलरशिप्.**—कोल्हापूर, काठेवाड, सावंतवाडी व कच्छ येथील विद्यार्थ्यांपैकीं जो विद्यार्थी म्याट्रिक्युलेशन परिक्षेंत पसार होईल त्यास सालिना १२० रुपये मिळावे इतकी रकम दिली.

३५. **सर जॉर्ज ली ग्रांट जेकब प्राईझ.**—इ. स. १८७९ मध्यें सदर्हु गृहस्थानें १,००० पौंडचा ट्रस्ट व १०० पौंडाचा 'डिबेंचर बांड' युनिव्हर्सिटीचे स्वाधीन केले व ह्या रकमेच्या उत्पन्नांतून जो विद्यार्थी ब्रिटीश राज्यापासून हिंदुस्थानास लाभ या विषयावर उत्तम निबंध लिहील त्यास बक्षीस देण्याकरितां दिले.

३६. **जयराजभाई पीरभाई स्कॉलरशिप्.**—इ. स. १८८१ मध्यें सदर्हु गृहस्थानें जो मुसलमान विद्यार्थी म्याट्रिक्युलेशन परिक्षेंत पसार होऊन कॉलेजांत जाईल अगर विलायतेस परीक्षा देण्याकरितां जाईल त्यास बक्षीस देण्याकरितां ५,००० रुपये युनिव्हर्सिटीस दिले.

३७. **वरजीवनदास माधवदास संस्कृत स्कॉलरशिप्.**—या गृहस्थाच्या कुटुंबांतील मनुष्यांनीं इ. स. १८८२ सालीं पहिल्या बी. ए. च्या परिक्षेंत प्रतिवर्षी जो उमेदवार संस्कृतामध्यें पसार होईल त्यास बक्षीस देण्याकरितां युनिव्हर्सिटीस ५,००० रुपये दिले.

३८. **जमशेटजी दोराबजी नायगामवाला प्राईझ.**—एल्. सी. ई. परिक्षेंत जो उत्तम तऱ्हेनें पसार होईल त्यास सालिना १२० रुपये बक्षीस देण्याकरितां इ. स. १८८२ सालीं दादाभाई जमशेटजी आणि कावसजी दादाभाई नायगामवाला ह्यांनीं युनिव्हर्सिटीस ३,००० रुपये दिले.

३९. **मेलव्हिल् मेमोरिअल स्कॉलरशिप्.**—खानबहादूर पेस्तनजी जहांगीर ह्यांनीं वरील साहेबाचे स्मरणार्थ गायकवाड सरकारच्या राज्यांतील कोणत्याही शाळेंतून जो कोणी प्रिव्हिअस परिक्षेंत पसार होऊन पुढें अभ्यास चालवील त्यास दोन वर्षेंपर्यंत दरमहा २० रुपयांचें बक्षीस मिळावें म्हणून इ. स. १८८३ सालीं ६,००० रुपये दिले.

४०. **सर फ्यांक सूटर स्कॉलरशिप्.**—जे मुसलमान उमेदवार म्याट्रिक्युलेशन, प्रिव्हिअस व फर्स्ट बी. ए. ह्या परीक्षा पसार होऊन पुढें अभ्यास चालवितील त्यांस दरमहा १५ रुपयांच्या तीन स्कॉलरशिपा द्याव्या ह्मणून इ. स. १८८३ सालीं बांबे महामेडन न्याशनल असोसिएशनचे प्रेसिडेंट व सेक्रेटरी ह्यांनीं १३,६३० रुपये युनिव्हर्सिटीच्या स्वाधीन केले.

४१. **चार्ल्स मोरहेड प्राईझ.**—एल्, एम्, आणि एस्, परिक्षेंत जो उमेदवार उत्तम तऱ्हेंनें पसार होईल त्यास वरील गृहस्थाच्या नांवानें २०० रुपये बक्षीस देण्याकरितां मोरहेड मेमोरिअल कमिटीनें ५,००० रुपये दिले.

४२. **बालकृष्ण सुदामजी प्राईझ.**—एल्, एम्, आणि एस्, परिक्षेंत पसार होऊन सुईण कामाचे विषयांत जो पुष्कळ गुण मिळवील त्यास दरवर्षी रोकड अगर पुस्तकरूपानें २०० रुपये बक्षीस देण्याकरितां वरील गृहस्थांची विधवा स्त्री हिणें ५,००० रुपये दिले.

४३. **भगवंत सिंगजी कलेक्शन ऑफ् संस्कृत म्यानस्क्रिप्ट.**—गोंडलचे ठाकूर साहेब ह्यांनीं इ. स. १८८५ सालीं युनिव्हर्सिटीला संस्कृत पुस्तकें घेण्याकरितां ६,००० रुपये दिले.

४४. **मुजुमदार मणीशंकर किकाजी संस्कृत स्कॉलरशिप्.**—इ. स. १८८५ सालीं मिस्तर सी. म्याकनॉटन—प्रिन्सिपाल राजकुमार कॉलेज, ह्यांनीं काठेवाडींतील विद्यार्थ्यांस संस्कृत शिकण्यास उत्तेजन यावें ह्मणून युनिव्हर्सिटीस ३,००० रुपये दिले.

४५. **भावनगर पर्सिव्हल स्कॉलरशिप्.**—प्रिव्हिअस परिक्षेंत सामलदास कॉलेजांतून पुष्कळ गुण मिळवून पसार होईल त्यास पुढें अभ्यास करण्यास उत्तेजन यावें ह्मणून स्कॉलरशिप् देण्याकरितां हरीदास वेहारीदास देसाई ह्यांनीं ३,६०० रुपये दिले.

४६. **भाऊसाहेब देसाई स्कॉलरशिप्.**—जे कोणी दोन उमेदवार नडियाद हायस्कुलांतून म्याट्रिक्युलेशनमध्यें पसार होऊन गुजराथ कालेजांत अभ्यास करतील त्यांस सारख्या रकमेच्या वरील नांवांच्या दोन स्कॉलरशिपा देण्याकरितां हरिदास वेहारीदास ह्यांनीं युनिव्हर्सिटीस ७,२०० रुपये दिले.

४७. **आशबर्नर प्राईझ.**—हिंदुस्थानांतील कलाकौशल्य, कारागिरी, शेती वगैरे संबंधीं जो उत्तम निबंध लिहील त्यास १२० रुपयांचें बक्षीस मिळण्याकरितां ३,००० रुपये ऑनरेबल एल्. आर. आशबर्नर, माजी मुंबई कौन्सिलचे मेंबर, ह्यांच्या स्मारकाकरितां इ. स. १८८६ त दिले.

४८. **कच्छी दिवाण बहादुर मणीभाई प्राईझ.**—सदर्हु कच्छचे दिवाण साहेब ह्यांनीं म्याट्रिक्युलेशन परिक्षेंत जो कच्छि उमेदवार पसार होईल त्यास १०० रुपये मिळावे ह्मणून २,५०० रुपये दिले.

४९. **जेम्स ग्रीव्हस् स्कॉलरशिप्.**—सदर्हु साहेबाच्या स्मारक कमिटींनें भडोच हायस्कूल अगर भडोच संस्थानांतील कोणत्याही शाळेंतील जो मुलगा उत्तम रीतीनें पसार होऊन पुढें कालेजांत जाईन असें कबूल करील त्यास दरमहा पंधरा रुपये देण्याकरितां ४,५०० रुपये दिले.

५०. **कर्नल प्याट्रिक फ्रेंच स्कॉलरशिप्.**—कर्नल पी. एफ्. फ्रेंच, बी. बी. आणि सी. आय् रेलवे कंपनीचे माजी चेअरमन ह्यांचे स्मारक रहावें ह्मणून सदर्हु कंपनीच्या नोकरांनीं वर्गणी गोळा करून ४,००० रुपये युनिव्हर्सिटीस दिले. याच्या व्याजांतून २०० रुपये एल.सी.ई परिक्षेंत पसार होऊन पुढें सिव्हिल इंजिनियरिंग कॉलेजांत अभ्यास करील त्यास देण्याकरितां दिले.

५१. **दिवाण बहादुर लक्ष्मण जगन्नाथ वैद्य स्कॉलरशिप्.**—कायस्थ प्रभू एज्युकेशनल फंड कमिटीनें ५,००० रुपये सदर्हु नांवाची स्कॉलरशिप काढण्याकरितां युनिव्हर्सिटीस दिले. याच्या व्याजांतून कायस्थ प्रभू जातीचा जो उमेदवार म्याट्रिक्युलेशन परिक्षेत उत्तम तऱ्हेनें पसार होऊन पुढें आर्त कालेजांत अभ्यास करील त्यास स्कॉलरशिप् दिली जावी अशा उद्देशानें सदरील रकम देण्यांत आली आहे.

## विमान (बलून)

विमानाविषयीं आह्मीं सहाव्या भागांत पृष्ठ २२४ वर थोडीशी माहिती दिलीच आहे. त्याप्रमाणें **मुंबई**मध्यें तारीख २६ माहे जानेवारी १८८९ रोजीं सायंकाळीं पावणेपांच वाजतां मिस्तर पिर्सिव्हल स्पेन्सर नामक गृहस्थानें गव्हर्मेंटहौस **परळ** येथें विमान उडवून दाखविलें. ह्याप्रकारचें विमान मुंबईत पहिल्यानेंच उडविण्यांत आलें. दिवसा बारा वाजल्यापासून परळाकडेस लोकांचे थव्याचेथवे लोटत होते. शहरांतील तीन चतुर्थांश तरी लोक तेथें गेले असतील असें वाटतें. गाड्याघोड्यांची तर मनस्वीच गर्दी झाली होती. ट्रामवेच्या गाड्या तर एकामागून एक भरभरून जात होत्या; व त्या गाड्यांच्या मागे पुढें To Balloon (टु बलून, बलूनकडे नेणारी गाडी) अशीं अक्षरें लिहिलीं होतीं. त्याचप्रमाणें **परळ**च्या रस्त्यावर भिंतींवरही This way to balloon (धिस वे टू बलून, ह्या रस्त्यानें बलून पाहण्यास जा) ह्मणून कागद चिकटविले होते. बलून पाहण्यास जाण्याकरितां कांहीं सरकारी व सावकारी ऑफिसें दोन वाजल्यावर बंद करण्यांत आलीं होतीं. गव्हर्मेंटहौस परळ ह्यांच्या बॉंबे गेटवर टिकिटें विकणारी मंडळी बसली होती. टिकिटांचे तीन वर्ग होते—१ रुपया, २ रुपये व ३ रुपये.

मागच्या वर्णनांत दिलेल्या बलुनांत व ह्या बलुनांत फरक एवढाच होता कीं, ह्यांचें खालील तोंड मोकळें होतें. बलुनास एक छत्री लावली होती, त्या छत्रींत बसून मिस्तर स्पेन्सर गव्हर्मेंटहौस परळच्या कांहीं अंतरावर उतरला. बलुन वर उडतांना तो बलुनास लावलेलें एक वर्तुळाकार कडें होतें त्यांत बसला व बलुनाच्या दोऱ्या सोडतांच तें वर जाऊं लागलें. १,७६० फूट वर गेल्यावर मिस्तर **स्पेन्सर** ह्यानें विमानाचा संबंध सोडून वर ह्मटलेल्या छत्रीचा आधार करून तींत बसून खालीं उतरूं लागला व विमान वर जाऊं लागलें. हा सर्व प्रकार अवघ्या तीन चार मिनिटांचे आंतच आटपला. विमानांतील ग्यास संपल्यामुळें तेंही तसेंच खाली उतरूं लागलें तें थोडक्याच वेळांत जमिनीवर आलें. ह्याचप्रमाणें तारीख ९ फेब्रुवारी रोजीं पुनः दुसरें विमान उडविण्यांत आलें. मिस्तर **स्पेन्सर** ह्या गृहस्थानें आजपर्यंत **इंग्लंदादि** देशांत बरींच विमानें उडविलीं आहेत व त्यांचा हा पिढीजाद धंदा आहे ह्मणून त्यांनीं सांगितलें. धन्य आहे असल्या धाडसी मनुष्याची ! ! !

## कॉलेजिस

१. एल्फिस्टन कॉलेज. ४. सेंटझेविअर कॉलेज.
२. ग्रांट मेडिकल कॉलेज. ५. फ्री जनरल असेम्लीज ”
३. सेंटमेरीज ”

## हायस्कूल्स्

१. एल्फिस्टन हायस्कूल. ५. बॉंबे हायस्कूल.
२. क्याथीड्रल ” ६. फोर्ट ”
३. जॉन कॉनन ” ७. शिवाजी ”
४. चंदनवाडी ”

## स्कूल्स्

१. बॉंबे एज्युकेशन सोसायटीचें स्कूल.
२. ” स्कॉटिश एज्युकेशन सोसायटीचें स्कूल.
३. डेव्हिड ससून इंडस्ट्रिअल रिफॉर्मेटरी.
४. फ्री जनरल असेम्लीज इन्स्टिट्युशन (डाक्तर विलसनची शाळा.)
५. जनरल ” ” (जाडेखांबांची ” )
६. फ्रिअर फ्लेचर स्कूल.
७. बॉंबे प्रोप्रायटरी ”
८. इंडो ब्रिटीश इन्स्टिट्यूशन.
९. राबर्ट मनी ” (मनीस्कूल.)
१०. सर जमशेटजी जीजीभाई पारशी बेनिव्होलेंट इन्स्टिट्यूशन.
११. ” ” ” स्कूल ऑफ् आर्ट आणि इंडस्ट्री.
१२. बॉंबे डायओसिसन बोर्ड ऑफ् एज्युकेशन.
१३. स्कॉटिश आर्फनेज.
१४. धि ऑनरेबल जगन्नाथ शंकरशेट फर्स्टग्रेड अंग्लोव्हरन्याक्युलर स्कूल.
१५. सर जमशेटजी जीजीभाई झुरतास्ती मद्रसा.
१६. अमरचंदवाडी शाळा.
१७. न्यू इंग्लिश स्कूल.
१८. फ्रामजी नसरवानजी अंग्लोव्हरन्याक्युलर स्कूल.
१९. बॉंबे प्रायव्हेट इंग्लिश स्कूल (गोविंद विष्णूची शाळा.)

२०. प्रभूसेमिनरी.

२१. मुल्ला फरोझ मद्रसा.

२२. गिरगांव प्रायव्हेट स्कूल (पोतदारांची शाळा)

२३. मजलस—इ—वायस इसलाम.

२४. आंजुमन—इ—अखबाब.

२५. थिइस्टिक असोसिएशनची रात्रीची शाळा.

२६. इंडो ब्रिटीश इन्स्टिट्यूशन फॉर बॉय्ज आणि गर्ल्स.

## कन्या शाळा

१. अलेक्झांड्रा नेटिव्ह गर्ल्स स्कूल.

२. भाऊ दाजी गर्ल्स स्कूल.

३. भगवानदास पुरुषोत्तमदास गर्ल्स स्कूल.

४. गोकुळदास तेजपाळ " "

५. सर जमशेटजी जीजीभाई " "

६. स्टूडंटस् लिटररी आणि सायंटिफिक सोसायटीज् गर्ल्स स्कूल.

७. जैराजभाई पीरभाई गर्ल्स स्कूल.

८. जीवराज बाळू गर्ल्स स्कूल.

९. जगन्नाथ शंकरशेट " "

१०. खोजा साजनभाई मीरअल्ली गर्ल्स स्कूल.

११. महमदन गर्ल्स स्कूल.

१२. मेहरवानजी माणकजी शेट गर्ल्स स्कूल.

१३. मंगळदास नथुभाई गर्ल्स स्कूल.

१४. अमरोळी मिशन. " "

१५. पारशी गर्ल्स स्कूल असोशिएशन.

## मुख्य व प्रसिद्ध रस्त्यांचीं नांवें-कोट

१. अपालो बंदर रस्ता. २. अपालो रस्ता. ३. आशलेन. ४. ऑर्मेनिअनलेन. ५. बेक हौस लेन. ६. बझारगेट स्ट्रीट. ७. बेल लेन. ८. ब्रूस लेन. ९. चर्चगेट स्ट्रीट. १०. कस्टम हौस रस्ता. ११. दलाल स्ट्रीट. १२. डीन लेन. १३. एल्डन रस्ता. १४. एलफिस्टन सर्कल. १५. एस्प्लेनेड रस्ता. १६. फॉर्ब्स स्ट्रीट. १७. ग्रीन स्ट्रीट. १८. होमजी स्ट्रीट. १९. हार्नबी रस्ता.

२०. हमम स्ट्रीट. २१. इम्पीरिअल हॉटेल लेन. २२. मरीन स्ट्रीट. २३. मेयो रस्ता. २४. मेडोज स्ट्रीट. २५. मिलीटरी स्क्वेअर. २६. ओक लेन. २७. पारसी बझार स्ट्रीट. २८. पटेल स्ट्रीट. २९. [१]रामपार्ट रो. ३०. टाटामरिन्ड लेन. ३१. न्यू बझार गेट स्ट्रीट. ३२. क्रूकशांक रोड.

## शहर

१. काळकादेवीचा रस्ता. २. परेल रस्ता. ३ भुलेश्वर रस्ता. ४. पालव रस्ता. ५ कावजीपटेल ट्यांक रस्ता. ६ गिरगांव ब्याक रोड. ७ अस्कीन रोड अथवा नळबजार रस्ता. ८ डंकन रोड. ९ माजगांव रस्ता. १० भायखळा रस्ता. ११ क्राफर्डमारकेट रस्ता. १२ कारनाक बंदर रस्ता. १३ चर्चगेट रस्ता. १४ क्विन्स रोड. १५ ग्रांट रोड (हा १८३५ त ग्रांटसाहेबांनें बांधला) १६ महालक्ष्मी रस्ता. १७ वालुकेश्वर रस्ता. १८ सिडी रस्ता. १९ बाबुलाटयांक रोड. २० फाकलंड रस्ता. २१ पायधुणी रस्ता. २२ भेंडीबाजार रस्ता. २३ ब्रीच क्यांडी रोड. २४ मरिन लाईन्स. २५ खेतवाडी रस्ता. २६ गवाळीतळें रस्ता. २७ गांवदेवी रस्ता. २८ मलबारहिल् रोड. २९ पेडर रोड खंभाळाहिल्. ३० बेल्यासिस रोड. (सुरतेंत दुष्काळ पडला होता त्यावेळीं जनरल बेल्यासिस ह्यांनीं तिकडून पळून आलेल्या लोकांकडून बांधविला). ३१ आलबर्ट रोड. ३२ वार्डन रोड. ३३ अमरचंदवाडीचा रस्ता. ३४ अमरोळी लेन. ३५ अनंतरुषीची वाडी. ३६ अंजीर वाडी. ३७ आनेस्ली रोड. ३८ आनेस्टी रोड. ३९ आर्गाईल रोड. ४० आर्थर रोड. ४१ अतारी मोहोला. ४२ बाबाढबूचा रस्ता. ४३ बाळूसारंग स्ट्रीट. ४४ बंगाली मोहोला. ४५ बापुहजामचा मोहोला. ४६ बापुजोशाची वाडी. ४७ बारभाई मोहोला. ४८ बाटलीवाला मोहोला. ४९ भाजीपाला रोड. ५० भावनगरी मोहोला. ५१ भिस्ती मोहोला. ५२ भोई वाडा. ५३ भुसारी मोहोला. ५४ गायवाडी रस्ता. ५५ करसेटजी सुकलाजी स्ट्रीट उर्फ सफेद गल्ली. ५६ चंदन वाडी रस्ता. ५७ चटनी मोहोला. ५८ छत्रीसारंग मोहोला. ५९ चौकी मोहोला. ६०. चौपाटी रोड. ६१. सुपारीबाग रोड. ६२. चौल वाडी. ६३. चुनाभट्टी रस्ता.

---

**टीप १.–** ह्यास पूर्वी रोप्वॉक् ह्मणत कारण कंपनीचा ह्या ठिकाणीं काथ्याचे दोर करण्याचा कारखाना होता.

६४ दखनी मोहोला. ६५ डोंगर वाडी. ६६ दोनताड रस्ता. ६७ फणसवाडी लेन. ६८ फोरास रोड. ६९ रिपन रोड, फ्रिअर रोड. ७० घोघारी मोहोला. ७१ गिब्स रोड. ७२ हेन्स रोड. ७३ जकरिया मोहोला. ७४ जेल रोड. ७५ कामाठी पुरा. ७६ कांडी मोहोला. ७७ खेतवाडीमेन रोड. ७८ लव्ह लेन. ७९ महालक्ष्मी रोड. ८०. मौन्ट रोड. ८१ टांकबंदर रोड. ८२ ताडदेव टेमकर मोहोला. ८३ ठाकूरद्वार रोड. ८४ तीन दरवाजे रस्ता. ८५ नेपिअर रोड. ८६ व्हिक्टोरिया रोड. ८७ वाडवी रोड.

## भाड्याच्या गाड्या उभ्या राहण्याचीं ठिकाणें

१ मोठा कुलाबा. २ धाकटा कुलाबा. ३ अपालोबंदर. ४ अपालोबंदर व मरीन स्ट्रीट. ५ टंकसाळीचे समोर. ६ फ्रिअर फौंटनजवळ. ७ म्युनिसिपल ऑफिसाजवळ. ८ मैदानांत बजारस्ट्रीटजवळ. ९ व्हिक्टोरिया टरमिनस स्टेशनाजवळ. १० धोबीतळें. ११ मेमण स्ट्रीटजवळ. १२ पायधुणी. १३ सर जमशेदजी जीजीभाई पुतळ्याजवळ. १४ एल्फिन्स्टन बंदर. १५ दोनटांकी. १६ भायखळा रेलवे स्टेशनाजवळ. १७ व्हिक्टोरिया रोड. १८ गिरगांव पोर्टुगीज चर्चजवळ. १९ ग्रांटरोड स्टेशनाजवळ. २० माजगांव बंदर. २१ ताडदेवाच्या चौकीजवळ. २२ मलबारहिल् चौकीजवळ. २३ ब्रिचक्यांडी चौकीजवळ. २४ लालबागाजवळ. २५ गिरगांव पोलिसकोर्टाजवळ. २६ कावसजी पटेलच्या तळ्याजवळ. २७ नळबाजाराचे नाक्यावर.

## मुंबई शहरांत राज्य व्यवहारासंबंधी परकीय राजांकडून जे त्यांच्या तर्फे प्रतिनिधि (कौन्सलर्स्) असतात त्यांची यादी येणेंप्रमाणें :—

१ अमेरिका—बी. एफ्. फर्नह्याम.
२ आस्ट्रो हंगेरिअन— फ्रांझ स्टांकिजर.
३ बेलजम—पेटझ् डि थॉयी.
४ डेनमार्क—हेरोल्डकरेल.
५ फ्रान्स—मांशिअर कालेट.
६ जर्मनी—एच् बार्टेलस्.
७ इताली—एफ्. बी. बझोनी.
८ नेदरलंड—एस् स्टिनर.
९ पर्शिआ—हाजीहसन कुलीखान मुस्तभिदडलव्हिझारे.
१० पोर्टुगल—एफ्. सी. एफ्. डी. मेनेझीस.

११ सयाम—ए. सी. एच्. बी. फार्ब्स. १३ स्विदन आणि नॉर्वे—जे. जानी.
१२ स्पेन—ए. ब्ल्याश्र्चेक. १४ टर्की—धालीत बे.

## पूल

**फ्रेंचपूल**—हा इ. स. १८६६ त बाँबे बरोडा आणि सेंट्रल इंडिया रेलवे कंपनीनें बांधला.

**केनेडीपूल**.—हाही सदर्हु कंपनींने बांधला.

**कुलाबापूल**— कित्ता.

**ग्रांटरोडपूल**—३ ,,

**दादरपूल**— ,,

**नेसविटपूल**—ग्रेटइंडियन पेनिनसुला रेलवेनें बांधला.

**आलिव्हंटपूल**— ,,

**हानकांक** ,,— ,, इ. स. १८७९ त बांधला.

**फ्रिअर** ,,— ,,

**मसजीद** ,,— ,,

**कारन्याक** ,,— ,, इ. स. १८६८ त बांधला.

## प्रसिद्ध नेटीव कंपन्या

१ आदमजी पीरभाई आणि कं.
२ आर्देसर फ्रामजी मूस ,,
३ भास्कर वासुदेव पाठक ,,
४ डि. आर. दादी ,,
५ जी. मोटी. आणि कंपनी.
६ हरिवल्लभदास कल्याण ,,
७ वाडिया आणि सन्स.
८ जमशेदजी नसरवानजी टाटा
९ जयराजभाई पीरभाई आणि कं.
१० जीवराज माधवजी.
११ मोदी आणि कं.
१२ मुळजी जेठा आणि कं.
१३ नानाभाई बैरामजी जीजीभाई आणि कं.
१४ करानी आणि कं.
१५ तापीदास वर्जदास आणि कं.
१६ थारीया टोपन आणि कं.
१७ वीसराम इब्राईम आणि कं.
१८ युलानचिंन आणि कं.
१९ कामत आणि कं.

## प्रसिद्ध युरोपिअन कंपन्या

१ आलकाक आशडौन आणि वर्थ.
२ आस्क्विवत्थ लॉर्ड आणि व्हिटमोर.
३ बाडाम पाईल आणि कं.
४ वॉल्टन ,, ,,
५ बाप्टी ब्रदर्स.
६ एडवर्ड बेट्स आणि कं.
७ विलियम बेल ,, ,,
८ बेन आशली ,, ,,
९ बेन आणि बेकर ,, ,,
१० बॉंबे कंपनी.
११ जॉन क्यांबेल ,, ,,
१२ क्रिस्टल ,, ,,
१३ कोर्ट ,, ,,
१४ कटलर पामर ,, ,,
१५ इवर्ट ल्याथ्याम ,, ,,
१६ फेव्हर ल्युबा ,, ,,
१७ फिनले म्यूर ,, ,,
१८ एफ्. फिचेर ,, ,,
१९ फ्लेमिंग ,, ,,
२० सी. एच्. बी. फार्ब्स ,, ,,
२१ सर चार्ल्स ,, ,,
२२ गाडम बायथेल ,, ,,
२३ ग्लेड आणि कं.
२४ ग्रेहाम ,, ,,
२५ ग्रिव्हज कॉटन ,, ,,
२६ ग्रिन्डले ग्रूम ,, ,,
२७ गिसी आणि क्लिजंग.
२८ केंप आणि कं.
२९ किलिक निक्सन आणि कं.
३० किंग किंग ,, ,,
३१ ल्यांग मॉयर ,, ,,
३२ ल्याथाम आणि कं. ,,
३३ ल्याथम आबरक्रांबी ,, ,,
३४ लंड आणि ब्लाकली.
३५ लायन आणि कं.
३६ म्याकिनान मेकेंझी ,, ,,
३७ मार्क्स ,, ,,
३८ ओवेन आणि ओकेल.
३९ फिलिप्स आणि कं.
४० पनेट ,, ,,
४१ राली ब्रदर्स.
४२ सी. जोस्ट आणि कं.
४३ रिचर्डसन आणि क्रूडास.
४४ रिची स्टुअर्ट.
४५ राजर्स आणि कं.
४६ डेविड ससून ,, ,,
४७ साऊन्डी ,, ,,
४८ ट्रिचर ,, ,,
४९ व्हॉलकर्ट ब्रदर्स.
५० वालेस आणि कं.
५१ वाल्श लव्हेट ,, ,,
५२ वॉटसन ,, ,,
५३ विलियम ग्रासमन

## ब्यांका

१ आग्राब्यांक लिमिटेड.
२ ब्यांक ऑफ् बेंगाल.
३ ब्यांक ऑफ् बॉंबे.
४ चार्टर्ड ब्यांक ऑफ् इंडिया ऑस्ट्रेलिया आणि चायना.
५ चार्टर्ड ब्यांक मर्कंटाईल ब्यांक ऑफ् इंडिया लंडन आणि चायना.
६ काम्पाटायर डि एस् कामटे डि प्यारिस.
७ गव्हर्नमेंट सेव्हिंग्स् ब्यांक.
८ हांगकांग ॲन्ड शांघाय ब्यांकिंग कॉरपोरेशन.
९ न्याशनल ब्यांक ऑफ् इंडिया.
१० न्यू ओरिएन्टल ब्यांकिंग कॉरपोरेशन.

## असोशिएशन (मंडळ्या)

१ बॉंबे ब्र्यांच ऑफ् धि ईस्ट इंडिया असोशिएशन.
२ बॉंबे ब्र्यांच ऑफ धि न्याशनल इंडियन असोशिएशन.
३ बॉंबे प्रेसिडेन्सी असोशिएशन.
४ बॉंबे ग्र्याज्युएटस् असोशिएशन.
५ बॉंबे वुइमेन्स असोशिएशन.
६ बॉंबे यंग वुइमेन्स क्रिस्तिअन असोशिएशन.
७ बॉंबे यंग मेन्स क्रिस्तिअन असोशिएशन.
८ बॉंबे थिइस्टिक असोशिएशन.
९ वेस्टर्न इंडिया व्हॉलंटिअर अथलेटिक असोशिएशन.
१० युरेजिअन आणि आंग्लो इंडियन असोशिएशन ऑफ् वेस्टर्न इंडिया.

## मर्कंटाईल असोशिएशन्स

१ बॉंबे असोशिएशन ऑफ् फायर इन्शूरन्स.
२ चेंम्बर ऑफ् कॉमर्स.
३ कॉटन ट्रेडर्स असोशिएशन.
४ मिल् ओनर्स असोसिएशन
५ नेटिव्ह मर्चंटस् असोशिएशन.
६ ट्रेडर्स असोशिएशन.
७ अंडर रायटर्स असोशिएशन.
८ बॉंबे बायबल वुइमेन्स ”
९ बॉंबे न्याशनल महामेदन ”

## सोसाएटी

१ बॉंबे न्याचरल हिस्टरी सोसाएटी.
२ स्टूडन्स लिटररी आणि सायंटिफिक सोसाएटी.

३ स्ट्रेंजर्स फ्रेंड सोसाएटी.
४ म्यूचुअल प्राव्हिडेंट सोसाएटी लिमिटेड.
५ आंथ्रोपोलाजिकल सोसाएटी ऑफ् बाँबे.
६ चर्च मिशनरी सोसाएटी.
७ बाँबे आक्झीलरी बायबल सोसाएटी.
८ बाँबे ट्र्याक्ट् आणि बुक सोसाएटी.
९ बाँबे डायओसिसन आडिशनल क्लरजी सोसाएटी.
१० सोसाएटी फॉर प्रमोटिंग खिस्तिअन नॉलेज.
११ बुद्धिवर्धक हिंदु सोसाएटी.
१२ मराठी ज्ञानप्रसारक सोसाएटी.
१३ ओरिएन्टल डिबेटिंग सोसाएटी.

**मंडळ्या व सभा**

नीतिप्रसारक मंडळी.　　गुजराथी ज्ञानवर्धक मंडळी.
आर्यसुधर्मोदय सभा.　　आर्यज्ञानवर्धक सभा.
फार्ब्स गुजराथी सभा.

**बेनिव्होलेंट इंस्टिट्यूशन्स** (धर्मार्थ गृहें)

गोकुळदास तेजपाळ —
- बोर्डिंग स्कूल
- संस्कृत सेमिनरी
- सेमिनरी
- लॉ आणि मेडिकल फंड
- गर्लस स्कूल (कन्याशाळा)
- भाटिया डेस्टिट्यूट रिलिफ इन्टिट्यूशन.

रॉयल आलफ्रेड सेलर्स होम.
शेफर्डस आम हौस—भायखळा.
बाँबे इन्स्टिट्यूशन ऑफ् डेफ आणि म्यूट्स
चारीटेबल सोसाएटी ऑफ् सेंट व्हिन्सेट डी पॉल
बाँबे डिस्ट्रिक्ट बेनिव्होलेंट सोसाएटी
पांडेची धर्मशाळा.
होम फार पुअर पारशीज.
युरोपिअन पेन्शनर्स आणि विडोज होम.

एम्. एफ्. पांडे स्यानिटेरिएम. (मेहरबान बाग)
आदमजी पीरभाई स्यानिटेरिएम.
बॉंबे सोसाएटी फॉर धि प्रिव्हेन्शन ऑफ् क्र्युएल्टी टु आनिमल्स.

### स्पिनिंग आणि विव्हींग कंपन्या

१ आग्रा स्पिनिंग आणि विव्हींग कंपनी लिमिटेड.
२ अकबर म्यानुफ्याकचरिंग आणि प्रेस कंपनी लिमिटेड.
३ अलायन्स कॉटन म्यानुफ्याकचरिंग कं. लिमिटेड.
४ आंग्लो इंदियन स्पिनिंग आणि म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
५ बेलारी प्रेस कं. लि.
६ भावनगर सिटी प्रेस आणि म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
७ बॉंबे कॉटन प्रेस कं. लि.
८ बॉंबे कॉटन म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
९ बॉंबे न्याशनल म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
१०. बॉंबे युनायटेड स्पिनिंग आणि विव्हींग कं. लि.
११ सिटी ऑफ् बॉंबे म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
१२ कुलाबा ल्यांड आणि मिल कं. लि.
१३ कुलाबा ल्यांड प्रेस कं. लि.
१४ कनाट मिल्स कं. लि.
१५ कुर्ला स्पिनिंग आणि विव्हींग कं. लि.
१६ धन मिल्स कं. लि.
१७ एम्प्रेस स्पिनिंग आणि विव्हींग कं. लि.
१८ फोर्ट प्रेस कं. लि.
१९ फ्रामजी पेटीटस् स्पिनिंग आणि म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
२० गार्डन्स— " " " " "
२१ हारव्हे आणि सबापती कं.
२२ हिंदुस्तान स्पिनिंग आणि विव्हींग मिल्स कं. लि.
२३ हावर्ड आणि बलो मिल्स कं. लि.
२४ इंपीरियल कॉटन मिल्स कं. लि.
२५ इंडियन म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
२६ जाधवजी राघवजी मिल्स लि.

२७ जाफरअली स्पिनिंग आणि विव्हींग कं. लि.
२८ जेम्स ग्रिव्हस् मिल्स कं. लि.
२९ जमशेद म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
३० जीवराज बाळू स्पिनिंग आणि विव्हींग कं. लि.
३१ जुबिली म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
३२ खटाव स्पिनिंग आणि विव्हींग कं. लि.
३३ लखमीदास खिमजी स्पिनिंग आणि विव्हींग कं. लि.
३४ माणकजी पेटीट म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
३५ माजगांव स्पिनिंग आणि म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
३६ मोफ्युसल कं. लि.
३७ मुरारजी गोकुळदास स्पिनिंग आणि विव्हींग कं. लि.
३८ नायगांव कॉटन क्लिनिंग आणि म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
३९ न्याशनल स्पिनिंग आणि विव्हींग कंपनी ऑफ इंदिया लि.
४० न्यू अपालो प्रेस कंपनी लिमिटेड.
४१ न्यू बझार कंपनी लिमिटेड.
४२ न्यू ईस्ट इंदिया प्रेस कं. लि.
४३ न्यू ग्रेट ईस्टर्न स्पि. आणि वि. कं. लि.
४४ धि प्रिन्स ऑफ् वेल्स स्पिनिंग आणि विव्हींग कं. लि.
४५ ओरिएन्टल स्पिनिंग आणि विव्हींग कं. लि.
४६ पीपल ऑफ् इंदिया स्पिनिंग आणि म्यानुफ्याकचरिंग कं.
४७ धि न्यू प्रिन्स ऑफ् वेल्स प्रेस कं. लि.
४८ क्विन स्पिनिंग आणि विव्हींग कं. लि.
४९ रिपन म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
५० ससून स्पिनिंग आणि विव्हींग कं. लि.
५१ शेक इसुफभाई खलिफा मिल्स कं. लि.
५२ सुंदरदास स्पिनिंग आणि विव्हींग मिल्स कं. लि.
५३ स्टार ऑफ् इंदिया मिल्स लि.
५४ स्वदेशी मिल्स कं. लि.
५५ व्हिक्टोरिया म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
५६ वेस्टर्न इंदिया स्पिनिंग म्यानुफ्याकचरिंग कं. लि.

## फ्लोअर आणि ऑईल् मिल्स कंपन्या

१ बाँबे फ्लोअर मिल्स कं. लि.
२ ब्याप्टी ब्रदर्स कं. लि.
३ कॉलेट फ्लोअर आणि ऑईल मिल्स कं. लि.
४ एम्प्रेस रोलर फ्लोअर मिल्स कं. लि.
५ इंडियन फ्लोअर मिल्स आणि म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
६ इंडियन ऑईल मिल् आणि म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
७ मास्तर फ्लोअर मिल्स म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
८ ओरिएन्टल ऑईल आणि फ्लोअर म्यानुफ्याकचरिंग कं. लि.
९ परसिव्हिअरन्स फ्लोअर मिल्स आणि आयर्न फाउन्डरी लि.
१० रायल फ्लोअर मिल्स कं. लि.
११ वेस्टर्न इंडिया रॉयल फ्लोअर मिल्स कं. लि.

## किरकोळ कंपन्या वगैरे

गोल्ड मायनिंग कं.
केसरी हिंद गोल्ड मायनिंग कं. लि.
आईस कंपनी.
बाँबे आईस म्यानुफ्याकचरिंग कंपनी.
डेकन आईस कंपनी लिमिटेड.
महाराणी आईस कंपनी लिमिटेड.
ग्यास कंपनी.
बाँबे ग्यास कंपनी.
लाईफ इन्शुअरन्स कंपनी.
बाँबे म्यूचुअल लाईफ अशुअरन्स कंपनी.
इंडिया ग्यारन्टी आणि शुअरटीशिप असोशिएशन लिमिटेड.
ओरिएन्टल लाईफ अशुअरन्स कंपनी लिमिटेड.
ओरिएन्टल लोन असोशिएशन कंपनी लिमिटेड.
स्टांडर्ड लाईफ अशुअरन्स कंपनी लिमिटेड.
फायर इन्शुअरन्स कंपनी.
बाँबे फायर इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड.
इंडियन फायर इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड.

एम्पायर फायर इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड.
स्टीम न्याव्हिगेशन कंपनी.
पि. आणि ओ. ”
आस्ट्रो हंगेरियन लॉईडस् स्टीम न्याव्हिगेशन कंपनी.
ब्रिटीश इंडिया स्टीम न्याव्हिगेशन ”
फ्लोरिओ आणि रुब्याटिनो युनायटेड ”
बॉंबे ल्यांड आणि बिल्डींग कंपनी.
बॉंबे टेलिफोन ”
कोआपरेटिव्ह स्टोअर्स ”
नेपिअर हाटेल कंपनी लिमिटेड.
पिअर्स आणि ” ”
पोर्ट क्यानिंग आणि ल्यांड इम्प्रुव्हिंग कंपनी.
रिपन प्ल्यांटिंग कं. लि.
टेलीफोन ” ”

## पोस्ट ऑफिसें

| | |
|---|---|
| जनरल पोस्ट ऑफिस. | माजगांव. |
| मिडल कुलाबा. | मांडवी. |
| मलबारहिल्. | ताडदेव. |
| व्हिक्टोरिया टरमिनस. | दादर. |
| काळबादेवी रोड. | माहिम. |
| भायखळा. | प्रिन्सेसडाक्. |
| गिरगांव | परळ. |
| उमरखाडी. | शिवाय रस्तोरस्तीं खांब आहेत ते निराळेच. |

## टेलीग्राफ ऑफिसें

| | |
|---|---|
| जनरल टेलीग्राफ ऑफिस. | मलबारहिल्. |
| व्हिक्टोरिया टरमिनस. | भायखळा. |
| मिडल कुलाबा. | गिरगांव. |
| मुंबादेवी. | मशीदबंदर. |

## केमिस्ट आणि ड्रगिस्ट

| | |
|---|---|
| कुपर मादन आणि कंपनी. | केंप आणि कंपनी. |

फरन्यांडीज आणि कंपनी.
थामसन आणि कंपनी.
फिलिप्स आणि कंपनी
ट्रेचर आणि कंपनी.

## डेंटिस्ट (दंतवैद्य)

एफ. बी. सिरव्हई.
वॉल्टन आणि ब्रांम्बी.
एन. पी. धिस्टा.

## हौस एजंट्स

कुट्स आणि सखारामजी.
इ. डब्ल्यू फ्लोअर.
पी. बैरामजी.

## फोटोग्राफर्स

बाँबे फोटोग्राफिक कंपनी
व्ह्यासीनो (पी) आणि कंपनी.
बोर्न आणि शेफर्ड.
एफ्. आशले आणि कंपनी.

## बुकसेलर्स

गव्हर्नमेंट सेंट्रल बुक डिपो.
थाकर आणि कंपनी.
ट्र्याक्ट आणि बुक सोसायटी.
गोपाळ नारायण आणि कंपनी.
बी. एक्स. फरटाडो आणि ब्रदर्स.
कुपर मादन आणि कंपनी.
बायबल सोसायटी.
राधाबाई आत्माराम सगुण आणि कंपनी.
जनार्दन महादेव गुर्जर.
इरकशा करानी आणि कंपनी.
हार्मसजी सोराबजी आणि कंपनी.
जहांगीर बेझनजी करानी आणि कंपनी.
एम्. मिस्त्री आणि कंपनी.
सुंदर पांडुरंग आणि कंपनी.
ज्येष्ठाराम मुकुंदजी.
गणपत कृष्णाजी.
गंगाविष्णु श्रीकृष्णदास.
सोसायटी फॉर प्रमोटिंग क्रिस्तीयन नॉलेज.
हरीप्रसाद भगीरथ.

## पुस्तकालयें (लायब्रऱ्या)

१ बाँबे बेनिव्होलेंट लायब्ररी.
२ क्याथलिक लायब्ररी आणि रिडींग रूम.
३ कावसजी दिनशा रिडींग रूम आणि लायब्ररी.
४ धनजीभाई फ्रामजी लायब्ररी.
५ फोर्ट रिडींग रूम आणि लायब्ररी.
६ हिंदु ज्ञानवर्धक लायब्ररी.
७ खोजा नूरमहंमद जनरल रिडींग रूम आणि लायब्ररी.
८ लॉ लायब्ररी.
९ परेल मेक्यानिक्स इंस्टिट्युशन.
१० लुसो इंदियानो लायब्ररी आणि रिडींग रूम.
११ ससून मेक्यानिक्स इंस्टिट्युशन.
१२ माझगांव रिडींग आणि रिक्रीएशन रूम.
१३ यंग मेन्स क्रिस्तीयन असोसिएशन.
१४ नेटीव जनरल लायब्ररी.
१५ पारोचिअल लायब्ररी.
१६ भुलेश्वर लायब्ररी.
१७ थिआसॉफिकल सोसायटीची लायब्ररी.
१८ आंजुमन इसलाम लायब्ररी.
१९ गिरगांव लायब्ररी.
२० दयानंद पुस्तकालय.
२१ बाँबे सरक्युलेटिंग लायब्ररी.
२२ बाहेरकोट इम्प्रुव्हमेंट लायब्ररी.
२३ दिनशा पेटिट कांडा आणि भरोचा मोहोला लायब्ररी.
२४ माऊंट रोड लायब्ररी.
२५ फ्रयाटरनल असोशिएशन लेडीज एण्ड जन्टलमेन्स सरक्युलेटिंग लायब्ररी.
२६ मुलजी जीवराज खोजा जनरल रिंडींग रूम आणि लायब्ररी.
२७ धि रायल एशिआटिक सोसायटीची लायब्ररी.
२८ दैवज्ञ सरक्युलेटिंग लायब्ररी.

## वर्तमानपत्रें आणि मासिक पुस्तकें

### इंग्रजी

#### दररोज निघणारीं

टाईम्स ऑफ इंदिया. आडव्होकेट ऑफ् इंदिया.
बांबे ग्याझेट.

#### कॉमर्शिअल (व्यापारसंबंधीं)

डेली मर्चंट्स कंप्यानिअन.
डेली कॉमर्शिअल सेल्स रिपोर्ट.
धि चेम्बर ऑफ् कॉमर्स डेली ट्रेड रिटर्न्स.

#### बायविकली (आठवड्यातून दोनदां निघणारीं)

टाईम्स ऑफ् इंदिया बायविकली एडिशन.
धि आर्मी जनरल ऑर्डर्स.

#### विकली (साप्ताहिक)

टाईम्स ऑफ् इंदिया विकली एडिशन.
" " " ओव्हरलंड समरी.
धि बाँबे एक्स्चेंज प्राईस करन्ट.
" " ग्याझेट ओव्हरलंड समरी.
" " प्राईस करन्ट.
धि ओव्हरलंड कॉमर्शिअल ग्याझेट.
धि बाँबे गव्हर्मेंट ग्याझेट.
धि बाँबे गार्डीयन.
धि बाँबे क्याथालिक एक्झामिनर.
धि इंग्लिश मेल.
धि इंदियन स्पेक्टेटर.

#### मासिक

धि व्हाईस ऑफ इंदिया.
धि टीचर.
धि आर्मी लिस्ट.
धि इंदियन आंटिक्वेरी.

धि बाँबे एज्युकेशनल रेकार्ड.
धि इंदियन ए. बी. सी. रेलवे गाईड.
धि जी. आय्. पी. रेलवे गाईड.
धि इंदियन ट्राव्हेलर्स गाईड.

**तिमाही**

धि सिव्हिल लिस्ट.
त्रिमासिक टीकाकार (गुजराथी)

**वार्षिक**

धि टाईम्स ऑफ इंदिया क्यालेंडर आणि डायरेक्टरी.
म्याक्लिन्स गाईड टु बाँबे.

**धि आंग्लो पोर्टुगीज**

ओ आंग्लो ल्युसिट्यानो (साप्ताहिक).

**इंग्लिश आणि मराठी** (दररोज).

प्रभाकर.

**बाय विकली**

नेटीव ओपिनिअन.

**साप्ताहिक**

सुबोधपत्रिका.
दीनबंधु.
ज्ञानोदय.
तेलगूपंच.
तेलगूमित्र.
वार्ताहर.
इंदुप्रकाश.

**इंग्लिश आणि गुजराथी** (मासिक)

पिकिंग्स फ्रॉम धि पारशी पंच

**गुजराथी** (दररोज)

मुंबई समाचार.
जामेजमशेद.
अखबार—इ—सौदागर.

**साप्ताहिक**

रास्तगोफ्तार तथा सत्यप्रकाश.
सत्यमित्र.
केसर—इ—हिंद.
एसदनपारस्त.
लोकमित्र.
गुजराथी.

पारसी पंच

सत्यवक्ता.

**आठवड्यांतून तीनदां निघणारीं**

मुंबई काशीद.

**पाक्षिक**

पंधरवड्यांनीं मजा.

गपसप.

**मासिक**

(गुजराथी).
स्त्रीबोध.
नुरेएलम.
फुरसुद.
आर्यधर्मप्रकाश.
ज्ञानवर्धक.
विद्यामित्र.
आर्यप्रकाश.
गुलअफ्शान
मधुरवचन.
सच्चिदानंद.

(मराठी).
वाग्विलास.
विविधज्ञानविस्तार.
गृहिणी.
बालबोध.
चंद्रकांत.
काव्यमाला.
स्वदेशवत्सल.
काव्यमाला (संस्कृत.)
सार्वजनिक

**हिंदुस्थानी** (साप्ताहिक)

काशपुल अखबार.

शौकत--इ—हिंद.

**आंग्लो कानडी** (साप्ताहिक)

हव्यक् सुबोक.

कानडी सुवार्ता.

**आरबी** (साप्ताहिक)

नखमात एल् अखबार.

**इंग्रजी मराठी व उर्दू**

पंडित.

**रिफ्रेशमेंट रूम्स्** (उपहार गृहें)

१ अपालो रिफ्रेशमेंट रूम्स—अपालोबंदर.
२ बार्लिंगटन " —मेडोस्ट्रीट.
३ क्रिटेरियन " —एस्प्लेनेड रोड.
४ एम्प्रेस ऑफ् इंदिया —मरीन स्ट्रीट.

## हॉटेलस् (खाणावळी)

१ आडेलफी फ्यामिली हॉटेल— क्ले रोड भायखळा.
२ आडेलफी हॉटेल— ''
३ अपोलोबंदर हॉटेल—अपालोबंदर.
४ भायखळा हॉटेल—भायखळा.
५ बाँबे हॉटेल—ट्यामरिन्ड लेन.
६ कुलाबा हॉटेल—कुलाबा.
७ कंबाला फ्यामिली हॉटेल—कंबाला हिल्.
८ इंग्लिश हॉटेल—हार्नबीरोड.
९ फिट्झेरल्ड हॉटेल—परेल रोड, भायखळा.
१० एस्प्लेनेड हॉटेल—एस्प्लेनेड रोड.
११ ग्रांटरोड हॉटेल—ग्रांटरोड.
१२ लंडन हॉटेल—ग्रांटरोड.
१३ ग्रेट वेस्टर्न हॉटेल—अपालो रोड.
१४ ह्यामिल्टन हॉटेल व जिमखाना—माजगांव.
१५ टेंपलबार हॉटेल—मेडोस्ट्रीट व एस्प्लेनेड रोड.
१६ इंम्पीरियल हॉटेल—दलाल स्ट्रीट.
१७ प्रिन्स आफ् वेल्स हॉटेल—मरिन स्ट्रीट.
१८ टेलर्स हॉटेल—मेडो स्ट्रीट.
१९ व्हिक्टोरिया हॉटेल—परळरोड आणि एस्प्लेनेड.
२० वेव्हलरी हॉटेल—फोर्ट.
२१ वेलिंगटन हॉटेल—फॉर्ब्स स्ट्रीट.
२२ नारायण भोजन व वस्ती गृह (नेटिवांकरितां)—उमरखाडी व ठाकूरद्वार.

## क्लब्स् (मंडळ्या)

१ बाँबे क्लब.
२ बाँबे जिमखाना क्लब.
३ भायखळा क्लब.
४ रायल बाँबे याच्ट क्लब.
५ कार्लटन क्लब.
६ रिपन क्लब.
७ आर्य ब्रह्म संसद.
८ व्हॉलंटिअर क्लब.
९ क्लब ऑफ् वेस्टर्न इंदिया.
१० हिंदु युनियन क्लब.
११ वेस्टर्न इंदिया टर्फ क्लब.
१२ क्यानरा क्लब.
१३ ब्राह्मण क्लब.
१४ सारस्वत समूह.

## हॉस्पिटलस्

१ काबसजी जहांगीर अपथॉलामिक इन्स्टिट्यूशन—भायखळा.
२ युरोपिअन जनरल हॉस्पिटल—फोर्ट.
३ सेंट जोसेफस फौन्डलिंग् हॉस्पिटल—व्हिक्टोरिया क्रॉसरोड.
४ गोकुळदास तेजपाळ हॉस्पिटल—कारन्याकरोड.
५ हॉस्पिटल फॉर लेपर्स आणि इनक्यूरेबल्स—भायखळा.
६ सर जमशेटजी जीजीभाई हॉस्पिटल—भायखळा.
७ कामा हॉस्पिटल—क्विन्सरोड.
८ आय् आणि इयर इन्फर्मरी—गिरगांव.
९ पारसी ओरतने माटे सुवावडखानुं—मरिन लाईन्स.
१० भाई सकवारबाई दिन्नशा पेटिट हॉस्पिटल फॉर आनिमलस्—परळ.

## डिस्पेन्सऱ्या (दवाखाने)

१ बॉंबे नेटीव डिस्पेन्सरी—चंदनवाडी.
२ फोर्ट ग्याचुइटस डिस्पेन्सरी—ओल्ड बराक लेन.
३ जहांगीर नसरवानजी वाडिया डिस्पेन्सरी—माहिम.
४ जगन्नाथ शंकरशेट डिस्पेन्सरी—ताडदेव.
५ खेतवाडी नेटीव डिस्पेन्सरी—खेतवाडी.
६ खोजा साजनभाय मीरअली डिस्पेन्सरी—शामजी हसाजी स्ट्रीट.
७ लवजी वाडिया डिस्पेन्सरी—परळ.
८ होमिओप्याथिक डिस्पेन्सरी—काळबादेवी व फोर्ट.
९ थिआसाफिकल सोसायटीची होमिओप्याथिक डिस्पेन्सरी.
१० जाफर सुलेमानची डिस्पेन्सरी—मैदान.
११ नसर्वानजी माणकजी पेटीट डिस्पेन्सरी.
१२ कमू सुलेमानची डिस्पेन्सरी—बोरीबंदर.

## वेळादर्शक कोष्टक

**ग्रीनिच** येथील घड्याळांत दुपारी १२ वाजले अशी कल्पना केली असतां त्याच वेळीं पृथ्वीवरील इतर मुख्य मुख्य शहरीं किती वाजले समजतां यावे ह्मणून खालील कोष्टक वाचकां.

| शहराचें नांव | वेळ | शहराचें नांव | वेळ |
|---|---|---|---|
| | सकाळीं ता.मि. (A.M.) | | रात्रौ ता. मि. (P. M.) |
| (१) | (२) | (३) | (४) |
| बोस्टन.— | " ७-१८ | केप टौन. | " १-१ |
| डब्लिन.— | " ११-३५ | कॉन्स्टच्यांटि- | " |
| एडिनबरो.— | " ११-४७ | नोपल | " १-५६ |
| ग्लासगो.— | " ११-४३ | कोपन हेगन. | " १२-५० |
| लिस्बन.— | " ११-४३ | फ्लॉरेन्स. | " १२-४५ |
| म्याड्रिड.— | " ११-४५ | यरूसलेम | " २-२१ |
| न्यू यॉर्क.— | " ७-१४ | मद्रास | " ५-२१ |
| पेनझ्यान्स.— | " ११-३८ | माल्टा | " १२-५८ |
| फिलाडेल्फिया.— | " ६-५९ | मेलबोर्न, ऑस्ट्रेलिया. | " ९-४० |
| क्यूबेक.— | " ७-१५ | | |
| | (P. M.) | | |
| एडिलेड, ऑस्ट्रेलिया | रात्रौ ९-११ | मास्को. | " २-३० |
| आम्स्टर्डम.— | " १२-१९ | म्यूनिच. | " १२-४६ |
| आथेन्स.— | " १-३५ | प्यारिस. | " १२-९ |
| बर्लिन.— | " १२-५४ | पेकिन. | " ७-४६ |
| बेर्न.— | " १२-३० | प्रेग्यु. | " १२-५८ |
| मुंबई— | " ४-५२ | रोम(रूमशाम) | " १२-५० |
| ब्रुसेल्स.— | " १२-१७ | रॉटरडम | " १२-१८ |
| कलकत्ता.— | " -५४ | सेंटपिटर्सबर्ग. | " २-१ |

| | | |
|---|---|---|
| सुएझ.— | रात्रौ | २-१० |
| सिड्नी, आस्ट्रेलिया— | " | १०-५ |
| स्टॉकहोम.— | " | १-१२ |
| स्ट्रटगार्ट.— | " | १२-३७ |
| | " | १-० |

## मुंबईतील जत्रा

| जत्रा भरण्याची जागा. (१) | कारण. (२) | दिवस. (३) |
|---|---|---|
| महालक्ष्मी खेडें .. | चैत्र पौर्णिमा. .. | ४ |
| ,, .. | धाकलेश्वर .. | २ |
| ,, .. | दसरा .. | ३ |
| ताडदेव रोड .. | रघुवीर .. | ४ |
| ग्रांट रोड .. .. | चरणदास उदासीचे देवळाची. | ५ |
| मांगेल वाडी .. | पीरशाह नवाज .. | २ |
| मुंबादेवी .. .. | दसरा .. | ३ |
| वाळुकेश्वर रोड .. | पिठोरी अमावास्या .. | ४ |
| घोडपदेव रोड .. | सिद्धेश्वर देवालय .. | ३ |
| गनापौडर रोड .. | माणकेश्वर देवालयाची | ३ |
| ,, .. | ,, .. | ३ |
| परल रोड .. | ,, .. | ३ |
| बेलासीस रोड .. | नागपंचमी .. | १ |
| माऊंट रोड .. | आगाखान .. | ३ |
| दादर .. .. | पीर फत्ता अल्ली .. | १ |
| महालक्ष्मी .. | रेसीस (घोड्यांच्या शर्यती) | ७ |
| परळ .. .. | वागेश्वर .. | ४ |
| धारावी .. .. | सैयद पीर कादरी | १ |
| माटुंगा .. .. | विठोबाचें देवालय .. | १ |
| महालक्ष्मी .. | बासी ईद .. | १ |
| मामाहजानी .. | बकरी ईद .. | १ |
| माटुंगें .. .. | शेक मिसरी .. | १ |
| अपर माहिम .. | हसन पीर .. | १ |
| ,, .. | पीर मगखदुम साब | १२ |
| धाकटें माहिम .. | परभादेवी .. | १ |
| मैदान .. .. | नारळी पौर्णिमा .. | १ |
| चौपाटी .. | ,, .. | १ |

| (१) (२) | (३) | |
|---|---|---|
| अपर कुलाबा रोड. . | शेक हसन गजा अल्ली | १ |
| ,, . . | गीआबानशा वली . . | १ |
| लोअर कुलाबा रोड | शेकइस्मायल गजाअल्ली | १ |
| बोरा बाजार स्ट्रीट . . | भीमनाथदेवालय . . | १ |
| मैदान . . . . | पारशी जत्रा . . | १ |
| ,, . . | ,, . . | १ |
| तांडेल स्ट्रीट . . | महंमदशा शाहीद . . | ५ |
| नवा बंगालीपुरा क्रास लेन | बावा गोर . . | १ |
| जुना मेमण वाडा स्ट्रीट | पीर बडा मिया . . | ५ |
| डोंगरी स्ट्रीट . . | आकशा . . . . | १ |
| बाळाजी शामशेट स्ट्रीट | मुद्रादेवी . . . . | ३ |
| पायधुणी रोड . . | कालिकादेवी . . | ३ |
| चंपा गल्ली . . | चंपादेवी . . . . | १ |
| काळबादेवी रोड . . | काळबादेवी . . | १ |
| जुनी सोनापूर स्ट्रीट | सयद अल्वी . . | १ |
| करल वाडी . . | हसनशा कादरी . . | ३ |
| ,, . . | सयद गुलाबशहा . . | १ |
| नवे वाडी . . | महेश्वरी . . . . | ५ |
| बापू खोत स्ट्रीट . . | सयद इस्माईलशहा | १ |
| दुसरा भोयवाडा . . | रामदेव . . . . | २ |
| कीका स्ट्रीट . . | रामदेव . . . . | १ |
| भुलेश्वर रोड . . | रणछोड . . . . | १ |
| खोजा स्ट्रीट . . . . | महादेवी . . . . | १ |
| अर्स्किन रोड . . | मदारशहा . . | १ |
| पहिली भंडार गल्ली | जुमाशहा . . | १ |
| नवी हनुमान लेन . . | हनुमान . . . . | १ |
| वाळकेश्वर रोड . . | आषाढी एकादशी . . | १ |
| ,, | कार्तिकी एकादशी | ४ |
| ,, | त्रिपुरी पौर्णिमा . . | ५ |
| ,, . . | महा शिवरात्र . . | १ |

## छापखाने

| | | | |
|---|---|---|---|
| जामेजमसेट | प्रेस | रायझिंग स्टार प्रिंटिंग | प्रेस |
| अलायन्स | ,, | रायल .. | ,, |
| प्रेसिडेन्सी प्रिंटींग | ,, | गणपत कृष्णाजी .. | ,, |
| ड्युक ऑफ कनॉट | ,, | गोविंदजी शामजी .. | ,, |
| केसर-इ-हिंद | ,, | आंग्लो जुईश .. | ,, |
| क्याक्स्टन प्रिंटिंग | ,, | कासीद .. | ,, |
| टाईम्स ऑफ इंडिया | ,, | ज्यॉइन्ट स्टॉक .. | ,, |
| फोर्ट प्रिंटिंग | ,, | फतेउल करीम .. | ,, |
| इंडस्ट्रियल | ,, | दत्तप्रसाद .. | ,, |
| ओरिएन्टल | ,, | गुलाम हुसेन .. | ,, |
| गव्हर्मेन्ट सेन्ट्रल | ,, | रघुनाथ कृष्णाजी .. | ,, |
| आडव्होकेट ऑफ इंडिया | ,, | नारायण भिकाजी .. | ,, |
| इक्झामिनर | ,, | ग्रंथप्रकाश .. | ,, |
| व्हाईस ऑफ इंडिया | ,, | बापू हरशेट .. | ,, |
| दफतर आशकारा | ,, | बापू सदाशिव .. | ,, |
| स्टॉडर्ड प्रिंटिंग | ,, | पारशी प्रिंटिंग .. | ,, |
| न्याशनल प्रिंटिंग | ,, | ज्ञानदर्पण .. | ,, |
| रिपोर्ट | ,, | श्रीव्यंकटेश .. | ,, |
| कामर्शिअल | ,, | आर्यन् ट्राक्ट आणि बूकडिपो | ,, |
| अखबारे सौदागर | ,, | बॉम्बे वर्त्तमान .. | ,, |
| सत्यवक्ता | ,, | यूनियन् .. | ,, |
| मुंबईसमाचार | ,, | भारती .. | ,, |
| इंग्लिश व गुजराथी | ,, | कल्पतरु .. | ,, |
| जॉब प्रिंटिंग | ,, | फ्यामिली .. | ,, |
| बॉम्बे मर्चंट | ,, | गोपाळ नारायण .. | ,, |
| झोऱ्यास्ट्रियन प्रिंटिंग | ,, | रिपन प्रिंटिंग .. | ,, |
| गुजराथी प्रिंटिंग | ,, | निर्णयसागर .. | ,, |
| हायकोर्ट | ,, | ऑग्लोल्युसिटानो .. | ,, |
| सालव्हेशन आर्मी | ,, | कर्नाटक प्रिंटिंग .. | ,, |
| | | आडवर टायझर .. | ,, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| निकोलस प्रिंटिंग | प्रेस | जगदीश्वर | .. | प्रेस |
| ज्ञानसागर | ,, | आर्यसेवक | .. | ,, |
| श्रीनारायण | ,, | स्वदेशमित्र | .. | ,, |
| गुजराथ प्रिंटिंग | ,, | गौरीप्रसाद | .. | ,, |
| मुतबई हुसेन | ,, | माजगांव प्रिंटिंग | .. | ,, |
| इंदुप्रकाश | ,, | ऑग्लोव्हर्न्याक्यूलर | .. | ,, |
| भानुप्रकाश | ,, | मुतबे महमदी | .. | ,, |
| मुकदमी | ,, | सुफदारी | .. | ,, |
| ज्ञानमित्र | ,, | चक्रवर्त्तिनी | .. | ,, |
| मदभाई हुसेन | ,, | दीनबंधू | .. | ,, |
| सुबोधप्रकाश | ,, | एज्युकेशनल सोसायटी प्रिंटिंग | | ,, |
| नेटीव ओपिनियन | ,, | श्रीकृष्णभूषण | .. | ,, |
| बॉंबे सिटी | ,, | बॉम्बे गाझीट | .. | ,, |
| न्यायानंद | ,, | हिंदुस्थान प्रिंटिंग | .. | ,, |
| इंडियन प्रिंटिंग | ,, | वेव्हारे प्रिंटिंग | .. | ,, |

## परिशिष्ट : मुंबईतील रस्त्यांची बदललेली नावे

| जुने नाव | नवीन नाव |
|---|---|
| अपोलो पीयर रोड | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग |
| अर्सकिन रोड | ब्रिगेडियर उस्मान मार्ग |
| अल्बर्ट रोड ते रे रोड | वीर तानाजी मालुसरे पथ |
| अल्टामाउंट रोड | सालेभाई करीमजी बरोडावाला मार्ग |
| ॲश लेन (दादर) | डी.एस्.बाब्रेकर मार्ग |
| ॲश लेन (गोखले रोड ते बोले रोड) | ज्ञानमंदिर रोड |
| आग्रिपाडा चाळ स्ट्रीट | माधवराव गांगण पथ |
| आचार्य दोंदे मार्ग ते महाजनी मार्ग | प्रबोधनकार ठाकरे क्रिडांगण मार्ग |
| आर्गिल रोड (कार्नॅक ब्रिज जवळ सुरू) | संत तुकाराम रोड |
| आर्च बंगलो मार्ग | केशवराव बोरकर मार्ग |
| आर्जिणल रोड | नंदलाल जैन रोड |
| आर्थर रोड (जेकब सर्कल ते डिलाइल रोड) | साने गुरुजी रोड |
| आर्थर बंदर रोड पासून सुरू | मिनू देसाई मार्ग |
| ...................... | इब्राहिम रहिमतुल्ला स्ट्रीट |
| ईस्ट ॲव्हेन्यू रोड | शरश्चंद्र चटर्जी मार्ग |
| उमरखाडी रोड (बाबुला टँक ते जेल रोड) | भाऊसाहेब सुर्वे मार्ग |
| उमरखाडी रोड १ व २ | बालु चंगु पाटिल मार्ग |
| एन्.एम्. जोशी मार्गावरील चौक | तात्यासाहेब घोडके चौक |
| एल्फिन्स्टन रोड | जगन्नाथराव भाटनकर मार्ग |
| एस्प्लनेड रोड | महात्मा गांधी मार्ग |
| ऑपेरा हाउस | विष्णु दिगंबर पलुस्कर चौक |
| ओल्ड सट्टा गल्ली | कवी निरज गल्ली |

| | |
|---|---|
| औटरॅम रोड | पुरुषोत्तमदास ठाकूरदास मार्ग |
| क्लाइव्ह रोड | लिलाधर लखमसी शाहा मार्ग |
| क्वीन्स् रोड | महर्षी कर्वे रोड |
| कबूतरखाना | डॉ. यज्ञेश्वर विठ्ठल पुरंदरे चौक |
| कॅनॉट रोड (व्हिक्टोरिआ गार्डन जवळ) | इब्राहिम पाटनवाला रोड |
| करी रोड | महादेव पालव मार्ग |
| करोल रोड | बालशेट मादूरकर मार्ग |
| क्लब बॅक रोड | वाय्.एम्.सी.ए. रोड |
| क्लेअर रोड | मिर्झा गालिब मार्ग |
| क्रेसंट रोड | जीवन भीम मार्ग |
| कांदेवाडी लेन | खाडिलकर रोड |
| कांदेवाडीतील गल्ली | डॉ. एन्.ए.देशमुख पथ |
| कार्नेजी रोड | नाथीबाई ठाकरसी रोड |
| कार्नॅक बंदर (धोबितलाव-भगतसिंग मार्ग) | लो. टिळक मार्ग |
| कार्नॅक बंदर रोड | बाबूराव बोधे मार्ग |
| कारमायकेल रोड | एम्.एल्. डहाणुकर मार्ग |
| क्लार्क रोड | केशवराव खाड्ये मार्ग |
| काउ लेन (गिरगाव) | बंडु गोखले पथ |
| काळबादेवी रोड (गांधी मार्ग-शर्मा स्ट्रीट) | श्री वर्धमान चौक |
| काळबादेवी रोड चौक | विजय वल्लभ चौक |
| काळा घोडा | नेताजी सुभाषचंद्र बोस चौक |
| काळा चौकी रोड | दत्ताराम लाड पथ |
| कॉलेज रोड | एम्.आर. महाजनी मार्ग |
| क्रॉस रोड | डॉ. गजानन पुरंदरे मार्ग |
| क्लीव्ह लॅण्ड रोड | सस्मीश मार्ग |
| किका स्ट्रीट | विजय वल्लभ मार्ग |

| | |
|---|---|
| किंग एडवर्ड रोड | आचार्य दोन्दे मार्ग |
| किंग्रिग रोड | रामभाऊ साळगावकर मार्ग |
| कुंभार तुकडा | कृष्णलाल जव्हेरी रोड |
| कुंभार वाडा स्ट्रीट | संत सेना महाराज मार्ग |
| केळेवाडी | डॉ. भालेराव मार्ग |
| कोलभाट स्ट्रीट | डॉ. बी.एम्. वेलकर स्ट्रीट |
| कोलभाट लेन (पहिली) | सद्गुरु कदम बाबा मार्ग |
| कोळीवाडा (स्टेशनासून सुरू होणारा | मुकुंदराव आंबेडकर रोड |
| कोहिनूर-लखमसी नप्पुशेठ-आंबेडकर रोड | स्वामी ग्यान जीवनजी मार्ग |
| कोहिनूर मार्ग | स्वामी ग्यान जीवनजी मार्ग |
| खार् फर्स्ट रोड | चित्रकार धुरंधर मार्ग |
| खत्तर गल्ली | नाथ माधव पथ |
| खत्तर गल्ली क्रॉस लेन | नाथ माधव क्रॉस पथ |
| खेतवाडी मेन रोड (भाग) | नानुभाई देसाई रोड |
| खेतवाडी मेन रोड (भाग) | पदमसी रोड |
| खेड गल्ली | काशीनाथ गाडगीळ मार्ग |
| गनबो स्ट्रीट | रूस्तुम सिध्वा मार्ग |
| गव्हर्नमेंट गेट रोड | डॉ. एस्.एस्. राव रोड |
| ग्रँट रोड क्रॉस लेन | फुलाजी बुवा नगरे लेन |
| ग्रँट रोड (जे.जे. हॉस्पिटल ते नाना चौक) | मौलाना शोकत अल्ली रोड |
| ग्रॅहॅम रोड | जे.एन्. हेरोडिया रोड |
| अलेक्झांड्रा रोड, गावदेवी | डॉ. काशीबाई नवरंगे मार्ग |
| गिरगाव बॅक रोड | विठ्ठलभाई पटेल रोड |
| गिरगाव रोड | जगन्नाथ शंकरशेट रोड |
| गोखले रोडला जोडणारा रस्ता | प्रिं. रा.सा.एन्.एम्. काळे मार्ग |
| गोखले रोड (हरि निवास समोरील चौक) | राजा बढे चौक |

| | |
|---|---|
| गोखले रोड साउथ (दक्षिण) ते रानडे रोड | पी.एल्. काळे गुरूजी मार्ग |
| गोवालिया टँक मैदान | ऑगस्ट क्रांती मैदान |
| गोलनजी हिल रोड | सखाराम लांजेकर पथ |
| गोवालिया चाळ लेन | शंकरराव नरम पथ |
| घोडबंदर रोड | स्वामी विवेकानंद रोड |
| घोडपदेव रोड | रामभाऊ भोगले मार्ग |
| चर्चगेट चौक | देवी अहिल्याबाई होळकर चौक |
| चर्चगेट स्ट्रीट | वीर नरिमन रोड |
| चांभार लेन, भायखळा | नामदेव उमाजी भालिंगे स्ट्रीट |
| पोकळी रोड | तुकाराम भिकाजी कदम मार्ग |
| चिचबंदर रोड (भाग) | डॉ. पी. मैशेरी मार्ग |
| चिचबंदर रोड (भाग) | केशवजी नाईक रोड |
| चौपाटी बँड स्टँड चौक | कविवर्य भा.रा. तांबे चौक |
| चौपाटी लेन | कुलपती के.एम्. मुनशी मार्ग |
| छकटे वाडी | तुळशी वाडी |
| डॉ. छोटीराम गिडवाई रोड | ...... .......... |
| जिमखाना रोड | प्रो. यू.यू. भट मार्ग |
| जुनी हनुमान लेन | धिरूभाई पारीख मार्ग |
| प्रभादेवीपासून समुद्रापर्यंत | पी. बाळू मार्ग |
| जुने नागपाडा रोड | महमंद इब्राहिम सारंग मार्ग |
| जुने शिव ईस्ट हिल गार्डन | जवाहरलाल नेहरू उद्यान |
| जमशेद रोड ते फाइव गार्डन | खुशालदास पारेख मार्ग |
| जेल रोड नॉर्थ | लक्ष्मण नारायण जाधव मार्ग |
| टंडल स्ट्रीट साउथ | एम्.ए. सारंग मार्ग |
| ठाकुरदास रस्ता (माधवबाग ते क्वीन्स् रोड) | डॉ. बाबासाहेब जयकर मार्ग |
| डॉक्टर स्ट्रीट | सैफी ज्यूबिली स्ट्रीट |
| डिलाइल रोड क्रॉस लेन क्र. १ व २ | एन्.एम्. जोशी क्रॉस मार्ग |

| | |
|---|---|
| डिसूझा स्ट्रीट (मसजिद बंदर ते सॅम्युअल स्ट्रीट) | वीर विठ्ठलदास चंदर स्ट्रीट |
| डुआर्ट ओआर्ट | साई धाम वाडी |
| डुकरवाडी | विजय वाडी |
| डोंगरी स्ट्रीट | शयदा मार्ग |
| त्रिभुवन रोड | त्रिभुवन रोड |
| ताडदेव रोड (नाना चौक ते ताडदेव नाका) | जावजी दादाजी रोड |
| ताडदेव रोड-खाड्येमार्ग-लजपत-राम मार्ग | वत्सलाबाई देसाई चौक |
| तुळशी पाइप रोड | सेनापती बापट मार्ग |
| तुळशीराम पाडा स्ट्रीट | अनंत मालवणकर पथ |
| तेली गल्ली | क्रांतिरत्न विष्णु गणेश पिंगळे मार्ग |
| टॉमस स्ट्रीट | लाला निगम रोड |
| दादर रोड क्र. १६ | सेंट पॉल स्ट्रीट |
| ले. गुप्ते मार्ग ते लेडी जमशेटजी रोड | पं. जगन्नाथ बुवा पुरोहित मार्ग |
| दौगल रोड | नरोत्तम मुरारजी मार्ग |
| धारावी क्रॉस रोड जवळ | सम्राट अशोक मार्ग |
| धोबी तलाव चौक | क्रान्तिवीर वासुदेव बळवंत फडके चौक |
| नवी भटवाडी | अवंतिकाबाई गोखले रोड |
| नरसी नाथा स्ट्रीट | .......... ............ |
| न्यू क्विन्स् रोड (मॅथ्यू रोड ते ऑपरा हाऊस) | मामा परमानंद मार्ग |
| न्यू नागपाडा व्हिक्टोरिया गार्डन रोड | सोफिया झुबेर रोड |
| न्यू मरीन लाइन्स स्ट्रीट | सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग |
| न्यू लोहार स्ट्रीट | कांतिलाल शर्मा स्ट्रीट |
| न्यू साखळी स्ट्रीट | सौतेर स्ट्रीट |
| नानाजी जेल रोड | सामंतभाई नानाजी मार्ग |

| | |
|---|---|
| नायगाव ३रा रस्ता | ज्योतिबा फुले रोड |
| नायगाव १२वा रस्ता | मोरबाग रोड |
| नायगाव १३वा रस्ता | डॉ. बी.जे. देवरूखकर स्ट्रीट |
| नायगाव १५वा रस्ता | गोविंदजी केणी रोड |
| नायगाव १७वा रस्ता | सेंट झेवियर स्ट्रीट |
| निकद वरी लेन | एस्. व्ही. सावंत पथ |
| नेपियन रोड | एल्. जी. रूपारेल मार्ग |
| नेस्बीट रोड | सरदार बलवंत सिंग धोडी मार्ग |
| परेल चौक पासून व्हिन्सेंट रोड | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग |
| परेल टँक रोड | जी. डी. आम्बेकर मार्ग |
| पॅराडाइस सिनेमा लेन | भागोजी कीर मार्ग |
| प्लॅनेट मिल लेन | दाजी तुकाराम राऊत मार्ग |
| पंडिता रमाबाई मार्ग जंक्शन | पाठारे क्षत्रिय वक्तृत्वोत्तेजक समाज चौक |
| प्रॉक्टर रोड | वाडिलाल पटेल मार्ग |
| पायधुणी रोड | इब्राहिम मर्चंट रोड |
| पार्शी कॉलनी रोड क्र. १२ | सोराब पालम कोटे रोड |
| पार्शी वाडा तिसरी गल्ली | डॉ. विल्सन स्ट्रीट |
| पिकेट क्रॉस रोड | रतनसी चामसी पथ |
| पेडर रोड (केम्प फ्लाय ओव्हर पासून) | डॉ. गोपाळराव देशमुख मार्ग |
| पोर्तुगीज चर्च (गिरगाव) चौक | अनंत हरि गद्रे चौक |
| पोर्तुगीज चर्च (दादर) चौक | प्रबोधनकार ठाकरे चौक |
| पोर्तुगीज चर्च स्ट्रीट | रा. ब. एस् के. बोले रोड |
| फणसवाडी स्ट्रीट (दुसरी) | दादासाहेब परूळेकर मार्ग |
| फणस वाडी स्ट्रीट | सिताराम पोद्दार रोड |
| फर्ग्यूसन रोड | गणपतराव कदम मार्ग |
| फोर शोअर रोड | जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग |
| फॉक्लंड रोड | पठ्ठे बापूराव मार्ग |
| फ्रियर रोड (फोर्ट स्टेशन ते ससून डॉक) | शहीद भगतसिंग रोड |
| फ्रियर रोड (फोर्ट स्ट्रीट ते रे रोड) | डिमेलो रोड |

| | |
|---|---|
| फ्रेंच रोड (विल्सन कॉलेज जवळ) | डॉ. आत्माराम रामचंद्र रांगणेकर मार्ग |
| फोरास रोड (भाग) | लॅमिंटन क्रॉस रोड |
| फोरास रोड (फॉकलंड रोड पासून) | आर्. एस्. निमकर मार्ग |
| फोर्ब्स स्ट्रीट मा.गां.रो. ते अपोलो स्ट्रीट | डॉ. व्ही. बी. गांधी मार्ग |
| फोर्जेट हिल | क्रांतिवीर वसंतराव नारायण नाईक मार्ग |
| फणसवाडी स्ट्रीट (दुसरी) | दादासाहेब परूळेकर मार्ग |
| बदक चाळ लेन | समर्थ हनुमान मार्ग |
| बनाम हॉल लेन | डॉ. डी. डी. साठे मार्ग |
| बनियन रोड | अलारखा इब्राहिम पटेल मार्ग |
| बॅस्टीयन रोड | अमृत केशव नाईक मार्ग |
| जुना घोडबंदर रोड बझार रोड पर्यंत | जैन मंदिर रोड |
| बझार गेट स्ट्रीट | पेरीन नरीमन स्ट्रीट |
| बझार रोड | नारायण दायाभाई मार्ग |
| बरोज लेन (ठाकुरद्वार) | जगन्नाथ शंकरशेट मार्ग |
| ब्राह्मण वाडा रोड | के. ड. सुब्रमन्यम रोड |
| बाबुला टँक रोड | रामचंद्र भट मार्ग |
| बाल संभाजी जिम्नॅशियम समोरील रस्ता | व्ही. एल्. पेडणेकर भाग |
| बेलासिस् रोड | जहांगिर बोमन बेहराम मार्ग |
| बेलासिस् रोड भाग | डिम्टिमकर रोड |
| बेल्वेडर रोड | दत्ताराम भाऊ कायंदे मार्ग |
| बेल्वेडर हिल रोड | हुसेन पटेल मार्ग |
| ब्रोच स्ट्रीट | देवजी रतनसी मार्ग |
| बोरा क्रॉस लेन | इन्दु साक्रीकर पथ |
| बोरा स्ट्रीट | पंढरीनाथ लक्ष्मण पाटील मार्ग |
| बोरी बंदर चौक | नगर चौक |
| भंडारवाडा रोड ते बाबरेकर रोड | भिकोबा वामन पाठारे रोड |
| भंडारी स्ट्रीट (मसजिद बंदर जवळ) | नारायणराव कोळी मार्ग |
| भवानी शंकर रोड ते सेनापती बापट मार्ग | डॉ. एम्. सी. जावळे मार्ग |

| | |
|---|---|
| भांडार गल्ली | ले. प्रकाश नारायण कोटणीस पथ |
| भाटिया हॉस्पिटल समोरील रस्ता | दिनानाथ मंगेशकर मार्ग |
| भायखळा स्टेशन रोड | गणेश हरि पुरुंडेकर मार्ग |
| भुलाभाई देसाई रोड/ डॉ. देशमुख मार्ग | डॉ. एम्. एस्. प्रभू चौक |
| भेंडी बझार चौक | जोहार चौक |
| भोईवाडा जंक्शन | माने मास्तर चौक |
| मरीन ड्राइव्ह | नेताजी सुभाष मार्ग |
| मरीन लाइन्स फ्लायओव्हर | भाऊ साहेब बांदोडकर मार्ग |
| मरीन लाइन्स् स्ट्रीट | सर दिनशा मुल्ला रोड |
| महात्मा गांधी रोड / भाऊराव पाटील मार्ग | चाफेकर बंधू चौक |
| माउंटप्लेझंट रोड | भाऊसाहेब हिरे मार्ग |
| माउंट रोड | डॉ. मस्करनेस रोड |
| माटुंगा स्टेशन रोड | भवानजी अर्जुन खिमजी मार्ग |
| माटुंगा रोड नं. १ | डी. व्ही. प्रधान रोड |
| मिल्क स्ट्रीट | महमद सिद्दिक अन्सारी मार्ग |
| मुंबई सकाळ प्रेस ते दत्त मंदिर | डॉ. एन्. बी. परूळेकर मार्ग |
| मेडोज स्ट्रीट | नगीनदास मास्तर रोड |
| मेयो रोड | कर्मवीर भाऊराव पाटील रोड |
| मेयोरोड फोरशोअर रोडचा भाग | मॅडम कामा रोड |
| मोगल लेन | पंडित सातवळेकर मार्ग |
| मोरलॅण्ड रोड | अब्दुल हमीद अन्सारी मार्ग |
| मोरी रोड | डॉ. गजानन धर्माजी दांडेकर मार्ग |
| मोहामेडन स्ट्रीट | महमद उमर रजब रोड |
| मोरबाग रोड | एस्. एस् वाघ मार्ग |
| मौलाना शोकत अल्ली रोड / फॉकलंड रोड | डॉ. मिटासिन माहितुरा स्ट्रीट |

| | |
|---|---|
| मौ. आझाद रोड / सी. पी. टँक किका स्ट्रीट | जी. एस्. याज्ञिक चौक |
| रथवाडी ते सावरकर मार्ग | डॉ. वसंत जे. रथ मार्ग |
| (डॉ.) राव रोड ते जी.डी.आंबेकर मार्ग | श्री साईबाबा मार्ग |
| रॅम्पार्ट रोड | कैकाश्रु दुबाश मार्ग |
| रानडे रोड–कॅडल रोड ते समुद्र | ज्ञानेश्वर मंदिर रोड |
| रिपन रोड | मौलाना आझाद सहावी क्रॉस लेन |
| रिज रोड, गिब्स् रोड | बाळ गंगाधर खेर मार्ग |
| रीगल टॉकीज समोरचा चौक | डॉ. शामा प्रसाद मुकर्जी चौक |
| रे रोड (वाडीबंदर ते दत्ताराम-लाड मार्ग) | बॅ. नाथ पै रोड |
| रेनॉल्डस् रोड | डॉ. लीला मेलविल मार्ग |
| रेव्हिल कॅम्प गार्डन | रमाबाई आंबेडकर उद्यान |
| लव्ह ग्रोव्ह रोड | डॉ. ॲनि बेझंट रोड |
| लव्ह लेन (भायखळा ते माउंट रोड) | मोतिशहा रोड |
| लॅमिंटन रोड (मुंबई सेंट्रल पर्यंत) | डॉ. दादासाहेब भडकमकर मार्ग |
| लॅमिंटन रोड (उत्तर) | डॉ. आनंदराव नायर रोड |
| लॅमिंटन रोड क्रॉस रोड | अलिभाई प्रेमजी मार्ग |
| लूप रोड, शीव | गुलमोहर रोड |
| लेडी जमशेटजी रोड (भाग) | न. चिं. केळकर रोड |
| लोहार स्ट्रीट | डॉ. कावसजी होरमसजी स्ट्रीट |
| वरळी रोड नं. १० | डॉ. आर्. जी. थडाणी रोड |
| वरळी हिल रोड | आचार्य अत्रे रोड |
| वाल पाखाडी रोड | मावजी राठोड रोड |
| वॉडवी रोड | हिराचंद सोमाणी मार्ग |
| विल्डर नेस रोड | मानव मंदिर रोड |
| विजय वाडी, गिरगाव | डॉ. नगीनदास शहा मार्ग |
| विंटर रोड, मलबार हिल | रतिलाल आर्. ठक्कर मार्ग |

| | |
|---|---|
| वेलजी लड्डा रोड /विठ्ठलभाई पटेल रोड | शेट मोति पाचन राष्ट्रीय शाळा मार्ग |
| व्हिक्टोरिया बंदर रोड | एन. ए. सावंत मार्ग |
| व्हिक्टोरिया रोड | संत सांवता मार्ग |
| व्हिटेट रोड (बॅलार्डरोडला मिळणारा) | वालचंद हिराचंद मार्ग |
| शाहूनगर ४४ वा रस्ता | संत वाल्मिकी मंदिर मार्ग |
| शिवडी-वडाळा स्कीम ५७ (५०वा रस्ता) | डी. जी. महाजनी पथ |
| शिवडी-वडाळा स्कीम ५७ (२३वा रस्ता) | टिळक रोड एक्स्टेंशन |
| शिवाजी पार्क रोड नं. १-२ | डॉ. मधुकर बी. राऊत रोड |
| शिवाजी पार्क रोड नं. ५ | पांडुरंग नाईक मार्ग |
| शिवाजी पार्क समोरील चौक | राम गणेश गडकरी चौक |
| शिवडी रोड | हडकर मार्ग |
| आचार्य दोन्दे मार्ग क्रॉस आंबेकर मार्ग | संत गोरा कुंभार चौक |
| सन मिल रोड | सिताराम जाधव मार्ग |
| सन मिल क्रॉस लेन | सिताराम जाधव क्रॉस लेन |
| सयानी रोड-खेडगल्ली | हिरवे गुरुजी पथ |
| सयानी रोड से. बा. मार्ग ते सावरकर मार्ग | पी. बाळू मार्ग |
| ससेक्स रोड | दादाजी कोंडदेव मार्ग |
| ससून डॉक रोड, दुसरा | वूमन ग्रॅज्युएट्स् रोड |
| सांकली स्ट्रीट | शेख हफिझुद्दिन मार्ग |
| साखळी स्ट्रीट ४थी गल्ली | बदलू रंगारी स्ट्रीट |
| साने गुरुजी मार्ग / बा. सा. आंबेडकर मार्ग | संताजी महाराज जगनाडे चौक |
| सायन सर्कल | महाराणी लक्ष्मीबाई चौक |
| सावता मार्ग / मस्कारनेस रोड | सावळ्या तांडेल चौक |

| | |
|---|---|
| सॉल्ट पॅन रोड | बर्कत अल्ली दर्गा मार्ग |
| मोरी रोड ते छोटानी रोड | सुनवाला अग्यारी मार्ग |
| सूर्यवंशी हॉल ते शिवाजी पार्क स्मशान | रामकृष्ण महाराज जांभेकर पथ |
| सेंच्यूरी बझार चौक | बाबासाहेब वरळीकर चौक |
| सेंट मायकेल चर्च चौक, माहीम | दामुअण्णा मालवणकर चौक |
| सेंच्यूरी बझार जवळील चौक | खांसाहेब अब्दुल करीम खान चौक |
| सैतान चौकी | गोपीनाथ चव्हाण चौक |
| सोनापूर लेन | श्रीकांत पालेकर मार्ग |
| सोनापूर लेन | सूर्यवंशी क्षत्रीय सभागृह मार्ग |
| सौटर स्ट्रीट | मेघराज शेठी मार्ग |
| स्प्रोट रोड | शिवसागर रामगुलाम मार्ग |
| स्ट्रॅण्ड रोड | प्रेमसिंग जेटसिंग रामचंद्रानी मार्ग |
| स्लेटर रोड | नौशेर भरूचा रोड |
| हमाम स्ट्रीट | अंबालाल दोशी मार्ग |
| हाथीबाग लेन, माझगाव | डॉ. एन्. सिंग रोड |
| हनसाळी टॅंक रोड | राजाराम केशव वैद्य मार्ग |
| हार्कनेस रोड | जमनादास मेहता रोड |
| हार्वे रोड | पंडिता रमाबाई रोड |
| हॉर्न्बी रोड | डॉ. दादादभाई नवरोजी रोड |
| हॉर्न्बी वेलार्ड | लाला लजपतराय मार्ग |
| हॉस्पिटल ॲव्हेन्यू | डॉ. अर्नेस्ट बोर्जेस मार्ग |
| ह्यूजिस् रोड | न्यायमूर्ती सीताराम पाटकर रोड |
| हे स्टॉक रोड | पांडुरंग बुधकर मार्ग |
| हेन्स् रोड भायखळा पूल ते महालक्ष्मी रेल्वे स्टेशन | कॉ. बाबुराव जगताप मार्ग |
| हेन्स् रोड (महालक्ष्मी रे. स्टे. ते वरळी नाका) | डॉ. इ. मोझेस रोड |
| होम स्ट्रीट | चरनजीत राय मार्ग |


| | |
|---|---|
| एस् ब्रीज भायखळा | पी. एस्. मंडलिक ब्रीज |
| श्री सिनेमावरुन जाणारा रस्ता | ले. दिलीप गुप्ते मार्ग |
| वाय् रोड दक्षिण दादर | बाई पद्माबाई ठक्कर रोड |
| जे. व्ही. पी. डी. स्कीम रोड नं. २ | पेल्टोफ्रुम रोड |
| अन्धेरी फ्लाय ओव्हर ब्रिज | गोपाल कृष्ण गोखले ब्रिज |
| अन्धरी–वर्सोवा रोड | जयप्रकाश रोड |
| आग्रा रोडचा भाग | ए. एन्. वाडिया मार्ग |
| आग्रा रोड (कुर्ल्यापासून) | सर्वेश्वर मंदिर रोड |
| आझाद रोड विलेपार्ले (पूर्व) | वीर मकरंद घाणेकर मार्ग |
| ओल्ड पोस्ट ऑफिस रोड | विठ्ठलभाई पटेल रोड |
| कमला हायस्कूल (खार समोर) | श्री. निर्मलदास गर्भलक्ष्मी मार्ग |
| क्वेरी रोड मालाड, | राणी सती मार्ग |
| कार्टर रोड नं. ३ (बोरिवली) | महादेवी देसाई रोड |
| बैल बझार रोड, (कुर्ला-अंधेरी) | काळे मार्ग |
| कुर्ला-अंधेरी रोड | सर मथुरादास वासनजी रोड |
| कोल डोंगरी रोड नं. ३ | माधवराव पेशवे मार्ग |
| कोल डोंगरी रोड नं. २ | दर्यासारंग कान्होजी आंग्रे मार्ग |
| कोल डोंगरी रोड नं. ४ | मुरार बाजी देशपांडे मार्ग |
| खार पाली रोड | प्रेमचंद्र दीपचंद हिनुजा मार्ग |
| गझदर स्ट्रीट, सांताक्रूझ | सरोजिनी नायडू मार्ग |
| गोराई रोड | लोकमान्य टिळक रोड |
| गोवंडी स्टेशन रोड (चेंबूर) | भक्त कवि शिवाजी भाई देवशी मार्ग |
| गोरेगाव (पश्चिम) मितलनगर | श्रीरंग साबडे मार्ग |
| घाटकोपर (पूर्व) फिफ्टी फीट रोड | रामनारायण मार्ग |
| घाटकोपर महुल रोड | रामकृष्ण चेंबूरकर मार्ग |
| घाटिया रोड (बान्द्रा) | नागोजी भिकु मार्ग |
| घोडबंदर रोड (भाग) | स्वामी विवेकानंद रोड |
| घोडबंदर रोड वरील चौक | मांडके बुवा चौक |
| चमारबाग रोड (परेल) | परमार गुरुजी रोड |
| चिराग नगर मार्ग (घाटकोपर) | धर्मवीर संभाजी पथ |

| | |
|---|---|
| चेंबूर गोवंडी रोड | नारायण गजानन आचार्य मार्ग |
| चेंबूर रेल्वे स्टेशन ते देवनार | परेश लहानू लोखंडे मार्ग |
| चेंबूर सिन्धी सोसायटी रोड | रा. ब. शेवाराम देवमल रोड |
| झुलेलाल मंदिर (मुलुंड) | झुलेलाल मंदिर मार्ग |
| जंगल मंगल रोड (भांडुप) | सरदार प्रतापसिंग मार्ग |
| जुहू लेन (अंधेरी) | चुनिलाल बर्फिवाला मार्ग |
| टर्नर रोड (बान्द्रा) | गुरू नानक रोड |
| टर्नर रोड लेन (जुहू) | बैराज सहानी मार्ग |
| टागोर नगर (विक्रोळी) | रमाकांत देशमुख मार्ग |
| टिळक रोड ते अतुबी मेहता मार्ग | श्रीकांत राजचंद्र मार्ग |
| डहाणूकर वाडी (२७२ रोड) | पांडुरंग साळुंके रोड |
| डुपिंग मार्ग (मुलुंड) | पंडित दिनदयाळ उपाध्याय मार्ग<br>दत्तात्रेय कृष्णा शारदा मार्ग |
| तानसा पाइप लाइन ते विनोबा नगर ब्राह्मण वाडी | आचार्य विनोबा भावे मार्ग |
| दहिसर घाट | गणेश घाट |
| दुर्गाबाई बझार रोड | महादेव बावा मार्ग |
| देवनार फिफ्टी फीट रोड | वामन तुकाराम पाटील मार्ग |
| देवनार म्युनिसिपल कॉलनी | कर्मवीर दादासाहेब गायकवाड चौक |
| नवलकर लेन, कुर्ला | आझाद रोड |
| नॅशनल बटन फॅक्टरी जवळील रस्ता | गंगाराम बुवा इंदुलकर मार्ग |
| नारी सेवासदन (घाटकोपर) | नेताजी पालकर मार्ग |
| न्यू गुरूद्वार (मुलुंड) | न्यू गुरूद्वार मार्ग |
| पवई रोड (मलबार हिल) | अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल रोड |
| पाइप रोड (कुर्ला) | मोरेश्वर नारायण पाटणकर मार्ग |
| आरे रोड (गोरेगांव) | श्रीकृष्ण सरस्वती दत्त मार्ग |
| पाली दांडा रोड | डॉ. आंबेडकर रोड |
| पाली हिल | ऑग्झीलियरी कॉन्व्हेंट रोड |


| | |
|---|---|
| पार्शी पंचायत एक्स्टेन्शन रोड (अंधेरी) | जिजामाता रोड |
| फॅक्टरी लेन (बोरिवली) | गोवर्धनदास ढाकरसी लेन |
| बाबू गेनू ते काजूपाडा, भटवाडी (घाटकोपर) | रामचंद्र बजाजी राव कदम क्रॉस रोड<br>बापूभाई वासी रोड |
| बोरिवली रोड नं. १ | श्री. आप्पा साहेब सिद्धये रोड |
| भवानी शंकर व्होरा रोड | गोशाला रोड |
| भानुशाली लेन घाटकोपर | वेलजी नरसी भानुशाली मार्ग |
| भीमनगर (घाटकोपर) | सुभेदार रामजी आंबेडकर मार्ग |
| भोईवाडा रोड (वांद्रा) | नॅशनल लायब्ररी रोड |
| मुलुंड सामळदास स्कीम | सत्यधर्म विद्यापीठ मार्ग |
| मंग्लोरियन गार्डन रोड, विलेपार्ले | वीर बाजी प्रभू देशपांडे मार्ग |
| मट टेंपल ते भावे मार्ग | भास्कर भोपी मार्ग |
| मंडपेश्वर रोड अंधेरी | सरदार वल्लभभाई पटेल रोड |
| मलबार हिल रोड (मुलुंड) | श्री गुरू अर्जुन देव रोड |
| मॅच फॅक्टरी लेन | हुतात्मा प्रभाकर केळुसकर मार्ग |
| मामलतदार वाडी मेन रोड | स्वतंत्र मार्ग |
| मालाड गावठाण रोड | पन्नालाल घोष रोड |
| मार्वे रोड मालाड | चुनिलाल गिरधरलाल मार्ग |
| माहुल व्हिलेज रस्ता | माणिक पांडुरंग पाटणकर मार्ग |
| मिलीटरी रोड | जवाहरलाल नेहरू रोड |
| मिलीटरी रोड (जुहू रोड पर्यंत) | ए.बी. नायर मार्ग |
| मुंबई-आग्रा रोड (सायन ते मुलुंड) | लाल बहादद्दूर शास्त्री मार्ग |
| मुलुंड बॅरक १ ते ८ | झुलेलाल मंदिर क्रॉस रोड |
| मुलुंड कॉलनी मेन रोड | गुरू गोविंद सिंग मार्ग |
| मुरार रोड ते म.गांधी रोड | महाकवि कालिदास मार्ग |
| मेन ॲव्हेन्यू रोड खार | बंकिमचंद्र चतर्जी मार्ग |
| राजेंद्र प्रसाद रोड ते म. गांधी रोड | शहिद मंगल पांडे मार्ग |

| | |
|---|---|
| राममंदिर खेरवाडी (वांद्रा) | श्री राममंदिर पथ |
| लायब्ररी गार्डन चौक (मालाड पश्चिम) | नाना शंकरशेट चौक |
| वढवली व्हिलेज रोड | ॲलोयसियस सोआरेस् मार्ग |
| वरसेकर रोड ते बांद्रा स्टेशन | धोंडोपंत रामजी वरसेकर मार्ग |
| वर्सोवा मेन रोड | पांडुरंग रानडे मार्ग |
| वॉटरफील्ड रोड (वांद्रा) | रामकृष्ण कृष्णाजी पाटकर मार्ग |
| विक्रोळी स्टेशन ते कन्नमवार नगर | फेरोजशा गोद्रेज मार्ग |
| विक्रोळी स्टेशन ते टागोर नगर | परेश पारकर मार्ग |
| विश्वकर्मा नगर ते नेहरू नगर | विश्वकर्मा मार्ग |
| विष्णु स्ट्रीट (विलेपार्ले) | नंदा पातकर स्ट्रीट |
| शान्तीलाल मोदी क्रॉस लेन १ | बालिका विद्यालय मार्ग |
| डहाणुकर वाडी ५०० वा रस्ता | समीर चंदावरकर रोड |
| स्टेशन रोड (गोरेगाव) | केशव (बंडू) गोरे मार्ग |
| स्टेशन रोड (माला पश्चिम) | ईश्वरलाल पारेख मार्ग |
| सावी विहार रोड | बाजी पासलकर मार्ग |
| सिमेट्री रोड वांद्रा | श्री कडेश्वरी मंदिर मार्ग |
| स्टेबल स्ट्रीट | चंद्रमणी बुद्ध विहार मार्ग |
| सांताक्रुझ-गझदर रोड जवळचा रस्ता | श्री सदाशिव गणेश जोशी मार्ग |
| स्टेशन रोड (कुर्ला) | माधवदास अमरसी रोड |
| सोनारी रोड | सुभाष बोस रोड |
| हॉर्शू व्हली म्युनिसिपल कॉलनी | स.गो. बर्वे नगर |
| हिल रोड ते नॅशनल लायब्ररी रोड | राम मंदिर रस्ता |
| हे स्टॅक रोड | भानजी भाई राठोड मार्ग |
| लक्ष्मणजी रोड, मालाड | नानाभाई पलेश्वर रोड |
| हिल रोड (वांद्रा) | श्रीकृष्ण चंद्र मार्ग |
| एअरपोर्ट रस्ता | जरी मरी देवी मार्ग |
| ईस्ट वेस्ट रोड (१०० वा रस्ता) | वैकुंठ मेहता मार्ग |

1. Kola-bhāt
2. Island of Al-O
3. Pallav
4. Tamarind Tre
5. Shrine of Mahi
6. Bhandari Sett
7. Dongri
8. Tamarind or C
9. Koli Settlemen
10. 11. Clumps of Br
12. Kolwar (Cave)
13. Orchard of Jack T
14. Brab Trees.
15. Plantain-grov
16. Koli holdings.











RIVA FORT
WIND MILL
DUNCANS CAUSE WAY
DHARAVEE
CUSTOM HOUSE AND FERRY
MAHIM FORT
MAHIM
DONGREE
WORLEE FORT
WORLEE
TOWER
SEWREE FORT
BATTERY
TANK BUNDAR
OLD BATTERY
MAGAZINE
POWDER WORKS
MAZAGAON DOCKS
COLOWREE
MAZAGAON
BELVEDERE
CARNACS BUNDUR
OR
PIER
SLAUGHTER HO
CROSS ISLAND
OR
CHINAL TEKREE
SONAPUR




मुंबईतील किल्ल्याचा दरवाजा १८६६


वाय-४२५-३६ब.




मुंबई किल्ल्याचे फ्रेंच प्लान १७५८




मुंबईचा किल्ला १६६८




बंदरावरून मुंबई किल्ल्याचे दर्शन १६६५




आतला चर्चगेट (दरवाजा) १८६४




अपोलो गेट १८६४




चर्चगेट बाहेरचा दरवाजा १८६४




परेल रोड १८६४




चर्चगेटचा बाहेरचा दरवाजा आणि एस्प्लनेड मैदान १८६४





मापलापोल राहूल न्यायालय आणि कारागृह




बंदर, बोर्डी १८६०




लकडी बंदर, चौपाटी १८६४




कुलाबा कॉजवे १८६०




जे. जे. हॉस्पिटल्स - बाबूलाटँक १८६४




टाउन हॉल १८६४




ग्रँट मेडिकल कॉलेज




गिरगाव चौपाटीचे पूर्वस्वरूप




कागदाचे उत्पादन




बैलांचा घाणा



भंडाऱ्यांच्या दारू-भट्ट्या




रंगारी



बंदीखाना




उंचावरील सार्वजनिक संडास




THE HALALOORE


मैला वाहणारा हलालखोर




मैला वाहातूक आणि निचरा




ज्वरांची घरटी




शिवबंदर स्टेशनजवळील कपड्याच्या वखारी



गुरांचा गोठा



नवीन सोनापूर येथे मेलेली जनावरे




SHEEP SLAUCHTER HOUSE

बोकडांचा कत्तलखाना



कातडी कमावण्याचा कारखाना

33 नकाशा



महानगरपालिकेचे नवीन कचरा गोडाउन आणि गोठे आणि भंग्यांच्या झोपड्या